DAMAGE BOOK

THE BOOK WAS DRENCHED

TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192538
UNIVERSAL
LIBRARY

OUP—831—5-8-74—15,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M85 H25M Accession No. M1039

Author हरदास; बाबूशास्त्री:

Title अद्भुतरत्नावली व्याख्या

This book should be returned on or before the date last marked below.

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास

यांचीं

महाभारतावरील व्याख्यानें

प्रकाशक
नारायण शंकर दाते,
२००/३ सदाशिव, पुणें २.

(प्रथमावृत्ति)
१९५१
किंमत १० रुपये



मुद्रक
शंकर रामचंद्र दाते,
काळ छापखाना,

प्रकाशकाचें निवेदन

नागपूर येथील साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास यांचीं यंदा पुणें येथें दि. २६ मार्च १९५१ ते २३ एप्रिल १९५१ पर्यन्त (म्हणजे शिवजयंतीपासून हनुमानजयंतीपर्यन्त) महाभारतावर व्याख्यानें झालीं. हीं एकंदर व्याख्यानें उपसंहारासह २६ झालीं असून तीं आतां पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यांत येत आहेत.

मागील वर्षी त्यांचीं अशींच रामायणावर १४ व्याख्यानें झालीं होतीं व तींही त्या वेळीं प्रसिद्ध करण्यांत आलीं आहेत.

श्री. बाळशास्त्री हरदास यांचा रामायण–महाभारताचा व्यासंग किती प्रचंड, अभ्यास किती सूक्ष्म व वक्तृत्व किती अमोघ आहे याचा आतां महाराष्ट्रीयांना चांगला परिचय आहे.

पुढील वर्षीं त्यांची पुण्यास भगवान् श्रीकृष्णांवर व्याख्यानमाला व्हावयाची संकल्पित आहे. त्यांचेंही असेंच पुस्तक तयार झालें म्हणजे भारताचे जे महान् सांस्कृतिक ग्रंथ रामायण व महाभारत त्यांचें वास्तव स्वरूप साररूपानें मराठी भाषाभाषिकांना उपलब्ध होऊं शकेल. असें व्हावें एवढीच इच्छा आहे.

गोकुळअष्टमी शके १८७३
दि. २४ ऑगस्ट १९५१

प्रकाशक

★ अर्पण-पत्रिका ★



गुरुवर्य अप्रबुद्ध,
गुरुवर्य म. म. कृष्णशास्त्री घुले व
गुरुवर्य वेदांतवाचस्पति भाऊशास्त्री वझे
यांच्या चरणांना सविनय वंदन करून
माझी ही व्याख्यानमाला
युगप्रवर्तक छत्रपति श्री शिवाजी महाराज व
युगप्रवर्तक लो. टिळक
यांना मी समर्पण करतों.

बाळशास्त्री हरदास

अनुक्रमणिका

व्याख्यान		पृष्ठ
१ लें	प्रास्ताविक	१
२ रें	महाभारताचें श्रेष्ठत्व	८
३ रें	महाभारताचे टीकाकार	२१
४ थें	कम्युनिस्टांचे महाभारतावरील आक्षेप	३३
५ वें	सांस्कृतिक जीवनमूल्यांचा ऱ्हास	५१
६ वें	भारतीय राज्यसंस्थेचें स्वरूप	६५
७ वें	भारतीय राज्यसंस्थेवरील नियंत्रणें	८४
८ वें	राजसत्तेचा अधःपात	११०
९ वें	राजा धृतराष्ट्र	१३०
१० वें	धृतराष्ट्राचें स्वभावचित्र	१४८
११ वें व १२ वें	दुर्योधन	१८५
१३ वें	दुःशासन व शकुनि	२२६
१४ वें व १५ वें	महारथी कर्ण	२३९
१६ वें, १७ वें व १८ वें	राजर्षि भीष्म	३४१
१९ वें	विदुर	४४७
२० वें	महासती गांधारी	४८६
२१ वें	धर्मराज युधिष्ठिर	५१४
२२ वें	राजमाता कुंती	५६८
२३ वें	द्रौपदी	६०८
२४ वें	भीम—ज्वलंत प्रतिशोध	६६६
२५ वें	नरोत्तम पार्थ	७३६
२६ वें	उपसंहार	८६०

१. प्रास्ताविक

श्रीमन्महाभारतावरील या व्याख्यानमालेचा प्रारंभ छत्रपति शिवाजीमहाराजांसारख्या युगपुरुषाच्या जन्मदिवशीं होत आहे ही अत्यत सद्भाग्याची गोष्ट आहे. श्रीमहाराजांना महाभारतापासूनच हिंदुराष्ट्राच्या पुनरुत्थानाची स्फूर्ति झाली असें म्हणतात. श्रीशिवाजी महाराजांसारख्या सर्वश्रेष्ठ विभूतीलाही स्फूर्ति देण्याचें सामर्थ्य असलेला हा ग्रंथराज म्हणजे काय आहे हें या व्याख्यानांतून पहाण्याचा आपण प्रयत्न करणार आहोंत.

महाभारतासारख्या विषयावर पुण्यासारख्या भारतीय संस्कृतीचें विद्यापीठ असलेल्या नगरीं व्याख्यान द्यावयास सिद्ध होत असतांना मी एक प्रकारचें धाडसच करीत आहे याची मला पूर्णपणें जाणीव आहे. महाभारताच्या संशोधनाची अखंड तपस्या करणारे तपस्वी व त्यांतील प्रत्येक शब्दाचा कीस काढण्यांत क्षण नि क्षण वेचणारे विद्वान् आजही पुण्यांत विद्यमान आहेत. महाभारतांतील सर्वश्रेष्ठ प्रकरण जें श्रीमत् भगवद्गीता तीवर भगवत्पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यानंतर ज्याचें नांव उच्चारणें योग्य असा गीतेचें रहस्य प्रकाशांत आणणारा महान् भाष्यकार याच नगरीनें भारताला दिलेला आहे. महाभारताची शुद्ध आवृत्ति काढण्यासाठीं कटिबद्ध झालेल्या संशोधक संस्था येथें कार्य करीत आहेत. अशा या शहरांत आजपर्यंत कोणीही न सांगितलेलें महाभारताचें एकादें नवेंच रहस्य मी सांगूं शकेन असा अभिनिवेश कोणालाही धरतां येणार नाहीं.

ज्याप्रमाणें या नगरीचें स्थानमाहात्म्य म्हणून या विषयाला प्रारंभ करतांना माझें अंतःकरण कंपित होऊन जीभ अडखळते, त्याचप्रमाणें विषयाच्या व्यापक सर्वश्रेष्ठतेमुळेंही माझी स्थिति भांबावल्यासारखी होते. सर्व विद्यांची अधिष्ठात्री देवता, व भार-

---

व्याख्यान १ लें, दि. २६ मार्च १९५१

ताच्या सांस्कृतिक वाङमयांत पूज्यता पावलेले मंगलमूर्ति गजाननही ज्या ग्रंथाच्या गौरवामुळें जागोजागी चितनशील बनले, त्या या ग्रंथाच्या रहस्याचें उद्घाटन मी पामर काय करणार! श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या विनीत शब्दांत मी आपणांस येवढीच विनंति करतों की, केवळ माझी वाणी पवित्र होण्यासाठींच मी हा वाग्व्यापार करीत असल्यामुळे आपण "अति हळुवारपण चित्ता आणुनिया" तो ऐकावा. मला महाभारत कितपत समजले आहे तें आपल्यासमोर मी माडणार आहें. त्यांतील त्रुटी आपण भरून काढाव्या व नर-नारायणांच्या श्रेष्ठतेचें वर्णन करणाऱ्या या ग्रथाच्या रसग्रहणांत आपण व मी आपल्या जीवनांतील कांही क्षण सार्थकी लावावे एवढीच माझी इच्छा आहे.

ग्रंथविस्तार

श्रीमन्महाभारत हा एक लक्ष श्लोकांचा ग्रंथ आहे. त्याच्या विस्तारामुळेच तो ग्रथ एककर्तृक नसावा असें पुष्कळांनीं प्रतिपादन केले आहे पण केवळ विस्तार म्हणून त्याच्या एककर्तृकत्वावर ऐतिहासिक दृष्टीनें आक्षेप घेतां येत नाही. एकनाथ महाराजाच्या कालखडांत दासोपंत गोसावी या नांवाच्या एका सत कवीनें सव्वा लक्ष पदसख्येचा 'गीतार्णव' नांवाचा ग्रथ व तितक्याच पदसंख्येचा 'पदार्णव' नावाचा दुसरा ग्रथ निर्माण करून शिवाय इतर अनेक गद्यपद्यात्मक सस्कृत व मराठी ग्रंथ निर्माण केले असा मराठी वाङमयाच्या इतिहासांत उल्लेख आहे. अडीच लक्ष पदसख्येची निर्मिति करूनही ग्रंथकाराची नवीन ग्रंथनिर्मितीची शक्ति जर शिल्लक राहू शकते, तर व्यासांसारख्या दिव्य प्रतिभेच्या व्यक्तीनें एक लक्ष श्लोकांचा ग्रंथ निर्माण करणें ही गोष्ट अशक्य कोटींतील का वाटावी?

महाभारताचें महत्त्व भारतवर्षाच्या सांस्कृतिक वाङमयांत अपरंपार आहे. ब्रह्मयज्ञ नांवाच्या आन्हिक क्रियेंत महाभारताचा 'स्वाध्याय' म्हणून उल्लेख येतो. ऋग्वेदाच्या खालोखाल महाभारताला पूज्य मानण्यात येतें. जगांतील सर्व महाकाव्यांत विस्तारानें

महाभारत सर्वश्रेष्ठ आहे. 'इलियड' (Iliad) आणि 'ओडेसी' (Odyssey) या दोघांना एकत्र केलें तर जेवढा ग्रथ होईल त्याच्या आठपट तरी महाभारत मोठे आहे. रामायणापेक्षा ते चार पटीनें मोठें म्हणतां येईल. शिवाय हरिवशाची जर खिलपर्व म्हणून महाभारतांतच असलेली गणना ध्यानात घेतली तर ही संख्या अधिकच वाढते. महाभारताला केवळ महाकाव्य म्हणून म्हणता येणार नाहीं असा आपला अभिप्राय "History of Indian Literature" या भारतीय वाङमयाच्या आपल्या इतिहासग्रथांत डॉ. विन्टरनिट्झ (Winter Nitz) यानी व्यक्त केला आहे. ते म्हणतात :

"It is only in a very restricted sense that we may speak of the Mahabharat as an 'Epic' and a 'Poem'. Indeed in a certain sense, the Mahabharat is not one poetic production at all, but rather a whole literature"

ग्रंथाचें स्वरूप

महाभारतांत केवळ कुरुपांडवांच्या युद्धाचा इतिहास आहे अशी जरी रूढ समजूत असली तरी प्राचीन सांस्कृतिक संकेत तसे नाहीत. कुरुपाडवाच्या युद्धाचा इतिहास सांगण्याच्या निमित्तानें वाङमय या शब्दानें अभिप्रेत असलेले आर्य राष्ट्राचें सर्व काही या ग्रंथांत समाविष्ट झालेले आहे. महाभारताचा प्राचीन टीकाकार नीलकंठ आपल्या टीकेच्या प्रारभीच्या प्रस्तावनेत असें म्हणतो कीं,

"इह खलु भगवान्पाराशर्यः परमकारुणिको मन्दमध्यममतीननुगृह्णितुं चतुर्दश विद्यास्थानरहस्यान्येकत्र प्रदर्शयिषुर्महाभारताख्यमितिहासं प्रणेष्यन्प्रारिप्सितस्य ग्रन्थस्य निष्प्रत्यूहपरिपूरणाय प्रचयगमनाय च कृतं मंगलं शिष्यशिक्षायै श्लोकरूपेण निबध्नन्नर्थात्तत्र प्रेक्षावत्प्रवृत्यंगमभिधेयादि. दर्शयति।"

याचा तात्पर्यार्थ असा की, समाजांतील सर्व थराना मार्गदर्शन करून त्यांच्यावर कृपा करावी या हेतूने परमदयाळू व्यास महर्षीनी चौदा विद्यांच्या रहस्यांचे एकत्र दिग्दर्शन करण्याच्या हेतूनें हा ग्रथ

निर्माण केला आहे. व्यासांनीं महाभारताच्या रूपानें कोणतें महत्त्वाचें कार्य पार पाडलें याचें जें वर्णन महाभारतांत अगदीं प्रारंभीच्याच अध्यायांत केले आहे त्यांतीलच कांहीं उतारे मी येथें उद्धृत करतों म्हणजे त्यावरून प्रत्यक्ष महाभारतांतच महाभारताचें जे स्वरूप सांगण्यांत आले आहे त्याची कल्पना येईल :—

तस्याख्यानवरिष्ठस्य विचित्रपदपर्वणः ।
सूक्ष्मार्थन्याययुक्तस्य वेदार्थैर्भूषितस्य च ॥ १८

भारतस्येतिहासस्य पुण्यां ग्रन्थार्थसंयुताम् ।
संस्कारोपगतां ब्राह्मीं नानाशास्त्रोपबृंहिताम् ॥ १९

वेदैश्चतुर्भिः संयुक्तां व्यासस्याद्भुतकर्मणः ।
संहितां श्रोतुमिच्छामः पुण्यां पापभयापहाम् ॥ २१

आचख्युः कवयः केचित्संप्रत्याचक्षते परे ।
आख्यास्यन्ति तथैवान्ये इतिहासमिमं भुवि ॥ २६

इदं तु त्रिषु लोकेषु महज्ज्ञानं प्रतिष्ठितम् ।
विस्तरैश्च समासैश्च धार्यते यद् द्विजातिभिः ॥ २७

अलङ्कृतं शुभैः शब्दैः समयैर्दिव्यमानुषैः ।
छन्दोवृत्तैश्च विविधैरन्वितं विदुषां प्रियम् ॥ २८

तपसा ब्रह्मचर्येण व्यस्य वेदं सनातनम् ।
इतिहासमिमं चक्रे पुण्यं सत्यवतीसुतः ॥ ५४

ब्रह्मन् वेदरहस्यं च यच्चान्यत्स्थापितं मया ।
साङ्गोपनिषदां चैव वेदानां विस्तरक्रिया ॥ ६२

इतिहासपुराणानामुन्मेषं निर्मितं च यत् ।
भूतं भव्यं भविष्यं च त्रिविधं कालसंज्ञितम् ॥ ६३

जरामृत्युभयव्याधिभावाभावविनिश्चयः ।
विविधस्य च धर्मस्य ह्याश्रमाणां च लक्षणम् ॥ ६४

चातुर्वर्ण्यविधानं च पुराणानां च कृत्स्नशः ।
तपसो ब्रह्मचर्यस्य पृथिव्याश्चन्द्रसूर्ययोः ॥ ६५

ग्रहनक्षत्रतारागां प्रमाणं च युगैः सह ।
ऋचो यजूंषि सामानि वेदाध्यात्मं तथैव च ॥ ६६
न्यायशिक्षाचिकित्सा च दान पाशुपतं तथा ।
हेतुनैव समं जन्म दिव्यमानुषसंज्ञितम् ॥ ६७
तीर्थानां चैव पुण्यानां देशानां चैव कीर्तनम् ।
नदीनां पर्वतानां च वनानां सागरस्य च ॥ ६८
पुराणां चैव दिव्यानां कल्पानां युद्धकौशलम् ।
वाक्यजातिविशेषाश्च लोकयात्राक्रमश्च यः ॥ ६९
यच्चापि सर्वगं वस्तु तच्चैव प्रतिपादितम् ।
परं न लेखकः कश्चिदेतस्य भुवि विद्यते ॥ ७०
अज्ञानतिमिरान्धस्य लोकस्य तु विचेष्टतः ।
ज्ञानाञ्जनशलाकाभिर्नेत्रोन्मीलनकारकम् ॥ ८४
धर्मार्थकाममोक्षार्थैः समासव्यासकीर्तनैः ।
तथा भारतसूर्येण नृणां विनिहतं तमः ॥ ८५
पुराणपूर्णचन्द्रेण श्रुतिज्योत्स्नाः प्रकाशिताः ।
नृबुद्धिकौरवाणां च कृतमेतत्प्रकाशनम् ॥ ८६
इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना ।
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत्संप्रकाशितम् ॥ ८७
सर्वेषां कविमुख्यानामुपजीव्यो भविष्यति ।
पर्जन्य इव भूतानामक्षयो भारतद्रुमः ॥ ९२
ब्रूणहत्यादिकं चापि पापं जह्यादसंशयम् ।
य इमं शुचिरध्यायं पठेत्पर्वणि पर्वणि ॥ २६९
पुरा किल सुरैः सर्वैः समेत्य तुलया धृतम् ।
चतुर्भ्यः सरहस्येभ्यो वेदेभ्यो ह्यधिकं यदा ॥ २७२
तदाप्रभृति लोकेऽस्मिन्महाभारतमुच्यते ।
महत्त्वे च गुरुत्वे च ध्रियमाणं यतोऽधिकम् ॥ २७३
महत्त्वाद्भारवत्त्वाच्च महाभारतमुच्यते ।
निरुक्तमस्य यो वेद सर्वपापैः प्रमुच्यते ॥ २७४

यो विद्याच्चतुरो वेदान् साङ्गोपनिषदो द्विज ।
न चाख्यानमिदं विद्यान्नैव स स्याद्विचक्षणः ॥ ३८२
अर्थशास्त्रमिदं प्रोक्तं धर्मशास्त्रमिद महत् ।
कामशास्त्रमिदं प्रोक्तं व्यासेनामितबुद्धिना ॥ ३८३
श्रुत्वा त्विदमुपाख्यानं श्राव्यमन्यन्न रोचते ।
पुंस्कोकिलगिरं श्रुत्वा रूक्षा ध्वांक्षस्य वागिव ॥ ३८४
इतिहासोत्तमादस्माज्जायन्ते कविबुद्धयः ।
पञ्चभ्य इव भूतेभ्यो लोकसंविधयस्त्रयः ॥ ३८५
अस्याख्यानस्य विषये पुराणं वर्तते द्विजाः ।
अन्तरिक्षस्य विषये प्रजा इव चतुर्विधा ३८६
क्रियागुणानां सर्वेषामिदमाख्यानमाश्रय ।
इन्द्रियाणां समस्तानां चित्रा इव मनःक्रिया ॥ ३८७
अनाश्रित्यैतदाख्यानं कथा भुवि न विद्यते ।
आहारमनपाश्रित्य शरीरस्येव धारणाम् ॥ ३८८
इदं कविवरैः सर्वैराख्यानमुपजीव्यते ।
उदयप्रेप्सुभिर्भृत्यैरभिजात इवेश्वरः ॥ ३८९
अस्य काव्यस्य कवयो न समर्था विशेषणे ।
साधोरिव गृहस्थस्य शेषास्त्रय इवाश्रमाः ॥ ३९०

महाभारत, आदिपर्व अध्याय २

यावरून महाभारत म्हणजे निवळ कुरुपाडव युद्धाचा इतिहास नसून आर्याचे तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, राज्यशास्त्र, व्यवहार-शास्त्र, कामशास्त्र इतिहासशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांचे एकत्र विस्तारपूर्वक दिग्दर्शन करणारा महान् सास्कृतिक ज्ञानकोशच होय याची कल्पना येईल. या सास्कृतिक ज्ञानकोशाच्या महत्तेचे वर्णन मी माझ्या तुटक्या वाणीनें करण्यापेक्षां श्री ज्ञानेश्वर महाराजाच्या तेजस्वी शब्दातच तें आपणांस सांगतों. ज्ञानदेव आपल्या भावार्थदीपिकेच्या प्रस्तावनेंत महाभारताचें वर्णन करताना म्हणतात—

आतां अवधारा कथा गहन । जे सकळ कौतुकां जन्मस्थान ।
कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें ।। २८
ना तरी सर्व सुखाची आदि । जे प्रमेय महानिधि ।
नाना नवरस सुधाब्धि। परिपूर्ण हे ।। २९
कीं परमधाम प्रकट । सर्व विद्यांचें मूळपीठ ।
शास्त्रजातां वसौट । अशेषांचे ।। ३०
ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनांचें जिव्हार ।
लावण्यरत्न भाण्डार । शारदेचें ।। ३१
भानूतेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसें उजळिलें ।
तैसें व्यासमती कवळिलें । मिरवे विश्व ।। ३९
जें अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरूपम
परम मंगलधाम । अवधारीजो ।। ४९

ज्ञानेश्वरी अ. १

या महान् सांस्कृतिक ज्ञानकोशांत आर्य राष्ट्राच्या जीवनदृष्टीचें व ध्येयवादाचें यथार्थ व संपूर्ण दिग्दर्शन झालेलें आहे. त्याची मधुरता व त्याचा प्रभाव इतका विलक्षण आहे की, दोडदोन सहस्रकें तरी भारतीय मनावर त्यानें अलौकिक प्रभुत्व गाजविलेलें असून परकीय लोकांचा या वाङ्मयाच्या महासागराशी जेव्हां सबध आला तेव्हां त्यांतील अत्यंत तेजस्वी रत्नांनी त्यांच्याही मनावर विलक्षण परिणाम करून त्यांना सदांचे भारून टाकलें आहे कसें तें आपण पुढच्या व्याख्यानात पाहू.

२. महाभारताचें श्रेष्ठत्व

महाभारताच्या रचनेनंतर भारतीय मनावर त्यानें जे अप्रतिहत अधिराज्य गाजविलें तें खरोखरी अपूर्व आहे. व्याकरणशास्त्र, मंत्रशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारधर्म, आपद्धर्म, मोक्षधर्म, तत्त्वज्ञान, काव्य, छंदःशास्त्र, नाटकादि इतर ललित कृति या सर्व क्षेत्रांतून ख्रिस्तपूर्व पांचव्या शतकापासूनच महाभारताचे उल्लेख येतात. विख्यात मीमांसक कुमारिलभट्ट व भगवत्पूज्यपाद श्रीमदाद्य शंकराचार्य हे तर श्रुति म्हणूनच त्याचा उल्लेख करतात. भासाचीं बहुतेक नाटकें महाभारतांतील कथानकांवर आधारलेली आहेत. संस्कृत वाङ्मयात महाकवि म्हणून ज्यांचा उल्लेख येतो, त्यांच्या कृति महाभारतांतील उपकथानकांवर आधारलेल्या आहेत. हें पाहिलें म्हणजे "इतिहासोत्तमादस्मात् जायन्ते कविबुद्धयः" ही महाभारताच्या कर्त्याची आत्मप्रत्ययपूर्वक वृत्ति सार्थ आहे असें वाटू लागतें. "कनिष्ठिका सार्थवती बभूव" असें ज्याचें संस्कृत साहित्यांतून यथार्थ वर्णन येतें व शारदेचा विभ्रम म्हणून ज्याला गौरविण्यांत येतें, त्या कविकुलगुरु कालिदासाची विख्यात कृति जे 'अभिज्ञान शाकुतल' नाटक तें महाभारतांतील शाकुंतलोपाख्यानावर आधारलेले आहे. शाकुतलाची योग्यता स्वतंत्र वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाही. विख्यात जर्मन कवि गटे याला स्वर्ग व पृथ्वी यांच्या उत्फुल्ल वैभवाच्या एकीकरणाचा महान् साक्षात्कार शाकुंतलानें झाला होता हें प्रसिद्ध आहे संस्कृत भाषेंतील दुसरा महाकवि माघ याच्या 'शिशुपालवधम्' या प्रौढ, सुश्लिष्ट व अर्थगंभीर काव्याची रचना महाभारतांतील सभापर्वांतर्गत शिशुपाल वधाच्या प्रकरणाच्या आश्रयानें झालेली आहे. 'विद्वदौषध' असें ज्याचें यथार्थ वर्णन करतात तें श्रीहर्षाचे विख्यात नैषध काव्य महाभारतांतील नलोपाख्यानावर आधारलेलें आहे. तात्पर्य संस्कृतां-

---

व्याख्यान दुसरे, दि. २७ मार्च १९५१

तील सर्व श्रेष्ठ महाकवींच्या प्रतिभाविलासाचें अधिष्ठान व जीवन-धन म्हणजे महाभारत होय.

व्यासोच्छिष्ट जगत्त्रय

भारतवर्षातील सर्व प्रातिक भाषातून महाभारताघर जशी स्वतंत्र काव्यें निर्माण झाली त्याचप्रमाणें महाभारताचीं अनेक रूपांतरेंही झालेलीं आहेत व ती सर्व अतिशय लोकप्रियही आहेत. मराठी भाषेंत योगीद्र श्रीज्ञानदेवांपासून तों मुक्तेश्वर, मोरोपंत व वामन पंडितांपर्यंत किबहुना, रघुनाथ पंडितांपर्यंतच्या सर्व प्राचीन महाकवींच्या प्रतिभेचे उन्मेष महाभारतानेंच घडविले आहेत. अर्वाचीन खाडिलकरांसारखे नाटककार राजकीय प्रचाराप्रीत्यर्थ आपल्या कृति निर्माण करूं लागले तों त्यांना महाभारताइतकें दुसरें समर्थ साधन त्या प्रसारासाठी आढळले नाही. नुसतें वाङमयात्मक जीवनच नव्हे, तर व्यवहार्य जीवनदेखील महाभारतावर आधारलें गेलें आहे. भारताचें सर्व सांस्कृतिक जीवन महाभारतप्रणीत धर्माधर्माच्या व्याख्यांच्या सारणीतूनच निर्माण झालें आहे. महाभारतांत वर्णन केलेल्या युद्धशास्त्रांतील डावपेचांचा व व्यूहरचनेचा उपयोग भारतवर्षातील लोक अलेक्झांडर दि ग्रेटच्या काळापर्यत करीत असत व शेवटीं त्या काळांतील एका प्रजासत्ताकाच्या शकट व्यूहानेंच अलेक्झांडरच्या ग्रीक सैनिकांना कच खाऊन व माघार घेऊन परत फिरण्यास भाग पाडलें असा इतिहास आहे. व्यष्टि-समष्टींचे धर्म, विधिविधाने व प्रायश्चित्ते, आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचीं वैयक्तिक, गृह्य, व सामाजिक कर्तव्यें, त्यांच्या जीवनाचें आध्यात्मिक साध्य व त्याचीं साधने, चातुर्वर्ण्यात्मक समाजरचना, व त्यांची कर्तव्यें या सर्वांचें महाभारतांत केलेलें दिग्दर्शन प्रमाण मानून आर्य राष्ट्राचें सांस्कृतिक जीवन सहस्रावधि वर्षे चाललेले आहे. भारतांतून निर्माण झालेला भक्तिसंप्रदाय तर शतकानुशतकें भारतीय मनावर वर्चस्व गाजवीत आहे. राष्ट्रीय अधःपतनाच्या वेळीं या भक्तिसंप्रदायाच्या पुनरुज्जीवनानें महाराष्ट्रांत श्रीज्ञानेश्वर महाराजांपासूनची

संतपरंपरा निर्माण झाली तर उत्तरेंत गोस्वामी श्रीतुलसीदास भक्तकवि श्रीसूरदास प्रभृतीनी राष्ट्रीयतेच्या घटक तत्त्वांवर भारतीय समाज स्थिर केला व त्याचे देदीप्यमान पुनरुत्थान घडवून आणलें. कर्मयोगाचा दिव्य संदेश स्वत.च्या भाष्यांतून देऊन लोकमान्य टिळकानी आधुनिक युगात महाभारताच्या साहाय्याने राष्ट्रीय पुनरुत्थानाचें आंदोलन उत्पन्न केले गीतारहस्याने आमच्या आंदोलनाना नैतिक व आध्यात्मिक अधिष्ठान दिले अशी बगाली क्रातिकारकांची व त्याच्या आंतरप्रातीय कीर्तीच्या नेत्याची साक्ष आहे. तात्पर्य महाभारताच्या अपार सामर्थ्याला दिशा व काळाची बंधनें नसून पुनरुत्थानाच्या प्रत्येक क्षणी त्याचा जसा उपयोग झाला आहे त्याचप्रमाणे प्रत्येक नव्या समस्येला त्याच्यातून उत्तर मिळत गेले आहे. म्हणूनच "व्यासोच्छिष्ट जगत्त्रय" असे श्री ज्ञानेश्वर महाराजानी उद्गार काढले आहेत.

श्रीमन्महाभारतात असें म्हटलें आहे की 'यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित्!" जे येथें प्रतिपादन केले आहे तेंच सर्व विश्वात आहे व जे येथें नाही असें कोठेही काही अपूर्व आढळावयाचें नाही. याचा अर्थ असा आहे की, विश्वाच्या सर्व व्यापाराचें व त्याच्या पाठीमागच्या शाश्वत आणि अशाश्वत अशा सर्व प्रकारच्या प्रेरणांचे महाभारतात सपूर्ण दिग्दर्शन झालेलें आहे. नामे व रूपें कितीही बदलली व साधनांच्या बाह्य स्वरूपांत केवढाही थारेपालट घडून आला तरी मानसशास्त्रज्ञाचे असे मत आहे की, सामाजिक व वैयक्तिक मनोवृत्ति व तिचे नैसर्गिक व्यापार अनादिकालापासून एकरूपच असतात व त्याच्याच वेगवेगळ्या प्रकारच्या विहरणाचा व्यापार म्हणजेच मानवी इतिहासाचा ओघ होय.जो काय बदल किंवा जी काय भिन्नता असेल ती त्या विहरणाच्या बाह्य कवचापुरतीच असते. अंतःप्रेरणा व त्यांचे संघर्ष तेच चालू असतात. महर्षि व्यासांनी ही गोष्ट ओळखून या विहरणाचें व त्याच्या तरल अशा गतीचें आणि त्यामुळें घडून येणाऱ्या परिणामांचें जें भव्य चित्र महाभारतांत चित्रित केले आहे तें इतके सर्वकष स्वरूपाचें आहे कीं,

इतिहासाच्या ओघांत व्यक्ति व समाजाच्या अवस्थेतील नांवें, रूपे, व साधनाचें दृश्यस्वरूप कितीही बदलले तरी प्रत्येक संघर्षाच्या व साम्याच्या मुळाशी त्याच त्या अंतःप्रेरणा व त्याचेच विहार आढळल्यावाचून राहणार नाहीत. व म्हणूनच जे महाभारती नाही "तें नाहीच लोकत्रयी" ही ज्ञानदेवांची उक्ति अगदी सार्थ ठरते.

नवरस सुधाब्धि

काव्य म्हणून महाभारताचा विचार केला तर नवरसांचा जो अति भव्य व उत्कट आविष्कार महाभारतात दृष्टोत्पत्तीस येईल त्याच्यासमोर कोणत्याही कवीची प्रतिभा विनत झाल्यावांचून राहणार नाही. रसराज शृंगाराचें नलदमयतीसारख्या उपाख्यानातून जे आविष्करण झालें आहे त्यानें कवि, चंपूकार व शब्दसृष्टीचे इतर अनेक ईश्वर याना तर खाद्य पुरविलेंच आहे पण इतर अनेकांच्या प्रतिभेला अजूनही फुलोरा आणण्याचे त्यांत सामर्थ्य आहे. भीष्मांच्या रूपानें महाभारतकारानी विशुद्ध वीररसाचा जो आविष्कार केला आहे तो केवळ अपूर्व होय. संपूर्ण भीष्मपर्व म्हणजे त्या रसाचे महान् विधानक होय. वीररसाचा रौद्र वा भयानक रसाशीं झालेला शबलित आविष्कार सर्वत्र आढळेल. वीररसाचा शबलित परंतु उत्कट आविष्कार द्रोणपर्वातील अभिमन्यूच्या युद्धात दृष्टीस पडतो. पण भीष्मपर्वातील वीररस समिश्र नसून शुद्ध आहे. त्यांत अंगांगीभाव देखील नाही हे त्याचें खरे वैशिष्टय होय. संस्कृत साहित्यशास्त्रांत वीररसाचा स्थायीभाव उत्साही दाखविलेला आहे. बहुधा महाकवीच्या काव्यांतून वीररसाचा जो आविष्कार होत असतो तो रौद्रांतच पर्यवसित होतो. कारण विशुद्ध स्वरूपांत क्रोध या स्थायी भावाशी मुळीच भेसळ न झालेला असा उत्साहाचा आविष्कार सहसा कोणाला करतां येत नाहीं. वीररस म्हटला की, त्यांत युद्ध आलेंच व युद्ध म्हटलें की, त्यांत क्रोधाचा भाग आलाच. महाभारताच्या भीष्मपर्वात असें आढळावयाचें नाही. या पर्वाच्या नायकाच्या अंतःकरणांत केवळ क्षात्र कर्तव्यपालनाचा अपूर्व उत्साह असून त्यांत प्रतिपक्षांविषयीं मुळींच क्रोध नाहीं. उलट, त्यांतील

विशेष कुशल रणपंडितांविषयी एक प्रकारच्या वात्सल्यमिश्रित कौतुकाचा आविष्कार आहे. उत्साह या स्थायी भावाचा व वीररसाचा इतका विशुद्ध आविष्कार व्यासावांचून दुसऱ्या कोणाचीही प्रतिभा आजवर करूं शकलेली नाही निदान माझ्या तरी आढळात नाही.

वीररसाप्रमाणेच महाभारतांतील करुण रसाचा आविष्कार देखील अनुपम व अलौकिक आहे. उपाख्यानांतून देखील महाभारतानें नवरसांचे दिव्य व परिपूर्ण आविष्कार करून दाखविले आहेत. तर मग प्रत्यक्ष आख्यानाविषयी बोलावयासच नको. अभिमन्युवधानंतरचा सुभद्रा, कुंती, द्रौपदी, व युधिष्ठिर यांचा विलाप, पांडवांच्या शिबिरांतील स्मशान शांतता, व अर्जुनाचे शोकोद्गार यांनी कोणाचेंही अंतःकरण द्रवल्यावांचून राहणार नाही. अपार पराक्रमाच्या आविष्कारानंतर त्यांतूनच उत्पन्न झालेलें एक करुण वातावरण कोणाच्याही अंतःकरणाची सदाची पकड घ्यावयास समर्थ आहे. भीषण महायुद्धांत भारतांतील बहुतेक सर्व वीरश्रेष्ठांचें पतन झाल्यानंतर त्यांच्या स्त्रियांच्या दुःस्थितीच्या व विलापांच्या वर्णनासाठीं निर्माण झालेलें स्वतंत्र स्त्रीपर्व तर करुण रसाचें आगरच आहे. कर्ण आपला बंधु आहे हें समजल्यावर युधिष्ठिरानें केलेला विलाप आजही सर्वाच्या अंतःकरणाला चटका लावावयास पूर्ण समर्थ आहे. आणि तें द्रौपदीवस्त्रहरणाचें करुणामय दृश्य ! त्याची तुलना तरी कोणाला दुसऱ्या कशाशीं करतां येईल कांय ? एकवार भारतवर्षाची सम्राज्ञी होऊन जिला अभिषेक झाला, पूर्णावतार भगवान् श्रीकृष्णानें जिला आपली भगिनी म्हणून मानलें, ती महासती याज्ञसेनी मदांध सत्ताधिपाकडून भर सभेंत केस धरून फरफटत ओढीत आणली जात आहे, तिच्या केसांना हिसडे देत तिची अब्रू चवाठ्यावर मांडण्याचा निकराचा प्रयत्न सुरू आहे, डोळ्यांतून अनिवार अश्रुसरित् कोसळत आहे, व अशा स्थितींत खालीं माना घालून बसलेल्या पराक्रमी कुरुवृद्धांना " मी दासी आहें काय ? " असा प्रश्न ती विचारीत आहे हें दृश्य नुसतें कल्पनेंत आल्यावरही

ज्याचे डोळे पाणवणार नाहींत व अंतःकरण पाझरणार नाहीं त्या महापुरुषाची गणना "म वै मुक्तोऽथवा पशुः" या कोटींतच करावी लागेल.

घटोत्कच युद्ध, गीतेंतील सुविख्यात विश्वरूपदर्शन, द्रौपदीला वस्त्रें पुरविण्याचा प्रसंग, कृष्णशिष्टाईच्या वेळीं भगवान् श्रीकृष्णाचें विश्वरूपदर्शन, वनपर्वातील हनुमंताच्या स्वरूपाचा भव्य आविष्कार इत्यादि महाभारतांतील अद्‌भुत रसाचे आविष्कार प्रसिद्धच आहेत. कीचकवधाच्या प्रकरणांतील कीचकाच्या वधानंतर भीमानें केलेली त्याच्या प्रेताची दुर्दशा व दुःशासनाचा कंठनाल चिरून त्यानें केलेले रक्तप्राशन, आजही भीरूंच्या अगावर रोमांच उत्पन्न करणारा भयानक रसाचा आविष्कार म्हणून दाखवितां येण्यासारखें आहे. महायुद्धानंतर रणभूमीवरील प्रेतांच्या भोंवती मांसभक्षी श्वापदांच्या, पक्षांच्या व क्रव्यादांच्या घिरटया घालणाऱ्या थव्यांचें वर्णन, कुरतडलेल्या जिव्हांचें, फोडलेल्या डोळ्यांचें व लचके तोडलेल्या शरीरांचे वर्णन म्हणजे बीभत्सरसाचा मूर्तिमंत आविष्कारच होय. अलीकडच्या साहित्यशास्त्रांत बीभत्साला रस मानावें की नाही, त्यांत चर्वणा कशी उत्पन्न होणार व ती चर्वणा एखाद्या महाकाव्याचा विषय कसा होऊं शकेल, यासंबंधीचे वादविवाद चालू आहेत व बीभत्साला रसाच्या क्षेत्रांतून बाहेर घालवून देण्याच्या निर्णयापर्यंत हे वादविवाद पर्यवसित होत आहेत. बीभत्साला रसत्व कसें येऊ शकतें, त्यांत चर्वणा कशी निर्माण होऊं शकते, व तो महाकाव्याचा विषय कसा होऊं शकतो याचें निदर्शन म्हणजे महाभारतांतील हे प्रकरण होय असें म्हटले तरी चालेल. तें वाचून तरी कोणत्याही मर्मज्ञाला बीभत्साचें रसत्व नाकारतां येणार नाही. सौप्तिकपर्वातील अश्वत्थाम्यानें रात्री केलेल्या संहारानंतरच्या शिबिराच्या अवस्थेचें वर्णन यांतच समाविष्ट होतें. द्रोणपर्वात रौद्ररसाचा अत्यंत उत्कट आविष्कार झालेला आहे. शांतिपर्व व गीतेंतील कित्येक प्रकरणें शांतरसाचे आविष्कार म्हणून निर्देश करतां येण्यासारखीं आहेत. शांतरस म्हणजे सर्व वृत्तींची लीनता. महाभारतांत

शांतिपर्वातील कित्येक उपाख्यानातून त्याचा उत्कट आविष्कार झालेला आहे महाभारतातील हास्यरस इतका प्रसगनिष्ठ व निर्मळ आहे की घाणेरडे विष्णुशर्म्याचे वर्णन देण्याऐवजी काव्यप्रकाशकाराच्या प्रतिभेने त्याचाच उपयोग का करून घेतला नाही याचेच कोणालाही आश्चर्य वाटावे. बानगीदाखल हास्य रसाचे एकच उदाहरण मी आपणास सागतो. कीचकाच्या वधासाठी द्रौपदी व भीमसेन याच्यात बोलणे झाल्यानतर कीचकाला सकेतस्थान म्हणून विराटाच्या नृत्यशाळेत अधाऱ्या रात्री बोलविण्यात येते, तेथे आल्यानतर मचकावर पहुडलेल्या भीमसेनाच्या वज्रदेहाला स्पर्श करूनही काममोहित कीचक त्यालाच सैरध्री समजून त्याच्याशी अनुनयाचे भाषण करू लागतो. भीमसेन त्याच्या स्पर्शज्ञानाची प्रसशाही करतो हे भीमकीचक सवादाचे प्रकरण हास्यरसाचे उत्तम निदर्शन म्हणून दाखविता येईल आदिपर्वातर्गत 'बकवध' पर्वातील ब्राह्मणाच्या लहान मुलाचा गवताची काडी उचलून बकासुराला मारण्याचा आविष्कार तर निरागस हास्याचे उत्कृष्ट उदाहरणच होय महाभारताने एकेका रसाचे असे प्रचड नद निर्माण केले आहेत की, त्या सर्वाचा क्षीरसागर म्हणून कविप्रतिभाना ते सदैव महानिधान वाटावे.

महाभारतातील स्वभावचित्रे उपमान म्हणून सर्वश्रेष्ठ ठरली आहेत व भारतीय जीवनाचा ती सदैव आदर्श झाली आहेत. महाभारतातील उपाख्यानातून उपास्यसप्रदायही निर्माण झाल्याचे दृश्य निदर्शनास येते सावित्री उपाख्यानातील नायकनायिकाचा व्रतविधीत समावेश झालेला आहे विष्णुसहस्रनाम व शिवसहस्रनामयासारखी कित्येक प्रकरणे तर दैनदिन उपासनातील नित्य पाठाचा आजही विषय होऊन राहिली असून ती वाछितार्थफलप्रद असल्याचा साधकाचा आजही अनुभव आहे. महाभारताची प्रतिपाद्य व्यक्ति जी भगवान् श्रीकृष्ण तिच्यासबधी तर वर्णन करावे तितके थोडेच आहे. भारत काव्याच्या या नायकाची गणना पूर्णावतारात होत असून मत्रशास्त्र व सर्व प्रकारचे साधनमार्ग याची ती सर्वश्रेष्ठ

उपास्यदेवता आहे. तिनें सर्वांना वेड लावलें असून ज्यांचा ज्याचा हिंदुस्थानाशी सबध आला त्या परकीयानाही तिनें भारून टाकले आहे. भक्तिसप्रदायाची ती अधिष्ठात्री देवता असून तिच्या चरणी विलीन होण्यात लोक सतत धन्यता मानीत आले आहेत. भोळ्या भक्तांपासून डोळस तत्त्वज्ञांपर्यत व कुटिल राजनीतिज्ञापासून तर शुद्ध सात्त्विक धर्मनिष्ठापर्यत सदा सर्व काळी समाजातील सर्व थराची ती आकर्षण केंद्र बनून राहिली आहे.

श्रीमत् भगवद्गीतेचें अपूर्व महत्त्व

महाभारतातील भगवद्गीता–प्रकरणाला जे महत्त्व लाभले तितके दुसऱ्या कोणत्याही धर्मग्रथाला लाभलेले नाही. रेडियमच्या कणाप्रमाणे त्याची स्फुरणशालिता अखड असून समाजातील सर्व थराना सदासर्वकाळी मार्गदर्शन करण्याचे तिचे सामर्थ्य अलौकिक आहे. सर्व शास्त्राहून तिचे आगळे असणारे महत्त्व सर्वानीच मान्य केलेले असून फार प्राचीन काळापासून मुक्तिमार्गाच्या पाठ्य ग्रथात तिचा समावेश झालेला आहे सुप्रसिद्ध काश्मीरचा राजा अवतिवर्मा मरण्यापूर्वी भगवद्गीतेचा सपूर्ण पाठ ऐकून नंतरच शाश्वततेंत विलीन झाला, असे कल्हणानें आपल्या काश्मीरच्या इतिहासांत म्हटले आहे भारतीयाच्या प्रस्थानत्रयीत उपनिषदाच्या बरोबरीनें भगवद्गीतेचा समावेश असून भगवान् श्रीशकराचार्याना आपला ज्ञानमार्ग सिद्ध करण्यासाठी उपनिषदांबरोबरच भगवद्गीतेवर भाष्य लिहिणे क्रमप्राप्त ठरले राष्ट्राच्या दुर्दैवाच्या क्षणी त्याच्या पुनरुत्थानासाठी गीतेंतून आवश्यक तो सदेश देण्याची भारतीय द्रष्ट्याची परपरा अविच्छिन्न आहे. भगवान् श्रीशकराचार्यानी गीतेच्या द्वारेच आपला सदेश लोकाना दिला. श्री ज्ञानेश्वर महाराजानी भगवद्गीतेच्याच आधारे भागवत धर्माची प्रतिष्ठापना केली. लोकमान्यांनाही कर्मयोगाचा सदेश गीतेच्या द्वारेच देण्याची आवश्यकता भासली. आजही गीतेतूनच तत्त्वाच्या मजरी आपला सुगंध दरवळीत आहेत श्रीमद्भगवद्गीता हा असा अपूर्व ग्रंथ आहे की त्यावर कितीही लिहिले तरी तें पुरे वाटूच नये अशी

लोकांची अवस्था होते. विख्यात अरेबियन प्रवासी अल्बरुणी याच्या मनाची पकड गीतेनें घेतली होती. ज्ञानेश्वरांची ज्ञानदेवी, वामनाची यथार्थदीपिका, दासोपंताचा गीतार्णव, तुकाराम महाराजांची मंत्रार्थ गीता, वामनाची समश्लोकी, गीतेचे हिंदी अनुवाद, प्राचीन सर्व संप्रदाय-प्रवर्तकांची गीतेवरील भाष्यें, लोकमान्य अरविंद प्रभृतीचे गीतेवरील ग्रथ या सर्वांचा विचार केला तर असें म्हणावें लागतें की ज्या कोणाला आपलें नवे मत प्रतिष्ठापद पावावें असें वाटत असेल त्याला तें गीतेंतून सिद्ध करण्याशिवाय दुसरा मार्गच उरूं नये अशी वस्तुस्थिति आहे. आजच्या धर्मग्लानीच्या काळांतदेखील गीतेची लोकप्रियता वाढती आहे. व तिच्यावर नवनवे ग्रंथ प्रत्यही निर्माण होत आहेत. आमच्या धर्मग्रंथांतील तेजस्वी व निर्मल हिरा या शब्दांत लोकमान्यांनीं तिचें वर्णन केलें आहे तें अगदीं यथार्थ आहे यांत शंका नाही.

रामायण व महाभारत

रामायण व महाभारत हे भारतीय राष्ट्राचे दोन राष्ट्रीय ग्रंथ आहेत. त्यांपैकी रामायण हा सांस्कृतिक इतिहास असून महाभारत हा अतिप्रचंड असा सांस्कृतिक ज्ञानकोश होय. रामायणानें जीवनाचे ध्येयदर्शन घडविले असले तर महाभारतानें मानवी जीवनाची अपरिपूर्णता लक्षांत घेऊन विषम परिस्थितीच्या घट्टांधकारांतून ध्येयसिद्धीचा मार्ग दाखविलेला आहे. जोंवर हे दोन राष्ट्रीय ग्रंथ भारतीयांजवळ आहेत तोंवर भारतीयांना जगापासून दृष्टिकोन व तत्त्वज्ञान या दृष्टीनें कांहींही शिकण्यासारखें नसून उलट जगाची घडी नीट बसवून सदाची मंगलमयता उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असलेली जीवनदृष्टि या ग्रंथांच्या भरंवशावर भारतच जगाला देऊं शकेल. मात्र दुर्दैवानें भारतीयांचीच अशी परिस्थिति झालेली आहे कीं त्या ग्रंथांचा प्रकाश त्यांच्याच अंतःकरणांत समाविष्ट करावयास त्यांची धारणा समर्थ नाहीं. त्याचीं कारणें मी पुढें सांगणारच आहे.

महाभारताचें हें महत्त्व केवळ हिंदुस्थानापुरतेंच नसून हिंदुस्थानाबाहेरही या ग्रंथराजानें आपला प्रभाव दाखविला आहे. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकापासूनच ग्रीकांच्या वाङ्मयांत महाभारताचे उल्लेख येतात. इसवी सनाच्या सहाव्या शतकांत कांबोडियाच्या देवळांतून संपूर्ण भारतसहितेचें वाचन होत असे. इसवी सनाच्या सातव्या शतकांत मंगोलियांतील तुर्कांमधून महाभारतांतील हिडिंबवधासारखीं प्रकरणें काव्य म्हणून गायिलीं जात होतीं. दहाव्या शतकाच्या पूर्वी तर जावा बेटांतील लोकांनी आपल्या भाषेंतून महाभारताचें सपूर्ण भाषांतर केल्याचें आढळतें. इसवी सन १८१९ मध्यें फ्रान्झ बॉपने (Franz Bopp) जेव्हा प्रथम महाभारतांतील नलोपाख्यानाचें रूपांतर केलें तेव्हां हिंदुस्थानांतीलच नव्हे, तर जगाच्या वाङ्मयांतील एक देदीप्यमान अलंकार म्हणून पाश्चात्य साहित्यकांत त्याला प्रतिष्ठा मिळाली. पाश्चात्य देशांतील विद्यापीठांमधून संस्कृत भाषेच्या अध्ययनाला नलोपाख्यानापासूनच प्रारंभ करण्यांत येत असे असें डॉ. विन्टर निट्झनें आपल्या ग्रंथांत उल्लेखिलें आहे. जर्मन, इंग्लिश, फ्रेंच, इटालियन, स्वीडिश, झेक्, पोलिश, रशियन, नवीन ग्रीक भाषा व हंगेरियन इत्यादि जगांतील सर्व भाषांतून त्याची भाषांतरें झालीं असून जिब्रान्टिसनें १८६१ सालीं त्याच्यावर नाटक लिहिल्यानंतर फ्रान्सच्या रंगभूमीवर त्याचा प्रयोग करण्यांत आला होता. श्लेगेल्नें (A. W. V. Schlegel) त्याच्यावरच आपला असा अभिप्राय प्रकट केला कीं,

I will only say, that in my estimation, this poem can hardly be surpassed in pathos and ethos in the enthrolling force and the tenderness of the sentiments. It is made expressly to attract old and young, the high-born and the lowly, the Commisseurs and those who are merely guided by instincts.

ऋष्यशृंगाची कथा बुद्धजातकांतही घेतलेली असून ती तिबेट, चीन व जपान येथें अत्यंत लोकप्रिय झालेली आहे. डॉ. विंटर निट्झ

याला तर विदुलेची वीरगाथा, द्रोणपर्वांतील रात्रियुद्धांचें वर्णन, स्त्रीपर्वातील गाधारीच्या तोंडून येणारें रणभूमीचें वर्णन, यांची मोहिनीच पडलेली असून सावित्रीच्या उदात्त कथेनें वेड लावलें आहे. द्रोणपर्वातील रात्रियुद्धाच्या वर्णनांतील एका प्रसंगावर आपला अभिप्राय व्यक्त करताना तो असें म्हणतो की, the style recalls in some places the lyrics of Kalidas (येथील वर्णनपद्धति कांही ठिकाणी कालिदासाची आठवण करून देते). गांधारीच्या तोंडून रणभूमीचें वर्णन वदविण्यांत डॉ. विटरनिट्झला सौंदर्याचा इतका अपूर्व साक्षात्कार झाला आहे की, तो म्हणतो:—

Here follows the lament of Gandhari, which is one of the most beautiful parts of the whole epic as the master piece of elegiac poetry, as well as for the clear description of the battle-field recalling the pictures as a wereschagin The whole scenebecomes so much the more impressive owing to the fact that the poet does not himself tell the story but lets the aged mother of heroes recount what she sees with her own eyes.

सावित्रीच्या उपाख्यानासंबधानें तर त्यानें व्यक्त केलेला अभिप्राय अत्यंत हृदयगम आहे. विटरनिट्झ म्हणतो. But whoever it was who sang the song of Savitri, whether a Suta or a Brahman, he was certainly one of the greatest poets of all times Only a great poet was capable of placing this noble female character before us, so that we seem to see her before our eyes. Only a true poet could have described in such a touching and elevating manner, a victory of love and constancy of virtue and wisdom over destiny and death, without even for an instant, falling into the tone of the dry preacher of morality; and only an inspired artist could have produced, as if by magic, such wonderful pictures before us We see the deeply distressed woman walking by the side of her husband who is doomed to death ; the husband, mortally ill,

wearily lying his head on his wife's lap; the dreadful form of the God of Death, who binds the man's soul with fetters and leads it away; the wife, wrestling with the God of Death for the life of her husband; and finally the happily reunited pair wandering homwards in the moon-light with their arms about each other; and we see all these pictures in the splendid setting of a primeval Indian forest whose deep stillness we seem to feel and whose delicious fragrance we seem to breathe when we surrender ourselves to the magic of this incomparable poem The poem has frequently been translated into European languages including German, but all translations can only give a feeble idea of the incomparable charm of this Indian Poem.

"सावित्री उपाख्यानाचा कवि ब्राह्मण असो किंवा सूत असो, पण तो निश्चितपणें सर्व काळी सर्वश्रेष्ठ महाकवि ठरल्यावाचून राहणार नाही. केवळ महाकवीच इतके उदात्त स्त्रीजीवन इतक्या जिवंतपणें चित्रित करू शकतो. जणू की काय तें आजही डोळ्यादेखत घडत आहे की काय असें वाटतें. रुक्ष नीतिमत्तेच्या प्रचारकाचा सूर मुळीच न येऊ देता, प्रेम व सद्गुण आणि शहाणपण याचे सूत्र मृत्यु व वस्तुस्थिति यावर अखेरीस कसा विजय मिळवितें याचे इतके चटका लावणारें व इतक्या समर्पक रीतीने रेखाटलेले हृदयगम चित्र खऱ्या महाकवीशिवाय कोणीच निर्माण करू शकत नाही. एखादा उत्स्फूर्त कलावंतच जणू की काय जादूने निर्माण केलेले असें आश्चर्यकारक चित्र आपल्यासमोर उभे करील. मृत्यूच्या दाढेंत सापडलेल्या आपल्या पतीबरोबर त्याची सत्रस्त झालेली पत्नी चालते आहे, श्रांत झालेला तिचा पति तिच्या अंकावर मस्तक टेकून झोंपला आहे, मृत्युदेवतेची भयानक मूर्ति त्याच्या शरीरांतून प्राण ओढून घेऊन चालली आहे, ती सती पतीचे प्राण परत मिळविण्यासाठी मृत्युदेवतेशी वादविवाद करीत आहे, व शेवटी आनंदाने पुनर्मीलन घडून आलेलें तें दांपत्य एकमेकाभोवती हात टाकून चंद्र-

प्रकाशांतून फिरत व रमत आपल्या आश्रमाकडे परतत आहे, हें सर्व दृश्य हिंदुस्थानांतील वनांच्या मनोरम वातावरणांत आपण प्रत्यक्ष बघत आहोंत असा भास होऊन या अतुलनीय व दिव्य शक्तीनें भारलेल्या काव्याच्या जादुनगरींत आपण पूर्णपणें विलीन होऊन जातो. हें काव्य सर्व पाश्चात्य भाषांतून भाषांतरित झालें आहे. पण सर्व भाषांतरें, रूपांतरे, व अनुकरणें त्याची केवळ पुसट कल्पनाच काय ती देऊं शकतात." महाभारताच्या या दिव्य सौंदर्याच्या तन्मयतेंतच आपण आजचें व्याख्यान सपवू या.

३. महाभारताचे टीकाकार

श्रीमत् रामायणाप्रमाणेच महाभारतीय कथानकांच्याही अनेक प्रकारच्या विकृति झालेल्या असून कांही ठिकाणी महाभारतांतील वर्णनाला सुसंगततेसाठी म्हणून विशेष स्वरूपाची स्पष्टीकरणेंही जोडण्यांत आलेली आहेत. भारताच्या वर्णनाच्या ओघांत ज्या ठिकाणी विरोध अथवा विरोधाभास आढळले तेथें त्यावर शंका उपस्थित करून सुसंगति सुचविण्याचें काम मुख्यतः श्रीमत् भागवतानें केलेलें आहे. त्याची कांही उदाहरणेंच मी येथे देतों.

(१) महाभारतांतील वनपर्वात (अ. १५ ते २२) श्रीकृष्ण व शाल्व यांच्या युद्धाचें वर्णन आलेले आहे. त्यांतील २१ व्या अध्यायांत असें वर्णन आहे की, शाल्वांनी मायिक वसुदेव उत्पन्न करून त्याचा वध केला. आपल्या पित्याचा वध झालेला पाहून भगवान् श्रीकृष्णाला मोह उत्पन्न झाला. ती गोष्ट मिथ्या असतांनाही श्रीकृष्ण ती सत्यच समजले. स्वतः श्रीकृष्णच हें वृत्त सांगतांना म्हणतात :—

"तस्य रूपं प्रपततः पितुर्मम नराधिप ।
ययाते क्षीणपुण्यस्य स्वर्गादिव महीतलम् ॥ २३
ततः शाङ्गंधनु. श्रेष्ठं कृरात् प्रपतितं मम ।
मोहोपन्नश्च कौंतेय रथोपस्थ उपाविशम् ॥ २५

—महाभारत वनपर्व अध्याय २१

अर्थ—"शाल्वाच्या विमानांतून पडणाऱ्या माझ्या पित्याचें रूप क्षीणपुण्य झाल्यामुळें स्वर्गातून खाली ढकलून दिलेल्या ययातीप्रमाणें दिसू लागलें तें पहातांच माझ्या हातांतून शाङ्गंधनुष्य गळून पडलें व मोह उत्पन्न होऊन मी रथांतच पडलों." भागवतकारांना भगवान् श्रीकृष्णासारख्या पूर्णावतार परब्रह्माला मोह उत्पन्न होणें ही गोष्ट तर अयोग्य वाटलीच, पण प्रत्यक्ष महाभारतांतच श्रीकृष्णाला अनेक स्थळीं देवाधिदेव म्हणून संबोधण्यांत आलेलें असल्या-

मुळें त्या प्रतिपादनाशी हें वर्णन विसंगत आहे असें उघड उघड दिसून आलें, म्हणून त्यानी यावर पुढीलप्रमाणे शका काढून "असें वर्णन करणे अनुचित आहे" असें स्पष्ट शब्दात प्रतिपादन केले आहे भागवतकार म्हणतात,

एवं वदन्ति राजर्षे ऋषयः केचनान्विता ।
यत्स्ववाचो विरुध्येरन्नूनं ते न स्मरन्युत ॥३०
क्व शोकमोहौ स्नेहो वा भयं वा येऽज्ञसंभवाः ।
क्व चाखण्डितविज्ञानज्ञानैश्वर्यस्त्वखण्डित. ॥३१॥
यत्पादसेवोजितयाऽऽत्मविद्यया हिन्वन्त्यनाद्यात्मविपर्ययग्रहम् ।
लभन्त आत्मीयमनन्तमैश्वरं कुतो नु मोहः परमस्य सद्गतेः ॥३२

--भागवत दशम स्कंध अध्याय ७७

अर्थ--कांही ऋषि परमेश्वराला मोह उत्पन्न झाला असें वर्णन करतात. पण आपण एकदा जे प्रतिपादन केले त्याच्याच नेमके विरुद्ध आपण वर्णन करीत आहोंत हें ते विसरतात. केवळ अज्ञांच्याच ठिकाणी सभवणारे शोक, मोह, स्नेह वा भय हे विकार कुठे, नि अखंडित ज्ञानविज्ञानैश्वर्यमडित परमेश्वर कुठें! ज्याच्या चरणसेवेनें प्राप्त होणाऱ्या आत्मविद्येच्या आश्रयानें सर्व प्रकारचे मोह व भ्रम नष्ट होऊन आत्मज्ञानात्मक अनंत ऐश्वर्य प्राप्त होतें त्या परमश्रेष्ठ व सर्वांचें आश्रयस्थान असलेल्या परमेश्वराला मोह कसा उत्पन्न होणार ?

(२) महाभारताच्या मौसल पर्वात असे वर्णन आले आहे की.

ततः शरीरे रामस्य वासुदेवस्य चोभयोः ।
अन्विष्य दाहयामास पुरुषैराप्तकारिभिः ॥३१॥ मौसल पर्व अ. ७

अर्थ—" नतर बलराम नि श्रीकृष्ण यांची शरीरे शोधून अर्जुनाने आप्तांकडून त्यांच्यावर अग्निसंस्कार केला. श्रीकृष्ण हे सच्चिदानद परब्रह्म आहेत हें मानल्यानंतर भक्तांच्या मते त्यांना पांचभौतिक शरीर असू शकत नसल्यामुळें ते पंचमहाभूतांत विलीन करण्याचा अथवा होण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. हें भारतीय वर्णन परमे-

श्वराच्या अपांचभौतिकतेला विरोधी असल्यामुळें भागवतकारांनें त्यावर पुढील वर्णनाचा पडदा टाकलेला आहे.

लोकाभिरामां स्वतनुं धारणाध्यानमगलम् ।
योगधारणयाऽग्नेय्या दग्ध्वा धामाविशत् स्वकम् ॥ ६
सौदामन्या यथाकाशे यान्त्या हित्वाभ्रमंडलम् ।
गतिनं लक्ष्यते मर्त्यैस्तथा कृष्णस्य दैवतै ॥ ९

—भागवत एकादश स्कध अध्याय ३१

अर्थ—सर्व लोकाना अत्यत मनोरम वाटणारे, धारणा, ध्यान यांना अत्यत मगलकारक असे आपले शरीर योगमार्गाच्या अग्नि धारणेनें जाळून न टाकतां भगवतांनीं आपल्या मूलभूत स्वरूपां प्रवेश केला. ज्याप्रमाणें आकाशांत तळपून जाणाऱ्या विजेची गति सामान्य लोकांना समजू शकत नाही, त्याचप्रमाणें भगवान् श्री कृष्णाचें हें महाप्रयाण पहाण्यासाठी तेथें आलेल्या देवतांना त्यांचं गति समजू शकली नाही.

(३) भगवान् श्रीकृष्ण हा महाभारताचा प्रतिपाद्य विषय अस तांनाही धर्म, अर्थ, काम इत्यादीचा महाभारतांत जितक्या प्रमा णांत विस्तार झालेला आहे तितका भगवंताच्या वर्णनाचा झालेल नाही, असें तर भागवतकारांनी उघडपणेंच म्हटलेलें असून महाभार ताच्या वर्णनांत उद्देश जरी धर्माच्या प्रतिष्ठापनेचा असला, तर वर्णनाच्या ओघामुळें इतर गोष्टींतच मन रमून लोक श्रेयाला आंच वण्याची भीतीही भागवतकारांनी व्यक्त केली आहे. ते म्हणतात

यथा धर्मादयश्चार्थाः मुनिवर्यानुकीर्तिता ।
न तथा वासुदेवस्य महिमा ह्यनुवर्णितः ॥ ९

—भागवत प्रथमस्कंध अ. ५

जुगुप्सितं धर्मकृतेऽनुशासत स्वभावरक्तस्य महान् व्यतिक्रमः ।
यद्वाक्यतो धर्म इतीतरः स्थितो न मन्यते तस्य निवारणं जनः ॥१५

—भागवत प्रथमस्कंध अ. ५

अर्थ—नारद व्यासांना म्हणतात की, हे मुनिवर्य, ज्याप्रमा आपण धर्मादि पुरुषार्थांचें वर्णन केलें आहे त्याप्रमाणें भगवान् वास

देवाच्या महिम्याचें वर्णन केले नाही. धर्मासाठींच नि धर्माचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवावें म्हणून आपण अनेक गोष्टी वर्णन करून सांगितल्या आहेत; पण विकारवश लोकांच्या मनोवृत्तीचा विचार केला तर त्यांना आवडणाऱ्या त्या इतर गोष्टीचाच पगडा त्यांच्या मनावर अधिक वसून ते धर्ममार्गालाच आंचवण्याची भीति उत्पन्न झाली आहे. असो.

श्रीमत् भागवताचें म्हणणे आवश्यक व योग्य आहे यांत शकाच नाही. महाभारतावर स्वतंत्र रचना करणाऱ्या लोकांनीं आपआपल्या आवडीनुसार वर्णन केलेले असल्यामुळे चांगल्या चांगल्या कवींकडूनही भारताच्या प्रतिपादनाचें तात्पर्य ध्यानांत न घेतां विकृतीकरणें झाली आहेत कीर्तनकाराच्या कथांनी तर त्या विकृतीकरणांचा पुष्कळ ठिकाणी उच्चाकही गांठलेला आहे. पण भारताच्या या भारतीय विकृतीकरणात कोणताही दुष्ट हेतु नाही. भारताचे पाश्चात्य टीकाकार मात्र एक प्रकारच्या दुष्ट हेतूनेंच प्रवृत्त झालेले आढळतात. त्यासाठीं संशोधनाच्या नांवाखाली ते हेतुतः मिथ्या विधानें करतील, जातां जातां अकारणच एकादा अपसिद्धांत ठोकून देतील नि गृहीत कृत्ये सिद्धांतवजा मानण्याचा आग्रह धरून वसतील. कुठें कुठे तर संहितेंतील वर्णनाचा अर्थ नि सामान्य व्यक्तीना सहज समजू शकणाऱ्या घटनांकडेही त्यांचें दुर्लक्ष झालेलें आहे. इतर सामान्यांची गोष्टच सोडा, पण या बाबतींत उदाहरणासाठी मी हिंदुस्थानाविषयी थोडी फार सद्बुद्धि बाळगणाऱ्या डॉ. विन्टरनिट्झच्याच ग्रंथांतील कांहीं विधानें आपणांस सांगतों.

डॉ. विंटरनिट्झ

आपल्या ग्रंथांत अश्वत्थाम्याचें वर्णन करतांना डॉ. विंटरनिट्झ म्हणतात, Also Ashwathaman, one of Drona's sons महाभारतांत अश्वत्थाम्यावांचून द्रोणांना दुसरा मुलगा असल्याचा उल्लेख नाहीं. महाभारतांत ज्या दोन ठिकाणीं अश्वत्थाम्याच्या जन्माचें वर्णन आहे तें पुढीलप्रमाणें आहे:--

अलभद् गौतमी पुत्रमश्वत्थामानमेव च ।
स जातमात्रो व्यनदद्यथैवोच्चैःश्रवा हयः ॥ ४७ ॥ आदिपर्व अ. १३०
अलभद् गौतमी पुत्रमश्वत्थामानमौरसम् ।
भीमविक्रमकर्माणमादित्यसमतेजसम् ॥ ५० ॥ आदिपर्व अ. १३१

अर्थ–द्रोणपत्नी गौतमीला अश्वत्थामा नांवाचा मुलगा झाला. जन्मतःच उच्चैश्रवा घोड्याप्रमाणे त्याने गर्जना केली. गौतमीला अत्यंत पराक्रमी नि सूर्याप्रमाणें तेजस्वी अश्वत्थामा नांवाचा पुत्र झाला

डॉक्टरसाहेबानीं ही चूक अजाणता केलेली आहे हें उघड आहे.

(२) उत्तर गोग्रहणाच्या प्रसगाचें वर्णन करतांना ते लिहितात :

' Though the Kourawas harboured a suspicion that it was Arjuna who was fighting against them, they did not recognize him."

महाभारतांतील विराट पर्वात याच्या उलट अर्जुनाला लोकांनीं नुसतें ओळखलें इतकेंच नव्हे तर त्यानेंही स्वतः लोकांना आपली ओळख सांगितली असा स्पष्ट उल्लेख आहे. अर्जुन येतांना पाहून द्रोणाचार्य म्हणतात,

एतद्ध्वजाग्रं पार्थस्य दूरतः संप्रकाशते ।
एष घोष सरथजो रोरवीति च वानरः ॥ ४ —विराट पर्व अ. ५३

दुरून पार्थाचा ध्वज तळपतो आहे, रथावरील नाद नि वानराची गर्जना ऐकू येऊं लागली आहे. युद्धांत अर्जुन द्रोणांना म्हणतो.

उषिताः स्मो वने वासं प्रतिकर्म चिकीर्षवः ।
कोपं नार्हसि नः कर्तुं सदा समरदुर्जय ॥ १८ —विराट पर्व अ. ५८

अथ–आमचा वनवास संपला आहे. आवश्यक तें कार्य करावयास आम्ही प्रवृत्त झालों आहोंत. आपण आमच्यावर रागवूं नये. अर्जुन कर्णाला म्हणतो, '

एहि कर्ण मया सार्धं प्रतियुद्धस्व सङ्गरे ॥ ८ —विराटपर्व अ. ६०

त्यावर कर्ण अर्जुनाला म्हणतो,

अयं कौंतेय कामस्ते न चिरात् समुपस्थितः । १४ विराटपर्व अ. ६०

पळणाऱ्या दुर्योधनाला अर्जुन म्हणतो,

युधिष्ठिरस्यास्मि निदेशकारी पार्थस्तृतीयो युधि संस्थितोऽस्मि ।
तदर्थमावृत्य मुखं प्रयच्छ नरेन्द्र वृत्तं स्मर धार्तराष्ट्र ॥ १६

विराट पर्व अ. ६५

"युधिष्ठिराच्या आज्ञेत राहणारा मी कुतीचा तिसरा पुत्र तुझ्याशी युद्ध करावयास आलो आहे. राजासारखे वाग व न पळता माझ्याशी युद्ध कर."

(३) आपली स्वत.ची अनुमाने, प्रमाणे न देतां, सिद्धांत म्हणून लादण्याचाही प्रकार विटरनिट्झच्या ग्रथातून भरपूर आढळतो. उदाहरणार्थ सुभद्राहरणाच्या बाबतीत डॉ विटरनिट्झ लिहितो Obviously the Yadavas were a rough Shepherd Tribe with whom marriage by theft was still legitimate.

पण हें कशावरून याचें त्याच्याजवळ उत्तर नाही. भारतांतील सुभद्राहरण श्रीकृष्णाच्या समतीनें झाले आहे व त्याची कांही राजकीय स्वरूपाची कारणें आहेत तीं मी पुढें सागेन. पण बळानें नि पराक्रमानें कन्याहरणाची चाल क्षत्रियात होती असें महाभारतावरून स्पष्ट दिसतें. अर्जुनाला सुभद्राहरणामाठी प्रोत्साहित करतांना भगवान् श्रीकृष्ण असें सांगतात कीं,

प्रसह्य हरण चापि क्षत्रियाणां प्रशस्यते ।
विवाहहेतु. शूराणामिति धर्मविदो विदु ॥ २२ ॥

—आदिपर्व अध्याय २१९

शूर क्षत्रियाच्यामध्ये विवाहासाठी बळाने 'कन्याहरण' हा धर्मच होय असें धर्मवेत्ते लोक म्हणतात. उद्योगपर्वामध्यें भीष्मांनी काशीच्या राजकन्यांच्या हरणाचा प्रसग जो स्वतःच वर्णन केलेला आहे त्यांत ते असें म्हणतात की,

ते यतध्वं परं शक्त्या सर्वे मोक्षाय पार्थिवाः ।
प्रसह्य हि हराम्येष मिवतां वो नरर्षभाः ॥ १५ ॥

—उद्योगपर्व अ. १७३

हे राजांनो तुमच्यात सामर्थ्य असेल तर तुम्ही या कन्यांना सोडवा. तुम्ही सगळे पहात असताना मी बळाने त्यांचें हरण करतों. जर 'प्रसह्यहरण' यादवांना हीन ठरवीत असेल तर भीष्म व कौरव राजकुलांच्या बाबतीतही तोच न्याय लागू होईल. एक अनुमान ज्या कारणांसाठी एका ठिकाणीं वापरलें आहे त्याच कारणासाठी तें दुसऱ्याही ठिकाणीं वापरले जाईल. महाभारताप्रमाणे यादव हे क्षत्रिय व शुद्ध क्षत्रिय होते हें निर्विवाद आहे.

(४) शल्याच्या बाबतीत लिहितांना डॉ. विंटरनिट्झ लिहितात

Shalya is to fight on the side of the Kouravas, but as Karna's charioteer, is to drive chariot badly and thus cause Karna's fall.

आणखी दुसऱ्या एका ठिकाणीं ते लिहितात,

Although we already know that this happens in consequence of the treachery of Shalya, the matter is here presented as .. ' Brahman-Shap '

पण हें सगळें अनुमान निराधार आहे. कर्णाचा रथ वाईट रीतीने चालवावा असें युधिष्ठिरानें शल्याला म्हटलेलें नाहीं व शल्यानेंही आपण तें करणार असल्याचें कोठेंही म्हटलेलें नाहीं. युधिष्ठिराची शल्याला अशी विनति आहे की,

तत्र पाल्योऽर्जुनो राजन् यदि मत्प्रियमिच्छसि ।
तेजोवधश्च ते कार्यः सौतेरस्मज्जयावह ॥ ४४

—महाभारत उद्योगपर्व अध्याय ८

आपण जर माझे प्रिय करूं इच्छीत असाल तर अर्जुनाला वांचवावें व त्यासाठी ज्यावेळी आपण कर्णाचें सारथ्य कराल त्या वेळी त्याचा तेजोवध करावा. रथ वाईट चालवून हा तेजोवध करावयाचा नव्हता. तेजोवधाचा प्रकार सांगताना शल्य स्वतःच असे म्हणतो की,

तस्याहं कुरुशार्दूल प्रतीपमहितं वचः ।
ध्रुवं सकथयिष्यामि योद्धुकामस्य संयुगे ॥ ४७ ॥

यथा स हृतदर्पश्च हृततेजाश्च पांडव ।
भविष्यति सुखं हन्तुं सत्यमेतद्ब्रवीमि ते ।। ४८ ।।

-- महाभारत, उद्योगपर्व, अ ८

अर्थ–मी त्याच्याविरुद्ध व त्याला न रुचणारें बोलून त्याचा अहकार व त्याचें तेज अशा पद्धतीने नष्ट करीन की, तू त्याला सहज मारूं शकशील.

श्री. चितामणराव वैद्य यांनी या शल्यप्रकरणावर असा आक्षेप घेतलेला आहे की, शल्यासारखा मनुष्य दुर्योधनाला साहय्य केल्याचे मान्य केल्यावर कर्णाच्या तेजोवधासारखे विश्वासघाताचे कृत्य करणें शक्य नसल्यामुळें हें सगळें प्रकरणच प्रक्षिप्त असावें. जे जे आपल्याला उलगडले नाही ते तें प्रक्षिप्त म्हणण्याची संशोधकांची नेहमीचीच सोपी रीत आहे. महाभारतांतील शल्यप्रकरणाचा विचार केला तर असें आढळून येतें की, शल्याची वचना करूनच दुर्योधनाने त्याला केवळ शब्दांत पकडून आपल्या बाजूस ओढलें वास्तविक शल्य पांडवांपैकी नकुल–सहदेवांचा मामा. आपल्या भाच्यांवर द्यूतांतून झालेल्या अन्यायामुळें, सती द्रौपदीच्या विटबनेमुळें नि पांडवांना भोगाव्या लागलेल्या अपार आपदांमुळें त्याचें अंतःकरण तिळतिळ तुटत होतें या सगळ्या प्रकारांचा वचपा काढण्यासाठी पांडवांना युद्धात साहाय्य करावें म्हणूनच तो येत होता. दुर्योधनाच्या वचनेनें फसल्यानतर पांडवांच्या शिबिरांत येऊन त्यानें युधिष्ठिराच्या जयाची अभ्यर्थना केली आहे. इतकेंच नव्हे, तर कर्णानें द्रौपदीचा केलेला अपमान त्याच्या अंत करणांत खुपत होता. त्याने असे स्पष्ट उद्गार काढले आहेत की,

यच्च दुःखं त्वया प्राप्तं द्यूते वै कृष्णया सह ।
परुषाणि च वाक्यानि सूतपुत्र कृतानि वै ।। ५० ।।

--महाभारत उद्योगपर्व अ. ८

तात्पर्य वचकाची वचना करणे नि छलकपटाशी छलकपटानें वागणें याला महाभारतांत अथवा हिंदुधर्मशास्त्राच्या कोणत्याही ग्रंथांत निषिद्ध मानलेलें नाही. 'धटासी आणावा धट, उद्धटासी

उद्धट, खटनटासी खटनट, अगत्य करी । हे समर्थांचें वचन सुप्रसिद्धच आहे. शल्यानें तेंच केले असलें तर त्याला विश्वासघातकी कसें ठरवितां येईल ? व तेवढ्यावरून साऱ्या शल्यप्रकरणाला प्रक्षिप्त ठरविण्याचे कारण काय ? तात्पर्य सशोधकाची ही मन-कल्पित कल्पना आहे.

याप्रमाणें महाभारतातल्या अत्यत माध्या गोष्टीच्या बाबतीत देखील मूळ संहितेच्या उल्लेखाचा विचारही न करतां आपली मतें "ठोकून देतों ऐसाजे" या पद्धतीनें सागणाऱ्या पाश्चात्यांच्या सशोधनांत एक प्रकारचा हेतुगर्भ दुष्टपणाही आहे. हिंदुस्थान देशाच्या राष्ट्रीय अभिमानाला नष्ट करून टाकावयाचें, त्या देशांतील धर्म, सस्कृति, व आत्माभिमान या गोष्टींची निदा-नालस्ती करावयाची, केवळ आधारहीन अनुमाने सिद्धांत म्हणून जोरानें सांगावयाची असा हा सारा प्रकार आहे. हल्लीची महाभारत संहिता मुळांत एक वीररसप्रधान काव्य असून ब्राह्मणांनी आपलें महत्त्व वाढविण्यासाठीं मागाहून तिच्यांत अनेक गोष्टी घुसडल्या असें डॉ. विटरनिट्झचें मत आहे व त्याच्याप्रमाणेच अनेकांचाही तो तर्क आहे. तो लिहितो,

The more the heroic songs grew in favour and more popular they became, the greater was the anxiety of the Brahamins to take the possession of this epic poetry also and 'they had the art of compounding this poetry, which was essentially secular in origin, with their own religious poems and the whole stock in trade of their theological and priestly knowledge"

पण हें कशावरून याचें उत्तर "मला असें वाटतें म्हणून" या पलीकडे या लोकांना देतां येत नाहीं. फार तर काय पण दालमन यानें महाभारतावर आपला अभिप्राय प्रकट करतांना ज्यावेळीं असें सांगितलें कीं, "भारत हे भारतीय क्षत्रियांची कर्तव्यनिष्ठा व क्षात्रधर्म सांगणारा धर्मग्रंथ असून त्याचें केंद्र भगवद्गीता व नारायणीय धर्म हें आहे, आणि त्याच्याभोंवतीं अत्यंत कलात्मक रीतीनें इति-

हासाची गुफण करण्यात आलेली आहे, तेव्हां त्याच्यासंबधी Such a point of view is justifiable, असें म्हणण्यापलीकडे विटर निट्झला त्याचे खडण करतां आले नाही तरीपण I myself believe the real nucleus of the Mahabharat is heroic poem of the conflict between the Kouravas and the Pandavas असें म्हणून स्वत.चा आग्रह सोडावयास काही विटरनिट्झदेखील सिद्ध नाही.

श्रीकृष्ण देखील एक नसून ते तीन चार असले पाहिजेत अशीही कल्पना पाश्चात्य पडितांनी लढविलेली आहे व तिला आमच्या देशांतील डॉ भांडारकर प्रभृति लोकांचाही पाठिबा आहे. याचें कारण काय असें जर विचारले तर ते मोठें विचित्र सागण्यांत येतें. डॉ. विटरनिट्झ म्हणतो, It is difficult to believe that Krishna the friend and councellor of the Pandavas, Krishna the hera'd of the doctrines of the Bhagavat Geeta, Krishna the youthful hero and demon-slayer, Krishna the favourite and the lover of cowherdesses, finally Krishna the incarnation of the exhalted God Vishnu can be one and the same person. It is far more likely that there were two, or several traditional Krishnas were merged into one deity at a later time. डॉ. भाडारकरांनीही हेंच मत मान्य केलें आहे. यावर लोकमान्य टिळकांनी गीतारहस्यांत दिलेलें उत्तर मी येथें उद्धृत करतों म्हणजे निराळ्या विवेचनाची आवश्यकता नाही. लो. टिळक म्हणतात, "तीन किवा चार निरनिराळे श्रीकृष्ण झाले असून त्यांपैकी प्रत्येकानें त्यांत थोडी थोडी भर घातली असेल असें मानण्याचें कारण नाही व मानण्यास पुरावाही नाही. मूळ धर्मांत घडत आलेल्या बऱ्यावाईट फरकावरून ही कल्पना बसविलेली आहे. पण बुद्ध, ख्रिस्त किवा महमद एकेक असतांही त्यांच्या त्यांच्या धर्मांतही जर पुढें पुष्कळ बरेवाईट फरक झालेले आढळून येतात तर मूळच्या भागवत धर्मास पुढें निरनिराळीं स्वरूपे प्राप्त झालीं म्हणून अगर श्रीकृष्णाबद्दल पुढें निर-

निराळ्या कल्पना निघाल्या म्हणून निरनिराळे श्रीकृष्ण मानण्याचें आमच्या मतें कांही कारण नाही. कोणताही धर्म घेतला तरी कालांतरानें त्याची अशी रूपांतरें होणें अगदीं सहज व स्वाभाविक आहे. त्यासाठी भिन्नभिन्न कृष्ण, बुद्ध अगर ख्रिस्त मानण्यास नकोत. श्रीकृष्ण, यादव व पाडव किंवा भारतीय युद्ध या ऐतिहासिक गोष्टी नसून कल्पित कथा आहेत असेही तर्क कित्येक लोक, विशेषतः कांही पाश्चिमात्य तार्किक काढीत असतात. आणि कित्येकांच्या मतें महाभारत हें एक मोठे थोरलें अध्यात्मपर रूपक आहे. पण आमच्याकडील प्राचीन ग्रंथाचा पुरावा पाहिला तर या शका निराधार होत असें कोणाही निःपक्षपाती मनुष्यास कबूल करावें लागेल. सारांश श्रीकृष्ण चार पांच नसून एकच ऐतिहासिक पुरुष होते असें आमचें मत आहे. कित्येकांचा यावर असा आक्षेप आहे की, श्रीकृष्ण व पांडव हे जरी ऐतिहासिक पुरुष असले तरी श्रीकृष्ण या एका क्षत्रिय योद्धयास प्रथम एका महापुरुषाचें, नंतर विष्णूचें आणि क्रमाक्रमानें अखेर पूर्ण परब्रह्माचे रूप ब्राह्मणांनीं देईपर्यंत दरम्यान पुष्कळ काळ लोटला असावा. पण या म्हणण्यांत कांही अर्थ दिसत नाही. कोणाला देव मानावें व कोणाला देव मानूं नये याबद्दलची आधुनिक तार्किकांची समजूत आणि दोन चार हजार वर्षापूर्वीच्या लोकांची समजूत यांत महदंतर पडलेले आहे. आणि ज्ञानी पुरुष स्वतःच ब्रह्ममय होतो असा श्रीकृष्णापूर्वीच्या उपनिषदांत सिद्धांत केलेला असून मैत्रेय्युपनिषदांत रुद्र, विष्णु, अच्युत, नारायण हे सर्व ब्रह्मच आहेत असें स्वच्छ म्हटलें आहे. मग श्रीकृष्णास परब्रह्मत्व येण्यास वेळ लागण्याचे कारण काय? इतिहासाकडे पाहिलें तरी बुद्ध आपल्या स्वतःला ब्रह्मभूत म्हणत असून त्याच्या हयातीतच त्यास देवाचा मान मिळूं लागला होता. व त्याच्या मरणानंतर लवकरच त्यास देवाधिदेवाचे किंवा वैदिक धर्मांतील परमात्म्याचें स्वरूप प्राप्त होऊन त्याची पूजाही सुरू झालेली होती असें विश्वसनीय बौद्ध ग्रथावरून दिसून येतें. आणि ख्रिस्ताची गोष्टही तशीच आहे. बुद्ध व ख्रिस्त धर्मांच्या मूळ पुरुषा-

प्रमाणें भागवत धर्माच्याही प्रवर्तकास पहिल्यापासूनच ब्रह्माचें किंवा देवाचें स्वरूप प्राप्त होण्यास कोणतीच हरकत येण्याचें कारण नाही." (गीतारहस्य (आवृत्ति १९१५) पृष्ठ ५४२ ते ५४४)

सांस्कृतिक दृष्टचा आपल्यापेक्षां कोणीही श्रेष्ठ नाही असा दर्प व ज्यांना हीन लेखावयाचें आहे त्यांना सांस्कृतिक दृष्टचा हीन ठरविण्याची प्रवृत्ति या दोषांनी पाश्चात्य दृष्टि डागळलेली असल्यामुळें तिचा डोळसपणाने व जपूनच विचार केला पाहिजे. भारतीयांनी आपल्या सांस्कृतिक ग्रंथांच्या विषयी "यद्वै किंचन साहेव अब्रवीत् तद् भेषजम्।" या पद्धतीनें त्यांच्या सिद्धांताकडे पाहू नये इतकेंच माझें म्हणणें आहे. भारताच्या सांस्कृतिक ग्रथावर याहूनही अधिक विकृत स्वरूपाचा व दुष्टपणाचा अत्याचार करण्यास भारताचेच कांहीं पुत्र प्रवृत्त झाले आहेत. ते म्हणजे भारतीय कम्युनिस्ट होत. त्यांच्या महाभारतावरील अत्याचाराचें पुढच्या व्याख्यानांत दिग्दर्शन करून मी भारताच्या विषयाला हात घालीन.

४. कम्युनिस्टांचे महाभारतावरील आक्षेप

कम्युनिस्टांचे महाभारतावरील अत्याचार प्रसिद्ध कम्युनिस्ट पुढारी श्री एस. ए. डांगे याच्या 'India from primitive Communism to Slavery' या पुस्तकांतून दृष्टोत्पत्तीस येतात. डांगे यानी हे पुस्तक केवळ महाभारतासाठी लिहिलेले नसून वेदांपासून महाभारतापर्यंतच्या सर्व भारतीय वाङ्मयाचा मार्क्स व लेनिनिझमच्या भौतिक इतिहासप्रक्रियेने उलगडा करण्यासाठी म्हणून हे पुस्तक लिहिलेले आहे. तें एकाद्या विद्वानाने सत्यसंशोधनासाठी लिहिलेले पुस्तक नसून सर्व जगात निरीश्वरवादाची नि जडवादाची प्रतिष्ठापना करावयास बद्धपरिकर झालेल्या रशियानियंत्रित कम्युनिस्ट योजनेचा एक प्रचारात्मक भाग म्हणजे डांगे यांचे पुस्तक होय.

हें पुस्तक इतर अनेक ग्रंथांप्रमाणें केवळ एखाद्या ग्रंथालयांत राहावयाचें नसून कम्युनिस्टांच्या तत्त्वाप्रमाणे त्याचा पद्धतशीर प्रचार करण्यांत येईल. त्यांत दिग्दर्शित केलेल्या तत्त्वांचा, प्रतिपादनाचा, व भारतीय इतिहासासंबधीं केलेल्या उलगड्याचा कम्युनिस्टांच्या अभ्यासमंडळांतून पद्धतशीरपणे प्रचार करण्यांत येऊन भारतीय तरुण मनावर त्यातील कुसस्कार घडविण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात येईल, इतके त्या पुस्तकाला महत्त्व आहे. डांगे हे भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे संस्थापक व अत्यत प्रभावशाली पुढारी आहेत. त्यांचा त्याग मोठा आहे. पक्षाच्या सेवेची त्यांची तपश्चर्या मोठी आहे नि त्यांची बुद्धिमत्ताही अत्यंत कुशाग्र आहे. पण पक्षविशिष्ट धोरणामुळें रशियन तंत्राचा एक भाग म्हणून भारतीय वाङ्मयाचें त्यांनीं विडंबन चालविलें आहे. रशियामध्यें रशियन नियंत्रणाखालीं सर्व जगांतून धर्ममूल्याची व नीतिमूल्यांची हकालपट्टी करून त्या जागी पद्धतशीर रीतीनें निरीश्वरवादाची प्रतिष्ठापना करण्यासाठीं नुकतेंच एक मडळ स्थापन झाल्याचें. वर्तमान-

पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून मी म्हणतों या गोष्टीची सत्यता विचारवंतांना पटल्यावांचून राहणार नाहीं. कम्युनिस्टांच्या भौतिक इतिहासप्रक्रियेचा ओघ भारतीय जीवनमूल्यें व सांस्कृतिक ग्रंथ यांच्याशीं टक्कर होतांच अनेकवार अडून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या आहेत. ही अडचण ध्यानांत घेऊन " माझी इतिहास-प्रक्रिया हिंदुस्थानला लागू होत नाही असें तुम्ही म्हणतां काय, कशी होत नाही तेंच मी आतां पहातों ! " अशा अभिनिवेशानें दंड थोपटून कम्युनिस्टांचा हा नेता भारतीय सांस्कृतिक वाङ्मयाच्या विडंबनार्थ प्रवृत्त झाला आहे! त्यामुळें आणि कम्युनिस्टांचा जगांतील वाढता प्रभाव लक्षांत घेऊन डांगे यांच्या पुस्तकांतील प्रमेयांचा विचार करतांना भारतीय तरुण मनानें त्यांतील अपसिद्धांत व अपप्रचार पूर्णपणें लक्षांत घेतले पाहिजेत इतकेंच माझें म्हणणें आहे. जें सत्य असेल तें निर्भीडपणें मांडावयास व स्वीकारावयास मुळींच अडचण नाहीं. पण सत्याच्या नांवाखालीं आत्मवंचनेचे प्रयत्न न ओळखण्याइतकें कोणीही भाबडेंपण स्वीकारूं नये असें मला वाटतें. डांगे यांचें पुस्तक सर्वच बाबतींत विचार करून खोडून काढण्यासरखें आहे. पण माझ्या विषयाच्या मर्यादेमुळें मी केवळ महाभारतापुरताच त्याचा विचार करणार आहें.

डांगे यांचा आरोप

श्री. डांगे यांनी आपल्या पुस्तकाच्या उपोद्घातामध्यें (पृ. १-४) गेल्या १५० वर्षांत न्या. तेलंग, रानडे, भांडारकर, राजवाडे, लो. टिळक, दीक्षित, डॉ. जयस्वाल प्रभृति सर्व संशोधकांचा इतिहास लिहिण्यांतील हेतु सत्यसंशोधनाचा नसून भारतीय राष्ट्राच्या आत्माभिमानावर निखारे टाकणाऱ्या पाश्चात्य संशोधकांना गप्प बसवून ब्रिटिश सरकारविरुद्ध करावयाच्या आंदोलनाला नैतिक अधिष्ठान व ऐतिहासिक पार्श्वभूमि मिळवून देण्याचा होता आणि त्यांचें संशोधन नि प्रतिपादन याप्रमाणें हेतुगर्भ असल्यामुळें त्यांतून सत्यदर्शन झालेलें नाहीं, असें म्हणून त्याची बोळवण केलेली आहे.

ते आपल्या "India From Primitive Communism to Slavery" या पुस्तकांत लिहितात,

Indian writers and historians had almost developed a craze to prove that not only were we ancient but that everything that now exists in the world, as part of civilisation, was once with us, and we knew it all in science, philosophy, politics, etc. If Kant was great in Philosophy, our Shankar was one greater. If Shakespeare was great in literature, our Kalidas was one greater. If you had Rousseau's, social contract in politics, we too had one like it. We had Aeroplanes, Railways, Explosives, and what not ? And we had all this when the English or Enropeans were wearing bearskins We dug up our ancient walls and moats, our *Bhoorja patras*, and papyrii to build a defence against the foreign enemy who was trying to anihilate us. History was used by the English Rulers of India to demoralise the rising freedom movement, to build a psychosis in the leadership of the people that compared to world history, its age, its achievements India and its people were nowhere; and whatever of its history was known, led to one conclusion that this country and its people were historically destined to be always conquered and ruled by foreign invaders.

Serious and responsible historians of *Cambridge History* and other works propagated this thesis. The English spoke as the inheriters of the civilisation of Greece and Rome, claimed the first place in ancient civilisation for them and for Egypt and Palestine; they denied that *Mahabharat* had any meaning or reality, that the Vedas of the Hindus were a historical record, or that our history could go beyond that of the Greeks whose Alexander conquered some parts of India. In order to fight it, our historians went to prove that India's history really

almost begins world history of present man. Tilak says in his "Arctic Home in the Vedas" that "the interglacial Aryan civilization and culture must have been of a higher type than is usually supposed to be; and that there is no reason why the primitive Aryans should not be placed on an equal footing with the prehistoric inhabitants of Egypt on point of culture and civilization"

The celebrated volume of Jayaswal on ancient *Hindu Polity* was written with the motive to refute the assertions of the British ruling class that India was unfit for parliamentary democratic institutions by showing that ancient India had republics and "self-governing democracies.

The works of Tilak, Rajwade, Ranade, Jayaswal, Paoga, Kunte, Bhandarkar, Ketkar and a host of others have done a great deal to lay down the outlines of the history of India But so far most of the material has been presented with one purpose–to combat the view of Indian History as given by the European (British) writers.

Such militant history-writing had its use in the struggle against British power. But just as it gave the Indian Nationalist a certain morale, it also gave him a false sense of values regarding the past, and made him venerate everything that was of the past, but had ceased to be of any use in the present, or had become a positive hindrance. —(India : From primitive Communism to slavery Pp. 1–4)

म्हणजे भारतीय लेखकांनी व इतिहासज्ञांनीं आपलें सर्व सामर्थ्य हें सिद्ध करण्यासाठींच खर्ची घातलें आहे कीं, आम्ही केवळ प्राचीनच नसून, शास्त्रें, तत्त्वज्ञान, राजकारणशास्त्र इत्यादि जें जें कांही संस्कृतीचा भाग म्हणून आज जगांत नांदतें तें तें सर्व आमच्याजवळ एकदां होतें व आम्हांला माहीत आहे. जर कॉन्ट तत्त्वज्ञानांत श्रेष्ठ असेल तर आमचा शंकर त्यापेक्षां मोठा होता. जर शेक्सपिअर

वाङ्मयांत मोठा असेल तर आमचा कालिदास त्यापेक्षां मोठा होता. रूसोचे राज्यशास्त्र व सोशल कान्ट्रॅक्टची कल्पना तुमच्याजवळ असेल तर ती आमच्याजवळ नाही असे नाही. आमच्याजवळ विमानें होतीं. आगगाडया, विध्वसक साधने, सर्व होतें. नव्हतें काय? जेव्हां इग्रज व युरोपिअन उघड्या अगाने फिरत होते तेव्हाच आमच्याजवळ हे सर्व काही होते.

या इतिहास–लेखकाच्या मागची हीच खरी प्रेरणा होती. आम्हांला हीन लेखू पाहणाऱ्या परकीय शत्रूविरुद्ध भूर्जपत्रे व ताडपत्रे सरसावून आम्ही प्राचीन इतिहासाच्या भिती खणून प्रतिकाराची सिद्धता करीत होतो

हिदुस्थानातील ब्रिटिश राज्यकर्त्यानी भारतीय स्वातत्र्याच्या चळवळीचे नैतिक अधिष्ठान नष्ट करून ऐतिहासिक दृष्ट्याच हिदुस्थानांतील लोक जगांत कवडी किमतीचे असून परक्यानी त्याच्यावर राज्य करणे आणि त्याना जिकणे हेच त्यांच्या इतिहासाच्या ओघात बसतें हे सिद्ध करण्यासाठीच इतिहासाचा उपयोग केला. केंब्रिज विद्यापीठाच्या इतिहासाचे गंभीर, नि दायित्व अगावर घेणारे इतिहासज्ञ देखील याच गोष्टीच्या प्रचारासाठी खपत होते. या गोष्टीशी टक्कर देऊन मानवी इतिहास जर कांहीं असेल तर तो हिदुस्थानापासूनच सुरू होतो हें सिद्ध करण्यासाठीच भारतीय सशोधक पुढे सरसावले ग्रीस व रोमच्या सस्कृतीतून वाढलेले इग्रज लोक स्वत च्या सस्कृतीला नि इजिप्त आणि पॅलेस्टाईनच्या संस्कृतीला प्रथम श्रेणीचें स्थान देऊन, महाभारताला कांही अर्थ आणि सत्यता नसून वेदांचा इतिहासाशी कांही संबध नाही आणि ज्यांच्या शिकंदराने हिदुस्थानचा कांही भाग जिकला त्या ग्रीकांपूर्वी हिदुस्थानास कांहींही इतिहास नाही असे प्रतिपादीत होते, त्यांना उत्तर देण्यासाठीच भारतीय इतिहास-लेखकांनी लेखन केले. उदाहरणार्थ टिळक आपल्या "आर्क्टिक होम इन दि वेदाज," या ग्रंथांत म्हणतात, "आर्याची सस्कृति व सभ्यता समजण्यांत येते त्यापेक्षां निश्चितच अधिक श्रेष्ठ श्रेणीची असली पाहिजे आणि सभ्यत

आणि संस्कृतीच्यासबंधी प्रागैतिहासिक काळांतील इजिप्शियनापेक्षा आर्यांना कमी लेखण्याचें कोणतेंही कारण दिसून येत नाही. जयस्वालांचा 'प्राचीन हिंदुराज्यसंस्था' हा विख्यात ग्रंथ असाच विशिष्ट राजकीय हेतूसाठीच लिहिलेला आहे. ब्रिटिश लोक "लोकतन्त्रात्मक राज्यकारभाराला हिंदुस्थान अयोग्य आहे" असें प्रतिपादन करीत होते याच्या उलट प्राचीन भारतांत गणराज्यें व स्वयशासित लोक–तन्त्रात्मक राज्यव्यवस्था होती हे सिद्ध करून आपली त्याविषयीची पात्रता सिद्ध करणें हाच जयस्वालांच्या लिहिण्यांतील हेतु आहे. टिळक, राजवाडे, रानडे, जयस्वाल, पावगी, कुंटे, भांडारकर, केतकर, आणि इतर भारतीयांचा संघच्या संघ प्राचीन भारताच्या इतिहास-लेखनास प्रवृत्त झाला तो केवळ या उद्देशानें. या सैनिकी बाण्याच्या इतिहासलेखनाचा उपयोग ब्रिटिश सत्तेविरुद्ध युद्ध करीत असतांना होता यांत शंका नाहीं. पण ज्याप्रमाणें या इतिहासलेखनानें भारतीय राष्ट्रवाद्यांना काही विशिष्ट प्रमाणांत नैतिक पार्श्वभूमि मिळवून दिली, त्याचप्रमाणे प्राचीन भारताविषयींच्या मूल्यांच्या अत्यंत चुकीच्या कल्पना त्यांच्या मनांत बद्धमूल करून त्याला प्रत्येक प्राचीनत्वाचा दुरभिमानी बनविले. त्यामुळें तें इतिहासलेखन आज तर निरुपयोगी झालेंच आहे, पण इतिहासदर्शनाच्या दृष्टीनें तें निश्चित विरोधक व तापदायकच झालें आहे.

डांगे याचा हा किती सफाईदार वार आहे! लेखणीच्या एकाच फटकाऱ्यानें त्यांनी येथें कितीतरी गोष्टी सांगितल्या आहेत! एकतर त्यांना आतां कोणाचीही मतें पद्धतशीर व प्रमाणबद्ध रीतीने खोडून काढण्याची आवश्यकता उरली नाहीं. आणि सर्वच्या सर्व इतिहासलेखकांना बुर्झुआंच्या वर्गात लोटून त्यांच्या परिश्रमावर बोळा फिरवितां आला! टिळकांनी अनेक प्रमाणें दाखवून आर्यांची प्राचीनता व सुसस्कृतता सिद्ध केली. ती खोटी ठरविण्याच्या भानगडीत न पडतां डांगे व त्यांचे अनुयायी फक्त इतकेंच म्हणणार की, हें सारे तुम्ही राष्ट्राभिमानाच्या दृष्टीनें लिहिलें तें ठीक आहे. पण तें कांही खरें नाहीं. त्यासाठी टिळकांचा सिद्धांत खोडून टाकण्याची

त्यांना यातायात नको. रहस्यसिद्धांताच्या बाबतीत तुम्ही युरोपिअनांशीं भांडतां हें ठीक आहे, पण वस्तुस्थिति कांही अशी असूं शकत नाहीं असें म्हटलें म्हणजे डांगे याचें काम संपतें! वेदांग-ज्योतिषासारख्या विषयावर तपेची तपें घालविणाऱ्या व्यक्तीपासून तर वर्षानुवर्षे मनन-चिंतनांत घालवून प्राचीन भारतीय ग्रंथांचा अभ्यास करणाऱ्या राजवाडे, भांडारकर प्रभृतींना अशा सुलभ रीतीनें दूर सारण्याची ही युक्ति संस्थानांमागून संस्थानें लेखणीच्या एकाच फटकाऱ्यानें धुळीस लोळविणाऱ्या डलहौसीवरही अधिक ताण करणारी आहे यांत शंका नाहीं!

याप्रमाणें दुसऱ्यावर खोटे हेत्वारोप करून स्वतः डांगे तरी सत्य-संशोधनाच्या हेतूस्तव इतिहासलेखनास प्रवृत्त झाले आहेत काय? 'नाहीं' असें त्याचें उत्तर आहे. किंबहुना त्यांनीं बोळवण केलेल्या संशोधकांनीं परिश्रमपूर्वक नि सप्रमाण तरी लेखन केलेलें आहे, पण डांगे यांनीं तेंही केलें नाहीं. आपण ग्रंथ कां लिहीत आहोंत हें स्पष्ट करतांना आधीं ते सर्वांवर एक आरोप करतात नि नंतर आपला हेतु स्पष्ट करतात. त्यांचा आरोप (पृ. १६।१७) असा आहे कीं —

डांगे यांचा आरोप

When the working class of a county has grown to the consciousness of its historical role, and begins to organise with its new ideology the Bourgeoisie, besides suppressing it with violence, tries to corrupt it with its own ideology in every possible way. One of these ways is to teach the worker *wrong history*, to give him a picture of history as will tie him to the tail of the Bourgeois social order, as the best one, as the inevitable one, as the permanent, eternal, God-given, most moral and happy one. Bourgeoisie presents the Communist conception of history, and future society as utopian, unreal, immoral, unnatural anti-human nature and ruinous. In order to do this,

the Bourgeois intelligentsia dives again into history, hypnotises the rising worker with the idealist, metaphysical picture of social growth and denies the dialectical materialist picture of social growth.

One of the ideological arguments the Bourgeoisie used against the rising Communist movement in India was that whatever the case in Europe and other Countries, India and its culture, its people and history were piculiar to themselves, that they did not answer to any of the laws of Marxism-Leninism.

And they dived into the story of the *Vedas*, *Smritis*, *Upanishads*, epics, and *Puranas*, and as evidence of their theory held forth for view the powerful systems of castes, the saintly kings on thrones and kingly saints in forests, all surviving through thousands of years, as nowhere else, and turned round and askedthe Communists: Where are all these according to your law of historical materialism? India had no primitive communism, no collective property and matriarchy, no communes, she has no history of their break-up and rise of private property and State, classes and class-wars, slavery and feudalism, as you call them, taking their turns in her history. Yes, we have capitalism now; the cursed gift of the English and their machine but our capitalism has its distinctly Indian virtue Hence we need not inevitably go over to Socialism through class-struggles and revolution We shall have a new product of our own, and belie your law of Communism

The Proletiarian State or the Proletarian democracy is not necessary for Indian conditions. In order to prove this they approach the worker and the peasant with bright happy stories of the Hindu and Muslim past and exploit

his present ignorance and ideology to cheat him of his future. (India : from primitive Communism to slavery PP 16–17)

म्हणजे ज्या वेळी श्रमजीवी वर्ग ऐतिहासिक ओघाच्या अनुसार जागृत होऊन आपल्या नव्या तत्त्वज्ञानानुसार संघटित होऊं लागतो, त्यावेळीं बुर्झुआ हा हिंसात्मक साधनांनी त्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न करतोच; पण शक्य त्या सर्व साधनांनी त्याच्या तत्त्वज्ञानाचेंही विडंबन करतो या विडंबनाचा एक मार्ग त्याला चुकीचा इतिहास शिकविणे हा आहे. या मार्गानें आपले समाजशास्त्र दुर्लंघ्य, शाश्वत, सनातन, देवाने दिलेले, सर्वात अधिक नैतिक व सुखस्वरूप आहे हें सिद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कम्युनिस्टांच्या इतिहासाच्या व्याख्येला खोटी, अनैतिक, मिथ्या, अनैसर्गिक, मनुष्याच्या भावी सुखाच्या दृष्टीने विध्वंसक असें दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यासाठी इतिहासाचा आश्रय करून उठू पाहणाऱ्या कामकऱ्याला, ध्येयवादी नि आध्यात्मिक समाजविकसनाची चित्रें दाखवून, विरोध–विकासात्मक जडवादाचें, समाजविकसनाचें चित्र खोटे आहे हें सिद्ध करण्याचा हा कुटिल डाव आहे बुर्झुआंच्या ध्येयवादी नि कल्पनागर्भ विचारसरणीतून हिंदुस्थानातील वर्धिष्णु साम्यवादी चळवळीला असें नेहमी सांगण्यांत येत असतें की, युरोप आणि इतर देशांत कोणतीही वस्तुस्थिति असो, पण हिंदुस्थान, त्याची संस्कृति, लोक व इतिहास ही कांही खास वैशिष्ट्यांनीं युक्त असून मार्क्सिझम व लेनिनिझम्च्या पद्धतीनें ती वैशिष्ट्ये मुळीच उलगडू शकत नाहीत यासाठी ते वेद, स्मृति, उपनिषदें, नीतिग्रंथ आणि पुराणे याच्या आश्रयानें आपली सामर्थ्यशील वर्णसंस्था सिंहासनस्थ सतराजे व राजवैभवाने तळपणारे अरण्यातील मुनि यांच्या सहस्रावधि वर्षापूर्वीच्या प्राचीन चित्रणांना पुढे करून असें विचारतात की, कुठे तरी अशी वस्तुस्थिति आहे काय? साम्यवादी इतिहासप्रक्रियेच्या पद्धतीने याचें काय उत्तर देता येईल? हिंदुस्थानांत रानटी संघजीवन, संघसंपत्ति, इतिहासांतील संघर्ष आणि खाजगी मालमत्तेचें आणि राज्यसंस्थेचें उत्थान, वर्ग व

वर्गविग्रह, दास्य नि सरंजामशाही इत्यादि साम्यवादांतील भानगडीचा मागमूस तरी सांपडतो काय ? आज भांडवलशाही आमच्या देशांत आहे हें खरें ; पण तो ब्रिटिश सत्तेचा अभिशाप आहे. त्यासाठी अगतिकपणें साम्यवादाच्या, वर्गविग्रहाच्या व क्रांतीच्याच मार्गाची कांस धरली पाहिजे असें नाही. त्यासाठी आम्ही आमच्या पद्धतीनें स्वतत्र मार्ग काढू. त्यासाठी श्रमजीवी वर्गाची राज्यसत्ता व श्रमजीवी वर्गाचें लोकराज्य हिदुस्थानांत स्थापन करण्याची कांही आवश्यकता नाही आणि हें सिद्ध करण्यासाठी ते कामकऱ्यांच्याकडे जातात आणि त्यांना नि शेतकऱ्यांना फसवून त्यांच्या विचारसरणीवर पडदा टाकण्यासाठी प्राचीन इतिहासांतील उदात्त व सुखस्वरूप कथाचीं चित्रणें करतात.

डांगे यांची चक्रिकापत्ति

दुसऱ्यांवर हेतूचा आरोप करीत असतांना श्री. डांगे यांनी आपण स्वतःच कांही विशिष्ट हेतूस्तव प्राचीन भारतीय वाङमयाचें संशोधन करीत आहोंत हें या ठिकाणी स्पष्टपणे मान्य केलें आहे. इतकेंच नव्हे तर तो हेतु शुद्ध राजकीय स्वरूपाचा असून आज हिदुस्थानांत चालू असलेल्या कम्युनिस्ट आंदोलनाला हिदुस्थानच्या इतिहासांतून पाठिंबा मिळवून देणें व त्याचा एक भाग म्हणजे हिंदुस्थानच्या इतिहासाचा विशिष्ट अर्थ लावून दाखविणें यासाठी ते प्रवृत्त झाले आहेत हेंही त्यांनी मान्य केलें आहे. हेतुपूर्वक केलेलें इतिहाससंशोधन अशास्त्रीय स्वरूपाचें असतें असा दुसऱ्यावर आरोप करणाऱ्या या व्यक्तीनें स्वतः तेंच अधिक नागडचा स्वरूपांत करण्यास प्रवृत्त व्हावें, तें स्पष्टपणें मान्य करावें, नि तरीही आपण सत्यसंशोधनास बसलों आहोंत असा आग्रह दाखवावा हा निवळ राणा भीमदेवी प्रकार आहे. हिदुस्थानचा इतिहास मार्क्सिझममध्यें बसत नाहीं काय? मग तो मी आतां त्यांत कोंबून दाखवितों अशा आकसानें ते लेखनास प्रवृत्त झाले आहेत ! त्याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे खोटे पुरावे देणें, भडक चित्रें रंगविणें, वचनांचे अर्थ उलटे सुलटे करणें, मधलींच कोठलींही वचनें दडपून देणें, नुसतींच विधानें करणें,

विधानांना पुराव्यांशिवाय वापरणें, फिरवाफिरव करणें इत्यादि गोष्टींत झालेला आहे. वास्तविक इतिहासलेखनाला प्रवृत्त होत असतांना त्यांच्यासारख्या बुद्धिमंतांनीं या वाम मार्गाची कांस धरणे सर्वथा अनुचित होतें. पण विद्वानांची बुद्धि चळल्यावर ती एखाद्या ब्रह्मसमंधाप्रमाणें काय काय अनर्थपात करणार नाही ? वस्तुस्थिति अशी आहे की, या पुस्तकाच्या रूपानें श्री. डांगे यांनीं स्वतःच धूळफेंक करून नि थापा देऊन भारतीय इतिहासाच्या बाबतीत श्रमजीवी वर्गाला नि आपल्या अनुयायांना पूर्णपणे फसविलें आहे. आजच्या भांडवलशाहींत त्यांना जो मार्ग सुचतो त्या मार्गानें त्यांनीं खुशाल जावें, पण त्यासाठीं या अनैतिक वाङ्मयविडंबनाची कांहींच आवश्यकता नव्हती. कदाचित् कम्युनिस्टांच्या नीतिमूल्यांचाच ते वापर करीत असतील! आपल्या स्वतःच्याच या कृत्यानें त्यांनीं खोटेपणा, अनैतिकता ही तर आपल्या पदरी बाधून घेतलेलीच आहेत, पण त्याच बरोबर त्यांचें प्रतिपादन किती विध्वंसक आहे हेंही त्यांनी स्पष्टपणें दाखविलें आहे. इतिहासक्षेत्रांतील व विशेषत. महाभारत आणि तत्सदृश ग्रंथांच्या प्रांतांतील त्यांच्या मिथ्या नि अनैतिक विडंबनाचीं कांहीं प्रत्यक्ष उदाहरणेंच मी येथें देतो.

खोटे पुरावे तयार करणें

(१) युधिष्ठिराच्या राज्यारोहणानतर जिकडे तिकडे दारिद्र्य उत्पन्न झालें होतें असें कोणताही पुरावा न देतां विधान करून श्री. डांगे त्याचा पुरावा म्हणून आपल्या पुस्तकांत (पृ. १७४) लिहितात:

In places where there was famine and drought, the proud ruling class Brahmins turned to the hated Chandalas in their forest retreat to ask for food, and it had become the privilege of the conquered enslaved Chandal to preach morality to the holy Vishwamitra of the conquering Aryans not to resort to eating the carcass of dead dog to preserve his life.

" ज्या ठिकाणीं दुष्काळ व दारिद्र्य होतें तेथें गर्विष्ठ व वर्चस्व गाजविणाऱ्या वर्गाचे प्रतिनिधि जे ब्राह्मण ते द्वेष्य समजण्यांत

आलेल्या चांडालांच्या अरण्यांतील झोपडीत जात, व अन्नाची भिक्षा मागत व चांडाल त्याना नीतीचा उपदेश करीत, हें ऋषि विश्वामित्र कुत्र्याची तंगडी मागण्यासाठीं आले असतां चांडालानें त्यांना जो उपदेश केला त्यावरून दिसतें."

येथें डांग्यांनी खोटा पुरावा तयार केला आहे. ही कथा महाभारताच्या शांतिपर्वाच्या १४१ व्या अध्यायांत आली असून तेथे युधिष्ठिरानें भीष्मांना असें विचारलें आहे की 'अनिवार आपत्तीत अथवा दुष्काळी परिस्थितीत सांपडलेल्या व्यक्तीने कसे वागावे ? प्राण द्यावा की नियमानुसार वागावें ?' त्यावर भीष्मांनी उत्तर देतांना उदाहरणादाखल म्हणून प्राचीन काळची ही गोष्ट सांगितली आहे. डांगे म्हणतात त्याप्रमाणें त्या काळची ती कशी होणार ? या गोष्टीच्या आरंभी असे म्हटले आहे की,

अत्राप्युदाहरन्तीममितिहासं पुरातनम् ।
विश्वामित्रस्य संवादं चाण्डालस्य च पक्कणे ॥१२
त्रेताद्वापरयोः संधौ तदा दैवविधिक्रमात् ।
अनावृष्टिरभूद्घोरा लोके द्वादशवार्षिकी ॥ १३

—महाभारत शान्तिपर्व अ. १४१

महाभारताप्रमाणे ही गोष्ट त्रेता व द्वापर युगांच्या संधीत झालेली आहे आणि युधिष्ठिराचा राज्यकाल द्वापर आणि कलीच्या संधीतील आहे अशा स्थितीत या दोन गोष्टी एककालिक कशा होणार ? युधिष्ठिराच्या राज्याच्या वेळच्या परिस्थितीचे वर्णन जे महाभारतात आहे तेच या बाबतीत प्रमाण मानले पाहिजे कारण त्यायोगेच त्यावेळची परिस्थिति उलगडेल शांतिपर्वांत सर्व प्रकारचे प्रश्न विचारण्यांत आले असून त्याची उत्तरे वेगवेगळ्या दृष्टान्तानी देण्यात आलेली आहेत जर विश्वामित्र कधी काळी कोण्या चाडाळाचे घरी गेला म्हणून ते युधिष्ठिराच्या काळचेच वर्णन मानावयाचे तर शांतिपर्वातील एका गोष्टीतील उटाची मान कित्येक मैल लाब होती म्हणून मैलोगणती लांब मानेचे उंट त्या वेळी होते असें श्री. डांगे याच्या अनुमानाच्या पद्धतीने मानावयास काय हरकत आहे ?

(२) आपल्या ग्रथाच्या १७४ व्या पृष्ठावर श्री. डांगे लिहितात Straightforword materialism faced them with its challenge, but Pandavas, true to their class-nature, beheaded the materialists.

"भौतिकवाद उघडपणे पाडवाच्या राज्यसत्तेला आव्हान देत होता. पण आपल्या वर्गाच्या स्वभावानुसार त्यांनी भौतिकवाद्यांचे शिरच्छेद केले."

वास्तविक कोणत्याही भौतिकवादी पाडवाच्या राज्यसत्तेला कधींही विरोध करावयास आला नसून सर्व प्रजा युधिष्ठिराची राज्यसत्ता आल्याबद्दल आनंदांत होती असेंच महाभारतात वर्णन आहे. डांगे यांनी आपलें हें विधान शातिपर्वातील ३९ व्या अध्यायांत आलेल्या चार्वाक राक्षसाच्या कथेवर आधारलेलें आहे पण महाभारतांतील चार्वाक राक्षस व दर्शनशास्त्रांतील दर्शनकार चार्वाक या दोन व्यक्ति एकच आहेत अशी त्यानीं जी आपली कल्पना करून घेतली आहे ती मुळांतच बरोबर नाही.

'चार्वाको राक्षसो' 'दुर्योधनसखा' अशीं विशेषणें जोडून दुर्योधनाचा एक मित्र युधिष्ठिराची नाजूक व कोमल वृत्ति ध्यानांत घेऊन निंद्यावर प्रहार करावयास पुढें आला असें महाभारतकारांचे म्हणणें आहे. त्यानें युधिष्ठिराचा जो धिक्कार केला तोही कोणत्याही भौतिकवादाच्या तत्त्वांची कांस धरून केला नसून युधिष्ठिराने आपल्या गुरूचा व नातलगांचा वध केला म्हणूनच केला आहे हें त्याच्याच वाक्यावरून स्पष्ट होतें. तें त्याच्या मित्रप्रेमाच्या दृष्टीनें ठीकच होतें. तो म्हणतो :

धिक् भवन्तं कुनृपतिं ज्ञातिघातिनमस्तु वै ॥ २६
किं तेन स्याद्धि कौंतेय कृत्वेमं ज्ञातिसंक्षयम् ।
घातयित्वा गुरूंश्चैव मृतं श्रेयो न जीवितम् ॥ २७
—महाभारत शांतिपर्व अ ३८

पण यांत कोणचा Straightforward materialism आहे ? शिवाय पांडवांनी त्याला मुळींच मारलेलें नसून प्रजाजनांनींच त्याचा वध केलेला आहे.

आदर्श बिघडविण्याचे प्रयत्न

(३) श्री. डांगे हे आपल्या ग्रंथांत (पृष्ठ १६० वर) लिहितात : Jain Sutras say that Sita was Rama's sister. Even Walmiki could not suppress the fact that she was Ayonija. Rama lived in the period when primitives had not yet prohibited brother-sister marriage.

म्हणजे जैनसूत्रे असें म्हणतात की, राम अशा रानटी युगांत राहात होता की, ज्यावेळी बहीण–भावांमध्यें लग्नें होत असत. वाल्मीकीलादेखील ही गोष्ट दडवून ठेवतां आली नाही. त्यानें सीतेला 'अयोनिजा' म्हटलें आहे. अयोनिजा या शब्दाचा इतका घाणेरडा अर्थ करणें म्हणजे काव्याविषयी अज्ञान प्रकट करण्यासारखेंच आहे विदेहराजदुहिता असें सीतेचें सर्वत्र वर्णन येतें. ज्या दशरथजातकाच्या गोष्टीवरून डांगे यांनी प्रस्तुत वर्णन घेतलें आहे तें रामायणापूर्वीचें नसल्याचें संशोधकांनीं निर्विवादपणें सिद्ध केलेलें आहे डांगे यांच्यावर हें दायित्व येऊन पडतें कीं त्यांनीं तें पूर्वीचें आहे हें सिद्ध केलें पाहिजे. पण त्यांना सत्यसंशोधन करावयाचेंच नसून बुद्धिपुरःसर विकृतीकरण करावयाचें आहे हें ध्यानांत घेतलें म्हणजे वादच उरत नाहीं.

पृष्ठ १७१ वर श्री. डांगे लिहितात, The principle was again wielded by the ruling class against the toiling masses in the centuries to come in order to disarm the masses of their feelings of protest, their unhappiness and anger. It produced that wonderful legend of Janaka and others like him, where the rich king ate good food, but felt no pleasure in his tongue, wore good cloth, but was not attached to any feeling about it. So even the toiling slave must feel happy in starvation, control his emotions and reduce his body to a sensationless working machine to discharge the ordained duty. When everyone had attained that stage, poverty and misery vanish, as they lose their meaning for the man. The question of exploitation, slavery, share

of product, State and violence then no longer be raised on a social scale, when each individual can get happiness by this simple acrobatics of thought.

"पुन्हां एकदां वर्चस्व गाजविणाऱ्या वर्गानी विरोध करून असंतोषानें व रागानें सत्तेला उलथून देऊं नये म्हणून एक युक्तिवाद काढला. त्यांनीं जनकाचें आणि तत्सम इतरांचें असें वर्णन तोंडावर फेकलें कीं, जेथें श्रीमत राजा पक्वान्नें झोडीत होता पण जिभेच्या स्वादाचा आनंद त्याला भासत नव्हता तो स्वत: उत्तम कपडे घाली पण त्याचा त्याला आनद नव्हता. म्हणून रागावलेल्या दलित दासानेंही त्याच्याप्रमाणेंच उपासमारीतही आनदांत राहावें आणि आपल्या भावना आवरून शरीरविकार शून्य करून स्वत:ला मरेतों काम करण्याचें यंत्र बनवावें. प्रत्येकाला ही अवस्था प्राप्त झाली कीं, दारिद्र्य व दु:ख नष्ट होईल. कारण मनुष्याच्या दृष्टीनें त्याचें महत्त्वच राहणार नाहीं. पिळवणूक, दास्य, लाभाचा विभाग, राज्य व हिंसा हीं सामाजिक स्वरूपांत नंतर कधींच प्रकट होऊं शकणार नाहींत. जर प्रत्येक व्यक्तीला इतक्या सोप्या रीतीनें सुख मिळवितां येणें शक्य आहे तर मग या गोष्टींची गरजच काय ?"

श्री. डांगे यांनीं जनकाच्या कथेचा हा जो उपयोग केला, तो अत्यंत चुकीचा व खोडसाळ आहे. भारतीय राजसंस्थेचा आदर्श असा हीन कधींही नव्हता हें मी पुढें राज्यसंस्थेविषयींच्या व्याख्यानांत दाखविणारच आहें. तूर्त त्यांना इतकेंच सांगतों कीं त्यांनीं महाभारतांतील पुढील उक्तींकडे लक्ष द्यावें.

बुक्ता यदा जनपदा भिक्षन्ते ब्राह्मणा इव ।
अभीक्ष्णं भिक्षुरूपेण राजानं घ्नन्ति तादृशाः ॥ २३ ॥
म. शातिपर्व अ. ९१

अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।
स संहत्य निहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ॥ ३३ ॥
म. भा. अनुशासनपर्व ६१

ज्यावेळीं काम करावयाची इच्छा व शक्ति असलेले लोक ब्राह्मणांप्रमाणें भिक्षा मागूं लागतात त्यावेळीं असंतुष्ट लोक राजाला

ठार मारल्याखेरीज राहात नाहीत. मी तुमचे संरक्षण करणार आहे असें सांगूनही जो राजा लोकाचें रक्षण करीत नाही त्याला सर्व लोकानी सघटित रीतीने वेड लागलेल्या कुत्र्याप्रमाणें ठार मारावें. अशा दुष्ट राजाना 'बलिमद्भागहरः' 'राजकलि' इत्यादि विशेषणें महाभारतांतून अनेकवार योजलेली आहेत जनक हा राजर्षि म्हणून गौरविलेला आहे. त्याचे वर्णन कर्मयोगी म्हणून येत असतें व तेंही मानसिक समतेच्या उच्च पातळीसबधी आहे हें ध्यानात ठेवले पाहिजे.

निराधार व खोटे प्रतिपादन करणें हा तर डांगे याच्या हातचा मळ आहे. पृष्ठ ३५ वर ते लिहितात,

How does the Hindu philosopher of history define these four yugas of social development:

The *Aitareya Brahman* of *Rigweda* defines them thus:– (VII-15)

The Kali is one sleeping or lying prostrate.

The Dwapar is slowly moving.

The Treta is standing.

The Krita is wandering.

The hunter, wandering in search of prey in groups with his stone tools, crude boulders, etc. is the epoch of *Krita*, very remote in man's memory. It is the stage of of savagery of man. The second is where he evolves from stone tools to the bow and arrow, discovers fire, domesticates animals and grows primitive pasturage. Life has become more stable, though one cannot talk of stability of the age of civilization. It is the *Treta*, say, of barbarism. From there the evolution is more rapid. Metal tools are evoled; smelting does it. The iron axe, the plough and agriculture come into existence. Populations in growing have to move but life is more stable. Finally, still greater development of tools, handicrafts

come in, town and country develop; property relations undergo a violent change. and *Kali* is usherd in, the age of civilisation.

हिंदुतत्त्वज्ञानी व इतिहासवेत्ते चतुर्युगाची कल्पना मांडून समाज-विकसन कसें दाखवितात ? ऐतरेय ब्राह्मण म्हणतें,

कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ॥

कृत म्हणजे ज्या वेळी भक्ष्य मिळविण्यासाठीं रानटी मनुष्य आपल्या साधनांनिशी हिंडत होता ती प्राथमिक रानटी अवस्था. कारण 'चरन्' असें म्हटलें आहे. पुढे त्याच्या साधनांत धनुष्य-बाण, अग्नि, उपयुक्त जनावरें याची वाढ झाल्यावर त्याला थोडी अधिक स्थिरता प्राप्त झाली. या दुसऱ्या अवस्थेला त्रेता असें म्हणतात. त्यानंतर उत्पादनसाधनात आणखी वाढ होऊन शेतीची स्थिति अस्तित्वांत आली. त्याला द्वापर असें म्हणतात. कारण त्यांत आणखी थोडी स्थिरता असते. शेवटी या साधनात आणखी उत्क्रांति होऊन लहान लहान उद्योगधंदे इत्यादि निर्माण होऊन जी नागर संस्कृति उत्पन्न झाली तिला कलियुग असे म्हणतात. कारण येथें जीवनाला पुष्कळ स्थिरत्व उत्पन्न झालेले आहे.

एकतर डांगे यांना ही ऋचा समजली तरी नाहीं किंवा त्यांनी हेतुतः तरी विपर्यास केला. भारतीयांच्या सर्व सांस्कृतिक ग्रंथांत व महाभारतांतही कृत ही आदर्श स्थिति नि कलि ही अधःपतनाची स्थिति म्हणून स्पष्ट दिग्दर्शित करण्यांत आलें आहे. डांगे यांनीं उद्धृत केलेली ऋचा युगांची व्याख्या म्हणून ऐतरेय ब्राह्मणांत आलेली नाहीं व तिचा ते करतात तसा अर्थही नाही. त्यांनी उपक्रम, उपसंहार कां दडविले ? ऋग्वेदाच्या ऐतरेय ब्राह्मणाच्या ३३ व्या अध्यायांतील तिसऱ्या खंडांत इंद्राचें वाक्य म्हणून ही ऋचा आलेली आहे. प्रकरण असें आहे की, हरिश्चद्रानें वरुण देवतेचा अपराध केलेला असल्यामुळें वरुण त्याला रोगग्रस्त करतो. त्याला

भेटण्यास त्याचा मुलगा रोहित त्याच्याकडे येत असतो. इंद्र हा वरुणाचा मित्र असल्यामुळे रोहिताला अडथळा उत्पन्न होतो. त्या वेळीं इंद्र त्याला हें पटवून देऊं इच्छितो कीं, त्यानें घरीं न येतां भटकावें. येथे कृत, त्रेता, द्वापर, कलि या संज्ञा देखील भारतीयांच्या सास्कृतिक संकेताप्रमाणें कृत ही सर्वोच्च अवस्था, त्रेता ही त्यापेक्षां कमी श्रेष्ठतेची, द्वापर ही त्याहून कमी श्रेणीची, नि कलि ही आत्यंतिक अध.पाताची हें गृहीत धरूनच वापरण्यात आलेल्या आहेत.

ताश्च उत्तरोत्तरश्रेष्ठत्वात् कलिद्वापरत्रेताकृतयुगैस्समानाः ।
ततश्चरणस्य सर्वोत्तमत्वात् चरेयुरेवेति ।

तात्पर्य, रोहिताचे भटकणें इंद्राला अभिप्रेत आहे म्हणून तो त्याला तसें सांगत आहे.

या पद्धतीनें डांगे जर हिंदुस्थानच्या इतिहासांतून मार्क्सची प्रक्रिया सिद्ध करू पहात असतील तर 'Save me from my friends' असेंच मार्क्सवाद्यांना त्यांच्या बाबतीत म्हणण्याची लवकरच पाळी येईल. मी दाखविलेल्या येवढ्या गोष्टींवरून देखील त्यांचें हें पुस्तक रानडयांच्या नाना फडणिसांवरील भारुडाच्या योग्यतेचें ठरतें. गीतेवर त्यांनी केलेले अत्याचार मी माझ्या व्याख्यानमालेंत गीतेवरील व्याख्यानांत सांगणार आहे. डांगे यांनी आपल्या पुस्तकानेंच मार्क्सची इतिहासप्रक्रिया ही खोटी, अनैसर्गिक, चुकीची, विध्वंसक आणि अशास्त्रीय कशी आहे हें उत्कृष्टपणें सिद्ध केल्याबद्दल मात्र मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. तात्पर्य मला आपणांस इतकेंच सांगावयाचें आहे कीं, महाभारतासारख्या ग्रंथाकडे पाहतांना या विकृत दृष्टिकोनाच्या आहारीं जाऊं नये. विशुद्ध, सत्यान्वेषी दृष्टीनेंच या जीवनशास्त्रावरील महान् ग्रंथाकडे पाहणे अवश्य आहे.

———

५. सांस्कृतिक जीवनमूल्यांचा ऱ्हास

महाभारत हें आर्यांचें जीवनशास्त्र आहे. भारतीय राष्ट्राचीं लक्षणें व ध्येयें, विषम परिस्थितीत ती साध्य करण्याचीं साधनें, आणि व्यक्ति व समाज यांच्या अंतिम विकसनाचें चित्र त्यांत उत्कृष्ट रीतीनें आढळेल. इतिहास, पुराण, काव्य, धर्मशास्त्र, राज्यशास्त्र, युद्धशास्त्र, आपत्तीत कसें वागावें इत्यादि सर्व गोष्टीचें त्यांत यथावत् दिग्दर्शन असल्यामुळें आणि तें आजही जीवनमार्ग उजळावयास पूर्णपणें समर्थ असल्यामुळें मी त्याला सांस्कृतिक ज्ञानकोश असें म्हटलें. लोकांच्या अंतःकरणांतील सर्व अधकार नाहीसा करून हा दीपस्तंभ कर्तव्याकर्तव्यांचा मार्ग त्यांच्यासाठी उजळतो. हा इतिहास हिंदुराष्ट्राला आपण कोण आहोंत, व आपल्याला काय उत्पन्न करावयाचें आहे, याची स्पष्टपणें जाणीव देतो.

महाभारताला 'जय' नामक इतिहास म्हणतात. आणि या 'जय' नामक इतिहासाचें वाचन करीत असतां नारायण आणि नरोत्तम नर यांना वंदन केलें पाहिजे असा नियम आहे. कारण कीं, नरनारायणांनी मिळविलेल्या विजयाचाच हा इतिहास आहे. येथें नर म्हणजे अर्जुन,असून नारायण म्हणजे भगवान् श्रीकृष्ण होत.

अवतारांचें कारण

श्रीकृष्णाला महाभारतांतच चराचरांत भरून राहिलेल्या परमेश्वराचें स्वरूप मानलेलें असून भगवान् महाविष्णूचा तो अवतार होय असें प्रतिपादन केलें आहे. परमेश्वरानें अवतार घेण्यासारखी कोणती परिस्थिति महाभारतकाळीं निर्माण झाली होती हें पहाणें अवश्य आहे. श्रीमत् भगवद्गीतेंत परमेश्वराचे अवतार केव्हां होत असतात याचें वर्णन करतांना असें म्हटलें आहे की—

व्याख्यान ५ वें, दिनांक ३० मार्च १९५१.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ ७
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ —गीता अ. ४

ज्या ज्या वेळी धर्माची ग्लानि होते आणि अधर्माचा उत्कर्ष होतो त्या त्या वेळी मी उत्पन्न होतों. साधूचे संरक्षण करण्यासाठी, दुराचारी लोकाना ठार मारण्यासाठी आणि धर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठी मी अवतार घेतो.

भगवान् श्रीकृष्ण हे युगपुरुष होते हे निर्विवाद आहे. मनुष्य-स्वभावातल्या सर्व विकाराच्या नि अपूर्णतेच्या ते अनतपटीनें वर असून त्याच्या धारणेला त्या अपूर्णतेचा स्पर्शही नव्हता. अशा या युगपुरुषानें धर्माची स्थापना केली, अधर्माचा विनाश केला नि साधूचें सरक्षण केले. परमेश्वराचे अवतार या भरतभूमीत वारवार होत असतात. आत्मविस्मृतिरूप अधर्म परकीयाच्या आक्रमणामुळे वा स्वकीयाच्या अध पतनामुळे जेव्हा वाढीस लागतो तेव्हां त्याचा नायनाट करून त्या जागी आत्मज्ञानरूपी धर्माची प्रतिष्ठापना करणे हें युगपुरुषांचें काम आहे. त्यांना येथे अवतारी म्हटले जातें. श्रीकृष्णजन्मापूर्वी भारतीय राष्ट्रांत आत्मविस्मृतिरूप अधर्माची गडद काळी छाया पसरली असली पाहिजे हें निर्विवाद आहे. खरोखरी तशी वस्तुस्थिति उत्पन्न झाली होती काय हें पाहिल्यावांचून महाभारताच्या इतिहासांतील प्रतिपाद्य विषयाची संगति लागू शकणार नाही.

भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य

भारतीय राष्ट्राची समाजरचना चातुर्वर्ण्यात्मक असून त्या समाजांतील ब्राह्मणवर्णाला संस्कृतीच्या संरक्षणाचें काम दिलेलें आहे. योगयुक्त, तपस्यामय आणि ज्ञानसंपन्न जीवन जगणारा, मानवाच्या अंत करणांतील सर्व स्वाभाविक भावविकारांवर Natural instincts विजय मिळवून दारिद्र्य हेंच परमधन मानणारा, असा एक वर्गच्या वर्ग भारतीय सस्कृतीनें उत्पन्न करून तो सहस्रावधि वर्षे

टिकवून दाखविला हे त्या संस्कृतीचें वैशिष्ट्य होय. पाश्चात्य इतिहाससशोधक व कम्युनिस्ट पुढारी युरोपमधल्या पतित, भ्रष्ट आणि भोगसुखासीन झालेल्या भिक्षुक वर्गाशी ब्राह्मणांची तुलना करतात तें चूक आहे. मानवी जीवन हें पशुत्व आणि देवत्व यांचें सग्रामस्थान आहे. या जीवनातील मन.सामर्थ्याच्या भरंवशावर पशुत्वावर सपूर्णपणे विजय मिळवून विकारहीन चराचरांचे ठायी आपली अस्मिता प्रत्यक्ष अनुभवणारें असें जीवन उत्पन्न करावयाचे हा या संस्कृतीचा संकेत आहे. असें जीवन प्रत्यक्ष उत्पन्न झाल्यावांचून, भांडवली लोकशाहीच्या पद्धतीनें उत्पादनसाधनें आणि अुत्पादन कितीही वाढविलें, अथवा साम्यवाद्यांच्या पद्धतीनें आर्थिक वाटपाच्या केवढ्याही योजना आंखल्या, तरीही त्याचा जगत्कल्याणाच्या दृष्टीने कांही उपयोग होऊ शकत नाही. संकुचितता, मत्सर, क्रोध व लोभ यांच्यावर विजय मिळविल्यावांचून आणि कर्तव्यनिष्ठ बनल्यावाचून खऱ्या अर्थानें मानवतेचे प्रश्न कोण व कसे सोडविणार ?

अशा धारणेचा एक वर्गच्या वर्ग आर्य संस्कृतीनें उत्पन्न केला होता. त्याला कोणाच्या धनाची अपेक्षा नसे. उपजीवनासाठी राज्यसस्थेचें अकित होऊन राहणे त्याच्या जीवनात आवश्यक नसे. अल्पही अपराध झाला तरी त्याची शिक्षा आपण होऊन घेण्याचें धैर्य त्याच्या ठिकाणी असे. म्हणून तो राजसत्तेला नियत्रित करूं शकत असे. राजसत्तेला त्याचें नियत्रण करण्याचा अधिकार नसे. सर्व इंद्रियांना ताब्यांत ठेवणारा, शम, दम, तप, सत्य, तितिक्षा, शांति, नम्रता, इत्यादि गुणांची केवळ मूस असा हा वर्ग आयुष्यभर देवघरांतल्या नदादीपाप्रमाणें सांस्कृतिक जीवनमूल्यें प्रत्यक्ष जीवनांतून आविष्कृत करण्यासाठी म्हणून सतत तिळतिळ जीवन जाळण्याचें व्रत पत्करीत असे. म्हणून तोच उलट राजसत्ता जर आपल्या हेतूपासून ढळली तर तिला नियंत्रित करी. राजसत्तेचे पाश त्याच्यावर पडत नसत. वेन हा अधार्मिक राजा असल्यामुळें त्याला या वर्गानें पदच्युत केलें होतें. त्याला सत्तेजवळून कांही नको होतें. ती उन्मार्ग-

गामी होऊ नये एवढीच त्याची इच्छा होती. घटनात्मक दृष्टचाच या वर्गाचें नियंत्रण राजसत्तेवर कसें असे हें मी माझ्या रामायणावरील व्याख्यानमालेत स्पष्ट केलें आहे. जोवर हा वर्ग अधःपतित झालेला नाही तोंवर भारतीय संस्कृतीला विनाशाचें भय नाही असें श्रीशंकराचार्यानीं गीताभाष्यांतील "ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षित. स्यात् वैदिको धर्म ।" या उक्तीने सुचवून ठेविलें आहे. या वर्गाजवळ राजसत्ता कर मागत नसे आणि त्यास दंडही करीत नसे. याचा अर्थ कित्येक लोकांनी चुकीचा केलेला आहे. हे विशेषअधिकार नव्हते. स्वतः होऊनच आपल्या अपराधाविषयी जो दड स्वीकारावयास सिद्ध आहे त्याला सत्तेनें आणखी नवा दंड तो काय द्यावयाचा ?

शंख व लिखित

महाभारतांतील शातिपर्वाच्या २३ व्या अध्यायांत यासंबंधी एक मोठें उद्‌बोधक उदाहरण आलें आहे. शख व लिखित या नांवाचे दोन ब्राह्मण होते. ते दोघे एकमेकांचे बधु असून त्यांचे दोन स्वतंत्र वेगवेगळे आश्रम होते. एकदां शंखाला भेटावयास लिखित त्याच्या आश्रमांत आला. त्यावेळी शख आश्रमांत नव्हता. लिखितानें त्या आश्रमांतील एका वृक्षाचे फळ तोडून तोडांत टाकले. थोडचा वेळानें शंख तेथे आला. त्यानें आपल्या भावाला फळ खातांना पाहून "हे फळ तू कोठून आणलेंस" म्हणून विचारलें. त्यावर लिखिताने असें उत्तर दिले की, "या तुझ्या आश्रमांतील वृक्षाचेंच हें फळ असून मीच तें तोडून घेतले आहे." त्यावर शंख त्याला म्हणाला, "हें फळ तू मला न विचारतां तोडण्यांत धर्मशास्त्राच्या अनुसार चोरी केली आहेस. तेव्हां या अपराधाची शिक्षा भोगणें हें तुझे कर्तव्य आहे. तू ताबडतोब राजाकडे जा व चोरी करण्याची जी शिक्षा असेल ती भोगून परत ये." वडील भावाच्या या आज्ञेप्रमाणें लिखित त्या प्रातान्या राजाकडे गेला व स्वतःला शिक्षा करण्यासाठी त्याला आग्रह करूं लागला. राजानें त्याला पुष्कळ समजाविण्याचा प्रयत्न केला, पण त्यानें तें ऐकलें नाहीं. शेवटी चोरीची

शिक्षा म्हणून राजानें त्याचे हात तोडले तेव्हां त्या ब्राह्मणाचें खरे समाधान झालें. अंतःकरणाची नैतिक भावना ज्यांची इतकी उच्च आहे त्यांना अदंडच मानण्यांत आलें असलें तर त्यांत नवल काय ? आणि उपजीवनार्थ कांहीच न करतां समाजाच्या कल्याणासाठी "उरलों उपकारापुरता" असें जीवन जगणाऱ्या या वर्गाजवळून कर तरी कसा घ्यावयाचा ? हा वर्ग ज्या वेळीं नष्ट होतो अथवा भ्रष्ट होतो त्यावेळीं भारतीय संस्कृतीचा व राष्ट्राचाही नाश होतो. आणि हा वर्ग ज्यावेळी आपल्या सर्व वैशिष्ट्यांनीं तळपत असतो त्यावेळी राष्ट्रही आपल्या ऐश्वर्यानें तळपत असतें असें महाभारताचें म्हणणें आहे.

ब्राह्मण्य नष्ट झालेल्या आणि लौकिक जीवन पत्करलेल्या ब्राह्मणांजवळून करभार घेऊं नये असें महाभारतांत कोठेंही म्हटलेलें नाहीं. उलट ब्राह्मणांतही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असतात. आणि भ्रष्ट ब्राह्मणांकडून अथवा लौकिक जीवन जगणाऱ्या ब्राह्मणांकडून करभारही घ्यावा, इतकेंच नव्हे तर त्याला वेठीला धरून त्याच्याकडून विनावेतन काम करून घ्यावें असेंही महाभारतांत स्पष्ट म्हटलें आहे. महाभारतांतील पुढील कांहीं वचनें पहाः—

जन्मकर्मविहीना ये कदर्या ब्रह्मबन्धव ।
एते शूद्रसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥ ४
अश्रोत्रियाः सर्व एव सर्वे चानाहिताग्नयः ।
तान् सर्वान् धार्मिको राजा बलिं विष्टिं च कारयेत ॥ ५
ऋत्विक् पुरोहितो मन्त्री दूतो वार्तानुकर्षकः ।
एते क्षत्रसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥ ७
अश्वारोहा गजारोहा रथिनोऽथ पदातयः ।
एते वैश्यसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥ ८
एतेभ्यो बलिमादद्याद्धीनकोशो महीपतिः ।
ऋते ब्रह्मसमेभ्यश्च देवकल्पेभ्य एव च ॥९
अब्राह्मणानां वित्तस्य स्वामी राजेति वैदिकम् ।
ब्राह्मणानां च ये केचिद्विकर्मस्था भवन्त्युत ॥ १०

विकर्मस्थाश्च नोपेक्ष्या विप्रा राज्ञा कथंचन ।
नियम्याः संविभज्याश्च धर्मानुग्रहकारणात् ॥ ११ ॥

—महाभारत शांतिपर्व अ. ७६

अर्थ—जे जन्मसिद्ध कर्मापासून विन्मुख असणारे, दळभद्रे, ब्राह्मण-ब्रुव आहेत ते सर्व शूद्र होत. वेदाध्ययन न केलेले, अग्नीची उपासना न करणारे अशा सर्व ब्राह्मणांना धार्मिक राजाने वेठीला धरून कामाला लावावे व त्याच्याकडून करही घ्यावा. ऋत्विज, पुरोहित, मंत्री, दूत, व बातम्या काढणारे हे ब्राह्मणांमधले क्षत्रिय होत. अश्व, गज, रथ यांवर आरोहण करणारे अशा ब्राह्मणांना वैश्याप्रमाणें समजावें आणि या सर्वांपासून क्षीणकोश राजानें करभार घ्यावा. केवळ जे देवासारखे अथवा ब्रह्मासारखे ब्राह्मण असतील त्याच्याच जवळून करभार घेऊ नये. अब्राह्मणांच्या वित्ताचा धनी राजाच आहे अशी वैदिक धर्माची धारणा आहे. जे ब्राह्मण संस्कृतिसरक्षणाचें आपलें काम सोडून देणारे व भलत्याच कामास हात घालणारे असतील त्यांची राजानें केव्हाही उपेक्षा करू नये. इतकेंच नव्हे तर त्यांचें नियत्रण करावें व इतर प्रजाजनाप्रमाणेच त्यांना वागवावे.

ब्रह्मसम व देवसम ब्राह्मण कोणते याचें महाभारतानें पुढीलप्रमाणें लक्षण दिलें आहे.

युधिष्ठिर उवाच :—

स्वकर्मण्यपरे युक्तास्त्वर्थवान्ये विकर्मणि ।
तेषां विशेषमाचक्ष्व ब्राह्मणानां पितामह ॥ १

भीष्म उवाच :—

विद्यालक्षणसंपन्नाः सर्वत्र समदर्शिनः ।
एते ब्रह्मसमा राजन् ब्राह्मणाः परिकीर्तिताः ॥ २
ऋग्यजुःसामसंपन्नाः स्वेषु कर्मस्ववस्थिताः ।
एते देवसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥ ३

—महाभारत शान्तिपर्व अ. ७६

विद्वान्, चारित्र्यसंपन्न आणि सर्वत्र समभावना ठेवणारे जे ब्राह्मण त्यांना ब्रह्मसम म्हणतात आणि देवत्रयीमध्यें निष्णात असून आपल्या वर्णधर्मानुसार जे चालणारे त्यांना 'देवसम' म्हणतात.

ब्राह्मण्य भंगलें

महाभारतकालीन अथवा श्रीकृष्णजन्मापूर्वीच्या परिस्थितीत समाजाचें सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या या वर्गाचा दारुण अधःपात झालेला होता. नेत्याचा अध पात झाला की साऱ्या राष्ट्राचा अधःपात झाल्यावांचून राहात नाही. व्यक्तीचा अध.पात एकवार क्षम्य समजतां येतो. कारण त्यामुळे व्हावयाची हानि त्या व्यक्तीपुरतीच काय ती मर्यादित असते. पण नेत्याचा अध पात कधीही क्षम्य असू शकत नाहीं. कारण त्यांत त्या व्यक्तीची हानि नसून सपूर्ण समाजाचाच त्यामुळें अध पात होत असतो. अशा या वर्गाच्या दारुण अध.पतनाचें चित्र महाभारतांत द्रोणाचार्याच्या रूपानें महर्षि व्यासांनी चित्रित केलेले आहे.

आचार्य द्रोण हे महर्षि होते हें प्रसिद्ध आहे. असें जीवन त्यांना लाभलें होतें, की ज्या जीवनात सर्व कोमल विकारांवर व मानवस्वभावसुलभ भावनानिष्ठतेवर त्यानी विजय मिळविणे हे त्यांच्या वर्णधर्माच्या दृष्टीनें आणि स्वभावसिद्ध सामाजिक नेतृत्वाच्या दृष्टीनें परम आवश्यक होतें. परन्तु त्यांनी विकारावर विजय मिळविण्याऐवजी विकारांनीच त्यांच्यावर विजय मिळविला.

द्रोणांनी शस्त्र हातांत घेतलें म्हणून कांही त्यांना कोणी अधःपतित म्हणू शकत नाही. ब्राह्मणांनी शस्त्र हातांत घेण्याचा कुठेंही निषेध नाही. कांहीं विशिष्ट प्रसगी तर शस्त्र हातात घेणें हें त्यांचें धार्मिक कर्तव्यच होऊन बसतें. पण द्रोणाचा अधःपात वेगळ्या प्रकारचा होता. द्रोण हे भरद्वाज ऋषीचे पुत्र. धनुर्वेदांत त्यावेळच्या सर्व क्षत्रिय समाजाचे ते गुरु होते. लहानपणी आपल्या वडिलाच्या आश्रमांत ते अध्ययन करीत असतां तेथेंच पांचाल राजपुत्र द्रुपदही त्यांच्याबरोबरच अध्ययन करीत होता. लहानपणी मित्रप्रेमानें प्रेरित होऊन द्रुपदानें या आश्रमांत द्रोणांना असें सांगितलें की मी पुढें राजा झाल्यावर मित्र म्हणून तुला माझें अर्धे राज्य देईन. अध्ययन पूर्ण झाल्यावर द्रुपद आपल्या राजनगरीत जाऊन पांचालांचा राजा झाला. पुढें द्रोणानी ववाह केला. त्यांना अश्वत्थामा नांवाचा मुलगा झाला. आणि

आश्रमात ते दारिद्र्याचे ऋषितुल्य जीवन कठू लागले. 'काय वाटेल तें झालें तरी राजाची सेवा पत्करून हीन जीवन स्वीकारावयाचें नाहीं असा द्रोणांचा निश्चय होता. पण स्वत:चें जीवन कंठीत असतां द्रोणांच्यावर विकारांनी विजय मिळविला नसला तरी शेवटी पुत्र-स्नेहानें–मानवांच्या अंत.करणांतील सर्व भावनांना व्यापून टाकणाऱ्या या अत्यत कोमल बंधनानें द्रोणांच्या खदिरांगारासारख्या तेजस्वी ब्राह्मण्यालाही शेवटी जिकलें. त्याचा पुत्र अश्वत्थामा त्यांच्या घरच्या दारिद्र्यामूळें दूध घेऊं शकत नसे. त्याचे समवयस्क सोबती आपल्या घरून दूध पिऊन येत. पण अश्वत्थाम्याला दूध मिळेना. तो हट्ट धरून बसला त्यावेळी त्याच्या आईने पांढरें पीठ पाण्यात कालवून तेंच दूध म्हणन त्याला दिले. आणि तोही यापूर्वी दूधाचा स्वाद कधीही घेतलेला नसल्यामुळे तेंच दूध समजून पिऊन आनंदानें नाचू लागला. आचार्यानी स्वत.च तो प्रसंग पाहिला. बरोबरीची मुलें त्याची थट्टा करूं लागली. आणि तें पहातांच उग्र चारित्र्यापासून द्रोणांचे दृढनिश्चयी मन ढळलें. आचार्य स्वत.च या प्रसंगाचें वर्णन करताना म्हणतात —

हास्यतामुपसंप्राप्तं कश्मलं तत्र मेऽभवत् ।
द्रोण धिगस्त्वधनिनं यो धन नाधिगच्छति ॥ ५६
पिष्टोदकं सुतो यस्य पीत्वा क्षीरस्य तृष्णया ।
नृत्यति स्म मुदाविष्टः क्षीरं पीत मयाऽप्युत ॥ ५७
इति सभाषतां वाच श्रुत्वा मे बुद्धिरच्यवत् । ५८

— महाभारत आदिपर्व अ. १३१

अर्थ—दरिदी द्रोणाला धिक्कार असो ! ज्याचा मुलगा दूध समजून पिठाचें पाणी पिऊन नृत्य करतो, त्या द्रोणाला धिक्कार असो! असा माझा उपहास ऐकून मला अत्यंत दु.ख झाले व माझ्या चित्ताचें स्थैर्य ढळलें. तरीपण

" परोपसेवां पापिष्ठां न च कुर्यां धनेप्सया " ॥ ५९—आदिपर्व अ. १३१

धनासाठीं दुसऱ्याची सेवा करण्याचें हीनत्व मी कधींही पत्करणार नाही असा त्यांचा उग्र निश्चय होताच. त्यांनीं असें ठरविलें

की, आपला मित्र जो द्रुपद त्याच्याकडे जाऊन आणि त्याच्या पूर्वीच्या वचनांची नि मित्रत्वाची त्याला आठवण देऊन कांही साहाय्य मिळालें तर बघावें. त्याप्रमाणें ते द्रुपदाकडे गेले. पण त्या उन्मत्त राजानें त्याचा उपहास करून त्यांनाच उलट असें सांगितले की,

आसीत्सख्यं द्विजश्रेष्ठ त्वया मेऽर्थनिबन्धनम् ।
न ह्यनाढ्यः सखाढ्यस्य नाविद्वान्विदुषः सखा ॥६९
न शूरस्य सखा क्लीबः सखिपूर्वं किमिष्यते ।
न हि राज्ञामुदीर्णानामेवं भूतैर्नरैः क्वचित् ॥७०
नाराजा पार्थिवस्यापि सखिपूर्वं किमिष्यते ।
अहं त्वया न जानामि राज्यार्थं संविदं कृताम् ॥७२
एकरात्रं तु ते ब्रह्मन्कामं दास्यामि भोजनम् ।
एवमुक्तस्त्वहं तेन सदारः प्रस्थितस्तदा ॥७३

—महाभारत आदिपर्व अ. १३१

अर्थ— हे ब्राह्मणा, माझ्या स्वार्थासाठी मी तुझ्याशी सख्य केलें होतें. दरिद्री श्रीमंताचा, मूर्ख विद्वानाचा, नि पंढ शूराचा सखा कधींही असू शकत नाही. श्रीमंत राजे अशा प्रकारच्या लोकांशीं कधींही सख्य करीत नसतात. जो राजा नाही तो राजाचा मित्र कसा होणार ? मी तुला राज्यासाठी काही वचन दिलें होतें हें मला मुळीच आठवत नाही. फारतर आलाच आहेस म्हणून एका रात्री-पुरतें तुझ्या इच्छेनुसार पोटभर जेवण मी तुला देईन.

त्या उन्मत्त राजाची ही वागणूक पहातांच द्रोणांना अतिशय राग आला. पुढें ते कौरवांच्या राजसत्तेकडे गेले आणि भीष्मांनी त्यांची योग्यता पाहून कौरव राजकुमारांचे गुरु म्हणून त्यांची नियुक्ति भरून त्यांना सन्मानपूर्वक आश्रय दिला. स्वतंत्र द्रोण आतां राजसत्तेचे आश्रित झाले. आश्रमस्थ मुनीप्रमाणें ते गुरुसंस्था चालवीत नव्हते तर ते शिष्यांनीं दिलेल्या वेतनावर अगतिकतेनें उपजीवन चालविणारे शिक्षक झाले होते. महाभारतांत असें म्हटलें आहे कीं.

राज्यप्रेष्यो यश्च भवेत् विकर्मा । राजन्नेतान् वर्जयेत् देवकृत्ये । ४, ५
—शांतिपर्व अ. ६३

आचार्य द्रोण राज्यप्रेष्य झाले आणि त्यामुळेच विकृत व निःस्पृह ब्राह्मण्याला अधःपतित करणारी कृत्येंही त्याच्या हातून घडली. वसिष्ठांची तेजस्विता आचार्यांना सभाळतां आली नाही. वसिष्ठ हे अयोध्येच्या राजसत्तेचे गुरु होते तर आचार्य द्रोण कौरवाच्या राजसत्तेचे आश्रित होते. या दोघाची कधीही तुलना करता यावयाची नाही. वसिष्ठ गुरु असल्यामुळे लक्ष्मणाच्या बाबतीत राजसत्तेच्या तोंडावर ते आपला कटुकठोर निर्णय ऐकवू शकले तर याच्या उलट आचार्यांना आपलें स्वत्व गमावून बसावे लागले होतें.

द्रोणांचा अधःपात

राजसत्तेचे आश्रित बनल्यावर तिचे अन्याय्य निर्णय देखील द्रोणांना अगतिकतेनें मान्य करावे लागले. इतकेच नव्हे तर राजसत्तेचे त्यांच्याहून कमी योग्यतेचे उन्मत्त आश्रितही तोडावर त्याचा अवमान करावयास मागेपुढे पहात नसत. परतु आपल्या तेजानें सत्ता जाळून टाकण्याऐवजी स्वास्थ्य नि सुखासीन जीवन न सोडतां आल्यामुळे त्यांना शेवटी तो अवमान गिळून सहन करणेंच भाग पडले. त्यांच्या अवमानाचे कित्येक प्रसंग महाभारतांत आहेत त्यांतील एकच येथें देतो.

द्रुपदनगरीत पांडव प्रकट झाल्यानंतर त्याना परत हस्तिनापुरात बोलवावें की, पांचालांवर चढाई करून त्यांचा नाश करावा असा विचार कौरवांच्या राजसभेंत चालू होता. त्यावेळीं द्रोणांनी पांडवाना सन्मानपूर्वक परत बोलावणेंच हिताचें आहे असें सांगितले असतां सूतपुत्र कर्णानें त्यांच्या तोंडावर दुर्योधनाला उद्देशून पुढीलप्रमाणें उद्‌गार काढले:—

योजितावर्थमानाभ्यां सर्वकार्येष्वनन्तरौ ।
न मन्त्रयेतां त्वच्छ्रेयः किमद्‌भुततरं ततः ॥ १३
दुष्टेन मनसा यो वै प्रच्छन्नेनान्तरात्मना ।
ब्रूयान्निःश्रेयसं नाम कथं कुर्यात्सतां मतम् ॥ १४

एवं विद्वन्नुपादत्स्व मन्त्रिणां साध्वसाधुताम् ।
दुष्टानां चैव बोद्धव्यमदुष्टानां च भाषितम् ॥ २५
— महाभारत आदिपर्व अ. २०४

अर्थ—नेहमींच धन व सन्मान देऊन आणि प्रत्येक प्रसंगांत प्रथम-श्रेणीचें स्थान देऊनही हे भीष्म व द्रोण तुझें हित व्हावें अशी इच्छा करीत नाहीत. यापेक्षां आश्चर्यकारक दुसरें कांही असू शकेल काय? स्वतःच्या मित्रांचा द्रोह करणारा आणि तोंडावर गोड बोलून शत्रूचेंच हित पाहणारा कधीही मित्र असू शकत नाहीं. मत्र्यांच्या मध्यें दुष्ट कोण आणि सज्जन कोण हें नेहमीच ओळखून असलें पाहिजे.

भार्गवराम अथवा वसिष्ठ यांच्यावर हे शब्द ऐकण्याचा प्रसंग आला असता तर त्याचें उत्तर फार वेगळ्या रीतीनें देण्यात आले असतें. पण द्रोण हे उपजीवनाच्या प्रश्नावर अगतिक होऊन बसले होते म्हणूनच पांचालीनें वस्त्रहरणप्रसगांत "द्रोणस्य च नास्ति सत्त्वम्।" असा आपला अभिप्राय प्रकट केला आहे. महासती द्रौपदीला भर सभेंत फरफटत ओढीत आणल्यानतर द्रोण आपल्या महास्त्रांच्या प्रभावानें कुलीन स्त्रियांची विटबना करावयास सरसावलेल्या राजसत्तेला दग्ध करू शकले असते. ब्राह्मण हा कोणाचाही दास असू शकत नाही हें तत्त्व द्रोणांनी आचरणांत आणले नाही. इतकेंच नाही तर त्यांचा त्याहूनही अधिक अधःपात झाला.

ब्राह्मणांनीं शस्त्र हातांत केव्हां घ्यावें याचा निर्णय करीत असतांना धर्मशास्त्रानें असें सांगितलें आहे कीं, " शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते । " ज्या ठिकाणी धर्माचा उपरोध होईल तेथेंच ब्राह्मणांनीं शस्त्र हातांत घ्यावें. द्रौपदीच्या विटंबनांत कौरवांनी धर्माचा विध्वंस केला होता. द्यूतांत पांडवाचें राज्य हरण करून घेण्यांत त्यांनीं धर्ममर्यादेचा भंग केला होता. इतकेंच नव्हे तर पांडवांच्यावर विषप्रयोग करून त्याना जिवत जाळून टाकण्याची कारस्थानें उभारून ते पंच महापातकांचे धनी बनले होते. द्रोणांचें हें कर्तव्य होतें की त्यांनी त्यांचें निखंदन करावें. आपल्या तेजस्वी गुरूचें, आपल्याला अस्त्रविद्या देऊन सदाचें कृतार्थ करणाऱ्या सर्व-

श्रेष्ठ भार्गवरामाचें अनुकरण करून द्रोणांनाही मदांध सत्तेच्या ठिकऱ्या उडवीत अधार्मिक सत्तेच्या अन्तकाची परंपरा पुढे चालवितां आली असती; पण तें त्यांनीं केलें नाहीं. उलट द्रौपदीच्या वस्त्रहरणांत प्रत्यक्ष भाग घेणारा दु.शासन, तिच्या वस्त्रहरणाची आज्ञा देणारा कर्ण, व तिला डावी माडी उघडी करून दाखविणारा नराधम दुर्योधन या पतितांच्या सरक्षणाचा भार मात्र त्यांनी स्वत च्या मस्तकावर घेतला. कौरवाच्या विनाशाची प्रतिज्ञा करून पांडव वनवासांत गेल्यानंतर त्याच्या सामर्थ्यामुळें भयकंपित झालेल्या दुर्योधन, कर्ण, दु:शासन नि शकुनि यांनी द्रोणांचा आश्रय केला नि द्रोणांनी त्यांना आश्रय दिला असे महाभारतांत वर्णन आहे.

ततो दुर्योधनः कर्णः शकुनिश्चापि सौबलः ।
द्रोणं द्वीपममन्यन्त राज्यं चास्मै न्यवेदयत् ।। ३६
अथाब्रवीत्ततो द्रोणो दुर्योधनममर्षणम् ।
दुःशासन च कर्णं च सर्वानेव च भारतान् ।। ३७
अहं वः शरणं प्राप्तान्वर्तमानो यथा बलम् ।। ३८
गन्ता सर्वात्मना भक्त्या धार्तराष्ट्रान्सराजकान् ।
नोत्सहेयं परित्यक्तुं दैवं हि बलवत्तरम् ।। ३९

— महाभारत सभापर्व अ. ८०

अर्थ—नंतर दुर्योधन, कर्ण, आणि सौबल शकुनि हे द्रोणांना त्या आपत्तीत आश्रयस्थान समजून त्याच्याकडे आले नि त्यांनी त्यांना संरक्षणासाठीं प्रार्थना केली. तेव्हां दुर्योधन, दु.शासन, कर्ण व कौरवांच्या राजसभेंतील सर्वच लोकांना उद्देशून द्रोणाचार्य असें म्हणाले की मला शरण आलेल्या या धृतराष्ट्रपुत्रांचे नि त्यांच्या सहायकांचें माझ्या शक्त्यनुसार प्रयत्न करून मी संरक्षण करीन. प्रेमपूर्वक मी त्यांना साहाय्य करीन. दैव बलवत्तर आहे. मीं त्यांना सोडू शकत नाही.

ब्राह्मण्याचें हें केवढें दारुण विडंबन! भीष्मपर्वाच्या प्रारंभीं "अर्थस्य पुरुषो दासः!" हे उद्गार द्रोणासारख्या ब्राह्मणाच्या तोंडून निघावे हा केवढा अध:पात! शेवटी कौरवांच्या अधार्मिक पक्षाच्या

ंरक्षणासाठींच द्रोणांनीं आपलें खड्ग निष्कोशित केलें, इतकेंच नव्हे ार अस्त्रज्ञांनीं अनस्त्रज्ञांना मारूं नये हा साधा नियमही दृष्टीआड करून अधर्मानें त्यांनी विकराल मनुष्यसहार केला. द्रोणपर्वांत भीम ोणांना म्हणतो,

श्वपाकवन्म्लेछगणान् हत्वा चान्यान्पृथग्विधान् ।
अज्ञानान्मूढवद् ब्रह्मन् पुत्रदारधनेप्सया ।। ३९

—द्रोणपर्व अ. १९२

पुत्र, दारा व धनाच्या नादी लागून एखाद्या अज्ञानी मूढाप्रमाणें ुम्ही हा भीषण मनुष्यसंहार करीत आहांत. भीमाचें हें म्हणणें क्षरश. खरे आहे. कारण ऋषीच द्रोणांना म्हणतात की,

ब्रह्मास्त्रेण त्वया दग्धा अनस्त्रज्ञा नरा भूवि ।
यदेतदीदृशं विप्र कृतं कर्म न साधु तत् ।। ३९

—द्रोणपर्व अ. १९०

ह ब्राह्मणा ! अनस्त्रज्ञ लोकांना तू ब्रह्मास्त्रानें भस्म केलें आहेस. तें ुझें कर्म अत्यंत अनुचित आहे. अधःपात तो आणखी कशाला म्हणत सतात? जें अनुचित कर्म करू नये म्हणून द्रोणांनी कर्णाला ब्रह्मास्त्र देलें नाही नि अश्वत्थाम्यालाही तें अर्धवटच शिकविलें तेंच अनुचित र्म त्यांच्या हातून स्वतःच घडलें आहे. मनाची स्थिति धर्मपक्षाकडे ा शरीरमात्र अधर्माकडे असें द्रोणांच्या आंदोलित मनोवृत्तीचें भगवान् वेदव्यासांनी जें हृदयगम चित्र चित्रित केलें आहे त्याला काव्यसृष्टींत तुलना आढळणार नाही. द्रोणपुत्र अश्वत्थाम्याच्या रूपानें ार ब्राह्मण्याच्या अधःपतनाचें हें चित्र परिपूर्ण होतें.

अश्वत्थामा

अश्वत्थाम्यामध्य बुद्धीची क्षुद्रता व दुष्टता किती होती हें त्यानें ुद्धानंतर रात्रीं झोपलेल्या पांडवांच्या शिबिरांतील सैनिकांचा जो क्रूर वध केला त्यावरून,स्पष्ट होतें. त्याच्या त्या अपकृत्यानें महाभारतांतील सौप्तिक पर्वाचे कित्येक अध्याय भरलेले असून कपटानें ध करणाऱ्या गर्ह्य कृत्याला अश्वत्थामी संप्रदाय असें नांवच पड-

लेले आहे. अश्वत्थाम्याची ही दुष्टता ओळखून त्याला प्रथम ब्रह्मास्त्र शिकविण्याचेंच द्रोणांनी नाकारलें होतें. पुढें त्याच्या आग्रहास्तव द्रोणांनीं पुत्रस्नेहानें प्रेरित होऊन त्याला तें शिकविलें तरी त्याची दुष्टता त्यांना पूर्णपणे माहीत होती, म्हणून त्यांनी ब्रह्मास्त्राचा प्रयोग कुठेही करूं नये अशी अटही घातली होती.

विदितं चापलं ह्यासीदात्मजस्य दुरात्मनः ।
सर्वधर्मविदाचार्यः सोऽन्वशात्स्वसुतं ततः ॥ ७
परमापद्गतेनापि न स्म तात त्वया रणे ।
इदमस्त्रं प्रयोक्तव्यं मानुषेषु विशेषतः ॥ ८

--महाभारत सौप्तिकपर्व अ. १२

स्वत च्या दुराचारी मुलाचें चापल धर्मवेत्त्या द्रोणांना माहीत असल्यामुळे त्यानी त्याला असे सागितले की, अत्यत आपत्तीत देखील विशेषत. मनुष्यावर या अस्त्राचा तू प्रयोग करू नकोस; पण, त्यानें उत्तरेच्या गर्भावर देखील त्या अस्त्राचा प्रयोग करावयास कमी केलें नाही ! त्याच्या मनाची क्षुद्रता तर इतकी होती कीं, भगवान् श्रीकृष्णानाच तो सुदर्शन चक्र मागून त्याचाच पराभव करू इच्छीत होता असे महाभारताच्या सौप्तिक पर्वाच्या १२ व्या अध्यायांत वर्णन आहे. तात्पर्य भ्रूणहत्येपासून नि बालहत्येपासूनचीं कोणतीही गर्ह्य पापे करण्याची त्याने शिल्लक ठेविली नव्हती. सामाजिक नीतिमत्तेचा जो आधार, सस्कृतिसरक्षण हे ज्याचें कार्य, व ज्याला भारतीय संस्कृतीमध्ये राष्ट्राच्या स्थैर्यासाठी सामाजिक नेतृत्वाचा सन्मान दिला, त्या वर्गाची महाभारताच्या काळी ही अवस्था होऊं लागली होती. जीवनांतून धनाचें मूल्य काढून टाकणें व त्या जागी वैराग्य नि ज्ञानाच्या मूल्यांची प्रतिष्ठापना करणें हें महत्कार्य तिनें ज्यांच्या भरंवशावर करावें त्यांचाच हा अधःपात होता. अधर्माचें अभ्युत्थान तें आणखी दुसरें कोणतें असतें? ब्राह्मण-वर्गाची ही दुरवस्था पाहिल्यावर क्षत्रियांकडे वळणें त्याहूनही अधिक बोधक ठरणार आहे. महाभारतकालीन भारतीय राज्यसंस्थेचें स्वरूप कसें झालें होतें हें आपण पुढच्या व्याख्यानांत पाहू.

६. भारतीय राज्यसंस्थेचें स्वरूप

महाभारतामधील राज्यसंस्था, किंबहुना भारतीय संस्कृतीनेंच दिग्दर्शित केलेली राज्यसंस्था स्वयंभू नसून कांहीं विशिष्ट हेतूस्तव उत्पन्न झालेली आहे. दंडनीति अथवा राज्यानुशासन समाजाच्या धारणेसाठी, पोषणासाठीं नि विकसनासाठीं अत्यंत आवश्यक असल्याचा साक्षात्कार भारतीय समाजशास्त्रज्ञांना फार प्राचीन काळी झालेला आहे. महाभारतांत ठिकठिकाणी अध्यायचे अध्याय राज्यधर्माच्या महत्त्वाच्या वर्णनाप्रीत्यर्थ खर्ची पडलेले आहेत. उदाहरणार्थ, महाभारताच्या शांतिपर्वाच्या ६३ व्या अध्यायांतील पुढील वर्णन पहा.

यथा राजन्हस्तिपदे पदानि संलीयन्ते सर्वसत्त्वोद्भवानि ।
एवं धर्मान् राजधर्मेषु सर्वान् सर्वावस्थं संप्रलीनान्निबोध ।। २५
अल्पाश्रयानल्पफलान्वदन्ति धर्मानन्यान्धर्मविदो मनुष्याः ।
महाश्रयं बहुकल्याणरूपं क्षात्रं धर्मं नेतरं प्राहुरार्याः ।। २६
सर्वे धर्मा राजधर्मप्रधानाः सर्वे वर्णाः पाल्यमाना भवन्ति ।
सर्वस्त्यागो राजधर्मेषु राजंस्त्यागं धर्मं चाहुरग्र्यं पुराणम् ।। २७
मज्जेत्त्रयी दण्डनीतौ हतायां सर्वे धर्माः प्रक्षयेयुर्विबुद्धाः ।
सर्वे धर्माश्चाश्रमाणां हताः स्युः क्षात्रे त्यक्ते राजधर्मे पुराणे ।। २८
सर्वे त्यागा राजधर्मेषु दृष्टाः सर्वा दीक्षा राजधर्मेषु चोक्ताः ।
सर्वा विद्या राजधर्मेषु युक्ताः सर्वे लोका राजधर्मे प्रविष्टाः ।। २९

—महाभारत, शांतिपर्व अध्याय ६३

" ज्याप्रमाणें हत्तीच्या पायांत सारे पाय समाविष्ट होतात, त्याच प्रमाणें राजधर्मात सर्व धर्म समाविष्ट होतात. बाकी सर्व धर्मांचे आधारही लहान व परिणामही मर्यादित. अनेकविध प्रकारांनीं लोकांचें पुष्कळ कल्याण करूं शकणारा व सर्वांना मोठा आधार असणारा असा केवळ क्षात्रधर्मच होय, दुसरा नाही, असें आर्यांचें

म्हणणें आहे. सर्व धर्म राजधर्मामुळेंच रक्षिले जातात. सर्व वर्णांचें संरक्षण राजधर्मामुळेंच होतें. राजधर्मांत सर्व गोष्टींचा त्याग अभिप्रेत आहे आणि त्याग हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे असेंच प्राचीनांचें म्हणणें आहे. राजधर्म जर नष्ट झाला तर त्रयी नष्ट होते. वाढलेले आणि बद्धमूल झालेले धर्म देखील नष्ट होतात. क्षत्रप्रधान राजधर्माचा परित्याग केला तर सर्व आश्रमधर्म नष्ट होतात. राजधर्मांत सर्व प्रकारचा त्याग आहे. राजधर्मांत सर्व प्रकारच्या दीक्षा आहेत. राजधर्मांत सर्व प्रकारच्या विद्यांचा समावेश होतो. राजधर्मांतच सर्व प्रकारचे लोक समाविष्ट आहेत."

दण्डाचें महत्त्व

दण्डाचें महत्त्व भारतीयांनी फार पूर्वीपासून ओळखलें होतें. जगांतील दुष्प्रवृत्तीवर दंडासारखा दुसरा तोडगा नसून भौतिक सामर्थ्याची पार्श्वभूमि लाभल्यावांचून धर्म, संस्कृति, आणि नीतिमूल्यें यांचें संरक्षण होणे शक्य नाही, हा जगाचा त्रिकालाबाधित न्याय महाभारतांत वारंवार उल्लेखिण्यांत आला आहे.

महाभारत म्हणतें—

कर्मणा वै पुरा देवा ऋषयश्चामितौजसः ।
त्रातः सर्वे प्रसह्यारीन्क्षत्रधर्मेण विष्णुना ॥ २३
यदि ह्यसौ भगवन्नाहनिष्यद्रिपून्सर्वानसुरानप्रमेयः ।
न ब्राह्मणा न च लोकादिकर्ता नायं धर्मो नादिधर्मोऽभविष्यत् ॥२४

— महाभारत, शांतिपर्व अ. ६४

"क्षात्रधर्माच्या शत्रूना मारण्याच्या कर्माचा अंगीकार करून महाविष्णूनी शत्रूना ठार मारून पूर्वी देव नि तेजस्वी ऋषि यांचें संरक्षण केलें. जर अप्रमेय पराक्रमी भगवन्तानें असुरांना ठार मारलें नसतें तर ब्राह्मण, प्रजापति, धर्म नि आदिधर्म राहूंच शकले नसते. वैषम्यावर उभारलेल्या, स्वार्थी प्रवृत्तींनीं भरलेल्या, बळी तो कानपिळी हा न्याय असलेल्या आणि सर्व प्रकारच्या हीन प्रवृत्तींनीं युक्त असलेल्या अशा प्रकारच्या जगांत राजदंडावांचून, न्याय तर काय, पण जीवन देखील अशक्य आहे हें महाभारतांत स्पष्ट करण्यांत आलें

आहे. ॲरिस्टॉटल आणि प्लेटो यांच्या शतावधि वर्षापूर्वी हें महान् सत्य भारतीयांनीं कंठरवानें प्रतिपादिलें आहे.

अराजकाचा निषेध

राष्ट्रस्यैतत्कृत्यतमं राज्ञ एवाभिषेचनम् ।
अनिंद्रमबलं राष्ट्रं दस्यवोऽभिभवन्त्युत ।। २ ।।
अराजकेषु राष्ट्रेषु धर्मो न व्यवतिष्ठते ।
परस्परं च खादन्ति सर्वथा धिगराजकम् ।। ३
नाराजकेषु राष्ट्रेषु वस्तव्यमिति रोचते ।
नाराजकेषु राष्ट्रेषु हव्यमग्निर्वहत्युत ।। ५
न हि पापात्परतरमस्ति किञ्चिदराजकात् ।। ७
स चेत्समनुपश्येत समग्रं कुशलं भवेत् ।। ८
अदासः क्रियते दासो ह्रियन्ते च बलात् स्त्रियः ।
एतस्मात्कारणाद्देवाः प्रजापालान्प्रचक्रिरे ।। १५
राजा चेन्न भवेल्लोके पृथिव्यां दण्डधारकः ।
जले मत्स्यानिवाभक्ष्यन्दुर्बलं बलवत्तराः ।। १६
अराजकाः प्रजाः पूर्वं विनेशुरिति नः श्रुतम् ।
परस्परं भक्षयन्तो मत्स्या इव जले कृशान् ।। १७

—महाभारत, शांतिपर्व अ. ६७

"राष्ट्रानें राज्यतंत्र उत्पन्न केलेंच पाहिजे. अधिपति नसलेल्या निर्बल राष्ट्राला अनार्य आक्रमक नेहमींच त्रास देतात. अराजक राष्ट्रांत धर्म राहूं शकत नाहीं. सगळे लोक एकमेकांना खाऊन टाकतात. अराजकाचा सर्वथा धिक्कार असो. अराजक राष्ट्रांत कधींही राहूं नये. अराजक राष्ट्रांत अग्नि देवांना हविर्भाग पोचवीत नाहीं. अराजकापेक्षां अधिक पापकारक जगांत दुसरें कांहींही असूं शकत नाहीं. तेथें अदासांना दास करण्यांत येतें. बलात्कारानें स्त्रियांचें अपहरण होतें. म्हणूनच देवांनीं प्रजापालक राज्यतंत्र उत्पन्न केलें. जर दण्डधारक राजा पृथ्वीवर नसेल तर पाण्यामध्यें सबल मासे दुर्बलांना खाऊन टाकतात त्याप्रमाणें बलवान् लोक दुर्बलांना नष्ट केल्याविना राहणार नाहींत. अराजक प्रजांचा मात्स्यन्यायानें पूर्वीं नाश झाला असें आम्ही ऐकलें आहे."

याप्रमाणें राजदण्डाचें व क्षात्रधर्माचें महत्त्व मानणाऱ्या या संस्कृतींत ॲरिस्टॉटलप्रमाणें राज्यतंत्राला स्वयंभू मात्र मानण्यांत आलेले नाही. राजदण्ड नि राज्यतत्र उत्पन्न कसें झालें याचें महाभारतात अत्यत सुदर वर्णन आहे. भारतीय समाजशास्त्रज्ञ ज्ञानस्वरूप चेतनाला जगाचें कारण नि मूलतत्त्व समजत असल्यामुळे "पूर्णापासुनि ढळलेले जग जाते पूर्णाकडे" अमा त्याचा सिद्धात आहे. तदनुसार रागद्वेषविहीन स्थितप्रज्ञांची समाजविकसनाची एक अतिश्रेष्ठ अवस्था ते मानतात. विश्वात्मभावनेने अंतःकरण भरून राहिलेल्या आणि "पडलें वळण इद्रियां सकळा" इतक्या सहजतेनें आपआपलीं कर्तव्यें सतत करीत राहणाऱ्या अत्युच्च सामाजिक अवस्थेची त्यांनी कल्पना केलेली असून तिचें वर्णन ते 'कृतयुग' या नावाने करतात. या अवस्थेंत समाजांतील यच्चयावत् व्यक्ति पूर्ण सत्त्वगुणसपन्न असल्यामुळे त्यांना हसवर्णाचे म्हणून सबोधिलें आहे हस ही भारतीय काव्यसृष्टीतली अत्यंत शुचितम कल्पना आहे. बिसततूचा फराळ करून मोत्यांच्या चाऱ्यावर जगणारा निरुपद्रवी पण सामर्थ्यसंपन्न आणि ज्याचें सर्वच कांही अत्यत विलोभनीय, अमा राजहंस हा अत्यंत विलोभनीय म्हणून काव्यसृष्टीचा सदाचा अलकार होऊन राहिलेला आहे. म्हणूनच सामाजिक विकसनाच्या परिपूर्ण अवस्थेला त्याची उपमा देण्यांत आली. मानवी अंतःकरणातील पशुत्व पूर्णपणें नष्ट होऊन ज्यावेळी तेथें संपूर्ण देवजीवन उत्पन्न होतें, त्यावेळीं त्या अवस्थेला 'कृतयुग' म्हणून संबोधितात. या अवस्थेंत राजा, राजदण्ड, राज्यतंत्र इत्यादि सर्व गोष्टी समाजविकसनाच्या अत्युच्च अवस्थेंत विलीन होऊन जात असतात. Higher phase of the Communism मध्यें याच अवस्थेचें वर्णन करण्यात आलें असून जगांतील सर्व समाजशास्त्रज्ञांना ध्येय म्हणून याच अवस्थेची अथवा सुवर्णयुगाची तहान लागल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें Withering away of the State या मार्क्सो-लेनिनिझमच्या सूत्राने याच अवस्थेचें दिग्दर्शन केलें आहे. मात्र ही अवस्था प्रत्यक्षात कशी निर्माण करावी हें भोगवासनांच्या नादीं लागलेल्या

मार्क्सला नि त्यांच्या साम्प्रदायिकांना कधीच उलगडले नाहीं. केवळ आर्थिक वांटपाने ही अवस्था उत्पन्न होईल असा एकदेशीय दृष्टिकोन पत्करून विध्वंसनाचें आपले आसुरी शास्त्र त्यांनी निर्माण केले. भारतीयांनी समाजात ही अवस्था पुनःपुन्हां उत्पन्न व्हावी आणि सामाजिक विकसनाचें सुवर्णयुग निर्माण व्हावें म्हणूनच राज्यतंत्र निर्माण केलें आहे. अराजक वेगळें व ही राज्यतंत्रविहीन अवस्था वेगळी. या सुवर्ण युगाच्या अवस्थेत राज्यतंत्रानें जें साधावयाचें तें सिद्ध झालेले असल्यामुळे राज्यतंत्र समाजात विलीन होऊन जातें, तर अराजकांत राज्यतंत्राची आवश्यकता असूनही तें नसतें. भारतीयांच्या मतें ही अवस्था पूर्वी केव्हां तरी होती, इतकेंच नव्हे तर ती वारंवार उत्पन्न होणें, पुन्हांपुन्हा नष्ट होणें, हा चक्रनेमिक्रमाने चालणाऱ्या जगाचा आणि त्याच्या गतिस्वरूपाचा स्वभावविशेष आहे असें मानलें आहे.

मार्क्सिस्टांनी त्याच्या प्रगतीच्या अशास्त्रीय सिद्धान्तानुरूप ही अवस्था पूर्वी कधीही नसून आमच्या प्रयत्नानी ती पुढे आम्ही उत्पन्न करू असे प्रतिपादन केले आहे. उर्वरित सर्व समाजशास्त्रज्ञांनी ही अवस्था पूर्वी कधीही नव्हती नि पुढे कधीही उत्पन्न व्हावयाची नाहीं असें म्हटले असून तिला केवळ कविप्रतिभेचा विलास ठरविलें आहे, असो.

राज्यतंत्र म्हटलें की तें एकतन्त्रात्मक असो की लोकतंत्रात्मक असो, त्यांत एका अथवा कांहीं थोड्या व्यक्तीनी अनेकांवर अधिकार गाजवावयाचा नि त्या अनेकांनीं त्या एका अथवा कांहीं व्यक्तींच्या आज्ञेत राहावयाचें ही विषम अवस्था आलीच. अशा स्थितींत असें कां असावें? या प्रश्नाला महाभारतांत जें उत्तर देण्यांत आलेले आहे त्यांतूनच कृतयुगाच्या सुवर्णावस्थेंतून राज्यतंत्र कसें उत्पन्न होतें याचें मनोरम वर्णन आहे. अभारतीय राज्यशास्त्रज्ञांप्रमाणें त्यांत अस्वाभाविक गूढवादाचा मुळींच अवलंब केलेला नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

राज्यसंस्था कशी उत्पन्न झाली ?

युधिष्ठिर राज्यसंस्था कशी उत्पन्न झाली असा प्रश्न भीष्मांना विचारतांना म्हणतात :—

य एष राजन् राजेति शब्दश्चरति भारत ।
कथमेष समुत्पन्नस्तन्मे ब्रूहि परंतप ।। ५
तुल्यपाणिभुजग्रीवस्तुल्यबुद्धीन्द्रियात्मकः ।
तुल्यदुःखसुखात्मा च तुल्यपृष्ठमुखोदरः ।। ६
तुल्यशुक्रास्थिमज्जश्च तुल्यमांसासृगेव च ।
निःश्वासोच्छ्वासतुल्यश्च तुल्यप्राणशरीरवान् ।। ७
समानजन्ममरणः समः सर्वैर्गुणैर्नृणाम् ।
विशिष्टबुद्धीन् शूरांश्च कथमेकोऽधितिष्ठति ।। ८
कथमेको महीं कृत्स्नां शूरवीर्यसंकुलाम् ।
रक्षत्यपि च लोकस्य प्रसादमभिवाञ्छति ।। ९
एकस्य तु प्रसादेन कृत्स्नो लोकः प्रसीदति ।
व्याकुले चाकुलः सर्वो भवतीति विनिश्चयः ।। १०
एतदिच्छाम्यहं श्रोतुं तत्त्वेन भरतर्षभ ।
कृत्स्नं तन्मे यथातत्त्वं प्रब्रूहि वदतां वर ।। ११
नैतत्कारणमल्पं हि भविष्यति विशांपते ।
यदेकस्मिन् जगत्सर्वं देववद्याति सन्नतिम् । १२

—महाभारत, शांतिपर्व अ. ५९

" राजा, राजा, असा जो शब्द समाजामध्यें रूढ झालेला आहे तो शब्द अथवा ती कल्पना समाजामध्यें उत्पन्न कशी झाली ? ते आपण मला सांगा. सर्वसामान्य लोकांप्रमाणेंच हात, पाय, मान, बुद्धि, इंद्रियें, सुखदुःखांच्या संवेदना, पार्श्वभाग, मुख,उदर, सप्तधातु-संस्था, रक्त, मांस, श्वासनिश्वास, सामर्थ्य, शरीर, सारखेंच असतां जन्म आणि मरण आणि इतरही सर्व गुण इतर माणसांसारखेच असतां समाजांतील अत्यंत बुद्धिमान व शूर लोकांवरही आधिपत्य गाजविणारा एकच मनुष्य कसा उत्पन्न होतो ? शूर, वीर नि श्रेष्ठ

लोकांनीं भरलेल्या या पृथ्वीचें एकच मनुष्य संरक्षण कसें करतो ? एकाच्याच प्रसन्नतेंत सर्व लोकांची प्रसन्नता नि एकाच्याच विफलतेंत सर्वांची विफलता कां असावी ? मला या गोष्टीचें तात्त्विक उत्तर हवें आहे. एकालाच देवाप्रमाणें मानून त्याच्या पायाशीं सर्व जग नम्र व्हावें अशी परिस्थिति उत्पन्न होण्याचें कारण काय ?

याचें उत्तर देतांना भीष्म म्हणतात :–

नियतस्त्वं नरव्याघ्र शृणु सर्वमशेषतः ।
यथा राज्यं समुत्पन्नमादौ कृतयुगेऽभवत् ।। १३
न वै राज्यं न राजाऽसीन्न च दण्डो न दाण्डिकः ।
धर्मेणैव प्रजाः सर्वा रक्षन्ति स्म परस्परम् ।। १४
पाल्यमानास्तथान्योऽन्यं नरा धर्मेण भारत ।
खेवं परमुपाजग्मुस्ततस्तान्मोह आविशत् ।। १५
ते मोहवशमापन्ना मनुजा मनुजर्षभ ।
प्रतिपत्तिविमोहाच्च धर्मस्तेषामनीनशत् ।। १६
नष्टायां प्रतिपत्तौ च मोहवश्या नरास्तदा ।
लोभस्य वशमापन्नाः सर्वे भरतसत्तम । १७
अप्राप्तस्याभिमर्शं तु कुर्वन्तो मनुजास्ततः ।
कामो नामापरस्तत्र प्रत्यपद्यत वै प्रभो ।। १८
तांस्तु कामवशं प्राप्तान् रागो नामाभिसंस्पृशत् ।
रक्ताश्च नाभ्यजानन्त कार्याकार्यं युधिष्ठिर ।। १९
अगम्यागमनं चैव वाच्यावाच्यं तथैव च ।
भक्ष्याभक्ष्यं च राजेंद्र दोषादोषं च नात्यजन् ।। २०
विप्लुते नरलोके वै ब्रह्म चैव ननाश ह ।
नाशाच्च ब्रह्मणो राजन्धर्मो नाशमथागमत् ।। २१
नष्टे ब्राह्मणि धर्मे च देवांस्त्रासः समाविशत् ।। २२

—महाभारत शांतिपर्व अध्याय ५९

अर्थ–राज्य कसें उत्पन्न झालें तें मी तुला सांगतों. पूर्वी कृत युगांत अशी वस्तुस्थिति होती कीं त्यावेळीं राज्य नव्हतें, राजा नव्हता, दण्ड नव्हता, दण्ड देणारा नव्हता, कारण कीं ज्याला दंड

करावयाचा असा कोणी अपराधीच नव्हता. सर्व प्रजा स्वस्वकर्तव्याची जाणीव स्वभावतःच अतःकरणांत जागृत असलेल्या स्थितींत परस्परांचें संरक्षण करीत असत. याप्रमाणें धर्मानें लोक परस्परांचें पालन करीत असतां अशी एक सामाजिक अवस्था उत्पन्न झाली की ज्यावेळीं नदादीपाप्रमाणें सतत तिळतिळ जीवन जाळण्याच्या या सयमी अवस्थेचा ताण लोकांना सहन होईना. त्यामुळेंच त्यांच्यांत मोह उत्पन्न झाला. हळुहळू मोहाच्या प्रभावाने त्यांची स्वाभाविक ज्ञानावस्था भग पावली. आणि कर्तव्याची तेजस्वी जाणीव त्यांच्या अंतःकरणांतून नष्ट झाली. या धर्मनाशाबरोबर लोभ त्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाला नि अस्मितेचें क्षितिज मर्यादित झाले. नंतर ज्याच्यावर आपला अधिकार नाही तीही गोष्ट केवळ आपल्याला मिळावी नि दुसऱ्याला मिळू नये अशी कुवासना अंतःकरणांत उत्पन्न होऊन कामविकाराच्या ते आधीन झाले. लवकरच कामाची जागा अभिलाषाने घेतली आणि त्यांचा कार्याकार्यविवेक पूर्णपणें नष्ट झाला. ते अगम्यागमन करू लागले, त्याचा भक्ष्याभक्ष्य विवेक नाहीसा झाला, वाणीचे पावित्र्य नष्ट होऊन काय बोलावें नि काय बोलू नये यासबधीचा तोल गेला, इतकेच नव्हे तर चागल्या वाइटासबंधीचाही विवेक नष्ट होऊन त्याचे सत्याचे अधिष्ठान नष्ट झाले. त्याबरोबर धर्म नष्ट झाला आणि दैवी शक्तीना मानवाची ही दुरवस्था पाहून अत्यत उद्वेग वाटू लागला

अशा अवस्थेत पुनश्च ती श्रेष्ठ अवस्था उत्पन्न करण्यासाठीं राज्यतत्र उत्पन्न झालें आहे. तें उत्पन्न झालें आहे म्हणण्यापेक्षां तें उत्पन्न केले आहे. कम्युनिस्ट अपप्रचारक आपल्या अशास्त्रीय इतिहासप्रक्रियेत भारताचा इतिहास कोंबण्यासाठी कृतयुगाच्या या वर्णनाला Primitive Communism च्या अवस्थेंत ढकलतात. डांगे यांनीं यासाठीं संस्कृत भाषेला, नव्हे तिच्यांतील प्रत्येक शब्दाला निरुक्तीचें व व्युत्पत्तीचें शास्त्र लागतें ही गोष्ट लक्षांत न घेतां ब्रह्म शब्दाचा अर्थ 'कम्यून' असा सागून Primitive Commune चें हें वर्णन आहे असें प्रतिपादन केलें आहे. पण तें केवळ दडपून देतों

ऐसाजे अशा वर्गांत समाविष्ट होईल. ब्रह्मचा अर्थ 'कम्यून' असा होत नाहीं. आणि कृतयुगाची अवस्था जर 'प्रिमिटिव्ह' मानावयाची असेल तर 'हायर फेज' तरी दुसरी काय असू शकते? महाभारतांत कृतयुगाचें वर्णन करतांना, 'कृतलक्षणाः' असें म्हटलें आहे. या युगाचें वर्णन करतांना महाभारतकार वनपर्वात म्हणतात.—

न तस्मिन्युगसंसर्गे व्याधयो नेन्द्रियक्षयः ।
नासूया नापि रुदितं न दर्पो नापि वैकृतम् ॥ १५
न विग्रहः कुतस्तन्द्री न द्वेषो न च पैशुनम् ।
न भयं नापि सतापो न चेर्ष्या न च मत्सरः ॥ १६
ततः परमकं ब्रह्म सा गतिर्योगिनां परा ।
आत्मा च सर्वभूतानां शुक्लो नारायणस्तदा ॥१७
ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्च कृतलक्षणाः ।
कृते युगे समभवन्स्वकर्मनिरताः प्रजाः ॥ १८

—महाभारत, वनपर्व अध्याय १४९

" त्या अवस्थेत व्याधी नव्हत्या, इंद्रियक्षय, असूया, रोदन, अहंकार, विकृति, सघर्ष, द्वेष, दुष्टता, भय, संताप, ईर्ष्या, मत्सर, आळस इत्यादि कांहींही नव्हतें. त्यावेळी सर्वश्रेष्ठ परब्रह्म हेच योग्यांचें अंतिम साध्य असून सर्वभूतात्मा जो परमेश्वर त्याचा वर्ण शुक्ल होता. चातुर्वर्ण्यातील लोक आपल्या सर्व मानसिक वैशिष्ट्यांनीं युक्त होते. याचा सरळ अर्थ असा आहे की, पशुत्वाच्या सर्व विकारावर मानवानें पूर्णपणे विजय मिळविलेली ही अवस्था असून मानसशास्त्रज्ञांनीं मूलभूत मानलेली अस्मितेची धारणादेखील लोकांनीं जिंकून टाकलेली होती. अतःकरणांतील वृत्तीचा निरोध, बाह्य इंद्रियप्रवृत्तीचा निरोध, अखड तपस्या, सत्यधारणा, खोटेपणा मनांतही न येणे, शरीराचें व मनाचें पावित्र्य, सामर्थ्यसपन्नता, एकमेकांसाठी खपण्याचें स्वाभाविक वळण इत्यादि चातुर्वर्ण्यसमाजातील सर्व लक्षणें परिपूर्णावस्थेंत दृष्टोत्पत्तीस येणें हेंच 'कृतलक्षणाः' याचें खरें स्वरूप आहे. स्वाभाविक प्रवृत्तींना (Natural instincts) जिंकून टाकल्यावांचून ही गोष्ट उत्पन्न होणें शक्य नाहीं असें मानस-

शास्त्रज्ञही मानतात. त्यामुळें हें Primitive अवस्थेचें वर्णन असूं शकत नाहीं हें स्पष्ट आहे आजच्या कम्युनिस्टांच्या पितृभूमींत स्वतःच्या लहरींच्या विरुद्ध असणाऱ्या शास्त्रज्ञांना, संशोधकांना, इतकेंच नव्हें तर एकेकाळाच्या सहकाऱ्यांनादेखील ठार मारण्याचा जो खाटिकखाना चालू आहे. त्यावरून आतां उत्पन्न व्हावयाची ती अवस्था मात्र खऱ्या Primitive अवस्थेंत मानवाला नेऊन सोडण्याचा संभव आहे. असो.

भारतीय राज्यतंत्र

अशा उदात्त उद्देशानें निर्माण झालेल्या भारतीय राज्यतंत्राचा "राजा प्रकृतिरंजनात्" या शब्दांनीं सर्वत्र हेतु व्यक्त करण्यांत आलेला आहे. प्रजारक्षण हाच राजाचा सर्वश्रेष्ठ अशा प्रकारचा धर्म होय. "एष एव परो धर्मो यद्राजा रक्षति प्रजाः।" असें महाभारतांत स्पष्ट शब्दांत सांगण्यांत आलें आहे. राज्यतंत्र संभाळणें हें जरी क्षत्रिय वर्णाचें मुख्यत. काम असलें तरी जर क्षत्रिय तें काम करावयास अयोग्य असेल तर जो कोणी तें काम करील त्यालाच महाभारतांत श्रेष्ठ म्हटलेलें आहे.

अपारे यो भवेत्पारमप्लवे यः प्लवो भवेत्।
शूद्रो वा यदि वाऽप्यन्य सर्वथा मानमर्हति ॥ ३८
यमाश्रित्य नरा राजन्वर्तयेयुर्यथासुखम्।
अनाथाः परिकाल्यंतो दस्युभिः परिपीडिताः ॥ ३९
तमेव पूजयेयुस्ते प्रीत्या स्वमिव बान्धवम्।
अभीरभीक्ष्णं कौरव्य कर्ता सन्मानमर्हति ॥ ४०
किं तेनाऽनडुहा नोह्यः किं धेन्वा वाऽप्यदुग्धया।
वन्ध्यया भार्यया कोऽर्थः कोर्थो राज्ञाऽप्यरक्षता ॥ ४१
यथा दारुमयो हस्ती यथा चर्ममयो मृगः।
यथा हृषनर्थः वण्ढो वा पार्थ क्षेत्रं यथोषरम् ॥ ४२
एवं विप्रोऽनधीयानो राजा यश्च न रक्षिता।
मेघो न वर्षते यश्च सर्वथा ते निरर्थकाः ॥ ४३

नित्यं यस्तु सतो रक्षेदसतश्च निवर्तयेत् ।
स एव राजा कर्तव्यस्तेन सर्वमिदं धृतम् ॥ ४४
—महाभारत, शांतिपर्व अध्याय ७८

"जो कोणी अपार अशा संकटांत लोकांचें संरक्षण करील, तो शूद्र असो कीं कोणी असो, त्याच्याचकडे मान जाईल. दस्यूंनीं पीडिलेले अनाथ लोक ज्याच्या आश्रयानें सुखानें नांदतील त्यालाच ते श्रेष्ठ समजतील. आपल्या बांधवांप्रमाणें ते त्यालाच मानतील. हे कौरव्या, नेहमीं जो काम करतो त्यालाच सन्मान मिळत असतो. भार वाहूं न शकणारा बैल, दूध न देणारी गाय, वांझ स्त्री, नि रक्षण न करूं शकणारा राजा यांचा काय उपयोग आहे? लाकडाचा हत्ती, चामड्याचा हरीण, षंढ मनुष्य, नापीक जमीन, अध्ययन न करणारा ब्राह्मण, रक्षण न करणारा राजा, नि वर्षाव न करणारा मेघ हे सर्वस्वी निरर्थक होत. जो सज्जनांचें रक्षण करतो आणि दुष्टांचें निवारण करतो त्यालाच राजा करावें. तोच या सर्वांचा आधार होऊं शकतो." हिंदुराज्यपद्धतीप्रमाणें प्रत्येक राजाला सिंहासनावर बसतांना प्रतिज्ञा घ्यावी लागे. वेदवाङ्मयापासूनच्या सर्व वाङ्मयांत या प्रतिज्ञेचे उल्लेख आहेत. महाभारतांत पृथूच्या राज्यारोहणाचे वेळीं त्यानें जी प्रतिज्ञा घेतली ती दिलेली आहे. त्या प्रतिज्ञेचा जर विचार केला तर राज्य ही भारतवर्षांत तरी भोगसुखासाठीं निर्माण झालेली वस्तुस्थिति नव्हती हें स्पष्टपणें ध्यानांत येतें. ती प्रतिज्ञा पुढीलप्रमाणें :—

नियतो यत्र धर्मो वै तमशङ्कः समाचर ॥ १०३
प्रियाप्रिये परित्यज्य समः सर्वेषु जन्तुषु ।
कामं क्रोधं च लोभं च मानं चोत्सृज्य दूरतः । १०४
यश्च धर्मात्प्रविचलेल्लोके कश्चन मानवः ।
निग्राह्यस्ते स्वबाहुभ्यां शश्वद्धर्ममवेक्षता ॥ १०५
प्रतिज्ञां चाधिरोहस्व मनसा कर्मणा गिरा ।
पालयिष्याम्यहं भौमं ब्रह्म इत्येव चासकृत् ॥ १०६
यश्चात्र धर्मो नित्योक्तो दण्डनीतिव्यपाश्रयः ।
तमशङ्कः करिष्यामि स्ववशो न कदाचन ॥ १०७
—महाभारत, शांतिपर्व अध्याय ५९

याठिकाणी जो ठरलेला धर्म आहे, त्याचे तू निःशकपणे आचरण कर. प्रियाप्रिय भावना व व्यक्तिगत मनोविकार यांचा परित्याग करून यच्चयावत् प्राणिमात्राशी तुला समबुद्धीनेच वागलें पाहिजे. काम, क्रोध, लोभ, मान इत्यादि भावना सोडून प्रजारक्षण करणें हेंच तुझें कर्तव्य होय. शाश्वत धर्माचें स्वरूप ध्यानांत घेऊन जो कोणी आपल्या कर्तव्यापासून विचलित होईल त्याचा स्वतःच्या बाहुबलानें तू निग्रह केला पाहिजेस. तू मनानें, वाणीनें व कर्मानें नि वारंवार या पृथ्वीला ब्रह्म समजून तिचें पालन करीन अशी प्रतिज्ञा कर. दण्डनीतीच्या आधारानें नित्यधर्माचें निःशंक मनानें परिपालन करण्याची तू प्रतिज्ञा कर. यापुढे स्वतःच्या लहरीनें तुला वागतां येणार नाहीं.

हिदुराजाची ही प्रतिज्ञा पाहिली म्हणजे जगातील यच्चयावत् प्राचीन राज्यपद्धतीतील प्रतिज्ञेच्या विभागांतील ठराविक गूढवाद तिच्यांत मुळींच नसल्याचे प्रत्ययास येतें. ही प्रतिज्ञा नुसती उच्चारावयाची नसून ती प्रत्यक्ष पाळावयाची असे. जो ती पाळी त्यालाच विष्णूचा अवतार व लोकपालाचा अश समजत. जो भोगसुखासीन राहून ती पाळण्याच्या बाबतींत कुचराई करील त्याला असत्यसंध व भ्रष्टप्रतिज्ञ समजून सिहासनावरून पदच्युत करण्यांत येई. क्वचित प्रसंगी ठारही मारण्यांत येई. राजा हा वध्य केव्हां मानला जात असे याचा विचार मी पुढे करणारच आहें. राजाला भारतीय लोक विष्णूचा अश व लोकपालांचा अश समजत म्हणजे काय याची कल्पना पुष्कळ लोकांना येत नाही. त्यामुळें अभारतीय राज्यघटनांमधून 'King does no wrong' अशासारखें जें गूढवलय निर्माण केलेले असतें, तेंच भारतीय राजांच्या भोंवतींही निर्माण केलें असावें अशी कल्पना होते. वास्तविक त्याला लोकपालांचा अंश म्हणण्यांत त्याच्याकडून कांहीं विशिष्ट कर्तव्यें अभिप्रेत आहेत. ती जर त्यानें पार न पाडलीं तर महाभारत त्याला लोकपालांचा अंश मानावयास मुळीच सिद्ध नाही. या बाबतींत प्रत्यक्ष महाभारतानें टाकलेला प्रकाश अत्यंत महत्त्वाचा आहे.

न हि जात्ववमन्तव्यो मनुष्य इति भूमिपः ।
महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ॥ ४०
कुरुते पद्मरूपाणि कालयुक्तानि यः सदा ।
भवत्यग्निस्तथाऽऽदित्यो मृत्युर्वै श्रवणो यमः ॥ ४१
यदा ह्यासीदतः पापान्दहत्युग्रेण तेजसा ।
मिथ्योपचरितो राजा तदा भवति पावकः ॥ ४२
यदा पश्यति चारेण सर्वभूतानि भूमिपः ।
क्षेमं च कृत्वा व्रजति तदा भवति भास्करः ॥ ४३
अशुचींश्च यदा क्रुद्धः क्षिणोति शतशो नरान् ।
सपुत्रपौत्रान्सामात्यांस्तदा भवति सोऽन्तकः ॥ ४४
यदा त्वधार्मिकान्सर्वांस्तीक्ष्णेंदण्डेनियच्छति ।
धार्मिकांश्चानुगृह्णाति भवत्यथ यमस्तदा ॥ ४५
यदा तु धनधाराभिस्तर्पयत्युपकारिण. ।
आच्छिनत्ति च रत्नानि विविधान्यपकारिणाम् ॥ ४६
श्रियं ददाति कस्मैचित्कस्माच्चिदपकर्षति ।
तदा वैश्रवणो राजा लोके भवति भूमिपः ॥ ४७

—महाभारत, शांतिपर्व अ. ६८

"मनुष्य म्हणून राजाचा कधीही अपमान करूं नये. कारण की, मनुष्यरूपानें ती प्रत्यक्ष देवताच नांदत असते. विशिष्ट काळीं राजा विशिष्ट प्रकारच्या देवतांची रूपें धारण करतो. ज्या वेळीं राजा आपल्या उग्र तेजानें पापी लोकांना दग्ध करतो त्या वेळीं तो अग्नि होतो. ज्यावेळीं सर्व लोकांचें कल्याण करण्याच्या इच्छेनें आपल्या चाररूपी डोळ्यांनी तो समाजस्थितीचें ज्ञान करून घेतो, त्यावेळी त्याला सूर्य असें म्हणतात. चारित्र्यभ्रष्ट लोकांना त्यांच्या परिवारासहित जाळून तो ठार मारतो त्या वेळीं त्याला मृत्यूचें स्वरूप येतें. ज्यावेळीं तो अधार्मिकांना तीक्ष्ण दंड देतो व धार्मिकांचें कल्याण करतो, त्यावेळीं त्याला यमधर्म म्हणतात; व ज्या वेळी तो धनाचा वर्षाव करून उपकारकर्त्यावर प्रतिउपकार करतो आणि अपकारी लोकांच्या संपत्तीचा अपहार करून कोशसंग्रह करतो

त्यावेळीं त्याला कुबेर म्हणतात." ही कर्तव्यें पार न पाडणाऱ्या राजाला 'राजकलि' व 'बलिषड्भागतस्कर' अशी विशेषणें लावलेलीं आहेत. राज्ययंत्राच्या सूत्रचालकानें सर्वांत प्रथम जर कोणती गोष्ट जिंकावयाची असेल तर तें त्याचें स्वतःचें मन होय.

आत्मा जेयः सदा राज्ञा ततो जेयाश्च शत्रवः ।
अजितात्मा नरपतिर्विजयेत कथं रिपून् ॥ ५

—महाभारत, शांतिपर्व अ. ६९

राजानें प्रथम स्वतःचें मन जिकावें व नंतर शत्रु जिंकावेत. जो स्वतःला जिंकणार नाही तो शत्रूंना काय जिंकू शकणार ?

राज्ययंत्राचें उत्तरदायित्व

समाजाच्या अधःपतनाचें व विकसनाचें सर्व दायित्व महाभारतानें राजावर टाकलेलें आहे. राष्ट्र जर अत्यंत चारित्र्यसंपन्न, समृद्ध, सुखी नि समर्थ असलें तर त्याविषयीं राजाला जसें गौरविलें आहे, त्याचप्रमाणें जर त्याचा अधःपात होत असला, तें शीलभ्रष्ट, दुःखी, असंरक्षित नि दुर्बल असलें, तर त्यासंबंधींही निंदेला पात्र दुसरा कोण होणार ? राज्ययंत्राच्या या उत्तरदायित्वाचें नि महत्त्वाचें वर्णन करतांना महाभारत म्हणतें :—

राज्ञा सप्तैव रक्ष्याणि तानि चैव निबोध मे ।
आत्माऽमात्याश्च कोशाश्च दण्डो मित्राणि चैव हि ॥ ६४
तथा जनपदाश्चैव पुरं च कुरुनन्दन ।
एतत्सप्तात्मकं राज्यं परिपाल्यं प्रयत्नतः ॥ ६५
किं तस्य तपसा राज्ञः किं च तस्याध्वरैरपि ।
सुपालितप्रजो यः स्यात्सर्वधर्मविदेव सः ॥ ७३
कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणम् ॥ ७९
राजा कृतयुगस्रष्टा त्रेताया द्वापरस्य च ।
युगस्य च चतुर्थस्य राजा भवति कारणम् ॥ ९८
कृतस्य करणाद्राजा स्वर्गमत्यन्तमश्नुते ।
त्रेतायाः करणाद्राजा स्वर्गं नात्यन्तमश्नुते ॥ ९९

—महाभारत शांतिपर्व अध्याय ६९

"राजानें मन, अमात्य, कोश, दण्ड, मित्र, जनपद, आणि पुर या राज्याच्या सातही अंगांचें संरक्षण करावें. राजाला तपश्चर्या अथवा यज्ञयाग यांचें काय करावयाचें आहे? जो आपल्या प्रजेचें उत्तम पालन करील तो सर्व धर्मशास्त्रज्ञ आहेच. राजा परिस्थिति निर्माण करतो की परिस्थिति राजा निर्माण करते असा संशय बाळगण्याचें कारण नाही. राजाच परिस्थिति निर्माण करीत असतो. कृत, त्रेता, द्वापर व कलि या नांवानें दिग्दर्शित केलेली समाजविकसनाची अथवा समाजाच्या अधःपतनाची परिस्थिति निर्माण करण्याचें सामर्थ्य राजाचेंच आहे. राजानें कृतयुग उत्पन्न केलें तर त्याला सर्वश्रेष्ठ सद्गति मिळते. जर त्यानें त्रेतायुग उत्पन्न केलें तर त्याला तितकी श्रेष्ठ सद्गति मिळत नाहीं. जर त्यानें द्वापर युग उत्पन्न केलें तर त्याला सद्गति व असद्गति दोन्ही प्राप्त होतात व जर त्यानें कलियुग उत्पन्न केलें तर मात्र त्याला घोर पाप लागतें." या निमित्तानें भारतीयांनी आपला समाज-शास्त्राचाही सिद्धांत स्पष्ट केला आहे.

परिस्थिति नेतृत्व उत्पन्न करते की नेतृत्व परिस्थिति उत्पन्न करते हा अलीकडे समाजशास्त्रज्ञांत वादाचा प्रश्न झालेला असून त्याबाबतींत नेतृत्वच परिस्थिति उत्पन्न करीत असतें असा भारतीय समाज-शास्त्रज्ञांचा सिद्धांत आहे. परिस्थिति नेतृत्व उत्पन्न करते असें कम्युनिस्ट म्हणतात. पण मानवी इतिहासाचा ओघ त्यांच्याविरुद्ध साक्ष देतो. खास कम्युनिस्टांचा इतिहास घेतला तरी समाजवादी क्रांति जर्मनीमध्यें होण्याऐवजीं अथवा इंग्लंडमध्यें होण्याऐवजीं भांडवलशाहीच्या अवस्थेंत न आलेल्या रशियांतच ती झाली ही गोष्ट त्यांच्या इतिहासप्रक्रियेच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. व रशियांत ही गोष्ट घडून यावयास शेवटीं लेनिनचें समर्थ नेतृत्व हेंच कारण दिसून येतें. हा अपवाद आहे असें म्हणावयाचें असलें तर ज्यांच्या शास्त्राला अपवादापासूनच सुरुवात होते त्यांना केवळ धन्य म्हटलें पाहिजे. असो. महाभारत म्हणतें--

राजैव कर्ता भूतानां राजैव च विनाशकः ।
धर्मात्मा यः स कर्ता स्यादधर्मात्मा विनाशकः ॥ ९
--महाभारत, शांतिपर्व अ. ९१

राजा हाच जसा लोकांचें कल्याण करणारा आहे तसाच तो लोकांचा विनाशही करणारा आहे. तो जर धार्मिक असला तर तो जसें लोकांचें कल्याण करूं शकतो त्याचप्रमाणें तो जर अधार्मिक असला तर तो लोकांचें अकल्याणही करूं शकतो.

भारतीयांच्या धर्मग्रथात केवळ पालन करण्याच्या क्रियेसाठींच राजाला भूमिपति मानण्यांत येत होतें असें दृष्टोत्पत्तीस येईल. राजा राष्ट्राचा धनी नाहीं तर तो सेवक आहे म्हणूनच त्याला इतर कोणतेंही दान करता आलें तरी भूमिदान करतां येत नाहीं. "सार्वभौमस्यापि न तस्या सत्त्व ।" असें धर्मशास्त्रकारांनी स्पष्ट म्हटलें आहे. राज्ययंत्र परतंत्र आहे की स्वयंभू आहे असा प्रश्न राज्यशास्त्रज्ञांत नेहमी उत्पन्न होत आलेला आहे. भारतीय राज्ययत्र सर्वस्वी प्रजातंत्र असून राजाला सिहासनावर बसविण्याचा अथवा त्याला काढून टाकण्याचाही प्रजेला अधिकार आहे. जन्मानुसार राज्याचा वारस असूनही प्रजेला जर तो नको असेल, तर त्याच्या जागी प्रजेनें दुसऱ्याची नियुक्ति केल्याची महाभारतांत अनेक उदाहरणें आहेत. किंबहुना या बाबतीत प्रजांचा अधिकार राज्ययंत्राला दुःखद वाटला तरी डावलता येत नसे व मुकाटचाने मान्य करण्याखेरीज गत्यंतर उरत नसे अशी वस्तुस्थिति आहे.

महाभारताच्या उद्योगपर्वात शंतनु राजा कसा झाला याचें जें वर्णन आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. 'प्रतीप' नांवाच्या राजाला देवापि, बाह्लीक व शंतनु अशी तीन मुलें होती. त्यांपैकी देवापि हा राज्याचा वारस होता. कारण तो ज्येष्ठ पुत्र होता. या तीनही भावांत अलौकिक बंधुप्रेम नांदत होतें. देवापीच्या ठिकाणी एकच दोष होता व तो म्हणजे त्याला कातडीचा रोग होता. इतर सर्व दृष्टीनें तो योग्य असल्यामुळे त्यालाच राज्य द्यावयाचें असें ठरवून राजानें त्याप्रमाणें त्याच्या अभिषेकाची सिद्धता केली. पण प्रजांनी

त्याला राजा करण्यास्तव विरोध करून ती गोष्ट हाणून पाडली. महाभारतांत या घटनेचें वर्णन पुढीलप्रमाणें आलें आहे :—

देवापिस्तु महातेजास्त्वग्दोषी राजसत्तमः ।
धार्मिकः सत्यवादी च पितुः शुश्रूषणे रतः ॥ १७
पौरजानपदानां च सम्मतः साधुसत्कृतः ।
सर्वेषां बालवृद्धानां देवापिर्हृदयंगमः ॥ १८
वदान्यः सत्यसन्धश्च सर्वभूतहिते रतः ।
वर्तमानः पितुः शास्त्रे ब्राह्मणानां तथैव च ॥ १९
बाह्लीकस्य प्रियो भ्राता शान्तनोश्च महात्मनः ।
सौभ्रात्रं च परं तेषां सहितानां महात्मनाम् ॥ २०
अथ कालस्य पर्याये वृद्धो नृपतिसत्तमः ।
सम्भारानभिषेकार्थं कारयामास शास्त्रतः ॥ २१
कारयामास सर्वाणि मङ्गलार्थानि वै विभुः ।
तं ब्राह्मणाश्च वृद्धाश्च पौरजानपदैः सह ॥ २२
सर्वे निवारयामासुर्देवापेरभिषेचनम् ।
स तच्छ्रुत्वा तु नृपतिरभिषेकनिवारणम् ।
अश्रुकण्ठोऽभवद्राजा पर्यशोचत चात्मजम् ॥ २३
एवं वदान्यो धर्मज्ञः सत्यसन्धश्च सोऽभवत् ।
प्रियः प्रजानामपि संस्त्वग्दोषेण प्रदूषितः ॥ २४
ततः प्रव्यथिताङ्गोऽसौ पुत्रशोकसमन्वितः ।
निवारितं नृपं दृष्ट्वा देवापिः संश्रितो वनम् ॥ २६
बाह्लीको मातुलकुलं त्यक्त्वा राज्यं समाश्रितः ।
पितृभ्रातॄन् परित्यज्य प्राप्तवान् परमर्द्धिमत् ॥ २७
बाह्लीकेन त्वनुज्ञातः शान्तनुर्लोकविश्रुतः ।
पितर्युपरते राजन् राजा राज्यमकारयत् ॥ २८

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४९

" देवापि कातडीच्या दोषानें युक्त असला तरी अत्यंत तेजस्वी, धार्मिक, सत्यवादी, पितृभक्त, सर्वांना आवडणारा, सर्वांचें प्रेम असलेला, उदार, सत्यप्रतिज्ञ, प्राणिमात्रांच्या हिताविषयीं जागृत असा होता. कालांतरानें वृद्ध राजानें त्याच्या राज्याभिषेकाची

सिद्धता केली. पण ऐन अभिषेकाचे वेळीं ब्राह्मण, वृद्ध लोक, व पौर-जानपद यांनीं तो अभिषेक थांबविला. शारीरिक दोषानें युक्त असलेला पुरुष, दुसरा तोही दोष नसलेला वारस मिळत असतां, राज्यावर बसू शकत नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें. राजाचा अभिषेक त्यांनीं बंद पाडला. राजाला अत्यंत दुःख झालें व देवापि अरण्यांत निघून गेला. मधला बंधु बाह्लीक याला आजोळचें राज्य मिळाल्यामुळें तो तिकडे निघून गेला. म्हणून पित्यानंतर शंतनूला राज्य मिळालें. धृतराष्ट्राला देखील युधिष्ठिराचें यौवराज्य आपण नाकारल्यास प्रजा आपणांस ठार मारील हीच भीति मुख्यतः वाटते. तो म्हणतो:

ते पुरा सत्कृतास्तात पाण्डुना नागरा जनाः।
कथं युधिष्ठिरस्यार्थे न नो हन्युः सबान्धवान् ॥ ११
—महाभारत आदिपर्व अध्याय १४२

"हे दुर्योधना! पांडूनें पूर्वी नागर जनांचें सर्वस्वी कल्याण केलेले आहे. आतां युधिष्ठिरासाठी ते आपणांस ठार मारल्यावांचून राहतील काय?"

राजा व प्रजा यांचे संबंध किती मधुर होते नि प्रजांचें राजांना किती महत्त्व वाटत असे याचें अत्यंत करुणास्पद वर्णन महाभारताच्या आश्रमवासिक पर्वांत धृतराष्ट्रानें प्रजांचा शेवटचा निरोप घेते वेळीं आलेलें आहे. तें असें :—

शान्तनुः पालयामास यथवद्वसुधामिमाम्।
तथा विचित्रवीर्यश्च भीष्मेण परिपालितः ॥ १
पालयामास नस्तातो विदितार्थो न संशयः।
यथा च पाण्डुर्भ्राता मे दयितो भवतामभूत् ॥ २
स चापि पालयामास यथावत्तच्च वेत्थ ह।
मया च भवतां सम्यक् शुश्रूषा या कृताऽनघाः ॥ ३
असम्यग्वा महाभागास्तक्षन्तव्यमतन्द्रितैः।
यदा दुर्योधनेनेदं भुक्तं राज्यमकण्टकम् ॥ ४
तन्मया साधु वाऽपीदं यदि वासाधु वै कृतम् ॥ ६
तद्वो हृदि न कर्तव्यं मया बद्धोऽयमञ्जलिः।
वृद्धोऽयं हतपुत्रोऽयं दुःखितोऽयं नराधिपः ॥ ७

पूर्वराज्ञां च पुत्रोऽयमिति कृत्वाऽनुजानथ ।
इयं च कृपणा वृद्धा हतपुत्रा तपस्विनी ॥ ८
हतपुत्राविमौ वृद्धौ विदित्वा दुःखितौ तथा ॥ ९
अनुजानीत भद्रं वो व्रजाव शरणं च वः । १०
अवश्यमेव वक्तव्यमिति कृत्वा ब्रवीमि वः ।
एष न्यासो मया दत्तः सर्वेषां वो युधिष्ठिरः ॥ १४
भवन्तोऽस्य च वीरस्य न्यासभूताः कृता मया ।
यदेव तैः कृतं किञ्चिद्बलीकं वः सुतंमम ॥ १५

--महाभारत आश्रमवासिक पर्व अध्याय ९

धृतराष्ट्र म्हणतो :

शंतनूनें धर्मशास्त्रानुसार या पृथ्वीचें पालन केलें. त्यानतर भीष्मानें ज्याचें पालन केले आहे असा माझा पिता जो विचित्रवीर्य त्यानेंही आपलें यथाशास्त्र पालन केले. त्यानंतर माझा भाऊ पंडू हा गादीवर आला. तो तर आपणांस अत्यत प्रियच होता. त्यानंतर मी आपली सेवा केली. ती योग्य किंवा अयोग्य जशी काय केली असेल त्याविषयीं आपण मला क्षमा करावी. मी जें काय चांगलें वाईट केलें असेल त्याविषयीं आपण मला क्षमा करावी नि मनांत कांहीं ठेवू नये. मी आपणांस हात जोडतों. हा वृद्ध आहे, याचीं सर्व मुलें मारली गेलीं आहेत हा अत्यंत दुःखी आहे, आणि परंपरेनें आपलें संरक्षण करीत असणाऱ्या राजांच्या वंशांतच याचा जन्म झालेला आहे हें ध्यानीं आणून तरी आपण मला क्षमा करावी. मुलेंबाळें नष्ट झालेलीं व दुःखी असणारीं दोन वृद्ध माणसें आपणांस शरण आलीं आहेत हें ध्यानी आणावें. हा युधिष्ठिर माझी ठेव म्हणून मी आपल्या स्वाधीन करतों व आपणांसही माझी ठेव म्हणूनच मी युधिष्ठिराच्या स्वाधीन करतों. "

राज्ययंत्र स्वयंभू नसून परतंत्र असल्याची महाभारताची साक्ष असल्याचें मी आपणांस सांगितलें. तें परतंत्र असण्यांत त्याचीं नियंत्रणें आलींच. राज्ययंत्राचीं तीं नियंत्रणें कोणतीं हें पुढील व्याख्यानांत पाहूं.

७. भारतीय राज्यसंस्थेवरील नियंत्रणें

भारतीय राज्यतंत्र स्वतंत्र नसून तें नियंत्रित असल्याचें मीं आपणास सांगितलें. ती नियंत्रणें कोणती होती अथवा शास्त्रानुसार आहेत हें पहाणें मोठें महत्त्वाचें ठरेल. त्यांपैकी पहिले नियंत्रण पौरजानपदांचें होय.

(१) पौर व जानपद

राज्यकारभारांतल्या घटनाविषयक व राज्यविषयक धोरणाच्या सर्व बाबी पौर व जानपद यांच्या संमतीनेंच कराव्या लागत. पौर व जानपद असे दोन वेगवेगळे शब्द ज्याप्रमाणे भारतीय वाङ्मयांत येतात त्याप्रमाणें कधीकधीं ते शब्द एकमेकांचे पर्याय म्हणूनही वापरले जातात. राष्ट्रांतील लोक व प्रत्यक्ष राजधानींत राहणारे नागर जन या दोघांच्याही दोन स्वतंत्र अशा समिति अथवा प्रातिनिधिक मडळें असत. कोणतीही गोष्ट त्या मडळाला विचारल्यावांचून करतां येत नसे. रामायणांत तर ब्राह्मण लोकांनी निवडलेले प्रतिनिधि आणि पौर नि जानपद यांनी एकत्र येऊन अयोध्येच्या राजसिहासनाला कोण युवराज असावा याविषयी प्रत्यक्ष विचार केलेला असून त्यांनीं तो विचार राजा दशरथाला सुचविल्यावरच श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकाचा प्रश्न विचारार्ह ठरलेला आहे. कालच्या व्याख्यानांत राज्ययंत्र प्रजातंत्र असे, असें मीं जें सांगितलें त्याची ही घटनात्मक व्यवस्था होती. रामायण, महाभारत तर काय पण चंद्रगुप्त मौर्यांच्या काळापर्यंतही या पौर-जानपदांचें अस्तित्व नि घटनात्मक महत्त्व प्रत्यक्षांत होतें. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत पौर-जानपदांचा राज्ययंत्रावर विश्वास आहे की नाही हें पहाण्यासाठीं त्यांच्यांत हेर सोडावे आणि त्या हेरांनीं राजाविषयी निंदास्पद बोलावयास सुरुवात करावी आणि त्या बोलण्यावरून

व्याख्यान ७ वें, दि. १ एप्रिल १९५१

त्यांची आपल्यावर किंवा राज्ययंत्रावर निष्ठा किती आहे हें पहाण्याचा प्रयत्न करावा असें सांगितलेले आहे. कौटिल्य म्हणतो:—

"गूढपुरुषप्रणिधिः कृतमहामात्यापसर्पः पौरजानपदानपसर्पयेत् । सत्रिणो द्वन्द्विनस्तीर्थसभाशालापूगजनसमवायेषु विवाद कुर्युः । सर्वगुणसपन्नश्चाय राजा श्रूयते । न चास्य कश्चिद् गुणो दृश्यते, यः पौरजानपदान् दण्डकराभ्यां पीडयतीति ॥"

(कौटिलीय अर्थशास्त्र अ. १३)

अर्थ:— "आपले हेर राजाने पौरजानपदांच्या जमण्याच्या ठिकाणी पेरून ठेवावेत व त्या हेरांनी नागरिक लोक ऐकत असतां आपसांतच असा वादविवाद सुरू करावा की, हा राजा सर्वगुणसंपन्न आहे असें आम्ही ऐकतो आहोंत खरे, पण हा सर्व लोकांना कर लादून व दड करून अकारण पीडा देत असल्याचेंच दृष्टोत्पत्तीस येतें. त्यामुळे हा चागला आहे असें कसे म्हणावें ?"

महाभारतात असें सांगितले आहे की, राज्याचा मुख्य प्रधान पौरजानपदांच्या संमतीवांचून निश्चित करता येत नाही.

तस्मै मन्त्रः प्रयोक्तव्यो दण्डमाधित्सता नृप ॥ ४५
पौरजानपदा यस्मिन्विश्वासं धर्मतो गताः ॥ ४६

—महाभारत शातिपर्व अ. ८३

अर्थ—"दण्डनीति नीट चालवू इच्छिणाऱ्या राजानें पौरजानपदांना ज्याच्याविषयी अत्यंत विश्वास असेल अशालाच राज्याचा मुख्य प्रधान करावें." इतकेंच नव्हे तर जानपद व त्यांचे अध्यक्ष यांची संमति असल्यावांचून त्यास राज्ययंत्राविषयींचा कोणताही व्यवहार किंवा राज्ययंत्राचें धोरण ठरवितां येत नसे. राज्ययत्राच्या धोरणाविषयी अष्टप्रधानमंडळांत पूर्णपणें खल करूनही तेवढ्यानें न भागतां राजानें प्रधानमंडळाशीं चर्चा करून धोरण निश्चित केल्यावर तें पौरांकडून संमत करून घ्यावयाचें व नंतर त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीना दाखवून त्याच्या संमतीनेंच व्यवहारांत आणावयाचें म्हणजे तें घटनात्मक दृष्टीनें योग्य होत असे. महाभारतांत म्हटलें आहे कीं,—

अष्टानां मन्त्रिणां मध्ये मन्त्रं राजोपधारयेत् ॥ ११
ततः संप्रेषयेद्राष्ट्रे राष्ट्रीयाय च दर्शयेत् ।
अनेन व्यवहारेण द्रष्टव्यास्ते प्रजाः सदा ॥ १२

—महाभारत शांतिपर्व अ. ८५

अर्थ—"आठ मंत्र्यांच्यामध्ये बसून राजानें चर्चा केल्यानंतर ठरविलेलें धोरण पौरजानपदांकडे पाठवावें व त्यांच्या प्रतिनिधीला दाखवावें. धोरण गंभीर विषयासंबधींचें असो किंवा सामान्य विषयासंबंधीं असो, राजानें प्रजेशीं वागतांना याच धोरणाचा अवलंब केला पाहिजे."

महाभारतकाळी पौरजानपदाचें असलेलें हें महत्त्व मौर्यांच्या वेळेपर्यंत चालू असल्याचे पुरावे इतिहासांतून मिळतात. तक्षशिलेच्या नागरिकांनी एकदां राज्ययंत्राविरुद्ध आंदोलन घडवून आणलें. त्यावेळी सम्राट अशोकाचें राज्य चालू होतें. अशोकानें आपल्या युवराजाला प्रजांचें काय म्हणणें आहे तें ऐकून घेण्यासाठी पाठविलें तेव्हां प्रजांनी युवराजाची भेट घेऊन आम्हांला राज्ययंत्राविषयी कांहीच म्हणावयाचें नसून आमच्यावर नेमलेले जे अधिकारी आहेत ते वारवार आमचा अपमान करीत असल्यामुळें त्यांना काढून लावा असें सांगितलें. तें ऐकतांच सम्राट अशोकानें त्या अधिकाऱ्याना काढून लावले, असें वृत्त मौर्याच्या इतिहासांतून आढळतें. राज्ययंत्राला पौरजानपदांच्या बाबतीतलें नियंत्रण इतकें असे की धर्मशास्त्रानुसार ठरलेल्यापेक्षां अधिक कर त्याला त्यांच्यावर लादतां येत नसत. पण राष्ट्राचा संसार म्हटला कीं त्यामध्यें संपत्तीआपत्तीचे उन्हाळेपावसाळे यावयाचेच. कोश हेंच राज्ययंत्राचे खरें बळ आहे, ही गोष्ट महाभारतांत वारंवार सांगितलेली आहे. अशा स्थितींत विशिष्ट आपत्तीच्या प्रसंगीं प्रजांवर अधिक कर लादून कोशसंग्रह करण्याची आवश्यकता राज्ययंत्राला निर्माण होणें अपरिहार्य आहे. या स्थितींत राज्ययंत्रांला ते प्रासंगिक कर लादण्याच्या वेळी पौरजानपदांची संमति घेणें क्रमप्राप्त असे. आणि ती संमति त्याला प्रार्थनापूर्वक अनुनयाच्या मार्गानेंच घ्यावी लागत

असे. ही संमति राज्ययंत्र कशी घेत असे याचें महाभारतांत अत्यंत हृदयंगम वर्णन आहे तें पुढीलप्रमाणें:—

प्रागेव तु धनादानमनुभाष्य ततः पुनः ।
सन्निपत्य स्वविषये भयं राष्ट्रे प्रदर्शयेत् ॥ २६
इयमापत्समुत्पन्ना परचक्रभयं महत् ।
अपि चान्ताय कल्पन्ते वेणोरिव फलागमा ॥ २७
अरयो मे समुत्थाय बहुभिर्बस्युभिः सह ।
इदमात्मवधायैव राष्ट्रमिच्छन्ति बाधितुम् ॥ २८
अस्यामापदि घोरायां संप्राप्ते दारुणे भये ।
परित्राणाय भवतः प्रार्थयिष्ये धनानि वः ॥ २९
प्रतिदास्ये च भवतां सर्वं चाहं भयक्षये ।
नारयः प्रतिदास्यन्ति यद्धरेयुर्बलादितः ॥ ३०
कलत्रमादितः कृत्वा सर्वं वो विनशेदिति ।
अपि चेत्पुत्रदारार्थमर्थसंचय इष्यते ॥ ३१
नन्दामि वः प्रभावेण पुत्राणामिव चोदये ।
यथा शक्त्युपगृह्णामि राष्ट्रस्यापीडया च वः ॥ ३२
आपत्स्वेव च वोढव्यं भवद्भिः पुङ्गवैरिव ।
न च प्रियतरं कार्यं धनं कस्याञ्चिदापदि ॥ ३३
इति वाचा मधुरया श्लक्ष्णया सोपचारया ।
स्वरश्मीनभ्यवसृजेद्योगमाधाय कालवित् ॥ ३४

—महाभारत शांतिपर्व अध्याय ८७

अर्थ—" राष्ट्रावर अधिक कर लादून कोशसंग्रह करावयाचा असेल तर तसें करण्यापूर्वीच ही गोष्ट राष्ट्राला अनुनयपूर्वक सांगावी. राष्ट्रावर आलेल्या आपत्तींचें प्रजाजनांसमोर वर्णन करावें. त्यांना असें सांगावें कीं, राष्ट्रावर परचक्राची मोठी आपत्ति येत आहे. गांवांगांवांतून आपत्तींची कल्पना द्यावी. अनेक दस्यूचें साहाय्य घेऊन आमचे शत्रु या राष्ट्रावर तुटून पडू इच्छीत आहेत, स्वतःचाच विनाश होण्यासाठीं ते या राष्ट्राला उपसर्ग करूं इच्छीत आहेत, या अत्यंत घोर आपत्तीच्या वेळीं दारुण भय उत्पन्न झालें

असतांना तुमचेच रक्षण व्हावे म्हणून मी तुमचें धन मला देण्याविषयी तुमची प्रार्थना करीत आहे. आज जें धन मी तुमच्याजवळून मागतों तें केवळ तात्पुरतें असून आपत्ति नष्ट झाल्यावर तें मी तुम्हांस परत केल्यावांचून राहणार नाही. शत्रूनी जर चढाई करून बलात्काराने तुमचे धन हरण केले तर ते काही तुम्हांला परत देणार नाहीत. नुसतें धनच तर काय, पण ते तुमचें सर्वस्व हरण करतील स्त्रियासुद्धां पळवतील. अशी आपत्ति येऊं नये म्हणून आज आपण आपलें धन मला द्यावें. जर धनाचाही संग्रह पोराबाळांसाठी व स्त्रियांच्या सरक्षणासाठीच करावयाचा असतो, तर त्यांच्याच विनाशाची ही वेळ आल्यानंतर नुसतें धन जवळ बाळगून तरी उपयोग काय ? आपल्याच प्रभावानें मी आनंदांत आहे. पुत्रांच्या उदयांत पित्याला जसा आनंद त्याचप्रमाणें आपल्या उदयांत मला आनद आहे. राष्ट्राला मुळींच पीडा न देता माझ्या राज्ययंत्रानें नेहमीच त्याचें यथाशक्ति रक्षण केलें आहे हे आपण जाणताच. आपण श्रेष्ठ आहात. आपत्तीचा भार आपणच सहन केला पाहिजे आपत्तिनिवारण की धन अशा द्वद्वांत आपत्तीचें निवारण हीच आपण सर्वश्रेष्ठ गोष्ट मानाल, असा मला विश्वास वाटतो " याप्रमाणें अत्यत मधुर, सस्कारित, नि अनुनयाच्या भाषेने प्रार्थना करूनच आपले काम करून घ्यावे. भारतीय राज्यतत्रांत पौरजानपदांचें महत्त्व इतके श्रेष्ठ मानले आहे की,

' पौरजनपदा यस्य स्वनुरक्ता अपोडिताः ।
राष्ट्रकर्मकरा ह्येते राष्ट्रस्य च विरोधिनः ॥

ज्याचे पौर आणि जानपद न छळण्यांत आलेले नि म्हणूनच अनुरक्त असतील ते त्याच्या राष्ट्राचे संरक्षण करू शकनात. तसे नसतील तर ते राष्ट्र नष्टही करूं शकतात. कोणती राज्यसत्ता दृढमूल होते याचे वर्णन करीत असतांना महाभारतांत असे म्हटलें आहे की—

यस्य स्फीतो जनपदः संपन्नप्रियराजक ।
संतुष्टपुष्टसचिवो दृढमूलः स पार्थिवः ॥ ३

पौरजानपदा यस्य भूतेषु च दयालवः ।
सधना धान्यवन्तश्च दृढमूलः स पार्थिव ॥ ५

—महाभारत शांतिपर्व अध्याय ९४

ज्याचा जनपद अत्यंत समृद्ध असून राजावर प्रेम करणारा असतो व ज्याचे मंत्री संतुष्ट आणि पुष्कळ धन देऊन प्रसन्न केलेले असतात त्या राजाचें राज्ययंत्र सुस्थिर होय. ज्याचे पौरजानपद श्रीमत, धनधान्यादिकानी समृद्ध व प्राणिमात्रावर दया करणारे असतात त्यांचें राज्ययत्र सुस्थिर असते. भारतीय धर्मशास्त्रांत तर असें सांगितलें आहे की पौरजानपद याचे धन जर चोरीला गेलें तर राजाने तें मिळवून देणे त्याला शक्य नसल्यास स्वत.च्या कोशांतून त्याची भरपाई केली पाहिजे.

देयं चौरहृतं द्रव्यं राज्ञा जानपदाय तु ।
अददद्धि समाप्नोति किल्बिषं यस्य यस्य तत् ॥ ३६

—याज्ञवल्क्य, व्यवहाराध्याय २

प्रत्याहर्तुमशक्तस्तु धनं चौरैर्हृतं यदि ।
स्वकोशात्तद्धि देयं स्यादशक्तेन महीक्षिता ॥

—(वरील श्लोकावरील मिताक्षरा पहा)

चोरांनी जर प्रजाजनांचें द्रव्य चोरलें तर राजाने तें त्याना परत दिले पाहिजे राजानें जर तें त्यांना परत दिले नाही तर त्याला घोर पाप लागते. जो राजा चोरांनी प्रजांचें चोरलेलें द्रव्य चोराना पकडून देऊन, त्यांच्याकडून ज्याचे त्याला परत करूं शकत नसेल त्यानें त्याचें द्रव्य स्वत:च्या कोशातून परत केले पाहिजे.

महाभारतात या बाबतीत रोजच्या रोजच पौरजानपदांचीं कार्ये राजानें केली पाहिजेत असें म्हटलें आहे. रोजच्या रोज होणारा राज्यकारभारदेखील प्रजांना संमत आहे की नाही याची राजानें माहिती मिळवावी.

अतीतदिवसे वृत्तं प्रशंसन्ति न वा पुनः ।
गुप्तैश्चारैरनुमतैः पृथिवीमनुसारयेत् ॥ १५
जानीयुर्यदि मे वृत्तं प्रशंसन्ति न वा पुनः ।
कच्चिद्गोचेज्जनपदे कच्चिद्राष्ट्रे च मे यशः ॥ १६

—महाभारत, शांतिपर्व अ. ८९

आदल्या दिवशीं केलेलें कृत्य लोक प्रशंसा करण्याजोगें समजतात की निंदा करण्याजोगें समजतात हें पहाण्यासाठीं राजानें रोज गुप्त चारांना लोकांमध्यें सोडावें आणि राष्ट्रांतील लोक मला चांगलें म्हणतात कीं वाईट म्हणतात हें नीट शोध करून मला कळवा असें त्यांना सांगावें. राजाला द्यावयाचा दानधर्म देखील पौरजानपदांच्या अनुमतीच्या अनुसारच द्यावा लागेल अशी वस्तुस्थिति होती. तात्पर्य पौर नि जानपद हें राजाचें नि राज्ययंत्राचें सर्वात महत्त्वाचें नियत्रण असून त्यांच्या हातीं पुढीलप्रमाणें अधिकार असत–

(१) पौर व जानपद राज्याला वारस सुचवू शकत.

(२) असलेला वारस ते नाकारू शकत, व त्याच्या जागी दुसरा बसवू शकत.

(३) राज्यावरील राजाला ते पदच्युत करू शकत.

(४) कर ठरलेले होते पण विशिष्ट आपत्तीच्या प्रसंगी राजाला ते वाढवावयाचे असल्यास त्या आपत्तींची पौरजानपदांना पूर्णपणें कल्पना देऊन त्यांची मनधरणी करून व त्यांनी संमति दिल्यास राजाला ते वाढवितां येत असत.

(५) प्रधानमंत्री नियुक्त करतांना त्यांची संमति अवश्य असे.

(६) अधिकारी कोणचा असावा वा नसावा हें ते ठरवीत. निदान त्यांनी विरोध केल्यास अधिकारी बदलणें क्रमप्राप्त असे.

(७) राज्याचें धोरण त्यांच्या संमतीनें ठरवावें लागे. त्यासाठीं अष्टप्रधान मंडळांत ठरलेली गोष्ट त्यांच्याकडे संमतीसाठीं पाठवून त्यांच्या प्रतिनिधींच्या निदर्शनास आणावी लागे.

राज्ययंत्राचें दुसरें नियंत्रण–तपस्वी ब्राह्मण

राज्ययंत्राचे दुसरें मोठें नियंत्रण म्हणजे तपस्व्यांचें होतें. या तपस्वी लोकांचा प्रभाव आर्यांच्या सर्व संस्कृतीवर पडलेला आहे. आर्य संस्कृतीची खूण जर विचारली तर ती हीच निर्विवादपणें सांगतां येईल.

धनमानादिकांचा परित्याग करून अरण्यांत राहणारे हे तेजस्वी ऋषि राजे नि प्रजा या दोहोच्याही सारख्याच विश्वासास पात्र असत. त्यांना राज्ययंत्रापासून कांहीही नको होतें. त्यामुळें राग-द्वेषाचा त्यांच्यावर कांहींही परिणाम होत नसे. हिंदू इतिहासांतील कितीतरी भाग त्यांच्या श्रेष्ठत्वाच्या वर्णनाने भरलेला आहे. राष्ट्र संकटांत सापडलें अथवा राज्ययत्रांत कांही महत्त्वाचा प्रश्न उत्पन्न झाला, म्हणजे या वर्गालाच उपाययोजना विचारावयास मोठमोठे सत्ताधीश येत. महाभारतांत गणराज्यांत भेद उत्पन्न झाल्यावर तो नष्ट करून ते सुखी कसे करावेत यासबंधी प्रत्यक्ष भगवान् श्री-कृष्णांनी नारदाचा विचार घेतला असल्याचें लिहिले आहे. इतकेंच नव्हें तर हे तपस्वी वारंवार राज्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या राष्ट्रांत धर्मसंरक्षण नीट चालू आहे की नाहीं हें पहात असत. महा-भारतांतील सभापर्वात प्रत्यक्ष नारद येऊन यासंबंधीं युधिष्ठिराला प्रश्न विचारीत असल्याचें वृत्त वर्णिलें आहे.

तपस्व्यांच्या बाबतींत महाभारत असें म्हणतें की:—

> आत्मानं सर्वकार्याणि तापसे राष्ट्रमेव च ।
> निवेदयेत्प्रयत्नेन तिष्ठेत्प्रह्वश्च सर्वदा ॥ २६
>
> —महाभारत, शांतिपर्व अ. ८६

राजानें आपण आपला राज्यकारभार नि सारें राष्ट्र तपस्व्या-च्या पायावर अर्पण करून नेहमी नम्रपणानें त्यांच्यासमोर उभें राहावें. संपूर्ण हिंदू इतिहासांत दारिद्र्य हा अलंकार समजून बुद्धि अधिकाधिक सूक्ष्म व तीक्ष्ण करीत जाण्याचें पिढ्यान् पिढ्या व्रत पत्करलेला असा हा तपस्वी ब्राह्मणांचा वर्ग होता. पौरजानपदांचा निदान स्वतःच्या उपजीवनासंबंधींचा तरी स्वार्थ असू शकेल. या वर्गाला तोही नव्हता. त्याचें महत्त्व नि नियंत्रण स्पष्ट करतांना महाभारत म्हणतें:—

> ब्राह्मणो हि कुले जातः कृतप्रज्ञो विनीतवान् ॥ १५
> श्रेयो नयति राजानं सुवंश्चित्रां सरस्वतीम् । १६
>
> —महाभारत, शांतिपर्व अ. ७२

ब्रह्मवृक्षो रक्ष्यमाणो मधु हेम च वर्षति ।
अरक्ष्यमाणः सततमश्रु पापं च वर्षति ।। १४
—महाभारत, शांतिपर्व अ. ७३

तपो मन्त्रबलं नित्यं ब्राह्मणेषु प्रतिष्ठितम् ।
अस्त्रबाहुबलं नित्यं क्षत्रियेषु प्रतिष्ठितम् ।। १४
ताभ्यां संभूय कर्तव्य प्रजानां परिपालनम् । १५
—महाभारत, शांतिपर्व अ ७४

अर्थ—" कुलीन, विद्वान्, नि विनयनम्र ब्राह्मण योग्य तें सुव्यवस्थित सागून राजाचे कल्याण करतो. ब्रह्मवृक्षाचें संरक्षण केलें तर तो मधु आणि सुवर्ण यांचा वर्षाव करतो. पण जर त्याचें संरक्षण न केलें तर मात्र तो सतत अश्रु नि पाप याचाच वर्षाव करतो. तपश्चर्या आणि मंत्रबल नेहमी ब्राह्मणांत प्रतिष्ठा पावलेले असून अस्त्रविद्या नि बाहुबल क्षत्रियांत प्रतिष्ठा पावलें आहे. म्हणून त्या दोघांनी मिळूनच प्रजाचें परिपालन केले पाहिजे. धर्मसंरक्षणाचें खड्ग क्षत्रियाना ब्राह्मणांनी दिलेले आहे असे महाभारतांतच स्पष्ट सांगितले आहे.

भारतकार म्हणतात —

असिं धर्मस्य गोप्तारं ददौ सत्कृत्य विष्णवे ।
विष्णुर्मरीचये प्रादान्मरीचिर्भगवानपि ।। ६६
महर्षिभ्यो ददौ खड्गमृषयो वासवाय च ।
महेन्द्रो लोकपालेभ्यो लोकपालास्तु पुत्रक ।। ६७
मनवे सूर्यपुत्राय ददुः खड्गं सुविस्तरम् ।
उच्चुश्चैनं तथा वाक्यं मानुषाणां त्वमीश्वरः ।। ६८
असिना धर्मगर्भेण पालयस्व प्रजा इति ।। ६९
—महाभारत, शांतिपर्व अ. १६६

या खड्गस्तोत्रांतील परंपरेचा विचार केला तर असें आढळून येईल कीं, ऋषींनी मनू व मनुपुत्र यांना खड्ग दिलेलें आहे. अर्थात् तें वापरावें कसें यावर त्यांचें नियंत्रण असणारच. या महर्षींचें राज्ययंत्रावरील नियंत्रण अप्रत्यक्षपणे तर असेच, पण प्रत्यक्षपणेंही तें

पुरोहिताच्या रूपानें असे. महाभारतात राजानें पुरोहित केलाच पाहिजे असें सांगितलें असून शांतिपर्वाच्या ७४ व्या अध्यायांत पुरोहितानें राजाला संकटातून कसें तारलें त्याचें वृत्तही दिले आहे. महाभारत म्हणतें—

राज्ञा पुरोहितः कार्यो भवेद्विद्वान्बहुश्रुतः ।
उभौ समीक्ष्य धर्मार्थावप्रमेयावनन्तरम् ॥ १

—महाभारत, शान्तिपर्व अ. ७३

राजानें धर्म, अर्थ आणि त्याचें गूढ असें स्वरूप ध्यानांत घेऊन विद्वान् आणि बहुश्रुत पुरोहित करावा. श्रीमत् वाल्मीकीय रामायणांत तर या तपस्वी लोकांचीच राज्ययत्रावर नियंत्रण ठेवणारी मंत्रिसस्था असल्याचें वर्णिले असून महत्त्वाच्या प्रसंगी तिने राज्ययत्राचें नियत्रण केल्याचे दाखविले आहे. विद्वत्ता, दक्षता, नि कार्यकुशलता या सर्व बाबतीत राज्ययंत्रानें जे श्रेष्ठ असतील त्यांचा संग्रह केलाच पाहिजे. शंभर मूर्खापेक्षा एका विद्वानाचें मत अधिक ग्राह्य होय असें महाभारताचे स्पष्ट मत आहे. 'शत विहाय मूर्खाणां एकं वृणामि पण्डितम्' असें युधिष्ठिराला नारदानेंच विचारले आहे.

इतिहासकाळातही या मार्गदर्शकांचे महत्कार्य अनेकवार दृष्टीस पडतें. हे राज्ययत्राचे दुसरें नियंत्रण होय.

राज्ययंत्राचें तिसरें नियंत्रण म्हणजे अमात्य–संस्था

राजा म्हटला की त्याला मत्री असलेच पाहिजेत असें भारतीय धर्मशास्त्राचें नि राज्यशास्त्राचें स्पष्ट मत आहे. मनु म्हणतो :—

सोऽसहायेन मूढेन लुब्धेनाकृतबुद्धिना ।
न शक्यो न्यायतो नेतुं सक्तेन विषयेषु च ॥ ३०
शुचिना सत्यसन्धेन यथाशास्त्रानुसारिणा ।
प्रणेतुं शक्यते दण्डः सुसहायेन धीमता ॥ ३१
अपि यत्सुकरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
विशेषतोऽसहायेन किमु राज्यं महोदयम् ॥ ५५
तैः सार्धं चिन्तयेन्नित्यं सामान्यं सन्धिविग्रहम् ।
स्थानं समुदयं गुप्तिं लब्धप्रशमनानि च ॥ ५६

—मनुस्मृति अ ७

सर्वविद्यासु कुशलो नृपो ह्यपि सुमन्त्रवित् ।
मन्त्रिभिस्तु विना मन्त्रं नैकोऽर्थं चिन्तयेत् क्वचित् ॥
सभ्याधिकारि–प्रकृति–सभासत्सुमते स्थितः ।
सर्वदा स्यान्नृपः प्राज्ञः स्वमते न कदाचन ॥
प्रभुः स्वातन्त्र्यमापन्नो ह्यनर्थायैव कल्पते ।
भिन्नराष्ट्रो भवेत्सद्यो भिन्नप्रकृतिरेव च ॥
तेषां स्वं स्वमभिप्रायमुपलभ्य पृथक् पृथक् ।
समस्तानां च कार्येषु विदध्याद्धितमात्मनः ॥ मनुस्मृति ७–५७

असहाय, मूर्ख, अनुभवहीन, व विषयासक्त व्यक्तीला राजधर्म सुव्यवस्थित पाळता येणें कधीही शक्य नाहीं. पवित्र, सत्यसंध, यथाशास्त्र वागणारा, बुद्धिमान, व साहाय्यसंपन्न असा राजाच शासनयत्र नीट चालवू शकतो. अत्यत सुलभ कामें देखील असहाय अशा एकटया व्यक्तीला दुष्कर होऊन बसतात. मग राज्य तर फारच भव्य गोष्ट आहे. मंत्र्यासहित राज्यव्यवहार, संधिविग्रह, स्थान, उत्कर्ष, गुप्तता कशी राखावी, नि मिळेल तें पचनीं कसे पाडावें याचें उत्कृष्ट प्रकारें चितन करावे. स्वतःला उत्कृष्ट विचार करता येत असला आणि केवढेंही कौशल्य अंगी असलें तरी मंत्र्याविरहित एकटया राजानें कधीही कोणतीही गोष्ट ठरवूं नये. सभ्य, अधिकारी, प्रजा नि सभासद यांच्याच मतानुसार बुद्धिमान राजांनींही वागावें. कधींही आपल्या मतानुसार वागू नये. स्वतंत्र वागणारा राजा स्वतःवर अनर्थ ओढवून घेतो. प्रजा त्याला दुरावतात वं त्याच्या राष्ट्राचे तुकडे तुकडे उडतात. त्यांचे विचार घेतांना एकेकटया मंत्र्याचे व सर्वांचे मिळून घ्यावेत. महाभारतांत मंत्रिसंस्थेचें महत्त्व अतिशय वर्णन केलेलें आहे. मंत्री कसे असावेत याचें वर्णन करतांना महाभारत म्हणतें :–

कुलीनान् शीलसंपन्नानिङ्गितज्ञाननिष्ठुरान् ।
देशकालविधानज्ञान् भर्तृकार्यहितैषिणः ॥ ८
नित्यमर्थेषु सर्वेषु राजा कुर्वीत मन्त्रिणः ।
अर्थमानार्घसत्कारैर्भोगं रक्त्वावचैः प्रियैः ॥ ९

संबन्धिपुरुषैः सर्वैरभिजातैः स्वदेशजैः ।
अहार्यैरव्यभीचारैः सर्वशः सुपरीक्षितैः ॥ १९
यौनाः श्रौतास्तथा मौलास्तथैवाप्यनहंकृताः ।
कर्तव्या भूतिकामेन पुरुषेण बुभूषता ॥ २०
एषां वैनायिकी बुद्धिः प्रकृतिश्चैव शोभना ।
तेजो धैर्यं क्षमा शौचमनुरागः स्थितिर्धृतिः ॥ २१
परीक्ष्य च गुणांस्नित्यं प्रौढभावान्धुरंधरान ।
पञ्चोपधा व्यतीतांश्च कुर्याद्राजाऽर्थकारिणः ॥ २२
पर्याप्तवचनान्वीरान्प्रतिपत्तिविशारदान् ।
कुलीनान्सत्त्वसंपन्नानिङ्गितज्ञाननिष्ठुरान् ॥ २३
देशकालविधानज्ञान्भर्तृकार्यहितैषिणः ।
नित्यमर्थेषु सर्वेषु राजन्कुर्वीत मन्त्रिणः ॥ २४
धर्मार्थकामज्ञमुपेत्य पृच्छेद्युक्तो गुरुं ब्राह्मणमुत्तरार्थम् ।
निष्ठा कृता तेन यदा सह स्यात्तं मन्त्रमार्गं प्रणयेदसक्तः ॥ ५४

—महाभारत, शांतिपर्व अ. ८३

"कुलीन, शीलसंपन्न, अभिप्राय ओळखणारे, देशकालादिकांचें ज्ञान असणारे, आणि आपल्या धन्याचें कार्य नि हित व्हावें अशी इच्छा करणारे, अशा प्रकारचे अमात्य राजानें सर्व प्रकारच्या राज्यव्यवहारासाठीं अवश्य करावे. आपल्या देशांत असलेल्या संबंधी, कुलीन, व्यभिचारी निष्ठा नसलेल्या, पैसे देऊन ज्यांना फोडतां येणार नाहीं अशा सर्व दृष्टींनीं परीक्षा केलेल्या, तरुण, उत्साही, ज्ञानसंपन्न, परंपरागत मोठमोठीं कामें करीत आलेल्या अशाच लोकांना मंत्रिपदावर नेमावें. ज्यांचे संस्कार चांगले आहेत, ज्यांची वाणी सत्यनिष्ठ पण मृदु आहे, शत्रूचा पराभव करण्यासारखा ज्यांचा पराक्रम आहे, भयानक आपत्तींतही ज्यांचें धैर्य टिकून राहूं शकतें, मोठा अपराध केला तरी राष्ट्रकल्याणाच्या दृष्टीनें राज्ययंत्राला क्षम करण्यासारखें ज्यांचें सामर्थ्य आहे, ज्यांचें आपल्या प्रभूवर अत्यंत प्रेम आहे असे मंत्री राजानें करावे. मंत्र्यांशीं विचारविनिमय केल्यानंतर धर्म, काम नि अर्थ यांच्यांत अत्यंत कुशल असलेल्या गुरूकडे जाऊन

राजानें त्यांचा सल्ला विचारावा व तो सांगेल त्याप्रमाणें आचरण करावें. या शेवटच्या उल्लेखावरून तपस्वी संस्थेचें नियंत्रण मंत्रि-संस्थेपेक्षां अधिक सामर्थ्यवान् होते हें स्पष्ट दिसतें.

मंत्र्यांची संख्या

मंत्र्यांची संख्या किती असावी आणि राजानें विचारविनिमय करावयाचा तो तरी किती जणासहित करावा या प्रश्नाचा विचार भारतीय राज्यशास्त्रात सूक्ष्मतेनें केलेला आहे. कौटिल्यानें इंद्राच्या सहस्रनेत्राचा अर्थ लावीत असतां असें म्हटलें आहे की,

"इद्रस्य हि मंत्रपरिषद् ऋषीणा सहस्रम्। स तच्चक्षुः। तस्मादिमं द्वचक्ष सहस्राक्षमाहु. ॥" (कौटिलीय अर्थशास्त्र अ. १५)

इद्राची मत्रिपरिषद सहस्र लोकाची होती म्हणून तो दोन डोळ्याचा असतानादेखील त्याला सहस्राक्ष असें म्हटले आहे. मंत्र्यांची सख्या आठ ही रूढ असल्याचें आपल्याला पुष्कळ ठिकाणी आढळून येते. हिदुराज्यपद्धति म्हणजे अष्टप्रधान संस्थेचीच असली पाहिजे असा जणू काही सकेतच ठरलेला आहे. भारतीय राज्य-शास्त्रांत यासंबधानें अमूक इतकीच संख्या असली पाहिजे असा कांही निश्चित नियम नाहीं. काय वाटेल तें झालें तरी तीनपेक्षां मंत्र्यांची सख्या कमी असू नये, असें महाभारताचें मत आहे.

तस्मात्सर्वैर्गुणैरेतैरुपपन्नाः सुपूजिताः।
मन्त्रिणः प्रकृतिज्ञाः स्युस्त्र्यवरा महदीप्सवः ॥ ४७॥
—महाभारत, शांतिपर्व अ. ८३

सर्व गुणांनीं युक्त असलेले मंत्री पांच जर न मिळाले तर तीन तरी असावेतच असें महाभारताचा सुविख्यात टीकाकार नीलकंठ म्हणतो. मंत्र्यांची संख्या एक किवा दोन न असतां तीन तरी कां असली पाहिजे याचें स्पष्टीकरण करतांना कौटिल्य म्हणतो—

एको मन्त्री न कर्तव्यः। एको निरवग्रहश्चरति मुह्यति च कार्यकृच्छ्रेषु। द्वावपि मंत्रिणौ न कर्तव्यौ, तौ संहतौ चरन्तौ भक्षयन्तौ गृहीतौ च विनाशयतः। अतः पञ्च सप्त वा मत्रिणः कार्याः॥

एक मंत्री कधींही करूं नये. कारण तो एकतर लहरीनुसार तरी कामें करूं लागतो किंवा कठीण प्रसंगी त्यालाच कांहीं न सुचतां मोह उत्पन्न होण्याचा संभव असतो. दोन मंत्रीही करूं नयेत. कारण ते परस्परांत एकी करून आपली तुंबडी भरण्याचा उद्योग सुरू करतात व तें राजाच्या ध्यानांत आले की सत्तेचाच नायनाट करतात. तीन, पांच, किवा सात मंत्री करावेत. या मत्र्यांनी राजसस्थेचें नेहमी नियंत्रण केले पाहिजे. महाभारतानें असें म्हटलें आहे कीं:–

परतंत्रः सदा राजा कुतो राज्ञः स्वतंत्रता ।
मंत्रे चामात्यसहिते कुतस्तस्य स्वतंत्रता ।।

राजा नेहमी परतत्र असतो. त्याला स्वातंत्र्य कोठलें ? अमात्यासहित राजानें विचार करावयास पाहिजे असल्यामुळें त्याला स्वातंत्र्य असूच शकत नाही.

शुक्रनीतींत तर असें सांगितलें आहे की––

रोधनं न भवेत्तस्माद्राज्ञस्ते स्युः सुमंत्रिणः ।।
न बिभेति नृपो येभ्यस्तैः स्यात्कि राज्यवर्धनम् ।
यथालङ्कारवस्त्राद्यैः स्त्रियो भूष्यास्तथा हि ते ।।

(कौटिल्य)

जर मंत्री अकार्यापासून राजाला अडवून त्याचें नियंत्रण करणार नाहीत तर त्यांना चांगले मंत्री म्हणतां येणार नाही. जे मंत्री राजानें अकार्य करूं नये म्हणून त्याच्या अंत.करणांत स्वत.बद्दलचा धाक उत्पन्न करणार नाहींत ते राज्य काय वाढवू शकतील ? अलंकारादिकांनी भूषविलेल्या स्त्रिया व असे मंत्री यांची योग्यता सारखीच आहे.

या मंत्रिसंस्थेपेक्षांही राजाचें सर्वश्रेष्ठ नियंत्रण म्हणजे धर्म होय. राजानें काम करतांना नेहमीं धर्मशास्त्रानुसारच केलें पाहिजे असें स्पष्ट म्हटलें आहे. राजदण्ड धर्मसंरक्षणार्थच निघालेला आहे असें महाभारतांत सर्व जगताचा आद्य राजा जो पृथु त्याला ज्यावेळीं राजदण्ड महर्षींनी दिला त्यावेळीं " नियतो यत्र धर्मो वै तमशंकः समाचर " म्हणजे "ठरलेल्या धर्मानुसारच तू वाग" असें

स्पष्ट म्हटलेलें आहे. धर्म हा राजांचाही राजा आहे असें मनूनें म्हटलेले असून राजानें 'धर्मशास्त्रानुसारेण' वागावें असें शुक्रनीतींत स्पष्ट शब्दांत सांगितलेलें आहे. अभारतीय राज्यतंत्राप्रमाणें भारतांतील राजा विधीच्या (कायद्यांच्या) अतीत नाही. तो विधान (कायदे) निर्माण करण्यासाठी उपन्न झालेला नसून ते पूर्वीच रागद्वेषहीन तपस्व्यांनीं जसे निर्माण केले असतील तसे व्यवहारांत आणण्यासाठी निर्माण झाला आहे. किबहुना राजाच काय, पण या सर्वच राज्यसंस्था धर्मनियंत्रित आहेत, नि धर्माचें नियंत्रण सर्व समाज आणि व्यक्ति यांच्या जीवनावर सदाचें आहे. तात्पर्य भारतीय राज्यसंस्था ही इतक्या नियंत्रणांनी युक्त आहे. त्या राज्यसस्थेची कांही व्यावहारिक वैशिष्टचे विचार करण्यासारखीं आहेत. 'King does no wrong' ही प्रवृत्ति तर बाजूसच राहिली, पण येथें राजा नुसता नियत्रितच नसून तो जर धर्मशास्त्रानुसार राज्यकारभार चालवीत नसेल तर इतर सामान्य अपराध्याप्रमाणें त्यालाही अपराधी समजण्यांत येई. इतकेंच नव्हें तर सामान्य अपराध्याला जेथे एकपट दंड सांगितला तेथें राजाला त्याच्या अपराधास्तव सहस्रपट अधिक दड करावा असें स्पष्ट म्हटलें आहे. मनु म्हणतोः——

कार्षापणं भवेत् दण्डचो यत्रान्यः प्राकृतो जनः।
तत्र राजा भवेत् दण्डचः सहस्रमिति धारणा॥ ३३६

मनु. अ. ८

सामान्य मनुष्याला जेथें एकपट दण्ड असेल तेथे राजाला एक सहस्र कार्षापण (त्या वेळचे नाणें) दंड करावा. विधि (कायदा) व त्याचें विधान (अंमलबजावणी) ही दोन भारतीय राज्यसंस्थेंत पृथक् खाती होती. नियम सागणारे व निर्णय करणारे हे धर्मशास्त्र पंडित नि ब्राह्मण राहात. त्यांनाही संशय उत्पन्न झाला तर ते महान् तपस्व्यांना विचारीत. तसे कोणी न आढळले तर बहुमतानुसार निर्णय होई. आणि प्रत्यक्ष दंडविधान राजाज्ञेवरून अथवा क्षत्रिय अधिकाऱ्यांच्या हातूनही होत असे. आज जो विधि (Law) व

विधान (Administration) यांच्या बाबतींत नेहमींच प्रश्न उत्पन्न होतो त्याचे महाभारतानुसार हें उत्तर आहे.

करपद्धति (Taxation)

महाभारताप्रमाणें व भारतीयांच्या राज्यशास्त्राप्रमाणेंही राजा हा धर्म आणि प्रजा यांचा सेवक असून त्याचें वेतन म्हणजे लोकांच्या उत्पन्नापैकी सहावा हिस्सा असेंच मानलेले आहे.

बलिषष्ठेन शुल्केन दण्डेनाथापराधिनाम् ।
शास्त्रनीतेन लिप्सेथाः वेतनेन धनागरम् ॥

असें या बाबतीत स्पष्ट म्हटलेलें आहे. अपराध्यांना देण्यांत येणारा दड आणि बलिषष्ठ हेंच राजाचें वेतन होय. या बाबतीत महाभारतामध्यें अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत की, नोच्छिद्यादात्मनो मूलं परेषां चापि तृष्णया । (शांतिपर्व ८८·१८) म्हणजे आपण आणि दुसरे लोक यांची मुळेंच उखडून जातील असें कधीही वागू नये. तृष्णेला देखील मर्यादा आहे. "प्रद्विष्यन्ति परिख्यातं राजानमतिखादिनम् । " (शांतिपर्व, ८८-१९) अतिशय खादाड असलेला राजा हा सर्व लोकांचा द्वेष्य होतो. कोशाचें बळ महाभारतकारांना माहीत असूनही कर लोकांवर लादण्याच्या बाबतीत महाभारतकारांनी दिलेले इषारे आजच्याही राज्यसंस्थांनी ध्यानांत घेण्यासारखे आहेत. राज्ययत्र निवळ कोशसंग्रहासाठीच वापरणाऱ्या लोकांच्या बाबतीत महाभारतकार पुढीलप्रमाणें इषारा देतात.—

कामक्रोधौ पुरस्कृत्य योऽर्थं राजाऽनुतिष्ठति
न स धर्मं न चाप्यर्थं प्रतिगृह्णाति बालिशः ॥ ७
मास्म लुब्धांश्च मूर्खांश्च कामार्थे च प्रयूयुज ।
अलुब्धान्बुद्धिसम्पन्नान्सर्वकर्मसु योजयेत् ॥ ८
मूर्खो हर्यधिकृतोऽर्थेषु कार्याणामविशारदः ।
प्रजाः क्लिश्नात्ययोगेन कामक्रोधसमन्वितः ॥ ९
बलिषष्ठेन शुल्केन दण्डेनाथापराधिनाम् ।
शास्त्रनीतेन लिप्सेथाः वेतनेन धनागरम् ॥ १०
दापयित्वा करं धर्म्यं राष्ट्रं नीत्वा यथाविधि ॥ ११

अर्थशास्त्रपरो राजा धर्मार्थान्नाधिगच्छति ।
अस्थाने चास्य तद्वित्तं सर्वमेव विनश्यति ॥ १४
अर्थमूलोऽपि हिंसां च कुरुते स्वयमात्मनः ।
करैरशास्त्रदृष्टैर्हि मोहात्सपीडयन् प्रजाः ॥ १५
ऊधश्छिंद्यात्तु यो धेन्वा क्षीरार्थी न लभेत्पयः ।
एवं राष्ट्रमयोगेन पीडितं न विवर्धते ॥ १६
यो हि दोग्धरीमुपास्ते च स नित्यं विन्दते पयः ।
एवं राष्ट्रमुपायेन भुञ्जानो लभते फलम् ॥ १७
अथ राष्ट्रमुपायेन भुज्यमानं सुरक्षितम् ।
जनयत्यतुलां नित्यं कोशवृद्धिं युधिष्ठिर ॥ १८

-- महाभारत, शांतिपर्व अ. ७१

प्रद्विषन्ति परिख्यातं राजानमतिखादिनम् ॥ १९
प्रद्विष्टस्य कुतः श्रेयो न प्रियो लभते फलम् ।
वत्सौपम्येन दोग्धव्यं राष्ट्रमक्षीणबुद्धिना ॥ २०
भृतो वत्सो जातबलः पीडां सहति भारत ।
न कर्म कुरुते वत्सो भृशं दुग्धो युधिष्ठिर ॥ २१
राष्ट्रमप्यतिदुग्धं हि न कर्म कुरुते महत ।
यो राष्ट्रमनुगृह्णाति परिरक्षन्व्ययं नृपः ॥ २२

--महाभारत, शांतिपर्व अध्याय ८७

मधुदोहं दुहेद्राष्ट्रं भ्रमरा इव पादपम् ।
वत्सापेक्षी दुहेच्चैव स्तनांश्च न विकृट्टयेत् ॥ ४
जलौकावत्पिबेद्राष्ट्रं मृदुनैव नराधिपः ।
व्याघ्रीव च हरेत्पुत्रान्संदशेन्न च पीडयेत् ॥ ५
यथा शल्यकवानाखुः पदं धूनयते सदा ।
अतीक्ष्णेनाभ्युपायेन तथा राष्ट्रं समापिबेत् ॥ ६
अल्पेनाल्पेन देयेन वर्धमानं प्रदापयेत् ।
ततो भूयस्ततो भूयः क्रमवृद्धिं समापिबेत् ॥ ७
दमयन्निव दम्यानि शश्वद्भारं विवर्धयेत् ।
मृदुपूर्वं प्रयत्नेन पाशानभ्यवहारयेत् ॥ ८

सकृत्पाशावकीर्णास्ते न भविष्यन्ति दुर्दमाः ।
उचितेनैव भोक्तव्यास्ते भविष्यन्ति यत्नतः ॥ ९
न चास्थाने न चाकाले करांस्तेभ्यो निपातयेत् ।
आनुपूर्व्येण सान्त्वेन यथाकालं यथाविधि ॥ १२

महाभारत, शांतिपर्व अध्याय ८८

अर्थ—कामक्रोधांच्या आहारीं जाऊन जो राजा आपलें राज्य चालवितो त्याला धर्म व अर्थ दोन्ही प्राप्त न होतां केवळ मूर्खपणा मात्र पदरीं येतो. मूर्ख आणि लोभी अधिकाऱ्यांचा अर्थकाम साधण्याच्या कामी कधीही उपयोग करूं नय. जर या कामावर अशांची योजना केली तर कामें कशी करावी हें त्यांना माहीत नसल्यामुळें कामक्रोधांच्या आहारी जाऊन हे लोक शहाणपणाच्या अभावीं प्रजांना छळतात. लोभी नसलेल्या बुद्धिसपन्न लोकांनाच कोणत्याही कामावर नियुक्त करावे. प्रजांच्या उत्पन्नापैकी केवळ सहावा भाग, त्यांत कोणतीही लबाडी न करतां, राजानें घ्यावा. तसेंच अपराध्यांना देण्यात येणाऱ्या दंडावरही राजांना अधिकार आहे. नीतीचा पुरस्कार करून प्रजेजवळून करभार घेऊनच राजाने आपला योगक्षेम चालविला पाहिजे. केवळ अर्थाच्या पाठीमागे लागलेल्या राजांचे धर्म व अर्थ नष्ट होतात. धनाचेंच महत्त्व एकदां उत्पन्न झाले म्हणजे वाटेल तसे कर प्रजांवर लादून शेवटी राजेलोक आपलाच विनाश ओढवून घेत असतात. जो गाईचा स्तनभागच कापून घेईल त्याला जसें दूध मिळूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें जो राष्ट्र पिळून काढील त्याच्याही पदरांत कांहीं पडणार नाही. ज्याप्रमाणें गाईची शुश्रूषा करून नीट दूध काढणाऱ्यालाच लाभ होतो, त्याचप्रमाणें युक्तीनें, संरक्षण करून राष्ट्राजवळून धन घेणारांचीच कोशवृद्धि होत असते. प्रजा खादाड राजाचा द्वेष करतात. प्रजांकडून ज्याचा द्वेष होतो तो टिकणार कसा? वत्साप्रमाणेंच राष्ट्राला राजानें पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें व्यवस्थित रांखलेला वत्स पीडा सहन करतो, त्याचप्रमाणें व्यवस्थित राखलेलेंच राष्ट्र संकटकालीं टिकाव धरूं शकतें. भ्रमर ज्याप्रमाणें झाडाला पीडा न देतां त्यांतील मध फक्त काढून घेतात

किंवा वत्साची अपेक्षा करणारा ज्याप्रमाणें स्तनांना पीडा न देतां दूध काढतो अथवा वाघीण ज्याप्रमाणें दातांत पिलांना धरूनही त्यांना दांत रुतूं देत नाही किंवा उंदीर ज्याप्रमाणें पाय कुरतडत असतांना आग होऊं देत नाही, त्याचप्रमाणें या बाबतीत राज्ययत्राचें वर्तन असलें पाहिजे. हळुहळू, लक्षांत न येतां कोश वाढवावा. अत्यंत मृदु असे उपाय त्यासंबंधीं योजावे. अकाली नि अस्थानी कर कधीही लादू नये. योग्य कारण दाखवून नैतिकदृष्ट्या समर्थनीय व काळाच्या दृष्टीनें योग्य असेच कर पोटांतील पाणीदेखील हालू न देतां वाढविले पाहिजेत.

कोश कसा वाढवावा ?

राज्ययंत्राचें खरें बळ कोशच होय. ह्याची महाभारतकारांना पूर्ण कल्पना आहे. ते सांगतात:—

' राज्ञः कोशक्षयादेव जायते बलसंक्षयः ।। १२

महाभारत, शांतिपर्व अ. १३०

राजाचा कोश नष्ट झाला की त्याचे बळ नष्ट होतें. किंबहुना भारतकार असें म्हणतात की.—

राज्ञः कोशबलं मूलं कोशमूलं पुनर्बलम् ।
तन्मलं सर्वधर्माणां धर्ममूलाः पुनः प्रजाः ।। ३५
नान्यानपीडयित्वेह कोशः शक्यः कुतो बलम् ।
तदर्थं पीडयित्वा च दोषं प्राप्तुं न सोऽर्हति ।। ३६

शान्तिपर्व अ. १३०

अर्थ :– " कोश हेंच राज्याचें मूळ होय. कोश समृद्ध असेल तरच राष्ट्र सामर्थ्ययुक्त असतें. सैन्यही त्याच्याच भरंवशावर जगतें. तेंच सर्व धर्मांचें मूळ आहे व धर्म हाच प्रजांचा आधार होय. दुसऱ्यांना पीडा दिल्यावांचून कोश वाढणें शक्य नाहीं. कोश नाहीं म्हणजे बळही नाहीं. म्हणून कोशासाठीं लोकांना पीडा दिली तरी त्यासाठीं राजाला दोष देतां येणार नाहीं. पण कोणाला पीडा द्यावी व कोणावर अधिक कर बसवावे याचेही नियम ठरलेले होते. उदाहरणार्थ महाभारत यासंबंधीं म्हणतें :–

पानागारनिवेशाश्च वेश्याः प्रापणिकास्तथा ।
कुशीलवाः सकितवा ये चान्ये केचिदीदृशाः ॥ १४

— महाभारत, शान्तिपर्व अ. ८८

मद्यपान गृहें, वेश्यागारे, कुंटिणखाने, विट, व द्यूतकार हे सर्व राष्ट्राचें धन अकारण शोषण करणारे असल्यामुळें त्यांच्यावर नानाप्रकारचे कर लादून व त्यांना दंड करून राजाला आपला कोश समृद्ध करावयास कांहींही अडचण नाही. असा एक उगाचच अपसमज पसरविण्यांत येतो कीं, ब्राह्मणांनी करापासून स्वतःची सुटका करून घेतली असून त्यांना कर वा दड द्यावा लागत नसे. पण हें निव्वळ चुकीचें आहे. जो अरण्यांत राहून षट्कर्मे करीत तपस्यामय, ज्ञानसंपन्न असें जीवन जगेल त्यालाच केवळ कर द्यावा लागत नसे. ब्राह्मणांतही मागें सांगितल्याप्रमाणे क्षत्रिय, वैश्य व शूद्र वृत्तीचे ब्राह्मण असत. त्यांच्याजवळून राजानें अवश्य कर घ्यावा. इतकेंच नव्हें तर त्यांना वेठीलाही धरावे असें महाभारताचे स्पष्ट मत आहे.

अश्रोत्रियाः सर्व एव सर्वे चानाहिताग्नयः ।
तान् सर्वान् धार्मिको राजा बलिं विष्टिच कारयेत् ॥ ५
आह्वायका देवलका नाक्षत्रा ग्रामयाजकाः ।
एते ब्राह्मणचाण्डाला महापथिकपञ्चमाः ॥ ६
ऋत्विक् पुरोहितो मन्त्री दूतो वार्तानुकर्षकः ।
एते क्षत्रसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥ ७
अश्वारोहा गजारोहा रथिनोऽथ पदातयः ।
एते वैश्यसमा राजन् ब्राह्मणानां भवन्त्युत ॥ ८
एतेभ्यो बलिमादद्याद्धीनकोशो महीपतिः ।
ऋते ब्रह्मसमेभ्यश्च देवकल्पेभ्य एव च ॥ ९
अब्राह्मणानां वित्तस्य स्वामी राजेति वैदिकम् ।
ब्राह्मणानां च ये केचिद्विकर्मस्था भवन्त्युत ॥ १०
विकर्मस्थाश्च नोपेक्ष्या विप्रा राज्ञा कथंचन ।
नियम्याः संविभज्याश्च धर्मानुग्रहकारणात् ॥ ११

यस्य स्म विषये राजन्स्तेनो भवति वै द्विजः ।
राज्ञ एवापराधं तं मन्यन्ते तद्विदो जनः ।। १२
अवृत्त्या यो भवेत्स्तेनो वेदवित्स्नातकस्तथा ।
राजन्स राज्ञा भर्तव्य इति वेदविदो विदुः ।। १३
स चेन्नो परिवर्तेत कृतवृत्तिः परतप ।
ततो निर्वासनीयः स्यात्तस्माद्देशात्स बांधवः ।। १४
—महाभारत, शांतिपर्व अ. ७६

"जे ब्राह्मण श्रोत्रिय नसतील, अग्नीची उपासना करणारे नसतील त्या सर्वांना धार्मिक राजानें कर द्यावयास लावावें, इतकेंच नव्हें तर वेठीला धरून कामालाही लावावे. देवविषयक कामें पैसे घेऊन करणारे ब्राह्मण हे चांडाळ होत. ऋत्विज, पुरोहित, मंत्री, दूत, बातम्या सांगणारे हे ब्राह्मणांतील क्षत्रिय होत. अश्वावर बसणारे, गजावर आरोहण करणारे रथी व पदाती हे ब्राह्मणांमधील वैश्यासारखे होत. राजानें विशेषतः हीन कोश राजानें यांच्याजवळून करभार घ्यावा. जे देवतुल्य व ब्रह्मतुल्य ब्राह्मण असतील, केवळ त्यांच्याजवळूनच करभार घेऊ नये. अब्राह्मणाच्या वित्ताचा राजा स्वामी आहे याचा खरा अर्थ हाच आहे. ब्राह्मणांपैकी जे आपला वर्णधर्म सोडून दुसऱ्या वर्णधर्मानुसार वागणारे असतील त्यांची राजानें कधीही उपेक्षा करू नये. त्यांचें नियमन करावें व त्यांना नीट मार्गावर आणून धर्माचे सरक्षण करावें. ज्याच्या राज्यांत ब्राह्मण चोर होईल तो त्या राजाचाच अपराध होय असें मानतात. वेदवेत्त्या व व्रतस्थ ब्राह्मणाला जर उपजीवन नसेल आणि म्हणून जर तो चोरी करीत असेल तर राजानें त्याचें पोषण करावें. त्याच्या उपजीवनाची व्यवस्था करूनही जर तो आपलें दुर्वर्तन सोडीत नसेल तर त्याला त्याच्या संबंधी परिवारासहित देशाबाहेर हांकलून लावावें.

उपजीवन व राज्यसंस्था

हिंदु राज्यसंस्था ही, उपजीवनाचा विचार अतिशय बारकाईनें व शास्त्रशुद्ध रीतीनें करीत असे. धर्म व संस्कृतीच्या वेली भुकेच्या

आगीनें करपून जातात म्हणून उपजीवन हें धर्म व संस्कृतीच्या संरक्षणाचें एक अत्यंत महत्त्वाचें अंग आहे याची त्यांना पूर्ण कल्पना होती. म्हणून त्याच्यासंबंधीं जितकें अधिक शास्त्रशुद्ध नियमन करतां येईल तितका प्रयत्न करण्यांत आलेला आहे. राजकर्तव्यात शेती, उद्योगधंदे, कला व व्यापार या सर्वाच्याच उत्तेजनाविषयी दक्षता घ्यावयास वारंवार सांगितलें आहे. 'पालन' हा शब्द राजसंस्थेचा आत्मा म्हणूनच वारवार येतो. सामाजिक व आर्थिक प्रश्न राजकर्तव्याचें प्रथम श्रेणीचें कर्तव्य म्हणून मानले जात. सर्व वर्णाच्या, जातींच्या आणि वर्गाच्या लोकांच्या उपजीवनाच्या व्यवसायांना समृद्ध करण्यासाठी त्याच्या आड जे जे येतील त्याना कठोर शिक्षा सांगितलेल्या आहेत. एका वर्गानें दुसऱ्या वर्गाच्या उपजीवनाच्या व्यवसायांत हस्तक्षेप न करण्यासबधीची दक्षता घेण्यांत आलेली आहे. वार्ताशास्त्र अथवा उत्पादनाच्या विविध विभागांचें शास्त्र अत्यंत महत्त्वाचें म्हणून मानण्यांत येऊन महाभारताच्या शांतिपर्वात तर वेदत्रयी म्हणजे कर्मकांड व आन्विक्षिकी म्हणजे अध्यात्म यांच्याबरोबरीनें वार्तेला अथवा महाभारताच्याच शब्दांत सांगावयाचें तर जीविकाकांडाला अत्यंत महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे.

त्रयी चान्विक्षिकी चैव वार्ता च भरतर्षभ
दण्डनीतिश्च विपुला विद्यास्तत्र निदर्शिताः ॥

—महाभारत, शान्तिपर्व अ. ५९

वार्तेचें महत्त्व महाभारतानें 'वार्तामूलो हयय लोको, (शान्तिपर्व अ. ६८·३५) कृषिगोरक्ष वाणिज्यं लोकानामिह जीवनम् (शान्तिपर्व अ. ८९·७) अशा शब्दांनीं दिग्दर्शित केले आहे. भारताच्या वनपर्वात तर या जीवनशास्त्राचें महत्त्व वर्णन करतांना हनुमंतांनीं चातुर्वर्ण्यात्मक समाजरचनेचें धारणपोषण वार्तेच्या भरंवशावर होतें असें स्पष्टपणें म्हटलें आहे. जो राजा या उपजीवनाकडे लक्ष देणार नाहीं त्याला बलिषड्भागतस्कर म्हटलें असून राजाचें रोजचें कर्तव्य म्हणून या बाबीकडे राजानें लक्ष दिलें पाहिजे असें प्रतिपादन केलें आहे. या बाबतींत महाभारतानें एक अतिशय उत्कृष्ट उपमा वापरली आहे. महाभारत म्हणते :—

भवितव्यं सदा राज्ञा गर्भिणीसहधर्मिणा । ४४

——महाभारत, शान्तिपर्व अ. ५६-

ज्याप्रमाणें गरोदर स्त्री आपल्या मुलाच्या रक्षणावांचून दुसऱ्या कशाचाही विचार करूं शकत नाही, त्याचप्रमाणे राजानेंही प्रजेच्या उपजीवनाशिवाय स्वतःविषयीच्या दुसऱ्या कोणत्याही विचारास आपल्या मनांत स्थान देऊ नये. इतकेंच नव्हें तर भारतपुढें म्हणते :—

मा ते राष्ट्रे याचनकाऽभूवन्मा चापि दस्यवः ।
एषां दातार एवैते नैते भूतस्य भावकाः ॥

तुझ्या राष्ट्रांत याचक उत्पन्न होऊं नयेत व चोरही उत्पन्न होऊं नयेत. किबहुना या आपल्या कर्तव्याला चुकणाऱ्या राज्ययत्राविषयीं भारतानें अत्यंत तिरस्कार प्रकट केला आहे.

लोक सम्राटसुद्धां निवडीत

अशा या सुनियत्रित व प्रजानीच निर्माण केलेल्या राज्ययंत्रांत 'सम्राट' देखील निवडीत असे दिसतें. सर्वसामान्य लोक हे ज्याप्रमाणें राजाचे प्रजाजन, त्याचप्रमाणें सर्व राजे हे सम्राटाचे प्रजाजन असत. आपल्यापैकीं एकेकटयाला गांठून दस्यूंनी आपला पराजय करूं नये म्हणून सम्राट म्हणून आपल्याचपैकी जो सर्वात अधिक गुणसंपन्न असेल त्याला निवडण्याची प्रथा होती. साम्राज्यही याप्रमाणें लोकमतानुवर्ती व लोकांच्या आवश्यकतेंतूनच निर्माण झालेली बाब होती. महाभारताच्या आदिपर्वात शतनूला याच पद्धतीतें सम्राट् केल्याचें वर्णन आहे ते पुढीलप्रमाणें :—

न चास्य सदृशः कश्चिद्धर्मतः पार्थिवोऽभवत् ॥ ६
वर्तमानं हि धर्मेषु सर्वधर्मभृतां वरम् ।
तं महीपा महीपालं राजराज्येऽभ्यषेचयन् ॥ ७
वीतशोकभयाबाधाः सुखस्वप्ननिबोधनाः ।
पतिं भारतगोप्तारं समपद्यन्त भूमिपाः ॥ ८

——महाभारत, आदिपर्व अ. १००

शंतनूसारखा त्यावेळी कोणीही धर्मनिष्ठ राजा नव्हता. तो सर्व धार्मिकांमध्यें अत्यंत श्रेष्ठ असल्यामुळें सर्व राजांनीं एकत्र जमून

त्याला साम्राज्यपदाचा अभिषेक केला आणि अखिल भारतवर्षाच्या त्या महान् सम्राटाच्या साम्राज्यांत शोक, भय इत्यादिकांची बाधा नाहीशी होऊन सर्व राजे आनदाची सुखस्वप्नें पहात नांदू लागले. या पद्धतीनें चंद्रसूर्य वंशांच्या साम्राज्याखालीं नांदण्याची प्रथाच भारतवर्षात पडलेली होती. महाभारताच्या सभापर्वाच्या १४ व्या अध्यायांत भगवान् श्रीकृष्णांनीं स्वतःच या कथेचा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात :—

ऐलस्येक्ष्वाकुवंशस्य प्रकृतिं परिचक्षते ।
राजानः श्रेणिबद्धाश्च तथान्ये क्षत्रिया भुवि ॥ ४

—महाभारत, सभापर्व अ. १४

ऐल आणि इक्ष्वाकु या दोन राजवंशांचे भारतांतील सर्व क्षत्रिय व राजे हे प्रजाजनच होत.

राजा वध्य आहे कीं नाहीं ?

याप्रमाणें राजा व त्याची नियत्रणें नि त्या सस्थेचें स्वरूप महाभारतांत वर्णिलें आहे. राज्यसंस्थेचें हें स्वरूप कलंकित करणाऱ्या, स्वार्थी ठरलेल्या, व केवळ स्वतःच्या लहरीनुसार राज्य करूं इच्छिणाऱ्या मुलतानाला राज्यावर तर बसण्याचा अधिकार नाहीच नाही पण जिवंतही राहण्याचा अधिकार नाहीं असें महाभारतांत स्पष्ट म्हटलें आहे. इतकेंच नव्हें तर अशा राजांना राजकलि म्हणून ठार मारल्याची उदाहरणेंही आहेत. वेन राजाला ऋषींनीं याच कारणास्तव ठार मारलें असें महाभारताच्या शांतिपर्वात म्हटलें आहे.

तं प्रजासु विधर्माणं रागद्वेषवशानुगम् ।
मन्त्रभूतैः कुशैर्जघ्नुर्ऋषयो ब्रह्मवादिनः ॥ ९४ —शान्तिपर्व अ. ५९.

प्रजांच्या बाबतींत धर्मानुसार न वागणाऱ्या व रागद्वेषादि विकारांना बळी पडून आपल्या लहरीनुसार वागणाऱ्या वेनाला ब्रह्मवादी ऋषींनीं मंत्रभूत कुशांनीं ठार मारलें. महाभारताच्या उद्योगपर्वांत अशा चौदा कुलांगार राजकलींची यादीच दिलेली आहे.

हैहयानां मुदावर्तो नीपानां जनमेजयः ।
बहुलस्तालजङ्घानां कृमीणामुद्धतो वसुः ॥ १३
अजबिन्दुः सुवीराणां सुराष्ट्राणां दुर्वाद्धकः ।
अर्कजश्च बलीहानां चीनानां धौतमूलकः ॥ १४
हयग्रीवो विदेहानां वरयुश्च महौजसाम् ।
बाहुः सुन्दरवंशानां दीप्ताक्षाणां पुरूरवाः ॥ १५
सहजश्चेदिमत्स्यानां प्रवीराणां वृषध्वजः ।
धारणश्चन्द्रवत्सानां मुकुटानां विगाहनः ॥ १६
शमश्च नन्दिवेगानामित्येते कुलपांसनाः ।
युगान्ते कृष्णसम्भूताः कुले कुपुरुषाधमा ॥ १७

—महाभारत, उद्योगपर्व अ. ७४

राजा वध्य केव्हा होतो हे सांगतांना महाभारताच्या शांतिपर्वात "असत्पापिष्ठसचिवो वध्यो लोकस्य धर्म. ।" दुष्ट व पापी असे ज्याचे मन्त्री असतात, असा धर्मनाश करणारा राजा हा प्रजांच्या दृष्टीनें वध्य होतो असे सांगितलेलें असून अनुशासन पर्वाच्या ६१ व्या अध्यायांत त्याचें पुढीलप्रमाणें विस्तृत वर्णन आहे --

धिक् तस्य जीवितं राज्ञो राष्ट्रे यस्यावसीदति ।
द्विजोऽन्यो वा मनुष्योऽपि शिबिराह वचो यथा ॥ २९
यस्य स्म विषये राज्ञः स्नातकः सीदति क्षुधा ।
अवृद्धिमेति तद्राष्ट्रं विन्दते सहराजकम् ॥ ३०
क्रोशन्त्यो यस्य वै राष्ट्राद् ध्रियन्ते तरसा स्त्रियः ।
क्रोशतां पतिपुत्राणां मृतोऽसौ न च जीवति ॥ ३१
अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।
तं वै राजकृलं हन्युः प्रजाः संनह्य निर्घृणम् ॥ ३२
अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।
स संहत्य निहंतव्यः श्वेव सोन्माद आतुरः ।

—महाभारत, अनुशासनपर्व अ ६१

ज्याच्या राज्यांत द्विज अथवा कोणत्याही वर्णाचा मनुष्य कष्ट पावतो, त्या राजाच्या जीविताला धिक्कार असो. ज्याच्या राष्ट्रांत

तपस्वी व्रतस्थांना अन्न न मिळून ते भुकेच्या आगीनें होरपळून निघतात तें राष्ट्र समृद्ध तर होत नाहीच, पण राज्ययंत्रासहित विनाश पावतें. ज्या राष्ट्रांतून पति–पुत्र हे असहाय होऊन रडत असतांना बलात्कारानें स्त्रियांचें, त्या रडत ओरडत असलेल्या स्थितीत, अपहरण होतें त्या राज्ययंत्राचा सूत्रचालक हा जिवत नसून मेलेला आहे व तें एक जिवत प्रेत आहे असें समजावें. संरक्षण न करणाऱ्या, लुबाडणाऱ्या, उपजीवन नष्ट करणाऱ्या, व राज्यसंस्थेची कोणतींही नियंत्रणें न मानणाऱ्या राजाला प्रजांनीं राजकलि समजून संघटितरीत्या निर्घृणपणें कसलीही दयामाया न ठेवतां ठार मारावें. मी तुमचें संरक्षण करीन असें सांगूनही जो राजा आपल्या प्रजांचें सरक्षण करीत नाहीं त्याला सर्वांनी मिळून सघटितपणें पिसाळलेल्या व मरणपथास लागलेल्या कुत्र्याप्रमाणें ठार मारावे. महाभारतकाळीं केवळ राज्यें च होती व राजा नसलेली राज्यव्यवस्था नव्हती असें नाही. वैदिककाळापासूनच भारतवर्षात गणराज्यें (Republics) असल्याचा उल्लेख येतो. इतकेच नव्हे, तर या गणराज्यांच्या प्रतापानेंच अलेक्झाडरला अखेरीस हिदुस्थान सोडून जाण्याची पाळी आल्याचा स्पष्ट उल्लेख इतिहासांत सांपडतो. ही गणराज्यें अत्यंत समृद्ध, सपन्न, व समर्थ असत. ती अत्यत सुव्यवस्थित चालत. ज्या भगवान् श्रीकृष्णांच्या कर्तृत्वाच्या वर्णनासाठी वेदव्यासांच्या दिव्य प्रतिभेंतून श्रीमन्महाभारताची निर्मिति झाली आहे त्या श्रीकृष्णांचें यादवांचें राज्य हें गणराज्य होतें. इतकेंच नव्हें तर त्या गणराज्यात बभ्रु, उग्रसेन, व श्रीकृष्ण हे तीन लोकनियुक्त अध्यक्ष होते व लोकसभेंत त्यांचे कडाक्याचे वाद होत असत असें महाभारतावरून स्पष्ट दिसतें. गणराज्ये सुरक्षित व समर्थ कशीं होतात आणि त्यासाठीं कोणतें पथ्य सांभाळणें अत्यंत आवश्यक आहे याचेही महाभारतांत उत्कृष्ट वर्णन आलेले आहे. तें आपण पुढील व्याख्यानांत पाहूं.

८. राजसत्तचा अधःपात

गणराज्यें (Republics)

महाभारताच्या शांतिपर्वात सर्वसामान्य व्यक्तीला गणराज्य चालवितांना अडचणी काय येतात व त्यांचें निवारण कसें करावें याचें अत्यंत उत्कृष्ट वर्णन आले आहे. तें पुढीलप्रमाणेः—

यथा गणाः प्रवर्धन्ते न भिद्यन्ते च भारत ।
अरींश्च विजिगीषन्ते सुहृदः प्राप्तुवन्ति च ॥ ७
भेदमूलो विनाशो हि गणानामुपलक्षये ।
मत्रसवरण दुःखं बहूनामिति मे मतिः ॥ ८
एतदिच्छाम्यहं श्रोतुं निखिलेन परंतप ।
यथा च ते न भिद्येरस्तच्च मे वद पार्थिव ॥ ९

भीष्म उवाच—

गणानां च कुलानां च राज्ञां भरतसत्तम ।
वैरसंदीपनावेतौ लोभामर्षौ नराधिप ॥ १०
लोभमेको हि वृणुते ततोऽमर्षमनन्तरम् ।
तौ क्षयव्ययसंयुक्तावन्योन्यं च विनाशिनौ ॥ ११
चारमन्त्रबलादानैः सामदानविभेदनैः ।
क्षयव्ययभयोपायैः प्रकर्षन्तीतरेतरम ॥ १२
तत्रादानेन भिद्यन्ते गणाः सघातवृत्तयः ।
भिन्ना विमनसः सर्वे गच्छन्त्यरिवशं भयात् ॥ १३
भेदे गणा विनश्यंहि भिन्नास्तु सुजयाः परैः ।
तस्मात्संघातयोगेन प्रयतेरन् गणाः सदा ॥ १४
अर्थाश्चैवाधिगम्यन्ते संघातबलपौरुषैः ।
बाह्याश्च मैत्रीं कुर्वन्ति तेषु संघातवृत्तिषु ॥ १५
ज्ञानवृद्धाः प्रशंसन्ति शुश्रूषन्तः परस्परम् ।

व्याख्यान ८ वे, दि. ३ एप्रिल १९५१

विनिवृत्ताभिसन्धानाः सुखमेधन्ति सर्वशः ॥ १६
धर्मिष्ठान् व्यवहारांश्च स्थापयन्तश्च शास्त्रतः ।
यथावत्प्रतिपश्यन्तो विवर्धन्ते गणोत्तमाः ॥ १७
पुत्रान्भ्रातॄन्निगृह्णन्तो विनयन्तश्च तान्सदा ।
विनीतांश्च प्रगृह्णन्तो विवर्धन्ते गणोत्तमाः ॥ १८
चारमन्त्रविधानेषु कोषसंनिचयेषु च ।
नित्ययुक्ता महाबाहो वर्धन्ते सर्वतो गणाः ॥ १९
प्राज्ञान्शूरान्महोत्साहान्कर्मसु स्थिरपौरुषान् ।
मानयन्तः सदा युक्ता विवर्धन्ते गणा नृप ॥ २०
द्रव्यवन्तश्च शूराश्च शस्त्रज्ञाः शास्त्रपारगाः ।
कृच्छ्रास्वापत्सु संमूढान् गणाः सन्तारयन्ति ते ॥ २१
क्रोधो भेदो भयं दण्डः कर्षणं निग्रहो वधः ।
नयत्यरिवशं सद्यो गणान्भरतसत्तम ॥ २२
तस्मान्मानयितव्यास्ते गणमुख्याः प्रधानतः ।
लोकयात्रा समायत्ता भूयसी तेषु पार्थिव ॥ २३
मन्त्रिगुप्तिः प्रधानेषु चारश्चामित्रकर्षण ।
न गणाः कृत्स्नशो मन्त्रं श्रोतुमर्हन्ति भारत ॥ २४
गणमुख्यैस्तु संभूय कार्यं गणहितं मिथः ।
पृथग्गणस्य भिन्नस्य विततस्य ततोऽन्यथा ॥ २५
अर्थाः प्रत्यवसीदन्ति तथाऽनर्था भवन्ति च ।
तेषामन्योन्यभिन्नानां स्वशक्तिमनुतिष्ठताम् ॥ २६
निग्रहः पण्डितैः कार्यः क्षिप्रमेव प्रधानतः ।
कुलेषु कलहा जाताः कुलवृद्धैरुपेक्षिताः ॥ २७
गोत्रस्य नाशं कुर्वन्ति गणभेदस्य कारकम् ।
आभ्यन्तरं भयं रक्ष्यमसार बाह्यतो भयम् ॥ २८
आभ्यन्तरं भयं राजन् सद्यो मूलानि कृन्तति ।
अकस्मात्क्रोधमोहाभ्यां लोभाद्वापि स्वभावजात् ॥ २९
अन्योन्यं नाभिभाषन्ते तत्पराभवलक्षणम् ।
जात्या च सदृशाः सर्वे कुलेन सदृशास्तथा ॥ ३०

न चोद्योगेन बुद्ध्या वा रूपद्रव्येण वा पुनः ।
भेदाश्चैव प्रदानाच्च भिद्यन्ते रिपुभिर्गणाः ॥ ३१
तस्मात्संघातमेवाहुर्गणानां शरणं महत् ॥ ३२

—महाभारत, शांतिपर्व अ. १०७

म्हणजे सघराज्ये वाढतात कशी ? शत्रूना जिकतात कशी ? मित्र नि साहाय्यक मिळवितात कशी ? व त्यांच्यांत परस्परांत भेद निर्माण कसा होतो? गणराज्यांचा नाश त्यांच्यांत होणाऱ्या फुटीवर अवलबून आहे असें मला वाटतें. त्याचप्रमाणें त्यांच्यांत राज्याला अवश्यक ते महत्त्वाचे विचार गुप्त ठेवणेंही अशक्य होत असावें. कारण की, तें एकतत्रात्मक नसून बहुतत्रात्मक असल्यामुळें व त्यांच्यांतील सर्वच लोक समान अधिकारी असल्यामुळें मसलती गुप्त ठेवणें त्यांना शक्य होत नसावे. मला या बाबतीत आपलें प्रतिपादन ऐकण्याची इच्छा आहे. त्यावर भीष्म म्हणतात, "संघराज्यें व कुलराज्यें यांच्यांत परस्परांत लोभ व मत्सराच्या पोटी जन्माला येणारा क्रोध हेच वैर उत्पन्न करतात व वाढवितात. प्रथम लोभ उत्पन्न होतो. त्याच्या-मागोमाग क्रोध उत्पन्न होतो व तेच गणांतील लोकांना एकमेकांचा नाश करावयास व त्यासाठी हवें तें गमवावयास लावून दोन्ही स्पर्धाळू व्यक्तींचा नाश करतात. एकाच्या अंतःकरणांत लोभ व त्याच्या पाठोपाठ मत्सर उत्पन्न झाला की, तो हेर गुप्त मसलती व सैनिक सामर्थ्य यांचा उपयोग करून साम, दाम, भेद यांचाही भर-पूर प्रमाणात उपयोग करून तसेंच नाश, व्यय व भय उत्पन्न कर-ण्याचा प्रयत्न करून आपल्या प्रतिपक्षाची छळणूक मांडतो. संघ-राज्यामध्यें हे प्रकार परस्परांविरुद्ध सुरू झाले की, फुटीरपणा कमालीचा वाढून समान ध्येयाच्या बाबतींत अथवा सांघिक कामाच्या बाबतींत ते परस्परांविषयीं उदासीन व एकमेकांपासून विलग होतात. त्यामुळें त्यांची सघशक्ति विलयास जाऊन आप-आपसांतच जीवितसरक्षणासाठी ते एकमेकांना भिऊं लागतात व शेवटी शत्रूच्या हस्तगत होतात. गणांतलें सांघिक जीवन नष्ट होऊन ते फुटले की त्यांचा नाश ओढवलाच म्हणून समजावें. ते विलग झाले

की शत्रूचें भक्ष्य झालेच. म्हणून त्यांनी नेहमीं आपले संघजीवन मुळीच कसें फुटणार नाही याची पूर्णपणें काळजी घेतली पाहिजे. गणांतील सर्वच लोक सैनिक असतात त्यामुळें तें नेहमीच बलवान राष्ट्र असतें. साधिक बळामुळे व साधिक पराक्रमामुळे गणराज्य समृद्ध तर होतेंच, परंतु बाहेरचे लोक देखील त्याच्याशी मैत्री व सौहार्द उत्पन्न करण्याचा प्रयत्न करतात. चांगल्या गणराज्यांत जे ज्ञानवृद्ध लोक असतात ते सर्वांच्या अत.करणांतील सघजीवनांत विलीन होऊन जाण्याच्या व व्यक्तित्व उरूं न देण्याच्या वृत्तीला नेहमीच उत्तेजन देतात. परस्परांशी आंतले बाहेरचे कांहीं एक न ठेवता ते परस्परांशी शुद्ध व सरळ व्यवहार करतात व त्यामुळेच गणराज्यात सर्व प्रकारचे सुख नांदतें. गणराज्यांतील लोक धर्म शास्त्रानुसार आपले व्यवहार चालवितांत व विधिविधानें बनवितात म्हणूनच ते समृद्ध व सुखी जीवन जगू शकतात. एकमेकाशी त्यांचें वागणें नेहमीच परस्परसहकार्याचे व कोणाचीही हानि न करणारें असतें. गणराज्यांत वरिष्ठ नेते आपल्या मुलांना व बंधूना व सर्वच युवकांना शिस्तीनें कसे वागावे याचे सुव्यवस्थित शिक्षण देतात व हें शिक्षण परिपूर्ण होऊन तदनुसार उत्कृष्ट कौशल्य दाखविण्याची त्यांनी खात्री उत्पन्न केली म्हणजेच त्याजवर जबाबदारीची कामें सोंपविण्यांत येतात म्हणूनच गणराज्यें समृद्ध होतात. हेर खाते, मत्रविधान, कोश वाढविण्याचे शास्त्र, या बाबतीत गणराज्यें नेहमीं दक्ष असली तर वाढतात. आपल्या प्राज्ञ, शूर, उत्साही, व स्वतःच्या कर्तव्यांत अत्यंत दक्ष असलेल्या अशा अधिकाऱ्यांना सघराज्यांत जोंवर मान व स्थान देण्याची प्रवृत्ति असते तोवर गणराज्ये वाढतात. गणराज्यांतील श्रीमंत, शूर, शास्त्रज्ञ, शस्त्रधारणात अत्यत कुशल असलेले असे लोक आपत्तीत सांपडलेल्या आपल्या सहकाऱ्याना संभाळून तारून नेण्याची वृत्ति जोवर राखतात तोवर गणराज्ये समृद्ध व समर्थ असतात. आपआपसांत क्रोध, भेद, भय, दण्ड, पिळवणूक, बधन, व वध यांचें तांडव सुरू झाले की गणराज्यें विलय पावतात. म्हणून गणराज्याचा जो प्रमुख असेल व गणराज्याचे जे इतर

मुख्य असतील त्यांचा त्या राज्यांत नेहमींच सन्मान राखला गेला पाहिजे. गणांच्या मुख्य अशा अधिकाऱ्यांच्यामध्येंच मसलती चालतात. त्यांच्याबाहेर त्या कधीही जाऊं नयेत. संघराज्यांतील सर्वच नागरिकांना मसलती कधीही सांगत नसतात. मंत्रगुप्तीचा हा उत्कृष्ट उपाय होय. गणांतील मुख्यांनी एकत्र येऊनच गणांच्या हिताचा विचार केला पाहिजे. फुटीरपणा उत्पन्न झाला की, प्रत्येक गणप्रमुख आपआपली शक्ति वेगवेगळी वाढवू लागतो व त्यामुळे गण विनाश पावतात. ज्या ठिकाणी अन्याय होईल तेथें गणांतील विचक्षण पुरुषांनी ताबडतोब अपराध्याना शासन करून अपराध न होण्याची व्यवस्था केली पाहिजे. कुलात होणारे कलह जर कुलवृद्धांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले व थाबविले नाहीत तर ते कुलांचा व गणांचा नाश करतात. बाह्य व अतर्गत अशा दोन प्रकारच्या भयापैकीं सघराज्याच्या दृष्टीनें आतल्या फुटीर वृत्तीच्या भयाचे महत्त्व अधिक मोठे आहे. त्या मानाने बाहय शक्तीच्या आक्रमणाचें भय काहीच नव्हे. म्हणून हे अतर्भय नष्ट करण्याचा कसोशीनें प्रयत्न केला पाहिजे. कारण अतर्भय गणराज्याचा पायाच नष्ट करते. ज्यावेळी गणराज्यांतील लोक उगाचच एकमेकावर रागावून केवळ लोभामुळे, मोहामुळे अथवा केवळ मूर्खपणामुळे एकमेकांशी बोलणें टाकून देतात त्यावेळी त्याच्या विनाशाची पदचिन्हे स्पष्ट दिसू लागली असे समजावें. जातिकुळांची विषमता अथवा त्याच्यावर आधारलेले मोठेपण गणराज्यात नसून सर्वांना समान सधि हेच त्याचें तत्त्व असतें. रूपाचा वा द्रव्याचा मोह दाखवून अथवा आक्रमणाचा प्रयत्न करून संघराज्य कधीही नष्ट होऊ शकत नाही. सघराज्यांत आपआपसांत फूट उत्पन्न करून व तिला उत्तेजन देऊनच शत्रूनीं सघराज्यें नष्ट केलेली आहेत. म्हणून संघजीवन हाच सघराज्याचा प्राण आहे, हें नेहमीच लक्षांत ठेवले पाहिजे व ज्यांना सघराज्य टिकवावयाचें असेल त्यानी तेथील सघजीवन कसें कधीही नष्ट होणार नाही याविषयीं पूर्णपणें दक्षता घेतली पाहिजे.

महाभारतकारांनीं संघराज्यासंबधी केलेले हें विवेचन आजही प्रत्येकानें हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखें शाश्वत स्वरूपाचें आहे.

संघराज्यांतील नेत्यानीं तें राज्य टिकवून धरण्यासाठी, कोणत पथ्य पाळणें अवश्य आहे हेंही महाभारतांत अत्यंत उत्कृष्ट रीतीं श्रीकृष्ण व नारद यांच्या संवादाच्या द्वारें दाखविलेलें आहे. तें पुढीलप्रमाणेः—

वासुदेव उवाच—

नासुहृत्परमं मन्त्रं नारदार्हति वेदितुम् ।
अपण्डितो वाऽपि सुहृत् पण्डितो वाऽप्यनात्मवान् ॥ ३
स ते सौहृदमास्थाय किञ्चिद्वक्ष्यामि नारद ।
कृत्स्नं बुद्धिबल प्रेक्ष्य संपृच्छेत्त्रिदिवंगम ॥ ४
दास्यमैश्वर्यवादेन ज्ञातीनां न करोम्यहम् ।
अर्धं भोक्ताऽस्मि भोगानां वाग्दुरुक्तानि च क्षमे ॥ ५
अरणीमग्निकामो वा मथ्नाति हृदयं मम ।
वाचा दुरुक्तं देवर्षे तन्मे दहति नित्यदा ॥ ६
बलं संकर्षणे नित्यं सौकुमार्यं पुनर्गदे ।
रूपेण मत्तः प्रद्युम्न. सोऽसहायोऽस्मि नारद ॥ ७
अन्ये हि सुमहाभागा बलवन्तो दुरुत्सहाः ।
नित्योत्थानेन संपन्ना नारदान्धकवृष्णय. ॥ ८
यस्य न स्युर्न वै स स्याद्यस्य स्युः कृत्स्नमेव तत् ।
द्वाभ्यां निवारितो नित्यं वृणोम्येकतरं न च ॥ ९
स्यातां यस्याहुकाक्रूरौ किं नु दुःखतरं ततः ।
यस्य चापि न तौ स्यातां किं नु दुःखतरं ततः ॥ १०
सोऽहं कितव मातेव द्वयोरपि महामते ।
एकस्य जयमाशंसे द्वितीयस्यापराजयम् ॥ ११
ममैवं क्लिश्यमानस्य नारदोभयतः सदा ।
वक्तुमर्हसि यच्छ्रेयो ज्ञातीनामात्मनस्तथा ॥ १२

नारद उवाच—

आपदो द्विविधाः कृष्ण बाह्याश्चाभ्यंतराश्च ह ।
प्रादुर्भवन्ति वार्ष्णेय स्वकृता यदि वाऽन्यतः ॥ १३

सेयमाभ्यंतरा तुभ्यमापत्कृच्छ्रा स्वकर्मजा ।
अक्रूरभोजप्रभवा सर्वे ह्येते तवन्वयाः ॥ १४
अर्थहेतोर्हि कामाद्वा वाचा बीभत्सयाऽपि वा ।
आत्मना प्राप्तमैश्वर्यमन्यत्र प्रतिपादितम् ॥ १५
कृतमूलमिदानीं तज्ज्ञातिशब्दं सहायवान् ।
न शक्यं पुनरादातुं वान्तमग्निमिव त्वया ॥ १६
बभ्रूग्रसेनयो राज्यं नाप्तुं शक्यं कथञ्चन ।
ज्ञातिभेदभयात् कृष्ण त्वया चापि विशेषतः ॥ १७
तच्च सिध्येत्प्रयत्नेन कृत्वा कर्म सुदुष्करम् ।
महाक्षयं व्ययो वा स्याद्विनाशो वा पुनर्भवेत् ॥ १८
अनायसेन शस्त्रेण मृदुना हृदयच्छिदा ।
जिह्वामुद्धर सर्वेषां परिमृज्यानुमृज्य च ॥ १९

वासुदेव उवाच—

अनायसं मुने शस्त्र मृदु विद्यामहं कथम् ।
येनैषामुद्धरे जिह्वां परिमृज्यानुमृज्य च ॥ २०

नारद उवाच—

शक्त्याऽन्नदानं सततं तितिक्षार्जवमार्दवम् ।
यथार्हप्रतिपूजा च शस्त्रमेतदनायसम् ॥ २१
ज्ञातीनां वक्तुकामानां कटुकानि लघूनि च ।
गिरा त्वं हृदयं वाचं शमयस्व मनांसि च ॥ २२
नामहापुरुष कश्चिन्नानात्मा नासहायवान् ।
महतीं धुरमाधत्ते तामुद्यम्योरसा वह ॥ २३
सर्व एव गुरुं भारमनड्वान्वहते समे ।
दुर्गे प्रतीकः सुगवा भारं वहति दुर्वहम् ॥ २४
भेदाद्विनाश. संघानां संघमुख्योऽसि केशव ।
यथा त्वां प्राप्य नोत्सीदेवयं संघस्तथा कुरु ॥ २५
नान्यत्र बुद्धिक्षान्तिभ्यां नान्यत्रेन्द्रियनिग्रहात् ।
नान्यत्र धनसंत्यागाद्गणः प्राज्ञेऽवतिष्ठते ॥ २६
धन्य यशस्यमायुष्यं स्वपक्षोद्भावनं सदा ।
ज्ञातीनामविनाशः स्याद्यथा कृष्ण तथा कुरु ॥ २७

आयत्यां च तदात्वे च न तेऽस्त्यविदितं प्रभो ।
षाड्गुण्यस्य विधानेन यात्री यानविधौ तथा ॥ २८
यादवाः कुकुरा भोजाः सर्वे चान्धकवृष्णयः ।
त्वय्यासक्ता महाबाहो लोका लोकेश्वराश्च ये ॥ २९
उपासन्ते हि त्वद्बुद्धिमृषयश्चापि माधव ।
त्वं गुरुः सर्वभूतानां जानीये त्वं गतागतम् ॥ ३०
त्वामासाद्य यदुश्रेष्ठ मेधन्ते यादवाः सुखम् ॥ ३१

—महाभारत, शांतिपर्व अध्याय ८१

अर्थ.—"अधक व वृष्णी गणांचे नेते भगवान् श्रीकृष्ण एके दिवशीं नारदाला म्हणाले की, मला तुला अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींत कांही विचारावयाचें आहे. राज्यतंत्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी जो मित्र नाही त्याच्याशी बोलता येत नाहीत. ज्याच्याशी त्या गोष्टी बोलावयाच्या तो चांगला विचक्षण नसेल आणि विचक्षण असला तरी त्याचे मन जर त्याच्या पूर्णपणें आधीन नसेल तर त्याच्याशीही बोलतां येत नाही. अशा तऱ्हेचें मित्रत्व तुझ्या ठिकाणी असल्याचें पाहून कांही महत्त्वाच्या गोष्टी मी तुला विचारीत आहे. तुझ्या बुद्धिमत्तेवर माझा विश्वास आहे. लोक मला अंधकवृष्णी गणांचा ऐश्वर्यशाली नेता असें समजतात. पण वास्तविक ऐश्वर्याच्या नांवाखाली माझ्या गणांचें दास्यच मी करीत आहें. जरी अर्धा अधिकार माझ्या आधीन असला तरी केवळ दुरुत्तरें ऐकून ती सहन करणें एवढ्यापुरताच तो आहे. जिच्यांतून अग्नि उत्पन्न होतो अशी अरणी ज्याप्रमाणें जळावी तशी या दुरुत्तरांनी माझ्या अंतःकरणाची अवस्था झाली आहे. माझें अंतःकरण रोज जळत आहे. माझ्या सहायकांकडे पहावें तर माझा बंधु संकर्षण हा बलवान् म्हणून विख्यात आहे आणि दादाला सर्व राज्यवैशिष्ट्ये लाभली आहेत. तो अत्यंत सुकुमार आहे. प्रद्युम्न तर माझ्याही पेक्षा सुन्दर असून त्याला स्वतःच्या सौंदर्याचा अतिशय गर्व आहे. तरीही मी अत्यत असहाय आहें असें मला वाटतें. बाकीचे अंधक आणि वृष्णी अत्यंत बलवान् आणि कोणीही ज्यांचें धर्षण करूं शक-

णार नाही असे सामर्थ्यशील आहेत. त्या साऱ्यांच्यात राजकीय संघर्षाचा उत्साह अमर्याद आहे. ते ज्याच्या बाजूला असतील त्याला लाभणार नाही अशी गोष्टच नाही. व ते ज्याच्या बाजूला नसतील त्याचें अस्तित्वच अशक्य आहे. आहुक आणि अक्रूर हे ज्याच्या बाजूला असतील त्याच्यापेक्षां त्याची अधिक दुर्दशा असू शकणार नाहीं. त्याचप्रमाणे ते ज्याच्या बाजूला नसतील त्याच्याही दुर्दशेला पारावार उरणार नाही. मला या दोघांपैकी कोणत्याही एका पक्षाचा जसा जय इच्छितां येत नाही त्याचप्रमाणे कोणत्याही एका पक्षाचा पराजय व्हावा असेंही इच्छितां येत नाहीं. दोन जुगाऱ्यांच्या आईसारखी माझी अनुकंपनीय अवस्था झाली आहे. ते परस्परांत द्यूत खेळत असतां दोन्ही स्वत:चीच मुले असल्यामुळें त्यांच्या आईला ज्याप्रमाणे एकाचा विजय इच्छून दुसऱ्याच्या पराजयाची कल्पना करणें अशक्य आहे, तीच माझी अवस्था आहे. तू माझ्या या अवस्थेचा आणि माझ्या ज्ञातीच्याही अवस्थेचा विचार करून आमच्या कल्याणाचे कार्य कोणतें ते मला साग."

त्यावर नारद म्हणाले: "सघराज्यात दोन प्रकारची सकटे असतात. एक आभ्यतर सकट व दुसरे बाह्य सकट. तू माझ्याजवळ जें सांगितलेंस तें आभ्यतर संकट असून सघाच्या सभासदांकडूनच उत्पन्न झालेलें आहे. अक्रूर आणि भोज हे व त्यांचे अनुयायी यांना ज्यांच्यापासून लाभ झाला त्यांना ते लोक साहाय्य करणारच. त्यांना ज्ञातीचें साहाय्य असल्यामुळें त्यांचे अधिकार दृढमूल झालेले आहेत. अशा स्थितीत त्यांचे अधिकार काढून घेणे केव्हांही उचित नाही. त्याच्यामुळे आपापसात भेद उत्पन्न होईल व त्याला तू कारण होऊं नयेस असें मला वाटतें. ओकलेले अन्न ज्याप्रमाणें पुन: घेतां येत नाही त्याचप्रमाणें दिलेला अधिकारही या प्रकरणांत काढून घेऊं नये. वृष्णी आणि अधक गणांच्या अध्यक्षपदावरून उग्रसेनाला काढले तर त्याच्यासाठी मोठा प्रयत्नही लागेल आणि या दुष्कर कृत्याचा परिणाम म्हणून भयानक स्वरूपाची हानि व सामर्थ्याचा व्यर्थ व्यय होऊन शिवाय गणराज्याच्या

सदाच्या विनाशाची भीति उत्पन्न होईल. या संकटावर एक उपाय आहे व तो उपाय म्हणजे एका विशेष शस्त्राचा वापर होय. तें शस्त्र पोलादाचें बनविलेलें नाही. तें अत्यंत मृदु आहे, तरीही तें कोणाचेंही हृदय चिरावयास समर्थ आहे. तें शस्त्र वारवार पाजळून तूं अधिकाधिक तीक्ष्ण कर व सर्व ज्ञातीच्या जिव्हांचें सामर्थ्य सदाचें नष्ट करून टाक.''

श्रीकृष्णानें नारदाला विचारलें, 'तें शस्त्र कोणतें ?'

''नारदांनी सांगितलें की, दुसऱ्यांच्या योग्यतेची आपण पूर्णपणें जाणीव ठेवतों असें दाखवून त्यांचा सन्मान करणें, सौम्यपणा, कपट न ठेवतां सरळ वागणें, असीम सहनशीलता व आपल्या शक्त्यनुसार सर्वांचा आदरसत्कार करणे हें तें परिणामकारक शस्त्र होय. अत्यत कडू आणि क्षुद्रपणाचीं बोलणी वारंवार बोलू इच्छिणाऱ्या नातलगांचीं बोलणीं तू मनावर घेऊं नकोस. उलट आपल्या सुमधुर वाणीनें तूं त्यांची अंत करणें शांत व जिव्हा बोथट कर. स्वतःच्या मनावर ताबा असणारा, अनेक लोकांचें साहाय्य असलेला असा महापुरुषच एवढ्या मोठ्या राज्याचा अधिकार सांभाळू शकतो. सामान्य व विकारांच्या आधीन होणाऱ्या व्यक्तीचें हें काम नव्हे. सरळ रस्त्यावरून भारवाहक होणें कोणत्याही बैलाला शक्य होतें पण मोठा भार विषम मार्गावरून सामान्य पशु नेऊ शकत नाही. भेदांतच सघराज्याचा नाश आहे. तू या संघराज्याचा मुख्य आहेस. तुझ्यासारखा नेता लाभला असतां संघ नष्ट होणार नाही असेच तुला वागलें पाहिजे. केवळ युक्ति आणि सहनशीलता, स्वतःच्या सैराट धांवणाऱ्या मनोवृत्तीवर पूर्ण ताबा असणे, आणि नेहमी अनेकांचा सत्कार करण्याची प्रवृत्ति असणें व त्यासाठी लागेल ती घस सोसणें या गोष्टी ज्या शहाण्या माणसाजवळ असतील तोच संघराज्याचा नेता होऊं शकतो. आपला पक्ष याप्रमाणें बलवान् करणें हेच सघराज्याचें आयुष्य,यश व वैभव वाढावयास कारणीभूत होतें. तू अशाच पद्धतीनें वाग की ज्याच्यामुळें संघराज्याचा नाश होणार नाही. भूत, भविष्य, वर्तमानाच्या बाबतींत आणि राज्य-

तंत्राच्या इतर सर्व कक्षांच्या बाबतींत तुला माहीत नाहीं असें कांहीही नाहीं. यादव, त्रिपुर, भोज, यांचे गण व गणमुख्य या साऱ्यांचें अस्तित्व तुझ्यावर अवलंबून आहे हें ध्यानांत ठेवूनच तूं वागलें पाहिजेस."

महाभारतांत प्रदर्शित केलेले हे गणराज्याविषयींचे विचार कोणत्याही लोकतंत्रात्मक व्यवस्थेला आजही जसेच्यातसे लागू आहेत. महाभारतकाळी राज्यतंत्राचें आतांपर्यंत दाखविलेले हे आदर्शस्वरूप राहिलें होतें काय? जर तें तसें राहिलें असतें तर भगवान् श्रीकृष्णांना भारतीय संस्कृति व जीवनमूल्यें यांच्या संरक्षणासाठीं खड्ग उपसण्याचें कांहीच कारण नव्हतें. त्यांनी राजमस्तकांचें उपायन धर्माच्या मूलतत्त्वासाठीं जे दिले त्याचें कारण राजसंस्थेचा अध.पात हेच होय.

साम्राज्यसत्तेचा अधःपात

शंतनूच्या उदाहरणावरून आपण हे पाहिले आहे कीं, ज्याच्याहातीं धर्म सुरक्षित राहील असा राजा आपलें संरक्षण करण्यास समर्थ आहे असें दिसून आल्यास राजे लोक आपण होऊनच त्याला साम्राज्यपदावर बसवीत व सम्राट म्हणून त्याचें नेतृत्व मान्य करीत Might is right अथवा 'बळी तो कान पिळी' हा निसर्गाचा न्याय आहे असे म्हणतात याचा अर्थ, तो पशुत्वाचा स्वयंसिद्ध असा प्रकार आहे, इतकाच आहे. "सर्व बलवतां सुखम्," हें कांही कोणास शिकवावयास नको. ही परिस्थिति बदलवून त्या जागी विचारांचें विकारांवर व न्यायाचें बळावर नियंत्रण उत्पन्न करण्यासाठीच भारतीय सस्कृतीचा जन्म झालेला आहे. म्हणूनच भारतीयांची राज्यसंस्था ही पाशवी बळानें उत्पन्न झालेली नसून धर्मसंरक्षणार्थ उत्पन्न झालेली आहे व म्हणूनच ती पूर्ण त्यागमय आहे हें आपण पाहिले आहे. भगवान् श्रीकृष्णाच्या काळीं धर्माऐवजी बळाला महत्त्व चढलें ब प्राचीन साम्राज्यघटनेला पूर्णपणें अर्धचंद्र मिळून जो बलवान् असेल त्यानें इतरांचें न्याय्य हक्कही लुबाडून अधिराज्य गाजवावें, साम्राज्यपदावर आरूढ

व्हावें, व जें आपण करूं तेंच धर्म्य आहे असा दर्प मिरवावा अशी वस्तुस्थिति उत्पन्न झाली. प्राचीन साम्राज्याचें विशुद्ध स्वरूप पूर्णपणें नष्ट होऊन व त्याचीं नियंत्रणेंही गळून पडून त्या जागीं नवी, बळावर अधिष्ठित झालेली राज्यसत्ता अधिरूढ झाली. मगधांच्या आक्रमणकारी साम्राज्यसत्तेनें हा नवा साम्राज्यवाद उत्पन्न केला. ज्याच्या समर्थ नेतृत्वाखालीं हा आक्रमणकारी साम्राज्यवाद उत्पन्न झाला, त्याचें नांव जरासध असें होतें. भगवान् श्रीकृष्णांनीं स्वतःच जरासंधाच्या या आक्रमणाचें व सामर्थ्याचें स्वरूप विशद केलें आहे. ते म्हणतात.——

जामदग्न्येन रामेण क्षत्रं यदवशेषितम् ।
तस्मादवरजं लोके यदिदं क्षत्रसंज्ञितम् ॥ २
कृतोयं कुलसंकल्पः क्षत्रियैर्वसुधाधिप ।
निवेशवाग्भिस्तत्ते ह विदितं भरतर्षभ ॥ ३
ऐलस्येक्ष्वाकुवंशस्य प्रकृतिं परिचक्षते ।
राजानः श्रेणिबद्धाश्च तथान्ये क्षत्रिया भुवि ॥ ४
ऐलवंशाश्च ये राजंस्तथैवेक्ष्वाकवो नृपाः ।
तानि चैकशतं विद्धि कुलानि भरतर्षभ ॥ ५
ययातेस्त्वेव भोजानां विस्तरो गुणतो महान् ।
भजतेद्य महाराज विस्तरं स चतुर्दिशम् ॥ ६
तेषां तथैव तां लक्ष्मीं सर्वक्षत्रमुपासते ।
इदानीमेव वै राजञ्जरासंधो महीपतिः ॥ ७
अभिभूय श्रियं तेषां कुलानामभिषेचितः ।
स्थितो मूर्ध्नि नरेन्द्राणामोजसाक्रम्य सर्वशः ॥ ८
सोऽवनीं मध्यमां भुक्त्वा मिथो भेदममन्यत ।
प्रभुर्यस्तु परो राजा यस्मिन्नेकवशे जगत् ॥ ९

—महाभारत, सभापर्व अध्याय १४

"जामदग्न्य रामाच्या आक्रमणानंतर हल्ली जे क्षत्रिय उरले आहेत त्या सर्व क्षत्रियांनीं आपल्यामध्ये असा संकेत केला आहे कीं, जो आम्हांमध्यें सर्वांत श्रेष्ठ तो आमचा सम्राट होईल. चंद्र आणि सूर्य

या वंशांतील लोक सम्राट् व इतर सर्व राजे आणि क्षत्रिय ही त्यांची प्रजा असा हा संकेत चालत आलेला आहे. या चंद्र व सूर्य राजवंशांचीं एकंदर शंभर कुळें झालीं व चारही दिशांना हीं राजकुळें पसरलीं. कुलक्रमागत त्यांचें नेतृत्व आजवर सर्व क्षत्रियांनी मान्य केलेलें होतें व तें चालत आलेलें होतें. अलीकडेच राजा जरासंधानें त्या सर्व कुलांचा पराजय करून स्वतःला अभिषेक करून घेतलेला आहे व तो आपल्या बळानें सर्व साम्राज्याचा एकमात्र एकछत्री सम्राट झालेला आहे."

वास्तविक सर्व जगांतील क्षत्रियांना जिंकून सम्राट होणें हा कांहीं अपराध नाही; पण सगर, मांधाता, भरत, इत्यादिकांप्रमाणें केवळ क्षत्रियाना जिकणें येवढेच काही जरासंधाच्या साम्राज्यवादाचें स्वरूप नव्हतें. आपला कोणीही विरोधक उरूं नये म्हणून जुने राजवंश नष्ट करून टाकणे व उग्रदंडाच्या भयानें धार्मिकांनाही आपल्या सत्तेचे दास करणें हें त्याच्या साम्राज्याचें स्वरूप होतें. तो अत्यंत पराक्रमी होता. महाभारतात त्याचें जें वृत्त दिलें आहे तें पहाण्यासारखें आहे. महभारताच्या सभापर्वात १७ व्या, १८ व्या, व १९ व्या अध्यायांत त्याचें हें वृत्त आलेलें आहे.

जरासंधाचें पूर्ववृत्त

बृहद्रथ नांवाचा मगध देशाचा (बिहार) एक राजा होता. तो सर्व गुणांनीं संपन्न असून सामर्थ्यसंपन्न व अत्यंत धार्मिक होता. काशी राजाच्या दोन मुलीशीं त्यानें विवाह केला पण दैवयोगानें त्याला पुत्र झालाच नाही. कांही दिवसांनीं तो पुत्रप्राप्तीविषयीं अत्यंत निराश झाला. एकदा चडक कौशिक या नांवाचे एक ऋषी त्याच्या राज्यांत आले. राजाने व त्याच्या दोन्ही राण्यांनीं त्या ऋषीची दक्षतेनें सेवा केली. ऋषीनीं त्या सेवेनें प्रसन्न होऊन पुत्रप्राप्तीस्तव त्याला एक फळ दिलें. राजानें त्या फळाचे दोन विभाग करून ते आपल्या दोन राण्यांना दिले. योग्यसमयी राण्या प्रसूत झाल्या; पण त्यांना मानवी बालकाच्या शरीराचे मधोमध दोन तुकडे केले असतां तें जसें दिसेल तसें एकेक शकल झालें. तें पाहून राण्यांना

अत्यत शोक झाला. त्यानी आपल्या दासीकरवी ती शकलें चौरस्त्यावर टाकून दिली. रात्रीच्या वेळीं 'जरा' नांवाच्या राक्षसीनें ती शकले घेऊन एकत्र जुळविली तों ती बरोबर जुळून एक जिवत बालक निर्माण झालें तोच 'जरासंध' होय. जरा नांवाच्या राक्षसीनें त्याला सांधलें म्हणून त्याला जरासंध असें म्हणतात. राक्षसीनें तें बालक राजा बृहद्रथाच्या स्वाधीन केलें. (महाभारत सभापर्व अध्याय १७–१८).

कांही दिवसांनी पुनश्च चण्ड कौशिक ऋषि राजा बृहद्रथाच्या राज्यांत आले. त्यांनी आपल्या वरदानानें उत्पन्न झालेल्या त्या पुत्राला अनेकविध आशीर्वाद दिले. 'जरासध' तरुण झाल्यावर राजा बृहद्रथानें प्राचीन आर्याच्या पद्धतीप्रमाणें त्याच्या स्वाधीन राज्य करून आपल्या जीविताचें सार्थक व्हावें.म्हणून अरण्यवास पत्करला. जरासंध मगधाच्या गादीवर येतांच त्यानें हस व डिभक या नांवांच्या दोन पराक्रमी पुरुषांना आपलें सेनपतित्व दिलें. हंस, डिभक व जरासंध हे तिघे मिळून त्या वेळच्या कोणत्याही सत्तेचा पराभव करूं शकतील इतके समर्थ होते.

जरासंधाच्या आक्रमणाचें स्वरूप

जरासंधाचें आक्रमण ही कांही सामान्य गोष्ट नव्हती. त्याच्या पराक्रमाचा गौरव कोणीही करावा असाच त्याचा पराक्रम होता. त्याच्या उत्पत्तीच्या या कथेंतील दैवी भाग सोडून दिला तरी त्याचा पराक्रम निर्विवादपणें मान्य केलाच पाहिजे. तो ब्राह्मणांचा पूजक होता. आपल्या प्रजाजनांना तो चांगलें वागवीत असे. क्षत्रमंडळाला त्यानें जिकून घेतलें असलें तर ती त्याच्या दृष्टीनें अभिमानाचीच गोष्ट होती. पण तेवढ्यानें त्याचें भागेना. आर्य राजांच्या पद्धतींत आपल्या पराक्रमाच्या प्रतिष्ठापनेप्रीत्यर्थ विजय संपादन केल्यानंतर ज्यांची राज्यें सम्राटांनीं जिकली असतील त्यांचीं ती राज्यें नष्ट करून टाकणें व त्यांच्या अंतर्गत व्यवस्थेंत ढवळाढवळ करणें या गोष्टीचा मुळीच अंतर्भाव होत नसे. जिंकलेल्या सत्तेनें पराक्रमाच्या बाबतींत आपलें श्रेष्ठत्व मान्य करणें ही एकच गोष्ट

तेथें अभिप्रेत होती. जिकलेली सत्ता धर्मानें वागली म्हणजे विजेता अंतर्गत कारभाराचे बाबतीत त्या सत्तेला पूर्णपणें स्वातंत्र्य देत असे. दाशरथी रामचंद्रांनी किष्किधेच्या वानर राज्याला जिकूनही तेथील लोकांच्या स्वातत्र्याचें अपहरण न करतां ती त्यांच्या हातीच ठेविली. राक्षस राष्ट्राचा विध्वंस करूनही राक्षस राष्ट्राचें स्वातंत्र्य त्यांनी नष्ट केलें नाही. केवळ धर्मानें वागण्याची अट घालून त्यांनी त्यांचें स्वातत्र्य अबाधित राखलें. आर्य सम्राटांची ही परंपरा ध्यानांत घेतली म्हणजे जरासंधाच्या आक्रमणाचें खरें स्वरूप ध्यानांत येतें. जरासधानें सत्ता नुसत्या जिकल्याच नाहीत तर त्या पूर्णपणें आपल्या अधीन करून घेऊन तेथील राजांना सदाचें बंदिवासांत टाकलें. इतकेंच नव्हे, तर सूर्य व चंद्र वशांच्या सर्व राजांना यज्ञांत महादेवाच्या नांवानें बलिदान करण्याचा आणि याप्रमाणें चद्र–सूर्य राजवंश सपूर्ण नष्ट करून टाकण्याचा त्यानें निश्चय केला. चंद्र–सूर्य वंशाची जीं शंभर कुळे होतीं त्यांतील ८६ राजांना त्यानें आपल्या पराक्रमानें जिकलें व त्यांचें यज्ञीय पशु म्हणून बलिदान करण्यासाठीं त्यानें त्यांना आपल्या गिरिव्रज नांवाच्या राजधानीत बंदिवासात आणून टाकलें. केवळ १४ राजांना त्याने जिकावयाचें राहिलें होतें व या कुळांतील शभरही राजे स्वाधीन झाले की या शतराजबलींचा तो भीषण नरमेध 'समारंभ' व्हावयाचा होता. त्यासंबंधीं त्याला कोणीही अडथळा उत्पन्न करूं शकत नव्हता. त्याच्या आक्रमणाच्या या विशिष्ट स्वरूपाचें श्रीकृष्णांनी सभापर्वांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे :–

तेन रुद्धा हि राजानः सर्वे जित्वा गिरिव्रजे ।
कन्दरे पर्वतेन्द्रस्य सिंहेनेव महाद्विपाः ॥ ६३
स हि राजा जरासंधो यियक्षुर्वसुधाधिपैः ।
महादेवं महात्मानमुमापतिमरिंदमम् ॥ ६४
आराध्य तपसोग्रेण निर्जितास्तेन पार्थिवाः ।
प्रतिज्ञायाश्च पारं स गतः पार्थिवसत्तम ॥ ६५

—महाभारत सभापर्व अ. १८

तस्मादिह बलादेव साम्राज्यं कुरुते हि सः ॥ १९
रत्नभाजो हि राजानो जरासंधमुपासते ।
न च तुष्यति तेनापि बाल्यादनयमास्थितः ॥ २०
मूर्धाभिषिक्तं नृपतिं प्रधानपुरुषो बलात् ।
आदत्ते न च नो दृष्टो भागः पुरुषतः क्वचित् ॥ २१
एवं सर्वान्वशे चक्रे जरासंध शतावरान् ।
तं दुर्बलतरो राजा कथं पार्थ उपैष्यति ॥ २२
प्रोक्षितानां प्रमृष्टानां राज्ञां पशुपतेर्गृहे ।
पशूनामिव का प्रीतिर्जीविते भरतर्षभ ॥ २३
क्षत्रियः शस्त्रमरणो यदा भवति सत्कृतः ।
ततः स्म मागधं संख्ये प्रतिबाधेम यद्वयम् ॥ २४
षडशीतिः समानीताः शेषा राजंश्चतुर्दश ।
जरासंधेन राजानस्ततः क्रूरं प्रवर्त्स्यते ॥ २५
प्राप्नुयात्स यशो दीप्तं तत्र यो विघ्नमाचरेत् ।
जयेद्यश्च जरासंधं स सम्राण्नियतं भवेत् ॥ २६

—महाभारत, सभापर्व अध्याय १५

"राजा जरासधाने सर्व राजे जिकून गिरिव्रजात बंदिवासांत ठेवले आहेत. त्या राजांना पशु कल्पून महादेवाच्या नांवानें यज्ञ करावयाची त्याची इच्छा आहे. जे जे युद्धार्थ आले त्यांना त्यांना बांधून राजधानीत आणून त्यानें बदिवासांत ठेविले आहे. केवळ बळानें साम्राज्यें करावीत ही त्याची प्रवृत्ति आहे. मोठमोठे राजे रत्नांचे ओघ त्याच्या पायावर अर्पण करून त्याचें आधिपत्य स्वीकारावयास सिद्ध आहेत. तरीही त्याचें समाधान नाही. आपल्या बळाच्या दर्पानें धर्म व परपरा पायाखाली तुडवून वागण्याची त्याची प्रवृत्ति आहे. मूर्धाभिषिक्त राजांपैकी असा कोणीही नाही की ज्याला जरासंधाने ताब्यांत घेतलें नाही. यज्ञपशूप्रमाणेंच जरासंधानें त्यांचें प्रोक्षण केलें असून तो त्यांचें बलिदान निश्चित करणार असल्यामुळें त्यांना आतां जगण्यांत काय गोडी वाटणार आहे? ८६ राजे त्यानें जिंकलेच आहेत. उरलेले १४ त्याला जिकावयाचे आहेत. ते त्याने जिंकले की राजांचा तो क्रूर नरमेध सुरू होईल."

जरासंधाच्या क्रौर्याची व दुरात्मतेची जाणीव पांडवांनादेखील पूर्वीपासूनच होती. युधिष्ठिर म्हणतो,

वयं चैव महाभाग जरासंधभयात्तदा ।
शङ्किताः स्म महाभाग दौरात्म्यात्तस्य चानघ ।। ७

—महाभारत सभापर्व अ. १५

"आम्हीही तेव्हांच जरासंधाची दुरात्मता व त्याच्या पराक्रमाचें भय यामुळें शंकितच होतों ! जरासंधाचें ज्या चौदा शेषराजांच्यावर लक्ष होतें, त्यांत चंद्रवशीय राजांमध्यें हस्तिनापूरच्याही कुरुवंशीयांचें स्थान होतेंच. केवळ भीष्माच्या प्रतापानेच ते वांचले असें धृतराष्ट्रानें उद्योगपर्वात स्वतःच म्हटलें आहे."

कृत्स्नेयं पृथिवी देवी जरासंधेन धीमता ।
मागधेन्द्रेण बलिना वशे कृत्वा प्रतापिता ।। ३८
भीष्मप्रतापात् कुरवो नयेनान्धकवृष्णयः ।
यन्न तस्य वशे जग्मुः केवलं दैवमेव तत् ।। ३९

—महाभारत, उद्योगपर्व अ. ५१

जरासंधाच्या आक्रमणाच्या या विशिष्ट पद्धतीमुळें भारतवर्षातील सर्व राजकुलांत एक प्रकारचा हाहाःकार माजून राहिला होता. ज्यांना पळून जातां येणें शक्य होतें ते पळून गेले. जे इतर रीतींनीं प्राण वांचवू शकत होते त्यांनी ते ते उपाय अवलंबिले व उरलेले मोठमोठे पराक्रमी लोक जरासंधाच्या साम्राज्याखालीं येऊन त्याचें आधिपत्य मान्य करून व दास्य पत्करून त्याच्या आज्ञेंत वागूं लागले. या धर्मविरोधी शासनाचा धर्म आणि नीति यांच्या दृष्टीनें विनाश होणें आवश्यक होऊन बसावें अशी वस्तुस्थिति त्यावेळीं निर्माण झाली होती. जरासंधाच्या साम्राज्यसत्तेचें तांडव परंपरेनें चालत आलेल्या राजवंशांच्या परिसरांत सुरू होऊन त्यांच्या परंपरांचे पूर्णपणें विडंबन चाललेलें होतें. दुष्ट राजेलोकांचा एक मोठा संघ त्याच्या नेतृत्वाखाली भारतांत उत्पन्न झालेला होता. मोठमोठ्या पराक्रमी लोकांनाही या नव्या मगध साम्राज्याचें आधिपत्य स्वीकारणें अथवा त्याच्या नरमेधांतील एक पशु होऊन राहणें यावांचून

दुसरा मार्ग उरलेला नव्हता. कोण कोण अधिपति व प्रबल राजे त्याच्या अंकित झाले होते याचें महाभारतांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे :—

राजन्सेनापतिर्जातः शिशुपालः प्रतापवान् ।
तमेव च महाराज शिष्यवत्समुपस्थितः ॥ ११
वक्रः करुषाधिपतिर्मायायोधी महाबलः ।
अपरौ च महावीर्यौ महात्मानौ समाश्रितौ ॥ १२
जरासंधं महावीर्यं तौ हंसडिम्भकावुभौ ।
वक्रदन्तः करूषश्च करभो मेघवाहनः ।
मूर्ध्ना दिव्यमणिं बिभ्रद्यमद्भुतमणिं विदुः ॥ १३
मुरुं च नरकं चैव शास्ति यो यवनाधिपः ।
अपर्यन्तबलो राजा प्रतीच्यां वरुणो यथा ॥ १४
भगदत्तो महाराज वृद्धस्तव पितुः सखा ।
स वाचा प्रणतस्तस्य कर्मणा च विशेषतः ॥ १५
स्नेहबद्धश्च मनसा पितृवद्भक्तिमांस्त्वयि ।
प्रतीच्यां दक्षिणं चान्तं पृथिव्याः प्रति यो नृपः ॥ १६
मातुलो भवतः शूरः पुरुजित्कुन्तिवर्धनः ।
स ते सन्नतिमानेकः स्नेहतः शत्रुसूदनः ॥ १७
जरासंधं गतस्त्वेव पुरा यो न मया हतः ।
पुरुषोत्तमविज्ञानो योऽसौ चेदिषु दुर्मतिः ॥ १८
आत्मानं प्रतिजानाति लोकेस्मिन्पुरुषोत्तमम् ।
आदत्ते सततं मोहाद्यः स चिह्नं च मामकम् ॥ १९
वङ्गपुण्ड्रकिरातेषु राजा बलसमन्वितः ।
पौण्ड्रको वासुदेवेति योऽसौ लोकेभिविश्रुतः ॥ २०
चतुर्थभाङ्महाराज भोजं इंद्रसखो बली ।
विद्याबलाद्यो व्यजयत्सपाण्डचक्रथकैशिकान् ॥ २१
भ्राता यस्याकृतिः शूरो जामदग्न्यसमोऽभवत् ।
स भक्तो मागधं राजा भीष्मकः परवीरहा ॥ २२
प्रियाण्याचरतः प्रह्वान्सदा संबन्धिनस्ततः ।
भजतो न भजत्यस्मानप्रियेषु व्यवस्थितः ॥ २३

नकुलं सबलं राजन्नभ्यजानात्तथात्मनः ।
पश्यमानो यशोदीप्तं जरासंधमुपस्थितः ॥ २४
उदीच्याश्च तथा भोजाः कुलान्यष्टादश प्रभो ।
जरासंधभयादेव प्रतीचीं दिशमास्थिताः ॥ २५
शूरसेना भद्रकारा बोधाः शाल्वा. पटच्चराः ।
सुस्थलाश्च सुकुट्टाश्च कुलिन्दाः कुन्तिभिः सह ॥ २६
शाल्वायनाश्च राजानः सोदर्यानुचरैः सह ।
दक्षिणा ये च पाञ्चालाः पूर्वाः कुन्तिषु कोशलाः ॥ २७
तथोत्तरां दिशं चापि परित्यज्य भयार्दिताः ।
मत्स्याः संन्यस्तपादाश्च दक्षिणां दिशमाश्रिताः ॥ २८
तथैव सर्वपाञ्चाला जरासंधभयार्दिताः ।

—महाभारत, सभापर्व अ. १४

चेदिराज शिशुपाल अत्यत पराक्रमी असतांही शिष्याप्रमाणें त्याला शरण जाऊन त्याचा सेनापति झाला. कपटयुद्ध करणारा करुषाधिपति वक्रदंत, करभ मेघवाहन, भगदत्त, पौण्ड्रक वासुदेव, श्रीकृष्णांचे श्वशुर भीष्मक इत्यादि मोठे मोठे राजे जरासंधाचे कुणी मित्र तर कोणी सेवक झाले होते. पचाल, यादव इत्यादिकांची गणराज्ये व संघराज्यें पार धुळीला मिळाली होती असें या वर्णनावरून दिसतें. तात्पर्य धार्मिक साम्राज्यसत्तेऐवजी बलाढ्य, दुसऱ्याचें स्वातत्र्य हिरावून घेणारी, नरमेधासारख्या भयानक कर्माला प्रवृत्त होणारी, उन्मार्गवर्ती सत्ता जरासंधाच्या रूपानें प्रत्यक्ष अस्तित्वांत आली असून त्या एकछत्री सत्तेचें प्रजातंत्र संघराज्यांना जीवघेऊ भय उत्पन्न झालें होतें. यादवांचें संघराज्य तेथीलच कंस नांवाच्या तरुण व अविचारी गणनायकाच्या द्वारें जरासंधानें मोडून टाकले होतें असें दिसतें.

बलेन तेन स्वज्ञातीनभिभूय वृथामतिः ॥ ३१
श्रैष्ठ्यं प्राप्तः स तस्यासीदतीवाप्तनयो महान् । ३२

—महाभारत सभापर्व अ. १४

कसानें जरासंधाच्या सामर्थ्याने आपल्या ज्ञातींचा पराभव केला व तो गणराज्याचें आधिपत्य बळकावून बसला हा मोठाच अन्याय

होय. रक्ताला चटावलेला, शोषण हा आत्मा असलेला, प्रजातंत्र नष्ट करूं पहाणारा व स्वातंत्र्याचा अपहारक असा हा साम्राज्यवाद भारतीय साम्राज्यकल्पनेला विरोधी होता. हे त्या कल्पनेचे अधःपतन होतें. स्वाभाविकपणेंच या साम्राज्यवादाच्या छायेखालीं नांदणाऱ्या राजमंडळाच्या 'राज्यसंस्थेचा अधःपात' व तिच्या मूल तत्त्वांचा विपर्यास सुरू झाला असल्यास त्यांत नवल नाही. विवाहित स्त्रियांना पळवून नेईपर्यंत राज्यसत्ताधारी व्यक्तीच्या अधःपतनाची मजल गेली होती असें दिसतें. शिशुपालाच्या अपराधांचें वर्णन करीत असतां शिशुपालानें एका विवाहित स्त्रीचे अपहरण केल्याचें भगवान् श्रीकृष्णांनी स्वतःच वर्णन केलें आहे. ते म्हणतातः——

सौवीरान्प्रतियातां च बभ्रोरेष तपस्विन.।
भार्यामभ्यहरन्मोहादकामां तामितो गताम् ॥ १०
एष मायाप्रतिच्छन्नः कार्ष्णयार्थे तपस्विनीम् ।
जहार भद्रां वैशालीं मातुलस्य नृशंसकृत् ॥ ११

——महाभारत, सभापर्व अ. ४५

कुलस्त्रियांचा अपमान झाला तर त्याला वधदण्ड द्यावा असे आर्यांचें नीतिशास्त्र सागणाऱ्या भगवान् श्री रामचंद्रांच्या, भारतीय राज्यसत्तेच्या त्या महान् प्रतिनिधीच्या उज्ज्वल चारित्र्याच्या प्रकाशांत हें वर्णन वाचलें म्हणजे महाभारतकालीन राज्यसत्तेचें केवढें पतन झालें होतें याची नीट कल्पना करतां येईल. भगवान वेदव्यासांच्या दिव्यदर्शी प्रतिभेनें राज्यसत्तेच्या या अधःपतनाचे संपूर्ण चित्रच महाभारतांत एका व्यक्तिचित्रणाच्या रूपानें मांडले आहे. व्यासांनी निर्माण केलेल्या या व्यक्तिचित्राचें नांव मी आपणांस सांगितलें तर आपणांस आश्चर्य वाटेल. त्या व्यक्तीचें नांव 'राजा धृतराष्ट्र'.

९. राजा धृतराष्ट्र

जन्मानें अंध पण तीव्र बुद्धिमत्तेनें अनेक डोळसांवर मात करणारा, वाणीनें अत्यंत मृदु,पण हृदयानें पाजळलेल्या तरवारीपेक्षां अधिक तीक्ष्ण असणारा, तोंडानें धर्म, नीति व तत्त्वज्ञान यांचा एकसारखा उद्‌घोष करीत राहून कमळाच्या पानाला जलबिंदूचा नसावा तसाच या गोष्टींचा प्रत्यक्ष चारित्र्याशीं व आचरणाशीं किंचिन्मात्रही संबंध नसलेला राजा धृतराष्ट्र हा कुशल प्रतिभेंतून निर्माण झालेल्या कोणत्याही काव्याच्या खलनायकापेक्षां अधिक श्रेष्ठ आहे. वास्तविक धृतराष्ट्र हा विचित्रवीर्याचा ज्येष्ठ पुत्र असल्यामुळें कुरु राज्याचा जन्मतः वारस होता. पण हीनांग व्यक्तीला सिंहासनावर बसतां येत नाहीं या तत्कालीन नियमानुसार राजा धृतराष्ट्राला कुरु राज्याच्या सिंहासनाचा वारसा मिळू शकला नाहीं.ज्या कारणास्तव शंतनूचे वडील बंधु देवापि हे राज्याचे वारस होऊं शकले नाहीत, त्याच कारणास्तव धृतराष्ट्रही कुरु राज्याचा वारस होऊ शकला नाही. या संबधांत महाभारतांत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे :—

धृतराष्ट्रस्त्वचक्षुष्ट्वाद्राज्यं न प्रत्यपद्यत ।
पारसवत्वाद्विदुरो राजा पाण्डुर्बभूव ह ।। २५
—महाभारत, आदिपर्व अ. १०९

धृतराष्ट्राला डोळे नसल्यामुळें त्याला राज्य मिळालें नाहीं. विदुर दासीपुत्र असल्यामुळें तोही राज्याचा वारस होऊं शकला नाहीं म्हणून शेवटीं पाण्डूलाच राज्य मिळालें. महाभारताच्या उद्योगपर्वांत धृतराष्ट्राविषयीं उल्लेख करतांना भीष्मांनींही याच गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात .—

अन्धः करणहीनत्वान्न वै राजा पिता तव ।
राजा तु पाण्डुरभवन्महात्मा लोकविश्रुतः ।। ३९
—महाभारत, उद्योगपर्व अ. १४७

अंध व अवयवहीन असल्यामुळें तुझा पिता धृतराष्ट्र हा राजा होऊं शकत नाहीं म्हणून पाण्डूच राजा झाला. पाण्डूनें राज्य अत्यंत उत्कृष्ट रीतीनें सांभाळलें व दिग्विजय करून कौरवांच्या सिंहासनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. सिंहासनाधीश्वर असतांना त्यानें धृतराष्ट्राचे वडिलकीचे सर्व मान सांभाळले इतकेंच नव्हे तर त्याच्याच भरंवशावर धृतराष्ट्रानें नाना प्रकारचे यज्ञयाग करून ऐश्वर्याचा यथावत् उपभोग घेतला. महाभारतांत म्हटलें आहे:–

तस्य वीरस्य विक्रान्तैः सहस्रशतदक्षिणैः ।
अश्वमेधशतैरीजे धृतराष्ट्रो महामखैः ॥ ५

—महाभारत, आदिपर्व अ. ११४

पाण्डूच्या पराक्रमानें मिळविलेल्या द्रव्यानें राजा धृतराष्ट्रानें अनेक प्रकारचे अश्वमेधाशी बरोबरी करणारे यज्ञ केले. धार्मिक दृष्टीनें पाण्डु धृतराष्ट्राशीं फार चांगल्या रीतीनें वागत असे. यासंबंधी स्वतः धृतराष्ट्रानेंच साक्ष दिली आहे. तो दुर्योधनाला पाण्डूविषयीं सांगतांना असें म्हणतो कीं,

धर्मनित्यः सदा पाण्डुस्तथा धर्मपरायणः ।
सर्वेषु ज्ञातिषु तथा मयि त्वासीद्विशेषतः ॥ ६
नासौ किंचिद्विजानाति भोजनादिचिकीर्षितम् ।
निवेदयति नित्यं हि मम राज्यं धृतव्रतः ॥ ७

—महाभारत, आदिपर्व अ. १४२

पाण्डु अत्यंत धर्मपरायण असून सर्वच संबंधी लोकांचे बाबतींत तो आपल्या धर्मप्राप्त कर्तव्यानुसारच वागत असे. माझ्यावर तर त्याचें विशेषच प्रेम होतें. माझी तो सर्व प्रकारची काळजी घेऊन जणूं कीं काय मीच राज्याचा धनी आहे अशाच समजुतीनें वागत असे. राजा धृतराष्ट्राचा हाच मान पाण्डवांनींही पुढें चालविला.

धृतराष्ट्राविषयीं सर्व सामान्यपणें अशी एक रूढ समजूत आहे कीं तो स्वभावतः चांगला, धर्मनिष्ठ व सत्प्रवृत्त असून पांडवांच्या राज्याचा अपहार करण्याची त्याची इच्छा नव्हती. इतकेंच नव्हे, तर दुर्योधनाच्या दुष्प्रवृत्तींना आवरण्याचा त्यानें आटोकाट प्रयत्न

केला; पण त्याचें कांही एक न चालून दुर्योधनाच्या दुराग्रहामुळें एवढ्या मोठ्या संहाराचा क्षण उगवला. वास्तविक दुर्योधन असला तर दुष्ट आहे, पण धृतराष्ट्र निश्चित नाहीं. तो अगतिक असल्यामुळें त्याचें कांहीं चालू शकले नाही इतकेच. या चुकीच्या समजुतीमुळें दोषाचा भागीदार फक्त दुर्योधन ठरून धृतराष्ट्र मात्र सर्वांच्या अनुकंपेचा विषय ठरतो. त्यामुळे महाभारताच्या आश्रमवासी पर्वात युधिष्ठिराच्या निर्बंधांना बाजूला सारून आंतरिक संतापाने भीम ज्यावेळी केवळ शब्दांनीच कां होईना पण धृतराष्ट्राच्या अंत:करणाला यातना देण्यासारखे वर्तन करतो व त्याने दु:खित धृतराष्ट्र आहारविहारादि सोडून आपल्याच दु:खांत चूर होऊन बसतो, त्यावेळी त्याच्याबद्दल अनुकंपा वाटून त्या हतपुत्र, निराश्रित, वृद्ध व परावलंबी राजाविषयी मर्यादातीत दयेचे भाव कोणाच्याही अंत:करणांत उत्पन्न होऊन उलट भीमाविषयीच एक प्रकारची अढी निर्माण होते. आश्रमवासी पर्वात धृतराष्ट्राच्या या दु खद परिस्थितीचें वर्णन करतांना म्हटलें आहे:—

अथ भीमः सुहृन्मध्ये बाहुशब्दं तथाऽकरोत् ।
संश्रवे धृतराष्ट्रस्य गान्धार्याश्चाप्यमर्षणः ।। ५
स्मृत्वा दुर्योधनं शत्रुं कर्णदुःशासनावपि ।
प्रोवाचेदं सुसंरब्धो भीमः स परुषं वचः ।। ६
अन्धस्य नृपतेः पुत्रा मया परिघबाहुना ।
नीता लोकममुं सर्वे नानाशस्त्रास्त्रयोधिनः ।।७
इमौ तौ परिघप्रख्यौ भुजौ मम दुरासदौ ।
ययोरन्तरमासाद्य धार्तराष्ट्राः क्षयं गताः ।। ८
ताविमौ चन्दनेनाक्तौ चन्दनार्हौ च मे भुजौ ।
याभ्यां दुर्योधनो नीतः क्षयं ससुतबान्धवः ।। ९
एताश्चान्याश्च विविधाः शल्यभूता नराधिप ।
वृकोदरस्य ता वाचः श्रुत्वा निर्वेदमागमत् ।। १०
सा च बुद्धिमती देवी कालपर्यायवेदिनी ।। ११
राजा निर्वेदमापेदे भीमवाग्बाणपीडितः ।
तान्बबुध्यत तद्राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।। २४

अस्य पापस्य शुद्ध्यर्थं नियतोऽस्मि सुदुर्मतिः ।
चतुर्थे नियते काले कदाचिदपि चाष्टमे ।। २५
तृष्णाविनयनं भुञ्जे गान्धारी वेद तन्मम ।
करोत्याहारमिति मां सर्वः परिजनः सदा ।। २६
युधिष्ठिरभयाद्वेत्ति भृशं तप्यति पाण्डवः ।
भूमौ शये जप्यपरो दर्भेष्वजिनसंवृतः ।। २७
—महाभारत, आश्रमवासिक पर्व अ. ३.

"धृतराष्ट्र जवळपास असतांना भीमसेनानें आपल्या बाहूंचा शब्द करावा व रागाच्या भरांत धृतराष्ट्राला व गान्धारीला ऐकू जाईल अशा बेतानें दण्ड थोपटून दुर्योधन, कर्ण व दु.शासनाचें शत्रुत्व ध्यानीं आणून असें कठोर बोलावें की, मी माझ्या परिघासारख्या प्रबळ बाहूनीं नाना प्रकारचीं शस्त्रास्त्रें घेऊन या अंधराजाचे युद्ध करणारे सर्व पुत्र ठार मारले. हे माझे पुष्ट बाहू पहा. धार्तराष्ट्र याच्याच आधीन होऊन नष्ट झाले आहेत. माझे चदनाची उटी लावलेले व ती उटी लावण्यास अत्यत योग्य असलेले हेच ते हात होत कीं, ज्यांनी सपुत्रबांधव दुर्योधनाला ठार मारलें. या व अशाच प्रकारच्या अत करणाला घरें पाडणाऱ्या वाक्यानी धृतराष्ट्राला अत्यंत वैताग उत्पन्न झाला.

आपली ही परिस्थिति त्यानें पुष्कळ दिवस लपविली. अखेरीस वनवासात जाऊन देहाचें सार्थक करावें या हेतूनें युधिष्ठिराला त्या-विषयीची आज्ञा मागतांना तो म्हणतो .—

"माझ्या पापाच्या शुद्धीसाठी प्रयत्न करावयाचा मी निश्चय केला आहे. मी उपवास करीत आहें. चवथ्या किवा आठव्या दिवशी अगदी राहवलेंच नाही तर भूक मदावण्यापुरताच मी आहार करतो. ही गोष्ट केवळ गांधारीलाच माहीत आहे. सर्व परिज-नाना मी रोज जेवतों असेंच वाटतें व तू त्यांच्यावर रागावू नयेस नि तुला दुःख होऊं नये म्हणून मी परिजनांना तसेंच भासवीत असतो. मी शय्या सोडली आहे. दर्भावर हरिणाजिन अंथरून मी भूमिशयन करतो व सदासर्वदा जपजाप्यांत आपला काळ घाल-

वितों." युधिष्ठिराशीं नुसतें येवढें बोलण्यानेंही धृतराष्ट्राला इतका थकवा आला कीं

वयसा च प्रकृष्टेन वाग्व्यायामेन चैव ह ॥ ६०
गान्धारीं शिश्रिये धीमान् सहसैव गतासुवत् ॥ ६१

--महाभारत, आश्रमवासिक पर्व अ. ३

वृद्ध वय झाल्यामुळें व थकल्यामुळें तेवढ्याच बोलण्यानें राजा धृतराष्ट्राला इतके श्रम झाले की तो निश्चेष्ट स्थितींत गांधारीच्या अंगावर पडला. धृतराष्ट्रानें अरण्यवास पत्करावयाचें ठरविले त्या वेळीं आपल्या सर्व नातलगांचीं व पुत्रांची श्राद्धें करावयाचें ठरविलें. त्यावेळी त्यानें युधिष्ठिराजवळ द्रव्याची याचना केली. युधिष्ठिर व अर्जुन यांनी मोठ्या आनंदानें आपआपले धनकोश त्याच्या स्वाधीन केले. पण भीमानें मात्र भर राजसभेंत अशी वाणी काढली की :—

भीमसेनस्तु सक्रोधः प्रोवाचेदं वचस्तदा ।
वयं भीष्मस्य दास्यामः प्रेतकार्यं तु फाल्गुन ॥ १६
श्राद्धानि पुरुषव्याघ्र मा प्रादात्कौरवो नृपः ॥ १८
इति मे वर्तते बुद्धिर्मा नो निन्दन्तु शत्रवः ।
कष्टात्कष्टतरं यान्तु सर्वे दुर्योधनादयः ॥ १९
यैरियं पृथिवी कृत्स्ना घातिता कुलपांसनः ।
कुतस्त्वमसि विस्मृत्य वैरं द्वादशवार्षिकम् ॥ २०
अज्ञातवासं गहनं द्रौपदीशोकवर्धनम् ।
क्व तदा धृतराष्ट्रस्य स्नेहोऽस्मद्गोचरो गतः ॥ २१
कृष्णाजिनोपसंवीतो हृताभरणभूषणः ।
सार्धं पाञ्चालपुत्र्या त्वं राजानमुपजग्मिवान् ॥ २२
क्व तदा द्रोणभीष्मौ तौ सोमदत्तोऽपि वाऽभवत् ।
यत्र त्रयोदशसमा वने वन्येन जीवथ ॥ २३
न तदा त्वां पिता ज्येष्ठः पितृत्वेनाभिवीक्षते ।
किं ते तद्विस्मृतं पार्थ यदेष कुलपांसनः ॥ २४
दुर्बुद्धिर्विदुरं प्राह द्यूते किं जितमित्युत ।

--महाभारत, आश्रमवासिक पर्व अ. ११

"भीमसेन त्या वेळीं रागानें म्हणाला कीं, हे अर्जुना! आम्हांला भीष्मांच्या उत्तरक्रियेसाठीं जें काय करावयाचें तें आम्ही स्वतंत्रपणें करूं. राजा धृतराष्ट्राला श्राद्ध करूं द्यावें असें मला मुळीच वाटत नाहीं. शत्रूनी आमची निंदा करावी व आम्ही त्यांच्या उपहासास व अवहेलनेस पात्र व्हावें असें मला मुळींच वाटत नाहीं. दुर्योधनादिकांच्या सद्गतीसाठीं आपण कांही करावें असें मला मुळींच वाटत नाहीं. वाइटांतील वाईट नरक गति त्यांना प्राप्त होवो. त्या कुलकलंक नराधमांनीं या संपूर्ण पृथ्वीचा नाश केलेला आहे. ते भयानक बारा वर्षांचें वैर, तो कष्टदायक अज्ञातवास, ते द्रौपदीला झालेले कष्ट, व तिचा करुणविलाप तू विसरलास काय? आमच्यावरचें धृतराष्ट्राचें प्रेम त्या वेळी कोठें गेलें होतें? ज्या वेळीं अंगावरील सर्व भूषणें काढून घेतलेल्या अवस्थेंत कटीला कृष्णाजिन व गळ्यांत केवळ उपवीत धारण करून भणंग भिकारी अवस्थेंत तू पंचालराजकन्या द्रौपदीसहित या धृतराष्ट्राकडे गेलास त्या वेळी याचें प्रेम अटलें होतें काय? तेरा वर्षें दुर्दैवाचे दशावतार आम्ही अरण्यांत उपभोगीत असतां ते भीष्म व द्रोण आणि तो सोमदत्त कोठें होता? त्या वेळीं आपला हा ज्येष्ठ पिता तुझ्याशी पित्याप्रमाणें वर्तन करावयास मुळीच सिद्ध नव्हता. हे पार्था! हा कुलांगार दुर्बुद्धि धृतराष्ट्र द्यूतामध्यें विदुराला वारवार काय जिकलें! काय जिकलें!! म्हणून विचारीत होता तें तू विसरलास काय? भीमाचे हे उद्गार ऐकतांच कोणालाही दुःख झाल्याखेरीज राहात नाहीं. पण मी याच्याच जोडीला दोन वेगळीं शब्दचित्रें आपणांसमोर मांडतों. पहा बरें! आश्रमवासी पर्वांतील रेखाचित्रांचा आपणावर अणुमात्र तरी परिणाम होतो काय? राजा धृतराष्ट्राविषयी आपणांस अणुमात्र तरी अनुकंपा वाटते काय?

(१) कपटपटु शकुनि कपटद्यूतानें युधिष्ठिराची नागवणूक करीत आहे. सर्वस्व हरलेला युधिष्ठिर हट्टाला पेटून स्वतःलाही पणाला लावून गमावून बसला आहे. अशा वेळी शकुनि त्याला म्हणतो :—

अस्ति ते वै प्रिया राजन्नलह एकोऽपराजितः ।
पणस्व कृष्णां पाञ्चालीं तयात्मानं पुनर्जय ॥ ३२

—महाभारत, सभापर्व अ. ६५

"हे राजन्! अजून एक पराजित न झालेली वस्तु तुझ्याजवळ आहे. ती वस्तु म्हणजे तुझी प्रिया पांचाली होय. तिला पणाला लाव व जें हरलास तें जिकून घे." शकुनीच्या या वाक्यानंतर द्यूताच्या कैफांत कार्याकार्यविवेक विसरलेला युधिष्ठिर हातांत फांसे घेऊन द्रौपदीलाच पणाला लावावयास निघाला. तो म्हणाला :

शारदोत्पलसेविन्या रूपेण श्रीसमानया ॥ ३४
तथैव स्यादानृशंस्यात्तथा स्याद्रूपसंपदा ।
तथा स्याच्छीलसंपत्या यामिच्छेत्पुरुषः स्त्रियम् ॥ ३५
तयैवंविधया राजन्पाञ्चाल्याहं सुमध्यया ।
ग्लहं दीव्यामि चार्वङ्ग्या द्रौपद्या हन्त सौबल ॥ ३९

—महाभारत, सभापर्व अ. ६५

"शरद्ऋतूतील कमलाप्रमाणें जिचे विस्तीर्ण डोळे आहेत, शारदीय कमलाप्रमाणे जिचा गध आहे, शारदीय कमळे जिला अत्यंत आवडतात, रूपानें जिला प्रत्यक्ष लक्ष्मी म्हणावें लागेल, हृदयाची श्रीमंती, रूपसपत्ति व शीलचारित्र्य या सर्व गोष्टी जिच्या ठिकाणी पुरुषांच्या कल्पनासृष्टीत असाव्या इतक्या परिपूर्ण आहेत, त्या पांचालीला मी भरसभेत पणास लावतों." युधिष्ठराच्या तोंडून हीं वाक्ये निघाली मात्र, महाभारतकार वर्णन करतातः—

एवमुक्ते तु वचने धर्मराजेन धीमता ।
धिग्धिगित्येव वृद्धानां सभ्यानां निःसृता गिरः ॥ ४०
चक्षुभे सा सभा राजन्राज्ञां संजज्ञिरे शुचः ।
भीष्मद्रोणकृपादीनां स्वेदश्च समजायत ॥ ४१
शिरो गृहीत्वा विदुरो गतसत्त्व इवाभवत् ।
आस्ते ध्यायन्नधोवक्त्रो निःश्वसन्निव पन्नगः ॥ ४२
धृतराष्ट्रस्तु तं हृष्टं पर्यपृच्छत्पुनः पुनः ।
किं जितं किं जितमिति हृद्याकारं नाभ्यरक्षत ॥ ४३

—महाभारत, सभापर्व अ. ६५

याप्रमाणें युधिष्ठिराच्या तोंडून वाणी निघतांच सभ्यांच्या तोंडून 'धिक्कार' 'धिक्कार' अशा प्रकारचे शब्द बाहेर पडले. सर्व सभा अत्यंत क्षुब्ध झाली व सभेतील सर्व सामत दु खात बुडून गेले. भीष्म, द्रोण व कृपाचार्य यांच्या शरीराचा भीतीनें थरकांप उडून त्यांना घाम आला. मस्तक तळहातावर टेकून विदुर एखाद्या प्रेताप्रमाणें निश्चल बनला. पण हें सर्व द्यूत थांबविण्याचें सामर्थ्य ज्याच्या एका शब्दांत होतें तो डोळ्यांनीं अंध पण कानांनी मुळींच बधिर नसलेला राजा धृतराष्ट्र मात्र त्या निश्चेष्ट विदुराला पुन्हां पुन्हां स्पर्श करून आनंदानें काय जिकलें! काय जिकलें!! म्हणून विचारीत होता. स्वतःचा हर्ष व अंतःकरणाची क्षुद्रता त्याला मुळीच लपवितां आली नाहीं. त्यानतरही द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा भीषण प्रकार तो ऐकत असतांनाच घडला. दु.शासन द्रौपदीच्या केसांना हिसडे देत तिला सभेंत ओढीत आणू लागला, त्या वेळी तिनें केलेला करुण विलाप धृतराष्ट्रानें आपल्या कानांनी ऐकला, पण द्रौपदीच्या विलापानें त्याच्या हृदयाला करुणेचा पाझर फुटला नाही. कुलवधूला नग्न करण्याच्या दु शासनाच्या प्रवृत्तीचा निषेध करावा असें त्याला कधींही वाटले नाही. दुर्योधनानें तिला मांडी उघडी करून दाखविली व नाना प्रकारे तिची विटंबना चालविली त्यामुळेंही त्याचें मन विचलित झालें नाही. शेवटी प्रत्यक्ष गांधारीनें अत पुरांतून बाहेर येऊन ज्यावेळी रदबदली केली, त्यावेळींच पुढील अनिष्ट प्रकार टळले आहेत. भारताची महान् सम्राज्ञी नग्न होण्याच्या अप्रतिष्ठेच्या गर्तेत फेकली जाऊन अश्रूच्या प्रवाहानें न्हाऊन निघत आहे व अशाही स्थितींत आपल्या प्रज्ञेचे डोळे झांकून आपण कपटानें संपत्ति पदरांत पाडून ऐश्वर्याच्या शिखरावर कसे आरूढ झालों आहोंत याच तन्मयतेंत राजा धृतराष्ट्र गर्क आहे, हें दृश्य आपल्या डोळ्यासमोर आणा आणि आश्रमवासी पर्वातील भीम केवळ अप्रत्यक्षपणें धृतराष्ट्राला करीत असलेल्या शब्दताडनाच्या दृश्याशीं त्याची तुलना करा. म्हणजे कोणतें दृश्य अधिक करुणास्पद आहे याची कल्पना येते. धृतराष्ट्राविषयी किंचित् मात्र

तरी अनुकंपा यानंतर वाटू शकते काय? आणखी एक दृश्य आपल्या मनःचक्षूसमोर आणा.

(२) पाण्डूनें राजा धृतराष्ट्राला किती सन्मानपूर्वक वागविलें हें आपण पाहिलेंच. तो अवचित् अरण्यांत कालवश झाल्यानतर त्याची विधवा स्त्री आपल्या पांच पुत्रांना घेऊन धृतराष्ट्राकडे आश्रय मागावयास आल्यानतर विश्वासानें मांडीवर डोके टेकलेल्या त्या अनाथ विधवेचा तिच्या पाच पुत्रांसहित विनाश करावा म्हणून नानाप्रकारचीं कारस्थानें करण्यांत राजा धृतराष्ट्र गुंग झाला, इतकेंच नव्हे, तर तिला तिच्या इच्छेविरुद्ध वारणावतांत पाठविण्यांत येऊन तिला जाळून टाकण्याचेंही कारस्थान उभारलें गेले. त्यांतून कशी तरी वांचून ती रानोमाळ आपल्या पुत्रांसहित नरमांसभक्षक वन्य जाती व हिस्र श्वापदे यांचा अनिरुद्ध संचार असलेल्या विजनांतून फिरते आहे व उभारलेलें नाटक आनंदपर्यवसायी होऊन लोकक्षोभाला आपण बळी पडू नये म्हणून राजा धृतराष्ट्र विलापाचें ढोंग करण्यांत गुतला आहे या दृश्याशीं, केवळ शब्दताडनामुळें व तेंही अप्रत्यक्षपणे केलेल्या शब्दताडनामुळें विव्हळ होणाऱ्या आश्रमवासीपर्वांतील धृतराष्ट्राशी तुलना करा म्हणजे आपणांस कोणतें दृश्य अधिक करुणास्पद वाटतें याची खात्री पटेल. धृतराष्ट्र हाच खरा महाभारताचा 'खलनायक' होय. तो अत्यत गूढ आहे. सर्पाची गति ज्याप्रमाणें अप्रत्यक्ष असते व दंश फक्त प्रत्तीतीस येतो, अशीच धृतराष्ट्राच्या आक्रमणाची वाटचाल अत्यत गुप्त आहे. त्यामुळे महाभारत सहितेचें वरवर वाचन करणारास धृतराष्ट्राच्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येत नाही. त्यानें दुर्योधनाला ठिकठिकाणी दिलेली दूषणे, त्यानें त्याची भरसभेंत अनेकवार केलेली निंदा आपण अत्यत सोज्ज्वळ असून केवळ अगतिकतेमुळेंच आपणांस हें सर्व सहन करावें लागतें हे सर्व दाखविण्याची त्याची प्रवृत्ति, पांडवांची त्यानें वारवार केलेली प्रशंसा, धर्म व न्याय यांसाठीं त्यानें वारंवार केलेले आक्रोश ही सर्व त्याचीं बाह्यस्वरूपें अथवा ढोंगें आहेत. बगळा ज्याप्रमाणें साधूचा आव आणून नदीच्या तीरावर

एकाच पायावर उभा राहून माशांना फसविण्यापुरतीच तपश्चर्या करतो व ते आटोक्यांत येतांच त्यांना गिळकृत करतो त्याचप्रमाणे राजा धृतराष्ट्राचेंही आहे. " बकवत् साधयेदर्थान् " या कूटनीतीचें धृतराष्ट्र ही केवळ मूस होय. राजा धृतराष्ट्र याच्या या स्वभाव विशेषाचा, महाभारत सूक्ष्मतेने पाहिल्यास, ठिकठिकाणी प्रत्यय आल्यावांचून रहात नाही. दुर्योधनावर त्याचें प्रेम होतें, येवढ्याच कारणास्तव तो त्याच्या कुकृत्यांना समति देतो असें नसून त्याच्य स्वतःच्याच अतःकरणांत पांडवांच्याविषयी असूयेने पेट घेतलेल असतो असें महाभारतांत म्हटलें आहे. राज्य पांडूचें असल्या मुळें तें त्याच्या ज्येष्ठ पुत्राला मिळावें ही गोष्ट उघडच होती पांडूनें अरण्यांत जातांना आपलें राज्य धृतराष्ट्राच्या स्वाधीन केले व तसें तें पांडूनें केलें म्हणूनच त्याची मुले अल्पवयी असल्यामुळं प्रजानीही धृतराष्ट्राला तात्पुरती समति दिली. अर्थात् धृतराष्ट्र याप्रमाणें सिहासनाचा कारभार चालवू लागला तरी राज्याच पुढचा वारस धृतराष्ट्रानंतर कां होईना पण युधिष्ठिरच होता ही गोष्ट निर्विवाद होती. या बाबतीत महाभारतात असें म्हटले आहे की —

तथा पाण्डुर्नरपतिः सत्यसंधो जितेन्द्रियः ।
राजा कुरूणां धर्मात्मा सुव्रतः सुसमाहितः ।। ३
ज्येष्ठाय राज्यमददद् धृतराष्ट्राय धीमते ।
यवीयसे तथा क्षत्रे कुरूणां वंशवर्धनः ।। ४
ततः सिंहासने राजन् स्थापयित्वैनमच्युतम् ।
वनं जगाम कौरव्यो भार्याभ्यां सहितो नृपः ।। ५
नीचैः स्थित्वा तु विदुर उपास्ते स्म विनीतवत् ।
प्रेष्यवत् पुरुषव्याघ्रो वालव्यजनमुत्क्षिपन् ।। ६
ततः सर्वाः प्रजास्तात धृतराष्ट्रं जनेश्वरम् ।
अन्वपद्यन्त विधिवद्यथा पाण्डुं जनाधिपम् ।। ७
विसृज्य धृतराष्ट्राय राज्यं सविदुराय च ।
चचार पृथिवीं पाण्डुः सर्वां परपुरञ्जयः ।। ८

कोशसंवनने दाने भृत्यानां चान्ववेक्षणे ।
भरणे चैव सर्वस्य विदुरः सत्यसङ्गरः ॥ ९
सन्धिविग्रहसंयुक्तो राज्ञां संवाहनक्रियाः ।
अवेक्षत महातेजाः भीष्मः परपुरञ्जयः ॥ १०
सिंहासनस्थो नृपतिर्धृतराष्ट्रो महाबलः ।
अन्वास्यमानः सततं विदुरेण महात्मना ॥ ११

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४८

"कौरवांचा धर्मात्मा, सत्यसंध, व्रतनिष्ठ, जितेंद्रिय राजा जो पाण्डु त्यानें वनांत जाण्याचा निश्चय करून राज्य धृतराष्ट्राच्या आधीन केलें व तो आपल्या स्त्रियांसहित मृगया, व विहार करण्यास्तव वनसचार करूं लागला. राजा धृतराष्ट्र राज्यप्रमुख म्हणून कारभार पाहू लागल्यानतर विदुर अत्यंत नम्रपणे चामर हातात घेऊन त्याची सेवा करू लागला. प्रजा ज्याप्रमाणें पाण्डूला भजत, त्याचप्रमाणे त्या पाण्डूनेंच राज्य स्वाधीन केलेल्या धृतराष्ट्राचाही सन्मान राखू लागल्या. विदुरासहित धृतराष्ट्राच्या स्वाधीन राज्य करून पाण्डु पृथ्वीवर संचार करू लागला. कोशसंग्रह, कोशव्यय, अधिकारी नियुक्त करणे व सर्वाचे पालनपोषण इत्यादि कामें विदुराने यथावत् चालविली. राज्यव्यवहार व सधिविग्रहादिक कार्ये भीष्म पाहू लागले व सिहासनावर धृतराष्ट्र राहिला"

हे द्रोणाचें भाषण आहे. धृतराष्ट्राला याप्रमाणे सिहासनावर येण्याची सधि पाण्डूच्याच कृपेनें मिळाली असली तरी तें काही पाण्डूने राजा धृतराष्ट्राला सतत दिलेलें राज्याचें दानपत्र नव्हतें की वशपरंपरागत तें त्याच्याकडे रहावें. ती एक तात्पुरत्या स्वरूपाची व्यवस्था आहे. त्यामुळे त्या राज्याचा भावी वारस अर्थात्च युधिष्ठिर होता. राज्याचे प्रमुख सूत्रचालक भीष्म, यांनीं स्वतःच ही गोष्ट उद्योगपर्वात सांगितलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :—

राजा तु पाण्डुरभवन्महात्मा लोकविश्रुतः ॥ ३९
स राजा तस्य ते पुत्राः पितुर्दायाद्यहारिणः ॥ ४०

—महाभारत, उद्योगपर्व अ. १४७

सर्व लोकांत विख्यात कीर्ति असलेला पाण्डु हाच राजा असल्यामुळें त्याचे पुत्र हेच त्याच्या संपत्तीचे धनी ठरतील ही गोष्ट निर्विवाद आहे.त्याप्रमाणे सर्व अध्ययन पूर्ण झाल्यावर सर्वांच्या संमतीनेंच युधिष्ठाराला धृतराष्ट्रानें यौवराज्याचा अभिषेक केला. युधिष्ठिर युवराज झाल्यानतर तो आपल्या अंगच्या गुणांनी अत्यत लोकप्रिय झाला. त्याचे बधु त्याच्या आज्ञेत राहून राज्यविस्तार करूं लागले. त्यांची परस्परांतील एकी, त्याचा प्रभाव व पराक्रम यांमुळें ते जसजसे लोकप्रिय होऊ लागले तसातसा राजा धृतराष्ट्राला त्यांच्या विषयी अकारण मत्सर वाटू लागून त्याचें अंत:करण त्यांच्या विषयींच्या दुष्टभावनेने भरून गेलें. महाभारत म्हणतें :—

ततः संवत्सरस्यान्ते यौवराज्याय पार्थिव ।
स्थापितो धृतराष्ट्रेण पाण्डुपुत्रो युधिष्ठिरः ।। १
धृतिस्थैर्यसहिष्णुत्वादानृशंस्यात्तथार्जवात् ।
भृत्यानामनुकम्पार्थं तथैव स्थिरसौहृदात् ।। २
ततोऽदीर्घेण कालेन कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
पितुरन्तर्दधे कीर्ति शीलवृत्तसमाधिभिः ।। ३
असियुद्धे गदायुद्धे रथयुद्धे च पाण्डवः ।
संकर्षणादशिक्षद्वै शश्वच्छिक्षां वृकोदर. ।। ४
समाप्तशिक्षो भीमस्तु द्युमत्सेनसमो बले । ५
अर्जुनस्य समो लोके नास्ति कश्चिद्धनुर्धरः ।। १६
गदायुद्धेऽसियुद्धे च रथयुद्धे च पाण्डव ।
पारगश्च धनुर्युद्धे बभूवाथ धनंजय. ।। १७
नीतिमान्सकला नीति विबुधाधिपतेस्तदा ।
अवाप्य सहदेवोऽपि भ्रातृणां ववृते वशे ।। १८
द्रोणेनैव विनीतश्च भ्रातृणां नकुलः प्रियः ।
चित्रयोधी समाख्यातो बभूवातिरथोदितः ।। १९
धनौघं प्रापयामास कुरुराष्ट्रं धनंजयः ।। २५
एवं सर्वे महात्मानः पाण्डवा मनुजोत्तमाः ।
परराष्ट्राणि निर्जित्य स्वराष्ट्रं ववृधु पुरा ।। २६
ततो बलमतिख्यातं विज्ञाय वृढधन्विनाम् ।। २७

—महाभारत, आदिपर्व अ १३९

त्यानंतर एक वर्षानें धृतराष्ट्रानें यौवराज्यावर पांडुपुत्र युधिष्ठिराची स्थापना केली. धैर्य, स्थैर्य, सहिष्णुता, प्रेमळपणा, नम्रता, ज्याच्यावर प्रेम केलें त्यावर तें स्थिर राखणें, व हाताखालच्या अधिकाऱ्यांवरील ममत्व, शील, चारित्र्य व मनाचा खंबीरपणा, यामुळें लौकरच कुंतीपुत्र युधिष्ठिरानें आपले वडील पाण्डु यांच्या कीर्तीवरही मात केली व तो अत्यंत लोकप्रिय होऊन राहिला. खड्गयुद्ध, गदायुद्ध, रथयुद्ध या सर्वांच्यांत भीमसेनानें अत्यंत प्रावीण्य मिळविलें. त्यानें बलरामाजवळून शस्त्रास्त्र विद्येचें खास शिक्षण घेतलें व त्यानंतर तो अत्यंत बलशाली व पराक्रमसंपन्न म्हणून गणला जाऊं लागला. तो आपल्या ज्येष्ठ भ्रात्याच्या नेहमी आज्ञेंत असे. अर्जुन धनुर्विद्येंत तर अलौकिकच होता. त्याचप्रमाणें गदायुद्ध, खड्गयुद्ध व रथयुद्ध यांतही तो अत्यंत प्रवीण होता. सहदेव हा बृहस्पतीच्या नीतिशास्त्रांत अत्यंत प्रवीण होता. नकुलही कलात्मक युद्ध करणारा असून अतिरथी म्हणून विख्यात होता. अर्जुनानें अनेक राज्यें जिकून आपल्या पराक्रमानें अपार धन कुरु राष्ट्राला मिळवून दिलें. याप्रमाणें सर्वश्रेष्ठ पांडवांनीं विजय सपादन करून आपलें राष्ट्र वाढवावयास प्रारंभ केला. त्यांचें विख्यात बळ, पराक्रम, लोकप्रियता, अभेद्य एकी इत्यादि पाहून धृतराष्ट्राचें अंतःकरण त्यांच्याविषयीं दूषित झालें व त्यांचा विनाश कसा करतां येईल आणि हातीं असलेलें सर्व राज्य सदाचेंच कसें गिळंकृत करतां येईल याचा विचार त्याच्या अंतःकरणांत सुरू झाला. त्यानें कणिक नांवाच्या एका कूटनीतिज्ञाला एकांतांत बोलावून आणून त्याच्याशीं गुप्तपणानें बोलणें केलें व त्याच्याजवळून कूटनीतीचे पाठ घेऊन तदनुसार आपल्या कारस्थानांना प्रारंभ केला. धृतराष्ट्राचें स्वभावचित्र उलगडण्याच्या दृष्टीनें कणिकनीतींतील प्रमेयांचें फार महत्त्व आहे. महाभारतकारांनीं आदिपर्वाच्या १४० व्या अध्यायांत कणिकनीति सांगून १४१ व्या अध्यायापासून धृतराष्ट्राच्या कपट कारस्थानाच्या वर्णनाला प्रारंभ केलेला आहे. यांत काव्याच्या दृष्टीनें पौर्वापर्य क्रम अत्यंत उत्कृष्ट

रीतीनें साधण्यांत आलेला आहे. जणू कीं काय कणिकनीति हा प्रतिपाद्य विषय व धृतराष्ट्र हें त्याचें प्रात्यक्षिक वाटतें. या दृष्टीनें धृतराष्ट्राचें स्वरूप ध्यानांत येण्यास कणिकानें त्याला केलेल्या उपदेशाचें स्वरूप लक्षांत घेणें अत्यंत आवश्यक आहे. कणिकानें धृतराष्ट्राला काय सांगितलें ?

कणिकाचा उपदेश

वैशंपायन उवाच ।

श्रुत्वा पाण्डुसुतान्वीरान्बलोद्रिक्तान्महौजसः ।
धृतराष्ट्रो महीपालश्चिन्तामगमदातुरः ॥१
तत आहूय मन्त्रज्ञं राजशास्त्रार्थवित्तमम् ।
कणिकं मंत्रिणां श्रेष्ठं धृतराष्ट्रोऽब्रवीद्वचः ॥ २

धृतराष्ट्र उवाच ।

उत्सक्ताः पाण्डवा नित्यं तेभ्योऽसूये द्विजोत्तम ।
तत्र मे निश्चिततमं संधिविग्रहकारणम् ।
कणिक त्वं ममाचक्ष्व करिष्ये वचनं तव ॥ ३

वैशंपायन उवाच ।

स प्रसन्नमनास्तेन परिपृष्टो द्विजोत्तमः ।
उवाच वचनं तीक्ष्णं राजशास्त्रार्थदर्शनम् ॥ ४
नास्य छिद्रं परः पश्येच्छिद्रेण परमन्वियात् ।
गूहेत्कूर्म इवाङ्गानि रक्षेद्विवरमात्मनः ॥ ८
नासम्यक्कृतकारी स्यादुपक्रम्य कदाचन ।
कण्टको हृपि दुच्छिन्न आत्मावं जनयेच्चिरम् ॥ ९
वधमेव प्रशंसन्ति शत्रूणामपकारिणाम् ।
सुविदीर्णं सुविक्रान्तं सुयुद्धं सुपलायितम् ॥ १०
आपद्यापदि काले च कुर्वीत न विचारयेत् ।
नावज्ञेयो रिपुस्तात दुर्बलोऽपि कथंचन ॥ ११
अन्धः स्यादन्धवेलायां बाधिर्यमपि चाश्रयेत् ॥ १२
कुर्यात्तृणमयं चापं शयीत मृगशायिकाम् ।
सान्त्वादिभिरुपायैस्तु हन्याच्छत्रुं वशे स्थितम् ॥ १३

दया न तस्मिन्कर्तव्या शरणागत इत्युत ।
निरुद्विग्नो हि भवति न हताज्जायते भयम् ॥ १४
अग्न्याधानेन यज्ञेन काषायेण जटाजिनैः ।
लोकान्विश्वासयित्वैव ततो लुम्पेद्यथा वृकः ॥ १९
वहेदमित्रं स्कंधेन यावत्कालस्य पर्ययः ॥ २१
ततः प्रत्यागते काले भिन्द्याद्घटमिवाश्मनि ।
अमित्रो न विमोक्तव्यः कृपणं बहूवपि ब्रुवन् ॥ २२
कृपा न तस्मिन्कर्तव्या हन्यादेवापकारिणम् ।
हन्यादमित्रं सान्त्वेन तथा दानेन वा पुनः ॥ २३
पुत्रः सखा वा भ्राता वा पिता वा यदि वा गुरुः ।
रिपुस्थानेषु वर्तन्तो हन्तव्या भूतिमिच्छता ॥ ५२
शपथेनाप्यरिं हन्यादर्थदानेन वा पुनः ।
विषेण मायया वापि नोपेक्षेत कथंचन ॥ ५३
उभौ चेत्संशयोपेतौ श्रद्धावांस्तत्र वर्धते ॥५३
क्रुद्धोऽप्यक्रुद्धरूपः स्यात्स्मितपूर्वाभिभाषिता ।
न चाप्यन्यमपध्वंसेत्कदाचित्कोपसंयुतः ॥ ५५
प्रहरिष्यन्प्रियं ब्रूयात्प्रहरन्नपि भारत ।
प्रहृत्य च कृपायीत शोचेत च रुदेत च ॥ ५६
आश्वासयेच्चापि परं सान्त्वधर्मार्थवृत्तिभिः ।
अथास्य प्रहरेत्काले यदा विचलिते पथि ॥ ५७
अपि घोरापराधस्य धर्ममाश्रित्य तिष्ठतः ।
सहि प्रच्छाद्यते दोषः शैलो मेघैरिवासितैः ॥५८
यः स्यादनुप्राप्तवधस्तस्यागारं प्रदीपयेत् ॥ ५९
प्रत्युत्थानासनाद्येन संप्रदानेन केनचित् ।
प्रतिविश्रब्धघाती स्यात्तीक्ष्णदंष्ट्रो निमग्नकः ॥ ६०
वाचा भृशं विनीतः स्याद् हृदयेन तथा क्षुरः ।
स्मितपूर्वाभिभाषी स्यात्सृष्टो रौद्रेण कर्मणा ॥ ६६
अञ्जलिः शपथः सान्त्व शिरसा पादवन्दनम् ।
आज्ञाकरणमित्येवं कर्तव्यं भूतिमिच्छता ॥ ६७

नाच्छित्त्वा परमर्माणि नाकृत्वा कर्म दारुणम् ।
नाहत्वा मत्स्यघातीव प्राप्नोति महतीं श्रियम् ॥ ७७
नास्य कृत्यानि बुध्येरन्मित्राणि रिपवस्तथा ।
आरब्धान्येव पश्येरन्सुपर्यवसितान्यपि ॥ ८१
भ्रातॄव्या बलिनो यस्मात्पाण्डुपुत्राः नराधिप ।
पश्चात्तापो यथा न स्यात्तथा नीतिर्विधीयताम् ॥ ८२
—महाभारत, आदिपर्व, अध्याय १४०

पाण्डुपुत्र वीर, अत्यंत बलवान, अत्यंत तेजस्वी आहेत हें पाहून राजा धृतराष्ट्राला अतिशय चिंता वाटूं लागली. म्हणून राज्यशास्त्रामध्यें अत्यंत निष्णात असलेल्या मंत्रिश्रेष्ठ कणिकाला बोलावून धृतराष्ट्र त्याला म्हणाला कीं, हे ब्राह्मणश्रेष्ठा ! पाण्डव एकसारखे उत्कर्ष पावत असल्यामुळें माझ्या अंतःकरणांत त्यांच्याविषयीं असूया निर्माण झालेली आहे. अशा स्थितींत संधि व विग्रहाच्या धोरणाचें यथावत् विवेचन करणारें शास्त्र तू मला समजावून सांग. तूं जसें सांगशील त्याप्रमाणेंच मी वागेन. हें ऐकतांच अत्यंत प्रसन्न होऊन त्या ब्राह्मणानें राजनीतिशास्त्रांतील लाभकारक अशीं अत्यंत कठोर प्रमेये धृतराष्ट्राला समजावून सांगितलीं. तो म्हणाला : आपलें छिद्र कोणीही पाहूं नये, याची पूर्णपणें काळजी घेऊन ज्याप्रमाणें कासव आपलीं सर्व अंगें गुप्त करून ठेवतो, त्याप्रमाणेंच ज्यामुळें आपला नाश होण्याचा संभव आहे अथवा ज्याच्यांत दुसरे आपलें ग्रहण करूं शकतात अशा आपल्या सर्व बाबी अत्यंत गुप्त ठेवाव्या. याच्या उलट अत्यंत सावधगिरीनें शत्रूचीं छिद्रें मात्र कसोशीनें पहात असावें. एकदां शत्रुविनाशाला प्रारंभ केला कीं, त्याचा संपूर्ण विध्वंस केल्याशिवाय कधींही राहूं नये. कांटा पायांत अर्धवट मोडला तर तो सतत रक्त वाहविल्याशिवाय राहात नाहीं. शत्रु उन्मत्त असो, खूप पराक्रमी असो, युद्धांत कुशल असो, वेळेचें महत्त्व जाणून व त्याच्या आपत्तींत त्याला हार खावयास लावून त्याच्याबद्दल दयेचा विचारही अंतःकरणांत न आणतां त्याला संपूर्णपणें नष्ट केल्याशिवाय कधींही राहूं नये. शत्रु दुर्बळ असला तरी

त्याची उपेक्षा कधींही करूं नये. थोडासा अग्नि देखील सर्व अरण्य जाळून भस्म केल्याशिवाय कधींही राहात नाहीं. वेळेनुसार कधीं अंध व्हावें तर कधीं बधिर व्हावें; व आपल्या समोर गोष्टी घडत असतांही आपल्याला त्या मुळीच कळत नाहीत असें दाखवावें. कान चांगले तीक्ष्ण असतांनादेखील खुशाल बहिरेपणाचें सोग घ्यावें. कधी तृणाचे चाप करावे व व्याध ज्याप्रमाणें मृगांच्या अंत:करणांत विश्वास उत्पन्न करतो त्याप्रमाणें ढोगीपणानें नि गरिबीनें वागून व सांत्वन, नम्रता इत्यादि सर्व उपायांचें अवलंबन करून शत्रूच्या मनांत आपल्याविषयी विश्वास उत्पन्न करून त्याला ताब्यांत घ्यावें व ठार मारावें. याला गवतांत झांकलेलें धनुष्य म्हणतात. कारण वरून दिसायला तें जरी गवत वाटलें तरी आंत असतें प्राणहारक धनुष्य. शत्रु शरण आला आहे म्हणून त्याच्यावर कधींही दया करूं नये. कारण त्याला स्वास्थ्य मिळालें की तो भय उत्पन्न केल्यावांचून राहात नाही. एकदां ठारच मारल्यावर भय कोठचें? अग्निपूजेचें व्रत धारण करून, यज्ञयागादि कर्मांचें ढोंग उभारून, काषाय वस्त्रें परिधान करून, जटा व हरिणाजिनांचा अवलंब करून लोकांच्या अंत करणांत आपल्याविषयी विश्वास उत्पन्न करावा. नंतर लांडग्याप्रमाणें त्यांचें सर्वस्व लुबाडावें. जोंवर आपला काळ वाईट आहे तोंवर शत्रूलाही खुशाल खांद्यावरून वाहावें, व पुन्हां काळ अनुकूल आला की घडा ज्याप्रमाणें दगडावर आपटून फोडून टाकतात त्याप्रमाणें आपल्या शत्रूला नष्ट करावें. शत्रु कितीही प्रार्थना करीत असला तरीही त्याला कधीही सोडू नये. त्याच्यावर कधीं दया दाखवूं नये. त्याला ठारच मारावें. साम, दाम, भेद, दण्ड इत्यादि सर्व उपायांचा अवलंब करून शत्रूला ठार मारावें. शत्रूच्या नात्यांत खाजगी नातीं येत नसतात. पुत्र, मित्र, बंधु, पिता अथवा गुरु कोणीही असो, एकदां तो आपला शत्रु आहे असें ठरविलें की, ज्याला स्वत:चें कल्याण व्हावें अशी इच्छा आहे त्यानें त्यांना ठार मारल्याशिवाय कधीही राहूं नये. ज्याला आपल्याला मारावयाचें आहे त्याच्या मनांत आपल्याविषयीं अपार प्रेम आहे असें दाखवून धार्मिकतेचें ढोंग उभारून व त्याचा मोठा

आदरसत्कार करीत असल्याचेंही दाखवून त्याची वंचना करावी व वेळ आली तर त्याला ठार मारावें. अत्यत घोर जरी अपराध केला तरी वरून जो धर्माचें भरपूर ढोंग करू शकतो त्याचे दोष व अपराध मेघांनीं पर्वत झांकला जावा त्याप्रमाणें झांकले जातात. ज्याला आपल्याला ठार मारावयाचें आहे त्याला कसलाही संशय येऊं देऊं नये. त्याला उत्थापन देऊन व आसनादिकांनीं आदरसत्कार करून, क्वचित् देणग्याही देऊन शत्रूच्या मनांत प्रथम विश्वास उत्पन्न करावा व त्याच्या अंतःकरणांत भरपूर विश्वास उत्पन्न झाला की त्याच्यावर असा जीवघेऊ प्रहार करावा कीं त्याला उठूं म्हणून देऊं नये. वाणीनें अत्यत विनीत असावें पण हृदय वस्तऱ्याच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण असावें. अंतःकरणांत केवढेंही क्रूर कृत्य करावयाची इच्छा असली तरीही बोलतांना मात्र नेहमी स्मितपूर्वकच बोलावें. हात जोडणें, वचनें देणें, सांत्वना दाखविणें, पायावर डोकें ठेवणें, वाटेल तशीं आश्वासनें देऊन आशा उत्पन्न करणें, यापैकीं कोणत्याही गोष्टीचा वेळ पडेल त्याप्रमाणें अवश्य उपयोग करावा. ज्याला आपले कल्याण करून घ्यावयाचें आहे त्यानें या सर्व गोष्टींचा अवलंब करावयास हृदय कचरूं देऊं नये. दुसऱ्याच्या मर्मावर आघात केल्यावांचून, अत्यंत दारुण कर्म केल्यावांचून व बगळ्याप्रमाणें ढोंग करून आघात केल्यावांचून जगांत कोणालाही मोठें ऐश्वर्य प्राप्त झालेलें नाही. इतक्या गुप्तपणानें कोणतेंही काम करावें कीं आपले शत्रु मित्र दोघांनाही तिच्या प्रयोगाचा पत्ता लागू नये. केवळ परिणामांवरूनच त्यांना काय ज्ञान व्हावयाचें असेल तें होईल. इतक्या दक्षपणें या बाबतीत वागावें. जर पाण्डुपुत्र बलवान् आहेत व जर तूं त्यांना आपले शत्रु समजतोस तर तुला ज्यायोगें पश्चात्ताप होणार नाही अशाच पद्धतीनें या नीतीचा तू अवलंब कर."

मी येथें सर्व कणिकनीति उद्धृत केलेली नाहीं. धृतराष्ट्राचें व्यक्तिचित्र उलगडावयास तिच्या ज्या तत्त्वांचा परिचय असणें आवश्यक आहे, तेवढ्यांचाच मी येथें उल्लेख केलेला आहे. ही तत्त्वें ध्यानांत ठेवून राजा धृतराष्ट्राच्या व्यक्तिचित्राकडे पाहिलें तर काय दृष्टोत्पत्तीस येईल ? तें आपण पुढच्या व्याख्यानांत पाहूं.

१०. धृतराष्ट्राचें स्वभावचित्र

मागच्या व्याख्यानांत उद्धृत केलेल्या कूटनीतीच्या अथवा कणिक नीतीच्या संबंधीं नेहमींच अशी एक गोष्ट सांगण्यांत येते कीं, या नीतीचे प्रयोग जगांतील सर्वच राजकारणधुरंधर पुरुषांनीं केलेले असल्यामुळें व जगांतील इतिहासाच्या ओघांत आजवर आलेल्या व पुढें येणाऱ्या कोणत्याही राजकारणी पुरुषाला यश मिळणें दुरापास्त असल्यामुळें त्या नीतीचा अवलंब करणें कोणत्याही पुरुषाला अत्यंत आवश्यक ठरतें; व त्यामुळें या नीतीचा अवलंब करणारा पुरुष अनीतिमान्, अधार्मिक अथवा अधःपतित म्हणून समजण्यांत येत नाहीं. आजवर तरी तो तसा समजला गेलेला नाही. केवळ भारतवर्षाच्या इतिहासापुरतें पाहिलें तरी भगवान् श्रीकृष्णासारख्या पूर्णावताराला देखील या नीतीचा अवलंब करणें क्रमप्राप्त ठरलें. इतकेंच नव्हे तर नंदवंशाचा नाश याच नीतीनें करणारा व आपल्या कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथांत तिचा वेगवेगळ्या अंगांनीं परिचय करून देणारा आर्य चाणक्य अतिशय श्रेष्ठ पुरुष म्हणून इतिहासांत प्रसिद्धीस आला. मग ज्या नीतीच्या अवलंबामुळें भगवान् श्रीकृष्णाचें पूर्णावतारत्व नष्ट होऊं शकत नाहीं, त्याच नीतीचा अवलंब राजा धृतराष्ट्रानें केल्याबरोबर त्याच्या बाबतींत मात्र दोषारोष करावयास कां तयार व्हावें? महाभारताच्या शांतिपर्वातील राजधर्म प्रकरणांत ज्याप्रमाणें विशुद्ध नीतिधर्माचा पुरस्कार केलेला आहे त्याचप्रमाणें राज्य मिळवूं, रक्षूं व वाढवूं इच्छिणाऱ्या व्यक्तीसाठीं म्हणून या कूट नीतीचाही पुरस्कार करण्यांत आलेला आहे. अशा स्थितींत राजा धृतराष्ट्रानें या नीतीचा पुरस्कार केला असतां त्याला दोषी समजण्याचें कारण काय? या प्रश्नाचा परिहार सोपा आहे. जगांतील ज्या थोर व्यक्तींनीं या नीतीचा पुरस्कार केला त्यांनीं तो अपरिहार्य म्हणून, अगतिक होऊन केलेला आहे. प्राप्त धार्मिक कर्तव्य म्हणून नव्हे. किंबहुना या विशिष्ट नीतीच्या बाबतींत व्यक्तिगत धार्मिक

व्याख्यान १० वें, दिनांक ५ एप्रिल १९५१

आचरणापेक्षां सामाजिक कल्याणाचा हेतु अधिक श्रेष्ठ समजून तिचा पुरस्कार करण्यांत आलेला आहे. जग हें लबाडांनीं भरलेलें आहे. अशा स्थितींत समाजकल्याणाच्या दृष्टीनें काट्यानें काटा काढावा या न्यायानें लबाडांचेंच हत्यार त्यांच्यावर उलटवून त्यांचा नाश केल्यावांचून भागावयाचें नाहीं. म्हणून जगांतील महापुरुषांचें या नीतीचा अवलंब करणें हें प्राप्तकर्तव्य ठरलें. रोज संध्या करावी, प्रत्येक वसंत ऋतूत सोमयाग करावा, परस्त्रियांना मातेसमान मानावें अथवा नेहमीं खरें बोलावें हीं जशीं नीतिशास्त्रांतलीं कर्तव्यें आहेत, त्याप्रमाणें स्वार्थासाठीं खोटें बोलावें, लोकांचीं घरें जाळावी, दुसऱ्यांना विषप्रयोग करावे व अकारण परस्वापहरण करावें हीं कांहीं नीतिशास्त्रांतलीं प्राप्तकर्तव्यें नव्हेत. दुसऱ्यानें आपलें राष्ट्र बुडवूं नये म्हणून आपण त्यांचीं घरें जाळावींत, दुसऱ्यांनीं आपल्याला विषप्रयोग करूं नये म्हणून शक्य ती दक्षता बाळगून त्यालाच नष्ट करावें, या आत्मसंरक्षणात्मक प्रतिक्रियेंतून अगतिकतेनें या नीतीचा पुरस्कार करण्यांत आलेला आहे. कोणत्याही गोष्टीची नीतिमयता अथवा अनीतिमयता तिच्या मुळाशीं असलेल्या प्रेरक हेतूवरूनच पारखली जाते. आर्य चाणक्यानें कौटिल्याचा अंगीकार करून नंदराज्य धुळीला मिळविलें व त्या जागीं दुसरी सत्ता प्रस्थापित केली असली तरी त्या सत्तेपैकीं कर्पदिकेचाही त्यानें अभिलाष धरला नाहीं व नव्या प्रस्थापित सत्तेकडून ग्रीकयवनांच्या आक्रमणाला थोपवून धरून भारत त्यांच्या आक्रमणापासून मुक्त केल्यावर एकाद्या महान् साम्राज्याचे वास्तविक सूत्रधार बनण्याच्या प्रभुत्वाच्या आकांक्षेचा देखील परित्याग करून तो आपलें तपश्चर्येचें कर्तव्य पार पाडण्यासाठीं निघून गेला. या गोष्टींत त्याचें आर्यत्व, भारतीयत्व अथवा माहात्म्य व्यक्त झालें आहे. जर तो तसें कांहीं न करतां स्वतःच राज्य बळकावून बसला असता अथवा त्या राज्याचें सूत्रचालकत्व मरेपर्यंत न सोडतां जळू ज्याप्रमाणें रक्ताला चिकटून बसते त्याप्रमाणें जर तो जन्मभर चंद्रगुप्ताची प्रधानकीच करीत राहिला असता तर इतिहासाच्या दृष्टीनें तो आज ठरला आहे तसा महापुरुष खात्रीनें ठरला नसता. काव्यवाङ्मयावर देखील

या महापुरुषाच्या महत्तेची त्याच्या या त्यागबुद्धीमुळेंच छाप बसलेली आहे हें मुद्राराक्षस नाटकांतून चांगलेंच प्रत्ययास येतें. तेथील कचुकी चाणक्याचें वर्णन करतांना म्हणतो :—

अहो राजाधिराज मन्त्रिणो विभूतिः । तथाहि
उपलशकलमेतत् भेदकं गोमयानाम् ।
बटुभिरुपहृतानां बर्हिषां स्तूपमेतत् ॥

—मुद्राराक्षस, ३-१५

चाणक्याची महत्ता या गोष्टीत सामावलेली आहे व म्हणून कौटिल्य करूनही 'पद्मपत्रमिवांभसा' या न्यायानें त्याची महत्ता नष्ट होऊ शकत नाही. भगवान् श्रीकृष्णांच्या बाबतींतही हेंच आहे. नृशंसकृत्यें करणाऱ्या स्वार्थी लबाडांची वाटचाल ओळखून जे त्यांच्याशीं तेंच हत्यार वापरून धोरण आंखीत नाहींत ते अखेरीस जगांत बावळट व मूर्ख समजले जाऊन स्वतःचा व राष्ट्राचाही सर्वनाश ओढवून घेतात, हें हाती आलेल्या महंमद घोरीला जीवदान देऊन शेवटी स्वतःचा व राष्ट्राचाही नाश ओढवून घेणाऱ्या पृथ्वीराज चव्हाणाच्या उदाहरणावरून चांगलें स्पष्ट होण्यासारखें आहे. तात्पर्य केवळ स्वार्थी हेतूनें, दुसऱ्यांच्या सर्वस्वापहरणाची नीच वृत्ति ठेवून या नीतीचा वापर करणें हें अधःपाताचेंच लक्षण समजलें पाहिजे. आर्य महापुरुषांनीं व राजांनी तें तसेंच मानलें होतें. शाश्वत धर्म, मानव कल्याण अथवा राष्ट्रहित या उदात्त ध्येयाप्रीत्यर्थ स्वतःचा स्वार्थ मनांतही न आणतां या नीतीचा अवलंब करणें वेगळें व स्वार्थी हेतु पुरविण्यास्तव तिचा अवलंब करणें वेगळें. प्रतिक्रिया व अगतिकता म्हणून तिला नीतिशास्त्रांत स्थान मिळालें आहे; विधिप्राप्त कर्तव्य किंवा आवश्यक नैतिक गोष्ट म्हणून नव्हे. हें या गोष्टीचा विचार करतांना नेहमींच लक्षांत ठेवलें पाहिजे. राजा धृतराष्ट्राचा हेतु श्रीकृष्ण, कौटिल्य अथवा जगांतील इतर महापुरुष यांच्याप्रमाणेच उदात्त होता काय?

राजा धृतराष्ट्राचा हेतु

महाभारताच्या शांतिपर्वांत राजधर्मप्रकरणांत राजकर्तव्य म्हणून असें सांगितलें आहे कीं :—

नाधर्मेण महीं जेतुं लिप्सेत जगतीपतिः ।
अधर्मविजयं लब्ध्वा को नु मन्येत भूमिपः ॥ १
अधर्मयुक्तो विजयो हृद्यध्रुवोऽस्वर्ग्य एव च ।
सादयत्येष राजानं महीं च भरतर्षभ ॥ २

—महाभारत, शांतिपर्व अ. ९६

"राजानें अधर्मानें पृथ्वी जिकण्याचा विचारही मनांत आणू नये. अधर्मानें मिळविलेला विजय कोणत्या राजास अभिमानास्पद वाटेल? अधर्मानें मिळविलेला विजय या लोकी टिकू शकत नाही व परलोकीही तो दुर्गतीसच कारणीभूत होतो. इतकेंच नव्हे तर शेवटीं तो त्या राजाचा व त्याने मिळविलेल्या जमिनीचाही नाश करतो." राजा धृतराष्ट्रानें युधिष्ठिराला यौवराज्यपदावर बसविले होतें हें आपण पाहिलेंच. एकदा युधिष्ठिराला यौवराज्यपदावर बसविल्यावर त्याच्या पराक्रमाविषयीं व योग्यतेविषयीं आपल्याला मत्सर वाटू लागला हेंही त्यानें स्पष्ट शब्दांत कबूल केलें आहे हेंही आपण मागच्या व्याख्यानांत पाहिलें. तत्कालीन रूढ कायद्याप्रमाणें अंध म्हणून त्याचा राज्यावरील अधिकार सपल्यानंतर त्याचे आजोबा देवापि यांच्याप्रमाणें धीरोदात्त वर्तन राखणें हेच त्याचें कर्तव्य होतें. देवापि हीनाग असल्यामुळें धृतराष्ट्राप्रमाणें ज्येष्ठ पुत्र असतांना देखील त्याचा राज्यावरील अधिकार सपताच कूटनीतीचा आश्रय न करतां धाकटचा भावाला म्हणजे शतनूला गादीवर बसवून तो स्वतः अरण्यांत निघून गेल्याचें आपण पाहिले. त्याच परंपरेंत जन्म पावलेल्या धृतराष्ट्राचेंही तेंच कर्तव्य होतें तें त्यानें न पाळतां उलट राज्याची अधिकारसूत्रे आपल्याच हाती ठेविली हा त्याचा पहिला अध.पात व नुसतींच आपल्या हाती ठेविली असें नसून युधिष्ठिराला यौवराज्याचा अभिषेक करून कुरुराजाचा भावी वारस म्हणून नियुक्त केल्यानंतर मग त्यानें त्याच्या पदच्युतीची व राज्य गिळंकृत करण्याची कारस्थानें सुरू केलीं हा त्याचा दुसरा अधःपात. आपल्या मनांत उत्पन्न झालेले विचार पापमय आहेत याची धृतराष्ट्राला स्वतःला जाणीव होती इतकेंच नव्हे तर त्या बाबतींत तो आपला उद्देश स्पष्ट करून सांगावयास भीतही होता असें दिसतें. तो स्वतःच म्हणतो :

दुर्योधन ममाप्येतद् हृदि संपरिवर्तते ।
अभिप्रायस्य पापत्वान्नैवं तु विवृणोम्यहम् ।। १६
न च भीष्मो न च द्रोणो न च क्षत्ता न गौतमः ।
विवास्यमानान्कौन्तेयाननुमंस्यन्ति कर्हिचित् ।। १७
समा हि कौरवेयाणां वयं ते चैव पुत्रक ।
नैते विषममिच्छेयुर्धर्मयुक्ता मनस्विनः ।। १८
ते वयं कौरवेयाणामेतेषां च महात्मनाम् ।
कथं न वध्यतां तात गच्छाम जगतस्तथा ।। १९

—महाभारत, आदिपर्व अध्याय १४२

"दुर्योधना ! माझ्याही अंतःकरणांत हीच गोष्ट आहे. पण हा अभिप्राय पापमय असल्यामुळें तो मी कोणासमोर सांगू शकत नाहीं. आपण जर पाण्डवांना काढून लावलें तर भीष्म, द्रोण, विदुर, व कृपाचार्य या कृत्याला कधीच संमति देणार नाहींत. आपण व पाण्डव यांच्याविषयीं त्यांची समबुद्धि असल्यामुळें व ते धार्मिक आणि मनस्वी लोक असल्यामुळें आपलें मात्र हित व्हावें आणि केवळ पाण्डवांचें मात्र अहित व्हावें ही गोष्ट ते केव्हांही मान्य करणार नाहींत. इतकेंच नाहीं तर कौरवराज्यांतील कुलधुरंधर पुरुष राज्य-कारभारांतील द्रोणादि श्रेष्ठ लोक व नीति व अनीति यांची ओळख असणारें सर्व जग यांच्या दृष्टीनें आपण वध्य ठरल्याशिवाय राहा-णार नाहीं अशी भीति वाटते."

दुर्योधनानें त्याला आपल्या कारस्थानांची माहिती दिल्यानंतर मागें वर्णिलेल्या कूट नीतीतील पुत्र, सखा, भाऊ, पिता, वा गुरू कोणीही असो, जो कोणी आपल्या स्वार्थाच्या आड येईल त्याला ठार मारावें या प्रमेयाचा त्यानें अंगीकार केला. आपल्या मुलाला प्रजांशीं स्पष्ट संबंध ठेवतां यावा म्हणून त्यानें पाण्डवांना वारणाव-तांत काढून लावावयाचें निश्चित केलें; पण त्यांना सरळ काढून लावणें अशक्य होतें म्हणून त्यासाठीं त्यानें मागें उल्लेखिलेल्या 'तृणमय चाप वापरावें' या नीतीचा अंगीकार केला व कारस्थान उभारलें.

धृतराष्ट्राचें कारस्थान

हस्तिनापुराच्या प्रजाजनांपासून पाण्डवांना पुष्कळ दिवसपर्यंत दूर ठेवून त्या अवधींत दुर्योधनाला आपलें आसन दृढमूल करण्याची संधि द्यावी असें या कारस्थानाचें धृतराष्ट्राच्या मतें स्वरूप होतें. त्यासाठीं त्यानें वारणावत नांवाच्या नगरींत त्यांना पाठवावयाचें निश्चित केलें. पण उघडपणें तर त्यांना तसें पाठवितां येणें शक्य नव्हतें म्हणून त्यानें पाण्डवांच्याच मनांत वारणावताला जाण्याची इच्छा उत्पन्न व्हावी असा प्रयत्न सुरू केला. महाभारतांत म्हटलें आहे :—

धृतराष्ट्रप्रयुक्तास्ते केचित्कुशलमन्त्रिणः ।
कथयांचक्रिरे रम्यं नगरं वारणावतम् ॥ २
अयं समाजः सुमहान्रमणीयतमो भुवि ।
उपस्थितः पशुपतेर्नगरे वारणावते ॥ ३
सर्वरत्नसमाकीर्णे पुंसां देशे मनोरमे ।
इत्येवं धृतराष्ट्रस्य वचनाऊचक्रिरे कथाः ॥ ४
कथ्यमाने तथा रम्ये नगरे वारणावते ।
गमने पाण्डुपुत्राणां जज्ञे तत्र मतिर्नृप ॥ ५
यदा त्वमन्यत नृपो जातकौतूहला इति ।
उवाचैतानेत्य तदा पाण्डवानम्बिकासुतः ॥ ६
ममैते पुरुषा नित्यं कथयन्ति पुनः पुनः ।
रमणीयतमं लोके नगरं वारणावतम् ॥ ७
ते ताता यदि मन्यध्वमुत्सवं वाराणावते ।
सगणाः सान्वयाश्चैव विहरध्वं यथामराः ॥ ८
ब्राह्मणेभ्यश्च रत्नानि गायनेभ्यश्च सर्वशः ।
प्रयच्छध्वं यथाकामं देवा इव सुवर्चसः ॥ ९
कंचित्कालं विहृत्यैवमनुभूय परां मुदम् ।
इदं वै हस्तिनपुरं सुखिनः पुनरेष्यथ ॥ १०

—महाभारत, आदिपर्व अध्याय १४३

"धृतराष्ट्रानें नियुक्त केलेले कांहीं कुशल मंत्री पांडवांच्या आंवतीं भोंवतीं वारणावत शहर अत्यंत रम्य असल्याबद्दल वारंवार गोष्टी

करूं लागले. त्या वारणावतात भगवान् महादेवाचें अत्यंत रम्य स्थान असून तेथें मोठी यात्रा भरणार आहे, तें नगर अत्यंत समृद्ध असून मनोरमतेंत तें सर्वश्रेष्ठ ठरेल, इत्यादि गोष्टी धृतराष्ट्राच्या प्रेरणेवरून त्याचे कुशल स्नेही वारंवार करूं लागले. त्याच त्या गोष्टी एकसारख्या कानावर पडत गेल्यामुळें हें 'वारणावत' प्रकरण आहे तरी काय, तें एकदां डोळ्यांनी बघावें अशी इच्छा पांडवांच्याही मनांत स्वाभाविकपणे उत्पन्न झाली. पांडव तें नगर पहाण्याविषयी पुरेसे उत्सुक झालेले आहेत अशी राजा धृतराष्ट्राची जेव्हां पूर्णपणें खात्री पटली, तेव्हां त्यानें त्यांची भेट घेऊन त्यांना असें सांगितले की "हीं माझी माणसें वारवार वारणावत नगर अत्यत चांगलें असल्याविषयीं व तेथील रमणीयता अपूर्व असल्याविषयी सांगत असतात. जर तुमची तेथें जाण्याची इच्छा असेल तर आपल्या परिवारासह तुम्ही तेथें जाऊं शकतां. देवांप्रमाणें तेथें आनंदानें विहार करा. आपल्या नांवलौकिकाला साजेल अशा रीतीनें ब्राह्मणांना रत्नादिकांची उत्कृष्ट दानें द्या. गायनादि ऐका. जितका आनद उपभोगितां येईल तितका भोगून व कांही दिवस तेथें सुखानें राहून पुन्हां हस्तिनापुराला येतां येईल." किती मायावी होतें हें भाषण! व किती कौशल्याने टाकलेला होता हा डाव!! सहजच पाण्डव त्यानें फसले व सर्व वडील मंडळीची आज्ञा घेऊन त्यांनी वारणावतास जाण्याची सिद्धता चालविली. धृतराष्ट्राची इच्छा पाण्डवांनीं दूर व्हावें एवढीच असली तर दुष्ट इच्छेच्या बाबतीत दुर्योधन त्याच्यावर मात करणारा होता. पाण्डव नुसते वारणावतास जाऊन त्याचें समाधान होणार नव्हतें. शत्रु निःशेष करावा या कल्पनेच्या अनुसार त्यानें गेलेले पांडव पुन्हां परत येण्याचा सभवही उरूं नये म्हणून त्यांना तेथें जाळून टाकण्याचा बेत केला. व पुरोचन नांवाच्या एका अत्यंत दुष्ट व्यक्तीची त्या कामावर नियुक्ति करून तेथें 'लाक्षागृह' बनविलें. चक्राला गति मिळण्याचाच अवकाश होता. एकदां ती गति मिळाल्यावर त्याचें पर्यवसान किती भयानकतेंत होईल याची कोण कशी कल्पना करूं शकणार! व तें थांबवू तरी कोण शकणार? पांडवांचा धृतराष्ट्रा-

वर पूर्णपणें विश्वास होता. त्याना त्याच्या अतरगाची व या कारस्थानाची कांहींच कल्पना नव्हती. जातांना स्वतः युधिष्ठिरच यासबधी असें म्हणतो —

पिता मान्यो गुरुः श्रेष्ठो यदाह पृथिवीपतिः ।
अशङ्कमानैस्तत्कार्यमस्माभिरिति नो व्रतम् ।। १५

"पृथ्वीपति धृतराष्ट्र आमचा पिता, गुरु व आमच्यापेक्षां श्रेष्ठ असून तो जें सांगेल तें आमच्या हिताचेंच असल्यामुळे त्याविषयी आम्हांला कांहीएक सशय न घेतां तो सांगेल त्याप्रमाणेंच वागणें उचित आहे." असो.

राजशक्ति व सचिवशक्ति यांचें द्वंद्व

याप्रमाणें धृतराष्ट्रानें कितीही गुप्त कारस्थान रचलें असलें तरी कुरुराज्याचा अत्यत धार्मिक व विचक्षण मत्री विदुर यानें तें कारस्थान ओळखलें व त्यांतून पांडवांना वांचवावयाचा निश्चय केला. आदर्श राज्यपद्धतीत सचिवशक्ति व राजशक्ति यांच्यांत मतैक्य असणें आवश्यक असतें असें आपण भारतीय राज्यशास्त्राचें स्वरूप विशद करतांना पाहिले आहे. या ठिकाणी सचिव धार्मिक, तर राजा अधार्मिक असें द्वद्व उत्पन्न होऊन अधार्मिक राजावर धार्मिक सचिवानें मात करण्याचा निश्चय केला. महाभारत म्हणतें :—

तेषामिङ्गितभावज्ञो विदुरस्तत्त्वदर्शिवान् ।
आकारेण च तं मन्त्रं बुबुधे दुष्टचेतसाम् ।। ३
ततो विदितवेद्यात्मा पाण्डवानां हिते रतः ।
पलायने मतिं चक्रे कुन्त्याः पुत्रैः सहानघः ।। ४

— महाभारत, आदिपर्व अध्याय १४१

चेहऱ्यावरूनच भाव ओळखण्यात अत्यंत कुशल अशा तत्त्वदर्शी विदुरानें कौरवांचे भाव त्यांच्या चेहऱ्यावरूनच ओळखले व काय करावें नि काय करूं नये या संबंधीं तो अत्यंत विचक्षण असल्यामुळें पाण्डवांचें हित करावयाचा निश्चय करून कुन्तीला तिच्या पुत्रांसहित तेथून पळवून नेण्याचा बेत त्यानें योजिला. अनेक लोक पाण्डव हस्तिनापुराहून निघत असतां त्यांना निरोप देण्या-

साठी हस्तिनापुराच्या वेशीपर्यंत आले होते. विदुरानें तेथेंच थोडा वेळ थांबून युधिष्ठिराला सांकेतिक भाषेंत त्याच्यावरील संकटाची कल्पना दिली. युधिष्ठिरानेंही सांकेतिक परिभाषेंतच त्याला उत्तर दिलें व सावध होऊन आगामी संकटांतून स्वतःची मुक्तता करून घेण्याच्या सिद्धतेनेंच त्यानें दक्षता राखली. महाभारतांत असें वर्णन आहे कीं—

पौरेषु विनिवृत्तेषु विदुरः सत्यधर्मवित् ।
बोधयन्पाण्डवश्रेष्ठमिदं वचनमब्रवीत् ॥ १९
गृहादग्निश्च बोद्धव्य इति मां विदुरोऽब्रवीत् ।
पन्थाश्च वो नाविदितः कश्चित्स्यादिति धर्मधीः ॥ ३२
जितेन्द्रियश्च वसुधां प्राप्स्यतीति च मेऽब्रवीत् ।
विज्ञातमिति तत्सर्वं प्रयुक्तो विदुरो मया ॥ ३३

—महाभारत, आदिपर्व अ. १४५

"वेशीपर्यंत पोंचवावयास आलेले सर्व पौरजन निघून गेल्यानंतर पाण्डवांतील ज्येष्ठ बंधु युधिष्ठिर याला आगामी संकटाची सूचना धर्मवेत्त्या विदुरानें दिली. युधिष्ठिरानें ती आपल्याला समजली असल्याचें त्याला सांगितलें. पुढें कुन्तीनें हा काय प्रकार आहे म्हणून विचारल्यानंतर विदुराचा निरोप म्हणून सांगतांना युधिष्ठिर तिला म्हणाला कीं, 'तुम्ही ज्या घरांत राहाल त्याला अग्नीपासून भय आहे, पण तेथून बाहेर कसें पडावयाचें याची व्यवस्था होईल. आपणाला कारस्थान समजलें आहे असें मुळींच दाखवूं नका. मन ज्याच्या ताब्यांत असतें त्यालाच शेवटी विजय प्राप्त होत असतो.' मीही विदुराला मला सर्व समजल्याचें सांगितलें." पाण्डव स्वस्थपणें वारणावतांत आले व लाक्षागृहांत राहूं लागले. त्या घराची परीक्षा करून युधिष्ठिरानें तें लाक्षागृह असल्याची तेव्हांच कल्पना केली. पण विदुराच्या सूचनेनुरूप त्यानें तसें मुळींच भासविलें नाही. पुरोचन नेहमींच सेवेच्या मिषानें त्यांच्या सन्निध राहात असल्यामुळें तेथून बाहेर कसें पडावें व तेही आपण सुरक्षित बाहेर पडलों नसून दग्ध झालों असा आभास उत्पन्न करूनच बाहेर कसें पडावें याचा विचार युधिष्ठिर करूं लागला. महाभारतांत युधिष्ठिर भीमाला म्हणतो कीं:—

जिघ्राणोस्य वसागन्धं सर्पिर्जतुविमिश्रितम् ।
कृतं हि व्यक्तमाग्नेयमिदं वेश्म परंतप ॥ १४
इह यत्तैर्निराकारैर्वस्तव्यमिति रोचये ।
अप्रमत्तैर्विचिन्वद्भिर्गतिमिष्टां ध्रुवामितः ॥ २१
भौमं च बिलमद्यैव करवाम सुसंवृतम् ।
गूढश्वासान्न नस्तत्र हुताशः संप्रधक्ष्यति ॥ ३०
वसतोऽत्र यथा चास्मन्न बुध्येत पुरोचनः ।
पौरो वापि जनः कश्चित्तथा कार्यमतन्द्रितैः ॥ ३१
—महाभारत, आदिपर्व अ. १४६

"हे भीमसेना ! हया घरांतील भिंतींना जो ज्वालाग्राही पदार्थाचा वास येत आहे त्यावरून हें दाहक पदार्थांनींच बनविलें आहे ही गोष्ट अगदीं स्पष्ट होते.तरीपण ही गोष्ट आपणाला माहीत आहे असें आपण आपल्या चेहऱ्यावरून कोणालाही दिसूं देतां कामा नये. मात्र अत्यंत दक्ष राहून यांतून बाहेर पडण्याचा मार्ग आपण शोधून काढू.एक गुप्त भुयार कोणाच्या लक्षांत न येईल अशा पद्धतीनें आपण येथेंच या घरांतच निर्माण करूं व तेथून बाहेर पडू. मात्र तें भुयार या पुरोचनाच्या ध्यानांत न येईल अथवा इतरही कोणी नगरवासी जन समजू शकणार नाहीत अशा बेतानेंच आपणांस केलें पाहिजे." पण पाण्डवांनी असें ठरविलें तरी भुयार निर्माण कसें करावें हा त्यांच्याहीसमोर मोठाच प्रश्न होता. त्यांची तीही अडचण विदुरानें दूर केली. महाभारतांत म्हटलें आहेः—

विदुरस्य सुहृत्कश्चित्खनकः कुशलो नरः ।
विविक्ते पाण्डवान्राजन्निदं वचनमब्रवीत् ॥ १
प्रहितो विदुरेणास्मि खनकः कुशलो हयहम् ।
पाण्डवानां प्रियं कार्यमिति किं करवाणि वः ॥ २
स तथेति प्रतिश्रुत्य खनको यत्नमास्थितः ।
परिखामुत्किरन्नाम चकार च महाबिलम् ॥ १६
चक्रे च वेश्मनस्तस्य मध्येनातिमहद्बिलम् ।
कपाटयुक्तमज्ञातं समं भूम्याश्च भारते ॥ १७
पुरोचनभयादेव व्यदधात्संवृतं मुखम् ।
स तस्य तु गृहद्वारि वसत्यशुभधीः सदा १८
—महाभारत, आदिपर्व अध्याय १४७

विदुराचा कोणी एक मित्र खणण्याच्या कामांत अत्यंत कुशल होता. त्यानें एकांतांत पाण्डवांची भेट घेतली व त्यांना असें सांगितलें कीं, मी खनक असून आपलें प्रिय कार्य करावयास विदुरानें मला आज्ञा केली आहे. युधिष्ठिराच्या आज्ञेवरून त्यानें त्या घरांतूनच एक मोठे भुयार तयार केलें. पुरोचनाच्या तें ध्यानांत येऊं नये म्हणून त्याला वरून कपाट केलें होतें. त्यानें तें नेहमीं झांकलेलें असे. पुढें पांडवांनी योग्य वेळी त्या घराला स्वतःच आग लावून देऊन त्यांत पुरोचनालाच भस्मसात् केलें. दारू पिऊन उन्मत्त झालेली एक भिल्लीण आपल्या पांच पुत्रांसहित तेथें राहावयास आली होती तीही त्यांत जळून गेली. पांडव भुयाराच्या वाटेनें कुन्तीसहित तेथून निघून गेले. पुढे जातांना त्यांना वाटेंत नदी लागली. ती नदी तरून जाण्यासाठीं विदुरानें आपलीं माणसें व नाव तेथें आधीच सिद्ध ठेवलेली होती. त्यांनी पाण्डवांना गंगापार करून दिलें. पांडवही कोणाच्या लक्षांत न येतांच तेथून निघून गेले.

महाभारतांत म्हटलें आहे—

एतस्मिन्नेव काले तु यथासंप्रत्ययं कविः ।
विदुरः प्रेषयामास तद्वनं पुरुषं शुचिम् ॥ १
स गत्वा तु यथोद्देशं पाण्डवान्ददृशे वने ।
जनन्या सह कौरव्य मापयानान्नदीजलम् ॥ २
ततः प्रवासितो विद्वान्विदुरेण नरस्तदा ।
पार्थानां दर्शयामास मनो मारुतगामिनीम् ॥ ४
सर्ववातसहां नावं यन्त्रयुक्तां पताकिनीम् ।
शिवे भागीरथीतीरे नरैर्विस्रम्भिभिः कृताम् ॥ ४
इत्युक्त्वा स तु तान्वीरान्पुत्रान्विदुरचोदितः ।
तारयामास राजेंद्र गंगां नावा नरर्षभान् ॥ १३
तारयित्वा ततो गंगां पारं प्राप्तांश्च सर्वशः ।
जयाशिषः प्रयुज्याथ ययागतमगाद्धि सः ॥ १४
पांडवाश्च महात्मानः प्रतिसंदिश्य वै कवेः ।
गंगामुत्तीर्य वेगेन जग्मुर्गूढमलक्षिताः ॥ १५

—महाभारत, आदिपर्व अ. १४९

याच वेळीं पूर्वीच ठरल्याप्रमाणें विदुरानें आपला मनुष्य नदीवर पाठविला. नदी तरून जाण्यासाठी पाण्डव नदीचें पाणी किती खोल आहे हें पाहात असलेले त्यानें पाहिले. त्याने लगेच त्यांची भेट घेऊन अतिशय वेगवान् यंत्रयुक्त व ध्वज फडकत असलेली नाव त्यांना दाखवून तिच्यांत बसविलें व नदीपार करून दिलें. त्यांचा निरोप घेऊन तो पुरुष निघून गेला व पांडवही गुप्तपणें आपल्या वाटेस लागले. कदाचित् घर पहातांना भुयार दृष्टीस पडलें तर पांडव गुप्तपणें निसटल्याचें शत्रूच्या ध्यानांत येईल म्हणून तें ताबडतोब बुजवून टाकण्याचीही काळजी घ्यावयास विदुर विसरला नाहीं. भारतांत म्हटलें आहे:—

खनकेन तु तेनैव वेश्म शोधयता बिलम् ।
पांसुभिः पिहितं तच्च पुरुषैस्तेन लक्षितम् ॥ ८

—महाभारत, आदिपर्व अ. १५०.

ज्या खनकाकरवी विदुरानें तें भुयार तयार करविले होतें त्याच खनकाकरवीं त्यानें तें गुप्तपणें बुजवूनही टाकलें. इकडे लाक्षा-गृहांत पाण्डव दग्ध झाल्याच्या वार्ता हस्तिनापुरांत येऊन ठेपल्या. सर्व लोक शोकांत निमग्न झाले. कारस्थानें करणाऱ्या लोकांना अत्यंत आनंद झाला. तरी तो दाखविणें त्यांना उचित नसल्यामुळें त्यांनीं व विशेषतः राजा धृतराष्ट्रानें सर्वापेक्षां आपणालाच अधिक शोक झाला आहे असा भाव आणून खूप शोक केला. समारंभानें पांडवांचीं श्राद्धें व त्यांचें तर्पण उरकलें. विदुराला सर्व प्रकार माहीत असल्यामुळें शोक करण्याचें जरी त्याला कांहींच कारण नव्हतें तरीही कोणाला तें माहीत असू नये म्हणून त्याला शोकाचें सोंग करणें भागच होतें. तेवढें सोंग त्यानें व्यवस्थितपणें पार पाडलें. महाभारतांत म्हटलें आहे :—

अद्य पाण्डुर्मृतो राजा मम भ्राता महायशाः ।
तेषु वीरेषु दग्धेषु मात्रा सह विशेषतः ॥ ११
गच्छन्तु पुरुषाः शीघ्रं नगरं वारणावतम् ।
सत्कारयन्तु तान्वीरान्कुन्तीराजसुतां च ताम् ॥ १२

एवमुक्त्वा ततश्चक्रे ज्ञातिभिः परिवारितः ।
उदकं पाण्डुपुत्राणां धृतराष्ट्रोऽम्बिकासुतः ॥ १५
रुरुदुः सहिताः सर्वे भृशं शोकपरायणाः ।
हा युधिष्ठिर कौरव्य हा भीम इति चापरे ॥ १६
हा फाल्गुनेति चाप्यन्ये हा यमाविति चापरे ।
कुन्तीमार्ताश्च शोचन्त उदकं चक्रिरे जनाः ॥ १७
अन्ये पौरजनाश्चैवमन्वशोचन्त पाण्डवान् ।
विदुरस्त्वल्पशश्चक्रे शोकं वेद परं हि सः ॥ १८
—महाभारत, आदिपर्व अ. १५०

"आज पाण्डव व कुन्ती यांच्या या निधनानें माझा अत्यंत कीर्तिमान भाऊ पाण्डू हा खरोखरीच मेला आहे. आजवर तो पुत्रांच्या रूपानें तरी जिवंत होता. सर्व लोक, ताबडतोब वारणावतास जा व कुन्ती आणि पाण्डव यांचे त्यांच्या योग्यतेस शोभतील असे थाटानें प्रेत-संस्कार करा. याप्रमाणें बोलून राजा धृतराष्ट्रानें सर्व ज्ञातिबांधवांसहित पाण्डवांचें तर्पण केलें. हे युधिष्ठिर, हे भीमा, हा अर्जुन, हे कुन्ती याप्रमाणें विलाप करीत सर्व लोक पाण्डवांचें तर्पण करीत असतां जोरजोरानें रडत होते. विदुराला खरें काय हें सर्व माहीत होतें; तथापि त्यास तें दाखवावयाचें नसल्यामुळें लौकिक आचारास अनुसरून त्यानेंही थोडा वेळ शोक केला." तात्पर्य राजशक्ति व सचिवशक्ति या दोहोंचेंच येथें द्वंद्व उत्पन्न होऊन त्यांत अखेरीस राजशक्तीचा पराजय झाला.

धृतराष्ट्राचें ढोंग

पण पाण्डव दग्ध झाले याचा खरोखरीचा शोक धृतराष्ट्राला झाला होता काय? तसें दिसत नाहीं. उलट त्याला मनांतून आनंदच झाला होता. द्रौपदी स्वयंवराचे वेळीं पाण्डव प्रकट झाल्यानंतर त्यानें त्यांच्या संबंधी जें धोरण स्वीकारलें त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. विदुरानें द्रौपदीस्वयंवराहून येतांच पाण्डव प्रकट झाल्याची व त्यांनीं द्रौपदीला वरल्याची वार्ता धृतराष्ट्राला सांगतांच केवळ विदुरानें आपला अभिप्राय ओळखू नये म्हणून त्यानें पांडवांना अतिशय वाखाणिलें. तो म्हणतो :—

यथैव पाण्डोः पुत्रास्तु तथैवाभ्यधिका मम ।
यथा चाभ्यधिका बुद्धिर्मम तान्प्रति तच्छृणु ॥ २३
—महाभारत, आदिपर्व अ. २००

"पाण्डव हे नुसते पाण्डूचेच पुत्र नसून मला ते माझ्या पुत्रांपेक्षांही अधिक आवडतात, माझें त्यांच्यावर अत्यंत प्रेम कां आहे तें मी तुला सांगतों." एका बाजूला विदुराशीं याप्रमाणें गोष्टी बोलत असतांच त्याच रात्री दुर्योधन व कर्ण यांच्यासह पाण्डवांच्या विनाशाचें कारस्थान रचण्यांत तो गढून गेला होता. तो कर्ण व दुर्योधन यांना म्हणतो :–

अहमप्येवमेवैतच्चिकीर्षामि यथा युवाम् ।
विवेक्तुं नाहमिच्छामि त्वाकारं विदुरं प्रति ॥ १
ततस्तेषां गुणानेव कीर्तयामि विशेषतः ।
नावबुध्येत विदुरो ममाभिप्रायमिङ्गितैः ॥ २
यच्च त्वं मन्यसे प्राप्तं तद्ब्रवीहि सुयोधन ।
राधेय मन्यसे यच्च प्राप्तकालं वदाशु मे ॥ ३
—महाभारत, आदिपर्व अ. २०१

"तुमच्या विचारांशीं मी पूर्णपणें सहमत आहें. पण माझ्या चेहऱ्यावरून व बोलण्यावरून विदुराला माझें खरें अंतरंग कळूं नये अशी माझी इच्छा आहे. माझ्या हालचालीवरून विदुराला कांहींही कळूं नये म्हणून तो जवळ असला की मी पाण्डवांच्या गुणांची विशेषच प्रशंसा करतों. तथापि तें कांहींही मनावर न घेतां तुम्ही जें योग्य ठरवाल त्याप्रमाणें वागावयास मी सिद्ध आहें."

त्यानें प्रथम मुत्सद्देगिरीनें पाण्डवांचा विनाश करतां येणें शक्य आहे काय याचें समालोचन केलें. पण सुचविलेल्या कोणत्याही छद्मी उपायानें पांडवांचा नाश होणें शक्य नाही अशी त्याची खात्री पटली. त्याचा स्वतःचा भीष्मद्रोणांच्या पराक्रमावर विश्वास होता. पण ते पाण्डवांवर हल्ला करून त्यांचा विनाश आपल्यासाठीं करावयास सिद्ध होतील कीं नाहीं याचा जेव्हां त्यानें अंदाज घेतला त्या वेळीं त्या दोघांनींही त्याच्या या हेतूंना विरोध केला. भीष्म म्हणतात :–

यदा प्रभृति दग्धास्ते कुन्तीभोजसुतासुताः ।
तदा प्रभृति गान्धारे न शक्नोम्यभिवीक्षितुम् ॥ १४
लोके प्राणभृतां कंचिच्छ्रुत्वा कुन्तीं तथागताम् ।
न चापि दोषेण तथा लोको मन्येत्पुरोचनम् ।
यथा त्वां पुरुषव्याघ्र लोको दोषेण गच्छति ॥ १५

—महाभारत, आदिपर्व अ. २०३

ज्या दिवसापासून कुन्ती व तिचे पुत्र जळल्याचें मीं ऐकलें त्या दिवसापासून मला तोंड काढावयास देखील जागा उरली नाहीं. लोक पुरोचनाला जितके दोष देत नाहीत तितके ते तुला दोष देत आहेत असें त्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें. तेव्हां एकट्या कर्णाच्या भरंवशावर युद्धाचें साहस करण्याच्या भानगडींत पडणें त्याला हितावह वाटेना. आपल्या दुष्कृत्यांची जाणीव झाल्यास अमात्य व प्रजा आपला सर्वनाश करतील अशी त्याला जाणीव होती. म्हणून त्यानें यावेळी माघार घेणें हेंच शहाणपणाचें होईल असें ठरविलें. शिवाय पाण्डव या वेळी पूर्वीप्रमाणे असहाय अवस्थेंत राहिलेले नसून त्यांना एका बाजूला पचालांच्या सत्तेचें व दुसऱ्या बाजूला यादवांच्या सत्तेचें साहाय्य मिळालेलें होतें. त्यामुळें त्यानें समारंभपूर्वक विदुराला त्यांच्याकडे पाठवून मोठ्या आर्जवी भाषेनें त्यांना आपल्याकडे बोलावून घेतलें.

वाचा भृशं विनीतः स्यात् हृदयेन यथा क्षुरः ।
स्मितपूर्वाभिभाषी स्यात् सृष्टो रौद्रेण कर्मणा ॥ ६६

—महाभारत, आदिपर्व अ. १४०

या कणिकाच्या उद्देशाचें जणू की काय हें प्रात्यक्षिकच आहे.

अर्धें राज्य बळकाविलें

पाण्डव धृतराष्ट्राच्या निमंत्रणानुसार हस्तिनापुरांत येऊन स्थिर होतांच त्यांचे पूर्वीचेंच पद त्यांना मिळणें ही गोष्ट क्रमप्राप्त होती. युधिष्ठिर लाक्षागृहांत दग्ध होण्यापूर्वी कुरु राज्याचे अनभिषिक्त युवराज होते. त्यामुळें परत आल्यावरही ते त्याच पदावर रहाणें क्रमप्राप्तच होतें. पण त्याऐवजी धृतराष्ट्रानें भांडण होऊं नये या

सबबीवर अर्धे राज्य पाण्डवांनी घ्यावें व अर्धे राज्य स्वतःकडे ठेवावें असें ठरविलें. कुलभेद होऊं नये या सबबीवर ही गोष्ट त्यानें आपल्या बाजूच्या जबाबदार मुत्सद्यांना पटविली व पाण्डवांना हस्तिनापूर सोडून खाण्डवप्रस्थाच्या विभागांत पाठवून दिलें. पाण्डव तेथें गेले त्या वेळीं तें नुसतें अरण्य होतें. त्यांना नगररचनेपासून सर्व गोष्टी स्वतःच्या स्वतंत्र कराव्या लागल्या. धृतराष्ट्रानें मात्र या युक्तीनें कुरु जांगल प्रांताचे समृद्ध, दृढमूल व सुव्यवस्थित राज्य स्वतःच्या पदरांत पाडून घेतलें. महाभारतांत या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :—

धृतराष्ट्र उवाच :

भ्रातृभिः सह कौन्तेय निबोध गदतो मम ।
पुनर्नो विग्रहो मा भूत्खाण्डवप्रस्थमाविश ॥ २४
न च वो वसतस्तत्र कश्चिच्छक्तः प्रबाधितुम् ।
संरक्ष्यमाणान्पार्थेन त्रिदशानिव वज्रिणा ॥ २५
अर्धं राज्यस्य संप्राप्य खाण्डवप्रस्थमाविश ।

वैशंपायन उवाच :

प्रतिगृह्य तु तद्वाक्यं नृपं सर्वे प्रणम्य च ॥ २६
प्रतस्थिरे ततो घोरं वनं तन्मनुजर्षभाः ।
अर्धं राज्यस्य संप्राप्य खाडवप्रस्थमाविशन् ॥ २७
ततस्ते पाण्डवास्तत्र गत्वा कृष्णपुरोगमाः ।
मण्डयांचक्रिरे तद्वै परं स्वर्गवदच्युताः ॥ २८
ततः पुण्ये शिवे देशे शान्ति कृत्वा महारथाः ।
नगरं मापयामासुर्द्वैपायनपुरोगमाः ॥ २९

—महाभारत, आदिपर्व अ. २०७

"हे युधिष्ठिरा ! आपल्या सर्व बंधूसहित तू माझें म्हणणें ऐक. पुनश्च आपआपसांत वैर उत्पन्न होऊं नये म्हणून तू येथें न राहतां खाण्डवप्रस्थांत राहावें असें मला वाटतें. त्या ठिकाणीं तुम्ही राहात असतां कोणीही तुम्हांला पीडा देऊं शकणार नाहीं. सर्व संकटांतून तुमचें रक्षण करावयास अर्जुन पूर्ण समर्थ आहे. ज्या-

प्रमाणें महेंद्र देवांचें रक्षण करतो, त्याचप्रमाणें तो तुमचें रक्षण करील. तेव्हा मी अर्धे राज्य देतों तें घ्या व खाण्डवप्रस्थांत जा."

राजाची ही आज्ञा ऐकून युधिष्ठिरासह सर्व पाण्डवांनीं त्याला प्रणाम केला व श्रीकृष्णासहित त्यांनी खाण्डवप्रस्थाच्या गहन अरण्यांत प्रवेश केला. नंतर पवित्र स्थळ पाहून व्यासादि महर्षींच्या उपस्थितींत त्यांनी नगररचनेप्रीत्यर्थ शांति करून जमीन मापली. तात्पर्य केवळ आपसांतील संघर्षाचें भय दाखवून धृतराष्ट्रानें कणिकानें वर्णन केलेल्या सामाच्याच मार्गानें युधिष्ठिराचें अर्धे राज्य तरी पदरांत पाडून घेतलें. पण दैवयोगानें त्याचा तो डाव उलटला. किबहुना त्यानें केलेल्या या कपटनीतीच्या प्रयोगाचा श्रीकृष्णांनीच आपल्या विशिष्ट उद्दिष्टाप्रीत्यर्थ उपयोग करून घेतल्यामुळें तो डाव सर्वस्वीं धृतराष्ट्राच्याच अंगाशीं आला.

डाव अंगाशीं आला

जर धृतराष्ट्रानें पाण्डवांना अर्धे राज्य दिलें नसतें तर पाण्डवांनी केवढाही पराक्रम केला असता तरी युधिष्ठिराच्या सद्बुद्धीमुळें तो शेवटपर्यंत युवराज राहून धृतराष्ट्र सिहासनावर राहिला असता. त्यामुळें साम्राज्य पाण्डवांनी मिळविलें असतें तरी सम्राट म्हणून राजा धृतराष्ट्राचीच कीर्ति वाढली असती. पण काळाच्या पोटांतील सुवर्णमय भविष्याच्या गोष्टी कोणत्याही व्यक्तीला आधीं कधींच कळत नसतात. अर्धे राज्य मिळतांच पाण्डव स्वतंत्र झाले नि धृतराष्ट्राच्या राज्याशी त्यांचा कांहींही संबंध उरला नाही. अर्थात् तें आपलें राज्य वाढवावयास पूर्णपणें मोकळे झाले. त्याप्रमाणें त्यांनी बाहुबलानें दिग्विजय केला. श्रीकृष्णासारख्या महानुभावाच्या साहाय्यानें आपला राज्यविस्तार केला. ज्ञात जगांतील सर्व सत्ता आपल्या पायाशीं नमविल्या, व युक्तीनें पदरांत पाडून घेतलेले कुरुजांगलाचें राज्य धृतराष्ट्र व दुर्योधन करीत असतांच ते त्यांच्या डोळ्यादेखत भारतवर्षाचे सम्राट् झाले.

आतां या साम्राज्यावर धृतराष्ट्राला कांहीं एक हक्क सांगतां येण्यासारखा नव्हता. तरी पण आपल्या डोळ्यांदेखत पांडवांचा

झालेला हा उत्कर्ष दुर्योधनाला सहन झाला नाही. युधिष्ठिराचा विशेष स्वभाव ओळखून जें खड्गानें शक्य नाहीं तें द्यूतानें पदरांत पाडावें असा दुर्योधनानें निश्चय केला. राजा धृतराष्ट्रानेंही पुत्र-मोह व राज्यलोभ या दोन गोष्टींमुळें त्यास संमति दिली. विदुरानें त्याला पुष्कळ उपदेश केला, तरीही त्यानें त्याचें न ऐकतां केवळ दैवाकडे बोल देऊन पांडवांना मंत्रिसत्तेच्या इच्छेविरुद्ध द्यूतासाठीं आवाहन केलें. धृतराष्ट्र जर या प्रकरणांत पडला नसता तर द्यूत स्त्रीनें झालें नसतें. बलवंतांना याप्रकारें फसविण्यांत आपण स्वत:वर संकट ओढवून घेत आहोंत याची त्याला जाणीव होती. पण संकटाचें स्वरूप संशयास्पद होतें व द्यूताचा लाभ निश्चित होता. म्हणून त्यानें युधिष्ठिराला द्यूतासाठीं बोलावून आणावयास विदुरा-लाच आज्ञा दिली. तो विदुराला म्हणतो :—

नेह क्षत्तः कलहस्तप्स्यते मां न चेद्दैवं प्रतिलोमं भविष्यत् ।
धात्रा तु दिष्टस्य वशे किलेदं सर्वं जगच्चेष्टति न स्वतन्त्रम् ॥ ४
तदद्य विदुर प्राप्य राजानं मम शासनात ।
क्षिप्रमानय दुर्धर्षं कुन्तीपुत्रं युधिष्ठिरम् ॥ ५

—महाभारत, सभापर्व अ. ५७

"विदुरा! दैवच प्रतिकूल आहे. एरवी कलहाचें हें मूळ मी स्वत:च काय म्हणून लावावयास बसलों असतों? परमेश्वरानें जग हें दैवाच्या स्वाधीन केलेलें आहे, तें स्वतंत्र नाही. म्हणून तूं कुन्ती-पुत्र युधिष्ठिराला माझ्या आज्ञेवरून येथे घेऊन ये."

द्यूत धृतराष्ट्राला नापसंत होतें काय?

विदुर अथवा भीष्म यांच्याप्रमाणें धृतराष्ट्र द्यूताच्या मुळींच विरुद्ध नव्हता. त्याचें एक मोठें प्रमाण हें आहे कीं, द्रौपदीसारख्या स्त्रीला युधिष्ठिरानें द्यूताच्या कैफांत पणाला लावल्यानंतर व शकु-नीनें तिला जिकल्याची गर्जना केल्यानंतर सभोंवार सर्व सभ्य धिक्कार करीत असतां, भीष्मद्रोणादि थरकापून उठले असतां व विदुर एखाद्या प्रेताप्रमाणें निश्चल झाला असतां राजा धृतराष्ट्र आनं-दित होऊन विदुराच्या खांद्याला वारंवार स्पर्श करून त्याला "काय

जिकलें ! काय जिकलें ! ! " म्हणून एकसारखा विचारीत होता. अनायासें एवढी संपत्ति पदरांत पडल्याचा आनंद त्या कपटपटु व्यक्तीलाही लपवितां आला नाहीं. ज्या चार अधम प्रवृत्तीच्या लोकांना कुलस्त्री पणाला लावून जिकल्यानंतर लज्जेऐवजीं आनंद वाटला त्यांची गणना करीत असतां महाभारतकारांनीं त्यांच्यांत धृतराष्ट्राला अग्रस्थान दिले आहे. ते म्हणतात :—

धृतराष्ट्रस्तु तं हृष्टः पर्यपृच्छत्पुनः पुनः ।
किं जितं किं जितमिति हृद्याकारं नाभ्यरक्षत ॥ ४३
जहर्ष कर्णोतिभृशं सह दुःशासनादिभिः ।
इतरेषां तु सभ्यानां नेत्रेभ्यः प्रापतज्जलम् ॥ ४४
सौबलस्त्वभिधायैवं जितकाशी मदोत्कटः ।
जितमित्येव तानक्षान्पुनरेवान्वपद्यत ॥ ४५

—महाभारत, सभापर्व अ. ६५

आनंदित झालेला धृतराष्ट्र वारंवार पुनःपुन्हां काय जिकलें ! काय जिकलें ! ! असें विचारूं लागला. कर्णाला अत्यंत आनंद झाला. दुःशासनादि दुष्ट लोकही आनंदित झाले. धृतराष्ट्र, दुर्योधन, कर्ण, दुःशासन, शकुनि हे दुष्ट लोक सोडून बाकी सर्व सभ्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. जिकण्याचा मद शकुनीला इतका चढला होता की तो वारंवार 'जितं, जितं' अशी गर्जना करीत होता. राजा धृतराष्ट्राला या अधर्मानें मिळविलेल्या संपत्तीबद्दल व ती मिळवून भाग्यास चढलेल्या दुर्योधनाबद्दल अंतःकरणपूर्वकच इतकें प्रेम वाटत होतें कीं पाण्डवाविषयींचें त्याचें अतरंग फार काळ गुप्त राहू शकलें नाही. अशुद्ध रक्त रोगाच्या रूपानें केव्हां तरी बाहेर येतेंच त्याचप्रमाणें पाण्डव वनांत जाऊन थोडे दिवस लोटतात न लोटतात तोंच एका प्रसंगानें त्याचें खरे अंतरग स्पष्टपणें प्रकट झाले. झालेला अन्याय केवळ धृतराष्ट्रालाच सांवरून धरतां येण्यासारखा होता तो त्यानें सांवरून धरून पुढील अनर्थपात टाळावा म्हणून विदुरानें त्याला वारंवार विनवणी केली असतां धृतराष्ट्रानें त्याला उलटें राज्यांतून निघून जावयास सांगितलें. महाभारतातील वनपर्वांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे :—

एतद्वाक्यं विदुर यत्त सभायामिह प्रोक्तं पाण्डवान्प्राप्य मां च ।
हितं तेषामहितं मामकानामेतत्सर्वं मम नावैति चेतः ॥ १८
इदं त्विदानीं गत एव निश्चितं तेषामर्थे पाण्डवानां यदात्थ ।
तेनाद्य मन्ये नासि हितो ममेति कथं हि पुत्रं पाण्डवार्थे त्यजेयम् ॥ १९
असंशयं तेऽपि ममैव पुत्रा दुर्योधनस्तु मम देहात्प्रसूतः ।
स्वं वै देहं परहेतोस्त्यजेति को न ब्रूयात्समतामन्ववेक्ष्य ॥ २०
स मां जिह्मं विदुर सर्वं ब्रवीषि मानं च तेहमधिकं धारयामि ।
यथेच्छकं गच्छ वा तिष्ठ वा त्वं सुसान्त्व्यमानाप्यसतो स्त्री जहाति ॥ २१
एतावदुक्त्वा धृतराष्ट्रोऽन्वपद्यदन्तर्वेश्म सहसोत्थाय राजन् । २२
—महाभारत, वनपर्व अ. ४

"विदुरा तुझी या प्रकरचीं भाषणें पाण्डव सभेंत नांदत असतां मी जशीं ऐकलीं आहेत त्याचप्रमाणें तुझें आतांचेंही भाषण मीं ऐकलें. तुझ्या सर्व बोलण्यांत पाण्डवांचें हित व्हावें व माझ्या पुत्रांचें मात्र अहित व्हावें अशी प्रबळ इच्छा दिसून येते. त्यावरून तू माझ्या हिताचा नाहींस ही गोष्ट मला स्पष्टपणें कळून चुकली आहे. पाण्डवांसाठीं मी माझ्या पुत्राला कसें टाकणार? पाण्डव जरी एका अर्थानें माझे पुत्रच असले तरीही दुर्योधन माझ्या प्रत्यक्ष शरीरापासून उत्पन्न झालेला आहे. काय वाटेल तें झालें तरी दुसऱ्यासाठीं आपला देह टाकावयास कोण सिद्ध होईल? तू लबाडीनें माझें अहित करूं इच्छीत आहेस. मी मात्र तुझा व्यर्थच मान राखला. तुला वाटलें तर जा, वाटलें तर रहा. कितीही सांत्वन केलें तरी व्यभिचारी स्त्री शेवटी एकनिष्ठ राहू शकत नाही हीच गोष्ट खरी. याप्रमाणें बोलून धृतराष्ट्र अंतःपुरांत निघून गेला." यामुळें धृतराष्ट्राच्या अंतःकरणावर स्वच्छ प्रकाश पडण्यासारखा आहे. द्यूत काय पण त्यानंतर झालेलें द्रौपदीचें केशाकर्षण, तिच्या वस्त्रहरणापर्यंत येऊन ठेपलेला प्रसंग, दुर्योधनानें तिला हलकटपणानें डावी मांडी दाखविणें इत्यादि सर्व गोष्टी धृतराष्ट्रासमोरच घडत असतात. राजा धृतराष्ट्रानें त्या थांबविण्याचा यत्किंचित्ही प्रयत्न केला नाहीं. हे सर्व अधमपणाचे प्रकार थांबविणें केवळ त्याच्या एकट्याच्या आधीन होते. तरीही ते मुळींच न थांबवितां त्यानें उलट आसुरी आनंदानें ते तसेच चालू

दिले. शेवटीही ते जर केवळ त्याच्याच आज्ञेवरून थांबले आहेत तर आधींही ते त्याच्याच आज्ञेनें थांबले असते. पण त्यानें ते थांबविलेले नाहींत. त्यावरून दुर्योधनाइतकाच त्याला आसुरी आनंद वाटत होता ही गोष्ट निश्चित आहे. शेवटीं गान्धारी ज्या वेळीं अंतःपुरांतून बाहेर आली व तिनें राजाची कानउघाडणी केली तेव्हांच कायते ते प्रकार थांबले. महाभारतांत असें वर्णन आहे कीं :—

ततो गान्धारी विदुरश्चापि विद्वांस्तमुत्पातं घोरमाख्य राज्ञे ।
निवेदयामासतुरार्तवत्तदा ततो राजा वाक्यमिदं बभाषे ॥ २४

—महाभारत, सभापर्व अ. ७१

नंतर गान्धारी व विदुर यांनीं नाना प्रकारचे उत्पात पाहून राजा धृतराष्ट्राची आर्ततेनें जेव्हां विनवणी केली त्या वेळीं त्यानें दुर्योधनाला उद्देशून आज्ञा करून ते प्रकार थांबविले. पुढें आपल्या औदार्याच्या प्रदर्शनाच्या सोंगांत त्यानें पांडवांना त्यांचें सर्वस्व दिलें तरी त्यांत त्याची झालेली चूक दुर्योधनानें त्याला दाखवून देतांच त्यानें पुनश्च पाण्डवांना द्यूतार्थ आव्हान करून सर्वांच्या इच्छेविरुद्ध दुसरें द्यूत घडवून आणलें व त्यांना देशोधडीला लावलें.

अकामानां च सर्वेषां सुहृदामर्थदर्शिनाम् ।
अकरोत्पाण्डवाह्वानं धृतराष्ट्रः सुतप्रियः ॥ २७

—महाभारत, सभापर्व अ. ७४

धृतराष्ट्राचा मुत्सद्दीपणा

राजा धृतराष्ट्र हा केवढा सूक्ष्म बुद्धीचा मुत्सद्दी व चाणाक्ष पुरुष होता, याचे पुरावे महाभारताच्या उद्योगपर्वांत ठिकठिकाणीं आढळत आहेत. त्यातील एक पुरावा म्हणजे 'द्रुपद 'पुरोहिताचें दौत्यप्रकरण होय. राजसत्ता जेव्हां एकमेकांकडे दूत पाठवीत असतात, तेव्हां तो नेहमीच बुद्धिमान् व दीर्घदर्शी मनुष्य पाठविला जातो. व त्याच्याकडून उघड दौत्यापेक्षांही वेगळींच कामें करून घ्यावयाचीं असतात. पाण्डव प्रकट झाल्यावर वचनाप्रमाणें राज्याची पहिली मागणी करण्याकरितां द्रुपदानें पाण्डवांच्या बाजूनें आपला अत्यंत दीर्घदर्शी प्रतिभेचा पुरोहित कौरवांच्या राजसभेंत पाठविला.

तो पाठविण्याचीं अनेक कारणें होतीं. दौत्य कर्माचा येथें कांहीं एक उपयोग होणार नाहीं याची पाण्डवपक्षाला पूर्णपणें कल्पना होती. किबहुना त्याऐवजीं आणखी दुसरीं महत्त्वाचीं कामें साधण्यासाठीच त्या पुरोहिताला पाठविण्यांत आलें होतें. त्यानें काय काय करावें हें त्याला समजावून सांगतांता द्रुपद सांगतो.

मनांसि तस्य योधानां ध्रुवमावर्तयिष्यति ।
विदुरश्चापि तद्वाक्यं साधयिष्यति तावकम् ॥ ९
भीष्मद्रोणकृपादीनां भेदं संजनयिष्यति ।
अमात्येषु च भिन्नेषु योधेषु विमुखेषु च ॥ १०
पुनरेकत्रकरणं तेषां कर्म भविष्यति ।
एतस्मिन्नन्तरे पार्थाः सुखमेकाग्रबुद्धयः ॥ ११
सेनाकर्म करिष्यन्ति द्रव्याणां चैव सञ्चयम् ।
विद्यमानेषु च स्वेषु लम्बमाने तया त्वयि ॥ १२

—महाभारत, उदयोगपर्व अ. ६

" तूं तेथें राहून दुर्योधनाच्या बाजूच्या योद्धयांना त्याच्यापासून फोड. विदुर या बाबतींत तुला मदत करील. भीष्म, द्रोण, कृपाचार्य या सर्वांचीं अंतःकरणें तूं कौरवांपासून विन्मुख करण्याचा प्रयत्न कर. एकदां योद्धे व अमात्य यांची फळी फुटली म्हणजे स्वाभाविकपणेंच त्यांना एकत्र आणण्यासाठीं कौरवांना पुष्कळ प्रयास पडतील व त्यासाठी त्यांना पुष्कळ वेळ खर्ची घालावा लागेल. तेवढया अवधींत पाण्डव आपलें सर्व लक्ष केंद्रित करून सैन्याची जमवाजमव व युद्धाला आवश्यक तो द्रव्यसंचय सहज करतील. तुला जितका अधिक विलंब लागेल तितकें हें काम अधिक सुकर आहे. पण इतके विचक्षण दूत कशासाठीं येत असतात व ते आपलें बोलणें कशासाठीं लांबवीत असतात याची सूक्ष्मदर्शी धृतराष्ट्राला पूर्णपणें कल्पना होती. म्हणून त्यानें द्रुपद पुरोहित येतांच त्याला तेथें मुळींच थांबूं न देतां ताबडतोब त्याची सभेंत भेट घेऊन आपला उलट निरोप घेऊन पाण्डवांकडे त्याला लावून दिलें व द्रुपदाच्या मुत्सद्दीपणावर विजय संपादन केला.

चिन्तयित्वा तु पार्थेभ्यः प्रेषयिष्यामि सञ्जयम् ।
स भवान् प्रतियात्वद्य पाण्डवानेव मा चिरम् ॥ २०

स तं सत्कृत्य कौरव्यः प्रेषयामास पाण्डवान् ।
सभामध्ये समाहूय सञ्जयं वाक्यमब्रवीत् ॥ २१

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय २१

"आपला निरोप मी ऐकला. पूर्ण विचार करून मी पांडवांकडे माझा दूत संजयच पाठवितों. तुम्ही शक्य तितक्या त्वरेनें पांडवांकडे जा. याप्रमाणें बोलून त्यानें सत्कारपूर्वक द्रुपदाच्या पुरोहिताची बोळवण केली."

धृतराष्ट्राचा पाताळयंत्रीपणा

यानंतर धृतराष्ट्रानें आपला दूत संजय याला रात्रीं सुव्यवस्थितपणें पढवून युधिष्ठिराकडे पाठविलें. युधिष्ठिराच्या धार्मिक मनोवृत्तीचा व दयाशील स्वभावाचा धृतराष्ट्राला इतका परिचय होता की काय बोललें असतां त्याचा परिणाम युधिष्ठिरावर होईल या गोष्टीची त्याला पूर्णपणें कल्पना होती. पराक्रमाचा दर्प दाखवून पाण्डवांच्यावर कांहींही परिणाम व्हावयाचा नाही. आपली बाजूच अन्यायाची असल्यामुळें तिला न्यायाचा उजळा देण्याचा कांहीं उपयोग नाहीं हे धृतराष्ट्राला पूर्णपणें माहीत होतें. पण त्याबरोबर त्याला हेंही माहीत होतें कीं केवळ अगतिक म्हणूनच पांडव युद्ध करीत आहेत. वास्तविक सर्व कुळाचा विध्वंस करणारें हें युद्ध त्यांना मुळीच नको असून कोणत्याही उपायानें तें जितकें टळेल तितकें त्यांना हवेंच आहे. त्यांच्या या ऋजु स्वभावाचा अधिकांत अधिक लाभ कसा उठवितां येईल याचा धृतराष्ट्रानें पूर्णपणें विचार केला होता. त्या अनुरोधानेंच त्यानें संजयाला पढवून पांडवांकडे पाठविलें. संजय शिष्टाई हें महाभारतांतील धृतराष्ट्राच्या कौटिल्याचें अद्वितीय उदाहरण आहे. संजयानें येऊन युधिष्ठिराला धृतराष्ट्राचा म्हणून जो निरोप सांगितला तो अभ्यास करण्यासारखा आहे.

संजय म्हणतो :

शमं राजा धृतराष्ट्रोऽभिनन्दन्नयोजयत्स्वरमाणो रथं मे ।
सभ्रातृपुत्रस्वजनस्य राज्ञस्तद्रोचतां पाण्डवानां शमोऽस्तु ॥ ४
सर्वैर्धर्मैः समुपेतास्तु पार्थाः संस्थानेन मार्दवेनार्जवेन ।
जाताः कुले ह्यनृशंसा वदान्या ह्रीनिषेवाः कर्मणां निश्चयज्ञाः ॥५
न युज्यते कर्म युष्मासु हीनं सत्त्वं हि वस्तादृशं भीमसेनाः ।
उद्भासते ह्यञ्जनबिन्दुवत्तच्छुभ्रे वस्त्रे यद् भवेत् किल्बिषं वः ॥ ६
सर्वक्षयो दृश्यते यत्र कृत्स्नः पापोदयो निरयोऽभावसंस्थः ।
कस्तत्र कुर्याज्जातु कर्म प्रजानन् पराजयो यत्र समो जयश्च ॥ ७
ते वै धन्या यैः कृतं ज्ञातिकार्यं ते वै पुत्राः सुहृदो बान्धवाश्च ।
उपक्रुष्टं जीवितं सन्त्यजेयुर्यतः कुरूणां नियतो वै भवः स्यात् ॥ ८
ते चेत् कुरूननुशिष्याथ पार्था निर्णीय सर्वान् द्विषतो निगृह्य ।
समं वस्तज्जीवितं मृत्युना स्याद्यज्जीवध्वं ज्ञातिवधे न साधु ॥ ९
को ह्येव युष्मान् सह केशवेन सचेकितानान् पार्षतबाहुगुप्तान् ।
ससात्यकीन् विषहेत प्रजेतु लब्ध्वाऽपि देवान् सचिवान् सहेन्द्रान् ॥१०
को वा कुरून् द्रोणभीष्माभिगुप्तानश्वत्थाम्ना शल्यकृपादिभिश्च ।
रणे विजेतु विषहेत राजन् राधेयगुप्तान् सहभूमिपालैः ॥ ११
महद्बलं धार्तराष्ट्रस्य राज्ञः को वै शक्तो हन्तुमक्षीयमाणः ।
सोऽहं जये चैव पराजये च निःश्रेयसं नाधिगच्छामि किञ्चित् ॥ १२
कथं हि नीचा इव दौष्कुलेया निर्धर्मार्थं कर्म कुर्युश्च पार्थाः ।
सोऽहं प्रसाद्य प्रणतो वासुदेवं पञ्चालानामधिपं चैव वृद्धम् ॥ १३
कृताञ्जलिः शरणं वः प्रपद्ये कथं स्वस्ति स्यात् कुरुसृञ्जयानाम् ।
न ह्येवमेवं वचनं वासुदेवो धनञ्जयो वा जातु किंचिन्न कुर्यात् ॥ १४
प्राणान् दद्याद्याचमानः कुतोऽन्यदेतद्विद्वन् साधनार्थं ब्रवीमि ।
एतद्राज्ञो भीष्मपुरोगमस्य मतं यद्वः शान्तिरिहोत्तमा स्यात् ॥ १५
— महाभारत उद्योगपर्व अध्याय २५

सजय उवाच :—

धर्मनीत्या पाण्डव ते विचेष्टा लोके श्रुता दृश्यते चापि पार्थ ।
महाश्रावं जीवितं चाप्यनित्यं संपश्य त्वं पाण्डव मा व्यनीनशः ॥ १

न चेद्भागं कुरवोऽन्यत्र युद्धात् प्रयच्छेरंस्तुभ्यमजातशत्रो ।
भैक्षचर्यामन्धकवृष्णिराज्ये श्रेयो मन्ये न तु युद्धेन राज्यम् ॥ २
अल्पकालं जीवितं यन्मनुष्ये महास्रावं नित्यदुःखं चलं च ।
भूयश्च तद्यशसो नानुरूपं तस्मात् पापं पाण्डव मा कृथास्त्वम् ॥ ३
कामा मनुष्यं प्रसजन्त एते धर्मस्य ये विघ्नमूलं नरेंद्र ।
पूर्वं नरस्तान् मतिमान् प्रणिघ्नन् लोके प्रशंसां लभतेऽनवद्याम् ॥ ४
निबन्धनी ह्यर्थतृष्णेह पार्थ तामिच्छतां बाध्यते धर्म एव ।
धर्मं तु यः प्रवृणीते स बुद्धः कामे गृध्नो हीयतेऽर्थानुरोधात् ॥ ५
धर्मं कृत्वा कर्मणां तात मुख्यं महाप्रतापः सवितेव भाति ।
हीनो हि धर्मेण महीमपीमां लब्ध्वा नरः सीदति पापबुद्धिः ॥ ६
इह क्षेत्रे क्रियते पार्थ कार्यं न वै किञ्चित् क्रियते प्रेत्य कार्यम् ।
कृतं त्वया पारलौक्यं च कर्म पुण्यं महत्सद्भिरतिप्रशस्तम् ॥ १२
तच्चेदेवं द्वेषरूपेण पार्थाः करिष्यध्वं कर्म पापं चिराय ।
निवसध्वं वर्षपूगान् वनेषु दुःखं वासं पाण्डवा धर्म एव ॥ १६
अप्रव्रज्ये मा स्म हित्वा पुरस्तादात्माधीनं यद्बलं ह्येतदासीत् ।
नित्यं च वश्याः सचिवास्तवेमे जनार्दनो युयुधानश्च वीरः ॥ १७
मत्स्यो राजा रथमरथः सपुत्रः प्रहारिभिः सह पुत्रैर्विराटः ।
राजानश्च ये विजिताः पुरस्तात् त्वामेव ते संश्रयेयुः समस्ताः ॥ १८
महासहायः प्रतपन् बलस्थः पुरस्कृतो वासुदेवार्जुनाभ्याम् ।
वरान् हनिष्यन् द्विषतो रङ्गमध्ये व्यनेष्यथा धार्तराष्ट्रस्य दर्पम् ॥ १९
बलं कस्माद्वर्धयित्वा परस्य निजान् कस्मात् कर्शयित्वा सहायान् ।
निरुध्य कस्माद्वर्षपूगान् वनेषु युयुत्ससे पाण्डव हीनकालम् ॥ २०
अप्राज्ञो वा पाण्डव युध्यमानोऽधर्मज्ञो वा भूतिमथोऽभ्युपैति ।
प्रज्ञावान् वा बुध्यमानोऽपि धर्मं संस्तम्भाद्वा सोपि भूतेरपैति ॥ २१
नाधर्मे ते धीयते पार्थ बुद्धिर्न संरम्भात् कर्म चकर्थ पापम् ।
आत्थ किं तत्कारणं यस्य हेतोः प्रज्ञाविरुद्धं कर्म चिकीर्षसीदम् ॥ २२
अध्याधिजं कटुकं शीर्षरोगि यशोमुषं पापफलोदयं वा ।
सतां पेयं यन्न पिबन्त्यसन्तो मन्युं महाराज पिब प्रशाम्य ॥ २३
पापानुबन्धं को नु तं कामयेत क्षमेव ते ज्यायसी नोत भोगाः ।
यत्र भीष्मः शान्तनवो हतः स्याद्यत्र द्रोणः सहपुत्रो हतः स्यात् ॥ २४

कृपः शल्यः सौमदत्तिर्विकर्णो विविंशतिः कर्णदुर्योधनौ च ।
एतान् हत्वा कीदृशं तत्सुखं स्याद्वद्विन्देयास्तवनु ब्रूहि पार्थ ॥ २५
लब्ध्वाऽपीमां पृथिवीं सागरान्तां जरामृत्यू नैव हि त्वं प्रजहधाः ।
प्रियाप्रिये सुखदुखे च राजन्नेवं विद्वान्नेव युद्धं कुरु त्वम् ॥ २६
अमात्यानां यदि कामस्य हेतोरेवं युक्तं कर्म चिकीर्षसि त्वम् ।
अपक्रामेः स्वं प्रदायैव तेषां मा गास्त्वं वै देवयानात् पथोऽद्य ॥ २७

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय २७.

राजा धृतराष्ट्राला शांति असावी अशी उत्कट इच्छा आहे. तेवढ्याचसाठीं त्यानें मला येथें पाठविलें. पांडव आणि कौरव या सर्व स्वजनांचें सख्य व्हावें आणि ती गोष्ट पांडवांना रुचावी असें त्याला अंतःकरणपूर्वक वाटतें. धर्मनिष्ठा, दयाशीलता, कपटाचा अंतःकरणाला स्पर्शही नसणें, उग्रतेचा मुळींच स्पर्श नसणें, अकृत्याबद्दल स्वभावतःच संकोच वाटणें, दानशूरपणा, दृढनिश्चयीपणा, व घरंदाजपणा या बाबतीत पांडव सर्वश्रेष्ठ आहेत असें राजाचें मत आहे. तुमच्याजवळ सैन्यबळ अत्यंत श्रेष्ठ आहे हें खरें; पण सद्गुणांचे तुम्ही आधारस्तंभ असल्यामुळें तुमच्या हातून कोणतेंही हीनपणाचें कार्य होणें ही गोष्ट लोकांच्या दृष्टीनें धक्का देणारी होईल. कौरव जाणूनबुजूनच अधम आहेत. त्यांच्या हातून कोणतेंही हीन कृत्य झालें तरी लोक त्यांना नवीं नांवें कोणती ठेवणार? मूळच्याच काळ्या कापडावर कितीही काळा रंग ओतला तरी त्याचा डाग कांहीं पडत नाही, पण अतिशय शुभ्र वस्त्रावर बिंदुमात्र जरी डाग पडला तरीदेखील तो उठून दिसल्याखेरीज राहात नाही. या न्यायानें तुमच्यासारख्या अतिश्रेष्ठ चारित्र्याच्या, धर्माच्या आधारस्तंभांकडून अत्यंत लहान जरी दोष घडला तरी तो लोकांच्या डोळ्यांत भरल्याशिवाय राहणार नाहीं. होणारें युद्ध अत्यंत भीषण आहे. त्यांत सर्वाचाच सर्वनाश होणार आहे. सर्वच कर्ती पिढी कापली गेल्यावर दुराचार माजेल व त्यांतून नरकगामी अशी कुकृत्यें उत्पन्न होतील. सर्वनाशाच्या नरकांतच ज्यामुळें जावें लागेल व ज्याच्यांतून मिळणारा जयदेखील पराजयासारखाच आहे तें भयानक कृत्य जाणून बुजून कोण कशासाठीं करील? ते

लोक जगांत धन्य होत की जे या महान् विनाशापासून कौरव कुलाला वांचविण्याचे ज्ञातिकार्य करतील. जें कौरव कुल जगावें म्हणून स्वतःचें जीवितदेखील द्यावयास सिद्ध होतील ते खरोखरी सर्व जगाकडून धन्यतेस पात्र झाल्यावांचून राहणार नाहींत. तुम्ही ज्यांना शत्रु समजतां ते व तुम्ही एकाच कुलांतील आहांत. त्यांना ठार मारून टाकल्यावर तुम्हांला स्वतःलाच त्यांच्यावांचून जगणे मृत्यूइतकेंच यातनामय व भीषण वाटेल. तुमच्या सामर्थ्याची कोण कल्पना करूं शकणार आहे ? ज्याच्या बाजूला स्वतः श्रीकृष्ण आहे, सात्यकिप्रभृति योद्धे ज्यांच्याकडून लढावयास सिद्ध आहेत, धृष्टद्युम्नानें ज्यांच्या संरक्षणाचा भार उचलला आहे, त्या तुमच्याशी युद्ध करून महेंद्रदेखील आपल्या सर्व देवसैन्यासह यशस्वी होऊं शकणार नाहीं. त्याचप्रमाणें भीष्म, द्रोण, अश्वत्थामा, कर्ण, शल्य व कृपाचार्य यांनीं ज्याचें संरक्षण चालविलें आहे असें राजा दुर्योधनाचें अमर्याद सामर्थ तरी स्वतःचा नाश ओढवून घेतल्यावाचून कोण धुळीस मिळवू शकेल ? म्हणून जय अथवा पराजय मला समानच वाटतात. केवळ स्वतःचाच स्वार्थ साधावा म्हणून ज्यांत कसल्याही प्रकारचा धर्म नाहीं असें हें ज्ञातिवधाचें भीषण कार्य अत्यंत अधम अशा कुलांगारावांचून दुसरा कोण करूं शकेल ? पाण्डावांसारखे धार्मिक व श्रेष्ठ पुरुष हें कार्य करावयास कधीही प्रवृत्त होणार नाहीत म्हणून मी श्रीकृष्ण व पंचालांचा वृद्ध राजा द्रुपद या दोघांनाही हात जोडून अशी विनंति करतों की, कौरव व पाण्डव यांचें कल्याण व्हावें म्हणून काय वाटेल तें झालें तरी हा सर्वनाश त्यांनीं होऊं देऊं नये. माझी ही विनंति श्रीकृष्ण मान्य केल्याखेरीज राहणार नाहीत व अर्जुनही ती मान्य करील असा मला भरंवसा आहे. मी सर्वांच्या प्राणांची भिक्षा मागतो. जे माझे मत आहे तेंच भीष्मादि सर्वश्रेष्ठ लोकांचेंही मत आहे. विशेषतः युधिष्ठिराला माझें असें सांगणें आहे की तुझी प्रवृत्ति स्वाभाविकच धर्माकडे आहे. लोकही त्यासाठी वारंवार तुझी प्रशंसा करीत असतात व ती नुसती वरवर नसून अगदीं खरी आहे याविषयी मला मुळीच संशय वाटत नाहीं. म्हणून मी तुलाच असें म्हणूं इच्छितों कीं जीव-

नाचें मूल्य अत्यंत श्रेष्ठ आहे हें ओळखून त्याचा विनाश करूं नकोस. जर कौरव युद्धावांचून तुला तुझा भाग द्यावयास सिद्ध नसतील तर तूं खुशाल अंधकवृष्णीच्या राज्यांत भिक्षा मागणें पत्करं. पण युद्ध करून राज्य घेऊं नकोस. यांतच तुझ्यासारख्या धार्मिक प्रवृत्तीच्या महापुरुषाचें कल्याण आहे. आयुष्य अत्यत चंचल आहे. त्यांतही दुःखाचे प्रसंग अनेक, सुख नेहमींच थोडें. अशा या जीविताच्या विनिमयानें सर्वश्रेष्ठ असें जगत्कल्याणाचें यश संपादन करावयाचें कीं लोक आपल्याला पापी म्हणतील असें कुकृत्य करावयाचें ? उपभोगाची इच्छाच मनुष्याचा खरा शत्रु होय. धर्माचें खरें विघ्न तेंच होय. तुला मारावयाचेंच असलें तर त्या इच्छेलाच मारून टाक. जो कोणी विचक्षण मनुष्य या इच्छेलाच मारून टाकतो, त्याच्या कीर्तीचें गायन जगांत सदोदित होत असतें. संपत्तीची तृष्णा हीच या सर्व वाईट गोष्टीची प्रेरक आहे. जो कोणी तिच्या तावडीत सांपडतो त्याचा धर्म ती नष्ट करून टाकते. जो कोणी खरा विचक्षण असतो तो नेहमी धर्मबुद्धीचाच आश्रय करतो. व जो उपभोगेच्छेच्या आहारी जातो तो केवळ हीन म्हणून लोक त्याची निंदा करतात. आपल्या सर्व प्रवृत्ति जो केवळ धर्माच्या अनुरोधानेंच ठेवतो, तो अत्यंत तेजस्वी सूर्याप्रमाणें जगांत तळपतो. व जो धर्म सोडून देतो त्याला सर्व पृथ्वी जरी मिळाली तरीही त्याच्या पापबुद्धीमुळें तो नेहमीं आंतरिक क्लेशांतच काळ घालवितो. आपण या लोकीं जें कर्म करूं त्याचाच आपल्याला परलोकीं उपयोग होईल. परलोकांत कांहीं कर्म करावयाचें नसतें. आजपर्यंत तू परलोकासाठीं इतकें उत्कृष्ट पुण्यकर्म केलें आहेस कीं त्यामुळें जगांतील सर्व थोर थोर महात्मेही तुझी प्रशंसा करीत असतात. आज द्वेषाच्या आहारीं जाऊन जर तू पापकर्म करावयास सिद्ध होशील तर तें अत्यंत वाईट होईल व हेंच जर तुम्हांस करावयाचें असलें तर तेरा वर्षे तुम्हांला वनांत रहावें लागलें ही गोष्ट चांगलीच झाली असें म्हटलें पाहिजे. कारण तेवढीं वर्षे तरी मानव जातीचा विनाश टळला. जर तुला अखेरीस हेंच करावयाचें होतें तर मग तेरा वर्षे तरी धार्मिकतेचें सोंग आणून वनवास

कशाला पत्करलास ? आजचे तुझे साहाय्यकारी त्या वेळींही तुझ्या स्वाधीनच होते. श्रीकृष्ण, सात्यकि, विराट, द्रुपद ही सर्व मंडळी त्यावेळींही तू म्हणशील तें करावयास सिद्ध होती. त्यांचें साहाय्य घेऊन तू त्याच वेळीं अर्जुन व श्रीकृष्ण यांच्या नेतृत्वाखालीं दुर्योधनाचा गर्व शस्त्रांचा वापर करून कां मोडून काढला नाहीस ? इतके दिवस थांबून दुसऱ्याला आपलें बळ वाढविण्याची पूर्णपणें संधि देऊन, आपल्या साहाय्यकारी लोकांना मनस्ताप देऊन, वर्षेंचीं वर्षें वनांत कष्ट सहन करून तू आतां कशासाठीं युद्धघोषणा करीत आहेस ? आज युद्ध करण्यांत शहाणपण, धर्म, लोककल्याण कांहींच नाहीं हें तुलाही माहीत आहे. तुझी बुद्धि अधर्माकडे वळूं नये, पापकर्म तुझ्या हातून घडू नये असें मला वाटतें. सदसद्बुद्धीला हरताळ फांसणारें हें कुकर्म करण्यासाठीं तूं कां प्रवृत्त झालास तेंच मला कळत नाहीं. कांहींही रोग ज्याच्यापासून उत्पन्न होऊं शकत नाहीं असें सर्वत्र लाभदायक कर्मच मनुष्यानें करावें. माझें ऐकशील तर तू राग गिळून टाक. त्यांतच तुझें कल्याण आहे. पाप उत्पन्न होणारें असें कर्म महापुरुषांना कधींही आवडत नाही. क्षमा व भोग यांच्यामध्यें क्षमा श्रेष्ठ होय. ज्या कर्मामुळें तुला तुझें आजोबा भीष्म यांना ठार मारावें लागेल, तुझे गुरु द्रोण यांची त्यांच्या पुत्रासहित हत्या करावी लागेल, कृपाचार्य, शल्य, सौमदत्ति, विकर्ण, विवंशति, कर्ण, व दुर्योधन यांची हत्त्या करावी लागेल, त्या कर्मापासून काय सुख उत्पन्न होणार ? मनुष्याच्या भाग्यांत असतें तेंच त्याला मिळणार. जय, मृत्यु, सुखदुःख या गोष्टी केवळ भाग्यानुसारच लाभत असतात. साऱ्या समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य जरी तू मिळविलेंस तरी या गोष्टी तुला टाळतां येणार नाहींत. ज्या गोष्टी तुझ्या भाग्यांतच नाहीत, त्या काय वाटेल तें केलेंस तरी कशा मिळणार ? म्हणून युद्धाच्या पापकर्मास प्रवृत्त होऊं नकोस. जर तुझ्या सल्लागारांच्या अनुरोधानें तू हें कृत्य करावयास प्रवृत्त झाला असशील तर त्यांना तू नीट समजावून सांग व आजवरचें चारित्र्य ध्यानांत घेऊन सद्गतीच्या मार्गापासून स्वतःला भ्रष्ट करून घेऊं नकोस.

युधिष्ठिराचें मनोविज्ञान लक्षांत घेतां धृतराष्ट्रानें हा किती कुशलतेनें डाव टाकला होता! त्याचे परिणाम श्रीकृष्णांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वानें जरी धृतराष्ट्राला हवे होते तसे घडून आले नाहींत तरी ते खोलवर रुजले होते यांत शंका नाहीं.

कणिकानें उपदेशिलेल्या

अग्न्याधानेन यज्ञेन काषायेण जटाजिनैः ।
लोकान्विश्वासयित्वैव ततो लुम्पेद्यथा वृकः ॥१९

—महाभारत, आदिपर्व अध्याय १४०

या तत्त्वाचा संजयशिष्टाईइतका परिपूर्ण आविष्कार अन्यत्र दृष्टीस पडणें दुरापास्त आहे. युधिष्ठिराची विशिष्ट धार्मिक मनोवृत्ति व दयाबुद्धि ध्यानांत घेऊनच धृतराष्ट्रानें हा प्रयोग त्याच्यावर केलेला होता. केवळ भगवान् श्रीकृष्णाच्या उपस्थितीमुळें व प्रभावी विभूतिमत्त्वामुळेंच त्याचा हा डाव यशस्वी होऊं शकला नाहीं ही गोष्ट वेगळी. युधिष्ठिराला धृतराष्ट्राचें हें कपट उलगडलें नाहीं असें नाही. तो श्रीकृष्णांना म्हणतो :—

श्रुतं ते धार्तराष्ट्रस्य सपुत्रस्य चिकीर्षितम् ।
एतद्धि सकलं कृष्ण सञ्जयो मां यदब्रवीत् ॥६
तन्मतं धृतराष्ट्रस्य सोऽस्यात्मा विवृतान्तरः ।
यथोक्तं ब्रूत आचष्टे वध्यः स्यादन्यथा ब्रुवन् ॥ ७
अप्रदानेन राज्यस्य शान्तिमस्मासु मार्गति ।
लुब्धः पापेन मनसा चरन्नसममात्मनः ॥ ८
यत्तद्द्वादशवर्षाणि वनेषु ह्युषिता वयम् ।
छद्मना शरवं चैकां धृतराष्ट्रस्य शासनात् ॥९
स्थाता नः समये तस्मिन् धृतराष्ट्र इति प्रभो ।
नाहास्म समयं कृष्ण तद्धि नो ब्राह्मणा विदुः ॥१०
गृद्धो राजा धृतराष्ट्रः स्वधर्मं नानुपश्यति ।
वश्यत्वात् पुत्रगृद्धित्वान्मन्वस्यान्वेति शासनम् ॥११
सुयोधनमते तिष्ठन् राजाऽस्मासु जनार्दन ।
मिथ्या चरति लुब्धः सन् चरन् हि प्रियमात्मनः ॥१२

— महाभारत उद्योगपर्व अ. ७२

"श्रीकृष्ण! संजयाच्या तोंडून सपुत्र धृतराष्ट्राचे सर्व विचार आपल्याला कळलेच आहेत. हें धृतराष्ट्राचें मत आहे. त्याचें अंतःकरण येथें अगदीं उघड झालेलें आहे. कारण राजनीतिशास्त्राप्रमाणें जसें धन्यानें बोलावयास सांगितले असेल तसेंच दूताला बोलावें लागतें. जर तो वेगळें बोलला तर त्याला ठार मारतात. स्वतःला शोभणार नाहींत असें विचार लोभाविष्ट होऊन पापात्मा धृतराष्ट्र आपल्या अंतःकरणांत वागवीत आहे. राज्य मुळींच न देतां त्याला शांतता हवी आहे, व ती आम्ही राखावी अशी त्याची इच्छा आहे. केवळ धृतराष्ट्राच्या आज्ञेसाठीं आम्ही बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास केला. आम्ही आपलें वचन पाळलें. पण धृतराष्ट्र कांहीं आपलें वचन पाळावयास सिद्ध नाहीं. धृतराष्ट्र लोभी आहे, तो धर्म पाळू इच्छीत नाहीं. त्याचा आपल्या मनावर ताबा नाहीं. पुत्रलोभामुळे मूर्ख दुर्योधनाच्या लहरीनुसार तो वागतो. लोभीपणा, केवळ स्वतःकडेच पाहण्याची वृत्ति या गोष्टींतून त्याचें कपटाचरण जन्म पावलेलें आहे व दुर्योधनाचेंच तेवढें बरें पाहून तो आमचें मात्र अकल्याण करू इच्छीत आहे."

याप्रमाणें युधिष्ठिरानें धृतराष्ट्राची लबाडी पूर्णपणें ओळखली असली तरी त्याच्या मनावर संजयाच्या वाक्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. संजयाच्या वाक्यांचे बाण केवळ युधिष्ठिराच्या सात्त्विक मनावरच काय, पण महारथी अर्जुनाच्याही मनावर परिणाम केल्यावांचून राहिले नाहींत असें श्रीमत् भगवद्गीतेच्या प्रथमाध्यायांतील अर्जुनाच्या विलपनावरूनही दिसतें. तो म्हणतो :

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥ २८
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति । २९
येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥३३
एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किमु महीकृते ॥३५

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाश्रयेदस्मान् हत्वैतानाततायिनः ॥३६
यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥३८
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ॥४५
यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥४६

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय २५

"हे श्रीकृष्णा ! माझे सगळे स्वजनच युद्धार्थ उपस्थित असलेले पाहून माझ्या अंगाला कांपरें भरलें आहे व तोंड कोरडें पडलें आहे. ज्यांच्यासाठीं म्हणून राज्य, भोग व सुख यांची इच्छा करावयाची ते सगळे हे लोक धनाचा व प्राणांचा परित्याग करून आमच्याशी युद्ध करावयास ठाकले आहेत. त्रैलोक्याचें राज्य जरी मिळत असलें तरीही मी यांना मारणार नाही, मग पृथ्वीवरच्या राज्याची कथाच काय ? हे लोक मला मारीत असले तरीही मी त्यांना मारणार नाही. यांना मारून आम्हांला काय आनद मिळणार आहे ? उलट या आततायीना मारल्यामुळे आम्हांला पाप मात्र लागेल. हे लोभाविष्ट झाल्यामुळें मित्रद्रोह व कुलक्षय हें केवढें मोठें पाप आहे याची त्यांना कल्पना नाही. पण आम्हांला ती कल्पना न ठेवून कसें चालेल. केवळ राज्यसुखाच्या लोभानें स्वजनांनाच ठार मारण्याची सिद्धता करण्यांत आम्ही केवढे मोठें पापकृत्य करावयास उद्युक्त झालों होतों. मी हातांत शस्त्र घेणार नाही. प्रतिकार करणार नाही. अशा स्थितींतही या कौरवांनीं मला ठार मारलें तरीही माझी हरकत नाही."

संजय तरी यापेक्षां वेगळें काय सांगत होता ? श्रीकृष्णामुळेंच धृतराष्ट्राचा हा डाव फसल्यानंतर शिष्टाईच्या वेळी पुनश्च श्रीकृष्ण येणार आहेत हें ऐकून लोभानें त्यांना पाण्डवांपासून फोडण्याचा अथवा नाना प्रकारच्या उपायांनीं त्यांना ताब्यांत घेण्याचा धृतराष्ट्रानें प्रयत्न केला. पण श्रीकृष्ण या सर्व गोष्टी ओळखूनच

असल्यामुळें ते कांहीं त्याच्या कोणत्याही प्रलोभनाला बळी पडले नाहींत किंवा त्याच्या कपटजालांत सांपडू शकले नाहींत. त्याच्या उद्‌गारांवरून ही गोष्ट सहसा त्याच्या अमात्यांच्या ध्यानांत येऊं शकली नाही तरी विदुरानें ती गोष्ट अखेरीस ओळखलीच. श्रीकृष्ण येणार आहेत हे ऐकून धृतराष्ट्र म्हणतो :

एकवर्णैः सुकल्पाङ्गैर्बाह्लिजातैर्हयोत्तमैः ।
चतुर्युक्तान् रथांस्तस्मै रौक्मान् दास्यामि षोडश ॥६
नित्य प्रभिन्नान् मातङ्गानीषादन्तान् प्रहारिणः ।
अष्टानुचरमेकैकमष्टौ दास्यामि कौरव ॥७
दासीनामप्रजातानां शुभानां रुक्मवर्चसाम् ।
शतमस्मै प्रदास्यामि दासानामपि तावताम् ॥८
आविकं च सुखस्पर्शं पार्वतीयैरुपाहृतम् ।
तदप्यस्मै प्रदास्यामि सहस्राणि दशाष्ट च ॥९
अजिनानां सहस्राणि चीनदेशोद्‌भवानि च ।
तान्यप्यस्मै प्रदास्यामि यावदर्हति केशवः ॥१०
दिवा रात्रौ च भात्येष सुतेजा विमलो मणिः ।
तमप्यस्मै प्रदास्यामि तमर्हति हि केशवः ॥११
एकेनाभिपतत्यह्ना योजनानि चतुर्दश ।
यानमश्वतरीयुक्तं दास्ये तस्मै तदप्यहम् ॥१२
यावन्ति वाहनान्यस्य यावन्तः पुरुषाश्च ते ।
ततोऽष्टगुणप्यस्मै भोज्यं दास्याम्यहं सदा ॥१३
स्वलंकृताश्च कल्याण्यः पादैरेव सहस्रशः ।
वारमुख्या महाभागं प्रत्युद्यास्यन्ति केशवम् ॥ १५
नगरादपि याः काश्चिद्‌गमिष्यन्ति जनार्दनम् ।
द्रष्टुं कन्याश्च कल्याण्यस्ताश्च यास्यन्त्यनावृताः ॥१६
दुःशासनस्य च गृहं दुर्योधनगृहाद्वरम् ।
तदद्य क्रियतां क्षिप्रं सुसंमृष्टमलंकृतम् ॥१९
सर्वमस्मिन् गृहे रत्नं मम दुर्योधनस्य च ।
यद्यदर्हति वार्ष्णेयस्तत्तद्देयमसंशयम् ॥२१

—महाभारत उद्योगपर्व अ. ८६

"मी कृष्णाला बाह्लिकदेशांत जन्म पावलेले, एकाच रंगाचे, सर्व अलंकार अंगावर घातलेले, असे चार चार घोडे एकेकाला जुंपलेले सुवर्णाचे सोळा रथ देईन. उत्कृष्ट असे आठ हत्ती मी त्याला अर्पण करीन. प्रत्येक हत्तीच्या मागें आठ आठ अनुचर असतील. सोन्याचे अलंकार अगावर घातलेल्या तरुण, प्रसूत न झालेल्या अशा शंभर दासी मी श्रीकृष्णाला देईन. उत्कृष्ट प्रकारचीं हजारों वस्त्रें व चीन देशांत उत्पन्न झालेलीं सहस्रावधि अजिनें मी श्रीकृष्णांना देईन. दिवसरात्र आपल्या तेजानें तळपणारा असा हा माझ्या जवळचा उत्कृष्ट मणि (रत्न) मी कृष्णाला देईन. तोच ही गोष्ट घ्यावयास योग्य आहे. एकाच दिवसांत चौदा योजनें जाऊं शकणाऱ्या अश्वतरींनी युक्त असे वाहन मी श्रीकृष्णाला देईन. त्याच्याबरोबर जितकी माणसें व लोक असतील त्यांना लागणाऱ्या अन्नापेक्षां आठपट अधिक पदार्थ मी त्यांना देईन. उत्कृष्ट अलंकार अंगावर घातलेल्या अतिशय सुदर अशा सहस्रावधि वेश्या श्रीकृष्णांबरोबर राहतील. दुर्योधनापेक्षांही दुःशासनाचा प्रासाद अधिक उत्कृष्ट आहे. तो अधिक अलंकृत व सुशोभित करा व तेथेंच श्रीकृष्णांना उतरवा. माझ्या व दुर्योधनाच्या घरचीं जेवढी रत्नें असतील तेवढीं तेथें नेऊन भरा. श्रीकृष्णाची ज्याच्यावर दृष्टि पडेल व त्याला जें आवडेल तें त्याला खुशाल द्या." त्याच्या या सूचनांत असलेलें कपटजाल विदुरानें ओळखलें व त्याला स्वच्छ शब्दांत असें सांगितलें कीं :—

मायैषा सत्यमेवैतच्छद्मैतद्भूरिदक्षिण ।
जानामि त्वन्मतं राजन् गूढं बाह्यधेन कर्मणा ॥ ८
पञ्च पञ्चैव लिप्स्यन्ति ग्रामकान् पाण्डवा नृप ।
न च दित्ससि तेभ्यस्तांस्तच्छद्मं न करिष्यसि ॥ ९
अर्थेन तु महाबाहुं वार्ष्णेयं त्वं जिहीर्षसि ।
अनेन चाप्युपायेन पाण्डवेभ्यो विभेत्स्यसि ॥ १०
न च वित्तेन शक्योऽसौ नोद्यमेन न गर्हया ।
अन्यो धनञ्जयात् कर्तुमेतत्तत्त्वं ब्रवीमि ते ॥ ११

—महाभारत, उद्योगपर्व अ. ८७

"राजन्, हें सर्व कपट आहे. तुझ्या काळचा अंतःकरणाची मला पूर्ण कल्पना आहे. पाण्डव केवळ पांच गांवें मागतात तीं तू त्यांना देऊं इच्छीत नाहींस व श्रीकृष्णावर मात्र धनाचा वर्षाव करूं इच्छितोस यांतील कपट मला स्पष्ट माहीत आहे. पण या उपायांनी तुला श्रीकृष्णाला जिंकतां येणार नाहीं अथवा पाण्डवांपासून फोडतांही येणार नाहीं. धन, नानाविध उपाय व गर्हणा यांनी अर्जुनापासून श्रीकृष्णाला वेगळें करणें अशक्य आहे." धृतराष्ट्रानें केलेली ही सिद्धता दिसते तितकी साधी नाही. कौटिलीय अर्थशास्त्राच्या कूटप्रयोगांचे नीट निरीक्षण केलें, कणिकनीति डोळ्यासमोर ठेविली व विष देण्यापासून तर जाळून मारण्यापर्यंतच्या सर्व प्रकारच्या दुराचारांचा उपयोग करून स्वतःचा स्वार्थ साधणाऱ्या धृतराष्ट्राचा पूर्वेतिहास लक्षांत घेतला तर त्याच्या या प्रयत्नाचें खरे स्वरूप ध्यानांत येतें. पण श्रीकृष्णांनीं त्याचा हा पट पार उधळून लावला. त्यांनी कौरवांचें भोजन टाळलें, त्याचे सत्कार धिक्कारले. विदुराच्या घरी रात्र काढली. बरोबर लढवय्ये खदे सैनिक घेऊनच ते आले असल्यामुळे व कृतवर्म्यासारखा त्यांचा सामंत लक्षावधि यादव सैनिकांनिशी आधीच हस्तिनापुरांत उपस्थित असल्यामुळें त्यांच्या बाबतीत कोणालाही सामर्थ्याच्या उपयोग करतां येणें शक्य झाले नाही. या गोष्टीचा विशेष विस्तार श्रीकृष्णांच्या व्यक्तिचित्राचे वेळीं करतां येईल. धृतराष्ट्राचें कौटिल्य ध्यानांत येण्याकरितांच वरील उल्लेख येथें केला आहे. युद्ध ही त्याचीच इच्छा होती, व स्वतःच्या सैन्यसागराच्या भरंवशावर आपण युद्ध जिंकू शकूं असा त्याला विश्वास वाटत होता. यासंबंधीं त्याच्या व दुर्योधनाच्या अनुमानांत फारसा फरक नाहीं. म्हणूनच भीष्मद्रोणांनीं युद्धाचे भीषण परिणाम व त्यांत होणारा स्वतःचा विनाश त्याला सांगूनही तो त्यांच्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करी. महभारतांत म्हटलें आहे :—

अनादृत्य तु तद्वाक्यमर्थवद्द्रोणभीष्मयोः ।
ततः स सञ्जयं राजा पर्यपृच्छत पाण्डवान् ॥ ४७
तदैव कुरवः सर्वे निराशा जीवितेऽभवन् ।
भीष्मद्रोणौ यदा राजा न सम्यगनुभाषते ॥ ४८
—महाभारत, उद्योगपर्व अ. ४९

किमसौ पाण्डवो राजा धर्मपुत्रोऽभ्यभाषत ।
श्रुत्वेह बहुलाः सेनाः प्रीत्यर्थं नः समागताः ॥ १
किमसौ चेष्टते सूत योत्स्यमानो युधिष्ठिरः ।
के वाऽस्य भ्रातृपुत्राणां पश्यन्त्याज्ञेप्सवो मुखम् ॥ २
—महाभारत, उद्योगपर्व अ. ५०

भीष्म व द्रोणांचें कल्याणकारक भाषण दुर्लक्षित करून धृतराष्ट्र जेव्हां संजयाकडेच वळून बोलू लागला तेव्हांच कौरवांनीं आपल्या जीविताची आशा सोडली. तो म्हणाला : आमच्या प्रीतीसाठीं येथे जमलेला हा सेनासागर पाहून युद्धाची इच्छा धरणाऱ्या युधिष्ठिराची काय अवस्था झाली आहे तें मला सांग. त्याच्या लोकांपैकी कोण त्याच्या आज्ञेची वाट पाहात आहेत? कोण या सैन्यसागराचा धाक घेऊन युद्धेच्छेपासून त्याचें निवारण करीत आहेत तें मला सांग. धृतराष्ट्राला निव्वळ पुत्रमोह नसून स्वतःचा राज्यलोभही होता हें आपण पाहिलेंच. पण निव्वळ पुत्रमोह जरी म्हटला तरी त्याच्या कुकृत्यांचें समर्थन होऊं शकत नाही. ज्या पुत्रमोहाला कुलस्त्रियांची अब्रू दिसत नाहीं, धर्म दिसत नाहीं, केवळ कापटच कायतें समर्थनीय वाटतें, त्याचें अस्तित्व आर्य राष्ट्राच्या उज्ज्वल परंपरेच्या दृष्टीनें दूषणीय आहे. आर्यावर्तांत धर्माप्रीत्यर्थ पुत्राचा त्याग करणारे लोक झाले. पुत्रलोभांतून मानवराक्षस उत्पन्न होतील तर ते अर्थात् वध्य होत. बापापेक्षां आईला खरें म्हटलें तर हा मोह अधिक असावयास पाहिजे. पण धर्म व कल्याण या दोन्ही दृष्टींनीं दुर्योधनाची आई गान्धारी हिनें धृतराष्ट्राला असें स्पष्ट सांगितलें होतें कीं :—

त्वन्नेत्राः सन्तु ते पुत्रा मा त्वां दीर्णाः प्रहासिषुः ।
तस्मादयं मद्वचनात्त्यज्यतां कुलपांसनः ॥ ८
—महाभारत, सभापर्व अ. ७५

"तुझ्या पुत्रांना तूंच सन्मार्ग दाखविला पाहिजेस. तुझ्यामुळें त्यांचा विनाश न होवो. मी दुर्योधनाची आई आहे तरीही मी तुला सांगतें कीं तूं या कुलांगारांचा माझ्या वचनासाठीं तरी परित्याग कर." गांधारीच्या या उद्‌गारांचा पार्श्वभूमीवर धृतराष्ट्राचें व्यक्ति-

चित्र अधिकच हिणकस दिसू लागतें. त्याच्या या मोहाविष्टते-मुळेंच बहुधा महाभारतकारांनीं त्याला संभवपर्वांत गंधर्वांच्या मोह-मय सृष्टीचा प्रतिनिधि म्हणून म्हटलें असावें. तोच सर्व अनर्थांचें खरें मूळ असल्यामुळें भारताच्या उद्योगपर्वांत भगवान् श्रीकृष्णांनीं 'मूल राजा धृतराष्ट्रोऽमनीषी' असें म्हटलें आहे. श्रीकृष्ण ज्या वेळीं भारतीय युद्धानंतर धृतराष्ट्राच्या सांत्वनास्तव हस्तिनापुरांत गेले, त्यावेळीही त्यांनीं साऱ्या अनर्थाबद्दल धृतराष्ट्रावरच दायित्व टाकलें आहे. ते म्हणतात :

त्वया कालोपसृष्टेन लोभतो नापवर्जिताः ।
तवापराधान्नृपते सर्वं क्षत्रं क्षयं गतम् ॥ ४५

—महाभारत, शल्यपर्व अ. ६३

पाण्डवांच्या प्रथम भेटोच्या वेळी धृतराष्ट्रानें रागानें जेव्हां भीमाची लोखंडी प्रतिमा भीम आहे असें समजून चूर्ण केली त्या वेळीही श्रीकृष्णांनी त्याला पुनश्च तेंच बजावून सांगितलें आहे. ते म्हणतात.:—

आत्मापराधादापन्नस्तांत्कं भीमं जिघांससि ।
तस्मात् संयच्छ कोपं त्वं स्वमनुस्मर दुष्कृतम् ॥ ९

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १३

आपल्या स्वतःच्याच अपराधानें तूच ही परिस्थिति ओढवून आणली असतां भीमाला ठार मारण्याचा प्रयत्न कशासाठीं करीत आहेस ? आपल्या दुष्कृत्यांचें स्मरण करून स्वतःचा क्रोध तूं आव-रला पाहिजेस. तात्पर्य धृतराष्ट्र हाच महाभारतांतील खरा 'खलनायक' असून राज्यसंस्थेच्या अधःपतनाचें चित्र त्याच्या रूपानें महर्षि व्यासानी रेखाटलें आहे. त्याच्याच जोडीला दुर्योध-नाच्या व्यक्तिचित्राचें समालोचन केले म्हणजे या अधःपतनाची खरी कल्पना येते.

दुर्योधन

दुर्योधनाचें वर्णन करतांना महाभारताच्या आदिपर्वाच्या पहिल्याच अध्यायांत "दुर्योधनो मन्युमयो महाद्रुमः।" म्हणजे "दुर्योधन हा अमर्याद क्रोधाचा प्रचंड वृक्षच होय" असें म्हटलें असून भारताच्या उद्योगपर्वांत श्रीकृष्णांच्या त्याच्याविषयीच्या उद्‌गारांतून याच वाक्याचा पुनरुच्चार झालेला आहे. कमालीचा मत्सर, तीव्र क्रोध, अमर्याद पीळ, अलौकिक ताठपणा, व आत्मगौरवाची अथवा प्रभुत्वाची विलक्षण आकांक्षा हे युवराज दुर्योधनाचे विशेष प्रकृतिधर्म होत. राजा दुर्योधन झालेला अपमान कधीही विसरत नसे व त्यामुळें त्याच्या क्रोधाचें पर्यवसान वाटेल त्या भीषण प्रकारांत सहज होई. लहानपणीं राज्याच्या आकांक्षेचा उदय अंतःकरणांत झालेला नसतांना देखील केवळ लहानपणांतील खेळांच्या स्पर्धेवरून भीमाला विषप्रयोग करण्यापर्यंत त्याची मजल गेल्याचें महाभारतांत वर्णन आहे.

भारतकार म्हणतातः—

जवे लक्ष्याभिहरणे भोज्ये पांसुविकर्षणे।
धार्तराष्ट्रान्भीमसेनः सर्वान्स परिमर्दति ॥ १६
एवं स धार्तराष्ट्रांश्च स्पर्धमानो वृकोदरः
अप्रियेऽतिष्ठदत्यन्तं बाल्यान्न द्रोहचेतसा ॥ २४
ततो बलमतिख्यातं धार्तराष्ट्रः प्रतापवान्।
भीमसेनस्य तज्ज्ञात्वा दुष्टभावमदर्शयत् ॥ २५
अयं बलवतां श्रेष्ठः कुन्तीपुत्रो वृकोदरः।
मध्यमः पाण्डुपुत्राणां निकृत्या स निगृह्यताम् ॥ २७
एवं स निश्चयं पापः कृत्वा दुर्योधनस्तदा।
नित्यमेवान्तरप्रेक्षी भीमस्यासीन्महात्मनः ॥ ३०
ततो दुर्योधनः पापस्तद्‌भक्ष्ये कालकूटकम्।
विषं प्रक्षेपयामास भीमसेनजिघांसया ॥ ४५

स्वयमुत्थाय चैवाथ हृदयेन क्षुरोपमः ।
स वाचा मृतकल्पश्च भर्तृवच्च सुहृद्यथा ॥ ४६
स्वयं प्रक्षिपते भक्ष्यं बहु भीमस्य पापकृत् ।
प्रतीक्षितं स्म भीमेन तं वै दोषमजानता ॥ ४७
प्रमाणकोटचां वासार्थी सुप्त्वापावाप्य तत्स्थलम् ॥ ५२
शीतं वातं समासाद्य श्रान्तो मदविमोहितः ।
विषेण च परीताङ्गो निश्चेष्टः पाण्डुनन्दनः ॥ ५३
ततो बध्वा लतापाशैर्भीमं दुर्योधनः स्वयम् ।
मृतकल्पं तदा वीरं स्थलाज्जलमपातयत् ॥ ५४

—महाभारत, आदिपर्व अ. १२८

"वेग, वृक्षविहरण, भोज्य, धूळ उडविणें इत्यादि सर्व गोष्टींत एकटा भीमसेन धृतराष्ट्राच्या सर्व मुलांची खोडकी जिरवीत असे. त्यामुळें स्पर्धेनें भीम धृतराष्ट्राच्या सर्व मुलांना अत्यंत अप्रिय झाला. अर्थात् त्यांत लहानपणच्या बालिशतेवांचून दुसरें कांहीं नव्हतें. भीमाचें तें विख्यात बळ पाहून स्पर्धा करणाऱ्या दुर्योधनानें त्याच्याविषयी आपल्या अंतःकरणात दश धरला व कपटाने त्याचा सूड घ्यावयाचें ठरविले. भीम आपल्या तावडीत कसा सांपडेल हेंच पहाण्याचा तो प्रयत्न करूं लागला. लहानपणाच्या खेळांतील अपमानानें चिडून जाऊन व भीमाच्या सामर्थ्यासमोर आपलें कांहीं चालत नाही हें पाहून त्यानें त्याला ठार मारण्याचा निश्चय केला. भीमाच्या अन्नांत त्यानें विष मिसळविलें व तें त्याला भरपूर खावयास घातले. त्याचें अंतःकरण जरी वस्तऱ्याप्रमाणें अत्यंत तीक्ष्ण होतें तरीही त्याच्या वाणींत त्या तीक्ष्णतेचा मुळींच अंश नसल्यामुळें भीमाला त्याचा संशय आला नाहीं. विषाचा प्रभाव भीमावर पडून तेथीलच एका जागीं भीम जाऊन झोंपला. तो खेळून दमला होता त्यांतच थंड वारा शरीराला झोंबू लागल्यामुळें त्याला झोंप आली. व त्याच वेळीं विषाचाही प्रभाव दिसूं लागून त्याच्या हालचाली अगदीं बंद होऊन गेल्या. एखाद्या मृताप्रमाणें तो निश्चेष्ट पडला आहे असें पाहून स्वतः दुर्योधनानें त्याला लतापाशांनीं बांधलें व जमिनीवरून पाण्यांत फेकून दिलें." लहानपणच्या खेळांत जो गृहस्थ

साध्या अपमानाबद्दल दुसऱ्याना ठार मारावयास उद्युक्त होतो, तो मोठेंपणी योजनाबद्ध अवस्थेंत त्याच क्रोधामुळे केवढा सूड घेऊं पहात असेल व खुनशी स्वभाव व्यक्त करीत असेल हें सांगावयास नकोच. पाण्डवांना द्यूतांत हरून त्यांची संपत्ति गिळंकृत केल्यानंतर त्यांची एकवस्त्रा व रजस्वला पत्नी द्रौपदी तिची विटबना करावयास तो कां धजला असेल ? मर्यादातीत क्रोधाचा व दश घेऊन सूड घेण्याचा त्याचा हा स्थायीभावच पांडव व द्रौपदी यांची माणुसकीविरहित अप्रतिष्ठा करावयास कारणीभूत झाला. पाण्डवांच्या राजसूय यज्ञांत तो उपस्थित असतां मयसभेत त्याची जी फजिती झाली तिचा त्यानें घेतलेला सूड म्हणजेच सभापर्वातील पांडवांच्या अप्रतिष्ठेचें गर्ह्य प्रकरण होय. मयसभेत त्याच्या अनभिज्ञतेला लोक जे सहज हसले तें त्याच्या अंतःकरणांत किती खोलवर रुजून बसलें होतें याचें त्यानें स्वतःच पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे :—

कृतां बिन्दुसरोरत्नैर्मयेन स्फटिकच्छदाम ।
अपश्यं नलिनीं पूर्णामुदकस्येव भारत ॥ २५
वस्त्रमुत्कर्षति मयि प्राहसत्स वृकोदरः ।
शत्रोर्ऋद्धिविशेषेण विमूढं रत्नवर्जितम् ॥ २६
तत्र स्म यदि शक्तः स्यां पातयेहं वृकोदरम् ।
यदि कुर्यां समारम्भं भीमं हन्तुं नराधिप ॥ २७
शिशुपाल इवास्माकं गतिः स्यान्नात्र संशयः ।
सपत्नेनावहासो मे स मां दहति भारत ॥ २८
पुनश्च तादृशीमेव वापीं जलजशालिनीम् ।
मत्वा शिलासमां तोये पतितोऽस्मि नराधिप ॥ २९
तत्र मां प्राहसत्कृष्णः पार्थेन सह सुस्वरम् ।
द्रौपदी च सह स्त्रीभिर्व्यथयन्ती मनो मम ॥ ३०
विलम्बवस्त्रस्य तु जले किंकरा राजनोदिताः ।
ददुर्बासांसि मेऽन्यानि तच्च दुःखं परं मम ॥ ३१
प्रलम्भं च शृणुष्वान्यद् वदतो मे नराधिप ।
अद्वारेण विनिर्गच्छन्द्वारसंस्थानरूपिणा ।
अभिहत्य शिलां भूयो ललाटे नास्मि विक्षतः ॥ ३२

तत्र मां यमजौ दूराद्वालोक्याभिहतं तदा ।
बाहुभिः परिगृह्णीतां शोचन्तौ सहितावुभौ ।। ३३
उवाच सहदेवस्तु तत्र मां विस्मयन्निव ।
इदं द्वारमितो गच्छ राजन्निति पुनः पुनः ।। ३४

——महाभारत, सभापर्व अध्याय ५०

"त्या ठिकाणी मयासुरानें बिंदुसरोवरावरील रत्नांनीं निर्माण केलेली व स्फटिकाचा भरपूर उपयोग करण्यांत आलेली अशा प्रकारची एक जागा होती. मला ती पाण्यानें कांठोकांठ भरलेली पुष्करिणी आहे असेंच वाटलें. मी आधीच शत्रूची विशेष प्रकारची समृद्धि पाहून भान हरपलो होतों. अशा स्थितींत वस्त्रे भिजू नयेत म्हणून मी माझीं वस्त्रें सांवरून चालू लागलों तेव्हां भीम माझ्याकडे पाहून जोरानें हसला. जर माझ्यांत सामर्थ्य असतें तर मीं भीमाला ठार मारलें असतें. पण जर मी तसें केलें असतें तर शिशुपालासारखीच माझीही गति झाली असती यांत मला संशय नाही. सपत्नांनी हा जो माझा उपहास केला तो माझें अंतःकरण जाळीत आहे. त्यानंतर त्या सभेंत एक कमलें प्रफुल्लित झालेली जलाशयाचीं जागा होती. मला तेथें पाण्याऐवजीं भूमीच आहे असें वाटलें. व मी त्या पाण्यांत पडलों. तें पाहून अर्जुनासहित श्रीकृष्ण तर जोरजोरानें हसलेच, पण जमलेल्या सर्व स्त्रियांसहित द्रौपदीही हसली. त्याची माझ्या अंतःकरणांत जखम झालेली आहे. माझीं वस्त्रे भिजलीं होतीं. राजानें सांगितल्यावरून सेवकांनी मला दुसरी वस्त्रें आणून दिलीं. त्यामुळें माझें दुःख अधिकच भडकलें. दुःखानें व संतापानें मी त्या सभेच्या बाहेर जाऊं लागलों. समोर होती भित. मला वाटलें दार आहे. म्हणून मी वेगानें तेथून जाऊं लागलों असतां माझें कपाळ त्या भितीवर आपटलें. नकुल–सहदेवांनीं दुरून माझी ती अवस्था पाहिली व खेद करीत आपल्या बाहूंनी त्यांनीं मला सांवरून धरलें. सहदेवानें मला विस्मयचकित होऊन, हें दार आहे येथून जा असें वारंवार म्हटलें. भीमानें तर हे धृतराष्ट्रात्मजा, 'नीट दारानें बाहेर जा' असें म्हणून मला दार दाखविलें." वास्तविक दुर्योधन ज्या मंडळींत मयसभेंत होता ती सर्व नात्यानें त्याच्या

बरोबरीची, व योग्यतेनें त्याच्याहून अणुमात्रही हीन नसलेली अशीच मंडळी होती. अशा मंडळीत नको तेथे जर अज्ञानत: कोणाची फजिती झाली तर हास्यविनोद नेहमीच चालतो. तो कोणी मनाला लावून घेत नाही. द्रौपदी ही दुर्योधनाची भावजय तर भगवान् श्रीकृष्ण हे एका अर्थानें त्याचे मेव्हणे होते. त्यानेंच आपल्या वेंधळेंपणानें लोकांनीं आपणांला हसावें असा प्रसंग उत्पन्न केल्यानंतर जीं माणसें नात्यानेंच त्याची थट्टा करूं शकत होती ती हसली असलीं व त्याच्या बरोबरीच्या लोकांनी त्याची थट्टा केली असली तर त्यांत दंश धरून सूड घेण्यासारखें काय आहे ? पण जाणून बुजून लहानपणापासूनच साध्या खेळांतील अपमानाचादेखील जीवघेऊ सूड घेईपर्यंत ज्याचा नैसर्गिक स्वभाव अमर्याद क्रोधाचाच आहे त्या व्यक्तीनें प्रौढपणी स्वत:चे शत्रु म्हणून ठरविलेल्या व त्यांच्या विनाशाचीं स्वप्नें सतत पहात बसलेल्या अवस्थेंत त्यांच्या साध्या थट्टेचा विपर्यास करणे व ते आपल्या हाती येताच सगळ्या प्रकारचीं धर्मबंधनें विसरून त्यांच्या घोर विडंबनास प्रवृत्त होणें ही गोष्ट आश्चर्याची नाहीं. त्याने पाण्डवांचा दंश धरून व त्यांचा पक्षपात करणाऱ्या विदुराचाही दंश धरून द्रौपदी जिकली जातांच द्यूताच्या शेवटी मयसभेंत ती हसल्याबद्दल तिला प्रायश्चित्त देण्यासाठीं भरसभेंत तिला दासी म्हणून घेऊन येण्याची आज्ञा केली. तो म्हणतो :

एहि क्षत्त द्रौपदीमानयस्व प्रियां भार्यां संमतां पाण्डवानाम् ।
संमार्जतां वेश्म परंतु शीघ्रं तत्रास्तु दासीभिरपुण्यशीला ॥ १

—महाभारत, सभापर्व अध्याय ६६

"हे विदुरा ! पाण्डवांची प्रिय भार्या जी द्रौपदी तिला येथें घेऊन ये. तिनें येथें शीघ्र येऊन अन्यदासींसहित झाडलोटीचीं कामें केली पाहिजेत. तिला शील कसलें आलें आहे?" विदुर जाईना तेव्हां त्यानें दु:शासनालाच अशी आज्ञा दिली की, तूच जाऊन द्रौपदीला बलात्कारानें येथें घेऊन ये. तो म्हणतो :—

दु:शासनैष मम सूतपुत्रो वृकोदराद्बिभेतेऽल्पचेता: ।
स्वयं प्रगृह्यानय याज्ञसेनीं किं ते करिष्यन्त्यवशा: सपत्ना ॥ २५

—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

"दुःशासना! हा मूर्ख सूत भीमाला भीत आहे. तूंच जाऊन द्रौपदीला बलात्कारानें येथें घेऊन ये. हे आपले जिंकलेले दास झाले आहेत. अवश झालेले हे शत्रु आता आपल्याला काय करणार?" कर्णाने द्रौपदीचा केलेला उपहास पाहून त्यानें त्यांत आनंद मानला. तिच्या केसांना हिसडे देऊन दुःशासन तिची अप्रतिष्ठा करीत असतां आपल्या अपमानाचा सूड घेतल्याचें समाधान त्याला लाभत होतें. इतकेंच नव्हे तर जी आपल्याला आपल्या फजितीबद्दल हंसली त्या द्रौपदीला दासीपेक्षांही अधिक छळून एखाद्या शीलभ्रष्ट भोगदासीपेक्षां आपण तिला अधिक महत्त्व देत नाहीं याचें प्रदर्शन करण्यासाठीं भरसभेंत वस्त्र वर करून तिला आपली डावी मांडी उघडी करून दाखवावयासही त्याला लाज वाटली नाही. महाभारतांत म्हटलें आहे :—

भीमसेनवचः श्रुत्वा राजा दुर्योधनस्तदा ।
युधिष्ठिरमुवाचेदं तूष्णीं भूतमचेतनम् ॥ ८
भीमार्जुनौ यमौ चैव स्थितौ ते नृपशासने ।
प्रश्नं ब्रूहि च कृष्णां त्वमजितां यदि मन्यसे ॥ ९
एवमुक्त्वा तु कौन्तेयमपोह्य वसनं स्वकम् ।
स्मयन्निवेक्ष्य पाञ्चालीमैश्वर्यमदमोहितः ॥ १०
कदलीदण्डसदृशं सर्वलक्षणसंयुतम् ।
गजहस्तप्रतीकाशं वज्रप्रतिमगौरवम् ॥ ११
अभ्युत्स्मयित्वा राधेयं भीममाधर्षयन्निव ।
द्रौपद्याः प्रेक्षमाणायाः सव्यमूरुमदर्शयत् ॥ १२

—महाभारत, सभापर्व अध्याय ७१

"भीमसेनाचीं भाषणें ऐकून अचेतनपणे स्वस्थ बसलेल्या राजा युधिष्ठिराला उद्देशून दुर्योधन म्हणालाः 'भीमसेन, अर्जुन, नकुल व सहदेव हे तुझ्या आज्ञेंत आहेत. द्रौपदी जित नाही काय? जर ती जित नाही असें तू समजत असशील तर तसें उत्तर दे.' असें युधिष्ठिराशी बोलून ऐश्वर्याच्या मदाच्या धुंदीत येऊन त्यानें आपलें वस्त्र वर केलें व केळीच्या खांबासारखी सर्व लक्षणांनीं युक्त, हत्तीच्या सोंडेप्रमाणें पुष्ट व वज्राप्रमाणें कठीण अशी आपली डावी मांडी

भीमाची धर्षणा करीत व कर्णाला उत्तेजन देत द्रौपदीला दाखविली." साध्या उपहासाच्या सुडाची मर्यादा तो या अवस्थेपर्यंत नेऊं शकत होता. यावरून त्याचा क्रोधी व दंश ठेवणारा स्वभाव चांगलाच व्यक्त होतो. या विकारांत सांपडल्यावर साध्या माणुसकीच्या मर्यादाही विसरून त्यानें पशूनाही लाज आणणारे वर्तन केलें आहे. सामान्य व्यक्तीनें अपराध केला तर तिला जो दंड देण्यांत येईल तोच अपराध जर राजसिंहासनावरील व्यक्तीच्या हातून घडला तर तिला सामान्य व्यक्तीहून सहस्रपट अधिक दंड केला पाहिजे असें आर्यांचें दण्डविधान सांगतें हें आपण मागे पाहिलेंच आहे. दुर्योधनानें केलेला हा अपराध सामान्य माणसाचे बाबतींत देखील वधदंड देण्याच्या योग्यतेचा आहे. मग तो दुर्योधनासारख्या राजपुरुषांनी केल्यास आर्यांच्या दडविधानशास्त्राच्या दृष्टीनें किती भयानक स्वरूपाचा असेल हें सांगावयास नकोच. त्याच्या क्रोधाचें हें भीषण स्वरूप पाहिल्यावर "मन्युमय महाद्रुम" हे महाभारतकारांनीं त्याला लावलेलें विशेषण किती यथार्थ होतें याची खात्री पटते.

मत्सराची प्रत्यक्ष मूर्ति

क्रोधाप्रमाणेंच दुर्योधन हा मत्सराची केवळ मूर्ति होता. दुसऱ्यांचें ऐश्वर्य पाहून तें त्याला हवेसें तर वाटेच पण कोणत्याही उपायानें तें मिळविण्याची शक्यता नसली तर त्याचें जीवित त्याला अशक्य होऊन जाई. राज्याचे दोन विभाग केल्यानंतर वास्तविक त्याचा अधिकार असो वा नसो पण त्याच्या इच्छेप्रमाणें वेगळें राज्य त्याला स्वतःला मिळून कुरुपाण्डवांच्या भांडणाचा प्रसंग संपला होता. पण स्वतःच्या व साहाय्यकांच्या कर्तृत्वावर युधिष्ठिरानें केलेला आपल्या राज्याचा विस्तार, मिळविलेलें साम्राज्य व वाढविलेलें अपार वैभव पाहून मत्सराग्नीनें त्याच्या अंतःकरणांत पेट घेतला. तो इतका कीं जर कोणत्याही उपायानें पाण्डवांचें तें ऐश्वर्य त्याला न मिळालें तर जिवंत राहणें देखील त्याला अशक्य होऊन बसलें. शकुनीला तो म्हणतो :—

श्रियं तथागतां दृष्ट्वा ज्वलंतीमिव पाण्डवे ।
अमर्षवशमापन्नो दहयामि न तथोचितः ॥ २९
एवं स निश्चयं कृत्वा ततो वचनमब्रवीत् ।
पुनर्गान्धारनृपतिं दहयमान इवाग्निना ॥ ३०
वह्निमेव प्रवेक्ष्यामि भक्षयिष्यामि वा विषं ।
अपो वापि प्रवेक्ष्यामि नहि शक्ष्यामि जीवितुम् ॥ ३१
—महाभारत, सभापर्व अध्याय ४७

पाण्डवांची देदीप्यमान संपत्ति पाहून माझें अंतःकरण जळून गेलें आहे. अशा स्थितींत मी जगू शकत नाहीं. अग्नींत जळून जावें, पाण्यांत उडी घेऊन जीव द्यावा, अथवा विष भक्षण करावें पण जगूं नये असें मला वाटू लागलें आहे. मी तसें केल्यावांचून राहणार नाहीं. पुन्हां राजा धृतराष्ट्राजवळ पांण्डवांच्या ऐश्वर्याचें वर्णन करून तो हीच गोष्ट स्पष्टपणें सांगतो.

अश्नाम्याच्छादयामीति प्रपश्यन्पापपूरुषः ।
नेत्यार्यं कुरुते यस्तु पुरुष. सोधमः स्मृतः ॥ १७
न त्वां प्रीणाति राजेन्द्र लक्ष्मीः साधारणी विभो ।
ज्वलितामेव कौन्तेये श्रियं दृष्ट्वा च विव्यथे ॥ १८
सर्वां च पृथिवीं चैव युधिष्ठिरवशानुगाम् ।
स्थिरोस्मि योहं जीवामि दुःखादेतद् ब्रवीमि ते ॥ १९
—महाभारत, सभापर्व अध्याय ५०

"मी खातों, पितों, व एखाद्या अधम पुरुषाप्रमाणें सर्व व्यवहार करतों. पण जो मनुष्य दुसऱ्याच्या संपत्तीचा हेवा करीत नाहीं व त्यामुळें आपण सपत्तिमान् व्हावें असें ज्याला वाटत नाहीं तो केवळ अधम होय. हे राजेंद्र धृतराष्ट्रा! स्वाधीन असलेल्या सामान्य राज्यलक्ष्मीनें माझें आतां समाधान होत नाहीं. पांडवांची देदीप्यमान संपत्ति मी पाहिली आहे व त्यामुळेंच माझ्या अंतःकरणांत वेदना होत आहेत. युधिष्ठिराच्या ताब्यांत सर्व पृथ्वी आली तरीही मी जिवंत रहावें याचेंच मला अत्यंत दुःख होत आहे." त्याच्या मर्यादातीत अमर्षाचें व त्याच स्थितींत अपमानित झाला तर अतिशय संतापानें जीव देण्याच्या प्रवृत्तीचें अत्यंत मोठें प्रत्यंतर घोष-

यात्रेच्या प्रसंगीं घडलें आहे. पांडव द्वैतवनांत राहात असतां आपलें ऐश्वर्य दाखवून त्यांचा अपमान व उपहास करावा या बुद्धीनें दुर्योधन आपल्या सर्व सेनेसह व ऐश्वर्यासह घोषयात्रेच्या निमित्तानें तेथें गेला. पण नियतीच्या प्रभावानें त्यानें पांडवांचा उपहास करण्याऐवजी पाडवांनी त्याचा उपहास करावा अशी परिस्थिति उत्पन्न झाली. चित्रसेन गंधर्वानें त्याचा पराभव केला, त्याचे सहकारी त्याला सोडून निघून गेले व शेवटी गंधर्वानी त्याला जिकून जिवतपणें स्वर्गयात्रा घडवावयाचा प्रसग आणल्यावर युधिष्ठिराच्या आज्ञेवरून पांडवांनीच त्याची सुटका केली. ज्यांचा आपण उपहास करावयास गेलों त्यांनीच आपणास शेवटी जीवदान दिले या कल्पनेचेंच त्याला इतके दु.ख झाले की त्याला जिवंतच राहावेसें वाटेना. तो कर्णाला म्हणू लागला ——

स्त्रीसमक्षमहं दीनो बद्धः शत्रुवशं गतः ॥ ६
युधिष्ठिरस्योपहृतः किं नु दुःखमतःपरम् ।
ये मे निराकृता नित्यं रिपुर्येषामहं सदा ॥ ७
तैर्मोक्षितोऽह दुर्बुद्धिर्दत्तं तैरेव जीवितम् ।
प्राप्त. स्यां यद्यहं वीरवधं तस्मिन् महारणे ॥
श्रेयस्तद्भविता महद्यं नैवंभूतस्य जीवितम् ।
अभूद्यशः पृथिव्यां मे स्यातं गन्धर्वतो वधात् ॥ ९
प्राप्ताश्च पुण्यलोकाः स्युर्मर्हेन्द्रसदनेऽक्षयाः ।
यत्त्वद्य मे व्यवसितं तच्छृणुध्वं नरर्षभाः ॥ १०
इह प्रायमुपासिष्ये यूयं व्रजत वै गृहान् ।
भ्रातरश्चैव मे सर्वे यान्त्वद्य स्वपुरं प्रति ॥ ११
कर्णप्रभृतयश्चैव सुहृदो बान्धवाश्च ये ।
दुःशासनं पुरस्कृत्य प्रयान्त्वद्य पुरं प्रति ॥ १२
न हयहं सम्प्रयास्यामि पुरं शत्रुनिराकृतः ।
शत्रुमानापहो भूत्वा सुहृदां मानकृत् तथा ॥ १३
स सुहृच्छोकदो जातः शत्रूणां हर्षवर्धनः ॥ १४
अहो नार्हमिदं कर्म कष्टं दुश्चरितं कृतम् ।
स्वयं दुर्बुद्धिना मोहाद्येन प्राप्तोऽस्मि संशयम् ॥ १९

तस्मात् प्रायमुपासिष्ये न हि शक्ष्यामि जीवितुम् ।
चेतयानो हि को जीवेत् कृच्छ्राच्छत्रुभिरुद्धृतः ॥ २०
शत्रुभिश्चावहसितो मानी पौरुषवर्जितः ।
पाण्डवैर्विक्रमाढ्यैश्च सावमानमवेक्षितः ॥ २१

वैशम्पायन उवाच ।

एवं चिन्तापरिगतो दुःशासनमथाब्रवीत् ।
दु.शासन निबोधेदं वचनं मम भारत ॥ २२
प्रतीच्छ त्वं मया दत्तमभिषेकं नृपो भव ।
प्रशाधि पृथिवीं स्फीतां कर्णसौबलपालिताम् ॥ २३

—महाभारत, वनपर्व अध्याय २४९

"स्त्रियांच्या समक्ष मी दीन होऊन शत्रूच्या तावडीत सांपडलों. त्यांनीं मला बांधलें. युधिष्ठिराच्या लोकानी मला सोडवून त्याच्या स्वाधीन केलें. याच्या इतके दु खप्रद दुसरे काही असेल काय ! मी पूर्वी जिंकलेले जे माझे शत्रु व मी ज्याचा नेहमींचाच शत्रु त्यानी माझी सुटका करावी व त्यांनीच मला जीवदान द्यावें, याच्या-इतकी दु खाची दुसरी कोणती गोष्ट आहे? यापेक्षा गंधर्वाशी झालेल्या युद्धांत माझा वध झाला असता तरी मला अधिक बरें वाटले असतें. रणांत शत्रूशी संग्राम करीत मी वध पावल्यानें शूर म्हणून माझी कीर्ति झाली असती व पुण्यवंताना मिळतात ते लोक मला मिळाले असते. आतां मला हे अपमानित तोंड घेऊन हस्तिनापुरांत जाण्याची इच्छा नाहीं. मी येथेंच प्रायोपवेशन करून मरावयाचें ठरविलें आहे. कर्णप्रभृति माझे सुहृद व बंधुजन यांनीं दु.शासनाला पुढें घालून परत जावें. शत्रूचा अपमान व मित्राचा सन्मान करणारा मी आज शत्रूकडून अपमानित झालेल्या अवस्थेंत कधींही हस्तिना-पुरांत येणार नाही. आज माझी अवस्था मित्रांना शोककारक व शत्रूना हर्षप्रद झालेली आहे. स्वतःच्याच दुर्बुद्धीमुळें मोहांत सांपडून अपमानित अवस्था मी प्राप्त करून घेतली आहे. शत्रूनीं ज्याला जीवदान दिलें असा मी जिवंत कसा राहणार ? प्रायोपवेशन करून मी जीविताचा अंत करावयाचें निश्चित केलें आहे. मी अत्यंत मानी असतांना आज पराक्रमहीन ठरलों. शत्रूकडून अपमानित झालों.

आपल्या अमोघ पराक्रमाच्या जाणिवेनें पाण्डवांनी तुच्छबुद्धीनें माझ्याकडे पाहिले. शत्रूकडून ज्याची ही अवस्था झाली असा कोणता तेजस्वी पुरुष जिवंत रहाण्याची इच्छा करील ? पुढे चितेंत निमग्न होऊन दुर्योधन दुःशासनाला म्हणाला कीं, मी तुला हें राज्य देतों. स्वत:ला अभिषेक करून घेऊन तू कौरवांचा राजा हो व कर्णशकुनीनी पाळिलेल्या या राज्याचें संरक्षण कर." तात्पर्य अमर्यादि क्रोध व अमर्यादि अमर्ष हे दुर्योधनाचे स्थायीभाव होते.

अलीकडे पतितपरावर्तनाची व पतितोद्धाराची एक वाङ्मयीन चळवळ निघालेली आहे. इतिहासाच्या ओघांत जे जे पतित म्हणून ठरतात अथवा ठरले आहेत ते ते सर्व अत्यंत थोर पुरुष होते, व जे पुण्यश्लोक म्हणून ठरले तेच त्यांच्यापेक्षां हीन होते हें दाखविण्याचा त्या चळवळीचा हेतु आहे. त्याचें एक प्रात्यक्षिक नारायणराव पेशवे याचा खून की आत्महत्या ? या प्रचंड भारुडाच्या रूपाने विचक्षण महाराष्ट्रीयांच्या प्रत्ययास आलेंच आहे. पतितपरावर्तनाच्या व पतितोद्धाराच्या या चळवळीने सम्राट दुर्योधनालाही हात दिलेला आहे. त्या दृष्टीने दुर्योधनाच्या स्वभावविशेषांतील क्रोध व अमर्ष या दोन गोष्टी ध्यानांत धरून ज्या कांहीं चांगल्या वा वाईट गोष्टी दृष्टोत्पत्तीस येतात त्यांचें निरीक्षण करणें बोधप्रद ठरेल. तसेंच त्याची स्वत:चीही या बाबतीत एक विचारसरणी आहे, तीही त्याचें व्यक्तिचित्र समजण्याच्या दृष्टीनें ध्यानांत घेणे अवश्य आहे. वास्तविक राजा धृतराष्ट्र हा अंध असल्यामुळें तत्कालीन नियमानुसार त्याचा राज्यावरील अधिकार संपला होता, तथापि बाप अंधळा असल्यामुळें त्याचा राज्याधिकार नष्ट झाला तरी आपण सर्व दृष्टीनी योग्य असतां आपल्याला राज्य कां मिळू नये असें दुर्योधनाला वाटत होतें. व जर पाण्डूचें राज्य म्हणून त्याचा जेष्ठ पुत्र युधिष्ठिर याला राज्य प्राप्त झाले तर तें पुढें त्याच्या मुलाला प्राप्त होईल, आपण कधीच राजे होणार नाहीं अशी त्याला भीति वाटत होती. हीच त्याची विचारसरणी होती. त्याच्या बाजूचें हें समर्थन त्याच्याच तोंडून महर्षि व्यासांनी आदिपर्वांत वदविलें आहे.

श्रुता मे जल्पतां तात पौराणामशिवा गिरः ।
त्वामनादृत्य भीष्मं च पतिमिच्छन्ति पाण्डवम् ॥ ३२
मतमेतच्च भीष्मस्य न स राज्यं बुभुक्षति ।
अस्माकं तु परां पीडां चिकीर्षन्ति पुरे जनाः ॥ ३३
पितृत. प्राप्तवान्राज्य पाण्डुरात्मगुणैः पुरा ।
त्वमन्धगुणसंयोगात्प्राप्तं राज्यं न लब्धवान् ॥ ३४
स एष पाण्डोर्दायाद्य यदि प्राप्नोति पाण्डव. ।
तस्य पुत्रो ध्रुवं प्राप्तस्तस्य तस्यापि चापरः ॥ ३५
ते वयं राजवंशेन हीना. सह सुतैरपि ।
अवज्ञाता भविष्यामो लोकस्य जगतीपते ॥ ३६
सततं निरयं प्राप्ताः परपिण्डोपजीविनः ।
न भवेम यथा राजंस्तथा नीतिर्विधीयताम् ॥ ३७
यदि त्वं हि पुरा राजन्निदं राज्यमवाप्तवान् ।
ध्रुवं प्राप्स्याम च वयं राज्यमप्यवशे जने ॥ ३८

—महाभारत आदिपर्व अध्याय १४१

दुर्योधन धृतराष्ट्राला म्हणतो. "प्रजाजनाच्या तोंडून मी पुष्कळ आपल्याला अमंगलकारक अशा गोष्टी ऐकल्या. आपला व भीष्माचा अनादर करून पाण्डव राजा व्हावा अशी ते इच्छा करीत आहेत. भीष्म त्यांच्या दृढनिश्चयानुसार कधीच राज्य घेणार नाहीत. आम्हांला मात्र संकटांत टाकण्याची प्रजाजनाची इच्छा आहे. स्वत:च्या गुणांनी पाण्डूनें या राज्याचे स्वामित्व मिळविले व आपण अंध असल्यामुळे तें आपल्याला मिळाले नाही. जर हे राज्य पाण्डूचे म्हणून युधिष्ठिराला मिळाले तर त्याच्यानंतर ते त्याच्या मुलाला मिळणार व त्यानंतर तेही त्याच्याच मुलाला मिळून युधिष्ठिराचा वंश हाच राज्याचा स्वामी होऊन बसणार ही गोष्ट निश्चित आहे. याचा अर्थ आमचा कांहीं एक अपराध नसताना आम्ही आमच्या पुत्रपौत्रांसहित राज्याला आंचवलों ही गोष्ट उघड आहे. याप्रमाणे एकदां आम्ही राज्याला सदांचे आंचवलों म्हणजे लोकांच्या दृष्टीने आम्ही सदाचे हीन ठरलों. दुसऱ्यानें दिलेल्या पिण्डावर उपजीविका करणें हाच मग आमचा जीवनाचा मार्ग व नरक हीच आमची गति.

आमची अशी अवस्था होणार नाही अशा नीतीचा अवलंब करणें हेंच आपलें कर्तव्य आहे. जर पूर्वी हें राज्य आपणांस मिळालें असतें तर तें आम्हांलाही नि संशय मिळालें असतें."

दुर्योधनाचें हें म्हणणें तत्कालीन सामाजिक दंडविधानांत बसण्यासारखें नाही. समाजाच्या कल्याणार्थ निर्माण झालेलें राज्ययंत्र काही विशेष नियमानुसारच चालतें. त्या नियमांचा परिणाम अधिकांत अधिक लोकांना सुख लाभण्यात होतो की नाही एवढेच पाहिलें पाहिजे. कारण दुर्योधनाचेंच तर्कशास्त्र पुढें चालवावयाचें म्हटले तर फारच अनर्थ उत्पन्न होतो. राजाच्या जेष्ठ पुत्राला राज्य मिळावयाचें हा नियम लक्षांत घेतला तर कोणत्याही कारणास्तव कां असेना धृतराष्ट्र हा राजा नाही ही गोष्ट निश्चित ठरल्यावर व या बाबतीतला निर्णय पांडूला राज्य मिळून कसलाही वाद वा संघर्ष न होता प्रत्यक्ष कार्यवाहीत आल्यानंतर जो राजाच नाही त्याच्या मुलाला राज्य मिळण्याचें कारण काय? बापाच्या अपराधासाठी मी दण्ड का भोगावा? हे तर्कशास्त्र येथे लागू पडू शकत नाही. एरवी भीम व अर्जुनदेखील सहजच असें म्हणू शकतात की आम्ही आमच्या पराक्रमावर जर हें राज्य मिळविलें व त्याचा विस्तार केला तर तेंच आम्हांला कां मिळू नये? युधिष्ठिराऐवजीं आम्हीच राज्यावर कां बसू नये? आम्ही मागाहून जन्माला आलो हा काही आमचा अपराध नव्हे व युधिष्ठिर हा आधीं जन्माला आला ही कांही मोठी कर्तृत्वाची गोष्ट नव्हे. निसर्गानें एक आधी जन्माला आला नि दुसरा मागाहून इतकेंच. या तर्कशास्त्रालाही कांही उत्तर नाही. तरीपण कुळांत भांडणे उत्पन्न होऊन ती चव्हाट्यावर येऊं नयेत व संघर्षाच्या बीजाचें सदांचें समारोपण होऊ नये म्हणून द्रौपदी स्वयंवरानंतर पाण्डव प्रकट झाल्यावर अर्धे राज्य युधिष्ठिराला व अर्धे दुर्योधनाला देऊन राज्याची फाळणी करण्यांत आली होती. कोणत्याही कारणास्तव असो, दुर्योधनाला एकदां स्वतंत्र राज्य मिळाल्यावर त्यानें तें संतोषानें चालवावयास हवें होतें. अथवा कर्तृत्वाने वाढवावयास हवें होतें. पण तसें काहीएक न करता त्यानें पाण्डवांनी स्वकर्तृत्वानें वाढविलेलेंही राज्य

पदरांत पाडून घेण्यासाठीं परस्वापहरणाची नीच बुद्धि ठेवून द्यूतासारख्या वाम मार्गाची कांस धरली व त्यासाठी सारे सूक्तासूक्त विचार सोडले हें लक्षांत घेतलें म्हणजे विचारांत घेण्यासारखी कोणतीही बाजू त्याला नाही हें स्पष्ट होतें. एकतर त्याला समर्थनीय अशी कांही एक बाजूच नाही व त्यानंतर असलीच तर राज्याच्या फाळणीनतर ती संपलेली आहे. त्यानंतरही युद्धानें त्याने राज्य मिळविण्याचा प्रयत्न केला असता तर गोष्ट वेगळी होती. त्या ऐवजी द्यूतासारख्या वाममार्गाची त्यानें कांस धरली यांत तर त्याने शौर्यप्रधान क्षत्रिय धर्माचाही परित्याग केला. अशा स्थितीत त्याचे पुढच्या साम्राज्यलोभाच्या दृष्टीनें काही एक समर्थन असू शकत नाही. म्हणनच त्याला "पापात्मा व कलीचा अश" ही महाभारताने विशेषणे जोडली आहेत.

खोलवर विचार करणारा

दुर्योधनाच्या स्वभावविशेषांत अत्यंत दूरगामीपणानें विचार करणें हाही एक विशेष दृष्टीस पडतो. हव्या त्या सूक्तासूक्त मार्गाने राज्य मिळवावयाचें असें ठरल्यावर त्याने त्यासाठी आवश्यक त्या सचिवसंस्थेला व पौर जानपदांना आपलेसें करून घ्यावयाचें ठरवून तदनुसार धोरण पहिल्यापासूनच आंखलें. त्यांत ऋजुता, सद्गुण व औदार्य यांच्या बाबतीत युधिष्ठिरावर मात करणे केवळ अशक्य असल्यामुळे व तो जोंवर सतत प्रजांच्या डोळ्यासमोर आहे तोंवर त्याच्यासमोर आपला प्रभाव पडणेंही अशक्य वाटल्यानें बरेच दिवस त्याला राज्ययंत्रापासून दूर ठेवणें व त्या अवधींत पौर जानपद व सचिव संस्था आपलीशी करून घेणें हें दुर्योधनाला आवश्यक वाटलें. या दृष्टीनें त्यानें पूर्णपणें विचार केलेला होता; इतकेंच नव्हे तर आपल्या राजसभेंतील प्रत्येक व्यक्तीचा त्यानें आपल्या कर्तृत्वाच्या प्रारभिक अवस्थेतच अतिशय सूक्ष्म अभ्यास केला होता असें त्याच्या उद्गारांवरून दिसून येतें. तो म्हणतो :

एवमेतन्मया तात भावितं दोषमात्मनि ।
दृष्ट्वा प्रकृतयः सर्वा अर्थमानेन पूजिताः ॥ १२

ध्रुवमस्मत्सहायास्ते भविष्यन्ति प्रधानतः ।
अर्थवर्गः सहामात्यो मत्संस्थोऽद्य महीपते ॥ १३
स भवान्पाण्डवानाशु विवासयितुमर्हति ।
मृदुनैवाभ्युपायेन नगरं वारणावतम् ॥ १४
यदा प्रतिष्ठितं राज्यं मयि राजन्भविष्यति ।
तदा कुन्तीसहापत्या पुनरेष्यति भारत ॥ १५
मध्यस्थः सततं भीष्मो द्रोणपुत्रो मयि स्थितः ।
यतः पुत्रस्ततो द्रोणो भविता नात्र संशयः ॥ २०
कृपः शारद्वतश्चैव यत एतौ ततो भवेत् ।
द्रोणं च भागिनेयं च न स त्यक्ष्यति कर्हिचित् ॥ २१
क्षत्ताऽर्थबद्धस्त्वस्माकं प्रच्छन्नं संयतः पुरैः ।
न चैकः ससमर्थोऽस्मान्पाण्डवार्थेऽधिबाधितुम् ॥ २२
सुविस्रब्धः पाण्डुपुत्रान्सह मात्रा प्रवासय ।
वारणावतमद्यैव यथा यान्ति तथा कुरु ॥ २३
विनिद्रकरणं घोरं हृदि शल्यमिवार्पितम् ।
शोकपावकमुद्भूतं कर्मणैतेन नाशय ॥ २४

महाभारत, आदिपर्व अध्याय १४२

मी सर्व गोष्टीचा विचार करून धन व सन्मान समर्पण करून प्रजांना प्रसन्न करून घेतले आहे. अमात्यसस्था याच उपायांनी मीं माझ्याकडे वळविली आहे. अशा स्थितीत हे सर्व लोक आपल्यालाच साहाय्य करतील असें मला वाटतें. तुम्ही युक्तीने पाण्डवांना वारणावतास पाठवून द्या. ज्या वेळी माझें राज्य दृढमूल होईल, त्या वेळीं कुन्ती पांडवांसह पुनश्च येथें परत येईल. आपल्या सभेंतील सर्व लोकांचा मी पूर्ण विचार केला आहे. भीष्म पूर्णपणें पाण्डवांचेही नाहींत व आमचेहीनाहींत. दोन्हीकडे त्यांचें सारखच प्रेम असल्यामुळें ते मध्यस्थ आहेत असें म्हणावयास हरकत नाही. द्रोणांची तशी चिंता बाळगण्याचें कारण नाहीं. कारण अश्वत्थामा पूर्णपणें माझ्या बाजूचा आहे व द्रोणांचें पुत्रावर अतोनात प्रेम असल्यामुळें कोणत्याही परिस्थितींत जिकडे अश्वत्थामा तिकडेच द्रोण राहतील यांत कांहीं शंका नाही. शारद्वत कृपाचार्य हेही अश्वत्थामा व द्रोण यांच्याच

बाजूला राहणार. स्वत:चे मेव्हणे द्रोण व बहिणीचा मुलगा अश्वत्थामा यांचा कोणत्याही परिस्थितीत ते परित्याग करू शकत नाहींत येऊन जाऊन प्रश्न उरला विदुराचा. एकतर तो आमचा सेवक असून उपजीवनार्थ तो आमच्यावर अवलंबून आहे. त्याचा ओढा पाण्डवाच्याकडे असला तरी तो प्रच्छन्नपणेच पाण्डवांना साहाय्य करूं शकतो. एकटा तो पाण्डवाच्या बाजूने आम्हांला त्रास द्यावयास समर्थ नाही. म्हणून आपण पाण्डवाना शांत अंत करणाने वारणावतास पाठवा व अंत करणातील हे शल्य दूर करा.

दुर्योधनाच्या या उद्गारांवरून पहिल्यापासूनच त्याने किती बारकाईनें सर्व गोष्टीचा विचार केला होता हे स्पष्ट होते. कारस्थानीपणा व स्वत:चे उद्दिष्ट प्राप्त करून घेण्यासाठी वाटेल त्या गर्हण्य उपायांचें अवलंबन करण्याची त्याच्या मनाची सिद्धता लहानपणापासूनच झालेली होती असें दिसते. धृतराष्ट्राच्याही ध्यानांत न येऊ देता वारणावतास गेलेल्या पाण्डवाना जाळून मारावें म्हणजे आपल्या राज्यप्राप्तीच्या मार्गात कसलाही अडथळा उरणार नाही असा विचार करूनच त्याने हा बेत केला. 'लाक्षागृह प्रकरण' हा त्याच्या निर्घृण कारस्थानीपणाचा स्पष्ट पुरावाच होय.

निर्घृण कारस्थानीपणा

धृतराष्ट्राने पाण्डवाना वारणावतास जावयाची आज्ञा दिल्यावर महाभारतकार वर्णन करतात–

एवमुक्तेषु राज्ञा तु पाण्डुपुत्रेषु भारत ।
दुर्योधनः परं हर्षमगच्छत्स दुरात्मवान् ॥ १
स पुरोचनमेकान्तमानीय भरतर्षभ ।
गृहीत्वा दक्षिणे पाणौ सचिव वाक्यमब्रवीत् ॥ २
ममेयं वसुसंपूर्णा पुरोचन वसुंधरा ।
ययेयं मम तद्वत्ते स तां रक्षितुमर्हसि ॥ ३
नहि मे कश्चिदन्योस्ति विश्वासिकतरस्त्वया ।
सहायो येन संधाय मन्त्रयेयं यथा त्वया ॥ ४
संरक्ष तात मन्त्रं च सपत्नांश्च ममोद्धर ।
निपुणेनाभ्युपायेन यद्ब्रवीमि तथा कुरु ॥ ५

पाण्डवा धृतराष्ट्रेण प्रेषिता वारणावतम् ।
उत्सवे विहरिष्यन्ति धृतराष्ट्रस्य शासनात् ॥ ६
स त्वं रासभयुक्तेन स्यन्दनेनाशुगामिना ।
वारणावतमद्यैव यथा यासि तथा कुरु ॥ ७
तत्र गत्वा चतुःशालं गृह परमसंवृतम् ।
नगरोपान्तमाश्रित्य कारयेथा महाधनम् ॥ ८
शणसर्जरसादीनि यानि द्रव्याणि कानिचित् ।
आग्नेयान्युत सन्तीह तानि तत्र प्रदापय ॥ ९
सर्पिस्तैलवसाभिश्च लाक्षया चाप्यनल्पया ।
मृत्तिकां मिश्रयित्वा त्वं लेप कुड्येषु दापय ॥ १०
शणं तैलं घृतं चैव जतु दारूणि चैव हि ।
तस्मिन्वेश्मनि सर्वाणि निक्षिपेथाः समन्ततः ॥ ११
यथा च तत्र पश्येरन्परीक्षन्तोऽपि पाण्डवाः ।
आग्नेयमिति तत्कार्यमपि चान्येऽपि मानवाः ॥ १२
वेश्मन्येव कृते तत्र गत्वा तान्परमार्चितान् ।
वासयेथा पाण्डवेयान्कुन्तीं च ससुहृज्जनाम् ॥ १३
आसनानि च दिव्यानि यानानि शयनानि च ।
विधातव्यानि पाण्डूनां यथा तुष्येत वै पिता ॥ १४
यथा च तत्र जानन्ति नगरे वारणावते ।
तथा सर्वं विधातव्यं यावत्कालस्य पर्ययः ॥ १५
ज्ञात्वा च तान्सुविश्वस्तान् शयानानकुतोभयान् ।
अग्निस्त्वया ततो देयो द्वारतस्तस्य वेश्मनः ॥ १६
बहुधमाने स्वके गेहे दग्धा इति ततो जनाः ।
न गर्हयेयुरस्मान्वै पाण्डवार्थाय कर्हिचित् ॥ १७

—महाभारत, आदिपर्व अ. १४८

"याप्रमाणें राजा धृतराष्ट्रानें पाण्डवांना सांगितल्यावर दुरात्मा दुर्योधनाला अत्यत आनंद झाला. त्यानें पुरोचनाला एकांतांत आणून व आपल्या उजव्या हातानें त्याचा हात धरून असें सांगितलें कीं, हे पुरोचना ! ही संपूर्ण धनधान्यासहित पृथ्वी माझी आहे. ती जशी माझी तशीच ती तुझीही आहे. म्हणून तूं तिचें संरक्षण केलें

पाहिजेस. तुझ्याहून अधिक विश्वासू असा सहायक मला दुसरा कोणीही दिसत नाही कीं ज्याच्याशी विचारविनिमय करून मी एखादा बेत ठरवावा. मी तुला सांगतों तें कर. मात्र आपलें हें बोलणें अतिशय गुप्त ठेव. माझ्या शत्रूचा नाश कर व मी सांगतो त्याप्रमाणें कुशलतेनें सर्व योजना पार पाड. धृतराष्ट्रानें पांडवाना वारणावतास पाठविलेले असून त्या ठिकाणी राजा धृतराष्ट्राच्या आज्ञेवरून ते काही दिवस आनदानें राहतील. तू शक्य तितक्या लवकर गाढवें जोडलेल्या रथाने वारणावतास जा. तेथें जाऊन शहराच्याच एका बाजूला एक अत्यत उत्कृष्ट चारही बाजूनी झांकलेला व ज्याच्यामध्ये सर्व प्रकारच्या सुखसोयी आहेत असा उत्कृष्ट प्रासाद तेथे बांध. त्यासाठी जे सामान वापरशील तें सर्व अत्यंत ज्वालाग्राही व लौकर पेट घेणाऱ्या पदार्थानी युक्त असलें पाहिजे. शक्य तोवर लाकडें वापरून त्यांच्यावर लवकर पेट घेण्याइतकें तेल, तूप वगैरे टाकून ठेव. सर्व घरच या प्रकारच्या साहित्यानें भरलेलें असावें, पण, हे सारें इतक्या गुप्तरीतीने व कौशल्यानें झाले पाहिजे की परीक्षा करूनही पाण्डवांना अथवा इतर कोणालाही हें घर 'लाक्षागृह' आहे हें न कळलें पाहिजे. इतरही कोणाला तसा संशय मुळीच येऊं नये. पाण्डव तेथे आल्यावर कुन्तीसहित त्यांचा थाटाचा आदरसत्कार करून त्या घरीं त्यांना राहावयास घेऊन जा. तेथें दिव्य आसने, उत्कृष्ट वाहनें, सुदर शय्या, इत्यादिकांची रेलचेल असावी. पाण्डवांना तर तें सारें पाहून बरें वाटेलच, पण राजा धृतराष्ट्रालाही त्यांची ही केलेली व्यवस्था पाहून अत्यंत आनंद झाला पाहिजे. तू त्यांच्याजवळ अत्यंत लीनता पत्करून अशा सुव्यवस्थितपणें राहा की कोणालाही कमलाही सशय न आला पाहिजे. जोंपर्यंत योग्य अवसर प्राप्त होत नाही तोंवर अत्यत दक्षतेनें त्यांच्या अंत:करणांत विश्वास उत्पन्न होण्याजोगें वर्तन तू कर. एकदां त्यांच्या मनांत तुझ्याविषयीं विश्वास उत्पन्न झाला की एके दिवशीं रात्री त्यांना गाढ झोप लागली आहे असें पाहून तूं त्या घराला आग लाव. उठल्याबरोबर त्यांना पळून जातां येऊ नये म्हणून आग दाराच्या बाजूनेंच लाव. लोक असें समजतील कीं एकाएकी घर पेटल्यामुळें पाण्डवांना जळण्याचें अपघाती मरण

आलें. आमचे शत्रु पाण्डव हेही नष्ट होतील व आमच्यावर जनापवादही येणार नाहीं." या एकाच उदाहरणावरून दुर्योधनाचें कारस्थानपटुत्व, त्याची निर्घृणता, व सर्पाप्रमाणे ध्यानांत न येतां दंश करण्याची प्रवृत्ति स्पष्ट होते.

विलक्षण पोळ

त्याचप्रमाणे 'मोडेन पण वाकणार नाही' अशीही त्याची विलक्षण ताठपणाची मनोवृत्ति महाभारतात सर्वत्र दृष्टीस पडते. अगदी सामान्य प्रसंगांतदेखील कोणत्याही कारणास्तव आपण शत्रूसमोर वाकलों आहोंत अथवा त्याच्या भयाने आपल्या मनावर कांही परिणाम झाला आहे हें यत्किंचित्देखील कोणाच्याही लक्षांत येऊ नये अशी त्याची उत्कट इच्छा आहे. भगवान् श्रीकृष्ण शिष्टाईसाठी आपल्या राजसभेंत येणार हें ऐकताच कोणत्या पद्धतीनें त्याचा सत्कार करावा याविषयी कौरवांच्या राजसभेंत मुत्सद्दी लोक विचार करू लागले अमतां व विदुरानें तुम्ही श्रीकृष्णाचा कितीही थाटाचा सत्कार केला तरी कृष्णाला पांडवांपासून फोडतां येणें केवळ अशक्य होय असें स्पष्ट सांगितल्यावर दुर्योधनाने राजसभेंत धृतराष्ट्राला उद्देशून जे भाषण केलें तें त्याच्या या मनोवृत्तीवर उत्कृष्ट प्रकाश टाकणारें आहे. तो म्हणतो :—

यदाह विदुरः कृष्णे सर्वं तत् सत्यमच्युते ।
अनुरक्तो हृषसंहार्यः पार्थान् प्रति जनार्दन ॥ १
यत्तत्सत्कारसंयुक्तं देयं वसु जनार्दने ।
अनेकरूपं राजेन्द्र न तद्देयं कदाचन ॥ २
देशः कालस्तथाऽयुक्तो न हि नार्हति केशवः ।
मस्यत्यधोक्षजो राजन् भयादर्चति मामिति ॥ ३
अवमानश्च यत्र स्यात् क्षत्रियस्य विशाम्पते ।
न तत् कुर्याद्बुधः कार्यमिति मे निश्चिता मतिः ॥ ४
स हि पूज्यतमो लोके कृष्णः पृथुललोचनः ।
त्रयाणामपि लोकानां विदितं मम सर्वथा ॥ ५
न तु तस्मै प्रदेयं स्यात्तथा कार्यगतिः प्रभो ।
विग्रहः समुपारब्धो न हि शाम्यत्यविग्रहात् ॥ ६

—महाभारत उद्योगपर्व अध्याय ८८

"विदुराने जें श्रीकृष्णाविषयी सांगितलें तेंच सत्य आहे असें माझें मत आहे. श्रीकृष्णाचे पांडवांवर इतके प्रेम आहे की, कोणत्याही परिस्थितीत आपण त्याना पांडवांपासून फोडू शकणार नाहीं. अशा स्थितीत जी कांही श्रीकृष्णांच्या सत्कारार्थ तुम्ही त्याला अनेक प्रकारची उपायनें द्यावयाची ठरविली आहेत, त्यांपैकी काहीही देऊ नये असें माझे मत आहे. आपण जो थाटाचा सत्कार करू इच्छितो त्याला श्रीकृष्ण योग्य अथवा पात्र नाही असे माझे मुळीच मत नाही पण सध्यांची परिस्थिति व वेळ या गोष्टी करण्यास योग्य नाही असें माझे मत आहे. आपण श्रीकृष्णाचा सत्कार करू व तो असें समजेल की त्याच्या व पांडवाच्या सामर्थ्याला भिऊनच आपण त्याचा सत्कार करीत आहो. क्षत्रियाच्या बाबतीत अमा समज पसरणे अत्यत लाछनास्पद आहे ज्यामुळे आपला अपमान होण्याचा सभव आहे अशी कोणतीही गोष्ट विचक्षण क्षत्रियानें कधीही करू नये. विशाललोचन श्रीकृष्ण या लोकातच काय पण त्रैलोक्यातील सर्वच लोकांना अत्यत पूज्य आहे हे मला पूर्णपणे माहीत आहे. पण त्याच्या सत्काराची ही वेळ नव्हे. एकदां सघर्षास प्रारभ झाला की शाततेच्या सौम्य उपायानी कधीही काम होत नसते." सपूर्ण पृथ्वीचे अन्यायानें गिळकृत केलेलें राज्य, इतराचे न्यायत प्राप्त होणारे अधिकारदेखील तुडवून एकटयानेच उपभोगण्याची दुर्दान्त महत्त्वाकाक्षा वस्तुत अत्यत निपेध्य असताही त्या बाबतीतल्या दुर्योधनाच्या विलक्षण ताठपणाच्या भूमिकेमुळे व तिच्यांतच परिणामाची काडीइतकीही पर्वा न करतां त्यानें दाखविलेल्या असीम निर्भयतेमुळे एक प्रकारच्या विकृत कां होईना, पण काव्यमय आकर्षणानें भरलेली आहे यांत शका नाही. श्रीकृष्णांना अखेरचें उत्तर म्हणून देत असतां तो म्हणतो —

मुख्यश्चैवैष नो धर्मः क्षत्रियाणां जनार्दन ।
यच्छयीमहि संग्रामे शरतल्पगता वयम् ।। १६
ते वयं वीरशयनं प्राप्स्यामो यदि संयुगे ।
अप्रणम्यैव शत्रूणां न नस्तप्स्यन्ति माधव ।। १७
कश्च जातु कुले जात. क्षत्रधर्मेण वर्तयन् ।
भयाद् वृत्तिं समीक्ष्यैवं प्रणमेदिह कर्हिचित् ।। १८

उद्यच्छेदेव न नमेदुद्यमो ह्येव पौरुषम् ।
अप्यपर्वणि भज्येत न नमेदिह कर्हिचित् ।। १९
इति मातंगवचनं परीप्सन्ति हितेप्सव ।
धर्माय चैव प्रणमेद्ब्राह्मणेभ्यश्च मद्विध. ।। २०
अचिन्तयन् कञ्चिदन्य यावज्जीवं तथाऽऽचरेत् ।
एष धर्म क्षत्रियाणां मतमेतच्च मे सदा । २१
राज्यांशश्चाभ्यनुज्ञातो यो मे पित्रा पुराऽभवत् ।
न स लभ्य पुनर्जातु मयि जीवति केशव ।। २२
यावच्च राजा धृयते धृतराष्ट्रो जनार्दन ।
न्यस्तशस्त्रा वयं ते वाऽप्युपजीवाम माधव ।
अप्रदेयं पुरा दत्तं राज्यं परवतो मम ।। २३
अज्ञानाद्वा भयाद्वाऽपि मयि बाले जनार्दन ।
न तदद्य पुनर्लभ्यं पाण्डवैर्वृष्णिनन्दन ।। २४
घ्रियमाणे महाबाहौ मयि सम्प्रति केशव ।
यावद्धि तीक्ष्णया सूच्या विध्येदग्रेण केशव ।
तावदप्यपरित्याज्यं भूमेर्न: पाण्डवान् प्रति । २५

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १२७.

" जर सग्रामामध्ये आम्हाला बाणानी ठार मरावें लागले तर तो क्षत्रियाचा धर्मच होय. शरतल्पावर शयन करण्यात क्षत्रियाची काय हानि आहे ? शत्रूच्या समोर नम्र न होतां जर आम्हाला सग्रामात वीरोचित शय्या मिळाली तर त्यात मुळीच दु ख वाटणार नाही. कोण घरदाज क्षत्रिय भयाने आपल्या शत्रूसमोर मान वाकवील ? मनुष्याने ताठ असावें त्यातच खरे पौरुष आहे. मोडून गेलें तरी हरकत नाही, पण वाकू मात्र नये असे मातगाचे वचन आहे. खरे क्षत्रिय असेंच वागत असतात. नमस्कारच करावयाचा तर माझ्यासारखा क्षत्रिय धार्मिक कर्तव्य म्हणून ब्राह्मणासमोर नमेल. पण शत्रूसमोर कधीही नमणार नाही. ब्राह्मण सोडून इतर कोणासमोर कधीही न नमणें हा क्षत्रियाचा धर्म आहे व असेंच वागण्याचा माझाही निश्चय आहे. माझ्या वडिलांनी पूर्वी पाण्डवांना जो राज्याचा विभाग दिला होता तोदेखील मी जिवंत असेपर्यंत पुन्हां पाण्डवांना मिळणें केवळ

अशक्य आहे. जोंवर राजा धृतराष्ट्र जिवंत आहे तोंवर कोणाला राज्य देण्याचा प्रश्नच नाहीं. मी पूर्वी परवश असल्यामुळें माझ्या बाल्यावस्थेत अज्ञानामुळे म्हणा, अथवा भयामुळे म्हणा, पाण्डवांना राज्य दिले गेलें. आतां मी या राज्याचा सूत्रचालक असतांना तें पाण्डवांना कोणत्याही उपायानें मिळणें अशक्य आहे. अत्यंत तीक्ष्ण अशा सुईच्या अग्रावर राहील इतकी मातीदेखील मी पाण्डवांना देणार नाही, मग राज्य तर लांबच राहिलें."

दुर्योधनाच्या या उद्‌गारांत न्यायाच्या दृष्टीनें समर्थनीय असें कांही नाही. एकदां धृतराष्ट्रानेच राज्य तोडून दिलेले असल्यावर व मनांत कांहीही असले तरी उघडपणे तो तें मान्य करावयास सिद्ध असल्यावर न्यायदृष्टीनें धृतराष्ट्र जिवंत असेपर्यंत तरी दुर्योधनाला या वाटाघाटी करण्याचा अथवा निर्णय घेण्याचा काडीइतकाही अधिकार नाही, असें असतांही तो वरीलप्रमाणे बोलू शकतो. या त्याच्या उद्‌गारांवरून त्याच्या उद्धटपणाची कल्पना येऊं शकेल.

स्पर्धेतून उत्पन्न झालेले सद्‌गुण

युधिष्ठिराची स्पर्धा हा दुर्योधनाचा स्थायीभाव असल्यामुळे सर्व प्रकारच्या उपायांनी त्याच्यापेक्षां आपण वरचढ ठरावें असा त्याने प्रयत्न चालविलेला आहे. पाण्डव राजसूय यज्ञ करतात म्हणून त्यानें वनांत पाण्डव असतां राजसूय यज्ञाचा घाट घातला. पाण्डवांनीं ज्याप्रमाणें स्वतःच्या बाहुबलावर सर्व क्षत्रियांना जिंकलें त्याप्रमाणें दुर्योधनानें कांहीं बाहुबलानें राज्य संपादन केलेले नव्हतें. त्यामुळें त्याला त्या बाबतींत पाण्डवांचें पद मिळू शकत नव्हतें. कर्णानें त्याची ती इच्छा पूर्ण केली व स्वतःच्या बाहुबलानें पृथ्वीवरील बहुतेक क्षत्रिय जिंकून दुर्योधनाच्या साम्राज्यास सामर्थ्याची जोड मिळवून दिली. मित्राच्या कां होईना पण पराक्रमानें आपण पृथ्वीचे विजेते झालों हें पाहतांच त्याच्या अंतःकरणांत युधिष्ठिराप्रमाणें राजसूय यज्ञ करून क्षत्रियांत सर्वश्रेष्ठ पद मिळविण्याची इच्छा झाली. तो कर्णाला म्हणूं लागला.

एवमुक्तस्तु कर्णेन कर्णं राजाऽब्रवीत्पुनः ।
न किञ्चिद्दुर्लभं तस्य यस्य त्वं पुरुषर्षभ ॥ ४

सहायश्चानुरक्तश्च मदर्थं च समुद्यतः ।
अभिप्रायस्तु मे कश्चित् तं वै शृणु यथातथम् ॥ ५
राजसूयं पाण्डवस्य दृष्ट्वा क्रतुवरं महत् ।
मम स्पृहा समुत्पन्ना तां सम्पादय सूतज ॥ ६
—महाभारत, वनपर्व अध्याय २५५

तू ज्याचा मित्र आहेस त्याला जगांत दुर्लभ अशी कोणतीही गोष्ट नाही. पण माझ्या अंतःकरणात एक विशेष विचार घोळत आहे. युधिष्ठिराचा श्रेष्ठ राजसूय यज्ञ मी पाहिला आहे. तितक्याच थाटाचा राजसूय यज्ञ आपण स्वतःही करावा अशी माझी इच्छा आहे. कर्णानें त्याला सांगितले की, आज सर्व राजे व त्यांचे राजमुकुट मी तुझ्या पायी समर्पण केल्यावर राजसूय यज्ञ करावा की करूं नये हा प्रश्नच उत्पन्न होण्याचें कारण काय? तू अवश्य राजसूय यज्ञ कर व त्या दृष्टीनें तुझ्या पुरोहिताना सिद्धता करावयास सांग. पण पुरोहितानें राजाला राजसूय यज्ञ करावयास विरोध करून त्या ऐवजी "विष्णु याग" करावयाची सूचना दिली. तो म्हणाला :

स एवमुक्तो नृपतिमुवाच द्विजसत्तमः ।
न सशक्यः क्रतुश्रेष्ठो जीवमाने युधिष्ठिरे ॥ १३
आहर्तुं कौरवश्रेष्ठ कुले तव नृपोत्तम ।
दीर्घायुर्जीवति च ते धृतराष्ट्रः पिता नृप ॥ १४
अतश्चापि विरुद्धस्ते क्रतुरेष नृपोत्तम ।
अस्ति त्वन्यन्महत् सत्रं राजसूयसमं प्रभो ॥ १५
तेन त्वं यज राजेन्द्र शृणु चेदं वचो मम । १६
—महाभारत, वनपर्व अध्याय २५५

"पुरोहिताने सांगितलें की, युधिष्ठिर जिवंत असेपर्यंत तुला राजसूय यज्ञ करतां येणार नाहीं. जोवर तू युधिष्ठिराला जिकले नाहीस तोंवर सर्व क्षत्रियांना जिकलें असें होत नाही. तसेंच तुझे वडील धृतराष्ट्र जिवंत असतांना तुला राजसूय कसा करतां येणार? हवें तर राजसूयासारखाच दुसरा एक मोठा याग आहे तो तुला करता येईल." दुर्योधनानें त्याप्रमाणे मोठा याग करून तपस्वी, याचक व ब्राह्मण याच्या दृष्टीनें दानशूर म्हणून कीर्ति मिळविली. पण येथें हें

लक्षांत ठेवले पाहिजे की या दानाचा उगम स्पर्धेतून झालेला आहे. अत्यंत शीघ्रकोपी दुर्वास ऋषींनादेखील त्यानें आपल्या औदार्यानें व सेवेने प्रसन्न करून घेतले होतें असें वर्णन आहे. पण पाण्डवांचें नांव काढताच भरसभेत माडी थोपटून अपमानित करणाऱ्या दुर्योधनाला मैत्रेयासारख्या तपस्व्यांची मोठी प्रतिष्ठा होती असें मुळीच नव्हे. ज्या ज्या शक्तीचा पाण्डवाविरुद्ध उपयोग करतां येईल त्यांचा तो संग्रह करीत होता. याच धोरणाने त्यानें दुर्वासांची सेवा केली हें त्यानें शेवटी जे वरदान मागितले त्यावरून दिसतें. महाभारतांत या संबंधानें पुढीलप्रमाणे वर्णन आहे ––

श्रुत्वा तेषां तथा वृत्तिं नगरे वसतामिव ॥ ५
दुर्योधनो महाराज तेषु पापमरोचयत् ।
तथा तैर्निकृतिप्रज्ञैः कर्णदुःशासनादिभिः ॥ ६
नानोपायैरघ तेषू चिन्तयत्सु दुरात्मसु ।
अभ्यागच्छत् सधर्मात्मा तपस्वी सुमहायशाः ॥ ७
शिष्यायुतसमोपेतो दुर्वासा नाम कामतः ।
तमागतमभिप्रेक्ष्य मुनिं परमकोपनम् ॥ ८
दुर्योधनो विनीतात्मा प्रश्रयेण दमेन च ।
सहितो भ्रातृभिः श्रीमानातिथ्येन न्यमन्त्रयत् ॥९
विधिवत् पूजयामास स्वय किङ्करवत् स्थितः ।
अहानि कतिचित् तत्र तस्थौ स मुनिसत्तमः ॥ १०
तं च पर्यचरद्राजा दिवारात्रमतन्द्रितः ।
दुर्योधनो महाराज शापात्तस्य विशंकित ॥ ११
क्षुधितोऽस्मि ददस्वान्नं शीघ्रं मम नराधिप ।
इत्युक्त्वा गच्छति स्नातुं प्रत्यागच्छति वै चिरात् ।
न भोक्ष्याम्यद्य मे नास्ति क्षुधेत्युक्त्वैत्यदर्शनम् ॥ १२
अकस्मादेत्य च ब्रूते भोजयास्मांस्त्वरान्वितः ।
कदाचिच्च निशीथे स उत्थाय निकृतौ स्थितः ॥ १३
पूर्ववत् कारयित्वाऽन्नं न भुङ्क्ते गर्हयन् स्म सः ।
वर्तमाने तथा तस्मिन् यदा दुर्योधनो नृपः ॥ १४

विकृतिं नैति न क्रोधं तदा तुष्टोऽभवन्मुनिः ।
आह चैनं दुराधर्षो वरदोऽस्मीति भारत ॥ १५

दुर्वासा उवाच ।

वरं वरय भद्रं ते यत् ते मनसि वर्तते ।
मयि प्रीते तु यद्धर्म्यं नालभ्यं विद्यते तव ॥ १६

वशम्पायन उवाच ।

एतच्छ्रुत्वा वचस्तस्य महर्षेर्भावितात्मनः ।
अमन्यत पुनर्जातमात्मानं स सुयोधनः ॥ १७
प्रागेव मन्त्रितं चासीत् कर्णदुःशासनादिभिः ।
याचनीयं मुनेस्तुष्टादिति निश्चित्य दुर्मतिः ॥ १८
अतिहर्षान्वितो राजन् वरमेनमयाचत ।
शिष्यैःसह मम ब्रह्मन् यथा जातोऽतिथिर्भवान् ॥ १९
अस्मत्कुले महाराजो ज्येष्ठः श्रेष्ठो युधिष्ठिरः ।
वने वसति धर्मात्मा भ्रातृभिः परिवारितः ॥ २०
गुणवान् शीलसम्पन्नस्तस्य त्वमितिथिर्भव ।
यदा च राजपुत्री सा सुकुमारी यशस्विनी ॥ २१
भोजयित्वा द्विजान् सर्वान् पतींश्च वरवर्णिनी ।
विश्रान्ता च स्वयं भुक्त्वा सुखासीनां भवेत्तदा ॥ २२
तदा त्वं तत्र गच्छेथा यद्यनुग्राह्यता मयि ।
तथा करिष्ये त्वत्प्रीत्येत्येव मुक्त्वा सुयोधनम् ॥ २३
दुर्वासा अपि विप्रेन्द्रो यथागतमगात् ततः ।
कृतार्थमपि चात्मानं तदा मेने सुयोधनः ॥ २४
करेण च करं गृह्य कर्णस्य मुदितो भृशम् ।
कर्णोऽपि भ्रातृसहितमित्युवाच नृपं मुदा ॥ २५

कर्ण उवाच ।

दिष्ट्या कामः सुसंवृत्तो दिष्ट्या कौरव वर्धसे ।
दिष्ट्या ते शत्रवो मग्ना दुस्तरे व्यसनार्णवे ॥ २६
दुर्वासःक्रोधजे वन्हौ पतिता पाण्डुनन्दनाः ।
स्वैरेव ते महापापैर्गता वै दुस्तरं तमः ॥ २७

—महाभारत, वनपर्व अध्याय २६२

पाण्डव वनांत असतांना दुर्योधनाच्या अंतःकरणांत त्यांच्या-विषयीचे दुष्ट विचार सतत घोळत असत. कर्ण आणि दु.शासन या कपटपटूच्या बरोबर तो त्याविषयी नेहमी विचार करीत असे. असें असतां एके दिवशी सहजगत्या फिरत फिरत महान् तपस्वी व धर्मात्मा दुर्वास ऋषि आपल्या दहा हजार शिष्यासमवेत तेथे आले. दुर्योधनानें अत्यत विनयाने अतिथि म्हणून त्यांना निमंत्रण दिलें. त्यांची विधियुक्त पूजा करून एखाद्या दासाप्रमाणे तो दिवसरात्र त्यांची सेवा करूं लागला. कांहीं दिवस दुर्वास तेथें राहिले. त्यांच्या शापाची सदोदित मनांत भीति बाळगून दुर्योधन अत्यत दक्षतेनें त्यांची सेवा करीत असे. ऋषीनी एखाद्यावेळी लहरीत येऊन, 'मला अत्यंत भूक लागली आहे. लवकर भोजन तयार करा' अशी आज्ञा द्यावी. व स्नानासाठी म्हणून नदीवर जावें, व परत आल्यावर मला जेवावयाचे नाही असे सागून तें सगळे अन्न वाया घालवावें. कधी काहीच तयार नसतां एकदम भोजन मागावे भलत्याच रात्री उठून भूक लागली म्हणून अन्न तयार करावयास लावावे, व त्या अन्नाचीच निदा करून तें फेकून द्यावयास लावावे. याप्रमाणे दुर्वास ऋषि सतत छळ करीत असूनही तो दुर्योधनाने सहन केला. शेवटी दुर्वास त्याच्यावर प्रसन्न झाले व त्यानी तुला काय हवे तें माग म्हणून दुर्योधनाला सांगितलें. तेव्हां दुर्योधनानें आपल्या दुष्ट मंत्र्यांशी विचारविनिमय करून दुर्वासांना असे सांगितले की आमच्या कुळांत सर्वांत ज्येष्ठ व श्रेष्ठ युधिष्ठिर असून तो धर्मात्मा आपल्या वधूजनांसहित वनांत राहतो. तो गुणवान् असून चारित्र्यसंपन्न आहे. आपण त्याचे अतिथि व्हावें. मात्र जर आपणांस खरोखरीच माझें कांही प्रिय करावयाचें असेल तर सुकुमारी, यशस्विनी, राजकन्या द्रौपदी सर्व ब्राह्मणांना व पतीना भोजन घालून व स्वतःचेंही भोजन संपवून ज्यावेळीं विश्रांति घेत असेल, त्यावेळीच आपण तेथें जावें व भोजन मागावें. दुर्वास ऋषींनी 'तथास्तु' म्हणून त्याला वरदान दिलें व ते निघून गेले. ते गेल्यावर दुर्योधनाला आपण कृतार्थ झालों असें वाटू लागले, व कर्णाचा हात आपल्या हातांत घेऊन तो स्वतःचा आनंद व्यक्त

करू लागला. कर्णही त्याला असे म्हणाला कीं, मोठी भाग्याची गोष्ट आहे कीं तुझी इच्छा परिपूर्ण झाली. तुझे सर्व शत्रु दुस्तर, संकट-समुद्रांत निमग्न झाले हें फार चांगलें झालें. आपल्या स्वतःच्याच पापानें दुर्वासांसारख्या मूर्तिमत क्रोधाच्या अग्निकुंडांत आतां पाण्डव जळून भस्म होतील. तात्पर्य दुर्योधनाची ब्राह्मण्यता ही अशा प्रकारच्या दुष्ट हेतूतून अथवा युधिष्ठिरापेक्षां आपली अधिक कीर्ति व्हावी अशा प्रकारच्या स्पर्धेतून निर्माण झालेली आहे हें नेहमीच लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याच्या ब्राह्मण्यतेचें समर्थन करतांना त्याचे समर्थक नेहमी संजयानें शिष्टाईच्या वेळीं " कुतो दायानोपयेत् ब्राह्मणानाम्। " असें जे म्हटले आहे तें त्याच्या ब्राह्मण्यतेचें उदाहरण म्हणून पुढे करीत असतात. पण त्यानी त्याला सदुपदेश करतांच तो त्याचा अपमान करीत असे असें दिसतें. मैत्रेयाशी त्यानें केलेल्या वागणुकीविषयी लिहितांना महाभारतकारांनी लिहिलें आहे की –

एवं तु ब्रुवतस्तस्य मैत्रेयस्य विशांपते ॥ २८
ऊरुं गजकराकारं करेणाभिजघान सः ॥ २९

—महाभारत, वनपर्व अ. १०

याप्रमाणे मैत्रेय बोलत असतां त्याला उत्तर म्हणून हत्तीच्या सोंडेप्रमाणे पुष्ट असणाऱ्या आपल्या मांडीवर दुर्योधनानें हात मारिला.

त्याच्या ब्राह्मण्यतेप्रमाणेंच त्याचें उत्कृष्ट प्रजापालनही युधिष्ठिराच्या स्पर्धेतूनच निर्माण झालेलें आहे. आश्रमवासी पर्वांत राजा धृतराष्ट्र प्रजांचा अखेरचा निरोप घेऊन व आपल्याकडून नि मुलांकडून कांहीं आगळिक झाली असल्यास तिची क्षमा करा म्हणून प्रजांना या शेवटच्या क्षणी विनवीत असतां या कुळांतील सर्व राजांनीं आमचें परिपालनच केलेले आहे. पाण्डव तर करीतच आहेत. पण दुर्योधनानेंही आमचें उकृष्ट परिपालन केलें असें त्यांनी म्हटलें आहे. प्रजा म्हणतात :—

तथा दुर्योधनेनापि राज्ञा सुपरिपालिताः ॥ २०
न स्वल्पमपि पुत्रस्ते व्यलीकं कृतवान्नृप ।
पितरीव सुविश्वस्तास्तस्मिन्नपि नराधिपे ॥ २१

वयमास्म यथा सम्यक् भवतो विदितं तथा ।

तथा वर्षसहस्राणि कुन्तीपुत्रेण धीमता ।। २२

—महाभारत, आश्रमवासिक पर्व अध्याय १०

"राजा दुर्योधनानेंदेखील आमचें उत्तम रीतीनें परिपालन केलें. तुझ्या पुत्रानें आमचें थोडेंही वाईट केलें नाही. स्वतःच्या पित्याप्रमाणेंच त्यानें विश्वासानें आमचें पालन केलें आहे". दुर्योधनाच्या प्रजावत्सलतेचा हा पुरावा त्याच्या उच्च धारणेचा द्योतक नसून तो फुसका आहे हे ध्यानांत ठेवले पाहिजे. एकतर सदाचा निरोप घेऊन जात असलेल्या धृतराष्ट्राला उगाच दुःख देण्याचे हृदयहीन वर्तन कोणीही करणें शक्य नसल्यामुळें प्रजाच्या तोडी हीं वाक्यें आली असली पाहिजेत. दुसरे असें आहे की पौरजानपद ही भारतीय राज्यतंत्राची एक महान् शक्ति असून कोणत्याही राजाला तिला भ्यावेंच लागत असे हे आपण मागेच पाहिलें आहे. प्रत्यक्ष दुर्योधनाच्याच देवापि नांवाच्या पूर्वजाला या शक्तीच्या प्रभावानें पूर्वजांच्या राज्यसिंहासनाचा जन्मसिद्ध वारसा गमवावा लागला होता हेंही आपण मागें पाहिलेच आहे. अशा स्थितीत सिंहासनाच्या दक्षतेसाठी दुर्योधनासारख्या अन्यायाने तें गिळकृत करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने तरी या बाबतीत जपणे अत्यंतच आवश्यक होतें. स्वतः धृतराष्ट्राला व दुर्योधनाला आपल्या कुकृत्यांमुळे प्रजांचा आपल्यावर संताप ओढवेल याची स्पष्ट जाणीव असल्याचें धृतराष्ट्रावरील व्याख्यानांत मी उल्लेखिलेच आहे. व म्हणून दुर्योधनाने राज्य गिळंकृत करण्याच्या मार्गांतील एक आवश्यक बाब म्हणून हे धोरण स्वीकारलेले होतें, असें त्यानें स्वतःच म्हटलेलें आहे. तो म्हणतो :

एवमेतन्मया तात भाविते दोषमात्मनि ।

दृष्ट्वा प्रकृतयः सर्वा अर्थमानेन पूजिताः ।। १२

एवमस्मत्सहायास्ते भविष्यन्ति प्रधानतः ।। १३

—आदिपर्व अध्याय १४२

ततो दुर्योधनो राजा सर्वाः प्रकृतय. शनैः ।
अर्थमानप्रदानाभ्यां संजहार सहानुजः ॥ १
—महाभारत, आदिपर्व अध्याय १४३

" प्रजांचा आपल्या बाबतींत असतोष होण्याचा संभव आहे ही गोष्ट मी यापूर्वीच ओळखून त्या धोरणानें सन्मान व धनदान यांच्या साहाय्यानें त्यांना प्रसन्न करून घेतले आहे. ते आपलेच सहायक होतील असे आतां मला वाटतें."

असें म्हणून दुर्योधनाने सन्मान व धनदान यांच्या साहाय्यानें सर्व प्रजांना सतत प्रसन्न करून घ्यावयाचें धोरण प्रत्यक्षांत आणावयास प्रारंभ केला.

धोरणीपणा व नेतृत्व

एकदां उद्दिष्ट ठरल्यावर तें प्राप्त करून घेण्यासाठीं त्यानें आवश्यक ते मित्र, नाना प्रकारचा त्याग करून जोडले. इतकेंच नव्हे तर त्या बाबतींत ज्यांचें ज्यांचें सामर्थ्य संगृहीत करणें आवश्यक, वाटले त्यांना त्याना त्यानें दूरदर्शीपणानें पूर्वीपासूनच आपल्या बाजूला बाधून टाकलेले आहेत. अर्जुनाच्या महास्त्रज्ञतेला भिऊन त्यानें कर्णाला जवळ केलें. त्यानें कर्णाला अंगराज्य दिलें व कर्ण त्याचा अनुचर व सेवक असूनही त्याने कर्णाजवळ फक्त सख्याचीच भिक्षा मागितली. महाभारतकारांनीं असें म्हटलें आहे की :—

अभिषिक्तोऽङ्गराज्ये स श्रियायुक्तो महाबलः ।
सच्छत्रवालव्यजनो जयशब्दोत्तरेण च ॥ ३८
उवाच कौरवं राजन्वचनं स वृषस्तदा ।
अस्य राज्यप्रदानस्य सदृशं किं ददानि ते ॥ ३९
प्रब्रूहि राजशार्दूल कर्ता हृष्यस्मि तथा नृप ।
अत्यन्तं सख्यमिच्छामीत्याह तं स सुयोधनः ॥ ४०
—महाभारत, आदिपर्व अध्याय १३६

दुर्योधनस्यापि तदा कर्णमासाद्य पार्थिव ।
भयमर्जुनसंजातं क्षिप्रमन्तरधीयत ॥ २४
—महाभारत, आदिपर्व अध्याय १३७

" अंगराज्याचा अभिषेक झाल्यावर सर्व राजैश्वर्यानें युक्त असा कर्ण दुर्योधनाला म्हणाला की, या राज्यप्रदानाचें मी तुला काय द्यावें अशी तुझी इच्छा आहे ? तू मला जे दिलेंस त्यांतून मी कसा उतराई होऊं ? " त्यावर दुर्योधन कर्णाला इतकेंच म्हणाला की, 'अत्यत सख्याशिवाय मला दुसरे कांहीही नको'. कर्णाशी सख्य होतांच दुर्योधनाच्या अंत:करणांतील अर्जुनाविषयीचें सर्व भय नष्ट झालें. आणि कर्णासाठी दुर्योधनानें काय केलें नाही? श्रीकृष्णाना पाण्डवांच्या सभेत जो मान होता तो दुर्योधनाने कर्णाला समर्पण केला व इतका अविरत प्रेमाचा त्यानें कर्णावर वर्षाव केला की, जगांतली कोणतीही मोठी शक्ति कोणत्याही कारणास्तव कर्णाला दुर्योधनापासून विलग करावयास समर्थ ठरू शकली नाही. यासबधी स्वत: कर्णाचेच उद्‌गार अत्यत उद्‌बोधक ठरतात. भगवान् श्रीकृष्ण व कुन्ती कर्णाला दुर्योधनापासून फोडावयास आले असतां नकार देतांना त्यानें त्यांना जीं अनेक कारणे सांगितली आहेत त्यांत दुर्योधनाविषयीं बोलतांना तो म्हणतो :—

धृतराष्ट्रकुले कृष्ण दुर्योधनसमाश्रयात् ।
मया त्रयोदशसमा भुक्तं राज्यमकण्टकम् ।। १३
वधाद्‌बंधाद्‌भयाद्वाऽपि लोभाद्वाऽपि जनार्दन ।
अनृतं नोत्सहे कर्तुं धार्तराष्ट्रस्य धीमत: ।। १७
प्राप्य चापि महद्‌राज्यं तदहं मधुसूदन ।
स्फीतं दुर्योधनायैव संप्रदद्यामरिन्दम ।। २२

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४१

सर्वकामै: संविभक्त: पूजितश्च यथासुखम् ।
अहं वै धार्तराष्ट्राणां कुर्यां तदफलं कथम् ।। ११
उपनम्य परैर्वैरं ये मां नित्यमुपासते । १२
अयं हि काल: संप्राप्तो धार्तराष्ट्रोपजीविनाम् ।
निर्वेष्टव्यं मया तत्र प्राणानपरिरक्षता ।। १५
कृतार्था: सुभृता ये हि कृत्यकाले हृपुस्थिते ।
अनवेक्ष्य कृतं पापा विकुर्वन्त्यनवस्थिता: ।। १६

—महाभारत, उदयोगपर्व अध्याय १४६

हे कृष्णा ! धृतराष्ट्राच्या या राज्यांत दुर्योधनाच्या आश्रयानें मी तेरा वर्षे अकटक राज्याचा उपभोग घेतला. अशा स्थितींत आज वध, बधन, भय अथवा लोभ यांपैकीं कोणत्याही गोष्टीमुळें राजा दुर्योधनाचें अनिष्ट करण्याची माझी इच्छा नाहीं. जर तूं पाण्डवांना मी त्यांचा वडील बधु आहे असें सांगून मला हें राज्य मिळावें अशी खटपट केलीस तर तें सारें समृद्ध राज्य मी दुर्योधनालाच परत दिल्यावांचून राहाणार नाही.

कुन्तीशीं बोलतांना तो म्हणतो : सर्व राजविलासांत दुर्योधनानें मला स्वत.च्या योग्यतेचा विभाग दिला असून माझ्या सर्व इच्छा त्यानें परिपूर्ण केल्या आहेत. सतत त्यानें माझा इतका आदर केल्यावर मी त्याला तोडघशी पाडणार नाही. कौरवानी माझ्या भरंवशावर हें वैर उत्पन्न केलें आहे. देवगण ज्याप्रमाणे इंद्राला वदन करतात त्याचप्रमाणें ते सतत माझ्या पायांशी विनम्र राहात आले आहेत. अशा स्थितीत धृतराष्ट्रपुत्राच्या भरवशावर ज्यांनी आजवर सन्मानानें उपजीविका केली त्यांनी आज त्यांच्यासाठीं स्वतःचे प्राण वेंचण्याची सधि आलेली आहे. कृतज्ञ लोक नेहमीं उपकारकर्त्याच्या उपकाराची फेड करीत असतात. कृतघ्न मात्र उपकारांची फेड अपकारानें करीत असतात.

दुर्योधन नुसता कर्णाच्याच भरंवशावर होता असें नाही. भीष्म-द्रोणांना प्रसन्न राखून त्याना आपल्या पक्षांत बांधून न ठेविल्यास आपला पक्ष बलहीन होण्याचा सभव आहे हें ओळखून त्यानें त्यांचा सन्मान राखून त्यांचा संग्रह करण्यासाठीं जें त्याला शक्य तें सर्व केलें होतें. शेवटी " बद्धोऽस्म्यर्थेन कौरवैः " अशी त्यांपैकी प्रत्येकाला लाजिरवाणी वाणी उच्चारून त्याच्याकडून लढणें भाग पडलें आहे. इतकेंच नव्हे तर त्यानें त्यांना ज्ञातिक्षयाचें भय दाखवून पांडव वनांत गेले त्या वेळींच आपल्याकडून लढण्याच्या वचनानें बांधून घेतलें होतें. हा वृत्तान्त सांगतांना तो म्हणतो :

वने प्रव्राजितान् पार्थान् यदाऽऽयान्मधुसूदनः ।
महता बलचक्रेण परराष्ट्रावमर्दिना ॥ २

कृष्णप्रधानाः संहत्य पर्युपासन्त भारत ॥ ५
प्रत्यादानं च राज्यस्य कार्यमूचुर्नराधिपाः ।
भवतः सानुबन्धस्य समुच्छेदं चिकीर्षवः ॥ ६
ते राज्ञो धृतराष्ट्रस्य सामात्यस्य महारथाः ।
वैरं प्रतिकरिष्यन्ति कुलोच्छेदेन पाण्डवाः ॥ १६
ततो द्रोणोऽब्रवीद्भीष्मः कृपो द्रौणिश्च भारत ।
मत्वा मां महतीं चिन्तामास्थितं व्यथितेन्द्रियम् ॥ १७
अभिद्रुग्धाः परे चेन्नो न भेतव्यं परन्तप ।
असमर्थाः परे जेतुमस्मान् युधि समास्थितान् ॥ १८
एकैकशः समर्थाः स्मो विजेतुं सर्वपार्थिवान् ।
आगच्छन्तु विनेष्यामो दर्पमेषां शितैः शरैः ॥ १९

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ५५

दुर्योधन म्हणतो : पाण्डव वनांत गेल्यावर परराष्ट्राचें मर्दन करूं शकण्याचें सामर्थ्य असलेलें आपलें सैन्य घेऊन श्रीकृष्णानें त्यांची वनांत भेट घेतली. कृष्णाच्या नेतृत्वाखालीं जमलेल्या सर्व लोकांनी राज्य परत घेतलें पाहिजे असा निश्चय करून राजा धृतराष्ट्राच्या कुलाचा समूळ उच्छेद करण्याची प्रतिज्ञा केली. अमात्यासहित राजा धृतराष्ट्राच्या कुलाचा समूळ उच्छेद करूनच आपल्या वैराचें उत्तर द्यावयाचें असा पाण्डवांनी केलेला निश्चय सर्वांना सांगितला. त्या-वेळीं मी अत्यंत चिताकुल झालों आहें हें पाहून भीष्म, द्रोण, कृपा-चार्य, अश्वत्थामा यांनी मला असें वचन दिलें कीं, दुसरे लोक जर आपला विद्वेष करीत आहेत तर तुला भिण्याचें कांहीच कारण नाहीं. आम्ही युद्धांत उभे राहिल्यावर हे लोक आमचा पराभव करण्यास पूर्णपणें असमर्थ आहेत. आम्ही एकएकटेदेखील त्या सर्वांचा नाश करूं शकतों. मग संघटितरीत्या उभे राहिल्यावर विचारा-वयासच नको. ते आमच्यावर चालून येत असतील तर त्यांचा सगळा गर्व आम्ही आमच्या तीक्ष्ण बाणांनीं नष्ट केल्यावांचून राहणार नाही.

आधींच या प्रकारें या धर्मनिष्ठ महारथींना त्यांची सत्यसंधता पाहून आपल्याकडे गुतवून ठेवण्यांत दुर्योधनानें केवढी अपूर्व दूर-दर्शिता व्यक्त केली आहे ! कर्ण त्याचा मित्र असून त्यानें सेना-

पतित्वाचा पहिला अभिषेक, भीष्म जिवंत असेपर्यंत मी हातांत हत्यार घेणार नाही असें म्हणून त्यांचा परित्याग करण्याची अप्रत्यक्ष सूचना दिली असतांही दुर्योधनानें त्याला दूर सारून भीष्मांनाच सेनापतित्वाचा पहिला अभिषेक केला. आपसातील सेनापतीची सर्व भांडणें त्यानें ज्या कुशलतेनें तोडलेलीं आहेत व परस्परांशी जीव घ्यावयास उठेपर्यंत तंडणारे सर्व लोक त्यांनी ज्या कुशलतेनें शेवटपर्यंत एकाच सूत्रांत बांधून ठेवले आहेत तें पाहिलें म्हणजे त्याच्या असामान्य नेतृत्वाची खात्री पटल्यावांचून राहात नाही. नुसतें 'विशिष्टन् देवकीपुत्रान्' तू कृष्णापेक्षांही थोर आहेस असें प्रेमळपणानें म्हणून शल्यासारख्या तीक्ष्ण मानधनाला त्यानें कर्णाचें सारथ्य करावयास लावलें आहे. प्रत्येक भांडणाच्या वेळी उत्तर गोग्रहणापासून तों कर्णवधापर्यंत कर्ण व द्रोणाचार्य, कर्ण व भीष्म, कर्ण व अश्वत्थामा, कर्ण व शल्य, या सगळ्यांचीं भांडणें त्यानें ज्या सफाईनें निकालांत काढली आहेत व तसें करतांना कोणालाही अप्रसन्न न करण्यांत त्यानें जें कौशल्य प्रकट केलें आहे तें पाहून मनुष्य थक्क झाल्यावांचून राहात नाही. आपआपसांत लोक कितीही भांडोत त्याच्यासाठीं मात्र सर्व प्राण द्यावयास सिद्ध आहेत ही गोष्ट त्याचें असामान्य नेतृत्वच सिद्ध करते. पण यासर्वांवर ताण करणारी व भगवान् श्रीकृष्णाचेंही अंत:करण क्षणभर स्तिमित करणारी गोष्ट म्हणजे त्याचें मृत्यूशींही झुंज घेऊन त्याला जिंकून टाकणारें अलौकिक धैर्य होय.

अलौकिक धैर्य

पाण्डवांशीं लढण्याचा त्याचा उत्साह त्याच्या बाजूच्या अनेक लोकांनीं कमी केल्यावर त्यानें त्यांना उत्तरादाखल जीं भाषणें केलीं आहेत त्यांत त्याचें अलौलिक धैर्य व्यक्त झालें आहे. ज्यांच्या भरंवशावर तू हें युद्ध उभारलेंस ते लोक तुला प्रतिकूल आहेत असें त्याला धृतराष्ट्रानें जाणविल्यावर व देवताही तुला प्रतिकूल आहेत असें सांगितल्यावर तो धृतराष्ट्राला उत्तर देतांना म्हणतो :

समर्थं मन्यसे यच्च कुन्तीपुत्रं वृकोदरम्।
तन्मिथ्या न हि मे कृत्स्नं प्रभावं वेत्सि भारत॥ ३१

मत्समो हि गदायुद्धे पृथिव्यां नास्ति कश्चन ।
नासीत् कश्चिदतिक्रान्तो भविता न च कश्चन ॥ ३२
युक्तो दुःखोचितश्चाहं विद्यापारगतस्तथा ।
तस्मान्न भीमान्नान्येभ्यो भयं मे विद्यते क्वचित् ॥ ३३
दुर्योधनसमो नास्ति गदायामिति निश्चयः ।
संकर्षणस्य भद्रं ते यत्तदैनमुपावसम् ॥ ३४
युद्धे संकर्षणसमो बलेनाभ्यधिको भुवि ।
गदाप्रहारं भीमो मे न जातु विषहेद्युधि । ३५
एकं प्रहारं यं दद्यां भीमाय रुषितो नृप ।
स एवैनं नयेद्घोरः क्षिप्रं वैवस्वतक्षयम् ॥ ३६
इच्छेयं च गदाहस्तं राजन् द्रष्टुं वृकोदरम् ।
सुचिरं प्रार्थितो ह्येष मम नित्यं मनोरथः ॥ ३७
गदया निहतो ह्याजौ मया पार्थो वृकोदरः ।
विशीर्णगात्रः पृथिवीं परासुः प्रपतिष्यति ॥ ३८

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ५५

नाहं भवति न द्रोणे नाश्वत्थाम्नि न सञ्जये ।
न भीष्मे न च काम्बोजे न कृपे नच बाह्लिके ॥ १०
सत्यव्रते पुरुमित्रे भूरिश्रवसि वा पुनः ।
अन्येषु वा तावकेषु भारं कृत्वा समाहृवयम् ॥ ११
अहं च तात कर्णश्च रणयज्ञं वितत्य वै ।
युधिष्ठिरं पशुं कृत्वा दीक्षितौ भरतर्षभ ॥ १२
रथो वेदी स्रुवः खड्गो गदास्रुक् कवचं सदः ।
चातुर्होत्रं च धुर्या मे शरा दर्भा हविर्यशः ॥ १३
आत्मयज्ञेन नृपते इष्ट्वा वैवस्वतं रणे ।
विजित्य च समेष्यावो हतामित्रौ श्रिया वृतौ ॥ १४
अहं च तात कर्णश्च भ्राता दुःशासनश्च मे ।
एते वयं हनिष्यामः पाण्डवान् समरे त्रयः ॥ १५
अहं हि पाण्डवान् हत्वा प्रशास्ता पृथिवीमिमाम् ।
मां वा हत्वा पाण्डुपुत्रा भोक्तारः पृथिवीमिमाम् ॥ १६

त्यक्तं मे जीवितं राज्यं धनं सर्वं च पार्थिव ।
न जातु पाण्डवैः सार्धं वसेयमहमच्युत ॥ १७
यावद्धि सूच्यास्तीक्ष्णाया विध्येदग्रेण मारिष ।
तावदप्यपरित्याज्यं भूमेर्नः पाण्डवान् प्रति ॥ १८
महाभारत, उदद्योगपर्व अध्याय ५८

मयाऽभिमन्त्रितः शश्वज्जातवेदाः प्रशाम्यति ।
दिधक्षुः सकलाँल्लोकान् परिक्षिप्य समन्ततः ॥ ९
यद्वा परमकं तेजो येन युक्ता दिवौकसः ।
ममाप्यनुपमं भूयो देवेभ्यो विद्धि भारत ॥ १०
—महाभारत, उदद्योगपर्व अध्याय ६१

कुन्तीपुत्र भीमसेन अत्यंत समर्थ आहे असें जे आपणांस वाटतें ते सर्वस्वी खोटे आहे. माझ्या प्रभावाची आपणास कल्पना नाही. या पृथ्वीवर माझ्यासारखा गदायुद्धात विचक्षण कोणीही नाही. इतकेंच काय पण असा कोणी पूर्वीही नव्हता व पुढेंही शक्य नाही. मी कष्टानें विद्या सपादन केली आहे त्यामुळें भीम किवा इतर कोणाहीपासून मला काडीइतकेही भय नाहीं. मी ज्यावेळीं बलरामांच्या जवळ गदायुद्धाचा अभ्यास केला, त्यावेळी दुर्योधनासारखा या युद्धप्रकारांत कोणीही विचक्षण नाही असें ते म्हणत असत. मी बलरामांप्रमाणे किवा त्यांच्यापेक्षांही अधिक समर्थ आहे. माझ्या गदेचा प्रहार भीम सहन करूं शकणार नाहीं. एक प्रहार जरी मी रागावून टाकला तरीही तो जिवत राहूं शकणार नाही. गदा हातांत घेऊन माझ्यावर चालून येणाऱ्या भीमाला पाहाण्याचीच माझी इच्छा आहे. एकदां मी त्याला ठार मारलें म्हणजे तो धुळींत तडफडत मरून पडेल. आपण, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, संजय, भीष्म, काम्बोज, कृपाचार्य, वाह्लीक, सत्यव्रत, पुरुमित्र, भूरिश्रवा इत्यादिकांच्या भरवशावर मी मुळींच पाण्डवांना आव्हान करीत नाही. मी व कर्ण या दोघांनी मिळून या रणयज्ञाची दीक्षा घेतली असून युधिष्ठिर हा पशु, रथ ही वेदी, खड्ग म्हणजेच स्रुवा, गदा म्हणजे स्रुक्, कवच हेंच सद्, धुरी म्हणजे चातुर्होत्र, बाण हेच दर्भ, यश हाच हविर्भाग, कल्पून आत्मयज्ञानें यमदेवतेला प्रसन्न करून घ्यावयाचा मीं

निश्चय केला आहे. शत्रूना ठार मारून विजय सपादन करणे हेंच या यज्ञाचें फल होय. मी, कर्ण व दुःशासन असे आम्ही तिघेच पांडवांना ठार मारू. मी पाण्डवांना ठार मारून या सर्व पृथ्वीचें राज्य करीन किंवा ते तरी मला ठार करून पृथ्वीचें राज्य करतील. मी जीवित, राज्य, धन इत्यादि सर्व गोष्टी गमवाव्या लागल्या तरीही पाण्डवांच्याबरोबर एकत्र म्हणून राहणार नाही. फार काय सुईच्या अग्रावर राहील इतकी मातीदेखील मी त्यांना देणार नाही. मी अभिमंत्रण केलें की सर्व लोकाना जाळावयास सिद्ध होणारा अग्नीदेखील शांत होतो. देव ज्या परम तेजानें युक्त आहेत त्यापेक्षाही माझे तेज अधिक प्रखर आहे.

दुर्योधन ज्यावेळीं ही वाक्ये बोलला त्यावेळी त्याच्याजवळ त्याचे सर्व सहायक तरी होते. पण ज्यावेळी त्याचे सर्व सहायक नष्ट झाले व त्याचा सर्वात मोठा भरंवशाचा वीर कर्णही अर्जुनाच्या हाताने मारला गेला, त्यावेळी उरलेले सर्व सुहृद, त्याला सधि करण्याचा उपदेश करीत असतांना, त्यानें त्यांना जी उत्तरें दिली आहेत त्यांत त्याच्या धैर्याचें खरें तेज तळपले आहे. कृपाचार्य त्याला संधीचा उपदेश करीत असता त्याने त्यांना जें उत्तर दिलें आहे तें या दृष्टीनें मननीय आहे. तो म्हणतो :

पाण्डवाना प्रसादेन भोक्ष्ये राज्यमहं कथम् ।
उपर्युपरि राज्ञां वै ज्वलित्वा भास्करो यथा ॥ २३
युधिष्ठिरं कथं पश्चादनुयास्यामि दासवत् ।
कथं भुक्त्वा स्वयं भोगान् दत्वा दायांश्च पुष्कलान् ॥ २४
नायं क्लीबयितुं कालः संयोद्धुं काल एव नः ।
इष्टं मे बहुभिर्यज्ञैर्दत्ता विप्रेषु दक्षिणाः ॥ २७
गृहे यत्क्षत्रियस्यापि निधनं तद्विगर्हितम् ।
अधर्मः सुमहानेष यच्छय्यामरणं गृहे ॥ ३२
कृपणं विलपन्नार्तो जरयाऽभिपरिप्लुतः ।
म्रियते रुदतां मध्ये ज्ञातीनां न स पूरुषः ॥ ३४
त्यक्त्वा तु विविधान् भोगान् प्राप्तानां परमां गतिम् ।
अपीदानीं सुयुद्धेन गच्छेयं यत्सलोकताम् ॥ ३५

शूराणामार्यवृत्तानां संग्रामेष्वनिवर्तिनाम् ।
धीमतां सत्यसन्धानां सर्वेषां क्रतुयाजिनाम् ॥ ३६
शस्त्रावभृथपूतानां ध्रुवं वासस्त्रिविष्टपे ।
मुदा नूनं प्रपश्यन्ति युद्धे हृष्टप्सरसां गणा. ॥ ३७
पश्यन्ति नूनं पितरः पूजितान्सुरसंसदि ।
अप्सरोभिः परिवृत्तान्मोदमानांस्त्रिविष्टपे ॥ ३८
ये मदर्थे हताः शूरास्तेषां कृतमनुस्मरन् ।
ऋणं तत्प्रतियुञ्जानो न राज्ये मन आदधे ॥ ४४
—महाभारत, शल्यपर्व अध्याय ५

सर्व राजांच्या मस्तकावर प्रखर सूर्याप्रमाणे तळपून आतां मी पांडवांच्या प्रसादानें राज्याचा उपभोग घेऊ काय ? स्वतःच्या सामर्थ्यानें अनेक प्रकारचे भोग भोगून व अनेकांना हवें तितकें देऊन आतां मी युधिष्ठिराच्या पाठीमागें एखाद्या दासाप्रमाणें चालू काय? मी अनेक प्रकारचे यज्ञ केले आहेत व विद्वान् ब्राह्मणांना खूप दक्षिणा दिलेली आहे. एखाद्या शूराप्रमाणे लढून मरण्याचा हा काळ आहे. पढाप्रमाणे शरणागतीचा नव्हे. क्षत्रियानें घरी शय्येवर मरणें हें निदास्पद तर आहेच, पण अधर्माचेंही आहे. लाचारीनें विलाप करीत आर्त होऊन, अगाला कांपरे भरून, आपले ज्ञातिबांधव सभोवार बसून रडत असतां जो मरतो, त्याला पुरुष म्हणत नाहीत. सर्व प्रकारचे भोग टाकून परम गतीला गेलेल्या अशा शूर, श्रेष्ठ, चारित्र्यसपन्न सग्रामात कधीही पाठ न दाखविणाऱ्या,बुद्धिमान्, सत्यसध व यजनशील अशा लोकांच्या गतीला मी जाईन. शस्त्राच्या अवभृथ स्नानानें पवित्र होऊन जे लोक रणांगणांत मरतात, त्यांना स्वर्गात चिरकाल स्थान मिळून अप्सरांचे संघ त्यांच्यावर लुब्ध होतात. माझ्यासाठी मेलेल्या शूरांनी माझ्यावर जें उपकारांचें ओझें करून ठेविलें आहे, त्यांतून मुक्त होण्यासाठीं मला युद्ध करणेंच आवश्यक आहे.

त्याचें सर्व सैन्य व बांधव मेल्यानंतर एकाकी अवस्थेंत तो डोहांत बसला असतां युधिष्ठिर आपल्या सैनिकांसह व बंधूंसह तीरावर उभा राहून त्याचा ज्या वेळी उपहास करूं लागला त्या वेळीं त्यानें दिलेलें उत्तरही त्याच्या अलौकिक धैर्याचें द्योतक आहे. तो म्हणतोः

अरथश्चानिषगी च निहतः पार्ष्णिसारथिः ।
एकश्चाप्यगणः संख्ये प्रत्याश्वासमरोचयम् ।। ३९
न प्राणहेतोर्न भयान्न विषादाद्विशांपते ।
इदमंभः प्रविष्टोऽस्मि श्रमात्त्विदमनुष्ठितम् ।। ४०
त्वं चाश्वसिहि कौन्तेय ये चाप्यनुगतास्तव ।
अहमुत्थाय वः सर्वान्प्रति योत्स्यामि संयुगे ।।४१
—महाभारत, शल्यपर्व अध्याय ३१

"माझ्याजवळ रथ नाही, भाते नाहीत, पृष्ठरक्षक व सारथी गेला, अशा स्थितीत माझा सर्वनाश झाल्यावर एकट्या मला जर थोडा वेळ विश्रांति घेणें अवश्य वाटले तर त्यात काय आश्चर्य आहे? केवळ श्रमामुळेच मी येथें बसलों आहें. प्राण वांचवावे म्हणून नव्हे. भय अथवा विषादाचा मला स्पर्शही नाही. तू थोडा वेळ विश्रांति घे, मीही घेतो व नतर मी एकटा तुम्हा सर्वाशी लढतों."

पुढे युधिष्ठिरानें वाटेल त्याच्याशी लढ म्हणून त्याला संधि दिली असतांना त्यानें भीमालाच आव्हान दिले. बलरामाच्या सूचनेवरून सर्व लोक कुरुक्षेत्राहून स्यमन्तपंचक क्षेत्रास युद्धार्थ जात असतां गदा खांद्यावर घेऊन कृतांताप्रमाणें एकटाच आपल्या गतीनें मदांध गजांनाही लाजवीत तो शत्रूच्या वाहनांची अपेक्षा न करतां पायीच जेव्हां जाऊं लागला, तेव्हां त्याच्या निर्भयतेनें कोणाचें अंतःकरण थरारलें नाही? देवांनींदेखील या अलौकिक धैर्यामुळें त्याचे स्तुतिपाठ गायिले असें महाभारतांत वर्णन आहे.

ततो दुर्योधनो राजा प्रगृह्य महतीं गदाम् ।
पद्भ्याममर्षी द्युतिमानगच्छत्पाण्डवैः सह ।। १२
तथाऽऽयान्तं गदाहस्तं वर्मणा चापि वंशित ।
अन्तरिक्षचरा देवाः साधु साध्वित्यपूजयन् ।। १३
वातिकाश्चारणा ये तु दृष्ट्वा ते हर्षमागताः ।। १४
—महाभारत, शल्यपर्व अध्याय ५५

"मग राजा दुर्योधन हातांत प्रचंड गदा घेऊन तेजानें तळपत पांडवांसहित पायींच जाऊं लागला. तेव्हां कवच अंगांत घातलेल्या

व गदा हातांत असलेल्या त्या धैर्यमूर्तीकडे पाहातांच चारण व सूत तर हर्षित झालेच पण देवही त्याची स्तुति करूं लागले. पुढें भीमानें अधर्मानें त्याच्या मांडीवर आघात करून त्याचा ज्या वेळीं वध केला त्या वेळी त्याच्या अलौकिक धैर्यानें प्रसन्न होऊन त्यांनी त्याला वरदानें तर दिलीच, पण भगवान् श्रीकृष्णही त्याच्या धैर्याने इतके भारले गेले होते कीं भीमाने त्याच्या मस्तकावर लाथ मारतांच त्याचे गतापराध विसरून त्यांनींही युधिष्ठिराला तसें होऊ दिल्याबद्दल पुढीलप्रमाणें ठपका दिला आहे —

दुर्योधनस्य भीमेन मृद्यमानं शिरः पदा ।
उपप्रेक्षसि कस्मात्त्वं धर्मज्ञः सन्नराधिप ।। ३४

—महाभारत, शल्यपर्व अध्याय ६०

भीमानें दुर्योधनाचें मस्तक पायाखाली तुडविलें ही गोष्ट धर्मज्ञ असूनही तू कशी सहन केलीस ? श्रीकृष्णांनी शेवटी त्याचा उपहास केल्यानंतर त्यानें त्यांना जें बाणेदार उत्तर दिलें आहे तें तर आजही अलौकिक धैर्याचें निदर्शन म्हणून हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखें आहे. महाभारतकार म्हणतातः——

अमर्षवशमापन्न उदतिष्ठद्विशांपते ।
स्फिग्देशेनोपविष्टः स दोर्भ्यां विष्टभ्य मेदिनीम् ।। २४
दृष्टि भ्रूसंकटां कृत्वा वासुदेवे न्यपातयत् ।
अधोन्नतशरीरस्य रूपमासीन्नृपस्य तु ।। २५
क्रुद्धस्याशीविषस्येवं छिन्नपुच्छस्य भारत ।
प्राणान्तकरिणीं घोरां वेदनामप्यचिन्तयन् ।। २६
दुर्योधनो वासुदेवं वाग्भिरुग्राभिरार्दयत् ।
कंसदासस्य दायाद न ते लज्जाऽस्त्यनेन वै ।। २७
अधर्मेण गदायुद्धे यदहं विनिपातितः ।
ऊरू भिन्धीति भीमस्य स्मृतिं मिथ्या प्रयच्छता ।। २८
अधीतं विधिवद्दत्तं भूः प्रशास्ता ससागरा ।
मूर्ध्नि स्थितममित्राणां को नु स्वन्ततरो मया ।
यविष्टं क्षत्रबन्धूनां स्वधर्ममनुपश्यताम् ।।

तदिदं निधनं प्राप्तं को नु स्वन्ततरो मया ।
देवार्हा मानुषा भोगाः प्राप्ता असुलभा नृपैः ॥ ५२
ऐश्वर्यं चोत्तमं प्राप्तं को नु स्वन्ततरो मया ।
ससुहृत्सानुगश्चैव स्वर्गं गन्ताहमच्युत ॥ ५३
यूयं निहतसंकल्पाः शोचन्तो वर्तयिष्यथ ।
न मे विषादो भीमेन पादेन शिर आहतम् ।
काका वा कंकगृध्रा वा निधास्यन्ति पदं क्षणात् ॥ ५४
—महाभारत, शल्यपर्व अध्याय ६१

याप्रमाणें कृष्णानें दुर्योधनाचा अधिक्षेप केल्यानंतर मांड्या मोडल्या होत्या तरी रागाच्या भरांत दोन हात भूमीवर टेकून तसाच तो शरीर त्या हातावर तोलून अर्धवट उठला व भिवई वक्र करून रागानें नेत्र लाल करून श्रीकृष्णाकडे पाहू लागला. त्याच्या प्राणांतिक वेदनादेखील तो या वेळी विसरला होता. छिन्नपुच्छ सर्पाप्रमाणें त्याचें त्या वेळचें स्वरूप भयानक होतें. कठोर वाक्यांनी श्रीकृष्णाला तो म्हणाला : हे कंसाच्या दासाच्या पोरा ! माझा उपहास करतांना तुला लाज वाटत नाही काय ? भीमाला माझ्या मांडीवर आघात करण्याचा सकेत करून तूच अधर्मानें मला मारले आहेस. या मरणाला दुर्गति म्हणतात काय ? मी अध्ययन केलें, विधिपूर्वक दानें दिली, समुद्रवलयांकित पृथ्वीचें राज्य केले, व शत्रूच्या डोक्यावर पाय देऊन उभा राहिलों. माझ्यासारखें उत्तम मरण कोणाला लाभले आहे ? क्षत्रियांना युद्धांत स्वधर्मानें लढतांना मरण येणे हेच प्रशसनीय आहे. राजांनाही मिळणार नाहीत असे, देवांनाच केवळ योग्य असे विलास मी भोगले. उत्तम ऐश्वर्यांत मी नांदलों व आतां सर्व सुहृद व बांधवांसहित स्वर्गास जाणार आहें. माझ्याइतकें चांगलें मरण कोणाला लाभलें ? तुम्ही मात्र विहतसकल्प होऊन नातलगांच्या आठवणीनें खुशाल रडत बसा. भीमानें माझ्या मस्तकाला पायानें स्पर्श केला याचा मला मुळींच विषाद वाटत नाहीं. कारण थोड्याच वेळांत कावळे व गिधाडें माझ्या शरीराला स्पर्श करणार आहेतच !

जेथें लोकांनी थरकांपावें तेथें 'अकुतोभय' वृत्ति दाखविणाऱ्या त्याच्या या असामान्य धैर्यानेंच त्याला सद्गति मिळालेली आहे. स्वर्गारोहणपर्वांत नारद युधिष्ठिराला सांगतांना म्हणतात :

दुर्योधनं प्रति नृपं शृणु चेदं वचो मम ॥ १२
एष दुर्योधनो राजा पूज्यते त्रिदशैः सह । १३
स एव क्षत्रधर्मेण स्थानमेतदवाप्तवान् ।
भये महति योऽभीतो बभूव पृथिवीपतिः ॥ १५

—महाभारत, स्वर्गारोहणपर्व अध्याय १

"हे राजा ! दुर्योधनाची देव प्रशंसा करीत आहेत व त्यानें हें जें स्थान मिळविलें त्याचें कारण ऐक. त्यानें क्षात्रधर्मानें हें स्थान मिळविलें आहे.

महान् भयाचा प्रसंग उत्पन्न झाला तरी त्याची निर्भय मृत्युंजय वृत्ति टिकून राहिली म्हणून तो या पदावर आला.

याप्रमाणें अलौकिक, धैर्यसंपन्न असूनही अभिलाषा, क्षुद्रता, क्रोध, मत्सर, महत्त्वाकांक्षा, अधमपणा, अनीतिमत्ता, दंश ठेवण्याची गहर्ष वृत्ति इत्यादि अनेक मानवतेला कलंक फांसणाऱ्या दुर्गुणांमुळें महाभारतकारांच्या मतें 'राजकलि दुर्योधन' हा 'कलीचाच अंश' ठरला आहे. त्याला स्वर्गात भलेंही स्थान मिळो. पण धर्म, न्याय व संस्कृति यांच्या शाश्वत मूल्यांच्या दृष्टीनें असे राजकलि वध्यच होत हें निर्विवाद आहे. भारतकालीन राज्यसंस्थेचें महर्षींनीं धृतराष्ट्र व दुर्योधनाच्या रूपाने चित्रित केलेलें हें अधःपतित स्वरूप सचिवसस्थेच्या निरीक्षणाशिवाय पुरे होणार नाही. दुःशासन, शकुनि व कर्ण यांच्या रूपानें या सचिवसस्थेचें अधःपतित स्वरूप महर्षींनीं रेखाटलें आहे तें आपण पुढच्या व्याख्यानांत पाहूं.

---

*

१३. दुःशासन व शकुनि

दुर्योधनाच्याबरोबर जीं नांवें उच्चारलीं जातात त्यांत दुःशासन हें नांव नेहमींच उच्चारलें जातें. तो दुर्योधनाचा धाकटा बंधु होता. तसेंच दुर्योधन, दुःशासन, शकुनि व कर्ण या सुप्रसिद्ध चांडाळ चौकडीचा तो एक सभासद होता. दुर्योधनावर त्याचें अपरंपार प्रेम आहे. राजा धृतराष्ट्रानें घोषयात्रेतील फजितीनंतर दुर्योधन ज्या वेळीं प्रायोपवेशन करून दुःशासनाला राज्य घेण्याचा आग्रह करूं लागला त्या वेळी दुःशासनानें मोठा शोक करून त्याच्यावांचून राज्य घेण्याचें नाकारले. त्याचें बधुप्रेम चांगलेंच तीव्र असून दुर्योधनाच्या प्रत्येक कृत्यांत एखाद्या छायेप्रमाणें तो त्याचा अनुचर राहिलेला आहे. दुर्योधन ज्या वेळीं प्रायोपवेशन करून राज्य घेण्याचा दुःशासनाला आग्रह करूं लागला त्या प्रसंगाचें वर्णन महाभारतकारांनी पुढीलप्रमाणें केलें आहेः—

तस्य तद्वचनं श्रुत्वा दीनो दुःशासनोऽब्रवीत् ।
अश्रुकण्ठः सुदु खार्तः प्राञ्जलिः प्रणिपत्य च ॥ २८
सगद्गदमिदं वाक्यं भ्रातरं ज्येष्ठमात्मनः ।
प्रसीदेत्यपतद् भूमौ दूयमानेन चेतसा ॥ २९
दुःखित. पादयोस्तस्य नेत्रजं जलमुत्सृजन् ।
उक्तवांश्च नरव्याघ्रो नैतदेवं भविष्यति ॥ ३०
विदीर्येत् सकला भूमिर्द्यौश्चापि शकलीभवेत् ।
रविरात्मप्रभां जह्यात् सोमः शीतांशुतां त्यजेत् ॥ ३१
वायुः शघ्न्यमथो जह्याद्धिमवांश्च परिव्रजेत् ।
शुष्येत् तोयं समुद्रेषु वह्निरप्युष्णतां त्यजेत् ॥ ३२
न चाहं त्वदृते राजन् प्रशासेयं वसुन्धराम् ।
पुनः पुनः प्रसीदेति वाक्यं चेदमुवाच ह ॥ ३३
त्वमेव नः कुले राजा भविष्यसि शतं समाः ।
एवमुक्त्वा स राजानं सुस्वरं प्ररुरोद ह ॥ ३४
पादौ संस्पृश्य मानार्हो भ्रातुर्ज्येष्ठस्य भारत ।

—महभारत, वनपर्व अध्याय २४९

व्याख्यान १३ वे, दि. ८ एप्रिल १९५१.

दुर्योधनाचें भाषण ऐकून दीन व दुःखानें आतुर झालेला दुःशासन सद्‌गदित होऊन, हात जोडून व नमस्कार करून भरल्या कंठानें प्रसन्न हो म्हणून आपल्या भावाची प्रार्थना करूं लागला. आपल्या डोळ्यांतील पाण्यानें त्यानें आपल्या ज्येष्ठ बंधूच्या पायावर अभिषेक केला व असें होणार नाही असें तो म्हणाला. पृथ्वी विदीर्ण होईल, द्युलोकाचे तुकडे पडतील, सूर्य आपलें तेज सोडील, अथवा चंद्र शीतलतेचा परित्याग करील, वायु गतीचा परित्याग करील, अग्नि आपली उष्णता टाकील, समुद्राचें पाणी आटेल, अथवा हिमाचल चालू लागेल, पण हे राजन् ! मी तुझ्या वांचून या पृथ्वीचें राज्य कधीही करणार नाहीं. तू माझ्यावर प्रसन्न हो. तूच आमच्या कुळांत दीर्घकाळपर्यंत राज्य कर ! असे म्हणून आपल्या ज्येष्ठ बधूचे पाय धरून तो गळा काढून जोरजोरानें रडू लागला.

बालिशता

दुःशासन हा पूर्णपणें परतंत्र बुद्धीचा असून जें जें दुर्योधन म्हणेल तें तें त्याच्यापेक्षां सवाईनें करून दाखवावें ही त्याची प्रवृत्ति होती. एक प्रकारचा पोरकटपणा त्याच्या वागण्यांत सर्वत्र दिसून येतो. या पोरकटपणाच्या जोडीलाच औद्धत्यही आहे. कसलेंही धोरण अथवा शहाणपणाचा अंशदेखील त्याच्या ठिकाणी असल्याचें दिसून येत नाही. त्याच्या या पोरकटपणाचें महाभारताच्या वनपर्वांत एक उदाहरण आलेलें आहे. दुर्योधनानें कर्णाच्या दिग्विजयानंतर विष्णुयाग केला त्यावेळी कोणालाच न कळवितां दुःशासनानें एक दूत हेतुतः चिडविण्यासाठीं पांडवांकडे पाठविला. भारतकार म्हणतातः—

तत्र कञ्चित् प्रयातं तु दूतं दुःशासनोऽब्रवीत् ॥ ७
गच्छ द्वैतवनं शीघ्रं पाण्डवान् पापपूरुषान् ।
निमन्त्रय यथान्यायं विप्रांस्तस्मिन् वने तदा ॥ ८

—महाभारत, वनपर्व अध्याय २५६

या दूत पाठविण्यांत बालिशतेशिवाय दुसरे काय असू शकेल ? करण पाण्डवांना त्यांत चीड आणण्यासारखें कांहींही नव्हतें. नुकतेंच त्यांच्या कृपाप्रसादावर जीवदान मिळालेल्या लोकांनीं द्यूताच्या

पौरुषहीन मार्गानें मिळविलेल्या धनानें केवढाही यज्ञ केला तरी त्यांत पांण्डवांना कमीपणा येण्याचें कांहींच कारण नाहीं. ही साधी गोष्ट ओळखण्याइतकी देखील त्याच्यांत बुद्धिमत्ता नव्हती. तो एक दुर्योधनाची छाया आहे इतकेंच. कदाचित् तो एखाद्या महापुरुषाच्या सहवासांत असता तर अद्वितीय बंधु म्हणून भारतवर्षाच्या इतिहासांत वाखाणण्यांतही आला असता. कारण त्याच्यासारखे लतावृत्तीचे लोक ज्या व्यक्तित्वाच्या वृक्षाच्या आश्रयानें असतात त्यांच्यावरच त्यांच्या वाढीची दिशा अवलंबून असते. जितक्या निष्ठेनें त्यानें दुर्योधनाचीं दुष्कृत्यें पार पाडलीं, तितक्याच निष्ठेनें युधिष्ठिरासारखा बंधु त्याला मिळता तर त्यानें सत्कृत्येंही पार पाडली असतीं. पण एका कलिपुरुषाच्या छायेंत कांही तरी अधिक करून दाखविण्याच्या मूर्खपणास भरीस पडून त्याच्या हातून अनन्वित कृत्यें झाली आहेत. दुर्योधनानें त्याचा आपल्या दुर्वासना शमविणाचें साधन म्हणून उपयोग करून घेतला व तो कमालीचा निर्लज्ज असल्यामुळें त्यानें तो तसा होऊही दिला. त्याला त्यात एक प्रकारचा आनदच वाटत होता. धृष्टतेंत, निर्लज्जपणांत, औद्धत्यात, व बालिशतेंत रममाण होण्याची कमालीची मानसिक विकृति त्याच्या रूपाने महर्षींनी रेखाटली आहे. त्याच्या घोर अपकृत्यांनी भारताच्या युद्धाला रौद्रता उत्पन्न झालेली आहे व शेवटीं भीमासारख्या पुरुषाला त्याच्या रक्तप्राशनासारखें भीषण कृत्य करण्यावांचून गत्यतर उरलेलें नाही. त्याच्या या विकृतीचा कळस म्हणजे द्रौपदीवस्त्रहरणाचें प्रकरण होय. निर्लज्जता, अधमपणा, त्याच्या त्या वेळच्या वर्तनांत जणू की काय उफाळून उठलेला आहे. महाभारतकारानी त्याच्या अधमपणाची चित्रे पुढीलप्रमाणे रेखाटली आहेत :—

दुःशासनैष मम सूतपूत्रो वृकोदरादुद्विजतेऽल्पचेताः ।
स्वयं प्रगृह्यानय याज्ञसेनीं किं ते करिष्यन्त्यवशाः सपत्नाः ॥ २५
ततः समुत्थाय स राजपुत्रः श्रुत्वा भ्रातुः शासनं रक्तदृष्टिः ।
प्रविश्य तद्वेश्म महारथानामित्यब्रवीद् द्रौपदीं राजपुत्रीम् ॥ २६
एहचेहि पाञ्चालि जितासि कृष्णे दुर्योधनं पश्य विमुक्तलज्जा ।
कुरून्भजस्वायतपत्रनेत्रे धर्मेण लब्धासि सभां परैहि ॥२७

ततः समुत्थाय सुदुर्मना सा विवर्णमामृज्य मुखं करेण ।
आर्ता प्रदुद्राव यतः स्त्रियस्ता वृद्धस्य राज्ञः कुरुपुङ्गवस्य ।। २८
ततो जवेनाभिससार रोषाद्दुःशासनस्तामभिगर्जमानः ।
वीर्घेषु नीलेष्वथ चोर्मिमत्सु जग्राह केशेषु नरेंद्रपत्नीम् ।। २९
ये राजसूयावभृथे जलेन महाक्रतौ मन्त्रपूतेन सिक्ताः ।
ते पाण्डवानां परिभूय वीर्यं बलात्प्रमृष्टा धृतराष्ट्रजेन ।।३०
स तां पराकृष्य सभासमीपमानीय कृष्णामतिदीर्घकेशीम् ।
दुःशासनो नाथवतीमनाथवच्चकर्ष वायुः कदलीमिवार्ताम् ।।३१
सा कृष्यमाणा नमिताङ्गयष्टिः शनैरुवाचाथ रजस्वलाऽस्मि ।
एकं च वासो मम मन्दबुद्धे सभां नेतुं नार्हसि मामनार्य ।।३२
ततोऽब्रवीत्तां प्रसभं निगृह्य केशेषु कृष्णेषु तदा स कृष्णाम् ।
कृष्णं च जिष्णुं च हरिं नरं च त्राणाय विक्रोशति याज्ञसेनी ।। ३३

दुःशासन उवाच ।

रजस्वला वा भव याज्ञसेनि एकाम्बरा वाप्यथवा विवस्त्रा ।
द्यूते जिता चासि कृतासि दासी दासीषु वासश्च यथोपजोषम् ।। ३४
दुःशासनश्चापि समीक्ष्य कृष्णामवेक्षमाणां कृपणान्पतींस्तान् ।
आधूय वेगेन विसंज्ञकल्पामुवाच दासीति हसन्स शब्दम् ।। ४४

—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

"दुर्योधन दुःशासनाला म्हणाला: हा सूतपुत्र भीमाला भितो आहे. तू स्वतःच जाऊन बलात्कारानें द्रौपदीला सभेंत घेऊन ये. आपल्या स्वाधीन असलेले हे शत्रू आपल्याला काय करणार आहेत? ज्येष्ठ बंधूची ही आज्ञा ऐकतांच नेत्र लाल करून तो राजपुत्र अंतःपुरांत गेला व द्रौपदीला म्हणाला : हे पांचालि! माझ्याबरोबर चल आम्हीं तुला जिकलें आहे. लाज सोडून दुर्योधनाला पहा. व हे कमलनेत्रे! कुरूंची सेवा कर. धर्मानें तूं आमची झाली आहेस. सभेंत चल. हें ऐकतांच अत्यंत कष्टी होऊन द्रौपदीचा चेहरा पांढरा पडला. दोन्ही हातांनी तोंड झांकून घेऊन वृद्ध कौरव स्त्रिया जेथें होत्या तिकडे ती जाऊ लागली. त्याबरोबर रागानें गर्जना करीत दुःशासन वेगानें तिच्या मागोमाग धांवला व त्यानें तिचे दीर्घ, कुरळे काळे केस धरून तिला ओढलें. राजसूय यज्ञांत ज्या केंसावर मंत्रपूत

जलांचा अभिषेक झाला, ते केस पांडवांच्या पराक्रमाचा अवमान करून दुःशासनानें बलात्कारानें हातांत घेतले. वायूनें ज्याप्रमाणें कदलीला त्रास द्यावा त्याप्रमाणें द्रौपदीला ओढीत दुःशासन सभेच्या जवळ आला व एखाद्या अनाथ स्त्रीप्रमाणें त्या सम्राज्ञीला तो सभेंत नेण्यासाठीं जोरानें ओढूं लागला. याप्रमाणें ओढली जात असता द्रौपदी त्याला म्हणाली, हे मूर्ख अनार्या, मी रजस्वला असून एकवस्त्रा आहे. अशा स्थितींत मला सभेत नेऊं नकोस. त्याबरोबर तिचे केस अधिकच बळकट धरून तिला खेचीत दुःशासन तिला म्हणाला. तू रजस्वला अस, एकवस्त्रा अस, अथवा विवस्त्र असलीस तरी चालेल. आम्ही तुला द्यूतांत जिकलें आहे. आम्ही तुला दासी केले आहे व दासीला वस्त्र असावें कीं नसावें हें ठरविणे तिच्या धन्याच्या इच्छेवर अवलंबून आहे. सभेंत खेचली जाणारी द्रौपदी आपल्या पतीकडे जेव्हां आर्त दृष्टीने पाहू लागली, तेव्हां दुःशासनाने तिला पुनश्च जोरानें खेचली. शरीराला व मनाला होणाऱ्या वेदनांनी ती ज्या वेळीं मूर्छित होण्याच्या अवस्थेंत आली त्या वेळीं गर्जना करून दुःशासन पुनः पुन्हां तिला दासी म्हणू लागला." कुलस्त्रीच्या अंगावर हात टाकून आपल्या वडीलधाऱ्या लोकांसमक्ष याप्रमाणें तिची अप्रतिष्ठा करणाऱ्या व्यक्तीला जगांत अकार्य असें काय असणार आहे? सारी अकार्यें करावयास तो अगदीं योग्य पुरुष आहे असें समजूनच कर्णानें द्रौपदीचें वस्त्र हिरावून घेण्याची त्याला आज्ञा केली. महाभारतकार म्हणतातः

ततो दुःशासनो राजन्द्रौपद्या वसनं बलात् ।
सभामध्ये समाक्षिप्य व्यपाकृष्टुं प्रचक्रमे ॥ ४०

—महाभारत, सभापर्व अध्याय ६८

भर सभेमध्यें दुःशासन द्रौपदीचें वस्त्र ओढूं लागला. या वेळी द्रौपदी त्याच्या समजुतीप्रमाणें दासी तरी होती अर्थात् दासीच्याही संबंधीं असें वर्तन क्षम्य मानलें जात नाहीं हें वेगळें. पण त्याचा निलाजरेपणा इतक्या परमावधीला पोहोंचलेला आहे कीं दास्यांतून मुक्त होऊन पांडव ज्या वेळीं दुसऱ्या द्यूतानंतर वनवासी होऊन अरण्यांत जाऊं लागले त्या वेळीं पुनश्च त्यानें द्रौपदीचा असाच घोर

अपमान करून सहसा राजपुरुषांना न शोभणारें अधमपणाचें वर्तन पाण्डवांशीं केलें आहे. महाभारतकार म्हणतात :—

महाप्राज्ञः सौमकिर्यज्ञसेनः कन्यां पाञ्चालीं पाण्डवेभ्यः प्रदाय ।
अकर्षीद्वै सुकृतं नेह किंचित् क्लीबाः पार्थाः पतयो याज्ञसेन्याः ॥ १०
सूक्ष्मप्रावारानजिनोत्तरीयान् दृष्ट्वारण्ये निर्धनानप्रतिष्ठान् ।
कां त्वं प्रीतिं लप्स्यसे याज्ञसेनि पतिं वृणीष्वेह यमन्यमिच्छसि ॥११
एवं ब्रुवाणमजिनैर्विवासितं दुःशासनस्तं परिनृत्यति स्म ।
मध्ये कुरूणां धर्मनिबद्धमार्गं गौर्गौरिति स्माह्वयन्मुक्तलज्जः ॥ १९

—महाभारत, सभापर्व अध्याय ७७

"पंचालराज यज्ञसेन हा शहाणा असतांही षढ पाण्डवांना द्रौपदी देऊन त्यानें मोठी चूकच केलेली आहे. या निर्धन पाण्डवांच्या पाठोपाठ जाऊन द्रौपदी, तुला कोणतें सुख मिळणार! त्यापेक्षां तू दुसरा एकादा पति कर. नंतर तो सर्व कौरवांच्यासमोर गाय, गाय, म्हणून मुक्तलज्ज स्थितीत भीमासमोर नाचून दाखवू लागला." पण त्यानें सापाच्या शेपटीवर पाय दिला होता. त्याचें उग्र फळ त्याला मिळालें. ज्या कर्णाच्या भरंवशावर त्यानें हें कुकृत्य केलें होतें त्या कर्णासमोरच भीमसेनानें पुढें युद्धांत त्याचे हालहाल करून त्याला ठार मारलें. ज्या हातानें त्यानें द्रौपदीची ही अप्रतिष्ठा केली होती तो हात भीमानें उखडून काढला व त्या हातानेंच त्याला झोडपून यमसदनास पाठविलें. मृत्यू देखील अशा नीचांना पुरेशी शिक्षा देऊं शकत नाहीं. ठार मारूनही भीमसेनाचें समाधान होईना. त्याच्या ज्या कंठनालांतून महापतिव्रता द्रौपदीला उद्देशून 'दासी' असे हीन शब्द निघाले तो चिरून त्यांतील उष्ण रक्ताचें कारंजें भीमानें रणभूमीवर उडविलें. व पुन्हां पुन्हां तो कंठनाल फोडून त्यांतील उष्ण रक्त ओठांना लावूनही तो अतृप्तच राहिला. तात्पर्य, दुःशासन ही दुर्योधनरूपी कलिपुरुषाची छाया असून लतावृत्ति, कसलेंही कुकर्म करण्याची सिद्धता, औद्धात्य, धृष्टता व बालिशता यांचा तो मूर्त आविष्कार होय. पण दुर्योधनाच्या सचिवांत व परिवारांत दुःशासन हा जर उघड दुष्ट असेल तर शकुनि हा खल पुरुषांच्या विशिष्ट गूढतेचा नमुना

म्हणतां येईल. कोणतीही गोष्ट आपण प्रेरिल्यामुळें झालेली आहे असें मुळींच न दाखवितां ती घडविण्याचें त्याचें कसब असामान्य आहे. राजा धृतराष्ट्राइतका तो चतुर नसला तरी त्याचे मार्ग धृतराष्ट्राच्या मार्गाप्रमाणेंच गूढ आहेत. द्यूत त्यानेंच केलें असलें तरी प्रत्यक्ष दुर्योधनालाही शकुनीनें प्रोत्साहित केलें म्हणून आपण द्यूत खेळलों असें म्हणतां आलें नसतें. उलट हालवून खुटा बळकट करावा या न्यायानें त्यानें दुर्योधन आपल्या निश्चयावर किती स्थिर आहे याचा निश्चित शोध घेऊन नंतरच द्यूताचें सूतोवाच केलें आहे.

गांधारराज शकुनि

गांधारराज शकुनि हा जरी गांधारांचा राजा असला तरी दुर्योधनाच्या परिवारांतच तो नित्य राही. गांधारी व शकुनि हीं दोन अपत्यें एकाच कुळांतील असूनही एक व्यक्ति मानवजातीचा सदाचा अलंकार होऊन बसली तर दुसरी सर्व प्रकारच्या कापट्याचा केवळ अर्क होऊन राहिली. एकाच वेलीवरचें एक अमृतफळ आहे. तर दुसरें विषफळ आहे. तो द्यूतविद्येंत अत्यंत प्रवीण होता. पण आपण दुर्योधनाला द्यूत खेळावयास लाविलें असें प्रत्यक्ष त्यालाही म्हणतां येऊं नये याची काळजी घेऊनच आपल्या कार्यस्थानास त्यानें सुरुवात केली आहे. राजसूयावरून परत येतांना दुर्योधन ज्या वेळीं पांडवांविषयींच्या आपल्या मर्यादातीत मत्सराचें प्रदर्शन करूं लागला त्या वेळीं याचें अंतःकरण क्षत्रियाप्रमाणें पराक्रम करून संपत्ति मिळविण्याइतके तेजस्वी आहे कीं हव्या त्या क्षुद्र मार्गानें हा जावयास सिद्ध आहे हें पहाण्याआधीं द्यूतासारख्या हीन मार्गाचा प्रस्ताव करणें त्याला सुरक्षित वाटलें नाही. म्हणून त्यानें त्याची परीक्षा घेण्याच्या हेतूनें अत्यंत धूर्ततेचें भाषण केलें आहे. तो म्हणतो :—

दुर्योधन न तेऽमर्षः कार्यः प्रति युधिष्ठिरम् ।
भागधेयानि हि स्वानि पाण्डवा भुञ्जते सदा ॥ १
विधानं विविधाकारं परं तेषां विधानत. ।
अनेकैरभ्युपायैश्च त्वया न शकिताः पुरा ॥ २

आरब्धापि महाराज पुनःपुनरिंदम ।
विमुक्ताश्च नरव्याघ्रा भागधेयपुरस्कृताः ॥ ३
तैर्लब्धा द्रौपदी भार्या द्रुपदश्च सुतैः सह ।
सहायः पृथिवीलाभे वासुदेवश्च वीर्यवान् ॥ ४
लब्धश्चानभिभूतार्थैः पित्र्यंशः पृथिवीपते ।
विवृद्धस्तेजसा तेषां तत्र का परिदेवना ॥ ५
धनंजयेन गाण्डीवमक्षय्यौ च महेषुधी ।
लब्धान्यस्त्राणि दिव्यानि तोषयित्वा हुताशनम् ॥ ६
तेन कार्मुकमुख्येन बाहुवीर्येण चात्मनः ।
कृता वशे महीपालास्तत्र का परिदेवना ॥ ७
अग्निदाहान्मयं चापि मोक्षयित्वा सदानवम् ।
सभां तां कारयामास सव्यसाची परंतपः ॥ ८
तेन चैव मयेनोक्ताः किंकरा नाम राक्षसाः ।
वहन्ति तां सभां भीमास्तत्र का परिदेवना ॥ ९
यच्चासहायतां राजन्नुक्तवानसि भारत ।
तन्मिथ्या भ्रातरो ह्येमे तव सर्वे वशानुगाः ॥ १०
द्रोणस्तव महेष्वासः सहपुत्रेण वीर्यवान् ।
सूतपुत्रश्च राधेयो गौतमश्च महारथः ॥ ११
अहं च सह सोदर्यैः सोमदत्तिश्च पार्थिवः ।
एतैस्त्वं सहितः सर्वैर्जय कृत्स्नां वसुंधराम् ॥ १२
—महाभारत, सभापर्व अ. ४८

"हे दुर्योधना ! तूं युधिष्ठिराचा मत्सर करणें योग्य आहे असें मला वाटत नाहीं. पाण्डव आपल्या भाग्यानेंच ऐश्वर्यास चढले आहेत. तूं अनेक उपायांनीं त्यांना मारण्याचे आजवर प्रयत्न केलेस पण ते सर्व फसून आपल्या भाग्यानें ते वैभवास चढले. त्यांना द्रौपदीसारखी पत्नी मिळाली, मोठमोठ्या राजांचें साहाय्य मिळाले, श्रीकृष्णासारखा समर्थ सहकारी मिळाला, व त्यांनीं स्वतःचें हक्काचें राज्य स्वसामर्थ्यानें वाढविलें. अर्जुनाला अग्नीच्या प्रसादानें दिव्य अस्त्रें व गाण्डीवासारखें श्रेष्ठ धनुष्य मिळून त्यानें आपल्या कर्तृत्वानें सर्व पृथ्वी जिंकली. त्यानें आपल्याच कर्तृत्वानें शिल्पकार मय दानवाला

उपकारबद्ध करून उत्कृष्ट मयसभा निर्माण केली. आपल्या कर्तृत्वानें याप्रमाणें अपार ऐश्वर्य मिळवून भाग्यास चढलेल्या लोकांचा नुसता मत्सर करून उपयोग काय? तूही कांहीं असहाय नाहीस. तुझेही सर्व भ्राते तुझ्या स्वाधीन आहेत. अश्वत्थामा व महापराक्रमी द्रोणाचार्य, महारथी कृपाचार्य व कर्ण हे तुझे सहायक आहेत. मीही तुझे साहाय्य करावयास सिद्ध आहे. नुसता मत्सर करून स्वतःला त्रास करून घेण्याऐवजी तू विजय संपादन करून ऐश्वर्यसंपन्न कां होत नाहींस?"

हें नुसतें भाषण वाचून कोणालाही शकुनीने केवळ सद्बुद्धीनेंच भाषण केले आहे असें वाटेल, पण वास्तविक तें तसें नाही. त्यानें हा प्रस्ताव करतांच दुर्योधन त्याला असें म्हणू लागला की, सर्व सहायकांसह जग जिकण्याचा स्वतंत्र उद्योग करण्यापेक्षां पाण्डवच आज जगाचे धनी असल्यामुळे त्यांनाच जर जिकले तर अनायासेंच जग जिकल्यासारखे होईल. त्यावर शकुनीनें ज्या धूर्ततेनें द्यूताचा प्रस्ताव केलेला आहे तो पाहिला म्हणजे त्याचें वरील भाषण त्याच्या पुढच्या कौटिल्याची नांदी वाटल्यावांचून राहात नाही. तो म्हणतो :

धनंजयो वासुदेवो भीमसेनो युधिष्ठिरः ।
नकुलः सहदेवश्च द्रुपदश्च सहात्मजैः ॥ १५
नैते युधि पराजेतुं शक्या देवगणैरपि ।
महारथा महेष्वासाः कृतास्त्रा युद्धदुर्मदाः ॥ १६
अहं तु तद्विजानामि विजेतुं येन शक्यते ।
युधिष्ठिरं स्वयं राजंस्तन्निबोध जुषस्व च ॥ १७

दुर्योधन उवाच ।

अप्रमादेन सुहृदामन्येषां च महात्मनाम् ।
यदि शक्या विजेतुं ते तन्ममाचक्ष्व मातुल ॥ १८

शकुनिरुवाच ।

द्यूतप्रियश्च कौन्तेयो न स जानाति देवितुम् ।
समाहूतश्च राजेन्द्रो न शक्यति निवर्तितुम् ॥ १९
देवने कुशलश्चाहं न मेस्ति सदृशो भुवि ।
त्रिषु लोकेषु कौरव्य तं त्वं द्यूते समाह्वय ॥ २०

तस्याक्षकुशलो राजन्नामस्येहमसंशयम् ।
राज्यं श्रियं च तां दीप्तां त्वदर्थं पुरुषर्षभ ।। २१
इदं तु सर्वं त्वं राज्ञे दुर्योधन निवेदय ।
अनुज्ञातस्तु ते पित्रा विजेष्ये ताम्न संशयः ।। २२

—महाभारत सभापर्व अध्याय ४८

"हे दुर्योधना ! धनजय, वासुदेव, भीमसेन, युधिष्ठिर नकुल, सहदेव, व आपल्या मुलांसहित द्रुपद यांचा पराभव देवांनादेखील करतां येणे शक्य नाहीं. हे सर्व महारथी असून कृतास्त्र व खंदे लढवय्ये आहेत. युधिष्ठिराला कसें जिकावें तें मला माहीत आहे. तुझी सिद्धता असेल तर मी सांगतो.

"दुर्योधनाने त्याला म्हटले की, आपल्यापैकी कोणाचा विनाश न होता असा कांही उपाय असला तर सांग.

"त्यावर शकुनि म्हणाला· युधिष्ठिर द्यूतप्रिय असून त्याला द्यूत कसें खेळावें तें मात्र माहीत नाही व आव्हान दिलें तर तें नाकारतां येणें त्याला शक्य होणार नाही. मी अत्यंत कुशल द्यूतकार असून त्रैलोक्यांत माझ्यासारखा कुशल द्यूतकार नाही. तू त्याला आव्हान दे. त्याची सर्व राज्यलक्ष्मी मी द्यूतांत जिकून तुझ्या स्वाधीन करतों. मात्र तू आपल्या पित्याची संमति घे. "

किती खुबीनें शकुनीनें द्यूताची प्रस्तावना केलेली आहे ! जणू कीं काय केवळ दुर्योधन म्हणतो म्हणूनच त्याला आतां द्यूत खेळावें लागणार आहे. तात्पर्य तो अत्यंत सावध आहे. दुराचारांतलें प्रत्येक पाऊल टाकतांना दुर्योधनाच्या अंतःकरणाचा ठाव घेत त्यानें तें टाकलेलें आहे. एरवीं त्याच्या दुष्टतेचें वर्णन करतांना द्रौपदीची अप्रतिष्ठा करण्याच्या दुःशासनाच्या कामगिरीबद्दल त्यानें त्याचें अभिनदन केल्याचें महाभारतांत स्पष्ट उल्लेखिलें आहे.

गान्धारराजः सुबलस्य पुत्रस्तथैव दुःशासनमभ्यनन्दत् ।। ४५

—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

राजसत्तेला आपल्या कच्छपी लावन तिच्या सूत्रचालकांना त्यांचे वाटणारें प्रत्येक श्रेय आपल्यामुळेंच झालेलें आहे असें दाख-

विण्याची जी कांही लोकांची विशिष्ट पद्धति असते तिचें शकुनि हे निदर्शनच होय. पाण्डवांनीं घोषयात्रेत दुर्योधनाला जीवदान दिल्यानंतर दुर्योधनाच्या अंतःकरणांत त्यांच्याविषयीं कृतज्ञेचे भाव उत्पन्न झाले आहेत की काय हें पाहण्यासाठी त्याने त्यास पाण्डवांशी शक्यतर सौभ्रात्र राखून आपली कीर्ति व यश वाढविण्याचा उपदेश केलेला आहे. तो म्हणतोः

यत्र हर्षस्त्वया कार्यः सत्कर्तव्याश्च पाण्डवा· ।
तत्र शोचसि राजेंद्र विपरीतमिदं तव ।। ७
प्रसीद मा त्यजात्मानं तुष्टश्च सुकृतं स्मर ।
प्रयच्छ राज्यं पार्थानां यशो धर्ममवाप्नुहि ।। ८
क्रियामेतां समाज्ञाय कृतज्ञस्त्वं भविष्यसि ।
सौभ्रात्रं पाण्डवैः कृत्वा समवस्थाप्य चैव तान् ।। ९ ।।
पित्र्यं राज्यं प्रयच्छैषां ततः सुखमवाप्स्यसि ।

—महाभारत, वनपर्व अध्याय २५१

"जेथें तू आनंदित होऊन पाण्डवांचा सत्कार करावा तेथे तू शोक करीत आहेस हें किती विपरीत आहे? आपला जीव देऊं नकोस तो वांचल्याबद्दल आनंद मान. पाण्डवांना राज्य दे. स्वतःचें तुला कांही द्यावयाचें आहे असें मुळींच नाहीं. या उपकाराच्या जाणिवेने त्यांच्या पित्याचाच अश त्यांना देऊन तू कृतज्ञताबुद्धि प्रकट केलीस तर त्यांत तुझीच कीर्ति वाढणार आहे." शकुनीची कृतज्ञताबुद्धि हें बोलत नसून पाण्डवांनी केलेल्या उपकाराच्या जाणिवेनें लज्जित होऊन जीव द्यावयास निघालेल्या दुर्योधनाच्या अंतःकरणांतील खळबळीचें संपूर्ण ज्ञान व्हावें म्हणून शकुनीनें चातुर्यानें योजिलेली ही एक 'मधुजिव्ह' युक्ति आहे. जर त्याच्या अंतःकरणांत खरोखरी सद्वासनांचा अंश असता तर त्यानें द्यूताची कल्पना काढण्याऐवजीं दुर्योधनाला स्वतंत्रपणें दिग्विजयासच प्रोत्साहन दिलें असते किंवा युधिष्ठिराशीं सख्य करून त्याच्या साहाय्यानें आपलें ऐश्वर्य वाढविण्याविषयीं प्रोत्साहित केलें असतें. या दुसऱ्या प्रकरणीं देखील घोषयात्रेच्या निमित्तानें पाण्डवांचा उपहास करून त्यांत आनंद मानण्याची क्षुद्र कल्पना शकुनीच्याच अंतःकरणांत उत्पन्न झालेली आहे. महाभारतांत त्याचें पुढीलप्रमाणें वर्णन आहेः——.

धृतराष्ट्रस्य तद्वाक्यं निशम्य शकुनिस्तदा ।
दुर्योधनमिद काले कर्णेन सहितोऽब्रवीत् ।। १
यै. स्म ते नाद्रियेताज्ञा न च ये शासने स्थिताः ।
पश्यामस्तान् श्रिया हीनान् पाण्डवान् वनवासिनः ।। १२
स्थितो राज्ये च्युतान्राज्याच्छ्रिया हीनाञ्छ्रिया वृतः ।
असमृद्धान समृद्धार्थः पश्य पाण्डुसुतान् नृप ।। १५
सुवाससो हि ते भार्या वल्कलाजिनसंवृताम् ।
पश्यन्तु दुःखितां कृष्णां सा च निर्विद्यतां पुनः ।।२१
विनिन्दतां तथाऽऽत्मानं जीवितं च धनच्युतम् ।
न तथा हि सभामध्यें तस्या भवितुमर्हति ।
वैमनस्यं यथा दृष्ट्वा तव भार्याः स्वलङ्कृताः ।। २२
—महाभारत, वनपर्व अध्याय २३७

"धृतराष्ट्राचें वाक्य ऐकून शकुनि कर्णासहित त्याला म्हणाला की तुझी आज्ञा न ऐकणारे व तुझ्या नियत्रणात नसलेले पाण्डव आज धनहीन झालेले आहेत. त्याच्या या दीन वनवासी अवस्थेंत आपण जर त्याना पाहू शकलों तर फार चांगले होईल. मला वाटतें आपण वनांत पाण्डव आहेत तेथें जावें. तू राज्यावर आहेस, ते राज्यभ्रष्ट झाले आहेत. तू वैभवसपन्न आहेस, ते धनहीन आहेत. तुझ्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या आहेत, त्यांचे सर्व मनोरथ भग्न झाले आहेत. अशा स्थितीत तू त्यांना पहाणें केवढें आनदाचें होईल? उत्तम वस्त्रे परिधान केलेल्या तुझ्या स्त्रियांनी लक्तरे नेसलेल्या, दु.खी द्रौपदीला पहावें, त्यांचें वैभव पाहून स्वत:ची निदा करीत द्रौपदी जेव्हां विषण्ण होईल त्या वेळी तिला पहाणें हा केवढा भाग्याचा क्षण ! सभेंत आपण तिची अप्रतिष्ठा केलीच आहे. पण अलंकृत अशा तुझ्या स्त्रियांना पाहून तिच्या चेहऱ्यावर जे भाव दिसतील ते पाहणें त्याहूनही अधिक रोचक आहे." इतके हीन विचार अंत:करणांत बाळगणारी व्यक्ति मार्गदर्शनाच्यासंबंधी दुर्योधनाच्या आचार्यपदावर विराजमान झाली होती हें ध्यानांत घेतलें म्हणजे सचिवसंस्थेच्या अध:पतनाचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहिल्याशिवाय राहात नाहीं. धृतराष्ट्रापासून शकुनीपर्यंतच्या भारतांतील व्यक्तिचित्रांचें निरीक्षण करून राज्य-

सस्था व सचिवसंस्था किती अधःपतित झाली होती हें आपण आतां-पर्यंत पाहिलें आहे. पण या संस्थांचें नियंत्रण करणें कुरु राज्यांतील तत्कालीन पराक्रमी नि धर्मनिष्ठ लोकांना का अशक्य झालें असेल? राजा धृतराष्ट्र स्वतः अंध असल्यामुळे दुर्बल होता. किबहुना त्याच्या कापट्याचा जन्म त्याच्या अंधतेमुळें उत्पन्न झालेल्या अगतिकतेंतूनच झालेला आहे. दुर्योधन कितीही दुष्ट व निर्भय असला तरी पाण्डवां-सारख्या सर्वास्त्रज्ञ व अत्यंत बलसंपन्न अशा लोकांशी उघड उघड वैर पत्करून शेवटपर्यंत ते तसेंच तडीला नेणें त्याला एकट्याला केवळ अशक्य आहे. पाण्डवांच्या सामर्थ्याची त्याला पूर्णपणें जाणीव आहे. भीष्मद्रोणादि महास्त्रज्ञ त्याच्या अतःकरणांतील हीन विचा-रांच्या प्रथमपासूनच विरोधी आहेत. या गोष्टीचीही त्याला पूर्णपणे जाणीव आहे. शकुनि अथवा दुःशासन हेही ज्याच्याशी त्याला वैर करावयाचें आहे त्यांच्या तुलनेनें अत्यंत सामर्थ्यहीन आहेत याची त्याला पूर्णपणें जाणीव आहे. अशा स्थितीत कोणाच्या भरंवशावर राजा दुर्योधन व त्याची सचिवसस्था स्वतःच्या कर्तृत्वावर साम्राज्य उभारणाऱ्या महान् शक्तीशीं द्वंद्व खेळावयास सिद्ध झाली असेल? भारताचें युद्ध हें इतिहासकाळांतील अतिशय भीषण युद्ध असून त्या युद्धांत केवळ अठरा दिवसांत लक्षावधि मनुष्यांचा प्रचड संहार झालेला आहे. ही गोष्ट घडून यावयास अधःपतित राज्यसत्तेला कित्येक दिवस आपल्या महत्त्वाकांक्षेचें थैमान घालावयास अवसर मिळाला असला पाहिजे. हा अवसर सामर्थ्याच्या भक्कम पार्श्वभूमी-वांचून मिळूं शकणार नाही हें उघड आहे. या राज्यसत्तेच्या पाठीशी अशी कोणती भक्कम स्वरूपाची शक्ति उभी राहिली असेल की जिच्यामुळें तिचें नियंत्रण थोडक्यांत न होतां तिचें आसुरी तांडव कित्येक दिवस चालून व लक्षावधि लोकांचें बलिदान घेऊन नंतरच थांबलें? ती प्रचंड शक्ति म्हणजे महारथी कर्ण होय.

१६. राजर्षि भीष्म

राजा धृतराष्ट्र व दुर्योधन यांच्या रूपानें आपण ज्याप्रमाणें धर्म, तपस्वी सत्ता, व पौरजानपद यांच्या नियंत्रक सत्तेचें नियंत्रण झुगारून देणारी अध पतित राज्यसंस्था पाहिली, त्याचप्रमाणें दु.शासन, शकुनि व कर्ण यांच्या रूपानें समर्थ पण विकारवश, क्षुद्र, नृशस व स्वत.च्या महत्त्वाकांक्षेसाठीं जगांतील वाटेल त्या गोष्टीचे बलिदान द्यावयास सिद्ध असलेल्या सचिवसत्तेचेंही स्वरूप आपण पाहिलें. "असत्पापिष्ठसचिवो वध्यो लोकस्य धर्मः।" या शाश्वत न्यायानुसार ही राज्यसस्था वध्य झाली होती. कारण तिला सुधारण्यास दुसरी कोणतीही शक्ति समर्थ नव्हती. त्या वेळी विशुद्ध सचिवसंस्था नव्हतीच काय असा प्रश्न उपस्थित होईल. होती असें त्याचें उत्तर आहे. राजर्षि भीष्म, विदुर, नि गांधारी यांच्या रूपाने या विशुद्ध सचिवसंस्थेचें महाभारतकारांनी चित्रण केलें आहे. पण ती सचिवसस्था विशुद्ध असली तरी राज्यसंस्थेवरचें तिचें नियंत्रण अजिबात सपलेलें होतें. त्यामुळें एरवी रामायणासारख्या सामाजिक विकसनांत तिचा जो उपयोग होऊं शकला असता तो मुळीच होऊ शकला नाही. ती अस्तित्वांत असतांनाही राज्यसंस्थेच्या उपहासाचा विषय बनली व राज्यसंस्थेला नष्ट करून टाकण्याचें आत्यंतिक साधन तिनें न वापरल्यामुळें शेवटीं ती त्या सस्थेबरोबरच नियतीच्या विकराल दाढेखाली पार रगडली गेली. या सचिवसंस्थेचें स्वरूप काय आहे तें महाभारताचे प्रणेते महर्षि व्यास यांच्या दिव्य प्रतिभेचा मागोवा घेत आपण पाहूं.

राजर्षि भीष्म

राजर्षि भीष्मासंबंधानें अनेक प्रकारचे अपसमज पसरले आहेत. कोणी म्हणतात की म्हाताऱ्या शांतनूसाठीं ब्रह्मचर्याची भलतीच

व्याख्यान १६ वे, १७ वे व १८ वे दि. १२, १३ व १५ एप्रिल १९५१

प्रतिज्ञा करून त्यांनींच एकंदर कौरवकुलाचा नाश केला. जर भीष्मांनीं विवाह केला असता तर त्यांच्या विशुद्धतेमुळें त्यांना अत्यंत उत्कृष्ट संतति लाभून पुढें दुर्योधनासारख्या कुसंततीनें कौरव कुलाचें व त्याच्याबरोबर साऱ्या भारतवर्षाचें जें निसंतान झालें तें खात्रीनें झालें नसतें. या मुद्द्यावर 'भीष्मांची भयंकर भूल' या शीर्षकाखालीं मागें एकदां एका सुप्रजाजननशास्त्राच्या आंधळ्या भक्तानें एक लेखही लिहिला होता. दुसऱ्या कित्येकांचें असें म्हणणें आहे की, द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळी भीष्मांनी मौन स्वीकारून सारा घात केला. त्यांच्या अंगांत अपार सामर्थ्य होतें. त्यांनीं उठून आपल्या बाहुबलानें राजा दुर्योधनाचा बंदोबस्त करून एका सतीची अब्रू कां वांचविली नाही ? जर त्यांनी तसें केलें असतें तर पांडवांचा वनवास टळून पुढे महाभारतीय युद्धापर्यंत जें प्रकरण शिजलें व त्यांत जो भयानक मानवसहार झाला तो खात्रीनें झाला नसता. आणखी कित्येकांचें असें मत आहे की, भीष्मासारख्या पुरुषांनी आपल्या जीवनांत उपजीविकेला अत्यंत महत्त्वाचें स्थान देऊन पैशासाठी लाचारी स्वीकारावी ही गोष्ट अत्यंत अनुचित होय. वास्तविक सत्पक्ष जर पांडवांचाच होता व तशी भीष्माचीही खात्री होती, तर त्यानी पाडवांच्याच पक्षाकडून लढणें व कौरवांसारख्या दुराचारी, कुलीन स्त्रियाची अब्रू घ्यावयास उठलेल्या नि लोकांचे राज्य गिळंकृत करूं पहाणाऱ्या लोकांना युद्धांत ठार मारावयास हवें होतें. त्याऐवजी 'अर्थस्य पुरुषो दासः' 'मी पैशांचा दास आहे' असे लाचारीचे उद्‌गार काढून त्यांनी पैशासाठी दुर्योधनाचा पक्ष स्वीकारावा याच्याइतकी वाईट गोष्ट दुसरी कोणची असू शकेल ? बरें, कौरवांचा पक्ष स्वीकारला तरी त्या पक्षाशी तरी ते एकनिष्ठ राहिले काय ? तेथेंही त्यांच्या वागण्यांत किती तरी जरतरीपणाचा (Ifs and buts) प्रकार आहेच. ते लढतात पण पांडवांना मारणार नाही म्हणतच लढतात. मुख्य युद्धच जर कौरवपांडवांचें आहे तर त्यांना मात्र हात न लावतां इतरांसाठी आपल्या महास्त्रांचा खाटिकखाना उघडण्याचे त्यांना काय कारण ? दुसरें, शरीरानें दुर्योधनाकडून लढतों म्हणतात पण हिताचा सल्ला मात्र पांडवांच्या पक्षाला

देण्याचें पत्करतात. या दुटप्पी व दुहेरी वर्तनाचें समर्थन कसें होणार? शेवटीं ते इच्छामरणी असूनही आपल्या मरणाचा उपाय ते पांडवांना सांगून मोकळे होतात ही दुर्योधनाची वंचनाच नव्हे काय व भीष्मासारख्या महापुरुषांनी ही वंचना काय म्हणून करावी?

राजर्षि भीष्मांवर असलेल्या आरोपांचें स्वरूप सामान्यत: हें असें आहे. या आक्षेपांपैकी बहुतेक आक्षेप केवळ महाभारत संहिता न वाचल्यामुळेंच उद्‌भवलेले आहेत, तर कांही वाचूनही विचार न केल्यामुळें उद्‌भवलेले आहेत. उदाहरणार्थ शांतनु हा वृद्ध होता व सत्यवती ही बाला होती असा महाभारतांत उल्लेख नाहीं. दुसरें लग्न करावयाच्या वेळीं मनुष्य वृद्धच असला पाहिजे हा एक अजब शोध आहे. त्यामुळें शांतनु–सत्यवती विवाह हें बाला–जरठ विवाहाचें उदाहरण समजण्याचें कांहीं एक कारण नाही. तसेंच "अर्थस्य पुरुषो दासः" यांतील अर्थ शब्दाचा अर्थ 'पैसा' असा करणें चुकीचें आहे ही साधी गोष्टही कां लक्षांत येऊं नये हें समजत नाही. प्रतिज्ञेसाठी ज्यानें राज्य सोडलें त्याला पैशाचें महत्त्व कितीसें असेल हें स्पष्ट आहे. या सर्व आरोपांचा धुक्याचा पडदा नष्ट व्हावयास भीष्मांच्या चरित्राच्या सूर्यप्रकाशाकडेच वळणें अवश्य आहे.

भीष्मांचें महत्त्व

स्वतः महाभारतकारांचें व भीष्मांच्या समकालीन सर्वश्रेष्ठ व्यक्तींचें भीष्मासंबंधी काय मत आहे हें पहाणे अवश्य ठरेल. भगवान् श्रीकृष्ण हे भीष्मांच्या विरुद्ध बाजूला असलेले नेते असून त्यांच्या सेनापतित्वाच्या कालांत तिसऱ्या व नवव्या दिवशीं ते भीष्मांच्या अगावर त्यांना ठार मारण्यासाठी धांवून गेल्याचें महाभारतांत वर्णन आहे. 'मी भीष्मांना ठार मारतों' असें तर त्यांनीं वारंवार म्हटलें आहे. अशा व्यक्तीनें युधिष्ठिराला धर्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं भीष्मांची निवड करावी यावरूनच त्यांची योग्यता केवढी थोर असली पाहिजे हें स्पष्ट होतें. शांतिपर्व हें महाभारतांतील सर्व पर्वांत अत्यंत श्रेष्ठ असून महाभारतकारांना जगाला जें विशिष्ट तत्त्वज्ञान द्यावयाचें आहे तें त्यांनी शांतिपर्वाच्या

द्वारें दिलेले आहे. या तत्त्वज्ञानाचे प्रवक्ते भीष्म आहेत हें ध्यानांत घेतलें म्हणजे महाभारतकारांच्या मतें ते किती श्रेष्ठ असले पाहिजेत हें आपोआपच स्पष्ट होतें. भीष्म निर्याण पावणार या कल्पनेनें अत्यंत दुःखी होऊन श्रीकृष्ण युधिष्ठिराजवळ त्यांच्या श्रेष्ठतेचें जें वर्णन करतात तें या दृष्टीनें पहाण्यासारखे आहे. ते म्हणतात :—

यस्य ज्यातलनिर्घोष विस्फूर्जितमिवाशनेः ।
न सेहे देवराजोऽपि तमस्मि मनसा गतः ।। १२
येनाभिजित्य तरसा समस्तं राजमण्डलम् ।
ऊढास्तिस्रस्तु ताः कन्यास्तमस्मि मनसा गतः ।। १३
त्रयोविंशतिरात्रं यो योधायमास भार्गवम् ।
न च रामेण निस्तीर्णस्तमस्मि मनसा गतः ।। १४
एकीकृत्येन्द्रियग्रामं मनः संयम्य मेधया ।
शरणं मामुपागच्छत्ततो मे तद्गतं मनः ।। १५
यं गङ्गा गर्भविधिना धारयामास पार्थिव ।
वसिष्ठशिक्षितं तात तमस्मि मनसा गतः ।। १६
दिव्यास्त्राणि महातेजा यो धारयति बुद्धिमान् ।
साङ्गांश्च चतुरो वेदांस्तमस्मि मनसा गतः ।। १७
रामस्य दयितं शिष्यं जामदग्न्यस्य पाण्डव ।
आधारं सर्वविद्यानां तमस्मि मनसा गतः ।। १८
स हि भूतं भविष्यच्च भवच्च भरतर्षभ ।
वेत्ति धर्मविदां श्रेष्ठं तमस्मि मनसा गतः १९
तस्मिन्हि पुरुषव्याघ्रे कर्मभिः स्वैर्दिवं गते ।
भविष्यति मही पार्थ नष्टचंद्रेव शर्वरी ।। २०
तद्युधिष्ठिर गाङ्गेयं भीष्मं भीमपराक्रमम् ।
अभिगम्योपसंगृह्य पृच्छ यत्ते मनोगतम् ।। २१
चातुर्विद्यं चातुर्होत्रं चातुराश्रम्यमेव च ।
राजधर्मांश्च निखिलान् पृच्छैनं पृथिवीपते ।। २२
तस्मिन्नस्तमिते भीष्मे कौरवाणां धुरंधरे ।
ज्ञानान्यस्तं गमिष्यन्ति तस्मात्त्वां चोदयाम्यहम् ।। २३

—महभारत, शांतिपर्व अध्याय ४६

"वज्राप्रमाणे अति भयंकर असलेला, ज्याच्या धनुष्याचा टणत्कार देवराज इंद्रालादेखील सहन होऊ शकला नाही, त्या भीष्मांचा मी विचार करीत होतों. ज्यानें आपल्या पराक्रमानें सर्व राजमंडलाचा पराभव करून काशी नगरींत तीन कन्यांचें हरण केलें, त्या भीष्मांचा मी विचार करीत होतों. तेवीस दिवस अहोरात्र ज्यानें परशुरामासारख्या विख्यात योद्धयाशी युद्ध केलें व त्याला भग्नसकल्प करून परत पाठविलें त्याचा मी विचार करीत होतो. सर्व इंद्रियांचें एकीकरण करून व बुद्धीनें मनाचा निरोध करून भीष्म मला शरण आले म्हणून माझेंही मन त्यांच्याकडे गेलें. गंगेनें गर्भात ज्यांचें धारण केलें, साक्षात् वसिष्ठांजवळून ज्यांनी विद्या ग्रहण केली, सांग चतुर्वेद व दिव्य अस्त्रे जे धारण करतात, जे सर्व विद्यांचे आधार व जामदग्न्य परशुरामांचे अत्यंत आवडते शिष्य आहेत, ज्यांना भूत, भविष्य व वर्तमानाचें संपूर्ण ज्ञान आहे व सर्व धर्मवेत्त्यांत जे अत्यंत श्रेष्ठ आहेत त्या भीष्मांचा मी विचार करीत होतों. पुरुषव्याघ्र भीष्म आपल्या महत्तम कर्मानें स्वर्गात गेल्यावर ही सपूर्ण पृथ्वी चंद्रावांचूनच्या रात्रीप्रमाणें अंधकारमय होऊन जाईल. हे युधिष्ठिरा ! तू भीमपराक्रम भीष्मांच्याकडे जा व जे कांहीं तुझ्या मनांत असेल तें त्यांना विचार. धर्मार्थकाममोक्ष, सर्व विद्या, त्रैवर्णिकांची सर्व कर्मे, चारही आश्रमांचे धर्म व राजधर्म यांपैकी तुला जें जें कांही त्यांना विचारावयाचें असेल तें तें तू मोकळेपणानें विचार. कौरवधुरंधर भीष्म एकदां अस्तंगत झाले म्हणजे त्यांच्याबरोबर सर्व ज्ञानेंही अस्तंगत होणार आहेत. म्हणून मी तुला तेथे जाण्याची प्रेरणा देत आहें."

प्रत्यक्ष भीष्मांच्या दर्शनास गेल्यावर पुनश्च श्रीकृष्ण अधिकच शोकाकुल झाले. त्यांनी त्या ठिकाणीही त्यांचें जें वर्णन केलें आहे तेंही असेंच त्यांच्या माहात्म्याचें सूचक आहे. श्रीकृष्ण म्हणतातः—

ततो निशाम्य गाङ्गेयं शाम्यमानमिवानलम् ।
किंचिद्दीनमना भीष्ममिति होवाच केशवः ॥ १२
कच्चिज्ज्ञानानि सर्वाणि प्रसन्नानि यथा पुरा ।
कच्चिन्न व्याकुला चैव बुद्धिस्ते वदतां वर ॥ १३

शराभिघातदुःखात्ते कच्चिद्गात्रं न दूयते ।
मानसादपि दुःखाद्धि शारीरं बलवत्तरम् ॥ १४
वरदानात्पितुः कामं छन्दमृत्युरसिप्रभो ।
शान्तनोर्धर्मनित्यस्य न त्वेतन्मम कारणम् ॥ १५
सुसूक्ष्मोऽपि तु देहे वै शल्यो जनयते रुजम् ।
किं पुनः शरसंघातैश्चित्तस्य तव पार्थिव ॥ १६
कामं नैतत्तवाख्येयं प्राणिनां प्रभवाप्ययौ ।
उपदेष्टुं भवान् शक्तो देवानामपि भारत ॥ १७
यच्च भूतं भविष्यं च भवच्च पुरुषर्षभ ।
सर्वं तज्ज्ञानवृद्धस्य तव भीष्म प्रतिष्ठितम् ॥ १८
संहारश्चैव भूतानां धर्मस्य च फलोदयः ।
विदितस्ते महाप्राज्ञ त्वं हि धर्ममयो निधिः ॥ १९
ऋते शान्तनवाद्भीष्मात्त्रिषु लोकेषु पार्थिव ।
सत्यधर्मान्महावीर्याच्छूराद्धर्मैकतत्परात् ॥ २१
मृत्युमावार्य तपसा शरसंस्तरशायिनः ।
निसर्गप्रभवं किंचिन्न च तातानुशुश्रुम ॥ २२
सत्ये तपसि दाने च यज्ञाधिकरणे तथा ।
धनुर्वेदे च वेदे च नीत्यां चैवानुरक्षणे ॥ २३
अनृशंसं शुचिं दान्तं सर्वभूतहिते रतम् ।
महारथं त्वत्सदृशं न कञ्चिदनुशुश्रुम ॥ २४
त्वं हि देवान्सगन्धर्वानसुरान् यक्षराक्षसान् ।
शक्तस्त्वेकरथेनैव विजेतुं नात्र संशयः ॥ २५
स त्वं भीष्म महाबाहो वसूनां वासवोपमः ।
नित्यं विप्रैः समाख्यातो नवमोऽनवमो गुणैः ॥ २६
अहं च त्वाऽभिजानामि यस्त्वं पुरुषसत्तम ।
त्रिदशेष्वपि विख्यातस्त्वं शक्त्या पुरुषोत्तमः ॥ २७
मनुष्येषु मनुष्येन्द्र न दृष्टो न च मे श्रुतः ।
भवतो वा गुणैर्युक्तः पृथिव्यां पुरुषः क्वचित् ॥ २८
त्वं हि सर्वगुणे राजन्देवानप्यतिरिच्यसे ।
तपसा हि भवाञ्शक्तः स्रष्टुं लोकाञ्चराचरान् ॥ २९

किं पुनश्चात्मनो लोकानुत्तमानुत्तमैर्गुणः ।
तदस्य तप्यमानस्य ज्ञातीनां संक्षयेन वै ।। ३०
ज्येष्ठस्य पाण्डुपुत्रस्य शोकं भीष्म व्यपानुद ।
ये हि धर्माः समाख्याताश्चातुर्वर्ण्यस्य भारत ।। ३१
चातुराश्रम्यसंयुक्तः सर्वे ते विदितास्तव ।
चातुर्विद्ये च ये प्रोक्ताश्चातुर्होत्रे च भारत ।। ३२
योगे सांख्ये च नियता ये च धर्माः सनातनाः ।
चातुर्वर्ण्यस्य यश्चोक्तो धर्मो न स्म विरुध्यते ।। ३३
सेव्यमानः सदैयाख्यो गाङ्गेय विदितस्तव ।
प्रतिलोमप्रसूतानां वर्णानां चैव यः स्मृतः ।। ३४
देशजातिकुलानां च जानीषे धर्मलक्षणम् ।
वेदोक्तो यश्च शिष्टोक्तः सदैव विदितस्तव ।। ३५
इतिहासपुराणार्थाः कात्स्न्र्येन विदितास्तव ।
धर्मशास्त्रं च सकलं नित्यं मनसि ते स्थितम् ।। ३६
ये च केचन लोकेऽस्मिन्नर्थाः संशयकारकाः ।
तेषां छेत्ता नास्ति लोके त्वदन्यः पुरुषर्षभ ।। ३७
स पाण्डवेयस्य मनःसमुत्थितं नरेंद्र शोकं व्यपकर्ष मेधया ।
भवद्विधा हयुत्तमबुद्धिविस्तरा विमुह्यमानस्य नरस्य शान्तये ।। ३८

—महाभारत, शांतिपर्व अध्याय ५०

भीष्म विझत आलेल्या अग्नीप्रमाणे लवकरच इहलोक सोडून जाणार हें पाहून अस्वस्थ झालेले श्रीकृष्ण त्यांना म्हणाले, "आपली सर्व ज्ञान ग्रहण करणारी इद्रियें व निरनिराळचा विषयांचें आपलें ज्ञान पूर्वीप्रमाणेंच प्रसन्न आहे काय? आपली बुद्धि व्याकूळ झालेली नाही ना? बाणांच्या आघातांच्या दुःखानें आपल्या अवयवांना आजही वेदना होत आहेत काय? हे प्रभो, धर्मनिष्ठ शांतनूच्या वरदानामुळें जरी आपण इच्छामरणी असलांत तरीही शरीराला सूक्ष्म जरी शल्य असलें तरी तें रोग उत्पन्न करतें व मनाला विकल करतें. मग आपल्या अंगांत तर बाणांचे समूहचे समूह रुतून बसले आहेत. अशा स्थितीत आपल्या अंतःकरणाला विकलता प्राप्त झाली असल्यास त्यांत नवल काय आहे? जन्म व मृत्यु हे प्राण्यांना सदैव

लागलेले आहेत व त्यांपासून कोणीही सुटू शकत नाही, हें आपणास कोणीही सांगावयाचे कारण नाही. देवांनादेखील उपदेश करण्याचें आपल्यांत सामर्थ्य आहे. हे ज्ञानवृद्ध भीष्मा! भूत, भविष्य व वर्तमानाचें सर्व ज्ञान आपल्या ठिकाणीं प्रतिष्ठित झालें आहे. जगताचा सहार व त्याची उत्पत्ति, धर्माचे स्वरूप, त्याचें उद्दिष्ट व परिणाम, या सर्वांचें आपणांस यथावत् ज्ञान असून आपण धर्माचे केवळ महानिधि आहांत या सर्व त्रैलोक्यांत सत्यधर्म, महापराक्रमी शूर व धर्मैकतत्पर अशा शांतनव भीष्मावांचून मृत्यूला जिकून बाणांच्या शय्येवर शयन करणारा आम्ही दुसरा कोणीही महापुरुष पाहिला नाही किवा ऐकिला नाही. सत्य,तपश्चर्या,दान,यज्ञ,धनुर्वेद, वेद, नीति,आत्मसंरक्षणाचे उपाय, अभिजातता, पावित्र्य, जितेंद्रियता व सर्व लोकांचें कल्याण व्हावें यासाठी सतत प्रयत्नशील असणे या सर्व बाबतींत आपल्या योग्यतेचा महापुरुष दुसरा कोणीहि आम्ही ऐकला नाही. आपण स्वतःच्या एकटयाच्या भरंवशावर देव, गधर्व, दैत्य, यक्ष व राक्षस या सर्वांना जिकावयास समर्थ आहांत. वसूच्या मध्यें देवेंद्राप्रमाणें आपलें तेजस्वी स्थान आहे. आपल्या गुणानी आपण स्वर्गीय देवांहूनही अधिक श्रेष्ठ आहांत. आपल्या तपस्येच्या प्रभावानें नवी सृष्टि आपण उत्पन्न करूं शकाल. मग स्वतःसाठी उत्तम गति मिळवाल यांत काय आश्चर्य आहे? मी बुद्धयाच आपणाकडे आलों आहें. ज्ञातीच्या सहारामुळे पाण्डुपुत्र युधिष्ठिराच्या अंत.करणात उद्भवलेला शोक आपण नष्ट करावा. सर्व धर्म व तत्त्वज्ञान, इतिहास व राजनीतिशास्त्र, किंबहुना ज्ञान या शब्दांत येणारें सर्व कांहीं आपणांस ज्ञात असून त्यासंबंधीचे सर्व संशय दूर करूं शकणारा आपल्यासारखा प्रभावी पुरुष दुसरा नाहीं. आपणासारखे पुरुष स्वतःच्या तेजस्वी बुद्धिमत्तेनें लोकांचे मोह दूर करावयासाठींच असतात.

भीष्मांवर श्रीकृष्णांचें इतकें प्रेम आहे की "तुम्हीं स्वतःच युधिष्ठिराचा संशय दूर कां करीत नाहीं" असें भीष्मांनी श्रीकृष्णांना विचारल्यावर त्याचें श्रीकृष्णांनीं दिलेले उत्तर अत्यंत मननीय आहे. ती प्रश्नोत्तरेच मी येथें देतों.

स्वयं किमर्थं तु भवान् श्रेयो न प्राह पाण्डवम् ।
किं ते विवक्षितं चात्र तदाशु वद माधव ।। २४

वासुदेव उवाच ।

यशसः श्रेयसश्चैव मूलं मां विद्धि कौरव ।
मत्तः सर्वेऽभिनिर्वृत्ता भावाः सदसदात्मकाः ।। २५
शीतांशुश्चंद्र इत्युक्ते लोके को विस्मयिष्यति ।
तथैव यशसा पूर्णे मयि को विस्मयिष्यति ।। २६
आधेयं तु मया भूयो यशस्तव महाद्युते ।
ततो मे विपुला बुद्धिस्त्वयि भीष्म समर्पिता ।। २७
यावद्धि पृथिवीपाल पृथ्वीयं स्थास्यति ध्रुवा ।
तावत्तवाक्षया कीर्तिर्लोकाननुचरिष्यति ।। २८
यच्च त्वं वक्ष्यसे भीष्म पाण्डवायानुपृच्छते ।
वेदप्रवाद इव ते स्थास्यते वसुधातले ।। २९
यच्चैतेन प्रमाणेन योक्ष्यत्यात्मानमात्मना ।
स फलं सर्वपुण्यानां प्रेत्य चानुभविष्यति ।। ३०
एतस्मात् कारणाद्भीष्म मतिर्दिव्या मया हि ते ।
दत्ता यशो विप्रथयेत् कथं भूयस्तवेति ह ।। ३१
यावद्धि प्रथते लोके पुरुषस्य यशो भुवि ।
तावत्तस्याक्षया कीर्तिर्भवतीति विनिश्चिता ।। ३२
राजानो हतशिष्टास्त्वां राजन्नभित आसते ।
धर्माननुयुयुक्षन्तस्तेभ्यः प्रब्रूहि भारत ।। ३३
भवान् हि वयसा वृद्धः श्रुताचारसमन्वितः ।
कुशलो राजधर्माणां सर्वेषामपराश्च ये ।। ३४
जन्मप्रभृति ते कश्चिद्बृजिनं न ददर्श ह ।
ज्ञातारं सर्वधर्माणां त्वां विदुः सर्वपार्थिवाः ।। ३५
तेभ्यः पितेव पुत्रेभ्यो राजन्ब्रूहि परं नयम् ।
ऋषयश्चैव देवाश्च त्वया नित्यमुपासिताः ।। ३६
तस्माद्वक्तव्यमेवेदं त्वयाऽवश्यमशेषतः ।
धर्मं शुश्रूषमाणेभ्यः पृष्टेन च सता पुनः ।। ३७

वक्तव्यं विदुषा चेति धर्ममाहुर्मनीषिणः ।
अप्रतिब्रुवतः कष्टो दोषो हि भविता प्रभो ॥ ३८
तस्मात्पुत्रैश्चपौत्रैश्च धर्मान्पृष्टान्सनातनान् ।
विद्वान् जिज्ञासमानैस्त्वं प्रब्रूहि भरतर्षभ ॥ ३९
--महाभारत, शांतिपर्व अध्याय ५४

" हे माधवा, तूं स्वत.च पांडवांना त्यांच्या कल्याणाचा उपदेश कां करीत नाहीस ? मी उपदेश करावा असें तुला कां वाटतें ? यावर भगवान् श्रीकृष्णानी असें उत्तर दिलें कीं, .यश व श्रेय यांचें मूळ मी असून माझ्यापासूनच सर्व सदसदात्मक भाव उत्पन्न झाले आहेत. चंद्र शीतल आहे असें म्हणण्यांत ज्याप्रमाणे कोणालाही विस्मय वाटावयाचा नाही, त्याचप्रमाणें मी यशस्वी व कीर्तिमान् आहे असें म्हणण्यांतही माझ्या कीर्तीत कांही भर पडून कोणाला विस्मय वाटावा असें नाहीं. तुमचें यश वाढविणें हेंच माझें कर्तव्य आहे. म्हणून मी माझें लक्ष आपणावर केंद्रित केलें. जोंवर ही पृथ्वी आहे, तोंवर आपलें यश जगामध्यें अक्षय्य राहील. युधिष्ठिर आपणांस विचारीत असतां आपण त्याचें उत्तर म्हणून जें कांही बोलाल, तें वेदवाक्याप्रमाणें जगांत मान्यता पावेल व आपले वचन प्रमाण मानून जो कोणी तदनुसार वर्तन करील त्याचें इह-परलोकीं कल्याण होईल. हे भीष्मा, या कारणास्तव मी दिव्य बुद्धिमत्ता आपल्याला दिली आहे. आपलें यश अधिक वाढावें अशी माझी इच्छा आहे. भारताच्या संहारकांडांतून जे राजे वांचले आहेत, त्यांना धर्मज्ञानाची अत्यंत आवश्यकता असून त्या हेतूनेंच ते आपणाकडे आले आहेत. आपण त्यांना अवश्य ज्ञान सांगितलें पाहिजे. आपण वयानें वृद्ध आहांत. प्रत्यक्ष क्रियावान् असून सर्व आचारधर्मांचें आपण यथावत् प्रतिपालन केलें आहे. राजधर्म व इतर सर्व धर्मशास्त्र यांच्यांत आपण पारंगत आहांत. आपण सर्व धर्मांचे ज्ञाते आहांत असा सर्व राजांचाही विश्वास आहे. साऱ्या जन्मांत कोणीसी आपला दोष काढू शकणार नाहीं इतकें आपलें वर्तन पवित्र आहे. ऋषि व देव यांची आपण उपासना केली आहे. म्हणून पित्यानें पुत्राला करावा असा आपण या सर्वांना उपदेश करा.

विद्वानानें लोकांना उपदेश करावा असें बुद्धिमंतांचें म्हणणें आहे. हें आपलें कर्तव्य विद्वानानें जर न पार पाडले तर तो त्याचा दोष समजला जातो. हे आपले पुत्रपौत्र धर्म जाणण्याच्या इच्छेनें आपल्या सभोंवार बसले आहेत. आपण त्यांना उपदेश करा."

भगवान् श्रीकृष्णांनीं भीष्मांच्या बाबतीत काढलेले हे उद्‌गार त्यांच्या योग्यतेवर पूर्णपणें प्रकाश टाकतात. भगवान् श्रीकृष्णांसारखा पूर्णावतारी युगपुरुष ज्याच्यासंबंधी "जन्मप्रभृति ते कश्चिद् वृजिनं न ददर्श ह।" साऱ्या जीवनांत ज्याचा दोष म्हणून नाहींच असे उद्‌गार काढतो त्या व्यक्तीची विशुद्धता व योग्यता केवढी श्रेष्ठ असली पाहिजे!

भीष्मांची दिव्य जन्मकथा

भीष्म हे महाभारतकाली शेवटचे शुद्ध क्षत्रिय असून देवी गंगा व राजे शांतनु यांचे ते पुत्र होत. ब्रह्मलोकांत गंगादेवी एके दिवशीं ब्रह्मदेवांच्या दर्शनासाठी गेली असतां वाऱ्यानें तिचा पदर उडूं लागला. सर्व सभासदांनीं खाली माना घातल्या पण भान न राहून तेथें असलेल्या महाभिष नांवाच्या राजानें मात्र तिच्याकडे निःशंकपणें पाहिलें. गंगाही क्षणभर त्याच्याकडे पाहूं लागली. ब्रह्मलोकासारख्या कामगंधहीन नि मोहातीत अशा स्थानी क्षणभर कां होईना हा प्रकार होणें अनिष्ट वाटल्यामुळें भगवान् ब्रह्मदेवानें त्याला शाप दिला कीं, तूं पुनश्च मर्त्य लोकी जा. तेथें पत्नी या नात्यानें गगा तुला मिळेल. ती तुझें अप्रिय करील व त्याचा तुला राग आल्यावर तूं पुनश्च येथें येशील. हा महाभिष पृथ्वीवर शांतनु या नांवानें उत्पन्न झाला. देवी गंगा शापानुरूप भूतलावर येत असतां रस्त्यांत तिची व अष्ट वसूंची भेट झाली. वसिष्ठांचा कांहीं अपराध केल्यामुळें ह्या अष्ट वसूना त्यांनीं पृथ्वीवर येण्याचा शाप दिला होता. त्यांनीं गंगेला असें सांगितलें कीं, आम्हांला पृथ्वीवर यावेंच लागणार आहे. मात्र मानुषी स्त्रीच्या गर्भांत राहण्याची आमची इच्छा नसल्यामुळें तू आम्हांला जन्म द्यावास अशी आमची इच्छा आहे. मात्र आम्ही जन्मतांच तूं आम्हांला

पाण्यात बुडवून टाक.* कारण तेथे रहाण्याची आमची इच्छा नाहं गगेनें त्याना त्यांच्या इच्छेनुसार करण्याचें वचन दिलें. मात्र ति त्यांना असें सागितलें कीं, माझ्यासारखी देवी पत्नी या नात्या मिळून राजा शातनु निपुत्रिक राहावा ही गोष्ट मला सर्वथा इ नाही. तरी तुम्हां सर्वांच्या अंशापासून उत्पन्न झालेला एक दीर्घा पुत्र मी त्या राजाला द्यावा, असें तुम्ही मान्य केलें पाहिजे. त्या सर्वां ती गोष्ट मान्य केली. पुढें शांतनूची पत्नी म्हणून गंगा र लागल्यावर तिनें वसूना दिलेलें वचन पाळण्यासाठी राजाला अ अट घातली की, तू माझ्या कोणत्याही कामांत अडथळा करूं नये पुढें सर्व प्रकारें गगा राजाचें प्रिय करी; पण पुत्र झाला की त्याला पाण्यांत बुडवून नष्ट करी. राजाला या गोष्टीचें अत्यंत वा वाटे. पण दिलेलें वचन पाळण्यासाठीं तो तिला कांहीही बोल नसे. आठवा पुत्र होतांच राजानें तिला तो तरी बुडवू नकोस म्हण प्रार्थना केली. गंगेनें त्याला सांगितलें कीं, हा पुत्र तुला चिरका लाभेल. मात्र तू आपलें वचन मोडलें असल्यामुळें मी जातें शांतनु अतिशय शोकाकुल होतांच, गगेनें त्याला आपला सर्व वृत्ता सांगितला व वसूचें वरदान सांगून त्याचा शोक दूर केला. तात भीष्म हे गंगा व शांतनू यांचे महान् दैवी अंश असलेले पुत्र आहे त्यांच्या पित्याचे वर्णन महाभारतांत पुढीलप्रमाणें आहे :—

स राजा शान्तनुर्धीमान्देवराजर्षिसत्कृतः ।
धर्मात्मा सर्वलोकेषु सत्यवागिति विश्रुतः ॥ १
दमो दानं क्षमा बुद्धिर्ह्रीर्धृतिस्तेज उत्तमम् ।
नित्यान्यासन्महासत्त्वे शान्तनौ पुरुषर्षभे ॥ २
एवं स गुणसंपन्नो धर्मार्थकुशलो नृपः ।
आसीद्भरतवंशस्य गोप्ता सर्वजनस्य च ॥३
तस्य कीर्तिमतो वृत्तमवेक्ष्य सततं नराः ।
धर्म एव परः कामादर्थाच्चेति व्यवस्थिताः ॥ ५
न चास्य सदृशः कश्चिद्धर्मतः पार्थिवोऽभवत् ॥ ६
वर्तमानं हि धर्मेषु सर्वधर्मभृतां वरम् ।
तं महीपा महीपालं राजराज्येऽभ्यवेचयन् ॥ ७

वीतशोकभयाबाधा सुखस्वप्ननिबोधनाः ।
पौंत भारतगोप्तारं समपद्यन्त भूमिपाः ।। ८
स देवराजसदृशो धर्मज्ञः सत्यवागृजुः।
दानधर्मतपोयोगाच्छ्रया परमया युतः ।। १३
अरागद्वेषसंयुक्तः सोमवत्प्रियदर्शनः ।
तेजसा सूर्यकल्पोऽभूद्वायुवेगसमो जवे ।।
अन्तकप्रतिमः कोपे क्षमया पृथिवीसमः ।। १४
वधः पशुवराहाणां तथैव मृगपक्षिणाम् ।
शान्तनौ पृथिवीपाले नावर्तत तथा नृप ।। १५
ब्रह्मधर्मोत्तरे राज्ये शान्तनुर्विनयात्मवान् ।
समं शशास भूतानि कामरागविवर्जितः ।। १६

—महाभारत, आदिपर्व अध्याय १००

शांतनू राजा अत्यन्त बुद्धिमान् असून देव व राजर्षि यांचा त्याच्याविषयीं अत्यन्त आदर असे. धर्मात्मा व सत्यसंघ अशी त्याची कीर्ति असे. जितेंद्रियता, दान, क्षमा, बुद्धि, अभिजातता, धैर्य, तेज व सामर्थ्य हे त्याचे नैसर्गिक गुण होते. त्याच्या वेळीं त्याच्या एवढा श्रेष्ठ धर्मनिष्ठ राजा कोणीही नसल्यामुळें भारतवर्षातील सर्व राज्यसत्तांनी त्याचें चारित्र्य व सद्गुण पाहून स्वतः होऊनच त्याला सम्राटपदावर अभिषेक करून नियुक्त केलें होतें. त्याच्या अंतःकरणात रागद्वेषादि विकारांना मुळीच थारा नसे. चद्राप्रमाणें त्याचें दर्शन सर्वांना आल्हादकर असून तो तेजानें सूर्यासारखा, वेगांत वायूसारखा, क्रोधांत यमाप्रमाणें भयानक, व क्षमेनें पृथ्वीसारखा होता. माणसें तर लांबच राहिली, पण शातनूच्या राज्यांत मृगपक्ष्यांचा देखील व्यर्थ वध कधीही झाला नाही. आपण होऊन लोकांनी ज्याला सम्राट केलें व तेही बळाच्या धाकानें नसून चारित्र्य व कर्तव्यनिष्ठा या दोन सद्गुणांवर लुब्ध होऊन केलें, त्या महनीय व्यक्तीच्या योग्यतेविषयीं काय वर्णन करावें? म्हणून भीष्मांना आपल्या पित्याचा अत्यन्त अभिमान असे. तो महाभारतांत त्यांनी ठिकठिकाणी व्यक्त केला असून स्वतःला शांतनव म्हणविण्यांत

त्यांना किती गौरव वाटत असे याची त्यावरून कल्पना येते. अशा या महनीय व्यक्तीचा पुत्र म्हणवून घेण्याचें भाग्य लाभलेले भीष्म पित्याप्रमाणेंच सत्यसध व धर्मनिष्ठ राहिले असल्यास ते 'प्रवर्तितो दीप इव प्रदीपात्' अशाच स्वरूपाचे आहेत. आणि त्यांच्या मातेविषयीं काय लिहावें ? गंगा हा शब्द भारतीय वाङमयांत पावित्र्याचा वाचक झालेला आहे. अपार क्षमा, व असीम शुद्धता यांनी देवी गंगा भारतीय वाङमयाचा सदाचा अलंकार झालेली असून हें नांव म्हणजे निष्कलंकतेचा पर्याय शब्द आहे. आपल्या या दिव्य मातेकडून भीष्मांना प्रखर पावित्र्य व अलौकिक शील यांची देणगी मिळालेली होती. गंगा अंतर्धान पावतांना शांतनूला आश्वासन देऊन आपल्या पुत्राला विद्या व धनुर्वेद यांत निष्णात करावें म्हणून ती स्वतःबरोबर देवलोकी घेऊन गेली होती. पुढे एके दिवशीं राजा शांतनु नदीतीरावरून फिरत असतां त्याला गंगेच्या पाण्याचा सर्व प्रवाह अवरुद्ध झाल्याचें दिसून आलें. तो प्रवाह कशामुळें अवरुद्ध झाला म्हणून तो शोधू लागल्यावर त्याला असें आढळून आलें कीं एक दिव्य रूपसंपन्न कुमार आपल्या महास्त्रांच्या सामर्थ्यानें प्रवाहाचा अवरोध करीत आहे. त्याचा तो प्रभाव पाहून शांतनु विस्मित झाला. तोच देवी गंगा तेथें प्रकट झाली व हा तुझाच कुमार असून त्याचें विद्याध्ययन पूर्ण झालें असल्यामुळें मी तो तुझ्या स्वाधीन करतें असें म्हणून गगेनें त्या कुमाराला राजाच्या स्वाधीन केले. चिर विरहानंतर मुलगा लाभल्याचा राजाला केवढा अपूर्व आनंद झाला असेल ?

भीष्मांची दिव्य गुरुपरंपरा

राजर्षि भीष्म आपल्या अलौकिक आईच्या खास निरीक्षणाखालीं ज्यांच्याजवळ विद्यांचा अभ्यास करीत होते त्यांची परंपरा महाभारतांत उल्लेखिलेली आहे. या कुमाराचें शिक्षण कोणाजवळ नि कसें पूर्ण केलें हें शांतनूला सांगत असतां गंगा म्हणते :—

यं पुत्रमष्टमं राजंस्त्वं पुरा मय्यविन्दथाः
स चायं पुरुषव्याघ्र सर्वास्त्रविदनुत्तमः ।। ३३

गृहाणेमं महाराज मया संवर्धितं सुतम् ।
आदाय पुरुषव्याघ्र नयस्वैनं गृहं विभो ॥ ३४
वेदानधिजगे साङ्गान्वसिष्ठादेष वीर्यवान् ।
कृतास्त्रः परमेष्वासो देवराजसमो युधि ॥ ३५
सुराणां संमतो नित्यमसुराणां च भारत ।
उशना वेदयच्छास्त्रमयं तद्वेद सर्वशः ॥ ३६
तथैवाङ्गिरसः पुत्रः सुरासुरनमस्कृतः ।
यद्वेद शास्त्रं तच्चापि कृत्स्नमस्मिन्प्रतिष्ठितम् ॥ ३७
तव पुत्रे महाबाहो साङ्गोपाङ्गं महात्मनि ।
ऋषिः परैरनाधृष्यो जामदग्न्यः प्रतापवान् ॥ ३८
यदस्त्रं वेद रामश्च तदेतस्मिन्प्रतिष्ठितम् ।
महेष्वासमिम राजन्राजधर्मार्थकोविदम् ॥ ३९
मया दत्तं निजं पुत्रं वीरं वीर गृहं नय ।

—महाभारत, आदिपर्व अध्याय १००

हे राजन्! जो माझा आठवा पुत्र पूर्वी तू पहिला होतास, तोच हा आहे. हा सर्व अस्त्रांचा ज्ञाता आहे. वसिष्ठापासून याने साङ्गवेदांचें अध्ययन केलेलें असून हा देवराजाप्रमाणें पराक्रमी आहे. योद्धा या नात्यानें देव व दैत्य यांच्यांत हा सारखीच मान्यता पावलेला आहे. देवगुरु बृहस्पति व दैत्यगुरु शुक्राचार्य यांना जे ज्ञान आहे तें सर्व याच्या ठिकाणी प्रतिष्ठित झालें आहे. कोणीही ज्यांचें धर्षण करूं शकत नाही असे परमप्रतापी जामदग्न्य परशुराम याना जें महास्त्रांचें ज्ञान आहे तें याच्या ठिकाणी सर्व प्रकारें सुप्रतिष्ठित झाले आहे. मी हा मुलगा तुला देतें. याला तूं घेऊन जा." तात्पर्य भीष्म हे वसिष्ठ, बृहस्पति, शुक्राचार्य व परशुराम अशा अलौकिक गुरूंचे शिष्य होते.

राजा या नात्यानें भीष्मांची योग्यता

त्या पुत्राला घरीं घेऊन जाऊन शांतनूनें यौवराज्याचा अभिषेक केला. पुढें राज्य सोडलेल्या भीष्मांची राजा या नात्यानें किती अलौकिक योग्यता होती व त्यांनी जर सिंहासनावरील आपला

अधिकार सोडला नसता तर ते केवढे थोर राजे झाले असते या वर्णन महाभारतात एका ठिकाणी आले आहे. विचित्रवीर्याच्य मृत्यूनंतर धृतराष्ट्र, पाण्डु व विदुर हे लहान असता भीष्माव त्याच्या संगोपनाची व अधिकारसूत्रे हाती वागवून प्रत्यक्ष राज चालविण्याची कित्येक वर्षे जबाबदारी येऊन पडली होती. ती त्यां किती उत्कृष्टपणें सभाळली यांचें महाभारतांत पुढीलप्रमाणें वर्ण आलें आहे. :—

ऊर्ध्वसस्याऽभवद्भूमिः सस्यानि रसवन्ति च ।
यथर्तुवर्षी पर्जन्यो बहुपुष्पफला द्रुमाः ॥ २
वाहनानि प्रहृष्टानि मुदिता मृगपक्षिणः ।
गन्धवन्ति च माल्यानि रसवन्ति फलानि च ॥ ३
वणिग्भिश्चान्वकीर्यन्त नगराण्यथ शिल्पिभिः ।
शूराश्च कृतविद्याश्च सन्तश्च सुखिनोऽभवन् ॥ ४
नाभवन्दस्यवः केचिन्नाधर्मरुचयो जनाः ।
प्रदेशेष्वपि राष्ट्राणां कृतं युगमवर्तत ॥ ५
धर्मक्रिया यज्ञशीलाः सत्यव्रतपरायणाः ।
अन्योन्यप्रीतिसंयुक्ता व्यवर्धन्त प्रजास्तदा ॥ ६
मानक्रोधविहीनाश्च नरा लोभविवर्जिताः ।
अन्योऽन्यमभ्यनन्दन्त धर्मोत्तरमवर्तत ॥ ७
तन्महोदधिवत्पूर्णं नगरं वै व्यरोचत ।
द्वारतोरणनिर्यूहैर्युक्तमभ्रचयोपमैः ॥ ८
प्रासादशतसंबाधं महेन्द्रपुरसंनिभम् ।
नदीषु वनखण्डेषु वापीपल्वलसानुषु ।
काननेषु च रम्येषु विजहुरुर्मुदिता जनाः ॥ ९
उत्तरैः कुरुभिः सार्धं दक्षिणाः कुरुवस्तथा ।
विस्पर्धमाना व्यचरंस्तथा देवर्षिचारणैः ॥ १०
नाभवत्कृपणः कश्चिन्नाभवन्विधवाः स्त्रियः ।
तस्मिञ्जनपदे रम्ये कुरुभिर्बहुलीकृते ॥ ११
कूपारामसमावाप्यो ब्राह्मणावसथास्तथा ।
बभूवुः सर्वधियुतास्तस्मिन् राष्ट्रे सदोत्सवाः ॥ १२

भीष्मेण धर्मतो राजन्सर्वतः परिरक्षिते ।
बभूव रमणीयश्च चैत्ययूपशताङ्कितः ॥ १३
स देशः परराष्ट्राणि विमृज्याभिप्रवर्धितः ।
भीष्मेण विहितं राष्ट्रे धर्मचक्रमवर्तत ॥ १४

—महाभारत, आदिपर्व अ. १०९

"जमीन जणू की काय आपली पिकें वर आणून देत होती. धान्य सुस्वादु असे. पाऊस ज्या दिवसात यावयाचा त्याच दिवसात येई. झाडे फळांनी व पुष्पानीं नेहमी बहरलेली दिसत. मृग व पक्षी आनदित दिसत. वाहतुकीची जनावरे उत्साहित दिसत. फुले सुगंधी व फळे रसयुक्त रहात. व्यापारी नि शिल्पकार यांनी नगरे गजबजलेली दिसत. शूर, व विद्वान असे सज्जन अत्यंत सुखांत दिसत. प्रजेतील कोणालाही कर्तव्यपराङ्मुखता आवडत नसे. दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करणारे कोणीही लोक नव्हते. सर्व राष्ट्रामध्यें जणू काय कृतयुग उत्पन्न झालें आहे असें वाटावे इतकी प्रजाची मानसिक व आर्थिक सुबत्तेची परिस्थिति झालेली होती. कर्तव्य ओळखून तदनुसार आचरण करणारे, यज्ञशील, सत्यव्रतपरायण, व एकमेकावर प्रेम करणारे असेच प्रजेतील सर्व लोक दिसून येत. ह्यामुळे आपोआपच सर्व बाजूनी त्याची भरभराट होत चालली होती. मान, क्रोध, लोभ, याना अत.करणांत मुळींच थारा न देणारे व एकमेकांच्या उत्कर्षाचीच चिता वाहणारे असे लोक असल्यामुळें जणू प्रत्यक्ष धर्मयुगच उत्पन्न झालेले होतें. नगर नाना प्रकारच्या गोपुरानी व प्रासादानी सुशोभित असून स्वर्गाप्रमाणें तें वैभवपूर्व व अलंकृत केलेले भासत असे. सुरक्षिततेची भावना व तिच्यापोटी येणारा निर्धास्तपणा इतका होता की नदी, अरण्यें, पाणपोया, पर्वतशिखरें इत्यादि सर्व ठिकाणी लोक निर्भयपणें, आनंदानें विहार करीत असत. सर्व जणू कीं काय आपल्या वर्तनानें उत्तर कुरूंच्या देवभूमीशींच स्पर्धा करणारे आहेत असें वाटत असे. त्यांच्या राष्ट्रांत कोणीही वृत्तीनें क्षुद्र वा परिस्थितीनें गांजलेला असा दृष्टोत्पत्तीस येत नव्हता. त्याचप्रमाणें विधवा स्त्रीही त्या राज्यांत कोठें दृष्टीस पडत नव्हती. सर्व प्रकारच्या समृद्धीनें राष्ट्र सदैव भरलेलें असल्या-

मुळे तेथें नित्य उत्सव व नित्य मंगल चालत असे. भीष्मानें त्या राष्ट्राच्या सूत्रधाराची भूमिका पत्करून ज्यावेळीं संरक्षण चालविलें होतें त्यावेळीं सर्व बाजूंनी या प्रकारें समृद्धि होऊन शासनसंस्थेच्या द्वारें व प्रजांच्या वर्तनांतून नेहमींच असें वाटावें कीं प्रत्यक्ष धर्माचेंच येथें राज्य सुरूं आहे."

भारतीय संस्कृतीच्या दृष्टीनें सर्वांत आदर्श असें जें रामराज्य त्याचें महर्षि वाल्मीकीय रामायणांत जें वर्णन आढळतें त्यांत आणि भीष्मांच्या राज्याच्या वर्णनांत काय भेद आहे ? परिस्थिति नेतृत्व उत्पन्न करते की नेतृत्व परिस्थिति उत्पन्न करते या प्रश्नचिन्हांसंबधी समाजशास्त्रज्ञांमध्यें निरनिराळे वादविवाद आजही प्रचलित असून त्यांनीं वाङमयाची पुष्कळच जागा नेहमींच अडते. भारतीयांचा या संबंधांत असा सिद्धान्त आहे कीं, परिस्थिति नेतृत्व उत्पन्न करीत नसून नेतृत्वच परिस्थिति उत्पन्न करीत असतें. नव्या इतिहास-प्रक्रियेचे पुरस्कर्ते जे मार्क्सवादी ते जरी परिस्थितीच नेतृत्व उत्पन्न करते असें कितीही हट्टाग्रहानें सांगत असले तरी त्याच्या स्वतः-च्याच इतिहासाची साक्ष त्या गोष्टीच्याविरुद्ध आहे. " कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम्। इति ते संशयो माऽभूत् राजा कालस्य कारणम् ॥" हीच गोष्ट खरी आहे. कृतयुग ही सामाजिक विकसनाची अवस्था उत्पन्न करण्यासाठी राजानें झटावें व जो हें ध्येय प्राप्त करून घेईल त्यानें राज्यसंस्थेचा सूत्रधार या नात्यानें आपलें कर्तव्य परिपूर्णपणें पार पाडलें असें शांतिपर्वांतील राज-धर्माच्या प्रकरणांत भीष्माचार्यानी जें प्रतिपादन केलें आहे तें या प्रकारें प्रत्यक्ष त्यांनीं स्वतः आचरून दाखविलें होतें असें दिसतें. भीष्म जर सिंहासनाधीश्वर राजे झाले असते तर ते किती थोर राजे झाले असते हें यावरून स्पष्ट होतें. भीष्मांची ज्ञानी पुरुष या दृष्टीनें केवढी योग्यता होती, तपस्या नि धार्मिकता यांचा ते मूर्त आविष्कारच कसा होते हें भगवान श्रीकृष्णांचे त्यांच्याविषयीचे शांतिपर्वांतील जे उद्‌गार मी उद्‌धृत केले आहेत त्यांवरूनच प्रत्ययास येतें. म्हणून त्यासंबंधीं वेगळ्या स्पष्टीकरणाची आवश्यकता नाहीं. या सर्व गोष्टी असल्या म्हणजे मनुष्य उत्तम राजा होईल असें मात्र नाहीं. या

सर्व गोष्टी असून शिवाय सिंहासारखा पराक्रम, व अपार सामर्थ्य असेल तरच ती राजसत्ता खरी टिकाऊ होते. भीष्मांच्या ठिकाणीं असा अपार पराक्रम असून ते महान् सामर्थ्यसपन्न होते. कठोर कर्तव्यनिष्ठा, कोणचीही शक्ति आड आली तरी तिला भीक न घालण्याची निर्भय नि मृत्युजय प्रवृत्ति, प्रभावपूर्ण कुलाभिमान व जाज्वल्य धर्मनिष्ठा हे त्यांचे विशेष होत. तळपत्या क्षात्रतेजामुळें भीष्म कोणासमोरही कधींच वाकले नाहीत. त्यांच्या या सर्व वैशिष्ट्याचें व्यक्तीकरण जामदग्न्य परशुरामाशीं त्यांचें जें भीषण युद्ध झालें त्यांतून दृष्टोत्पत्तीस येतें. याच त्याच्या प्रखर पराक्रमानें जगाचे दिक्कोन गर्जून उठले व पराक्रमी लोकांत त्यांचें नांव अग्रगण्य म्हणून विख्यात झाले.

एक विचित्र प्रसंग

भीष्मांचे वडील राजे शातनु याना त्यांच्या द्वितीय विवाहापासून चित्रांगद नि विचित्रवीर्य अशी दोन मुलें झाली. त्यांपैकी चित्रांगद हा त्याच नांवाच्या एका गधर्वाकडून मारला गेला व अल्पवयी विचित्रवीर्याला भीष्मांनी गादीवर बसविलें. विचित्रवीर्याच्या विवाहासाठी भीष्म मुली शोधू लागले असता त्याना असें कळले की, काशी नगरीच्या राजाला तीन मुली असून त्या तिन्ही मुली अत्यंत सुदर, सुलक्षणसपन्न व कौरवाच्या राजघराण्यात वधू म्हणून शोभण्यासारख्या आहेत. काशिराजानें आपल्या मुलीचें स्वयवर मांडलें होतें. त्या स्वयवरासाठी अधिकात अधिक पराक्रमी जो असेल त्यानेंच त्या मुलींना वरावें असा सकेत होता. भीष्म त्या ठिकाणी जाऊन पोंचले व जमलेल्या सर्व राजांसमक्ष त्यांनी त्या मुलोना आपल्या रथांत घातलें. सर्व राजमंडळ संतप्त होऊन 'मारा, मारा भीष्माला ठार करा' असा एकच आक्रोश करीत त्यांच्या अंगावर तुटून पडलें. पण एकटया भीष्मांनीं त्यांच्या त्या आक्रमणाचा सारा दर्प उतरवून व रक्ताचे पूर वाहवून त्यांचा पूर्णपणें पराभव केला. त्यानंतर शाल्व नांवाचा एक राजा त्यांच्याशीं निकराचे द्वंद्वयुद्ध करण्यास्तव आला. भीष्मांनीं लवकरच त्याला विरथ व विशस्त्र करून

बंदिवान केलें. वास्तविक त्यांनी त्याला ठारच मारलें असतें. पण मेलेल्याला अधिक मारण्यांत अर्थ काय ? म्हणून त्यांनी त्याला जीवदान दिलें. त्या तिन्ही मुली घेऊन भीष्म आपल्या राजधानींत परत आले व सत्यवतीच्या स्वाधीन त्या मुली करून विचित्र-वीर्याच्या विवाहाची त्यांनीं सिद्धता चालविली. पण ऐन विवाहाच्या प्रसंगीं त्या तीन मुलींपैकी सर्वात वडील मुलगी जी अम्बा ती भीष्मांना असें म्हणू लागली की :—

सत्यवत्यास्त्वनुमते विवाहे समुपस्थिते ।
उवाच वाक्यं सव्रीडा ज्येष्ठा काशिपतेः सुता ॥ ४
भीष्म त्वमसि धर्मज्ञः सर्वशास्त्रविशारदः ।
श्रुत्वा च वचनं धर्म्यं महयं कर्तुमिहार्हसि ॥ ५
मया शाल्वपतिः पूर्वं मनसाऽभिवृतो वरः ।
तेन चास्मि वृता पूर्वं रहस्यविदिते पितुः ॥ ६
कथं मामन्यकामां त्वं राजधर्ममतीत्य वै ।
वासयेथा गृहे भीष्म कौरवः सन् विशेषतः ॥ ७
एतद् बुद्धया विनिश्चित्य मनसा भरतर्षभ ।
यत् क्षमं ते महाबाहो तविहारब्धुमर्हसि ॥ ८
स मां प्रतीक्षते व्यक्तं शाल्वराजो विशांपते ।
तस्मान्मां त्वं कुरुश्रेष्ठ समनुज्ञातुमर्हसि ॥ ९
कृपां कुरु महाबाहो मयि धर्मभृतां वर ।
त्वं हि सत्यव्रतो वीर पृथिव्यामिति नः श्रुतम् ॥ १०

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १७४

" नंतर सत्यवतीच्या अनुमतीनें विवाह ठरल्यावर त्या मुलींपैकीं ज्येष्ठ जी अंबा ती भीष्मांना असें म्हणू लागली कीं, हे भीष्मा, तूं धर्मज्ञ असून सर्वशास्त्रविशारद आहेस. मी तुला जें सांगतें तें करणें हें तुझें कर्तव्य आहे. मी मनानें पूर्वीच शाल्व राजाला वरलें असून त्यानेंही मनानें पूर्वीच मला वरलें आहे. माझ्या पित्याला माहीत नसतांनाच एकांतांत आम्ही परस्परांस वचनें दिलीं. अशा स्थितींत मनानें दुसऱ्यावर प्रेम करणाऱ्या मुलीला तू कुलवंत कौरव असतांना राजधर्माचें उल्लंघन करून आपल्या घरीं कसें ठेवूं इच्छि-

तोस ? माझ्या या म्हणण्याचा योग्य विचार करून तुला जें हवें तें तू करूं शकतोस. राजा शाल्व माझी निश्चित प्रतीक्षा करीत असेल. अशा स्थितीत मला तिकडे गेलेंच पाहिजे. धार्मिक लोकांत तू अत्यंत श्रेष्ठ आहेस. सत्यसंध म्हणून सर्व जगांत तुझी कीर्ति पसरलेली आहे. तू माझ्यावर कृपा कर."

भीष्मानें तिचें म्हणणें ऐकून तिची शाल्वाकडे रवानगी केली. पुढें जो प्रसंग उद्भवला त्यांत भीष्म वस्तुतः पूर्णपणें कसे निर्दोषी होते हें स्पष्ट व्हावें म्हणून व कांहीं लोक भीष्मांवर या प्रकरणांत जो दोषारोप करतात तो कसा पूर्णपणें चुकीचा आहे हें ध्यानांत यावें म्हणून महाभारतांत या प्रकरणासंबंधी पुढें काय घडलें तें सांगणारा जो परिच्छेद आहे तोच मी येथें उद्धृत करतों. भीष्म उद्योगपर्वात स्वतःच हा वृत्तान्त दुर्योधनाला सांगतांना म्हणतात :—

ततोऽहं समनुज्ञाप्य कालीं गन्धवतीं तदा ।
मन्त्रिणश्चर्त्विजश्चैव तथैव च पुरोहितान् ॥ १
समनुज्ञासिषं कन्यामम्बां ज्येष्ठां नराधिप ।
अनुज्ञाता ययौ सा तु कन्या शाल्वपतेः पुरम ॥ २
वृद्धैर्द्विजातिभिर्गुप्ता धात्र्या चानुगता तदा ।
अतीत्य च तमध्वानमासाद्य नृपतिं तथा ॥ ३
सा तमासाद्य राजानं शाल्वं वचनमब्रवीत् ।
आगताऽहं महाबाहो त्वामुद्दिश्य महामते ॥ ४
तामब्रवीच्छाल्वपतिः स्मयन्निव विशांपते ।
त्वयाऽन्यपूर्वया नाहं भार्यार्थी वरवर्णिनि ॥ ५
गच्छ भद्रे पुनस्तत्र सकाशं भीष्मकस्य वै ।
नाहमिच्छामि भीष्मेण गृहीतां त्वां प्रसह्य वै ॥ ६
त्वं हि भीष्मेण निर्जित्य नीता प्रीतिमतो तदा ।
परामृश्य महायुद्धे निर्जित्य पृथिवीपतीन् ॥ ७
नाहं त्वय्यन्यपूर्वायां भार्यार्थी वरवर्णिनि ।
कथमस्मद्विधो राजा परपूर्वां प्रवेशयेत् ॥ ८
नारीं विदितविज्ञानः परेषां धर्ममादिशन् ।
यथेष्टं गम्यतां भद्रे मा त्वां कालोऽत्यगादयम् ॥ ९

अम्बा तमब्रवीद्राजन्नङ्गशरपीडिता ।
नैवं वद महीपाल नैतदेवं कथञ्चन ।। १०
नास्मि प्रीतिमती नीता भीष्मेणाभित्रकर्शन ।
बलान्नीताऽस्मि रुदती विद्राव्य पृथिवीपतीन् ।। ११
भजस्व मां शाल्वपते भक्तां बालामनागसम् ।
भक्तानां हि परित्यागो न धर्मेषु प्रशस्यते ।। १२
साऽहमामन्त्र्य गाङ्गेयं समरेष्वनिवर्तिनम् ।
अनुज्ञाता च तेनैव ततोऽहं भृशमागता ।। १३
न स भीष्मो महाबाहुर्मामिच्छति विशांपते ।
भ्रातृहेतोः समारंभो भीष्मस्येति श्रुतं मया ।। १४
भगिन्यौ मम ये नीते अम्बिकाम्बालिके नृप ।
प्रादाद्विचित्रवीर्याय गाङ्गेयो हि यवीयसे ।। १५
यथा शाल्वपते नान्यं वरं ध्यामि कथञ्चन ।
त्वामृते पुरुषव्याघ्र तथा मूर्धानमालभे ।। १६
न चान्यपूर्वा राजेन्द्र त्वामहं समुपस्थिता ।
सत्यं ब्रवीमि शाल्वैतत् सत्येनात्मानमालभे ।। १७
भजस्व मां विशालाक्ष स्वयं कन्यामुपस्थिताम् ।
अनन्यपूर्वां राजेन्द्र त्वत्प्रसादाभिकाङ्क्षिणीम् ।। १८
तामेवं भाषमाणां तु शाल्वः काशिपतेः सुताम् ।
अत्यजद्भरतश्रेष्ठ जीर्णां त्वचमिवोरगः ।। १९
एवं बहुविधैर्वाक्यैर्याच्यमानस्तया नृपः ।
नाश्रद्दधच्छाल्वपतिः कन्यायां भरतर्षभ ।। २०
ततः सा मन्युनाऽऽविष्टा ज्येष्ठा काशिपतेः सुता ।
अब्रवीत् साश्रुनयना बाष्पविप्लुतया गिरा ।। २१
त्वया त्यक्ता गमिष्यामि यत्र तत्र विशाम्पते ।
तत्र मे गतयः सन्तु सन्तः सत्यं यथा ध्रुवम् ।। २२
एवं तां भाषमाणां तु कन्यां शाल्वपतिस्तदा ।
परित्यत्याज कौरव्य करुणं परिदेवतीम् ।। २३
गच्छ गच्छेति तां शाल्वः पुनः पुनरभाषत ।
बिभेमि भीष्मात् सुश्रोणि त्वं च भीष्मपरिग्रहः ।। २४

एवमुक्ता तु सा तेन शाल्वेनादीर्घदर्शिना ।
निश्चक्राम पुराद्दीना रुदती कुररी यथा ॥ २५

—महाभारत, उदयोगपर्व अध्याय १७५

नतर मी माझी माता जी सत्यवती तिची आज्ञा घेऊन व अम्बेच्या बाबतीत आपण काय करावें यासबंधी मत्री, ऋत्विज व पुरोहित यांचा विचार घेऊन त्यांच्या अनुमतीने त्या मुलीला शाल्वाकडे जावयास अनुज्ञा दिली. वृद्ध ब्राह्मण व दासी तिच्याबरोबर दिल्या. ती शाल्वाकडे जाऊन त्याला म्हणाली, हे महाबाहो, मी तुझ्याकडे आले आहे. त्याबरोबर शाल्व चेहऱ्यावर आश्चर्य दाखवून तिला असें म्हणाला की, तुझ्यासारख्या एकवार दुसऱ्याकडे गेलेल्या मुलीची मला इच्छा नाही. भीष्मानें आपल्या पराक्रमानें सर्व पृथ्वीवरील राजाना जिकून तुला ज्या वेळी नेलें त्या वेळी तुला आनंद झाला असें मला दिसून आले. जिकून भीष्मानें तुला एकदां नेल्यावर व तेंही पत्नीच्या नात्याने नेल्यावर आमच्यासारखा धर्मज्ञ राजा पुनश्च तुझा स्वीकार कसा करील ? तेव्हां तुला वाटेल तिकडे जा. आमचें तुला असें सागणें आहे की, तू आपला येथें व्यर्थ वेळ गमाविण्यांत कांही एक अर्थ नाही. त्याबरोबर ती कामपीडित अम्बा त्या राजाला असें म्हणू लागली की, हे महीपाला, असें मुळीच घडलेलें नाही. तू असे बोलू नकोस. भीष्माबरोबर मी माझ्या इच्छेनें गेलेलें नाही. मी रथांत रोदनच करीत होतें. त्याने आपल्या पराक्रमानें सर्व राजांना पळवून लावून मला नेलें. माझ्यासारख्या अनुरक्त, निरपराध अशा मुलीचा परित्याग धर्मदृष्टचा प्रशसनीय नाहीं. युद्धांत कधीही निवृत्त न होणाऱ्या गंगापुत्र भीष्माला सर्व गोष्टीची नीट कल्पना देऊन त्यानें मला अनुज्ञा दिल्यावर मी त्याच्या अनुज्ञेनेंच येथें आलें आहे. महाबाहू भीष्माला, माझी मुळीच इच्छा नाही. आपल्या भावाच्या विवाहासाठीं त्यानें हें सारे केलें. अम्बिका व अम्बालिका या माझ्या दोन बहिणीचा विवाह त्यानें आपला धाकटा बंधु जो विचित्रवीर्य त्याच्याशीच केला आहे. हे शाल्वपते, मी माझ्या मस्तकाची शपथ घेऊन सांगतें कीं तुझ्या वांचून दुसऱ्या कोणत्याही पुरुषाची 'वर' म्हणून मी कधींच मनांत

देखील कल्पना केली नाही. हे राजेन्द्रा, मी अन्यपूर्व स्थितीत तुझ्याकडे मुळीच आलेलें नाही. मी सत्य तेंच सांगते. मी सत्याची शपथ घेतें. अनन्यपूर्वा, तुझ्या प्रसादाची इच्छा करणारी अशी ही कन्या आहे. तिचा तू कृपापूर्वक स्वीकार कर.

याप्रमाणें ती वारवार विनती करीत असतादेखील सर्पाने कात टाकावी त्याप्रमाणें शाल्वानें तिचा परित्याग केला. अनेक प्रकारांनी तिनें त्याची विनवणी केली तरी त्याचा तिच्यावर मुळीच विश्वास बसला नाहीं. त्याबरोबर तिला अत्यंत क्रोध आला. डोळ्यांत पाणी आणून भरल्या कंठानें ती शाल्वाला असें म्हणाली की, तू माझा परित्याग केला आहेस. पाय नेतील तिकडे मी आतां जाईन. असुरक्षित स्थितीत देखील संत सज्जन माझें संरक्षण करतीलच. याप्रमाणें करुण भाषण करणाऱ्या त्या कन्येचा शाल्वानें परित्यागच केला. तो तिला पुनःपुन्हां म्हणू लागला की, हे सुदरी, तुला येथून जितक्या लवकर जाणें शक्य असेल, तितक्या लवकर जा. तू भीष्माचा परिग्रह आहेस. मला भीष्मांचें भय वाटतें. याप्रमाणें त्या मूर्ख शाल्वानें तिचा परित्याग केल्यामुळें तेथून ती हरणीप्रमाणे करुण आक्रंदन करीत निघाली.''

या सर्व प्रकरणाचा सूक्ष्म विचार केला तर त्यांत भीष्मांचा अणुमात्रही दोष नाही असेंच दिसून येतें. क्षत्रियांच्या स्वयंवरात जो आपला पराक्रम प्रकट करील त्याला स्वयंवरातील मुलगी नेण्याचा अधिकार असे. त्या रूढ अशा तत्कालीन पद्धतीप्रमाणे भीष्मांनीं या मुली नेल्या, त्यामुळें त्यांत त्यांना दोष देण्यासारखे कांहींही नाहीं. पुढें भीष्मांनी अम्बेची जी पाठवणी केली त्यावरून त्याचवेळीं जर अम्बेनें भीष्माना वस्तुस्थितीची नीट कल्पना दिली असती तर भीष्मांनी कधीही तिला बळाने नेलें नसतें हें स्पष्टपणें सिद्ध होतें. अम्बेनें आपली बाजू त्याच वेळीं त्यांच्यासमोर मांडणें अवश्य होतें. भीष्मांच्या सर्वमान्य व्यक्तिमत्त्वामुळें व त्यांनी रणांगणांत दाखविलेल्या अपूर्व पराक्रमामुळें मोठमोठे क्षत्रिय वीर घाबरून दाती तृण धरून पळून गेले. त्या स्थितींत ती मुलगी घाबरणें व तिला त्यांना तसें सांगण्याचें अवधान न रहाणें अत्यंत स्वाभाविक

होतें. हें जरी गृहीत धरले तरी त्याबरोबरच दुसरें हेंही लक्षांत ठेवणे अवश्यच आहे की, भीष्मांना असे कुणी सागितल्यावांचून त्यांना तरी ती गोष्ट कळण्यास दुसरा काय मार्ग होता? शाल्व युद्धांत त्याच्या अगावर चालून आला व व्यर्थ पराक्रमाने भीष्मांना जिकण्याच्या भरीस पडून फजीत पावला. त्याऐवजी त्याला भीष्मांच्या पुढे आपल्या व अम्बेच्या झालेल्या आणाभाका सांगून आपली बाजू मांडता आली असती व तसे झाले असतें तर सगळेच प्रकरण सामोपचारानें सपलें असतें. तसे त्यानें मुळीच केलें नाहीं. अम्बेनें आल्याबरोबरही भीष्मांना ही बाजू मुळींच सांगितली नाहीं. तरीही ऐन विवाहाच्या वेळी अम्बेनें भीष्मांना आपलें म्हणणें सांगतांच भीष्मांनी तिला तिच्या इच्छेनुरूप शाल्वाकडे पाठवून दिलें. व तेंही एकटे न पाठवितां वृद्ध दासी, वृद्ध घरंदाज सेवक व राजधानीतील दायित्व अंगावर घेणारे ब्राह्मण यांच्यासह त्यांनीं तिला शाल्वाकडे परत पाठविलें. शाल्वानें जे संशय व्यक्त करून तिला काढून लावलें तसें करण्याचें त्याला कोणतेंही कारण नव्हतें. अम्बेबरोबर भीष्मांची मंडळी आहेत हें पाहून तरी त्याला हें निश्चित समजू शकत होतें की तिला भीष्मांनीच आपणांकडे पाठविलें आहे. ती सांगत होती तो वृत्तान्त खरा कीं खोटा याचा पडताळा तो या लोकांना विचारून घेऊं शकत होता. पण खोटचा अभिमानाला बळी पडून भीष्मांनी केलेल्या आपल्या पराभवाचा सूड त्यानें मूर्खाप्रमाणें तिच्यावर काढला. म्हणून या संबंधांत दोषी जर कोणी असला तर तो शाल्व ठरतो. भीष्म नाहीं. म्हणूनच त्याला अदीर्घदर्शी असें विशेषण महाभारतांत लावलेलें आहे. येवढें स्पष्टीकरण ध्यानांत ठेवलें म्हणजे यापुढील प्रकरणांत भीष्मांची बाजू कशी न्यायावर आधारलेली होती हें स्पष्ट होतें.

पुढे ती अम्बा शोक करीत तेथून निघाली. ती अरण्यांत गेली. ती आपल्या दैवाला, शाल्वाच्या मूर्खपणाला, स्वयंवर रचणाऱ्या आपल्या पित्याला व भीष्मांनाही दोष देत रडत रडत मार्ग आक्रमण करीत होती. वनांत अनेक तपस्वी तिला भेटले. त्यांनी तिची नाना प्रकारें विचारपूस चालविली. तिनें त्यांना सर्व वृत्तान्त सांगि-

तला. त्यातील कोणी आपआपल्या लहरीनुरूप जो दोषी वाटेल त्याला दूषणे देत होते. त्या सर्वांनी तिला असे सांगितले की, येथे राहाणें सर्वथा उचित नाही. तुझा विचार जरी तपस्येत काळ कठण्याचा असला तरी तुझ्यासारख्या सुदर व तरुण स्त्रीला एकाकी अवस्थेंत विजनवासात पाहून मृगयेच्या निमित्तानें येथें येणारे सबल राजे व राजपुत्र तुला त्रास दिल्यावांचून राहणार नाहीत व त्यायोगे झालें आहे याहूनही तुझ्या जीवनाचे अधिक मातेरे मात्र होईल. त्यापेक्षां तू आपल्या पित्याच्या घरी जा. तरुण स्त्रीला सरक्षण अवश्य हवें. पित्याच्या घरी मान नि सन्मान कसला आला आहे? पण ती इतकी हटवादी होती की तिने स्वच्छ शब्दांत ऋषीना पुढीलप्रमाणें उत्तर दिलें:–

न शक्यं काशिनगरं पुनर्गन्तुं पितुर्गृहान् ।
अवज्ञाता भविष्यामि बान्धवानां न संशयः ।। १२
उषिताऽस्मि तथा बाल्ये पितुर्वेश्मनि तापसाः ।
नाहं गमिष्ये भद्रं वस्तत्र यत्र पिता मम ।
तपस्तप्तुमभीप्सामि तापसैः परिरक्षिता ।। १३
यथा परेऽपि मे लोके न स्यादेवं महात्ययः ।
दौर्भाग्यं तापसश्रेष्ठास्तस्मात्तप्स्याम्यहं तपः ।। १४

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १७६

"काशिनगरीला आपल्या पित्याच्या घरी जाणें मला शक्य नाही. माझ्या नातलगांच्या घरी मी अपमानित होईन. हे तापसांनो, माझ्या लहानपणी जेथें मी सन्मानानें नांदलें तेथें आतां अपमानित स्थितीत मी मुळींच जाणार नाही. आपणांबरोबर मी येथें तपश्चर्या करूं इच्छितें. माझा इहलोक तर बुडालाच आहे. पण परलोकही बुडावा अशी माझी इच्छा नाही." याप्रमाणें ती कन्या बोलत असतांनाच तेथें होत्रवाहन नांवाचा एक राजर्षि आला. त्यानें तिला ओळखलें व तिच्या दुःखानें अत्यंत दुःखी होऊन तो त्या तापस्यांना सांगूं लागला कीं, ही माझी नात आहे. तो परशुरामांचा मित्र होता. त्यानें तिचें तें सर्व वृत्त ऐकून परशुरामांच्याकडे तिनें जावें म्हणजे तिचें दुःख दूर होईल असें सांगितलें.

हा संवाद चालू असतांनाच परशुरामांचा शिष्य अकृतव्रण तेथें उपस्थित झाला. त्याला सर्व वृत्तांत सांगून होत्रवाहनानें असें सांगितलें कीं, जरी भीष्मानें हिच्या विनंतीवरून शाल्वाकडे हिला पाठविलें असलें तरी, तोच आपल्या दुःखाचें मूळ आहे अशी हिची समजूत आहे. अकृतव्रणानें भार्गवराम उद्यां सकाळी येथे येणार आहेत असें सांगून त्या मुलीला त्यांच्याजवळ दुःख सांगण्याविषयीं सूचना दिली. पण अकृतव्रण तिला विचारूं लागला की, 'तू स्वतः रामांच्याकडून कोणतें काम व्हावें याची इच्छा करतेस तें सांग.' अम्बेनें वास्तविक भीष्मांचा कांहीं अपराध तिलाही दाखवितां येत नसल्यानें आपली बाजू पुनश्च अकृतव्रणाजवळ मांडून त्यानेंच त्याला जें योग्य दिसेल तें करावें असें सुचविलें. पण केवळ भीष्मांच्या पराक्रमामुळें अकारण मत्सरप्रेरित होऊन अकृतव्रणानेंच तिच्या मनांत भीष्मांच्या विनाशाची कल्पना भरविली. थोर लोकांचे अकारण वैरी असतात ते हे असे ! तो सारा संवादच मी येथें उद्धृत करतोः—

अकृतव्रण उवाच ।

दुःखद्वयमिदं भद्रे कतरस्य चिकीर्षसि ।
प्रतिकर्तव्यमबले तत्त्वं वत्से वदस्व मे ॥ १
यदि सौभपतिर्भद्रे नियोक्तव्यो मतस्तव ।
नियोक्ष्यति महात्मा स रामस्त्वद्धितकाम्यया ॥ २
अथापगेयं भीष्मं त्वं रामेणेच्छसि धीमता ।
रणे विनिर्जितं द्रष्टुं कुर्यात्तदपि भार्गवः ॥ ३
सृञ्जयस्य वचः श्रुत्वा तव चैव शुचिस्मिते ।
यदत्र ते भृशं कार्यं तदद्यैव विचिन्त्यताम् ॥ ४

अम्बोवाच ।

अपनीताऽस्मि भीष्मेण भगवन्न विजानता ।
नाभिजानाति मे भीष्मो ब्रह्मन् शाल्वगतं मनः ॥ ५
एतद्विचार्य मनसा भवानेतद्विनिश्चयम् ।
विधिनोतु यथान्यायं विधानं क्रियतां तथा ॥ ६

भीष्मे वा कुरुशार्दूले शाल्वराजेऽथवा पुनः ।
उभयोरेव वा ब्रह्मन् युक्तं यत्तत् समाचर ॥ ७
निवेदितं मया ह्येतद्दुःखमूलं यथातथम् ।
विधानं तत्र भगवन् कर्तुमर्हसि युक्तितः ॥ ८

अकृतव्रण उवाच ।

उपपन्नमिदं भद्रे यदेवं वरवर्णिनि ।
धर्मं प्रति वचो ब्रूयाः शृणु चेदं वचो मम ॥ ९
यदि त्वामापगेयो वै न नयेद्गजसाह्वयम् ।
शाल्वस्त्वां शिरसा भीरु गृह्णीयाद्रामचोदितः ॥ १०
तेन त्वं निर्जिता भद्रे यस्मान्नीताऽसि भाविनि ।
संशयः शाल्वराजस्य तेन त्वयि सुमध्यमे ॥ ११
भीष्मः पुरुषमानी च जितकाशी तथैव च ।
तस्मात् प्रतिक्रिया युक्ता भीष्मे कारयितुं तव ॥ १२

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १७७

अकृतव्रण म्हणाला : हे वत्से, तुझें दुःख दोन प्रकारचें आहे. त्यां पैकी कोणत्या दुःखाचा तुला प्रतिकार करावयाचा आहे तें सांग शाल्वाचें नियंत्रण करावयाचें असेल तर तसें सांग. शाल्व तुल पत्करील असें राम करतील. किंवा रणामध्यें रामांनी भीष्मांन जिकावें अशी तुझी इच्छा असल्यास राम तेंही करतील. तू त तुझे आजोबा यांनी मिळून दोनपैकीं कांहींही ठरवावें. हें ऐकतांच अंबा म्हणूं लागली : शाल्वाकडे माझें मन गुंतलें आहे, हें मल नेतांना भीष्मांना मुळींच माहीत नव्हतें. तेव्हां अशा स्थितीत ज्य कोणाचा प्रतिकार करणें आपणांस योग्य वाटत असेल त्याचा आपण प्रतिकार करावा. त्यावर अकृतव्रण तिला असें म्हणू लागला की "जर भीष्मानें तुला नेलें नसतें तर शाल्वानें खात्रीनें रामांच्य म्हणण्यावरून तुझा स्वीकार केला असता. पण भीष्मानें तुल जिकलें म्हणूनच शाल्वाच्या अंतःकरणांत तुझ्याविषयीं संशय उत्पन्न झालेला आहे. आपल्या पौरुषाचा भीष्माला अहंकार आहे स्वतःला तो मोठा अजिक्य समजतो. त्यामुळें त्याचाच प्रतिकार करणे माझ्या मतें योग्य आहे."

अकृतव्रणाचा हा हट्ट तामसी आहे. भीष्मानें अंबेला नेलेंच नसतें तर शाल्वाने तिचा स्वीकार करावयास परशुरामांच्या साहाय्याची कांहीं एक आवश्यकता नव्हती. पण केवळ भीष्म पराक्रमी आहेत एवढ्याचसाठी त्यांच्यावर शस्त्र परजणें हें आपलें कर्तव्य आहे अशा ब्राह्मण्याला न शोभणाऱ्या मत्सराच्या व द्वेषाच्या भावनेनें अकृतव्रण पछाडला गेला. त्या मुलीला काय, ती त्याच्या म्हणण्याला तत्काल वश झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं राम तेथें आले. त्यांना सर्व वृत्तांत सांगण्यांत आला. भीष्म म्हणतात :—

तस्याश्च दृष्ट्वा रूपं च वपुश्चाभिनवं पुनः ।
सौकुमार्यं परं चैव रामश्चिन्तापरोऽभवत् ॥ २८
किमियं वक्ष्यतीत्येवं विममर्श भृगूद्वहः ।
इति दध्यौ चिरं रामः कृपयाऽभिपरिप्लुतः ॥ २९
कथ्यतामिति सा भूयो रामेणोक्ता शुचिस्मिता ।
सर्वमेव यथातत्त्वं कथयामास भार्गवे ॥ ३०
तच्छ्रुत्वा जामदग्न्यस्तु राजपुत्र्या वचस्तदा ।
उवाच तां वरारोहां निश्चित्यार्थविनिश्चयम् ॥ ३१

राम उवाच ।

प्रेषयिष्यामि भीष्माय कुरुश्रेष्ठाय भाविनि ।
करिष्यति वचो महयं श्रुत्वा च स नराधिपः ॥ ३२
न चेत्करिष्यति वचो मयोक्तं जाह्नवीसुतः ।
धक्ष्याम्यहं रणे भद्रे सामात्यं शस्त्रतेजसा ॥ ३३
अथवा ते मतिस्तत्र राजपुत्रि न वर्तते ।
यावच्छाल्वपतिं वीरं योजयाम्यत्र कर्मणि ॥ ३४

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १७७

वाचा भीष्मश्च शाल्वश्च मम राज्ञि वशानुगौ ।
भविष्यतोऽनवद्याङ्गि तत् करिष्यामि मा शुचः ॥ ३
न तु शस्त्रं ग्रहीष्यामि कथञ्चिदपि भाविनि ।
ऋते नियोगाद्विप्राणामेष मे समयः कृतः ॥ ४

म. भा. २४

राम उवाच ।

काशिकन्ये पुनर्ब्रूहि भीष्मस्ते चरणावुभौ ।
शिरसा वन्दनार्होऽपि ग्रहीष्यति गिरा मम ।। ६

अम्बोवाच ।

जहि भीष्मं रणे राम गर्जन्तमसुरं यथा ।
समाहूतो रणे राम मम चेदिच्छसि प्रियम् ।।
प्रतिश्रुतं च यदपि तत् सत्यं कर्तुमर्हसि ।। ७

भीष्म उवाच ।

ततोः संवदतोरेवं राजन् रामाम्बयोस्तदा ।
ऋषि. परमधर्मात्मा इदं वचनमब्रवीत् ।। ८
शरणागतां महाबाहो कन्यां न त्यक्तुमर्हसि ।
यदि भीष्मो रणे राम समाहूतस्त्वया मृधे ।। ९
निर्जितोऽस्मीति वा ब्रूयात् कुर्याद्वा वचनं तव ।
कृतमस्या भवेत् कार्यं कन्याया भृगुनन्दन ।। १०
वाक्यं सत्यं च ते वीर भविष्यति कृत विभो ।
इयं चापि प्रतिज्ञा ते तदा राम महामुने ।। ११
जित्वा वै क्षत्रियान् सर्वान् ब्राह्मणेषु प्रतिश्रुता ।
ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चैव रणे यदि ।। १२
ब्रह्मद्विड्भविता तं वै हनिष्यामीति भार्गव ।
शरणार्थे प्रपन्नानां भीतानां शरणार्थिनाम् ।। १३
न शक्ष्यामि परित्यागं कर्तु जीवन् कथञ्चन ।
यश्च कृत्स्नं रणे क्षत्रं विजेष्यति समागतम् ।। १४
दीप्तात्मानमहं तं च हनिष्यामीति भार्गव ।
स एवं विजयी राम भीष्म. कुरुकुलोद्वहः ।
तेन युध्यस्व सङ्ग्रामे समेत्य भृगुनन्दन ।। १५

राम उवाच ।

यदि भीष्मो रणश्लाघो न करिष्यति मे वचः ।
हनिष्याम्येनमुद्रिक्तमिति मे निश्चिता मतिः ।। १८
न हि बाणा मयोत्सृष्टाः सज्जन्तीह शरीरिणाम् ।
कायेषु विदित तुभ्यं पुरा क्षत्रियसङ्गरे ।। १९

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १७८

"त्या मुलीचे रूप, सौकुमार्य, व शोकमग्नता पाहून रामाच्या अतःकरणांत अपार दया उत्पन्न झाली. विकारांनीं विचारांचा ताबा घेतल्यावर राम तिला म्हणू लागले, मी कुरुश्रेष्ठ भीष्माकडे निरोप पाठवितो. जर तो माझे म्हणणे ऐकणार नाही, तर अमा–त्यासहित मी त्याला माझ्या शस्त्रांच्या तेजाने दग्ध करीन. अथवा हचा भानगडीत पडण्याची तुझी इच्छा नसेल तर शाल्वानें तुझा स्वीकार करावा असेंही मी करीन. भीष्म आणि शाल्व दोघेही माझ्या स्वाधीन आहेत. मी त्यांना स्वाधीन करूं शकतो. पण हे काशिकन्ये, मला हातांत शस्त्र घ्यावयास लावूं नकोस. केवळ ब्राह्मणावर संकट आलें तरच मी हातांत शस्त्र घेईन अशी माझी प्रतिज्ञा आहे. तुझी इच्छा असेल तर भीष्म तुझ्या पायावर आपले मस्तक नमवील. वास्तविक सर्वानी त्याच्याच पायावर डोकें ठेवावें अशी वस्तुस्थिति आहे." त्यावर अम्बा म्हणू लागली की, 'गर्जना करणाऱ्या असुरांप्रमाणें भीष्म हा अत्यन्त उन्मत्त आहे. आपण त्यालाच ठार मारा. त्यावाचून माझे दुसऱ्या कशानेंही प्रिय होणार नाही.' त्यावर अकृतव्रण रामांना असा आग्रह करू लागला की, शरण आलेल्या या मुलीचें सरक्षण करणे व तिची इच्छा पुरविणे हे आता आपल्या हातीं आहे. आपण रणांत भीष्माला आव्हान केल्यावर त्याने आपले म्हणणें ऐकले किवा निदान 'मी हरलो' येवढे जरी त्यानें म्हटले तरीही हिच्या मनाचे समाधान होईल. आपणच पूर्वी असें म्हटलें आहे की, ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य–शूद्र यापैकी कोणीही जर ब्रह्मद्वेष्टा निघेल तर मी त्याला ठार मारीन. भ्यालेल्या नि शरण आलेल्या लोकांना मी टाकू शकत नाही. तसेच जो कोणी सर्व क्षत्रियांचा पराभव करून आपल्या तेजानें तळपून उठेल त्याला मी ठार मारीन. भीष्म असाच सर्वाचा विजेता आहे. म्हणून आपण त्याच्याशी युद्ध कराच. भोळे परशुराम अहकारवश होऊन असें म्हणू लागले की, "युद्धाची आवड असलेला भीष्म जर माझे म्हणणें ऐकणार नाहीं तर मी त्याला ठार मारीन. मी सोडलेले बाण देहधारी लोक कधींही सहन करूं शकत नाहीत." तात्पर्य परशुरामांनीं स्वतः होऊन अन्याय्य भूमिका पत्करली व ते हस्तिना-

पुराच्या वेशीवर येऊन थडकले. त्यांनी भीष्मांना निरोप पाठविला. त्यांना असें वाटले की, भीष्म त्यांच्या सामर्थ्यासमोर वाकतील. ते भीष्मांना म्हणू लागले की, तुला इच्छा नसतां तू या मुलीला काय म्हणून आणलेस? त्यामुळें आतां माझी आज्ञा म्हणून तुला हिचा स्वीकार केलाच पाहिजे.

भीष्म कां बुद्धिमास्थाय काशिराजसुता तदा ।
अकामेन त्वयाऽऽनीता पुनश्चैव विसर्जिता ।। २८
प्रत्याख्याता हि शाल्वेन त्वयाऽऽनीतेति भारत ।
तस्मादिमां मन्नियोगात् प्रतिगृह्णीष्व भारत ।। ३०
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १७८

पण भीष्मांनी त्याना असें सांगितलें कीं, मी माझ्या भावाला ही मुलगी कधींही देणार नाही. तो सगळा संवादच महाभारतातील वाङमयाचा अमर अलकार असून त्यांतून भीष्मांच्या व्यक्तिमत्त्वाचे सारे तेजस्वी विशेष व्यक्त होतात. तो संवाद पुढीलप्रमाणें :—

नाहमेनां पुनर्दद्यां ब्रह्मन् भ्रात्रे कथञ्चन ।। ३२
शाल्वस्याहमिति प्राह पुरा मामेव भार्गव ।
मया चैवाभ्यनुज्ञाता गतेयं नगरं प्रति ।। ३३
न भयान्नाप्यनुक्रोशान्नार्थलोभान्न काम्यया ।
क्षात्रं धर्ममहं जह्यामिति मे व्रतमाहितम् ।। ३४
अथ मामब्रवीद्रामः क्रोधपर्याकुलेक्षणः ।
न करिष्यसि चेदेतद्वाक्यं मे नरपुङ्गव ।। ३५
हनिष्यामि सहामात्यं त्वामद्येति पुनः पुनः ।
संरंभादब्रवीद्रामः क्रोधपर्याकुलेक्षणः ।। ३६
तमहं गोभिरिष्टाभिः पुनः पुनरररिन्दम ।
अयाचं भृगुशार्दूलं न चैव प्रशशाम सः ।। ३७
प्रणम्य तमहं मूर्ध्ना भूयो ब्राह्मणसत्तमम् ।
अब्रुवं कारणं किं तद्यत्त्वं युद्धं मयेच्छसि ।। ३८
इष्वस्त्रं मम बालस्य भवतैव चतुर्विधम् ।
उपदिष्टं महाबाहो शिष्योऽस्मि तव भार्गव ।। ३९

ततो मामब्रवीद्राम. क्रोधसंरक्तलोचनः ।
जानीषे मां गुरुं भीष्म गृह्णासीमां न चेद्व ह ।। ४०
सुतां काश्यस्य कौरव्य मत्प्रियार्थं महामते ।
न हि ते विद्यते शान्तिरन्यथा कुरुनन्दन ।। ४१
गृहाणेमां महाबाहो रक्षस्व कुलमात्मनः ।
त्वया विभ्रंशिता ह्येयं भर्तारं नाधिगच्छति ।। ४२
तथा ब्रुवन्तं तमहं रामं परपुरञ्जयम् ।
नैतदेव पुनर्भावि ब्रह्मर्षे किं श्रमेण ते । ४३
गुरुत्वं त्वयि संप्रेक्ष्य जामदग्न्य पुरातनम् ।
प्रसादये त्वां भगवंस्त्यक्तैषा तु पुरा मया ।। ४४
को जातु परभावां हि नारीं व्यालीमवस्थिताम् ।
वासयेत गृहे जानत् स्त्रीणां दोषो महात्ययः ।। ४५
न भयाद्वासवस्यापि धर्मं जह्यां महाव्रत ।
प्रसीद मा वा यद्वा ते कार्यं तत्कुरु मा चिरम् ।। ४६
अयं चापि विशुद्धात्मन् पुराणे श्रूयते विभो ।
मरुत्तन महाबुद्धे गीतः श्लोको महात्मना ।। ४७
" गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ।। ४८
स त्वं गुरुरिति प्रेम्णा मया संमानितो भृशम् ।
गुरुवृत्तिं न जानीषे तस्माद्योत्स्यामि वै त्वया ।। ४९
गुरु न हन्यां समरे ब्राह्मणं च विशेषतः ।
विशेषतस्तपोवृद्धमेवं क्षान्तं मया तव ।। ५०
उद्यतेषुमथो दृष्ट्वा ब्राह्मणं क्षत्रबन्धुवत् ।
थी हन्यात् समरे क्रुद्धं युध्यन्तमपलायिनम् ।। ५१
ब्रह्महत्या न तस्य स्यादिति धर्मेषु निश्चयः ।
क्षत्रियाणां स्थितो धर्मे क्षत्रियोऽस्मि तपोधन ।। ५२
यो यथा वर्तते यस्मिंस्तस्मिन्नेव प्रवर्तयन् ।
नाधर्मं समवाप्नोति न चाश्रेयश्च विन्दति ।। ५३
अर्थे वा यदि वा धर्मे समर्थो देशकालवित् ।
अर्थसंशयमापन्नः श्रेयान्निःसंशयो नरः ।। ५४

यस्मात् संशयितेऽप्यर्थेऽयथान्यायं प्रवर्तसे ।
तस्माद्योत्स्यामि सहितस्त्वया राम महाहवे ॥ ५५
पश्य मे बाहुवीर्यं च विक्रमं चातिमानुषम् ।
एवं गतेऽपि तु मया यच्छक्यं भृगुनन्दन ॥ ५६
तत्करिष्ये कुरुक्षेत्रे योत्स्ये विप्र त्वया सह ।
द्वन्द्वे राम यथेष्टं मे सज्जीभव महाद्युते ॥ ५७
तत्र त्वं निहतो राम मया शरशतार्दितः ।
प्राप्स्यसे निर्जितांल्लोकान् शस्त्रपूतो महारणे ॥ ५८
स गच्छ विनिवर्तस्व कुरुक्षेत्रं रणप्रिय ।
तत्रैष्यामि महाबाहो युद्धाय त्वां तपोधन ॥ ५९
अपि यत्र त्वया राम कृतं शौचं पुरा पितुः ।
तत्राहमपि हत्वा त्वां शौचं कर्ताऽस्मि भार्गव ॥ ६०
तत्र राम समागच्छ त्वरितं युद्धदुर्मद ।
व्यपनेष्यामि ते दर्पं पौराणं ब्राह्मणब्रुवः ॥ ६१
यच्चापि कत्थसे राम बहुशः परिवत्सरे ।
निर्जिताः क्षत्रिया लोके मयैकेनेति तच्छृणु ॥ ६२
न तदा जातवान् भीष्मः क्षत्रियो वाऽपि मद्विधः ।
पश्चाज्जातानि तेजांसि तृणेषु ज्वलितं त्वया ॥ ६३
यस्ते युद्धमयं दर्पं कामं च व्यपनाशयेत् ।
सोऽहं जातो महाबाहो भीष्मः परपुरञ्जयः ।
व्यपनेष्यामि ते दर्पं युद्धे राम न संशय ॥ ६४

भीष्म उवाच ।

ततो मामब्रवीद्रामः प्रहसन्निव भारत ।
दिष्ट्या भीष्म मया सार्धं योद्धुमिच्छसि सङ्गरे ॥ ६५
अयं गच्छामि कौरव्य कुरुक्षेत्रं त्वया सह ।
भाषितं ते करिष्यामि तत्रागच्छ परंतप ॥ १६
तत्र त्वां निहतं माता मया शरशताचितम् ।
जाह्नवी पश्यतां भीष्म गृधकङ्कबलाशनम् ॥ ६७
कृपणं त्वामभिप्रेक्ष्य सिद्धचारणसेविता ।
मया विनिहतं देवी रोदतामद्य पार्थिव ॥ ६८

अंतर्वहा महाभागा भागीरथसुताऽनघा ।
या त्वामजीजनन्मन्दं युद्धकामुकमातुरम् ॥ ६९
एहि गच्छ मया भीष्म युद्धकामुक दुर्मद ।
गृहाण सर्वं कौरव्य रथादि भरतर्षभ ॥ ७०
इति ब्रुवाणं तमहं रामं परपुरञ्जयम् ।
प्रणम्य शिरसा राममेवमस्त्वित्यथाब्रुवम् ॥ ७१

—महाभारत, उदयोगपर्व अध्याय १७८

भीष्म म्हणाले: काय वाटेल तें झालें तरी या मुलीचा विवाह आतां मी माझ्या भावाशीं करूं शकणार नाही. हिनेंच मला आपले शाल्वावर प्रेम असल्याचें सांगितलें व हिच्या इच्छेनुसारच मी हिची शाल्वाकडे रवानगी केली. आतां मी पुन्हां हिचा स्वीकार कसा करणार? भय, दया, अर्थ, लोभ, लहर यांपैकीं कोणत्याही गोष्टींनीं मी माझा क्षात्रधर्म कधींही कलकित करणार नाही. हें माझे ठरलेलें व्रत आहे. त्याबरोबर राम खदिरांगाराप्रमाणें नेत्र लाल करून पुन:पुन्हां असे म्हणू लागले की, जर तू माझी आज्ञा ऐकणार नाहीस तर अमात्यासहित मी तुला ठार मारल्यावांचून राहणार नाही. मी पुन: पुन्हां त्यांची विनवणी केली पण, ते शात होईचनात. शेवटी मी त्याना म्हटलें, अगदीं पायावर डोकें ठेवून नमस्कार करून म्हटलें की माझ्याशी ही युद्ध करण्याची वासना आपण काय म्हणून बाळगता? माझ्या लहानपणी आपणच मला साङ्गधनुर्वेदाचें व अस्त्रांचें शिक्षण देऊन कृतार्थ केले आहे. भार्गवा, मी आपलाच शिष्य आहे. माझ्याशी आपण युद्ध करण्याची कां इच्छा करावी? पण रामांनी रागानें मला धमकावून असें सांगितलें की, मला तू एकदा गुरु म्हणतोस व शिवाय माझी अवज्ञा करतोस? जर तुला माझें कांहीं प्रिय करावयाचें असेल तर या काशिराज-कन्येचा तूं स्वीकार कर. हिचा स्वीकार कर व माझ्या क्रोधापासून आपल्या कुळाचें संरक्षण कर. तुझ्याचमुळें हिच्यावर ही आपत्ति आलेली आहे. मी रामांना पुनश्च हात जोडून सांगितलें, जी गोष्ट व्हावयाची नाहीं तिचा व्यर्थ आग्रह धरण्यांत काय अर्थ आहे? केवळ तुम्ही माझे पूर्वीचे गुरु आहांत म्हणून मी तुमची एवढी विनवणी

करीत आहे. पण या मुलीचा स्वीकार माझा कांहीं एक अपराध नसतांना केवळ तुमच्या अधार्मिक हट्टासाठीं मी कालत्रयींही करणार नाहीं. दुसऱ्याकडे जिची आणभाक झाली आहे व परक्यावर जिचें मन बसले आहे त्या मुलीला एखाद्या सर्पिणीप्रमाणें कोणता कुलवान् आपल्या घरी आश्रय देईल? कुळाची इभ्रत मी घालवावयाला सिद्ध नाही. भयाच्या गोष्टी मला सांगणे व्यर्थ आहे. इंद्राच्यादेखील भयानें मी माझा धर्म सोडणार नाही. आपल्याला वाटलें तर माझ्यावर प्रसन्न व्हा, वाटले तर खुशाल रागवा. आपल्याला जे काय करावयाचें असेल तें खुशाल करा. मरुत्तानें पूर्वी असें म्हटलें आहे कीं, मदांध, कार्याकार्याचा विवेक नसणाऱ्या व उन्मार्गवर्ती अशा गुरूचा परित्यागच केला पाहिजे. मी गुरु म्हणून प्रेमानें नि सन्मानानें आपला पुष्कळ आदर राखला, पण गुरूची भूमिका कशी सभाळावी याचें आपणांस मुळीच ज्ञान नाही. मी आपणाशी अवश्य युद्ध करीन. ब्राह्मण, गुरु व तपोवृद्ध म्हणून मी आपली आतांपर्यंत गय केली. पण धर्मशास्त्राचा असा निश्चय आहे कीं क्षत्रियाप्रमाणे निवृत्त न होण्याचें व्रत पत्करून हत्यार उगारून क्रोधानें जो ब्राह्मण हिसा करावयास प्रवृत्त होईल त्याला ठार मारण्यांत ब्रह्महत्या लागत नाही. तुम्ही आपला वर्णधर्म सोडला आहे. तुमचें ब्राह्मण्य भंग पावलें. मी क्षत्रिय आहें. क्षात्रधर्मानुसारच वागत आहें. जो ज्याप्रमाणें वागतो त्याच्याशी त्याच पद्धतीने वागण्यांत अधर्मही नाहीं व अकल्याणही नाही. या प्रकरणाची तुम्हांला माहिती नाही. त्याचा तुम्ही नीट विचार केलेला नाही. अशा स्थितीत जेथें पुष्कळ विचार करावयास हवा, अशा प्रकरणी तुम्ही मन मानेल तसें वागावयास खुशाल प्रवृत्त झालां आहांत. तुमचें कोण ऐकून घेईल? तुमच्या इच्छेनुसार तुमच्याशीं मी भयानक युद्ध करावयास सिद्ध आहें. माझें बाहुबल व अतिमानुष पराक्रम याचा प्रत्यय मी तुम्हांला देतोंच. जें माझ्याच्यानें होईल तें मी कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर आपणांस प्रत्यक्ष करूनच दाखवीन. व्हा सज्ज! या द्वंद्वयुद्धास!! युद्धांत माझ्या बाणप्रहारांनीं अंगाची चाळणी होऊन रणक्षेत्रावरील धारातीर्थांत

पवित्र होऊन मृत्यूच्या सोपानमार्गावरून तुम्ही स्वर्गलोकांत जा. आपल्या पूर्वजांच्या वधाचा सूड घेऊन तुम्ही पूर्वी कृतकृत्य झालांत. माझ्या पूर्वजांच्या वधाचा सूड तुम्हांस ठार मारून घेऊन मी कृतकृत्य होईन. हे युद्धदुर्मदा ब्राह्मणाधमा! मी तुझा सर्व गर्व आज हरण करीन. मी एकटयानें सर्व क्षत्रियाना जिकलें नि ठार मारलें, असें वारंवार तुम्ही मला सांगतां. मी किंवा माझ्यासारखा क्षत्रिय त्या वेळी नव्हता हें त्याचें खरें कारण आहे. तुम्ही गवत जाळलें. तेज मागाहून उत्पन्न झाले. तुमचा युद्धाचा दर्प हरण करावयासाठीच माझा जन्म झाला आहे. त्यावर हसून राम मला म्हणाले: तू युद्धास सज्ज झालास हें फार चांगलें झालें. येच तू कुरुक्षेत्रांत माझी गांठ घ्यावयास. माझ्या बाणांनी तू मेल्यावर गिधाडांनीं फाडलेलें तुझें प्रेत तुझ्या गगामातेला अवश्य पाहूं दे. सिद्धचारणांनीं जिची सेवा करावी त्या देवीला जर पुत्रनिधनाचें दु:ख व्हावयाचेंच असलें तर खुशाल रडू दे. ती महाभागा खरोखरी दुर्दैवी आहे. तुझ्यासारख्या मदांध, युद्धदुर्मदाला, तिने जन्मच कां द्यावा? ये, आपलें युद्धसाहित्य घेऊन कुरुक्षेत्रावर उपस्थित हो. मी रामांना प्रणाम करून परतलों. (हा वृत्तान्त भीष्मांनी दुर्योधनाला सांगितलेला असल्यामुळें तेथे मी हें विशेषण सर्वत्र आलें आहे.)

भीष्म व परशुराम यांचें अत्यंत घनघोर असें तेवीस दिवस अहोरात्र युद्ध झालें. शेवटी त्यांत परशुराम हरले, पण भीष्मांनी त्यांच्या समोर नमतें घेतलें नाहीं. त्यांची ही मृत्युजय निर्भय वृत्ति अनेकवार प्रकट झाली आहे. महाभारतांतील सभापर्वांत सर्व क्षत्रिय त्यांच्यावर खवळून उठले असतां, गणयामि 'तृणेनैतान्' तृणाहून यांची अधिक किंमत मी करीत नाही असें म्हणून वार्धक्यांतही त्यांनी त्यांची बोळवण केली होती. इतके थोर योद्धे, तपस्वी, महापराक्रमी, तेजस्वी, ज्ञानसंपन्न, व निर्विवादपणें राज्ययंत्राला सर्वस्वी योग्य असे असलेले भीष्म द्रौपदीच्या वस्त्रहरणाच्या वेळीं स्वस्थ कां बसले असतील? कुरुराज्यावरील आपला अधिकार सोडून देऊन आपल्या डोळ्यांसमोर त्याचा अध:पात त्यांनीं कां पाहिला

असेल ? व क्षत्रियांतक जामदग्न्यासारख्या प्रचड शक्तीला न्यायासाठी लोळविणारे भीष्म युधिष्ठिराच्या न्यायाच्या पक्षाऐवजी दुर्योधनाच्या अन्याय्य पक्षाच्या संरक्षणाची ढाल कां बनले असतील? विचारी मनाला आज कांही सहस्रकांनंतर देखील गोंधळांत टाकणाऱ्या या प्रश्नांचें उत्तर महाभारतांत भीष्मांच्या घोर प्रतिज्ञेंत सांपडेल. तें प्रकरण असें :—

भीष्मप्रतिज्ञा

राजा शांतनु भीष्मांना युवराज करून निश्चित असतां पहिलीं चार वर्षे व्यवस्थितपणें गेलीं. चार वर्षांनंतर एके दिवशीं तो यमुना नदीवर गेला असतां त्याला एक अतिशय सुन्दर व जिच्या शरीराचा सुगंध आसमतांत पसरलेला आहे अशी दाशकन्या आढळली. तिचें रूप नि माधुर्य व सुगंध यांनीं शांतनूच्या मनाला मोह पडून त्यानें तिच्या पित्याजवळ तिची मागणी घातली. त्या दाशराजांनी शातनूला असें सागितले की, आपण सत्यसध आहांत, जर ही मुलगी मी आपणांस द्यावी अशी आपली खरोखरच इच्छा असेल तर आपण माझी एक अट मान्य करा. शांतनूनें त्याला असे सांगितलें की, 'तुझे काय म्हणणे आहे तें तू मला साग. तें जर योग्य असले तर ते मी तुला देईन व अयोग्य असलें तर मुळींच देणार नाही.' त्या दाशराजाने असे सागितले की, 'हिला जो मुलगा होईल तो जर आपल्यानतर कौरवांच्या राज्यसिहासनाचा उत्तराधिकारी होऊ शकत असेल, तर ही कन्या मी आपणांस द्यावयास सिद्ध आहें.' अत्यंत उत्कट इच्छा असूनही शांतनूला ही अट भलतीच साहसाची आहे असें वाटून त्यानें ती अयोग्य अट मान्य केली नाही. व तो तसाच परत फिरला. महाभारतांत म्हटलें आहे :—

शांतनुरुवाच ।

श्रुत्वा तव वरं दाश व्यवस्येयमहं तव ।
दातव्यं चेत्प्रदास्यामि न त्वदेयं कथंचन ॥ ५५

दाश उवाच ।

अस्यां जायेत यः पुत्रः स राजा पृथिवीपते ।
त्वदूर्ध्वमभिषेक्तव्यो नान्यः कश्चन पार्थिव ॥ ५६

वैशंपायन उवाच ।

नाकामयत तं दातुं वरं दाशाय शान्तनुः ।
शरीरजेन तीव्रेण दह्यमानोऽपि भारत ॥ ५७
—महाभारत, आदिपर्व अध्याय १००

चितामग्न शातनु हस्तिनापुरास परत आल्यावर खिन्नमनस्क अवस्थेत त्याला पाहून देवव्रत भीष्मांनीं त्यांना असें विचारले की, 'आपण असे चितामग्न कां दिसतां ?' त्यावर शांतनूनें त्यांना इतकेंच सागितले की, 'तुझ्यासारखा योग्य पुत्र असतां मला वस्तुतः चितामग्न होण्याचें कांहींच कारण नाहीं. पण परमेश्वरानें मला तुझ्यारूपानें एकच मुलगा दिला आहे. तू नित्य शस्त्र हातांत घेऊन क्षत्रियोचित पुरुषार्थाच्या कामांत गढून गेलेला असतोस. शतावधि पुत्रांपेक्षां तुझ्यासारखा सर्वश्रेष्ठ असा एकच पुत्र कोणालाही समाधान व हर्षच प्राप्त करून देईल. पण क्षात्रधर्माचें अनुकरण करताना जर तुझें कांही अनिष्ट झाले तर मात्र हा वश सपलाच, यांत काही सशय नाही. तुला एखादा भाऊ असता तर अधिक बरे झाले असतें.' पित्याचें तें बोलणें ऐकून महाबुद्धिवान् देवव्रत यांनी मंत्र्यांच्या जवळ सर्व प्रकरणाचा शोध घेतला. मत्र्यांकडून वृत्त कळतांच ते स्वतः उठून त्या दाशराजाकडे गेले व त्यांनी त्या कन्येची आपल्या पित्यासाठी मागणी केली. दाशाने त्यांना असे सागितले को, 'आपली मागणी मी अमान्य करावी अशा योग्यतेचा मी नाही. पण प्रत्येक पित्याला आपल्या कन्येची चिता स्वाभाविकपणेच असते. आपल्या येथे मुलगी देण्यांत अत्यंत प्रबल अशा शक्तीचें शत्रुत्व पत्करण्याचा प्रसंग येणें हा एकच दोष मला दिसतो. आपण सर्व दृष्टीनी सुयोग्य असून कुरुराज्याचे उत्तराधिकारी आहांत. आपण प्रसन्न असलात तर प्रश्नच नाहीं. पण जर आपण क्रुद्ध झालांत तर ज्याच्यावर आपण क्रुद्ध व्हाल तो देव, गंधर्व इत्यादिकांपैकी कोणीही असला तरी आपल्या पराक्रमासमोर तो टिकू वा जगू शकणार नाही हें निश्चित आहे. अशा स्थितीत माझ्या मुलीला आपल्या घरीं देऊन क्वचित् तिच्यावर येणाऱ्या दुःखपरंपरेचेंही मी कारण होण्याचा संभव आहे.' हें ऐकतांच गांगेय भीष्मांना

असें वाटले की, साध्या राज्यावरील अधिकारासाठीं पित्याला दुःखांत टाकण्याचें कारण काय? त्यांच्या सारख्या महामनस्क व्यक्तीला आपण राज्यावर बसणें व आपला भाऊ राज्यावर बसणें दोन्ही गोष्टी समान आहेत असेंच वाटलें. महाभारतकार म्हणतातः—

एवमुक्तस्तु गाङ्गेयस्तद्युक्तं प्रत्यभाषत ।
शृण्वतां भूमिपालानां पितुरर्थाय भारत ॥ ८५
इदं मे व्रतमादत्स्व सत्यं सत्यवतां वर ।
नैव जातो न वा जात्र ईदृशं वक्तुमुत्सहेत् ॥ ८६
एवमेतत्करिष्यामि यथात्वमनुभाषसे ।
योऽस्यां जनिष्यते पुत्रः स नो राजा भविष्यति ॥ ८७
इत्युक्तः पुनरेवाथ तं दाशः प्रत्यभाषत ।
चिकीर्षुर्दुष्करं कर्म राज्यार्थे भरतर्षभ ॥ ८८
त्वमेव नाथः संप्राप्तः शान्तनोरमितद्युते ।
कन्यायाश्चैव धर्मात्मन्प्रभुर्दानाय चेश्वरः ॥ ८९
इदं तु वचनं सौम्य कार्यं चैव निबोध मे ।
कौमारिकाणां शीलेन वक्ष्याम्यहमरिंदम ॥ ९०
यत्त्वया सत्यवत्यर्थे सत्यधर्मपरायण ।
राजमध्ये प्रतिज्ञातमनुरूपं तवैव तत् ॥ ९१
नान्यथा तन्महाबाहो संशयोऽत्र न कश्चन ।
तवापत्यं भवेद्यत्तु तत्र नः संशयो महान् । ९२

वैशंपायन उवाच ।

तस्यैतन्मतमाज्ञाय सत्यधर्मपरायणः ।
प्रत्यजानात्तदा राजन्पितुः प्रियचिकीर्षया ॥ ९३

गाङ्गय उवाच

दाशराज निबोधेदं वचनं मे नृपोत्तम ।
शृण्वतां भूमिपालानां यद्ब्रवीमि पितुः कृते ॥ ९४
राज्यं तावत्पूर्वमेव मया त्यक्तं नराधिपाः ।
अपत्यहेतोरपि च करिष्येऽद्य विनिश्चयम् ॥९५
अद्य प्रभृति मे दाश ब्रह्मचर्यं भविष्यति ।
अपुत्रस्यापि मे लोका भविष्यन्त्यक्षया दिवि ॥ ९६

वैशपायन उवाच ।

तस्य तद्वचनं श्रुत्वा सप्रहृष्टतनूरुहः ।
ददानीत्येव तं दाशो धर्मात्मा प्रत्यभाषत ॥ ९७
ततोऽन्तरिक्षेऽप्सरसो देवा. सर्षिगणास्तदा ।
अभ्यवर्षन्त कुसुमैर्भीष्मोऽयमिति चाब्रुवन् ॥ ९८
ततः स पितुरर्थाय तामुवाच यशस्विनीम् ।
अधिरोह रथं मातर्गच्छावः स्वगृहानिति ॥ ९९
एवमुक्ता तु भीष्मस्त रथमारोप्य भाविनीम् ।
आगम्य हस्तिनपुरं शान्तनोः संन्यवेदयत् ॥ १००
तस्य तद्दुष्करं कर्म प्रशशंसुर्नराधिपाः ।
समेताश्च पृथक्चैव भीष्मोऽयमिति चाब्रुवन् ॥ १०१
तच्छ्रुत्वा दुष्करं कर्म कृतं भीष्मेण शान्तनुः ।
स्वच्छन्दमरणं तुष्टो ददौ तस्मै महात्मने ॥ १०२
न ते मृत्युः प्रभविता यावज्जीवितुमिच्छसि ।
त्वत्तो हृषनुज्ञां संप्राप्य मृत्युः प्रभवितानघ ॥ १०३

—महाभारत, आदिपर्व अध्याय १००

याप्रमाणें तो दाशराज बोलत असतां बरोबरीच्या सामंतांसमोर भीष्मांनी अशी प्रतिज्ञा केली कीं, हे दाशराज, मी कधींही खोटें बोलत नाहीं. मी तुझ्यासमोर अशी प्रतिज्ञा करतों कीं, "या तुझ्या मुलीला जो पुत्र होईल, तोच आमचा राजा होईल. सहसा कोणीही जें बोलू शकणार नाहीं तें मी बोलत आहें. मी माझा राज्यावरील अधिकार सोडला."

याप्रमाणें भीष्मांची वाणी ऐकतांच कन्येच्या राज्यलाभासाठीं वाटेल तें करावयास सिद्ध असलेल्या त्या लोभी दाशानें असें सांगितलें कीं, 'महाराज शांतनु व ही कन्या आपल्या स्वाधीन आहेत. आपण ही कन्या त्यांना देऊं शकतां. पण कन्यापिता म्हणून आणखी एक गोष्ट मला बोलाविशी वाटते. आपण सत्यधर्मपरायण आहांत, जी प्रतिज्ञा आपण केलीत तशी दुष्कर प्रतिज्ञा आपल्यावांचून दुसरें कोणीही करूं शकणार नाहीं. आपल्यापासून माझ्या मुलीला व तिच्या संतानाला कांहीं एक भय नाहीं हें खरें. पण

आपल्या सतानापासून असे भय उत्पन्न होण्याचा सभव नाही काय ? पित्याचें प्रिय करणे ही गोष्ट भीष्मांच्या दृष्टीनें इतकी महत्त्वाची होती की, त्यानी त्याच्यासमोर दुसरी प्रतिज्ञा उच्चारली. ते म्हणाले, "हे दाशराज, मी पुन्हां दुसरी प्रतिज्ञा करतो. मी राज्याचा तर पूर्वीच त्याग केला आहे पण आजपासून मी ब्रह्मचर्य पाळीन. मी अपुत्र राहिलो तरीही माझ्या सामर्थ्याने मी अक्षय लोकाची प्राप्ति करून घेईन." त्यांचें ते वाक्य ऐकतांच आश्चर्याचे रोमाच अगावर उभे राहिलेल्या दाशानें ती मुलगी भीष्मांच्या स्वाधीन केली. अंतरिक्षातून देव, ऋषि नि अप्सरा यांनी देवव्रतावर पुष्प-वर्षाव केला व त्यांना 'भीष्म' म्हणून संबोधन दिले. भीष्म त्या सत्यवतीला म्हणाले, 'माते, तू रथात बैस. आपण आपल्या घरी जाऊ.' त्या कन्येसह भीष्म हस्तिनापुरात परत आले व त्यांनी ती कन्या आपल्या पित्याला समर्पण केली. त्याचें ते दुष्कर कर्म पाहून मोठमोठे राजे व लोक त्याची एकांतांत व लोकात अत्यंत प्रशंसा करूं लागले. पित्याने त्यांना असे वरदान दिले की, "तू स्वच्छंदमरणी होशील." मृत्यु तुझ्यावर सत्ता गाजवू शकणार नाही. तू मात्र मृत्यूवर सत्ता गाजविशील."

राजर्षि भीष्मांनी ही जी प्रतिज्ञा केली ती ज्या धर्मशास्त्राच्या व जीवनमूल्यांच्या महानिधीचे ते प्रतिनिधि होते त्यांच्या दृष्टीने अत्यंत श्रेष्ठ होती. भारतीय सस्कृतीत पितृगौरव ही अत्यत श्रेष्ठ गोष्ट असून तिच्यासाठी हवा तो त्याग केलेली अनेक महापुरुषांची उदाहरणे येथे आढळून येतील. भगवान् श्रीरामचंद्रानी पित्यासाठी राज्यलक्ष्मीचा त्याग केला व देवव्रत भीष्मांनी राज्य व गृहस्थाश्रम पित्यासाठीच त्यागिला. भीष्माचे वडील शातनु यांनी ही दुष्कर प्रतिज्ञा करावयास भीष्मांना मुळीच सांगितलें नव्हतें. त्यांनी तशी प्रतिज्ञा करणें, त्यांना समतही असण्याचें कारण नव्हतें. जर त्यांना ही गोष्ट प्रथम कळती, तर त्यांनी असें कांही होऊ दिलेंही नसते. पण त्याच्या नकळतच भीष्मांनीं ही प्रतिज्ञा केली. विवाहासाठी एवढें मोठें मूल्य द्यावें लागेल हें शांतनूला मुळीच माहीत नव्हतें. राज्याधिकाराची गोष्ट सत्यवतीच्या पित्यानें काढतांच शांतनूनें

त्याला स्पष्ट शब्दांत नकार दिला होता. त्यानें विवाहाची इच्छाच कां केली हा वाद अगदीच व्यर्थ आहे. प्रेमिकांच्या वेडच्या जगांत या गोष्टीचें मोल केवढेंही असले तरी जगतांतील सर्व समाजशास्त्रात प्रत्यक्ष आजदेखील द्वितीय पत्नी करणे ही गोष्ट असंमत, चुकीची अथवा सामाजिक प्रतिष्ठेला कमीपणा आणणारी आहे असें कोणीही समजत नाहीं एक पत्नी गेल्यावर वा ती सदाची सपल्यावर दुसरा विवाह करणें ही गोष्ट असंमत असलेला कोणताही समाज दाखवून देतां येणार नाही. ती एक सोय आहे व ती धर्मशास्त्रानें मान्यता पावलेली, समाजशास्त्राने मान्य केलेली, नीतिशास्त्रानें मुळीच गर्हर्य न मानलेली अशा प्रकारची सोय आहे. सामाजिक सुस्थितीच्या दृष्टीनें ती अत्यंत अवश्यही आहे. महाराज शांतनूनें गगा अंतर्धान पावल्यावर व पत्नी या नात्यानें ती मिळण्याचा सभव पूर्णपणे नष्ट झाल्यावर द्वितीय विवाह करण्यांत काय बिघडले ? जी गोष्ट आजचे मी 'मी म्हणविणारे तथाकथित पुरोगामीसुद्धां करावयाचें सोडीत नाहीत ती शांतनूनें केल्याबरोबर व तीही पांच हजार वर्षापूर्वीच्या समाजरचनेंतील नीतिकल्पनांना पूर्णपणें अनुसरून असलेली अशीच गोष्ट केल्यावर त्यासबंधांत त्याला दूषण देण्यासारखे कांही नाहीं. व्यक्ति एकपत्नीव्रतधारी राहिली तर त्या विशिष्ट बाबीपुरतें तिचें श्रेष्ठ स्थान कोणीही मान्य करील. पण दुसरी व्यक्ति तशी न राहूं शकली व तिनें योग्य कारणास्तव द्वितीय विवाह केला तर त्याबद्दल तिला दोष मुळीच देतां येत नाही. एकपत्नीव्रतधारी व्यक्तीचे जें श्रेष्ठ स्थान त्याची जोवर त्या बाबतींत शांतनु अपेक्षा करीत नाही तोंवर त्याला तरी दोष देतां येत नाहीं. शिवाय तो वलीपलित नि गलितगात्र नि वृद्ध जसा नाही, त्याचप्रमाणें सत्यवतीदेखील बाला नाही. अशा स्थितीत या विवाहाला दूषण देण्यासारखें कांही नाही. त्यानें जर आपल्या विवाहासाठीं भीष्मांच्या अधिकारांवर स्वत: काही आक्रमण केलें असतें अथवा भीष्मांनीं त्याच्यासमोर ही प्रतिज्ञा करीत असतां त्यानें त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला नसता वा तसें करण्यासाठी कांही उत्तेजना दिली असती तर मात्र त्याला निश्चित दोष देतां आला

असता. पण तसें कांही घडलेले नाही. त्यानें भीष्माच्या जवळ उघड नाही तरी व्यगार्थानें आपली विवाहाची व अधिक पुत्रांची इच्छा ध्वनित केली आहे हें खरे आहे. पण अमक्या एका विशिष्ट मुलीशीं आपल्याला विवाह करावयाचा आहे, त्याच्या अशा अशा अटी आहेत व त्या पुरविणे अवश्य आहे असें त्यानें कोठेंही सुचविलेलें नाही. मोकळेपणानें त्यानें नुसती इच्छा व्यक्त करणें हा कांहीं सामाजिक अगर व्यक्तिगत अपराध होऊं शकत नाही.

भीष्मांची भूमिका

भीष्म हे एक अलौकिक महापुरुष आहेत. स्वतःला त्यांना स्वार्थाचा लवलेशही स्पर्श करीत नाहीं. त्यामुळे राज्यलोभ ही जी सर्वसामान्य व्यक्तीच्या बाबतीत अत्यंत नैसर्गिक अशी बाब, तिच्यावर त्यांनीं केव्हांच विजय मिळविलेला असल्यामुळें हक्काच्या वा उपभोगाच्या परिभाषेचा उदय पुरुषोत्तम श्रीरामचंद्रांप्रमाणें त्यांच्याही अंतःकरणांत होऊं शकत नाहीं. त्यामुळें प्रतिज्ञा करण्याचे वेळीं आपल्या पित्याला सुखी करणें व त्यासाठीं लोकांच्या दृष्टीनें अलौकिक पण त्यांच्या महान् अंतःकरणाच्या दिव्य धारणेच्या दृष्टीनें एका सामान्य गोष्टीचा त्याग करणें हें त्यांना सहजच योग्य वाटलें. राज्य आपण केलें काय अथवा भावानें केलें काय, कौरवांच्या कुळांत तें नांदणें एवढी एकच गोष्ट त्यांच्या दृष्टीनें महत्त्वाची होती. अशा स्थितींत रामानें ज्याप्रमाणें राज्य भरताला गेलें काय अथवा स्वतःला राहिलें काय ही भूमिका पत्करिली तीच राजर्षि भीष्मांनीही पत्करिली आहे. भाऊ अल्पायुषी निघणार आहेत याची त्यांना काय कल्पना? व भावाच्या नातवांच्या तारुण्याच्या अवस्थेंत उत्पन्न झालेले झगडे त्यांना कसे कळणार! व असे झगडे व्हावयाचेच असतील तर ते स्वतः भीष्मांनीं लग्न करून त्यांच्या नातवांत झाले नसते कशावरून? भीष्म ज्याप्रमाणें शांतनूला एकटेच चिरंजीव होते, त्याप्रमाणें त्यांना अथवा त्यांच्या मुलाला एकेकच मुलगा राहिला असता असेंच कोणाला म्हणावयाचें असलें तर 'तुष्यतु दुर्जनः' म्हणून त्यांना वंदन करणें हा एकच मार्ग

आहे. तात्पर्य, पित्याच्या आनदाप्रीत्यर्थ महानुभाव भीष्मानीं राज्याचा परित्याग करण्यांत व संसाराचाही परित्याग करण्यांत भारतीय आर्यांची त्यागाची महनीय परंपराच चालविलेली आहे. सपत्ति हे जीवनाचे सारसर्वस्व समजणाऱ्या व सासारिक मोहपाशांच्या सुवर्णशृखला मानेभोवती अधिकाधिक आवळत बसणाऱ्या सामान्य हृदयाना या महनीय त्यागांतील महत्तेची कल्पना करवणार नाही हे उघडच आहे. त्याच्या प्रतिज्ञेतील एकाच पाशानें मात्र ते बाधले गेले. त्या बाबतीतले आपलें स्वातत्र्य जर त्यांनी राखलें असतें तर पुढील भीषण प्रसगात आपल्या वचनाच्या मर्यादेत सांपडून स्वतः मानसिक यातना अनुभवण्याचा घोर प्रसंग त्यांच्यावर कधीच आला नसता. पण त्यांनी राज्यावरचा अधिकार सोडून पूर्ण स्वातत्र्य न पत्करतां "स नो राजा भविष्यति" "तो आमचा राजा होईल" असें म्हणण्यांत स्वत.ला सिहासनाच्या अधिकाराच्या मर्यादेत गोवून घेतले. अर्थात् क्षत्रियोचित राजनिष्ठ प्रजाजनाप्रमाणें ते कौरवांच्या राजसभेचे सामंत व मंत्री राहिले. राज्ययत्रावर त्यांनीं अधिकार गाजविणें नैतिकदृष्टचा कितीही योग्य असले तरी घटनात्मक दृष्टीनें ते राज्ययत्राचे वचनानें बाधलेले सेवक राहिले. नियंत्रक राहिले नाहीत ही गोष्ट मुख्यत, त्याच्या चरित्रातील सर्व घटनांचें निरीक्षण करीत असतां, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें मूल्यमापन करीत असता व त्यांच्यावर नानाविध दोषारोप करीत असतां नेहमीच ध्यानांत ठेविली पाहिजे.

भीष्मांचें सत्यसंधत्व व त्यांची दैवाशीं झुंज

एकदां भीष्मांनी माता म्हणून सत्यवतीला घरी आणल्यावर तिच्याशीं मातेप्रमाणेंच विनम्र व आज्ञांकित वर्तन ठेवून राज्ययत्रांतली अथवा कौटुंबिक अशी कोणतीही महत्त्वाची बाब तिला विचारल्यावांचून अथवा तिची प्रथम समति घेतल्यावांचून त्यांनीं जशी केली नाहीं, तशीच कोणतीही गोष्ट घडल्यावर तिला ती सांगितल्याशिवाय ते राहिले नाहीत. नेहमी त्यांच्या बाबतीत

महाभारतांत 'सत्यवत्या मते स्थितः' असे शब्द येतात. इतकेंच नव्हे तर परशुरामांशीं घोर संग्राम करावयास भीष्म ज्या वेळीं गेले त्या वेळीं सुद्धां सत्यवतीला प्रथम निवेदन करून नंतरच ते गेलेले आहेत.

प्रविश्य नगरं चाहं सत्यवत्यै न्यवेदयम् ।। ७२
ततः कृतस्वस्त्ययनो मात्रा च प्रतिनन्दितः । ७३

—महाभारत, उदयोगपर्व अध्याय १७८

मातृभक्त भीष्म कुरुराज्याचे संरक्षक व सेवक या नात्यानें याप्रमाणें आपलें जीवन घालवीत असतां दैवानें जणूं कीं काय त्यांच्याशीं झुंजच घेतली होती. सत्यवतीला चित्रांगद व विचित्रवीर्य अशीं दोन मुलें झालीं. चित्रांगद हा अत्यंत पराक्रमी असून अत्यंत युद्धप्रिय असे. शांतनूच्या निधनानंतर भीष्मांनीं चित्रांगदाला सत्यवतीच्या अनुमतीनें राज्याभिषेक केला. पण चित्रांगद या नांवाच्या एका बलवान् गधर्वाशीं सरस्वतीनदीच्या तीरावर त्याचें मोठें भीषण युद्ध होऊन त्या युद्धांत त्या गंधर्वाकडून चित्रांगद मारला गेला. भीष्माना या बंधुनिधनाचें अत्यत दुःख झालें. धाकटा भाऊ विचित्रवीर्य त्यावेळी तारुण्याच्या सीमेवर येऊन न पोंचलेला बाल होता. तरी पण भीष्मांनी त्यालाच राज्यावर बसविलें व कारभारी म्हणून स्वतः गादी चालविली.

विचित्रवीर्यं च तदा बालमप्राप्तयौवनम् ।
कुरुराज्ये महाबाहुरभ्यषिञ्चदनन्तरम् ।। १२
विचित्रवीर्यः स तदा भीष्मस्य वचने स्थितः ।
अन्वशासन्महाराज पितृपैतामहं पदम् ।। १३
स धर्मशास्त्रकुशलं भीष्मं शान्तनवं नृपः ।
पूजयामास धर्मेण स चैनं प्रत्यपालयत् ।। १४

—महाभारत आदिपर्व अध्याय १०१

विचित्रवीर्य भीष्मांच्या आज्ञेत राहून पितृपितामहापासून परंपरेनें चालत आलेलें राज्यपद चालवू लागला. धर्मशास्त्रकुशल भीष्मांचा मान तो दक्षतेनें राखीत असे व भीष्मही त्याचें प्रतिपालन करीत. भीष्मांनींच मोठ्या समारंभानें त्याचा विवाह केला. त्यांनीं सर्व राजसत्तांचा पराभव करून काशिराजाच्या अम्बिका व

अम्बालिका या आणलेल्या दोन मुलींशीं त्याचा विवाह केला. भीष्मांना राज्ययंत्र आतां सुरळीत चालू लागेल व आपली चिंता दूर होईल असें वाटलें. पण स्वत.चा संसार सोडलेल्या भीष्मांनीं एकाहून एक दुःखाचे प्रसंग पाहून राज्ययंत्राचा सारा संसार करीत राहणें हाच त्यांच्यासाठीं ठरलेला विधिसंकेत होता. त्यामुळें त्यांच्या त्या कल्पना हवेंतच विरल्या. महाभारतकार म्हणतात :—

अम्बिकाम्बालिके भार्ये प्रादाद् भ्रात्रे यवीयसे ।
भीष्मो विचित्रवीर्याय विधिदृष्टेन कर्मणा ।। ६५
तयोः पाणी गृहीत्वा तु रूपयौवनदर्पितः ।
विचित्रवीर्यो धर्मात्मा कामात्मा समपद्यत ।। ६६
ते चापि बृहती श्यामे नीलकुञ्चितमूर्धजे ।
रक्ततुङ्गनखोपेते पीनश्रोणिपयोधरे ।। ६७
आत्मनः प्रतिरूपोऽसौ लब्धः पतिरिति स्थिते ।
विचित्रवीर्यं कल्याण्यौ पूजयामासतुः शुभे ।। ६८
स चाश्विरूपसदृशो देवतुल्यपराक्रमः ।
सर्वासामेव नारीणां चित्तप्रमथनो रहः ।। ६९
ताभ्यां सह समाः सप्त विहरन्पृथिवीपतिः ।
विचित्रवीर्यस्तरुणो यक्ष्मणा समगृह्यत ।। ७०
सुहृदां यतमानानामाप्तैः सह चिकित्सकैः ।
जगामाऽस्तमिवादित्यः कौरव्यो यमसादनम् ।। ७१
धर्मात्मा स तु गाङ्गेयश्चिन्ताशोकपरायणः ।
प्रेतकार्याणि सर्वाणि तस्य सम्यगकारयत् ।। ७२
राज्ञो विचित्रवीर्यस्य सत्यवत्या मते स्थितः ।
ऋत्विग्भिः सहितो भीष्मः सर्वैश्च कुरुपुङ्गवैः ।। ७३

—महाभारत, आदिपर्व अध्याय १०२

नतर भीष्मानीं अम्बिका व अम्बालिका या काशिराजाच्या दोन मुलींशी विचित्रवीर्याचा विधिपूर्वक विवाह करून दिला. त्या लावण्यवती धर्मपत्नीच्या सहवासांत तरुण विचित्रवीर्य मर्यादातीत कामी बनला व शेवटी त्याला क्षय झाला. सुहृदांनीं व चिकित्सकांनी अनेकवार प्रयत्न करूनही त्याचा कांहींएक उपयोग न होऊन शेवटी

तो मृत्युमुखीं पडला. धर्ममूर्ति भीष्म पुनश्च चितामग्न झाले. त्यानी राजाचें उत्तरकार्य यथाविधि केलें. यानंतर मात्र कौरव राजकुलाचा पूर्णपणें निर्वंश होण्याची वेळ आली. वंशाला भीष्मा-शिवाय दुसरा तंतु नव्हता व सिंहासनाला कोणीही राज्याधिकारी नव्हता.

भीष्माची सत्यसंधता

अशा स्थितीत जिच्यासाठीं भीष्मांनीं राज्याधिकार सोडला व ब्रह्मचर्य स्वीकारलें ती देवी सत्यवती भीष्माकडे येऊन प्राप्त परि-स्थितींत वंश व राज्य चालविण्यासाठीं गृहस्थाश्रम स्वीकारण्याची व राजा या नात्यानें सिंहासन अंगीकारण्याची त्यांना दीनपणें प्रार्थना करूं लागली. प्रजांनींही भीष्मांच्या दाराशी आक्रोश करून त्यांना राज्य स्वीकारण्याविषयीं आग्रह चालविला. एका बाजूला सत्य-संधता व दुसऱ्या बाजूला परिस्थितिप्राप्त कर्तव्य यांच्या कैचीत भीष्म पुन्हां अडकले. त्यांनीं काय केलें असेल? महाभारतांत यासंबंधीं पुढीलप्रमाणें वर्णन आहे :—

वैशंपायन उवाच ।

ततः सत्यवती दीना कृपणा पुत्रगृद्धिनी ।
पुत्रस्य कृत्वा कार्याणि स्नुषाभ्यां सह भारत ॥ १
समाश्वास्य स्नुषे ते च भीष्मं शस्त्रभृतां वरम् ।
धर्मं च पितृवंशं च मातृवंशं च भाविनी ।
प्रसमीक्ष्य महाभागा गाङ्गेयं वाक्यमब्रवीत् ॥ २
शान्तनोर्धर्मनित्यस्य कौरव्यस्य यशस्विनः ।
त्वयि पिण्डश्च कीर्तिश्च संतानं च प्रतिष्ठितम् ॥ ३
यथा कर्म शुभं कृत्वा स्वर्गोपगमनं ध्रुवम् ।
यथा चायुर्ध्रुवं सत्ये त्वयि धर्मस्तथा ध्रुवः ॥ ४
वेत्थ धर्मांश्च धर्मज्ञ समासेनेतरेण च ।
विविधास्त्वं श्रुतीर्वेत्थ वेदाङ्गानि च सर्वशः ॥ ५
व्यवस्थानं च ते धर्मे कुलाचारं च लक्षये ।
प्रतिपत्तिं च कृच्छ्रेषु शुक्राङ्गिरसयोरिव ॥ ३

तस्मात्सुभृशमाश्वस्य त्वयि धर्मभृतां वर ।
कार्ये त्वां विनियोक्ष्यामि तच्छ्रुत्वा कर्तुमर्हसि ॥ ७
मम पुत्रस्तव भ्राता वीर्यवान्सुप्रियश्च ते ।
बाल एव गतः स्वर्गमपुत्रः पुरुषर्षभ ॥ ८
इमे महिष्यौ भ्रातुस्ते काशिराजसुते शुभे ।
रूपयौवनसंपन्ने पुत्रकामे च भारत ॥ ८
तयोरुत्पादयापत्यं संतानाय कुलस्य नः ।
मन्नियोगान्महाबाहो धर्मं कर्तुमिहार्हसि ॥ १०
राज्ये चवाभिषिच्यस्व भारताननुशाधि च ।
दारांश्च कुरु धर्मेण मा निमज्जीः पितामहान् ॥ ११
तथोच्यमानो मात्रा स सुहृद्भिश्च परंतपः ।
इत्युवाचाथ धर्मात्मा धर्म्यमेवोत्तरं वचः ॥ १२
असंशयं परो धर्मस्त्वया मातरुदाहृतः ।
त्वमपत्यं प्रति च ते प्रतिज्ञां वेत्थ वै पराम् ॥ १३
जानासि च यथा वृत्तं शुल्कहेतोस्त्वदन्तरे ।
स सत्यवति सत्यं ते प्रतिजानाम्यहं पुनः ॥ १४
परित्यजेयं त्रैलोक्यं राज्यं देवेषु वा पुनः ।
यद्वाऽप्यधिकमेताभ्यां न तु सत्यं कथंचन ॥ १५
त्यजेच्च पृथिवी गन्धमापश्च रसमात्मनः ।
ज्योतिस्तथा त्यजेद्रूपं वायुः स्पर्शगुणं त्यजेत् ॥ १६
प्रभां समुत्सृजेदर्को धूमकेतुस्तथोष्णताम् ।
त्यजेच्छब्दं तथाकाशं सोमः शीतांशुतां त्यजेत् ॥ १७
विक्रमं वृत्रहा जह्याद्धर्मं जह्याच्च धर्मराट् ।
न त्वहं सत्यमुत्स्रष्टुं व्यवसेयं कथंचन ॥ १८
एवमुक्ता तु पुत्रेण भूरिद्रविणतेजसा ।
माता सत्यवती भीष्ममुवाच तदनन्तरम् ॥ १९
जानामि ते स्थितिं सत्ये परां सत्यपराक्रम ।
इच्छन्सृजेथास्त्रींल्लोकानन्यांस्त्वं स्वेन तेजसा ॥ २०
जानामि चैवं सत्यं तन्मदर्थे यच्च भाषितम् ।
आपद्धर्मं त्वमावेक्ष्य वह पैतामहीं धुरम् ॥ २१

यथा ते कुलतन्तुश्च धर्मश्च न पराभवेत् ।
सुहृदश्च प्रहृष्येरंस्तथा कुरु परंतप ।। २२
लालप्यमानां तामेवं कृपणां पुत्रगृद्धिनीम् ।
धर्मादपेतं ब्रुवतीं भीष्मो भूयोऽब्रवीदिदम् ।। २३
राज्ञि धर्मानवेक्षस्व मा नः सर्वान्व्यनीनशः ।
सत्याच्च्युतिः क्षत्रियस्य न धर्मेषु प्रशस्यते ।। २४
शान्तनोरपि सन्तानं यथा स्यादक्षयं भुवि ।
तत्ते धर्मं प्रवक्ष्यामि क्षात्रं राज्ञि सनातनम् ।। २५
श्रुत्वा तं प्रतिपद्यस्व प्राज्ञैः सह पुरोहितैः ।
आपद्धर्मार्थकुशलैर्लोकतन्त्रमवेक्ष्य च ।। २६

—महाभारत, आदिपर्व अ. १०३

"नंतर पुत्रवत्सल सत्यवती आपल्या सुनासह पुत्रांचें और्ध्वदेहिक करून व सुनांचें सांत्वन करून शस्त्रधारी लोकांमध्यें सर्वश्रेष्ठ अशा भीष्माकडे आली. मातृवंश आणि धर्म यांचा पूर्णपणें विचार करून ती दीन होऊन भीष्मांना म्हणाली की, महाराज शांतनूचा पिंड, कीर्ति व संतान आतां तुझ्या एकटयामध्येच प्रतिष्ठा पावलें आहे. सर्व धर्मांचें, वेदांचें व वेदांगांचे तुला संपूर्ण ज्ञान असून अडचणींतून मार्ग कसा काढावा यासंबंधी तुझी विचक्षणता बृहस्पति व शुक्राचार्य यांच्या योग्यतेची आहे. म्हणून तुझ्याविषयीं मला विश्वास वाटून परिस्थितीमुळेच चालून आलेले विशिष्ट जबाबदारीचें काम तुझ्यावर सोंपविण्याची मी इच्छा करतें. मी काय म्हणतें तें नीट ऐकून तदनुसार तू वर्तन करावें हेंच तुला योग्य आहे. माझा पुत्र व तुझा भ्राता सामर्थ्यवान् असून तुझे त्याच्यावर अत्यंत प्रेम होतें. तो निपुत्रिक अवस्थेत प्रौढ होण्याआधीच स्वर्गास गेला. त्याच्या या राण्या पुत्रकाम व रूपयौवनसंपन्न असून नियोगविधीनें तू त्यांना पुत्र दिले पाहिजेस. माझी ही तुला आज्ञा आहे व त्या आज्ञेप्रमाणें धर्माच्या कक्षेंत बसणारी ही गोष्ट तू केली पाहिजेस. स्वतःला तू राज्यावर अभिषेक करून घे. भारतीय प्रजेचें प्रतिपालन कर. धर्मानुसार विवाह कर. वंश नष्ट झाला म्हणून तुझे पूर्वज दुर्गतींत न पाडणें हेंच तुझें कर्तव्य आहे. याप्रमाणें माता नि सुहृद वारंवार

सांगत असतां धर्मनिष्ठ भीष्म आपल्या प्रतिज्ञेस अनुसरून वागण्याचा मनांत निश्चय करून मातेला म्हणू लागले की, हे माते, तू जी गोष्ट मला सांगतेस ती धर्मदृष्टचा अत्यंत योग्य आहे यांत शंका नाहीं. पण अपत्याच्या बाबतीत मी केलेली प्रतिज्ञा तुला माहीत नाहीं काय ? तुझ्याचसाठी म्हणून ती प्रतिज्ञा झाली होती. प्रतिज्ञेच्या सत्याशीं माझ्यासारख्याला प्रतारणा कशी करतां येईल ? त्रैलोक्याचें व देवादिकांचेंही राज्य अथवा त्याहूनही अधिक मोठें ऐश्वर्य माझ्या पायाशीं चालत आलें तरी मी त्यांचाही परित्याग करीन. पण सत्याचा परित्याग कधींच करणार नाहीं. पृथ्वी आपला गंध सोडील, आप रसाचा परित्याग करील, ज्योति तत्त्वरूपाचा परित्याग करील, वायु स्पर्शगुणाचा परित्याग करील, सूर्य प्रभेचा परित्याग करील, धूमकेतु ऊष्म्याचा परित्याग करील. आकाश शब्दगुण सोडील, चंद्र शीतल राहणार नाहीं, इंद्र पराक्रम सोडून देईल, कदाचित् धर्मराज धर्माचा परित्याग करील, पण भीष्म सत्याचा परित्याग कधींही करणार नाहीं. मग परिस्थिति कोणतीही असो. याप्रमाणें अत्यत तेजस्वी भीष्म स्पष्ट बोलल्यावर माता सत्यवती त्यांना म्हणाली कीं, हे सत्यपराक्रमा, सत्यावरील तुझी अढळ निष्ठा मी जाणतें. तुझें तेज अितकें सामर्थ्यवान् आहे की तू मनांत आणशील तर नवें त्रैलोक्य उत्पन्न करूं शकशील. सत्यधर्मावरील तुझी निष्ठा व माझ्यासाठीं तू केलेली प्रतिज्ञा या दोन्ही गोष्टीचें मला पूर्ण ज्ञान आहे. पण आपद्धर्म कांहीं आहेच कीं नाही ? त्या आपद्धर्माकडे पाहून या वंशपरंपरागत चालत आलेल्या राज्याचा भार तुझ्याशिवाय दुसरें कोण यानंतर संभाळूं शकणार आहे ? आपला वंश नष्ट होणार नाही, धर्माचा नाश होणार नाहीं, सुहृदांना आनंद होईल असें करणें तुझें कर्तव्य आहे. याप्रमाणें सत्यवती दीनपणें विलाप करीत वारंवार बोलत होती. पण तिचें तें सर्व बोलणें क्षात्रधर्माची प्रतिष्ठा ज्यावर अवलंबून आहे त्या सत्यधर्माच्याच विरुद्ध असल्यामुळें भीष्मांनीं तें मान्य केलें नाहीं. ते म्हणाले, 'महाराणी, आम्हां सर्वांचा ज्याच्यांत विनाश ओढवेल असें सत्यधर्माचा नाश करणारें कृत्य करावयास मला तूं आग्रह करूं नकोस.

धर्माकडे पहा. सत्यधर्मापासून भ्रष्ट होणें क्षात्रधर्माला मान्य नाहीं. महाराज शांतनूचा वंश चालावा अशी व्यवस्था करण्यासाठीं धर्मशास्त्रानेंच क्षत्रियांना घालून दिलेले दुसरे अनेक मार्ग आहेत. प्राज्ञपुरोहित, आपद्धर्माचें मर्म ओळखणारे इतर कुशल धर्मशास्त्रज्ञ व हल्लीं लोकांत चालू असलेला रूढ निर्बंध या सर्वांना अनुसरून शांतनूचा वंश पुढें कसा चालेल याचा मार्ग मी तुला सांगतों."

पुढील उतारा उद्योगपर्वातील आहे. तेथें भीष्म स्वतःच कौरवांच्या राजसभेंत हें वृत्त सांगत आहेत. ते म्हणतात :—

स्वयंतेऽहं पितरि तं स्वराज्ये सन्न्यवेशयम् ।
विचित्रवीर्यं राजानं भृत्यो भूत्वा हयधश्चरः ॥ २२
तस्याहं सदृशान् दारान् राजेन्द्र समुपाहरम् ॥
जित्वा पार्थिवसङ्घातमपि ते बहुशः श्रुतम् ॥ २३
ततो रामेण समरे द्वन्द्वयुद्धमुपागमम् ।
स हि रामभयादेभिर्नागरैर्विप्रवासितः ॥ २४
दारेष्वप्यतिसक्तश्च यक्ष्माणं समपद्यत ।
यदा त्वराजके राष्ट्रे न ववर्ष सुरेश्वरः ।
तदाऽभ्यधावन्मामेव प्रजाः क्षुद्भयपीडिताः ॥ २५

प्रजा ऊचुः ।

उपक्षीणाः प्रजाः सर्वा राजा भव भवाय नः ।
ईतीः प्रणुद भद्रं ते शान्तनोः कुलवर्धन ॥ २६
पीड्यन्ते ते प्रजाः सर्वा व्याधिभिर्भृशदारुणैः ।
अल्पावशिष्टा गाङ्गेय ताः परित्रातुमर्हसि ॥ २७
व्याधीन् प्रणुद वीर त्वं प्रजा धर्मेण पालय ।
त्वयि जीवति मा राष्ट्रं विनाशमुपगच्छतु ॥ २८

भीष्म उवाच ।

प्रजानां क्रोशतीनां वै नैवाक्षुभ्यत मे मनः ।
प्रतिज्ञां रक्षमाणस्य सद्वृत्तं स्मरतस्तथा ॥ २९
ततः पौरा महाराज माता काली च मे शुभा ।
भृत्याः पुरोहिताचार्या ब्राह्मणाश्च बहुश्रुताः ॥
मामूचुर्भृशसंतप्ता भव राजेति सन्ततम् ॥ ३०

प्रतीपरक्षितं राष्ट्रं त्वां प्राप्य विनशिष्यति ।
स त्वमस्मद्धितार्थं वै राजा भव महामते ॥ ३१
इत्युक्तः प्राञ्जलिर्भूत्वा दुःखितो भृशमातुरः ।
तेभ्यो न्यवेदयं तत्र प्रतिज्ञां पितृगौरवात् ॥ ३२
ऊर्ध्वरेता ह्यराजा च कुलस्यार्थे पुनः पुनः ।
विशेषतस्त्वदर्थं च धुरि मा मां नियोजय ॥ ३३
ततोऽहं प्राञ्जलिर्भूत्वा मातरं संप्रसादयम् ।
नाम्ब शान्तनुना जातः कौरवं वंशमुद्वहन् ॥ ३४
प्रतिज्ञां वितथां कुर्यामिति राजन् पुनः पुनः ।
विशेषतस्त्वदर्थं च प्रतिज्ञां कृतवानहम् ॥ ३५
अहं प्रेष्यश्च दासश्च तवाद्य सुतवत्सले ।
एवं तामनुनीयाहं मातरं जनमेव च ॥ ३६

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४७

"वडील स्वर्गलोकाला गेल्यावर मी विचित्रवीर्याला राज्यावर बसवून त्याचा भृत्य बनून राज्यकारभार पाहूं लागलों. त्याचा मी विवाह करून दिला. नंतर जामदग्न्य रामाशी माझें द्वंद्वयुद्ध झालें. त्या युद्धांत मी गुतलों असतां प्रजा हस्तिनापूर सोडून पळून गेल्या. नंतर विचित्रवीर्य कामात्मा बनून क्षय रोगानें मृत्युवश झाला. राज्यांत अराजक उत्पन्न होऊन त्यांतच दुष्काळही आला. अशा स्थितीत क्षुधेच्या भयानें पीडिलेल्या सर्व प्रजा मलाच आपला आधार समजून माझ्याकडे आल्या व मला विनंति करूं लागल्या की सर्व प्रजा क्षीण होत आहेत. आपला कुळधर्म म्हणून तूं आमचा राजा हो. आमचें दुःख दूर कर. हे शांतनूच्या कुलवर्धना, अत्यंत दारुण व्याधीनीं सर्व प्रजा पीडा पावत आहेत. कित्येक लोक संपले. त्यांचें संरक्षण करणें हें तुझें कर्तव्य आहे. सर्व दुःखांचा नायनाट करून तूच धर्मशास्त्रानुसार आपल्या प्रजेचें पालन केलें पाहिजेस. तूं जिवंत असतांना या राष्ट्राचा विनाश न झाला पाहिजे. पण हा आक्रोश ऐकून माझें मन माझ्या प्रतिज्ञेपासून मुळीच विचलित झालें नाही. शीलवान् क्षत्रियाच्या चारित्र्याप्रमाणें मी वागत होतों व तसें वागण्याचा माझा दृढ निश्चय झाला होता. भृत्य, पुरोहित, आचार्य,

बहुश्रुत ब्राह्मण, प्रजाजन व माझी माता सत्यवती शोकसंतप्त होऊन वारवार प्रतीपानें संरक्षण केलेलें हें राज्य तुझ्यामुळें विनाश न पावलें पाहिजे, आमच्या हितासाठीं तूं राजा हो, अशी वारंवार विनंती करूं लागले. तेव्हां मी हात जोडून नि साष्टांग नमस्कार घालून त्याना व मातेला असें सांगितलें की, पित्यासाठीं मी सिहासनावर न बसण्याची व ऊर्ध्वरेता ब्रह्मचर्य पाळण्याची जी घोर प्रतिज्ञा केली आहे ती मी कोणत्याही परिस्थितींत मोडूं शकत नाही. कौरवांच्या कुळांत उत्पन्न झालेला व शांतनूसारख्या धर्मनिष्ठ राजाचें नांव पिता म्हणून उच्चारण्यांत गौरव मानणारा माझ्यासारखा पुरुष आपली प्रतिज्ञा कधींही खोटी करूं शकत नाही. अशा अत्यंत कठीण परिस्थितीत क्षत्रियासाठीं म्हणून जे मार्ग सांगितलेले आहेत, ते रूढ निर्बधानुसार आचरण करतां येईल. पण काय वाटेल तें झालें तरी मी माझी प्रतिज्ञा मोडून सत्यसंधतेचें महाव्रत भंगूं इच्छीत नाहीं."

तात्पर्य भीष्मांचें सत्यसंधतेचें महाव्रत याप्रमाणें अग्निपरीक्षेंतून तावून सुलाखून निघालेलें आहे. या सत्यसंधतेनें ते स्पष्टपणेंच राजाचे––हस्तिनापुरच्या सिहासनावर बसणाऱ्या कौरववंशीय राजाचे––घटनात्मक दृष्टचा भृत्य राहिले. त्यामुळें खाजगी नात्यानें ते सर्वांचे आजोबा असले तरी घटनात्मक दृष्टचा राजाच्या नियंत्रणाचा त्यांना अधिकार नव्हता. खाजगी नाती खाजगी राहतात, राजकीय व्यवहारांत घटनेनें ठरविलेल्या अधिकाराचीं नाती हीच व्यवहारांतील खरी नाती असतात. हें पूर्णपणें ध्यानांत घेऊन भीष्मांच्या एकंदर चरित्राचा व विशेषत: त्यांतील वादग्रस्त वाटणाऱ्या प्रश्नांचा विचार केला पाहिजे.

भीष्म व पांडव

याप्रमाणें सत्यसंध भीष्मांनी आपली प्रतिज्ञा मोडण्याचें नाकारल्यावर त्यांनी स्वत:च तत्कालीन रूढ पद्धतीच्या अनुसार नियोगाचा आश्रय करून व्यासांकरवी कुरुवंश पुढें चालण्याची व्यवस्था केली. ते स्वत:च उद्योगपर्वात म्हणतात :—

अयाचं भ्रातृदारेषु तदा व्यासं महामुनिम् ।
सह मात्रा महाराज प्रसाद्य तमृषिं तदा ॥ ३७
अपत्यार्थं महाराज प्रसादं कृतवांश्च स ।
त्रीन् स पुत्रानजनयत्तदा भरतसत्तम ॥ ३८

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४७

कुळाचा वंशक्षय होण्याच्या परिस्थितीत ब्राह्मणाकडून पुत्रोत्पादन करवून घेण्याचा जो रूढ मार्ग होता त्या मार्गानुसार भीष्म वागले. यांत त्यांना दोष देण्यासारखें कांहींही नाहीं. किबहुना असे राजवंश त्या काळीं कितीतरी रूढ होते. दुसरा मार्गच नसता तर गोष्ट वेगळी होती. पण धर्मशास्त्राच्या संमतीनें रूढ असलेला मार्ग त्यांनीं मुद्दाम सोडून आपल्या व्रताचा भंग करण्याचें कांहींच कारण नव्हतें. ज्या सत्यनिष्ठेसाठी भारतीय राजांनी आपलें सर्वस्व लावल्याची परंपरा आहे त्या परंपरेतील मेरुमणि असलेले भीष्म आपलें सत्यसंधतेचें व्रत दुसरा मार्ग उपलब्ध असतांना काय म्हणून सोडतील ? पुढे धृतराष्ट्र, पाण्डु व विदुर अशी तीन मुलें झाल्यावर तत्कालीन रूढ निर्बंधानुसार वडील मुलगा असला तरी अंध असल्यामुळें धृतराष्ट्र राज्यावर बसू शकला नाही. दासीपुत्र असल्यामुळें विदुर राज्यावर येणें सर्वथा असंभवनीय होतें. त्यामुळे सर्व दृष्टीनी योग्य असलेला पाण्डूच कौरवांच्या राज्यसिंहासनावर बसला. पुनश्च भीष्मांनी या तिन्ही मुलांचा प्रतिपाळ केला व त्याच्या विद्याध्ययनाची सर्व प्रकारची व्यवस्था केली. पाण्यांत राहून कमलाच्या पानाप्रमाणें अलिप्त रहावें, त्याप्रमाणे भीष्मांनी जन्मभर संसारांत राहून कोणाच्या ध्यानांतही येणार नाहीं अशा पद्धतीनें कुरुकुलाचा ससार चालविला होता. महाभारतकार म्हणतात :—

धृतराष्ट्रश्च पाण्डुश्च विदुरश्च महामतिः ।
जन्मप्रभृति भीष्मेण पुत्रवत्परिपालिताः ॥ १७
संस्कारैः संस्कृतास्ते तु व्रताध्यनसंयुताः ।
श्रमव्यायामकुशलाः समपद्यन्त यौवनम् ॥ १८
धनुर्वेदे च वेदे च गदायुद्धेऽसिचर्मणि ।
तथैव गजशिक्षायां नीतिशास्त्रेषु पारगाः ॥ १९

इतिहासपुराणेषु नानाशिक्षासु बोधिता.।
वेदवेदाङ्गतत्त्वज्ञाः सर्वत्र कृतनिश्चयाः ।। २०
—महाभारत, आदिपर्व अध्याय १०९

धृतराष्ट्र, पाण्डु व विदुर यांचें भीष्मांनी जन्मापासून मुलाप्रमाणें पालन केलें. त्यांच्यावर संस्कार केले. व्रत आणि अध्ययन त्यांच्याकडून यथाशास्त्र घडविले व त्यांना व्यायामाची संवय लावली. धनुर्वेद, वेद, गदायुद्ध, सर्वप्रकारच्या युद्धकला, वेदांगें, तत्त्वज्ञान, नाना प्रकारच्या विद्या, इतिहास, पुराण नि नीतिशास्त्र यांच्यांत त्यांना पारंगत केलें व त्यांचे विवाहही करून दिले. या तीन मुलांपैकी राजा पाण्डु हा अत्यंत पराक्रमी निघाला. त्यानें दिग्विजय केला व साम्राज्याचा विस्तार केला. भीष्मांचें त्याच्यावर अतिशय प्रेम असे. पुढें पाण्डूनें राज्य धृतराष्ट्राच्या स्वाधीन केलें व तो मृगयासक्त होऊन अरण्यांत राहू लागला. अर्थात् पाण्डूच्या अरण्यवासाच्या कालापासून धृतराष्ट्र हाच राज्यप्रमुख होता. पाण्डु अरण्यांत असतां राज्यव्यवस्था कशा प्रकारची होती याचें महाभारतांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे :—

ततः सर्वाः प्रजास्तात धृतराष्ट्रं जनेश्वरम्।
अन्वपद्यन्त विधिवद्यथा पाण्डुं जनाधिपम् ।। ७
विसृज्य धृतराष्ट्राय राज्यं सविदुराय च।
चचार पृथिवीं पाण्डुः सर्वां परपुरञ्जयः ।। ८
कोशसंवनने दाने भृत्यानां चान्ववेक्षणे।
भरणे चैव सर्वस्य विदुरः सत्यसङ्गरः।। ९
सन्धिविग्रहसंयुक्तो राज्ञां संवाहनक्रियाः।
अवैक्षत महातेजा भीष्मः परपुरञ्जयः ।। १०
सिंहासनस्थो नृपतिर्धृतराष्ट्रो महाबलः।
अन्वास्यमानः सततं विदुरेण महात्मना ।। ११
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४८

याप्रमाणें पाण्डूनें राज्य स्वाधीन केल्यावर पाण्डूप्रमाणेंच प्रजा धृतराष्ट्राला मानूं लागल्या. विदुरासहित धृतराष्ट्राच्या स्वाधीन

राज्य करून पाण्डू पृथ्वीवर संचार करूं लागला. त्या वेळी कोश वाढविणें, व्यय करणे, सर्व खात्यावर व त्यांतील कामकऱ्यांवर देखरेख ठेवणें व सर्वांचें उपजीवन नीट चालतें की नाही हें पहाणें हें सर्व काम विदुराकडे होतें. संधि, विग्रह व परकीय राजांशी करावयाचे इतर व्यवहार ज्यात समाविष्ट आहेत असे (आजच्या राजकीय परिभाषेंत परराष्ट्रीय खातें) विभाग भीष्मांकडे होते. तात्पर्य सिहासनाधीश्वर राजे पाण्डु यांनी राज्य धृतराष्ट्राकडे सोंपवून विदुराला मंत्री केलें होतें व भीष्म केवळ एक विभाग संभाळीत होते. भीष्मांची कुरुराज्यांतील घटनात्मक वस्तुस्थिति समजावून घेणें ही गोष्ट त्यांच्या चरित्राचा विचार करतांना आवश्यक आहे. मागे सांगितल्याप्रमाणें प्रत्येक नव्या राजाचें पालनपोषण जरी भीष्मांनी केलें असलें व त्या त्या व्यक्तीला सिंहासनावर बसवावयास जरी तेच कारणीभूत झाले असले तरी राजा सिंहासनावर बसतांच आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें भीष्म हे आपोआपच राजभृत्य अथवा गादीचे सेवक होत. विचित्रवीर्याच्या काळीं ते जबाबदारीनें सर्व प्रकारचीं कामें करीत; पण पाण्डूच्या काळीं त्यांच्याच नेतृत्वाखालीं विदुर हा सर्व दृष्टीनी योग्य झालेला असल्यामुळें स्वतःच्या मंत्रिपदाचा भार अर्थातच त्यांनीं विदुराकडे द्यावयास सांगितला असला पाहिजे व सहजरीतीनें होण्यासारखें काम त्यांनीं स्वतःकडे घेतलें असलें पाहिजे किंवा त्यांच्या वार्धक्याकडे पाहूनच पाण्डूनें त्यांच्याच संमतीनें मुख्य कारभाराचा भार विदुराकडे देऊन एखादे खातें त्यांच्याकडे सोपविण्याची व्यवस्था केली असली पाहिजे. म्हणूनच वर उद्धृत केलेल्या उताऱ्यांत फक्त परराष्ट्रीय खात्याचा त्यांच्याशीं प्रत्यक्ष संबध असल्याचें उल्लेखिलें आहे. पुढें मृगयासक्त पाण्डु अरण्यांतच मृत्यु पावला. त्याची धाकटी पत्नी माद्री त्याजबरोबर सती जाऊन ज्येष्ठ पत्नी कुंती व तिचीं तीन मुलें नि माद्रीचीं दोन मुलें हस्तिनापुरांत ऋषीकडून आणून पोहोंचविली गेलीं. भीष्मांना, धृतराष्ट्राला व सर्वानाच या घटनेचें मोठें दुःख झालें. पाण्डूच्या और्ध्वदेहिकानंतर त्यानेंच केलेल्या व्यवस्थेनुरूप राज्ययंत्राची स्थिति व त्यांतील व्यक्तींचीं स्थानें जशींचीं तशींच राहिलीं. युधिष्ठिर मोठा

होऊन आपल्या पित्याचें राज्य युवराज या नात्यानें स्वीकारीपर्यंत या व्यवस्थेत कोणताच बदल होण्याचें कांहीच कारण नव्हतें. धृतराष्ट्राची शभर व पाण्डूची पाच मुलें यांच्या शिक्षणाची व्यवस्था कृपाचार्याकडून करण्यांत आली होती. पण आपल्या या नातवांना शस्त्रास्त्रविद्येंत अधिक पारंगत होतां यावे म्हणून भीष्मांनी पुनश्च त्यांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविलें. महाभारतांत या गोष्टीचा पुढीलप्रमाणें उल्लेख आहे :—

वैशंपायन उवाच ।

विशेषार्थी ततो भीष्मः पौत्राणां विनयेप्सया ॥ २४
इष्वस्त्रज्ञान्पर्यपृच्छदाचार्यान्वीर्यसंमतान् ।
नाल्पधीर्ना महाभागस्तथा नानास्त्रकोविदः ॥ २५
नादेवसत्त्वो विनयेत्कुरूनस्त्रे महाबलात् ।
इति संचिन्त्य गाङ्गेयः सदा भरतसत्तमः ॥ २६
द्रोणाय वेदविदुषे भारद्वाजाय धीमते ।
पाण्डवान्कौरवांश्चैव ददौ शिष्यान्नरर्षभ ॥ २७
शास्त्रतः पूजितश्चैव सम्यक्तेन महात्मना ।
स भीष्मेण महाभागस्तुष्टोऽस्त्रविदुषां वरः ॥ २८
प्रतिजग्राह तान्सर्वान् शिष्यत्वेन महायशाः ।
शिक्षयामास च द्रोणो धनुर्वेदमशेषतः ॥२९
तेऽचिरेणैव कालेन सर्वशस्त्रविशारदाः ।
बभूवुः कौरवा राजन्पाण्डवाश्चामितौजसः ॥३०

—महाभारत, आदिपर्व अ. १३०

नंतर मुलांना विशेष विद्या यावी म्हणून मोठमोठ्या धनुर्वेदसंपन्न पराक्रमी व अस्त्रज्ञ आचार्यांना भीष्म शोधू लागले. सामान्य बुद्धीचे, अस्त्रज्ञान नसलेले, सामान्य कर्तृत्वाचे व युद्धशास्त्राची बेताबाताचीच माहिती असलेले लोक कौरव राजकुमारांना शिकवू शकणार नाहीत म्हणून त्यांच्यासाठी तशाच कोण्या विचक्षण व असामान्य सामर्थ्यसंपन्न व्यक्तीची योजना केली पाहिजे असें त्यांना वाटत होतें. शेवटीं वेदवेत्त्यांच्या मध्यें अत्यंत श्रेष्ठ असे प्रतिभासंपन्न आचार्य भारद्वाज द्रोण यांच्या स्वाधीन पांडव व कौरव यांना

शिष्य या नात्यानें भीष्मांनीं केले. भीष्मांनी यथाशास्त्र व योग्य रीतीनें आचार्य द्रोणांची संभावना केल्यावर अस्त्रवेत्त्यांत सर्वश्रेष्ठ असलेले आचार्य त्यांच्यावर अत्यंत प्रसन्न झाले व त्यांनीं आपल्या त्या सर्व शिष्यांना संपूर्ण शस्त्रास्त्रविद्येचें व धनुर्वेदाचें शिक्षण दिलें. लवकरच कौरव व पांडव सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रविद्येंत अत्यंत प्रवीण झाले.

त्यानंतर युधिष्ठिराला यौवराज्याभिषेक करण्यांत आला. अर्थात् या क्षणापर्यत सर्व गोष्टी अत्यंत सुरळीतपणें चालू होत्या. भीमावर लहानपणीं झालेला विषप्रयोग, विदुराच्याच सल्ल्यावरून कुन्तीनें इतका गुप्त ठेवला होता कीं भीष्मांना त्याची कल्पनाही येणें शक्य नव्हतें. युधिष्ठिर युवराज असतांना वर उल्लेखिल्याप्रमाणें दैनंदिन राज्यकारभारांतून विदुर सर्व दृष्टीनी जबाबदारी संभाळीत असल्यामुळें अंग काढून घेतलेल्या भीष्मांना धृतराष्ट्राच्या अंतः-करणांत पाण्डवांच्याविषयीं पाप उत्पन्न झाले असून तो त्यांच्या विनाशाच्या खटपटींत आहे याची काडीइतकीही कल्पना नव्हती. विदुरानेंही तें त्यांच्या कानावर घातलें नाहीं. किबहुना विदुरानें धृतराष्ट्राच्या चेहऱ्यावरूनच त्याच्या अंत.करणातील भाव ओळखून पांडवांना त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें इतक्या गुप्तपणें सूचना दिलेल्या आहेत की, त्या युधिष्ठिराखेरीज कोणालाही कधीच कळल्या नाहींत. युधिष्ठिर युवराज असतांना त्याला गादीवरून काढण्यासाठी व स्वतःसाठी नि दुर्योधनासाठीं राज्य बळकवावें म्हणून भीष्म, विदुर व राज्यांतील इतर मंत्री यांच्यापैकी कोणा-च्याच लक्षांत न येईल अशा बेतानें धृतराष्ट्र किती गुप्तपणें आपल्या कारस्थानांची उभारणी करीत होता हें आपण धृतराष्ट्राच्या स्वभावचित्रांत पाहिलें आहे. त्यानें पांडवांना वारणावतास पाठ-विण्याचें कारस्थान अत्यत गुप्तपणें केलें. दुर्योधनानें पुरोचनाच्या मदतीनें त्यांना जाळण्यासाठी जें नवें लाक्षागृहाचें कारस्थान उभारलें तें तर सर्वस्वीं धृतराष्ट्रालादेखील अज्ञात राहावें अशा बेतानेंच उभारलें होतें. लाक्षागृह प्रकरणानंतर धृतराष्ट्र व दुर्योधन यांच्या अंत:करणांतील दुष्ट हेतूची भीष्मांना कल्पना आली व

म्हणून त्यांनी उघडपणें पांडवांना बोलवावें कीं नाहीं याचा विचार करण्यासाठीं राजसभा भरली असतां तेथें पांडव जिवंत राहिल्याबद्दल देवाचे आभार मानले व त्यांच्याशी विरोध करण्याच्या दुर्योधनादिकांच्या अभिप्रायासंबधी तीव्र नापसंती व्यक्त करून त्यांना बोलवावें असा त्यांनीं आपला सल्ला दिला. पण जिवंत जाळण्याच्या कार्यक्रमापर्यंत राज्यसूत्रधार असलेल्या व्यक्तींची मर्यादा गेलेली पाहून भेदाचें बीज वाढून कुळांत पुढें भांडणें होऊं नयेत, वैराची धार अधिक तीव्र होऊं नये व सर्व कांहीं सामोपचारानें निभावें म्हणून राज्याची फाळणी अथवा दोन विभाग करून एक विभाग पांडवांनी संभाळावा व दुसरा धृतराष्ट्र व दुर्योधनानें संभाळावा अशी त्यांनीं आपली योजना मांडली व अर्धे राज्य पांडवांना तोडून देऊन तें त्यांना स्वतंत्रपणें संभाळण्यासाठीं पूर्णपणें त्यांच्या स्वाधीन करावें असें प्रतिपादिलें. भीष्म म्हणतात :—

दिष्ट्या म्रियन्ते पार्था हि दिष्ट्या जीवन्ति सा पृथा ।
दिष्ट्या पुरोचनः पापो न सकामोऽत्ययं गतः ॥ १३
यदा प्रभृति दग्धास्ते कुन्तीभोजसुतासुताः ।
तदा प्रभृति गान्धारे न शक्नोम्यभिवीक्षितुम् ॥ १४
लोके प्राणभृतां कंचिच्छ्रुत्वा कुन्तीं तथागताम् ।
न चापि दोषेण तथा लोभो मन्येत्पुरोचनम् ।
यथा त्वां पुरुषव्याघ्र लोको दोषेण गच्छति ॥ १५
तदिदं जीवितं तेषां तव किल्बिषनाशनम् ।
संमन्तव्यं महाराज पाण्डवानां च दर्शनम् ॥ १६
न चापि तेषां वीराणां जीवतां कुरुनन्दन ।
पित्र्योंशः शक्य आदातुमपि वज्रभृता स्वयम् ॥ १७
ते सर्वेऽवस्थिता धर्मे सर्वे चैवैकचेतसः ।
अधर्मेण निरस्ताश्च तुल्ये राज्ये विशेषतः ॥ १८
यदि धर्मस्त्वया कार्यो यदि कार्यं प्रियं च मे ।
क्षेमं च यदि कर्तव्यं तेषामर्धं प्रदीयताम् ॥

—महाभारत, आदिपर्व अध्याय २०३

"ही मोठी भाग्याची गोष्ट आहे कीं, कुन्ती आणि पांडव हे जिवंत आहेत व पापी पुरोचनाचा मनोरथ परिपूर्ण झाला नाहीं. हे गांधारीपुत्रा, कुन्ती व तिचे पुत्र दग्ध झाल्याचें मी ज्या क्षणीं ऐकलें तेव्हांपासून लोकांना तोंड दाखविण्याची देखील सोय उरली नाहीं. लोक पुरोचनाला जितका देत नाहींत तितका दोष ते तुला देतात. हा दोष जावयाचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे पांडवांना येथें आणावयास संमति देणें हाच होय. ते वीर आहेत आणि त्यांच्या पित्याचा अंश त्याच्यापासून हिरावून घेण्याची देवेंद्राची देखील छाती नाहीं. त्या सर्वांची एकी अभेद्य आहे. ते सर्व अत्यंत धार्मिक आहेत. त्यांचा अधिकार अमान्य करून तुम्ही त्यांना काढून लावलें आहे. जर धर्मानुसार वागावयाचें असेल, माझें कांहीं प्रिय करावें असें वाटत असेल व कुळाचें नि सर्वांचें कल्याण व्हावें असें वाटत असेल तर मुकाट्यानें त्यांचें राज्य, निदान अर्धे राज्य तरी त्यांना परत द्यावें." भीष्मांची ही अभ्यर्थना मान्य झाली व तदनुसार पांडवांना बोलावून भीष्म व धृतराष्ट्र यांनीं कुलनाश टळावा म्हणून अर्धे राज्य पांडवांच्या स्वाधीन केलें. महाभारतकार म्हणतात :—

प्रतिगृह्य तु तद्वाक्यं नृपं सर्वे प्रणम्य च ।२६
प्रतस्थिरे ततो घोरं वनं तन्मनुजर्षभाः ।
अर्धं राजस्य संप्राप्य खाण्डवप्रस्थमाविशन् ॥ २७
ततस्ते पाण्डवास्तत्र गत्वा कृष्णपुरोगमाः ।
मण्डयांचक्रिरे तद्वै परं स्वर्गवदच्युताः ॥ २८
ततः पुण्ये शिवे देशे शान्तिं कृत्वा महारथाः ।
नगरं मापयामासुद्वैपायनपुरोगमाः ॥ २९

—महाभारत, आदिपर्व अ. २०७

नंतर धृतराष्ट्र व भीष्म यांनीं पांडवांना बोलावलें व धृतराष्ट्रानें त्यांना सांगितलें कीं, हे कौन्तेया, आपल्या परस्परांत कसल्याही प्रकारचें भांडण उपस्थित होऊं नये म्हणून राज्याचा अर्धा वांटा घेऊन तूं खांडवप्रस्थांत जा. त्या ठिकाणीं देवेंद्र ज्याप्रमाणें देवांचें रक्षण करतो त्याप्रमाणें अर्जुन तुमचें संरक्षण करीत असता

तुम्हांला कोणाचेंही भय नाही. याप्रमाणें पांडवांच्या नि कौरवांच्या राज्याधिकाराच्या क्षत्राची वांटणी होऊन दोन स्वतत्र राज्यें अस्तित्वांत आली. राज्य तोडून दिल्यावर भीष्म हस्तिनापुरांतच राहिले. ते धृतराष्ट्राच्या राजसत्तेचे सामंत होते. पांडवांच्या राज्याचे ते कोणीच नव्हते. म्हणून स्वतंत्र पांडवराज्यांत त्यांचा महत्त्वाच्या प्रसंगीं देखील कांहीही संबंध आलेला नाहीं. कारण सर्वसमर्थ पांडवांनीं आपली स्वतःची मंत्रिसत्ता स्वतत्रपणेंच उभारून भगवान् श्रीकृष्णांना अग्रस्थान देऊन त्याच्या इच्छाशक्तीच्या स्वाधीन आपले राज्ययत्र करून दिलें. महत्त्वाच्या प्रसंगीं देखील त्यांनी भीष्मांचा सल्ला घेतलेला नाही. राज्यच वेगळे झाल्यावर व आपले राज्य पूर्णपणें सांभाळावयास ते सर्व दृष्टींनी समर्थ असल्यावर त्यांना जाणून बुजून सल्लामसलतीची आवश्यकताच कसली होती ? म्हणून सुभद्राहरणाच्या वेळी अर्जुनानें युधिष्ठिराचा सल्ला घेतलेला आहे, भीष्माचा नाही तसेंच राजसूय यज्ञ करण्याच्या सबधातही धृतराष्ट्र अथवा भीष्म याना विचारण्याचे पांडवांना काही कारण पडलें नाही. इतकेच नव्हे तर दुर्योधनाच्या बाबतीत राजसूय यज्ञ करण्याच्या वेळी धृतराष्ट्राची अडचण पुढे आली होती तीही स्वतत्र राज्यामुळेच पाडवाच्या बाबतीत येऊं शकलेली नाही राजसूयाच्या सबधात त्यानी कृष्णाचाच सल्ला घेतला. त्यांनी इतर चार लोकांना बोलावलें त्याचप्रमाणे भीष्मांनाही बोलावलें व इतर अनेकाना कामे वाटून दिली तशीच तात्पुरती कृताकृतपरिज्ञानाच्या बाबतीत भीष्मांची नेमणूक युधिष्ठिरानें केली होती. तात्पर्य, राज्याच्या वांटणीनंतर अथवा फाळणीनंतर पांडवांनी इच्छा प्रदर्शित न केल्यामुळें वा त्यांना आवश्यकता न वाटल्यामुळे भीष्म त्याच जागी राहिले म्हणजे ते हस्तिनापूरच्या गादीचे भृत्य अथवा सामत राहिले. ही घटना ध्यानांत ठेवूनच त्याच्या द्रौपदीवस्त्रहरणाच्या प्रसगीच्या वर्तनाचा विचार केला पाहिजे.

द्रौपदीचें वस्त्रहरण व भीष्म

आतांपर्यंत वर्णन केलेली कौरवाच्या राज्यांतील भीष्मांच्या राजकीय घटनात्मक स्थानाची कल्पना नीट ध्यानांत ठेवूनच त्यांची

द्रौपदीच्या वस्त्रहरणप्रसंगांतील वागणूक पाहिली पाहिजे. ज्या द्यूतामुळे वस्त्रहरण झालें तें द्यूत कौरव व पाडव फाळणीमुळें विभक्त होऊन पूर्णपणें स्वतंत्र असलेल्या दोन राज्यातील अधिपतीमध्यें झालेलें आहे. अशा स्थितींत राजा धृतराष्ट्रानें द्यूतार्थ पांडवांना निमंत्रण केल्यावर अट्टाग्रहास पेटलेल्या राजाला भीष्म ही गोष्ट वाईट आहे हें सागण्यापलीकडे दुसरें काय करूं शकणार होते? तेवढें त्यांनी केलें आहे. द्यूताचें निमंत्रण मान्य करणें अथवा न करणें हा युधिष्ठिराचा प्रश्न होता व स्वतः युधिष्ठिरानें तें निमत्रण मान्य केल्यावर व शकुनि कपटी आहे हें माहीत असतांना त्याच्याशी द्यूत खेळून त्या द्यूतांत आपण स्वतः हरून 'दास झालो' हें युधिष्ठिर स्वत:च मान्य करीत असतांना सामत भीष्म तेथे दुसरे काय करूं शकणार होते? द्यूताच्या कैफांत युधिष्ठिरानें द्रौपदी पणाला लावली व शकुनीनें तो जिकल्याचें घोषित केले त्या वेळी घाबरून भीष्मही थरकांपले व त्यांच्या शरीराला घाम सुटला असे महाभारतांत वर्णन आहे.

एवमुक्ते तु वचने धर्मराजेन धीमता ।
धिग्धिगित्येव वृद्धानां सभ्यानां निःसृता गिरः ॥ ४०
चुक्षुभे सा सभा राजन्राज्ञां संजज्ञिरे शुचः ।
भीष्मद्रोणकृपादीनां स्वेदश्च समजायत ॥ ४१

—महाभारत, सभापर्व अध्याय ६५

द्रौपदीस भीष्मांचें उत्तर

द्रौपदीला द्यूतांत पणाला लावण्याचा व ती जिकली जाण्याचा परिणाम किती भीषण व्हावयाचा आहे याची भीष्मांना पूर्णपणें कल्पना होती. त्यामुळेच पुढील परिणामाच्या भयाने त्यांची ही अवस्था झाली. उच्छृंखल दुर्योधनानें द्रौपदीला दुःशासनाकडून अप्रतिष्ठेनें सभेत आणविले. त्यावेळी, मी जित आहे की अजित आहे असा प्रश्न द्रौपदी विचारीत असता भीष्मांनी तिला जे उत्तर दिले त्याचें स्वरूप नीट ध्यानांत न घेतांच त्यांच्यावर टीकेची झोड उठविली जाते. भीष्मांचें तें उत्तर त्याच्या परिस्थितीचा

विचार केला असतां योग्यच असून एक प्रकारच्या कडवट पण अनुकपनीय अशा त्यांच्या अंतःकरणवृत्तीची साक्ष देणारें आहे. ते व्यथित झाले होते पण ते सामंत असल्यामुळें युवराजाच्या उच्छृखल वर्तनाचा बदोबस्त करणें ही गोष्ट त्याच्या अधिकार-क्षेत्राबाहेरची होती. ती गोष्ट करणें फक्त धृतराष्ट्राच्या स्वाधीन होतें. जर दुर्योधन धृतराष्ट्राचें न ऐकता, व त्याच्या बंदोबस्ताची आज्ञा धृतराष्ट्र करते, तर राजद्रोही म्हणून दुर्योधनाचें नियंत्रण भीष्मांना करतां आलें असतें. शेवटी राजा धृतराष्ट्रानें आज्ञा केल्यावरच द्रौपदीचा छळवाद थाबलेला आहे. जर युधिष्ठिरानें द्यूत हें अधार्मिक असून कपटानें शकुनीनें मला जिकलें असल्यामुळें मी त्याचा मुळीच दास होत नाही असें म्हटले असतें किवा युधिष्ठिरानें द्रौपदीवरील आपलें स्वामित्व सोडले असतें अथवा द्रौपदीनें युधिष्ठिराचा आपल्यावरील अधिकार अमान्य केला असता, निदान उर्वरित चार पांडवांनी तो अधिकार अमान्य करून द्रौपदी स्वतंत्र असल्याचें घोषित केलें असतें तर भीष्मांना वेगळें कांहीं बोलतां आलें असतें. पण जिकणारा जिंकल्याची घोषणा करीत असतांना व हरणारा आपण हरलों व दास झालों हें मान्य करीत असतांना व जिच्यावर हा कटु प्रसंग ती व्यक्ति त्यांचें स्वामित्व मान्य करीत असतांना भीष्मांनी करावें तरी काय ? युधिष्ठिरानें मी कौरवांचा दास आहे ही गोष्ट मान्य केल्यावर मी तुला कौरवांचा दास होऊं देणार नाही हें कुरुराज्याचें एक सामंत असलेल्या भीष्मांनी कोणत्या आधारावर म्हणावयाचें ? द्रौपदी युधिष्ठिराचें स्वामित्व मान्य करीत असल्यावर "तू आपल्या पतीची आपल्यावरील सत्ता अमान्य कर" असें भीष्म तिला कोणत्या तोंडानें म्हणणार ? द्यूतांत जिकल्यामुळें तू दासी होऊं शकत नाहीस पण युधिष्ठिर तुझा पति असल्यामुळें व तो स्वतः कौरवाचा दास असल्याचें मान्य करीत असल्यामुळें त्या नात्यानें तू कौरवांची दासी झाली आहेस, एवढेंच भीष्मांनी म्हटलें आहे. या बाबतीतील सर्व जबाबदारी केवळ युधिष्ठिराची आहे हेंही भीष्मांनी स्पष्टपणें दाखविलेलें आहे. इतकेंच नव्हे तर युधिष्ठिराचें हें वर्तन आपल्याला दुःखदायक

वाटतें हेंही त्यांनी ध्वनित केलेलें आहे. शेवटी तर बलवान म्हणतील तो धर्म अशी येथील अनुकंपनीय परिस्थिति असून कौरव लोभमोहपरायण झाल्यामुळें नष्ट होतील अशी भविष्यवाणी उच्चारून निषेधदर्शक असें या स्थितींत सभेंतून निघून जाण्याचें शास्त्रसंमत असें स्वतःचें कर्तव्यही त्यांनीं पार पाडलें आहे. सत्यसंधतेमुळें एकदां राजभृत्यत्व पत्करल्यानंतर रेसभरही तिच्यापासून न ढळण्याचें महाव्रत पत्करलेला भीष्मासारखा पुरुष यावांचून दुसरे कांहींही करूं शकणार नाही. भीष्मांनी द्रौपदीला खरोखरीच काय उत्तर दिलें हे कधीच ध्यानांत घेतलें जात नाही. त्या उत्तराची नीट तपासणी न करतांच त्यांच्यावर आक्षेप घेतले जातात व ते उत्तर मुळमुळीत असल्याची अकारण समजूत केली जाते. तें उत्तर काय आहे तेंच आपण पाहूं.

न धर्मसौक्ष्म्यात्सुभगे विवेक्तुं शक्नोमि ते प्रश्नमिमं यथावत् ।
अस्वाम्यशक्तः पणितुं परस्वं स्त्रियाश्च भर्तुर्वशतां समीक्ष्य ।। ४७
त्यजेत सर्वां पृथिवीं समृद्धां युधिष्ठिरो धर्ममथो न जह्यात् ।
उक्तं जितोऽस्मीति च पाण्डवेन तस्मान्न शक्नोमि विवेक्तुमेतत् ।।४८
द्यूतेऽद्वितीयः शकुनिर्नरेषु कुन्तीसुतस्तेन निसृष्टकामः ।
न मन्यते तां निकृतिं युधिष्ठिरस्तस्मान्न ते प्रश्नमिमं ब्रवीमि ।।४९

——महाभारत, सभापर्व अध्याय ६७

उक्तवानस्मि कल्याणि धर्मस्य परमा गतिः ।
लोके न शक्यते ज्ञातुमपि विज्ञैर्महात्मभिः ।। १४
बलवांश्च यथा धर्मं लोके पश्यति पूरुषः ।
स धर्मो धर्मवेलायां भवत्यभिहतः परः ।। १५
न विवेक्तुं च ते प्रश्नमिमं शक्नोमि निश्चयात् ।
सूक्ष्मत्वाद्गहनत्वाच्च कार्यस्यास्य च गौरवात् ।। १६
नूनमन्तः कुलस्यायं भविता न चिरादिव ।
तथा हि कुरवः सर्वे लोभमोहपरायणाः ।। १७
कुलेषु जाताः कल्याणि व्यसनैराहता भृशम् ।
धर्म्यान्मार्गान्न च्यवन्ते येषां नस्त्वं वधूः स्थिता ।। १८

उपपन्नं च पाञ्चालि तवेदं वृत्तमीदृशम् ।
यत्कृच्छ्रमपि संप्राप्ता धर्ममेवान्ववेक्षसे ॥ १९
एते द्रोणादयश्चैव वृद्धा धर्मविदो जनाः ।
शून्यैः शरीरैस्तिष्ठन्ति गतासव इवानताः ॥ २०
युधिष्ठिरस्तु प्रश्नेऽस्मिन्प्रमाणमिति मे मतिः ।
अजितां वा जितां वेति स्वयं व्याहर्तुमर्हति ॥ २१

—महाभारत, सभापर्व अध्याय ६९

" हे सुभगे ! धर्म अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे तुझ्या प्रश्नाचें स्पष्ट उत्तर देता येणें मला शक्य दिसत नाहीं. युधिष्ठिरानें स्वतः पणाला लावून नतर तुला पणाला लावलेले असल्यामुळे जो स्वत चाच धनी उरलेला नाही त्याला दुसऱ्याचेंही धनी होतां येणार नाही. या न्यायाने तू दासी नाहीस. पण तू युधिष्ठिराची पत्नी आहेस व पत्नी पतीच्या नेहमीच अधीन असल्यामुळे युधिष्ठिर ज्या अर्थी दास झालेला आहे, त्या अर्थी तू आपोआपच दासी झालीस. युधिष्ठिर दास आहे किवा नाही हा प्रश्न आमच्या विचाराच्या कक्षेत राहिला नाही. युधिष्ठिर इतका धर्मनिष्ठ आहे की, प्रसगी तो समृद्ध अशा सर्व पृथ्वीचे साम्राज्यही सोडून देईल पण धर्म सोडणार नाही. अशा युधिष्ठिरानें स्वत च आपल्या तोडानें " मी जित आहे " असे म्हटले आहे अर्थात् पति या नात्याने त्याला जी अवस्था प्राप्त झाली आहे, ती अवस्था तुलाही प्राप्त होत असल्यामुळे या प्रश्नाचें उत्तर देणे माझ्या शक्तीच्या बाहेरचे आहे. शकुनि द्यूतामध्ये अद्वितीय आहे हे युधिष्ठिराला माहीत असूनही त्याच्याशी द्यूत खेळण्यांत युधिष्ठिरानें कृतार्थता मानली. इतकेच नव्हे तर शकुनीने आपणांस कपटाने फसविले असून वस्तुतः आपण दास नाही असेंही युधिष्ठिर मानावयास सिद्ध नाही. शकुनीनें त्याला जिकले हे त्याला पूर्णपणें मान्य असून तो स्वतःला 'जित' असेंच समजतो. अशा स्थितीत त्याच्या धर्मपत्नीच्या बाबतीत मी काय बोलणार ? हे कल्याणी, धर्माची गति अत्यंत सूक्ष्म असून ज्ञाते लोकही त्यांत मोह पावतात. (वास्तविक भीष्मांनीं स्वतःची असहायता प्रकट केलेली नसून युधिष्ठिराच्या स्वतःला जित समजण्यावर ही त्यांची टीका

आहे. कपटद्यूतांतील निर्णयाला मान्यता देऊन फसवणुकींत स्वतः-पुरतें तरी दासत्वाचें बंधन युधिष्ठिरानें उघडपणें स्वतःवर लादून घेतलें, हें पाहून विवेकी लोकांचा देखील कसा मानसिक गोंधळ उडतो हें ते दाखवीत आहेत.) जगतामध्यें बलवान् लोक ज्याला धर्म म्हणतील तो धर्म अशी दुर्दैवी परिस्थिति उत्पन्न झालेली आहे. (येथें पुनश्च भीष्म वाटेल तें करून आपला स्वार्थ साधू पहाणाऱ्या कौरवांच्या कपटाला 'कपट' न समजतां आपण जिकले गेलों हेंच सत्य आहे असें युधिष्ठिर समजतो याला अनुलक्षूनच बोलत आहेत) धर्म सूक्ष्म आहे म्हणून येथें उत्पन्न झालेल्या प्रश्नांच्या निरगांठी विचित्र आहेत म्हणून एकंदर वातावरण अत्यंत गुतागुतीचें दिसत असल्यामुळें निर्णय करणें अत्यंत कठिण झालें आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे व ती ही कीं, सर्व कौरव पूर्णपणे लोभ व मोह यांच्या आहारी गेलेले असल्यामुळे या कुळाचा नाश लवकरच होणार. तू ज्यांची वधू आहेस ते कुलीन आहेत. भयानक संकटांचा आघात त्यांच्यावर झालेला आहे, तरीही धर्ममार्गापासून ते विचलित होऊं इच्छीत नाहीत. हे पाचाली, तूही त्यांच्याचप्रमाणे अशा विलक्षण परिस्थितीत सापडल्यावर 'मी जित आहे की अजित हें धर्मानुसारच मला सांगा, असें म्हणत आहेस. यावरून तुझी धर्मनिष्ठाच व्यक्त होत आहे. हे द्रोणादिक वृद्ध धर्मवेत्ते खाली माना घालून बसले आहेत. जणू काय प्राणहीन शरीराप्रमाणेंच हे अचेतन दिसत आहेत. मला जर विचारशील तर तुझ्या या प्रश्नाचें उत्तर युधिष्ठिर जें देईल तेंच खरें. तू जित आहेस कीं अजित आहेस हे युधिष्ठिरानेंच सांगावें. ''

स्वतःच्या अधिकारांत न्यायानें जें सांगणें योग्य तें भीष्मांनीं सांगितलें. धर्मदृष्टचा मी दासी आहे की नाही ? असें द्रौपदी विचारीत असल्यावर धर्मदृष्टचा त्यांनी द्यावयाचें तें उत्तर दिलें. द्रौपदीला भीष्मांच्या संरक्षणाची आवश्यकता नाही. तिचे पति तिचें रक्षण करावयास पूर्ण समर्थ आहेत. पाण्डव शकुनीच्या कपटाला कपट न म्हणतां आपण दास आहोंत हें मान्य करीत असल्यावर व पति या नात्यानें त्यांची स्वतःवर असलेली सत्ता द्रौपदी मान्य करीत अस-

ल्यावर त्याचे जे परिणाम असतील त्या बाबतींत दुसरें कोण काय बोलू शकणार? दास 'दास' व्हावयाला सिद्ध असल्यावर व धनी धनीपणाचे प्रयोग करावयास पुढें सरसावल्यावर तिसऱ्या कोणी तिथें करावयाचें काय? अशा स्थितीत दुर्योधनाच्यापेक्षां वरिष्ठ अधिकारी असा धृतराष्ट्रच अनिष्ट प्रकार थांबवूं शकतो. भीष्मांच्या अधिकाराला दुर्योधन किती कस्पटासमान लेखीत असे हें आपण द्रौपदी-स्वयंवरानंतर पाण्डवांना परत बोलावण्याच्या वेळी कर्णानें राजाचे नोकर म्हणून भीष्मांचा जो अवमान केला व जो दुर्योधनानें करूं दिला त्या वेळीच कर्णावरील व्याख्यानांत आपण पाहिलें आहेच. त्यांचें नियंत्रकत्व संपलें असून फक्त प्रतिज्ञेच्या पाशानें ते बांधले गेले असल्यामुळे देह राबविणें येवढेच आपलें कर्तव्य उरलें आहे व तें करणें सत्याच्या पाशामुळें आपणांस भाग आहे हें भीष्मांनीं द्रौपदी स्वयंवराच्या प्रकरणानंतर ओळखलें होतें. त्यामुळें ते अधिक कांहींच करूं शकत नव्हते. समाजकल्याणाचा व नीतिमूल्यांच्या संरक्षणाचा विचार करून त्यांनी राजसत्तेचाच कां अंत घडविला नाही असा एक प्रश्न उत्पन्न होईल. त्याचें उत्तर इतकेंच आहे की, भीष्मांच्या जीवनाचें ध्येय सत्यसंधता हें होतें. समाजकल्याण हें नव्हतें. त्यामुळें त्यांच्या बाबतीत हा प्रश्न उत्पन्न होत नाहीं. अशा स्थितीत 'स नो राजा भविष्यति' या वचनाच्या परिपालनासाठी त्यांना दुसरे कांहीही करणे शक्य नव्हतें. सत्यसधता हीच भीष्मांची जीवननिष्ठा आहे. त्यांना एकच मार्ग शिल्लक होता व तो म्हणजे सभात्याग करून निघून जाणें हा होय. तो जर त्यांनीं केला नसता तर भीष्म दोषी ठरले असते. पण त्यानी सभेतील अनिष्ट प्रकार वाढत चालला आहे असें पाहून व तो थांबविणे आपल्या अधिकाराबाहेरचें आहे हें ओळखून आपला निषेध दर्शविण्यासाठी सभात्याग केला. स्वत. धृतराष्ट्रच या बाबतीत पुढीलप्रमाणे साक्ष देत आहे :—

प्रातिष्ठत ततो भीष्मो द्रोणेन सह सजय ।
कृपश्च सोमदत्तश्च बाल्हीकश्च महामनाः ।। २६

—महाभारत, सभापर्व अध्याय ८१

नंतर भीष्म, द्रोण, कृपाचार्य, सोमदत्त व बाल्हीक हे सभेंतून निघून गेले. त्यानंतर दुसरें द्यूत करावयाच्या वेळीही, ज्या सर्व लोकांनीं विरोध केला त्यांत भीष्म होतेच. राजसत्तेनें त्यांचें ऐकलें नाहीं यांत ते कांहीं दोषी ठरत नाहींत. महाभारतकार म्हणतातः—

ततो द्रोणः सोमदत्तो बाल्हीकश्चैव गौतमः ।
विदुरो द्रोणपुत्रश्च वैश्यापुत्रश्च वीर्यवान् ।। २५
भूरिश्रवाः शान्तनवो विकर्णश्च महारथः ।
मा द्यूतमित्यभाषन्त शमोऽस्त्विति च सर्वशः ।। २६
अकामानां च सर्वेषां सुहृदामर्थदर्शिनाम् ।
अकरोत्पाण्डवाह्वानं धृतराष्ट्रः सुतप्रियः ।। २७
—महाभारत, सभापर्व अ. ७४

नंतर द्रोण, सोमदत्त, बाल्हीक, कृपाचार्य, विदुर, अश्वत्थामा, युयुत्सु, भूरिश्रवा, भीष्म व विकर्ण या सर्वांनीं द्यूत नको म्हणून सांगितलें. पण कल्याणाची इच्छा करणारे सर्व सुहृद अमान्यता दर्शवीत असतांनासुद्धां धृतराष्ट्रानें सर्वांच्या इच्छेविरुद्ध पुनश्च पांडवांना द्यूतांत आव्हान केलें. तात्पर्य भीष्मांनीं आपलें शरीर एका वचनानें हस्तिनापूरच्या राज्ययंत्राला दिलें होतें. म्हणून त्या शरीराच्या उपयोगाची मर्यादा सोडून प्रत्येक वेळी त्यांनीं आपल्या मर्यादेंत स्वतःच्या कर्तव्याचें पूर्णपणें पालन केलें आहे. धर्माविरुद्ध त्यांनीं कधींही निर्णय दिला नाही. राज्ययंत्राचें त्यांनी कधीही लांगूलचालन केलें नाहीं. हितोपदेशाचें स्वतःचें जें कर्तव्य तें केल्यावांचून ते कधीही राहिले नाहीत. वनवास संपवून पांडव परत आल्यावर दुर्योधनाची सचिवसंस्था ते आपल्या दिलेल्या कालाआधींच प्रकट झाले असें म्हणत असता भीष्मांनी त्याविरुद्ध आपला निर्णय देऊन असें स्वच्छ शब्दांत सांगितले की, कालगणनेप्रमाणें पांडव बरोबर प्रकट झाले आहेत. इतकेंच नव्हे तर ते कधीही अधर्म करणार नाहीत हे सांगून राज्य त्यांना देणें उचित आहे असें त्यानीं सुचविलें आहे. तथापि मी मंत्री असल्यामुळे या बाबतीत कांही निर्णय घेऊं शकत नाही, परंतु तू राजा असल्यामुळें धर्मानें वागावयाचें की युद्ध करावयाचें हें तुझें तू ठरव. तू सांगशील त्याप्रमाणें आम्ही वागू

असें त्यांनी सांगितलें. दुर्योधनानें ज्या वेळी राज्य काय वाटेल तें झाले तरी मी देणार नाहीं, केवळ युद्धासंबंधी काय तें बोला असें आज्ञापिल्यावर भीष्म सेनारचनेच्या उद्योगास लागले. तरीही तुझें हित सांगणें माझें कर्तव्य आहे असें ते निराशेनें बोलल्यावांचून राहिले नाहीत. महाभारतांत म्हटले आहे :—

सर्वं यथावच्चरितं यद्यदेभिः प्रतिश्रुतम् ।
एवमेतद् ध्रुवं ज्ञात्वा ततो बीभत्सुरागतः ॥ ५
सर्वे चैव महात्मानः सर्वे धर्मार्थकोविदाः ।
येषां युधिष्ठिरो राजा कस्माद्धर्मेऽपराघ्नुयुः ॥ ६
अलुब्धाश्चैव कौन्तेयाः कृतवन्तश्च दुष्करम् ।
न चापि केवलं राज्यमिच्छेयुस्तेऽनुपायतः ॥ ७
तदैव ते हि विक्रान्तुमीषुः कौरवनन्दनाः ।
धर्मपाशनिबद्धास्तु न चेलुः क्षत्रियव्रतात् ॥ ८
यच्चानृत इति ख्यायाद्य· स गच्छेत् पराभवम् ।
वृणुयुर्मरणं पार्था नानृतत्वं कथंचन ॥ ९
प्राप्तकाले तु प्राप्तव्यं नोत्सृजेयुर्नरर्षभाः ।
अपि वज्रभृता गुप्तं तथावीर्या हि पाण्डवाः ॥ १०
प्रतियुध्येम समरे सर्वशस्त्रभृतां वरम् ।
तस्माद्यदत्र कल्याणं लोके सद्भिरनुष्ठितम् ॥
तत् संविधीयतां शीघ्रं मा वो हत्यर्थोऽभ्यगात् परम् ॥ ११
न हि पश्यामि सङ्ग्रामे कदाचिदपि कौरव ।
एकान्तसिद्धिं राजेन्द्र सप्राप्तश्च धनंजयः ॥ १२
संप्रवृत्ते तु सङ्ग्रामे भावाभावौ जयाजयौ ।
अवश्यमेकं स्पृशतो दृष्टमेतदसंशयम् ॥ १३
तस्माद्युद्धोचितं कर्म कर्म वा धर्मसंहितम् ।
क्रियतामाशु राजेन्द्र संप्राप्तश्च धनंजयः ॥ १४

दुर्योधन उवाच ।

नाहं राज्यं प्रदास्यामि पाण्डवानां पितामह ।
युद्धोपचारिकं यत्तु तच्छीघ्रं प्रविधीयताम् ॥ १५

भीष्म उवाच ।

अत्र या मामिका बुद्धिः श्रूयतां यदि रोचते ।
सर्वथा हि मया श्रेयो वक्तव्यं कुरुनन्दन ॥ १६
—महाभारत, विराटपर्व अध्याय ५२

" पांडवांनी जशी प्रतिज्ञा केली होती तदनुरूप ते व्यवस्थित वागले आहेत व म्हणूनच अर्जुन प्रकट झाला आहे. ते सर्व थोर लोक धर्म व व्यवहार यांत अत्यंत कुशल आहेत. युधिष्ठिर ज्यांचा राजा आहे ते लोक धर्माच्या संबधांत प्रमाद कसा करतील ? पांडव लोभी मुळीच नाहीत. ते अत्यत दुष्कर कर्म करणारे आहेत व तसें त्यांनी केलेही आहे. अधर्माने ते राज्य कधीही स्वीकारणार नाहीत. जर निव्वळ पराक्रमानेंच त्यांना राज्य घ्यावयाचें असतें तर त्यांनी तें पूर्वीच घेतलें असतें. केवळ धर्मपाशानें बाधलेले असल्यामुळेच क्षत्रियाच्या सत्यसधतेच्या व्रतापासून ते त्या वेळी ढळले नाहीत. पांडव हे इतके तीव्र सत्यनिष्ठ आहेत की ते मरण पत्करतील, पण असत्य कधीही पत्करणार नाहीत व ज्या वेळी जे घ्यावयाचें तें काय वाटेल ते झाले तरी तें घेतल्यावांचून कधीही राहणार नाहीत. इद्राने जरी त्याचा भाग गिळकृत करण्याचा प्रयत्न केला तरी देखील ते त्याच्याशीही युद्ध करून आपला भाग परत मिळविल्याशिवाय राहणार नाहीत व तितकें प्रखर सामर्थ्य त्याच्या ठिकाणी निश्चित आहे. म्हणून सर्व शस्त्रधारी लोकामध्ये अत्यत श्रेष्ठ असा जो अर्जुन त्याच्याशी सर्वानी मिळून संघटितपणेच युद्ध केले पाहिजे. कार्यनाश होऊं नये म्हणून या स्थितीत विचक्षणानी आचरलेला मार्ग शक्य तितक्या त्वरेने अवलंबिणें योग्य आहे. अर्जुनासारखा प्रबल योद्धा प्राप्त झाला आहे. सग्रामांत नेहमी जय कोणाला मिळाल्याचें मी पाहिलें नाही. एकदां संग्राम सुरू झाल्यावर कधी जय होतो तर कधी पराजय होतो, मरण कधीं टळतें, तर कधीं येतेंही, गमवावयास वेळ नाही म्हणून युद्धच करावयाचें असलें तर त्या तयारीला लागा व धर्मानुसार त्यांचें त्यांना देऊन संधि करावयाचा असला तर त्या सिद्धतेला लागा. त्यावर दुर्योधन म्हणाला, हे पितामह, मी पांडवांना

राज्य कधीच देणार नाही. युद्धाच्या दृष्टीनें जें काय बोलावयाचें असेल तें सांगा. भीष्म त्यावर इतकेंच म्हणाले, जें तुझ्या कल्याणाचें मला वाटेल तें सांगणें येवढेंच माझें कर्तव्य आहे. ऐकणें वा न ऐकणें ही तुझ्या स्वाधीनची गोष्ट आहे. जे तुला वाटेल तसे तू करूं शकतोस." तात्पर्य, भीष्मांनी देह कौरवांना दिला होता, पण हिताचें सांगणें, राज्ययंत्राच्या सूत्रचालकांनी जर अधर्म करावयाचें ठरविलें असले तर तो अधर्म आहे असें त्यांना स्वच्छ सांगणें—मग ते प्रसन्न होवोत वा न होवोत—त्यांनी कधीही सोडलें नाहीं. संपूर्ण उद्योगपर्वात त्यांनी दुर्योधनाला आणि धृतराष्ट्राला संधीचाच सल्ला दिलेला आहे. तो त्यांनी ऐकला नाही याचा दोष भीष्मांकडे येत नाही. सत्तेचे ते भृत्य असल्यामुळें त्यांना त्यांच्या कडून लढावें लागलें ही गोष्ट स्वतंत्र आहे. सेनापतिपद स्वीकारतांना देखील स्वतःच्या शरीराचें पारतंत्र्य व मनाचें स्वातंत्र्य त्यांनीं कांहीं गोष्टी राजा दुर्योधनाला स्पष्टपणे सांगूनच सिद्ध केल्या आहेत. पांडव हे कौरवकुळांतील असल्यामुळें भीष्म त्यांना ठार मारूं इच्छीत नव्हते. युद्ध थांबविण्यासाठीं त्यांनी जे प्रयत्न केले त्यांत कर्णाचा तेजोवध ही अत्यत महत्त्वाची गोष्ट त्यांनी केली. कारण कर्ण हेच कुलनाशाचें मूळ आहे हे ओळखून त्यांनी त्याच्यावर प्रहार चालविले होते. पण त्यांच्या त्या प्रयत्नांना यश आले नाही. कर्ण हा केवळ व्यक्तिगत महत्त्वाकाक्षेसाठी या भयानक विनाशास्तव सिद्ध झाला याचा त्यांना इतका उद्वेग वाटत होता की, रथातिरथगणनेच्या वेळी त्याचा हा सताप खळाळून बाहेर पडला आहे. ते म्हणतात .—

सखा ते दयितो नित्यं य एष रणकर्कशः ।
उत्साहयति राजंस्त्वां विग्रहे पांडवैः सह ॥ ३
परुषः कत्थनो नीचः कर्णो वैकर्तनस्तव ।
मन्त्री नेता च बंधुश्च मानी चात्यंतमुच्छ्रितः ॥ ४
एष नैव रथः कर्णः न चाप्यतिरथो रणे ।
वियुक्तः कवचेनैष सहजेन विचेतनः ॥ ५

कुण्डलाभ्यां च दिव्याभ्यां वियुक्तः सततं घृणी ।
अभिशापाच्च रामस्य ब्राह्मणस्य च भाषणात् ।। ६
करणानां वियोगाच्च तेन मेऽर्धरथो मतः ।
नैष फाल्गुनमासाद्य पुनर्जीवन् विमोक्ष्यसे ।। ७
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १६८

"हे राजा, हा तुझा रणकर्कश सखा जो तुला अत्यत प्रिय वाटतो व जो वारवार पांडवांशी करावयाच्या संघर्षासंबंधी तुला प्रेरित नि उत्साहित करतो तो तुझा मत्री नि नेता किबहुना बंधूहूनही तुला अधिक प्रिय वाटणारा तुझा मंत्री कर्ण अत्यत कठोर, बडबड्या, नीच, अहंकारी व मर्यादातीत उद्धट असून हा रथीही नाही व अतिरथी तर नाहीच नाही. याचें सहज कवचकुंडल गेलें आहे. मत्सरामुळें याचे गुण दूषित झालेले असून परशुरामांच्या शापामुळें, याला ब्राह्मणाचाही शाप असल्यामुळें व याच्याजवळची सर्व साधनें संपलेली असल्यामुळें माझ्या दृष्टीनें हा केवळ अर्धरथी आहे. अर्जुनाशी याची रणांत गांठ पडल्यावर हा पुन्हां जिवंत म्हणून रहाणार नाही." पण त्यांच्या साऱ्याच खटपटीना पूर्णपणें अपयश आलें. चाणाक्ष दुर्योधन भीष्मांचें रणपांडित्य माहीत असल्यामुळें कर्णालाही बाजूस सारून त्यांनाच सेनापति करावयास उद्युक्त झाला; पण भीष्मांनीं युद्धाचें सेनापतित्व स्वीकारीत असतांनाच त्याला कांहीं अटी घातल्या. त्या पुढीलप्रमाणें :—

एवमेतन्महाबाहो यथा वदसि भारत ।
यथैव हि भवन्तो मे तथैव मम पाण्डवाः ।। १६
अपि चैव मया श्रेयो वाच्यं तेषां नराधिप ।
संयोद्धव्यं तवार्थाय यथा मे समयः कृतः ।। १७
न तु पश्यामि योद्धारमात्मनः सदृशं भुवि ।
ऋते तस्मान्नरव्याघ्रात् कुन्तीपुत्राद्धनञ्जयात् ।। १८
स हि वेद महाबुद्धिर्दिव्यान्यस्त्राण्यनेकशः ।
न तु मां विवृतो युद्धे जातु युध्येत पाण्डवः ।। १९
अहं चैव क्षणेनैव निर्मनुष्यमिदं जगत् ।
कुर्यां शस्त्रबलेनैव ससुरासुरराक्षसम् ।। २०

न त्वेवोत्सादनीया मे पाण्डोः पुत्रा जनाधिप ।
तस्माद्योधान् हनिष्यामि प्रयोगेणायुतं सदा ।। २१
एवमेषां करिष्यामि निधनं कुरुनन्दन ।
न चेत्ते मां हनिष्यन्ति पूर्वमेव समागमे ।। २२
सेनापतिस्त्वहं राजन् समये नापरेण ते ।
भविष्यामि यथाकामं तन्मे श्रोतुमिहार्हसि ।। २३

——महाभारत, उदद्योगपर्व अध्याय १५६

एवमेष महाराज स्त्रीपुमान् द्रुपदात्मजः ।
स संभूत. कुरुश्रेष्ठ शिखण्डी रथसत्तमः ।। ६३
ज्येष्ठा काशिपतेः कन्या अम्बा नामेति विश्रुता ।
द्रुपदस्य कुले जाता शिखण्डी भरतर्षभ ।। ६४
नाहमेनं धनुष्पाणिं युयुत्सुं समुपस्थितम् ।
मुहूर्तमपि पश्येयं प्रहरेयं न चाप्युत ।। ६५
व्रतमेतन्मम सदा पृथिव्यामपि विश्रुतम् ।
स्त्रियां स्त्रीपूर्वके चैव स्त्रीनाम्नि स्त्रीसरूपिणि ।। ६६
न मुञ्चेयमहं बाणमिति कौरवनन्दन ।
न हन्यामहनेतेन कारणेन शिखण्डिनम् ।। ६७
एतत्तत्त्वमहं वेद जन्म तात शिखण्डिनः ।
ततो नैनं हनिष्यामि समरेष्वाततायिनम् ।। ६८
यदि भीष्मः स्त्रियं हन्यात् सन्तः कुर्युर्विगर्हणम् ।
नैनं तस्माद्धनिष्यामि दृष्ट्वाऽपि समरे स्थितम् ।। ६९

वैशम्पायन उवाच ।

एतच्छ्रुत्वा तु कौरव्यो राजा दुर्योधनस्तदा ।
मुहूर्तमिव स ध्यात्वा भीष्मे युक्तममन्यत ।। ७०

——महाभारत, उदद्योगपर्व अध्याय १९२

"राजा, तू म्हणतोस त्याप्रमाणें मी तुझें सेनापतित्व स्वीकारावयास तयार आहे. पण नात्यानें जसे तुम्ही माझे आहांत तसेच पाण्डवही माझे आहेत. त्यामुळे तुमचें कल्याण कशांत आहे हें सांगणें जसें माझे कर्तव्य आहे, त्याचप्रमाणें त्यांचें कल्याण कशांत

आहे हें सांगणेंही माझें कर्तव्यच आहे. मी राजयंत्राशीं वचनानें बांधलों असल्याकारणानें तुझ्या पक्षाकडून लढणे मला भागच आहे व माझ्या शब्दाप्रमाणे मी लढेन. पण पाण्डवांनीं मला त्यांचें कल्याण कशांत आहे हें विचारल्यास मी तें तुम्हांला जसें सांगतो तसेंच त्यांसही सांगेन. नरव्याघ्र कुन्तीपुत्र धनंजयावांचून माझ्या योग्यतेचा दुसरा प्रतियोद्धा मला कोणीही दिसत नाहीं. तो महाबुद्धि धनंजय अनेक प्रकारची दिव्य अस्त्रे जाणतो; पण तो माझ्याशीं जसें लढावयास पाहिजे असे (पूज्यभावनेमुळें) लढेल असें वाटत नाहीं. केवळ शस्त्रबळानेंच मी देव, दैत्य, राक्षस यांसह सर्व जगत् क्षणांत निर्मनुष्य करूं शकेन. पण पाण्डुपुत्रांना (ते कुरु कुळांतील व तुमच्याचसारखे माझे नातू असल्यामुळे) मी माझ्या हातानें ठार मारणार नाही. त्यांच्या बाजूचे प्रतिदिनी दहा हजार योद्धे मी कलात्मक युद्ध करून ठार मारीन. त्यांनी पूर्वीच जर मला ठार न मारलें तर मी या पद्धतीनें त्यांच्या सहायकांचा विध्वस करीन. सेनापतित्व स्वीकारताना माझी दुसरीही अट आहे. हा जो द्रुपदाचा मुलगा शिखंडी त्याच्याशी मी युद्ध करणार नाही. मी तुला सांगितल्याप्रमाणें तो स्त्रीचा पुरुष झालेला गृहस्थ आहे. काशिराजाची ज्येष्ठ कन्या अम्बा त्याच्या रूपानें अवतीर्ण झाली आहे. त्या स्त्रीपुरुषाला धनुष्य हातांत घेऊन रणांत उभा ठाकलेल्या स्थितीत पहाण्याची देखील माझी इच्छा नाही. मग त्याच्यावर प्रहार करणें तर दूरच राहील. स्त्री, स्त्रीपुरुष, स्त्रीचें नांव असलेला, व स्त्रियांसारखे रूप असलेला अशा गृहस्थाच्या अंगावर मी बाण कधींही टाकणार नाही असें माझें व्रत आहे. या कारणास्तव मी शिखंडीला मारणार नाहीं. मला शिखंडीचा सर्व इतिहास माहीत आहे. भीष्म जर स्त्रीवर हत्यार धरील तर संत त्याची निंदा केल्यावांचून रहाणार नाहींत. शिखंडी रणांत माझ्यासमोर येऊन ठाकला तरी देखील मी त्याला मारणार नाहीं." सर्व क्षत्रियांत अत्यत श्रेष्ठ व शेवटचे शुद्ध क्षत्रिय सत्यसंध भीष्म हे याप्रमाणें क्षत्रियधर्मास अनुसरून आपल्या प्रतिज्ञेच्या अग्निकुंडांत मनाला पीळ पडत असतांना देखील पांडवांविरुद्ध खड्ग धरून युद्धार्थ उभे

राहिले. धर्मनिष्ठ युधिष्ठिराला कुरुकुलाच्या सत्यसंधतेची महान् पताका असलेले ते आपले पितामह यापुढें आपल्या शस्त्राघाताचें लक्ष्य होणार यामुळें अत्यंत दुःख झालें. धर्मकार्यार्थ उगारलेल्या दंडाला त्यांचा महनीय आशीर्वाद मिळावा म्हणून युद्धाच्या प्रारंभीं युधिष्ठिर आपले पांच बंधु व श्रीकृष्ण यांच्यासहित भीष्मांकडे गेले व त्यांना वंदन करून त्यांच्या आशीर्वादाची अभ्यर्थना करूं लागले. महाभारतकार म्हणतात :—

सोऽवगाह्य चमूं शत्रोः शरशक्तिसमाकुलाम् ।
भीष्ममेवाभ्ययात्तूर्णं भ्रातृभिः परिवारितः ॥ ३५
तमुवाच ततः पादौ कराभ्यां पीडय पाण्डवः ।
भीष्मं शान्तनवं राजा युद्धाय समुपस्थितम् ॥ ३६

युधिष्ठिर उवाच ।

आमन्त्रये त्वां दुर्धर्ष त्वया योत्स्यामहे सह ।
अनुजानीहि मां तात आशिषश्च प्रयोजय ॥ ३७

भीष्म उवाच ।

यद्येवं नाभिगच्छेथा युधि मां पृथिवीपते ।
शपेयं त्वां महाराज पराभावाय भारत ॥ ३८
प्रीतोऽहं पुत्र युध्यस्व जयमाप्नुहि पाण्डव ।
यत्तेऽभिलषितं चान्यत्तदवाप्नुहि संयुगे ॥ ३९
व्रियतां च वरः पार्थ किमस्मत्तोऽभिकांक्षसि ।
एवंगते महाराज न तवास्ति पराजयः ॥ ४०
अर्थस्य पुरुषो दासो दासस्त्वर्थो न कस्यचित् ।
इति सत्यं महाराज बद्धोऽस्म्यर्थेन कौरवैः ॥ ४१
अतस्त्वां क्लीबवद्वाक्यं ब्रवीमि कुरुनन्दन ।
भृतोऽस्म्यर्थेन कौरव्य युद्धादन्यत्किमिच्छसि ॥ ४२

युधिष्ठिर उवाच ।

मन्त्रयस्व महाबाहो हितैषी मम नित्यशः ।
युध्यस्व कौरवस्यार्थे ममैष सततं वरः ॥ ४३

भीष्म उवाच ।

राजन्किमत्र साहयं ते करोमि कुरुनन्दन ।
कामं योत्स्ये परस्यार्थे ब्रूहि यत्ते विवक्षितम् ॥ ४४.

ष्ठिर उवाच ।

कथं जयेयं सङ्गरामे भवन्तमपराजितम् ।
एतन्मे मन्त्रय हितं यदि श्रेयः प्रपश्यसि ॥ ४५

म उवाच ।

नैनं पश्यामि कौन्तेय यो मां युध्यन्तमाहवे ।
विजयेत पुमान् कश्चित्साक्षादपि शतक्रतुः ॥ ४६

धष्ठिर उवाच ।

हन्त पृच्छामि तस्मात्त्वां पितामह नमोऽस्तु ते ।
वधोपायं ब्रवीहि त्वमात्मनः समरे परैः ॥ ४७

ष्म उवाच ।

न स्म तं तात पश्यामि समरे यो जयेत माम् ।
न तावन्मृत्युकालोऽपि पुनरागमनं कुरु ॥ ४८

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय ४३

नंतर युधिष्ठिरानें सिद्ध अशा त्या कौरवपक्षीय सेनेला पार केलें । बंधूसहित शीघ्रगतीनें तो भीष्मांच्या जवळ येऊन पोहोंचला. यांच्या पायावर वंदना समर्पण करून युधिष्ठिर त्यांना म्हणाला, हे पितामह, आपल्याबरोबर युद्ध करण्यासाठीं मी आपली आज्ञा मागावयास आलों आहे. मला आपण आशीर्वाद द्या. हें ऐकतांच भीष्म त्याला म्हणाले : हे राजा, जर तू माझ्याकडे आला नसतास व याप्रमाणें तुला योग्य तें कर्तव्य केलें नसतेस तर मी तुझा पराभव व्हावा म्हणून तुला खात्रीनें शाप दिला असता. हे पुत्रा, तुझ्या या कृत्यानें मी अत्यंत प्रसन्न झालों आहे. माझ्याशीं युद्ध कर व विजय संपादन कर. युद्धांत तुझी जी इच्छा असेल ती सफल करून घे. पण कुन्तीपुत्रा, तुझें काय अभिलषित आहे? कोणता वर तुला माझ्याकडून हवा आहे ? याप्रमाणें जो धर्मनिष्ठतेनें वागतो त्याचा कधींही पराभव होत नाहीं. हे राजा, अर्थ कधींही कोणाचा दास असत नाही. पुरुषच अर्थाचा दास असतो हें अगदीं सत्य आहे. मी कौरवांशीं अर्थानें बांधला गेलों आहे. (या ठिकाणीं अर्थ म्हणजे पुरुषार्थ. लोक समजतात त्याप्रमाणें पैसा नव्हे. ज्याच्या धनुष्याच्या

टणत्कारानें जामदग्न्य परशुरामांच्याही हृदयाचा थरकांप उडविला व चालत आलेलें राज्य ज्यानें ध्येयनिष्ठतेसाठीं कसल्याही प्रलोभनाला नि आग्रहाला बळी न पडतां दोनदां झिडकारून दिलें, तो सत्यसंध महापुरुष पैशासाठीं कौरवांचा गुलाम बनेल असें मानणें निव्वळ महामूर्खपणाचें आहे. सत्यरूपी पुरुषार्थ हीच भीष्मांची जीवननिष्ठा आहे. व त्यामुळेंच ते या ठिकाणीं पुरुषार्थ या अर्थानें अर्थशब्दाचा वापर करून असें म्हणत आहेत कीं प्रत्येक मनुष्य आपआपल्या ध्येयवादाचा अंकित आहे. ध्येय कांहीं मनुष्याच्या अंकित नाहीं. मी सत्यरूपी पुरुषार्थानें कौरवांशी बांधला गेलों आहे. त्यामुळें तुझा पक्ष न्यायाचा असून देखील मला कौरवांच्याच बाजूनें लढणें व हा देह खपविणें भाग आहे. या श्लोकावर बरीच टीका होत असल्यामुळें ती सर्वस्वी विपर्यस्त व चुकीची कशी आहे हें दाखविण्यासाठीच मी हें स्पष्टीकरण करीत आहें). म्हणून हे कुरुनंन्दना, एकाद्या क्लीबाप्रमाणें मी तुला असें विचारीत आहे की, माझ्या प्रतिज्ञेनुसार मी बांधला गेलों असल्यामुळे तुझ्या बाजूनें युद्ध करणें सोडून दुसरें मी तुझ्यासाठीं काय करावें अशी तुझी इच्छा आहे तें तू मला साग. युधिष्ठिर म्हणाले, " माझ्या कल्याणाची इच्छा मनांत बाळगून माझ्या हिताचा सल्ला आपण मला द्या. एवढाच वर मी आपल्यापाशी मागतों. आपण खुशाल कौरवांच्या बाजूनें लढावें. " त्यावर भीष्म म्हणाले, " मी याच बाजूनें लढेन हें तर खरेंच आहे. पण तुला माझा कोणत्या बाबतींत सल्ला हवा आहे तें सांग." त्यावर युधिष्ठिर म्हणाले, "आपण अजिक्य आहांत. मी आपणांशी संग्रामांत लढून आपणांस कोणत्या उपायानें जिंकावें तें आपण मला सांगा. माझ्या हिताचा हाच सल्ला मला हवा आहे." त्यावर भीष्म म्हणाले, " राजा, मी युद्धांत लढत असतां साक्षात् देवेंद्र देखील मला जिकू शकत नाहीं. मग इतरांची कथाच काय ? असा कोणीही पुरुष मला दिसत नाही की जो मी युद्ध करीत असतां मला जिंकू शकेल. " त्यावर युधिष्ठिर म्हणाले, " हे पितामहो, मी आपल्याला वंदन करतों. मोठा दुःखदायक प्रश्न आपल्याला बिचारण्याची पाळी माझ्यावर आली आहे. आपणांस युद्धांत कोणत्या

उपायानें ठार मारतां येईल तें आपण मला सांगा." त्यावर भीष्म म्हणाले, "राजा मला संग्रामांत कोणी जिकूही शकणार नाहीं व तूर्त माझा मृत्युकाळ आलेलाही मला दिसत नाही. पुन्हां तू ये त्या वेळी पाहूं." याप्रमाणें भीष्मांनीं दुर्योधनाच्या तोंडावर स्पष्टपणें सांगितल्याप्रमाणें युधिष्ठिराला त्याच्या हिताचा सल्ला दिला व आपला देह मात्र कौरवांसाठींच खपविला.

भीष्मांचें अवंचक युद्ध

शस्त्र हातांत घेतल्यावर भीष्मांनी जें युद्ध केलें त्यांत कसल्याही प्रकारें वंचना केली नाहीं. दहा दिवसांचें भीष्मपर्व हा महाभारतांतील अशबलित व विशुद्ध वीररसाचा आविष्कार होय. भीष्मांच्या मनांत केवळ क्षत्रियोचित असा युद्धोत्साह आहे. क्रोध मुळींच नाहीं. उलट उभयपक्षांतील प्रमुख नायक हे त्यांचींच मुलेंबाळें असल्यामुळें त्यांच्यासमोर कोणी विशेष पराक्रम व्यक्त केला तर वारंवार त्यांचें वात्सल्यच निर्मळपणें प्रकट झालें आहे. काव्यप्रकाशकार मम्मटाला अथवा इतर सस्कृत साहित्यकांना अशबलित व विशुद्ध वीररसाचें पर्वच्या पर्व ज्याने निर्माण केलें त्या महर्षि व्यासांच्या तेजस्वी प्रतिभेचा हा भव्य आविष्कार कसा दिसला नाहीं कोण जाणें! एरवी तथाकथित पंच महाकवींच्या, व्यासांच्या दिव्य प्रतिभेच्या तुलनेनें केवळ तिसऱ्या, चवथ्या श्रेणीच्या ठरणाऱ्या शबलित काव्यपक्तीकडे ते वळतेना. महर्षीनी हा एक अद्‌भुत चमत्कार करून दाखविलेला आहे. विशुद्ध वीररसाचें हें युद्ध केवळ शुद्ध क्षत्रिय या नात्यानें भीष्मांनीं केलें व तेंही इतक्या अवंचकतेनें की तें पाहून कोणाचेंही मन आश्चर्यानें थक्क व्हावें. पहिल्याच दिवशीं त्यांनीं पांडवांचा सेनापति श्वेत रणांत ठार मारून अर्जुन व भीमासारख्या खंद्या वीरांनीं संरक्षिलेल्या त्या सेनेची इतकी ससेहोलपट केली कीं, पहिल्याच दिवशी युधिष्ठिराचा युद्धोत्साह पार मावळून त्याच्या मनांत कमालीचा न्यूनगंड उत्पन्न झाला. महाभारतकार भीष्मपर्वांत लिहितात :—

कृतेऽवहारे सैन्यानां प्रथमे भरतर्षभ ।
भीष्मे च युद्धसंरब्धे हृष्टे दुर्योधने तथा ।। १
धर्मराजस्ततस्तूर्णमभिगम्य जनार्दनम् ।
भ्रातृभिः सहितः सर्वैः सर्वैश्चैव जनेश्वरैः ।। २
शुचा परमया युक्तश्चिन्तमानः पराजयम् ।
वार्ष्णेयमब्रवीद्राजन् दृष्ट्वा भीष्मस्य विक्रमम् ।। ३
कृष्ण पश्य महेष्वासं भीष्मं भीमपराक्रमम् ।
शरैर्वहन्तं सैन्यं मे ग्रीष्मे कक्षमिवानलम् ।। ४
कथमेनं महात्मानं शक्ष्यामः प्रतिवीक्षितुम् ।
लेलिहच्यमानं सैन्यं मे हविष्मन्तमिवानलम् ।। ५
एतं हि पुरुषव्याघ्रं धनुष्मतं महाबलम् ।
दृष्ट्वा विप्रद्रुतं सैन्यं समरे मार्गणाहतम् ।। ६
शक्यो जेतुं यमः क्रुद्धो वज्रपाणिश्च संयुगे ।
वरुणः पाशभृद्वापि कुबेरो वा गदाधरः ।। ७
न तु भीष्मो महातेजाः शक्यो जेतुं महाबलः ।
सोऽहमेवंगते मग्नो भीष्मागाधजले प्लवे ।। ८
आत्मनो बुद्धिदौर्बल्याद्भीष्ममासाद्य केशव ।
वनं यास्यामि वार्ष्णेय श्रेयो मे तत्र जीवितुम् ।।९
न त्वेतान् पृथिवीपालान् दातुं भीष्माय मृत्यवे ।
क्षणयिष्यति सेनां मे कृष्ण भीष्मो महास्त्रवित् ।। १०
यथाऽनलं प्रज्वलितं पतङ्गाः समभिद्रुताः ।
विनाशायोपगच्छन्ति तथा मे सैनिको जनः ।। ११
क्षयं नीतोऽस्मि वार्ष्णेय राज्यहेतोः पराक्रमी ।
भ्रातरश्चैव मे वीराः कर्शिताः शरपीडिताः ।। १२
मत्कृते भ्रातृहार्देन राज्याद्भ्रष्टास्तया सुखात् ।
जीवितं बहु मन्येऽहं जीवितं हद्य दुर्लभम् ।। १३
जीवितस्य च शेषेण तपस्तप्स्यामि दुश्चरम् ।
न घातयिष्यामि रणे मित्राणीमानि केशव ।। १४
रथान् मे बहुसाहस्रान् दिव्यैरस्त्रैर्महाबलः ।
घातयत्यनिशं भीष्मः प्रवराणां प्रहारिणाम् ।। १५

किं नु कृत्वा हितं मे स्याद् ब्रूहि माधव मा चिरम् ।
मध्यस्थमिव पश्यामि समरे सव्यसाचिनम् ॥ १६
एको भीमः परं शक्त्या युध्यत्येव महाभुजः ।
केवलं बाहुवीर्येण क्षत्रधर्ममनुस्मरन् ॥ १७

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय ५०

"या दिवशीं सैन्याचा अवहार केल्यानंतर दुर्योधनाचा आनंद व भीष्मांचा अपूर्व युद्धोत्साह पाहून सर्व सहायक राजे व बंधु यांच्यासह युधिष्ठिर भगवान् श्रीकृष्णांकडे गेला. त्याला अत्यंत दुःख झालें होतें व पराजयाचीं स्वप्नें त्याच्या नेत्रांसमोर तरळत होतीं. भीष्मांचा पराक्रम आठवून युधिष्ठिर श्रीकृष्णांना म्हणाला, 'हे कृष्णा, भव्य धनुष्य हातांत घेऊन भीषण पराक्रम प्रकट करणाऱ्या भीष्मांना तूं पाहिलेंस काय? ग्रीष्म ऋतूंत वाळलेलें गवत जाळणाऱ्या अग्नीप्रमाणें भीष्म आपल्या बाणांनीं माझें सैन्य दग्ध करीत आहेत. एखाद्या अग्नीप्रमाणेंच जणूं ज्वालांनीं ते माझें सैन्य जाळीत आहेत. त्यांच्याकडे पाहण्याचें तरी सामर्थ्य आमच्यांत आहे काय? या धनुष्पाणि व महाबलवान् पुरुषव्याघ्राला नुसतें पाहूनच माझें सैन्य थरकांपून उठतें व पळून जातें. क्रुद्ध झालेल्या यमाला, वज्र हातांत घेऊन आलेल्या इंद्राला, पाशहस्त वरुणाला, अथवा गदा धारण करणाऱ्या कुबेरालाही जिंकणें शक्य आहे, पण तेजस्वी व सामर्थ्यसंपन्न भीष्मांना जिकतां येणें केवळ अशक्य आहे. आज मी भीष्मरूपी मोठ्या जलसागरांत पार बुडून गेलों आहें. केवळ मूर्खपणानेंच मी भीष्मांची गांठ घेतली. या भीष्मरूपी मृत्यूच्या अधीन सर्व राजांना करण्याऐवजी मी वनांत जावयाचें ठरविलें आहे. या लोकांना व्यर्थ मारण्यापेक्षां तेथें जाणें बरें. महास्त्रवेत्ते भीष्म माझ्या सर्व सेनेचा नाश करतील. प्रज्वलित अग्नीत धांवत जाऊन पडणारे पतंग ज्याप्रमाणें स्वतःचा नाश करून घेतात तशीच माझ्या सैन्याची अवस्था झाली आहे. मी मनांत राज्याचा हेतु धरला खरा; पण माझाच सर्वनाश ओढवला आहे. माझे सर्व बंधूही बाणांच्या आघातांनी अत्यंत पीडित झाले आहेत. केवळ बंधुप्रेमामुळें ते माझ्यासाठीं राज्य व सुख यांपासून पूर्णपणें भ्रष्ट

झाले. त्यांनीं जीवितालाही आंचवावें अशी माझी इच्छा नाहीं. जीवित ही अत्यंत दुर्लभ गोष्ट असल्यामुळें त्याची प्रतिष्ठा मला सर्वात अधिक वाटते. उरलेलें जीवन मी दुष्कर तपश्चर्येत घालवीन. पण या माझ्या मित्रांना ठार मारण्याची माझी इच्छा नाहीं. सहस्रावधि मोठमोठ्या योद्धचांना आपल्या दिव्य अस्त्रांनी भीष्म ठार मारीत आहेत. मी काय केलें असतां माझें हित होईल तें मला सत्वर सांगा. अर्जुन केवळ मध्यस्थ आहे व मनापासून लढत नाहीं असें मला वाटतें. केवळ एकटा भीम मात्र क्षात्रधर्मानुसार आपल्या बाहूंचें बळ खर्ची घालून युद्ध करीत आहे."

प्रतियोद्धा केवळ श्रीकृष्ण

युधिष्ठिरांनीं अर्जुनाच्या पराक्रमावर भिस्त ठेवून असे उद्‌गार काढले खरे; पण केवळ श्रीकृष्णांवांचून भीष्मांना दुसरा प्रतियोद्धाच नव्हता हें अवघ्या तिसऱ्याच दिवशीं स्पष्ट झालें. तिसऱ्या दिवशींच्या युद्धांत भीष्मांनीं अर्जुनाचा मोड केला. सर्व सैन्य घाबरून पळूं लागलें. सात्यकीनें वीररसयुक्त आवाहन करून सर्व सैनिकांना थोपवून धरण्याचा प्रयत्न केला. पण प्राणभयानें थरकांपणाऱ्या लोकांनीं त्याचें न ऐकतांच पळून जाण्याचें ठरविलें. केवळ जगत् सूत्रचालक श्रीकृष्ण भीष्मांना पराजित करूं शकत होते. शेवटीं मानवी सामर्थ्याचा दिव्यास्त्रवेत्त्या भीष्मांसमोर कांहीं एक उपयोग होत नाहीं असें पाहून श्रीकृष्णांनी स्वतःच्या हातीं शस्त्र न घेण्याची प्रतिज्ञा बाजूस ठेविली. महाभारतकार म्हणतात :

उवाच शैनेयमभिप्रशंसन् दृष्ट्वा कुरूनापततः समग्रान् ।
ये यान्ति ये यान्तु शिनिप्रवीर येऽपि स्थिताः सात्वत तेऽपि यान्तु ॥ ८४
भीष्मं रथात् पश्य निपात्यमानं द्रोणं च संङ्ख्ये सगणं मयाऽद्य ।
न मे रथी सात्वत कौरवाणां क्रुद्धस्य मुच्येत रणेऽद्य कश्चित् ॥ ८५
तस्मादहं गृह्य रथाङ्गमुग्रं प्राणं हरिष्यामि महाव्रतस्य ।
निहत्य भीष्मं सगणं तथाऽऽजौ द्रोणं च शैनेय रथप्रवीरौ ॥ ८६
प्रीतिं करिष्यामि धनञ्जयस्य राज्ञश्च भीमस्य तथाऽश्विनोश्च ।
निहत्य सर्वान् धृतराष्ट्रपुत्रांस्तत्पक्षिणो ये च नरेंद्रमुख्याः ॥ ८७

राज्येन राजानमजातशत्रुं सम्पादयिष्याम्यहमद्य हृष्टः ।
ततः सुनाभं वसुदेवपुत्रः सूर्यप्रभं वज्रसमप्रभावम् ॥ ८८
क्षुरान्तमुद्यम्य भुजेन चक्रं रथादवप्लुत्य विसृज्य वाहान् ।
संकम्पयन् गां चरणैर्महात्मा वेगेन कृष्णः प्रससार भीष्मम् ॥ ८९
—महाभारत, भीष्मपर्व अध्याय ५९

"त्या प्रलयंकर युद्धांत तशाही भयानक अवस्थेंत टिकून राहणाऱ्या सात्यकीची प्रशंसा करीत व कौरव अंगावर तुटून पडत आहेत असें पहात श्रीकृष्ण म्हणाले, 'हे सात्यके, ज्यांना पळून जावयाचें आहे त्यांना खुशाल जाऊं दे. जे अजून रणांगणांत ठाण मांडून आहेत त्यांनाही जावयाचें असलें तरीही जाऊं दे. तू पहाच. मी आज भीष्मांना नि द्रोणांना ठार मारून युद्धांत रथावरून खालीं पाडतों. आज संतापलेल्या माझ्यासमोर कौरवांकडचा कोणीही रथी जिवंत राहूं शकणार नाहीं. मी माझें चक्र उगारून त्याच्या प्रभावानें महाव्रत भीष्माचे प्राण घेतों. अनुयायांसहित भीष्म व द्रोण या महारथ्यांना ठार मारून त्यांच्या मागोमाग सर्व धृतराष्ट्रपुत्र व तत्पक्षीय राजे यांनाही ठार मारून युधिष्ठिराला राज्य देऊन सर्व पांडवांना मी आज आनंदित करीन." असें म्हणून वसुदेवपुत्र श्रीकृष्णांनीं, सूर्याप्रमाणें अत्यंत तेजस्वी, व वज्राप्रमाणें अत्यंत प्रभावी असलेलें आपलें सुदर्शन चक्र हातांत घेतलें व तें उगारून ते भीष्मांच्या अंगावर वेगानें जणू पृथ्वी पायांनीं नमवीतच जाऊं लागले." शेवटीं अर्जुनानें श्रीकृष्णांना मोठ्या कष्टानें क्रोध आवरावयास सांगितलें. सत्यसंध भीष्मांनीं श्रीकृष्णांसारख्या अतुल पराक्रमी व्यक्तीला आपल्या अवंचक युद्धानें एकदांच नव्हें तर दोनदां देहभान विसरून भ्रष्टप्रतिज्ञ व्हावयास लावलें आहे. उदाहरणार्थ नवव्या दिवशींच्या युद्धाचें पुढील वर्णन पहा :—

प्रतपन्तमिवादित्यं मध्यमासाद्य सेनयोः ।
वरान्वरान् विनिघ्नन्तं पाण्डुपुत्रस्य सैनिकान् ॥ ५४
युगान्तमिव कुर्वाणं भीष्मं यौधिष्ठिरे बले ।
नामृष्यत महाबाहुर्माधवः परवीरहा ॥ ५५

उत्सृज्य रजतप्रख्यान् हयान्पार्थस्य मारिष ।
वासुदेवस्ततो योगी प्रचस्कन्द महारथात् ॥ ५६
अभिदुद्राव भीष्मं स भुजप्रहरणो बली ।
प्रतोदपाणिस्तेजस्वी सिंहवद्विनदन्मुहुः ॥ ५७
दारयन्निव पद्भ्यां स जगतीं जगदीश्वरः ।
क्रोधताम्रेक्षणः कृष्णो जिघांसुरमितद्युतिः ॥ ५८
ग्रसन्त इव चेतांसि तावकानां महाहवे ।
दृष्ट्वा माधवमाक्रन्दे भीष्मायोद्यतमन्तिके ॥ ५९
हतो भीष्मो हतो भीष्मस्तत्र तत्र वचो महत् ।
अश्रूयत महाराज वासुदेवभयात्तदा ॥ ६०
पीतकौशेयसंवीतो मणिश्यामो जनार्दनः ।
शुशुभे विद्रवन् भीष्मं विद्युन्माली यथाऽम्बुदः ॥ ६१

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १०६

"माध्यान्हीच्या सूर्याप्रमाणें उभय सैन्यांच्या मध्यभागीं भीष्म तळपत होते. मोठमोठ्या श्रेष्ठ अशा पांडवपक्षीय वीरांना ठार मारून ते जणूं प्रलयकाल ओढवून आणीत होते. भगवान् श्रीकृष्णांना तें सहन झालें नाहीं. पार्थाचे चांदीसारखे शुभ्र घोडे तसेच टाकून योगीश्वर श्रीकृष्णांनीं रथाखालीं उडी घेतली व भीष्माकडे वेगानें धांव घेतली. भुज हेच त्यांचें प्रहरण होते. चाबूक उगारला होता व ते सिंहाप्रमाणें मधून मधून गर्जना करीत होते. जणूं पायांनीं ते भूकंप घडवीत आहेत असें वाटलें. नगदीश्वर श्रीकृष्णांचे नेत्र क्रोधानें तांबडे लाल झाले होते व भीष्मांना ठार मारावें ही एकच वासना त्यांच्या अंतःकरणांत घोळत होती. आतांपर्यंतचा भीष्मांचा पराक्रम पाहून ज्या वेळी श्रीकृष्ण भीष्मांच्या अंगावर धावून जाऊं लागले तेव्हां त्यांच्या सामर्थ्यानें घाबरलेले कौरवपक्षीय वीर मेले, भीष्म ठार मेले असें ओरडू लागले. मेघावर वीज चमकावी त्या प्रमाणें, इंद्रनीळ मण्याप्रमाणें श्यामवर्ण श्रीकृष्णांच्या अंगावरील पिवळें वस्त्र सावळ्या मेघावरील विजेप्रमाणें चमकत होतें व तें अपूर्व होतें." आपल्यावांचून भीष्मांना कोणीही मारूं शकणार नाहीं, याविषयी श्रीकृष्णांची इतकी खात्री होऊन गेलेली होती कीं नवव्या

दिवशींच्या रात्रीं पांडवांच्या शिबिरांत जेव्हां योद्धचांची समिति भरली त्यावेळीं श्रीकृष्ण म्हणाले :—

मां वा नियुक्ष्व सौहार्दाद्योत्स्ये भीष्मेण पांडव ।
त्वत्प्रयुक्तो महाराज किं न कुर्यां महाहवे ॥ २८
हनिष्यामि रणे भीष्ममाहूय पुरुषर्षभम् ।
पश्यतां धार्तराष्ट्राणां यदि नेच्छति फाल्गुनः ॥ २९
यदि भीष्मे हते वीरे जयं पश्यसि पाण्डव ।
हन्ताऽस्म्येकरथेनाद्य कुरुवृद्धं पितामहम् ॥ ३०
पश्य मे विक्रमं राजन् महेन्द्रस्येव संयुगे ।
विमुञ्चन्तं महास्त्राणि पातयिष्यामि तं रथात् ॥ ३१

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १०७

"हे महाराज, आपण मला सेनापति कां नेमीत नाहीं? मी भीष्मांशीं युद्ध करतों. आपण सांगितल्यावर मी काय करणार नाहीं? अर्जुनाची इच्छा नसल्यावर सर्व कौरव पहात असतांना मी आव्हानपुरस्सर पुरुषश्रेष्ठ भीष्माला युद्धांत ठार मारतों. भीष्माच्या मृत्यूंत आपणांस विजय वाटत असल्यास मी भीष्मांना ठार मारीन. महेंद्राप्रमाणें माझा दिव्य पराक्रम आपण पहाच. महास्त्रांचा वारंवार प्रयोग करीत असलेल्या भीष्मांना मी ठार मारतों." श्रीकृष्णालाच भ्रष्टप्रतिज्ञ होऊन वारंवार हातांत शस्त्र घ्यावयाची स्फूर्ति उत्पन्न करणारी पराक्रमाची ही ज्योत केवढी दीप्तिमान् आहे! केवढी अतुलनीय आहे! युधिष्ठिरानें स्वतःसाठीं श्रीकृष्णांना भ्रष्टप्रतिज्ञ करण्याचें नाकारलें व शेवटी दुसरा उपाय नाही म्हणून भीष्मांनीं युद्धारंभीं सांगितल्याप्रमाणें श्रीकृष्णांसह पांडव त्यांनाच त्यांच्या मृत्यूचा उपाय विचारण्यासाठीं त्यांच्या शिबिरांत गेले.

मृत्युंजय महामनस्कता

भीष्मांनी त्यांचें प्रेमपूर्वक स्वागत केले. त्यांच्या त्या औदर्यानें ओशाळून गेलेल्या युधिष्ठिरानें त्यांना जिकण्याच्या बाबतींतील आपली असमर्थता त्यांच्या चरणीं निवेदन केली व त्यांना जिक-

ण्याचा उपाय विनम्रपणें विचारला. धर्मपक्षाचा विजय होण्यासाठींच जें शौर्य खर्ची पडावयाचें तें शौर्य प्रतिज्ञेनें बद्ध झाल्यामुळें दुष्टांच्या राज्ययंत्रांत स्थैर्य उत्पन्न करण्यासांठीं खर्ची पडत आहे याचा त्यांना अत्यंत विषाद वाटत होता. पण प्रतिज्ञा व त्यांच्या देहाचें जीवन इतकें एकरूप होऊन गेलें होतें कीं, अखेरीस त्या देहसमिधेच्या हवनावांचून प्रतिज्ञेचा अग्नि शांत करण्याचें दुसरें कोणतेंही साधन त्या सत्यसंध महापुरुषाजवळ उरलेलें नव्हतें. शवटीं निग्रहानें ती देहसमिधच हव्य म्हणून त्या अग्नींत टाकावयाचें त्यांनीं निश्चित केलें व युधिष्ठिराला उद्देशून ते म्हणाले :—

सत्यमेतन्महाबाहो यथा वदसि पाण्डव ॥ ७५
नाहं जेतुं रणे शक्यः सेन्द्रैरपि सुरासुरैः ।
आत्तशस्त्रो रणे यत्तो गृहीतवरकार्मुकः ॥ ७६
ततो मां न्यस्तशस्त्रं तु एते हन्युर्महारथाः ।
निक्षिप्तशस्त्रे पतिते विमुक्तकवचध्वजे ॥ ७७
द्रवमाणे च भीते च तवास्मीति च वादिनि ।
स्त्रियां स्त्रीनामधेये च विकले चैव पुत्रिणि ॥ ७८
अप्रशस्ते नरे चैव न युधं रोचते मम ।
इमं मे शृणु राजेन्द्र संकल्पं पूर्वचिन्तितम् ॥७९
अमङ्गल्यध्वजं दृष्ट्वा न युध्येयं कदाचन ।
य एष द्रौपदो राजंस्तव सैन्ये महारथः ॥ ८०
शिखण्डी समरामर्षी शूरश्च समितिञ्जयः ।
यथाऽभवच्च स्त्रीपूर्वं पश्चात्पुंस्त्वं समागतः ॥ ८१
जानन्ति च भवन्तोऽपि सर्वमेतद्यथातथम् ।
अर्जुनः समरे शूरः पुरस्कृत्य शिखण्डिनम् ॥ ८२
मामेव विशिखैस्तीक्ष्णैरभिद्रवतु दंशितः ।
अमङ्गल्यध्वजे तस्मिन् स्त्रीपूर्वे च विशेषतः ॥ ८३
न प्रहर्तुमभीप्सामि गृहीतेषुः कथञ्चन ।
तदन्तरं समासाद्य पाण्डवो मां धनञ्जयः ॥ ८४
शरैर्घातयतु क्षिप्रं समंताद् भरतर्षभ ।
न तं पश्यामि लोकेषु मां हन्याद्यः समुद्यतम् ॥ ८५

ऋते कृष्णान्महाभागात्पाण्डवाद्वा धनञ्जयात् ।
एष तस्मात् पुरोधाय कञ्चिदन्यं ममाग्रतः ॥ ८६
आत्तशस्त्रो रणे यत्तो गृहीतवरकार्मुकः ।
मां पातयतु बीभत्सुरेवं तव जयो ध्रुवम् ॥ ८७
एतत्कुरुष्व कौन्तेय यथोक्तं मम सुव्रत ।
संग्रामे धार्तराष्ट्रांश्च हन्याः सर्वान्समागतान् ॥ ८८

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १०७

"हे पांडवा, तू जें म्हणतोस तें अगदीं खरें आहे. हातांत शस्त्र व धनुष्य घेऊन मी युद्धांत उभा असतां देव व दैत्य यांच्या गणांनीं परिवेष्टित असलेल्या देवेन्द्राची देखील मला जिंकण्याची छाती नाही. केवळ मी शस्त्रसंन्यास केला तरच हे महारथ मला मारूं शकतील. शस्त्र टाकून दिलेला, पडलेला, कवच व ध्वज भग्न झालेला, पळून जाणारा, भ्यालेला, मी आपल्याला शरण असून आपल्या स्वाधीन आहे असें म्हणणारा, स्त्रीचें नांव घेतलेला, विकल, एकपुत्र व अप्रशस्त मनुष्य यांच्याशी युद्ध करणें मला आवडत नाही. तसेंच अमंगल ध्वज धारण करणारा अथवा अमंगलाला पुढें करून युद्ध करणारा मनुष्य समोर पाहिल्यावर मी कधीही लढणार नाहीं. तुमच्या सैन्यांत असलेला द्रुपदाचा पुत्र शिखंडी हा अशा प्रकारचा अमंगलध्वज आहे. तो स्त्रीपूर्व असल्यामुळें तो शूर, रणांगणांत ईर्ष्येनें लढणारा असा असला तरी मी त्याच्याशीं युद्ध करणार नाहीं. अर्जुन शूर आहे. त्यानें शिखंडीला पुढें करून माझ्याशी युद्ध करावें. शिखंडी पुढें असतांना मी मुळीच प्रहार करणार नाहीं. अशा स्थितीत निःशंक मनानें अर्जुनानें माझ्यावर तीक्ष्णांतल्या तीक्ष्ण बाणांचा प्रहार करावा. अशा रीतीनें जर तुम्ही मला ठार माराल तर रणांगणांत धृतराष्ट्रपुत्रांना तुम्ही मारूं शकाल." क्षात्रधर्माच्या त्या धीरोदात्त अवताराचें हें वाक्य ऐकतांच अर्जुनही मनांतून खिन्न झाला. न्यस्तशस्त्र स्थितींत आपल्या या पूजास्थानावर प्रहार करण्याची कल्पना त्याच्या मनाला थरकांपवूं लागली. पण भगवान श्रीकृष्णांच्या व स्वतः पितामहांच्याच आग्रहावरून अर्जुनानें ती गोष्ट अखेरीस मान्य केली. दुसऱ्या

दिवशीं जेव्हां युद्धाला सुरुवात झाली तेव्हां खांडववनाचा दाह करणाऱ्या महास्त्रवेत्त्या अर्जुनासारख्या महारथ्यालाही शेवटी शिखंडीलाच पुढें करून भीष्मांच्या समोर जातां आलें. भीष्मांनीं शिखंडीला पुढें आलेला पाहतांच लज्जेनें मान फिरविली व शस्त्र-संन्यास केला. अर्जुन शिखंडीच्या आडून आपल्या बाणांनीं त्यांच्या-वर कठोर प्रहार करूं लागला. शिखंडीच्या बाणवर्षावानें त्यांना कसल्याही वेदना होत नव्हत्या. पण अर्जुनाच्या मर्मघातक प्रहा-रांनीं मात्र त्यांना वेदना होत. तें पाहून जवळच उभ्या असलेल्या दुःशासनानें शिखंडीच्या बाणांनीं आजोबांना वेदना होत आहेत असें समजूं नये म्हणून एकीकडे आघात सहन करीत भीष्म त्याला सांगूं लागले :—

एवं तयोः संवदतोः फाल्गुनो निशितैः शरैः ॥ ५८
शिखंडिनं पुरस्कृत्य भीष्मं विव्याध संयुगे ।
ततो दुःशासनं भूयः स्मयमान इवाब्रवीत् ॥ ५९
अतिविद्धः शितैर्बाणैर्भृशं गाण्डीवधन्वना ।
वज्राशनिसमस्पर्शा अर्जुनेन शरा युधि ॥ ६०
मुक्ताः सर्वेऽव्यवच्छिन्ना नेमे बाणाः शिखण्डिनः ।
निकृन्तमाना मर्माणि दृढावरणभेदिनः ॥ ६१
मुसला इव मे घ्नंति नेमे बाणाः शिखण्डिनः ।
वज्रदण्डसमस्पर्शा वज्रवेगदुरासदाः ॥ ६२
मम प्राणानारुजन्ति नेमे बाणाः शिखण्डिन. ।
नाशयन्तीव मे प्राणान् यमदूता इवाहिताः ॥ ६३
गदापरिघसंस्पर्शा नेमे बाणाः शिखण्डिनः ।
भुजगा इव संक्रुद्धा लेलिहाना विषोल्बणाः ॥ ६४
समाविशन्ति मर्माणि नेमे बाणाः शिखण्डिनः ।
अर्जुनस्य इमे बाणा नेमे बाणाः शिखण्डिनः ॥ ६५
कृन्तन्ति मम गात्राणि माघमां सेगवा इव ।
सर्वे हृष्यपि न मे दुःखं कुर्युरन्ये नराधिपाः ॥ ६६
वीरं गाण्डीवधन्वानमृते जिष्णुं कपिध्वजम् । ६७

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय ११९

अर्जुनाच्या तीक्ष्ण बाणांनीं शरीरावर आघात होत असतां भीष्म दुःशासनाला म्हणाले: वज्राप्रमाणें कठोर स्पर्श असलेले, एकामागून एक सतत अंगावर येणारे हे बाण शिखंडीचे नसून अर्जुनाचे आहेत. दृढ अशा कवचाचेही तुकडे करणारे, मर्मांचें निकृन्तन-करणारे व मुसलाप्रमाणें जोराचा आघात करणारे, हे बाण वज्राच्या वेगाप्रमाणें भयानक आहेत. ते माझ्या प्राणांना व्याकूळ करतात. जणूं ते यमदूतच आहेत. गदा व परिघ यांच्याप्रमाणे त्यांचा स्पर्श भयानक आहे. जणू क्रुद्ध झालेले ते भयंकर विषारी सापच होत. गाण्डीवधारी अर्जुनावांचून मला इतकें दुःख दुसरें कोण देऊं शकेल? याप्रमाणें बोलत असतांच बाणांच्या आघातांनीं शरीराची चाळणी झालेले भीष्म रथांतून खालीं कोसळले. ते जमिनीवर पडले खरे, पण त्यांच्या अंगांत बाण इतके रुतून बसले होते की जमिनीचा त्यांच्या शरीराला स्पर्शही झाला नाहीं. ते खालीं पडतांच अर्जुनाच्या बाणांच्या अग्रावरच त्यांचें शरीर वरच्या वर तोलून धरलें गेलें. कांहीं वेळ महानुभाव भीष्मांना मूर्च्छा आली. पण थोड्याच वेळांत स्वतःला सावरून त्या अलौकिक पुरुषानें आपले नेत्र उघडले. त्यांनीं आकाशाकडे दृष्टि वळविली तोंच त्यांना दक्षिणायन आहे हें समजून आलें. त्याबरोबर त्यांनीं आपल्या इच्छामरणी सामर्थ्याचा उपयोग करून उत्तरायण येईपर्यंत शरशय्येवर तसेंच पडून रहावें, कीं स्वतःची जीवन ज्योत शाश्वत प्रकाशांत ताबडतोब विलीन करावी याचा विचार चालविला. धर्मशास्त्राप्रमाणें ज्याला शक्य आहे त्यानें उत्तरायणांत देह ठेवणें चांगलें. पण भीष्मांच्या समोर वेगळाच प्रश्न होता. बाणाघाताच्या वेदना त्यांना होत होत्या. त्या सहन करीत त्यांना उत्तरायण येईपर्यंत थांबणें क्रमप्राप्त होतें. तसें करावें की नाहीं म्हणजे वेदनामय मृत्यु स्वीकारावा कीं त्वरित दिव्य गतीला निघून जावें हा प्रश्न त्यांच्या समोर होता व तो केवळ त्यांच्या इच्छेनेंच सुटणारा होता. पण त्यांनीं तो प्रश्न कसा सोडवावा यासंबंधीं कांहीं दिव्य संदेश त्यांना ऐकू आले. महाभारतांत म्हटलें आहे कीं :–

पतन् स ददृशे चापि दक्षिणेन दिवाकरम् ॥ ९३
संज्ञां चोपालभद्वीरः कालं सञ्चिन्त्य भारत ।
अन्तरिक्षे च शुश्राव दिव्या वाचः समन्ततः ॥ ९४
कथं महात्मा गाङ्गेयः सर्वशस्त्रभृतां वरः ।
कालकर्ता नरव्याघ्रः संप्राप्ते दक्षिणायने ॥ ९५
स्थितोऽस्मीति च गाङ्गेयस्तच्छ्रुत्वा वाक्यमब्रवीत् ।
धारयामास च प्राणान् पतितोऽपि महीतले ॥ ९६
उत्तरायणमन्विच्छन् भीष्मः कुरुपितामहः ॥ ९७
महोपनिषदं चैव योगमास्थाय वीर्यवान् ॥ १२१
जपन् शान्तनवो धीमान् कालाकाङ्क्षी स्थितोऽभवत् ॥ १२२
—महाभारत, भीष्मपर्व अध्याय ११९

दक्षिणायन आहे असें पाहून भीष्म काळाचा जों विचार करूं लागले तोंच अंतरिक्षांतून त्यांना दिव्य वाणीनें असें ऐकू आलें कीं, काळ स्वाधीन असलेले भीष्म सर्व शस्त्रधाऱ्यांत श्रेष्ठ असे महानुभाव आहेत. हे नरव्याघ्र दक्षिणायनांत देह कसा ठेवीत आहेत? हें ऐकतांच भीष्मांनी त्यांना उत्तर दिलें कीं, दक्षिणायन संपेपर्यंत मी असाच राहणार आहे. उत्तरायणाची वाट पहात भीष्म तेथें तसेंच आपले प्राण धारण करून राहिले. योगसामर्थ्यानें श्रेष्ठ उपनिषदांचा पाठ करीत भीष्म काळाची वाट पहात होते. भीष्मांच्या निधनाची दुःखद वार्ता ऐकतांच द्रोणाचार्यांना जागच्या जागीच मूर्च्छा आली. कृपाचार्यादि महारथ्यांनीं भीष्मांचा देहपात म्हणजेंच स्वतःचा व दुर्योधनाच्या यशाकांक्षेचाही अंतकाळ समजून धीर सोडला. शरदंष्ट्रांनीं युक्त धनुष्य हेच ज्याचें मुख आहे, खड्ग हीच ज्याची जिव्हा, असा सर्वस्वी दुरासद असलेला तो नरसिंह कोणाचें आशास्थान नव्हता? भीष्म संपतांच कौरव व पांडव या दोन्ही पक्षांचे महारथी गहिवरले. सर्वांनीं आपआपलीं शस्त्रें सांवरलीं व त्या महापुरुषाच्या शरशय्येभोंवती गोळा होण्यासाठी सर्वजण खिन्न मनानें जाऊं लागले.

दिव्य शरशयन

आपआपलीं कवचें काढून घेऊन व नतमस्तक होऊन भीष्मांच्या पायाशीं उभयपक्षीय वीर उभे राहिले. त्यांच्या त्या समूहांत महा-

नुभाव भीष्मांनीं जे अनेक दिव्य भाव प्रकट केले त्यांचें महाभारतांत अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन आहे. हे वर्णन म्हणजे भीष्मांची महानुभावता व विनीत अर्जुनाचें सर्वश्रेष्ठ सामर्थ्य या दोहोंचें अत्यंत हृदयस्पर्शी असें एकीकरणच होय. महाभारतकार म्हणतात :—

निवृत्तेषु च सैन्येषु पारंपर्येण सर्वशः ।
निर्मुक्तकवचाः सर्वे भीष्ममीयुर्नराधिपाः ॥ २९
व्युपरम्य ततो युद्धाद्योधाः शतसहस्रशः ।
उपतस्थुर्महात्मानं प्रजापतिमिवामराः ॥ ३०
ते तु भीष्मं समासाद्य शयानं भरतर्षभम् ।
अभिवाद्यावतिष्ठन्त पाण्डवाः कुरुभिः सह ॥ ३१
अथ पाण्डून् कुरूंश्चैव प्रणिपत्याग्रतः स्थितान् ।
अभ्यभाषत धर्मात्मा भीष्मः शान्तनवस्तदा ॥ ३२
स्वागतं वो महाभागाः स्वागतं वो महारथाः ।
तुष्यामि दर्शनाच्चाहं युष्माकममरोपमाः ॥ ३३
अभिमन्त्र्याथ तानेवं शिरसा लम्बताऽब्रवीत् ।
शिरो मे लम्बतेऽत्यर्थमुपधानं प्रदीयताम् ॥ ३४
ततो नृपाः समाजह्रुस्तनूनि च मृदूनि च ।
उपधानानि मुख्यानि नैच्छत्तानि पितामहः ॥ ३५
अथाब्रवीन्नरव्याघ्रः प्रहसन्निव तान्नृपान् ।
नैतानि वीरशय्यासु युक्तरूपाणि पार्थिवाः ॥ ३६
ततो वीक्ष्य नरश्रेष्ठमभ्यभाषत पाण्डवम् ।
धनञ्जयं दीर्घबाहुं सर्वलोकमहारथम् ॥ ३७
धनञ्जय महाबाहो शिरो मे तात लम्बते ।
दीयतामुपधानं वै यद्युक्तमिह मन्यसे ॥ ३८

संजय उवाच ।

समारोप्य महच्चापमभिवाद्य पितामहम् ।
नेत्राभ्यामश्रुपूर्णाभ्यामिदं वचनमब्रवीत् ॥ ३९
आज्ञापय कुरुश्रेष्ठ सर्वशस्त्रभृतां वर ।
प्रेष्योऽहं तव दुर्धर्ष-क्रियतां किं पितामह ॥ ४०
तमब्रवीच्छान्तनवः शिरो मे तात लम्बते ।
उपधानं कुरुश्रेष्ठ फाल्गुनोपपद्यस्व मे ॥ ४१

शयनस्यानुरूपं वै शीघ्रं वीर प्रयच्छ मे ।
त्वं हि पार्थ समर्थो वै श्रेष्ठः सर्वधनुष्मताम् ॥ ४२
क्षत्रधर्मस्य वेत्ता च बुद्धिसत्त्वगुणान्वितः ।
फाल्गुनोऽपि तथेत्युक्त्वा व्यवसायमरोचयत् ॥ ४३
गृहानुमन्त्र्य गाण्डीवं शरान् सन्नतपर्वणः ।
अनुमान्य महात्मानं भरतानां महारथम् ॥ ४४
त्रिभिस्तीक्ष्णैर्महावेगैरन्वगृह्णाच्छिरः शरैः ।
अभिप्राये तु विदिते धर्मात्मा सव्यसाचिना ॥ ४५
अतुष्यद्भरतश्रेष्ठो भीष्मो धर्मार्थतत्त्ववित् ।
उपधानेन दत्तेन प्रत्यनन्दद्धनञ्जयम् ॥ ४६
प्राह सर्वान् समुद्वीक्ष्य भरतान् भारतं प्रति ।
कुन्तीपुत्रं युधां श्रेष्ठं सुहृदां प्रीतिवर्धनम् ॥ ४७
शयनस्यानुरूपं मे पाण्डवोपहितं त्वया ।
यद्यन्यथा प्रपद्येथाः शपेयं त्वामहं रुषा ॥ ४८
एवमेव महाबाहो धर्मेषु परितिष्ठता ।
स्वप्तव्यं क्षत्रियेणाजौ शरतल्पगतेन वै ॥ ४९
एवमुक्त्वा तु बीभत्सुं सर्वांस्तानब्रवीद्वचः ।
राज्ञश्च राजपुत्रांश्च पाण्डवानभिसंस्थितान् ॥ ५०
पश्यध्वमुपधानं मे पाण्डवेनाभिसंधितम् ।
शिश्येऽहमस्यां शय्यायां यावदावर्तनं रवेः ॥ ५१
उपातिष्ठन्नथो वैद्याः शल्योद्धरणकोविदाः ॥ ५५
सर्वोपकरणैर्युक्ताः कुशलैः साधुशिक्षिताः ।
तान् दृष्ट्वा जाह्नवीपुत्रः प्रोवाच तनयं तव ॥ ५६
धनं दत्त्वा विसृज्यन्तां पूजयित्वा चिकित्सकाः ।
एवं गते मयेदानीं वैद्यैः कार्यमिहास्ति किम् ॥ ५७
क्षत्रधर्मे प्रशस्तां हि प्राप्तोऽस्मि परमां गतिम् ।
नैष धर्मो महीपालाः शरतल्पगतस्य मे ॥ ५८
एभिरेव शरैश्चाहं दग्धव्योऽस्मि नराधिपाः ।
तच्छ्रुत्वा वचनं तस्य पुत्रो दुर्योधनस्तव ॥ ५९
वैद्यान् विसर्जयामास पूजयित्वा यथाहतः ।
ततस्ते विस्मयं जग्मुर्नानाजनपदेश्वराः ॥ ६०

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १२०

देवांनीं प्रजापतीसमोर उभें रहावें, त्याप्रमाणें सर्व मंडळी भीष्मांसमोर उभी राहिली असतां, त्यांच्या वंदना घेऊन भीष्म त्यांना म्हणाले, हे महाभागांनो तुमचें स्वागत असो. तुम्ही देव-तुल्य पराक्रमी आहांत. तुमच्या दर्शनानें मला अत्यंत आनंद झाला. याप्रमाणें त्यांना बोलून पुनश्च भीष्म त्यांना म्हणाले, मला शय्या मिळाली आहे. पण माझें मस्तक खालीं लोंबतें आहे. कोणी मला उपधान (उशी) देईल काय? हें ऐकतांच सर्व राजांनी उत्कृष्ट प्रकारच्या उशा त्यांना आणून दिल्या. त्यांचें तें कृत्य पाहून हसून नरव्याघ्र भीष्म त्यांना म्हणाले, हे राजांनो, या वीरशय्येवर हें उपधान योग्य आहे असें तुम्हांस वाटतें काय? माझ्या या वेळच्या अवस्थेला हें उपधान सर्वस्वीं अयोग्य आहे. नंतर दीर्घ-बाहू व सर्व लोकांत श्रेष्ठ महारथी म्हणून विख्यात असलेल्या अर्जु-नाला उद्देशून ते म्हणाले, हे महाबाहो धनंजया, माझें मस्तक खालीं लोंबतें आहे. तुला या शय्येला योग्य असें जें उपधान वाटेल तें मला दे. हें ऐकतांच आपले भयंकर धनुष्य सज्ज करून व पिता-महांना वंदन करून अश्रूनीं भरून आलेल्या डोळ्यांनीं त्यांच्याकडे पहात अर्जुन त्यांना म्हणाला, 'हे पितामहा, मी आपला दास आहे. काय आज्ञा आहे? भीष्मांनीं पुनः त्याला सांगितलें कीं, माझें मस्तक खालीं लोंबतें आहे, मला उपधानाची आवश्यकता आहे. तूं सर्व धनुर्धारी लोकांत श्रेष्ठ आहेस. बुद्धि व सामर्थ्य याचा तू निधीच आहेस. क्षात्रधर्म तुला समजतो. या शय्येला योग्य असें उपधान तूं मला दे.' हें ऐकतांच अर्जुनानें तीन तीक्ष्ण बाणांनीं त्यांचें मस्तक सांवरून धरले. अर्जुनानें आपला अभिप्राय ओळखला हें पाहून भीष्म अत्यंत प्रसन्न झाले व सर्वांचें लक्ष वेधून अर्जुनाला उद्देशून म्हणाले, 'माझ्या शय्येला अनुरूप असें हें उपधान देऊन तूं मला प्रसन्न करून घेतलें आहेस. हे पांडवा, तूं दुसरें कांहीं केलें असतेंस तर मी क्रोधानें तुला शाप दिला असता. शरशय्येवर शयन करणाऱ्या धर्मवेत्या क्षत्रियानें असेंच व्रत अंगीकारून राहिलें पाहिजे. नंतर सर्व राजांना उद्देशून ते म्हणाले, पहा, या पांडवानें माझी इच्छा कशी पूर्ण केली.

उत्तरायण येईपर्यंत मी असाच या शय्येवर पडून राहीन. थोडयाच वेळानें दुर्योधनानें पाठविलेले, जखम बरी करण्याच्या कामांत अत्यंत कुशल, चिकित्साशास्त्र उत्तम रीतीनें अवगत करून घेतलेले असे सर्वसाधनयुक्त वैद्य त्या ठिकाणीं आले. त्यांना पाहून भीष्म म्हणाले, 'धन देऊन या चिकित्सकांना परत पाठवून द्या. माझ्या या अशा अवस्थेंत वैद्यांचें काय काम आहे? क्षत्रियांना अत्यंत योग्य अशा सर्वश्रेष्ठ गतीला मी जात आहें. शरशय्येवरील योद्धयाला हें कर्तव्य नाहीं. मी संपल्यावर या बाणांसहितच मला दग्ध करा.' हें ऐकतांच दुर्योधनानें त्या सर्वांना धन देऊन परत पाठवून दिलें. त्यांचे ते धीरोदात्त उद्‌गार ऐकतांच सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुनश्च मंडळी भीष्मांच्या शय्येभोंवतीं गोळा झाली. त्यांनीं आपल्या अद्वितीय वीरभावाचा पुनश्च नवा आविष्कार त्यांना दाखविला. महाभारतकार म्हणतात :—

भीष्मस्तु वेदनां धैर्यान्निगृह्य भरतर्षभ ।
अभितप्तः शरैश्चैव नि.श्वसन्नुरगो यथा ॥ १०
शराभितप्तकायोऽपि शस्त्रसंपातमूर्छितः ।
पानीयमिति संप्रेक्ष्य राज्ञस्तान् प्रत्यभाषत ॥ ११
ततस्ते क्षत्रिया राजन्नुपाजह्रुः समन्ततः ।
भक्ष्यानुच्चावचान्राजन्वारिकुम्भांश्च शीतलान् ॥ १२
उपानीतं तु पानीयं दृष्ट्वा शान्तनवोऽब्रवीत् ।
नाद्यातीता मया शक्या भोगाः केचन मानुषाः ॥ १३
अपक्रान्तो मनुष्येभ्यः शरशय्यां गतो हृहम् ।
प्रतीक्षमाणस्तिष्ठामि निवृत्तिं शशिसूर्ययोः ॥ १४
एवमुक्त्वा शान्तनवो निन्दन् वाक्येन पार्थिवान् ।
अर्जुनं द्रष्टुमिच्छामीत्यभ्यभाषत भारत ॥ १५
अथोपेत्य महाबाहुरभिवाद्य पितामहम् ।
अतिष्ठत्प्राञ्जलिः प्रह्वः किं करोमीति चाब्रवीत् ॥ १६
तं दृष्ट्वा पाण्डवं राजन्नभिवाद्याग्रतः स्थितम् ।
अभ्यभाषत धर्मात्मा भीष्मः प्रीतो धनञ्जयम् ॥ १७

दहतीव शरीरं मे संवृतस्य तवेषुभिः ।
मर्माणि परिवृयन्ते मुखं च परिशुष्यति ॥ १८
वेदनार्तशरीरस्य प्रयच्छापो ममार्जुन ।
त्वं हि शक्तो महेष्वासः दातुमापो यथाविधि ॥ १९
अर्जुनस्तु तथेत्युक्त्वा रथमारुह्य वीर्यवान् ।
अधिज्यं बलवत्कृत्वा गाण्डीवं व्याक्षिपद्धनुः ॥ २०
तस्य ज्यातलनिर्घोषं विस्फूर्जितमिवाशनेः ।
वित्रेसुः सर्वभूतानि सर्वे श्रुत्वा च पार्थिवाः ॥ २१
ततः प्रदक्षिणं कृत्वा रथेन रथिनां वरः ।
शयानं भरतश्रेष्ठ सर्वशस्त्रभृतां वरम् ॥ २२
सन्धाय च शरं दीप्तमभिमन्त्र्य स पाण्डवः ।
पर्जन्यास्त्रेण संयोज्य सर्वलोकस्य पश्यतः ॥ २३
अविध्यत्पृथिवीं पार्थः पार्श्वे भीष्मस्य दक्षिणे ।
उत्पपात ततो धारा वारिणो विमला शुभा ॥ २४
शीतस्यामृतकल्पस्य दिव्यगन्धरसस्य च ।
अतर्पयत् ततः पार्थः शीतया जलधारया ॥ २५
भीष्मं कुरूणामृषभं दिव्यकर्मपराक्रमम् ।
कर्मणा तेन पार्थस्य शक्रस्येव विकुर्वतः ॥ २६
विस्मयं परमं जग्मुस्ततस्ते वसुधाधिपाः ।
तत् कर्म प्रेक्ष्य बीभत्सोरतिमानुषविक्रमम् ॥ २७
संप्रावेपन्त कुरवो गावः शीतार्दिता इव ।
विस्मयाच्चोत्तरीयाणि व्याविध्यन् सर्वतो नृपाः ॥ २८
शङ्खदुन्दुभिनिर्घोषस्तुमुलः सर्वतोऽभवत् ।
तृप्तः शान्तनवश्चापि राजन् बीभत्सुमब्रवीत् ॥ २९
सर्वपार्थिववीराणां सन्निधौ पूजयन्निव ।
नैतच्चित्रं महाबाहो त्वयि कौरवनन्दन ॥ ३०
कथितो नारदेनासि पूर्वर्षिरमितद्युते ।
वासुदेवसहायस्त्वं महत् कर्म करिष्यसि ॥ ३१

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १२१

"अंगांत रुतून राहिलेल्या बाणांच्या तीव्र वेदनांनीं भीष्मांना अतिशय त्रास होत होता. श्वास टाकीत असलेल्या सर्पाप्रमाणें ते दिसत होते. त्यांनी धैर्यानें सर्व वेदनांचें दुःख गिळून टाकले व त्या राजांना पाहून "पाणी पाहिजे" असें ते म्हणाले. तें ऐकतांच योद्धयांनी धांवत जाऊन नानाप्रकारचे खाद्यपदार्थ व थंड पाण्यानें भरलेले कुंभ त्यांच्यासाठीं आणले. ते पदार्थ व पाणी पाहून भीष्म म्हणाले, "मी मानुष भोग स्वीकारण्याच्या अवस्थेंत नाही. या शर-शय्येवर आल्यापासून मी मनुष्य लोकांतून केव्हांच पार गेलो आहें. केवळ उत्तरायणाची मी बाट पहात आहें. याप्रमाणें बोलून त्यांनीं सर्व राजांचा उपहास केला व "मी अर्जुनाला पाहूं इच्छितों" असें ते म्हणाले. हें ऐकतांच अर्जुनानें पुढें येऊन त्यांना वंदन केलें व नम्रपणें हात जोडून "काय आज्ञा आहे" म्हणून विचारलें. त्याची नम्रता पाहून प्रसन्न अंतःकरणानें भीष्म त्याला म्हणाले, "तुझे बाण सर्व बाजूंनीं माझ्या शरीरांत खोलवर रुतून बसलेले असल्यामुळें माझ्या शरीराचा अत्यंत दाह होत आहे. सारीं मर्मस्थानें ठणकत आहेत व तोंडाला कोरड पडली आहे. हे अर्जुना, वेदनेनें आर्त झालेल्या मला पाणी दे. हे महेष्वासा, मला विधिपूर्वक पाणी देण्याचें सामर्थ्य तुझ्याच ठिकाणी आहे." 'तथास्तु' असें म्हणून अर्जुनानें रथावर आरोहण केलें व आपलें गांडीव प्रत्यंचा चढवून सिद्ध करून त्याचा टणत्कार केला. वज्राघाताप्रमाणें भयानक असा त्याचा आवाज ऐकून सर्व प्राणिमात्र व जमलेले राजे कंपित झाले. नंतर शरशय्येवर पडलेल्या त्या वीरवराला त्यानें प्रदक्षिणा घातली व सर्व लोक त्याच्याकडे पहात असतांनाच त्यानें एक तेजस्वी बाण काढून त्यावर पर्जन्यास्त्रानें अभिमंत्रण केलें व भीष्मांच्या उजव्या बाजूच्या भूमीवर बाण सोडला, तोंच जमिनीतून दिव्यगंधानें युक्त व अमृताप्रमाणें मधुर अशी जलधारा बाहेर पडली. त्या जलधारेनें पार्थानें भीष्मांना तृप्त केलें. अर्जुनाचें तें अतिमानवी कृत्य पाहून सर्व राजे विस्मयचकित झाले. ते आश्चर्यातिरेकाने आपली उत्त-रीयें वर उडवू लागले व गारठलेल्या गाई जशा थरथरा कांपतात त्याप्रमाणें सर्व कौरव कंपित झाले. जिकडे तिकडे शंख व दुंदुभीचा

एकच नाद भरून गेला. तृप्त झालेले भीष्म सर्वांसमक्ष अर्जुनाला म्हणाले, " हे महाबाहो, तू हें कर्म केलेस याचें मला आश्चर्य वाटत नाहीं. नारदानें तू नरऋषि असल्याचें मला पूर्वीच सांगितलें आहे. ह्या वासुदेवाच्या साहाय्यानें तूं महत्कार्ये करशील."

नुसतें काव्यदृष्ट्या जरी पाहिलें तरी अद्‌भुताच्या अंगांगीभावानें विशुद्ध वीररसाला महर्षींनीं येथें केवढा भरघोस फुलोरा आणला आहे! हें प्रकरण म्हणजे भीष्माच्या उदात्त भव्यतेवर महर्षींनीं चढविलेला देदीप्यमान राजमुकुटच होय.

अंतकाळची कठोर कर्तव्यनिष्ठा

वस्तुतः शरशय्येवरील भीष्म हे मानुषभावाच्या इतके सीमापार गेले होते कीं उपधान व पाणी या मानवी व्यवहारांतल्या सामान्य गोष्टींचा देखील त्यांनीं स्वतःला स्पर्श होऊं दिला नाहीं. तरी पण अंतिमश्वासापर्यंत त्यांनीं आपली कठोर कर्तव्यनिष्ठा ढळूं दिली नाहीं. त्यांच्या जीवनाच्या या सायंकाळीं देखील त्यांनीं आपली निष्काम कर्मयोग्याची महान् भूमिका पार पाडल्याचीं तीन तरी ज्वलंत उदाहरणें आहेत. कौरवकुळांतील सर्वश्रेष्ठ वृद्ध व्यक्ति म्हणून कुळाचें संरक्षण करण्याचा व हस्तिनापूरच्या राजसभेचे मंत्री म्हणून राजसत्तेचें संरक्षण करण्याचा प्रयत्न त्यांनी या अंतिम क्षणीं देखील केला. अर्जुनाच्या दिव्य कृत्यांचें स्मरण राजा दुर्योधनाला देत ते म्हणाले:-

दृष्टं दुर्योधनैतत् ते यथा पार्थेन धीमता ।
जलस्य धारा जनिता शीतस्यामृतगन्धिनः ।। ३९
यावत् कृष्णो महाबाहुः स्वाधीनः कुरुसत्तम ।
तावत्पार्थेन शूरेण सन्धिस्ते तात युज्यताम् ।। ४५
ममावसानाच्छान्तिरस्तु प्रजानां संगच्छन्तां पार्थिवाः प्रीतिमन्तः ।।
पितापुत्रं मातुलं भागिनेयो भ्राता चैव भ्रातरं प्रैतु राजन् ।। ५४
—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १२१

" दुर्योधना ! पार्थानें शीतल, सुगंधी व अमृतासारखी मधुर जलधारा कशी निर्माण केली हा चमत्कार तूं पाहिलास काय ? जोंपर्यंत

महाबाहू कृष्ण आपण केलेली विनंती ऐकण्याच्या मनःस्थितींत आहे तोंवर शूर पार्थाशीं तूं सधि करून टाक. माझ्या अंताबरोबरच संघर्षाचाही अंत होऊन प्रेमानें या राजे लोकांना परस्परांना भेटू द्या. पिता व पुत्र, मामा व भाचे, बंधूबंधू एकत्र सुखानें नांदोत." पण अंतिम क्षणीं भीष्मांनीं केलेली ही अभ्यर्थना देखील व्यर्थ गेली. महाभारतकार म्हणतात :—

" धर्मार्थसहितं वाक्यं श्रुत्वा हितमनामयम् ।
नारोचयत पुत्रस्ते मुमूर्षुरिव भेषजम् ॥ ५७

—महाभारत भीष्मपर्व अध्याय १२१

"कर्तव्यमार्ग व कल्याण यांचें स्पष्ट मार्गदर्शन असलेलें तें वाक्य दुर्योधनाला रुचलें नाहीं. मरणपंथास लागलेल्या कोणाला औषध रुचलें आहे!" दुर्योधन ऐकत नाही असें पाहून कदाचित् कर्णाला वळवितां आलें तर पहावें! त्या योगानें तरी भयानक विनाश टळेल अशा कल्पनेनें, एकांतांत कर्ण भेटीला आला असतां त्यांनी तोही प्रयत्न करून पाहिला. ते कर्णाला म्हणाले :—

सोदर्याः पाण्डवा वीरा भ्रातरस्तेऽरिसूदन ।
संगच्छ तैर्महाबाहो मम चेदिच्छसि प्रियम् ॥ २१
मया भवतु निर्वृत्तं वैरमादित्यनंदन ।
पृथिव्यां सर्वराजानो भवन्त्वद्य निरामयाः ॥ २२

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १२२

हे शत्रुनाशना कर्णा! पांडव तुझे सहोदर बंधू आहेत. माझे कांहीं प्रिय करावें असें जर तुला खरोखरीच वाटत असेल तर त्यांच्याशीं एकरूप हो. हे सूर्यपुत्रा! माझ्या अंताबरोबरच हें वैर संपो व पृथ्वीवरील सर्व राजे आनंदांत व सुखानें नांदोत.

पण कर्णानें स्वतःच्या मृत्यूवांचून यांतून सुटका नाहीं असें सांगून त्यांचा युद्धासाठींच आशीर्वाद मागितला. शेवटीं प्रयत्नांच्या सीमामर्यादेपार गोष्ट गेलेली पाहून ते कर्णाला इतकेंच म्हणाले कीं :—

न चेच्छक्ष्यमवलष्टुं वैरमेतत् सुदारुणम् ।
अनुजानामि कर्ण त्वां युध्यस्व स्वर्गकाम्यया ॥ ३४

निर्मन्युर्गतसंरम्भः कृतकर्मा रणे स्म ह।
यथाशक्ति यथोत्साहं सतां वृत्तेषु वृत्तवान् ॥ ३५
अहं त्वाममुजानामि यदिच्छसि तदाप्नुहि।
क्षत्रधर्मजितांल्लोकानवाप्स्यसि धनञ्जयात् ॥ ३६
युध्यस्व निरहङ्कारो बलवीर्यव्यपाश्रयः।
धर्माद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३७
प्रशमे हि कृतो यत्नः सुमहान् सुचिरं मया।
न चैव शकितः कर्तुं कर्ण सत्यं ब्रवीमि ते ॥ ३८

—महाभारत, भीष्मपर्व अध्याय १२२

"हे कर्णा! हें दारुण वैर जर तुला सोडणें शक्य नसेल तर मी तुला युद्धाची अनुज्ञा देतों. मात्र स्वर्ग मिळविण्याच्याच इच्छेनें तूं लढ. क्रोधानें अंतःकरणाचा गोंधळ होऊं देऊं नकोस. स्वतःच्या कर्मानेंच रणांगणांत तूं तळपून ऊठ. यथाशक्ति व उत्साह असेल त्याप्रमाणें महापुरुषांचें चारित्र्य तू प्रकट कर. तुला युद्धच हवें आहे तर मी अनुज्ञा देतों. अर्जुनाच्या हातून तुला क्षात्रधर्मानें संपादन करावयाचे दिव्य लोक मिळतील. निरहंकार मनानें सामर्थ्य व पराक्रम यांचा आश्रय करून तू युद्ध कर. धर्म्य युद्धावांचून क्षत्रियांना दुसरें कल्याणकारक कांहीं नाहीं. हे कर्णा, मी तुला सत्य सांगतों कीं, शांतता नांदावी म्हणून मी दीर्घकाळ अत्यंत मोठा प्रयत्न केला पण मला यश आलें नाहीं."

युद्धानंतर गोत्रज हत्येच्या भयानें थरकांपणाऱ्या युधिष्ठिराचा शोक ज्ञाननिष्ठ भूमिकेवरून पूर्णपणें नष्ट करून जगांतील शोकमोहपीडित लोकांना कर्तव्यमार्गाची दीक्षा देण्याचें ज्ञाननिष्ठ तपस्व्याचें महाव्रत शरशय्येवरून देखील त्यांनीं धीरोदात्तपणें पार पाडलें. युधिष्ठिराच्याच हातून स्वतःला दारुण मृत्यु येत असतांना देखील शोकमोहातीत झालेले धर्ममूर्ति भीष्म त्याचेंच समाधान करूं लागले. नुसत्या युधिष्ठिरालाच काय, पण भावी भारतसंतानांना व्यक्तिगत, सामाजिक व राज्यतंत्रविषयक भारतीय साध्यांचा सदाचा उपयोगी पडेल असा उपदेश त्यांनीं केला. हिंदुधर्म व भारतीय संस्कृति अथवा

जीवनाचें वैदिक तत्त्वज्ञान काय आहे असें जर कोणी विचारलें तर भीष्मांच्या या उपदेशाकडे बोट दाखवितां येईल. महाभारत ग्रंथाला काष्ण्य वेद ही संज्ञा केवळ शांतिपर्व व अनुशासनपर्व या दोन पर्वांतील भीष्मांच्या उपदेशामुळेंच प्राप्त झाली आहे. स्वतःच्या महान् वाणीला वेदांचें महत्त्व प्राप्त करून द्यावयास ज्या महापुरुषाच्या वाणीचा कृष्णद्वैपायनांनीं आश्रय केला, त्याचें मीं पामरानें काय वर्णन करावें! भीष्म संपले कीं ज्ञानसूर्य अस्तंगत झाला हें भगवान् श्रीकृष्णांनीं जें म्हटलें तेंच खरें.

शेवटीं युधिष्ठिराला अनमोल उपदेश करून त्याच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या नव्या धर्मसत्तेचें एखाद्या दीपस्तंभाप्रमाणें भीष्मांनीं मार्गदर्शन करून आपल्या कर्तव्याची परिसमाप्ति केली. ते युधिष्ठिराला म्हणतात :—

उवाच चैनं मधुरं नृपं शांतनवो नृपः ।
प्रविशस्व पुरीं राजन्व्येतु ते मानसो ज्वरः ॥ ९
यजस्व विविधैर्यज्ञैर्बहुवन्नैः स्वाप्तदक्षिणैः ।
ययातिरिव राजेन्द्र श्रद्धावमपुरःसरः ॥ १०
क्षत्रधर्मरतः पार्थ पितॄन्देवांश्च तर्पय ।
श्रेयसा योक्ष्यसे चैव व्येतु ते मानसो ज्वरः ॥ ११
रञ्जयस्व प्रजाः सर्वाः प्रकृतीः परिसांत्वय ।
सुहृदः फलसत्कारैरर्चयस्व यथार्हतः ॥ १२
अनु त्वां तात जीवंतु मित्राणि सुहृदस्तथा ।
चैत्यस्थाने स्थितं वृक्षं फलवन्तमिव द्विजाः ॥ १३
आगन्तव्यं च भवता समये मम पार्थिव ।
विनिवृत्ते दिनकरे प्रवृत्ते चोत्तरायणे ॥ १४

—महाभारत, अनुशासनपर्व अध्याय १६६

"नंतर युधिष्ठिराला अत्यंत मधुर शब्दांनी भीष्म म्हणाले : हे राजन्, तूं आपल्या राजधानीस परत जा. तुझा मानसिक संताप नष्ट होवो. राजा ययातीप्रमाणें नानाविध यज्ञयाग करून तूं कीर्ति मिळव. क्षात्रधर्मांत तू एकनिष्ठ रहा. देव व पितर यांना तृप्त कर.

तुझें कल्याण होईल व हृद्रोग नष्ट होईल. आपल्या प्रजांचें सांत्वन कर व त्यांचें अनुरंजन कर. सुहृदांचा त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें आदरसत्कार कर. मित्र व सुहृद तुझ्या आश्रयानें आनंदानें जगोत. फळांनीं बहरलेल्या वृक्षाकडे सर्व लोक ज्या उत्कंठेनें जातात तीच उत्कंठा तुझ्यावर अवलंबून असलेल्या लोकांना तुझ्याविषयी वाटली पाहिजे. उत्तरायण लागलें कीं पुन्हां माझ्याकडे ये."

भीष्मांच्या आज्ञेप्रमाणें राजा युधिष्ठिर वागूं लागला हें सांगणें नकोच. त्यांच्या देहनिर्याणाच्या समयीं उत्तरायण लागलें आहे असें पाहून, राजा धृतराष्ट्राला पुढें घालून श्रीकृष्ण बांधव व परिवार यांच्यासह भीष्मांच्या शरशय्येजवळ युधिष्ठिर आले. पुत्रशोकानें संतप्त झालेल्या व परिस्थितीचा परिणाम म्हणून पांडवांशीं अजूनहि दुजाभाव बाळगणाऱ्या धृतराष्ट्राला भीष्मांनीं उपदेश केला. ते म्हणाले :—

राजन्विदितधर्मोऽसि सुनिर्णीतार्थसंशयः ।
बहुश्रुता हि ते विप्रा बहवः पर्युपासिताः ॥ ३०
वेदशास्त्राणि सर्वाणि धर्माश्च मनुजेश्वर ।
वेदांश्च चतुरः सर्वान्निखिलेनानुबुद्ध्यसे ॥ ३१
न शोचितव्यं कौरव्य भवितव्यं हि तत्तथा ।
श्रुतं देवरहस्यं ते कृष्णद्वैपायनादपि ॥ ३२
यथा पाण्डोः सुता राजंस्तथैव तव धर्मतः ।
तान्पालय स्थितो धर्मे गुरुशुश्रूषणे रतान् ॥ ३३
धर्मराजो हि शुद्धात्मा निदेशे स्थास्यते तव
आनृशंस्यपरं ह्येनं जानामि गुरुवत्सलम् ॥ ३४
तव पुत्रा दुरात्मानः क्रोधलोभपरायणाः ।
ईर्ष्याभिभूता दुर्वृत्तास्तान्न शोचितुमर्हसि ॥ ३५

—महाभारत, अनुशासनपर्व अध्याय १६७.

"हे राजन्, तुला धर्म काय आहे हें चांगलें माहीत आहे. बहुश्रुत ब्राह्मणांची पुष्कळ दिवस सेवा केल्यानंतर तुझ्या अंतःकरणांतील सर्व संशय पूर्णपणें दूर झालेले आहेत. वेदशास्त्रादिकांचें तुला यथा-

वत् ज्ञान असल्यामुळें कांहीं विशेष सांगावें असें नाहीं. जें घडलें आहे तें देवाच्या घरीं ठरलेलेंच असल्यामुळें त्याविषयीं शोक करण्यांत अर्थ नाहीं. स्वतःचे व पाण्डूचे पुत्र या दोघांहीकडे पहाण्याची तुझी दृष्टि समान असली पाहिजे. पांडव आपल्यापेक्षां वडील व मान्य अशा लोकांची सेवा करण्यांत स्वभावतःच निरत असतात. तूं आपल्या धर्मानुसार प्रेमानेंच त्यांच्याकडे पाहिलें पाहिजेस. धर्मराज शुद्ध अंतःकरणाचा असून त्याचें अंतःकरण दयापूर्ण व त्याचें गुरुवात्सल्य अप्रतिम आहे. तुझे पुत्र दुरात्मे व दुर्वृत्त होते. मत्सरानें प्रेरित होऊन ते क्रोध व लोभ यांच्या पूर्णपणें स्वाधीन झाले होते. अशा दुर्वृत्तांचा शोक कधींही करूं नये.

श्रीकृष्णही गर्हिवरले

शेवटीं जगाचा अखेरचा निरोप घेतांना भीष्मांनीं सर्वांना धीरोदात्त उपदेश केला व संहाराची कारणमीमांसा करून आपलें आराध्य दैवत जे भगवान् श्रीकृष्ण त्यांना हात जोडून भीष्मांनीं अंतिम क्षणीं आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले :—

एवमुक्तस्तु गाङ्गेयः पाण्डवानिदमब्रवीत् ।
धृतराष्ट्रमुखांश्चापि सर्वांश्च सुहृदस्तथा ॥ ४८
प्राणानुत्सृष्टुमिच्छामि तत्रानुज्ञातुमर्हथ ।
सत्येषु यतितव्यं वः सत्यं हि परमं बलम् ॥ ४९
आनृशंस्यपरैर्भाव्यं सदैव नियतात्मभिः ।
ब्रह्मण्यधर्मशीलैश्च तपोनित्यैश्च भारताः ॥ ५०
इत्युक्त्वा सुहृदः सर्वान्संपरिष्वज्य चैव ह ।
पुनरेवाब्रवीद्धीमान्युधिष्ठिरमिदं वचः ॥ ५१
ब्राह्मणाश्चैव ते नित्यं प्राज्ञाश्चैव विशेषतः ।
आचार्या ऋत्विजश्चैव पूजनीया जनाधिप ॥ ५२
अनुजानीहि मां कृष्ण वैकुण्ठ पुरुषोत्तम ॥ ३९
रक्ष्याश्च ते पाण्डवेया भवान्येषां परायणम् ।
उक्तवानस्मि दुर्बुद्धि मन्दं दुर्योधनं तदा ॥ ४०
'यतः कृष्णस्ततो धर्मो' यतो धर्मस्ततो जयः ।
वासुदेवेन तीर्थेन पुत्र संशाम्य पाण्डवः ॥ ४१

सन्धानस्य परः कालस्तवेति च पुनः पुनः ।
न च मे तद्वचो मूढः कृतवान्स सुमन्दधीः ।
घातयित्वेह पृथिवीं ततः स निधनं गतः ॥ ४२
त्वां तु जानाम्यहं देवं पुराणमृषिसत्तमम् ।
नरेण सहितं देव बदर्यां सुचिरोषितम् ॥ ४३
तथा मे नारदः प्राह व्यासश्च सुमहातपाः ।
नरनारायणावेतौ संभूतौ मनुजेष्विति ॥ ४४
स मां त्वमनुजानीहि कृष्ण मोक्ष्ये कलेवरम् ।
त्वयाऽहं समनुज्ञातो गच्छेयं परमां गतिम् ॥ ४५

—महाभात, अनुशासनपर्व अध्याय १६७

" मी आतां माझे प्राण शाश्वतांत विलीन करीत आहें. तुम्ही सर्व मला अनुज्ञा द्या. नेहमी सत्य धर्मानें वागा. सत्य हेंच परम बल होय. अंतःकरणांत कोमलता असू द्या. इंद्रियें सदैव स्वाधीन ठेवा. ब्रह्मण्य व धर्मशील राहून आपलें कर्तव्यकर्म करण्यांत सदैव जागृत असा. " असा सर्वांना उपदेश करून पुनश्च युधिष्ठिराला भीष्म म्हणाले, "तू ब्राह्मण, आचार्य व ऋत्विज यांच्या पूजनांत तर सदैव निमग्न राहाच. पण विशेषतः विचक्षण व शहाण्या लोकांचा नेहमीं सन्मान कर." किती मोलाचा उपदेश आहे हा! अखेरीस श्रीकृष्णांकडे वळून ते म्हणाले, "हे वैकुण्ठपुरुषोत्तमा, तू पांडवांची गति आहेस तूच त्यांचें संरक्षण कर. त्या दुर्बुद्धि व मूर्ख दुर्योधनाला मी स्पष्ट शब्दांत असें सांगितलें होतें कीं, " जिकडे कृष्ण आहे तिकडेच धर्म आहे. जिकडे धर्म आहे तिकडेच जय आहे. श्रीकृष्ण सांगेल तें ऐकण्यांतच कल्याण आहे. त्याच्या आश्रयानें पांडवांशीं संधि कर." पण तो मूर्ख माझें न ऐकतां सर्व पृथ्वीचा नाश करून त्या होळींत स्वतःही दग्ध झाला. तू पुराणऋषि नारायण आहेस हें मला माहीत आहे. तू व अर्जुन नर-नारायण होत असें मला नारद व व्यास यांच्या तोंडून कळलें आहे. मी तुझी अनुज्ञा घेतों. तुझ्या अनुज्ञेनें मी परम गतीला जाईन. आतां मी देह सोडतों. त्या तपोनिधानाचे हे अंतिम उद्‌गार ऐकतांच भगवान् श्रीकृष्णही गहिवरले. त्यांनीं भीष्मांना सांगितलें:—

अनुजानामि भीष्म त्वां वसून्प्राप्नुहि पार्थिव ।
न तेऽस्मि वृजिनं किञ्चिदिहलोके महाद्युते ॥ ४६
पितृभक्तोऽसि राजर्षे मार्कण्डेय इवापरः ।
तेन मृत्युस्तव वशे स्थितो भृत्य इवानतः ॥ ४७
—महाभारत, अनुशासनपर्व अध्याय १६७

" हे तेजोभास्करा, तुझ्या संपूर्ण चारित्र्यांत व जीवनांत अणुमात्रही कलंक नाहीं. मार्कण्डेयाप्रमाणें तूं अत्यंत पितृभक्त आहेस. त्यामुळें एखाद्या दासाप्रमाणें मृत्यु तुझ्या अधीन आहे. हे राजर्षे, मी तुला अनुज्ञा देतों. तूं आपल्या वसु स्वरूपांत विलीन हो. "

महानिर्याण

यानंतर भीष्मांनीं आपली वाणी आवरली व योगधारणा करून सर्व चैतन्यशक्तींचा अवरोध करून ते आपले प्राण वरवर नेऊं लागले. सर्व लोकांना आश्चर्यकारक असें दृश्य त्या वेळीं दिसलें. भीष्मांची प्राणशक्ति ज्या ज्या इंद्रियांवरील व अवयवांवरील आपला ताबा सोडी तो तो अवयव विशल्य होत असे. श्रीकृष्णांसहित सर्वांनाच या गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटलें. प्राणशक्ति ब्रह्मरंध्रांत एकत्र करून ब्रह्मरंध्राचा भेद करून भीष्मांचा आत्मा दिव्य गतीला निघून गेला. एक महान् ज्योत क्षणभर आकाशांत तळपली व सदाची अंतर्धान पावली. देवांनीं दुंदुभि वाजविल्या. दिव्य पुष्पांचा वर्षाव झाला. सिद्ध व ब्रह्मर्षि जयघोष करूं लागले. युधिष्ठिर व विदुरांनीं भीष्मांच्या शरीरावर रेशमी वस्त्र घातलें. पांडवांनीं चिता तयार केली. युयुत्सूनें त्यांच्या डोक्यावर श्वेत छत्र धरलें. नकुलसहदेवांनीं त्यांचीं शिरोभूषणें घेतलीं व भीमसेन व अर्जुन चौऱ्या व मोर्चेले ढाळूं लागले. राजस्त्रियांनीं पंख्यानें त्या पुण्यपुरुषाच्या शरीराला वारा घातला. भीष्मांचा तो तपकर्कश देह अग्नीच्या ज्योतीशीं एकरूप होऊन गेला. त्यांचें तर्पण करून लोक त्यांना तिलांजलि देत असतां देवी भागीरथी आपल्या जलप्रवाहांतून स्वतः दिव्य मूर्तीनें प्रकट झाली व लोकांचे शोकमोह दूर करणारी ती देवी त्या दिव्य पुत्रासाठीं इतका शोक करूं लागली कीं शेवटीं जगत्सूत्रचालक श्रीकृष्णांनीं व्यासांच्या साहाय्यानें तिचें सांत्वन केलें.

मूल्यमापन

महर्षि व्यासांनी क्षात्रधर्माचा मूर्त आविष्कार म्हणून भीष्मांचें व्यक्तिचित्र लोकासमोर मांडलें आहे. व्यक्तीनें स्वतःसमोर कोणतें ध्येय ठेवावें हा स्वतंत्र प्रश्न आहे. पण एकदां ध्येय ठरविल्यावर त्याच्याशी किती अवंचकतेनें राहिलें पाहिजे हें भीष्मांनीं आपल्या चारित्र्यानें दाखविलें आहे. कर्तव्याच्या मार्गावर भावना त्यांना कधीही विचलित करूं शकत नसत. त्यांनीं स्वतःच अनुशासनपर्वात त्यांच्या शास्त्रनिष्ठेविषयी पुढीलप्रमाणें गोष्ट सांगितली आहे :—

पिता मम महातेजाः शान्तनुर्निधनं गतः ।
तस्य वित्सुरहं श्राद्धं गङ्गाद्वारमुपागमम् ॥ ११
तत्राऽऽगम्य पितुः पुत्र श्राद्धकर्म समारभम् ।
माता मे जाह्नवी चात्र साहाय्यमकरोत्तदा ॥ १२
ततोऽग्रतस्ततः सिद्धानुपवेश्य बहूनृषीन् ।
तोयप्रदानात्प्रभृति कार्याण्यहमथारभम् ॥ १३
तत्समाप्य यथोद्दिष्टं पूर्वकर्म समाहितः ।
दातुं निर्वपणं सम्यग्यथावदहमारभम् ॥ १४
ततस्तं दर्भविन्यासं भित्त्वा सुरुचिराङ्गदः ।
प्रलम्बाभरणो बाहुरुदतिष्ठद्विशाम्पते ॥ १५
तमुत्थितमहं दृष्ट्वा परं विस्मयमागमम् ।
प्रतिग्रहीता साक्षान्मे पितेति भरतर्षभ ॥ १६
ततो मे पुनरेवासीत्संज्ञा सञ्चिन्त्य शास्त्रतः ।
नायं वेदेषु विहितो विधिर्हस्त इति प्रभो ॥ १७
पिण्डो देयो नरेणेह ततो मतिरभून्मम ।
साक्षान्नेह मनुष्यस्य पिण्डं हि पितरः क्वचित् ॥ १८
गृह्णन्ति विहितं चेत्थं पिण्डो देयः कुशेष्विति ।
ततोऽहं तदनादृत्य पितुर्हस्तनिदर्शनम् ॥ १९
शास्त्रप्रामाण्यसूक्ष्मं तु विधिं पिण्डस्य संस्मरन् ।
ततो दर्भेषु तत्सर्वमददं भरतर्षभ ॥ २०
शास्त्रमार्गानुसारेण तद्विद्धि मनुजर्षभ ।
ततः सोन्तर्हितो बाहुः पितुर्मम जनाधिप ॥ २१

ततो मां दर्शयामासुः स्वप्नान्ते पितरस्तथा ।
प्रीयमाणास्तु मामूचुः प्रीताः स्म भरतर्षभ ॥ २२
विज्ञानेन तवानेन यन्न मुह्यसि धर्मतः ॥ २३
—महाभारत, अनुशासनपर्व अध्याय ८४

"माझा पिता शांतनु निधन पावल्यावर त्याचें श्राद्ध करण्यासाठीं मी गंगाद्वाराला गेलों. माझी आई देवी गंगा तेथें मला साहाय्य करूं लागली. दर्भावर मी पिंड देत असतां मी अंथरलेले दर्भ बाजूस सारून व भूमि फोडून माझ्या पित्याचा हात वर आला. मला मोठें आश्चर्य वाटलें. व पिता स्वतःच पिंड घेत आहे असें पाहून धन्यता वाटली. पण मी पुन्हां मनाशीं विचार केला तेव्हां मला असें आढळून आलें कीं, हातावर पिंड द्यावा असा शास्त्रांत व वेदांत कोठेंही विधि नाहीं. दर्भावर पिंड द्यावा असाच विधि आहे. तेव्हां मी पित्याच्या हाताचा अनादर करून शास्त्रानुसार दर्भावरच पिंड दिला. रात्रीं स्वप्नांत पितरांनीं मला दर्शन दिलें व सांगितलें कीं तूं धर्माच्या प्रश्नांत कशानेंही मोह पावूं शकत नाहींस हें पाहून आम्ही अत्यंत संतुष्ट झालों आहोंत."

तात्पर्य, शास्त्रनिष्ठा व सत्यनिष्ठा हीच भीष्मांची जीवननिष्ठा होती. मानवी अपूर्णतेचें द्योतक असलेलें कोणतेंही सुखात्मक व दुःखात्मक मोहजाल त्यांना विचलित करूं शकत नव्हतें. या जीवननिष्ठेसाठींच चंदनाप्रमाणें सतत झिजत त्यांनीं आपलें बलिदान दिलें. असें महान् व्यक्तिमत्त्व लोककल्याणाच्या दृष्टीनें धर्ममूर्ति ईश्वराला प्रसंगीं वध्य ठरलें तरी त्यालाही तें वंदनीय खासच असतें. भीष्म हे स्थितप्रज्ञ कर्मयोग्याची प्रत्यक्ष मूर्ति आहेत. ज्या समाजस्थितीत ते उत्पन्न झाले ती अधःपतित होती. त्यामुळें तर त्यांचें भव्य, ऊर्जस्वल व महत्तम व्यक्तिमत्त्व अधिकच तळपून उठतें. भीष्मांच्या खालोखाल महाभारतांतील दुसरें असेंच व्यक्तिमत्त्व विदुराचें आहे. त्याकडे आपण पुढच्या व्याख्यानांत पाहूं.

१९. विदुर

साधुत्वाविषयींच्या विकृत कल्पनांमुळें महाभारतांतील जीं कांहीं महत्त्वाचीं व्यक्तिचित्रें विकृत झालीं आहेत त्यांत धृतराष्ट्राचा महामंत्री विदुर याचें व्यक्तिचित्र अग्रगण्य आहे. विदुर हा भक्त होता या कल्पनेमुळें भक्ताच्या बाबतींत ठरून गेलेले सारे संकेत त्याच्यासंबंधीं गृहीत धरण्यांत आलेले आहेत. विदुर हा दरिद्री होता व कौरवांच्या राज्याबाहेर एक झोपडी बांधून तिच्यांत तो राहात असे अशीही एक हास्यास्पद कविकल्पना त्याच्या बाबतींत नेहमींच केलेली आढळते. विदुराविषयीचे अपसमज सामान्यतः पुढीलप्रमाणें सांगतां येतील :—

(१) विदुर हा दरिद्री असून तो वल्कलें नेसून एकाद्या वनवासी व तपस्वी ऋषीप्रमाणें राजधानीच्या सीमेपार अरण्यांत रहात असे. (२) पांडव वनवासांत गेल्यानंतर कुंती, सुभद्रा व अभिमन्यु असे तिघेजण विदुराच्या घरीं रहात व तेथूनच अभिमन्यूनें बळरामाची मुलगी वत्सला हिचें हरण केलें. (३) विदुर हा श्रीकृष्णाचा अत्यन्त भक्त असल्यामुळें भक्तवत्सल श्रीकृष्णाला आपल्या या भक्ताचें अतोनात प्रेम वाटत असे. श्रीकृष्ण शिष्टाईला गेले असतां त्यांनीं विदुराच्या घरीं कण्या खाऊन दुर्योधनाच्या घरची मिष्टान्नें नाकारलीं. दरिद्री विदुर कण्यांशिवाय श्रीकृष्णांना दुसरें काय देऊं शकणार? (४) श्रीकृष्ण ज्या वेळीं विदुराच्या घरीं गेले त्या वेळीं विदुर घरीं नसून त्याची पत्नी घरीं होती. ती त्यावेळीं स्नान करीत होती. कृष्ण आल्याचें कळतांच हर्षातिरेकानें देहभान विसरून ती नग्नावस्थेंतच त्यांच्या स्वागतासाठीं बाहेर आली व तिनें श्रीकृष्णांना केळीं खावयाला दिलीं. पण तीं देतांना देखील ती इतकी वेडी बनली होती कीं, केळीं सोलून त्यांची सालें ती कृष्णांना देऊं लागली व गर स्वतःच्या तोंडांत टाकूं लागली. कांहीं वेळानें विदुर घरीं आले

व्याख्यान १९ वें, दि. १६ एप्रिल १९५१

तेव्हां त्यांना भक्तवेडा देव व प्रेमवेडी भक्ति पाहून हंसूं लोटलें. हे व या प्रकारचे गैरसमज भक्तांविषयी अकारण रूढ केले जातात.

विदुरांचें कुरुराज्यांतील स्थान

भक्त दरिद्री असलेच पाहिजेत हा अत्यंत चुकीचा समज आहे. विदुर हा राजा धृतराष्ट्राचा प्रथमपासूनच महामंत्री असल्याचा महाभारतांत उल्लेख आहे. पांडूनें धृतराष्ट्राला जें राज्य दिलें, तें विदुराची मत्रिपदावर स्थापना करूनच दिलें. इतकेंच नव्हे तर त्याच्याकडे अत्यंत महत्त्वाची अशीं खातीं होती. महाभारतकार म्हणतात.

नीचैः स्थित्वा तु विदुर उपास्ते स्म विनीतवान् ।
प्रेष्यवत् पुरुषव्याघ्रो वालव्यजनमुत्क्षिपन् ॥ ६
विसृज्य धृतराष्ट्राय राज्यं सविदुराय च ।
चचार पृथिवीं पाण्डुः सर्वां परपुरञ्जयः ॥ ८
कोशसंवनने दाने भृत्यानां चान्ववेक्षणे ।
भरणे चैव सर्वस्य विदुरः सत्यसङ्गरः ॥ ९

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४८

राजसेवक असल्यामुळें पुरुषव्याघ्र विदुर विनीतपणें हातांत मोर्चेलें घेऊन धृतराष्ट्राची सेवा करीत असे. विदुरासहित धृतराष्ट्राला राज्य देऊन पाण्डु पृथ्वीवर संचार करूं लागला. कोश वाढविणें, कोशाचा व्यय करणें, अधिकारी व नोकर यांच्यावर लक्ष ठेवणें व त्यांना वेतन वेळच्या वेळीं आणि व्यवस्थित मिळतें किवा नाहीं हें पाहणें हीं कामें विदुराची असून तो सत्यसंध होता. तात्पर्य, पूर्वी भीष्मांच्याकडे मंत्री या नात्यानें जी जीं कामें होतीं तीं ती सर्व राजा धृतराष्ट्राच्या राज्यांत विदुराकडे आलेली होती. त्याच्या चारित्र्यामुळें नि स्पष्टवक्तेपणामुळें त्याच्याविषयी एक प्रकारचा धाक व भीति धृतराष्ट्राला वाटत असे. म्हणून कोणतेंही अकार्य करतांना धृतराष्ट्राला त्याची नेहमीच भीति वाटत आलेली आहे. उन्मत्ततेची मर्यादा ओलांडीपर्यंत कर्ण व दुर्योधन यांना देखील एकादी अन्याय्य

गोष्ट विदुरासमोर उच्चारतांना एक प्रकारचा धाक वाटत असे. ज्या वेळीं पाण्डव द्रौपदीशी विवाहबद्ध झाले व त्यांना राजधानीत परत आणावें किंवा नाहीं याचा खल सुरू झाला, त्या वेळीं स्वतः दुर्योधनच असें म्हणतो कीं, विदुरासमोर अन्याय्य धोरण स्वीकारणें व त्यासंबंधी बोलणें करणें शक्य होत नाहीं.

ततो दुर्योधनश्चापि राधेयश्च विशांपते ।
धृतराष्ट्रमुपागम्य वचोऽब्रूतामिदं तदा ॥ २७
संनिधौ विदुरस्य त्वां दोषं वक्तुं न शक्नुवः ।
विविक्तमिति वक्ष्यावः किं तवेदं चिकीर्षितम् ॥ २८
सपत्नबुद्धिं यत्तात मन्यसे वृद्धिमात्मनः ।
अभिष्टौषि च यत्क्षत्तुः समीपे द्विषतां वर ॥ २९

—महाभारत, आदिपर्व अध्याय २००

नतर दुर्योधन व कर्ण राजा धृतराष्ट्राकडे आले व त्याला म्हणूं लागले की, "विदुराच्या समोर आम्ही आपणांस दुष्ट गोष्ट सांगू शकत नाहीं. आतां एकांत आहे म्हणूनच सांगतों. आपण हें काय मांडलें आहे? शत्रूंच्या उत्कर्षांत तुम्हांला स्वतःचा उत्कर्ष कां दिसतो? विदुरासमोर आपण आपल्या शत्रूचीच प्रशंसा कां करीत असतां?" यावर धृतराष्ट्रानें जें उत्तर दिलें आहे, त्यावरून महामंत्री विदुराला तोही किती भीत असे याची पूर्णपणें कल्पना येते. तो म्हणतोः—

अहमप्येवमेवैतच्चिकीर्षामि यथा युवाम् ।
विवेक्तुं नाहमिच्छामि त्वाकारं विदुरं प्रति ॥ १
ततस्तेषां गुणानेव कीर्तयामि विशेषतः ।
नावबुध्येत विदुरो ममाभिप्रायमिङ्गितैः ॥ २

—महाभारत, आदिपर्व अध्याय २०१

"तुमच्या अंतःकरणांत जें आहे तेंच माझ्याही अंतःकरणांत आहे; पण विदुराच्या समोर मी माझ्या चेहऱ्यावरून देखील माझ्या अंतःकरणांतील भाव प्रकट करूं इच्छीत नाहीं. इतकेंच नव्हे तर विदुर कुशल असल्यामुळें माझ्या हावभावांनीं व एकाद्या सामान्य शब्दानें

देखील तो माझा अभिप्राय ओळखील म्हणून त्याच्यासमोर मी पाण्डवांचें सारखें गुणवर्णनच करीत असतों."

विदुराच्या प्रगाढ बुद्धिमत्तेचा धाक व विश्वास राजा धृतराष्ट्राला किती वाटत होता, याचीं उदाहरणें महाभारतभर विखुरलेलीं आहेत. प्रत्येक महत्त्वाच्या वेळीं विदुरानें इच्छेविरुद्ध मत दिलें असतांही त्याचें मत धृतराष्ट्रानें वारंवार विचारलें आहे. विदुर एक महान् शक्ति असून ती जर पाण्डवांच्या पक्षाला मिळाली तर त्यांचें सदाचें कल्याण व आपलें सदाचें अहित होईल नि त्यामुळें तो आपणांस प्रसंगी केवढेंही कठोर बोलला तरी त्याला मुळींच न सोडतां आपल्याजवळच ठेवून घेतलें पाहिजे असें राजा धृतराष्ट्रानें स्वतःचें धोरणच ठरवून टाकलें होतें. त्याचें विदुरावर आत्यंतिक प्रेमही होतें व त्याची योग्यताही तो जाणून होता. पुत्रमोह व राज्यलोभ यांमुळें विदुरासारख्या दुर्लभ नररत्नाचा त्याला लाभ करून घेतां आला नाहीं, हें केवळ त्याचें दुर्दैव होय. विदुराविषयीं धृतराष्ट्राला काय वाटत होतें व कौरवांच्या राज्ययंत्रांत त्याचें केवढें महत्त्वाचें स्थान होतें हें एका प्रसंगानें स्वतः धृतराष्ट्राच्याच तोंडून स्पष्ट झालें आहे. पाण्डव वनांत गेल्यानंतर एकदां विदुरावर संतापून धृतराष्ट्रानें त्याचा परित्याग केला. परित्यक्त विदुर वनांत युधिष्ठिराकडे येऊन राहूं लागला. पण तो जातांच चिंतेनें राजा धृतराष्ट्राची शोचनीय अवस्था झाली. त्यानें वनांत संजयाला विदुराकडे पाठविलें व त्याला बोलावून आणून त्याची सपशेल क्षमा मागितली. विदुरानेंही त्याला बंधुप्रेमानें क्षमा केली. महाभारतकार या प्रसंगाचें वर्णन पुढीलप्रमाणें करतात :–

गते तु विदुरे राजन्नाश्रमं पाण्डवान्प्रति ।
धृतराष्ट्रो महाप्राज्ञः पर्यतप्यत भारत ॥ १
विदुरस्य प्रभावं च सन्धिविग्रहकारिताम् ।
विवृद्धिं च परां मत्वा पाण्डवानां भविष्यति ॥ २
स सभाद्वारमागम्य विदुरस्मारमोहितः ।
समक्षं पार्थिवेन्द्राणां पपाताविष्टचेतनः ॥ ३

स तु लब्ध्वा पुनः संज्ञां समुत्थाय महीतलात् ।
समीपोपस्थितं राजा संजयं वाक्यमब्रवीत् ॥ ४
भ्राता मम सुहृच्चैव साक्षाद्धर्म इवापरः ।
तस्य स्मृत्याद्य सुभृशं हृदयं दीर्यतीव मे ॥ ५
तमानयस्व धर्मज्ञं मम भ्रातरमाशु वै ।
इति ब्रुवन्स नृपतिः कृपणं पर्यदेवयत् ॥ ६
पश्चात्तापाभिसंतप्तो विदुरस्मारमोहितः ।
भ्रातृस्नेहादिदं राजा संजयं वाक्यमब्रवीत् ॥ ७
गच्छ संजय जानीहि भ्रातरं विदुरं मम ।
यदि जीवति रोषेण मया पापेन निर्धुतः ॥ ८
न हि तेन मम भ्रात्रा सुसूक्ष्ममपि किंचन ।
व्यलीकं कृतपूर्वं वै प्राज्ञेनामितबुद्धिना ॥ ९
स व्यलीकं परं प्राप्तो मत्तः परमबुद्धिमान् ।
त्यक्ष्यामि जीवितं प्राज्ञ तं गच्छानय संजय ॥ १०
तस्य तद्वचनं श्रुत्वा राज्ञस्तमनुमान्य च ।
संजयो बाढमित्युक्त्वा प्राद्रवत्काम्यकं प्रति ॥ ११
सोऽचिरेण समासाद्य तद्वनं यत्र पाण्डवाः ।
रौरवाजिनसंवीतं ददर्शाथ युधिष्ठिरम् ॥ १२
विदुरेण सहासीनं ब्राह्मणैश्च सहस्रशः ।
भ्रातृभिश्चाभिसंगुप्तं देवैरिव पुरंदरम् ॥ १३
युधिष्ठिरमुपागम्य पूजयामास संजयः ।
भीमार्जुनयमाश्चापि तद्युक्तं प्रतिपेदिरे ॥ १४
राज्ञा पृष्टः स कुशलं सुखासीनश्च संजयः ।
शशंसागमने हेतुमिदं चैवाब्रवीद्वचः ॥ १५

संजय उवाच ।

राजा स्मरति ते क्षत्तर्धृतराष्ट्रोम्बिकासुतः ।
तं पश्य गत्वा त्वं क्षिप्रं संजीवय च पार्थिवम् ॥ १६
सोनुमान्य नरश्रेष्ठान्पाण्डवान्कुरुनन्दनान् ।
नियोगाद्राजसिंहस्य गन्तुमर्हसि सत्तम ॥ १७

वैशपायन उवाच ।

एवमुक्तस्तु विदुरो धीमान्स्वजनवत्सलभः ।
युधिष्ठिरस्यानुमते पुनरायाद्गजाह्वयम् ॥ १८
तमब्रवीन्महातेजा धृतराष्ट्रोम्बिकासुतः ।
दिष्टया प्राप्तोसि धर्मज्ञ दिष्टया स्मरसि मेनघ ॥ १९
अद्य चाहं दिवा रात्रौ त्वत्कृते भरतर्षभ ।
प्रजागरे प्रपश्यामि विचित्रं देहमात्मनः ॥ २०
सोऽकमानीय विदुरं मूर्धन्याघ्राय चैव ह ।
क्षम्यतामिति चोवाच यदुक्तोसि मयानघ ॥ २१

विदुर उवाच

क्षान्तमेव मया राजन्गुरुर्मे परमो भवान् ।
एषोहमागतः शीघ्रं त्वद्दर्शनपरायणः ॥ २२

—महाभारत वनपर्व अध्याय ६

विदुर अरण्यांत पाण्डवांकडे गेल्यानंतर अत्यंत बुद्धिसंपन्न अशा धृतराष्ट्राला मोठी चिंता वाटू लागली. विदुराचा प्रभाव व केव्हां संधि करावा नि केव्हां नि कसें युद्ध करावें या बाबतींतील राजनीतीचें त्याचें सुसूक्ष्म ज्ञान यांमुळें पाण्डवांचा अत्यंत मोठा उत्कर्ष होईल या कल्पनेनें त्याला पूर्णपणें ग्रासलें. विदुराच्या सामर्थ्यानें व त्यामुळें आपल्या होणाऱ्या हानीच्या कल्पनेनें तो चिंतामग्न झाला. सभेच्या दाराशीं येतांच सर्व सामंतांसमक्ष राजा धृतराष्ट्र मूर्छित होऊन खालीं पडला. कांही वेळानें सावध झाल्यानंतर जवळच उपस्थित असलेल्या संजयाला तो म्हणाला, " धर्माचाच जणू कीं कांहीं अवतार असलेला असा माझा बंधु विदुर असून तो माझा सुहृद आहे. त्याच्या स्मृतीनें माझ्या हृदयांत खोलवर वेदना होत असून जणू तें विदीर्ण होत आहे. तूं ताबडतोब जाऊन माझ्या त्या धर्मज्ञ बंधूला सत्वर घेऊन ये." इतकें बोलून राजा धृतराष्ट्र विलाप करूं लागला. पश्चात्तापानें त्याचें अंतःकरण पोळले होतें व विदुराच्या स्मृतीने तो मोहित झाला होता. पुनश्च राजा संजयाला असें म्हणू लागला की, मी पाप्यानें काढून लावलेला माझा बंधु विदुर जर जिवंत असेल तर त्याचा शोध घे व त्याला ताबडतोब

इकडे घेऊन ये. तो अत्यंत बुद्धिमान आहे. त्यानें कधींही सूक्ष्म-देखील कपट केलेलें नाहीं. मी मात्र त्याच्याशीं द्वेषानें व कपटानें वागलों. जर त्याचा मला आणखी वियोग होईल तर त्याच्या-वांचून मी जिवंत राहूं शकणार नाहीं. राजाचें तें बोलणें ऐकून संजयानें काम्यक वनाकडे गमन केलें. तेथें मृगचर्म परिधान केलेल्या आणि विदुर व मंत्रवेत्ते ब्राह्मण यांनीं परिवेष्टिलेल्या, बंधूनीं संर-क्षित अशा इंद्राप्रमाणें शोभणाऱ्या राजा युधिष्ठिराला त्यानें पाहिलें. त्याच्याशीं कुशल प्रश्न करून संजय विदुराला म्हणाला, " राजा धृतराष्ट्र आपली आठवण करीत असून आपल्यावांचून त्याची मोठी शोचनीय अवस्था झाली आहे. तेव्हां पाण्डवांचा निरोप घेऊन राजाच्या आज्ञेनुरूप आपण हस्तिनापुरास चलावें व राजा धृत-राष्ट्रांत चैतन्य आणावें. " विदुरानें हें ऐकतांच पाण्डवांचा निरोप घेतला व तो धृतराष्ट्राकडे आला. त्याला पाहतांच धृतराष्ट्र म्हणाला, ' हे धर्मज्ञा, तू आलास व माझें स्मरण ठेवलेंस हें माझें मोठे भाग्य आहे. केवळ तू नसल्यामुळें तुझ्या आठवणीनें दिवस-रात्र मनांत भलभलत्या कल्पना येऊन चितेंत चूर होऊन मी जाग्रण करीत आहें. त्यानें विदुराला जवळ ओढून त्याच्या मस्तकाचें अवघ्राण केलें व जें कांही मी बोललों असेन त्याविषयीं मला क्षमा कर असें म्हटलें. त्याबरोबर विदुर म्हणाला, वडील बंधूच्या व राजाच्या नात्यानें तू मला अत्यंत मान्य असल्यामुळें मी तुला क्षमा केलीच आहे. तुझ्या भेटीसाठीच मी त्वरेनें येथें आलों. विदुराच्या कर्तृत्वाची व बुद्धिमत्तेची राजा धृतराष्ट्राला केवढी भीति वाटत होती हें स्पष्ट करण्यासाठीच महाभारतकारांनी 'विदुरस्मारमोहितः' असें विशेषण घातलें आहे. तेथील स्मार शब्दाचा नुसता स्मृति असा अर्थ करणें चुकीचें होईल. कित्येक पोथ्यांमधून स्मार या शब्दाच्या जागीं स्नेह या शब्दाचा वापर करण्यांत येतो व 'विदुरस्नेहमोहितः' असा पाठ आढळतो. पण तो अत्यंत चुकीचा आहे. नीलकंठ पंडित यासंबंधीं विवेचन करीत असतां आपल्या महाभारतावरील टीकेंत असें म्हणतो कीं, " विदुरस्मारमोहितः स्मरः कामः तस्मात् केन-चित्प्रतिबद्धात् उत्पन्नो द्वेषः स्मार इत्युच्यते। विदुरद्वेषेण मम नाशो

भविष्यतीति चिन्तया मोहं प्राप्तः इत्यर्थः । स्नेहेत्यपपाठः । द्वेषमेव स्नेहरूपेण नाटयितुं सभाद्वारे राज्ञां समक्षं पतित्वा उत्थाय आह भ्रातेत्यादि।" स्मर म्हणजे काम अथवा इच्छा. या कामाचा अथवा इच्छेचा अवरोध होण्याची परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें उत्पन्न होणारा जो द्वेष त्यालाच स्मार म्हणजे स्मरजनित असें येथें म्हटलें आहे. विदुराशीं विद्वेष उत्पन्न केल्यामुळें माझा नाश होईल या चिंतेनें धृतराष्ट्राला मोह उत्पन्न झाला, असा याचा अर्थ आहे. स्मारच्या जागीं कोठेंकोठें आढळणारा स्नेह शब्द हा अपपाठ अथवा चुकीचा पाठ होय. आपला द्वेषच स्नेहाच्या नाटकानें झाकण्यासाठीं राजा धृतराष्ट्रानें सामंतांसमक्ष राजसभेंत मूर्छित पडण्याचें नाटक केलें व त्याचें सर्व भाषण त्याच्या त्या नाटकीपणाचेंच द्योतक आहे. तात्पर्य, विदुर ही एक महान् शक्ति असून त्याचें जरी आपणास मुळींच ऐकावयाचें नसलें तरी आपल्याविरुद्ध त्याचा कधींही उपयोग होऊं नये म्हणून सर्व प्रकारच्या धनमानादिकांनीं त्याला आपल्याशीं सतत बांधून ठेवावयाचें, त्याचे कठोर शब्दांचे आघात सतत सहन करावयाचे, पण त्याला कोठेंही फटकू द्यावयाचें नाही, हें धृतराष्ट्राचें त्याच्या बाबतींतलें ठरलेलें धोरण होतें. अशा स्थितींत इतक्या महत्त्वाची व्यक्ति व तीही कोशसरक्षण आणि भृत्यसंगोपन यांसारखी महत्त्वाचीं खातीं संभाळून मंत्रिपदावर अधिष्ठित असलेली व्यक्ति दरिद्री असण्याचें कारण काय? विदुराला वेतन होतें याचा तर स्पष्ट पुरावा महाभारतांतच आहे. महाभारताच्या आदिपर्वांत (अ. १४२–२२) स्वतः दुर्योधनच विदुराविषयीं निर्देश करतांना 'क्षत्ताऽर्थबद्धस्त्वस्माकं'–'विदुर हा आपल्याशीं अर्थानें बांधलेला आहे' असें म्हणतो. तात्पर्य, विदुर हा कौरव राज्याचा महामंत्री होता असें समजूनच त्याचा विचार केला पाहिजे. त्याचें स्थान, वेतन व त्याच्याकडे असणारीं खातीं यांचा विचार केला असतां त्याच्या दारिद्र्याविषयींच्या कल्पनेची हिमराशि प्रत्यक्षाच्या उष्णतेनें आपोआप विरघळून गेल्याखेरीज रहात नाहीं. त्याच्या दारिद्र्यासंबंधानें ज्या कथा पसरल्या आहेत त्या वस्तुस्थितीस सर्वथा सोडून होत.

विदुराची पत्नी

विदुराच्या पत्नीचा महाभारतांत केवळ एकदांच उल्लेख येतो. व तो म्हणजे तिच्या विदुराशीं झालेल्या विवाहप्रसंगीचा होय. त्यावरून विदुर ज्याप्रमाणें दासीपुत्र असले तरी राजपुत्र होते त्याचप्रमाणें त्यांची पत्नीही त्यांच्याचप्रमाणें जन्म पावली असली तरी ती राजकन्या होती हें स्पष्ट दिसतें. तिच्यासारख्या स्वतः भीष्मांनीं पसंत केलेल्या व विदुरासारख्या महाबुद्धिमान् व्यक्तीच्या सहवासांत सारा जन्म घालविलेल्या स्त्रीला कोणत्याही कां होईना पण भावनेच्या आहारीं जाऊन वस्त्राचीही शुद्ध नव्हती असें प्रतिपादन करणें कमालीच्या धाष्टर्याचें आहे. विदुरपत्नीच्या बाबतींत केवळ एकदांच महाभारतांत येणारा जो उल्लेख तो पुढीलप्रमाणें आहेः—

अथ पारसवीं कन्यां देवकस्य महीपतेः ।
रूपयौवनसंपन्नां स शुश्रावापगासुतः ॥ १२
ततस्तु वरयित्वा तामानीय भरतर्षभः ।
विवाहं कारयामास विदुरस्य महामतेः ॥ १३
तस्यां चोत्पादयामास विदुरः कुरुनन्दनः ।
पुत्रान्विनयसंपन्नानात्मनः सदृशान्गुणैः ॥ १४

—महाभारत, आदिपर्व अध्याय ११४

नंतर भीष्मांनीं असें ऐकलें कीं, देवक राजाला विदुराच्या जन्मानुसारच जन्म पावलेली एक रूपयौवनसंपन्न कन्या आहे. लगेच भीष्मांनीं जाऊन विदुरासाठी त्या मुलीची मागणी केली व तिच्याशीं विदुराचा विवाह करून दिला. विदुरानें तिच्या ठिकाणीं आपल्याचसारखे गुणसंपन्न व विनयसंपन्न पुत्र उत्पन्न केले. विदुराच्या पत्नीचा प्रत्यक्ष महाभारतांतील हा पहिला व शेवटचाच उल्लेख होय. श्रीकृष्णांनीं विदुराच्या गृहाला ज्या वेळीं भेट दिली, त्या वेळीं तेथें ते फक्त एकाच स्त्रीला भेटले व ती म्हणजे त्यांची आत्या कुंती होय. गोष्ट रचतांनाही असंभाव्य रचून काय उपयोग? कृष्ण कौरवांच्या दरबारीं अचानक गेलेले नसून ते येणार हें कित्येक दिवस आधींपासूनच गाजत होतें. ते घरीं येण्याच्या प्रसंगीं विदुर घरीं न राहणें अत्यंत अस्वाभाविक होतें. केवळ शब्दाच्या उच्चारावरून व हावभावावरून कारस्थानें ओळखूं शकण्याइतका महाबुद्धिमान्

विदुर कृष्णांसारखा महान् पाहुणा घरीं यावयाच्या वेळींच नेमका अनुपस्थित राहील हें असंभवनीय आहे. महाभारतांत तसा उल्लेख अर्थात नाहींच. महाभारतानुसार भगवान् श्रीकृष्ण विदुराच्या घरीं एकंदर तीन वेळां गेलेले आहेत. त्यांपैकीं दोनदां ते विदुराच्या घरीं गेले ते प्रत्यक्ष विदुराला भेटावयाला होय. तिसऱ्यांदा ते जे गेले ते कुंतीला भेटण्यासाठीं म्हणून. अर्थात केळ्यांचा प्रसंग पहिल्याच भेटीच्या वेळीं होणें शक्य आहे. पण या पहिल्या भेटीच्या वेळीं विदुर श्रीकृष्णांबरोबरच होते.. कारण श्रीकृष्ण राजसभेंत गेले व नंतरच विदुराच्या घरीं गेले. श्रीकृष्णाचें त्याच्या घरी जें आदरातिथ्य झालें त्याचें महाभारतांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे. तें वर्णन वाचल्यावर केळ्यांच्या सालींचा पत्ताही लागण्यासारखा नाहीं. तें असें:—

सोऽर्चितो धृतराष्ट्रेण पूजितश्च महायशाः ।
राजानं समनुज्ञाप्य निरक्रामदरिन्दमः ॥ २१
तैः समेत्य यथान्यायं कुरुभिः कुरुसंसदि ।
विदुरावसथं रम्यमुपातिष्ठत माधवः ॥ २२
विदुरः सर्वकल्याणैरभिगम्य जनार्दनम् ।
अर्चयामास दाशार्हं सर्वकामैरुपस्थितम् ॥ २३
या मे प्रीतिः पुष्कराक्ष त्वद्दर्शनसमुद्भवा ।
सा किमाख्यायते तुभ्यमन्तरात्माऽसि देहिनाम् ॥ २४
कृतातिथ्यं तु गोविन्दं विदुरः सर्वधर्मवित् ।
कुशलं पाण्डुपुत्राणामपृच्छन्मधुसूदनम् ॥२५
प्रीयमाणस्य सुहृदो विदुरो बुद्धिसत्तमः ।
धर्मार्थनित्यस्य सतो गतरोषस्य धीमतः ॥ २६
तस्य सर्वं सविस्तारं पाण्डवानां विचेष्टितम् ।
क्षत्तुराचष्ट दाशार्हः सर्वं प्रत्यक्षदर्शिवान् ॥ २७

—महाभारत उद्योगपर्व अध्याय ८९

" याप्रमाणें धृतराष्ट्रानें केलेला सन्मान घेऊन श्रीकृष्णांनीं त्याची अनुज्ञा घेतली व उपस्थित सामंतांचीही अनुज्ञा घेऊन ते राजसभेबाहेर पडले. त्यानंतर ते रम्य अशा विदुराच्या राहण्याच्या जागीं आले. विदुरानें त्यांचें थाटाचें स्वागत केलें. श्रीकृष्णांचें

स्वागत करून विदुर त्यांना म्हणाला, 'हे कमलनेत्रा, तुझ्या दर्शनामुळें मला जो आनंद झाला आहे तो मी तुला सांगितलाच पाहिजे काय ? तूं सर्व लोकांचा अंतरात्मा असल्यामुळें तूं सर्व ओळखू शकतोसच.' विदुरानें कृष्णांचें उत्तम आतिथ्य केलें व पांडवांचें कुशल त्यांना विचारलें. श्रीकृष्णांनीही विदुरांना पांडवांचा सर्व वृत्तान्त सांगितला. येथें विदुरपत्नीचें नांवही नाही. कृष्ण आले त्या वेळीं विदुर घरीं नव्हते असें गृहीत धरलें तरी द्वारकाधीशाचें स्वागत करावयास स्नान करणाऱ्या पत्नीवांचून महामंत्री विदुराच्या घरीं दुसरें कुणी सामंत वगैरे असू शकणार नाहींत काय ? भक्तांनी विदुराचा पूर्ण तुकाराम बनविला आहे. तोही एक वेळ खपून गेला असता; पण त्याच्या पत्नीला नागव्या स्थितींत श्रीकृष्णांसमोर उभे करण्यांत तर असीम हिडिसपणाच व्यक्त होतो. कृष्ण आले ते एकटे येणें शक्य नाहीं. अकरावा अंबरावतार धारण करून द्रौपदीची लज्जा संरक्षण करणाऱ्या श्रीकृष्णांनीं आपल्याला मातृतुल्य असलेल्या या स्त्रीला अशा स्थितीत कधींतरी राहूं दिलें असतें काय? कल्पनाच करावयाची तर निदान ती चांगली तरी करावी. महाभारतांतील कोणतीही स्त्री केवढीही भक्त असली तरी बावळट नाहीं व भारतांतील भक्तीचे आविष्कार कितीही उत्कट असले तरी ते गर खाऊन देवाला केळ्यांच्या साली देण्याइतके स्वार्थी नाहींत. भारतीयांच्या रामायणमहाभारतासारख्या ग्रंथावर जे अत्याचार झाले आहेत ते परकीयांनीच केले आहेत असें नसून स्वकीय धर्मनिष्ठांनीही ते कसे केले आहेत याचें, विदुराविषयीची ही कुकल्पना म्हणजे प्रत्यक्ष निदर्शनच होय. द्वेषानेंच नव्हे तर प्रेमानेंही जीव गमावण्याची पाळी येते ती ही अशी. मानवतेच्या जीवनमार्गाचा महान् दीपस्तंभ म्हणून ज्याकडे बघावें त्या या ग्रंथरत्नावरील परकीयच नव्हे तर स्वकीयहि तेजहानिकर जवनिकांना दूर सारलें पाहिजे.

विदुराच्या घरच्या कण्या

विदुर दरिद्री नव्हता हें आपण पाहिलेंच. एरवीं कण्या खाणारा मनुष्य देखील मोठा पाहुणा घरीं आला असतां चार घरीं भिक्षा

मागून कां होईना चांदीच्या उपकरणांमधून मिष्टान्नाचे चार घास पाहुण्याच्या तोंडीं घालतो. श्रीकृष्णासारखा लोकोत्तर पुरुष पाहुणा म्हणून घरीं आला असतां विदुरासारखा महामंत्री या सस्यश्यामला भूमीवर अन्नधान्याचें कोणतेंही संकट कोसळलें नसतां कण्यांची मेजवानी कशासाठीं देईल ? श्रीकृष्णांच्या येथील भोजनप्रसंगाचें महाभारतांत पुढीलप्रमाणें वर्णन आहे:—

यातेषु कुरुषु क्षत्ता दाशार्हमपराजितम् ।
अभ्यर्चयामास तदा सर्वकामैः प्रयत्नवान् ॥ ३८
ततः क्षत्ताऽन्नपानानि शुचीनि गुणवन्ति च ।
उपाहरदनेकानि केशवाय महात्मने ॥ ३९
तैस्तर्पयित्वा प्रथमं ब्राह्मणान् मधुसूदनः ।
वेदविद्भ्यो ददौ कृष्णः प्रथमं द्रविणान्यपि ॥ ४०
ततोऽनुयायिभिः सार्धं मरुद्भिरिव वासवः ।
विदुराऽन्नानि बुभुजे शुचीनि गुणवन्ति च ॥ ४१
—महाभारत, उदयोगपर्व अध्याय ९१

"कौरव निघून गेल्यावर विदुरानें श्रीकृष्णांची सर्व प्रकारें अभ्यर्चना केली. त्यानें पवित्र व उत्कृष्ट अशीं अनेक पक्वान्नें तयार करून श्रीकृष्णांना निवेदन केली. श्रीकृष्णांनी तें अन्न व दक्षिणा प्रथम वेदवेत्त्या ब्राह्मणांना दिली व नंतर मरुद्गणासह इंद्रानें भोजन करावें त्याप्रमानें अनुयायांसहित श्रीकृष्णांनी उत्कृष्ट भोजन केलें. महाराष्ट्र कविवर्य मोरोपंतांनीं तर विदुराच्या घरच्या त्या अन्नाच्या स्वादाचें इतकें मनोरम वर्णन केलें आहे कीं, श्रीकृष्णांचें भोजन उरकलें, पण पंत म्हणतात, 'ताट चाटणें नुरलें'.

आणखी एक अपसमज

पांडवांच्या वनवासांत विदुराच्या घरीं केवळ कुंती होती. सुभद्रा व अभिमन्यु मुळींच नव्हते. कुंतीला देखील विदुरानें स्वतः होऊनच सन्मानानें आपल्या घरीं ठेवून घेतलें होतें व तेंही पांडवांच्या संमतीनेंच होय, महाभारतकार म्हणतात :

विदुर उवाच ।

आर्या पृथा राजपुत्री नारण्यं गन्तुमर्हति ।
सुकुमारी च वृद्धा च नित्यं चैव सुखोचिता ॥ ५
इह वत्स्यति कल्याणी सत्कृता मम वेश्मनि ।
इति पार्था विजानीध्वमगदं वोस्तु सर्वशः ॥ ६
तथेत्युक्त्वा ब्रुवन्सर्वे यथा नो वदसेनघ ।
त्व पितृव्यो पितृसमो वयं च त्वत्परायणाः ॥ ७
—महाभारत, सभापर्व अध्याय ७८

एव विलपतीं कुंतीमभिवाद्य प्रणम्य च ।
पाण्डवा विगतानन्दा वनायैव प्रवव्रजुः ॥ ३०
विदुरश्चापि तामार्तां कुंतीमाश्वास्य हेतुभिः ।
प्रावेशयत् गृहं क्षत्ता स्वयमार्ततरः शनैः ॥ ३१
—महाभारत, सभापर्व अध्याय ७९

विदुर म्हणाला, आर्या कुंती ही राजपुत्री आहे. ती सुकुमारी असून नेहमीं सुखांत राहिलेली आहे. शिवाय ती वृद्ध झालेली आहे. म्हणून तिनें अरण्यांत जाणें योग्य नाहीं. सन्मानपूर्वक मी तिला माझ्या घरीं ठेवीन. हें ऐकल्यावर पांडव त्याला म्हणाले, आपण आमचे काका असून आम्हांला पित्याप्रमाणेंच मान्य आहां. आम्ही आपल्या आज्ञेंत आहोंत. आपण म्हणाल तसेंच होईल. नंतर विलाप करणाऱ्या कुंतीला वंदन करून पांडव वनांत गेले व स्वतः अत्यंत दुःखी झालेल्या विदुरानें कुंतीचें परोपरीनें समाधान करून तिला आपल्या घरीं नेलें. सुभद्रा व अभिमन्यु यांना सुभद्रेचे बंधु भगवान् श्रीकृष्ण विदुराच्या घरीं राहूं देणें केवळ अशक्य होते. वनवासी पांडवांची श्रीकृष्णांनीं ज्या वेळी पहिली भेट घेतली त्या वेळीच परत द्वारकेला जातांना आपल्याबरोबर अभिमन्यु व सुभद्रा यांना घेऊन श्रीकृष्ण द्वारकेला गेल्याचें महाभारतांत वर्णन आहे. तें पुढीलप्रमाणें :—

सुभद्रामभिमन्युं च रथमारोप्य काञ्चनम् ।
आरुरोह रथं कृष्णः पाण्डवैरभिपूजितः ॥ ४७
शैब्यसुग्रीवयुक्तेन रथेनादित्यवर्चसा ।
द्वारकां प्रययौ कृष्णः समाश्वास्य युधिष्ठिरम् ॥ ४८
—महाभारत, वनपर्व अध्याय २२

" सुभद्रा व अभिमन्यु यांना आपल्या सुवर्णरथांत बसवून स्वतः श्रीकृष्णही त्या रथांत चढले व युधिष्ठिराला आश्वासन देऊन शैब्य, सुग्रीव इत्यादि विख्यात अश्वांनी युक्त अशा त्या रथावरून ते द्वारकेला गेले." तात्पर्य, महाभारतानुसार अभिमन्यु व सुभद्रा श्रीकृष्णांकडेच होते व उत्तरेच्या विवाहाच्या वेळीं द्वारकेहून श्रीकृष्णांनीं अभिमन्यूला आपल्याबरोबरच आणलें होतें. अभिमन्यूचा विवाह केवळ उत्तरेशीं झालेला होता. बलरामाला वत्सला या नांवाची कोणीही मुलगी नव्हती. त्यामुळें अभिमन्यूनें तिच्याशी लग्न करण्याचा, त्यासाठीं घटोत्कचानें आपला मायाबाजार उघडण्याचा व बलरामांची श्रीकृष्णांनीं वंचना करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. वत्सलाहरण ही मूळच्या सुभद्राहरणाची काल्पनिक विकृति असून सत्याचा व या विकृतीचा कांहींही संबंध नाही. असो.

विदुरांची महत्ता

महाभारतानुसार धर्माची शापित अधिदेवता म्हणजे विदुर होय. महाभारताच्या आदिपर्वाच्या १०७ व्या व १०८ व्या अध्यायांत विदुराच्या जन्माची कथा पुढीलप्रमाणें दिलेली आहे:— " कुणी एक माण्डव्य नांवाचे ऋषि होते. त्या ऋषींचें मौन व्रत असून ते अरण्यांत घोर तपश्चर्या करीत असतां कांही चोर त्या ऋषीच्या आश्रमांत गुपचूप शिरले. राजदूत त्या चोरांच्या मागावर होतेच. त्यांनी आश्रमांत येऊन ऋषीला त्या चोरांचा पत्ता विचारला. पण माण्डव्याचें मौन व्रत असल्यामुळें त्यांनीं कांहीच उत्तर दिलें नाहीं. शोधाअंतीं राजदूतांना चोर व द्रव्य ऋषीच्या आश्रमांतच सांपडले. तेव्हां हा गृहस्थ तपस्वी नसून त्या चोरांचाच ढोंगी साहचकर्ता असला पाहिजे असें त्या राजदूतांना स्वाभाविकपणेंच वाटलें. त्यांनीं चोरांबरोबरच माण्डव्यांनाही पकडून राजाच्या सभेंत आणलें. प्रत्यक्षाला पुराव्याची गरज न वाटल्यामुळें राजानेंही फारसा विचार न करतां चोरांबरोबर मांडव्यांनाही सुळावर चढविलें. ते चोर तेव्हांच गतप्राण झाले. पण दिवसचे दिवस लोटले तरी मांडव्य तसेच अविचल राहिले. तेव्हां आपल्या हातून केवढी भयंकर चूक

झाली याची राजाला कल्पना आली. त्यानें प्रार्थना करून मांडव्याची क्षमा मागितली. त्यांना सुळावरून खालीं उतरविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण काही केल्या त्याचें अग्र कांहीं निघेना. शेवटीं सूळ तोडून व अग्र जसेंचे तसेंच त्यांच्या गुह्यभागी राहूं देऊन त्याना खाली उतरविण्यांत आले. मांडव्यांनी राजाला क्षमा केली. पण कोणत्या तरी अधर्मावांचून सुळाची व त्याचें अग्र तसेंच अंगांत रुतून राहण्याची भयंकर वेदनामय शिक्षा आपल्याला होणें शक्य नाही अशा ठाम निश्चयानें आपले पूर्वार्जित कर्म काय आहे तें समजावून घ्यावें म्हणून मांडव्य तडक धर्माच्या देवतेकडे गेले. 'माझें असे कोणतें वाईट कर्म आहे की ज्यामुळें मला ही भयानक शिक्षा मिळावी ?' असें त्यांनी धर्माला विचारलें. त्यावर धर्मानें त्यांना असें उत्तर दिलें कीं, "तुमच्या बाल्यावस्थेंत चिमण्यांच्या अंगांत तुम्ही दर्भ टोंचला होता, त्याचें तुम्हांस हें फळ मिळालें आहे." हें ऐकतांच संतापून ऋषीनीं सांगितलें कीं, "वयाला बारावें वर्ष लागण्यापूर्वीच्या अजाणत्या अवस्थेंत केलेलें कोणतेंही कर्म पाप व पुण्याच्या मर्यादेत येऊं शकत नाहीं असा धर्मशास्त्राचा संकेत असतां त्या संकेताचें उल्लंघन करून अत्यंत लहान अपराधासाठीं तू मला अत्यंत भयानक शिक्षा दिली आहेस. तूं धर्म असतांही अधर्म केलास. त्याचें फळ भोगण्यासाठी तुलाच आपलें हें स्थान सोडून पृथ्वीवर मनुष्य होऊन रहावें लागेल." या शापाच्या अनुसार साक्षात् धर्मच मनुष्य होऊन विदुररूपानें पृथ्वीवर आला. या शापित धर्माच्या अथवा विदुराच्या महत्तेचें त्याच्या जन्मकाळीं त्याचे जन्मदाते व्यास महर्षि स्वतःच वर्णन करतांना म्हणतात :–

अयं च ते शुभे गर्भः श्रेयानुदरमागतः ।
धर्मात्मा भविता लोके सर्वबुद्धिमतां वरः ।। २७
धर्मो विदुररूपेण शापात्तस्य महात्मनः ।
मांडव्यस्यार्थतत्त्वज्ञः कामक्रोधविवर्जितः ।। २९
—महाभारत आदिपर्व अध्याय १०६

धर्मे चार्थे च कुशलो लोभक्रोधविवर्जितः ।
दीर्घदर्शी शमपरः कुरूणां च हिते रतः ।। १९
—महाभारत, आदिपर्व अध्याय १०८

त्रिषु लोकेषु न त्वासीत् कश्चित् विदुरसंमितः ।
धर्मे नित्यस्तथा राजन् धर्मे च परम गतः ॥ २२
—महाभारत, आदिपर्व अध्याय १०९

व्यास त्या दासीला म्हणाले, "हे शुभे, तुझ्या गर्भांत जो महापुरुष आलेला आहे तो अत्यंत कल्याणकारक आहे. तो सर्व बुद्धिमंतांत अत्यंत श्रेष्ठ असून धर्मात्मा म्हणून प्रसिद्ध होईल. विदुराच्या रूपानें मांडव्याच्या शापानें साक्षात् धर्मच पृथ्वीवर आलेला असून तो राज्यशास्त्रज्ञ व कामक्रोध यांनी पूर्णपणें विवर्जित आहे. धर्म व राज्यशास्त्र यांत कुशल, लोभ व क्रोध यांनी विवर्जित, दीर्घदर्शी, विकारांवर पूर्णपणें विजय मिळविलेला व कौरवांचें कल्याण साधण्यांत सदैव गढलेला असा विदुर आहे. त्रैलोक्यांत विदुरासारखा नित्यधर्मानुसारच वागणारा व धर्माचें संपूर्ण रहस्य जाणणारा असा कोणीही नसेल." महाभारतांत चित्रित केलेला विदुराचा संपूर्ण जीवनपट पाहिला तर महर्षीच्या विदुरासंबंधीच्या या अभिप्रायाची यथार्थता मनाला पटते.

विदुराच्या विवेकशक्तीचा प्रभाव

विदुराची विचक्षणता व कार्याकार्यविवेकाविषयीची त्याची पात्रता याची छाप कुरुकुलांतील वृद्ध व कर्त्या पुरुषांवरही त्याच्या बाल्यावस्थेपासूनच पडल्याचें दिसून येते. महत्त्वाच्या राजकीय बाबीपासून तर महत्त्वाच्या कौटुंबिक बाबींपर्यंत सर्व बाबतींत भीष्मासारख्या दीर्घदर्शी, कर्त्या व सर्वश्रेष्ठ पुरुषालाही विदुराचा सल्ला घेणें आवश्यक वाटत असे. धृतराष्ट्र व पांडु यांच्यापेक्षां वयानें विदुर वस्तुतः धाकटा होता. पण हे राजपुत्र विवाहाला योग्य होतांच त्यांचा विवाह करण्याच्या प्रश्नाच्या बाबतींत बरोबरीच्या नात्यानें विदुराचें मत विचारणें भीष्मासारख्या व्यक्तीलाही आवश्यक वाटलेलें आहे. भीष्म म्हणतात :—

गुणैः समुदितं सम्यगिदं नः प्रथितं कुलम् ।
अत्यन्यान्पृथिवीपालान् पृथिव्यामधिराज्यभाक् ॥ १
रक्षितं राजभिः पूर्वं धर्मविद्भिर्महात्मभिः ।
नोत्सादमगमच्चेदं कदाचिदिह नः कुलम् ॥ २

मया च सत्यवत्या च कृष्णेन च महात्मना ।
समवस्थापितं भूयो युष्मासु कुलतन्तुषु ॥ ३
तच्चैतद्वर्धते भूयः कुलं सागरवद्यथा ।
तथा मया विधातव्यं त्वया चैव न संशयः ॥ ४
श्रूयते यादवी कन्या स्वनुरूपा कुलस्य नः ।
सुबलस्यात्मजा चैव तथा भद्रेश्वरस्य च ॥
कुलीना रूपवत्यश्च ताः कन्याः पुत्र सर्वशः ।
उचिताश्चैव संबन्धे तेऽस्माकं क्षत्रियर्षभाः ॥ ६
मन्ये वरयितव्यास्ता इत्यहं धीमतां वर ।
संतानार्थं कुलस्यास्य यद्वा विदुर मन्यसे ॥ ७
—महाभारत, आदिपर्व अध्याय ११०

"आपलें हें कुळ अधिराज्य पदवीवर आरूढ झालेलें असून सर्व राजांपेक्षां अधिक प्रभावशाली ठरलें आहे. हें कुळ सर्व गुणांनीं युक्त असून प्रख्यात आहे. धर्मवेत्त्या व महानुभाव राजांनीं पूर्वी या कुळाचें संरक्षण केलें. या कुळाचा विध्वंस होऊं नये म्हणून मी, सत्यवतीनें व महानुभाव कृष्णद्वैपायनांनीं तुम्हां तीन कुलतन्तूंच्या रूपानें या कुलाची पुनश्च प्रतिष्ठापना केली आहे. सागराप्रमाणें हें कुल वाढावें असे प्रयत्न करणें हें जसें माझें तसेंच तुझेंही कर्तव्य आहे यांत कांहीं शंका नाहीं. यादवकन्या, गांधारदेशाचा राजा सुबल याची कन्या व मद्राधिपतीची कन्या या तीन मुली आपल्या कुलाला अनुरूप आहेत असें मीं ऐकलें आहे. या मुली कुलीन व रूपवान आहेत व त्यांचें घराणें हें क्षत्रिय श्रेष्ठांचें घराणें असल्यामुळें आपण त्यांच्याशीं हा संबंध करावा या गोष्टीस ते सर्वथा पात्र आहेत. हे बुद्धिमंतांत श्रेष्ठ असलेल्या विदुरा, कुलाच्या संतानवृद्धीसाठीं ही गोष्ट करावी असें माझे मत आहे. जर तुला हें म्हणणें पटत नसलें तर तुझें काय मत आहे तें सांग." भीष्मासारख्या व्यक्तीलाही एवढचा लहान वयांत विचार घेण्यास योग्य पुरुष विदुरच वाटला यावरून त्याचें महानुभावत्वच सिद्ध होतें. त्याच्या या योग्यतेची जाणीव राजा धृतराष्ट्रासारख्या खलपुरुषालाही कशी होती व कोणत्याही परिस्थितींत त्याला गमवावयास तो कसा सिद्ध नव्हता हें आपण मागें पाहिलेंच आहे.

स्पष्टवक्तेपणा

राजसभेंत मंत्रिपदावर असलेल्या व्यक्तीला राज्ययंत्राच्या हितासाठी पुष्कळदां राज्यकारभाराची अधिकारसूत्रें हातीं वागविणाऱ्या व्यक्तीला तोडून बोलणें भाग असतें. अनुरंजन हें भाट बंदीजनांचें कार्य आहे, मंत्री त्यासाठी नसतात. अनुरंजन करणाऱ्या शंभर मूर्खापेक्षां जें हिताचें असेल तेंच स्पष्ट पण तोंडावर सांगणाऱ्या स्पष्टवक्त्या पण विचक्षण मंत्र्याचीच राज्ययंत्राला खरी आवश्यकता असते. जे राजसत्तेच्या हिताच्या दृष्टीनें आपलें मत निर्भीडपणानें राजाच्या तोडावर सांगून त्याचें नियंत्रण करण्याचा प्रयत्न करीत नाहीत त्या मंत्र्यांची योग्यता अलंकारांनीं भूषविलेल्या स्त्रियांहून अधिक नाहीं असें शुक्रनीतींत स्पष्ट म्हटलें आहे. विदुर हा अशा मंत्र्यांपैकीं नसून महाभारतकारांनींच म्हटल्याप्रमाणें कौरव राजकुलाचें कल्याण हें त्याचें पदसिद्ध ध्येय असल्यामुळें त्याच्या आड येणारी प्रत्येक गोष्ट हाणून पाडण्याचा व त्यासाठीं सत्तेच्या रागालोभाची यत्किंचित्ही पर्वा न करतां कठोर निर्णय व कडवे शब्द ऐकविण्याचा त्यानें प्रथमपासूनच उपक्रम केलेला आहे. राजा दुर्योधन ज्या वेळीं जन्माला आला त्या वेळीं तो गर्दभस्वरानें ओरडूं लागला व कोल्हे, गिधाडें नि कावळे यांनीं त्याला प्रत्युत्तर दिलें असें महाभारतांत वर्णन आहे. ते अपशकुन पाहतांच धृतराष्ट्रानें भीष्म, विदुर व इतर मोठमोठ्या लोकांना एकत्रित करून काय करावें म्हणून विचारलें. त्यावेळीं विदुरानें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं —

यथेमानि निमित्तानि घोराणि मनुजाधिप ।
उत्थितानि सुते जाते ज्येष्ठे ते पुरुषर्षभ ॥ ३५
व्यक्तं कुलान्तकरणो भवितैष सुतस्तव ।
तस्य शान्तिः परित्यागे गुप्तावपनयो महान् ॥ ३६
शतमेकोनमप्यस्तु पुत्राणां ते महीपते ।
त्यजैनमेकं शान्ति चेत्कुलस्येच्छसि भारत ॥ ३७
एकेन कुरु वै क्षेमं कुलस्य जगतस्तथा ।
त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ॥ ३८
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् । ३९

—महाभारत, आदिपर्व अध्याय ११५

"तुझा ज्येष्ठ पुत्र जन्माला येतांच जे घोर अपशकुन झालेले आहेत त्यांचा विचार केला तर हा पुत्र सर्व कुळाचा अंत करणारा होईल हें स्पष्ट दिसतें. त्यामुळे या मुलाचा परित्याग करण्यांतच शांति व कल्याण असून त्याचें सरक्षण करण्यानें घोर अनर्थ निर्माण होईल. जर कुळांत स्वास्थ्य व समाधान नादावें अशी तुझी इच्छा असेल तर या मुलाचा तू त्वरित परित्याग कर. तुझी उर्वरित मुलें जगावयाचा व कुलनाश टाळण्याचा हा एकच मार्ग आहे. विश्व व कुळ याचें संरक्षण करण्यासाठी एका व्यक्तीचा परित्याग करणें आवश्यक असलें तर तो अवश्य केला पाहिजे. कुळासाठीं एका व्यक्तीचा, गांवासाठीं कुळाचा, जनपदासाठी गांवाचा व आत्मानंदासाठी पृथ्वीचाही परित्याग करावा असें शास्त्र आहे." पुत्रलोभानें विवश असलेल्या धृतराष्ट्राला विदुराची ही कडू गोळी पचवितांना केवढे प्रयास पडले असतील! पण दुर्योधनाच्या जन्माच्या वेळीच विदुरानें दिलेला हा संकेत किती दीर्घदर्शीपणाचा होता हें दुसऱ्या द्यूताच्या वेळी भावी महायुद्धाचे टिपरूं डक्यावर पडलेलें पाहून स्वत: गांधारीनेंच स्मृतिपूर्वक मान्य केलेलें आहे. ती धृतराष्ट्राला म्हणते :

जाते दुर्योधने क्षत्ता महामतिरभाषत ।
नीयतां परलोकाय साध्वयं कुलपांसनः ।। २
त्वन्नेत्राः सन्तु ते पुत्राः मा त्वां दीर्णाः प्रहासिषुः ।
तस्मादयं मद्वचनात् त्यज्यतां कुलपांसनः ।। ८

—महाभारत, सभापर्व अध्याय ७५

"दुर्योधन जन्माला येतांच महाबुद्धिशाली विदुरानें असें स्पष्ट सांगितलें होतें कीं हा कुलांगार आहे. याला मारून टाका. पण तें त्या वेळीं मोहवश होऊन तुम्ही ऐकिलें नाहीं. तुमचे उर्वरित पुत्र तुमच्या मार्गदर्शनानें जिवंत रहावे व सारे तुमच्या कृतीनें नाश पावूं नयेत असें मन:पूर्वक वाटत असेल तर माझ्या म्हणण्यासाठीं तरी या कुलांगार दुर्योधनाचा परित्याग करा." विदुराच्या कठोर स्पष्टवक्तेपणाची यासारखीं अनेक प्रत्यंतरें महाभारतांत मिळतात. ऐन द्यूत चालूं असतां व शकुनि एकामागून एक विजय संपादन करून

पांडवांचें राज्य गिळंकृत करीत असतां ती वार्ता ऐकून आनंदित होणाऱ्या धृतराष्ट्राला विदुराने पुढीलप्रमाणें उपदेश केला :—

महाराज विजानीहि यत्त्वां वक्ष्यामि भारत ।
मुमूर्षोरोषधमिव न रोचेतापि ते श्रुतम् ॥ २
यद्वै पुरा जातमात्रो रुराव गोमायुवद्विस्वर पापचेताः ।
दुर्योधनो भारतानां कुलघ्नः सोऽयं युक्तो भवतां कालहेतुः ॥ ३
विदितं ते महाप्राज्ञ भोजेष्वेवासमंजसम् ।
पुत्रं संत्यक्तवान् पूर्वं पौराणां हितकाम्यया ॥ ७
अन्धका यादवा भोजाः समेताः कंसमत्यजन् ।
नियोगात्तु हते तस्मिन् कृष्णेनामित्रघातिना ॥ ८
एवं ते ज्ञातयः सर्वे मोदमाना. शतं समाः ।
त्वं नियुक्तः सव्यसाची निगृह्णातु सुयोधनम् ॥ ९
निग्रहादस्य पापस्य मोदन्तां कुरवः सुखम् ॥ १०

—महाभारत, सभापर्व अध्याय ६२

"हे महाराज, मी जें सांगतों तें नीट लक्ष देऊन ऐका. मरणाऱ्या माणसाला औषध ज्याप्रमाणे आवडत नाही त्याचप्रमाणें आपणांसही माझे बोलणें आवडणार नाही याची मला पूर्णपणें कल्पना आहे. तरीपण माझे कर्तव्य म्हणून आपणांस मी जे कल्याणकारक आहे तें सांगतों. जन्मतःच कोल्हेच्याप्रमाणें ओरडणारा हा दुर्योधन सर्व भरत-कुलाचा विध्वंस करणारा असून तो तुमचा सर्व नाश घडवून आणल्या-खेरीज राहणार नाही. पूर्वी यादवांच्या मध्यें कुलांगार निपज-लेल्या कंस नांवाच्या राजपुत्राचा पौरांच्या हितासाठी यादवांनी परित्याग केला. पुढे श्रीकृष्णानें त्याला योगायोगानें ठार मारल्या-वर सर्व यादव मोठ्या आनंदानें राहूं लागले. तीच गोष्ट दुर्यो-धनाच्या बाबतीत करणें हाच कौरवकुलाच्या कल्याणाचा एकमात्र मार्ग आहे. तू अर्जुनाला आज्ञा कर. अर्जुन दुर्योधनाला पकडून बंदि-वासांत टाकील व या पाप्याच्या बंधनानें विनाश टळून सारें कौरव-कुल आनंदांत राहील." विदुराचीं ही वाक्ये ऐकतांच संतापलेल्या दुर्योधनानें "कठोर बोलणाऱ्या व आम्हांला पाण्यांत पाहणाऱ्या मंत्र्याची आम्हांला कांहीं एक आवश्यकता नसून तुला हवें तिकडे तू

जा " असें सांगतांच विदुरानें त्याच्या तोंडावर त्याला ठणठणीतपणे बजावलें कीं :—

यस्तु धर्मपरश्च स्याद्धित्वा भर्तुः प्रियाप्रिये ।
अप्रियाण्याह पथ्यानि तेन राजा सहायवान् ॥ १७

—महाभारत, सभापर्व अध्याय ६४

" जो धर्मपर राहून राजाला काय आवडेल अथवा काय आवडणार नाही याचा मुळीच विचार न करतां अप्रिय पण पथ्यकारक स्पष्टपणें बोलतो त्यानेंच राजा खरा साहाय्यवान् होतो. " विदुराच्या या वाक्बाणांनीं पीडलेला दुर्योधन हेतुतः त्याला अपमानित करण्यास्तव द्रौपदीला सभेंत आणण्याविषयीं सांगूं लागला असतां विदुरानें त्याला पुनश्च त्याच्या तोंडावर ठणकावून सांगितलें कीं:—

आशीविषास्ते शिरसि पूर्णकोपा महाविषाः ।
मा कोपिष्ठाः सुमन्दात्मन्मा गमस्त्वं यमक्षयम् ॥ ३

—महाभारत सभापर्व अध्याय ६६

" तुझ्या डोक्यावर अत्यंत संतापी व भयानक विष धारण करणारे सर्प उभे आहेत. त्यांना क्रोध आणू नकोस व आपला विनाश ओढवून घेऊं नकोस. "

धूर्तता व प्रयोगपटुता

धर्मनिष्ठ विदुर स्वतः कपटनीतीचा पुरस्कार करणें घृणास्पद समजत असले तरी दुसऱ्यानें केलेला कपटाचा प्रयोग ओळखण्याइतके विचक्षण, तो ध्यानांत आला नाहीं असें दाखविण्याइतके धूर्त व तो पूर्णपणें उलटविण्याइतके प्रयोगपटु होते. ज्या वेळी दुर्योधनानें भीमाला विषमिश्रित अन्न खाऊं घालून जिवें मारण्याच्या इच्छेने नदींत ढकलून दिलें त्या वेळीं विदुरानें कुंतीला दिलेला सल्ला या दृष्टीनें लक्षांत ठेवण्यासारखा आहे. भीम दिसत नाही असें पाहून घाबरलेले युधिष्ठिर कुतीकडे आले व भीम नाहींसा झाल्याचें तिला सांगू लागले. तें ऐकतांच घाबरून कुंतीनें विदुरांना बोलावणें पाठविलें व ती त्यांना म्हणू लागली.

क्व गतो भगवन् क्षत्तर्भीमसेनो न दृश्यते ॥ १३
उद्यानान्निर्गताः सर्वे भ्रातरो भ्रातृभिः सह ।
तत्रैकस्तु महाबाहुर्भीमो नाभ्येति मामिह ॥ १४
न च प्रीणयते चक्षुः सदा दुर्योधनस्य सः ।
क्रूरोऽसौ दुर्मतिः क्षुद्रो राज्यलुब्धोऽनपत्रपः ॥ १५
निहन्यादपि तं वीरं जातमन्युः सुयोधनः ।
तेन मे व्याकुलं चित्तं हृदयं दहतीव च ॥ १६

—महाभारत, आदिपर्व अध्याय १२१

" हे विदुरा, भीमसेन दिसत नाही. तो कुठें गेला असेल? उद्यानांत विहार करून सारे बंधु नुकतेच परत आले आहेत. पण भीम कांही त्यांच्यांत दिसत नाहीं. दुर्योधनाच्या डोळ्यांत भीम नेहमींच खुपत असतो. दुर्योधन अत्यत क्रूर असून तो दुष्टबुद्धीचा, क्षुद्र, राज्यलोभी, व निर्लज्ज आहे. राग व दश धरणारा दुर्योधन भीमाला ठारही मारण्याचा संभव आहे. म्हणून भीमाविषयीच्या शंकेनें माझें चित्त व्याकुळ झालें असून अंतःकरण जणू काही जळून गेलें आहे." कुतीचे हे उद्‌गार ऐकताच राजनीतिविशारद विदुरांना राज्यलोभासाठीं दुर्योधनाच्या व धृतराष्ट्राच्या मनोवृत्तीचे लोक काय काय करूं शकतात या गोष्टीची पूर्णपणें कल्पना आली. दुर्योधनाविरुद्ध कोणताही पुरावा नसल्यामुळें व धृतराष्ट्राच्याही पाताळयंत्रीपणाची त्यास पूर्णपणें कल्पना असल्यामुळें या गुप्त आघाताविरुद्ध नुसता आरडाओरडा करून कांहींच उपयोग नव्हता. जर भीमाचें कांहीं बरेंवाईट झालेंच असलें तर कानावर हात ठेवून शोकाचें ढोंग करावयास धृतराष्ट्र व दुर्योधन मोकळेच होते. त्यांच्यावर उघडपणें कोणताच आरोप घेण्यासारखा नव्हता. गुप्तपणेंच हें काम झालेलें होतें. व नुसता बभ्रा केल्यापासून स्वतःचा कांहीं एक फायदा नसून उलटा तोटाच होणार होता. कारण त्यामुळें शत्रुपक्ष सावध होऊन अधिक गुप्तपणें व दक्षतेनें उरलेल्या पांडवांनाही मारण्याचा सभव होता. त्यामुळें आपणांला कांहीच माहिती नाही असें दाखवून व शत्रुपक्षाला असावध ठेवून स्वतःचें सरक्षण करणें व गुप्तपणेंच त्यांची कारस्थानें हाणून पाडणें हा

एकच मार्ग होता. प्रौढांना ही गोष्ट सांगितली तर त्यांना ती खरी वाटणारी नव्हती. धृतराष्ट्र, दुर्योधन यांना ही गोष्ट सांगितल्यास सांगणाऱ्याच्याच पदरी वरून उपहास व दोष बांधून अधिक गुप्त व हानिकारक कारस्थानेंच फक्त उपस्थित होणारीं होतीं. म्हणून विदुरानें कुंतीला पुढीलप्रमाणें हिताचा सल्ला दिला :—

मैवं वदस्व कल्याणि शेषसंरक्षणं कुरु ।
प्रत्यादिष्टो हि दुष्टात्मा शेषेऽपि प्रहरेत्तव ॥ १७
दीर्घायुषस्तव सुता यथोवाच महामुनिः ।
आगमिष्यति ते पुत्रः प्रीतिं चोत्पादयिष्यति ॥ १८

—महाभारत, आदिपर्व अध्याय १२९

" हे कुंती, तू जें माझ्याजवळ बोललीस तें इतरत्र कोठेंही बोलू नकोस. उरलेल्या तुझ्या पुत्रांचें संरक्षण कर. जर दुर्योधनाला तू भीमाला कां व कसें मारलेंस असें विचारलेंस तर तो उरलेल्या तुझ्या पुत्रांच्या विनाशाचीही कारस्थानें केल्यावांचून राहणार नाहीं. तुझे सर्व पुत्र दीर्घायुषी आहेत असें महर्षि व्यासांनींच म्हटलें आहे. तुझा पुत्र निश्चित येईल व तुला आनंद देईल." विदुराच्या या सल्ल्यानुसार कुतीनें ती गोष्ट कधीही तोंडावाटें उच्चारली नाहीं. नुसत्या आकारावरून दुसऱ्याच्या मनांतले दुष्टभाव विदुर सहज ओळखू शकत असत. वारणावतांत पांडवांना लाक्षागृहांत जाळून टाकण्याची कल्पना व कारस्थान विदुरांनी धृतराष्ट्रदुर्योधनांच्या चेहऱ्यांवरील नुसत्या भावावरून ओळखलें. महाभारतांत म्हटलें आहे की :—

तेषामिङ्गितभावज्ञो विदुरस्तत्त्वदर्शिवान् ।
आकारेण च तं मन्त्रं बुबुधे दुष्टचेतसाम् ॥ ३

—महाभारत आदिपर्व अध्याय १४१

इंगितावरून भाव ओळखण्यांत अत्यंत कुशल असलेल्या तत्त्वदर्शी विदुरानें त्या दुष्टबुद्धीच्या लोकांचें तें कारस्थान केवळ त्यांच्या चेहरेपट्टीवरून ओळखलें. पांडव ज्या वेळीं वारणावतास निघाले, त्या वेळी त्यांना पोहोंचवावयास आलेले सर्व पौरजन निघून गेल्यानंतर विदु-

रांनी म्लेंच्छ भाषेत युधिष्ठिराला भावी संकटाची पूर्ण कल्पना दिली व मन ताब्यांत ठेवून त्याचा यत्किंचित्‌ही बभ्रा न करतां कांहींच लक्षांत आलें नाही असें दाखवून गुप्तपणें संकटांतून पार पडावें असें सांगितलें. साहचार्थ माझी माणसें येतील असेंही त्यांनीं सुचविलें. विदुरकाका काय म्हणाले हें कुती विचारूं लागली तेव्हां युधिष्ठिरांनीं तिला असें उत्तर दिले की :–

गृहादग्निश्च बोद्धव्य इति मां विदुरोऽब्रवीत्‌ ।
पन्थाश्च वो नाविदितः कश्चित्स्यादिति धर्मधीः ॥ ३२
जितेन्द्रियश्च वसुधां प्राप्स्यतीति च मेऽब्रवीत्‌ ।
विज्ञातमिति तत्सर्वं प्रत्युक्तो विदुरो मया ॥ ३३

—महाभारत, आदिपर्व अध्याय १४५

"घरापासून अग्नीचें भय आहे असें विदुराने मला सांगितलें. तेथून बाहेर कसें पडावयाचें हें तुम्हांला अज्ञात राहणार नाही, कोणीतरी तिथें राहील असेंही त्या धर्मनिष्ठ पुरुषानें मला सुचविलें. जितेन्द्रिय पुरुषाला शेवटी राज्य प्राप्त होतें असेंही विदुर मला म्हणाले. सर्व कांहीं माझ्या लक्षांत आलें, असें मी त्यांना उत्तर दिलें." विदुरांच्या या इषाऱ्यानुरूप वारणावतास जातांच ज्या घरांत आपल्या राहण्याची व्यवस्था केली आहे, तें लाक्षागृह आहे हें युधिष्ठिराच्या ध्यानांत आले. तेथून युक्तीनें बाहेर पडावयाचें म्हणजे आंतून भुयार करण्याची आवश्यकता होती. तें कसें करावें या चिंतेत पांडव असतां विदुरानें एक कुशल खनिक तेथें पाठविला व त्याच्याकडून भुयार तयार करवून दिलें. महाभारतांत म्हटलें आहे की :—

विदुरस्य सुहृत्कश्चित्खनकः कुशलो नरः ।
विविक्ते पाण्डवान्राजन्निदं वचनमब्रवीत्‌ ॥ १
प्रहितो विदुरेणास्मि खनकः कुशलो ह्यहम्‌ ।
पाण्डवानां प्रियं कार्यमिति किं करवाणि वः ॥ २
स तथेति प्रतिश्रुत्य खनको यत्नमास्थित. ।
परिखामुत्किरन्नाम चकार च महाबिलम्‌ ॥ १६
चक्र च वेश्मनस्तस्य मध्येनातिमहद्‌ बिलम्‌ ।
कपाटयुक्तमज्ञातं समं भूम्याश्च भारत ॥ १७

—महाभारत, आदिपर्व अध्याय १४७

" विदुराचा कोणी एक जमीन खणण्याच्या कामांत अत्यंत कुशल असलेला सुहृद् होता. तो एकांतांत पांडवांकडे येऊन त्यांना म्हणूं लागला कीं, मी अत्यंत कुशल खनक असून मला विदुरानें येथें पाठविलें आहे. पांडवांचें प्रिय करावें अशी मला त्यांची आज्ञा आहे. मी आपलें काय प्रिय करूं तें सांगा. नंतर युधिष्ठिराच्या आज्ञेनुरूप त्या खनकानें अत्यंत कुशलतेनें त्या घराच्या आंतून वनापर्यंत जाणारे एक मोठें भुयार तयार केलें. तें चांगलेंच मोठें असून त्याच्यावरून कपाट असल्यामुळें व तें कपाट जमिनीत अगदीं सारखें बसविलें असल्यामुळें कोणाच्याही तें लक्षांत आलें नाहीं. त्यानंतर पांडव त्या भुयारांतून बाहेर गेल्यावर रस्त्यांत त्यांना एक मोठी नदी लागली व ती तरून कशी जावी असा मोठाच प्रश्न पांडवांच्या समोर उत्पन्न झाला. पण तेथेंही विदुरानेंच त्यांना हात दिला. महाभारतकार म्हणतात :—

एतस्मिन्नेव काले तु यथासंप्रत्ययं कविः ।
विदुरः प्रेषयामास तद्वनं पुरुषं शुचिम् ॥ १
स गत्वा तु यथोद्देशं पाण्डवान्ददृशे वने ।
जनन्या सह कौरव्य मापयानान्नदीजलम् ॥ २
विदितं तन्महाबुद्धेर्विदुरस्य महात्मनः ।
ततस्तस्यापि चारेण चेष्टितं पापचेतसः ॥ ३
ततः प्रवासितो विद्वान्विदुरेण नरस्तदा ।
पार्थानां दर्शयामास मनो मारुतगामिनीम् ॥ ४
सर्ववातसहां नावं यंत्रयुक्तां पताकिनीम् ।
शिवे भागीरथीतीरे नरैर्विस्रम्भिभिः कृतान् ॥ ५
ततः पुनरथोवाच ज्ञापकं पूर्वचोदितम् ।
युधिष्ठिर निबोधेदं संज्ञार्थं वचनं कवेः ॥ ६
कक्षघ्नः शिशिरघ्नश्च महाकक्षे बिलौकसः ।
न हन्तीत्येवमात्मानं यो रक्षति स जीवति ॥ ७
तेन मां प्रेषितं विद्धि विश्वस्तं संज्ञयाऽनया ।
भूयश्चैवाह मां क्षत्ता विदुरः सर्वतोऽर्थवित् ॥ ८

कर्णं दुर्योधनं चैव भ्रातृभिः सहितं रणे ।
शकुनिं चैव कौन्तेय विजेताऽसि न संशयः ॥ ९
इयं वारिपथे युक्ता नौरप्सु सुखगामिनी ।
मोचिष्यति वः सर्वानस्माद्देशान्न संशयः ॥ १०
अथ तान्व्यथितान्दृष्ट्वा सह मात्रा नरोत्तमान् ।
नावमारोप्य गङ्गायां प्रस्थितानब्रवीत्पुनः ॥ ११
विदुरो मुष्टिमुपाघ्राय परिष्वज्य वचो मुहुः ।
अरिष्टं गच्छता व्यग्राः पन्थानमिति चाब्रवीत् ॥ १२
इत्युक्त्वा स तु तान्वीरान्पुमान्विदुरचोदितः ।
तारयामास राजेन्द्र गङ्गां नावा नरर्षभान् ॥ १३
तारयित्वा ततो गङ्गां पारं प्राप्तांश्च सर्वशः ।
जयाशिषः प्रयुज्याथ यथागतमगाद्धि सः ॥ १४
पाण्डवाश्च महात्मानः प्रतिसंदिश्य वै कवेः ।
गङ्गामुत्तीर्य वेगेन जग्मुर्गूढमलक्षिताः ॥ १५
--महाभारत, आदिपर्व अध्याय १४९

"त्याचवेळीं पूर्वीच ठरल्याप्रमाणें एका खात्रीच्या पुरुषाला विदुरानें त्या वनांत पाठविलें. तेथें त्याच्या असें दृष्टीस पडलें कीं, पांडव वनांत आपल्या मातेबरोबर असून ते पाण्याची खोली किती आहे याचें मोजमाप करीत आहेत. त्यानें पांडवांची भेट घेऊन त्यांना गंगा तरून जाण्यासाठीं पूर्वीच सिद्ध ठेवलेली नाव दाखविली. ती यंत्रयुक्त होती. तिच्यावरील माणसें विश्वासू होतीं. विदुराची ओळख त्या पुरुषानें सांगितली. विदुराचे आशीर्वाद पांडवांना कळविले. भावी विजयाच्या व वैभवाच्या आशेनें त्यानें पांडवांना प्रोत्साहित केलें व गंगेच्या पार करून दिलें. लगेच तो पुरुष आपल्या ठिकाणीं निघून गेला व पांडवही गुप्तपणें अरण्यांत निघून गेले." याप्रमाणें विदुराच्या सचिवसत्तेनें धृतराष्ट्राच्या कुटिल राजसत्तेचा पूर्णपणें पराभव करून पांडवांना वांचविले. पुढें पांडव द्रौपदीस्वयंवरांत प्रकट झाल्यानंतर ते कांही अनाथ राहिले नव्हते. एका बाजूला द्रुपदाच्या राजसत्तेचें व दुसऱ्या बाजूला यादवांच्या बलवान् गणसत्तेचें साह्य त्यांना उपलब्ध झालेलें होतें. त्यांच्यावर स्वारी

करून त्यांना नष्ट करण्याचे बेत कर्णादि लोक करीत असतां त्यांत कुळाचा सर्वनाश होण्याचा संभव आहे हें ओळखून पांडवांच्या सामर्थ्याची यथार्थ कल्पना विदुरानें धृतराष्ट्राला दिली व त्याचें मन वळवून सामर्थ्यशील पांडवांना सन्मानानें हस्तिनापुरांत आणवून सर्वनाश टाळला. तो धृतराष्ट्राला म्हणतो :—

तेषामनुग्रहश्चायं सर्वेषां चैव नः कुले ।
जीवितं च परं श्रेयः क्षत्रस्य च विवर्धनम् ॥ २४
द्रुपदोपि महान् राजा कृतवैरश्च नः पुरा ।
तस्य संग्रहणं राजन्स्वपक्षस्य विवर्धनम् ॥ २५
बलवन्तश्च दाशार्हा बहवश्च विशांपते ।
यतः कृष्णस्ततः सर्वे यतः कृष्णस्ततो जयः ॥ २६
यच्च साम्नैव शक्येत कार्यं साधयितुं नृप ।
को दैवशप्तस्तत्कार्यं विग्रहेण समाचरेत् ॥ २७
श्रुत्वा च जीवतः पार्थान्पौरजानपदा जनाः ।
बलवद्दर्शने हृष्टास्तेषां राजन्प्रियं कुरु ॥ २८
दुर्योधनश्च कर्णश्च शकुनिश्चापि सौबलः ।
अधर्मयुक्ता दुष्प्रज्ञा बाला मेषां वचः कृथाः ॥ २९
उक्तमेतत्पुरा राजन्मया गुणवतस्तव ।
दुर्योधनापराधेन प्रजेयं वै विनङ्क्ष्यति ॥ ३०

—महाभारत, आदिपर्व अ. २०५

"जर पांडवांच्या विषयीं स्नेहभाव दर्शविला तर आपल्या कुळांतील सर्व लोकांच्या जीविताविषयींच स्नेहभाव दर्शविल्यासारखें होणार आहे. व आपल्याच पराक्रमाचें तेज त्यांच्या व आपल्या एकीनें अधिक वाढणार आहे. राजा द्रुपद हा अत्यंत श्रेष्ठ राजा असून त्याचें आपलें वैर पूर्वीपासूनचें आहे. जर या निमित्तानें पांडवांच्याकडून त्याच्याशीं स्नेहसंबंध जोडतां आला तर त्यांत आपल्याच पक्षाचें बळ वस्तुतः वाढणार आहे. शिवाय यादव अत्यंत बलवान् असून संख्येनेंही पुष्कळ आहेत. जिकडे श्रीकृष्ण राहील तिकडेच सर्व यादव राहणार व जिकडे श्रीकृष्ण त्या पक्षालाच, त्यांचें सामर्थ्य ध्यानांत घेतां जय मिळणार ही गोष्ट निर्विवाद आहे. जी गोष्ट सामानें सहज साध्य होण्यासारखी आहे तिच्यासाठीं उगाच हानिकारक व सर्वनाश करणाऱ्या युद्धाची कास दैवानेंच शापिलेल्या

व्यक्तीवांचून दुसरी कोण धरील? पाण्डव जिवंत आहेत ही वार्ता ऐकतांच पौरजानपदांतील लोक अत्यंत उत्साहित झालेले असून त्यांना पांडवांना पाहण्याची अत्यंत उत्कंठा लागलेली आहे. राजा या नात्यानें त्यांची इच्छा पूर्ण करणें हें तुझें पहिलें कर्तव्य आहे. दुर्योधन, कर्ण व शकुनि हे अत्यंत अधार्मिक व दुष्ट बुद्धीचे लोक आहेत. या मूर्खाचें तू कांही एक ऐकू नकोस. हे राजा, दुर्योधनाच्या अपराधामुळें या सर्व प्रजेचा नाश होणार आहे हें तुला मी पूर्वीच सांगितलेलें आहे. त्याचींच हीं पदचिन्हें होत." विदुराच्या या सल्ल्यानुसार धृतराष्ट्रानें पांडवांना सन्मानानें राजधानीत आणलें व त्यानतर फाळणी करण्यांत येऊन एक पांडवांचें व दुसरें कौरवांचें अशी दोन स्वतत्र राज्यें अस्तित्वांत आलीं. पांडवांना आपल्या राजसभेंत, श्रीकृष्णासारखा मित्र लाभल्यामुळें दुसऱ्या कोणा मंत्र्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळें त्यांनी भीष्माना ज्या प्रमाणें वोलाविलें नाही तसेंच विदुरालाही त्यांनीं हस्तिनापूरच्या गादीचें मंत्रिपद सोडून आपणाकडे येण्यास्तव विनविलें नाही. राजसूयाच्या वेळीं ते पांडवांच्या निमंत्रणानुसार यज्ञांत आले होते, व तात्पुरतें काम म्हणून त्यांनी दान इत्यादि व्ययाचें कामही पत्करलें होतें. महाभारतांत म्हटले आहे:—

क्षत्ता व्ययकरस्त्वासीद्विदुरः सर्वधर्मवित् । ९

—महाभारत, सभापर्व अध्याय ३५

यानंतर दोन स्वतत्र राज्यें अस्तित्वांत असल्यावर कुळाचें संरक्षण व्हावें व ज्या गादीचे आपण मंत्री आहोंत तिचा सर्वनाश होऊं नये म्हणून सामापासून बिभीषिकेपर्यत सर्व उपायांचें अवलंबन करून विदुरांनी विनाशाच्या प्रत्येक क्षणीं राजसत्तेला सावध करण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे.

मंत्र्याचें कर्तव्य पार पाडलें

राजा धृतराष्ट्र ज्यावेळीं द्यूताचे कारस्थान करूं लागला त्यावेळीं विदुरानेंच मंत्री या नात्यानें त्याला भावी विनाशाचा स्पष्ट संकेत केला. तो राजाला म्हणतो:—

नाभिनन्दे नृपते प्रैषमेतं मैवं कृथाः कुलनाशाद्बिभेमि ।
पुत्रैर्भिन्नैः कलहस्ते ध्रुवं स्यादेतच्छङ्के द्यूतकृते नरेन्द्र ।। ३

—महाभारत, सभापर्व अध्याय ५७

"हे राजन् तुझ्या या कुकृत्याच्या बाबतीत मी तुझें मुळीच अभिनंदन करूं शकत नाहीं. तूं हें करूं नयेस. यामुळें संपूर्ण कुळाचा नाश होईल अशी मला भीति वाटते. यामुळें पाडव व तुझे पुत्र यांच्यांत विरोध उत्पन्न होईल व त्या संघर्षात सर्वनाश होईल असे मला निश्चित वाटतें." पण विदुराचें न ऐकतां अध:पतित राजसत्तेनें द्यूताचाच निर्णय घेतला. विदुरालाच युधिष्ठिराकडे निमंत्रणासाठी पाठविण्यांत आलें. यावेळीं युधिष्ठिर हे सर्व पृथ्वीचे साम्राज्य चालविणारे समर्थ सम्राट होते. विदुराने भावी अनर्थ टाळण्यासाठीं त्यांना द्यूतांत कोण कोण प्रतिपक्षी आहेत, काय अनर्थ होण्याचा संभव आहे व आपण ते थांबविण्याचा शक्यतो प्रयत्न कसा केला याची पूर्णपणें कल्पना दिली. एका स्वतत्र व जबाबदार राजाला ते यापेक्षां अधिक काय सांगू शकणार होते ? त्यांचें कर्तव्य त्यांनीं पूर्णपणें पार पाडलें. ते युधिष्ठिराला म्हणतात:—

जानाम्यहं द्यूतमनर्थमूलं कृतस्य यत्नोऽस्य मया निवारणे ।
राजा च मां प्राहिणोत्त्वत्सकाशं श्रुत्वा विद्वन् श्रेय इहाचरस्व ।।११
गान्धारराजः शकुनिर्विशाम्पते राजाऽतिदेवीकृतहस्तो मताक्षः ।
विंविंशतिः चित्रसेनश्च राजा सत्यव्रतः पुरुमित्रो जयश्च ।। १३

—महाभारत, सभापर्व अध्याय ५८

"द्यूत हें अनर्थाचें मूळ आहे हे मला पूर्णपणें माहीत आहे म्हणून त्याच्या निवारणाचा जितका प्रयत्न करणे शक्य आहे इतका मी केला. पण हट्टानें राजा धृतराष्ट्रानें मला तुझ्याकडे पाठविले आहे. तुला सारें कांही समजतेंच. जें कल्याणाचें तुला वाटेल त्याचे तू आचरण कर. तेथें गांधारराज शकुनि हा पट्टीचा द्यूतप्रवीण, सदैव द्यूत खेळणारा व फांसे ज्याला दान द्यावयास सदैव अनुकूल असतात असा आहे. तसेच विविंशति, राजा चित्रसेन, सत्यव्रत, पुरुमित्र व विजय असे पट्टीचे द्यूतकार तेथें आहेत." इतकें सांगूनही युधिष्ठिर द्यूतास सिद्ध झाले ! द्यूत प्रत्यक्ष चालू असतांही विदुरानें दुर्योधनाचा कोप

ओढवून घेऊन त्याचे अनर्थ धृतराष्ट्राला समजावून सांगून त्याला सावध करण्याचा व त्याच्याकडून तें द्यूत थांबविण्याचा शक्य तों प्रयत्न केला. शेवटीं तर शकुनीला त्याच्या देशांत ताबडतोब परत पाठविण्याचाही सल्ला त्यानें राजाला दिला. तो म्हणतोः–

जानीमहे देवितं सौबलस्य वेद द्यूते निकृतिं पार्वतीयः ।
यतः प्राप्तः शकुनिस्तत्र यातु मा यूयुधो भारत पाण्डवेयान् ॥ १२

––महाभारत, सभापर्व अ. ६३

"शकुनीचें द्यूतकौशल आम्हांला पूर्णपणें परिचित आहे. द्यूतांतील कपट विद्या त्याला पूर्णपणें अवगत आहे. शकुनि जेथून येथें आला आहे तेथें त्याला परत जाऊं द्या. पांडवांशी युद्ध ओढवून घेणें हितावह नाहीं." पण आपल्या श्रेष्ठ महामंत्र्याचें ऐकावयाच्या मनःस्थितींत ती उन्मत्त राजसत्ता नव्हती. पुढें द्रौपदीचें वस्त्रहरण होण्यापर्यंत पाळी येऊन ठेपल्यावर, केवळ धृतराष्ट्रानें मनांत आणलें तरच हा अधःपात टळेल व गांधारीवांचून धृतराष्ट्राला हें कोणीही करावयास लावूं शकणार नाहीं हें ओळखून त्यानें गांधारीला राजसभेंत आणवून तिच्याकडून धृतराष्ट्राला वळविलें. पुन्हां दुसऱ्या द्यूताच्या वेळीही विदुरानें राजसत्तेला सावध करण्याचा प्रयत्न केला. इतकेंच नव्हे तर पांडव वनांत गेल्यावर राजाला भावी अनर्थाची पूर्णपणें कल्पना देऊन बिभीषिकेच्या साहचानेंही त्यानें राजाला वळविण्याचा व पांडवांना वनांतून परत बोलाविण्याचा प्रयत्न केला. महाभारतकार म्हणतात :––

कथं गच्छति कौन्तेयो धर्मपुत्रो युधिष्ठिरः ।
भीमसेनः सव्यसाची माद्रीपुत्रौ च पाण्डवौ ॥ २
धौम्यश्चैव कथं क्षत्तर्द्रौपदी च यशस्विनी ।
श्रोतुमिच्छाम्यहं सर्वं तेषां शंस विचेष्टितम् ॥ ३

विदुर उवाच ।

वस्त्रेण संवृत्य मुखं कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
बाहू विशालौ संपश्यन्भीमो गच्छति पाण्डवः ॥ ४
सिकता वपन्सव्यसाची राजानमनुगच्छति ।
माद्रीपुत्रः सहदेवो मुखमालिप्य गच्छति ॥ ५

पांसूपलिप्तसर्वांगो नकुलश्चित्तविद्बलः ।
दर्शनीयतमो लोके राजानमनुगच्छति ।। ६
कृष्णा तु केशैः प्रच्छाद्य मुखमायतलोचना ।
दर्शनीया प्ररुदती राजानमनुगच्छति ।। ७
धौम्यो रौद्राणि सामानि याम्यानि च विशांपते ।
गायन्गच्छति मार्गेषु कुशानादाय पाणिना ।। ८

धृतराष्ट्र उवाच ।

विविधानीह रूपाणि कृत्वा गच्छन्ति पाण्डवाः ।
तन्ममाचक्ष्व विदुर कस्मादेवं व्रजन्ति ते ।। ९

विदुर उवाच ।

निकृतस्यापि ते पुत्रैर्हृते राज्ये धनेषु च ।
न धर्माच्चलते बुद्धिर्धर्मराजस्य धीमतः ।। १०
योऽसौ राजा घृणी नित्यं धार्तराष्ट्रेषु भारत ।
निकृत्या भ्रंशितः क्रोधान्नोन्मीलयति लोचने ।। ११
नाहं जनं निर्दहेयं दृष्ट्वा घोरेण चक्षुषा ।
स पिधाय मुखं राजा तस्माद् गच्छति पाण्डवः ।। १२
यथा च भीमो व्रजति तन्मे निगदतः शृणु ।
बाहुवीर्यबलेन नास्ति समो ममेति भरतर्षभ ।। १३
बाहू विशालौ कृत्वासौ तेन भीमोऽपि गच्छति ।
बाहू विदर्शयन्राजन्बाहुद्रविणदर्पितः ।। १४
चिकीर्षन्कर्म शत्रुभ्यो बाहुद्रव्यानुरूपतः ।
प्राविशच्छरसंपातान्कुन्तीपुत्रोऽर्जुनस्तदा ।। १५
सिकता वपन्सव्यसाची राजानमनुगच्छति ।
असक्ताः सिकतास्तस्य यथा संप्रति भारत ।
असक्तं शरवर्षाणि तथा मोक्ष्यति शत्रुषु ।। १६
न मे कश्चिद्विजानीयान्मुखमद्येति भारत ।
मुखमालिप्यते नासौ सहदेवोऽपि गच्छति ।। १७
नाहं मनांस्यावदेयं मार्गे स्त्रीणामिति प्रभो ।
पांसूपलिप्तसर्वाङ्गो नकुलस्तेन गच्छति ।। १८

एकवस्त्रा प्ररुदती मुक्तकेशी रजस्वला ।
शोणितेनाक्तवसना द्रौपदी वाक्यमब्रवीत् ॥ १९
यत्कृतेहमिदं प्राप्ता तेषां वर्षे चतुर्दशे ।
हतपत्यो हतसुता हतबन्धुजनप्रियाः ॥ २०
बहुशोणितदिग्धाङ्ग्यो मुक्तकेश्यो रजस्वलाः ।
एवं कृतोदका भार्याः प्रवेक्ष्यन्ति गजाह्वयम् ॥ २१
कृत्वा तु नैर्ऋतान्दर्भान्धीरो धौम्यः पुरोहितः ।
सामानि गायन्याम्यानि पुरतो याति भारत ॥ २२
हतेषु भारतेष्वाजौ कुरूणां गुरवस्तदा ।
एव सामानि गास्यन्तीत्युक्त्वा धौम्योपि गच्छति ॥ २३
हा हा गच्छन्ति नो नाथाः समवेक्ष्यध्वमीदृशम् ।
अहो धिक्कुरुवृद्धानां बालानामिव चेष्टितम् ॥ २४
राष्ट्रेभ्यः पाण्डुदायादाँल्लोभान्निर्वासयन्ति ये ।
अनाथाः स्म वयं सर्वे वियुक्ताः पाण्डुनन्दनैः ॥ २५
दुर्विनीतेषु लुब्धेषु का प्रीतिः कौरवेषु नः ।
इति पौराः सुदुःखार्ताः क्रोशन्ति स्म पुनः पुनः ॥ २६
एवमाकारलिङ्गैस्ते व्यवसायं मनोगतम् ।
कथयन्तश्च कौन्तेया वनं जग्मुर्मनस्विनः ॥ २७
एवं तेषु नराग्र्येषु निर्यत्सु गजसाह्वयात् ।
अनभ्रे विद्युतश्चासन्भूमिश्च समकम्पत ॥ २८
राहुरग्रसदादित्यमपर्वणि विशांपते ।
उल्का चाप्यपसव्येन पुरं कृत्वा व्यशीर्यत ॥ २९
प्रत्याहरन्ति क्रव्यादा गृध्रगोमायुवायसाः ।
देवायतनचैत्येषु प्राकाराट्टालकेषु च ॥ ३०
एवमेते महोत्पाता प्रादुरासन्दुरासदाः ।
भरतानामभावाय राजन्दुर्मन्त्रिते तव ॥ ३१

—महाभारत, सभापर्व अ. ८०

"धृतराष्ट्र विदुराला विचारूं लागला की, धर्मपुत्र युधिष्ठिर, भीमसेन, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी वनांत जातांना कोणत्या

पद्धतीनें गेले तें मला सांग. त्यावर विदुरानें सांगितलें, महाराज, वस्त्रानें आपलें तोंड झाकून कुंतीपुत्र युधिष्ठिर राजधानीतून बाहेर पडला. जातांना भीमसेन आपल्या विशाल बाहूंकडे पहात गेला. अर्जुन जाताना हातांतील वाळू जमिनीवर टाकीत जात होता. सहदेव तोंडाला माती सारवून गेला. सौन्दर्यसंपन्न नकुल सर्वांगाला राख फासून गेला. विशाललोचना द्रौपदी केसांनीं आपलें तोंड आच्छादून रडत रडत राजाच्या मागोमाग जात होती. पुरोहित धौम्य हातांत दर्भ घेऊन यमदेवताविषयक रौद्रसामें गात सर्वांच्या मागोमाग जात होते. हें ऐकतांच धृतराष्ट्र विचारूं लागला, याप्रमाणें विलक्षण रूपे करून या सर्वांनी जाण्याचें कारण काय? त्यावर विदुरानें सांगितलें, राजन् कपटानें फसवून तुझ्या पुत्रांनीं राज्य हिरावून घेतलें तरी युधिष्ठिराची बुद्धि धर्मापासून विचलित होत नाही. अजूनही तुझ्या पुत्रांवर दया करावी असें युधिष्ठिराला वाटतें म्हणून आलेल्या नेत्रावाटें क्रोध बाहेर पडून डोळ्यांच्या तेजानें कौरव जळू नयेत म्हणून आपले डोळे झाकून युधिष्ठिर वनांत गेले. माझ्यासारखा बाहुबलशाली जगांत कोणीही नसून आपल्या शत्रूचें विमर्दन बाहुबलाला अनुसरून मी करणार आहें असें भीमसेन बाहूकडे पहात सुचवीत होता. आज ज्याप्रमाणें मी माझ्या हातांतून वाळूचा अखंड वर्षाव करीत आहे तितक्याच सहजतेनें मी रणांगणांत शत्रूवर अविरत बाणवर्षाव करणार आहे हें अर्जुन सुचवीत होता. कोणीही आपल्याला ओळखू नये म्हणून सहदेवानें तोंड सारवून घेतलें होतें. जातांना स्त्रिया आपणांवर भाळू नयेत म्हणून नकुलानें अंगाला राख फासली होती. रजस्वला मुक्तकेशा याज्ञसेनी ज्या शोणितानें भरलेल्या वस्त्रानें राजसभेंत आणण्यांत आली त्या वस्त्रानेंच वनांत गेली. जातांना ती म्हणाली आज ज्यांच्यामुळे मला ही अवस्था प्राप्त झाली त्यांच्या, पति व पुत्र यांनीं विरहित व सर्व बांधव ठार मेलेल्या स्त्रिया अशाच शोणितानें वस्त्रें भिजवून केस पाठीवर मोकळे सोडून रजस्वला अवस्थेत आपल्या पतीना उदकदान करून हस्तिनापुरांत परततील. धौम्य पुरोहित असें सुचवीत होते कीं सर्व कौरव मेल्यावर कौरवांचे राजपुरोहित असेच यमदेवतासामें

गात राजधानीत परततील. लोभानें पांडवांची नागवणूक करणाऱ्या कौरवांना धिक्कार असो, त्यांच्यावर आमचा काडीचाही विश्वास नाही असें म्हणत व रडत प्रजाजन पाडवांच्या पाठोपाठ जात होते. ते जात असतां भूकप झाला. मेघ नसतां आकाशांत विजा चमकूं लागल्या ग्रहण नसतां राहूने सूर्याला गिळले व उल्का हस्तिनापुराला उजवी घालून आकाशांतून पडू लागल्या. गिधाडें, कावळें व कोल्हे मंदिरांतून आक्रोश करू लागले राजा, कौरवाचा नाश निश्चित होणार व तुझा मूर्खपणा हेच त्याचें कारण ठरणार." विदुराच्या या बिभीषिकेचाही राजसत्तेच्या अंतःकरणावर कांहीही परिणाम झाला नाहीं. यानंतर पांडव वनांतून आल्यावर त्यानें सामोपचारानें पांडवाचें राज्य कौरवांनी त्यांना परत द्यावें व कुलनाश टाळावा असा शक्य तितका प्रयत्न केला. पण त्याच्या कोणत्याही प्रयत्नाला यश यावें असा विधिसंकेत नव्हता. इतकेच नव्हे तर युद्ध कोणीही टाळूं शकणार नाही व सारे प्रयत्न व्यर्थ आहेत हें विदुराच्या तेव्हांच ध्यानांत आलें होतें. श्रीकृष्ण ज्यावेळी शिष्टाईसाठी कौरवांच्या राजदरबारीं आले त्यावेळी दीर्घदर्शी विदुरानें भगवान् श्रीकृष्णांना या गोष्टीची पूर्णपणें कल्पना देऊन " आपण येथें येण्याचे श्रम व साहस व्यर्थ केलें " असें स्पष्टपणें बजावलेही. तो श्रीकृष्णांना म्हणतोः—

अर्थधर्मातिगो मन्दः संरंभी च जनार्दन ।
मानघ्नो मानकामश्च वृद्धानां शासनातिगः ॥२
मूढश्चाकृतबुद्धिश्च इन्द्रियाणामनीश्वरः ।
कामानुसारी कृत्येषु सर्वेष्वकृतनिश्चयः ॥ ५
निश्चितं धार्तराष्ट्राणां सकर्णानां जनार्दन ।
भीष्मद्रोणमुखान् पार्था न शक्ताः प्रतिवीक्षितुम् ॥ ८
एकः कर्णः परान् जेतुं समर्थ इति निश्चितम् ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः स शमं नोपयास्यति ॥ १०
यत्र सूक्तं दुरुक्तं च समं स्यान्मधुसूदन ।
न तत्र प्रलपेत् प्राज्ञो बधिरेष्विव गायनः ॥ १३
अविजानत्सु मूढेषु निर्मर्यादेषु माधव ।
न त्वं वाक्यं ब्रुवन् युक्तः चाण्डालेषु द्विजो यथा ॥ १४

—महाभारत, उदयोगपर्व अध्याय ९२

"राजनीतिशास्त्र व धर्मशास्त्र यांचें अतिक्रमण करणारा, मूर्ख, एकदम क्षुब्ध होणारा, दुसऱ्यांचा अपमान करणारा, स्वतः मात्र सदैव सन्मानाची अपेक्षा करणारा, वृद्धांचें अनुशासन सदाच पायदळीं तुडविणारा, अकृतबुद्धि, इंद्रियें व विकार मुळीच ताब्यांत नसलेला, लहरीनुसार वागणारा व कोणाचाही विचार न घेतांच हवें तें ठरविणारा दुर्योधन कोणाचेंही ऐकणें शक्य नाहीं. कर्णासहित सर्व धृतराष्ट्रपुत्रांच्या मनानें असें नक्की घेतलें आहे कीं, भीष्मद्रोणादि योद्धयांच्या समोर देखील पांडव उभें राहूं शकणार नाहींत. मग युद्धाची तर भाषाच दूर राहिली. एकटा कर्ण सर्व पांडवांचा पराभव करण्यास समर्थ आहे अशी दुर्योधनाची खात्री झालेली आहे. तो कदापि सधि करावयाचा नाहीं. बहिऱ्यांसमोर गायन जसें व्यर्थ, तसेंच जेथें सूक्तासूक्तांचा विचार नाहीं तेथें उपदेशही व्यर्थच होय. शहाण्या माणसानें तेथें मुळींच बोलू नये. अजाण, निर्मर्याद, मूर्ख अशा लोकांत तू जाणें व बोलणें मला मुळींच योग्य वाटत नाही." अर्थातच श्रीकृष्ण हें सारें जाणूनच पण वेगळ्याच धोरणासाठीं तेथें गेले होते ही गोष्ट निराळी. इतकेंच नव्हे तर श्रीकृष्णांना दगा होण्याचा संभव आहे या गोष्टीचीही जाणीव विदुरानें त्यांना पूर्णपणें दिली होती. तो म्हणतोः—

तेषां समुपविष्टानां बहूनां दुष्टचेतसाम् ।
कथं मध्यं प्रपद्येथाः शत्रूणां शत्रुकर्शन ॥ २७
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ९२

"अत्यंत दुष्टबुद्धीचे अनेक लोक भोंवतालीं बसले असतां त्याच्यामध्यें तू जाणें योग्य आहे काय ? ते सारे शत्रू आहेत." यांतील ध्वनि स्पष्टच आहे. व त्याप्रमाणें सभेंत श्रीकृष्णांना बांधण्याचा प्रयत्न झालाही. कोणत्याही प्रयत्नाला कुलसंरक्षणाच्या दृष्टीनें यश येत नाहीं असें पाहून शेवटीं त्यानें सत्यसंध भीष्मांनाही स्वतःचा व्रतभंग करून दुर्योधनाचा निग्रह करण्याची अभ्यर्थना केली. तो भीष्मांना म्हणतोः—

"नोपेक्षस्व महाबाहो पश्यमानः कुलक्षयम् ।
अथ तेऽद्य मतिर्नष्टा विनाशे प्रत्युपस्थिते ॥ २४
वनं गच्छ मया सार्धं धृतराष्ट्रेण चैव ह ।
बद्ध्वा वा निकृतिप्रज्ञं धार्तराष्ट्रं सुदुर्मतिम् ॥ २५
शाधीदं राज्यमद्याशु पाण्डवैरभिरक्षितम् ।
प्रसीद राजशार्दूल विनाशो दृश्यते महान् ॥ २६
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४८

" हे महाभागा, नाश पावत असलेल्या या कुळाचा विनाश आपल्या डोळ्यांदेखत होऊं देऊं नका. विनाशकाळ आल्यामुळें आपली विवेकबुद्धि तर आपल्याला सोडून गेलेली नाही ना ! एक तर माझ्याबरोबर धृतराष्ट्राला घेऊन वनांत चला व आपल्या मागें या कुळाचें कांहीही होऊं द्या किंवा दुर्बुद्धि दुर्योधनाला आपल्या सामर्थ्यानें बांधून व बंदी करून पांडवांनी सरक्षिलेलें हें राज्य तरी चालवा. पण हे राजश्रेष्ठा, प्रसन्न व्हा. महान् विनाश मला डोळ्यांसमोर स्पष्टपणें दिसत आहे. त्याची उपेक्षा करूं नका. " शेवटी विदुराच्या मंत्री या नात्यानें राजसत्तेच्या हितासाठीं केलेल्या कोणत्याही खटपटीचा कांही उपयोग न होतां महायुद्ध टळू शकलें नाही व नुसत्या कौरव राजकुलाचाच नव्हे तर सपूर्ण भारतीय राजसत्तांचाच अंत घडून आला.

शेवटपर्यंत धृतराष्ट्राला सोडलें नाहीं

कौरवकुलाचा विध्वंस राजा धृतराष्ट्राच्या पाताळयंत्रीपणामुळेंच घडून आलेला आहे याची विदुराला पूर्णपणें जाणीव होती व तो टळावा म्हणून अनेकवार त्यानें धृतराष्ट्राची निर्भर्त्सना केली. पांडव अत्यंत धर्मनिष्ठ व न्यायप्रिय असल्यामुळे विदुराचें त्यांच्यावर अत्यंत प्रेम होतें. पण राजाचा मंत्री या नात्यानें धृतराष्ट्राच्या ऐश्वर्याच्या काळांत ज्याप्रमाणें विदुर त्याच्याबरोबर राहिला त्याचप्रमाणें नष्टपुत्र, हृतराज्य व शोकाकुल धृतराष्ट्राच्या वाईट दिवसांतही छायेप्रमाणें विदुर त्याचा मंत्री म्हणून त्याच्याबरोबरच राहिला. शेवटपर्यंत स्वतःचा राजा म्हणून त्यानें धृतराष्ट्राचीच

सेवा केली व धृतराष्ट्र अरण्यांत जातांच विदुरही पांडवांनीं दिलेल्या सन्मानाचा परित्याग करून अरण्यांत गेला. संपत्तीच्या मोहानें त्याचें मन जसें विचलित होऊं शकलें नाहीं तसेंच तें विपत्तींतही विचलित होऊन कार्यविन्मुख होऊं शकलेलें नाहीं. राजद्वारापासून अरण्यापर्यंत आपल्या राजाच्या सेवेंत व संरक्षणांत सदैव जागरूक असलेला राजा धृतराष्ट्राचा हा महामंत्री महाभारताचा अमर अलंकार आहे.

निर्याण व मूल्यमापन

धृतराष्ट्रावरोबर अरण्यवासांत गेल्यानंतर विदुरानें घोर तपश्चर्या केली व शेवटीं आपलाच अंश असलेल्या युधिष्ठिराच्या तेजांत आपली जीवनज्योत मिळवून टाकून विदुरानें आपलें इहलौकिक जीवन संपविलें. त्याच्या निर्याणाचें वर्णन करतांना महाभारतकार लिहितातः—

इत्युक्तः प्रत्युवाचेदं धृतराष्ट्रो जनाधिपम् ।
कुशली विदुरः पुत्र तपो घोरं समाश्रितः ॥ १६
वायुभक्षो निराहारः कृशो धमनिसन्ततः ।
कवाचिद् दृश्यते विप्रैः शून्येऽस्मिन् कानने क्वचित् ॥ १७
इत्येवं ब्रुवतस्तस्य जटी वीटामुखः कृशः ।
दिग्वासा मलदिग्धाङ्गो वनरेणुसमुक्षितः ॥ १८
दूरादालक्षितः क्षत्ता तत्राख्यातो महीपतेः ।
निवर्तमानः सहसा राजन् दृष्ट्वाऽश्रमं प्रति ॥ १९
तमन्वधावन् नृपतिरेक एवं युधिष्ठिरः ।
प्रविशन्तं वनं घोरं लक्ष्यालक्ष्यं क्वचित्क्वचित् ॥ २०
भो भो विदुर राजाऽहं दयितस्ते युधिष्ठिरः ।
इति ब्रुवन्नरपतिस्तं यत्नादभ्यधावत ॥ २१
ततो विविक्त एकान्ते तस्थौ बुद्धिमतां वरः ।
विदुरो वृक्षमाश्रित्य कञ्चित्तत्र वनान्तरे ॥ २२
तं राजा क्षीणभूयिष्ठमाकृतीमात्रसूचितम् ।
अभिजज्ञे महाबुद्धिं महाबुद्धिर्युधिष्ठिरः ॥ २३

युधिष्ठिरोऽहमस्मीति वाक्यमुक्त्वाऽग्रतः स्थितः ।
विदुरस्य श्रवे राजा तं च प्रत्यभ्यपूजयत् ॥ २४
ततः सोऽनिमिषो भूत्वा राजानं तमुदैक्षत ।
संयोज्य विदुरस्तस्मिन् दृष्टिं दृष्ट्वा समाहितः ॥ २५
विवेश विदुरो धीमान् गात्रैर्गात्राणिचैव ह ।
प्राणान्प्राणेषु च दधदिन्द्रियाणीन्द्रियेषु च ॥ २६
स योगबलमास्थाय विवेश नृपतेस्तनुम् ।
विदुरो धर्मराजस्य तेजसा प्रज्वलन्निव ॥ २७
विदुरस्य शरीरं तु तथव स्तब्धलोचनम् ।
वृक्षाश्रितं तदा राजा ददर्श गतचेतनम् ॥ २८
बलवन्तं तथाऽऽत्मानं मेने बहुगुणं तया ।
धर्मराजो महातेजाः तच्च सस्मार पाण्डवः ॥ २९

—महाभारत, आश्रमवासिक पर्व अ. २६

" वनांत भेटीला आलेल्या युधिष्ठिरानें विदुराविषयीं विचारताच धृतराष्ट्र म्हणाला, "विदुर घोर तपश्चर्या करीत आहे. वायुभक्षण करून तो निराहार राहतो. कृश झालेला असून त्याच्या अंगावर खूप मळ सांचलेला आहे. तो क्वचितच वनांतील तापसांना दिसतो." याप्रमाणें बोलणें चालू असतांच जटा वाढलेला, कृश, तोडांत दगड धारण केलेला, दिगंबर, अंगावर खूप मळ सांचलेला व वनांतली धूळ अंगावर बसलेला विदुर लांबून युधिष्ठिराच्या दृष्टीस पडला. तो आश्रमाकडे येतां येतांच एकदम परत फिरून गहन अरण्यांत निघून गेला. युधिष्ठिर त्याच्या पाठोपाठ धांवला. एकान्त गहन अरण्यांत राजा अखेरीस विदुराजवळ जाऊन पोहोंचला. विदुरानें त्याला पाहिलें. पण न बोलतां त्याच्याकडे नुसतें पहात तो एका वृक्षाला टेकून स्वस्थपणें उभा राहिला. युधिष्ठिरानें तशाही अवस्थेंत विदुराला ओळखलें. व "मी आपला आवडता युधिष्ठिर आहे" हें वाक्य पुन्हां पुन्हां त्याच्या कानाजवळ उच्चारलें. विदुरानें कांहीच न बोलतां त्याच्याकडे टक लावून पहात आपली इंद्रियें, प्राण व सर्व सामर्थ्य योगबळानें युधिष्ठिरांत विरवून टाकलें व देहत्याग केला. धर्म धर्मांत मिसळला व युधिष्ठिराला आपलें सामर्थ्य अनंत पटीनी वाढल्याचा प्रत्यय आला."

धर्मनिष्ठा, न्यायनिष्ठा, कर्तव्यतत्परता, सत्यसंधता, विचक्षणता, विवेकीपणा, व खरें महानुभावत्व प्रकट करणारें सौहार्द या सर्व दृष्टींनी महामंत्री विदुर केवळ अद्वितीय पुरुष होते. विषप्रयोगासारख्या भयानक प्रयोगांत हात रंगलेल्या कौरवांच्या राजसत्तेंत "क्षत्तुरेकस्य भोक्तव्यम्" मीं ज्याच्या घरीं जेवावें असा केवळ एक विदुरच आहे असे आत्मविश्वासाचे उद्गार भगवान् श्रीकृष्णांसारखा युगपुरुष ज्याच्यासंबंधीं काढूं शकला त्याच्या अकार्याविषयींच्या तिटकाऱ्याचें व धर्मबुद्धीच्या एकान्तिकतेचें दुसरें उदाहरण हवेंच कशास? प्रजागरपर्वांत धृतराष्ट्राला अध्यात्म सांगण्याची वेळ आल्यावर लीनतेनें विदुर म्हणाला:—

शूद्रयोनावहं जातो नातोऽन्यद् वक्तुमुत्सहे।
कुमारस्य तु या बुद्धिर्वेद तां शाश्वतीमहम् ॥ ५
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ४१

"वस्तुतः मला सनत्कुमाराइतकें ज्ञान आहे. पण शूद्रयोनींत जन्म पावल्यामुळें मी शास्त्रमर्यादा उल्लंघू इच्छीत नाहीं." केवढी ही विलक्षण लीनता! महाभारताच्या उद्योगपर्वांतील विदुरनीतीचें प्रकरण म्हणजे विदुराच्या ज्ञानवैभवाची साक्षच होय. एकाद्या स्वतंत्र ग्रंथांतून तिचा परामर्श घेतां येण्यासारखा आहे. तिच्यावरून शुक्र, बृहस्पति व भीष्म यांच्या तोडीचें विदुराचें ज्ञान होतें हें स्पष्ट होईल. भाग्यानेंच हा अलौकिक पुरुष मंत्री म्हणून धृतराष्ट्राला लाभला. पण त्याच्या कर्मानें त्यानें त्याचा उपयोग केला नाहीं.

गांधारीच्या व्यक्तिचित्राच्या परामर्शानें विशुद्ध सचिवसत्तेचें हें वर्णन पूर्ण होईल. पुढच्या व्याख्यानांत त्या अतितेजस्वी व शुचितम व्यक्तिचित्राकडे वळूं या.

२०. महासती गांधारी

राजा दुर्योधनासारख्या कलिपुरुषाची माता व राजा धृतराष्ट्रासारख्या पाताळयंत्री खलपुरुषाची पत्नी होण्याचें दुर्दैवानें जिच्या वांट्याला आलें ती महासती गांधारी भारतांतील स्त्रीरत्नांच्या अग्रस्थानीं शोभण्याच्या योग्यतेची आहे. गांधारी व शकुनि यांना एकाच कुळांत जन्माला आणून जीवनाच्या सूत्रधारानें काय साधलें असावें? कदाचित् त्यानें निर्मितीच्या वैचित्र्याची स्वतःची हौस फेडून घेतली असावी! महाभारतांतील वर्णनाप्रमाणें गांधारीनें कौरवांच्या राजकुलांत गृहिणी या नात्यानें जो पहिला पदन्यास केला तोच तिच्या पातिव्रत्याच्या महान् दीप्तीनें उजळून निघालेला आहे. गांधारी ही गांधार देशाच्या राजाची कन्या होय. तिच्या पित्याचें नांव सुबल. तिच्या विवाहाचें वृत्त महाभारताच्या आदिपर्वांत पुढीलप्रमाणें वर्णिलें आहे :—

अथ शुश्राव विप्रेभ्यो गान्धारीं सुबलात्मजाम् ।
आराध्य वरदं देवं भगनेत्रहरं हरम् ।। ९
गान्धारी किल पुत्राणां शतं लेभे वरं शुभा ।
इति शुश्राव तत्त्वेन भीष्मः कुरुपितामहः ।। १०
ततो गांधारराजस्य प्रेषयामास भारत ।
अचक्षुरिति तत्रासीत् सुबलस्य विचारणा ।। ११
कुलं ख्याति च वृत्तं च बुद्धया तु प्रसमीक्ष्य सः ।
ददौ तां धृतराष्ट्राय गांधारीं धर्मचारिणीम् ।। १२
गांधारी त्वथ शुश्राव धृतराष्ट्रमचक्षुषम् ।
आत्मानं दित्सितं चास्मै पित्रा मात्रा च भारत ।। १३
ततः सा पटमादाय कृत्वा बहुगुणं तदा ।
बबन्ध नेत्रे स्वे राजन् पतिव्रतपरायणा ।। १४
नाभ्यसूयां पतिमहमित्येवं कृतनिश्चया ।

व्याख्यान २० वे, दि १७ एप्रिल १९५१

ततो गान्धारराजस्य पुत्रः शकुनिरभ्ययात् ।। १५
स्वसारं वयसा लक्ष्म्या युक्तामादाय कौरवान् ।
तां तदा धृतराष्ट्राय ददौ परमसत्कृताम् ।।
भीष्मस्यानुमते चैव विवाहं समकारयत् । १६
दत्वा स भगिनीं वीरो यथार्हं च परिच्छदम् ।
पुनरायात् स्वनगरं भीष्मेण प्रतिपूजितः ।। १७
गान्धार्यपि वरारोहा शीलाचारविचेष्टितैः ।
तुष्टि कुरूणां सर्वेषां जनयामास भारत ।। १८
वृत्तेनाराध्य तान् सर्वान् गुरून् पतिपरायणा ।
वाचापि पुरुषानन्यान् सुव्रता नान्वकीर्तयत् ।। १९

—महाभारत, आदिपर्व अध्याय ११०

"कुरुपितामह भीष्मांना ब्राह्मणांच्या तोंडून असें कळलें कीं, गांधारराज सुबलाची कन्या गांधारी हिनें भगवान् शंकराची आराधना करून स्वत:ला शंभर पुत्र व्हावे असा वर प्राप्त करून घेतला आहे. भीष्मांनीं धृतराष्ट्रासाठीं त्या मुलीला मागणी घातली. सुबलाला जेव्हां धृतराष्ट्र अंध असल्याचें कळलें तेव्हां त्याला मोठाच विचार पडला. पण शेवटीं कुल, कीर्ति, कुरुकुलांतील राजांचें शील, चारित्र्य यांचा विचार करून धृतराष्ट्र अंध असला तरी त्याला गांधारी द्यावयाची असा निर्णय सुबल राजानें घेतला. गांधारीलाही आपला भावी पति धृतराष्ट्र अंध असल्याचें व तरीही सर्व परिस्थितीचा विचार करून आपल्या मातापित्यांनी त्याच्याशींच आपला विवाह निश्चित केला असल्याचें कळलें. ज्याअर्थीं आपला भावी पति धृतराष्ट्र अंध असून सृष्टीच्या दर्शनसुखाला पूर्णपणें आंचवलेला आहे व ज्याअर्थीं यापुढे आपलें व त्याचें जीवन विवाहबंधनानें पूर्णपणें एकरूप होऊन एकमेकांची सुखदु:खें ही एकरूपच व्हावयाचीं आहेत त्याअर्थी सृष्टीच्या ज्या दर्शनसुखाला राजा धृतराष्ट्र आंचवला तें त्याच्यावांचून आपण तरी कसें भोगावें या उग्र निश्चयानें प्रेरित होऊन गांधारीनें एक कापड आणविलें व त्याच्या आंतून कांहींच दिसूं शकणार नाहीं इतक्या त्याच्या घडया करून तिनें आपले नेत्र सदाचे झांकून घेतले. पतीच्यासंबंधीं

कसलीही असूया निर्माण होऊं द्यावयाची नाही असा तिचा निश्चय होता. नंतर गांधारराजाचा पुत्र शकुनि आपल्या भगिनीला घेऊन कौरवांच्या राजधानींत आला व भीष्मांच्या अनुमतीनें त्याच्या उपस्थितीतच धृतराष्ट्र व गांधारी यांचा विवाह झाला. शकुनीनें योग्य त्या देणग्या धृतराष्ट्राला दिल्या. भीष्मांनी योग्य ते सत्कार केल्यानंतर त्यांचा निरोप घेऊन तो आपल्या राजधानीस निघून गेला. गांधारीनें लवकरच आपल्या शीलचारित्र्यानें, वागणुकीनें व धोरणानें सर्व कौरवकुल पुरुषांच्या मनांत आपल्याविषयींचें समाधानाचें श्रेष्ठ स्थान उत्पन्न केलें. पतिपरायण गांधारीनें आपल्या शीलानें सर्व वडीलधाऱ्या मंडळीना प्रसन्न करून घेतलें. तिची पतिनिष्ठा इतकी तीव्र होती कीं, वाणीनेंही कधी परपुरुषासंबंधीं तिनें उच्चार केला नाही. अंधानें दर्शनसुखाचा उपभोग न घेणें वेगळें व दृष्टि असूनही एका विशिष्ट ध्येयाप्रीत्यर्थ सतत तिळतिळ जळण्याचें महनीय जीवन पत्करून स्वतःला संयमाचा सदाचा अडसर घालून घेणें ही गोष्ट वेगळी. ज्या अवंचकतेनें गांधारीनें स्वतःचें हें उग्र व्रत जीवनाचें विरामचिन्ह उमटेपर्यंत पाळलें त्याची नुसती कल्पना केली तरी अंतःकरण विलक्षण गौरवानें भरून आल्यावांचून रहात नाहीं. विवाहाच्या पूर्वी तिनें एकदां जी पट्टी आपल्या डोळ्यांना बांधली ती राजा धृतराष्ट्राबरोबर शेवटच्या अरण्यांतील सहप्रवासांत वणव्यांत आपलें शरीर दग्ध होईपर्यंत तिनें तशीच ठेवली. प्रखर निष्ठेच्या अग्नींत तिनें आपली दर्शनेच्छा सदाची जाळून घेतली. आपण होऊन पत्करलेल्या या तिच्या महाव्रतानें तिच्या अंगीं अपार सामर्थ्य उत्पन्न झालें असल्याचें महर्षि व्यासांनीं वर्णिलें आहे. महायुद्धांतील भीषण नरमेधानंतर ज्या वेळीं युधिष्ठिर प्रथम पुत्रवियोगानें शोकाकुल झालेल्या गांधारीच्या दर्शनासाठीं येतो त्या वेळीं तिच्या या सामर्थ्याचें चित्र रेखाटतांना महाभारतकार म्हणतात :—

एवमुक्त्वा तु गांधारी युधिष्ठिरमपृच्छत ।
क्व स राजेति सक्रोधा पुत्रपौत्रवधार्दिता ॥ २४

तामभ्यगच्छद्राजेन्द्रो वेपमानः कृताञ्जलिः ।
युधिष्ठिरस्त्विदं तत्र मधुरं वाक्यमब्रवीत् ॥ २५
पुत्रहन्ता नृशंसोऽहं तव देवि युधिष्ठिरः ।
शापार्हः पृथिवीनाशे हेतुभूतः शपस्व माम् ॥ २६
न हि मे जीवितेनार्थो न राज्येन धनेन वा ।
तादृशान् सुहृदो हत्वा मूढस्यास्य सुहृद्द्रुहः ॥ २७
तमेवंवादिनं भीतं सन्निकर्षगतं तदा ।
नोवाच किंचित् गांधारी निःश्वासपरमा भृशम् ॥ २८
तस्यावनतदेहस्य पादयोर्निपतिष्यतः ।
युधिष्ठिरस्य नृपतेर्धर्मज्ञा दीर्घदर्शिनी ॥ २९
अंगुल्यग्राणि ददृशे देवी पट्टान्तरेण सा ।
ततः स कुनखीभूतो दर्शनीयनखो नृपः ॥ ३०
तत् दृष्ट्वा चार्जुनोऽगच्छद्वासुदेवस्य पृष्ठतः ॥ ३१

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १५

"नंतर गांधारी पुत्रशोकानें विव्हल होऊन क्रोधानें 'तो राजा कुठें आहे ?' असें विचारूं लागली. तें ऐकतांच हात जोडून व अधिकच शोकमग्न होऊन युधिष्ठिर तिच्याजवळ गेला व अत्यंत मधुर वाणीनें म्हणाला, "हे देवी, मी तुझे पुत्र ठार करणारा नृशंस युधिष्ठिर आहें. साऱ्या पृथ्वीच्या नाशाचें मीच कारण आहे. मी शापाला सर्वस्वीं योग्य आहे. मला तूं अवश्य शाप दे. मी राज्य, धन अथवा जीवित यांपैकीं कशाच्याही योग्य नाहीं. मी सुहृदांचा द्रोह करणारा मूढ आहें. माझ्या सर्वोत्कृष्ट सुहृदांना ठार मारून मी त्यांचा द्रोह केला आहें." याप्रमाणें भयभीत होऊन व जवळ येऊन राजा युधिष्ठिर विलाप करूं लागला असतां गांधारी त्याला शब्दही बोलली नाहीं. ती केवळ वारंवार उसासे टाकीत होती. युधिष्ठिर खालीं वाकून तिच्या चरणांवर मस्तक ठेवीत असतां, नेत्रांना बांधलेल्या जाड कपडयांच्या आंतून गांधारीची जळजळीत दृष्टि युधिष्ठिराच्या नखांवर पडली मात्र, तों त्याचीं सुंदर नखें काळीं ठिक्कर पडलीं. तें पाहतांच भीतीनें अर्जुन श्रीकृष्णांच्या मागें जाऊन उभा राहिला.

न्यायसंरक्षक देवता

कठोर पातिव्रत्यपरिपालनानें गांधारीनें ज्याप्रमाणें नेत्रांचा विषय जिकून टाकला होता, त्याचप्रमाणें आपल्या दिव्यदर्शी न्याय-प्रियतेनें तिनें वात्सल्याच्या अत्यंत स्वाभाविक मोहपाशावरही विजय संपादन केलेला होता. जगांतली कठोर बंधनें तोडतां येतात पण कोमल बंधनें तोडतां येणें अत्यंत कठिण आहे. कविसंकेता-प्रमाणें लांकडें पोखरून टाकणारा भुगा कमलिनीच्या कोमल मिठींतून मात्र स्वतःची सुटका करून घेऊं शकत नाहीं. राजा धृत-राष्ट्र दुर्योधनाचा पिता असला तर गांधारी त्याची माता होती. मातेचें वात्सल्य व अपत्यप्रेम पित्यापेक्षां स्वभावतःच अधिक असतें. स्त्रीसुलभ अपत्यप्रेम व मातृत्वाची उत्कट ओढ गांधारीच्या ठिकाणीं उत्कटत्वानें होती याचीं महाभारतांत अनेक प्रत्यंतरें आढळतात. गांधारी दोन वर्षे गरोदर राहिली तरी तिला पुत्र होईना. अशा स्थितींत अरण्यांत कुंती प्रसूत होऊन तिला पुत्र झाल्याची वार्ता तिला कळतांच मातृत्वाच्या उत्कट ओढीनें तिनें स्वतःवर आघात करून घेतला. महाभारतकार लिहितात :—

श्रुत्वा कुन्तीसुतं जातं बालार्कसमतेजसम् ।
उदरस्यात्मनः स्थैर्यमुपलभ्यान्वचिन्तयत् ॥ १०
अज्ञातं धृतराष्ट्रस्य यत्नेन महता ततः ।
सोदरं घातयामास गांधारी दुःखमूर्च्छिता ॥ ११

—महाभारत, आदिपर्व अध्याय ११५

"कुंतीला बालसूर्यासारखा अत्यंत तेजस्वी मुलगा झाल्याचें ऐकून व आपलें उदर मात्र अत्यंत स्थिर आहे हे पाहून गांधारी चिंतेंत चूर झाली. शेवटीं दुःखातिरेकानें धृतराष्ट्राच्या न कळत तिनें मोठ्या प्रयत्नांनीं आपल्या उदरावर प्रहार करून घेतले." तिच्या वात्सल्याच्या पोटी आलेल्या कारुण्याचें जे अमर शब्दचित्र महर्षि व्यासांनीं स्त्रीपर्वात रेखाटलें आहे तें पाहून ज्याचे डोळे पाणावणार नाहींत अशा मनुष्याला 'नृपशुरथवाऽयं पशुपतिः' या कोटींतच ढकललें पाहिजे. युद्धांत सर्व मुलें ठार झालेल्या या वृद्ध मातेकडून

रणभूमीचें कारुण्यपूर्ण वर्णन करवून महर्षीनीं करुणाच्या उत्कटतेला जी सहजसिद्ध बैठक उत्पन्न केली आहे तिची मोहिनी डॉ. विंटरनिट्झसारख्या व्यक्तीला देखील विलक्षण पडून या घटनेचा स्वतंत्रपणें आपल्या ग्रंथांत उल्लेख करण्याची त्याला आवश्यकता वाटली आहे. दुर्योधनाविषयीं विलाप करतांना गांधारी म्हणते:—

योऽयं मूर्धाभिषिक्तानामग्रे याति परंतपः ।
सोऽयं पांसुषु शेतेऽद्य पश्य कालस्य पर्ययम् ॥ ११
यं पुरा पर्युपासीना रमयन्ति परस्त्रियः ।
तं वीरशयने सुप्तं रमयन्त्यशिवाः शिवाः ॥ १३
यं पुरा पर्युपासीना रमयंति मनीषिणः ।
महीतलस्थं निहतं गृध्रास्तं पर्युपासते ॥ १४
यं पुरा व्यजनैरुग्रैरुपजीवंति योषितः ।
तमद्य पक्षव्यजनैरुपजीवंति पक्षिणः ॥१५
एष दुर्योधनः शेते महेष्वासो महारथः ।
शार्दूल इव सिंहेन भीमसेनेन पातितः ॥ १६
निःसपत्ना मही यस्य त्रयोदशसमाः स्थिता ।
स शेते निहतो भूमौ सुतो मे पृथिवीपतिः ॥ २१
अपश्यं कृष्ण पृथिवीं धार्तराष्ट्रानुशासिताम् ।
पूर्णां हस्तिगवाश्वैश्च वार्ष्णेय न तु तच्चिरम् ॥ २२
तामेवाद्य महाबाहो पश्याम्यन्यानुशासिताम् ।
हीनां हस्तिगवाश्वेन किं नु जीवामि माधव ॥ २३
प्रकीर्णकेशां सुश्रोणीं दुर्योधनशुभाङ्गनाम् ।
रुक्मवेदीनिभां पश्य कृष्ण लक्ष्मणमातरम् ॥२५
कथं तु शतधा नेदं हृदयं मम दीर्यते ।
पश्यन्त्या निहतं पुत्रं पुत्रेण सहितं रणे ॥ २७
ततो दुर्योधनं दृष्ट्वा गान्धारी शोककर्शिता ।
सहसा न्यपतद्भूमौ छिन्नेव कदलीवने ॥ १

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १७

"जो पूर्वी मूर्धाभिषिक्त राजांच्या अग्रभागीं असावयाचा, तो आज धुळीत शयन करीत आहे. कृष्णा ! काळाची ही विपरीतता

पहा ! अत्यंत सुंदर व सुलक्षणी स्त्रिया पूर्वी दक्षतेनें ज्याला रमवीत त्या दुर्योधनाभोंवतीं आज अपशकुनी कोल्ह्या दिसत आहेत. मोठ-मोठे प्रज्ञावंत ज्याच्या भोंवती उपस्थित राहून अनुरंजन करावयाचे त्याच्या सभोंवार आज गिधाडें वावरतांना दिसत आहेत. पूर्वी राण्या ज्याला पंखांनीं वारा घालून रिझवीत असत त्याला आज उग्र पक्ष्यांच्या पंखांचा वारा घ्यावा लागत आहे. पहा पहा ! हा शस्त्र धारण करणाऱ्यांत श्रेष्ठ असलेला महारथ दुर्योधन धुळीत पडलेला आहे. याला चिरनिद्रा लागली. वाघाला सिहानें ठार मारावें त्याप्रमाणें भीमसेनानें याला ठार मारलें आहे. तेरा वर्षेपर्यंत ज्यानें निष्कंटकपणें पृथ्वीचा उपभोग घेतला तो हा माझा पृथ्वीपति पुत्र आज ठार मारण्यांत येऊन धुळीत पडला आहे. श्रीकृष्णा ! गजान्तलक्ष्मीनें समृद्ध व वैभवानें मुसमुसलेली पृथ्वी दुर्योधन तिचें अधिराज्य चालवीत असतां मीं पाहिली. पण तें ऐश्वर्य फार दिवस टिकलें नाहीं. आज तीच पृथ्वी ऐश्वर्यभंग पावून दुसऱ्याच्या स्वाधीन झालेली पाहण्याचा प्रसंग माझ्यावर आलेला आहे. या स्थितींत मीं जगावें तरी कसें ? व कशाला ? श्रीकृष्णा ! केस मोकळे सोडलेली, दुर्योधनाच्या अंकावर दुःखानें लोळण घेणारी व सोन्याच्या वेदीप्रमाणे दिसणारी ही माझ्या दुर्योधनाची राणी व लक्ष्मणाची माता पाहिलीस काय ? आपल्या पुत्रांसहित ठार झालेल्या माझ्या पुत्राला पाहून माझ्या हृदयाचे तुकडे तुकडे कां बरे पडत नाहींत ?" (याप्रमाणें बोलून) दुर्योधनाकडे पाहून केळी ज्याप्रमाणें उन्मळून पडावी त्याप्रमाणें शोकविव्हल गांधारी एकाएकीं मूर्च्छित होऊन जमिनीवर पडली." मी केवळ उदाहरण म्हणून गांधारीच्या करुणविलापांतील थोडासा भाग येथें उद्धृत केला आहे. पण तेवढ्यावरूनही गांधारीच्या हृदयाची वत्सलता उत्कटतेनें प्रत्ययास येईल. मुळांतून भारतांतील स्त्रीपर्व वाचणाऱ्या सहृदय वाचकाला तर गांधारीच्या विलापाचें हें प्रकरण अनेकवार खालींच ठेवावें लागेल. पुत्रनिधनानें शोककर्शित झालेल्या तिच्या अंतःकरणानें शेवटी श्रीकृष्णांना घोर शाप द्यावयासही कमी केलें नाहीं. ती म्हणते :—

शक्तेन बहुभृत्येन विपुले तिष्ठता बले ।
उभयत्र समर्थेन श्रुतवाक्येन चैव ह ॥ ४०
इच्छतोपेक्षितो नाशो कुरूणां मधुसूदन ।
यस्मात्त्वया महाबाहो फलं तस्मादवाप्नुहि ॥ ४१
पतिशुश्रूषया यन्मे तपः किञ्चिदुपार्जितम् ।
तेन त्वां दुरवापेन शप्स्ये चक्रगदाधरम ॥ ४२
यस्मात्परस्परं घ्नन्तो ज्ञातयः कुरुपांडवाः ।
उपेक्षितास्ते गोविंद तस्माज्ज्ञातीन् वधिष्यसि ॥ ४३
त्वमप्युपस्थिते वर्षे षट्त्रिंशे मधुसूदन ।
हतज्ञातिर्हतामात्यो हतपुत्रो वनेचरः ॥४४
अनाथवदविज्ञातो लोकेष्वनभिलक्षितः ।
कुत्सितेनाप्युपायेन निधनं समवाप्स्यसि ॥ ४५
तवाप्येयं हतसुता निहतज्ञातिबांधवाः ।
स्त्रियः परिपतिष्यन्ति यथैता भरतस्त्रियः ॥ ४६

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय २५

"अंगी सामर्थ्य असतांना, अनेक लोक आधीन असतांना, अपार सैन्य आज्ञेत असतांना, अद्वितीय सामर्थ्य असतांना, व कुरुपांण्डव युद्धांतील दोन्ही युध्यमान पक्ष आपल्या बळानें नियत्रित करणें शक्य असतांनाही तू त्यांची उपेक्षा केलीस. तुला सर्व कळत असतांना देखील तूं यांचा नाश व्हावा अशी इच्छा धारण करून यांची उपेक्षा केलेली आहेस. त्याचें फल तुलाही भोगलेंच पाहिजे. पतीची शुश्रूषा संपादन करून जें कांहीं पुण्य व सामर्थ्य माझ्या ठिकाणीं उत्पन्न झालेलें आहे त्याच्या भरंवशावर, हे चक्रगदाधरा, मी तुला अनिवार्य शाप देतें. तूं स्वतः आपल्या ज्ञातिबांधवांचाही असाच वध करशील. आजपासून ३६ व्या वर्षीं अमात्य, ज्ञातिबांधव, पुत्र या सर्वांचें निधन आपल्या डोळ्यांनीं पाहून तू एकाकी विजनवनांत भटकत असतां गहर्ष्यपणें मारला जाशील. आज ज्याप्रमाणें या भरतस्त्रिया आपलीं मुलें, ज्ञातिबांधव, पति वध पावलेल्या अवस्थेत येथें विलाप करीत आहेत, त्याचप्रमाणें तुझ्या स्त्रियाही अशाच हतपुत्र व निहतबांधव अवस्थेंत विलाप करतील."

गांधारीचें हें उत्कट पुत्रवात्सल्य तिच्या स्त्रीत्वाच्या वैशिष्ट्याचें द्योतक असले तर त्याच्या अपूर्व सयमाचें तिचें वैशिष्ट्य तिच्या महत्तेचें द्योतक आहे. जी गोष्ट धृतराष्ट्रासारख्या पुरुषाला शक्य झाली नाही ती गांधारीनें मातृहृदयाच्या उत्कट व स्वाभाविक वात्सल्यालाही बाजूस सारून करून दाखविली. मानवी जीवनांत सतत चालू असलेल्या भावना व कर्तव्य यांच्या झगडयांत कर्तव्य बुद्धीवर भावना नेहमी विजय संपादन करीत असल्याचा अनुभव येतो. जेथें भावनेवर कर्तव्यबुद्धीचाच विजय सतत दृष्टोत्पत्तीस येतो तेंच महत्तम जीवन होय. गांधारीचें जीवन अत्यत कसोटीच्या प्रसंगी देखील या कसोटीस पूर्णपणें उतरले आहे. कौरवांच्या राजसभेंत संधीच्या वाटाघाटी चालू असतां व निदान अर्धे राज्य तरी पांडवांना द्यावें या निर्णयावर मोठमोठी मंडळी येत असतां गांधारीनें सामंतांच्या समक्ष भर राजसभेंत दुर्योधनाच्या तोंडावर या राज्यावर न्याय व धर्म यांच्या नियमनाप्रमाणें तुझा कांही एक हक्क नसून अर्ध्याच नव्हे तर सर्वच राज्याचे पाण्डवच अधिपति असल्याचें स्पष्ट उद्घोषिलें आहे. वात्सल्यावर जागृत धर्मबुद्धीनें मिळविलेला हा केवढा विजय आहे! ती म्हणाली :—

ये पार्थिवा राजसभां प्रविष्टा ब्रह्मर्षयो ये च सभासदोऽन्ये ।
शृण्वन्तु वक्ष्यामि तवापराधं पापस्य सामात्यपरिच्छदस्य ॥ २९
राज्यं तु पाण्डोरिदमप्रधृष्यं तस्याद्य पुत्राः प्रभवन्ति नान्ये ।
राज्यं तदेतन्निखिलं पाण्डवानां पैतामहं पुत्रपौत्रानुगामी ॥ ३३
न्यायागतं राज्यमिदं कुरूणां युधिष्ठिरः शास्तु वै धर्मपुत्रः ।
प्रचोदितो धृतराष्ट्रेण राज्ञा पुरस्कृतः शान्तनवेन चैव ॥ ३६
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४८

या राजसभेंत उपस्थित असलेले सर्व राजे, ब्रह्मर्षि व इतर सभासद यांच्या समक्ष, हे पापात्म्या दुर्योधना! तू तुझ्या अमात्य व साहाय्यकर्त्यांच्यासह कोणत्या पापाचा पुरस्कार केलास तें मी उघड करून सांगतें. हें सर्वच राज्य राजा पांडूचें आहे. ज्या अर्थी राज्य पांडुराजाचें आहे त्याअर्थी त्याचे पुत्रच या राज्याचे उत्तराधिकारी आहेत; ते असतांना दुसरे कोणीहि राज्याधिकारी कधींही होऊंच

शकत नाहीत. पितृपितामहापासून चालत आलेलें राज्य त्यांच्या योग्य अधिकारी पुत्रपौत्रांनीच करावें असा न्याय आहे. राज्य जर राजा पाण्डूचें आहे तर तें अर्धेच नव्हें तर सर्वच्या सर्व एकटचा पांडवांचेंच आहे हें स्पष्ट आहे. म्हणून न्यायानेंच युधिष्ठिराचें असलेलें हें राज्य शान्तनव भीष्मांच्या पुरस्कारानें व राजा धृतराष्ट्राच्या प्रेरणेनें युधिष्ठिरानेंच केलें पाहिजे." याहूनही आणखी एका भावनामय प्रसंगीं तिची तेजस्वी कर्तव्यबुद्धि प्रकट झालेली आहे. महायुद्ध सुरू झाल्यानंतर रोज युद्धाला जावयास निघण्यापूर्वी राजा दुर्योधन आपल्या पुण्यशील मातेकडून विजयाचें आशीर्वचन मिळावें म्हणून तिच्या चरणांना वंदन करण्यास्तव तिच्याकडे जाई. वंदन करून रोज त्यानें तिला विजयाचें आशीर्वचन मागावें पण गांधारीनें तें त्याला कधींही दिलें नाहीं. ती स्वतःच भगवान् श्रीकृष्णांना हें वृत्त सांगतांना म्हणते :—

उपस्थितेऽस्मिन्सङ्ग्रामे ज्ञातीनां संक्षये विभो ॥ ५
मामयं प्राह वार्ष्णेय प्राञ्जलिर्नृपसत्तमः ।
अस्मिन् ज्ञातिसमुद्धर्षे जयमम्बा ब्रवीतु मे ॥ ६
इत्युक्ते जानती सर्वमहं स्वव्यसनागमम् ।
अब्रुवं पुरुषव्याघ्र यतो धर्मस्ततो जयः ॥ ७

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १७

" हे श्रीकृष्णा! हा ज्ञातीचा आपसांतील भयानक संग्राम उपस्थित झाला असतां राजा दुर्योधन हात जोडून मला म्हणूं लागला कीं, 'हे माते या आपसांतील युद्धांत माझा जय व्हावा असा आशीर्वाद मला तूं दे.' भावी संकटाची मला पूर्णपणें कल्पना होती. मी त्याला उत्तर म्हणून, 'जिकडे धर्म त्या पक्षाचाच जय होईल ' असें सांगितलें."गांधारीच्या या उद्‌गारांवरून दुर्योधन व गांधारी यांच्यांत हा संवाद एकदांच झाला अशी कुणाची कल्पना होईल. पण तो अठरा दिवसांच्या युद्धांत प्रत्येक दिवशीं झालेला आहे. गांधारीचें सांत्वन करतांना महर्षि व्यासांनीं या गोष्टीचा स्पष्ट निर्देश केलेला आहे. ते म्हणतात :—

उक्तास्यष्टदशाहानि पुत्रेण जयमिच्छता ।
शिवमाशंस मे मातर्युध्यमानस्य शत्रुभिः ॥ ८
सा तथा वाच्यमाना त्वं काले काले जयैषिणा ।
उक्तवत्यसि गान्धारि यतो धर्मस्ततो जयः ॥ ९
—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १४

हे गांधारी ! अठरादिवसपर्यंत रोज जय मिळावा या इच्छेनें तुझा पुत्र तुला 'हे माते ! मी शत्रूशीं संग्राम करीत असतां माझें कल्याण व्हावें असा आशीर्वाद दे' अशी तुझी प्रार्थना करीत होता. पण त्या त्या प्रत्येक वेळी 'जिकडे धर्म असेल त्या पक्षाचाच जय होईल' असेंच तू म्हणालीस. युद्धाच्या अगदीं प्रारंभी गांधारीच्या तोंडून असे उद्‌गार बाहेर पडले असले तर त्यांत तितकेसें आश्चर्य नाहीं. पण रोजच्या रोज पुत्रमरणाच्या व आपल्या पुत्रांच्या पक्षाच्या विनाशाच्या वार्ता ऐकूनही तिच्या अंतःकरणाचें स्थैर्य विचलित होऊं शकलें नाही यांतच तिची महत्ता व्यक्त होते.

तिचें महत्त्व व तिची राजनीतिज्ञता

गांधारीला महाभारतांत ठिकठिकाणीं महाप्राज्ञा व दीर्घदर्शिनी अशी विशेषणें जोडलेली आढळतात. प्रत्येक वेळी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला असता तिचा सल्ला घेणें आवश्यक ठरलेलें आहे. भगवान् श्रीकृष्ण ज्यावेळी कौरवांच्या राजसभेंतून शिष्टाई करून परत आले त्यावेळी युधिष्ठिरांनी त्यांना कोण कोण काय काय बोललें हें विचारीत असतां गांधारी काय बोलली हें बुद्धया विचारिलें आहे. युधिष्ठिर म्हणतो, 'गांधारी वा किमब्रवीत्' (महाभारत उद्योगपर्व अध्याय १४७।८) ज्यावेळीं राजसभेतून सभेच्या नियमांचा भंग करून भीष्मद्रोणादि सभासद राज्ययंत्राचा सूत्रचालक राजा धृतराष्ट्र व आलेले पाहुणे द्वारकाधीश भगवान् श्रीकृष्ण या सर्वांसमोर शिष्टाचाराचें उल्लंघन करून राजा दुर्योधन सभास्थान सोडून जाऊं लागला त्यावेळीं त्याला परत आणून उपदेश करावयाचें काम केवळ गांधारीच करूं शकेल हें ओळखून धृतराष्ट्रांनी विदुराला तिला राजसभेंत आणावयास पाठविलें. धृतराष्ट्र विदुराला म्हणतो :—

गच्छ तात महाप्राज्ञां गान्धारीं दीर्घदर्शिनीम् ।
आनयेह तया सार्धमनुनेष्यामि दुर्मतिम् ।। २
यदि साऽपि दुरात्मानं शमयेद्दुष्टचेतसम् ।
अपि कृष्णस्य सुहृदस्तिष्ठेम वचने वयम् ।। ३
अपि लोभाभिभूतस्य पन्थानमनुदर्शयेत् ।
दुर्बुद्धेर्दुःसहायस्य शमार्थं ब्रुवती वचः ।। ४
अपि नो व्यसनं घोरं दुर्योधनकृतं महत् ।
शमयेच्चिररात्राय योगक्षेमवदव्ययम् ।। ५

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १२९

"हे विदुरा, अत्यंत बुद्धिमान् व दीर्घदर्शिनी गांधारीला तू जाऊन येथें आण. मी तिच्यासहित या दुष्टाला समजावितों. जर ती याचें सांत्वन करूं शकेल तर आपण सर्व सुहृद् श्रीकृष्णांच्या म्हणण्याप्रमाणें वागू. ती तरी दुर्बुद्धि व वाईट लोकांच्या संगतींत असलेल्या दुष्टाचें चित्त सांत्वनाचा उपदेश करून वळवूं शकेल काय? हा लोभानें पूर्णपणें ग्रासलेला आहे. ती तरी याचें मार्गदर्शन करूं शकेल काय? दुर्योधनामुळें आपल्यावर अत्यंत भीषण संकट येऊं पहात आहे. आपण सर्व सुखानें जगू शकू असें गांधारी करूं शकेल काय?"

ज्या ठिकाणीं कोणत्याही बुद्धिमंताचें कांहीही चालूं शकत नाहीं अशा ठिकाणीं केवळ गांधारीच कांहीं करूं शकेल अशी कुरुराज्याच्या सूत्रचालकाची आशा आहे. गांधारीनें सभेंत येऊन दुर्योधनाला जो उपदेश केला त्यांतून तिची राजनीतिज्ञता व तिचें दीर्घदर्शी सखोल ज्ञान व्यक्त झालें आहे. ती म्हणते :—

दुर्योधन निबोधेदं वचनं मम पुत्रक ।
हितं ते सानुबन्धस्य तथाऽऽयत्यां सुखोदयम् ।। १९
दुर्योधन यदाह त्वां पिता भरतसत्तम ।
भीष्मो द्रोणः कृपः क्षत्ता सुहृदां कुरु तद्वचः ।। २०
भीष्मस्य तु पितुश्चैव मम चापचितिः कृता ।
भवेद्द्रोणमुखानां च सुहृदां शाम्यता त्वया ।। २१

न हि राज्यं महाप्राज्ञ स्वेन कामेन शक्यते ।
अवाप्तुं रक्षितुं वाऽपि भोक्तुं भरतसत्तम ॥ २२
न ह्यवश्येन्द्रियो राज्यमश्नीयाद्दीर्घमन्तरम् ।
विजितात्मा तु मेधावी स राज्यमभिपालयेत् ॥ २३
कामक्रोधौ हि पुरुषमर्थेभ्यो व्यपकर्षतः ।
तौ तु शत्रू विनिर्जित्य राजा विजयते महीम् ॥ २४
लोकेश्वर प्रभुत्वं हि महदेतद् दुरात्मभिः ।
राज्यं नामेप्सितं स्थानं न शक्यमभिरक्षितुम् ॥ २५
इन्द्रियाणि महत्प्रेप्सुर्नियच्छेदर्थधर्मयोः ।
इन्द्रियैर्नियतैर्बुद्धिर्वर्धतेऽग्निरिवेन्धनैः ॥ २६
अविधेयानि हीमानि व्यापादयितुमप्यलम् ।
अविधेया इवादान्ता हयाः पथि कुसारथिम् ॥ २७
अविजित्य य आत्मानममात्यान् विजिगीषते ।
अमित्रान् वाऽजितामात्यः सोऽवशः परिहीयते ॥ २८
आत्मानमेव प्रथमं द्वेष्यरूपेण योजयेत् ।
ततोऽमात्यानमित्रांश्च न मोघं विजिगीषते ॥ २९
वश्येन्द्रियं जितामात्यं धृतदण्डं विकारिषु ।
परीक्ष्यकारिणं धीरमत्यर्थं श्रीर्निषेवते ॥ ३०
क्षुद्राक्षेणेव जालेन झषावपिहितावुभौ ।
कामक्रोधौ शरीरस्थौ प्रज्ञानं तौ विलुम्पतः ॥ ३१
याभ्यां हि देवाः स्वर्यातुः स्वर्गस्य पिदधुर्मुखम् ।
बिभ्यतोऽनुपरागस्य कामक्रोधौ स्म वर्धतौ ॥ ३२
कामं क्रोधं च लोभं च दंभं दर्पं च भूमिपः ।
सम्यग्विजेतुं यो वेद स महीमभिजायते ॥ ३३
सततं निग्रहे युक्त इन्द्रियाणां भवेन्नृपः ।
ईप्सन्नर्थं च धर्मं च द्विषतां च पराभवम् ॥ ३४
कामाभिभूतः क्रोधाद्वा यो मिथ्या प्रतिपद्यते ।
स्वेषु चान्येषु वा तस्य न सहाया भवन्त्युत ॥ ३५
एकीभूतैर्महाप्राज्ञैः शूरैररिनिबर्हणैः ।
पाण्डवैः पृथिवीं तात भोक्ष्यसे सहितः सुखी ॥ ३६

यथा भीष्मः शान्तनवो द्रोणश्चापि महारथः ।
आहतुस्तात तत्सत्यमजेयौ कृष्णपाण्डवौ ॥ ३७
प्रपद्यस्व महाबाहुं कृष्णमक्लिष्टकारिणम् ।
प्रसन्नो हि सुखाय स्यादुभयोरेव केशवः ॥ ३८
सुहृदामर्थकामानां यो न तिष्ठति शासने ।
प्राज्ञानां कृतविद्यानां स नरः शत्रुनन्दनः ॥ ३९
न युद्धे तात कल्याणं न धर्मार्थौ कुतः सुखम् ।
न चापि विजयो नित्यं मा युद्धे चेत आधिथाः ॥ ४०
भीष्मेण हि महाप्राज्ञ पित्रा ते बाह्लिकेन च ।
दत्तोंशः पाण्डुपुत्राणां भेदाद्भीतैररिन्दम ॥ ४१
तस्य चैतत्प्रदानस्य फलमद्यानुपश्यसि ।
यद्भुङ्क्षे पृथिवीं कृत्स्नां शूरैर्निहतकण्टकाम् ॥ ४२
प्रयच्छ पाण्डुपुत्राणां यथोचितमरिन्दम ।
यदीच्छसि सहामात्यो भोक्तुमर्धं प्रदीयताम् ॥ ४३
अलमर्धं पृथिव्यास्ते सहामात्यस्य जीवितुम् ।
सुहृदां वचने तिष्ठन् यशः प्राप्स्यसि भारत ॥ ४४
श्रीमद्भिरात्मवद्भिस्तैर्बुद्धिमद्भिर्जितेन्द्रियैः ।
पाण्डवैर्विग्रहस्तात भ्रंशयेन्महतः सुखात् ॥ ४५
निगृह्य सुहृदां मन्युं शाधि राज्यं यथोचितम् ।
स्वमंशं पाण्डुपुत्रेभ्यः प्रदाय भरतर्षभ ॥ ४६
अलमङ्ग निकारोऽयं त्रयोदश समाः कृतः ।
शमयैनं महाप्राज्ञ कामक्रोधसमेधितम् ॥ ४७
न चैष शक्तः पार्थानां यस्त्वमर्थमभीप्ससि ।
सूतपुत्रो वृढक्रोधो भ्राता दुःशासनश्च ते ॥ ४८
भीष्मे द्रोणे कृपे कर्णे भीमसेने धनञ्जये ।
धृष्टद्युम्ने च संक्रुद्धे न स्युः सर्वाः प्रजा ध्रुवम् ॥ ४९
अमर्षवशमापन्नो मा कुरूंस्तात जीघनः ।
एषा हि पृथिवी कृत्स्ना मागमत्त्वत्कृते वधम् ॥ ५०
यच्च त्वं मन्यसे मूढ भीष्मद्रोणकृपादयः ।
योत्स्यन्ते सर्वशक्त्येति नैतदद्योपपद्यते ॥ ५१

समं हि राज्यं प्रीतिश्च स्थानं हि विदितात्मनाम् ।
पाण्डवेष्वथ युष्मासु धर्मस्त्वभ्यधिकस्ततः ॥ ५२
राजपिण्डभयादेते यदि हास्यन्ति जीवितम् ।
न हि शक्ष्यन्ति राजानं युधिष्ठिरमुदीक्षितुम् ॥ ५३
न लोभादर्थसम्पत्तिर्नराणामिह दृश्यते ।
तदलं तात लोभेन प्रशाम्य भरतर्षभ ॥ ५४

--महाभारत, उद्योगपर्व अध्याय १२९

हे दुर्योधना, मी काय सांगतें तें ऐक. ज्यामुळें तुझें तुझ्या सर्व अनुचरासह कल्याण होईल व पुढें ज्यामुळें साऱ्यांनाच सुख लाभेल असेंच मी तुला सांगतें. तुझा पिता, भीष्म, द्रोणाचार्य, कृपाचार्य, व तुझे इतर सुहृद हे सर्व तुला जें सांगत आहेत तदनुसारच तू वागणें तुझ्या हिताचें आहे. तू शांतीचा मार्ग स्वीकारलास की तुझे वडील व भीष्मद्रोणादि लोक व मी या सर्वांचें पूजन केल्यासारखे होईल. तू राज्य करूं इच्छीत आहेस, व तुझ्यासारख्या बुद्धिमान् व्यक्तीला ही गोष्ट समजली पाहिजे कीं राज्याची प्राप्ति, राज्याचें सरक्षण अथवा राज्याचा उपभोग कोणालाही आपल्या लहरीने वाटेल तसें वागन घेतां येत नसतो. इंद्रियें ज्याच्या स्वाधीन नाहीत त्याला दीर्घकाल राज्य करणें कधीही शक्य नाही. जो बुद्धिमान्, दक्ष, व मन सदैव स्वाधीन ठेवणारा असतो तोच केवळ राज्याचें पालन करूं शकतो. काम व क्रोध हे नेहमींच पुरुषाला अर्थप्राप्तीपासून वचित करीत असतात. मनाची लहर व मनाचा क्षोभ या दोन्ही गोष्टी राज्यासारखी महत्त्वाची गोष्ट स्वाधीन ठेवू इच्छिणाऱ्या व्यक्तींनीं सदैव नियंत्रित केल्याच पाहिजेत. काम व क्रोध हे खरे शत्रू आहेत. त्यांना जो जिंकील तोच पृथ्वी जिकील. सर्व लोकांचें ईश्वरत्व अथवा प्रभुत्व संपादन करणे ही एक अत्यंत महान् गोष्ट आहे. मन स्वाधीन नसलेल्या दुरात्म्यांना ती कधींही साधणार नाही. राज्य ही सर्वांच्याच हृदयांत मोह उत्पन्न करणारी गोष्ट आहे. पण ती मिळविण्यापेक्षांही त्याचें संरक्षण करणें ही अधिक दायित्वाची व अधिक कठिण गोष्ट आहे. ज्याला राज्यासारखी महान् गोष्ट प्राप्त करून घ्यावयाची असेल त्यानें अर्थ व धर्म या दोन

गोष्टीसाठी नेहमी आपली इंद्रिये नियंत्रित केलीं पाहिजेत. इंद्रियें नियंत्रित केली की बुद्धि वाढते. सर्पणानें ज्याप्रमाणें अग्नि प्रदीप्त होतो त्याचप्रमाणें संयमानें बुद्धि प्रदीप्त होत असते. इंद्रियें स्वाधीन नसली तर ती व्यक्तीचा नुसता पराजयच तर काय पण त्याची प्राणहानि देखील करूं शकतात. ज्याप्रमाणें अश्वांचें नियंत्रण न करूं शकणाऱ्या मूर्ख सारथ्याला अनियंत्रित अश्व शेवटी खड्ड्यांत घालून ठार मारतात, तशीच इंद्रियांचीही अवस्था आहे. स्वतःच्या मनावर विजय संपादन न करतां जो केवळ अमात्यांवर कुरघोडी करूं इच्छितो व शत्रूवर कुरघोडी करण्याची इच्छा करतो त्याला आपल्या अमात्यांवरही विजय संपादन करतां येत नाहीं व शेवटीं असा लहरीनुसार वागणारा राजा आपला सर्वनाश आपल्या हातानें ओढवून घेतो. आपलें मन हाच आपला खरा शत्रु आहे, हें ओळखून प्रथम तें स्वाधीन करून घेणारा व नंतर अमात्यांवर अधिसत्ता गाजवून शत्रूवर विजय संपादन करणारा मनुष्यच शेवटीं खऱ्या अर्थानें विजयी व यशस्वी ठरतो. इंद्रियें ज्याच्या स्वाधीन आहेत, अमात्य ज्याच्या स्वाधीन आहेत, विकृति उत्पन्न करणाऱ्या अपराधी लोकांना जो दंड करतो, प्रत्येक गोष्ट जो सर्व बाजूनी विचार व परीक्षा करून नंतरच आचरितो अशा गंभीर प्रकृतीच्या व्यक्तीजवळच संपत्ति सदैव निवास करते. ज्याला पुष्कळ छिद्रें पडलीं आहेत अशा जाळ्यानें कधींही बांधलें न जाणारें जलचर ज्याप्रमाणें जाळें छिन्नविच्छिन्न करून तें टाकणाऱ्याचाच नाश करतात त्याचप्रमाणे शरीराच्या आश्रयानें राहणारे काम व क्रोध ज्ञानाचा व बुद्धीचा विनाश करतात. वाढलेल्या कामक्रोधानीं ज्याचें अंतःकरण व्यापलें आहे अशा पुरुषासाठीं स्वर्गाचीं द्वारें देवांनीं सदाचीं बंद केलीं आहेत. काम, क्रोध, लोभ, दंभ व दर्प यांच्यावर जो राजा विजय सपादन करील तोच खरा राजा होय. पृथ्वी त्याच्याच स्वाधीन राहूं शकेल. इंद्रियांचा निग्रह करण्याविषयी राजानें सदैव दक्ष राहिलें पाहिजे. राज्यविस्तार, धर्मसंरक्षण, व शत्रूचा पराभव या गोष्टींची ज्याला इच्छा आहे अशा राजानें तर याबाबतींत डोळ्यांत तेल घालून सदैव जपलें पाहिजे.

कामाच्या स्वाधीन झाल्यानें असो किंवा क्रोधाच्या तावडींत सांपडून असो, पण जो आपल्या लोकांशी अथवा परक्या लोकांशीं खोटेंपणाचें आचरण करतो अथवा खोटें बोलतो त्याला जगांत कोणाचेंही व कसल्याही प्रकारचें साहाय्य मिळू शकत नाहीं. पांडव अत्यत बुद्धिमान् आहेत, शूर आहेत, व शत्रूचा त्यांनी केलेला पराभव अत्यंत देदीप्यमान असून ते पांचही बंधु अगदीं एकजीव आहेत. त्यांच्याशीं सख्य करून त्यांच्याबरोबर पृथ्वीचा उपभोग घेण्याची तू आपल्या मनाची सिद्धता करशील तरच सुखी होऊं शकशील. कृष्ण व पांडव अजिंक्य आहेत हें जें तुला शांतनुपुत्र भीष्म व महारथ द्रोण यांनीं सांगितलें तें अक्षरश. खरें आहे. उभयतांच्या कल्याणाच्या इच्छेनें येथें आलेल्या श्रीकृष्णाला तू शरण जा. जर कृष्ण प्रसन्न झाला तर तो उभय पक्षांचें कल्याण केल्यावांचून रहाणार नाहीं. राज्याच्या संरक्षणाचा पूर्ण विचार केलेल्या बुद्धिमान् व कर्तृत्ववान् सुहृदांचें म्हणणें जो ऐकत नाही तो मनुष्य स्वत:चा सर्वनाश ओढवून घेऊन केवळ स्वत:च्या शत्रूना आनंद देत असतो. युद्धाच्या कल्पनेपासून तू आपलें चित्त काढून घे. कारण या होणाऱ्या युद्धांत धर्म नाही. किंवा कसल्याही प्रकारचें कल्याण नाहीं, सुखाची तर वार्ताच नको, व तुझा विजयही व्हावयाचा नाही हें निश्चित आहे. कुळामध्यें भेद उत्पन्न होऊन सर्वनाश ओढवू नये म्हणूनच तुझा पिता, बाह्लिक व भीष्म यांनी पांडवांना पूर्वी राज्याचा अर्धा भाग दिला. आज निष्कंटक व अत्यंत विस्तृत अशा राज्याच्या उपभोग घेणें तुला जें शक्य झालेलें आहे तें केवळ त्यांच्या त्या कृतीचेंच फळ होय. पूर्वी हें राज्य येवढें विस्तारलेलें होतें काय ? पांडवांनीं आपल्या पराक्रमाने व शौर्यानें सर्व शत्रूचा नि:पात करून राज्य वाढविलें म्हणून तुम्ही येवढ्या मोठ्या राज्याचा उपभोग घेण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. जर यांपैकीं अर्ध्या राज्याचा जरी आपल्या अमात्यासह तुला यापुढें उपभोग घ्यावयाचा असेल तर जें योग्य आहे तें तू पांडवांना दिलेच पाहिजेस. तुला आपल्या अमात्यांसहित सुखानें जगावयास अर्धे राज्य पुरें आहे. जर आपल्या सुहृदांच्या म्हणण्याप्रमाणें तू वागलास तर मोठ्या

यशाची तुला प्राप्ति होईल असें मला वाटतें. श्रीमान्, मन स्वाधीन असलेले, सर्व सद्गुणांनीं मंडित, अत्यत बुद्धिमान् व जितेंद्रिय पांडवांशीं जर तू संघर्ष केलास तर तुझे सुखाचे दिवस यापुढे संपले असें समज. जो पांडवांचाच विभाग आहे तो त्यांना देऊन टाकून सुहृदांच्या अंतःकरणांतील क्रोध शांत कर व तुला जे उचित तेवढें राज्य तू कर. तेरा वर्षेपर्यंत कामक्रोधाच्या पोटी वाढलेला जो भयानक व अपकारक अन्याय तू केलास तो आतां पुरे झाला. यापुढें तो थांबलाच पाहिजे. पांडवांचा जो अंश तूं बळकावू इच्छितोस तो मिळविण्याचें सामर्थ्य तुझ्यांत व दुःशासनांत तर नाहींच, पण अत्यंत क्रोधन कर्णातही तें सामर्थ्य नाहीं हें तू खात्रीनें ध्यानांत ठेव. युद्धाचें पर्यवसान शेवटी कशांत व्हावयाचें आहे याचा तू यत्किंचित् तरी विचार केला आहेस काय? कोणाचाही जय झाला तरी त्यापासून लोकांचा सर्वनाशच व्हावयाचा आहे. भीष्म, द्रोण, कृपाचार्य, कर्ण, भीमसेन, अर्जुन व धृष्टद्युम्न एकमेकांवर संतापून उठल्यावर प्रजा जिवंत राहूं शकणार नाहीत हें निश्चित आहे. अकारण मत्सराचे व क्रोधाचे स्वाधीन होऊन सर्व कौरवांचा विनाश तूं कां करूं इच्छितोस? तुझ्या एकट्याच्या लहरीसाठी सर्व प्रजांचा व पृथ्वीचा विनाश करविण्याचें पातक तू करूं नयेस. भीष्म, द्रोण, कृपाचार्य हे आपल्या सर्व सामर्थ्यानिशी तुझ्याकडून लढतील ही जर तुझी अपेक्षा असेल तर ती निव्वळ मूर्खपणाची आहे. संबंधांच्या दृष्टीनें विचार केला तर तुम्हां दोघांचेंही राज्य, प्रेम, व स्थान या दृष्टीनें पांडव व तू त्यांना समानच आहांत. त्यामुळें पांडव सोडून तुझ्यावर अधिक प्रेम करण्याचें त्यांना कोणतेंही कारण नाहीं. धर्म व कर्तव्य या दृष्टीनें विचार केला तर कोणाचेंही प्रेम पांडवांच्याच पक्षावर बसावें इतके ते धार्मिक व न्यायप्रेमी असून त्यांची मागणी अत्यंत न्याय्य आहे. त्यामुळें यांच्या मनाचें पारडें झुकावयाचेंच तर तें तुझ्याऐवजीं पांडवांच्याचकडे झुकेल. केवळ अन्न खाल्लें आहे म्हणून जर त्यांना तुझ्याकडूनच जीवित समर्पावयाचें असेल तर हे राजा, युद्धांत युधिष्ठिराच्या डोळ्याशीं डोळा तरी भिडवावयाचें सामर्थ्य यांच्या ठिकाणी उरेल काय? आजपर्यंत लोभाच्या स्वाधीन

होऊन कोणीही राज्यविस्तार करूं शकला नाही. हित व्हावें अशी इच्छा असेल तर लोभ आवर व मन स्वाधीन ठेव, असें माझें तुला सांगणें आहे."

गांधारीनें या ठिकाणीं जें विवेचन केलें आहे तें राजधर्माचें विवेचन व कौटिल्यासारख्या श्रेष्ठ राज्यशास्त्रज्ञानें आपल्या राज्यशास्त्रावरील ग्रंथांतून केलेलें विवेचन यांत कांहींही भिन्नता आढळावयाची नाहीं. तिच्या या सखोल प्रतिपादनावरून तिची सूक्ष्म प्रज्ञा स्पष्ट होते. कर्तव्याकर्तव्याच्या प्रश्नांत नेहमींच तिनें आपलें मत निःसंकोच निर्भीडपणें मांडलें आहे. आदर्श सचिवसत्तेचा प्रतिनिधि विदुर जितक्या स्पष्टपणें आपलें मत मांडील इतक्याच स्पष्ट व निर्भीडपणें गांधारीनें राजा धृतराष्ट्राच्या तोंडावर भर राजसभेंत स्वतःचें मत मांडावयास अथवा प्रत्यक्ष राजा धृतराष्ट्राच्या तोंडावर त्याच्या सभासदांसमोर त्याची खरडपट्टी काढावयास मुळींच कमी केलेलें नाहीं. तूं दुर्योधनाला समजावून सांग असें धृतराष्ट्र गांधारीला म्हणत असतां त्याला उत्तर देतांना ती म्हणतेः—

आनाय्य सुतं क्षिप्रं राज्यकामुकमातुरम्।
न हि राज्यमशिष्टेन शक्यं धर्मार्थलोपिना॥ १०
आप्तुमाप्तं तथापीदमविनीतेन सर्वथा।
त्वं हृषेवात्र भृशं गर्हयों धृतराष्ट्र सुतप्रियः॥ ११
यो जानन् पापतामस्य तत्प्रज्ञामनुवर्तसे।
स एष काममन्युभ्यां प्रलब्धो लोभमास्थितः॥ १२
अशक्योऽद्य त्वया राजन्निवर्तयितुं बलात्।
राष्ट्रप्रदाने मूढस्य बालिशस्य दुरात्मनः॥ १३
दुःसहायस्य लुब्धस्य धृतराष्ट्रोऽनुते फलम्।
कथं हि स्वजने भेदमुपेक्षेत महीपतिः।
भिन्नं हि स्वजनेन त्वां प्रहसिष्यन्ति शत्रवः॥ १४
या हि शक्या महाराज साम्ना भेदेन वा पुनः।
निस्तर्तुंरापदः स्वेषु दण्डं कस्तत्र पातयेत्॥ १५

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १२९

" हे राजा राज्यकामुक व मूर्ख अशा अस्थिरबुद्धि तुझ्या पुत्राला त्वरित सभेंत बोलावून घे. धर्म व राज्यशास्त्र यांच्या नियमांचा भंग करणाऱ्या व मुळींच सभ्यता नसलेल्या व्यक्तीला राज्य संभाळतां येणें कधींच शक्य नाहीं. उद्धट मनुष्य कधी राज्यपालन करूं शकतो काय ? अविनयी मनुष्य राज्यसंपादन करूं शकत नाहीं. या बाबतींत खरोखरी कोणाला दोष देऊन त्याची गर्हणा करावयाची असेल तर, हे राजा धृतराष्ट्रा, ती तुझीच केली पाहिजे. दुर्योधन पापी व दुरात्मा आहे हें माहीत असतांना देखील केवळ पुत्रप्रेमानें प्रेरित होऊन तू त्याच्या लहरीनुसार वागलास व वागतोस त्याचें हें फळ आहे. तो लहर व क्रोध यांनीं शहाणपणापासून वंचित केलेला असून अत्यंत लोभी आहे. मूर्ख, बालिश व दुरात्म्या दुर्योधनाला तूं सामर्थ्याच्या भरंशावर आतां वळवू शकणार नाहींस. लोभ व दुष्टांचा भरंवसा याचें फल धृतराष्ट्र भोगतो आहे. आपल्याच लोकांत पडणाऱ्या फुटीची कोणता शहाणा मनुष्य उपेक्षा करील ? सारे स्वजन फुटून तुला सोडून गेल्यावर तू शत्रूच्या दृष्टीनें उपहासास्पद ठरल्यावाचून राहशील काय ? हे महाराज, आपल्याच लोकांकडून लोकांवर कोसळणारी जी आपत्ति सामानें व भेदानें टाळतां येण्यासारखी आहे तिच्या संबंधांत दंडाचा वापर कोणता शहाणा मनुष्य करील ? "

धर्म व कर्तव्यनिष्ठा हा गांधारीचा स्थायीभाव होता. म्हणूनच पुत्रमोह बाजूस सारून तिनें पांडवांचें अभीष्ट चिंतन केलें. पण जे धर्माचे आधारस्तंभ त्या पांडवांनीं आपल्या पुत्रांना अधर्मानें मारले ही गोष्ट कळतांच ती अेकाद्या वाघिणीप्रणाणें चवताळून उठली. ती व्यासांना म्हणते:—

दुर्योधनापराधेन शकुनेः सौबलस्य च ।
कर्णदुःशासनाभ्यां च कृतोऽयं कुरुसंक्षयः ॥ १६
किं तु कर्माकरोद् भीमो वासुदेवस्य पश्यतः ।
दुर्योधनं समाहूय गदायुद्धे महामनाः ॥ १९
शिक्षयाभ्यधिकं ज्ञात्वा चरन्तं बहुधा रणे ।
अधो नाभ्याः प्रहृतवांस्तन्मे कोपमवर्धयत् ॥ २०

कथं नु धर्मं धर्मज्ञैः समुद्दिष्टं महात्मभिः ।
त्यजेयुराहवे शूराः प्राणहेतोः कथञ्चन ।। २१

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १४

न तस्यैष वधस्तात यत्प्रशंससि मे सुतम् ।
कृतवांश्चापि तत्सर्वं यदिदं भाषसे मयि ।। १२
हताश्वे नकुले यत्तु वृषसेनेन भारत ।
अपिबः शोणितं संख्ये दुःशासनशरीरजम् । १३
सद्भिर्विगर्हितं घोरमनार्यजनसेवितम् ।
क्रूरं कर्माकृथास्तस्मात्तदयुक्तं वृकोदर ।। १४

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १५

"दुर्योधनाच्या अपराधानें व शकुनि, कर्ण आणि दुःशासन यांच्याचमुळें कौरवांचा विनाश झाला आहे याची मला पूर्ण कल्पना आहे. पण महाराज, अधर्माची मला मनापासून चीड आहे. या भीमानें दुर्योधनाला गदायुद्धांत आव्हान देऊन तो रणांत आपल्यापेक्षां अधिक कुशल आहे हें पाहतांच त्याच्या नाभिमात्राच्याखाली प्रहार करण्याचा जो अधर्म केला त्यामुळें माझा राग वाढला. श्रीकृष्ण पहात असतां भीमानें हा अधर्म केला. जे स्वतः धर्मज्ञ व महानुभाव लोक आहेत ते प्राणासाठी धर्माचा परित्याग कधीही करीत नसतात". घाबरलेला भीमसेन गाधारीची ही दरडावणी ऐकून दुर्योधन आपल्यापेक्षां गदायुद्धांत अधिक कुशल योद्धा कसा होता हें सांगूं लागतांच गांधारी त्याला म्हणाली, " तू ज्या अर्थी माझ्या पुत्राची प्रशंसा करतोस त्या अर्थी त्याचा वध झालाच नाही असें मी समजतें. पण कायरे, वृषसेनानें नकुलाचा पराजय करून त्याचे घोडे मारून टाकल्यावर तू दुःशासनाच्या शरीरांतील रक्त प्यालास काय? सज्जनांनीं निंदा केलेलें, घोर व केवळ अनार्यांनीच ज्याचें आचरण करावें असें कर्म करावयास तू कसा धजलास? तू अत्यंत अनुचित गोष्ट केलीस!" यावर भीमसेन 'मी दुःशासनाचें रक्त मुळींच प्यालों नाही' असें सांगून दुर्योधनाच्या बाबतींत मी जो काय धर्म वा अधर्म केला असेल त्यासंबधी तू मला क्षमा कर असें म्हणू लागला त्या वेळीच तिचा कोप कांहीसा शांत झाला.

सभापर्वांत द्रौपदीची विटंबनेपासून शेवटी सुटका करावयास गांधारीच कारणीभूत झाली असें वर्णन आहे.

ततो गान्धारी विदुरश्चापि विद्वांस्तमुत्पात घोरमालक्ष्य राज्ञे ।
निवेदयामासतुरार्तवत्तदा । ततो राजा वाक्यमिदं बभाषे ।। २४

—महाभारत, सभापर्व अध्याय ७१

नतर विदुर व गांधारी घोर उत्पात पाहून राजा धृतराष्ट्राला आर्तपणानें त्याविषयीं सचेत करूं लागली. नंतर राजा द्यूत थांबविण्याच्या उद्देशानें बोलला. या ठिकाणी विदुराचें नांव जरी आलें असलें तरी द्रौपद्रीची विटंबना खरी गांधारीमुळेंच थांबलेली आहे. विदुर तिच्याबरोबर वा तिचे प्रेरक होते इतकेंच. गांधारी सभेंत येईपर्यत विदुरांनी अनेकवार धृतराष्ट्रांना सचेत करून वळविण्यासाठी प्रयत्न केले, पण त्याचा कांहीएक उपयोग झाला नाही. गांधारीचा मात्र उपयोग झाला. यामुळें गांधारीनेंच द्रौपदीची विटंबना थांबविली असें म्हटलें पाहिजे. आपल्या पुत्रांनीं द्रौपदीला भरसभेंत ओढीत आणून अखिल स्त्रीजातीचा जो अपमान केला व साऱ्या कुळाला जो कलंक लावला त्याचें गांधारीला इतकें दुःख झालें की कर्तव्याग्नींत वात्सल्य जाळून टाकून दुर्योधनाचा परित्याग वा विनाश करावा असें तिनें धृतराष्ट्राला स्पष्ट शब्दांत सुचविलें आहे. महाभारतकार म्हणतात :—

अथाब्रवीन्महाराज धृतराष्ट्रं जनेश्वरम् ।
पुत्रहार्दाद्धर्मयुक्ता गान्धारी शोककर्षिता ।। १
जाते दुर्योधने क्षत्ता महामतिरभाषत ।
नीयतां परलोकाय साध्वयं कुलपांसनः ।। २
व्यनदज्जातमात्रो हि गोमायुरिव भारत ।
अन्तो नूनं कुलस्यास्य कुरवस्तन्निबोधत ।। ३
मा निमज्जीः स्वदोषेण महाप्सु त्वं हि भारत ।
मा बालानामशिष्टानामभिमंस्था मतिं प्रभो ।। ४
मा कुलस्य क्षये घोरे कारणं त्वं भविष्यसि ।
बद्धं सेतुं को नु भिन्द्याद्धमेच्छान्तं च पावकम् ।। ५

शमे स्थितान्को नु पार्थान्कोपयेद् भरतर्षभ ।
स्मरन्तं त्वामाजमीढं स्मारयिष्यम्यहं पुनः ।। ६
शास्त्रं च शास्ति दुर्बुद्धि श्रेयसे चेतराय च ।
न वै वृद्धो बालमतिर्भवेद्राजन् कथंचन ।। ७
त्वन्नेत्राः सन्तु ते पुत्रा मा त्वां दीर्णाः प्रहासिषुः ।
तस्मादयं मद्वचनात्त्यज्यतां कुलपांसनः ।। ८
तथा तेन कृतं राजन्पुत्रस्नेहान्नराधिप ।
तस्य प्राप्तं फलं विद्धि कुलान्तकरणाय यत् ।। ९
शमेन धमण नयेन युक्ता या ते बुद्धिः सास्तु मे मा प्रमादीः ।
प्रध्वंसिनी क्रूरसमाहिता श्रीर्मृदुप्रौढा गच्छति पुत्रपौत्रान् ।। १०
—महाभारत, सभापर्व अ. ७५

नंतर जनेश्वर धृतराष्ट्राला शोककर्षित गांधारी म्हणाली, हा दुर्योधन ज्यावेळीं जन्माला आला त्याचवेळीं महाबुद्धिमान् विदुरानें असें सांगितलें होतें कीं, हा कुलांगार असून याला ताबडतोब ठार मारून टाकणेंच हिताचें ठरेल. जन्मल्याबरोबर हा कोल्ह्याप्रमाणें ओरडला त्यावरूनच हा या कुलाचा अंत करणार आहे हें स्पष्ट झालें. हे महाराज धृतराष्ट्रा, स्वतःच्या दोषामुळें मोठ्या आपत्तींत तू बुडू नकोस. मूर्ख व असभ्य मुलांच्या लहरीनुसार तू वागूं नकोस. आपल्या कुलाच्या भयानक विनाशाला धृतराष्ट्र कारणीभूत झाला असें भावी पिढ्या म्हणतील असें कर्म तू करूं नकोस. कोण असा वेडा आहे की, जो बांधलेल्या सेतूला फोडून टाकून पुरांत बुडण्याची अथवा शांत असलेल्या अग्नीला प्रज्वलित करून त्यांत स्वतःच दग्ध होणाची सिद्धता करील? शांततेनें वागावयाला सिद्ध असणाऱ्या पांडवांना कोण अकारण कोप आणण्याचा प्रयत्न करील? दुर्बुद्ध मनुष्याला शास्त्र कांही करूं शकत नाही. तुझ्यासारख्या वृद्धानें मूर्खाच्या लहरीनुसार वागावें हें सर्वथा अनिष्ट आहे. जर तुझ्या सर्व मुलांनीं तुझ्या मार्गदर्शनानें जगावें व नाश पावून तुला दुःखांत लोटू नये असें तुला वाटत असेल तर माझ्यासाठी तरी या कुलांगार दुर्योधनाचा परित्याग कर. पुत्रस्नेहामळें त जें कुकर्म केलेंस त्याचें

कुलाचा अंत हें फळ लौकरच प्राप्त होईल. शम, धर्म व नीति यांनीं युक्त अशीच तुझी बुद्धि असावी. तिनें प्रमादाच्या आधीन होऊं नये. लहान सहान गोष्टीपासून क्रोर्यानें सपत्ति हरण करण्याची विनाशकारक बुद्धि एकदां स्वीकारली की ती आपल्यापेक्षां खालच्या पिढींतही पसरून सर्वाचाच विनाश ओढवून आणल्यावांचून रहात नाहीं. महर्षि व्यासांनी गांधारीचें वर्णन करतांना

पतिव्रता महाभागा समानव्रतचारिणी ।
उग्रेण तपसा युक्ता सततं सत्यवादिनी ।। २

—महाभारत स्त्रीपर्व अ. १६

पतिव्रता, महानुभाव, व्रताचरण करणारी अत्यंत उग्र तपानें युक्त, व सतत सत्यवादिनी असें म्हटलें आहे. अंतःकरणाचें तिचें औदार्य विलक्षण होतें. ज्यावेळीं रणांगणावर द्रौपदी पुत्रशोकानें विलाप करूं लागली त्या वेळी तिचें सांत्वन करावयास स्वतः गांधारीनेंच पुढें होऊन आपल्या हृदयाचें औदार्य प्रकट केलें आहे. ती द्रौपदीला म्हणते,

तामुवाचाथ गान्धारी सह वध्वा यशस्विनीम् ।। ४०
मैवं पुत्रीति शोकार्ता पश्य मामपि दुःखिताम् । ४१

—महाभारत, स्त्रीपर्व अ. १५

गांधारी आपल्या सुनांसह द्रौपदीला म्हणू लागली, 'हे मुली इतका शोक करूं नकोस, माझ्याकडे पहा. माझीं शंभर मुलें मेलीं आहेत. हें जगांत चालावयाचेंच.'

यानंतर गांधारीचें उर्वरित सारें आयुष्य आपल्या पुत्रशोकानें पीडित व अंध पतीच्या सेवाशुश्रूषेंत गेलें. महानुभाव युधिष्ठिर मातेप्रमाणें तिचीही काळजी घेत असे; व स्वतः कुंतीच तिची सेवा करीत असल्यामुळें आपोआपच सर्व पांडवस्त्रिया विनयानें तिच्या सेवाशुश्रूषेंत असत. धृतराष्ट्राच्या दुष्टाव्यामुळें त्याच्याविषयीं अंतःकरणांत अपार क्रोध साठलेला भीमसेन अप्रत्यक्ष रीत्या वाग्बाणांनी त्याला दुःखी करीत असे. ते गांधारीच्याही कानावर आदळत. पण त्या महामनस्क स्त्रीनें कालाचा महिमा पूर्णपणें

ओळखून त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें. छायेप्रमाणें ती धृतराष्ट्राबरोबर अरण्यांत गेली व कडकडीत तपाचरणांत आपला देह शुष्क करून धृतराष्ट्राबरोबर तिने आपला देहही वनांतील वणव्याच्या अग्नींत समर्पण केला.

तात्पर्य भीष्म, विदुर व गांधारी यांच्या रूपानें विशुद्ध सचिवसत्तेचें महाभारतांत महर्षींनी चित्र रेखाटलें आहे. पण ही सचिवसत्ता राजसत्तेवर नियंत्रण घालू न शकण्याइतकी दुबळी आहे. राजसत्ता स्वतःच दुष्ट असून शिवाय दुष्ट सचिवसत्तेला तिनें जवळ केलें आहे. महाभारतकाळी याप्रमाणे ब्रह्म व क्षत्र या दोहोंचाही पूर्णपणें अधःपात होण्याची वेळ आली होती. ब्रह्म हें समाजाचें नेतृत्व असलें तर क्षत्र हे सामर्थ्य होतें. समाजांत धर्म टिकावयास या दोहोंच्या विशुद्धतेची परम आवश्यकता होती. त्यासाठी येथील अधार्मिक राजसत्ता पार मोडून व विखंडून टाकून त्या जागी नवी धर्मसत्ता स्थापन करणे परम आवश्यक होतें. पूर्णावतार भगवान् श्रीकृष्णांनी हें कार्य केलें. त्यांच्या विजयाचा व या कार्याचा इतिहास हाच महाभारताचा इतिहास होय. हें कार्य ज्या साधनांनीं भगवान् श्रीष्णांनीं केलें तें साधन म्हणजे पांडव होत. श्रीकृष्णांनी आपण होऊनच हें साधन हातीं धरलेले आहे. द्रौपदीच्या स्वयंवरांत पांडव प्रकट होईपर्यंत भगवान् श्रीकृष्णांचा व त्यांचा कांहींही संबंध आलेला नव्हता. त्यानंतर स्वतः होऊन पांडवांची भेट घेऊन त्यांच्या असहाय स्थितीत त्यांनीं पांडवांच्या पाठीशीं उभे राहून त्यांना साहाय्य केलें आहे. भ्रष्ट राजसत्तेचा विध्वंस करून जगतांत धर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठीं पांडव हेच श्रीकृष्णांना महत्त्वाचें साधन कां वाटले असतील हें स्पष्ट होणें आवश्यक आहे.

पाण्डवांचें वैशिष्टय

पांडव हें एक प्रकारचें संघटित नेतृत्व आहे. सर्व पांडव राजा युधिष्ठिराच्या नियंत्रणाखाली असून त्यांच्यांत फूट पडणें केवळ अशक्य होतें हें महाभारत वरवर वाचणाऱ्याच्याही स्पष्टपणें

ध्यानांत येतें. भीम व अर्जुन यांच्यासारख्या सामर्थ्यशील व्यक्तीही अत्यंत आपत्तीच्या प्रसंगी देखील युधिष्ठिराचें नेतृत्व निर्विवादपणें मान्य करतात. द्यूत चालूं असतां या गोष्टीचा स्पष्टपणें प्रत्यय आलेला आहे. द्रौपदीची विटंबना होत असतांना व केवळ युधिष्ठिराच्या द्यूतप्रियतेनें, अंगी सामर्थ्य असूनही, दुर्योधनाचा दास होण्याचा प्रसंग आला असतां, इतकेंच नव्हे तर क्षणोक्षणीं उठून दुर्योधनाच्या नरडीचा घोट घ्यावा अशी वृत्ति अत्यंत जोरानें मनांत उफाळत असतांना देखील, ज्यावेळी युधिष्ठिर आमचा धनी नाहीं असें भीमार्जुनांनीं म्हटल्यास त्यांना मी आपल्या दास्यांतून मुक्त करावयास सिद्ध आहें असें दुर्योधनानें म्हटलें तेव्हां भीमासारखा महापराक्रमी क्रोधन देखील त्याला उत्तर देतांना असें म्हणतो कीं :–

यद्येष गुरुरस्माकं धर्मराजो महामनाः ।
न प्रभुः स्यात्कुलस्यास्य न वयं मर्षयेमहि ।। १२
ईशो नः पुण्यतपसां प्राणानामपि चेश्वरः ।
मन्यतेऽजितमात्मानं यद्येष विजिता वयम् ।। १३
न हि मुच्येत मे जीवन्पदा भूमिमुपस्पृशन् ।
मर्त्यधर्मा परामृश्य पाञ्चाल्या मूर्धजानिमान ।।१४
पश्यध्वं दृप्यतौ वृत्तौ भुजौ मे परिघाविव ।
नैतयोरन्तरं प्राप्य मुच्येतापि शतक्रतुः ।। १५
धर्मपाशसितस्त्वेवं नाधिगच्छामि संकटम् ।
गौरवेण विरुद्धश्च निग्रहादर्जुनस्य च ।। १६
धर्मराजनिसृष्टस्तु सिंहः क्षुद्रमृगानिव ।
धार्तराष्ट्रानिमान्पापान्निष्पिषेयं तलासिभिः ।। १७

—महाभारत, सभापर्व अध्याय ७०

"जर हा महानुभाव धर्मराज आमचा गुरू व आमच्या कुलाचा प्रभु नसता तर आम्ही हे चाललेले प्रकार कधीही सहन केले नसते. हा युधिष्ठिर आमच्या पुण्याचा, तपाचा व प्राणांचाही ईश्वर आहे. तो जर स्वतःला जित समजतो तर आम्हीही जिंकलों गेलों व दास झालों हें उघडच आहे. कोणताही जमिनीवर उभे राहूं शकणारा

मरणधर्मी मनुष्य मी जिवंत असतां द्रौपदीच्या केसाला हात लावून कधीही जिवंत राहूं शकला नसता. माझे हे परिघाप्रमाणें विस्तीर्ण व समर्थ भुज पहा. या बाहूच्या एकदां तावडींत सांपडल्यावर देवेंद्राची देखील सुटका होण्यासारखी नाहीं. धर्मपाशांत सांपडल्यामुळें युधिष्ठिराच्या गौरवानें नियत्रित झाल्यामुळे व अर्जुनाच्या निग्रहामुळें मला हें संकट सोसणे क्रमप्राप्त आहे. धर्मराजानें जर आज्ञा दिली तर सिह क्षुद्र मृगांचा वध करतो त्याचप्रमाणें मी या धार्तराष्ट्रांना केव्हांच ठार मारलें असतें. या क्षुद्रांना मारावयास शस्त्रें तरी कशाला हवीत? नुसतें तळहाताच्या आघातानें देखील मी यांना ठार मारूं शकेन."

भीमासारख्याची जर ही अवस्था तर बाकीचे पांडव युधिष्ठिराच्या नियंत्रणांत होते हें वेगळे सांगावयास नकोच. या सघटित नेतृत्वाचा नेता जो युधिष्ठिर त्याच्या असामान्य धर्मसत्तेच्या प्रेमामुळेच भगवान् श्रीकृष्णांचें लक्ष त्याच्याकडे वेधले आहे. भगवान् श्रीकृष्ण हे यादवांच्या गणराज्याचे घटक होते. कंसानें आपल्या पराक्रमी उन्मादानें या गणराज्याचें स्वरूप पार विध्वंसित करून स्वतःची एकतत्री सत्ता स्थापन केली व गणराज्य मोडून टाकलें. मगध साम्राज्याच्या प्रबल सामर्थ्याचा पाठिबा मिळाल्याकारणानेंच कंसाला ही गोष्ट करतां आली. आपल्या पराक्रमानें सर्व भारतीय राजसत्तांना अंकित करून घेणारा महापराक्रमी व पशुपतीच्या यज्ञांत शंभर राजमस्तकांचेंच हवन करूं इच्छिणारा क्रूरकर्मा जरासंध हा कंसाचा सासरा होता. त्याच्या अस्ति व प्राप्ति या दोन्ही मुली कंसाला देण्यांत आल्या होत्या. मगध सम्राटाच्या सामर्थ्याच्या बळावर यादव गणराज्याचा पाया खणून काढून कंसानें तेथें आपली एकतंत्री सत्ता उत्पन्न केली. या सत्तेला विरोध करावयास जे जे लोक पुढे आले त्या त्या लोकांना त्यानें नाना प्रकारें छळावयास प्रारंभ केला. प्रत्यक्ष स्वतःचा पिता जो उग्रसेन त्यालाच त्याने बदीत टाकावयास कमी केलें नाहीं. स्वकीय यादवांचा छळ होऊं लागला व परकीय मगधांचें वर्चस्व तेथें वाढूं लागलें. आपलें निष्कलंक गणराज्य पुनश्च उद्धृत करून त्याचे

हे श्रीकृष्णा, माझ्या या सर्व दुर्दैवासाठीं मी स्वत:ला अथवा दुर्योधनाला मुळींच दोष देऊं इच्छीत नाहीं. माझ्या पित्यालाच मी खरा दोष देतें. निर्जीव धनाप्रमाणें त्यानें कुंतीभोजावर प्रसन्न होऊन मला त्यास देऊन टाकलें. त्यावेळीं मी चेंडू हातांत घेऊन खेळूं शकत होतें. लहानपणी पित्यानें व मोठेपणी श्वशुरानें माझी वंचना केली. व तेव्हांपासूनच मला अत्यत दु:ख भोगावें लागत आहे. माझ्या जगण्याचें तरी काय फळ आहे हेंच मला समजत नाही."

तिच्यावरील विलक्षण प्रसंग

कुंती लहानपणीं कुंतीभोजाच्या घरीं रहात असतां तेथें एका पावसाळ्यांत महर्षि दुर्वास हे राहावयास्तव आले. राजा कुंतीभोजानें कुंतीलाच त्यांच्या सेवेसाठीं नियुक्त केलें. प्रसन्न झालेल्या दुर्वासांनी त्यांचें त्या नगरांतील वास्तव्य संपवितांना कुंतीला एक अभिचारयुक्त मंत्र दिला व असें सांगितलें कीं :—

यं यं देवं त्वमेतेन मन्त्रेणावाहयिष्यसि।
तस्य तस्य प्रभावेण तव पुत्रो भविष्यति ॥ ७

—महाभारत, आदिपर्व अध्याय १११

"तूं या मंत्रानें ज्या ज्या देवाला आवाहन करशील तो तो देव आपल्या प्रभावानें तुला पुत्र देईल." कुंतीला हें वरप्रदान ज्यावेळीं मिळालें त्यावेळी त्याचा अर्थ समजण्याइतकें तिचें वय प्रौढ नव्हतें. दुर्वासांनीं भलत्याच वयांत आपण जी शक्ति देत आहोंत त्याचा काय परिणाम होईल याचा विचार न करतां कुंतीच्या स्वाधीन हें सामर्थ्य करतांच त्याचा जो व्हावयाचा तोच परिणाम झाला.
महाभारतकार म्हणतात :—

तथोक्ता सा तु विप्रेण कुन्ती कौतूहलान्विता ।
कन्या सती देवमर्कमाजुहाव यशस्विनी ॥८
सा ददर्श तमायान्तं भास्करं लोकभावनम् ॥
विस्मिता चानवद्याङ्गी दृष्ट्वा तन्महदद्भुतम् ॥ ९
तां समासाद्य देवस्तु विवस्वानिदमब्रवीत् ।
अयमस्म्यसितापाङ्गि ब्रूहि किं करवाणि ते ॥ १०

कुन्त्युवाच ।

कश्चिन्मे ब्राह्मणः प्रादाद्वरं विद्यां च शत्रुहन् ।
तद्विजिज्ञासयाह्वानं कृतवत्यस्मि ते विभो ॥ ११
एतस्मिन्नपराधे त्वां शिरसाऽहं प्रसादये ।
योषितो हि सदा रक्ष्याः स्वापराद्धाऽपि नित्यशः ॥ १२

सूर्य उवाच

वेदाहं सर्वमेवैतद्यद् दुर्वासा वरं ददौ ।
संत्यज्य भयमेवेह क्रियतां संगमो मम ॥ १३
अमोघं दर्शनं महद्यमाहूतश्चास्मि ते शुभे ।
वृथाह्वानेऽपि ते भीरु दोषः स्यान्नात्र संशयः ॥ १४

वैशंपायन उवाच ।

एवमुक्ता बहुविधं सान्त्वपूर्वं विवस्वता ।
सा तु नैच्छद्वरारोहा कन्याहमिति भारत ॥ १५
बन्धुपक्षभयाद्भीता लज्जया च यशस्विनी ।
तामर्कः पुनरेवेदमब्रवीद् भरतर्षभ ॥ १६
मत्प्रसादान्न ते राज्ञि भविता दोष इत्युत ।
एवमुक्त्वा स भगवान्कुन्तिराजसुतां तदा ॥ १७
प्रकाशकर्ता तपनः सम्बभूव तया सह ।
तत्र वीरः समभवत्सर्वशस्त्रभृतां वरः ।
आमुक्तकवचः श्रीमान्देवगर्भः श्रियान्वितः ॥ १८
सहजं कवचं बिभ्रत्कुण्डलो द्योतिताननः ।
अजायत सुतः कर्णः सर्वलोकेषु विश्रुतः ॥ १९
प्रादाच्च तस्यै कन्यात्वं पुनः स परमद्युतिः ।
दत्वा च तपतां श्रेष्ठो दिवमाचक्रमे ततः ॥ २०
दृष्ट्वा कुमारं जातं सा वार्ष्णेयी दीनमानसा ।
एकाग्रं चिन्तयामास किं कृत्वा सुकृतं भवेत् ॥ २१
गूहमानापचारं सा बन्धुपक्षभयात्तदा ।
उत्ससर्ज कुमारं तं जले कुन्ती महाबलम् ॥ २२

—महाभारत, आदिपर्व अध्याय १११

"दुर्वास निघून गेल्यावर कुंतीच्या ठिकाणी बाल्यसुलभ औत्सुक्य जागृत झालें, व कोणत्या देवाला आवाहन करावें याचा विचार करीत असतांना समोर दिसणाऱ्या सूर्यनारायणालाच तिनें त्या मंत्र-प्रभावानें बोलाविलें. मंत्राचा प्रभाव असा विलक्षण कीं भगवान सूर्य तिच्यासमोर येऊन उपस्थित झाले. त्यांनीं विचारलें हे सुदरी, तू मला कशासाठी बोलाविलेंस ? मी तुझें काय प्रिय करूं तें सांग. अवचित प्रत्यक्ष सूर्याचें तेथें येणें व त्याचें हें बोलणें ऐकतांच कुंती गोंधळली. तिनें सूर्यनारायणाला असें सांगितलें की एका ब्राह्मणानें मला ही विद्या व वरदान दिलें. बाल्यसुलभ जिज्ञासेनें प्रेरित होऊन अजाणता मी त्याचा उपयोग करून आपणांस आवाहन केलें. हा माझा मोठा अपराध झालेला आहे. पण मी आपणाला साष्टांग नमस्कार घालतें. आपण मला क्षमा करा. स्त्रियांचें त्यांच्या अपराधापासून नेहमीच रक्षण करावें. सूर्यानें कुंतीला सांगितलें कीं दुर्वास ऋषीनी तुला दिलेलें वरदान व त्याचें सामर्थ्य मला माहीत आहे. आतां सर्वप्रकारचें अंतःकरणांतील भय टाकून देऊन तू माझ्याशी संगम कर. माझें दर्शन अमोघ आहे. तूं मला होऊन बोलाविलें आहेस. देवाचें दर्शन व्यर्थ कधींही न गेलें पाहिजे. व्यर्थ तू मला बोलाविलेंस तर तो तुझाच अपराध गणला जाईल व मी व्यर्थ दर्शन दिलें नि तसाच परत गेलों, तर तें मलाही योग्य नाहीं. याप्रमाणें सांत्वनपूर्वक सूर्यानें तिच्याशीं नानाप्रकारें बोलून तिला समजाविण्याचा प्रयत्न केला. पण मी कन्या असल्यामुळे संगमाला प्रवृत्त होऊं शकत नाहीं असेंच तिनें सांगितलें. स्वतःच्या कुमारीपणामुळें, नातलगांच्या भीतीनें व स्त्रीस्वभावसुलभ लज्जेमुळें सूर्याचें म्हणणें ती मान्य करीना. शेवटीं सूर्यानें तिला असें सांगितलें कीं, माझी व तुझी भेट व्यर्थ जाणार नाहींच. पण माझ्या संगमामुळें तुझें कन्यात्व नष्ट होणार नाहीं असें मी तुला वरदान देतों. शेवटीं कुंती व सूर्य यांचा संगम झाला. आणि तत्काळ कुंतीला सर्व शस्त्रधारी लोकांमध्यें श्रेष्ठ, देवपुत्राप्रमाणें अत्यंत तेजस्वी, सहज कवचकुंडलांनीं मंडित अशा प्रकारचा कर्ण नांवाचा मुलगा झाला. सूर्यानें आपल्या सामर्थ्यानें कुंतीचें कन्यात्व

पुनश्च तिला दिलें व सूर्य नारायण निघून गेले." तो मुलगा होतांच यादवकन्या कुंती अत्यत खिन्न झाली. ही गोष्ट आपल्या नातलगांना कळतांच आपले काय होईल या भयानें तिच्या अंगाचा थरकांप उडाला. एकांतामध्ये ती विचार करूं लागली कीं काय केलें असतां आपलें कल्याण होईल? शेवटीं नातलगांच्या भयानें आपले तें अपकृत्य कोणाच्या ध्यानांत येऊं नये म्हणून कुतीनें त्या मुलाला पाण्यांत टाकून दिलें." याप्रमाणें कुंतीनें कर्णाचा परित्याग केला तरी जन्मभर तें शल्य तिच्या अंत:करणात घर करून होतेंच. अर्जुनाला कर्णानें ज्यावेळीं पहिल्या शस्त्रपरीक्षेंत आव्हान दिलें त्या वेळीं कुंतीने कर्णाला पहिल्यानें ओळखले. ते दोन बधुबंधू एकमेकांचे प्राण हरण करण्याच्या इच्छेनें एकमेकांसमोर उभें राहिलेले पहातांच कुंतीच्या मनावर मोठा विपरीत परिणाम झाला. व ती एकाएकी मूर्च्छित होऊन पडली. महाभारतकार म्हणतात :–

द्विधा रङ्गः समभवत्स्त्रीणां द्वैधमजायत ।
कुन्तिभोजसुता मोहं विज्ञातार्था जगाम ह ॥ २७
तां तथा मोहमापन्नां विदुरः सर्वधर्मवित् ।
कुन्तीमाश्वासयामास प्रेष्याभिश्चन्दनोदकैः ॥ २८
ततः प्रत्यागतप्राणा तावुभौ परिदंशितौ ।
पुत्रौ दृष्ट्वा सुसंभ्रान्ता नान्वपद्यत किञ्चन ॥ २९

——महाभारत, आदिपर्व अध्याय १३६

" त्या दोन पुरुषांना परस्परांना आव्हान देतांना पहातांच त्या उपस्थित समाजांत दोघांच्याही अभिमान्यांचे दोन वर्ग उपस्थित झाले व स्त्रियांचेही असेच दोन वर्ग झाले. कर्ण कोण आहे हें कुंतीला समजून येतांच मनाला एकाएकी धक्का बसून ती एकदम मूर्च्छित झाली. मूर्च्छित झाल्याचें कळतांच विदुरानें दासीकडून चंदनाचें पाणी वगैरे शिंपडून तिला सावध केलें. सावध झाल्यानंतर आपल्याच त्या दोन पुत्रांना रणांत उभे ठाकलेले पाहून तिला संभ्रम उत्पन्न झाला. पण ओळख देण्याची ती वेळ नसल्यामुळें ती त्या वेळीं कांहीच बोलली नाहीं." यानंतर उद्योगपर्वांत विदुराला

सर्व वृत्तांत सांगून त्याच्या परवानगीनें कुंतीनें कर्णाची भेट घेतली व आपल्या या पुत्रांत आणि उर्वरित पुत्रांत कलह माजवून पुत्र-शोक आपल्याला होऊं नये म्हणून तिनें कर्णाचा शक्य तितका अनुनय केला. ती कर्णाला म्हणाली,

कौन्तेयस्त्वं न राधेयो न तवाधिरथः पिता ।
नासि सूतकुले जातः कर्ण तद्विद्धि मे वचः । २
कानीनस्त्वं मया जातः पूर्वजः कुक्षिणा धृतः ।
कुन्तिराजस्य भवने पार्थस्त्वमसि पुत्रक ॥ ३
प्रकाशकर्मा तपनो योऽयं देवो विरोचनः ।
अजीजनत्त्वां मय्येष कर्ण शस्त्रभृतां वरम् ॥ ४
कुण्डली बद्धकवचो देवगर्भः श्रिया वृतः ।
जातस्त्वमसि दुर्धर्ष मया पुत्र पितुर्गृहे ॥ ५
स त्वं भ्रातॄनसंबुध्य मोहाद्यदुपसेवसे ।
धार्तराष्ट्रान्न यद्युक्तं त्वयि पुत्र विशेषतः ॥ ६
एतद् धर्मफलं पुत्र नराणां धर्मनिश्चये ।
यत्तुष्यन्त्यस्य पितरो माता चाप्येकदर्शिनी ॥ ७
अर्जुनेनार्जितां पूर्वं हृतां लोभादसाधुभिः ।
आच्छिद्य धार्तराष्ट्रेभ्यो भुङ्क्ष्व यौधिष्ठिरीं श्रियम् ॥ ८
अद्य पश्यन्ति कुरवः कर्णार्जुनसमागमम् ।
सौभ्रात्रेण समालक्ष्य संनमन्तामसाधवः ॥ ९
कर्णार्जुनौ वै भवेतां यथा रामजनार्दनौ ।
असाध्यं किं नु लोके स्याद्युवयोः सहितात्मनो ॥ १०
कर्ण शोभिष्यसे नूनं पञ्चभिर्भ्रातृभिर्वृतः ।
देवैः परिवृतो ब्रह्मा वेद्याभिव महाध्वरे ॥ ११
उपपन्नो गुणैः सर्वैर्ज्येष्ठः श्रेष्ठेषु बन्धुषु ।
सूतपुत्रेति मा शब्दः पार्थस्त्वमसि वीर्यवान् ॥ १२

---महाभारत, उद्योगपर्व अध्याय १४५

"हे कर्णा, तू राधेय नाहीस किंवा अधिरथ तुझा पिता नाहीं. तू सूतांच्या जातीतही झालेला नाहींस. पांडवाप्रमाणेंच तूंही कौन्तेय

आहेस. मी कुंतीभोजाच्या येथें असतां तूं माझ्या कौमार्यावस्थेंत मला झालेला पुत्र आहेस. या कुशीनें ज्याप्रमाणें पांडवांना जन्म दिला त्याच प्रमाणें तुलाही जन्म दिला आहे. तू माझा सर्वांत ज्येष्ठ पुत्र आहेस. पांडव जसे देवपुत्र आहेत तसा तूही देवपुत्र आहेस. संपूर्ण जगताला प्रकाश देणारा भगवान् श्री सूर्यनारायण हा तुझा पिता होय. जन्मतःच तूं सर्व शस्त्रधाऱ्यांत श्रेष्ठ,सहज कवचकुंडलें लाभलेला, देवपुत्राप्रमाणें अत्यंत तेजस्वी असा मला लाभलास. मोहामुळें आपल्या बंधूची उपेक्षा करून तुझ्यासारख्या पुत्रानें धृतराष्ट्रपुत्रांचा पक्ष धरावा ही गोष्ट तुझ्यासारख्याला योग्य नाही. माता व पित्याला संतुष्ट करणें हें पुत्राचें खरें कर्तव्य होय. पूर्वी अर्जुनानें आपल्या पराक्रमानें मिळविलेली व दुष्ट धृतराष्ट्रपुत्रांनीं लोभामुळें हीन मार्गाचा अवलंब करून अपहरण केलेली युधिष्ठिराची राजसंपत्ति उपभोगण्याचा अधिकार माझा ज्येष्ठ पुत्र म्हणून वस्तुतः तुझाच आहे. पराक्रमानें धृतराष्ट्रपुत्रांकडून ती सपत्ति जिंकून घेऊन तू तिचा उपभोग घे. कर्ण व अर्जुन या बंधुबंधूचा बंधुप्रेमानें होणारा संयोग आज धृतराष्ट्र पुत्र पाहोत व त्यांच्या सामर्थ्यासमोर सर्व दुष्ट लोक नम्र होवोत. बलराम व श्रीकृष्णांप्रमाणेंच कर्णार्जुनांची जोडीही बंधुप्रेमाचा आदर्श ठरावी अशी माझी इच्छा आहे. तुम्ही दोघे एक झाल्यावर जगांत अशक्य तें काय आहे? मोठ्या यज्ञांतील वेदीवर देवांनी परिवेष्टित असे ब्रह्मदेव जसे शोभतात त्याचप्रमाणें आपल्या पांच बंधूनी परिवेष्टित असा तूही शोभल्यावांचून राहणार नाहीस. यापुढें लोकांनीं तुझ्यामागें सूतपुत्र असा शब्द लावू नये. तू वीर्यवान् पार्थ आहेस. त्या अतिश्रेष्ठ बंधूचा ज्येष्ठ बंधु म्हणून शोभण्यासारखे सर्व गुण तुझ्या ठिकाणी आहेत. तरी तूं आपल्या बंधूंना संरक्षण दे."

कुंतीच्या या वचनावर कर्णाचा विश्वास बसावा म्हणून सूर्यानेंही आकाशवाणीच्या रूपानें कर्णाला असें सांगितलें कीः—

सत्यमाह पृथा वाक्यं कर्ण मातृवचः कुरु ।
श्रेयस्ते स्यान्नरव्याघ्र सर्वमाचरतस्तथा ।। उद्योगपर्व अ १४६—२

"कुंतीनें जें सांगितलें तें खरें आहे. तू आपल्या मातेची आज्ञा ऐक. त्यानेंच तुझें कल्याण होईल."

पण महामनस्क कर्णानें आपल्या मातापित्यांच्या या अनुनयाचा धिक्कार करून कृतघ्नतेच्या ऐश्वर्याऐवजी कृतज्ञतेचें मरणच पत्करलें. कर्णाच्या मृत्यूची जखम कुंतीच्या मनाला शेवटपर्यंत वेदना देत होती. मरेपर्यंत सूतपुत्र म्हणून अप्रतिष्ठा सहन करीत हा आपला पुत्र राहिला, तरी त्याच्या वधानंतर तरी त्याला सद्गति मिळावी व त्याच्या जन्मानें त्याला मिळालेलें स्थान त्याला लाभावें म्हणून तिच्या जिवाची नेहमी तगमग होत असे. युधिष्ठिर गंगेवर युद्धांत मेलेल्या सर्व सुहृदांचें तर्पण करावयास बसले असतां कर्णाला आपल्या भ्रात्याच्या हातून पाणी मिळावें या भावनेनें मातृप्रेमानें कुंतीचें हृदय उचंबळून आलें. महाभारतकार म्हणतात :—

ततः कुन्ती महाराज सहसा शोककर्शिता ॥ ६
रुदती मन्दया वाचा पुत्रान्वचनमब्रवीत् ।
यः स पुत्रो महेष्वासो रथयूथपयूथपः ॥ ७
अर्जुनेन जितः सङ्ख्ये वीरलक्षणलक्षितः ।
यं सूतपुत्रं मन्यध्वं राधेयमिति पाण्डवाः ॥ ८
यो व्यराजच्चमूमध्ये दिवाकर इव प्रभुः ।
प्रत्ययुध्यत वः सर्वान्पुरा यः सपदानुगान् ॥ ९
दुर्योधनबलं सर्वं यः प्रकर्षन् व्यरोचत ।
यस्य नास्ति समो वीर्ये पृथिव्यामपि पार्थिवः ॥ १०
योऽवृणीत यशः शूरः प्राणैरपि सदा भुवि ।
कर्णस्य सत्यसन्धस्य सङ्ग्रामेष्वपलायिनः ॥ ११
कुरुध्वमुदकं तस्य भ्रातुरक्लिष्टकर्मणः ।
स हि वः पूर्वजो भ्राता भास्करान्मय्यजायत ॥ १२

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय २७

"नंतर एकदम शोकाकुल होऊन रडत रडत मंदवाणीनें कुंती आपल्या पुत्रांना म्हणाली कीं, तो जो महान् धनुष्य हातांत धारण करणारा सर्व वीरलक्षणांनीं युक्त व सेनापतींचाहि सेनापति असलेला वीर अर्जुनानें जिंकला व ज्याला तुम्ही 'राधेय' सूतपुत्र म्हणून ओळखतां, जो सूर्याप्रमाणेंच सैन्याच्या अग्रभागीं तळपत असे,

ज्यानें तुमच्याशीं व तुमच्या सैन्याशीं अनेकवार धडक दिली, जो दुर्योधनाच्या सर्व सैन्याचें नेतृत्व करीत असे, पृथ्वीवरील सर्व राजांत ज्याच्या योग्यतेचा पराक्रमी पुरुष कोणीहि नव्हता, ज्यानें प्राणापेक्षांही यशालाच मान दिला, त्या सत्यसंध व रणांत श्रेष्ठकर्मे करणाऱ्या कर्णाचें तुम्ही तर्पण करा. तो तुमचा पूर्वज भ्राता आहे. तो सूर्याप्रमाणें तेजस्वी व सहज कवचकुंडलांनीं मंडित असा पुत्र मला सूर्यापासून झाला. ''

कुंतीचें हें वचन ऐकतांच युधिष्ठिरांचा शोक अनावर झाला. ही गोष्ट अितके दिवस गुप्त ठेवल्याबद्दल त्यांनीं कुंतीलाच शाप दिला. कुंतीच्या अंतःकरणाची ही दोलायमान अवस्था शेवटपर्यंत तशीच होती. धृतराष्ट्राबरोबर अरण्यवास पत्करतांनाही कर्णाच्या बाबतींत घडून आलेल्या सर्व प्रकारांचें शल्य तिच्या अंतःकरणांत असल्यामुळें तिनें त्याच्या नांवानें पुष्कळ दानें दिल्याचा उल्लेख भारताच्या आश्रमवासिक पर्वात आहे.

कुंतीचा विवाह

कर्णाच्या जन्माच्या या दुर्दैवी प्रकरणानंतर त्याच्या गंगासमर्पणानें या प्रकरणावर शेवटचा पडदा पडल्यावर राजा कुंतीभोजानें कुंतीचा विवाहसमारभ स्वयंवराच्या पद्धतीनें करावयाचें ठरविलें. महाभारतकार म्हणतात :

सत्त्वरूपगुणोपेता धर्मारामा महाव्रता ।
दुहिता कुन्तिभोजस्य पृथा पृथुललोचना ॥ १
तां तु तेजस्विनीं कन्यां रूपयौवनशालिनीम् ।
व्यावृण्वन्पार्थिवाः केचिदतीव स्त्रीगुणैर्युताम् ॥ २
ततः सा कुन्तिभोजेन राज्ञाहूय नराधिपान् ।
पित्रा स्वयंवरे दत्ता दुहिता राजसत्तम ॥ ३
ततः सा रङ्गमध्यस्थं तेषां राज्ञां मनस्विनी ।
ददर्श राजशार्दूलं पाण्डुं भरतसत्तमम् ॥ ४
सिंहदर्पं महोरस्कं वृषभाक्षं महाबलम् ।
आदित्यमिव सर्वेषां राज्ञां प्रच्छाद्य वै प्रभाः ॥ ५

तिष्ठन्तं राजसमितौ पुरन्दरमिवापरम् ।
तं दृष्ट्वा सानवद्याङ्गी कुन्तिभोजसुता शुभा ॥ ६
पाण्डुं नरवरं रङ्गे हृदयेनाकुलाभवत् ।
ततः कामपरीताङ्गी सकृत्प्रचलमानसा ॥ ७
व्रीडमाना स्रजं कुन्ती राज्ञः स्कन्धे समासृजत् ।
तं निशम्य वृतं पाण्डुं कुन्त्या सर्वे नराधिपाः ॥ ८
कृत्वोद्वाहं तदा तं तु नानावसुभिरर्चितम् ।
स्वपुरं प्रेषयामास स राजा कुरुसत्तम ॥ ११
ततो बलेन महता नानाध्वजपताकिना ।
स्तूयमानः स चाशीर्भिर्ब्राह्मणैश्च महर्षिभिः ॥ १२
संप्राप्य नगरं राजा पाण्डुः कौरवनन्दनः ।
न्यवेशयत तां भार्यां कुन्तीं स्वभवने प्रभुः ॥ १३
—महाभारत, आदिपर्व अध्याय ११२

" सर्व सद्‌गुणांनीं युक्त, व्रतपरायण व धर्मामध्येंच अंतःकरण रमविणारी कुंतीभोजाची विशालनयना कन्या कुंती अत्यंत तेजस्वी, लावण्यवती व रूपयौवनानें युक्त असून तिच्यांत सर्व स्त्रीगुण उत्कटतेनें समाविष्ट झाले होते. अनेक राजांनी तिला मागणी घातली. शेवटी राजा कुंतीभोजानें तिचें स्वयंवर ठरविलें. त्या स्वयंवरांत आलेल्या राजमंडळांत कौरवेश्वर पाण्डूही उपस्थित होता. त्यानें आपल्या प्रभावानें सूर्यानें नक्षत्रें झांकून टाकावीत त्याप्रमाणें सर्व राजांचें तेज हरण केलें. महेंद्राप्रमाणे राजमंडळांत आपल्या तेजानें तळपत असलेल्या नरश्रेष्ठ पांडूच्या व्यक्तिमत्त्वामुळें कुंतीच्या मनावर विलक्षण परिणाम झाला व तिनें आपल्या हातांतील वरमाला सर्व राजांसमक्ष पांडूच्या कंठांत समर्पण केली. राजा पाण्डू व कुंती यांचा विवाह राजा कुंतीभोजानें मोठ्या थाटानें केला. राजा पांडूला त्यानें बरेंच आंदण दिलें. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेत विवाहानंतर कौरवेश्वर पांडू हस्तिनापुरास परत आला. याप्रमाणें कुंती कौरवांची महाराणी झाली.

कुंतीचें भाग्य

कुंतीच्या या विवाहानंतर तत्कालीन पद्धतीच्या अनुरूप म देशाच्या राजकन्येबरोबर पाण्डूचा दुसरा विवाह झाला. पण कुंतीने अंतःकरणांत किंचिन्मात्र सापत्नभाव न ठेवितां आपल्या या सवतीला इतकें चांगले वागविले की, माद्रीचा कुतीवर स्वतःपेक्षांही अधिक विश्वास होता. याची साक्ष पुढें एका विलक्षण प्रसंगानें पटलेली आहे.

पुढे पांडूबरोबर सती जात असतां माद्रीनें स्वतःच सती जाण्याचीं जी अनेकविध कारणें दिली आहेत त्यांत ती असें म्हणते की--

> **न चाप्यहं वर्तयन्ती निर्विशेषं सुतेषु ते ।**
> **वृतिमार्ये चरिष्यामि स्पृशेदेनस्तथा च माम् ॥ २७**
>
> --महाभारत, आदिपर्व अध्याय १२५

"हे कुती, मी जिवत राहिल्यास सर्व मुलांचा सांभाळ मला करावा लागेल. तुझ्या व माझ्या मुलांत मी फरक करणारच नाहीं अशी माझ्या मनाची मी खात्री देऊ शकत नाही." तात्पर्य माद्रीला स्वतःच्या अतःकरणाची जी खात्री नव्हती ती कुंतीच्या अंतःकरणाची मात्र वाटत होती. याच्यांतच तिच्या अतःकरणाची थोरवी दिसून येते. राजा पांडूनें पुढें महान् दिग्विजय करून कौरवांचे मोठें साम्राज्य स्थापन केलें व केवळ कौरवांची राणी असलेल्या कुंतीला साम्राज्ञी होण्याचें महद्भाग्य लाभले. यानंतर विहारप्रिय पाण्डूनें धृतराष्ट्र, विदुर व भीष्म यांच्या हाती राज्यकारभार सोपवून वन-विहाराचा अखड क्रम स्वीकारला व त्याच्या समर्थ बाहूंच्या सहवा-सांत कुतीचे दिवस मोठ्या आनंदांत गेले. जीवनांतील सर्व सुखें हात जोडून तिच्यासमोर उभीं होती. पण तिच्या दुर्दैवाला तिच्या सुखाचे ते दिवस पाहवले नाहीत.

दुर्दैवाचा वज्राघात

वनविहारांत दग असतां मृगयेचें पाण्डूला जणू कांहीं व्यसनच लागलें होतें. त्या व्यसनासक्त स्थितींत त्याच्या हातून मृगरूपानें

विहारांत दंग असलेल्या एका ऋषीची हत्या घडली. मरतां मरतां त्या ऋषीनें पाण्डूला असा शाप दिला की, "तूं ज्या अर्थीं मृगयेच्या नियमांचें उल्लघन करून माझ्या ऐन विहरणांत मला ठार मारलेंस, त्या अर्थी यापुढें तुलाही स्त्रीबरोबर विहार करतां येणार नाही. विहाराच्या इच्छेने तू स्त्रीजवळ गेलास की तत्काळ तुझें मरण ओढवेल." या शापानें राजा पाण्डू अतिशय दुःखी व लज्जित झाला. शापित अवस्थेंत भीष्मांना व कुरुकुलांतील इतर लोकांना तोंड दाखविण्याची त्याला इच्छा होईना. त्यानें आपल्या स्त्रियांना असें सांगितले की, माझी परत राज्यांत जाण्याची इच्छा नाही. मी वनांतच तपस्व्याचें जीवन कंठण्याचा निश्चय केला आहे. तुम्ही राज्यांत परत जा व माझा परित्याग करा. पण कुंतीनें व तिच्या सहवासांत सतीधर्माचें योग्य तें मार्गदर्शन झालेल्या माद्रीनेंही राजाला असें सांगितलें कीं :—

अन्येऽपि हचाश्रमाः सन्ति ये शक्या भरतर्षभ ।
आवाभ्यां धर्मपत्नीभ्यां सह तप्तुं तपो महत् ॥ २७
शरीरस्यापि मोक्षाय स्वर्ग्यं प्राप्य महाफलम् ।
त्वमेव भविता भर्ता स्वर्गस्यापि न संशयः ॥ २८
प्रणिधायेन्द्रियग्रामं भर्तृलोकपरायणे ।
त्यक्त्वा कामसुखे हचावां तप्स्यावो विपुलं तपः ॥ २९
यदि चावां महाप्राज्ञ त्यक्ष्यसि त्वं विशांपते ।
अद्यैवावां प्रहास्यावो जीवितं नात्र संशयः ॥ ३०

—महाभारत, आदिपर्व अध्याय ११९

"हे नरश्रेष्ठा, असे अनेक आश्रम आहेत की, जेथें आमच्यासारख्या धर्मपत्नीबरोबर आपल्याला महान् तपस्यामय जीवन कंठून स्वर्गप्राप्ति करून घेतां येणें शक्य आहे. स्वर्गात देखील आपणच पति म्हणून लाभावेत अशी आमची इच्छा आहे. इंद्रियांवर विजय संपादन करून व कामसुखाचा परित्याग करून पतिलोकप्राप्तीच्या इच्छेनें आम्हीही आपल्याबरोबर घोर तपस्या करूं. हे महाप्राज्ञा, जर आपण आमचा परित्याग कराल तर आम्ही राजधानींत परत

तर जाणार नाहीच, पण आपल्यासमोर आम्ही आमचा प्राणत्याग केल्यावांचून राहणार नाही."

पाण्डूनें आपल्या स्त्रियांची ती विनवणी पाहून त्यांना आपल्या तपस्यामय जीवनांत बरोबर राहण्याची अनुज्ञा दिली. पुढें त्याच्या अनुभवास असें आलें कीं, त्याच्या पोटीं संतान नसल्यामुळें मोठ-मोठ्या ब्रह्मर्षींबरोबर त्याला हवें तेथें जातां येत नाही. संतानावाचून सद्गति नाहीं या जाणिवेनें तत्कालीन पद्धतीस अनुसरून आपद्धर्माच्या शास्त्रानुसार त्यानें कुतीला जुनें इतिहास निवेदन करून एकाद्या तपस्व्याकडून पुत्रप्राप्ति करून घेऊन स्वतःला निपुत्रिकपणाच्या दुर्गतीतून वांचविण्याची प्रार्थना केली. कुंतीनें त्या गोष्टीला पुष्कळ नकार दिला. तिनें राजाशी वादविवादही करून पाहिला. पण राजा ज्या वेळीं ऐकेचना त्या वेळी निरुपाय म्हणून कुतीनें आपल्या वरदानाचें वृत्त पाण्डूला सांगून कोणत्याही मानवाऐवजी देवतांकडूनच पुत्रोत्पत्ति करून घेण्याची सिद्धता दर्शविली. पाण्डूच्या अनुज्ञेने धर्म, वायु व महेंद्र या तीन देवताकडून कुतीला युधिष्ठिर, भीमसेन व अर्जुन अशा अत्यंत तेजस्वी व लोकोत्तर गुणांनी युक्त अशा तीन पुत्रांचा लाभ झाला. पाण्डूच्याच अनुज्ञेनें माद्रीलाही आपली मंत्रविद्या तिनें दिली व तिलाही अश्विनीकुमारापासून नकुल व सहदेव या दोन पुत्रांचा लाभ झाला. पुढें दुर्दैवानें मनोवृत्ति स्वाधीन न राहून एकातांत पाण्डूनें विहरणाच्या इच्छेनें माद्रीला स्पर्श करतांच तो गतप्राण होऊन पडला. कुतीच्या जीवनाचा आधारच त्या दिवशी तुटल्यासारखा झाला. राजा पाण्डूच्या शवाबरोबर माद्री सती गेली व पांच मुलांच्या संभाराचा भार अनाथ व विधवा कुंतीवर येऊन पडला. ब्राह्मणांनी तिला आणून राजा धृतराष्ट्राच्या स्वाधीन केलें.

कुंतीचें कर्तृत्व

विधवा कुंती आपल्या पांच मुलांसहित धृतराष्ट्राच्या आश्रयानें येऊन राहिल्यानंतर लवकरच धृतराष्ट्राच्या व त्याच्या पुत्रांच्या अतःकरणांत पाण्डुपुत्रांविषयीं मत्सर उत्पन्न होऊन राज्याच्या या

खऱ्या अधिकाऱ्यांना ठार मारून टाकण्याचे त्यांचे उपक्रम सुरू झाले. भीमावर पहिलाच विषप्रयोग झाल्यानंतर आपल्यावर होणाऱ्या या सर्व कूट राजनीतीच्या भयानक प्रयोगांची कुंतीला कल्पना आली व तिनें राज्ययंत्रांतील महत्त्वाच्या व्यक्तींचें आपणांस साहाय्य मिळावें म्हणून राज्याचा महामंत्री असलेल्या विदुराला सर्व परिस्थिति सांगून त्यांच्याकडून साहाय्याची अपेक्षा केली. ती विदुराला म्हणते:—

क्षत्तारमानाय्य तदा कुन्ती वचनमब्रवीत् ।
क्व गतो भगवन् क्षत्तर्भीमसेनो न दृश्यते ॥ १३
उद्यानान्निर्गताः सर्वे भ्रातरो भ्रातृभिः सह ।
तत्रैकस्तु महाबाहुर्भीमो नाभ्येति मामिह ॥ १४
न च प्रीणयते चक्षुः सदा दुर्योधनस्य सः ।
क्रूरोऽसौ दुर्मतिः क्षुद्रो राज्यलब्धोऽनपत्रपः ॥ १५
निहन्यादपि तं वीरं जातमन्युः सुयोधनः ।
तेन मे व्याकुलं चित्तं हृदयं दहतीव च ॥ १६

—महाभारत, आदिपर्व अध्याय १२९

"हे भगवन् विदुरा, विहार करून उद्यानांतून माझीं सर्व मुलें परत आली व इतरही सर्व बधू परत आले पण दुर्दैवानें भीमसेन त्यांच्याबरोबर परत आलेला दिसत नाही. भीमाचें काय झालें असेल? अथवा तो कोठें गेला असेल ? दुर्योधनाचे नेत्र त्याच्यावर नेहमीं पडलेले असतात. दुर्योधन हा क्रूर, दुष्ट बुद्धीचा, क्षुद्र, राज्यलोभी व निर्लज्ज आहे. भीम त्याच्या डोळ्यांत नेहमींच खुपतो. मनांत दंश धरणारा दुर्योधन वेळीं भीमाला ठार मारल्यावांचूनही राहणार नाही. त्यामुळें माझें चित्त व्याकुळ झालें असून अंतःकरण जळतें आहे." पण विशिष्ट परिस्थितीमुळें तिला प्रत्यक्ष साहाय्य करतां येणें शक्य नसल्यामुळें विदुरानें तिला असें सांगितलें कीं, ही गोष्ट शक्य तितकी गुप्त ठेवून गुप्तपणेंच तूं आपल्या उर्वरित पुत्रांचें संरक्षण कर. तुझे शत्रु अत्यंत भयंकर आहेत. त्यांची कारस्थानें तुझ्या ध्यानांत आली असें जर त्यांना कळलें तर ते तुझ्या उरलेल्या पुत्रांवरही यापेक्षांही अधिक कूट व भयानक प्रहार केल्यावांचन

राहणार नाहीत. कुंतीनें विदुरांचा हा इषारा ध्यानांत ठेवून त्या तशाही विलक्षण परिस्थितीत आपल्या पुत्रांचें संरक्षण करण्यांत स्वत:चें अपूर्व कर्तृत्व प्रकट केलें आहे. दुष्ट राजसत्तेच्या कारस्थानापायी कुंतीला आपल्या पुत्रांबरोबर लाक्षागृहांतून विजनवासांत राहावें लागले, तेंही दु:ख तिनें सहन केलें. पुढें द्रौपदीस्वयंवरानंतर पांडवांना पाचालांच्या सत्तेचें व यादवांच्या सत्तेचें साहाय्य मिळून त्यांचे दिवस पालटले. मिळालेल्या राज्याचे कुंतीच्या पुत्रांनी आपल्या पराक्रमानें भव्य साम्राज्यांत रूपांतर केले व सर्व राजसत्ता पायीं विनम्र झालेल्या स्थितीत महान् राजसूय यज्ञांत आपल्या पुत्राचें सर्वश्रेष्ठ वैभव पाहून राजमाता या नात्यानें तिच्या हृदयानें आनंद अनुभविला.

कुंतीच्या हृदयाचें औदार्य

राजमाता कुंतीच्या हृदयाचे औदार्य, दुसऱ्याच्या दु:खानें दु:खित होण्याची तिची प्रवृत्ति, तिच्या अंत:करणातील अनुपम धैर्य यांचा प्रत्यय द्रौपदीस्वयवरापूर्वीच्या विजनवासांत बकासुर वधाच्या प्रकरणांत आलेला आहे. हिडिबाचा वध करून पांडव आपला मार्ग आक्रमीत असतां एकचक्रा नांवाच्या नगरीत त्यांना एकदां रहाण्याचा प्रसग आला. तेथे ज्या ब्राह्मणाच्या घरी ते उतरले होते त्याच्यावर एक मोठा दु:खाचा प्रसग ओढवला होता. पांडव घरीं नसतां व एकटी कुंतीच तेथें असतां तिनें एकाएकीं ब्राह्मणाच्या घरांतून रडण्याचा आवाज ऐकला. काय आहे तें समजून घेण्यासाठी ती एका बाजूला उभी राहून ऐकू लागली. तों तिला असें आढळून आलें की, ब्राह्मण, त्याची पत्नी, मुलगी व मुलगा सर्व मिळून विलाप करीत आहेत व एकमेकांना समजावीत आहेत. योग्य संधि पाहून कुंती त्यांच्या जवळ गेली व तिनें त्या ब्राह्मणाला त्याच्या दु:खाचें कारण विचारलें. ब्राह्मणानें तिला असें सांगितलें कीं या नगरीचा राजा अत्यंत वाईट असून नगरीला राक्षसांचा उपद्रव आहे. बकासुर नांवाचा एक राक्षस या नगरीच्या बाहेर राहात असून त्यानें नगरींतल्या लोकांशी असा करार केला आहे कीं, प्रत्येक

नागरिकानें पाळीपाळीनें त्याला रोज एक गाडाभर अन्न, त्या गाड्याला जोडलेला रेडा, व एक मनुष्य इतकें खाण्यासाठीं पुरवावयाचें व त्याच्या मोबदल्यांत त्या राक्षसानें त्या नगरीचें संरक्षण करावयाचें. जर त्याचा हा करार न पाळला गेला तर सर्व नगरीचा तो नाश केल्यावांचून राहणार नाहीं. क्रमाक्रमानें ही पाळी आज माझ्यावर आली आहे. माझ्या घरी पाठविण्यासारखा दुसरा मनुष्य नसल्यामुळें मी स्वतः जावयाचें ठरविलें आहे. माझी पत्नी स्वतः जाऊं इच्छिते तर, मुलगी मी जातें असें म्हणतें." कुंतीनें त्या ब्राह्मणाला आश्वासन देऊन असें सांगितलें की, आपण कोणीही जाण्याचें कारण नाही व शोकाचेंही कारण नाही. मी माझा मुलगा आपल्याऐवजीं पाठवितें. पण तो ब्राह्मण त्या गोष्टीस तयार होईना. शेवटीं कुंतीनें त्याला असें सांगितलें की, माझ्या मुलाला सिद्धि असून तो त्या राक्षसाला सहज ठार मारील. त्याला राक्षसांचें मुळीच भय नाही. शेवटीं ब्राह्मणानें मोठ्या कष्टानें ही गोष्ट मान्य केली. कुंतीनें भीमाला तेथें जाण्याची आज्ञा केली व भीमानेही ती गोष्ट मान्य केली. मागाहून युधिष्ठिर तेथें परत आल्यावर कुंतीनें हें केलेलें साहस ऐकताच त्याला अत्यंत वाईट वाटलें. कुंतीला ठपका देऊन तो म्हणू लागला की, तू हें किती भयानक साहस केलें आहेस! दुसऱ्याच्या मुलासाठी आपल्या स्वतःच्या मुलाच्या गळ्यावरून कोणी सुरी फिरवीत असतो काय? केवळ ज्याच्या बाहुबलाच्या आश्रयावर आपण गेलेलें वैभव परत मिळवू इच्छितों, ज्याच्या बळाच्या धाकानें आपल्या शत्रूना झोपही येत नाही, व आजवरच्या संकटांतून ज्यानें आपणांस तारलें त्याचेंच बलिदान करावयास तू निघालीस याला काय म्हणावें? माते, अतिशय दुःखामुळें तुझी बुद्धि भ्रष्ट तर नाहींना झाली? युधिष्ठिराच्या या रागाच्या बोलण्यावर उत्तर देत असतांना कुंतीनें जें भाषण केलें आहे तें तिच्या अंतःकरणाचें औदार्य व तिचें अलौकिक धैर्य स्पष्टपणें व्यक्त करते. ती युधिष्ठिरास म्हणाली :—

युधिष्ठिर न संतापस्त्वया कार्यो वृकोदरे ।
न चायं बुद्धिदौर्बल्याद् व्यवसायः कृतो मया ॥ १२

इह विप्रस्य भवने वयं पुत्र सुखोषिताः ।
अज्ञाता धार्तराष्ट्राणां सत्कृता वीतमन्यवः ॥ १३
तस्य प्रतिक्रिया पार्थ मयेयं प्रसमीक्षिता ।
एतावानेव पुरुषः कृतं यस्मिन्न नश्यति ॥ १४
यावच्च कुर्यादन्योऽस्य कुर्याद् बहुगुणं ततः ।
दृष्ट्वा भीमस्य विक्रान्तं तदा जतुगृहे महत् ॥
हिडिंबस्य वधाच्चैवं विश्वासो मे वृकोदरे । १५
बाहूवोर्बलं हि भीमस्य नागायुतसमं महत् ।
येन यूयं गजप्रख्या निर्व्यूढा वारणावतात् ॥ १६
वृकोदरेण सदृशो बलेनान्यो न विद्यते ।
यो व्यतीयाद् युधि श्रेष्ठमपि चक्रधरं स्वयम् ॥ १७
जातमात्रः पुरा चैव ममाङ्कात्पतितो गिरौ ।
शरीरगौरवादस्य शिला गात्रैर्विचूर्णिता ॥ १८
तदहं प्रज्ञया ज्ञात्वा बलं भीमस्य पाण्डव ।
प्रतिकार्ये च विप्रस्य ततः कृतवती मतिम् ॥ १९
नेदं लोभान्न चाज्ञानान्न च मोहाद् विनिश्चितम् ।
बुद्धिपूर्वं तु धर्मस्य व्यवसायः कृतो मया ॥ २०
अर्थौ द्वावपि निष्पन्नौ युधिष्ठिर भविष्यतः ।
प्रतीकारश्च वासस्य धर्मश्च चरितो महान् ॥ २१
यो ब्राह्मणस्य साहाय्यं कुर्यादर्थेषु कर्हिचित् ।
क्षत्रियः स शुभाँल्लोकानाप्नुयादिति मे मतिः ॥२२
क्षत्रियस्यैव कुर्वाणः क्षत्रियो वधमोक्षणम् ।
विपुलां कीर्तिमाप्नोति लोकेऽस्मिंश्च परत्र च ॥ २३
वैश्यस्यार्थे च साहाय्यं कुर्वाणः क्षत्रियो भुवि ।
स सर्वेष्वपि लोकेषु प्रजा रञ्जयते ध्रुवम् ॥ २४
शूद्रं च मोचयेद् राजा शरणार्थिनमागतम् ।
प्राप्नोतीह कुले जन्म सद्द्रव्ये राजपूजिते ॥ २५
एवं मां भगवान् व्यासः पुरा कौरवनन्दन ।
प्रोवाचासुकरप्रज्ञस्तस्मादेवं चिकीर्षितम् ॥ २६

—महाभारत, आदिपर्व अध्याय १६२

"हे युधिष्ठिरा, तुला स्वतःचा संताप करून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. माझी बुद्धि दुर्बळ झाली असल्यामुळें मी हें केलें असें मुळींच नाहीं. धृतराष्ट्रपुत्रांना, अज्ञात स्थितींत सर्व प्रकारचा मनाचा शांतपणा कायम राखून आपण इतके दिवस या ब्राह्मणाच्या घरीं सुखानें राहिलों. त्यानेंही आपल्यावरील आपत्तींत सन्मानपूर्वक आपल्याला स्वतःचे घरी आश्रय दिला. त्याच्या त्या उपकारांची मी ही फेड करीत आहें. उपकाराची फेड दुप्पट प्रत्युपकारानें करणें हेंच पुरुषाचें खरें कर्तव्य होय. लाक्षागृह प्रकरण व हिडिंबाचा वध या दोन प्रकरणांत भीमसेनाचा पराक्रम पाहून त्याच्या सामर्थ्यावरील माझा विश्वास वाढलेला आहे. दहा सहस्र हत्तींचें बळ भीमाच्या अंगीं आहे. हत्तीप्रमाणें धिप्पाड असणाऱ्या त्यानें एकटयानें तुम्हां सर्वांना वारणावतांतील लाक्षागृहांतून वनापर्यंत सुरक्षित आणलें आहे. त्याच्यासारखा बलवान् कोणीहि नाहीं. चक्रधर महाविष्णूशी देखील तो धडक देऊं शकेल. लहानपणीं माझ्या मांडीवरून दगडावर खाली पडतांच त्याच्या शरीराच्या भारानें त्या प्रचंड शिळेचें चूर्ण झालेलें मीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहें. भीमाच्या अलौकिक सामर्थ्याच्या या गोष्टीचा विचार करून व या ब्राह्मणावरील प्राणसंकट ध्यानांत घेऊन मी बकासुराकडे भीमाला पाठविण्याचा निश्चय केला आहे. लोभ, अज्ञान व मोह यांपैकी कोणत्याही कारणानें नव्हे तर केवळ बुद्धिपूर्वक पार पाडावयाचें धर्मकृत्य म्हणूनच मी हें कार्य करावयाचें ठरविलें आहे. यामुळें दोन गोष्टी सधणार आहेत. ब्राह्मणानें दिलेल्या आश्रयाचा प्रत्युपकार घडेल व दुसऱ्याला जीवदान दिल्याच्या महान् धर्माचें आचरणही घडेल. जो क्षत्रिय ब्राह्मणाच्या उपयोगी पडतो व त्याला साहाय्य करतो त्याला शुभ लोकांची प्राप्ति होते असें माझें मत आहे. जोक्षत्रिय क्षत्रियाला मृत्यूपासून वांचवितो, त्याला विपुल कीर्ति इहलोकीं व परलोकीं मिळते. जो क्षत्रिय वैश्याला साहाय्य करतो तो प्रजांचें अनुरंजन करणारा राजा होतो व शरण आलेल्या शूद्राला जो वांचवितो त्याला राजानेंही ज्याचा मान राखावा अशा धनसंपन्न कुळांत जन्म येतो असें वेदव्यासांनीं मला पूर्वीच सांगितलें आहे. त्यामुळें मीं हा निर्णय घेतला."

दुर्दैवाचे दशावतार

अशा या अत्यंत श्रेष्ठ व दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी होणाऱ्या स्त्रीवर राजसूयाच्या वैभवाच्या दिवसानंतर स्वतःच्या ज्येष्ठ पुत्राच्या द्यूतप्रियतेमुळें व त्याच्या कमालीच्या कोमल अंतःकरण-प्रवृत्तीमुळें दुर्दैवाचे दशावतार पहाण्याचा प्रसग आला. युधिष्ठिराचें सर्व राज्य गेलेलें तिनें पाहिलें, द्यूतांतील फाशांच्या कपटी प्रयोगानें आपल्या सर्वश्रेष्ठ पुत्रांना कौरवाचे दास झालेले तिला पहावें लागलें, जगताची सम्राज्ञी म्हणून सर्व सत्तांनी जिचे नुकतेंच चरण-वंदन केलें ती आपली सून फरफटत राजसभेंत नीचांनी ओढत नेलेली तिनें पाहिली, द्रौपदीच्या करुण किकाळ्यांनीं तिचें अतः-करण बधिर झालें. तिच्यावर भरसभेत नग्न होण्याचा आलेला प्रसंग पाहून देवी कुंतीचें अंतःकरण शतधा विदीर्ण होऊन गेलें. आपल्या तेजस्वी सुनेनें स्वतःच्या अनुपम धैर्यानें परत मिळविलेलें ऐश्वर्य युधिष्ठिराने दुबळ्या पितृगौरवाच्या कल्पनेने पुन्हां घालवि-लेलें तिला पहावें लागलें, वनांत जाताना ज्यावेळीं द्रोपदी वदनार्थ आली त्यावेळी तिला काय आशीर्वाद द्यावा हें त्या शोकविव्हल वृद्धेला समजेना. ती द्रौपदीला म्हणाली :—

वत्से शोको न ते कार्यः प्राप्येदं व्यसनं महत् ।
स्त्रीधर्माणामभिज्ञासि शीलाचारवती तथा ॥ ४
न त्वां सन्देष्टुमर्हामि भर्तृन्प्रति शुचिस्मिते ।
साध्वी गुणसमापन्ना भूषितं ते कुलद्वयम् ॥ ५
सभाग्याः कुरवश्चेमे ये न दग्धास्त्वयानघे ।
अरिष्टं व्रज पन्थानं मदनुध्यानबृंहिता ॥ ६
भाविन्यर्थे हि सत्स्त्रीणां वैकृतं नोपजायते ।
गुरुधर्माभिगुप्ता च श्रेयः क्षिप्रमवाप्स्यसि ॥ ७
सहदेवश्च मे पुत्रः सदावेक्ष्यो वने वसन् ।
ययेदं व्यसनं प्राप्य नायं सीदेन्महामतिः ॥ ८

—महाभारत, सभापर्व अध्याय ७९

"हे वत्से, तूं अत्यंत शीलाचारसंपन्न असून स्त्रियांचा धर्म काय असतो हें तुला पूर्णपणें कळतें. या घोर संकटांत सांपडूनही तू शोक न करतां आपले अंतःकरण खंबीर ठेव. पतीच्या बाबतींतलें तुझें कर्तव्य तुला सांगण्याची कांहीं आवश्यकता नाही. हे सद्गुण-संपन्न साध्वी, तू आपल्या बापाच्या कुळाला व पतीच्याही कुळाला भूषविले आहेस. माझी आठवण ठेवून आनदानें वनात जा. तुझ्या-सारख्या महासतीच्या कटाक्षानें कौरव दग्ध झाले नाहीत हें त्यांचें भाग्यच म्हटले पाहिजे. होणारी गोष्ट कोणालाही टळत नाही हें तत्त्व साध्वी स्त्रियाना माहीत असल्यामुळे दुःखाच्या प्रसंगीं देखील त्यांचें अंत करण गडबडून जात नाही. धर्मच तुझें सरक्षण करील व त्याच्यामुळेच लौकरच तुला कल्याणकारक दिवस प्राप्त होतील. वनांत सहदेवाची सर्वाहून अधिक काळजी घे. तो सर्वात धाकटा आहे. त्याला औदासीन्य न उत्पन्न व्हावें."

याप्रमाणें कुंतीनें द्रौपदीला मोठ्या धैर्यानें निरोप दिला खरा; पण ज्या वेळी खरोखरीच पांडव वनात जाऊ लागले त्या वेळी मात्र तिच्या संयमाचा बांध भगून जाऊन ती नाना प्रकारें विलाप करूं लागली. महाभारतकार म्हणतातः—

तदवस्थान् सुतान् सर्वानुपसृत्यातिवत्सला ।
स्वजमानावदच्छोकात्तत्तद्विलपती बहु ॥ १२

कुन्त्युवाच ।

कथं सद्धर्मचारित्रान्वृत्तस्थितिविभूषितान् ।
अक्षुद्रान्वृढभक्तांश्च दैवतेज्यापरान्सदा ॥ १३
व्यसनं वः समभ्यागात्कोऽयं विधिविपर्ययः ।
कस्यापध्यानजं चेदमागः पश्यामि वो धिया ॥ १४
स्यातु मद्भाग्यदोषोऽयं याहं युष्मानजीजनम् ।
दुःखायासभुजोत्यर्थं युक्तानप्युत्तमैर्गुणैः ॥ १५
कथं वत्स्यथ दुर्गेषु वने ऋद्धिविनाकृताः ।
वीर्यसत्त्वबलोत्साहतेजोभिरकृशाः कृशाः ॥ १६
यद्येतदेवमज्ञास्यं वने वासो हि वो ध्रुवम् ।
शतशृङ्गान्मृते पाण्डौ नागमिष्यं गजाह्वयम् ॥१७

धन्यं वः पितरं मन्ये तपोमेधान्वितं तथा ।
यः पुत्राधिमसंप्राप्य स्वर्गेच्छामकरोत्प्रियाम् ॥ १८
धन्यां चातीन्द्रियज्ञानामिमां प्राप्तां परां गतिम् ।
मन्ये तु माद्रीं धर्मज्ञां कल्याणीं सर्वथैव तु ॥ १९
रत्या मत्या च गत्या च ययाहमभिसंधिता ।
जीवितप्रियतां महचं धिङ्मां संक्लेशभागिनीम् ॥ २०
पुत्रका न विहास्ये वः कृच्छलब्धान्प्रियान्सतः ।
साहं यास्यामि हि वनं हा कृष्णे किं जहासि माम् ॥ २१
अन्तवन्त्यसुधर्मेऽस्मिन्धात्रा किं नु प्रमादितः ।
ममान्तो नैव विहितस्तेनायुर्न जहाति माम् ॥ २२
हा कृष्ण द्वारकावासिन् क्वासि सङ्कर्षणानुज ।
कस्मान्न त्रायसे दुःखान्मां चेमांश्च नरोत्तमान् ॥ २३
अनादिनिधनं ये त्वामनुध्यायन्ति वै नराः ।
तांस्त्वं पासीत्ययं वादः स गतो व्यर्थतां कथम् ॥ २४
इमे सद्धर्ममाहात्म्ययशोवीर्यानुवर्तिनः ।
नार्हन्ति व्यसनं भोक्तुं नन्वेषां क्रियतां दया ॥ २५
सेयं नीत्यर्थविज्ञेषु भीष्मद्रोणकृपादिषु ।
स्थितेषु कुलनाथेषु कथमापदुपागता ॥ २६
हा पाण्डो हा महाराज क्वासि किं समुपेक्षसे ।
पुत्रान्विवास्यतः साधूनरिभिर्धूर्तनिर्जितान् ॥ २७
सहदेव निवर्तस्व ननु त्वमसि मे प्रियः ।
शरीरादपि माद्रेय मां मा त्याक्षीः कुपुत्रवत् ॥ २८
व्रजन्तु भ्रातरस्तेमी यदि सत्याभिसन्धिनः ।
मत्परित्राणजं धर्ममिहैव त्वमवाप्नुहि ॥ २९

वैशपायन उवाच ।

एवं विलपतीं कुन्तीमभिवाद्य प्रणम्य च ।
पाण्डवा विगतानन्दा वनायैव प्रवव्रजुः ॥ ३०
विदुरश्चापि तामार्तां कुन्तीमाश्वास्य हेतुभिः ।
प्रावेशयद्गृहं क्षत्ता स्वयमार्ततरः शनैः ॥ ३१

--महाभार ., सभापर्व अध्याय ७९

"आपल्या पुत्रांची ती अवस्था पाहून अत्यत दुःखी झालेली कुंती अतिशय विलाप करूं लागली. ती म्हणू लागली, तुमच्यासारख्या धर्मचारित्र्यसंपन्न, उदारहृदयी, सर्व देवतांना सतत प्रसन्न करून घेणाऱ्या, दृढनिश्चयी व ऐश्वर्यशाली पुरुषांवर हें भीषण संकट यावें ही केवढी दुःखाची गोष्ट आहे ! कोणत्या देवतेचा तुम्ही काय अपराध केला असें मी समजू ? माझ्यासारख्या दुर्दैवी स्त्रीच्या उदरी जन्म झाला हाच तर तुमचा दोष नसेल ? उत्तम गुणांनी युक्त असलेल्या तुम्ही इतकी घोर दुःखें भोगावी हा माझ्याच भाग्याचा दोष आहे. वीर्य, सत्त्व, बल, उत्साह व तेज यांनीं नेहमी संपन्न असलेले तुम्ही कृश होऊन ऐश्वर्यहीन अवस्थेत घोर वनांत कसे नांदाल ? जर तुमच्या कपाळीं सदाचा वनवासच आहे असें मला पूर्वीच समजलें असतें तर शतशृंगावर राजा पांडूचें निधन झाल्यानतर मी हस्तिनापुरांत कधीही आलें नसतें. तुमचे वडील खरोखरी धन्य होत. पुत्रांचें दुःख पहाण्याआधीच त्यांनी स्वर्गवास पत्करला. तपश्चर्येमुळे आलेल्या दूरदर्शीपणानें त्यांनी हें पूर्वीच ओळखून तसें केलें असेल ! ती अतीद्रियज्ञानसपन्न, धर्मज्ञ माद्रीही खरोखरीच धन्य आहे. तिनें देखील हा भावी प्रकार ओळखूनच आधीच आपल्या पतीबरोबर स्वर्गास गमन केलें. माद्रीनें खरोखरीच विलास, बुद्धि. मत्ता, व उत्तम गति मिळविणें या सर्व बाबतीत मला पूर्णपणें पराजित केलें आहे. माझ्या जीवितप्रियतेला धिक्कार असो, मी जिवंत राहून केवळ क्लेश भोगण्यापलीकडे दुसरें काय मिळविलें ? हे मुलांनो, मोठ्या कष्टानें तुमची मला प्राप्ति झाली आहे. तुम्ही मला अत्यंत प्रिय आहांत. मी तुमचा कधीही परित्याग करणार नाहीं. मीं देखील तुमच्याबरोबर वनांत येते. द्रौपदी, तुझें आपल्या वृद्ध सासूवर प्रेम नाही काय ? तू मला येथेंच सोडून कां जातेस ? ब्रह्मदेवाच्या सृष्टीला अंत आहे असें म्हणतात. मग मलाच तेवढा ब्रह्मदेव कां बरें विसरला ? मला जिवंत ठेवून नियमाचा भंग करण्यांत निश्चित त्याच्या हातून प्रमाद घडलेला आहे, म्हणूनच आयुष्य माझी पाठ सोडीत नाहीं. हे द्वारकावासी, संकर्षणानुजा श्रीकृष्णा, तूं माझी व माझ्या मुलांची या दुःखापासून कां सुटका करीत नाहींस?

आदि व अंत नसलेल्या तुझे जे ध्यान करतात त्यांचें तू संरक्षण करतोस असें लोक सांगतात. मग तें सारें आजच व्यर्थ कसें ठरलें? ही माझी मुलें धर्म, महानुभावता, यश व पराक्रम यांचें अनुवर्तन करणारी असून अशा प्रकारचें घोर दुःख भोगावयास मुळीच योग्य नाहीत. त्यांच्यावर तू दया कां करीत नाहीस ? भीष्म, द्रोण व कृपाचार्य हे नीतिशास्त्र व राज्यशास्त्र यांत मोठे प्रवीण असून या कौरवकुलाचे आधारस्तभ आहेत असें म्हणतात. मग ते जिवत असतांना ही आपत्ति का बरें यावी ? हे महाराज पांडू, आपण कोठें आहांत ? शत्रू तुमच्या पुत्रांना कपटाने द्यूतांत जिकून देशोधडीला लावीत असतादेखील तुम्ही त्यांची उपेक्षा करतां काय ? हे सहदेवा, माझ्या शरीरापेक्षांही तू मला अधिक प्रिय आहेस, तू तरी वनांत न जातां येथेंच माझ्याजवळ राहा. एखाद्या कुपुत्राप्रमाणे माझा परित्याग करूं नकोस. हे तुझे भ्राते मोठे सत्यसंध आहेत तर त्यांना वनांत जाऊं दे. पण तू तरी माझ्याजवळ रहा आणि माझें संरक्षण करण्याच्या धर्माचा वांटेकरी हो." याप्रमाणें कुंती विलाप करीत असतां तिला वंदन करून विमनस्क स्थितीत पांडव वनांत निघून गेले. विदुरानें आर्त कुंतीचें कसेंबसें सांत्वन करून तिला आपल्या घरीं नेलें. तो स्वतःच अत्यंत दुःखी झाला होता."

तेरा वर्षे कुंती विदुराच्या घरीं राहिली. तेरा वर्षे पुत्रवियोगाचें विलक्षण दुःख तिनें सहन केलें. तिची आशा अशी होती कीं, तेरा वर्षानंतर तरी आपल्या अपमानाचा सूड घेऊन आपले पुत्र स्वतःचें राज्य परत मिळवितील. पण त्यानंतर केवळ पांच गांवें मागून आपले पुत्र संधि करावयास सिद्ध आहेत हें पाहून त्या तेजस्वी क्षत्राणीचा संताप खळाळून बाहेर पडला. भगवान् श्रीकृष्ण कौरवांच्या राजसभेंत शिष्टाई करण्यासाठीं आले असतां ती इतकी चिडलेली होती की, पांडवांचें कुशल विचारतां विचारतां तिला द्रौपदीच्या अपमानाची आठवण होऊन तिचे नेत्र क्रोधानें प्रदीप्त होऊन उठले व ती श्रीकृष्णांना म्हणाली :—

न प्रियो मम कृष्णाया बीभत्सुर्न युधिष्ठिरः ।
भीमसेनो यमौ वापि यदपश्यं सभागताम् ॥ ४९

न मे दुःखतरं किञ्चिद् भूतपूर्वं ततोऽधिकम् ।
स्त्रीधर्मिणीं द्रौपदीं यच्छ्वशुराणां समीपगाम् ॥ ५०
आनायितामनार्येण क्रोधलोभानुवर्तिना ।
सर्वे प्रेक्षन्त कुरव एकवस्त्रां सभागताम् ॥ ५१
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ९०

"युधिष्ठिर, अर्जुन, भीमसेन व नकुल सहदेव हे माझे पराक्रमी पुत्र डोळे उघडे ठेवून पहात असतां भरसभेत द्रौपदीला ओढीत आणण्यांत आलें ही गोष्ट आठवली कीं, मला या पुत्राच्याविषयीं मुळीच प्रेम वाटत नाही. क्रोध व लोभ यांच्या स्वाधीन होऊन अनार्यानी रजस्वला स्थितींत द्रौपदीला सभेत श्वशुरांसमक्ष आणून उभें करावें व एकवस्त्रा अवस्थेतल्या तिच्याकडे सर्वानीं टकमका बघत बसावें, याच्याइतकी दुःखाची दुसरी कोणती गोष्ट असेल ?

तेजस्विनी क्षत्राणी

यानंतर भगवान् श्रीकृष्ण आपल्या शिष्टाईच्या कामांत लोकदृष्टीनें अपयश घेऊन पांडवांकडे परत जात असतां त्यांनीं पुनश्च कुंतीची भेट घेतली व झालेले एकंदर वृत्त तिला निवेदन करून पांडवांसाठी तुझा काय निरोप आहे म्हणून विचारलें. त्यावर कुंतीनें श्रीकृष्णांना विदुलेची वीरगाथा सांगितली. कुंतीच्या तोंडी असलेली महाभारतांतील विदुलेची वीरगाथा आजही जीवन्मृतांचें संजीवन करूं शकण्याइतकी तेजसंपन्न आहे. डॉ. विटरनिट्झ सारख्यांनाही विदुलेच्या या वीरगाथेचा विलक्षण मोह पडलेला आहे. महाभारताच्या उपाख्यानांतच तिचा समावेश होत असल्यामुळें मी तिचें विवरण करीत नाही. ही वीरगाथा सांगून भगवान् श्रीकृष्णांकरवी कुंतीनें आपल्या पुत्रांना जो तेजस्वी संदेश धाडला आहे तो फक्त मी आपणांला सांगतों. त्या संदेशावरून कुंतीच्या रूपानें साक्षात् दाहक तेज अंगी वागविणारी विद्युल्लताच महाभारतांत तळपत असलेली आढळून येईल. कुंतीसारखी तेजस्विनी स्त्री सुप्तसंतापाचा अग्नि फुंकर घालून ज्यावेळी प्रज्वलित करते त्यावेळी त्या अग्नींत सर्व प्रकारच्या अधःपतनाचा पत्कर घेतलेल्या लक्षावधि

नराधमांचें भस्म करण्याचें दिव्य सामर्थ्य उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. उगाच कांहीं भगवान् श्रीकृष्णांना कुंती ही वंदनीय देवता वाटली नाहीं. आर्य स्त्रीच्या तेजस्वितेचा कुंती हा देदीप्यमान व अत्यंत दाहक असा आविष्कार आहे. आपल्या पुत्रांना निरोप देत असतां कुंती श्रीकृष्णांना म्हणाली :—

ब्रूयाः केशव राजानं धर्मात्मानं युधिष्ठिरम् ।
भूयांस्ते हीयते धर्मो मा पुत्रक वृथा कृथाः ॥ ५
श्रोत्रियस्येव ते राजन्मन्दकस्यावितश्चितः ।
अनुवाकहताबुद्धिर्धर्ममेवैकमीक्षते ॥ ६
अङ्गावेक्षस्व धर्मं त्वं यथा सृष्टः स्वयंभुवा ।
बाहुभ्यां क्षत्रियाः सृष्टा बाहुवीर्योपजीविनः ॥ ७
क्रूराय कर्मणे नित्यं प्रजानां परिपालने ।
शृणु चात्रोपमामेकां या वृद्धेभ्यः श्रुता मया ॥ ८
मुचुकुन्दस्य राजर्षेरददत् पृथिवीमिमाम् ।
पुरा वैश्रवणः प्रीतो न चासौ तद्गृहीतवान् ॥ ९
बाहुवीर्यार्जितं राज्यमश्नीयामिति कामये ।
ततो वैश्रवणः प्रीतो विस्मितः समपद्यत ॥ १०
मुचुकुन्दस्ततो राजा सोऽन्वशासद् वसुन्धराम् ।
बाहुवीर्यार्जितां सम्यक् क्षत्रधर्ममनुव्रतः ॥ ११
यं हि धर्मं चरन्तीह प्रजा राज्ञा सुरक्षिताः ।
चतुर्थं तस्य धर्मस्य राजा विन्देत भारत ॥ १२
राजा चरति चेद्धर्मं देवत्वायैव कल्पते ।
स चेदधर्मं चरति नरकायैव गच्छति ॥ १३
दण्डनीतिश्च धर्मेभ्यश्चातुर्वर्ण्यं नियच्छति ।
प्रयुक्ता स्वामिना सम्यगधर्मेभ्यश्च यच्छति ॥ १४
दण्डनीत्यां यदा राजा सम्यक् कात्स्न्र्येन वर्तते ।
तदा कृतयुगं नाम कालः श्रेष्ठः प्रवर्तते ॥ १५
कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणम् ॥ १६

राजा कृतयुगस्रष्टा त्रेताया द्वापरस्य च ।
युगस्य च चतुर्थस्य राजा भवति कारणम् ।। १७
कृतस्य करणाद्राजा स्वर्गमत्यन्तमश्नुते ।
त्रेतायाः करणाद्राजा स्वर्गं नात्यन्तमश्नुते ।। १८
प्रवर्तनाद्वापरस्य यथाभागमुपाश्नुते ।
कलेः प्रवर्तनाद्राजा पापमत्यन्तमश्नुते ।। १९
ततो वसति दुष्कर्मा नरके शाश्वतीः समाः ।
राजदोषेण हि जगत् स्पृश्यते जगतः स च ।। २०
राजधर्मानवेक्षस्व पितृपैतामहोचितान् ।
नैतद्राजर्षिवृत्तं हि यत्र त्वं स्थातुमिच्छसि ।। २१
न हि वैक्लव्यसंसृष्ट आनृशंस्यव्यवस्थितः ।
प्रजापालनसंभूतं फलं किञ्चन लब्धवान् ।। २२
न ह्येतामाशिषं पाण्डुर्न चाहं न पितामहः ।
प्रयुक्तवन्तः पूर्वं ते यया चरसि मेधया ।। २३
यज्ञो दानं तपः शौर्यं प्रज्ञा संतानमेव च ।
माहात्म्यं बलमोजश्च नित्यमाशंसितं मया ।। २४
नित्यं स्वाहा स्वधा नित्यं दद्युर्मानुषदेवताः ।
दीर्घमायुर्धनं पुत्रान् सम्यगाराधिताः शुभाः ।। २५
पुत्रेष्वाशासते नित्यं पितरो दैवतानि च ।
दानमध्ययनं यज्ञः प्रजानां परिपालनम् ।। २६
एतद्धर्ममधर्मं वा जन्मनैवाभ्यजायथाः ।
ते तु वैद्याः कुले जाता अवृत्या तात पीडिताः ।। २७
यत्र दानपतिं शूरं क्षुधिताः पृथिवीचराः ।
प्राप्य तुष्टा प्रतिष्ठन्ते धर्मः कोऽभ्यधिकस्ततः ।। २८
दानेनान्यं बलेनान्यं तथा सूनृतया परम् ।
सर्वतः प्रतिगृह्णीयाद्राज्यं प्राप्येह धार्मिकः ।। २९
ब्राह्मणः प्रचरेद् भैक्षं क्षत्रियः परिपालयेत् ।
वैश्यो धनार्जनं कुर्याच्छूद्रः परिचरेच्च तान् ।। ३०
भैक्षं विप्रतिषिद्धं ते कृषिर्नैवोपपद्यते ।
क्षत्रियोऽसि क्षतात् त्राता बाहुवीर्योपजीविता ।। ३१

पित्र्यमंशं महाबाहो निमग्नं पुनरुद्धर ।
साम्ना भेदेन दानेन दण्डेनाथ नयेन वा ॥ ३२
इतो दुःखतरं किं नु यदहं दीनबान्धवा ।
परपिण्डमुदीक्षे वै त्वां सूत्वाऽमित्रनन्दन ॥ ३३
युध्यस्व राजधर्मेण मा निमज्जीः पितामहान् ।
मा गमः क्षीणपुण्यस्त्वं सानुजः पापिकां गतिम् ॥ ३४
——महाभारत, उद्योगपर्व अध्याय १३२

विद्याशूरं तपःशूरं दानशूरं तपस्विनम् ।
ब्राह्म्या श्रिया दीप्यमानं साधुवादे च सम्मतम् ॥ २०
अर्चिष्मन्तं बलोपेतं महाभागं महारथम् ।
धृतिमन्तमनाधृष्यं जेतारमपराजितम् ॥ २१
नियन्तारमसाधूनां गोप्तारं धर्मचारिणाम् ।
ईदृशं क्षत्रिया सूते वीरं सत्यपराक्रमम् ॥ २२
——महाभारत, उद्योगपर्व अध्याय १३६

अर्जुनं केशव ब्रूयास्त्वयि जाने स्म सूतके ।
उपोपविष्टा नारीभिराश्रमे परिवारिता ॥ १
अथान्तरिक्षे वागासीद्दिव्यरूपा मनोरमा ।
सहस्राक्षसमः कुन्ति भविष्यत्येष ते सुतः ॥ २
एष जेष्यति सङ्ग्रामे कुरून्सर्वान्समागतान् ।
भीमसेनद्वितीयश्च लोकमुद्वर्तयिष्यति ॥ ३
पुत्रस्ते पृथिवीं जेता यशश्चास्य दिवं स्पृशेत् ।
हत्वा कुरूंश्च सङ्ग्रामे वासुदेवसहायवान् ॥ ४
पित्र्यमंशं प्रणष्टं च पुनरप्युद्धरिष्यति ।
भ्रातृभिः सहितः श्रीमांस्त्रीन्मेधानाहरिष्यति ॥ ५
स सत्यसन्धो बीभत्सुः सव्यसाची यथाऽच्युत ।
तथा त्वमेव जानासि बलवन्तं दुरासदम् ॥ ६
तथा तदस्तु दाशार्ह यथा वागभ्यभाषत ।
धर्मश्चेदस्ति वार्ष्णेय तथा सत्यं भविष्यति ॥ ७
त्वं चापि तत्तथा कृष्ण सर्वं संपादयिष्यसि ।
नाहं तदभ्यसूयासि यथा वागभ्यभाषत ॥ ८

नमो धर्माय महते धर्मो धारयति प्रजाः ।
एतद्धनंजयो वाच्यो नित्योद्युक्तो वृकोदरः ।। ९
यदर्थं क्षत्रिया सूते तस्य कालोऽयमागतः ।
न हि वैरं समासाद्य सीदन्ति पुरुषर्षभाः ।। १०
विदिता ते सदा बुद्धिर्भीमस्य न स शाम्यति ।
यावदन्तं न कुरुते शत्रूणां शत्रुकर्शन ।। ११
सर्वधर्मविशेषज्ञां स्नुषां पाण्डोर्महात्मनः ।
ब्रूया माधव कल्याणीं कृष्ण कृष्णां यशस्विनीम् ।। १२
युक्तमेतन्महाभागे कुले जाते यशस्विनि ।
यन्मे पुत्रेषु सर्वेषु यथावत्त्वमवर्तथाः ।।१३
माद्रीपुत्रौ च वक्तव्यौ क्षत्रधर्मरतावुभौ ।
विक्रमेणार्जितान् भोगान् वृणीतं जीवितादपि ।। १४
विक्रमाधिगता ह्यर्थाः क्षत्रधर्मेण जीवतः ।
मनो मनुष्यस्य सदा प्रीणन्ति पुरुषोत्तम ।। १५
यच्च वः प्रेक्षमाणानां सर्वधर्मोपचायिनाम् ।
पाञ्चाली परुषाण्युक्ता को नु तत्क्षन्तुमर्हति ।। १६
न राज्यहरणं दुःखं द्यूते चापि पराजयः ।
प्रव्राजनं सुतानां वा न मे तद्दुःखकारणम् ।। १७
यत्र सा बृहती श्यामा सभायां रुदती तदा ।
अश्रौषीत् परुषा वाचस्तन्मे दुःखतरं महत् ।। १८
स्त्रीधर्मिणी वरारोहा क्षत्रधर्मरता सदा ।
नाध्यगच्छत्तदा नाथं कृष्णा नाथवती सती ।। १९
तं वै ब्रूहि महाबाहो सर्वशस्त्रभृतां वरम् ।
अर्जुनं पुरुषव्याघ्रं द्रौपद्याः पदवीं चर ।। २०
विदितं हि तवात्यन्तं क्रुद्धाविव यमान्तकौ ।
भीमार्जुनौ नयेतां हि देवानपि परां गतिम् ।। २१
तयोश्चैतदवज्ञानं यत्सा कृष्णा सभागता ।
दुःशासनश्च यद्भीमं कटुकान्यभ्यभाषत ।। २२
पश्यतां कुरुवीराणां तच्च संस्मारयेः पुनः ।
पाण्डवान् कुशलं पृच्छेः सपुत्रान् कृष्णया सह ।। २३

मां च कुशलिनीं ब्रूयास्तेषु भूयो जनार्दन ।
अरिष्टं गच्छ पन्थानं पुत्रान् मे प्रतिपालय ॥ २४
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय १३७

हे केशवा, धर्मात्मा राजा युधिष्ठिराची भेट घेऊन माझा निरोप म्हणून तू त्याला असें सांग की, धर्म धर्म म्हणून तुझ्या हातून केवळ अधर्म घडत आहे. भलत्याच गोष्टीला धर्म म्हणून कवटाळून तू चुकीचें आचरण करीत आहेस. विद्वान् नसलेल्या मंदबुद्धीच्या वेदपाठकाची बुद्धि जशी अर्थाकडे मुळीच न पहातां वेदांच्या शब्दानांच मिठी मारून बसते तशीच तुझी ही बुद्धि धर्म धर्म म्हणतां म्हणतां धर्माचें रहस्य मुळीच न कळण्याइतकी जड झालेली आहे. ब्रह्मदेवानें तुला ज्या वर्णात उत्पन्न केलें त्या वर्णाचा जो धर्म तोच तुझा स्वधर्म होय याचा तू कधीं विचार तरी केला आहेस काय ? परमेश्वरानें आपल्या बाहूंपासून क्षत्रियांना उत्पन्न केले. त्यामुळें बाहूचें वीर्य हेंच त्यांचें उपजीवन होय. प्रजांचें परिपालन करण्यासाठी व युद्धासारखें क्रूर कर्म पार पाडण्यासाठीच क्षत्रियांची उत्पत्ति झालेली आहे. मी वृद्धांच्या तोंडून ऐकलेली एक गोष्ट तुला सांगतें. पूर्वी कुबेरानें अत्यंत प्रसन्न होऊन मुचुकुंद राजर्षीला ही सपूर्ण पृथ्वी दिली. पण त्यानें ती घ्यावयाचें नाकारले. तो म्हणाला कीं, क्षत्रिय कोणाचें कृपादान घेत नसतात. मी माझ्या बाहुवीर्याच्या भरंवशावर ही सपूर्ण पृथ्वी जिंकीन व नंतरच तिचा उपभोग घेईन. त्याच्या या उत्तरानें कुबेर अत्यंत आश्चर्यचकित झाला व संतुष्टही झाला. नंतर मुचुकुंदानें स्वतःच्या बाहुबलाच्या भरंवशावर क्षात्रधर्मानुसार पृथ्वी जिंकून तिचें राज्य केलें. राजानें संरक्षिलेल्या प्रजा जें धर्माचरण करतात त्या आचरणाच्या पुण्याच्या चवथ्या भागाचा राजा आपोआपच धनी होतो. राजा जर धर्मानुसार वागला तर तो देवच होतो. व तो जर अधर्माप्रमाणें वागला तर नरकांत जातो. राजानें दंडनीतीचा योग्य प्रयोग केला तर ती चातुर्वर्ण्यात्मक प्रजेचें अधर्मापासून नियंत्रण करून त्यांना धर्मानुसारच वागावयास लावितें. जर राजा दंडनीतीचा उत्कृष्ट प्रयोग करीत असेल तर कृतयुग नांवाची समाजविकसनाची सर्वश्रेष्ठ अवस्था तो उत्पन्न करतो. काळ हा राजाचें

कारण आहे की राजा हाच कालाचें कारण आहे या बाबतींत तुला संशय उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. राजा हेंच काळाचें खरें कारण आहे. राजाच कृतयुग उत्पन्न करणारा आहे. तोच आपल्या कर्तृत्वानें त्रेता, द्वापर व कलि हीं युगें उत्पन्न करतो. राजानें कृतयुग उत्पन्न केलें तर त्याला श्रेष्ठ स्वर्गसुखाची प्राप्ति होते. त्यानें जर त्यापेक्षां कमी श्रेणीचें त्रेतायुग उत्पन्न केलें तर त्याला तितक्या दिव्य गतीची प्राप्ति होत नाहीं. जर त्यानें द्वापर युग उत्पन्न केलें तर त्याला सामान्य फल प्राप्त होतें. व त्यानें जर कलियुग उत्पन्न केलें तर त्याला अतिशय मोठें पाप लागतें व तो दुरात्मा अनंत काळ नरकांत पिचत पडतो. राजाचे दोष जगाला भोगावे लागतात. तसेच जगाचे दोष राजालाही भोगावे लागतात. तुझ्या पितृपितामहांच्या परंपरेनें तुझ्यासाठीं सर्वस्वीं उचित असलेल्या राजधर्माकडे तू लक्ष दे. तू ज्या प्रकारचें आचरण करूं इच्छितोस तें राजर्षींना मुळींच शोभण्यासारखें नाही. नुसतें दयाशील अंतःकरण ठेवणाऱ्या व दुबळेपणाचें वर्तन करणाऱ्या कोणालाही प्रजापालनानें उत्पन्न होणारें श्रेष्ठ फल आजपर्यंत कधींही मिळालें नाहीं. तुझे पितामह, राजा पांडू व मी यांनीं तुझ्याविषयीं अशी कांहीं आशा धरली नव्हती. ज्या बुद्धीनें तू आज वागत आहेस, ती तुझ्यांत उत्पन्न व्हावी म्हणून आम्हीं तुला आशीर्वाद निश्चित दिलेले नव्हते. यज्ञ, दान, तपश्चर्या, शौर्य, बुद्धिमत्ता, संतान, माहात्म्य, बल, ओज ही तुझ्या ठिकाणी नित्य असावी अशीच मी सदैव इच्छा केली होती. नित्य यज्ञ करून पितर व देवता यांना तू प्रसन्न करून घ्यावेंस. तुला दीर्घ आयुष्य, धन व पुत्र यांची प्राप्ति व्हावी अशीच मी इच्छा केली होती. नित्य आराधना करून प्रसन्न केलेले पितर व दैवतें पुत्राविषयीं हीच इच्छा करीत असतात. दान, अध्ययन, यज्ञ व प्रजांचें परिपालन हाच तुझा जन्मसिद्ध धर्म आहे. खरे कुलवंत पंडित तेच होत कीं जे आपलें उपजीवन आपल्या धर्मानुसार मिळवितात व अकारण कष्टी होत नाहींत. पृथ्वीवरील भुकेले लोक शूर दात्याच्या घरीं येऊन संतुष्ट होऊन गेले तर त्याच्याइतका श्रेष्ठ धर्म जगांत दुसरा कोणता आहे? धार्मिक मनुष्याच्या

स्वाधीन राज्य असलें तर कुणाला दानानें, तर कुणाला सामर्थ्यानें, तर कुणाला भलेपणानें याप्रमाणें तो नियंत्रित करून सर्वांना धर्म-कार्यांत लावूं शकतो. भिक्षा मागून पोट भरणें हा ब्राह्मणांचा धर्म आहे. प्रजापालन करून उपजीवन करणें हा क्षत्रियांचा धर्म आहे. व्यापार करून धनार्जन करणे हा वैश्यांचा धर्म आहे व त्रैवर्णिकांची परिचर्या करून आपलें उपजीवन चालविणें हा शूद्राचा धर्म होय. भिक्षा तुला निषिद्ध आहे. कृषि तुला करतां येणार नाहीं. तू बाहु-वीर्यानें स्वतःचें उपजीवन चालविणारा क्षत्रिय आहेस. संकटांतून लोकांचें संरक्षण करणें हाच तुझा धर्म आहे. साम, भेद, दाम, दंड अथवा राजनीतीच्या इतर कोणत्याही उपायांचा अवलब करून तुझ्या पित्याचा दुसऱ्यानें गिळंकृत केलेला अश आपल्या स्वाधीन करून घेणें हेंच तुझें खरे कर्तव्य होय. तुझ्यासारख्याला जन्म देऊन मी तुझ्या आईनें दुसऱ्याच्या घरच्या पिडावर आपली उपजी-विका करावी याच्याइतकें दुःखदायक वा लाजिरवाणें दुसरें कांहीं असूं शकेल काय? राजधर्माप्रमाणें युद्ध कर. आपल्या पितामहाना शोकसागरांत अथवा अधोगतींत बुडवू नकोस व स्वतःही धर्माच्या नांवाखालीं अधर्माचें आचरण करून पुण्य नष्ट झालेल्या स्थितीत आपल्या भावांना घेऊन नरकांत जाऊ नकोस. विद्याशूर, तपःशूर, दानशूर, ब्राह्मतेजानें युक्त, सर्व लोक ज्याची प्रशसा करतात असा, दुसऱ्याना दाहक ठरणारा, अत्यंत तेजस्वी, अत्यत बलसपन्न महा-नुभाव, महारथ, धैर्यशील, दुसऱ्यांनी धर्षण करावयास अशक्य, शत्रूना जिंकणारा, ज्याचा पराजय कधीही होत नाहीं असा, दुष्टांचें नियंत्रण करणारा व धर्मानुसार वागणाऱ्याचे सरक्षण करणारा, सत्य पराक्रमी वीरपुत्रच आपल्याला व्हावा अशी क्षत्रिय स्त्री इच्छा करते. मी क्षत्रिया आहे. तू असा पुत्र आहेस काय? याचा स्वतःच्या मनाशी नीट विचार कर.

"हे केशवा, अर्जुनाला तू माझा असा निरोप सांग कीं तुझ्या जन्मा-नंतर जननाशौचामध्यें स्त्रियांच्या घोळक्यांत मी आश्रमांत बसलें असतां अवचित दिव्य आकाशवाणी झाली. त्या आकाशवाणीनें मला असें सांगितलें कीं, हे कुती, हा तुझा पुत्र देवेंद्राप्रमाणें अत्यंत

प्रभावशाली होणार आहे. हा भीमसेनाबरोबर सर्व लोकांवर विजय संपादन करून सर्व कौरवांना रणांत जिंकील. हा सर्व पृथ्वी जिंकून आपली यशोपताका स्वर्गाला नेऊन भिडवील. भगवान् श्रीकृष्णांच्या साहाय्यानें संग्रामांत सर्व कौरवांना ठार मारून त्यांनीं अपहृत केलेला आपल्या पित्याचा राज्यभाग हा पुनश्च परत मिळवील. बंधूसहित हा तीन अश्वमेध यज्ञ करील. हे केशवा, सव्यसाची व रणांत भीषण कर्मे करणारा अर्जुन सत्यसध आहे, बलवान् आहे व शत्रूंना धडक द्यावयास अत्यंत कठिण असा आहे. हें सर्व तुला माहीत आहेच. ती आकाशवाणी खरी झाली पाहिजे. जगांत जर धर्म कांही असेल तर आकाशवाणी खरी झालीच पाहिजे. तू तें सर्व खरें करून दाखविशील यांत मला शंका नाहीं. सर्व प्रजांचें धारण करणारा धर्म अत्यंत श्रेष्ठ आहे. त्याला माझा नमस्कार असो. आजवर ती आकाशवाणी खरी ठरलेली नाही. याचें मला वैषम्य वाटत नाही. परंतु आतां तरी ती खरी ठरली पाहिजे असें तू अर्जुनाला सांग. नेहमी प्रतिकारासाठी उद्युक्त असलेल्या भीमाला तू माझा असा निरोप सांग की, शत्रूशी वैर उत्पन्न झाल्यावर थोर पुरुष कधीही भग्नमनस्क व हतोत्साह होत नसतात. कौरवांचा अंत केल्यावांचून तुझ्या अंतःकरणालाही शांति कधीहि लाभणार नाही. तुझ्या स्वभावाची मला पूर्णपणें ओळख आहे. क्षत्रिय स्त्री ज्याच्यासाठीं पुत्राला जन्म देते त्याचा काळ आज आलेला आहे. तुझ्यापासून मी तीच अपेक्षा करते. सर्व धर्म जाणणारी राजा पांडूची सून कल्याणी द्रौपदी मला वारंवार आठवल्यावाचून राहात नाहीं. तिला माझे आशीर्वाद म्हणून एवढेंच सांग की, तू आपत्तीच्या काळांत माझ्या पुत्रांशीं जें वर्तन केलेंस तें कुलवती स्त्रियांना सर्वस्वीं भूषणास्पद आहे. क्षत्रिय धर्मात नेहमी रत असणाऱ्या माद्रीपुत्रांना माझा निरोप असा सांग कीं, प्राणापेक्षाही पराक्रमानें मिळविलेले भोग भोगण्याचीच तुम्ही इच्छा करा. क्षत्रिय धर्मानुसार जगून पराक्रमानें संपत्तीचा उपभोग घेणारा मनुष्य धन्य होय. त्याचेंच वैभव त्याला खरा आनंद देऊं शकतें. सर्व धर्माचा आधारस्तंभ होऊं शकणाऱ्या तुम्हां सगळ्यांच्या डोळ्यांदेखत त्या अधमांनीं

द्रौपदीला वाटेल ते हीन शब्द ऐकविले. तें कोण सहन करूं शकेल? श्रीकृष्णा, माझ्या पुत्रांना तूं असें सांग कीं, तुमच्या राज्याचा शत्रूंनीं अपहार केल्याचें अथवा द्यूतांत तुमचा पराजय झाल्याचें किंवा शत्रूनीं तुम्हांला देशोधडीला लावून दुर्गतींत ढकलल्याचें मला तितकें दुःख होत नाहीं. पण माझी ती अलौकिक सून भरसभेंत ओढीत आणल्यानंतर रडत असतां अंतःकरणाला घरे पाडणारे जे कठोर व हलकटपणाचे शब्द दुष्टांनी तिला ऐकविलें ही गोष्ट मात्र माझ्या अंतःकरणाला सारखी जाळीत आहे. क्षत्रिय धर्मावर अत्यंत निष्ठा असलेली व रजस्वला स्थितींत असलेली ती माझी सून तिचे पराक्रमी संरक्षक असतांनादेखील त्या भयानक दिवशीं निराधार व अनाथ ठरली. सर्व शस्त्रधारी लोकांत श्रेष्ठ असलेल्या पुरुषव्याघ्र अर्जुनाला तूं माझा निरोप म्हणून असें सांग कीं, द्रौपदीच्या विटंबनेचा सूड घेणें हेंच पुरुष म्हणून तुझें खरें कर्तव्य आहे. क्रुद्ध झालेले भीम व अर्जुन यमधर्मराज व मृत्यु यांच्या जोडीप्रमाणें भयंकर असून देवांना देखील नष्ट करण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं आहे. ते उघड्या डोळ्यांनीं पहात असतां शत्रूनीं द्रौपदीला सभेंत आणावें व सर्व कौरवश्रेष्ठ ऐकत असतां भीमासारख्या महापराक्रमी व्यक्तीला दुःशासनानें हलकटपणानें वाटेल तें बोलावें याचा अर्थ काय ? वस्त्रहरणाच्या वेळचा दारुण प्रसंग व त्यावेळी शत्रूनीं केलेला पांडवांचा भयानक उपहास याची तू त्यांना पुनश्च नीट जाणीव दे. त्यांचें कुशल मी विचारलें आहे म्हणून सांग. माझें कुशल त्यांना कळव. माझे पुत्र मी तुझ्या हातांत देतें."

अशा तेजस्विनी मातेच्या पुत्रांनीं आपल्या कुलस्त्रीच्या व वंशाच्या गौरवार्थ व श्रेष्ठ जीवनमूल्यांच्या संरक्षणासाठीं कुरुक्षेत्राच्या रणांगणावर अभूतपूर्व पराक्रम प्रकट करून दुर्जनांच्या रक्तनद्या वाहविल्या असल्या व अपमानित पण तेजस्वी राष्ट्राचें तें अखंड स्फूर्तिस्थान बनले असले तर त्यांत नवल तें काय आहे ! कुंतीच्या या तेजोगर्भ निरोपांत आजही पतित राष्ट्राचें उत्थापन घडवून आणण्याचें सामर्थ्य आहे.

खरी आर्य स्त्री

पण कुंतीचें खरें वैशिष्ट्य जें मनावर परिणाम करतें तें तिच्या उत्तर आयुष्यांतील तिच्या उदात्त त्यागामुळेंच होय. भारतीय स्त्री-जीवनाचें खरें वैशिष्ट्य तिनें आपल्या उत्तर आयुष्यांतील केलेल्या अपूर्व त्यागांत सांठविलेलें आहे. तिच्या पुत्रांनीं शत्रूंना रणांगणांत ठार मारून साम्राज्य मिळविल्यानंतर राजमाता म्हणून ऐश्वर्यांत व अहंकाराच्या उद्वेगांत आपला काळ घालविण्याऐवजीं आपल्यापेक्षां वडील म्हणून दुःखी असलेल्या देवी गांधारीच्या सदैव शुश्रूषेंत ती निमग्न राहिली.

युधिष्ठिरो महाराज धृतराष्ट्रेऽभ्युपाहरत् ।
तथैव कुन्ती गान्धार्यां गुरुवृत्तिमवर्तत ॥ ११

—महाभारत, आश्रमवासिकपर्व अध्याय १

यानंतर राजे धृतराष्ट्र गांधारी सहित अरण्यांत जाऊं लागले असतां राजवैभवाचा परित्याग करून कुतीही त्यांच्याबरोबर अरण्यांत जाऊं लागली. महाभारतकार म्हणतातः—

कुन्ती गान्धारीं बद्धनेत्रां व्रजन्तीं स्कन्धासक्तं हस्तमथोद्वहन्ती ।
राजा गान्धार्याः स्कन्धदेशेऽवसज्य पाणिं ययौ धृतराष्ट्रः प्रतीतः ॥ ९

—महाभारत, आश्रमवासिकपर्व अध्याय १५

"डोळ्यांना पट्टी बांधलेली गांधारी राजा धृतराष्ट्राबरोबर अरण्यांत जात असतां तिचा हात आपल्या खांद्यावर घेऊन राजमाता कुंती तिला आधार देऊन चालवीत होती व राजा धृतराष्ट्र गांधारीच्या स्कंधावर हात ठेवून हळुहळू मार्ग आक्रमीत होता." सर्व राजवैभवाचा परित्याग करून ज्या वेळीं कुंती धृतराष्ट्राबरोबर अरण्यांत जाऊं लागली त्यावेळीं कोमल मनाच्या युधिष्ठिरांना अत्यंत दुःख झालें. त्यांनीं आपल्या मातेला असें सांगितलें कीं, वनांत धृतराष्ट्र व गांधारी यांची सेवा करण्यास मी जातों पण आम्ही तुझे पुत्र जिवंत असतां तू अरण्यवासांतील कष्ट सहन करावेस हें मला बरें वाटत नाहीं. युधिष्ठिरांचा निर्बंध पाहून कुंतीच्या निश्चयांत कांहींही फरक पडला नाहीं. फक्त तिच्या डोळ्यांत अश्रु

मात्र तरळले. तिनें आपल्या पुत्राला काय उत्तर दिलें असेल ? ती म्हणाली:–

सहदेवे महाराज माऽप्रसादं कृथाः क्वचित् ।
एष मामनुरक्तो हि राजंस्त्वां चैव सर्वदा ॥ १०
कर्णं स्मरेथाः सततं सङ्ग्रामेष्वपलायिनम् ।
अवकीर्णो हि समरे वीरो दुष्प्रज्ञया तदा ॥ ११
आयसं हृदयं नूनं मन्दाया मम पुत्रक ।
यत्सूर्यजमपश्यन्त्याः शतधा न विदीर्यते ॥ १२
एवंगते तु किं शक्यं मया कर्तुमरिन्दम ।
मम दोषोऽयमत्यर्थं ख्यापितो यन्न सूर्यजः ॥ १३
तन्निमित्तं महाबाहो दानं दद्यास्त्वमुत्तमम् ।
सदैव भ्रातृभिः सार्धं सूर्यजस्यारिमर्दन ॥ १४
द्रौपद्याश्च प्रिये नित्यं स्थातव्यमरिकर्शन ।
भीमसेनोऽर्जुनश्चैव नकुलश्च कुरूद्वह ॥ १५
समाधेयास्त्वया राजंत्वय्यद्य कुलधूर्गता ।
श्वश्रूश्वशुरयोः पादान् शुश्रूषन्ती वने त्वहम् ।
गान्धारीसहिता वत्स्ये तापसी मलपङ्किनी ॥ १६

––महाभारत, आश्रमवासिक पर्व अध्याय १६

"हे महाराज, तुझा सर्वांत धाकटा बंधु जो सहदेव त्याच्यावर कधीही अप्रसन्न होऊ नकोस. येवढेंच माझें तुला सांगणें आहे. त्याचें माझ्यावर व तुझ्यावर अतिशय प्रेम आहे. त्याचप्रमाणें संग्रामांतून कधींही पलायन न करणाऱ्या कर्णाचें सतत स्मरण ठेव. दुष्ट बुद्धीनें त्याचा समरांत नाश झाला. माझें हृदय जणू की काय लोखंडाचें असावें असें मला वाटतें. एरवी कर्णाच्या स्मृतीनें तें शतधा विदीर्ण झाल्यावांचून राहिलें असतें काय? पण आतां होऊन गेलेल्या गोष्टीला मीं काय करूं शकणार आहे? कर्ण माझा मुलगा आहे ही गोष्ट मी पूर्वीच प्रकट केली नाहीं हा माझ्याहातून मोठा दोषच घडला आहे. दान ही कर्णाची जीवननिष्ठा होती. तू त्याच्या निमित्तानें पुष्कळसें दान दे. द्रौपदीचें नेहमीं प्रिय करणें हें तुझें कर्तव्य आहे. आतां कुळांत तूच सर्वांत वडील असल्यामुळें तूच सर्वांचा संभाळ केला पाहिजेस. भीमसेन, अर्जुन व नकुल यांना संभाळून घे. माझी

कसली काळजी करतोस? गांधारी व धृतराष्ट्र हे माझे सासू व सासरे आहेत. (गांधारी-धृतराष्ट्रांना कुंतीनें सासू-सासरे म्हटल्याबद्दल आर्य संस्कृतीच्या कुळाचारांची माहिती नसलेल्या पुष्कळांना मोठे विलक्षण वाटतें. मी येथें मुळांतले शब्द वापरले आहेत. त्यांचें स्पष्टीकरण करतांना महाभारताचा विख्यात टीकाकार नीलकंठ असें म्हणतो की, "धृतराष्ट्रः पाण्डोः ज्येष्ठत्वात् पितृसमः तेन कुन्त्याः सः श्वशुरः" धृतराष्ट्र हा पांडूचा वडील भाऊ असल्यामुळें तो त्याला पित्यासारखाच आहे. म्हणन कुंतीनें त्याला श्वशुर असें म्हटलें. येवढ्यानें आक्षेपकांचें समाधान होऊं शकेल असें वाटतें.) माझ्या या सासू–सासऱ्याची चरणसेवा करीत अरण्यांत गांधारीसहित मी राहीन. या वयांत धूळ अंगावर बसलेल्या स्थितींत तपस्या करीत जीवन घालविणें हेंच माझें कर्तव्य होय. याप्रमाणें कुंतीनें उत्तर देतांच धर्मात्मा युधिष्ठिर अत्यंत खिन्न झाला. चिंता व शोक यांनी त्याचें अंतःकरण व्यापून गेलें. तो कुंतीला म्हणू लागला, तू हें काय ठरविले आहेस? माते, याप्रमाणें बोलून तू आमच्या हृदयावर कां घरे पाडू इच्छितेस? तू माझ्यावर प्रसन्न हो व कृपा कर. तुला वनांत जावयास मी कधीच समति देणार नाही. पूर्वी विदुलेची कथा ऐकवून तूच आम्हांला अत्यत तेजस्वी निरोप पाठवून सग्रामासाठी उद्युक्त केलेंस व आज तूच आमचा असा परित्याग करतेस काय? सर्व राजांना ठार मारून श्रीकृष्णाकरवी तू पाठविलेल्या निरोपाप्रमाणें हें राज्य मी सपादन केलें आहे. आता तूच मला क्षात्र धर्मानुसार वागावयास भाग पाडून माझा परित्याग कां करतेस? ह्या विस्तीर्ण राज्याचा, आम्हां सर्वांचा, व जिच्यावर तुझें अत्यत प्रेम आहे त्या तुझ्या सुनेचा परित्याग करून अरण्यांत तू आपलें जीवन कसें घालविशील? माझ्यावर प्रसन्न हो व राजनगरींतच रहा.

हें बोलत असतां युधिष्ठिरांच्या नेत्रांतून अविरत अश्रुपात चालू होता. कुतीच्याही नेत्रांत अश्रू आले पण तिनें आपला निश्चय बदलला नाही. तें पाहून भीमसेन पुढें झाला व त्यानें कुंतीला म्हटलें, हे माते, पुत्रांनीं मिळविलेलें हें राज्य प्राप्त झाल्यावर राजधर्मानुसार

मिळणारे मानसन्मान सोडून अरण्यांत जाण्याची बुद्धि तुला कां झाली? असेंच जर करावयाचें होतें तर पूर्वी तू आम्हांला संपूर्ण पृथ्वीचा विनाश करून राज्यसंपादन करावयास्तव कां प्रोत्साहित केलेंस? व आतां आम्ही तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागल्यानंतर तूं आमचा कां परित्याग करूं इच्छितेस? तुला वनांत जाण्याचें काय कारण आहे? आई, तुला आम्हांला असेंच सोडावयाचें होतें तर तूं लहानपणीं आम्हांला अरण्यांतून राजधानीत आणलेंस तरी कशाला?

पण कुंती कांहींच न बोलतां पुढें जात होती. त्यानंतर वारंवार पांडवांचा शोक पाहून तिनें त्यांना जें उत्तर दिलें तें भारतांतील आर्य स्त्रियांच्या शीलचारित्र्याचें निदर्शन म्हणून भारतवर्षाच्या सांस्कृतिक इतिहासांत अमर ठरण्याच्या योग्यतेचें आहे. ती म्हणाली :—

एवमेतन्महाबाहो यथा वदसि पाण्डव ।
कृतमुद्धर्षणं पूर्वं मया वः सीदतां नृपाः ॥ १
द्यूतापहृतराज्यानां पतितानां सुखादपि ।
ज्ञातिभिः परिभूतानां कृतमुद्धर्षणं मया ॥ २
कथं पाण्डोर्न नश्येत सन्ततिः पुरुषर्षभाः ।
यशश्च वो न नश्येत इति चोद्धरणं कृतम् ॥ ३
यूयमिन्द्रसमाः सर्वे देवतुल्यपराक्रमाः ।
मा परेषां मुखप्रेक्षाः स्येत्येवं तत्कृतं मया ॥ ४
कथं धर्मभृतां श्रेष्ठो राजा त्वां वासवोपमः ।
पुनर्वने न दुःखी स्या इति चोद्धरणं कृतम् ॥ ५
नागायुतसमप्राणः ख्यातविक्रमपौरुषः ।
नायं भीमोत्ययं गच्छेदिति चोद्धरणं कृतम् ॥ ६
भीमसेनादवरजस्तथाऽयं वासवोपमः ।
विजयो नावसीदेत इति चोद्धरणं कृतम् ॥ ७
नकुलः सहदेवश्च तयेमौ गुरुवर्तिनौ ।
क्षुधा कथं न सीदेतामिति चोद्धरणं कृतम् ॥ ८
इयं च बृहती श्यामा तथाऽऽयतलोचना ।
वृथा सभातले क्लिष्टा मा भूदिति च तत्कृतम् ॥ ९
प्रेक्षतामेव वो भीम वेपन्तीं कदलीमिव ।
स्त्रीधर्मिणीमरिष्टाङ्गीं तथा द्यूतपराजिताम् ॥ १०
दुःशासनो यदा मौर्ख्याद् दासीवत्पर्यकर्षत ।
तदैव विदितं महद्यं पराभूतमिदं कुलम् ॥ ११

निषण्णाः कुरवश्चैव तदा मे श्वशुरादयः ।
सा दैवं नाथमिच्छन्ती व्यलपत्कुररी यथा ॥ १२
केशपक्षे परामृष्टा पापेन हतबुद्धिना ।
यदा दुःशासनेनैषा तदा मुह्याम्यहं नृपाः ॥ १३
युष्मत्तेजोविवृद्धयर्थं मया हयुद्धरणं कृतम् ।
तदानीं विदुलावाक्यैरिति तद्वित्त पुत्रकाः ॥ १४
कथं न राजवंशोऽयं नश्येत्प्राप्य सुतान्मम ।
पाण्डोरिति मया पुत्रास्तस्मादुद्धरणं कृतम् ॥ १५
न तस्य पुत्राः पौत्रा वा क्षतवंशस्य पार्थिव ।
लभन्ते सुकृताँल्लोकान् यस्माद्वंशः प्रणशति ॥ १६
भुक्तं राज्यफलं पुत्रा भर्तुर्मे विपुलं पुरा ।
महादानानि दत्तानि पीतः सोमो यथाविधि ॥ १७
नाहमात्मफलार्थं वै वासुदेवमचूचुदम् ।
विदुलायाः प्रलापैस्तैः पालनार्थं च तत्कृतम् ॥ १८
नाहं राज्यफलं पुत्राः कामये पुत्रनिर्जितम् ।
पतिलोकानहं पुण्यान्कामये तपसा विभो ॥ १९
श्वश्रूश्वशुरयोः कृत्वा शुश्रूषां वनवासिनोः ।
तपसा शोषयिष्यामि युधिष्ठिर कलेवरम् ॥ २०
निवर्तस्व कुरुश्रेष्ठ भीमसेनादिभिः सह ।
धर्मे ते धीयतां बुद्धिर्मनस्तु महदस्तु च ॥ २१
—महाभारत, आश्रमवासिक पर्व अध्याय १७

" हे पांडवा, मी पूर्वी अवश्य कर्तव्य म्हणून तुमच्यांत रणोत्साह उत्पन्न केला ही गोष्ट खरी आहे. सुखांतून परिभ्रष्ट झालेल्या, ज्ञाति-बांधवांनीं तिरस्कृत केलेल्या, द्यूतांत राज्याचा अपहार झालेल्या तुमचें तेज प्रदीप्त करणें माता म्हणून माझें कर्तव्यच होतें. राजा पांडू-सारख्या सर्वश्रेष्ठ पुरुषाची संतति नष्ट होऊं नये व तुमच्या यशाचा नाश होऊं नये म्हणून मीं तुम्हांला प्रोत्साहित केलें. तुम्ही सर्व लोक महेंद्राप्रमाणें प्रभावशाली व देवाप्रमाणें पराक्रमी असून देखील दुस-ऱ्याच्या तोंडाकडे पाहात बसण्याचा हीन मार्ग पत्करावा हें मला बरें वाटलें नाहीं. महेंद्राप्रमाणें प्रभावशाली असलेला व सर्व धर्मनिष्ठ राजांत अत्यंत श्रेष्ठ असा हा युधिष्ठिर जन्मभर दुःखी अवस्थेंत वनांत राहणें मला योग्य वाटलें नाहीं. दहा सहस्र हत्तींचें बळ अंगीं असलेला व आपल्या पराक्रमानें व पौरुषानें सर्व जगांत विख्यात अस-

लेला भीमसेन वाया जाऊन नष्ट होऊं नये अशी माझी इच्छा होती. भीमापेक्षां धाकटा पण महेंद्राप्रमाणें तेजस्वी असा हा अर्जुन जन्मभर दीन राहूं नये असें मला वाटत होतें. आपल्या ज्येष्ठ बंधूच्या आज्ञेंत राहणारे हे नकुलसहदेव अन्नासाठी लाचारीचे जीवन पत्करून सदा खिन्न राहू नयेत असें मला वाटत होतें. म्हणून मी क्षत्रिय कुळांत उत्पन्न झालेल्या तुमचे जें अवश्य कर्तव्य होतें तें तुम्ही पार पाडावें या उत्कट इच्छेनें तुमचें तेज वाढविले. तुमच्या हातून अधर्म घडत होता. मी धर्म घडविला. ही विशाललोचना द्रौपदी भरसभेंत फरफटत ओढत आणली गेली व तिला विटंबना सहन करावी लागली. हे भीमा, तुमच्या डोळ्यासमोर थरकांपणाऱ्या कदलीप्रमाणें कप उत्पन्न झालेल्या द्रौपदीला द्यूतपराजित दासी म्हणून दुःशासनानें मूर्खपणानें ज्यावेळीं भर सभेंत खेचलें त्याचवेळीं या कुळाचा सर्वनाश झाला हें मीं निश्चित ठरविलें. माझ्या सर्व श्वशुरांच्या सभेंत दैवालाच आपले संरक्षक समजून घाबरलेल्या हरिणीप्रमाणें द्रौपदी आर्त विलाप करीत असतां बुद्धि नष्ट झालेल्या त्या पापी दुःशासनानें जेव्हां तिच्या केसांना हात घातला त्यावेळी माझे अंतःकरण जळून दग्ध झालें. शूर क्षत्रियांच्या स्त्रीची त्यांच्या जिवंतपणीं अशी विटंबना होणें मला अत्यंत गर्हर्य वाटलें म्हणून तुमचें तेज वाढवावें म्हणून व आवश्यक तो क्रोध तुमच्या ठिकाणी उत्पन्न व्हावा म्हणून मी तुम्हांला रणोत्साहाचा संदेश दिला व विदुलेचा संदेश ऐकविला. तुमच्यासारखे पराक्रमी पुत्र असून महाराज पांडूचा वंश नष्ट होऊं नये म्हणून मी तुमच्या तेजाचें वर्धन केलें. जे पुत्र वा पौत्र आपल्या पित्याचा वंश नष्ट करावयास कारणीभूत होतात, त्यांना पुण्याच्या कर्मांनीं मिळणारे उत्कृष्ट लोक कधीही मिळू शकत नाहीत. मला स्वतःला उपभोग हवा होता म्हणून मी तुम्हांला संग्रामासाठी मुळीच उद्युक्त केलेलें नाही. हे पुत्रांनो, माझ्या पतीच्या पराक्रमानें मी साम्राज्याचा पुष्कळ उपभोग घेतला आहे. पतीच्या राज्यांत मी पुष्कळ मोठमोठीं दानें दिली व यज्ञांत सम्राटाची पत्नी या नात्यानें यथाविधि सोमपानहि पुष्कळ केलें. स्वतः राजैश्वर्य भोगण्याची मला कोणतीही इच्छा शिल्लक सहिलेली नाहीं व त्या इच्छेनें श्रीकृष्णाला मी माझा निरोप घेऊन

तुमच्याकडे पाठविलेंही नाहीं. राजवंशांत उत्पन्न झालेल्या तुमच्या हातून तुमचा कुळधम पाळला जावा येवढीच माझी इच्छा होती. पुत्रांनी मिळविलेल्या राजैश्वर्याचा उपभोग घ्यावा अशी माझी मुळीच इच्छा नाही. तपश्चर्येनें प्राप्त झालेल्या पुण्यानें, पतिलोक मिळवावा हीच माझी इच्छा आहे. हे युधिष्ठिरा, वीरांची माता म्हणून त्या वेळी माझें जें आवश्यक कर्तव्य होतें तें मी यथावत् पार पाडलें आहे. आतां कुरु कुळांतील विधवा सून म्हणून सासू-सासऱ्यांची सेवा करणें हें जें माझे दुसरें आवश्यक कर्तव्य तें मला पार पाडलें पाहिजे. या वनवासी सासूसासऱ्यांची सेवा करून तपश्चर्येनें मी माझे शरीर शुष्क करून टाकीन. भीमादिकांना बरोबर घेऊन तू राजधानीकडे परत जा. तुझी बुद्धि नेहमीं धर्मात रत होवो व तुझें अंतःकरण नेहमीं विशाल राहो."

यानंतर राजा धृतराष्ट्रानें व गांधारीनेंही अरण्यवासापासून कुंतीचें मन परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण कोणालाही त्यांत यश आलें नाहीं. धृतराष्ट्र व गांधारी यांची सेवा करण्यासाठीं कुंती, सोळा वर्षे त्यांच्याबरोबर अरण्यवासांत राहिली. मध्यंतरीं मातृ-भक्त पांडव तिला अरण्यांत जाऊन भेटूनही आले. आर्यशीला कुंतीनें आपलें शरीर तपस्येनें कृश करून धृतराष्ट्र व गांधारी यांच्याबरोबरच शेवटीं अरण्यांतील वणव्याच्या अग्नींत तें समर्पण करून टाकलें. भगवान् श्रीकृष्णांची ही वंदनीय आत्या व युधिष्ठिर, भीम व अर्जुन या श्रेष्ठ महानुभावांची ही माता महाभारताचा व भारतीय स्त्रीजीवनाचाही एक महान् व अमर अलंकारच होय. महर्षि व्यासांच्या दिव्य प्रतिभेलाही इतकें सुपूर्त व परिपूर्ण असें दुसरें स्त्री-जीवन वर्णितां आलेलें नाहीं. कुंतीच्या जीवनाचा हा महान् नंदादीप भारतीय आदर्श स्त्रीजीवन म्हणून कसें होतें हें दिग्दर्शित करावयास महाभारताच्या स्फूर्तिशाली इतिहासांत अखंडितपणें तेवत आहे. त्याच्या पवित्र प्रकाशांत कोणत्याही भारतीय स्त्रीला आजही खऱ्या आर्यजीवनाचा प्रत्यय घेतां येईल.

२३. द्रौपदी

राजमाता कुंती ही युधिष्ठिरांच्या धर्मकार्पण्याचे जसें एक बलिदान आहे, तसेच किबहुना त्याहूनही अधिक करुणास्पद बलिदान पाडवाची महाराणी व महापतिव्रता द्रौपदीचे झाले आहे. संपूर्ण महाभारतावर ज्या महान् जीवनाची छाया पडलेली आहे त्यांत द्रौपदीचें जीवन अग्रगण्य आहे असें म्हटलें तरी चालेल. भगवान् श्रीकृष्ण स्वतःच्या सहोदर भगिनीपेक्षांही जिला अधिक प्रिय व श्रेष्ठ समजत व मान देत असत, तिच्या महत्तेचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे. द्रौपदीच्या ठिकाणचे सर्व महनीय सद्गुण देवी सीतेइतकेच उज्ज्वल आहेत. पण दोघींच्या भाग्यरेषेंत सृष्टिनिर्मात्यानें विलक्षण स्वरूपाची भिन्नता उत्पन्न केली आहे. सीता व द्रौपदी या दोघीचेंही जीवन अत्यंत दुःखांत गेलें आहे. जणू कारुण्याचा आविष्कार म्हणूनच महर्षि वाल्मीकि व व्यास या दोन दिव्य प्रतिभावंतांनीं ही दोन चित्रणें निर्माण केली; पण सीतेचीं दुःखे भगवान् श्रीरामचंद्रांच्या दिव्य कर्तव्यनिष्ठेतून उद्भवलेली असल्यामुळें दुःखाग्नींतील त्या भयंकर होरपळण्यांतही कर्तव्यपूर्तीसाठीं आपलें बलिदान घडत आहे असें समाधान सीतादेवीला लाभलें; पण द्रौपदीची अवस्था एका अर्थानें सीतादेवीपेक्षांही अधिकच अनुकंपनीय आहे. बलिदानाचें दुःख तर तिला सहन करावें लागतेंच; पण तें तिच्या पतीच्या दिव्य कर्तव्यनिष्ठेऐवजीं भ्रामक धमकार्पण्यांतून उद्भवलेल्या परिस्थितींतून निर्माण होत असल्यानें कसलेंही आत्मसमाधान त्या बलिदानांत तिला लाभू शकत नाहीं. त्यामुळें द्रौपदीची मूर्ति कारुण्याच्या दृष्टीनें अधिकच सुपूर्त व सीतादेवीपेक्षांही अंतःकरणाला अस्वस्थतेची अधिकच टोचणी लावणारी आहे. सीता देवीप्रमाणेंच द्रौपदी हीही देवी श्रीचाच मानवी स्वरूपांत झालेला आविष्कार असून तिचे गुण इतके सर्वश्रेष्ठ आहेत कीं, मानवी पद्धतीप्रमाणें तिचा जन्म झाला असल्याची कल्पना महाकवींच्या

व्याख्यान २३ वें, दि. २० एप्रिल १९५१

तरल प्रतिभेला मानवत नाही. म्हणून सीता ज्याप्रमाणें अयोनिजा आहे त्याचप्रमाणें महर्षि व्यासांची द्रौपदीदेखील अयोनिजाच आहे. स्वतः महर्षीनींच वापरलेला हा शब्द मी येथें उपयोगांत आणलेला आहे. युधिष्ठिर स्वर्गांत गेल्यानंतर आपआपल्या मूळ स्वरूपाशीं एकरूप होत असलेल्या त्याच्या बंधूची व सुहृदांची त्याला ओळख पटवून देत असतां द्रौपदीसंबंधी देवेंद्र युधिष्ठिराला असें सांगतो कीः—

तथा ददर्श पाञ्चालीं कमलोत्पलमालिनीम् ।
वपुषा स्वर्गमाक्रम्य तिष्ठन्तीमर्कवर्चसम् ॥ १०
अखिलं सहसा राजा प्रष्टुमैच्छद्युधिष्ठिरः ।
ततोऽस्य भगवानिन्द्रः कथयामास देवराट् ॥ ११
श्रीरेषा द्रौपदीरूपा त्वदर्थे मानुषं गता ।
अयोनिजा लोककान्ता पुण्यगन्धा युधिष्ठिर ॥ १२
रत्यर्थं भवतां ह्येषा निर्मिता शूलपाणिना ।
द्रुपदस्य कुले जाता भवद्भिश्चोपजीविता ॥ १३

—महाभारत, स्वर्गारोहणपर्व अध्याय ४

"युधिष्ठिरानें स्वर्गात सूर्याप्रमाणें अत्यत तेजस्वी दिसणारी, गळ्यांत उत्फुल्ल कमळाची माळ घातलेली व स्वतःच्या लावण्याच्या आभेने स्वर्गशोभेला झांकून टाकणारी द्रौपदी पाहिली. तो देवेंद्राला कांही विचारणार इतक्यात इंद्रानें त्याला स्वतःच सांगावयाला सुरुवात केली. इंद्र म्हणाला : ही अयोनिजा सर्व लोकांचें चित्त हरण करणारी, जिच्या शरीराचा गंध अत्यंत उत्कृष्ट आहे अशी द्रौपदी म्हणजे द्रौपदीच्या रूपानें साक्षात् श्रीदेवीच मनुष्य लोकांत अवतीर्ण झाली होती. प्रत्यक्ष भगवान् शंकरांनीं तुमच्या विहारार्थ ही निर्माण केली. ही द्रुपदाच्या कुळांत उत्पन्न झालेली असून तुमची पत्नी या नात्यानें भूलोकांत राहिली."

द्रौपदीची जन्मकथा तिच्या सर्व व्यक्तिवैशिष्ट्यांचीं बीजें व्यक्त करणारी असून वैचित्र्यपूर्ण आहे. द्रौपदी व तिचा बंधु धृष्टद्युम्न हे दोघेही अग्नीपासून उत्पन्न झाल्याचें महाभारतांत वर्णन आहे. पंचाल देशाचा राजा द्रुपद यानें द्रोणाचार्यांचा अपमान केल्यानंतर संताप-

लेल्या आचार्य द्रोणांनी आपला शिष्य जो अर्जुन त्याच्याकरवीं द्रुपदाचा पराजय करून त्याचें अर्धे राज्य हिरावून घेतलें. द्रुपद द्रोणांना प्रत्यक्षांत तर कांहीच करूं शकला नाहीं. पण त्यानें तेव्हांपासून आपल्या अत.करणात आचार्याविषयी दश धरून तपस्वी ब्राह्मणांच्या मदतीने त्याना ठार मारणारा मुलगा उत्पन्न व्हावा म्हणून एक मोठें यज्ञीय अनुष्ठान केले. द्रुपदाच्या त्या यज्ञांतील याजकानें यज्ञात हवन करून मंत्रपूत हविर्भाग भक्षण करण्यासाठी द्रुपदाच्या महाराणीला बोलाविले. पण ती त्यावेळी अशुद्ध अवस्थेत होती. तिनें त्या याजकाला असें सांगितले की सध्यां मी अशुद्ध अवस्थेत असून मी माझें तोंड धुवून स्वच्छ व शुद्ध होईपर्यत तू थांब. पण तो तेजस्वी याजक तिला म्हणाला की, मला तुझ्यासाठी माझा वेळ घालवावयाचा नाही. वाटलें तर येथे उभी रहा अथवा कोठेंही जा. माझ्या मंत्राचे फळ तुझ्यावांचून मुळीच खोळंबून राहणार नाही. तू न आलीस तर वेदीतून मुलगा उत्पन्न होईल. महाभारतकार म्हणतात :

एवमुक्त्वा तु याजेन हुते हविषि संस्कृते ।
उत्तस्थौ पावकात्तस्मात्कुमारो देवसन्निधः ॥ ३९
ज्वालावर्णो घोररूपः किरीटी वर्म चोत्तमम् ॥
बिभ्रत्सखड्गः सशरो धनुष्मान्विनदन्मुहुः ॥ ४०
सोऽध्यारोहद्रथवरं तेन च प्रययौ तदा ।
ततः प्रणेदुः पाञ्चालाः प्रहृष्टाः साधु साध्विति ॥ ४१
हर्षाविष्टांस्ततश्चैताञ्ज्ञेयं सेहे वसुन्धरा ।
भयापहो राजपुत्रः पञ्चालानां यशस्करः ॥ ४२
राज्ञः शोकापहो जात एष द्रोणवधाय वै ।
इत्युवाच महद्भूतमदृश्यं खेचरं तदा ॥ ४३
कुमारी चापि पाञ्चाली वेदीमध्यात्समुत्थिता ।
सुभगा दर्शनीयाङ्गी स्वसितायतलोचना ॥ ४४
श्यामा पद्मपलाशाक्षी नीलकुञ्चितमूर्धजा ।
ताम्रतुङ्गनखी सुभ्रूश्चारुपीनपयोधरा ॥ ४५
मानुषं विग्रहं कृत्वा साक्षादमरवर्णिनी ।
नीलोत्पलसमो गन्धो यस्याः क्रोशात्प्रधावति ॥ ४६

या बिभर्ति परं रूपं यस्या नास्त्युपमा भुवि ।
देवदानवयक्षाणामीप्सितां देवरूपिणीम् ॥ ४७
तां चापि जातां सुश्रोणीं वागुवाचाशरीरिणी ।
सर्वयोषिद्वरा कृष्णा निनीषुः क्षत्रियान्क्षयम् ॥ ४८
सुरकार्यमियं काले करिष्यति सुमध्यमा ॥
अस्याः हेतोः कौरवाणां महदुत्पत्स्यते भयम् ॥ ४९
तच्छ्रुत्वा सर्वपाञ्चालाः प्रणेदुः सिंहसङ्घवत् ।
न चैतान्हर्षसंपूर्णानियं सेहे वसुन्धरा ॥ ५०
तौ दृष्ट्वा पार्षती याजं प्रपेदे वै सुतार्थिनी ।
न वै मदन्यां जननीं जानीयातामिमाविति ॥ ५१

——महाभारत, आदिपर्व अध्याय १६७

"याप्रमाणें बोलून याजकानें तो सस्कृत हविर्भाग अग्नीत हवन करतांच त्या अग्नीतून देवासारखा तेजस्वी, ज्वालेच्या वर्णाचा, अतः-करणांत थरकांप करणारे ज्याचें उग्र रूप आहे असा,डोक्यावर उत्कृष्ट किरीट व अगात उत्तम चिलखत धारण केलेला, एका हातांत खड्ग व दुसऱ्या हातांत बाणासहित धनुष्य धारण करणारा एक कुमार हळु-हळू गर्जना करीत बाहेर पडला. लगेच तो रथावर बसला व जाऊं लागला. त्यावरोवर सर्व पंचाल हर्षातिरेकानें जयघोष करूं लागले. पचालांचें सर्व भय हरण करणारा असा तो यशस्वी राजकुमार होता. त्याच्या जन्माच्यावेळी आकाशवाणीनें असें सागितलें की हा द्रोणाच्या वधासाठीं उत्पन्न झालेला असून राजा द्रुपदाच्या अंतःकरणांतील सर्व दुःख हा हरण करील. त्या कुमाराबरोबरच त्या यज्ञवेदीतून एक कुमारीही उत्पन्न झाली. तिच्या अगप्रत्यगांतून सौदर्याचा मूर्तिमत आविष्कार होत असून ती अत्यंत लावण्यसपन्न होती. निळ्या कमळा-प्रमाणें तिचे नेत्र विशाल असून तिचे काळेभोर केंस, उत्तुंग तावडी नखें, धनुष्याकृति भिवया व उत्कृष्ट हृदय यांमुळें मनुष्यरूपानें ती साक्षात् कोणी देवताच पृथ्वीवर आली आहे असें वाटत होतें. ती वर्णानें श्यामल होती. तिच्या शरीराचा गंध निळ्या कमलाप्रमाणें उत्कृष्ट असून आसमंतांत एक कोसपर्यत तो गंध दरवळत असे. तिच्या रूपलावण्याला पृथ्वीवर तरी उपमा नव्हती. मनुष्यच काय,

पण देव, दानव यक्ष यांचीही दृष्टि तिच्यावर खिळून राहावी असें तिचे सौदर्य अलौकिक होतें. ती निर्माण होतांच आकाशवाणीनें असें सांगितलें की, सर्व क्षत्रियांचा नाश करण्याचे देवकार्य करण्यासाठीं ही सर्वश्रेष्ठ स्त्री उत्पन्न झालेली असून योग्य वेळीं ती तें कार्य पार पाडील. हिच्यामुळे कौरवकुळाला मोठें भय उत्पन्न होईल. हें ऐकतांच सर्व पांचाल सिहाच्या संघाप्रमाणें सिहनाद करूं लागले. त्यांचा आनंद पृथ्वीवर कोठे मावेना. त्यावेळी द्रुपदाच्या पत्नीनें त्या याजकाला हात जोडून असें म्हटलें की, हा कुमार व ही कुमारी जरी अग्नीपासून उत्पन्न झालेली असली तरी त्या गोष्टीची त्यांना स्मृति राहूं नये व त्यांनी मलाच आपली माता समजावें असें वरदान आपण मला द्या. याजकानें राणीची ती इच्छा पूर्ण केली. द्रौपदी ही वर्णानें कृष्ण असल्यामुळें तिचें नांवच कृष्णा ठेवण्यांत आलें.

कृष्णेत्येवाब्रुवन्कृष्णां कृष्णा भूत्सा हि वर्णतः ।
तथा तन्मिथुनं जज्ञे द्रुपदस्य महामखे ॥ ५४

—महाभारत, आदिपर्व अध्याय १६७

द्रौपदीचें गाजलेलें स्वयंवर

द्रौपदीचे वडील राजे द्रुपद यांची खरी इच्छा द्रौपदी अर्जुनाला द्यावी अशी होती.

यज्ञसेनस्य कामस्तु पाण्डवाय किरीटिने ।
कृष्णां दद्यामिति सदा न चैतद्विवृणोति सः ॥ ८
सोऽन्वेषमाणः कौन्तेय पाञ्चाल्यो जनमेजय ।
दृढं धनुरनानम्यं कारयामास भारत ॥ ९
यन्त्रं वैहायसं चापि कारयामास कृत्रिमम् ।
तेन तन्त्रेण समितं राजा लक्ष्यं चकार सः ॥ १०

—महाभारत, आदिपर्व अध्याय १८५

पण आपल्या अंत.करणांतील ही गोष्ट, द्रुपदानें कधीही कोठें उघड केली नाही. अर्जुनानें त्याचा पराभव केलेला असल्यामुळें तारुण्याच्या दारवंठ्यावर नुकत्याच प्रवेश केलेल्या त्या राजकुमाराचा विलक्षण पराक्रम त्याच्या चांगलाच डोळ्यांत भरला होता. पण लाक्षागृहांत पांडव जळल्याचे ऐकून स्वाभाविकपणेंच तो भग्न-

मनस्क झाला. इतर कित्येक विचक्षण पुरुषांप्रमाणेंच पांडवांसारखे प्रतापी पुरुष असे व्यर्थ जळून जावयाचे नाहींत असेंही त्याला वाटत होतें. गुप्तपणे त्यानें पांडवांचा शोधही चालविला होता. शेवटीं वीरोचित व अर्जुनांसारख्या श्रेष्ठ धनुर्धरालाच जो पूर्ण करतां येणें शक्य होईल असा पण द्रौपदीच्या स्वयवरासाठी लावावा असें त्यानें ठरविले. त्यानें विशिष्ट प्रकाराचें दृढ धनुष्य सिद्ध करून त्याच्यावर योजण्यासाठी म्हणून खास बाण निर्मिले, व अखंड फिरणारे एक यंत्र वर लावून त्या फिरणाऱ्या यंत्राच्या आंतील लक्ष्याचा वेध जो या बाणानी करील त्यालाच द्रौपदी द्यावयाची असा आपला निश्चय घोषित केला. त्याची घोषणा अशी होती की,

इदं सज्यं धनुः कृत्वा सज्जैरेभिश्च सायकैः ।
अतीत्य लक्ष्यं यो वेद्धा स लब्धा मत्सुतामिति ॥ ११

——महाभारत, आदिपर्व अध्याय १८५

"जो कोणी माझे हें धनुष्य सज्ज करून माझे हे बाण त्याच्यावर योजून या फिरत्या यत्रातील लक्ष्याचा वेध करील त्यालाच माझी मुलगी मिळेल. धनुर्धारी लोकांमध्यें आपल्या शस्त्रास्त्र-शिक्षणाच्या भरंवशावर फिरत्या यंत्राचा वेध घेऊं शकणारा तरुण धनुर्धारी फक्त अर्जुनच होता. म्हणून त्याने अर्जुनाच्या प्राप्तीसाठी हा असा पण केला. द्रौपदीच्या स्वयंवराप्रीत्यर्थ अनेकविध राजे त्या ठिकाणी आले. महाभारतांतील त्यांची यादी पाहिली तर सर्व भारतीय सत्ताधिप त्या ठिकाणी एकत्रित झालेले होते असें दिसतें. भगवान् श्रीकृष्ण व बलरामही या स्वयंवरास उपस्थित होते. ब्राह्मणवेषानें पांडव या स्वयंवरार्थ उपस्थित झालेले होते. राज-सभेंत अथवा स्वयंवरार्थ उभारलेल्या विस्तीर्ण व शोभिवंत मंडपांत सर्व समाज एकत्रित जमलेला पाहून वाद्यें वाजत असतां देवते-प्रमाणें लावण्यसंपन्न अशा आपल्या भगिनीला घेऊन राजकुमार धृष्टद्युम्न त्या मंडपांत आला. राजकन्या पांचाली उत्कृष्ट रत्नाभर-णांनी सुशोभित झालेली असून तिच्या हातांत रत्नें जडविलेली सुवर्णाची वरमाला होती. धृष्टद्युम्नानें सर्व राजे लोकांसमक्ष द्रौपदीला मंडपांत आणवून उच्च स्वरानें असें घोषित केलें कीं,

इदं धनुर्लक्ष्यमिमे च बाणाः शृण्वन्तु मे भूपतयः समेताः ।
छिद्रेण यन्त्रस्य समर्पयध्वं शरैः शितैर्व्योमचरैर्दशार्धैः ॥ ३५
एतन्महत्कर्म करोति यो वै कुलेन रूपेण बलेन युक्तः ।
तस्याद्य भार्या भगिनी ममेयं कृष्णा भवित्री न मृषा ब्रवीमि ॥ ३६

—महाभारत, आदिपर्व अध्याय २२१

"हें येथें धनुष्य ठेवलेलें असून त्यावर योजावयाचे बाणही येथेंच ठेवलेले आहेत. मी काय बोलतो तें येथे जमलेल्या सर्व राजांनी स्थिर चित्तानें ऐकावें. या धनुष्यावर हे बाण लावून या फिरत्या यंत्राच्या छिद्रामधून लक्ष्यवेध करावयाचा आहे. बाण पांच आहेत व त्यांनीच हें नियुक्त कार्य साधले पाहिजे. हे महान् कृत्य करणारा जो कोणी आमच्या कुळाला योग्य असा कुळवत, रूपवान् व बल-संपन्न असेल त्याचीच भार्या माझी ही भगिनी कृष्णा होईल. अटी नीट पाळावयाच्या आहेत, व मी जे बोलतो त्यातले एक अक्षरही खोटें व्हावयाचे नाही." याप्रमाणे घोषित करून धृष्टद्युम्नानें उपस्थित सर्व राजे लोकाचा द्रौपद्रीला परिचय करून दिला. मोठ-मोठे क्षत्रिय राजे त्या ठिकाणीं लक्ष्यवेधाच्या प्रयत्नास लागले पण सर्व फजित पावले. त्यांत जरासध, शिशुपाल, व मद्रराज शल्य अशी मोठमोठी मंडळी होती. शेवटी कर्ण धनुष्याजवळ आला व पहातां पहातां त्यानें धनुष्य सज्ज करून त्यावर बाण लावून त्या फिरत्या यत्राकडे आपली दृष्टि वळविली. लक्ष्यवेधाचें सामर्थ्य अर्जुनाइतकें कर्णातही निश्चित होतें त्यामुळे त्यानें धनुष्याला हात घालतांच लक्ष्यवेध झालाच असें सर्वच मानू लागले होते. पण द्रौपदीच्या स्वयंवराच्या सर्व अटी स्पष्ट होत्या. त्यांतील कोण-तीही अट द्रुपदानें वा धृष्टद्युम्नानें झांकून ठेवलेली नव्हती. त्या स्वयंवरांत भाग घेणारी व्यक्ति नुसती लक्ष्यवेध करणारी असून चालणार नव्हतें. ती कुलीन असली पाहिजे असा राजा द्रुपदाचा आग्रह होता. व तो त्यांनीं आधीच धृष्टघुम्नाच्या तोंडून सर्वांना स्पष्टपणानें सांगितलेलाही होता. कर्ण हा सूतपुत्र म्हणून विख्यात असल्यामुळें क्षत्रियांच्या समाजांत कुलवंत म्हणून त्याला स्थान

ळणें केवळ अशक्य होतें. त्यामुळें त्यानें धनुष्याला हात घालतांच च्च स्वरानें द्रौपदीनें असें सांगितलें की,

दृष्ट्वा तु तं द्रौपदी वाक्युमुच्चैर्जगाद नाहं वरयामि सूतम् ।
सामर्षहासं प्रसमीक्ष्य सूर्यं तत्याज कर्णः स्फुरितं धनुस्तत् ॥ २३

——महाभारत, आदिपर्व अध्याय १८७

"काय वाटेल तें झालें तरी मी सूताला वरणार नाही" हें ऐकतांच संतापानें कर्णाने आपली आराध्य देवता सूर्यनारायण याच्याकडे एकदां पाहिलें व ते तळपतें धनुष्य हातांतून टाकून दिले. यानतर ब्राह्मणवेषधारी अर्जुनानें ते अप्रतिम लक्ष्य तोडलें व द्रौपदीची वरमाला घेतली. चालून आलेल्या सर्व राजसघाचा भीमसेन व अर्जुन यांनी पराजय केला व द्रौपदी पांडवांची राणी झाली. पाडवांनी पराक्रमानें साम्राज्य मिळविल्यानतर ज्ञात जगाची साम्राज्ञी होण्याचाही बहुमान तिनें उपभोगिला. कुटुब संस्थेचा आधार होण्याइतकी द्रौपदी सर्वसंग्राहक व समर्थ आहे. रुक्मिणीसारखें भाग्य जर तिला लाभतें तर तिने अतिशय उत्कृष्ट असा गृहिणीधर्म आचरून दाखविला असता. तिची इच्छा व प्रवृत्ति तशीच होती.

महासती द्रौपदी

द्रौपदीचें हृदय अत्यंत उदार असून आपल्या सवतीविषयीही तिनें केलेलें वर्णन तिच्या अतःकरणाची थोरवी व्यक्त करण्यास पुरेसें आहे. अर्जुनानें सुभद्राहरण केल्यानंतर पहिल्या प्रथम सुभद्रेने ज्या वेळी पांडवांच्या अंत.पुरांत प्रवेश केला त्यावेळी द्रौपदीच्या भेटीस्तव तिला कसें पाठवावें, या विचारानें महारथी पार्थ चांगलाच गोंधळला होता. त्यानें गोपीचा वेष देऊन सुभद्रेला अंतःपुरांत पाठविलें. कुंतीला वंदन करून किंचित् भीतभीतच सुभद्रा द्रौपदीकडे आली. द्रौपदीनें तिचें कोणत्या प्रकारें स्वागत केले असेल ? महाभारतकार म्हणतात :—

ववन्दे द्रौपदीं भद्रा प्रेष्याहमिति चाब्रवीत् ।
प्रत्युत्थाय तदा कृष्णा स्वसारं माधवस्य च ॥ २३

परिष्वज्यावदत्प्रीत्या निःसपत्नोऽस्तु ते पतिः ।
तथैव मुदिता भद्रा तामुवाचैवमस्त्विति ॥ २४
—महाभारत, आदिपर्व अध्याय २२१

"सुभद्रेनें येऊन द्रौपदीला वंदन केलें व विनयानें असें सांगितलें कीं, माझे नांव भद्रा असून मी आपली दासी आहे. भगवान श्रीकृष्णांच्या भगिनीचे ते विनयनम्र उद्‌गार ऐकतांच द्रौपदीनें अत्यत प्रेमानें तिला आलिगन देऊन असें म्हटलें की, तुझ्या पतीला जगांत कोणीहि शत्रू न उरोत. त्याबरोबर सुभद्रा अत्यत आनंदित झाली व असेंच होवो इतकेच म्हणाली."

द्रौपदीसारख्या महासतीची तिच्या व्यक्तिजीवनांत घरगुती वागणूक कशी असेल? व गृहजीवनाच्या संबंधी तिचे विचार काय असू शकतील? अशी उत्कंठा स्वाभाविकपणेंच कोणाच्याही अतःकरणांत नांदते. महाभारतांत एका ठिकाणी द्रौपदीनेंच स्वतः या प्रकरणांत आपले विचार व्यक्त केलेले आहेत. पाडव वनवासांत असतां एकदां भगवान् श्रीकृष्ण व सत्यभामा त्यांच्याकडे भेटावयास येतात. त्यावेळीं एकांतांत सत्यभामेनें द्रौपदीला असें विचारलें की हे द्रौपदी, लोकपालासारख्या अत्यत पराक्रमी व परस्परांवर अत्यंत प्रेम करणाऱ्या अशा पांडवांना तू कोणत्या आचरणानें आपल्या स्वाधीन करून घेतलें आहेस तें मला सांग. पांडव तुझ्या स्वाधीन दिसतात. ते तुझ्यावर कधीही क्रुद्ध होत नाहींत व प्रत्येक महत्त्वाच्या गोष्टीत तुझ्याकडून महत्त्वाचें मार्गदर्शन होईल अशा अपेक्षेनें ते तुझ्याकडे पाहतात. इतके त्यांच्यावर तू स्वतःचें वर्चस्व कसे गाजवितेस? कोणतें व्रत, तपश्चर्या, स्नान, मंत्र, औषध, विद्या, वीर्य, अंजन, जप, होम इत्यादि तू केलेंस की, ज्यामुळे भाग्यदेवता तुझ्यावर अतोनात प्रसन्न होऊन तूं आपल्या पतीवर निर्विवाद विजय संपादन केलास तें मलाही सांग. म्हणजे मी त्याचा प्रयोग श्रीकृष्णावर करून त्यांना सदाचें आपल्या स्वाधीन करून घेईन." याप्रमाणें सत्यभामेनें विचारतांच पतिव्रतांत अत्यत श्रेष्ठ असलेल्या द्रौपदीनें तिला जें उत्तर दिलें त्यांतून तिचा स्वतःचा वर्तनक्रम व गृहिणीपदासंबंधींचे तिचे सर्व विचार उत्कृष्ट रीतीनें व्यक्त झालेले आहेत.

द्रौपदीचें उत्तर मोठें असलें तरी तिच्या जीवनांतील एका अत्यंत महत्त्वाच्या बाबीवर त्यांतून उत्कृष्ट प्रकाश पडत असल्यामुळें मी तें येथें समग्र उद्धृत करतों. द्रौपदी म्हणाली :—

असत्स्त्रीणां समाचारं सत्ये मामनुपृच्छसि ।
असदाचरिते मार्गे कथं स्यादनुकीर्तनम् ॥ १०
अनुप्रश्नः संशयो वा नैतत्त्वय्युपपद्यते ।
तथा ह्युपेता बुद्धचा त्वं कृष्णस्य महिषी प्रिया ॥ ११
यदैव भर्ता जानीयान्मन्त्रमूलपरां स्त्रियम् ।
उद्विजेत तदैवास्याः सर्पाद्वेश्मगतादिव ॥ १२
उद्विग्नस्य कुतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ।
न जातु वशगो भर्ता स्त्रियाः स्यान्मन्त्रकर्मणा ॥ १३
अमित्रप्रहितांश्चापि गदान् परमदारुणान्
मूलप्रचारैर्हि विषं प्रयच्छन्ति जिघांसवः ॥ १४
जिह्वया यानि पुरुषस्त्वचा वाऽप्युपसेवते ।
तत्र चूर्णानि दत्तानि हन्युः क्षिप्रमसंशयम् ॥ १५
जलोदरसमायुक्ताः श्वित्रिणः पलितास्तथा ।
अपुमांसः कृताः स्त्रीभिर्जडान्धबधिरास्तथा ॥ १६
पापानुगास्तु पापास्ताः पतीनुपसृजन्त्युत ।
न जातु विप्रियं भर्तुः स्त्रिया कार्यं कथंचन ॥ १७
वर्ताम्यहं तु यां वृत्तिं पाण्डवेषु महात्मसु ।
तां सर्वां शृणु मे सत्यां सत्यभामे यशस्विनि ॥ १८
अहंकारं विहायाहं कामक्रोधौ च सर्वदा ।
सदारान् पाण्डवान् नित्यं प्रयतोपचराम्यहम् ॥ १९
प्रणयं प्रतिसंहृत्य निधायात्मानमात्मनि ।
शुश्रूषुर्निरभीमाना पतीनां चित्तरक्षिणी ॥ २०
दुर्व्याहृताच्छङ्कमाना दुःस्थिताद्दुरवेक्षितात् ।
दुरासिताद् दुर्व्रजितादिङ्गिताध्यासितादपि ॥ २१
सूर्यवैश्वानरसमान् सोमकल्पान् महारथान् ।
सेवे चक्षुर्हणः पार्थानुग्रवीर्यप्रतापिनः ॥ २२
देवो मनुष्यो गन्धर्वो युवा चापि स्वलङ्कृतः ।
द्रव्यवानभिरूपो वा न मेऽन्यः पुरुषो मतः ॥ २३

नाभुक्तवति नास्नाते नासंविष्टे च भर्तरि ।
न संविशामि नाश्नामि सदा कर्मकरेष्वपि ॥ २४
क्षेत्राद्वनाद्वा ग्रामाद्वा भर्तारं गृहमागतम् ।
अभ्युत्थायाभिनन्दामि आसनेनोदकेन च ॥ २५
प्रमृष्टभाण्डा मृष्टान्ना काले भोजनदायिनी ।
संयता गुप्तधान्या च सुसंमृष्टनिवेशना ॥ २६
अतिरस्कृतसम्भाषा दुःस्त्रियो नानुसेवती ।
अनुकूलवती नित्यं भवाम्यनलसा सदा ॥ २७
अनर्म चापि हसितं द्वारि स्थानमभीक्ष्णशः ।
अवस्करे चिरस्थानं निष्कुटेषु च वर्जये ॥ २८
अतिहासातिरोषौच क्रोधस्थानं च वर्जये ।
निरताऽहं सदा सत्ये भर्तृणामुपसेवने ॥ २९
सर्वथा भर्तृरहितं न ममेष्टं कथञ्चन ।
यदा प्रवसते भर्ता कुटुम्बार्थेन केनचित् ॥ ३०
सुमनोवर्णकापेता भवामि व्रतचारिणी ।
यच्च भर्ता न पिबति यच्च भर्ता न सेवते ॥ ३१
यच्च नाश्नाति मे भर्ता सर्वं तद्वर्जयाम्यहम् ।
यथोपदेशं नियता वर्तमाना वराऽगने । ३२
स्वलङ्कृता सुप्रियता भर्तुः प्रियहिते रता ।
ये च धर्मा कुटुम्बेषु श्वश्र्वा मे कथिताः पुरा ॥ ३३
भिक्षा बलिश्राद्धमिति स्थालीपाकश्च पर्वसु ।
मान्यानां मानसत्कारा ये चान्ये विदिता मम ॥ ३४
तान्सर्वाननुवर्तामि दिवारात्रमतन्द्रिता ।
विनयान्नियमांश्चैव सदा सर्वात्मना श्रिता ॥ ३५
मृदून् सतः सत्यशीलान् सत्यधर्मानुपालिनः ।
आशीविषानिव क्रुद्धान् पतीन् परिचराम्यहम् ॥ ३६
पत्याश्रयो हि मे धर्मो मतः स्त्रीणां सनातनः ।
स देवः सा गतिर्नान्या तस्य का विप्रियं चरेत् ॥ ३७
अहं पतीन्नातिशये नात्यश्ने नातिभूषये ।
नापि परिवदे श्वश्रूं सर्वदा परियन्त्रिता ॥ ३८
अवधानेन सुभगे नित्योत्थिततयैव च ।
भर्तारो वशगा मह्यं गुरुशुश्रूषयैव च ॥ ३९
नित्यमार्यामहं कुन्तीं वीरसूं सत्यवादिनीम् ।
स्वयं परिचराम्येतां पानाच्छादनभोजनैः ॥ ४०

नैतामतिशये जातु वस्त्रभूषणभोजनैः ।
नापि परिवदे चाहं तां पृथां पृथिवीसमाम् ॥ ४१
अष्टावग्रे ब्राह्मणानां सहस्राणि स्म नित्यदा ।
भुञ्जते रुक्मपात्रीषु युधिष्ठिरनिवेशने ॥ ४२
अष्टाशीतिसहस्राणि स्नातका गृहमेधिनः ।
त्रिंशद्दासीक एकैको यान् बिभर्ति युधिष्ठिरः ॥ ४३
दशान्यानि सहस्राणि येषामन्नं सुसंस्कृतम् ।
ह्रियते रुक्मपात्रीभिर्यतीनामूर्ध्वरेतसाम् ॥ ४४
तान् सर्वानग्रहारेण ब्राह्मणान् वेदवादिनः ।
यथार्हं पूजयामि स्म पानाच्छादनभोजनैः ॥ ४५
शतं दासीसहस्राणि कौन्तेयस्य महात्मनः ।
कम्बूकेयूरधारिण्यो निष्ककण्ठ्यः स्वलंकृताः ॥ ४६
महार्हमाल्याभरणाः सुवर्णाश्चन्दनोक्षिताः ॥
मणीन् हेम च बिभ्रत्यो नृत्यगीतविशारदाः ॥ ४७
तासां नाम च रूपं च भोजनाच्छादनानि च ।
सर्वासामेव वेदाहं कर्म चैव कृताकृतम् ॥ ४८
शतं दासीसहस्राणि कुन्तीपुत्रस्य धीमतः ।
पात्रीहस्ता दिवारात्रमतिथीन् भोजयन्त्युत ॥ ४९
शतमश्वसहस्राणि दशनागायुतानि च ।
युधिष्ठिरस्यानुयात्रमिन्द्रप्रस्थनिवासिनः ॥ ५०
एतदासीत्तदा राज्ञो यन्मही पर्यपालयत् ।
येषां सङ्ख्यार्विधिं चैव प्रदिशामि शृणोमि च ॥ ५१
अन्तःपुराणां सर्वेषां भृत्यानां चैव सर्वशः ।
आगोपालाविपालेभ्यः सर्वं वेद कृताकृतम् ॥ ५२
सर्वं राज्ञः समुदयमायं च व्ययमेव च ।
एकाहं वेक्ष्मि कल्याणि पाण्डवानां यशस्विनि ॥ ५३
मयि सर्वं समासज्य कुटुम्बं भरतर्षभाः ।
उपासनरताः सर्वे घटयन्ति वरानने ॥ ५४
तमहं भारमासक्तमनाधृष्यं दुरात्मभिः ।
सुखं सर्वं परित्यज्य रात्र्यहानि घटामि वै ॥ ५५

अधृष्यं वरुणस्येव निधिपूर्णमिवोदधिम् ।
एकाऽहं वेद्मि कोशं वै पतीनां धर्मचारिणाम् ॥ ५६
अनिशायां निशायां च सहाया क्षुत्पिपासयोः ।
आराधयन्त्याः कौरव्यांस्तुल्या रात्रिरहश्च मे ॥ ५७
प्रथमं प्रतिबुध्यामि चरमं संविशामि च ।
नित्यकालमहं सत्ये एतत्संवननं मम ॥ ५८
एतज्जानाम्यहं कर्तुं भर्तृसंवननं महत् ।
असत्स्त्रीणां समाचारं नाहं कुर्यां न कामये ॥ ५९

वैशंपायन उवाच ।

तच्छ्रुत्वा धर्मसहितं व्याहृतं कृष्णया तदा ।
उवाच सत्या सत्कृत्य पाञ्चालीं धर्मचारिणीम् ॥ ६०
अभिपन्नाऽस्मि पाञ्चालि याज्ञसेनि क्षमस्व मे ।
कामकारः सखीनां हि सोपहासं प्रभाषितम् ॥ ६१

—महाभारत, वनपर्व अध्याय २३३

द्रौपदी उवाच ।

इदं तु ते मार्गमपेतमोहं वक्ष्यामि चित्तग्रहणाय भर्तुः ।
अस्मिन् यथावत् सखि वर्तमाना भर्तारमाच्छेत्स्यसि कामिनीभ्यः ॥ १
नैतादृशं दैवतमस्ति सत्ये सर्वेषु लोकेषु सदेवकेषु ।
यथा पतिस्तस्य तु सर्वकामा लब्धाः प्रसादात्कुपितश्च हन्यात् ॥ २
तस्मादपत्यं विविधाश्च भोगाः शय्यासनान्युत्तमदर्शनानि ।
वस्त्राणि माल्यानि तथैव गन्धाः स्वर्गश्च लोको विपुला च कीर्तिः ॥३
सुखं सुखेनेह न जातु लभ्यं दुःखेन साध्वी लभते सुखानि ।
सा कृष्णमाराधय सौहृदेन प्रेम्णा च नित्यं प्रतिकर्मणा च ॥ ४
तथासनैश्चारुभिरग्रमाल्यैर्दाक्षिण्ययोगैर्विविधैश्च गन्धैः ।
अस्याः प्रियोऽस्मीति यथा विदित्वा त्वामेव संश्लिष्यति तद्विधत्स्व ॥ ५
श्रुत्वा स्वरं द्वारगतस्य भर्तुः प्रत्युत्थिता तिष्ठ गृहस्य मध्ये ।
दृष्ट्वा प्रविष्टं त्वरिताऽऽसनेन पाद्येन चैनं प्रतिपूजयस्व ॥ ६
संप्रेषितायामथ चैव दास्यामुत्थाय सर्वं स्वयमेव कार्यम् ।
जानातु कृष्णस्तव भावमेतं सर्वात्मना मां भजतीति सत्ये ॥ ७

त्वत्सन्निधौ यत्कथयेत्पतिस्ते यद्यप्यगुह्यं परिरक्षितव्यम् ।
काचित्सपत्नी तव वासुदेवं प्रत्यादिशेत्तेन भवेद्विरागः ॥ ८
प्रियांश्च रक्तांश्च हितांश्च भर्तुस्तान् भोजयेथा विविधैरुपायैः ।
द्वेष्यैरुपेक्ष्यैरहितैश्च तस्य भिद्यस्व नित्यं कुहकोद्यतैश्च ॥ ९
मदं प्रमादं पुरुषेषु हित्वा संयच्छ भावं प्रतिगृह्य मौनम् ।
प्रद्युम्नसाम्बावपि ते कुमारौ नोपासितव्यौ रहिते कदाचित् ॥ १०
महाकुलीनाभिरपापिकाभिः स्त्रीभिः सखीभिस्तव सख्यमस्तु ।
चण्डाश्च शौण्डाश्च महाशनाश्च चौराश्च दुष्टाश्चपलाश्च वर्ज्याः॥११
एतद्यशस्यं भगदैवतं च स्वार्थं तथा शत्रुनिबर्हणं च ।
महार्हमाल्याभरणाङ्गरागा भर्तारमाराधय पुण्यगन्धा ॥ १२

—महाभारत, वनपर्व अध्याय २३४

" हे सत्यभामे, दुर्वृत्त व भ्रष्ट स्त्रियांचा मार्ग तू मला विचारलास. या मार्गाच्या बाबतीत मी तुला काय सांगू शकणार ? भगवान् श्रीकृष्णाची प्रिय महाराणी होण्याचें भाग्य ज्या भाग्यशाली स्त्रीला लाभलें त्या तुझ्यासारख्या स्त्रीच्या तोंडी हा अशा रीतीचा प्रश्न व या प्रकारचे सशय मुळीच शोभत नाहीत. आपली स्त्री मंत्र व औषधीच्या नादी लागून आपल्याला स्वतःच्या अधीन ठेवूं पहाते असें जर कोणत्याही पतीला कळून आलें तर तिचें दर्शनही त्याला त्रासदायक वाटल्यावाचून राहणार नाहीं. जिवंत सर्प घरांत फिरतो आहे, या जाणिवेने मनुष्य जसा उद्विग्न होतो तसाच अशी पत्नी लाभलेला मनुष्य सदैव उद्विग्न अवस्थेंत राहील. जो एकदां उद्विग्न झाला त्याला शांति कोठली ? व ज्याला शांति नाहीं त्याला सुख तरी कोठलें ? एकाद्या मंत्रानें स्त्रीला आपला पति वश करून घेतां येतो ही कल्पनाच मुळांत अत्यत खोटी आहे. औषधींचा प्रयोग नवऱ्याच्या जिवावर आल्याखेरीज राहणार नाहीं. या मूर्खपणाच्या प्रयोगाच्या नादीं लागलेली स्त्री आपल्या पतीच्या शत्रूकडून शेवटीं आपल्या पतीचा मृत्यु ओढवावयास कारणीभूत होते. मूर्ख स्त्रियांनीं या मार्गाला लागून व पतीच्या अन्नपानांतून भलभलत्या गोष्टीचे त्याच्यावर प्रयोग करून जलोदर, कुक्षिव्याधी, श्वेतकुष्ठ जडत्व, अधत्व, बधिरपणा व नपुंसकत्व यांसारखे भीषण रोग मात्र आपल्या

पतीना चिकटविलेले आहेत. हे प्रयोग करीत बसणाऱ्या स्त्रिया स्वतः पापी होऊन पापबुद्धीच्या लोकांच्या हातांतलें खेळणें बनतात व आपल्या पतीना व्यर्थ पीडा द्यावयास मात्र कारणीभूत होतात. पतीला स्वाधीन करून घ्यावयाचा खरा मार्ग आपल्या पतीला आवडणार नाही असें आचरण पत्नीनें कधीही न करणें हाच आहे. हे यशस्विनी सत्यभामे, महानुभाव पांडवांशी मी ज्या पद्धतीनें वागतें त्याच्यांतच माझ्या पतीच्या माझ्यावरील प्रेमाचें रहस्य सांठविलेलें आहे. कोणत्या पद्धतीने मी त्यांच्याशी वागतें तें तू ऐक.

अहंकार पूर्णपणें जिकून व कामक्रोधावर विजय संपादन करून पांडव व माझ्या सपत्नी असलेल्या त्यांच्या इतर स्त्रिया यांची मी दक्षपणें शुश्रूषा करतें. मत्सर व ईर्ष्या यांचा पूर्णपणें परित्याग करून आपलें चित्त पूर्णपणे आवरून यत्किंचितही अभिमान अतःकरणांत धारण न करतां क्षणोक्षणी माझ्या पतीचें अंतःकरण संभाळीत मी त्यांची शुश्रूषा करतें. तोंडांतून एकही उणा शब्द बाहेर पडू नये, बसण्यांत वा उभे रहाण्यात कधीही अविनयाची शंका देखील येऊं नये, पहाण्यात देखील औद्धत्याचें कधी प्रदर्शन होऊं नये, बसणें, जाणें, हावभाव वा अंतःकरणाचे निश्चय यापैकी कोणत्याही बाबतीत यत्किंचित् देखील त्यांच्या मनाला लागण्यासारखे कांहीही घडू नये यासाठी मी सदैव जपत असतें. माझे पति पार्थ सूर्य व अग्नीप्रमाणें तेजस्वी, सहवासांतील लोकांना आनंद देणारे, चंद्राप्रमाणें शीतल, महारथी असून त्यांचें सामर्थ्य व त्यांचा प्रताप अत्यंत उग्र आहे. दृष्टीनेंच ते दुसऱ्याचें तेज सहज हरण करून घेतात. अशा लोकोत्तर पुरुषांची मला सेवा करावयाची आहे. ही जाणीव दृढपणानें सदैव अंतःकरणांत बाळगून मी त्यांची सेवा करीत असतें. देव, मनुष्य, गंधर्व, अलकार धारण केलेला रूपयौवनसंपन्न मनुष्य, द्रव्यवान् सौदर्यसपन्न पुरुष यापैकी कोणीही माझ्या अंतःकरणांत कधी येऊच शकत नाही. माझ्या पतीचें भोजन झाल्याखेरीज, त्यांचें प्रसाधन व स्नान होऊन त्यांनी विश्रांति घेतल्याविना मी कधीही भोजन व विश्रांतीची अपेक्षाही करीत नाही. अनेक नोकरचाकर सर्व कामें करावयास आमच्या राजमंदिरांत

असले तरी मी स्वतः जातीनेंच या गोष्टीकडे लक्ष देत आलें आहे. माझे पति कोठूनही आले तरी दासदासीऐवजी स्वतःच उठून त्यांना आसन व उदक देऊन मी त्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करतें. सर्व घर व उपकरणें सदैव स्वच्छ राहतील अशी काळजी घेऊन वेळेवर उत्कृष्ट अन्नाचें भोजन त्यांना मिळालेलें आहे की नाही याची मी स्वतः काळजी घेतें. धनधान्यादि गोष्टीचें रक्षण सुव्यवस्थितपणें चाललें आहे की नाही व घराला समृद्धि आणणाऱ्या वस्तू सुरक्षित आहेत कीं नाहींत याची मी स्वतः काळजी घेतें. माझ्या बोलण्यांतून अल्पस्वल्प देखील तिरस्कार अथवा अत्यत सूक्ष्मदेखील अवहेलना कधी व्यक्त होऊ शकत नाही. अवहेलना व्यक्त करणाऱ्या व सेवा न करणाऱ्या दुष्ट स्त्रियेविषयीं पति नेहमींच उदासीन राहतो. आळस सपूर्णपणे झाडून टाकून मी सदैव पांडवांना अनुकूल असेंच आचरण ठेवतें. थट्टेचा व विनोदाचा प्रसंग नसतां उगाच हंसत बसणें, वारवार दारांत येऊन अखंड उभे राहणें व घरांतील उद्यानांतून सदा रेंगाळत असणें या गोष्टींचा मी मनांतूनच तिरस्कार करतें व त्या स्वतःच्या आचरणांत कधीही येणार नाहींत याविषयीं मी अत्यंत दक्ष राहतें. खूप हंसणें, खूप रागावणें हें मी चुकूनही कधी करीत नाही. कोणालाही क्रोध उत्पन्न होईल अशा गोष्टीचा मी नेहमीच परित्याग करतें. आपल्या पतीच्या सेवेंत मी सदैव गढलेली असतें. पतीवांचून कोणत्याही गोष्टींचा उपभोग मला मुळीच इष्ट वाटत नाहीं. माझे पति ज्या वेळीं माझ्याजवळ नसतात त्या वेळीं अलकारांचा व पुष्पांचा साजशृंगार मुळीच न करतां मी सदैव व्रतस्थ राहतें. माझे पति खानपानांत जी गोष्ट आणूं इच्छीत नाहींत व ज्या गोष्टीचा उपभोग ते घेत नाहींत त्या सर्व गोष्टी मी पूर्णपणें वर्ज्य केलेल्या आहेत. सती स्त्रियांच्या आचरणाचा शास्त्रांत जो उपदेश केलेला आहे तदनुसारच माझें नेहमीं वर्तन असतें. पतीच्या सहवासांत सर्व प्रकारचा साजशृंगार करून मी दक्षपणें त्यांना आवडणारें व त्यांच्या हिताचें असेंच वर्तन करतें. माझ्या सासूनें स्त्रियाचें कौटुंबिक म्हणून भिक्षा, बलिश्राद्ध, पर्वकाळी स्थालीपाक, मान्य लोकांचा मानसत्कार

इत्यादि धर्म मला शिकविले आहेत. स्वतः मला कित्येक व्रतनियमांचें ज्ञान आहे. त्यांच्या परिपालनाविषयीं सदैव जागरूक राहून मुळीच आळस न करतां लक्षपूर्वक व मोठ्या विनयपूर्वक मी या व्रतनियमांचें आचरण करीत असतें. मृदु, सज्जन, सत्यधर्माचें परिपालन करणारे व सत्यशील पण क्रुद्ध झाले म्हणजे सर्पाप्रमाणें अत्यंत भयंकर असणारे असे माझे पति आहेत. त्यांची मी अखंड परिचर्या करतें. स्त्रीचा शाश्वत धर्म पतीवरच अवलंबून आहे. तोच स्त्रीचा देव व एकमात्र आधार होय. कोणती शहाणी स्त्री त्याला अप्रिय होईल असें आचरण करील ? मी नेहमीं पतीपेक्षां अधिक झोपणें, अधिक खाणें वा आपलाच अधिक थाटमाट करणें या गोष्टी कधीं न करण्याची दक्षता घेतें. नेहमी माझ्या सासूच्या नियंत्रणांत राहून तिची कधीही निंदा करीत नाहीं. नेहमी दक्ष राहण्यामुळें, नेहमीं काम करण्याविषयीं तत्पर राहण्यामुळें व गुरुजनांच्या मी करीत असलेल्या शुश्रूषेमुळें पति माझ्या स्वाधीन असतात. वीरमाता, सत्यवादिनी आर्या कुंतीची मी नेहमी सेवा करीत राहून स्वतः जातीनें तिच्या खाण्यापिण्याकडे लक्ष देतें. वस्त्र, भूषण व भोजन या बाबतीत कुंतीपेक्षां माझा मान अधिक आहे असें मी समजत नाहीं व पृथ्वीप्रमाणें उदार अंतःकरणाच्या कुंतीविषयीं कधींही वाईट बोलत नाहीं. आमच्या राज्यकाळांत युधिष्ठिराच्या राजमंडळांत सोन्याच्या ताटांत आठ सहस्र ब्राह्मण रोज भोजन करीत. ऐशी सहस्र स्नातक युधिष्ठिराचे आश्रित होते व त्या प्रत्येकाला तीस तीस दासी व्यवस्थेला दिलेल्या होत्या. दहा सहस्र ब्रह्मचारी व यति लोकांना सोन्याच्या ताटांतून भोजन वाढलें जाई. मी या सर्व वेदवेत्त्या ब्राह्मणांच्या पान, आच्छादन व भोजनाकडे लक्ष देऊन अग्रहारांनी त्यांची व्यवस्थित पूजा करीत असे. उत्तम अलंकार घातलेल्या युधिष्ठिरांच्या एक लक्ष दासी असत. त्या सर्व नृत्यगीतविशारद व अंगावर उत्कृष्ट अलंकार घालीत. त्यांची नांवें, रूपें, त्यांच्या आवडीचे खाण्याचे पदार्थ व वस्त्रें–प्रावरणें, त्यांचे स्वभाव व कामें या सर्वांची मला खडान्‌खडा माहिती असे. नित्य अतिथींना भोजन घालणाऱ्या युधिष्ठिरांच्या येथील सहस्रावधि

दासींची मला पूर्णपणें ओळख असे. इंद्रप्रस्थांत युधिष्ठिर राज्य करीत असतां ते बाहेर निघाले म्हणजे त्यांच्या पाठोपाठ दहा सहस्र हत्ती, व एक लक्ष घोडेस्वार जात. त्या सर्वांची संख्या, अंत:पुरांतील सर्व नोकरवर्गाची माहिती व गुराख्यापर्यंत सर्व लोकांच्या कृत्याकृत्याची माहिती मला खडान्‌खडा असे. पांडवांच्या आयव्ययाची मला पूर्णपणें माहिती होती. माझ्यावर कुटुबाचा व राज्यांतील अंत:पुराचा सर्व भार टाकून देऊन पांडव आपआपल्या कामांत गढून राहात. ,तो मन ताब्यांत नसलेल्या लोकांनीं सहन करण्यास अत्यत कठिण असा भार सर्व सुखाचा परित्याग करून व अहोरात्र खपून मी सहन केला आहे. वरुणाच्या रत्नसागराप्रमाणें कुणालाही धर्षण करण्यास अत्यंत कठिण अशा माझ्या धर्मनिष्ठ पतीचा धनकोश मला पूर्णपणे माहीत आहे. दिवसा व रात्रीं सतत पांडवांचें मन संभाळीत असतां मला रात्र व दिवस सारखेच झाले आहेत. मी पतीच्या आधीं उठते व नंतर झोंपते. मी तुला सांगितलें या प्रकारानें वागत आलें हाच माझ्या पतीना वश करून घेण्याचा माझा उपाय होय. दुष्ट स्त्रियांच्या आचाराकडे मी कधीं वळलें नाहीं व वळणार नाही.' याप्रमाणें द्रौपदीनें सत्यभामेला उत्तर दिल्यावर ती ओशाळली व द्रौपदीला म्हणू लागली की, हे पांचाली, मी सखीच्या नात्यानें सहज थट्टा म्हणून हें तुझ्याशीं बोललें. तू मला क्षमा कर. त्यावर द्रौपदी तिला म्हणाली की, आपल्या डोळ्यावरील खुळेपणाचें मोहपटल पूर्णपणें बाजूला सारून मी सांगतें त्या पद्धतीनें पतीचें मन आपल्या स्वाधीन करून घेण्यासाठीं तू वाग. तूं जर याप्रमाणें वागशील तर इतर सर्व स्त्रियांपेक्षां भगवान् तुझ्यावरच खरें प्रेम करतील. पतीसारखें सर्व जगांत दैवत नाहीं. त्याच्या प्रसन्नतेंत सर्व इच्छा पूर्ण होतात. व अप्रसन्नतेंत सर्व इच्छांचा विघात होतो. त्याच्यापासून अपत्यलाभ, विविध प्रकारच्या उपभोगांचा लाभ, शय्या, आसन, लावण्यमय पदार्थ, वस्त्र, माल्य, विविध सुगंधी द्रव्यें, इहलोकीं मोठी कीर्ति व परलोकीं स्वर्गाची प्राप्ति असा सर्व प्रकारचा लाभ आपोआप होतो. हे सत्यभामे,

सुखाच्या मार्गानें शाश्वत सुख कधी मिळत नाही. कष्ट करावे तेव्हांच खऱ्या सुखाची प्राप्ति होत असते. तू सौहार्दानें, प्रेमानें, व नित्य सर्व प्रकारची सेवा करून भगवान् श्रीकृष्णाची आराधना कर. उत्तम आसने, उत्कृष्ट माल्य, विविध सुगधी द्रव्यें त्यांना अर्पण करून त्या सर्वातून आपल्या अत.करणाचा प्रेमळपणा अशा पद्धतीनें व्यक्त कर की ज्यामुळे तुझे श्रीकृष्णांवर सर्वात अधिक प्रेम आहे हें पटून भगवान् श्रीकृष्ण तुझ्याचवर सर्वात अधिक प्रेम करतील. दारात कृष्णाचा शब्द ऐकला की अत.पुरांत तू उठून उभी राहा. दारांतून ते प्रवेश करूं लागले की आसन व पाद्याने तू त्यांचें स्वागत कर. दासी असो वा नसो, स्वत च उठून श्रीकृष्णाची सर्व कामें तू स्वत: कर. सर्व प्रकारे तू श्रीकृष्णांची सेवा करतेस हें त्यांना पटले पाहिजे. जे जे श्रीकृष्ण तुझ्याजवळ बोलतील तें जरी त्यांनीं गुप्त ठेवावयास सागितले नाही, तरीदेखील केवळ आपल्याच अंत.करणांत साठवून ठेव. जर तू असे एकांतांतले अभिप्राय कोठें बोललीस व ते तुझ्या सवतीनी ऐकले व त्यानी ते श्रीकृष्णाना सांगितले तर तुला वेधळी समजून कृष्ण तुझ्यासबधी उदासीन झाल्यावांचून राहणार नाहीत. कृष्णाचे जे आवडते, त्याच्यावर प्रेम करणारे, व त्याचे हित व्हावे म्हणून जपणारे असे लोक असतील त्यांना विविध उपायांनी भोजन घाल व त्यांची व्यवस्था ठेव. जे कृष्णाचे द्वेष्य, उपेक्ष्य, व त्यांना अहितकारक असे लोक असतील त्यांच्यापासून चार पावले दूर रहा. पूर्णपणें मौन स्वीकारून व आपल्या अत:करणांतील भाव गुप्त ठेवून प्रमाद व दर्प कोणत्याही पुरुषांसमोर कधीही प्रकट करू नकोस. प्रद्युम्न व सांब ही तुझी मुलें असली तरी एकांतात त्यांच्याशी देखील सबध ठेवू नको. अत्यत कुलीन व घरदाज, पापाचा कधीही विचार देखील अंत:करणांत न येणाऱ्या अशा महापतिव्रता स्त्रियांशींच तुझें सख्य असावें. क्रोधी, गर्विष्ठ, खादाड, चोर, दुष्ट व स्वैरिणी स्त्रियांशी तू मुळीच संबध ठेवू नकोस. भाग्यदेवतेला प्रसन्न करून घेण्याचें, जीवनात पूर्ण यशस्वी होण्याचें, व शत्रु परास्त करण्याचें हेच खरें साधन होय. उत्कृष्ट वस्त्रालंकारांनी आपला साजशृंगार करून व सुवासिक अंगराग

लावून आपल्या भर्त्याची सतत आराधना कर. तुझ्या कल्याणाचा हाच मार्ग आहे."

द्रौपदीचा हा उपदेश किती सुदर आहे! महासती द्रौपदी पांडवांच्या जीवनातील सर्व छायाप्रकाशांत त्यांच्याबरोबर राहिली. ते अरण्यांत गेले त्यावेळी ती ज्याप्रमाणें त्यांच्या बरोबर गेली त्याच प्रमाणें पुढें महाप्रस्थानिक पर्वात पांडव इह लोकाचा निरोप घेऊन स्वर्गास जावयास निघाले असतांही द्रौपदी त्याच्याबरोबर गेली आहे.

वज्राघातांची परंपरा

पांडवांच्या जीवनात द्रौपदी आल्यानंतर मनांत कोणत्या कल्पना बाळगून तिनें आपले सासारिक जीवन उभारलें होतें व त्यासाठी तिनें किती उत्कृष्ट प्रकारचा वर्तनक्रम ठेविला होता हें स्पष्ट करण्यासाठीच सत्यभामेचा व तिचा सवाद मी वर उद्धृत केला आहे. दुर्दैवानें अथवा तिच्या पतीच्या धर्मकार्पण्यामुळें त्या मानिनी स्त्रीला सर्व दृष्टीनी तिची योग्यता थोर असूनही तिची सारी स्वप्नें भंगलेलीं पाहावी लागून घोर विटंबना सहन करावी लागली. द्यूतांत एकाद्या निर्जीव वस्तूप्रमाणे युधिष्ठिरानें तिला पणाला लावले व शकुनीनें तिला जिकल्यावर उन्मत्त दुर्योधनानें प्रातिकामी नांवाच्या सूताकडून भरसभेत तिला येण्याविषयी बोलाविणें पाठविलें. ज्या वेळी प्रातिकामी अंतःपुरांत येऊन द्रौपदीला म्हणू लागला की, "द्यूतमदानें मत्त झालेल्या युधिष्ठिरानें आपल्यालाच पणाला लावले असून दुर्योधनाने आपल्याला जिकले आहे व कामें करण्यासाठी मी आपल्याला घेऊन जावयास आलों आहे" त्या वेळीं त्या मानिनी स्त्रीला तें खरें देखील वाटेना. धर्मात्मे द्यूताच्या कैफाने स्वतःच्या महासाध्वी स्त्रियांना देखील पणाला लावण्याइतके उन्मत्त होतात व केवळ फाशांच्या खळखळण्याने एका महान् साम्राज्याची साम्राज्ञी एका क्षणाच्या आंत दुष्टांची दासी होऊं शकते या गोष्टीवर तिचा विश्वास बसावा तरी कसा? ती प्रातिकामीला म्हणू लागली:—

कथं त्वेवं वदसि प्रातिकामिन्को हि दीव्येद्भार्यया राजपुत्रः ।
मूढो राजा द्यूतमदेन मत्तो ह्यभूत्रान्यत्कैतवमस्य किंचित् ॥ ५

—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

"हे प्रातिकामिन्, तू हें काय बरळतो आहेस? कोणता राजपुत्र आपल्या बायकोला द्यूतांत पणाला लावील? राजा द्यूत-मदाने मत्त होऊन मूर्ख तर नाही बनला? किंवा त्याची सपशेल फसवणूक तर नाहींना झाली? हें असें होईलच कसे?" प्रातिकामीने तिला सांगितलें की, युधिष्ठिरानें जेव्हां आपणांस पणाला लाविलें तेव्हां त्यांना कोणीही फसविलें नसून ते चागले सावध होते व आपण काय करतों आहोंत हें त्यांना पूर्णपणें माहीत होतें. प्रथम त्यांनी आपले बंधु पणाला लावले, नतर त्यानी स्वतःला पणाला लावलें व तोही पण हरल्यानतर त्यानी आपणांस पणाला लावलें." युधिष्ठिरानें स्वतःचें शरीर हरल्यावर नंतर आपणांस पणाला लाविलें यांतून कदाचित् अप्रतिष्ठेपासून सुटण्याचा मार्ग आपणास सांपडण्याचा संभव आहे असें वाटून तो त्या सूताला म्हणाली, हे सूता, तू सभेंत जाऊन त्या कपटी व जुगारी युधिष्ठिराला असें विचार कीं, तू आधी स्वतःला पणाला लावून हरलास व नतर मला पणाला लाविलेस की आधी मला पणाला लावून हरून नतर तू परक्यांचा दास झालास? राजा याचें जे उत्तर देईल तें मला येऊन सांग. म्हणजे मी कसे वागावयाचें तें ठरवीन. राजाचीच तशी इच्छा असली तर मी या दुःखी स्थितीत तेथे येईनही.

गच्छ त्वं कितवं गत्वा सभायां पृच्छ सूतज ।
किं तु पूर्वं पराजैषीरात्मानमथवा नु माम् ॥ ७
एतज्ज्ञात्वा समागच्छ ततो मां नय सूतज ।
ज्ञात्वा चिकीर्षितमहं राज्ञो यास्यामि दुःखिता ॥ ८

—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

तो सूत द्रौपदीच्या म्हणण्यानुसार राजसभेंत गेला व त्यानें युधिष्ठिरांना तिचा निरोप सांगितला. तें ऐकतांच युधिष्ठिर अगदी अचेतन झाले व त्यांनी कांहीच उत्तर दिले नाही. दुर्योधनानें मात्र सूताला असें सांगितलें कीं, द्रौपदीनें येथेंच राजसभेंत येऊन हा प्रश्न युधिष्ठिराला विचारावा. येथें असलेले सर्व लोक या दोघांचा होणारा तो सवाद ऐकू देत. तो बिचारा नोकर काय बोलणार? धन्याच्या आज्ञेनुरूप त्याला द्रौपदीकडे पुन्हां निरोप घेऊन जाणें

भागच होतें. तो अंतःकरणांतून अत्यंत दुःखी झाला पण विवश होऊन द्रौपदीकडे जाऊन त्यानें तिला असें सांगितलें कीं, हे राजकन्ये, हे सभ्य म्हणविणारे लोक तुला सभेंत बोलावीत आहेत. याचा अर्थ कौरवांचा विनाशकाळ जवळ आला आहे असाच आहे. जो कोणी क्षुद्रात्मा तुला राजसभेंत नेईल तो ऐश्वर्यापासून भ्रष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं. द्रौपदीनें त्याला इतकेच उत्तर दिलें कीं :—

एवं नूनं व्यदधात्संविधाता स्पर्शावुभौ स्पृशतो वृद्धबालौ ।
धर्मं त्वेकं परमं प्राह लोके स नः शमं धास्यति गोप्यमानः ॥ १५
सोयं धर्मो मात्यगात्कौरवान्वै सभ्यान्मत्वा पृच्छ धर्म्यं वचो मे ।
ते मां ब्रूयुर्निश्चितं तत्करिष्ये धर्मात्मानो नीतिमन्तो वरिष्ठाः ॥ १६
—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

"सर्व प्रकारच्या चराचर सृष्टीसाठी परमेश्वरानेंच सुखें व दुखें लावून दिलेली आहेत. त्यामुळे आपल्या भाग्याने मिळणाऱ्या सुखदुःखाचा फारसा विचार करण्याचें कारण नाही. सर्व जगांत धर्मच अत्यंत श्रेष्ठ आहे. आपण जर धर्मानुसार वागलों तर तो शेवटीं कल्याण केल्यावांचून राहात नाही. कौरवांच्या हातून धर्माचें उल्लंघन होऊ नये अशी माझी इच्छा आहे. म्हणून तू सभासदांना जाऊन धर्मानुसार असलेले माझे म्हणणें सांग. त्या सभेंतील धर्मात्मे, नीतिमान् व श्रेष्ठ असे लोक मला जसें वागावयास सागत असतील तसें वागावयास मी सिद्ध आहें. तो बिचारा सूत पुनश्च सभेंत येऊन सभासदाना द्रौपदीचा प्रश्न विचारूं लागला. पण प्रश्न धर्माधर्माच्या सूक्ष्म विवेचनाच्या पलीकडे गेलेला असून दुर्योधनाचा द्रौपदीला सभेत आणण्याचा दुराग्रह कधीही सुटावयाचा नाही असें पाहून उगाच आपला अपमान करून घेण्यांत कांही अर्थ नाही अशा कल्पनेने सभ्य खाली माना घालून स्वस्थ बसले. दुर्योधनानें त्या सूताला असें सांगितलें की, तू प्रत्यक्ष द्रौपदीकडे जाऊन तिलाच सभेत सभ्यांना हा प्रश्न विचारावयासाठी यावयास सांग. सूत त्याचा नोकर असला तरी द्रौपदीच्या क्रोधाला तो भीत होता. त्यामुळे तो पुनश्च मी द्रौपदीला काय सांगू असें तो सभ्याना विचारूं लागला. शेवटीं दुर्योधनाने रागानें आपली दृष्टि दुःशा-

सनाकडे वळविली व त्याला असें सांगितलें कीं, हा मूर्ख नोकर भीमाला भीत आहे. तू स्वतःच जाऊन द्रौपदीला खेंचून आण. आपण काय वाटेल तें केले तरी हे अवश शत्रु आपणांला काय करणार आहेत? लाल नेत्र करून दुःशासन उठला व त्या महासतीला अप्रतिष्ठेनें सभेत आणण्याचें, शौर्याला, कुळाला व माणुसकीला काळिमा फांसणारें तें कुकृत्य करण्यासाठी अत.पुराकडे निघाला. त्या करुण प्रसंगाचे चित्र चित्रित करीत असता महाभारतकार म्हणतातः—

ततः समुत्थाय स राजपुत्रः श्रुत्वा भ्रातुः शासनं रक्तदृष्टिः ।
प्रविश्य तद्वेश्म महारथानामित्यब्रवीद् द्रौपदीं राजपुत्रीम् ॥ २६
एहचेहि पाञ्चालि जितासि कृष्णे दुर्योधनं पश्य विमुक्तलज्जा ।
कुरून् भजस्वायतपत्रनेत्रे धर्मेण लब्धासि सभां परैहि ॥ २७
ततः समुत्थाय सुदुर्मना सा विवर्णमामृज्य मुखं करेण ।
आर्ता प्रदुद्राव यतः स्त्रियस्ता वृद्धस्य राज्ञः कुरुपुङ्गवस्य ॥ २८
ततो जवेनाभिससार रोषाद् दुःशासनस्तामभिगर्जमानः ।
दीर्घेषु नीलेष्वथ चोर्मिमत्सु जग्राह केशेषु नरेन्द्रपत्नीम् ॥ २९
ये राजसूयावभृथे जलेन महाक्रतौ मन्त्रपूतेन सिक्ताः ।
ते पाण्डवानां परिभूय वीर्यं बलात्प्रसृष्टा धृतराष्ट्रजेन ॥ ३०
स तां पराकृष्य सभासमीपमानीय कृष्णामतिदीर्घकेशीम् ।
दुःशासनो नाथवतीमनाथवच्चकर्ष वायुः कदलीमिवार्ताम् ॥ ३१
सा कृष्यमाणा नमिताङ्गयष्टिः शनैरुवाचाथ रजस्वलाऽस्मि ।
एकं च वासो मम मन्दबुद्धे सभां नेतुं नार्हसि मामनार्य ॥ ३२
ततोऽब्रवीत्तां प्रसभं निगृह्य केशेषु कृष्णेषु तदा स कृष्णाम् ।
कृष्णं च जिष्णुं च हरिं नरं च त्राणाय विक्रोशति याज्ञसेनी ॥ ३३

दुःशासन उवाच ।

रजस्वला वा भव याज्ञसेनि एकाम्बरा वाप्यथवा विवस्त्रा ।
द्यूते जिता चासि कृतासि दासी दासीषु वासश्च यथोपजोषम् ॥ ३४

वैशंपायन उवाच ।

प्रकीर्णकेशी पतितार्धवस्त्रा दुःशासनेन व्यवधूयमाना ।
ह्रीमत्यमर्षेण च दह्यमाना शनैरिदं वाक्यमुवाच कृष्णा ॥ ३५

द्रौपद्युवाच ।

इमे सभायामुपनीतशास्त्राः क्रियावन्तः सर्व एवेन्द्रकल्पाः ।
गुरुस्थाना गुरवश्चैव सर्वे तेषामग्रे नोत्सहे स्थातुमेवम् ॥ ३६
नृशंसकर्मस्त्वमनार्यवृत्त मा मा विवस्त्रां कुरु मा विकार्षीः ।
न मर्षयेयुस्तव राजपुत्राः सेन्द्रापि देवा यदि ते सहायाः ॥ ३७
धर्मे स्थितो धर्मसुतो महात्मा धर्मश्च सूक्ष्मो निपुणोपलब्धः ।
वाचापि भर्तुः परमाणुमात्रमिच्छामि दोषं न गुणान्विसृज्य ॥ ३८
इदं त्वकार्यं कुरुवीरमध्ये रजस्वलां यत्परिकर्षसे माम् ।
न चापि कश्चित् कुरुतेऽत्र कुत्सां ध्रुवं तवेदं मतमभ्युपेतः ॥ ३९
धिगस्तु नष्टः खलु भारतानां धर्मस्तथा क्षत्रविदां च वृत्तम् ।
यत्र ह्यधर्मेण कुरु धर्मवेलां प्रेक्षन्ति सर्वे कुरवः सभायाम् ॥ ४०
द्रोणस्य भीष्मस्य च नास्ति सत्त्वं क्षत्तुस्तथैवास्य महात्मनोऽपि ।
राज्ञस्तथा हीममधर्ममुग्रं न लक्षयन्ते कुरुवृद्धमुख्याः ॥ ४१

वैशंपायन उवाच ।

तथा ब्रुवन्ती करुणं सुमध्यमा भर्तॄन्कटाक्षैः कुपितानपश्यत् ।
सा पाण्डवान्कोपपरीतदेहान् संदीपयामास कटाक्षपातैः ॥ ४२
हृतेन राज्येन तथा धनेन रत्नैश्च मुख्यैर्न तथा बभूव ।
यथा त्रपाकोपसमीरितेन कृष्णाकटाक्षेण बभूव दुःखम् ॥ ४३
दुःशासनश्चापि समीक्ष्य कृष्णामवेक्षमाणां कृपणान्पतींस्तान् ।
आधूय वेगेन विसंज्ञकल्पामुवाच दासीति हसन्स शब्दम् ॥ ४४
तथा ब्रुवन्तीं करुणं रुदन्तीमवेक्षमाणां कृपणान्पतींस्तान् ।
दुःशासनः परुषाण्यप्रियाणि वाक्यान्युवाचामधुराणि चैव ॥ ५३
तां कृष्यमाणां च रजस्वलां च स्रस्तोत्तरीयामतदर्हमाणाम् ।
वृकोदरः प्रेक्ष्य युधिष्ठिरं च चकार कोपं परमार्तरूपः ॥ ५४

—महाभारत, सभापर्व अध्याय ६७

" अंतःपुरांत शिरून दुःशासन द्रौपदीला म्हणाला, 'हे कृष्णे, आम्ही धर्मानुसार जिकलेली तू आमची दासी आहेस. हे कमलनेत्रे, तूं यापुढें कौरवांची सेवा केली पाहिजेस. दासीला लाज कसली आली आहे? लाज सोडून तूं दुर्योधनाला पाहा. सभेंत चल." हृदयाला घरें पाडणारे त्याचे ते उद्‌गार ऐकतांच द्रौपदीचा चेहरा

पांढरा फटफटीत पडला. भग्नमनस्क स्थितींत आपल्या हातांनीं आपलें तोंड झांकून घेऊन व अत्यंत आर्त होऊन वृद्ध राजा धृतराष्ट्राच्या अंतःपुरांतील स्त्रिया जिकडे होत्या तिकडे ती धांवत जाऊं लागली. त्याबरोबर रागानें गर्जना करीत वेगानें दुःशासन तिच्या अगावर धांवून गेला व त्यानें तिचे कुरळे, दीर्घ व काळेभोर केस धरून त्या सम्राज्ञीला खेंचलें. महान् राजसूय यज्ञांत मंत्रपूत अवभृथाच्या जलाचा ज्यांच्यावर अभिषेक झाला त्या द्रौपदीच्या भाग्यशाली केसांना पाडवाच्या पराक्रमाचा अनादर करून बलात्कारानें धृतराष्ट्रपुत्रानें स्पर्श केला. वाऱ्यानें ज्याप्रमाणें कदलीला ओढीत न्यावें त्याप्रमाणें श्रेष्ठ सरक्षण असलेल्या द्रौपदीला एकाद्या अनाथाप्रमाणें दुःशासन केस धरून फरफर ओढीत सभेंत नेऊ लागला. केसांना हिसके बसत असल्यामुळे किंचित वांकलेली द्रौपदी त्या अधमाला म्हणाली, हे मदबुद्धीच्या दुष्टा, मी रजस्वला व एक वस्त्रा आहे. अशा स्थितींत तू मला सभेंत नेऊ नकोस. याप्रमाणें वारंवार दुःशासनाला विनवीत व आपल्या संरक्षणासाठीं परमेश्वराचा धावा करीत आक्रोश करणाऱ्या द्रौपदीच्या केसांना एक जोराचा हिसडा देऊन दुःशासनानें तिला सांगितलें की, तू रजस्वला असलीस, एकवस्त्रा असलीस किंवा सपूर्णपणें विवस्त्र असलीस तरी त्याची यत्किंचितही चिंता वाळगण्याचें मला कांही कारण नाहीं. आम्ही द्यूतांत जिकलेली तू आमची दासी आहेस व दासीला वस्त्र असावें की नसावें हें ठरविण्याचा अधिकार सर्वस्वी तिच्या धन्यांचा आहे. त्या ओढाताणींत द्रौपदीचे केस मोकळे सुटले होते. तिचा पदर खांद्यावरून घसरून खाली पडला होता. लज्जा व क्रोध यांनी तिचें अंतःकरण पूर्णपणें दग्ध झाले होतें. व तरीही दुःशासन तिच्या शरीराला हिसडे देत होता. विलाप करीत द्रौपदी त्याला म्हणाली, या तुमच्या सभेंत शास्त्रांचे अध्ययन केलेले, इंद्राप्रमाणें प्रभावशाली असे क्रियावान् लोक बसले आहेत. अशा मान्य लोकांसमोर या स्थितीत मला नेणे योग्य आहे काय? नृशंस कर्मांत निर्ढावलेल्या चारित्र्यभ्रष्ट अधमा, तू मला याप्रमाणें ओढू नकोस. माझें वस्त्र अस्ताव्यस्त झाले आहे. तू इतका घोर अपराध केलास

कीं आतां तूं वांचू शकणार नाहींस. इंद्रासहित सर्व देव जरी तुझ्या साहाय्यार्थ आले तरीही तुझें संरक्षण होऊं शकणार नाहीं. युधिष्ठिर धर्मबंधनानें बांधलेले आहेत. धर्म अत्यंत सूक्ष्म असून त्याचें रहस्य विचक्षणांनाही कळत नाहीं. या स्थितींत देखील माझ्या पतींचे गुण सोडून त्यांच्या परमाणूएवढ्या सूक्ष्म दोषांचेंही आविष्करण करण्याची माझी इच्छा नाही. सर्व कौरववीर पहात असतां माझ्यासारख्या रजस्वलेला तू भरसभेंत ओढतोस हें केवढें मोठें दुष्कृत्य आहे. पण तरीही तुझी येथें कोणी निर्भर्त्सना करीत नाही! या सर्वांची बुद्धि तुझ्यासारखीच भ्रष्ट झालेली आहे काय? भरतकुलांतील या सर्व लोकाना धिक्कार असो. यांचा धर्म गेला. यांचें क्षत्रियत्वही पार सपले. सर्व कौरव उघड्या डोळ्यांनी ज्या अर्थी ही धर्माची अमर्यादा पाहात आहेत, त्याअर्थी भीष्म, द्रोण, विदुर, राजा धृतराष्ट्र व इतर सर्व कुरुवृद्ध यांचें पुण्य व सामर्थ्य संपुष्टांतच आलें आहे असें म्हटले पाहिजे."

याप्रमाणें करुण विलाप करीत सभेंत येऊन तिनें पांडवांच्याकडे क्रोध व लज्जा, तिरस्कार व घृणा यांनीं भरलेला एक कटाक्ष टाकला. द्रौपदीच्या त्या कटाक्षांत कोणतें ब्रह्मांड सांठविलेलें नव्हतें? राज्य गेल्यामुळें व सर्वस्व गेल्यामुळें पांडवांना जितकें दु.ख झालें नाहीं तितकें लज्जा व क्रोध यांनी मिश्रित अशा द्रौपदीच्या कटाक्षानें त्यांना दु:ख झालें. त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी होऊन गेलें. त्याही स्थितीत दु:शासनानें द्रौपदीला इतक्या जोराचा हिसडा दिला कीं ती मूर्च्छित होण्याच्या बेतांत आली. पण तिची ती अवस्था पाहून तो मूर्ख दुरात्मा दात काढून हासत दासी म्हणून तिला संबोधू लागला. कर्णादि सर्व दुष्ट त्या मूर्खाचें अभिनदन करू लागले. इतर कोणीच कांही बोलेनात. ती भीष्मांना मी दासी आहे काय म्हणून विचारूं लागली. त्यांनी उत्तराच्यासबधी आपलें असामर्थ्य प्रकट केलें व युधिष्ठिराकडे बोट दाखविलें. शेवटी अब्रूसाठी द्रौपदी करुण आक्रदन करू लागली. दु:शासन तिला कठोरांतील कठोर वाक्यें ऐकवू लागला. रजस्वला स्थितीत ओढली जाणारी व वस्त्र अस्ताव्यस्त झालेली द्रौपदी पाहून भीम संतापला. पण त्याचा कांही एक उपयोग नव्हता.

एकटा विकर्ण मात्र द्रौपदी दासी नाहीं असें स्पष्टपणें म्हणाला. पण कर्णानें त्यालाच धमकाविलें. व त्या तेजस्विनी सम्राज्ञीला भर-सभेंत नग्न करण्याची त्यानें आज्ञा दिली. महाभारतकार म्हणतातः—

ततो दुःशासनो राजन्द्रौपद्या वसनं बलात्।
सभामध्ये समाक्षिप्य व्यपाकृष्टुं प्रचक्रमे ॥ ४०

वैशपायन उवाच।

आकृष्यमाने वसने द्रौपद्या चिन्तितो हरिः।
गोविन्द द्वारकावासिन्कृष्ण गोपीजनप्रिय ॥ ४१
कौरवैः परिभूतां मां किं न जानासि केशव।
हे नाथ हे रमानाथ व्रजनार्तिनाशन।
कौरवार्णवमग्नां मामुद्धरस्व जनार्दन ॥ ४२
कृष्ण कृष्ण महायोगिन्विश्वात्मन्विश्वभावन।
प्रपन्ना पाहि गोविन्द कुरुमध्येवसीदतीम् ॥ ४३
इत्यनुस्मृत्य कृष्णं सा हरिं त्रिभुवनेश्वरम्।
प्रारुदद् दुःखिता राजन्मुखमाच्छाद्य भामिनी ॥ ४४
याज्ञसेन्या वचः श्रुत्वा कृष्णो गह्वरितोऽभवत्।
त्यक्त्वा शय्यासनं पद्भ्यां कृपालुः कृपयाभ्यगात् ॥ ४५
कृष्णं च विष्णुं च हरिं नरं च त्राणाय विक्रोशति याज्ञसेनी।
ततस्तु धर्मोन्तरितो महात्मा समावृणोद्वै विविधैः सुवस्त्रैः ॥ ४६
आकृष्यमाणे वसने द्रौपद्यास्तु विशांपते।
तद्रूपमपरं वस्त्रं प्रादुरासीदनेकशः ॥ ४७
नानारागविरागाणि वसनान्यथ वै प्रभो।
प्रादुर्भवन्ति शतशो धर्मस्य परिपालनात् ॥ ४८
ततो हलहलाशब्दस्तत्रासीद् घोरदर्शनः।
तदद्भुततमं लोको वीक्ष्य सर्वे महीभृतः।
शशंसुर्द्रौपदीं तत्र कुत्सन्तो धृतराष्ट्रजम् ॥ ४९

—महाभारत, सभापर्व अध्याय ६८

नंतर दुःशासनानें बलात्कारानें द्रौपदीचें वस्त्र भर सभेंत ओढाव-यास प्रारंभ केला. मृत्यूहूनही भयकर अशा या विटबनेपासून कुणीही

आपलें संरक्षण करणे शक्य नाहीं असें पाहून, द्रौपदीनें भगवान् श्रीकृष्णांच्या नांवानें आर्त हांक मारली. ती म्हणाली हे द्वारकावासी, गोपीजनप्रिया श्रीकृष्णा, कौरवांनी माझी चालविलेली विटबना तुझ्या ध्यानांत आली नाही काय ? हे महायोगिन् विश्वभावना, मी तुला सर्वस्वी शरण आहे. तू माझे संरक्षण कर. त्रिभुवनेश्वर श्रीकृष्णाला याप्रमाणें हांक मारून दोन्ही हातांनीं आपले तोंड झांकून घेऊन द्रौपदी रडू लागली. त्याबरोबर भगवान् श्रीकृष्ण दुःखानें विव्हळ होऊन आपले शय्यासन सोडून त्या ठिकाणी आले. ती परमेश्वराला स्वतःच्या रक्षणार्थ हांक मारीत असतां तिच्या पातिव्रत्यधर्मानेंच अनेक वस्त्रानी तिला झांकून तिचें सरक्षण केलें. एक वस्त्र ओढले जाताच अनेक वस्त्रे निघू लागलीं. नतर अनर्थसूचक असा भयकर शब्द ऐकू येऊ लागला तो प्रकार पहातांच अनेक लोक द्रौपदीची प्रशसा करून धृतराष्ट्रपुत्राची निदा करू लागले. याप्रमाणे धर्मानें वस्त्रहरणाच्या आपत्तीतून तिला वांचविले. तरी तिचे कष्ट सपले नाहीत. ती रडत असता दु शासन कर्णाच्या आज्ञेवरून वारवार तिला ओढू लागला त्याबरोबर विलाप करीत ती म्हणाली:

स्वयंवरे यास्मि नृपैर्दृष्टा रङ्गे समागते ।
न दृष्टपूर्वा चान्यत्र साहमद्य सभां गता ॥ ४
यां न वायुर्न चादित्यो दृष्टवन्तौ पुरा गृहे ।
साहमद्य सभामध्ये दृश्यामि जनससदि ॥ ५
यां न मृष्यन्ति वातेन स्पृश्यमानां गृहे पुरा ।
स्पृश्यमानां सहन्तेऽद्य पाण्डवास्तां दुरात्मना ॥ ६
मृष्यन्ति कुरवश्चेमे मन्ये कालस्य पर्ययम् ।
स्नुषां दुहितरं चैव क्लिश्यमानामनर्हतीम् ॥ ७
किं न्वतः कृपणं भूयो यवहं स्त्री सती शुभा ।
सभामध्यं विगाहेऽद्य क्व नु धर्मो महीक्षिताम् ॥ ८
धर्म्यां स्त्रियं सभां पूर्वं न नयन्तीति नः श्रुतम् ।
स नष्टः कौरवो येषु पूर्वो धर्मः सनातनः ॥ ९
कथं हि भार्या पाण्डूनां पार्षतस्य स्वसा सती ।
वासुदेवस्य च सखी पार्थिवानां सभामियाम् ॥ १०

तामिमां धर्मराजस्य भार्यां सदृशवर्णजाम्।
ब्रूत दासीमदासीं वा तत्करिष्यामि कौरवः॥ ११
अयं मां सुदृढं क्षुद्रः कौरवाणां यशोहरः।
क्लिश्नाति नाहं तत्सोढुं चिरं शक्ष्यामि कौरवाः॥ १२
जितां वाप्यजितां वापि मन्यध्वं मां यथा नृपाः।
तथा प्रयुक्तमिच्छामि तत्करिष्यामि कौरवाः॥ १३

—महाभारत, सभापर्व अध्याय ६९

"काय दुर्दैव आहे! केवळ स्वयंवरांतच मी सभेत आले होतें पुन्हां कधी सभेत आले नाही. त्या मला आज या स्थितींत सभेत येण्याचा प्रसंग आला! वायु व सूर्यही जिला कधी पाहू शकले नाहीत त्या माझ्यासारख्या राजस्त्रीला सर्व सभासद उघड्या डोळ्यांनीं पहात आहेत. वाऱ्यानेही मला स्पर्श केला तर परक्रमी पांडवांना तो सहन होत नसे. आज हा अधम मला वारवार स्पर्श करीत असूनही पांडव तो सहन करीत आहेत! कौरव कुळांतील हे वृद्ध लोक मुलीसारख्या असलेल्या आपल्या सुनेला अशा प्रकारचे दिलेले कष्ट सहन करीत आहेत याचा अर्थ काळच फिरला आहे! याच्यापेक्षां दुसरी कोणची शोचनीय गोष्ट असेल काय? माझ्यासारख्या पतिव्रता स्त्रीला सभेमध्ये अशाच स्थितीत उभें राहणे भाग पडावें! आज राजधर्म कोठे गेला? स्त्रीला पूर्वी अशा अवस्थेंत कधीही सभेंत नेत नसत. ही धर्मपरंपरा कौरव कुळातून पूर्णपणें नष्ट झाली. पांडवासारख्यांची भार्या, धृष्टद्युम्नासारख्या वीराची बहीण, व भगवान् श्रीकृष्णाची सखी, अशा रीतीने सभेंत यावी काय? हे कौरवश्रेष्ठांनो, धर्मराज युधिष्ठिराची ही पत्नी खरेच दासी आहे असें तुम्हाला वाटतें काय? कौरवाच्या यशाला मशाल लावणारा हा नराधम मला जे तीव्र क्लेश देत आहे ते आता मी सहन करूं शकणार नाही. तुम्ही निर्णय द्याल तसें मी वागेन. सांगा, मी खरेंच दासी आहे काय?"

पण ती आर्त विलाप करीत असता कोणीही सभ्य तिला उत्तर देईना. कर्णानें हलकटपणाने तिला भोगदासी ठरवून पांडवांचा परित्याग करून कौरवांकडे कोणाचाही स्वीकार करावयास उघडपणें

सांगितलें. व दुर्योधनानें तर निर्लज्जपणें आपली डावी मांडीही तिला दाखविली. द्रौपदीची कोणती विटंबना व्हावयाची शिल्लक राहिली होती? युधिष्ठिराच्या धर्मकार्पण्यानें स्त्रीजीवनांतील सर्वस्व घालवून बसण्याचा दुःखद प्रसंग तिच्यावर येऊन कोसळला. शेवटीं गांधारीनें तिची सुटका केली. तिच्या सामर्थ्यानें परत मिळालेलें स्वातंत्र्य युधिष्ठिरानें पुनः द्यूतांत गमाविल्यानें पतीवरोबर ती महासाध्वी अरण्यांत जावयास निघाली असतां त्या हलकट दुःशासनानें तिला पुढीलप्रमाणें दारुण शब्द ऐकविले :—

महाप्राज्ञः सौमकिर्यज्ञसेनः कन्यां पाञ्चालीं पाण्डवेभ्यः प्रदाय ।
अकर्षीद्वै सुकृतं नेह किञ्चित् क्लीबाः पार्थाः पतयो याज्ञसेन्याः ॥ १०
सूक्ष्मप्रावारानजिनोत्तरीयान् दृष्ट्वारण्ये निर्धनानप्रतिष्ठान् ।
कां त्वं प्रीतिं लप्स्यसे याज्ञसेनि पतिं वृणीष्वेह यमन्यमिच्छसि ॥ ११
एते हि सर्वे कुरवः समेताः क्षान्ता दान्ताः सुद्रविणोपपन्नाः ।
एषां वृणीष्वैकतमं पतित्वे न त्वां नयेत्कालविपर्ययोयम् ॥ १२

—महाभारत, सभापर्व अध्याय ७७

" अत्यत बुद्धिमान् द्रुपदाने आपली कन्या द्रौपदी पांडवाना देऊन कांही एक भले केलें नाही. कारण द्रौपदीचे पति पांडव हे षढ आहेत. वल्कले धारण करून व अजिनें अंगावर घेऊन स्वतःचे राज्य गमावून वनांत जाणाऱ्या निर्धन पांडवांच्या मागोमाग जाऊन द्रौपदी, तुला काय मिळणार आहे ? यांना सोडून जो कोणी दुसरा पति तुला बरा वाटेल त्याला तू स्वीकार. येथे जमलेले सर्व कौरव धनकनकसंपन्न व अत्यंत प्रेमळ आहेत. त्यापैकीं कोणालाही तूं पति म्हणून पत्कर. आपले तारुण्य व्यर्थ कां घालवितेस? हे शब्द ऐकून द्रौपदीच्या हृदयाला कोणत्या वेदना व्हावयाच्या उरल्या असतील! महाभारतकार म्हणतातः—

तथेत्युक्त्वा तु सा देवी स्रवन्नेत्रजलाविला ।
शोणिताक्तैकवसना मुक्तकेशी विनिर्ययौ ॥ ९

—महाभारत, सभापर्व अध्याय ७९

" डोळ्यांतून अश्रुधारा गाळीत रजस्वला स्थितींत शोणितानें भरलेलें तेंच वस्त्र नेसून मुक्तकेशा अवस्थेंत द्रौपदी अरण्यांत गेली."

अरण्यांत तरी द्रौपदीला सन्मानानें काळ घालवितां आला काय ? कौरवांनी केलेली विटंबना पांडवांनी सहन केल्यापासून सर्वच दुष्टाना जणू की काय द्रौपदीची विटंबना करणे ही अगदी सहज गोष्ट वाटत होती. ती आश्रमात एकटी आहे असें पाहून धृतराष्ट्राचा जांवई सिधुराज जयद्रथ याने तिला पळवून नेण्याचा प्रयत्न केला. पांडवानी रणांत त्याला गांठून भीमसेनानें त्यास ठार मारण्याचा उपक्रम चालविला तो युधिष्ठिराच्या दयाबुद्धीनें पुन्हा त्या आक्रमकाला जीवदानच दिले ! अज्ञातवासात तर तिच्यावर याहीपेक्षां दु.खाचा प्रसंग आलेला आहे. एकवार सम्राज्ञी असता राजा विराटाच्या राणीची दासी होण्याचा प्रसग तिच्यावर आला. विराटाचा सेनापति कीचक तेथे सैरध्रीच्या मागे लागला. द्रौपदीने त्याला पुष्कळ सांगून पहाण्याचा प्रयत्न केला पण कोणत्या वलवताना दुर्बलाच्या तोंडी असलेली नीतितत्त्वे पटली आहेत ? द्रौपदीनें राणी सुदेष्णेकडून सरक्षण मिळविण्याचा प्रयत्न केला. पण उन्मत्त कीचकानें सुदेष्णेलाच आपल्या कारस्थानात ओढून सैरंध्रीला कोणत्या तरी निमित्तानें स्वत.कडे पाठवून देण्यास आज्ञेच्या स्वरूपाची विनती केली. कीचक हा अत्यत वलवान् असून त्याच्या भरवशावरच विराटाच्या राज्याचें अस्तित्व अवलबून असल्यामुळे सुदेष्णेला त्याचें म्हणणे अमान्य करणे केवळ अशक्य होतें. शेवटी स्वत.साठी मद्य आणण्याच्या निमित्ताने सुदेष्णेने द्रौपदीला कीचकाच्या महालात जावयास सांगितले. द्रौपदीने तिला असें सांगितलें की, कीचक अत्यत निर्लज्ज असून तो माझ्या अब्रूच्या मागे लागलेला आहे याची आपणांस पूर्णपणें कल्पना आहे. अशा स्थितीत आपण मला त्याच्याकडे जावयास सागावें हें मोठे आश्चर्य आहे. मी आपल्याकडे राहण्यापूर्वीच कोणाचीही भलतीच सेवा मी कधीही करणार नाही असें मी आपणांस सागितले होतें व आपणही तें मान्य केले होतें. अशा स्थितीत हे भलतेच काम आपण मला काय म्हणून सागतां? कीचक कामांध असून मूर्ख आहे. मला पाहिल्याबरोबर तो माझा अपमान करील. आपल्याकडे पुष्कळ दासी आहेत, कोणालाही आपण पाठवू शकतां. पण मी तुला पाठविलें असल्यामुळे कीचक तुझ्या

वाटेस जाणार नाही असें तोड भरून आश्वासन देऊन सुदेष्णेनें तिच्या हाती मद्याचा सुवर्णचषक दिला व तिला जावयास भाग पाडलें. आपल्यावर आलेल्या या दुःखद प्रसगाबद्दल स्वतःच्याच दैवालाच दोष देत द्रौपदी कीचकाच्या महालात गेली. तिसा पहातांच कामांध कीचकाने तिचे स्वागत करून व आपल्या ऐश्वर्याचें तिच्याजवळ वर्णन करून तिला वश करण्याचा प्रयत्न चालविला. द्रौपदीनें त्याला सागितले की, राणीनें मद्य आणण्यासाठी मला तुझ्याकडे पाठविले आहे. मला फक्त मद्य दे, मी जातें. 'मद्य न्यावयास इतर पुष्कळ दासी आहेत' असें सांगून द्रौपदीला तो तेथेच बलात्कारानें ओढावयास लागला असता त्याला ढकलून देऊन ती आश्रयार्थ राजसभेकडे आली. सभेत ककवेषानें राजे युधिष्ठिर आहेत, तेव्हां तेथें आपल्या सरक्षणाची व्यवस्था होईल अशी तिची कल्पना होती. एका क्षुद्र दासीने आपल्याला झिडकारलेलें पाहून कीचकानें तिचा पाठलाग करावयास सुरुवात केली. त्या महासाध्वीची दुःशासनानें केलेली विटबना जणू कीं काय अपुरीच होती, अशा कल्पनेनें त्याहूनही दारुण अप्रतिष्ठेचे ताट दैवाने तिच्यापुढे वाढून ठेवलें. कीचकानें तिच्या मागोमाग धांवत जाऊन भर सभेत राजा विराटासमक्ष तिचे केस धरून तिला ओढलें व खाली पाडून लाथ मारली. त्या सभेत बल्लववेषानें भीमसेनही उपस्थित होता. लाल नेत्र करून कीचकाचा वध करावा म्हणून तो समोरच्या झाडाकडे पाहूं लागला व आपण कदाचित ओळखले जाऊं या भयाने युधिष्ठिर आपल्या पायाचा आंगठा त्याच्या आंगठ्यावर दाबून त्याला सावध करीत म्हणाले "हे बल्लवा, त्या वृक्षाकडे काय पाहतोस? स्वयंपाकासाठी तुला लांकडे हवी असतील तर रानांतले वृक्ष तोड. राजसभेंतील वृक्ष या कार्यासाठी नसतात." द्रौपदीच्या कानावर हीं अक्षरे पडताच तिच्या सहनशीलतेची तार तुटली. लाल नेत्र करून क्रोधकटाक्षाने आपल्या पतीचे अत.करण जाळीत ती म्हणाली :

येषां वैरी न स्वपिति षष्ठेपि विषये वसन् ।
तेषां मां भगिनीं भार्यां सूतपुत्रः पदाऽवधीत् ॥ २२

ते दद्युर्न च याचेयुर्ब्रह्मण्याः सत्यवादिनः ।
तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदाऽवधीत् ॥ २३
येषां दुन्दुभिनिर्घोषो ज्याघोषः श्रूयतेऽनिशम् ।
तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदाऽवधीत् ॥ २४
ये च तेजस्विनो दान्ता बलवन्तोऽतिमानिनः ।
तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदाऽवधीत् ॥ २५
सर्वलोकमिमं हन्युर्धर्मपाशसितास्तु ये ।
तेषां मां मानिनीं भार्यां सूतपुत्रः पदाऽवधीत् ॥ २६
शरणं ये प्रपन्नानां भवन्ति शरणार्थिनाम् ।
चरन्ति लोके प्रच्छन्नाः क्व नु तेऽद्य महारथाः ॥ २७
कथं ते सूतपुत्रेण वध्यमानां प्रियां सतीम् ।
मर्षयन्ति यथा क्लीबा बलवन्तोऽमितौजसः ॥ २८
क्व नु तेषाममर्षश्च वीर्यं तेजश्च वर्तते ।
न परीप्सन्ति ये भार्यां वध्यमानां दुरात्मना ॥ २९
मयात्र शक्यं किं कर्तुं विराटे धर्मदूषके ।
यः पश्यन्मां मर्षयति वध्यमानामनागसम् ॥ ३०
न राजा राजवत्किञ्चित् समाचरति कीचके ।
दस्यूनामिव धर्मस्ते न हि संसदि शोभते ॥ ३१
नाहमेतेन युक्तं वै हन्तुं मत्स्य तवान्तिके ।
सभासदोऽत्र पश्यन्तु कीचकस्य व्यतिक्रमम् ॥ ३२
कीचको न च धर्मज्ञो न च मत्स्यः कथंचन ।
सभासदोऽप्यधर्मज्ञा य एनं पर्युपासते ॥ ३३

--महाभारत, विराटपर्व अध्याय १६

" ज्यांचा वैरी जगांत कुठेंही स्वस्थपणें झोप घेऊं शकत नाहीं, ज्या सत्यवादी ब्रह्मण्य वीरांनी आजवर फक्त दान दिलें, मागितलें मात्र नाही, ज्यांच्या दुदुभीचा निर्घोष व धनुष्याचा टणत्कार अखंड चालू असतो, जे तेजस्वी, उदार, अत्यंत बलवान् व अत्यंत मानी आहेत व शरण आलेल्या लोकांना जे सदैव आश्रय देतात, त्यांच्या या मानिनी भार्येला अधम सूतपुत्रानें आज लाथ मारली आहे. आपल्या प्रिय व पतिव्रता पत्नीचा एका सूतपुत्रानें केलेला हा अपमान

ते बलवान् व तेजस्वी लोक षंढाप्रमाणें कसा सहन करतात ? त्यांचा क्रोध, वीर्य व तेज आज कोठें गेलें ? दुरात्म्यांकडून त्यांच्या पत्नीचा होत असलेला हा अपमान ते कसे सहन करीत आहेत ? एका स्त्रीचा अपमान सहन करणारा विराटासारखा धर्मदूषक राजा सिंहासनावर असतां मला काय करतां येणें शक्य आहे ? हा राजा लुटारूप्रमाणें आहे. राजानें जसें वागावयास हवें तसें हा कीचकाशीं वागूं शकत नाहीं. हा राजा म्हणून या सभेंत मुळीच शोभत नाही. मत्स्यराज पहात असतांना व हे सारे सभासद जिवंत असतांना माझा असा अपमान व्हावा याचा अर्थच असा आहे कीं, कीचक तर अधार्मिक आहेच; पण राजा विराट व त्याची सेवा करणारे हे सारे सभासदही अत्यत अधार्मिक आहेत. तिचा तो विलाप ऐकून युधिष्ठिर तिला म्हणाले : हे सैरंध्री, तू येथें न थांबतांच सुदेष्णेच्या महालांत जा, पतीचे अनुवर्तन करणाऱ्या वीरपत्नी नेहमीच असे क्लेश भोगतात, पण शेवटी पतिलोक मिळवितात. तुझ्या पतींना क्रोध व्यक्त करावयास हा काळ योग्य नाहीं असें वाटत असलें पाहिजे. म्हणूनच सूर्यासारखे तेजस्वी गंधर्व या वेळीं घांवून येत नाहीत. तुला काळ वेळ कांही समजत नाहीं. उगाच येथें आक्रंदन करून राजसभेंत द्यूत खेळण्यांत निमग्न असलेल्या आम्हांला तू व्यर्थ विघ्न करीत आहेस. योग्य काळीं गंधर्व तुझें प्रिय करतील व तुझ्या अपमानाचें उत्तर देतील." पण द्रौपदीच्या सहनशीलतेची तार या वेळीं पूर्णपणें तुटली होती. संतापानें नेत्र लाल करून ती मानिनी स्त्री इतकेंच म्हणाली कीं :—

अतीव तेषां घृणिनामर्थेऽहं धर्मचारिणी ।
तस्य तस्यैव ते वध्या येषां ज्येष्ठोऽक्षिदेवितां ॥ ४५

—महाभारत, विराटपर्व अध्याय १६

" दुर्दैवानें मी ज्यांची पत्नी झालें ते भलतेच दयाशील आहेत. ज्यांच्यांतील ज्येष्ठ सदैव द्यूतांत रममाण होतो त्यांनीं जगांत अपमान व विटंबना यावांचून दुसरें काय पदरांत पाडून घेणें शक्य आहे ?" त्या दिवशी द्रौपदीच्या सहनशीलतेचे बंध पूर्णपणें तुटले

होते. दिवसभर ती तळमळत होती. अज्ञातवासाचा काळ संपेपर्यंत आपली अब्रू सुरक्षित राहील असा विश्वास तिला वाटत नव्हता. स्वत.ला लाथ मारणारा कीचक क्षणमात्रही जिवत राहूं नये अशी तिची इच्छा होती. कोण हे आपले काम करील याचा विचार करीत असता भीमसेनाच्या सामर्थ्यसपन्न मूर्तीवाचून दुसरें कोणीही आपलें काम करील असे तिला वाटेना. रात्रीच्या वेळी ती भीमसेनाच्या भेटीस्तव महानसात गेली. भीमाला हांक मारीत असतां तिचा संताप इतका अनावर झाला होता की, आयुष्यांत कधीही नाही असे शब्द तिने भीमाला ऐकविले ती म्हणाली :—

उत्तिष्ठोत्तिष्ठ किं शेषे भीमसेन यथा मृतः ।
नामृतस्य हि पापीयान् भार्यामालभ्य जीवति ॥ १५

—महाभारत, विराटपर्व अध्याय १७

" हे भीमसेना, एखाद्या मृताप्रमाणे तुम्ही स्वस्थ कसे झोपलांत! उठा. मनुष्य मेल्यावाचून दुरात्मे लोक त्याच्या बायकोची अप्रतिष्ठा करून कधी जिवत राहू शकत नाहीत." भीमसेनानें उठून तिचें सांत्वन केलें व तिच्या शोकाचें कारण विचारलें. त्या दिवशी तिच्या अत.करणांतील सर्व शोक खळाळून बाहेर पडलेला आहे. विराटपर्वातील हें प्रकरण वाचतांच कारुण्यमूर्ति याज्ञसेनीचें यथार्थ दर्शन झाल्यावांचून रहात नाही.

कारुण्यमूर्ति

ती भीमसेनाला म्हणाली :—

अशोच्यत्वं कुतस्तस्या यस्या भर्ता युधिष्ठिरः ।
जानन् सर्वाणि दुःखानि किं मां त्वं परिपृच्छसि ॥ १
यन्मां दासीप्रवादेन प्रातिकामी तदानयत् ।
सभापरिषदो मध्ये तन्मां दहति भारत ॥ २
पार्थिवस्य सुता नाम का नु जीवति मादृशी ।
अनुभूयेदृशं दुःखमन्यत्र द्रौपदीं प्रभो ॥ ३
वनवासगतायाश्च सैन्धवेन दुरात्मना ।
परामर्शो द्वितीयो वै सोढुमुत्सहते तु का ॥ ४

मत्सराज्ञः समक्षं तु तस्य धूर्तस्य पश्यतः ।
कीचकेन परामृष्टा का नु जीवति मादृशी ॥ ५
एवं बहुविधैः क्लेशैः क्लिश्यमानां च भारत ।
न मां जानासि कौन्तेय किं फलं जीवितेन मे ॥ ६
योऽयं राज्ञो विराटस्य कीचको नाम भारत ।
सेनानीः पुरुषव्याघ्र श्यालः परमदुर्मतिः ॥ ७
स मां सैरन्ध्रिवेषेण वसन्तीं राजवेश्मनि ।
नित्यमेवाह दुष्टात्मा भार्या मम भवेति वै ॥ ८
तेनापमन्त्रमाणाया वधार्हेण सपत्नहन् ।
कालेनेव फलं पक्वं हृदयं मे विदीर्यते ॥ ९
भ्रातरं च विगर्हस्व ज्येष्ठं दुर्द्यूतदेविनम् ।
यस्याऽस्मि कर्मणा प्राप्ता दुःखमेतदनन्तकम् ॥ १०
को हि राज्यं परित्यज्य सर्वस्वं चात्मना सह ।
प्रव्रज्यायैव दीव्येत विना दुर्द्यूतदेविनम् ॥ ११
यदि निष्कसहस्रेण यच्चान्यत्सारवद्धनम् ।
सायंप्रातरदेविष्यदपि संवत्सरान् बहून् ॥ १२
रुक्मं हिरण्यं वासांसि यानं युग्ममजाविकम् ।
अश्वाश्वतरसंघांश्च न जातु क्षयमावहेत् ॥ १३
सोऽयं द्यूतप्रवादेन श्रियः प्रत्यवरोपितः ।
तूष्णीमास्ते यथा मूढः स्वानि कर्माणि चिन्तयन् ॥ १४
दशनागसहस्राणि हयानां हेममालिनाम् ।
यं यान्तमनुयान्तीह सोऽयं द्यूतेन जीवति ॥ १५
रथाः शतसहस्राणि नृपाणाममितौजसाम् ।
उपासन्त महाराजमिन्द्रप्रस्थे युधिष्ठिरम् ॥ १६
शतं दासीसहस्राणां यस्य नित्यं महानसे ।
पात्रीहस्तं दिवारात्रमतिथीन् भोजयत्युत ॥ १७
एष निष्कसहस्राणि प्रदाय ददतां वरः ।
द्यूतजेन हृधनर्थेन महता समुपाश्रितः ॥ १८
एनं हि स्वरसम्पन्ना बहवः सूतमागधाः ॥
सायं प्रातरुपातिष्ठन् सुमृष्टमणिकुण्डलाः ॥ १९
सहस्रमृषयो यस्य नित्यमासन् सभासदः ।
तपः श्रुतोपसम्पन्नाः सर्वकामैरुपस्थिताः ॥ २०

अष्टाशीतिसहस्राणि स्नातका गृहमेधिनः ।
त्रिंशद्दासीक एकैको यान् बिभर्ति युधिष्ठिरः ॥ २१
अप्रतिग्राहिणां चैव यतीनामूर्ध्वरेतसाम् ।
दश चापि सहस्राणि सोऽयमास्ते नरेश्वरः ॥ २२
आनृशंस्यमनुक्रोशं संविभागस्तथैव च ।
यस्मिन्नेतानि सर्वाणि सोऽयमास्ते नरेश्वरः ॥ २३
अन्धान्वृद्धांस्तथाऽनाथान् बालान् राष्ट्रेषु दुर्गतान् ।
बिभर्ति विविधान् राजा धृतिमान् सत्यविक्रमः ॥
संविभागमना नित्यमानृशंस्याद्युधिष्ठिरः ॥ २४
स एष निरयं प्राप्तो मत्सस्य परिचारकः ।
सभायां देविता राज्ञः कङ्को ब्रूते युधिष्ठिरः ॥ २५
इन्द्रप्रस्थे निवसतः समये यस्य पार्थिवाः ।
आसन् बलिभृतः सर्वे सोऽद्यान्यैर्भूतिमिच्छति ॥ २६
पार्थिवाः पृथिवीपाला यस्यासन् वशवर्तिनः ।
स वशे विवशो राजा परेषामद्य वर्तते ॥ २७
प्रताप्य पृथिवीं सर्वां रश्मिमानिव तेजसा ।
सोऽयं राज्ञो विराटस्य सभास्तारो युधिष्ठिरः ॥ २८
यमुपासन्त राजानः सभायामृषिभिः सह ।
तमुपासीनमद्यान्यं पश्य पाण्डव पाण्डवम् ॥ २९
सदस्यं समुपासीनं परस्य प्रियवादिनम् ।
दृष्ट्वा युधिष्ठिरं कोपो वर्धते मामसंशयम् ॥ ३०
अतदर्हं महाप्राज्ञं जीवितार्थेऽभिसंस्थितम् ।
दृष्ट्वा कस्य न दुःखं स्याद् धर्मात्मानं युधिष्ठिरम् ॥ ३१
उपास्ते स्म सभायां यं कृत्स्ना वीर वसुन्धरा ।
तमुपासीनमप्यन्यं पश्य भारत भारतम् ॥ ३२
एवं बहुविधैर्दुःखैः पीड्यमानामनाथवत् ।
शोकसागरमध्यस्थां किं मां भीम न पश्यसि ॥ ३३

—महाभारत, विराटपव अध्याय १८

इदं तु ते महद्दुःखं यत्प्रवक्ष्यामि भारत ।
न मेऽभ्यसूया कर्तव्या दुःखादेतद् ब्रवीम्यहम् ॥ १
सूदकर्मणि हीने त्वमसमे भरतर्षभ ।
ब्रुवन् बल्लवजातीयः कस्य शोकं न वर्धयेः ॥ २

सूपकारं विराटस्य बल्लवं त्वां विदुर्जनाः ॥
प्रेष्यत्वं समनुप्राप्तं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३
यदा महानसे सिद्धे विराटमुपतिष्ठसि ।
ब्रुवाणो बल्लवः सूदस्तदा सीदति मे मनः ॥ ४
यदा प्रहृष्टः सम्राट् त्वां संयोधयति कुञ्जरैः ।
हसन्त्यन्तःपुरे नार्यो मम तूद्विजते मनः ॥ ५
शार्दूलैर्महिषैः सिंहैरागारे योध्यसे यदा ।
कैकेय्याः प्रेक्षमाणायास्तदा मे कश्मलं भवेत् ॥ ६
तत उत्थाय कैकेयी सर्वास्ताः प्रत्यभाषत ।
प्रेष्याः समुत्थिताश्चापि कैकेयीं ताः स्त्रियोऽब्रुवन् ॥ ७
प्रेष्य मामनवद्याङ्गीं कश्मलोपहतामिव ।
स्नेहात्संवासजाद् धर्मात्सूदमेषा शुचिस्मिता ॥ ८
योध्यमानं महावीर्यमियं समनुशोचति ।
कल्याणरूपा सैरन्ध्री बल्लवश्चापि सुन्दरः ॥ ९
स्त्रीणां चित्तं च वुर्ज्ञेयं युक्तरूपौ च मे मतौ ।
सैरन्ध्री प्रियसंवासान्नित्यं करुणवादिनी ॥ १०
अस्मिन् राजकुले चेमौ तुल्यकालनिवासिनौ ।
इति ब्रुवाणा वाक्यानि सा मां नित्यमतर्जयत् ॥ ११
क्रुध्यन्तीं मां च संप्रेक्ष्य समशङ्कन्त मां त्वयि ।
तस्यां तथा ब्रुवत्यां तु दुःखं मां महदाविशत् ॥ १२
त्वय्येवं निरयं प्राप्ते भीमे भीमपराक्रमे ।
शौके यौधिष्ठिरे मग्ना नाहं जीवितुमुत्सहे ॥ १३
यः सदेवान् मनुष्यांश्च सर्वांश्चैकरथोऽजयत् ।
सोऽयं राज्ञो विराटस्य कन्यानां नर्तको युवा ॥ १४
योऽतर्पयदमेयात्मा खाण्डवे जातवेदसम् ।
सोन्तःपुरगतः पार्थ कूपेऽग्निरिव संवृतः ॥ १५
यस्माद् भयमभित्राणां सदैव पुरुषर्षभात् ।
स लोकपरिभूतेन वेषेणास्ते धनञ्जयः ॥ १६
यस्य ज्याक्षेपकठिनौ बाहू परिघसन्निभौ ।
स शङ्खपरिपूर्णाभ्यां शोचन्नास्ते धनञ्जयः ॥ १७
यस्य ज्यातलनिर्घोषात्समकम्पन्त शत्रवः ।
स्त्रियो गीतस्वनं तस्य मुदिताः पर्युपासते ॥ १८

किरीटं सूर्यसङ्काशं यस्य मूर्धन्यशोभत ।
वेणी विकृतकेशान्तः सोऽयमद्य धनञ्जयः ॥ १९
तं वेणीकृतकेशान्तं भीमधन्वानमर्जुनम् ।
कन्यापरिवृतं दृष्ट्वा भीम सीदति मे मनः ॥ २०
यस्मिन्नस्त्राणि दिव्यानि समस्तानि महात्मनि ।
आधारः सर्वविद्यानां स धारयति कुण्डले ॥ २१
स्प्रष्टुं राजसहस्राणि तेजसाऽप्रतिमानि वै ।
समरे नाभ्यवर्तन्त वेलामिव महार्णवः ॥ २२
सोऽयं राज्ञो विराटस्य कन्यानां नर्तको युवा ।
आस्ते वेशप्रतिच्छन्नः कन्यानां परिचारकः ॥ २३
यस्य स्म रथघोषेण समकम्पन्त मेदिनी ।
स पर्वतवना भीम सहस्थावरजङ्गमा ॥ २४
यस्मिन् जाते महाभागे कुन्त्याः शोको व्यनश्यत ।
स शोचयति मामद्य भीमसेन तवानुजः ॥ २५
भूषितं तमलङ्कारैः कुण्डलैः परिहाटकैः ।
कम्बुपाणिनमायान्तं दृष्ट्वा सीदति मे मनः ॥ २६
यस्य नास्ति समो वीर्ये कश्चिदुर्व्यां धनुर्धरः ।
सोऽद्य कन्यापरिवृतो गायन्नास्ते धनञ्जयः ॥ २७
धर्मे शौर्ये च सत्ये च जीवलोकस्य संमतम् ।
स्त्रीवेषविकृतं पार्थं दृष्ट्वा सीदति मे मनः ॥२८
यदा ह्येनं परिवृतं कन्याभिर्वेषरूपिणम् ।
प्रभिन्नमिव मातङ्गं परिकीर्णं करेणुभिः ॥ २९
मत्स्यमर्थपतिं पार्थं विराटं समुपस्थितम् ।
पश्यामि तुर्यमध्यस्थं दिशो नश्यन्ति मे तदा ॥ ३०
नूनमार्या न जानाति कृच्छ्रं प्राप्तं धनञ्जयम् ।
अजातशत्रुं कौरव्यं मग्नं दुर्द्यूतदेविनम् ॥ ३१
तथा दृष्ट्वा यवीयांसं सहदेवं गवां पतिम् ।
मोघं गोवेषमायान्तं पाण्डुभूताऽस्मि भारत ॥ ३२
सहदेवस्य वृत्तानि चिन्तयन्ती पुनः पुनः ।
न निद्रामभिगच्छामि भीमसेन कुतो रतिम् ॥ ३३
न विन्दामि महाबाहो सहदेवस्य दुष्कृतम् ।
यस्मिन्नेवंविधं दुःखं प्राप्नुयात् सत्यविक्रमः ॥ ३४

ब्रूयामि भरतश्रेष्ठ दृष्ट्वा ते भ्रातरं प्रियम् ।
गोषु गोवृषसंकाशं मत्स्येनाभिनिवेशितम् ॥ ३५
संरब्धं रक्तनेपथ्यं गोपालानां पुरोगमम् ।
विराटमभिनन्दन्तमथ मे भवति ज्वरः ॥ ३६
सहदेवं हि मे वीरं नित्यमार्या प्रशंसति ।
महाभिजनसम्पन्नः शीलवान् वृत्तवानिति ॥ ३७
ह्रीनिषेवो मधुरवाक् धार्मिकश्च प्रियश्च मे ।
स तेऽरण्येषु वोढव्यो याज्ञसेनि क्षपास्वपि ॥ ३८
सुकुमारश्च शूरश्च राजानं चाप्यनुव्रतः ।
ज्येष्ठापचायिनं वीरं स्वयं पाञ्चालि भोजयेः ॥ ३९
इत्युवाच हि मां कुन्ती रुदती पुत्रगृद्धिनी ।
प्रव्रजन्तं महारण्यं तं परिष्वज्य तिष्ठति ॥ ४०
तं दृष्ट्वा व्यापृतं गोषु वत्सचर्मक्षपाशयम् ।
सहदेवं युधां श्रेष्ठं किं नु जीवामि पाण्डव ॥ ४१
यस्त्रिभिर्नित्यसम्पन्नो रूपणास्त्रेण मेधया ।
सोऽश्वबन्धो विराटस्य पश्य कालस्य पर्ययम् ॥ ४२
अभ्यकीर्यन्त वृन्दानि दामग्रंथिमुदीक्ष्य तम् ।
विनयन्तं जवेनाश्वान् महाराजस्य पश्यतः ॥ ४३
अपश्यमेनं श्रीमन्तं मत्स्यं भ्राजिष्णुमुत्तमम् ।
विराटमुपतिष्ठन्तं दर्शयन्तं च वाजिनः ॥ ४४
किं नु मां मन्यसे पार्थ सुखिनीति परंतप ।
एवं दुःखशताविष्टा युधिष्ठिरनिमित्ततः ॥ ४५
अतः प्रतिविशिष्टानि दुःखान्यनानि भारत ।
वर्तन्ते मयि कौन्तेय वक्ष्यामि शृणु तान्यपि ॥ ४६
युष्मासु ध्रियमाणेषु दुःखानि विविधान्युत ।
शोषयन्ति शरीरं मे किं नु दुःखमतःपरम् ॥ ४७

—महाभारत, विराटपर्व अध्याय १९

अहं सैरन्ध्रिवेषेण चरन्ती राजवेश्मनि ।
शौचदाऽस्मि सुदेष्णाया अक्षधूर्तस्य कारणात् ॥ १
विक्रियां पश्य मे तीव्रां राजपुत्र्याः परंतप ।
आत्मकालमुदीक्षन्ती सर्वं दुःखं किलान्तवत् ॥ २
अनित्या किल मर्त्यानामर्थसिद्धिर्जयाजयौ ।
इति कृत्वा प्रतीक्षामि भर्तृणामुदयं पुनः ॥ ३

चक्रवत्परिवर्तन्ते हृद्यर्थाश्च व्यसनानि च ।
इति कृत्वा प्रतीक्षामि भर्तृणामुदयं पुनः ॥ ४
य एव हेतुर्भवति पुरुषस्य जयावहः ।
पराजये च हेतुश्च स इति प्रतिपालये ॥
किं मां न प्रतिजानीषे भीमसेन मृतामिव ॥ ५
दत्वा याचन्ति पुरुषा हत्वा वध्यन्ति चापरे ।
पातयित्वा च पात्यन्ते परैरिति च मे श्रुतम् ॥ ६
न दैवस्यातिभारोस्ति न चैवास्यातिवर्तनम् ।
इति चाप्यागमं भूयो दैवस्य प्रतिपालये ॥ ७
स्थितं पूर्वं जलं यत्र पुनस्तत्रैव गच्छति ।
इति पर्यायमिच्छन्ती प्रतीक्षे उदयं पुनः ॥ ८
दैवेन किल यस्यार्थः सुनीतोऽपि विपद्यते ।
दैवस्य चागमे यत्नस्तेन कार्यो विजानता ॥ ९
यत्तु मे वचनस्यास्य कथितस्य प्रयोजनम् ।
पृच्छ मां दुःखितां तत्त्वं पृष्टा चात्र ब्रवीमि ते ॥ १०
महिषी पाण्डुपुत्राणां दुहिता द्रुपदस्य च ।
इमामवस्थां संप्राप्ता मदन्या का जिजीविषेत् ॥ ११
कुरून् परिभवेत् सर्वान् पाञ्चालानपि भारत ।
पाण्डवेयांश्च संप्राप्तो मम क्लेशो हृदारिदम ॥ १२
भ्रातृभिः श्वशुरैः पुत्रैः बहुभिः परिवारिता ।
एवं समुदिता नारी का त्वन्या दुःखिता भवेत् ॥ १३
नूनं हि बालया धातुर्मया वै विप्रियं कृतम् ।
यस्य प्रसादाद् दुर्नीतिं प्राप्तास्मि भरतर्षभ ॥ १४
वर्णावकाशमपि मे पश्य पाण्डव यादृशम् ।
तादृशो मे न तत्रासीत् दुःखे परमके तदा ॥ १५
त्वमेव भीम जानीषे यन्मे पार्थ सुखं पुरा ।
साऽहं दासीत्वमापन्ना न शान्तिमवशा लभे ॥ १६
नादैविकमहं मन्ये यत्र पार्थो धनञ्जयः ।
भीमधन्वा महाबाहुरास्ते छन्न इवानलः ॥ १७
अशक्या वेदितुं पार्थ प्राणिनां वै गतिर्नरैः ।
विनिपातमिमं मन्ये युष्माकं हृदविचिन्तितम् ॥ १८
यस्या मम मुखप्रेक्षा यूयमिन्द्रसमाः सदा ।
सा प्रेक्षे मुखमन्यासामवराणां वरा सती ॥ १९

पश्य पाण्डव मेऽवस्थां यथा नार्हामि वै तथा ।
युष्मासु ध्रियमाणेषु पश्य कालस्य पर्ययम् ॥ २०
यस्य सागरपर्यन्ता पृथिवी वशवर्तिनी ।
आसीत्साऽद्य सुदेष्णाया भीताऽहं वशवर्तिनी ॥ २१
यस्याः पुरःसरा आसन् पृष्ठतश्चानुगामिनः ।
साहमद्य सुदेष्णायाः पुरःपश्चाच्च गामिनी ॥ २२
इदं तु दुःखं कौन्तेय ममासह्यं निबोध तत् ।
या न जातु स्वयं पिंष गात्रोद्वर्तनमात्मनः ।
अन्यत्र कुन्त्या भद्रं ते सा पिनष्म्यद्य चन्दनम् ॥ २३
पश्य कौन्तेय पाणी मे नैवाभूतां हि यौ पुरा ।
इत्यस्य दर्शयामास किणवन्तौ करावुभौ ॥ २४
बिभेमि कुन्त्या या नाहं युष्माकं वा कदाचन ।
साऽद्याग्रतो विराटस्य भीता तिष्ठामि किङ्करी ॥ २५
किं नु वक्ष्यति सम्राण्मां वर्णकः सुकृतो न वा ।
नान्यपिष्टं हि मत्स्यस्य चन्दनं किल रोचते ॥ २६

वैशपायन उवाच ।

सा कीर्तयन्ती दुःखानि भीमसेनस्य भामिनी ।
रुरोद शनकैः कृष्णा भीमसेनमुवीक्षती ॥ २७
सा बाष्पकलया वाचा निःश्वसन्ती पुनः पुनः ।
हृदयं भीमसेनस्य घट्टयन्तीदमब्रवीत् ॥ २८
नात्मं कृतं मया भीम देवानां किल्बिषं पुरा ।
अभाग्या यत्र जीवामि कर्तव्ये सति पाण्डव ॥ २९
ततस्तस्याः करौ सूक्ष्मौ किणबद्धौ वृकोदरः ।
मुखमानीय वै पत्न्या रुरोद परवीरहा ॥ ३०
तौ गृहीत्वा च कौन्तेयो बाष्पमुत्सृज्य वीर्यवान् ।
ततः परमदुःखार्त इदं वचनमब्रवीत् ॥ ३१

—महाभारत, विराटपर्व अध्याय २०

" तुम्ही सर्व कांहीं गोष्टी जाणत असून मी दुःख कां करतें असें मला विचारतां हें मोठें आश्चर्य आहे. मी हंसावें असें पांडवांनीं माझ्यासाठीं काय केलें आहे ? जिला युधिष्ठिर पति म्हणून मिळाला त्या दुर्दैवी स्त्रीच्या भाग्यांत रडण्यावांचून दुसरें काय असू शकेल ? प्रातिकामी सूत सर्व सभेमध्यें 'दासी' म्हणून मला म्हणाला. ती

गोष्ट अजूनही माझे हृदय जाळीत आहे. इतकें भयानक दुःख भोगून माझ्यासारखी कोणती राजकन्या जिवंत राहणें शक्य आहे ? एक द्रौपदीच अशी दुर्दैवी स्त्री आहे की, जिच्यावर इतकें भयानक दुःखाचे प्रसग ओढवून देखील ती जिवत आहे. दुःखाचा एक प्रसंग माझ्यावर आला आहे काय ? मी वनात होते तर दुरात्म्या सैंधव जयद्रथानें माझ्यावर बलात्कार करण्याचा प्रसग आणला. तो तुमचा धूर्त ज्येष्ठ बंधु युधिष्ठिर पहात असतां विराटाच्या समक्ष कीचकानें माझा अपमान केला. या स्थितीत माझ्याशिवाय दुसरें कोण जिवत राहील ? एकाहून एक भयानक दु.खें मी भोगीत असतां माझ्या पतीना त्याची जाणीवही नाही ! मग मी जिवंत राहण्याचा उपयोग तरी काय ? विराट् राजाचा सेनापति असलेला त्याचा दुर्बुद्धि शालक कीचक मी या सैरंध्री वेषात येथें रहात असतां रोज मला स्वतःची भार्या हो म्हणून म्हणतो. तो सर्वस्वीं वध्य आहे. शत्रूला ठार मारण्याइतके तुम्ही पराक्रमी आहांत. तरीही मला हे शब्द रोज ऐकावे लागतात. माझे हृदय कां विदीर्ण होऊं नये. ज्याच्या कर्मानें हे अनंत व अपार दुःख भोगण्याचा प्रसंग माझ्यावर आलेला आहे त्या आपल्या द्यूतासक्त ज्येष्ठ भावाला माझ्या दुःखाचें कारण विचारा व त्याची निर्भर्त्सना करा. त्याच्यासारख्या अट्टल जुगाऱ्यावांचून दुसरें कोण स्वतःसुद्धां राज्य गमावून व्यर्थ वनवासाचे जीवन पत्करील? रोज सकाळ संध्याकाळ वर्षानुवर्षें तो संपत्ति लावून द्यूत खेळत बसला असता तरीदेखील संपूं नये इतकी संपत्ति आपल्याजवळ होती. तो हा सर्वस्व द्यूतांत गमावून बसला व तरीही आपल्याच कर्मांत चूर राहून स्वस्थ बसलेला आहे याला काय म्हणावें ? गळ्यांत सुवर्णाच्या माळा घातलेले दहा हजार हत्ती व घोडे ज्याच्या पाठोपाठ चालावे, लक्षावधि रथ सज्ज करून त्यावर अधिरूढ झालेल्या शेंकडो राजांनीं इंद्रप्रस्थांत ज्या सम्राटाची सेवा करावी, हातांत भरलेलीं अन्नाचीं ताटें घेऊन सहस्रावधि अतिथीना ज्याच्या पाकशाळेंत दिवस व रात्र भोजन घालीत, स्वरसंपन्न व कानांत रत्नांचीं कुंडलें घातलेले स्तुतिपाठक सकाळी व संध्याकाळी ज्याची उपासना करीत, तप व विद्या

ांनी सपन्न असलेले सहस्रावधि ऋषि, ज्याचे सभासद होऊन सर्व
च्छा परिपूर्ण झाल्यामुळें नेहमी तृप्त राहत, ऐशी हजार स्नातक
ा सहस्रावधि यति ज्याच्या आश्रयानें राहात, दया, औदार्य व
न्यायसिद्ध वर्तन हा ज्याचा स्वभाव होता, जो धैर्यशाली व सत्य
पराक्रमी अंध, वृद्ध, अनाथ, बाल, व संकटात सांपडलेले लोक यांचें
सदैव सरक्षण करी, तो सम्राट युधिष्ठिर मत्स्यराज्याचा परिचारक
बनून द्यूतावर उपजीविका करीत त्याच्या सभेंतील श्रेष्ठ द्यूतकार
म्हणून कंक या नांवानें या दुर्गतीच्या नरकांत पिचत पडला आहे.
मोठमोठे राजे इंद्रप्रस्थांत नजराणे समर्पण करून ज्याच्याकडून
संरक्षण अपेक्षीत तो दुसऱ्याकडून उपजीवन मागतो आहे ! पृथ्वी-
वरील सर्व राजे ज्याच्या स्वाधीन असावे तो विवश स्थितीत दुस-
ऱ्याच्या स्वाधीन झालेला आहे ! सूर्याच्या किरणज्वालांप्रमाणें
ज्याचा प्रभाव जगावर पसरला होता, तो विराटाचा सभास्तार
बनला आहे ! विराटाला बरे वाटेल तसें तो बोलतो व वागतो.
युधिष्ठिरांना पाहून माझा संताप व शोक अनावर होतो. धर्मात्मा
युधिष्ठिराला जीवनासाठी ही लाचारी पत्करावी लागावी काय ?
स्पष्ट बोलतें याबद्दल क्षमा करा. रागावू नका. हृदयाला पीळ
पडतो म्हणूनच मी हें बोलतें. स्वयपाक्याच्या हीन कामांत
तुमच्यासारख्या महाप्रतापी पुरुषाला गढलेले पाहून कोणाला दुःख
होणार नाही ? राजा विराटाचा स्वयंपाकी म्हणून लोक तुम्हांला
ओळखतात यापेक्षां अधिक दुःखाचें मला कांही असू शकेल का ?
स्वतःला बल्लव म्हणून स्वयंपाक सिद्ध करून तुम्ही राजा विराटा-
समोर उभे होतां तेव्हां माझें अंतःकरण करपून जातें. तुम्ही बल-
वान् आहांत म्हणून आनंदानें राजा मदोन्मत्त हत्तीशी जेव्हां आप-
णांस झुंज घ्यावयास लावतो तेव्हां अंतःपुरांतील स्त्रिया हंसतात
पण मला अत्यंत दुःख होतें. तें पुरें पडत नाहीं म्हणूनच कीं काय
माजलेले रेडे, वाघ व सिंह यांच्याशी राणीसमोर जेव्हां तुमची झुंज
लावण्यांत येते, तेव्हां शोकानें मला मूर्च्छा येते. तेव्हां राणी व
तिच्या दासी आपणांस काय म्हणतात माहीत आहे? त्या म्हणतात,
सहवासानें या सैरंध्रीचें या स्वयंपाक्यावर काय प्रेम बसलें आहे

पहा. सैरंध्री सुंदर आहे व बल्लवही सुंदर आहे. जोडा चांगला दिसतो. स्त्रियांचें चित्त ओळखावयास कठिण असतें. दोघेही बरोबरच येथे रहावयास आले. तेव्हां काय आहे कुणास ठाऊक? हें ऐकतांच मी संतापतें. तों त्या मला अधिकच चिडवितात. ज्या स्थितीत पत्नीला आपल्या पतीला आपला पति म्हणतां येत नाही ती ही स्थिति नरकापेक्षांही अधिक भीषण नाही काय? तुमच्यासारखा भीमपराक्रमी पुरुष युधिष्ठिरामुळेच या दुर्गतीच्या नरकांत पिचत पडला आहेना ? हें सर्व दुःख पहात असतां मला क्षणभरही जिवंत रहाण्याची इच्छा होत नाही. ज्यानें एका रथानें देव व मनुष्यांना जिकले, तो पराक्रमी पार्थ विराटाच्या कन्यांना नृत्य शिकविणारा नर्तक बनला आहे, ज्यानें खांडव वन समर्पून अग्नीला प्रसन्न केलें तो खडुयांत अग्नि पडावा त्याप्रमाणें अतःपुरांत पडला आहे. जो शत्रूना सदैव थरकांपवीत असे तो षंढ म्हणून ओळखला जातो. धनुष्याच्या दोरीचे घट्टे ज्याच्या हाताला शोभवीत, त्यानें हातांत शंखाच्या बांगडया भरल्या आहेत! ज्याच्या धनुष्याच्या टणत्कारानें शत्रू थरकांपत तो गाण्यानें स्त्रियांना रिझवीत आहे! सूर्याप्रमाणें तेजस्वी किरीट ज्याच्या मस्तकावर शोभत असे त्यानें पाठीवर वेणी सोडली आहे. भयकर धनुष्य हातांत धारण करणारा अर्जुन वेणी घालून मुलीच्या घोळक्यांत उभा असलेला पाहिला की माझें अंतःकरण विदीर्ण होऊन जातें. सर्व दिव्यास्त्रें व विद्या यांचा जो आधार, समरांत ज्याच्या तेजाला राजे स्पर्शही करूं शकत नसत, ज्याच्या रथघोपानें पृथ्वी थरकांपावी, जो जन्मल्यावरोवर आर्या कुंतीचा सर्व शोक गेला, ज्याच्यासारखा पराक्रमी धनुर्धर जगांत कोणी नाही, त्या अर्जुनाला षंढाप्रमाणें स्त्रियांचे दागदागिने अंगावर घालून मुलीच्या घोळक्यांत वाद्यें वाजत असतां, विराटासमोर उपस्थित झालेले पाहून माझ्या डोळ्यापुढे अंधेरी येते. युधिष्ठिराच्या द्यूतप्रियतेमुळे पराक्रमी पार्थाची काय अवस्था झाली आहे याची आर्या कुंतीला कल्पनाही नसेल! व गोपरूपानें सहदेवाला येतांना पाहिलें कीं मी पांढरी फटक पडते. मला झोप मुळींच येत नाहीं. मग आनंद कुठला?

सहदेवानें असें काय पाप केले की त्याला हें दुःख भोगावें लागावें! कुतीनें त्याचा सभाळ मला करावयास सांगितला. त्याची ही काय दशा झाली आहे? सौदर्यसपन्न व अस्त्र आणि बुद्धि यानी युक्त नकुल विराटाचे घोडे सभाळीत आहेत. हातात अश्ववधनें घेऊन तो विराटाची सेवा करतो. युधिष्ठिरामुळे हें पहाण्याचा प्रसग माझ्यावर आलेला आहे. तुमची ही दुर्गति महातांना माझी काय अवस्था होत असेल! युधिष्ठिराच्या द्यूताच्या कैफानें मला अतः-पुरांत सैरध्रीच्या वेषाने विराटाची सेवा करावयास लाविलें आहे. लाभ, जय व पराजय हे अनित्य असतात. सकटें व लाभ पुन्हां पुन्हां येतात व जातात. या तत्त्वज्ञानाकडे लक्ष देऊन व एकदां एका ठिकाणी असलेले पाणी पुन्हां तेथे येईल अशा कल्पनेनें पुन्हां तुमचा उदय होईल असा विश्वास बाळगून मी माझें दुःख सहन करीत आहे. द्रुपदाची कन्या व पाडवाची राणी होण्याचें भाग्य जिला लाभले ती मी या अवस्थेत कशी जिवत राहू? मला असे क्लेश भोगावे लागावेत यात पांचाल व पांडव, इतकेंच नव्हे तर साऱ्या कौरव कुळाचाच पराभव आहे. समर्थ भ्राते, श्वशुर व पुत्र असतां इतके दुःख भोगणारी दुसरी कोणी स्त्री असेल काय? मी लहानपणींच परमेश्वराचा घोर अपराध केला असला पाहिजे. त्याशिवाय मला इतकें घोर दुःख कां भोगावें लागावे? आपण माझा वर्ण पाहिलात काय? पूर्वी तो कधीं असा होता का? दुःखानें पहा माझी काय अवस्था करून टाकली आहे! पूर्वी मी कोणतें ऐश्वर्य भोगलें हें आपणांस माहीत आहे. त्या मला दासी व्हावें लागल्यावर शांति कशी लाभावी? इंद्रासारखे पराक्रमी तुम्ही माझ्या प्रसन्नतेसाठीं पूर्वी माझ्याकडे पहात होता. ती मी श्रेष्ठ स्त्री असतांना माझ्या-पेक्षां हीन लोकांकडे आज मला त्यांची कृपा व्हावी म्हणून पहावें लागतें. या समुद्रवलयांकित पृथ्वीची मी एकवार सम्राज्ञी होते. आज मी सुदेष्णेच्या अधीन होऊन मी तिला भिते. पूर्वी माझ्या पाठीमागे दासी धावत. आज मी सुदेष्णेच्या पाठीमागें 'दासी' म्हणून धांवते. हे कौन्तेया, स्वतःसाठी मी कधी पूर्वी देखील चंदन उगाळलें नाही. केवळ आर्या कुंतीसाठींच मी चदन उगाळलें.

त्या मला सुदेष्णेसारख्या क्षुद्र स्त्रीसाठी चंदन उगाळावे लागतें. माझ्या हाताला पडलेले हे घट्टे पाहिलेत काय? पूर्वी कधी माझ्या हाताला असे घट्टे पडल्याचें पाहिले होतें काय? असें म्हणून द्रौपदीनें आपले तळहात भीमाला दाखविले. ती म्हणाली पूर्वी मी तुम्हांला व कुतीलाही भिण्याचा कधी प्रसग आला नाही, त्या मला दासी म्हणून राजा विराटाला भ्यावें लागतें. माझे चदन सम्राटाला आवडेल काय म्हणून मी भिते. या विराटाला म्हणे माझ्याच हातचें चदन आवडतें. असें म्हणून भीमसेनाच्या हृदयावर आपली मान टेकून द्रौपदी रडू लागली. निश्वास टाकीत ती म्हणाली, मी परमेश्वराचा मोठाच अपराध केला आहे, ज्या स्थितीत मी मरावें त्या स्थितीत मी जगतें हें केवढें दुर्दैव! भीमानें तिचे ते दोन्ही हात आपल्या तोंडाजवळ नेले व त्यांच्यावरील घट्टे पाहून तो रडू लागला. तिचें दुःख पाहून भीमासारख्या पुरुषाच्या नेत्रांतूनही अश्रुधारा वाहूं लागल्या युधिष्ठिराच्या धर्मकार्पण्यामुळें केवढ्या मोठ्या जीवनाचें हें भीषण बलिदान घडविलें आहे!

अग्नीची तेजस्वी ज्वाला

द्रौपदीच्या उत्पत्ति कथेंत यज्ञाग्नीच्या वेदीतून ती उत्पन्न झाल्याचें वर्णन आपण मागें पाहिलेंच आहे. अग्नीच्या ज्वालेप्रमाणेंच ती अत्यंत प्रखर आहे. ती खरी तेजस्विनी व मानधन क्षत्राणी आहे. तिच्या वर दिलेल्या विलापावरून युधिष्ठिरांच्या धर्मकार्पण्यामुळेंच इतक्या भयानक आपत्ति ओढवल्याची तिला खात्री पटली आहे व म्हणूनच प्रसंगी ती कठोर शब्द बोलते. ती इतकी मानधन आहे कीं दुसऱ्याचें कृपादान स्वीकारणें तिला पूर्णपणें असमत आहे. गांधारीच्या मध्यस्थीनें तिची सुटका झाल्यावर राजा धृतराष्ट्र तिला वर माग म्हणून म्हणू लागला. त्यावेळीं तिनें त्याला असें सांगितलें कीं:—

ददासि चेद्वरं महयं वृणोमि भरतर्षभ ।
सर्वधर्मानुगः श्रीमानदासोस्तु युधिष्ठिरः ॥ २८
मनस्विनमजानन्तो मैवं ब्रूयुः कुमारकाः ।
एष वै दासपुत्रो हि प्रतिविन्ध्यं ममात्मजम् ॥ २९

राजपुत्रः पुरा भूत्वा यथा नान्यः पुमान्क्वचित् ।
राजभिर्लालितस्यास्य न युक्ता दासपुत्रता ।। ३०
—महाभारत, सभापर्व अध्याय ७२

"आपल्याला मला वर द्यावयाचाच असेल तर युधिष्ठिर स्वतंत्र व्हावेत व ते दास असू नयेत येवढाच वर मला द्या. माझा मुलगा जो प्रतिविंध्य त्याला लोकांनी दासपुत्र म्हणू नये अशी माझी इच्छा आहे. राजपुत्र म्हणून मोठमोठ्या राजांनी सम्राट युधिष्ठिराच्या या पुत्राचें एकवार कोडकौतुक केले असतां त्याला दासपुत्र असें विशेषण कोणी लावावयाला नको." धृतराष्ट्र तिला दुसरा वर माग म्हणू लागला तेव्हां तिनें शस्त्रास्त्रांसहित भीमसेन, अर्जुन, नकुल व सहदेव यांचें स्वातंत्र्य मागितले. धृतराष्ट्र तिला तिसरा वर माग म्हणाला: तेव्हां ती म्हणाली:—

लोभो धर्मस्य नाशाय भगवन्नाहमुत्सहे ।
अनर्हां वरमादातुं तृतीयं राजसत्तम ।। ३४
एकमाहुर्वैश्यवरं द्वौ तु क्षत्रस्त्रियो वरौ ।
त्रयस्तु राज्ञो राजेन्द्र ब्राह्मणस्य शतं वराः ।। ३५
पापीयांस इमे भूत्वा संतीर्णाः पतयो मम ।
वेत्स्यन्ति चैव भद्राणि राजन्पुण्येन कर्मणा ।। ३६
—महाभारत, सभापर्व अध्याय ७१

"लोभ धर्माचा नाश करतो. मला तिसरा वर नको. वैश्याला एक, क्षत्रिय स्त्रीला दोन, राजाला तीन व ब्राह्मणाला अनेक वर मागण्याचाचा अधिकार आहे. दुर्गतीतून माझे पति पार होऊन स्वतंत्र झाले म्हणजे स्वतःच्या भरंवशावर ते आपलें गेलेलें वैभव परत मिळवितील."

वनवासात असतां द्रौपदीनें युधिष्ठिरांना वारंवार क्षत्रियांच्या कर्तव्याचा उपदेश केलेला आहे. क्षत्रियधर्माचें तिला सम्यक् ज्ञान असून आपल्या क्षमाशील पतीचें तेज वाढविण्याचें तिचें कर्तव्य तिनें योग्य रीतीनें पार पाडलें. अपमान सहन करणारी युधिष्ठिराची थंड प्रवृत्ति त्या मानिनीला कधीच आवडली नाही. ती युधिष्ठिरांना वनांत म्हणते:—

नूनं च तव वै नास्ति मन्युर्भरतसत्तम ।
यत्ते भ्रातॄंश्च मां चैव दृष्ट्वा न व्यथते मनः ॥ ३६
न निर्मन्युः क्षत्रियोस्ति लोके निर्वचनं स्मृतम् ।
तदद्य त्वयि पश्यामि क्षत्रिये विपरीतवत् ॥ ३७
यो न दर्शयते तेजः क्षत्रियः काल आगते ।
सर्वभूतानि तं पार्थ सदा परिभवन्त्युत ॥ ३८
तत्त्वया न क्षमा कार्या शत्रून्प्रति कथंचन ।
तेजसैव हि ते शक्या निहन्तुं नात्र संशयः ॥३९

—महाभारत, वनपर्व अध्याय २७

" तुम्हाला राग म्हणजे काय तो माहीतच नाही असें दिसतें. एरवीं आपल्या बंधूची व माझी दुर्गति पाहून तुम्ही असे स्वस्थ राहिला नसतां. क्रोध नसलेला क्षत्रिय जगांत असूच शकत नाहीं. क्षत्रिय कुलांत जन्म घेऊनही विपरीत आचरण करणारे आपणच फक्त मला दिसतां. योग्य वेळी जो क्षत्रिय आपलें तेज प्रकट करीत नाहीं, त्याला सर्व प्राणिमात्राकडून नेहमींच अपमान सहन करावा लागतो. तेजानेंच ज्यांना मारणें शक्य आहे त्याला क्षमा करूं नये. युधिष्ठिर तिला क्षमेचें महत्त्व समजावून देऊं लागले त्या-वेळीं ती त्यांना इतकेंच म्हणाली की:—

नमो धात्रे विधात्रे च यौ मोहं चक्रतुस्तव ।
पितृपैतामहे वृत्ते वोढव्ये तेऽन्यथा मतिः ॥ १
नेह धर्मानृशंसाभ्यां न क्षान्त्या नार्जवेन च ।
पुरुषः श्रियमाप्नोति न घृणित्वेन कर्हिचित् ॥ ३

—महाभारत, वनपर्व अध्याय ३०

" त्या परमेश्वराला माझा साष्टांग नमस्कार असो कीं ज्यानें तुमची बुध्दीच भ्रांत करून टाकली. पितृपितामहांच्या परंपरेनें चालत आलेलें कर्तव्य पार पाडण्याऐवजी भलत्याच गोष्टीकडे तुमचें मन धांव घेतें. नुसते दया, क्षमा, शांति, आर्जव व कारुण्य एव-ढ्याच धर्मांचा आश्रय करून आजपर्यंत कोणीही वैभवशाली झालेले मीं कधीं पाहिलें नाहीं." पराक्रमाच्या बाबतींत आपल्या पतींना या मानिनी स्त्रीनें नेहमीच प्रोत्साहित केलेलें आहे. अर्जुन ज्या वेळीं अस्त्रप्राप्तीसाठीं तपश्चर्या करावयास जाऊं लागला तेव्हां द्रौपदी त्याला म्हणाली:

यत्ते कुन्ती महाबाहो जातस्यैच्छद्धनञ्जय ॥ २४
तत्तेऽस्तु सर्वं कौन्तेय यथा च स्वयमिच्छसि ॥ २५

—महाभारत, वनपर्व अध्याय ३७

"हे धनजया, आपल्या जन्माच्या वेळीं कुंतीनें ज्या इच्छा केल्या होत्या त्या सर्व परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपणांवर आहे. कीचकाकडून अपमानित होण्याचा प्रसंग येतांच भीमाचें अंतःकरण प्रदीप्त करून तिनें पुढील शब्दांनीं त्याला वाट न पहातां तात्काळ कीचकाचा वध करावयास प्रवृत्त केलें आहे. ती म्हणाली:–

दर्शने दर्शने हन्याद्यदि जह्यां च जीवितम् ।
तद्धर्मे यतमानानां महान्धर्मो नशिष्यति ॥ ३९
जयद्रथं तथैव त्वमजैषीर्भ्रातृभिः सह ।
जहीममपि पापिष्ठं योऽयं मामवमन्यते ॥ ४५
कीचको राजवाल्लभ्याच्छोककृन्मम भारत ।
तमेवं कामसंमत्तं भिन्धि कुम्भमिवाश्मनि ॥ ४६
यो निमित्तमनर्थानां बहूनां मम भारत ।
तं चेज्जीवन्तमादित्यः प्रातरभ्युदयिष्यति ॥ ४७
विषमालोड्य पास्यामि मा कीचकवशं गमम् ।
श्रेयो हि मरणं मह्यं भीमसेन तवाग्रतः ॥ ४८

—महाभारत, विराटपर्व अध्याय २१

"जर आपण आतां अज्ञातवास संपण्याची वाट पहात बसाल तर आपली ही पत्नी कांही जिवंत राहणार नाहीं. पूर्वीं जयद्रथाला आपण जिकले. आतां माझा घोर अपराध करणाऱ्या या अधम कीचकाला ठार मारा. राजाला प्रिय असल्यामुळें कामांध कीचक मला दुःख देण्याचें साहस करीत आहे. दगडावर आपटून घडा फोडावा त्याप्रमाणें आपण कीचकाला ठार मारा. माझ्या अनंत दुःखांचें कारण असणारा कीचक जर उद्यां प्रातःकाळीं सूर्योदय झाल्यावर जिवत असलेला मी पाहीन तर मी विष पिऊन प्राणत्याग केल्यावांचून राहणार नाहीं. आपला देह कीचकाच्या स्वाधीन करण्याऐवजी तुमच्यासमोर प्राणत्याग करणें मला अधिक श्रेयस्कर वाटतें." तिच्या या निर्वाणीच्या शब्दांमुळेंच भीम कीचकाला तात्काळ ठार मारावयास

सिद्ध झाला. द्रौपदीनें भीमाच्या आज्ञेनुसार कीचकाला फसवून नर्तनागारांत आणलें व पुनश्च भीमाला असें सांगितलें कीं:—

अश्रुदुःखाभिभूताया मम मार्जस्व भारत।
आत्मनश्चैव भद्रं ते कुरु मानं कुलस्य च ॥ २९

—महाभारत, विराटपर्व अध्याय २२

"आपण माझ्या अश्रूंचें परिमार्जन करा व स्वतःच्या कुळाचा मान संरक्षिला जाईल असेंच महनीय कृत्य करा." भीमानें भीषणपणें कीचकाला ठार मारल्यावर त्याचें प्रेत द्रौपदीनें स्वतः पाहिलें तेव्हांच तिचे समाधान झालें. भीम कीचकाला ठार मारीत असतां द्रौपदी तेथे जवळच उपस्थित होती. महाभारतकार म्हणतात :—

तं संमथितसर्वाङ्गं मांसपिण्डोपमं कृतम्।
कृष्णाया दर्शयामास भीमसेनो महाबलः ॥ ८३
उवाच च महातेजा द्रौपदीं योषितां वराम्।
पश्यैनमेहि पाञ्चालि कामुकोऽयं यथा कृतः ॥ ८४
एवमुक्त्वा महाराज भीमो भीमपराक्रमः।
पादेन पीडयामास तस्य कायं दुरात्मनः ॥ ८५
ततोऽग्निं तत्र प्रज्वाल्य दर्शयित्वा तु कीचकम्।
पाञ्चालीं स तदा वीर इदं वचनमब्रवीत् ॥ ८६
प्रार्थयन्ति सुकेशान्ते ये त्वां शीलगुणान्विताम्।
एवं ते भीरु वध्यन्ते कीचकः शोभते यथा ॥ ८७
तत्कृत्वा दुष्करं कर्म कृष्णायाः प्रियमुत्तमम्।
तथा स कीचकं हत्वा गत्वा रोषस्य वै शमम् ॥ ८८
आमन्त्र्य द्रौपदीं कृष्णां क्षिप्रमायान्महानसम्।
कीचकं घातयित्वा तु द्रौपदी योषितां वरा ॥
प्रहृष्टा गतसंतापा सभापालानुवाच ह ॥ ८९
कीचकोऽयं हतः शेते गन्धर्वैः पतिभिर्मम।
परस्त्रीकामसंमत्तस्तत्रागच्छत पश्यत ॥ ९०

—महाभारत, विराटपर्व अध्याय २२

" संपूर्ण शरीर विमथन करून टाकलेला व मांसाचा लोळागोळा केलेला तो कीचक भीमसेनानें द्रौपदीला दाखविला. तो म्हणाला हे पांचाली, मी या कामुकाची कशी अवस्था करून टाकली आहे हें

स्वतः प्रत्यक्ष पहा. असें म्हणून भीमानें लाथेनेंच तो कीचकाच्या देहाचा मांसगोल द्रौपदीला दाखविला. तेथें अग्नि प्रज्वलित करून व त्याच्या प्रकाशांत कीचकाचें तें प्रेत द्रौपदीला दाखवून भीम म्हणाला : तुझ्यासारख्या साध्वी स्त्रीची जे विटंबना करावयास प्रवृत्त होतात त्यांना असाच भयानक मृत्यु येत असतो. भीम हें दुष्कर कर्म करून व द्रौपदीचें प्रिय करून तिचा निरोप घेऊन पाकशाळेंत निघून गेला. कीचकाच्या मृत्यूनें द्रौपदीचा सर्व शोक जाऊन तिला अत्यंत आनंद झाला व नृत्यशाळेच्या रक्षकांना बोलावन तिनें सांगितलें की, परस्त्रीच्या अभिलाषेनें कामोन्मत्त झालेला कीचक माझ्या गंधर्व पतींनीं ठार मारला आहे. या व त्याला पहा.

पुढें अश्वत्थाम्यानें तिचे पुत्र मारल्यावर भीमसेनाला तिनें त्याचा प्रतिकार करण्यासाठी अशीच घोर उत्तेजना दिली आहे. ती भीमाला म्हणाली :—

भीमसेनमथागत्य परमं वाक्यमब्रवीत् ।
त्रातुमर्हसि मां भीम क्षत्रधर्ममनुस्मरन् ॥ २२
जहि तं पापकर्माणं शंबरं मघवानिव ।
न हि ते विक्रमे तुल्यः पुमानस्तीह कश्चन ॥ २३
श्रुतं तत्सर्वलोकेषु परमव्यसने यथा ।
द्वीपोऽभूस्त्वं हि पार्थानां नगरे वारणावते ॥ २४
हिडिम्बदर्शने चैव तथा त्वमभवो गतिः ।
तथा विराटनगरे कीचकेन भृशार्दिताम् ॥ २५
—महाभारत, सौप्तिकपर्व अध्याय ११

"क्षत्रियोचित कर्मे करणें हें आपलें कर्तव्य आहे. शंबराला इंद्रानें ठार मारले तसें आपण पापी अश्वत्थाम्याला ठार मारा. तुमच्यासारखा पराक्रमी पुरुष दुसरा कोणीही नाहीं. पार्थांना वारणावतातून तुम्हीच वांचविलें. हिडिंबासुरापासून सर्वांचें रक्षण तुम्हींच केलें. विराटनगरीत कीचकानें केलेल्या माझ्या अपमानाचा सूड तुम्हीच घेतला. अशा स्थितीत या दुःखापासून माझें रक्षण तुमच्याशिवाय कोण करणार ?

महामानिनी

स्वाभिमानी द्रौपदीचा हा ज्वलंत आविष्कार महाभारतांत ठिकठिकाणी दृष्टीस पडतो. ती तेजस्विनी स्त्री कौरवांनीं केलेले तिचे अपमान कधीही विसरली नाही. ज्या वेळीं तिचे पति कुलक्षयाच्या भीतीनें स्वतःचे अधिकार सोडून व अपमान विसरून केवळ पांच गांवांवर कौरवांशी सधि करावयास प्रवृत्त झाले व भगवान् श्रीकृष्ण संधीसाठी शिष्टाई करावयास जाण्याचा प्रसंग उद्भवला त्या वेळी कुलस्त्रीच्या अब्रूची आपल्या पतींना यत्किंचित्ही पर्वा नाही असें पाहून तिचें अतःकरण खवळून उठलें. तिनें आपल्या तेजस्वी वाक्यांनीं भगवान् श्रीकृष्णासारख्या स्थितप्रज्ञ पूर्णावतारालाही क्रोध आणला. महाभारतकारानी या प्रसंगाचें अतिशय उत्कृष्ट वर्णन केलेलें आहे. तें येथे उद्धृत करून आपण या मानिनी स्त्रीचे वर्णन पूर्ण करू. महाभारतकार म्हणतात :—

राज्ञस्तु तद्वचं श्रुत्वा धर्मार्थसहितं हितम् ।
कृष्णा दाशार्हमासीनमब्रवीच्छोककर्शिता ।। १
सुता द्रुपदराजस्य स्वसितायतमूर्धजा ।
संपूज्य सहदेवं च सात्यकिं च महारथम् ।। २
भीमसेनं च संशान्तं दृष्ट्वा परमदुर्मनाः ।
अश्रुपूर्णेक्षणा वाक्यमुवाचेदं मनस्विनी ।। ३
विदितं ते महाबाहो धर्मज्ञ मधुसूदन ।
यथा निकृतिमास्थाय भ्रंशिताः पाण्डवाः सुखात् ।। ४
धृतराष्ट्रस्य पुत्रेण सामात्येन जनार्दन ।
यथा च सञ्जयो राज्ञा मन्त्रं रहसि श्रावितः ।। ५
युधिष्ठिरस्य दाशार्ह तच्चापि विदितं तव ।
यथोक्तः सञ्जयश्चैव तच्च सर्वं श्रुतं त्वया ।। ६
पञ्च नस्तात दीयन्तां ग्रामा इति महाद्युते ।
अविस्थलं वृकस्थलं माकन्दीं वारणावतम् ।। ७
अवसानं महाबाहो कञ्चिदेकं च पञ्चमम् ।
इति दुर्योधनो वाच्यः सुहृदाश्चास्य केशव ।। ८
न चापि हृष्यकरोद्वाक्यं श्रुत्वा कृष्ण सुयोधनः ।
युधिष्ठिरस्य दाशार्ह श्रीमतः सन्धिमिच्छतः ।। ९
अप्रदानेन राज्यस्य यदि कृष्ण सुयोधनः ।
सन्धिमिच्छेन्न कर्तव्यं तत्र गत्वा कथञ्चन ।। १०

शक्ष्यन्ति हि महाबाहो पाण्डवाः सृञ्जयैः सह ।
धार्तराष्ट्रबलं घोरं क्रुद्धं प्रतिसमासितुम् ॥ ११
न हि साम्ना न दानेन शक्योऽर्थस्तेषु कश्चन ।
तस्मात्तेषु न कर्तव्या कृपा ते मधुसूदन ॥ १२
साम्ना दानेन वा कृष्ण ये न शाम्यन्ति शत्रवः ।
योक्तव्यस्तेषु दण्डः स्याज्जीवितं परिरक्षता ॥ १३
तस्मात्तेषु महादण्डः क्षेप्तव्यः क्षिप्रमच्युत ।
त्वया चैव महाबाहो पाण्डवैः सह सृञ्जयैः ॥ १४
एतत्समर्थं पार्थानां तव चैव यशस्करम् ।
क्रियमाणं भवेत् कृष्ण क्षत्रस्य च सुखावहम् ॥ १५
क्षत्रियेण हि हन्तव्यः क्षत्रियो लोभमास्थितः ।
अक्षत्रियो वा दाशार्ह स्वधर्ममनुतिष्ठता ॥ १६
अन्यत्र ब्राह्मणात्तात सर्वपापेष्ववस्थितात् ।
गुरुर्हि सर्ववर्णानां ब्राह्मणः प्रसृताग्रभुक् ॥ १७
यथाऽवध्ये वध्यमाने भवेद् दोषो जनार्दन ।
स वध्यस्यावधे दृष्ट इति धर्मविदो विदुः ॥ १८
यथा त्वां न स्पृशेदेष दोषः कृष्ण तथा कुरु ।
पाण्डवैः सह दाशार्हैः सृञ्जयैश्च ससैनिकैः ॥ १९
पुनरुक्तं च वक्ष्यामि विश्रम्भेण जनार्दन ।
का तु सीमन्तिनी मादृक् पृथिव्यामस्ति केशव ॥ २०
सुता द्रुपदराजस्य वेदिमध्यात्समुत्थिता ।
धृष्टद्युम्नस्य भगिनी तव कृष्ण प्रिया सखी ॥ २१
आजमीढकुलं प्राप्ता स्नुषा पाण्डोर्महात्मनः ।
महिषी पाण्डुपुत्राणां पञ्चेन्द्रसमवर्चसाम् ॥ २२
सुता मे पञ्चभिर्वीरैः पञ्च जाता महारथाः ।
अभिमन्युर्यथा कृष्ण तथा ते तव धर्मतः ॥ २३
साऽहं केशग्रहं प्राप्ता परिक्लिष्टा सभां गता ।
पश्यतां पाण्डुपुत्राणां त्वयि जीवति केशव ॥ २४
जीवत्सु पाण्डुपुत्रेषु पञ्चालेष्वथ वृष्णिषु ।
दासीभूताऽस्मि पापानां सभामध्ये व्यवस्थिता ॥ २५
निरमर्षेष्ववचेष्टेषु प्रेक्ष्यमाणेषु पाण्डुषु ।
पाहि मामिति गोविन्द मनसा चिन्तितोऽसि मे ॥ २६
यत्र मां भगवन्राजा श्वशुरो वाक्यमब्रवीत् ।
वरं वृणीष्व पाञ्चालि वरार्हाऽसि मता मम ॥ २७

अदासाः पाण्डवाः सन्तु सरथाः सायुधा इति ।
मयोक्ते यत्र निर्मुक्ता वनवासाय केशव ॥ २८
एवंविधानां दुःखानामभिज्ञोऽसि जनार्दन ।
त्रायस्व पुण्डरीकाक्ष सभर्तृज्ञातिबान्धवान् ॥ २९
नन्वहं कृष्ण भीष्मस्य धृतराष्ट्रस्य चोभयोः ।
स्नुषा भवामि धर्मेण साऽहं दासीकृता बलात् ॥ ३०
धिक् पार्थस्य धनुष्मत्तां भीमसेनस्य धिग्बलम् ।
यत्र दुर्योधनः कृष्ण मुहूर्तमपि जीवति ॥ ३१
यदि तेऽहमनुग्राह्या यदि तेऽस्ति कृपा मयि ।
धार्तराष्ट्रेषु वै कोपः सर्वः कृष्ण विधीयताम् ॥ ३२

वैशंपायन उवाच ।

इत्युक्त्वा मृदुसंहारं वृजिनाग्रं सुदर्शनम् ।
सुनीलमसितापाङ्गी सर्वगन्धाधिवासितम् ॥ ३३
सर्वलक्षणसम्पन्नं महाभुजगवर्चसम् ।
केशपक्षं वरारोहा गृह्य वामेन पाणिना ॥ ३४
पद्माक्षी पुण्डरीकाक्षमुपेत्य गजगामिनी ।
अश्रुपूर्णेक्षणा कृष्णा कृष्णं वचनमब्रवीत् ॥ ३५
अयं ते पुण्डरीकाक्ष दुःशासनकरोद्धृतः ।
स्मर्तव्यः सर्वकार्येषु परेषां सन्धिमिच्छता ॥ ३६
यदि भीमार्जुनौ कृष्ण कृपणौ सन्धिकामुकौ ।
पिता मे योत्स्यते वृद्धः सह पुत्रैर्महारथैः ॥ ३७
पञ्च चैव महावीर्याः पुत्रा मे मधुसूदन ।
अभिमन्युं पुरस्कृत्य योत्स्यन्ते कुरुभिः सह ॥ ३८
दुःशासनभुजं श्यामं संछिन्नं पांसुगुण्ठितम् ।
यद्यहं तु न पश्यामि का शान्तिर्हृदस्य मे ॥ ३९
त्रयोदश हि वर्षाणि प्रतीक्षन्त्या गतानि मे ।
विधाय हृदये मन्युं प्रदीप्तमिव पावकम् ॥ ४०
विदीर्यते मे हृदयं भीमवाक्शल्यपीडितम् ।
योऽयमद्य महाबाहुर्धर्ममेवानुपश्यति ॥ ४१
इत्युक्त्वा बाष्परुद्धेन कण्ठेनायतलोचना ।
रुरोद कृष्णा सोत्कम्पं सस्वरं बाष्पगद्गदम् ॥ ४२
स्तनौ पीनायतश्रोणी सहितावभिवर्षती ।
द्रवीभूतमिवात्युष्णं मुञ्चती वारि नेत्रजम् ॥ ४३
तामुवाच महाबाहुः केशवः परिसान्त्वयन् ।
अचिराद्रक्ष्यसे कृष्णे रुदतीर्भरतस्त्रियः ॥ ४४

एवं ता भीरु रोत्स्यन्ति निहतज्ञातिबान्धवाः ।
हतमित्रा हतबला येषां क्रुद्धाऽसि भामिनी ॥ ४५
अहं च तत्करिष्यामि भीमार्जुनयमैः सह ।
युधिष्ठिरनियोगेन दैवाच्च विधिनिर्मितात् ॥ ४६
धार्तराष्ट्राः कालपक्वा न चेच्छृण्वन्ति मे वचः ।
शेष्यन्ते निहताः भूमौ श्वसृगालादनीकृताः ॥ ४७
चलेद्धि हिमवान् शैलो मेदिनी शतधा फलेत् ।
द्यौः पतेच्च सनक्षत्रा न मे मोघं वचो भवेत् ॥ ४८
सत्यं ते प्रतिजानामि कृष्णे बाष्पो निगृह्यताम् ।
हतामित्रान् श्रिया युक्तानचिराद् द्रक्ष्यसे पतीन् ॥ ४९
—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ८२

" सर्व लोकांचें बोलणें ऐकून व युधिष्ठिरांचेंही बोलणें ऐकून शोककर्शित द्रौपदी श्रीकृष्णाशी बोलू लागली. सहदेव व सात्यकीचें तिनें अभिनंदन केलें. भीमाचा शांतपणा पाहून ती अत्यंत खिन्न झाली. अश्रुपूर्ण नयनांनीं श्रीकृष्णाकडे पाहून ती म्हणाली : हे महाबाहो धर्मज्ञा, मधुसूदना, दुष्टांनी कपटानें पांडवांना सुखापासून कसें भ्रष्ट केलें हें तुला माहीतच आहे. आपल्या अमात्यासहित धृतराष्ट्रपुत्राने युधिष्ठिरासाठी कोणता निरोप सजयाबरोबर पाठविला याचीही तुला कल्पना आहे. अविस्थळ, वृकस्थळ, माकंदी, वारणावत, व आणखी एक अशी पाच गांवें मागून तेवढ्यावर युधिष्ठिर सधि करावयास तयार झाले, पण दुर्योधन तें ऐकावयास सिद्ध झाला नाही. राज्य दिल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कारणास्तव तू तेथे जाऊन सधि करू नये. सृंजयासहित पांडव दुर्योधनाच्या भयकर सैन्याशी धडक द्यावयास पूर्णपणें समर्थ आहेत. त्याच्यासारख्या दुष्टांजवळून साम व दाम यांनी कार्य होण्याची आशाच नको. त्याच्यावर मुळीच दया दाखवू नये असें माझें मत आहे. ज्याला स्वतःचे सरक्षण करावयाचें आहे त्यानें साम व दाम यांनीं जे शत्रू वळत नाहीत त्यांच्यावर दंडाचाच प्रयोग केला पाहिजे. आणि कौरवांसारख्या दुष्टांना तर तू पांडव व सृंजय यांनीं मिळून अत्यत घोर दंड दिला पाहिजे. हेंच पांडवांच्या सामर्थ्याला योग्य, क्षत्रियोचित व तुझी कीर्ति वाढविणारें ठरणार

आहे. आपल्या धर्माचें प्रतिपालन करणाऱ्या जातिवंत क्षत्रियानें लोभाविष्ट झालेल्या क्षत्रियाला अथवा अक्षत्रियाला अवश्य ठार मारावें. अवध्याचा वध करण्यांत जसा दोष आहे तसाच वध्याचा वध न करण्यांतही दोष आहे. हा दोष तुला लागणार नाही असें वर्तन तूं स्वतः कर व आपल्या अनुचरांनाही तसेंच करावयास भाग पाड. श्रीकृष्णा मी तुला असें विचारतें कीं, माझ्यासारखी स्त्री पृथ्वीवर दुसरी असेल काय? साक्षात् यज्ञवेदीपासून माझा जन्म झाला. राजा द्रुपदाची मी कन्या, धृष्टद्युम्नासारख्या वीराची भगिनी व तुझी प्रियसखी या आजमीढ कुळांत राजा पांडूची सून म्हणून व महेंद्राप्रमाणें प्रभावशाली अशा पांडवांची महाराणी म्हणून आलें. पांच वीर पुत्रांची मी माता आहें. जसा अभिमन्यु तुझा भाचा तसेंच तेही तुझे भाचे आहेत. पण श्रीकृष्णा, पांडव उघड्या डोळ्यांनीं पहात असतां व तू जिवंत असतां मला केस धरून सभेत फरफटत ओढण्यांत आलें आहे. पंचाल, यादव व पांडव जिवंत असतां पाप्यांनीं मला सभेंत ओढलें व दासी म्हणून म्हटलें. माझ्या रक्षणाचा भार धर्मानेंच घेतलेले हे लोक त्याही स्थितीत शांतच बसले होते. तू माझें रक्षण कर म्हणून मी तुला अंतःकरणांतून हांक मारली. राजा धृतराष्ट्रानें मला वर माग म्हणून म्हटलें. मी फक्त सशस्त्र पांडवांचें स्वातंत्र्य मागून यांना मोकळें केलें. पण कर्मानें यांनी पुन्हां वनवास पत्करला. हे पुंडरीकाक्षा, माझ्या सर्व दुःखांची तुला जाणीव आहे. तूंच यांतून आमचें रक्षण केलें पाहिजेस. भीष्म व धृतराष्ट्रांची मी धर्मानें सून असतां बलात्कारानें मला दासी करण्यांत आलें. मला दासी करणारा दुर्योधन एक मुहूर्तमात्र जर जिवंत राहूं शकतो तर पांडवांच्या बलाचा उपयोग काय? भीमाच्या सामर्थ्याला व अर्जुनाच्या धनुर्धारीपणाला धिक्कार असो. जर तुझी माझ्यावर कृपा असेल व माझ्यावर अनुग्रह करावा असें तुला वाटत असेल तर शक्य असेल तितका तीव्र संताप कौरवांवर काढ." याप्रमाणें बोलून त्या महामानिनीनें आपले मृदु, दर्शनीय, सुगंधी, नीलवर्णाचे, व सर्पाकृति असे केंस डाव्या हातांत घेऊन व डोळ्यांत अश्रु आणून श्रीकृष्णांच्या डोळ्यासमोर धरले. ती पुनश्च म्हणाली,

हे पुंडरीकाक्षा, कौरवांच्याशीं संधि करण्याची ज्यावेळीं तुला इच्छा होईल त्या वेळीं त्या दृष्टीनें कोणतेंही कार्य करीत असतां दुःशासनानें ओढलेला हा माझा केशपाश तुझ्या स्मरणांत असू दे. हे भीमार्जुन दीन होऊन सधीसाठीं उत्सुक झाले असतील तर माझा वृद्ध पिता द्रुपद आपल्या महारथ पुत्रांसहित आपल्या कन्येसाठीं अधमांचें निर्दालन करील. पतीना आपल्या पत्नीच्या अब्रूची चाड नसली तरी आपल्या मातेची अब्रू माझ्या पुत्रांना रक्षणीय खास वाटेल. माझे पांच पुत्र अभिमन्यूला पुढें करून कौरवांशी युद्ध करतील. दुःशासनाचा माझ्या केसांना स्पर्श करणारा तो हात रणांत तुटून रक्ताच्या थारोळ्यांत धुळींत लोळत पडलेला मी जोंवर पहात नाही तोंवर माझ्या हृदयाला कुठून शांति मिळणार ? तेरा वर्षे प्रज्वलित अग्नीप्रमाणें माझा सताप मी हृदयाशीं बाळगला आहे. आज भीमाच्या या शांतपणाच्या बोलण्यानें माझें अंतःकरण विदीर्ण झालें. भीमाच्याही तोंडून शांतिपाठच ऐकावे काय ? याप्रमाणें बोलून द्रौपदी रडू लागली. तिच्या नेत्रांतून वाहणारा अश्रूपात पाहून तिचें सांत्वन करीत भगवान् श्रीकृष्ण तिला म्हणाले की, "साऱ्या कौरव स्त्रिया अशाच रडत असलेल्या पहाण्याचें भाग्य तुला लौकरच लाभेल. ज्यांच्यावर तू रागावलीस त्या सर्व लोकांचा वध करून त्यांच्या अनाथ स्त्रिया अशाच रडत असलेल्या मी तुला दाखवीन. कालानें जीवित संपवीत आणलेले धृतराष्ट्रपुत्र जर माझें ऐकणार नाहीत तर कोल्हे कुत्रे व गिधाडें यांचें भक्ष्य होऊन ते रणांत नाश पावतील. हे कृष्णे, हिमाचल आपली जागा सोडील, पृथ्वीचे तुकडे उडतील, नक्षत्रांसहित द्युलोक खालीं पडेल, पणमाझें वचन मिथ्या होणार नाहीं. अश्रु आंवर. शत्रूंचा विनाश होऊन आपले पति वैभवास चढलेले तू लवकरच पहाशील."

दौपदीच्या वाग्बाणांनी व अश्रूनी श्रीकृष्णाची ही भविष्यवाणी खरी करून दाखविली आहे. तेजस्विनी द्रौपदीचें महाभारतांतील हें व्यक्तिचित्र महाभारताच्या प्रत्येक वाचकाच्या अंतःकरणावर परिणाम घडवून आणल्याविना राहणार नाहीं.

२४. भीम—ज्वलंत प्रतिशोध

महाभारतांतील रौद्ररस ज्याच्या अतिमानुष पराक्रमानेंच मुख्यतः फुललेला आहे, ज्याच्या प्रचंड सामर्थ्याचे महाभारतांतील आविष्कार आजही अन्याय व आक्रमण याचा प्रतिशोध घ्यावयास उठलेल्या वीरबाहूंना स्फुरण द्यावयास व कातर हृदयांना कंपित करावयास पूर्णपणे समर्थ आहेत, किबहुना ज्वलत प्रतिशोधच ज्याच्या रूपानें आविष्कार पावलेला आहे तो द्वितीय पांडव भीमसेन महाभारताच्या प्रत्येक वाचकाच्या अंतःकरणावर विलक्षण परिणाम घडवून आणल्याविना राहात नाही. भीमसेन हे राजर्षि धर्मराज युधिष्ठिराचें अतिप्रचंड सामर्थ्य होय. युधिष्ठिराचें भीमावर सर्वांत अधिक प्रेम होतें. वनपर्वातील यक्षप्रश्नप्रकरणांत यक्षानें नकुलाचें जीवदान मागणाऱ्या युधिष्ठिराना असें म्हटलें आहे कीः—

तथैनं मनुजाः प्राहुर्भीमसेनं प्रियं तव ॥ २६

—महाभारत, वनपर्व अध्याय ३१३

लोक असें म्हणतात की, 'भीमसेन तुझा प्रिय आहे.' महाप्रस्थानिकपर्वात युधिष्ठिरांमागोमाग सारे बंधु व द्रौपदी जात असतां ते जेव्हा एकामागून एक गळून पडू लागले तेव्हां भीम स्वतः जमिनीवर कोसळल्यानतर याच गोष्टीचा अनुवाद करीत आहे. तो युधिष्ठिरांना म्हणतो :—

भो भो राजन्नवेक्षस्व पतितोऽहं प्रियस्तव ॥ २४

—महाभारत, महाप्रस्थानिकपर्व अध्याय २

"हे राजन्, माझ्याकडे पहा. तुझा प्रिय मी देखील गळून पडलों आहे." भीमानें द्रौपदी व इतर सर्व बंधु याच्या पडण्याचें व मरणाचें वर्णन करीत असतां 'प्रिय' हे विशेषण मुळींच वापरलेलें नाही हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. भीम अवखळ असला तरी त्याच्या पराक्रमामुळेच आपले नानाविध संकटातून संरक्षण झालें असून आपल्याला त्याच्या पराक्रमानेंच चांगले दिवस यावयाचे

व्याख्यान २४ वे, दि. २१ एप्रिल १९५१

आहेत अशी युधिष्ठिरांची त्याच्यासंबंधीची भावना महाभारतांत अनेक ठिकाणी व्यक्त झालेली आहे. कुतीनें बकासुराला ठार मारण्यासाठीं भीमाला पाठवावयाचें ठरविल्यावर तिला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असतां युधिष्ठिर म्हणतात :—

यस्य बाहू समाश्रित्य सुखं सर्वं शयामहे ।
राज्यं चापहृतं क्षुद्रैराजिहीर्षामहे पुनः ॥ ७
यस्य दुर्योधनो वीर्यं चिन्तयन्नमितौजसः ।
न शेते रजनीः सर्वाः दुःखाच्छकुनिना सह ॥ ८
यस्य वीरस्य वीर्येण मुक्ता जतुगृहाद्वयम् ।
अन्येभ्यश्चैव पापेभ्यो निहतश्च पुरोचनः ॥ ९
यस्य वीर्यं समाश्रित्य वसुपूर्णां वसुन्धराम् ।
इमां मन्यामहे प्राप्तां निहत्य धृतराष्ट्रजान् ॥ १०

—महाभारत, आदिपर्व अध्याय १६२

"ज्याच्या बाहूच्या आश्रयावर आपण सुखानें निद्रा घेतो व क्षुद्रांनी अपहरण केलेलें आपले राज्य परत मिळविण्याची आशा बाळगतों, ज्या अतितेजस्वी पुरुषाच्या पराक्रमाच्या चितेनें शकुनी-सहित दुर्योधन दु खानें रात्री जागून काढतो, ज्या वीराच्या प्रभावानें आपण लाक्षागृहांतून सुटलो, पुरोचन ठार झाला व अनेक पापी लोकाच्या आक्रमणांपासून आपले संरक्षण झालें, ज्याच्या वीर्याच्या भरवशावर ही धनधान्यसंपन्न पृथ्वी धृतराष्ट्रपुत्रांना ठार मारून आपण आपल्या अधीन करून घेऊ असें समजतों."

भीमाचें स्वरूप व शिक्षण

पुष्ट व दीर्घ बाहू असलेला, भरदार खांदे असून तापलेल्या सुवर्णाप्रमाणे गौरवर्णाचा व मदोन्मत्त गजेन्द्राप्रमाणें चालणारा असें महाभारतात भीमाच्या स्वरूपाचें वर्णन आढळतें. आश्रमवासिक पर्वात म्हटले आहे :—

अयं पुनर्मत्तगजेन्द्रगामी प्रतप्तचामीकरशुद्धगौरः ।
पृथ्वायतांसः पृथुदीर्घबाहुर्वृकोदरः पश्यत पश्यतेमम् ॥ ६

—महाभारत, आश्रमवासिक पर्व अध्याय २५

प्रत्यक्ष महाभारतांतील भीमसेनाच्या या स्वरूपवर्णनावरून त्याच्या स्थूल स्वरूपासंबंधी रूढ असलेले पुष्कळसे अपसमज दूर झाल्याविना रहाणार नाहीत. भीमाचें शरीर अत्यंत बांधेसूद असून ते कसलेलें व पिळदार होतें. त्याचा वर्ण गौर असून त्याचें गोरेपण पिवळट वर्णाचें होतें. पांडवामध्ये नकुल हा नाजुक सौदर्याचा आदर्श असला तर भीमाचे सौदर्य मर्दानी होतें. पेशव्यांच्या परंपरेंत पहिले बाजीराव व विश्वासराव यांच्या सौदर्यांत जी भिन्नता तीच भीमसेन व नकुल यांच्यांत होती असें म्हणता येईल. भीमाचें स्वरूप व वैशिष्ट्य यांसंबंधीचें अधिक वर्णन उद्योगपर्वात सजयाशी राजा धृतराष्ट्रानें केलेल्या भाषणांत आले आहे. तें असें:—

अनर्महासी सोन्मादः तिर्यक्प्रेक्षी महास्वन ॥ ५
महावेगो महोत्साहो महाबाहुर्महाबलः ॥ ६
बह्वाशी विप्रतीपश्च बाल्येऽपि रभसः सदा ॥ १०
अस्त्रे द्रोणार्जुनसमं वायुवेगसमं जवे ।
महेश्वरसमं क्रोधे को हन्याद् भीममाहवे ॥ १४
निष्ठुरो रोषणोऽत्यर्थं भज्येतापि न संनमेत् ।
तिर्यक्प्रेक्षी सहतभ्रूः कथं शाम्येद् वृकोदरः ॥ १८
शूरस्तथाऽप्रतिबलो गौरस्ताल इवोन्नतः ।
प्रमाणतो भीमसेनः प्रादेशेनाधिकोऽर्जुनात् ॥ १९
जवेन वाजिनोऽत्येति बलेनात्येति कुञ्जरान् ।
अव्यक्तजल्पी मध्वक्षो मध्यमः पाण्डवो बली ॥ २०
गदां भ्रामयतस्तस्य भिन्दतो हस्तिमस्तकान् ।
सृक्किणी लेलिहानस्य बाष्पमुत्सृजतो मुहुः ॥ २९

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ५१

"थट्टेंत देखील न हंसणारा, देहभान विसरणारा, नेहमीं वक्र दृष्टीनें पाहणारा, ज्याचा आवाज मोठा आहे, वेग प्रचंड आहे, उत्साह अतिरिक्त आहे असा विशाल व आजानुबाहू असलेला, अत्यंत बलवान्, अतिरिक्त खादाड, नेहमी आमच्याविरुद्ध असलेला लहानपणी देखील जो सदैव अत्यंत साहसी असे, अस्त्रविद्येंत द्रोण-अर्जुनाप्रमाणें प्रभावी, वेगांत वायूप्रमाणें, ज्याचा क्रोध महेश्वरा-

सारखा प्रलयकर आहे अशा भीमाला युद्धांत कोण मारूं शकेल ? तो अत्यंत निष्ठुर व अतिशय रागीट असून मोडला जाईल पण कधीहि वांकणार नाही. भिवया आकुचित करून नेहमी वांकड्या दृष्टीनें पाहण्याची सवय असलेला भीम शांत होणे कसें शक्य आहे ? तो अत्यंत शूर असून त्याच्या योग्यतेचा बलवान दुसरा कोणीही नाही. तो गौरवर्णाचा असून तालवृक्षाप्रमाणें उंच आहे. अर्जुनापेक्षां भीमसेन शरीरानें अधिक धष्टपुष्ट असून शारीरिक बळाच्या दृष्टीनेंही तो त्याच्यापेक्षां अधिक श्रेष्ठ आहे. चपल अश्वाहून त्याचा वेग अधिक आहे. गजेन्द्रापेक्षां तो अधिक बलवान आहे. अत्यंत बलवान असलेल्या या द्वितीय पांडव भीमसेनाचे डोळे नेहमींच दारूनें धुद झाल्याप्रमाणे आरक्त असून तो बोलत असतां त्याचा वर्णोच्चार नेहमी अस्पष्ट व तोंडांतल्या तोंडांत असतो. रणांगणामध्यें गदा फिरवीत हत्तीची गंडस्थले फोडीत असतां आपले ओठ चाटीत मधून मधून तो डोळ्यांतून क्रोधातिरेकानें अश्रू गाळीत असतो. " भीमसेनाचें सामर्थ्य जसें प्रचंड तदनुरूप त्याचा आहारही चांगलाच दांडगा होता याचे महाभारतांत उल्लेख आढळतात. धृतराष्ट्र त्याचा जन्मजात शत्रु असल्यामुळें तो त्याला ' खादाड ' म्हणतो असें नसून सामर्थ्यानुरूप त्याचा आहार प्रचंड असल्याचे स्वतंत्र उल्लेखही अनेक आहेत. महाप्रस्थानिक पर्वात युधिष्ठिरानें भीमाला त्याच्या पतनाची कारणें सांगताना

अतिभुक्तं च भवता प्राणेन च विकत्थसे ॥ २५

——महाभारत, महाप्रस्थानिकपर्व अ. २

" तू अतिशय खात असून सदैव आपल्या बळाचीच अतिशय घमेंड मारीत होतास " असें म्हटले आहे. एकचक्रा नगरीत पाडव रहात असता तेथें ते ब्राह्मणरूपानें भिक्षा मागून आपलें उपजीवन चालवीत असत. भिक्षा आणल्यावर तिचें जें वाटप होई त्याचें महाभारतांत असें वर्णन आहे की,

अर्धं ते भुञ्जते वीराः सह मात्रा परंतपाः ।
अर्धं सर्वस्य भक्षस्य भीमो भुङ्क्ते महाबलः ॥ ६

——महाभारत, आदिपर्व अ. १५७

"आणलेल्या भिक्षेपैकी अर्धी भिक्षा कुंतीसहित चार बंधु भक्षण करीत; व भिक्षेचा अर्धा भाग महाबल भीमसेन एकटा फस्त करीत असे." बकासुरासाठी सिद्ध केलेले गाडाभर अन्न, तो वरून मारीत असतांही त्याच्याकडे लक्ष देखील न देतां भीमानें खाऊन टाकल्याची गोष्ट तर प्रसिद्धच आहे. असो. इतर सर्व कौरव कुलांतील राजपुत्रांप्रमाणेंच भीमसेनही शस्त्रास्त्रविद्येत आचार्य द्रोणांचाच शिष्य होता. भीमसेन हा केवळ गदायुद्धांत प्रवीण होता ही रूढ समजूत बरोबर नाहीं. महाभारतानुसार खड्गयुद्ध, गदायुद्ध व रथांतून करावयाचें धनुष्यबाणांचे युद्ध या तिन्ही युद्धाच्या कलेंत भीमसेन निष्णात होता. त्याचप्रमाणें मल्लयुद्धांतही तो केवढा निष्णात होता हें जरासधासारख्या वीराला त्यानें मल्लयुद्धांतच ठार मारलें यावरून स्पष्ट होतें. जीमूतासारख्या प्रथितयश व अजिक्य पत्रें मिळविणाऱ्या मल्लाला व कीचकासारख्या विख्यात बलवतालाही भीमानें मल्लयुद्धांतच ठार मारले आहे. गदायुद्ध हे भीमाचें अतिशय आवडीचें युद्ध असून गदा या आयुधावर त्याचें विलक्षण प्रेम असे इतकेंच. त्याच्या भयानक गदेचे महाभारतांत अनेक ठिकाणी वर्णन येतें. भीमानें आचार्य द्रोणाजवळ गदेचा अभ्यास केल्यानंतर, लाक्षागृह प्रकरणापूर्वी युधिष्ठिरांच्या अल्पकालीन यौवराज्याच्या काळात तत्कालीन गदायुद्धवेत्त्यांचे सर्व श्रेष्ठ आचार्य यादवेंन्द्र बलराम (भगवान् श्रीकृष्णांचे ज्येष्ठ बंधु) यांच्याजवळ त्यानें गदायुद्धाचें स्वतंत्र शिक्षण घेऊन त्यांत प्रावीण्य संपादन केले. महाभारतकार म्हणतात:—

असियुद्धे गदायुद्धे रथयुद्धे च पाण्डवः ।
संकर्षणावशिक्षद् वै शश्वच्छिक्षां वृकोदरः ॥ ४
समाप्तशिक्षो भीमस्तु द्युमत्सेनसमो बले ।
पराक्रमेण सम्पन्नो भ्रातृणामचरद्वशे ॥ ५

—महाभारत, आदिपर्व अध्याय १३९

" खड्गयुद्ध, गदायुद्ध व रथांतून करावयाचें धनुर्बाणांचें युद्ध यांमध्यें भीम निष्णात असून त्याने सकर्षणाकडे (बलराम) जाऊन गदायुद्धाचें स्वतंत्रपणें शिक्षण घेतलें. शस्त्रास्त्रविद्येचें शिक्षण झाल्या-

वर भीमसेन द्युमत्सेनाप्रमाणें बलवान् म्हणून प्रसिद्धीस आला व तो पराक्रमसंपन्न पुरुष आपल्या बंधूच्या अधीन राहूं लागला."

प्रचंड सामर्थ्य

महाभारतांतील भीमसेन हे श्रीमद्रामायणांतील हनुमंताप्रमाणेंच अतिप्रचड सामर्थ्याचें दुसरे नांव आहे. हनुमताप्रमाणेच बलाची व वेगाची अधिष्ठात्री देवता जी वायु तिचा तो पुत्र आहे. त्याची जन्मकथा व जन्मतःच त्याच्या ठिकाणी असलेलें अद्भुत सामर्थ्य यांचें वर्णन महाभारतांत पुढीलप्रमाणें आहेः—

प्राहुः क्षत्रं बलज्येष्ठं बलज्येष्ठं सुतं वृणु ।
ततस्तथोक्ता भर्ता तु वायुमेवाजुहाव सा ।। ११
ततस्तामागतो वायुर्मृगारूढो महाबलः ।
किं ते कुन्ति ददाम्यद्य ब्रूहि यत्ते हृदि स्थितम् ।। १२
सा सलज्जा विहस्याह पुत्रं देहि सुरोत्तम ।
बलवन्तं महाकाय सर्वदर्पप्रभञ्जनम् ।। १३
तस्याञ्जज्ञे महाबाहुर्भीमो भीमपराक्रमः ।
तमप्यतिबलं जातं वागुवाचाशरीरिणी ।। १४
सर्वेषां बलिनां श्रेष्ठो जातोऽयमिति भारत ।
इदमत्यद्भुतं चासीज्जातमात्रे वृकोदरे ।। १५
यदङ्कात्पतितो मातुः शिलां गात्रैर्व्यचूर्णयत् ।
कुन्ती व्याघ्रभयोद्विग्ना सहसोत्पतिता किल ।। १६
नान्वबुध्यत संसुप्तमुत्सङ्गे स्वे वृकोदरम् ।
ततः स वज्रसंघातः कुमारो न्यपतद् गिरौ ।। १७
पतता तेन शतधा शिला गात्रैर्विचूर्णिता ।
तां शिलां चूर्णितां दृष्ट्वा पाण्डुर्विस्मयमागतः ।। १८

महाभारत, आदिपर्व अध्याय १२३

"युधिष्ठिराच्या जन्मानंतर पाण्डु कुन्तीला म्हणाला कीं, क्षत्रियांत बळालाच खरें प्राधान्य आहे. म्हणून बळानें सर्वश्रेष्ठ असलेला मुलगा तू देवाला माग. आपल्या पतीचें हें भाषण ऐकून कुन्तीनें वायुदेवतेचेंच आवाहन केलें. तिच्या मंत्रसामर्थ्यानें मृगावर आरूढ होऊन महाबलशाली वायु तेथें आले व कुंतीला म्हणाले कीं, हे कुन्ती, तुझ्या हृदयांत काय आहे तें मला सांग. मी तुझी इच्छा पूर्ण

करीन. त्याबरोबर सलज्ज मन्द स्मित करून कुंती त्यांना म्हणाली की हे देवश्रेष्ठा, मला बलवान्, धिप्पाड शरीराचा व सर्वांच्या बळाचा गर्व पार भंगून टाकणारा असा पुत्र द्या. वायूपासून अतिबल व भीमपराक्रमी भीमसेन झाला. तो जन्मतःच आकाशवाणी झाली व तिनें कुतीला असें सांगितले की तुझा हा पुत्र सर्व बलवन्तांत श्रेष्ठ आहे. त्याच्या बळाचा प्रत्यय कुतीला मोठ्या अद्भुत रीतीनें आला. एकदां कुंती भीमाला मांडीवर घेऊन बसली असतां तेथें एक वाघ आला. त्याला पहातांच भयकपित होऊन भीम आपल्या माडीवर झोपला आहे ही गोष्ट विसरून कुंती एकदम उठून उभी राहिली. त्याबरोबर जणू कांही वज्राचाच बनविलेला तो सुदृढ कुमार कुंतीच्या मांडीवरून एका मोठ्या शिलेवर पडला. वाघाचें भय नाहीसें झाल्यावर दगडावर पडलेल्या त्या कुमाराला कांहीं लागलें असेल अशा कल्पनेनें कुंतीनें व पांडूनें त्या शिलाखंडाकडे पाहिलें तो त्यांना काय आढळून आलें? शिलाखंडामुळें भीमाला कांहीच इजा न होतां उलट भीमाच्या शरीराच्या आघातानें ती शिलाच चूर्ण झाली होती! तें पाहून राजा पांडूला आश्चर्य वाटलें.

अंगच्या अपार शरीरसामर्थ्याच्या भरंवशावर लहानपणीं आपल्याबरोवर खेळावयास असणाऱ्या सर्व कौरव राजकुमारांची तो चांगलीच खोडकी जिरवीत असे. धांवण्याची स्पर्धा, लक्ष्याभिहरण स्पर्धेनें खाणें, व एकमेकांच्या अंगावर धूळ उडविणें, इत्यादि बालक्रीडांत शंभरही धृतराष्ट्रपुत्रांची भीम चांगलीच जिरवीत असे. एकशेंएक धृतराष्ट्र पुत्राचें नियमन करणें हा भीमाच्या हातचा खेळ होता. अत्यंत दुष्ट अंतःकरणाच्या दुर्योधनाला भीमाचा काटा काढावा असें वाटून त्यानें भीमाच्या अन्नांत एकदा कालकूट नांवाचें अतिशय भयंकर असें विप मिसळून तें अन्न त्याला खावयास दिलें. पण त्याच्या अद्भुत व अपार सामर्थ्यानें त्यानें तें विष पार पचवून टाकलें. त्याच्या विलक्षण सामर्थ्याचें वर्णन करतांना महाभारतकार म्हणतातः—

ततो दुर्योधनः पापस्तद्भक्ष्ये कालकूटकम् ।
विषं प्रक्षेपयामास भीमसेनजिघांसया ॥ ४५

स्वयमुत्थाय चैवाथ हृदयेन क्षुरोपमः ।
स वाचा मृतकल्पश्च भर्तृवच्च सुहृद्यथा ।। ४६
स्वयं प्रक्षिपते भक्ष्यं बहु भीमस्य पापकृत् ।
प्रतीक्षितं स्म भीमेन तं वै दोषमजानता ।। ४७
शीतं वातं समासाद्य श्रान्तो मदविमोहितः ।
विषेण च परीताङ्गो निश्चेष्टः पाण्डुनन्दनः ।। ५३
ततो बद्ध्वा लतापाशैर्भीमं दुर्योधनः स्वयम् ।
मृतकल्पं तदा वीरं स्थलाज्जलमपातयत् ।। ५४
स निःसंज्ञो जलस्यान्तमथ वै पाण्डवोऽविशत् ।
आक्रामन्नागभवने तदा नागकुमारकान् ।। ५५
ततः समेत्य बहुभिस्तदा नागैर्महाविषैः ।
अदश्यत भृशं भीमो महादंष्ट्रैर्विषोल्बणैः ।। ५६
ततोऽस्य दश्यमानस्य तद्विषं कालकूटकम् ।
हतं सर्वविषेणैव स्थावरं जंगमेन तु ।। ५७
दंष्ट्राश्च दंष्ट्रिणां तेषां मर्मस्वपि निपातिताः ।
त्वचं नैवास्य बिभिदुः सारत्वात्पृथुवक्षसः ।। ५८
तत. प्रबुद्धः कौन्तेयः सर्वं संछिद्य बन्धनम् ।
पोथयामास तान्सर्वान् केचिद् भीताः प्रदुद्रुव. ।। ५९

—महाभारत, आदिपर्व अ. १२८

"नतर दुष्ट दुर्योधनानें भीमसेनाला ठार मारण्याच्या इच्छेनें त्याच्या अन्नात कालकूट विष मिसळविले. वरून दिसायला तो अमृतमय वाणीचा सुहृद् अथवा बंधु भासत असला तरी त्याचें अंतःकरण वस्तऱ्याच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण व मारक होतें. आग्रह करकरून त्यानें भीमाला तें विषमय अन्न खाऊ घातलें व भीमानेंही अजाणपणें तें खाल्लें. त्यानंतर बराच वेळ जलक्रीडा केल्यावर थकून भीम विश्रांतिमंदिरांत बसला असतां थंड वारा त्याच्या अंगाला लागूं लागला. अतिरिक्त श्रमानें थकलेला, मदानें मोहित, विष साऱ्या अंगांत भिनलेला असा भीम थंड वारा अंगाला लागतांच पूर्णपणें असावध व निश्चेष्ट झाला. तो मूर्च्छित होऊन एकाद्या मेलेल्या माणसाप्रमाणें पडलेला पाहून दुर्योधनानें लतापाशांनीं

त्याला बांधलें व नदीत फेकून दिलें. निःसंज्ञ स्थितींत खोल पाण्यांत जात जात तो नाग लोकाकडे येऊं लागला. त्याला पाहतांच मोठमोठ्या दाढा असलेल्या भयंकर विषारी नागांनी त्याला भयानक दंश करावयास प्रारंभ केला. त्याबरोबर विषावर विषाचाच उतारा मिळून नागांच्या विषानें भीमाच्या अंगांत भिनलेलें विष संपूर्णपणें नष्ट करून टाकलें. नागांनी भीमाच्या मर्मामर्मावर आपल्या दातांनी दंश केला. पण त्याची कातडी देखील इतकी चिवट होती कीं, ती त्यांना आपल्या सामर्थ्यशील दांतांनीं किंचिन्मात्रही तोडतां आली नाही. कांही वेळानें भीम सावध झाला. त्यानें लतापाशांचीं बधनें तोडून टाकली व त्या नागांना आपल्या हातांनीं असें रगडून टाकलें की, त्यांतील कित्येक ठार झाले व उरलेले भयभीत होऊन पळून गेले."

लाक्षागृहांतून वांचविलें

भीमाचें असेंच अद्‌भुत सामर्थ्य लाक्षागृहांतून पाण्डवांना वांचवितांना प्रकट झालें आहे. त्यानेंच लाक्षागृहाला स्वतः आग लावून त्यांत पुरोचनाला फेकून दिलें. नंतर पाण्डव भुयारांतून बाहेर जात असता तिथे नसणारी हवा, एक प्रकारचें भय व गोंधळ, आणि डोळ्यावर आलेली निद्रेची झांपड यामुळे सर्वांचा जीव घाबरा झाला. भीमानेंच त्या वेळीं सर्वांना अगावर घेऊन वेगानें त्यांना भुयाराच्या पार करून दिलें. महाभारतकार म्हणतात :–

भीमसेनस्तु राजेन्द्र भीमवेगपराक्रमः ।
जगाम भ्रातृनादाय सर्वान्मातरमेव च ।। २०
स्कन्धमारोप्य जननीं यमावङ्केन वीर्यवान् ।
पार्थौ गृहीत्वा पाणिभ्यां भ्रातरौ सुमहाबलः ।। २१
उरसा पादपान्भञ्जन् महीं पद्भ्यां विदारयन् ।
स जगामाशु तेजस्वी वातरंहा वृकोदरः ।। २२

—महाभारत, आदिपर्व अ. १४८

"हे राजेन्द्रा, भयकर वेग व पराक्रम असलेल्या भीमसेनानें आईला व बन्धूंना घेऊन प्रयाण केलें. त्यानें आपल्या खांद्यावर

कुन्तीला घेतलें. नकुलसहदेवांना कमरेवर घेऊन व युधिष्ठिर आणि अर्जुन ह्यांना हातावर घेऊन तो भुयाराच्या बाहेर आला व वेगानें मार्ग आक्रमण करूं लागला. त्याचें जमिनीवर वेगानें पडणारे पाऊल जणू कांहीं पृथ्वी विदीर्ण करीत होतें. मार्गातील वृक्षांना छातीचीच धडक देऊन तो भुईसपाट करीत होता. ह्याप्रमाणें तेजस्वी भीमसेन वाऱ्याप्रमाणें वेग धारण करून वनांतून जाऊं लागला." भीमाच्या ह्या वेळच्या गतीचें महाभारतांत अत्यंत काव्यमय वर्णन केलें असून कितीही श्रम केले तरी न थकण्याच्या त्याच्या सामर्थ्याचेंही सुंदर वर्णन केलें आहे. महाभारतकार म्हणतात :—

तेन विक्रममाणेन ऊरुवेगसमीरितम् ।
वनं सवृक्षविटपं व्याघूर्णितमिवाभवत् ॥ १
ऋजुधावातो ववौ चास्य शुचिशुक्रागमे यथा ।
आवर्जितलतावृक्षं मार्गं चक्रे महाबलः ॥ २
समुद्गन्पुष्पितांश्चैव फलितांश्च वनस्पतीन् ।
अवरुज्य ययौ गुल्मान् पथस्तस्य समीपजान् ॥ ३
स रोषित इव क्रुद्धो वने भञ्जन्महाद्रुमान् ।
त्रिःप्रस्रुतमदः शुण्मी षष्टिवर्षो मतङ्गराट् ॥ ४
गच्छतस्तस्य वेगेन तार्क्ष्यमारुतरंहसः ।
भीमस्य पाण्डुपुत्राणां मूर्च्छेव समजायत ॥ ५
ते श्रमेण च कौरव्यास्तृष्णया च प्रपीडिताः ।
नाशक्नुवंस्तदा गन्तुं निद्रया च प्रबृद्धया ॥ ११
न्यविशन्त हि ते सर्वे निरास्वादे महावने ।
ततस्तृषा परिक्लान्ता कुन्ती पुत्रानथाब्रवीत् ॥ १२
माता सती पाण्डवानां पञ्चानां मध्यत. स्थिता ।
तृष्णया हि परीताऽस्मि पुत्रान्भृशमथाब्रवीत् ॥ १३
तच्छ्रुत्वा भीमसेनस्य मातृस्नेहात्प्रजल्पितम् ।
कारुण्येन मनस्तप्तं गमनायोपचक्रमे ॥ १४
ततो भीमो वनं घोरं प्रविश्य विजनं महत् ।
न्यग्रोधं विपुलच्छायं रमणीयं ददर्श ह ॥ १५
तत्र निक्षिप्य तान् सर्वानुवाच भरतर्षभः ।
पानीयं मृगयामीह विश्रमध्वमिति प्रभो ॥ १६

एते रुवन्ति मधुरं सारसा जलचारिणः ।
ध्रुवमत्र जलस्थानं महच्चेति मतिर्मम ॥ १७
अनुज्ञात. स गच्छेति भ्रात्रा ज्येष्ठेन भारत ।
जगाम तत्र यत्र स्म सारसा चलचारिणः ॥ १८
स तत्र पीत्वा पानीयं स्नात्वा च भरतर्षभ ।
तेषामर्थे च जग्राह भ्रातृणां भ्रातृवत्सलः ॥ १९
उत्तरीयेण पानीयमानयामास भारत ।
गव्यूतिमात्रादागत्य त्वरितो मातरं प्रति ॥
शोकदुःखपरीतात्मा निश्चश्वासोरगो यथा ॥ २०
—महाभारत, आदिपर्व अध्याय १५१

"पराक्रमी भीमसेन वेगानें जात असता त्याच्या माडयाच्या विलक्षण वेगामुळे वृक्षांनी भरलेलें संपूर्ण वन मथित झालें. ज्येष्ठ व आषाढामध्ये वाहणाऱ्या सोसाटयाच्या वाऱ्यानें ज्याप्रमाणें वृक्ष व लता उन्मळून पडून भुईसपाट होतात, तीच वनाची अवस्था भीमसेनाच्या चरणवेगानें उत्पन्न झालेल्या वाऱ्याने साऱ्या वनाची त्या वेळी करून टाकली. फुलाफळानी बहरलेल्या लता व झाडें आपल्या पायांनी रगडीत व लताची जाळी तुडवीत तो जात होता. पूर्ण तारुण्यांत आलेला गडस्थलांतून मदस्राव होत असलेला, व लोकानी चिडविल्यामुळें क्रुद्ध झालेला गजराज ज्याप्रमाणें मार्गातील वृक्षाना तुडवीत जातो, त्याचप्रमाणे भीमसेन जात होता. गरुड व वायु याच्याप्रमाणें वेग असलेल्या भीमाच्या त्या चालण्यानें त्याच्या शरीरावर असलेल्या त्याच्या बंधूना मूर्च्छा येऊं लागली. शरीराला बसणाऱ्या हिसक्यामुळे पाण्डव थकून गेले. तहान लागून पुढें जाण्याची शक्ति त्याच्यात उरली नाही. डोळ्यावर झोपही खूपच आली. अशा स्थितीत कुती तहानेनें व्याकुळ होऊन आपल्या पुत्रांना असें म्हणू लागली की, पाच पुत्राची आई असलेल्या मला कुणी पाणी देऊ शकणार नाही काय ? तिचे तें करुणाजनक भाषण ऐकून भीमानें एका विशाल वटवृक्षाच्या छायेखाली त्या सर्वांना विश्रांति घ्यावयास सांगितलें व इतके अपार परिश्रम करूनही मुळीच न थकलेला तो पाण्याच्या शोधार्थ निघाला. सरोवराजवळ येऊन त्यानें पोटभर जल प्राशन केले व स्नान करून आपल्या बंधूच्यासाठीं व आईसाठी

पाणी न्यावयाचा तो विचार करूं लागला. पाणी न्यावयास भांडें कुठचें असणार ? शेवटी आपल्या अंगावरील जाड उत्तरीय वस्त्रच त्यानें भिजविलें. पाण्डव जेथें पडले होते त्या ठिकाणाहून हें सरोवर दोन कोस लांब होतें. हें थबथबतें जाड वस्त्र तेवढ्या अंतरावरून त्वरित गतीनें घेऊन तो आपल्या आईजवळ आला. शोक व दु.खानें त्याचें अत:करण भरून गेले होतें व एकाद्या भयानक सर्पाप्रमाणें तो श्वास टाकीत होता " जवळ येतांच माता व बंधु यांना थकल्यामुळे झोप लागली असल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. त्यांची निद्रा भग पावू नये म्हणून तो जवळच्याच एका शिलाखंडावर स्वस्थपणें बसला. ज्या अरण्यांत पांडव होते तें एका हिडिम्ब नांवाच्या मनुष्य-भक्षक, क्रूर व बलवान् राक्षसाचें अरण्य होतें. त्याला मनुष्याचा वास येताच कोण माणसें आपल्या अरण्यांत आली आहेत तें पाह-ण्यासाठी त्यानें आपल्या बहीण हिडिम्बेला पाठविलें. मनुष्यरक्ताची व मांसाची चिरेप्सित मेजवानी आपल्याला मिळेल या कल्पनेनें तो हर्षभरित झाला होता. माणसें दृष्टीस पडतांच त्यांना आपण कसें खाऊं व त्यांचें रक्त कसें पिऊं याचें तो आपल्या बहिणीला वर्णन ऐकवू लागला. त्याच्याच शीलाची त्याची ती बहीण आपल्या बंधूच्या आज्ञेनुसार जी निघाली ती पांडव होते तेथे येतांच भीम-सेनाचें सौदर्य व सुदृढ शरीर पाहून त्याच्यावर लुब्ध झाली. कामविकार काय करणार नाही ? त्या भक्षक आपत्तीचें संरक्षक देवतेंत रूपांतर होऊन ती भीमसेनाला आगामी संकटाची सूचना देऊन स्वत:बरोबर येण्याची अभ्यर्थना करूं लागली. पण त्यानें आपल्या बंधूना व मातेला सोडून येण्याचें नाकारलें. त्याबरोबर त्यांना जागृत करून बरोबर घेऊन चलावें असें हिडिम्बेनें सुचविलें. पण आत्मप्रत्ययपूर्ण व निर्भय भीमानें सुखानें झोपलेल्या कुंतीला व पांडवांना उठविण्याचें साफ नाकारलें. तो त्या राक्षसीलाच उलटा धीर देऊन असें म्हणू लागला की:–

माभैस्त्वं पृथुसुश्रोणि नैष कश्चिन्मयि स्थिते ।
अहमेन हनिष्यामि प्रेक्षन्त्यास्ते सुमध्यमे ।। ७

नायं प्रतिबलो भीरु राक्षसापसदो मम ।
सोढुं युधि परिस्पन्दमथवा सर्वराक्षसाः ॥ ८
पश्य बाहू सुवृत्तौ मे हस्तिहस्तनिभाविमौ ।
ऊरू परिघसंकाशौ संहतं चाप्युरो महत् ॥ ९
विक्रमं मे यथेन्द्रस्य साऽद्य द्रक्ष्यसि शोभने ।
मावमंस्थाः पृथुश्रोणि मत्वा मामिह मानुषम् ॥ १०

--महाभारत, आदिपर्व अध्याय १५३

" हे सुन्दरी, तू मुळीच भिऊ नकोस. माझ्यासमोर तुझा भाऊ कःपदार्थ आहे. तुझ्या दृष्टीसमोर मी त्याला पाहतां पाहता ठार मारीन. तो राक्षसाधम माझा प्रतिपक्षी होण्याच्या देखील योग्यतेचा नाही. तोच काय, कोणताही राक्षस माझ्यासमोर क्षणमात्रही टिकावयाचा नाही. माझे हे हत्तीच्या सोंडेप्रमाणे पुष्ट असलेले बाहू पाहा. परिघाप्रमाणें असलेले माझे हे ऊरू व माझी भरदार छाती पहा. मला सामान्य मनुष्य समजून तू माझ्या सामर्थ्याची कल्पना करू नकोस. महेन्द्राप्रमाणे माझा पराक्रम आहे." याप्रमाणे त्या दोघाचा संवाद चालू असता अजून आपली बहीण का येत नाही म्हणून विचारांत पडलेला हिडिंब तेथे आला आपली बहीण आपले भक्ष्य असलेल्या मनुष्यावर लुब्ध झालेली पाहून त्याला अतोनात संताप चढला व प्रथम तो तिच्याच अंगावर धावून जाऊं लागला. भीमाने त्याला आपल्या अंगावर घेतले तेव्हां त्या नर-राक्षसाचे भीषण द्वंद्वयुद्ध झाले. थोड्याच वेळांत भीमसेनाने आपली माता व बंधु याच्या समक्ष त्याला जमिनीवर रगडून यज्ञीय पशूला वुकलून ठार मारावें त्याप्रमाणें त्याला ठार मारले. भीमसेनाच्या या भीम पराक्रमापासूनच कुंती व युधिष्ठिर याना त्याच्या अचाट सामर्थ्याची खरी ओळख पटलेली आहे. पुढे अनुरक्त हिडिंबेचा त्यानें कुंती व युधिष्ठिर याच्या अनुज्ञेनें स्वीकार केला. पुढे भगवान् श्रीकृष्णांच्या एका महान् योजनेतील महत्त्वाचा कीलक ठरलेला घटोत्कच हा भीमसेनाला हिडिंबेपासून झालेला पुत्र होय. यानंतर एकचक्रा नगरीतील पांडवाच्या निवासात कुंतीच्या आज्ञेवरून वकासुराचा वध करून भीमसेनानें तें सर्व वन व त्याच्या

आसमंतांतील प्रदेश नरमांसभक्षकापासून सदाचा मुक्त केला मर्यादापुरुषोत्तम भगवान् श्रीरामचंद्रांनी आपल्या दडकारण्यांतील निवासांत नरमांसभक्षकाच्या आक्रमणाच्या भयापासून प्रदेश निर्भय करण्याचें जें महनीय कार्य केलें तेंच कार्य महापराक्रमी भीमसेनानें आपल्या या अल्पकालीन विजनवासात पार पाडले आहे. हिडिब, वक व किर्मीर या सामर्थ्यशाली राक्षसाचा वध करणें हें भीमसेनाच्या अति मानवी सामर्थ्याचें द्योतक आहे. या महान् राक्षसी शक्तींशीं धडक देऊन त्यानें त्यांना नष्ट केल्यापासून त्याच्या सुहृदांचा व भगवान् श्रीकृष्णांचाही त्याच्या सामर्थ्याविषयीचा आत्मप्रत्यय इतका वाढलेला आहे की जरासधाला ठार मारण्याच्या धर्मसंस्थापनेच्या दृष्टीने अत्यत महत्त्वाच्या असलेल्या कार्यात त्यानी भीमाच्या सामर्थ्याचेच अमोघ साधन वापरलेले आहे. मगध सम्राट जरासध ही एक अति प्रचड शक्ति असून अनियत्रित व निरकुश सत्तेचा उपभोग घेऊ इच्छिणारे तत्कालीन सारें धर्मद्रोही भारतीय राजमडळ त्याच्या नेतृत्वाखाली सघटित झाले आहे. या सघटनेचें व तिचा नेता जो जरासध याचे सामर्थ्य इतके प्रभावशाली होते की अठरा वेळ त्या सामर्थ्याशी धडक देऊनही उघड्या मैदानात भगवान् श्रीकृष्णाना ते नष्ट करता आले नाही. इतकेच नव्हे तर स्वत.च्या राज्यातील नागर जीवनाला या आक्रमणकारी सामर्थ्याची सतत बाधा होऊन तें उत्सन्न होऊ नये म्हणून मथुरेच्या परिसराचा परित्याग करून द्वारकेच्या समुद्रवलयाकित दुर्गात येऊन राहणे त्यांना भाग पडले. हा सघटित भारतीय राजसघ फोडण्याचें भगवान् श्रीकृष्णानी अनेक प्रयत्न केले. पण ते सारे व्यर्थ ठरले. त्यांच्याशी विवाह बधनाच्या मधुर व नाजुक नात्यानें सबद्ध झालेले लोक देखील युद्धाचा प्रसग उद्भवताच जरासधाच्या नेतृत्वाखाली त्याच्यावरच उठावयास सिद्ध होत. शेवटी हा राजसघ फोडावयाचा एकच मार्ग त्यांना दिसून आला व तो म्हणजे मगध सम्राटालाच ठार मारणें हा होय. एकदा सम्राट जरासध मेला की या राजसघांतील प्राण निघून जाऊन तो असघटित व तेजोहीन होईल अशी त्यांची निश्चिति होती व पुढें तसेंच झालेंही. पण सम्राट् जरासधाला

मारणार कोण? त्याच्यावर ससैन्य आक्रमण करून त्याला सरळ मारतां येणें किती अशक्य आहे याचा प्रत्यय स्वतः श्रीकृष्णांना अठरा वेळ आलेला असल्यामुळे त्याच्या वधासाठीं उघड्या रणाची रीत सोडून दुसऱ्याच मार्गाचा अवलंब करणें भाग होतें. जेथें सरळ नीतीनें महनीय कार्याचा विनाश होतो तेथे कूट नीतीचें अवलंबन हेंच आवश्यक ठरतें. तत्कालीन क्षत्रियाच्यामध्ये द्वद्वयुद्धाचा एक नियम प्रचलित होता. त्याचें वैशिष्टय असें असे कीं जे दोन गृहस्थ एकमेकास आव्हान देऊन द्वद्वयुद्धासाठीं प्रवृत्त होतील त्यांच्या त्या युद्धांत तिसऱ्या कुणीही काय वाटेल तो परिणाम झाला तरी भाग घ्यावयाचा नसे. जरासधाला जर द्वद्वयुद्धांत एकट्याला गाठून आव्हान देतां आलें तर त्याला साह्यहीन अवस्थेंत ठार मारतां येईल असें त्याच्या मनानें घेतलें. द्वद्वयुद्धांत जरासंधाला एकट्या भीमावांचून दुसरा कोणीही ठार मारू शकणार नाही अशी त्यांची खात्री होती. ते युधिष्ठिराला म्हणतात :--

मयि नीतिर्बलं भीमे रक्षिता चावयोर्जयः ।
मागधं साधयिष्याम इष्टि त्रय इवाग्नयः ॥ ३
त्रिभिरासादितोस्माभिर्विजने स नराधिपः ।
न संदेहो यथा युद्धमेकेनाप्युपयास्यति ॥ ४
अवमानाच्च लोभाच्च बाहुवीर्याच्च दर्पितः ।
भीमसेनेन युद्धाय ध्रुवमप्युपयास्यति ॥ ५
अलं तस्य महाबाहुर्भीमसेनो महाबलः ।
लोकस्य समुदीर्णस्य निधनायान्तको यथा ॥ ६

--महाभारत, सभापर्व अध्याय २०

"माझ्या ठिकाणी नीति, भीमाच्या ठिकाणीं बल, व अर्जुन आम्हा तिघाचाही सरक्षणकर्ता अशा व्यवस्थेनें आम्ही जाऊं व जरासधाला ठार मारू. तीन अग्नीनी ज्याप्रमाणें इष्टि साधली जाते त्याप्रमाणेंच आम्ही तिघे मिळून संकल्पित कार्यभाग साधूं. आम्ही तिघांनीं एकांतांत त्याला गांठल्यावर तो द्वंद्वयुद्धासाठीं सिद्ध होईल यांत मला संशय नाही. द्वद्वयुद्ध नाकारण्यांत त्याला अपमान वाटेल. नवा विजय संपादन करण्याचा लोभ त्याला मुळींच सोड-

वणार नाही व स्वतःच्या बाहुवीर्याचा विलक्षण गर्व असल्यामुळें आपला पराजय होण्याची शक्यता देखील त्याला वाटणार नाही. उफाळलेल्या लोकांना अतक ज्याप्रमाणें ठार मारतो त्याप्रमाणें भीम मात्र जरासंधाला ठार मारील यांत मला संशय नाही."

भगवान् श्रीकृष्णाच्या इच्छेनुरूप भीमसेन व अर्जुन त्यांच्यावरोबर मगधाच्या राजधानीत गेले. तेथे त्यानीं राजा जरासधाची एकांतांत गांठ घेऊन त्यास द्वद्वयुद्धार्थ आव्हान केलें. श्रीकृष्णांच्या कल्पनेनुरूप जरासधानें हें आव्हान स्वीकारले व अहोरात्र चौदा दिवस भीमानें त्याच्याशी मल्लयुद्ध करून त्याला ठार मारलें. भक्तिमार्गीय भागवतकारांनी असें प्रतिपादन केलें आहे की, या युद्धांत भीमसेन थकल्यामुळे त्याने भगवान् श्रीकृष्णांना शरण जाऊन जरासधाला मारण्याची युक्ति विचारली व जें कार्य बलाने पार पाडण्यासारखें नव्हतें तें त्याने युक्तीने पार पाडले. पण महाभारतात याला कुठेही आधार नाही. सामर्थ्यशाली भीमसेनानें आपल्या स्वतःच्या विशिष्ट युद्धपद्धतीनें व महान् सामर्थ्यानेंच त्याला ठार मारलें आहे. महाभारतकार म्हणतात :–

यत्ते दैवं परं सत्त्वं यच्च ते मातरिश्वनः ।
बलं भीम जरासधे दर्शयाशु तदद्य वै ॥ ४
एवमुक्तस्तदा भीमो जरासंधमरिंदमः ।
उत्क्षिप्य भ्रामयामास बलवन्तं महाबलः ॥ ५
भ्रामयित्वा शतगुणं जानुभ्यां भरतर्षभ ।
बभञ्ज पृष्ठं सक्षिप्य निष्पिष्य विननाद च ॥ ६
करे गृहीत्वा चरणं द्वेधा चक्रे महाबलः ॥ ७
तस्य निष्पिष्यमाणस्य पाण्डवस्य च गर्जतः ।
अभवत्तुमुलो नादः सर्वप्राणिभयंकरः ॥ ८
वित्रेसुर्मागधाः सर्वे स्त्रीणां गर्भाश्च सुस्रुवुः ।
भीमसेनस्य नादेन जरासंधस्य चैव ह ॥ ९

—महाभारत, सभापर्व अध्याय २४

भगवान् श्रीकृष्ण भीमसेनाला म्हणाले की, "तुझ्या ठिकाणीं जें श्रेष्ठ दैवी सामर्थ्य आहे व वायूपासून जें अपार बल तुला प्राप्त

झालें आहे त्याचा या जरासंधावर उपयोग कर. हें ऐकतांच महाबलवान् भीमसेनानें बलवान् जरासंधाला मांड्या धरून एकदम वर उचललें व शंभर वेळां गरगरां फिरवून जमिनीवर आपटलें. त्याच्या पाठीचा कणा त्यानें रगडून मोडून टाकला, जोरानें गर्जना केली व नंतर त्यानें आपल्या हाताने त्याचा पाय मोडून त्याला मधून फाडलें व त्याचे दोन तुकडे केले. रगडला जाणारा जरासध मरणकाळच्या किकाळ्यानी किचाळत होता तर विजयोन्मादी भीमसेन जोरजोरानें गर्जना करीत होता. त्या दोघाचा तो समिश्र नाद आसमतातील सर्व प्राण्याना अत्यत भयंकर वाटत होता. भीम व जरासंध यांच्यां त्या गर्जनानी मगधांतील सर्व लोक त्रासून गेले व स्त्रियांचे गर्भपात झाले. भीमसेनाच्या जरासधवधाच्या ह्या अपूर्व पराक्रमाने भारतातील सर्व राजमडळ थरकापून उठले व राजा युधिष्ठिराचा राजसूय यज्ञ शक्य कोटीत आला. केवळ भीमसेनाच्या ह्या महान् पराक्रमामुळे त्याच्या कीर्तीने दिक्कोन गर्जून उठले व त्याच्याशी जन्मभर वैर करणाऱ्या व त्याच्या विनाशाची चिंता वाहणाऱ्या धृतराष्ट्रप्रमुख कौरवाना त्याचा व त्यामुळे पांडवांच्या सत्तेचा विलक्षण धाक वसला. जरासधाचा अतक भीमसेन कोणालाही जिंकता येणे केवळ अशक्य आहे अशी धृतराष्ट्राची सदाची समजूत होती. किवहुना भीमसेनाचा धाक धृतराष्ट्राच्या अत:करणात इतका विलक्षण बसला होता की, पाडव अज्ञातवासातून प्रकट झाल्याचे कळताच जरासधाच्या मरणकाळच्या किकाळ्या व रक्ताच्या थारोळ्यात पडलेले त्याच्या देहाचे दोन तुकडे त्याच्या अतश्चक्षूसमोर सारखे नाचू लागून त्याला झोप घेणे अशक्य होऊन बसले. तो सजयाला म्हणतो:—

सर्व एते महोत्साहा य त्वया परिकीर्तिता: ।
एकतस्त्वेव ते सर्वे समेता भीम एकत: ॥ १
भीमसेनाद्धि मे भूयो भयं संजायते महत् ।
क्रुद्धादमर्षणात्तात व्याघ्रादिव महाहरो: ॥ २
जागर्मि रात्रय: सर्वा दीर्घमुष्णं च निःश्वसन् ।
भीतो वृकोदरात्तात सिंहात् पशुरिवापर: ॥ ३

न हि तस्य महाबाहोः शक्रप्रतिमतेजसः ।
सैन्येऽस्मिन् प्रतिपश्यामि य एनं विषहेद्युधि ॥ ४
अमर्षणश्च कौन्तेयो दृढवैरश्च पाण्डवः ।
अनर्महासी सोन्मत्तस्तिर्यक्प्रेक्षी महास्वनः ॥ ५
महावेगो महोत्साहो महाबाहुर्महाबलः ।
मन्दानां मम पुत्राणां युद्धेनान्तं करिष्यति ॥ ६
उरुग्राहगृहीतानां गदां बिभ्रद्वृकोदरः ।
कुरूणामृषभो युद्धे दण्डपाणिरिवान्तकः ॥ ७
अष्टास्त्रिमायसीं घोरां गदां कांचनभूषणाम् ।
मनसाऽहं प्रपश्यामि ब्रह्मदण्डमिवोद्यतम् ॥ ८
यथा मृगाणां यूथेषु सिंहो जातबलश्चरेत् ।
मामकेषु तथा भीमो बलेषु विचरिष्यति ॥ ९
सर्वेषां मम पुत्राणां स एक क्रूरविक्रमः ।
बह्वाशी विप्रतीपश्च बाल्येऽपि रभसः सदा ॥ १०
उद्वेपते मे हृदयं ये मे दुर्योधनादयः ।
बाल्येऽपि तेन युध्यन्तो वारणेनेव मर्दिताः ॥ ११
तस्य वीर्येण संक्लिष्टा नित्यमेव सुता मम ।
स एव हेतुर्भेदस्य भीमो भीमपराक्रमः ॥ १२
ग्रसमानमनीकानि नरवारणवाजिनाम् ।
पश्यामीवाग्रतो भीमं क्रोधमूर्छितमाहवे ॥ १३
अस्त्रे द्रोणार्जुनसमं वायुवेगसमं जवे ।
महेश्वरसमं क्रोधे को हन्याद् भीममाहवे ॥ १४
संजयाचक्ष्व मे शूरं भीमसेनममर्षणम् ।
अतिलाभं तु मन्येऽहं यत्तेन रिपुघातिना ॥ १५
तदैव न हताः सर्वे पुत्रा मम मनस्विना ।
येन भीमबला यक्षा राक्षसाश्च पुरा हताः ॥ १६
कथं तस्य रणे वेगं मानुषः प्रसहिष्यति ।
न स जातु वशे तस्थौ मम बाल्येऽपि संजय ॥ १७
किं पुनर्मम दुष्पुत्रैः क्लिष्टः सम्प्रति पाण्डवः ।
निष्ठुरो रोषणोऽत्यर्थं भज्येतापि न संनमेत् ।
तिर्यक्प्रेक्षी संहतभ्रूः कथं शाम्येद् वृकोदरः ॥ १८
शूरस्तथाऽप्रतिबलो गौरस्ताल इवोन्नतः ।
प्रमाणतो भीमसेनः प्रादेशेनाधिकोऽर्जुनात् ॥ १९

जवेन वाजिनोऽत्येति बलेनात्येति कुंजरान् ।
अव्यक्तजल्पी मध्वक्षो मध्यमः पाण्डवो बली ।। २०
इति बाल्ये श्रुतः पूर्वं मया व्यासमुखात्पुरा ।
रूपतो वीर्यतश्चैव याथातथ्येन पाण्डव. ।। २१
आयसेन स दण्डेन रथान्नागान्नरान् हयान् ।
हनिष्यति रणे क्रुद्धो रौद्रः क्रूरपराक्रमः ।। २२
अमर्षी नित्यसंरब्धो भीमः प्रहरतां वर. ।
मया तात प्रतीपानि कुर्वन् पूर्वं विमानित ।। २३
निष्कर्णमायसीं स्थूलां सुपार्श्वां काञ्चनीं गदाम् ।
शतघ्नीं शतनिर्ह्रादां कथं शक्ष्यन्ति मे सुता ।। २४
अपारमप्लवागाधं समुद्रं शरवेधनम् ।
भीमसेनमयं दुर्गं तात मन्दास्तितीर्षवः ।। २५
क्रोशतो मे न शृण्वन्ति बालाः पण्डितमानिनः ।
विषमं न हि मन्यन्ते प्रपातं मधुदर्शिन ।। २६
संयुगं ये गमिष्यन्ति नररूपेण मृत्युना ।
नियतं चोदिता धात्रा सिंहेनेव महामृगाः ।। २७
शक्यां तात चतुष्किष्कुं षड्ऌिममितौजसम् ।
प्रहितां दुःखसंस्पर्शां कथं शक्ष्यन्ति मे सुताः ।। २८
गदां भ्रामयतस्तस्य भिन्दतो हस्तिमस्तकान् ।
सृक्किणी लेलिहानस्य बाष्पमुत्सृजतो मुहुः ।। २९
उद्दिश्य नागान् पतत कुर्वतो भैरवान् रवान् ।
प्रतीपं पततो मत्तान् कुंजरान् प्रतिगर्जतः ।। ३०
विगाहघ रथमार्गेषु वरानुद्दिश्य निघ्नतः ।
अग्नेः प्रज्वलितस्येव अपि मुच्येत मे प्रजा ।। ३१
वीर्यीं कुर्वन् महाबाहुर्द्रावयन् मम वाहिनीम् ।
नृत्यन्निव गदापाणिर्युगान्तं दर्शयिष्यति ।। ३२
प्रभिन्न इव मातङ्गः प्रभंजन् पुष्पितान् द्रुमान् ।
प्रवेक्ष्यति रणे सेनां पुत्राणां मे वृकोदर ।। ३३
कुर्वन्रथान्विपुरुषान्विसारथिहयध्वजान् ।
आरुजन् पुरुषव्याघ्रो रथिनः सादिनस्तथा ।। ३४
गङ्गावेग इवानूपांस्तीरजान् विविधान् द्रुमान् ।
प्रभङ्क्ष्यति रणे सेनां पुत्राणां मम संजय ।। ३५

दिशो नूनं गमिष्यन्ति भीमसेनभयार्दिताः ।
मम पुत्राश्च भृत्याश्च राजानश्चैव संजय ।। ३६
येन राजा महावीर्यः प्रविश्यान्त पुरं पुरा ।
वासुदेवसहायेन जरासन्धो निपातितः ।। ३७
कृत्स्नेय पृथिवी देवी जरासन्धेन धीमता ।
मागधेन्द्रेण बलिना वशे कृत्वा प्रतापिता ।। ३८
भीष्मप्रतापात् कुरवो नयेनान्धकवृष्णयः ।
यन्न तस्य वशे जग्मुः केवलं दैवमेव तत् ।। ३९
स गत्वा पाण्डुपुत्रेण तरसा बाहुशालिना ।
अनायुधेन वीरेण निहतः किं ततोऽधिकम् ।। ४०
दीर्घकालसमासक्त विषमाशीविषो यथा ।
स मोक्ष्यति रणे तेजः पुत्रेषु मम संजय ।। ४१
महेन्द्र इव वज्रेण दानवान् देवसत्तमः ।
भीमसेनो गदापाणिः सूदयिष्यति मे सुतान् ।। ४२
अविषह्यमनावार्यं तीव्रवेगपराक्रमम् ।
पश्यामीवातिताम्राक्षमापतन्त वृकोदरम् ।। ४३
अगदस्याप्यधनुषो विरथस्य विवर्मणः ।
बाहुभ्यां युध्यमानस्य कस्तिष्ठेदग्रतः पुमान् ।। ४४
भीष्मो द्रोणश्च विप्रोऽयं कृपः शारद्वतस्तथा ।
जानन्त्येते यथैवाहं वीर्यज्ञस्तस्य धीमतः ।। ४५

–महाभारत, उद्योगपर्व अध्याय ५१

"तू सांगितलेले हे सर्व वीर एका बाजूला व एकटा भीम एका बाजूला अशी स्थिति आहे. सहनशीलता मुळीच अंगी नसलेल्या व अत्यंत क्रुद्ध झालेल्या भीमसेनाचे मला मोठे भय वाटतें.एकाद्या मोठ्या हरिणाला वाघाचें वाटावें तसेंच मला भीमसेनाचें भय वाटतें. सिंहाला पाहून पशु भितात तसा मी भीमाला भितों. त्याच्या भयानें दीर्घ व उष्ण निःश्वास सोडून सारी रात्र मी जागून काढतों. इंद्राप्रमाणें अत्यंत तेजस्वी असलेल्या महाबाहु भीमसेनाला समरागणांत सहन करूं शकेल असा सैन्यांत मला कुणीही दिसत नाही. त्याच्यांत सहनशीलता मुळींच नसून मूळचाच तो अत्यंत रागीट आहे. आमच्याशीं त्याचें दृढस्वरूपाचें वैर आहे. थट्टेंत देखील नं हंसणारा, उन्मादी,

वाकड्या दृष्टीनें पाहणारा, आवाज मोठा असलेला, वेगवान्, अतिरिक्त उत्साही, आजानुबाहु व महाबलवान् भीमसेन, माझ्या मूर्ख पुत्रांना युद्धांत ठार मारल्यावाचून राहणार नाही. गदा हातांत घेऊन दण्डपाणि अन्तकाप्रमाणें दिसणारा भीमसेन मोठमोठ्या पराक्रमी लोकांचा अन्त करील. आपली सोन्याचें काम केलेली पोलादी घोर गदा ब्रह्मदण्डाप्रमाणें उगारलेला भीम माझ्या डोळ्यासमोर दिसतो. ज्याप्रमाणें बलिष्ठ सिह हरिणांच्या कळपांत संचार करतो, त्याप्रमाणें माझ्या सैन्यांत भीम सचार करील. तो खादाड, लहानपणापासूनच माझ्या पोरांशीं वाकडें असलेला, क्रूर व पराक्रमी भीमसेन एकटाच माझ्या सर्व पुत्रांचा अन्त करील. लहानपणींच एकाद्या मस्त हत्तीप्रमाणें त्याने रणांत माझ्या पुत्राचें मर्दन केले आहे. त्यामुळें माझ्या दुर्योधनादिक पुत्रांची काय गति होईल याची कल्पना करतांच माझें अतःकरण थरकापतें. भीमपराक्रमी भीमसेन हाच साऱ्या भांडणाचा मूळ हेतु आहे. क्रोधानें उन्मत्त होऊन सैन्यांतील पदाति, घोडेस्वार व हत्तीचें सैन्य मर्दन करीत असलेला भीम जणू की कांहीं माझ्या डोळ्यासमोर उभा असलेला मला दिसतो. अस्त्रविद्येंत द्रोणार्जुनांप्रमाणें असलेला, वायूप्रमाणें वेगवान् व महेश्वराप्रमाणे ज्याचा क्रोध भयानक आहे अशा भीमाला युद्धांत कोण मारू शकेल? संजया, रागीट भीमसेन काय म्हणाला तें मला साग माझ्या मुलांनी अपराध केला तेव्हांच मनस्वी भीमसेनानें त्याना ठार मारलें नाही हें मी माझे भाग्य समजतो. भीमपराक्रमी यक्ष व राक्षस ज्याने ठार मारून टाकले, त्याचें रणातील आक्रमण मनुष्य कसें सहन करू शकेल? लहानपणी देखील माझें नियत्रण त्यानें कधीही जुमानले नाही. मग माझ्या दुष्ट पुत्रांनी इतके दिवस त्याचा अतोनात छळ केल्यावर तो कधी ऐकेल काय? तो अत्यंत निष्ठुर, अतिशय रागीट, मोडेल पण वाकणार नाही अशा स्वभावाचा व भिवया आकुचित करून नेहमी वाकडें पाहणारा भीमसेन शात राहणें कसें शक्य आहे? तो अत्यत शूर असून त्याला प्रतियोद्धा कुणी नाही. गौर वर्णाचा, तालवृक्षाप्रमाणें उच, अर्जुनापेक्षां अधिक धिप्पाड व बलवान् असणारा भीमसेन आरक्त नेत्रांचा असून त्याचे

शब्दोच्चार अस्पष्ट असतात, असें त्याच्या रूपाचें व पराक्रमाचें वर्णन त्याच्या लहानपणींच व्यासांच्या तोंडून मी ऐकलें आहे. भयकर पराक्रम करणारा व क्रूर स्वभावाचा भीम रणांत क्रोधानें पोलादी कांब हातांत घेऊन चतुरग सैन्याचा नाश करील. आधीच तो रागीट, एकदम क्षुब्ध होणारा असा असून मी त्याचा अपमान करून त्याचे पुष्कळच वाईट केलें आहे. मला अप्रिय वाटणाऱ्या गोष्टी तो करी म्हणून मी त्याचा अवमान केला. आतां तो आपली सरळ, सोनेरी काम केलेली, वज्राप्रमाणें भयंकर व एकाच घावांत शभर शभर वीरांना जागच्या जागीं लोळविणारी गदा हातांत घेऊन माझ्या मुलांवर जेव्हां भयंकर आघात करील तेव्हां माझी मुले तो आघात कसा सहन करू शकतील. अपार, नाव नसलेला, अगाध व बाणांनीं भरलेला असा भीमसेनरूपी दुर्गम सागर तरून जाण्याची इच्छा करणारीं माझीं मुलें मूर्खच म्हटली पाहिजेत. स्वतःला पंडित समजणारी माझीं मुलें मी त्यांच्या कानीकपाळीं ओरडत असतांना देखील ऐकत नाहींत. मृत्यु ओढवलेल्या लोकांना समोरचा खड्डा दिसत नाही. जे कोणी भीमाशी प्रसग आहे याची कल्पना असूनही रणांत जातील ते मृगांना सिहाच्या जबडयांत ढकलावें त्याप्रमाणें परमेश्वरानेच मनुष्यरूपी मृत्यूच्या जबडयात ढकलले आहेत असें म्हटलें पाहिजे. ओठ चाटीत, डोळ्यांतून क्रोधानें अश्रू येत असलेल्या स्थितीत गदा फिरवीत हत्तीची गडस्थळे फोडणाऱ्या, हत्तीचे चीत्कार ऐकून प्रचड गर्जना करणाऱ्या, प्रज्वलित अग्नीप्रमाणें सैन्यांतून फिरत प्रमुख योद्धयाना ठार मारीत जाणाऱ्या भीमाच्या तावडीतून माझी मुलें सुटू शकतील काय ? गदा हाती घेऊन भीषण ताण्डव करीत माझ्या सैन्याला विदारण करून रस्ता काढणारा भीमसेन युगातांचेंच स्मरण करून देईल. मदोन्मत्त हत्ती फुलांनी बहरलेलीं झाडें ज्याप्रमाणे तुडवून काढतो त्याचप्रमाणें भीमसेन आमच्या सैन्याची अवस्था करून टाकील. आमच्या चतुरंग सैन्याचा पूर्ण विध्वस करून, गंगाप्रवाह तीरावरील विविध वृक्षांची जी अवस्था करतो तीच भीम आमच्या सैन्याची अवस्था करील. भीमाच्या भयानें माझे पुत्र, सेवक व युद्धासाठीं आलेले सर्व राजे दशदिशांना

पळून जातील असें मला वाटतें. ज्याने पूर्वी भगवान् श्रीकृष्णांच्या साहाय्यानें अत.पुरांत प्रवेश करून महापराक्रमी राजा जरासधाला ठार मारले तो हा भीम होय. बुद्धिमान मगधसम्राट जरासधाने ही सपूर्ण पृथ्वी जिकून पीडित केली होती. राजनीतिज्ञतेमुळे यादव व भीष्माच्या प्रतापामुळे कौरव त्याच्या स्वाधीन न होतां आपले स्वातत्र्य टिकून राहिलें हे केवळ दैवच होय. त्या महापराक्रमी जरासंधाला ज्यानें आयुधाला स्पर्शही न करतां केवळ बाहुबळानें ठार मारले त्या पांडुपुत्र भीमाच्या योग्यतेचे काय वर्णन करावें? पुष्कळ दिवस सांठविलेले विष सधि सांपडतांच सर्प ज्याप्रमाणे सोडतो त्याचप्रमाणें आपला इतके दिवस आवरलेला क्रोध भीम आता माझ्या पुत्रांवर टाकील. ज्याप्रमाणे महेंद्र दानवांना वज्रानें ठार मारतो त्याचप्रमाणें गदापाणि भीमसेन माझ्या पुत्रांना ठार मारील. भीमाचे ते भयानक आरक्त नेत्र माझ्या मनःचक्षूसमोर सदैव आहेत. गदा हातांत नसतां, धनुष्यही नसतां, विरथ व कवचाचे तुकडे उडालेल्या स्थितीत केवळ बाहूनी युद्ध करणाऱ्याही भीमसेनाच्या समोर उभे राहण्याची कुणाची छाती आहे! भीष्म, द्रोण, कृपाचार्य व मी या चौघांनाही भीमाच्या पराक्रमाची पूर्णपणें कल्पना आहे." महापराक्रमी जरासधाच्या वधानतर धर्मराजांच्या राजसूय यज्ञासाठी केलेल्या दिग्विजयांत भीमानें शिशुपालासारख्या दैवी सामर्थ्यसपन्न व्यक्तीच्या अंतःकरणाचाही थरकांप उडविलेला असून कर्णासारख्या महाधनुर्धराचाही पराजय केलेला आहे. भीमाचे हे अतिमानवी पराक्रम ध्यानांत घेतले तर त्यानें कीचक, दुःशासनादि घुगरटचांना ठार मारलें या गोष्टीचा स्वतत्रपणें उल्लेख देखील करण्याचें कारण उरत नाहीं.

युयुत्सु प्रवृत्ति व दांडगा आत्मप्रत्यय

भीमाच्या प्रचंड सामर्थ्याला अनुरूप अशीच त्याची ययुत्सु प्रवृत्ति असन स्वतःच्या सामर्थ्याविषयींचा त्याचा आत्मप्रत्यय विलक्षण आहे. धर्मनिष्ठ महापराक्रमी पुरुषानें, पराक्रमानें मिळणारें सर्व वैभव मिळविलेंच पाहिजे व धर्माच्या विरुद्ध नसणारे सर्व उपभोग घेतलेच

पाहिजेत असें त्याचें मत असून अकारण त्याग व अकर्मण्यता यांचा त्याला अत्यंत तिटकारा वाटतो. क्षात्रधर्माचा त्याला अत्यंत अभिमान असून क्षत्रिय धर्मानुसार पराक्रम करून साऱ्या जगाचें अधिराज्य मिळवावें असें त्याला वाटतें. राजसूय यज्ञाच्या वाटाघाटीच्या वेळीं जरासधाचा पराक्रम व त्याचे अजिक्यपण याचें भगवान् श्रीकृष्णानी वर्णन करतांच युधिष्ठिर राजसूय यज्ञाची कल्पनाच सोडून देऊन स्वस्थ बसावयाच्या गोष्टी बोलू लागले. त्या वेळी भीम युधिष्ठिरांना म्हणतो .—

अनारम्भपरो राजा वल्मीक इव सीदति ।
दुर्बलश्चानुपायेन बलिनं योऽधितिष्ठति ॥ ११
अतन्द्रितश्च प्रायेण दुर्बलो बलिन रिपुम् ।
जयेत्सम्यक्प्रयोगेण नीत्यार्थानात्मनो हितान् ॥ १२
कृष्णे नयो मयि बलं जयः पार्थे धनञ्जये ।
मागधं साधयिष्याम इष्टि त्रय इवाग्नयः ॥१३

—महाभारत, सभापर्व अध्याय १५

कमालीचा अकर्मण्य अथवा स्वतः दुर्बल असून युक्तीचा अवलब न करतां बलवताशी धडक देणारा राजा वारुळाप्रमाणें नष्ट होतो. अत्यत दक्ष राहून, नीतीच्या कुशल प्रयोगानें लाभ आपल्या पदरांत पाडून घेऊ इच्छिणारा राजा दुर्बल असला तरी योग्य युक्तीच्या अवलबनानें बलिष्ठ शत्रूला देखील बहुधा जिकतो. श्रीकृष्णाच्या ठिकाणी परिपूर्ण नीति असून माझ्या ठिकाणी बल व धनजयाच्या ठिकाणी विजय आहे. आम्ही तिघे मिळून जरासंधाचें काम पुरें करूं. तीन अग्नि ज्याप्रमाणें इष्टि साधतात तसेच आम्ही तिघे हें कार्य निश्चितपणें साधूं." साऱ्या राजसत्ता ज्याच्या पायाशीं विनम्र झाल्या होत्या, भगवान् श्रीकृष्ण देखील ज्याच्या भयानें राजधानी सोडून द्वारकेंत गेले होते व ज्याच्या प्रतापाचें वर्णन करीत असतां स्वतः भगवंतांनीं देखील ज्याचें अजिंक्यपण मान्य केलें होतें त्या जरासंधाचें वर्णन ऐकतांच कोणीही अनुकूल बोलावयाच्या आंतच भीमानें काढलेले हे समयस्फूर्त उद्गार आहेत हें

ध्यानांत घेतलें म्हणजे त्याचें महत्त्व अधिकच स्पष्ट होतें. भीमाचा रणोत्साह असा अपूर्व आहे की, त्याला जर कोणी साहाय्य देऊं केलें तर तें घेण्यांत एक प्रकारचा कमीपणा वाटून तो तें नाकारतो. हिडिंब व किर्मीर या राक्षसांच्या वधाच्या वेळीं अर्जुनानें त्याला साहाय्य देऊं केलें असतां भीमानें तें नाकारले. कर्णपर्वात तर भीमसेनाच्या अंगावरील घाव व त्याला झालेले श्रम पाहून अर्जुन युद्धाचा भार स्वतःवर सोपवून त्याला युधिष्ठिरांच्या समाचाराला जाण्यासाठीं विनवीत असतां भीमानें त्याला दिलेलें उत्तर पाहण्यासारखें आहे. भीम त्याला म्हणाला :—

त्वमेव जानीहि महानुभाव राज्ञः प्रवृत्तिं भरतर्षभस्य ।
अहं हि यद्यर्जुन याम्यमित्रा वदन्ति मां भीत इति प्रवीराः ॥ ८
ततोऽब्रवीदर्जुनो भीमसेनं संशप्तकाः प्रत्यनीकस्थिता मे ।
एतानहत्वाऽद्य मया न शक्यमितोपयातुं रिपुसंघगोष्ठात् ॥ ९
अथाब्रवीदर्जुनं भीमसेनः स्ववीर्यमासाद्य कुरुप्रवीर ।
संशप्तकान् प्रतियोत्स्यामि संख्ये सर्वानहं याहि धनञ्जय त्वम् ॥१०

—महाभारत, कर्णपर्व अध्याय ६५

"हे महानुभावा! भरतश्रेष्ठ राजा युधिष्ठिर कोठे आहे हें पहावयास तूच जा. जर मी येथून कोणत्याही निमित्तानें रण सोडून गेलो तर हे सारे शत्रू मला 'भ्याला' असें म्हणतील." त्यावर अर्जुनानें भीमाला असे सांगितले की, "संशप्तक माझ्याविरुद्ध रणांत ठाण माडून उभे आहेत. त्यांना ठार मारल्यावाचून शत्रुसैन्यांतून जाणें मला शक्य नाही." त्यावर आपल्या पराक्रमाच्या आत्मप्रत्ययानें भीमसेन अर्जुनाला म्हणाला की, या समोरच्या शत्रूंवरोवरच तुझ्या त्या संशप्तकांचाही मीच समाचार घेतों. किंबहुना साऱ्याच शत्रूचा भार मी माझ्याकडे घेतो. तू निश्चित मनानें युधिष्ठिरांच्या समाचारार्थ जा."

ज्याला जगांत जगावयाचें आहे त्यानें आपल्या हक्कांचें संरक्षण करण्यासाठीं सदैव जागरूक राहिलें पाहिजे व जगावयाचें तर आपल्या पराक्रमानें सन्मानाचे स्थान मिळवूनच जगलें पाहिजे अशी भीमाची विचारसरणी आहे. अपकारी लोकांनीं आपल्या उदात्तते-

पासून स्वतःचा लाभ करून घेऊन आपणांस बावळट समजून दुःख भोगावयास लावावें याची त्याला अत्यंत चीड आहे व जशास तसें या न्यायानेंच व्यवहारी जगांत वागलें पाहिजे असें त्याचें रोख ठोक तत्त्वज्ञान आहे. भीमाची सर्व विचारप्रणालि, युधिष्ठिरांना उत्तर म्हणून वनपर्वात त्यानें केलेल्या भाषणांत स्पष्ट झाली आहे. युधिष्ठिर आपला सत्यपरिपालनाचा व धर्मसंरक्षणाचा ध्येयवाद सांगून द्रौपदीला गप्प बसविण्याचा प्रयत्न करीत असतां भीम म्हणतो :—

राज्यस्य पदवीं धर्म्यां व्रज सत्पुरुषोचिताम् ।
धर्मार्थकामहीनानां किं नो वस्तुं तपोवने ॥ २
नैव धर्मेण तद्राज्यं नार्जवेन न चौजसा ।
अक्षकूटमधिष्ठाय हृतं दुर्योधनेन वै ॥ ३
गोमायुनेव सिंहानां दुर्बलेन बलीयसाम् ।
आमिषं विधसाशेन तद्वद्राज्यं हि नो हृतम् ॥ ४
धर्मलेशप्रतिच्छन्नः प्रभवं धर्मकामयोः ।
अर्थमुत्सृज्य किं राजन् दुःखेषु परितप्यसे ॥ ५
भवतोऽनवधानेन राज्यं नः पश्यतां हृतम् ।
अहार्यमपि शक्रेण गुप्तं गाण्डीवधन्वना ॥ ६
कुणीनामिव बिल्वानि पंगूनामिव धेनवः ।
हृतमैश्वर्यमस्माकं जीवतां भवतः कृते ॥ ७
भवतः प्रियमित्येवं महद् व्यसनमीदृशम् ।
धर्मकामे प्रतीतस्य प्रतिपन्नाः स्म भारत ॥ ८
कर्षयामः स्वमित्राणि नन्दयामश्च शात्रवान् ।
आत्मानं भवतां शास्त्रैर्नियम्य भरतर्षभ ॥ ९
यद्वयं न तदैवैतान्धार्तराष्ट्रान्निहन्महि ।
भवतः शास्त्रमादाय तन्नस्तपति दुष्कृतम् ॥ १०
भवान् धर्मो धर्म इति सततं व्रतकर्शितः ।
कच्चिद्राजन्न निर्वेदादापन्नः क्लीबजीविकाम् ॥ १३
अस्मानमी धार्तराष्ट्राः क्षममाणानलं सतः ।
अशक्तानिव मन्यन्ते तत् दुःखं नाहवे वधः ॥ १६
तत्र चेत् युध्यमानानामजिह्मगनिवर्तिनाम् ।
सर्वशो हि वधः श्रेयान् प्रेत्य लोकान् लभेमहि । १७

अथवा वयमेवैतान् निहत्य भरतर्षभ ।
आददीमहि गां सर्वां तथापि श्रेय एव नः ॥ १८
आत्मार्थं युध्यमानानां विदिते कृत्यलक्षणे ।
अन्यैरपि हृते राज्ये प्रशंसैव न गर्हणा ॥ २०
कर्षणार्थो हि यो धर्मो मित्राणामात्मनस्तथा ।
व्यसनं नाम तद्राजन् न धर्मः स कुधर्म तत् ॥ २१
सर्वथा धर्मनित्यं तु पुरुषं धर्मदुर्बलम् ।
त्यजतस्तात धर्मार्थौ प्रेतं दुःखसुखे यथा ॥ २२
यस्य धर्मो हि धर्मार्थं क्लेशभाङ्न स पण्डितः ।
न स धर्मस्य वेदार्थं सूर्यस्यान्धः प्रभामिव ॥ २३
अतिवेलं हि योऽर्थार्थी नेतरावनुतिष्ठति ।
स वध्यः सर्वभूतानां ब्रह्महेव जुगुप्सितः ॥ २५
सततं यश्च कामार्थी नेतरावनुतिष्ठति ।
मित्राणि तस्य नश्यन्ति धर्मार्थाभ्यां च हीयते ॥ २६
तस्माद्धर्मार्थयोर्नित्यं न प्रमाद्यन्ति पण्डिताः ।
प्रकृतिः सा हि कामस्य पावकस्यारणिर्यथा ॥ २८
सर्वथा धर्ममूलोर्थो धर्मश्चार्थपरिग्रहः ।
इतरेतरयोर्नीतौ विद्धि मेघोदधी यथा ॥ २९
दानं यज्ञाः सतां पूजा वेदधारणमार्जवम् ।
एष धर्मः परो राजन् बलवान् प्रेत्य चेह च ॥ ४६
एष नार्यविहीनेन शक्यो राजन् निषेवितुम् ।
अखिलाः पुरुषव्याघ्र गुणाः स्युर्यत्पितरे ॥ ४७
धर्ममूलं जगद्राजन् नान्यत् धर्माद् विशिष्यते ।
धर्मश्चार्थेन महता शक्यो राजन् निषेवितुम् ॥ ४८
न चार्थो भैक्ष्यचर्येण नापि क्लैब्येन कर्हिचित् ।
वेत्तुं शक्यः सदा राजन् केवलं धर्मबुद्धिना ॥ ४९
प्रतिषिद्धा हि ते याञ्चा यया सिध्यति वै द्विजः ।
तेजसैवार्थलिप्सायां यतस्व पुरुषर्षभ ॥ ५०
भैक्ष्यचर्या न विहिता न च विट्शूद्रजीविका ।
क्षत्रियस्य विशेषेण धर्मस्तु बलमौरसम् ॥ ५१
स्वधर्मं प्रतिपद्यस्व जहि शत्रून् समागतान् ।
धार्तराष्ट्रवनं पार्थ मया पार्थेन नाशय ॥ ५२

प्रजापालनसंभूतं फलं तव न गर्हितम् ।
एष ते विहितो राजन् धात्रा धर्मः सनातनः ॥ ५५
तस्मादपचितः पार्थ लोके हास्यं गमिष्यसि ।
स्वधर्माद्धि मनुष्याणां चलनं न प्रशस्यते ॥ ५६
न हि केवलधर्मात्मा पृथिवीं जातु कश्चन ।
पार्थिवो व्यजयद्राजन्न भूतिं न पुनः श्रियम् ॥ ५८
जिह्वां दत्वा बहूनां हि क्षुद्राणां लुब्धचेतसाम् ।
निकृत्या लभते राज्यमाहारमिव शल्यकः ॥ ५९
भ्रातरः पूर्वजाताश्च सुसमृद्धाश्च सर्वशः ।
निकृत्या निर्जिता देवैरसुराः पार्थिवर्षभ ॥ ६०
एवं बलवतः सर्वमिति बुध्वा महीपते ।
जहि शत्रून्महाबाहो परां निकृतिमास्थितः ॥ ६१
न ह्यर्जुनसमः कश्चित् युधि योधो धनुर्धरः ।
भविता वा पुमान्कश्चिन्मत्समो वा गदाधरः ॥ ६२
सर्वथा संहतैरेव दुर्बलैर्बलवानपि ।
अमित्रः शक्यते हन्तुं मधुहा भ्रमरैरिव ॥ ७०
यथा राजन्प्रजाः सर्वाः सूर्यः पाति गभस्तिभिः ।
अत्ति चैव तथैव त्वं सदृशः सवितुर्भव ॥ ७१
एतच्चापि तपो राजन् पुराणमिति नः श्रुतम् ।
विधिना पालनं भूमेर्यत्कृतं नः पितामहैः ॥ ७२
न तथा तपसा राजँल्लोकान्प्राप्नोति क्षत्रियः ।
यथा सृष्टेन युद्धेन विजयेनेतरेण वा ॥ ७३
अपेयात्किल भा सूर्यात्तल्लक्ष्मीश्चन्द्रमसस्तथा ।
इति लोको व्यवसितो दृष्ट्वेमां भवतो व्यथाम् ॥ ७४
भवतश्च प्रशंसाभिर्निन्दाभिरितरस्य च ।
कथा युक्ताः परिषदः पृथग्राजन्समागताः ॥ ७५
इदमभ्यधिकं राजन् ब्राह्मणाः कुरवश्च ते ।
समेताः कथयन्तीह मुदिताः सत्यसंधताम् ॥ ७६
यन्न मोहान्न कार्पण्यात् न लोभान्न भयादपि ।
अनृतं किंचिदुक्तं ते न कामान्नार्थकारणात् ॥ ७७
यदेनः कुरुते किंचिद्राजा भूमिमवाप्नुवन् ।
सर्वं तन्नुदते पश्चाद्यज्ञैर्विपुलदक्षिणैः ॥ ७८

ब्राह्मणेभ्यो ददन्ग्रामान्गाश्च राजन्सहस्रशः ।
मुच्यते सर्वपापेभ्यस्तमोभ्य इव चंद्रमाः ॥ ७९
पौरजानपदाः सर्वे प्रायशः कुरुनन्दन ।
सवृद्धबालसहिताः शंसन्ति त्वां युधिष्ठिर ॥ ८०
श्वदृतौ क्षीरमासक्तं ब्रह्म वा वृषले यथा ।
सत्यं स्तेने बलं नार्यां राज्यं दुर्योधने तथा ॥ ८१
इति लोके निर्वचनं पुरश्चरति भारत ।
अपि चैताः स्त्रियो बालाः स्वाध्यायमधिकुर्वते ॥ ८२
इमामवस्थां च गते सहास्माभिररिंदम ।
हन्त नष्टाः स्म सर्वे वै भवतोपद्रवे सति । ८३
स भवान्रथमास्थाय सर्वोपकरणान्वितम् ।
त्वरमाणोभिनिर्यातु विप्रेभ्योऽर्थविभावकः ॥ ८४
वाचयित्वा द्विजश्रेष्ठानद्यैव गजसाह्वयम् ।
अस्त्रविद्भिः परिवृतो भ्रातृभिर्दृढधन्विभिः ॥ ८५
आशीविषसमैर्वीरैर्मरुद्भिरिव वृत्रहा ।
अमित्रांस्तेजसा मृद्गन्नसुरानिव वृत्रहा ॥
श्रियमादत्स्व कौन्तेय धार्तराष्ट्रान्महाबल ॥ ८६
न हि गाण्डीवमुक्तानां शराणां गार्ध्रवाससाम् ।
स्पर्शमाशीविषाभानां मर्त्यः कश्चन संसहेत् ॥ ८७
न स वीरो न मातंगो न च सोऽश्वोस्ति भारत ।
यः सहेत गदावेगं मम क्रुद्धस्य संयुगे ॥ ८८
सृंजयैः सह कैकेयैर्वृष्णीनां वृषभेण च ।
कथंस्विद्युधि कौन्तेय न राज्यं प्राप्नुयामहे ॥ ८९
—महाभारत, वनपर्व अध्याय ३३

अस्माभिरुषिताः सम्यग्वने मासास्त्रयोदश ।
परिमाणेन तान्पश्य तावतः परिवत्सरान् ॥ ३२
अस्ति मासः प्रतिनिधिर्यथा प्राहुर्मनीषिणः ।
पूतिकानिव सोमस्य तथेदं क्रियतामिति ॥ ३३
अथवाऽनडुहे राजन्साधवे साधुवाहिने ।
सौहित्यदानादेतस्मादेनसः प्रतिमुच्यते ॥ ३४
तस्माच्छत्रुवधे राजन् क्रियतां निश्चयस्त्वया ।
क्षत्रियस्य हि सर्वस्य नान्यो धर्मोऽस्ति संयुगात् ॥ ३५
—महाभारत, वनपर्व अध्याय ३५

"सत्पुरुषांना उचित असलेलें व धर्माला अनुसरून असलेलें राजसिंहासन स्वाधीन करून घेण्याची खटपट करा. धर्म, काम व अर्थ यांपासून वंचित झालेल्या अवस्थेंत आपण तपोवनांत राहण्यांत काय लाभ आहे? आपलें राज्य कांहीं दुर्योधनानें धर्मानें, सज्जनपणानें अथवा पराक्रमानें जिकलेलें नाहीं. तें त्यानें कपटद्यूतानें जिंकलें आहे. कोल्ह्यानें सिंहाचा भाग घ्यावा अथवा कुत्र्यानें मांस पळवावें त्याप्रमाणें आम्हां बलवंतांचें राज्य त्या दुर्बलानें हरण केलें आहे. धर्माच्या लहान अंशाच्या नांवाखालीं धर्म व काम ज्याच्यापासून उत्पन्न होतात तो अर्थ सोडून देऊन व्यर्थ दुःखांत कां होरपळतां? गाण्डीवधारी अर्जुनानें संरक्षिलेलें आपलें राज्य इन्द्रालादेखील हरण करणें अशक्य होतें. केवळ तुमच्या अनवधानानें पाहतां पाहतां आमच्या डोळ्यांदेखत तें गेलें आहे. हात लुळे असलेल्या माणसाजवळून बिल्वफळें न्यावी अथवा पङ्गू माणसाच्या गायी पळवाव्या त्याप्रमाणें केवळ तुमच्यामुळें आम्ही जिवंत असतां आमचें राज्य गेलें. धर्म साधण्याच्या इच्छेनें तुम्ही हें मोठें संकट स्वतःवर ओढवून घेतलें व केवळ तुम्हाला बरें वाटावें म्हणून आम्ही विपत्ति सहन करीत आहोंत. आम्ही आमच्या मित्रांना दुःख देऊन शत्रूना मात्र आनंदित करीत आहोंत. कारण तुमच्या शास्त्रनियमांनी आम्हीच स्वतःला बांधून घेतलें आहे. त्याच वेळी आम्ही धृतराष्ट्रपुत्रांना जें ठार मारलें नाहीं त्याचें कारण केवळ तुमचे शास्त्रनियम होत. पण असें करण्यांत आम्ही मोठें दुष्कृत्य केलें आहे व त्याचाच परिणाम म्हणून हें दुःख आम्ही भोगीत आहोंत. आपण धर्म धर्म म्हणून भलत्याच कल्पनांनीं स्वतःला त्रास करून घेत निराश मनानें, एखाद्या षंढाप्रमाणें तर वागत नाही ना? आपण धृतराष्ट्रपुत्रांना क्षमा करावी म्हणून सहनशीलता दाखवितों. पण त्यामुळें ते मात्र आपल्याला अशक्त समजतात. ही गोष्ट जितकी दुःखाची आहे तितकें युद्धांत ठार होणें देखील दुःखाचें नाहीं. निष्कपट रीतीनें रणाला पाठ न दाखवितां आपल्या हक्कासाठीं लढत असतां मृत्यु आला तर स्वर्ग मिळेल व आम्हींच आमच्या शत्रूंना ठार मारले तर सात्या पृथ्वीचें राज्य उपभोगू. यांत उभयपक्षीं कल्याणच आहे. स्वतःच्या हक्कासाठीं

आवश्यक कर्तव्य म्हणून लढत असतां शत्रूनें आपणांस जिंकून आपलें राज्य घेतलें तरीदेखील ती निंदास्पद गोष्ट नसून भूषणास्पदच आहे. जो धर्म आपण व आपले मित्र यांना केवळ कष्टच देत असतो तो धर्म नसून कुधर्म होय. नेहमी धर्म धर्म करून एक प्रकारचें धर्म-दुर्बलत्व आलेल्या माणसाला, प्रेताला ज्याप्रमाणें सुखदुःखें सोडून जातात त्याचप्रमाणे धर्म व अर्थ सोडून जात असतात. प्रयोजनाकडे न पाहतां जो केवळ धर्म धर्म करीत बसतो तो शाहणा नसून केवळ क्लेशभागी होतो. अधाला ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश कळत नाही त्याचप्रमाणें त्याला धर्माचें रहस्य कळत नाहीं. तसेंच जो धर्म व व काम सोडून स्वार्थीपणानें केवळ अर्थ अर्थ करीत बसतो तो ब्रह्म-हत्येसारखें घाणेरडें पाप करणारा असून सर्व प्राणिमात्रांना वध्य आहे. जो धर्म व अर्थ सोडून कामाच्याच पाठीमागें लागतो त्याचे धर्म व अर्थ तर नाश पावतातच, पण मित्रही त्याला सोडून जातात. दान, यज्ञ, संतांची पूजा, वेदधारण व आर्जव हेंच धर्माचें स्वरूप असून हा श्रेष्ठ धर्म इहपरलोकीं कल्याणकारक आहे. पण हे पुरुषव्याघ्रा, इतर सर्व सद्गुण अगांत असूनही ज्याच्याजवळ संपत्ति नाही त्याला हचा धर्माचें अनुष्ठान कधीही करता येणें शक्य नाही. जगताचे धर्म हेंच मूळ असून त्यांपेक्षां दुसरें काहीही श्रेष्ठ नाही. पण पुष्कळ संपत्तीवाचून धर्माचें अनुष्ठानच अशक्य आहे. पण हे राजा, केवळ धर्मबुद्धि ठेवून भिक्षा मागण्यानें वा षढासारखें वाग-ल्यानें अर्थप्राप्ति कधीही होणार नाही. जिच्यापासून केवळ ब्राह्मणां-च्याच इच्छा सफळ होतात ती भिक्षा मागण्याची वृत्ति धर्मानेंच तुला बंद केली आहे. पराक्रमानें संपत्ति मिळविणें हा एकच मार्ग तुझ्यासाठी मोकळा आहे. ब्राह्मणाप्रमाणे भिक्षा मागणे अथवा वैश्य-शूद्राप्रमाणे जीवन जगणे क्षत्रियाला धर्माने सांगितलेलें नाही. बाहु-बळाच्या भरवशावर स्वतःचे उपजीवन चालविणे हेंच क्षत्रियाला विहित आहे. स्वधर्माप्रमाणें वाग, आक्रमण करणाऱ्या आपल्या शत्रूना ठार मार व मी व अर्जुन हचांच्या साहचाने धृतराष्ट्रपुत्रांचें हें वन नष्ट करून टाक. प्रजापालनानें मिळणारे पुण्यफळ हा तुझा वर्णधर्म होय. तुला हचा मार्गाला निन्दास्पद म्हणतां येणार नाही.

परमेश्वरानेंच तुझ्यासाठीं हा शाश्वत धर्म सांगितलेला आहे. स्वधर्मापासून चळणें मुळीच प्रशंसनीय नाहीं. तू आपल्या धर्मापासून चळलास कीं लोक तुझा उपहासच करतील. केवळ धर्म धर्म करीत बसणाऱ्या कोणत्याही राजाला आजपर्यंत पृथ्वी, कल्याण व संपत्ति यांची प्राप्ति झालेली नाहीं. व्याध ज्याप्रमाणें आपला आहार मिळवितो त्याचप्रमाणें लोभी व क्षुद्र लोकांना लोभ दाखवून वंचनेनेंच कुणालाही राज्य मिळत असतें. स्वतःपेक्षां ज्येष्ठ असलेल्या व सर्व दृष्टींनीं समृद्ध असलेल्या आपल्या बन्धूना देवांनीं देखील वंचनेनेंच जिंकिलें व राज्य मिळविलें आहे. सामर्थ्यसंपन्न लोक असेंच करीत असतात हें ओळखून भेदनीतीच्या उपायानें तू आपल्या शत्रूंना ठार मार. अर्जुनासारखा धनुर्धर कुणीही नाहीं व जगांत माझ्यासारखा गदाधरही कुणी नाही. मानसिक बळाच्या भरंवशावर युद्धासारखीं मोठीं काम पार पडत असतात. नुसत्या सैन्यबळानें व उत्साहानें कांहीं होत नाहीं. अत्यंत संघटित होऊन केवळ संघटनेच्या भरंवशावर दुर्बल लोक देखील बलवान् शत्रूला ठार मारूं शकत असतात. दुर्बल मधमाशा देखील मध चोरणाऱ्याचा विनाश करीत नाहीत काय? सूर्य ज्याप्रमाणें आपल्या किरणांनी जलशोषण करतो व पुन्हां वर्षाव करून लोकांचें रक्षण करतो, त्याप्रमाणें तू आज पराक्रम कर व प्रजांचें परिपालन करून त्यांना आनंद दे. आपल्या पूर्वजांनीं केले त्याप्रमाणे विधिपूर्वक भूमीचें परिपालन करणें ही एक सनातन तपश्चर्याच आहे. ज्याप्रमाणें युद्ध, विजय व पालन या धर्ममार्गानें क्षत्रियाला सद्गति मिळते त्याप्रमाणें त्याला तपश्चर्येनें सद्गति मिळू शकत नाही. तुझी ही व्यथा पाहून लोकांना, प्रभा सूर्याला व ज्योत्स्ना चद्राला सोडून गेल्यासारखें दुःख होतें. तू अत्यंत लोकप्रिय आहेस. प्रजा तुझ्यावर प्रसन्न आहे. प्रत्येक ठिकाणीं लोक जमून तुझी स्तुति व तुझ्या शत्रूची निन्दा करीत असतात. सारे ब्राह्मण व कुरुकुलांतील लोक तुझ्या सत्यसंधतेची प्रशंसा करीत असतात. मोह, कार्पण्य, लोभ, भय, काम व सपत्तीची अभिलाषा यांपैकीं कोणत्याही कारणास्तव तू कधीं खोटें बोलू शकला नाहीस असें लोकांचें मत आहे. राज्य मिळवितांना राजाला जें कांहीं पाप

लागतें तें विपुल दक्षिणा देऊन यज्ञ केल्यानें व विद्वान् ब्राह्मणांना खूप गोधन व सहस्रावधि अग्रहार दिल्यानें पार नाहींसें होतें. चंद्र अधाराला नाहींसें करतों त्याचप्रमाणें या कृत्यांनीं मिळणारी कीर्ति सर्व दोषांना नाहींसें करतें, सारे पौरजानपद व वृद्धबालप्रजाजन आपणच राजा व्हावें अशी इच्छा करतात. कुत्र्याला खीर, चांडालाला वेद, चोराला सत्य व स्त्रीला बल असावें तसेंच दुर्योधनासारख्या अधमाला राज्य असणें सर्वथा अयोग्य आहे असें स्त्रिया व मुलांसुद्धां सर्व प्रजाजन म्हणत असतात. प्रजांनी तुझ्या बाबतींत इतकी अपार निष्ठा दाखविली असतां तू जर नुसताच बसून राहशील तर सर्वाचाच अकारण सर्वनाश होईल. म्हणून आपला रथ सज्ज करून व ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून आजच हस्तिनापुरावर चढाई कर. आम्हां दृढधनुर्धारी, अस्त्रज्ञ व सर्पाप्रमाणें भयकर अशा बंधूनी परिवेष्टित अशा स्थितीत तूं मरुद्गणांनी परिवेष्टित अशा महेंद्राप्रमाणें शोभशील. महेंद्रानें असुरांना ठार मारावें त्याप्रमाणें आपल्या पराक्रमाने शत्रूना ठार मारून धृतराष्ट्रपुत्रांपासून तू आपलें राज्य हिसकावून घे. गांडीव धनुष्यापासून सुटलेले व सर्पाप्रमाणे भयकर असलेले अर्जुनाचे गार्धपत्र नांवाचे बाण सहन करूं शकेल असा कुणीही मनुष्य पृथ्वीवर नाहीं. त्याचप्रमाणे युद्धात क्रुद्ध झालेल्या माझा गदावेग सहन करूं शकणारा वीर पुरुष, हत्ती किंवा अश्व अजून जन्मालाच यावयाचा आहे. संजय, कैकेय व भगवान् श्रीकृष्ण याच्यासहित युद्ध करीत असतां आपल्याला राज्य मिळणार नाही असें तुला वाटतें काय ? आपण अरण्यांत तेरा महिने घालविले आहेत. पूतिका ज्याप्रमाणें सोमाच्या प्रतिनिधि असतात, त्याचप्रमाणें महिने हे वर्षाचे प्रतिनिधि होऊं शकतात असें विद्वानांचें मत आहे. तेव्हां पूर्ण झालेले तेरा महिने म्हणजे तेरा वर्षेच होत असें समजून वचनमुक्त व्हावयास हरकत नाही. तरीही तुला पाप वाटलेंच तर धर्मशास्त्रानुसार चांगल्या बैलाला भरपूर चारा घालून तुला पापापासून मुक्त होतां येईल. म्हणून हे राजा, शत्रुवधाचा तू निश्चय कर. क्षत्रियाचा युद्धावांचून दुसरा कोणताही धर्म नाही."

असें हें भीमाचें माणसासारखें तत्त्वज्ञान आहे. श्रीकृष्णाच्या "शठं प्रति शाठ्यं" या तत्त्वाचें यथावत् आचरण करण्याचा त्याचा आत्मप्रत्ययही अत्यंत विलोभनीय आहे. महान् साहस व मोडलों तरी नमणार नाही ही वीरवृत्ति भीमसेनाच्या नसांनसांतून खेळते.

मोडेन पण नमणार नाहीं

राजा धृतराष्ट्रानें भीमसेनाचें जें वर्णन केले आहे त्यात त्याच्या मोडेन पण वाकणार नाही, या प्रवृत्तीचा स्पष्ट उल्लेख आहेच. भीमाच्या या प्रवृत्तीची अनेक उदाहरणें महाभारतांत आहेत. द्रोण-पर्वात या प्रवृत्तीचे मोठे विलक्षण उदाहरण आलें आहे. आचार्य द्रोणांचा धृष्टद्युम्नाने वध केल्यानतर त्या भयानक वधाची वार्ता कळतांच द्रोणपुत्र अश्वत्थामा अतिशय सतापला व त्यानें पांडव सैन्याच्या विनाशासाठी नारायणास्त्राचा प्रयोग केला. नारायणास्त्र हे असें विलक्षण अस्त्र होतें की त्याचा विघात दुसऱ्या कोणत्याही अस्त्रानें होण्यासारखा नव्हता. वाहन सोडून शस्त्र खाली ठेवून व हात जोडून उभे राहाणे हा एकच तें अस्त्र शांत करण्याचा मार्ग होता. भगवान् श्रीकृष्णानी पांडव सैन्याला तशी आज्ञा केली व स्वत.ची शस्त्रे खाली ठेवून अर्जुनासहित ते स्वतः रथाखाली उतरून उभे राहिले. त्याच्या आज्ञेनुसार सर्वानी शस्त्रे खाली ठेवली. पण भीमसेनाला तो साराच प्रकार अत्यत अपमानास्पद वाटला. ज्याचा विघात होऊं शकत नाही असें अस्त्र जगांत असू शकतें यावर त्याचा मुळीच विश्वास नव्हता व शत्रूचें अस्त्र केवढेही भयानक असले तरी त्याच्यासमोर हात जोडून उभें राहणे हे त्याला मरणाहूनही अति दुःखदायक वाटलें. श्रीकृष्ण मोठे देव असले तरी ते सांगतील त्या मानभंगाच्या गोष्टी मान्य करावयास त्याचें मन मुळीच तयार होईना. अर्जुनासारखा आपला भाऊ व इतरही सारे लोक वेड्यासारखे आपली शस्त्रे खाली ठेवून द्रोणपुत्र अश्वत्थाम्या-सारख्या शत्रूसमोर नम्रपणें उभे राहिले आहेत हे पाहतांच त्याचा संताप अनावर झाला. श्रीकृष्णांचा अनादर करून तो सर्व सैन्या-समोर येऊन उभा राहिला व मोठ्यानें गर्जना करून म्हणू लागला:–

न कथंचन शस्त्राणि मोक्तव्यानीह केनचित् ।
अहमावारयिष्यामि द्रोणपुत्रास्त्रमाशुगैः ॥ ४५
गदयाऽप्यनया गुर्व्या हेमविग्रहया रणे ।
कालवत् प्रहरिष्यामि द्रौणेरस्त्रं विशातयन् ॥ ४६
न हि मे विक्रमे तुल्यः कश्चिदस्ति पुमानिह ।
यथैव सवितुस्तुल्यं ज्योतिरन्यन्न विद्यते ॥ ४७
पश्यतेमौ हि मे बाहू नागराजकरोपमौ ।
समर्थौ पर्वतस्यापि शैशिरस्य निपातने ॥ ४८
नागायुतसमप्राणो हयहमेको नरेष्विह ।
शक्रो यथाऽप्रतिद्वन्द्वो दिवि देवेषु विश्रुतः ॥ ४९
अद्य पश्यत मे वीर्यं बाह्वोः पीनांसयोर्युधि ।
ज्वलमानस्य दीप्तस्य द्रौणेरस्त्रस्य वारणे ॥ ५०
यदि नारायणास्त्रस्य प्रतियोद्धा न विद्यते ।
अद्यैतत्प्रतियोत्स्यामि पश्यत्सु कुरुपाण्डुषु ॥ ५१
अर्जुनार्जुन बीभत्सो न न्यस्यं गाण्डिवस्त्वया ।
शशाङ्कस्येव ते पङ्को नैर्मल्यं पातयिष्यति ॥ ५२

—महाभारत द्रोणपर्व अध्याय १९९

"कुणीही आपली शस्त्रे टाकण्याचें कारण नाही. मी माझ्या बाणांनी द्रोणपुत्राच्या अस्त्राचें निवारण करतो. अथवा माझ्या या सोन्याचें काम केलेल्या भयानक गदेने कालाप्रमाणे प्रहार करून त्याचें अस्त्राचें सामर्थ्य सपवितों. ज्याप्रमाणे सूर्याच्या तोडीचें तेज नाही त्याचप्रमाणें माझ्या तोडीचा कुणीही पराक्रमी पुरुष नाही. माझे हे हत्तीच्या सोंडेप्रमाणें पुष्ट बाहू पहा. ते पर्वत उचलून फेकावयास सुद्धा समर्थ आहेत सर्व माणसात माझ्याच अंगी दहा सहस्र हत्तीचें बळ आहे. महेन्द्राला ज्याप्रमाणे प्रतियोद्धा नाही त्याचप्रमाणें मलाही प्रतियोद्धा नाही. माझ्या हत्ती पुष्ट बाहूचे बळ पहा. मी द्रौणीच्या या प्रज्वलित अस्त्राचे निवारण करीन. नारायणास्त्राला प्रतियोद्धा नाहीं असें म्हणतात. साऱ्या कौरवपाण्डवांसमक्ष मी त्याचा प्रतियोद्धा होतों. अर्जुना, अर्जुना हे बीभत्सो, जरा थांब. तू आपलें गाण्डीव धनुष्य मुळीच टाकू नकोस. चंद्रावर कलंक यावा त्याप्रमाणें तुझ्या धवल यशावर निष्कारण कलंक येईल." हें ऐकतांच अर्जुनानें

भीमसेनाला समजाविण्याचा प्रयत्न केला. पण त्याचें मुळीच न ऐकतां संतापानें तो अश्वत्थाम्याच्या अगावर धांवून गेला. अश्वत्थाम्याला तें हवेंच होतें. त्या अस्त्राने अभिमंत्रित असे एकाहून एक तीक्ष्ण बाण त्याने भीमाच्या अगावर टाकावयास प्रारभ केला. त्याबरोबर तें अस्त्र अधिकच प्रज्वलित झालें. व भीम जों जो आक्रमण करूं लागला तो तों अधिक प्रदीप्त होऊन अस्त्राच्या तेजानें भीमाला वेढून टाकलें. तो भयकर प्रकार पाहताच सारी पाण्डवपक्षीय मडळी थरकांपून उठली. अर्जुनानें भीमाचें त्या अग्नीपासून संरक्षण व्हावें म्हणून त्याच्या शरीराभोवतीं वारुणास्त्राचा परकोट उभारण्याचा प्रयत्न केला. पण त्या अस्त्रदेवतेसमोर अर्जुन अगदी क्षुद्र ठरत होता. त्याच्या वारुणास्त्राचा कांहीही उपयोग झाला नाही. शेवटीं श्रीकृष्ण व अर्जुन भीमाला वांचविण्यासाठी त्या भयानक अग्नीतून वाट काढीत त्याच्याजवळ गेले. व तो ऐकेचना म्हणून जबरदस्तीनें त्याचे हात धरून त्याला रथाखाली ओढू लागले. महाभारतांत ह्या साऱ्या प्रकाराचे मोठे हास्यकारक वर्णन आहे. तें पुढीलप्रमाणे—

ततश्चकृषतुर्भीमं सर्वशस्त्रायुधानि च ।
नारायणास्त्रशान्त्यर्थं नरनारायणौ बलात् ।। १३
आकृष्यमाणः कौन्तेयो नदत्येव महारवम् ।
वर्धते चैव तद्घोर द्रौणेरस्त्रं सुदुर्जयम् ।। १४
तमब्रवीत् वासुदेवः किमिदं पाण्डुनन्दन ।
वार्यमाणोऽपि कौन्तेय यद्युद्धान्न निवर्तसे ।। १५
यदि युद्धेन जेयाः स्युरिमे कौरवनन्दनाः ।
वयमप्यत्र युध्येम तथा चेमे नरर्षभाः ।। १६
रथेभ्यस्त्ववतीर्णाः स्म सर्व एव हि तावकाः ।
तस्मात्त्वमपि कौन्तेय रथात्तूर्णमपाक्रम ।। १७
एवमुक्त्वा तु तं कृष्णो रथाद् भूमिमवर्तयत् ।
निःश्वसन्तं यथा नागं क्रोधसंरक्तलोचनम् ।। १८
यदाऽपकृष्टः स रथान्न्यासितश्चायुधं भुवि ।
ततो नारायणास्त्रं तत्प्रशान्तं शत्रुतापनम् ।। १९

—महाभारत द्रोणपर्व अध्याय २००

"नंतर नारायणास्त्राच्या शान्तीसाठीं श्रीकृष्ण व अर्जुन ह्यांनीं भीमाच्या हातातून बळानें सारीं शस्त्रें काढून घेतली व त्याला ओढून बळानें रथाखाली उतरविलें. भीम त्यांच्या हातांतून सुटण्याची धडपड करूं लागला. पण त्याला कांही सुटता येईना. शेवटीं आपण मुळीच नमलों नाहीं हें दाखविण्यासाठी तो जोरजोरानें गर्जना करूं लागला. तों त्याच्या त्या गर्जनेनें अश्वत्थाम्याचें तें घोर अस्त्र अधिकाधिक प्रज्वलित व दाहक होऊं लागलें. शेवटीं भगवान् श्रीकृष्ण त्याला म्हणाले, "भीमा हा काय पोरकटपणा आहे ? आम्ही वारंवार तुझें निवारण करीत असतां तू युद्धापासून निवृत्त होत नाहींस याचा अर्थ काय ? जर युद्धानें विजय संपादन करतां आला असता तर आम्ही अथवा बाकीचे सर्व लोक लढल्यावांचून राहिलों असतों काय ? सर्व लोक रथांतून खाली उतरून उभे राहिले आहेत. तुलाहि तसेंच उभें राहिले पाहिजे." असें म्हणून श्रीकृष्णांनी त्याला बळानें रथाखालीं उतरविलें. नाइलाज म्हणूनच तो उतरला खरा, पण सर्वस्वी इच्छेविरुद्ध वागावें लागल्यामुळे त्याचे डोळे रागानें अत्यंत आरक्त झाले होते व सर्पाप्रमाणे तो फूत्कार टाकीत होता. भीम रथाखाली उतरतांच व त्यानें शस्त्रन्यास करतांच तें अस्त्र आपोआप शान्त झालें.

मानीपणा व ताठपणा यांचा भीमसेन हा मूर्तिमत आविष्कार आहे. ज्याच्यासमोर नम्र व्हावयास पाहिजे तेही शत्रु म्हणून समोर उभे राहिल्यावर तो त्याच्यासमोर कधीहि नमला नाही. जयद्रथवधाच्या दिवशीं आचार्य द्रोणाच्या शकटव्यूहाचा भेद करावयास अर्जुन ज्या वेळी गेला त्या वेळी व्यूहद्वाराजवळच उभ्या असलेल्या आचार्य द्रोणांना गुरु म्हणून वन्दन करून व प्रदक्षिणा करून त्यांचा आशीर्वाद घेऊनच त्याने व्यूहामध्यें प्रवेश केला असें वर्णन आहे. अर्जुन जाऊन पुष्कळ वेळ झाला तरी त्याची कांहींच वार्ता कळली नाही म्हणून युधिष्ठिरानें चितामग्न होऊन भीमसेनाला त्याच्या शोधार्थ पाठविलें. ज्याप्रमाणें अर्जुन आपणांस वन्दन करून गेला त्याचप्रमाणें भीमसेनही आपणांस वन्दन करील असें आचार्यांना वाटलें. पण तसें चिन्ह कांहींच दिसेना. शेवटी स्वत: होऊनच आचार्य

द्रोणांनीं भीमसेनाला तसें सुचविलें. पण त्याचा काय परिणाम झाला असेल ? महाभारतकार म्हणतात :—

स मन्यमानस्त्वाचार्यो ममायं फाल्गुनो यथा ।
भीमः करिष्यते पूजामित्युवाच वृकोदरम् ।। ४४
भीमसेन न ते शक्या प्रवेष्टुमरिवाहिनी ।
मामनिर्जित्य समरे शत्रुमद्य महाबल ।। ४५
यदि ते सोऽनुजः कृष्णः प्रविष्टोऽनुमते मम ।
अनीकं न तु शक्यं मे प्रवेष्टुमिह वै त्वया ।। ४६
अथ भीमस्तु तच्छ्रुत्वा गुरोर्वाक्यमपेतभीः ।
क्रुद्धः प्रोवाच वै द्रोणं रक्ततास्रेक्षणस्त्वरन् ।। ४७
तवार्जुनो नानुमते ब्रह्मबन्धो रणाजिरम् ।
प्रविष्टः स हि दुर्धर्षः शक्रस्यापि विशेद् बलम् ।। ४८
तेन वै परमां पूजां कुर्वता मानितो ह्यसि ।
नार्जुनोऽहं घृणी द्रोण भीमसेनोऽस्मि ते रिपुः ।। ४९
पिता नस्त्वं गुरुर्बन्धुस्तथा पुत्रास्तु ते वयम् ।
इति मन्यामहे सर्वे भवन्तं प्रणताः स्थिताः ।। ५०
अद्य तद्विपरीतं ते वदतोऽस्मासु दृश्यते ।
यदि त्वं शत्रुमात्मानं मन्यसे तत्तथास्त्विह ।। ५१
एष ते सदृशं शत्रोः कर्म भीमः करोम्यहं ।
अथोद्भ्राम्य गदां भीमः कालदंडमिवान्तकः ।। ५२
द्रोणाय व्यसृजद्राजन् स रथादवपुप्लुवे ।
साश्वसूतध्वजं यानं द्रोणस्यापोथयत्तदा ।। ५३

—महाभारत द्रोणपर्व अध्याय १२७

स वध्यमानः समरे रथं द्रोणस्य मारिष ।
ईषायां पाणिना गृह्य प्रचिक्षेप महाबलः ।। १८
द्रोणस्तु सत्वरो राजन् क्षिप्तो भीमेन संयुगे ।
रथमन्यं समारुह्य व्यूहद्वारं ययौ पुनः ।। १९
तमायान्तं तथा दृष्ट्वा भग्नोत्साहं गुरुं तदा ।
गत्वा वेगात् पुनर्भीमो धुरं गृह्य रथस्य तु ।। २०
तमप्यतिरथं भीमश्चिक्षेप भृशरोषितः ।
एवमष्टौ रथाः क्षिप्त्वा भीमसेनेन लीलया ।। २१

व्यदृश्यत निमेषेण पुनः स्वरथमास्थितः ।
दृश्यते तावकैर्योधैर्विस्मयोत्फुल्ललोचनैः ।। २२
तस्मिन् क्षणे तस्य यन्ता तूर्णमश्वानचोदयत् ।
भीमसेनस्य कौरव्यस्तदद्भुतमिवाभवत् ।। २३
ततः स्वरथमास्थाय भीमसेनो महाबलः ।
अभ्यद्रवत वेगेन तव पुत्रस्य वाहिनीम् ।। २४

——महाभारत द्रोणपर्व अध्याय १२८

"अर्जुनाने ज्याप्रमाणें आपला सन्मान केला त्याचप्रमाणें भीमही आपला सन्मान करील असें वाटून आचार्य द्रोण भीमाला म्हणाले की, हे महाबला, मला जिकल्यावांचून तुला सैन्यांत प्रवेश करतां येणार नाहीं. तुझा विख्यात धाकटा बंधु अर्जुन माझी अनुमति घेऊनच सैन्यांत शिरला. तुला देखील तसेंच करतां येईल," हें ऐकतांच निर्भय भीमसेन क्रोधानें आपले नेत्र अधिकच आरक्त करून त्यांना म्हणाला, 'हे ब्राह्मणाधमा, तुझ्या अनुमतीनें अर्जुन तुझ्याच सैन्यांत शिरला ही शुद्ध थाप आहे. दुर्धर्ष अर्जुन इंद्राच्या देखील सैन्यांत शिरूं शकेल. मग तुझी कथाच काय ? गुरु म्हणून तुझा त्यानें सन्मान केला येवढेंच. पण मी अर्जुनाप्रमाणें दयाळू नाहीं. मी तुझा शत्रु भीम आहें. वास्तविक तू आमचा गुरु असल्यामुळें आम्ही तुलाच पिता व सुहृद समजून व स्वतःला तुझे पुत्र समजून तुझ्यासमोर नेहमीच नम्र रहात होतों; पण तू आपल्या पदवीला न शोभणारें वर्तन चालविले आहेस. तू जर स्वतःला आमचा शत्रु समजतोस तर तुझी इच्छा पूर्ण होवो." मी भीम तुझ्या शत्रू-प्रमाणेंच भयंकर कर्म करून दाखवितों. असें म्हणून अन्तकानें कालदण्ड फेकावा त्याप्रमाणें भीमानें आपली गदा फिरवून द्रोणांच्या अंगावर भिरकावली. ती येतांना पहातांच स्वतःला वांचविण्यासाठीं द्रोणांनी रथाखाली उडी घेतली व भीमाच्या त्या गदेनें अश्व, सूत व ध्वज यांसहित द्रोणांच्या रथाचें चूर्ण केलें. दुसरा रथ सज्ज करून व्यूहद्वारावर द्रोण येऊं लागले तों भीमासेनानें त्याही रथाची धुरा धरून तो फेकून दिला. तिसरा रथ सज्ज करून द्रोण आले तों भीमानें त्याही रथाची धुरा धरून तो उंच उचलून फेकून दिला.

सारे लोक आश्चर्यचकित होऊन पहात असतां याप्रमाणें एकंदर आठ वेळां द्रोणांचा रथ फेकून देऊन भीमानें त्यांचा उत्साह नष्ट केला. तेवढ्यांत अंतर साधून सारथ्यानें भीमाचा रथ त्याच्याजवळ आणला व त्यावर आरूढ होऊन द्रोण पुन्हां आपल्या जागीं येण्याच्या आंत भीम शकटव्यूहाचें अंतर तोडून बरेंच दूर आंत निघूनही गेला."

भयंकर क्रोध व प्रतिशोध यांची मूर्ति

विलक्षण साहस व अपार सामर्थ्य अंगांत असल्यामुळें व क्रोध हा स्थायीभाव असल्यामुळें ज्यांनी ज्यांनीं भीमाला डिवचण्याचा प्रयत्न केला व त्याचा अपराध केला त्या त्या प्रत्येकाचा सूड घेण्याचा प्रसंग आल्यावर ज्याचें नुसतें स्मरण झाल्यावरही कातरांचें अंतःकरण कंपित होऊन जाईल अशा प्रकारानें त्यानें त्यांचा प्रतिशोध घेतला आहे. हिडिब, बकासुर, जरासंध यांना ठार मारतांना व जयद्रथाची फटफजिती करतांना या विशिष्ट प्रकाराचें त्याचें स्वरूप स्पष्ट झालें आहे. पण अज्ञातवासांतील कीचकवधाच्या प्रकरणांत तें ज्या विदारक रीतीनें स्पष्ट झालें तितक्या विदारक रीतीनें केवळ दुःशासनाच्या वधाचें अपवादात्मक प्रकरण सोडून दुसरीकडे कुठेंही प्रकट झालें नाहीं. अल्प अपराध केल्यावर देखील तो सहन न व्हावा ही ज्याची मूलभूत प्रवृत्ति व जरासंधासारख्यालाही फाडून खाण्यासारखें ज्याचें अपार सामर्थ्य त्याच्या अंतःकरणाच्या लाक्षागृहाला कीचकानें अपमानाची जणू मशालच लावली होती. त्या उन्मत्त सूतपुत्रानें भीमाचा सर्वश्रेष्ठ मानबिंदु असलेल्या द्रौपदीवर आपली पापदृष्टि रोखली, इतकेंच नव्हे तर भीमसेन पहात असतां त्याच्यासमोर कीचकानें द्रौपदीचे केस धरून तिच्या कमरेंत लाथ हाणली. तें दृश्य पहातांच भीमाच्या अंतरंगाचा केवढा तिळपापड उडाला असेल! महाभारतकार वर्णन करतात :—

तस्य भीमो वधं प्रेप्सुः कीचकस्य दुरात्मनः ।
दंतैर्दन्तांस्तदा रोषान्निष्पिपेष महामनाः ॥ १४
धूमच्छाया हृद्यभजतां नेत्रे चोच्छ्वसपक्ष्मणी ।
मस्वेदा भ्रुकुटी चोग्रा ललाटे समवर्तत ॥ १५

हस्तेन ममृदे चैव ललाटं परवीरहा ।
भूयश्च त्वरितः क्रुद्धः सहसोत्थातुमैच्छत ॥ १६

—महाभारत, विराटपर्व अध्याय १६

"त्या दुरात्म्या कीचकाचा तत्काल वध करावा अशी इच्छा भीमाच्या अंतःकरणांत चमकली. रागानें देहभान विसरून त्यानें दांत एकमेकांवर कडकडा घासले. त्याचे नेत्र कलुषित झालेले दिसले. कपाळाला घाम येऊन त्याच्या भ्रुकुटी उग्र दिसू लागल्या. आपला तळहात त्यानें कपाळावरून जोरानें घासला व त्याचा क्रोध वाढून कीचकाला ठार मारण्यासाठी तो एकदम जागेवरून उठूं लागला. पण युधिष्ठिरानें त्याला आवरलें. ज्याचें नेतृत्व त्यानें मान्य केलें होतें, त्याच व्यक्तीनें त्याला आवरून त्याचा क्रोध मुळींच प्रकट होऊं दिला नाहीं. प्रस्फोट होऊं इच्छिणारा त्याच्या क्रोधाचा ज्वालामुखी याप्रमाणें त्या वेळी थांवला तरी द्रौपदीनें रात्री महानसांत त्याची गांठ घेऊन त्याचा प्रस्फोट घडवून आणला. अपमानित अवस्थेत भीमावांचून दुसरें कोणीही आपले प्रिय करूं शकणार नाही अशी तिची खात्री होती. महाभारतकार म्हणतात.—

किं करोमि क्व गच्छामि कथं कार्यं भवेन्मम ।
इत्येव चिन्तयित्वा सा भीमं वै मनसाऽगमत् ॥ ४
नान्यः कर्ता ऋते भीमान्ममाद्य मनसः प्रियम् ।
तत उत्थाय रात्रौ सा विहाय शयनं स्वकम् ॥ ५
प्राद्रवन्नार्थमिच्छन्ती कृष्णा नाथवती सती ।
भवनं भीमसेनस्य क्षिप्रमायतलोचना ॥ ६

—महाभारत, विराटपर्व अध्याय १७

"मी कुठें जाऊं ? काय करूं ? माझ्या अब्रूच्या संरक्षणासाठीं या दुष्टाला तावडतोव ठार मारूं शकेल असा कोण आहे, याचा विचार करीत असतां तिच्या अंतःकरणाच्या फलकावर भीमाचीच रौद्र मूर्ति उभी राहिली. तशीच मध्यरात्री आपल्या शयनावरून उठून भीमसेनाच्या भवनाकडे द्रौपदी गेली. त्या वेळी भीमसेन स्वस्थ झोपला होता. त्याच्या अतःकरणाला लागेल असें बोलून द्रौपदीनें भीमसेनाला जागृत केलें. तिला त्या स्थितींत पाहातांच

भीमानें तिला म्हटलें कीं, द्रौपदी, तुझ्या सर्व विपत्तींत मीं तुझें संरक्षण केलें आहे. मीच तुझा खरा विश्वासपात्र आहें याची मला पूर्ण कल्पना आहे. तुला काय हवें तें सांग. तूं इतकी दुःखी कां ? द्रौपदीनें स्वतःचें हृदय मोकळें करून भीमाला आपल्या दुःखाचीं जीं कारणें सांगितलीं त्याचें विस्तृत वर्णन मी माझ्या द्रौपदीवरील व्याख्यानांत केलेंच आहे. द्रौपदीनें आपलें हृदय मोकळें करून त्याच्या छातीवर आपलें डोकें टेकलें. आपले घट्टे पडलेले हात त्याला दाखविले. ते तिचे दोन्ही हात आपल्या तोंडाजवळ नेऊन तो प्रचंड सामर्थ्यशाली भीमसेन एकाद्या दुर्बलाप्रमाणें रडूं लागला. बराच वेळ अश्रुपात करून तो तिला म्हणाला :—

धिगस्तु मे बाहुबलं गाण्डीवं फाल्गुनस्य च ।
यत्ते रक्तौ पुरा भूत्वा पाणी कृतकिणाविमौ ॥ १
सभायां तु विराटस्य करोमि कदनं महत् ।
तत्र मे कारणं भाति कौन्तेयो यत् प्रतीक्षते ॥ २
अथवा कीचकस्याहं पोथयामि पदा शिरः ।
ऐश्वर्यमदमत्तस्य क्रीडन्निव महाद्विपः ॥ ३
अपश्यं त्वां यदा कृष्णे कीचकेन पदा हताम् ।
तदैवाहं चिकीर्षामि मत्स्यानां कदनं महत् ॥ ४
तत्र मां धर्मराजस्तु कटाक्षेण न्यवारयत् ।
तदहं तस्य विज्ञाय स्थित एवास्मि भामिनि ॥ ५
यच्च राष्ट्रात् प्रच्यवनं कुरूणामवधश्च यः ।
सुयोधनस्य कर्णस्य शकुनेः सौबलस्य च ॥ ६
दुःशासनस्य पापस्य यन्मया नाहृतं शिरः ।
तन्मे वहति गात्राणि हृदि शल्यमिवार्पितम् ॥ ७
मा धर्मं जहि सुश्रोणि क्रोधं जहि महामते ।
इदं तु समुपालम्भं त्वत्तो राजा युधिष्ठिरः ।
श्रुणुयाद्वाऽपि कल्याणि कृत्स्नं जह्यात् स जीवितम् ॥ ८
धनंजयो वा सुश्रोणि यमौ वा तनुमध्यमे ।
लोकान्तरगतेष्वेषु नाहं शक्ष्यामि जीवितुम् ॥ ९

—महाभारत, विराटपर्व अध्याय २१

"माझ्या बाहुबलाला व अर्जुनाच्या गाण्डीव धनुष्याला धिक्कार असो. तुझे आरक्त हात लोकांच्या घरी कामें करीत असतां घट्टे पडून व्यथित होतात तर मग आमच्या पराक्रमांत अर्थ तरी काय आहे? विराटाच्या सभेंत आज मी मोठा भयंकर संहार केला असता पण केवळ युधिष्ठिरांनीच तो प्रकार होऊं दिला नाहीं. एकाद्या महान् गजराजाप्रमाणें, ऐश्वर्यमदानें उन्मत्त झालेल्या कीचकाचें मस्तक मी माझ्या पायाने रगडून व तुडवून काढलें असतें. ज्या वेळी कीचकानें तुला लाथ मारली त्या वेळीं मत्स्यांचें कंदन करण्याची कल्पना माझ्या मनांत चमकली. पण तेथें धर्मराजानें कटाक्षानें माझें निवारण केलें. त्यांची तशी इच्छा नाहीं हें पाहून मी स्वस्थ बसलों. ही एकच गोष्ट काय पण राज्यापासून भ्रष्ट होणें, कौरवांना ठार न मारणे, दुःशासन, शकुनि, कर्ण व दुर्योधन यांची मस्तकें न तोडणें या सर्व गोष्टींनी माझ्या अंगाचा भडका उडालेला असून एकाद्या शल्याप्रमाणे या सर्व गोष्टी माझ्या हृदयांत टोचतात. पण काय करू, युधिष्ठिराची तशी इच्छा नाही. तू क्रोधाच्या भरांत आपल्या पतीची निंदा करण्याचा अधर्म करूं नकोस. क्रोध आवर. तू आतां युधिष्ठिरांविषयीं जें बोललीस तें जर तू त्यांच्यासमोर बोललीस तर युधिष्ठिर जिवंत रहाणार नाहींत. अर्जुन व नकुलसहदेवही जिवंत रहाणार नाहीत व द्रौपदी, माझ्या बंधूवांचून मलाही जिवंत रहाणे अशक्य आहे. आतां कांही फार दिवस उरलेले नाहीत."

मा दीर्घं क्षम कालं त्वं मासमर्धं च संमितम् ।
पूर्णे त्रयोदशे वर्षे राज्ञां राज्ञी भविष्यसि । १७

—महाभारत, विराटपर्व अध्याय २१

दीर्घकालपर्यंत तुला हें सारें सहन करण्याचें यापुढें मुळींच कारण उरलेलें नाहीं. हा अत्यंत थोड्या अवधीचा प्रश्न आहे. केवळ पंधरा दिवस तू थांब. आजपासून पंधराव्या दिवशी आपलीं तेरा वर्षे पूर्ण होतांच तू साम्राज्ञी होशील. पण द्रौपदी इतका वेळ थांबणें केवळ अशक्य होतें. तिनें त्याला स्पष्ट सांगितलें कीं माझ्या अब्रूचा प्रश्न पंधरा दिवसापर्यंत थांबणार नसून पुढच्या क्षणावर

येऊन ठेपला आहे. अब्रू गेलेल्या स्थितींत मी एक क्षणभरही जिवंत रहाणार नाही. मग खुशाल पंधरा दिवसपर्यंत तुम्ही थांबा व राज्य करीत बसा. कीचकानें उद्यांचा सूर्य पाहूं नये अशी माझी इच्छा आहे. त्याच्या अधीन होणें किंवा विष प्राशन करून मरून जाणें यांवाचून दुसरा कोणताच मार्ग माझ्यासमोर दिसत नाहीं, असें म्हणून भीमाच्या छातीवर मस्तक टेकवून ती आक्रंदन करूं लागली. महाभारतकार म्हणतात :—

इत्युक्त्वा प्रारुदत् कृष्णा भीमस्योरः समाश्रिता ।
भीमश्च तां परिष्वज्य महत्सान्त्वं प्रयुज्य च ॥ ४९
आश्वासयित्वा बहुशो भृशमार्तां सुमध्यमाम् ।
हेतुतत्त्वार्थसंयुक्तैर्वचोभिर्द्रुपदात्मजाम् ॥ ५०
प्रमृज्य वदनं तस्याः पाणिनाश्रुसमाकुलम् ।
कीचकं मनसाऽगच्छत् सृक्किणी परिसंलिहन् ॥
उवाच चैनां दुःखार्तां भीमः क्रोधसमन्वितः ॥ ५१

—महाभारत, विराटपर्व अध्याय २१

भीम उवाच ।

तथा भद्रे करिष्यामि यथा त्वं भीरु भाषसे ।
अद्य तं सूदयिष्यामि कीचकं सहबान्धवम् ॥ १
अस्या. प्रदोषे शर्वर्याः कुरुष्वानेन सङ्गतम् ।
दुःखं शोकं च निर्धूय याज्ञसेनि शुचिस्मिते ॥ २
यैषा नर्तनशालेह मत्स्यराजेन कारिता ।
दिवाऽत्र कन्या नृत्यन्ति रात्रौ यान्ति यथागृहम् ॥ ३
तत्रास्ति शयनं दिव्यं बृहाङ्गं सुप्रतिष्ठितम् ।
तत्रास्य दर्शयिष्यामि पूर्वप्रेतान् पितामहान् ॥ ४
यथा च त्वां न पश्येयुः कुर्वाणां तेन संविदम् ।
कुर्यास्तथा त्वं कल्याणि यथा सन्निहितो भवेत् ॥ ५

—महाभारत, विराटपर्व अध्याय २२

याप्रमाणे बोलून द्रौपदी भीमसेनाच्या छातीवर डोकें ठेवून अश्रुपात करूं लागली असतां भीमानें तिला कुरवाळून तिचें सांत्वन केलें. नाना प्रकारें बोलून त्यानें तिचें समाधान करण्याचा प्रयत्न केला. आपल्या हातानें तिचे अश्रू पुसून कीचकाचा विचार मनांत

आणून अत्यंत संतापलेल्या भीमानें आपले ओठ चाटले व तो द्रौपदीला म्हणाला, "हे कल्याणि, मी त्या दुरात्म्या कीचकाला त्याच्या बांधवांसहित ठार मारतों. पण तू एक युक्ति कर. दुःख व शोक गिळून टाकून आज सकाळीच कीचकाची तू गांठ घे. व राजा विराटाच्या नृत्यशाळेंत तो येईल असा त्याच्याशीं संकेत कर. या मत्स्य राजाच्या नृत्यशाळेंत दिवसा मुली नृत्य शिकतात व त्या रात्री आपापल्या घरी जातात. त्या ठिकाणी एक मोठा दिव्य, दृढ व व्यवस्थित रीतीनें ठेवलेला असा मंचक आहे. त्या मंचकावरच मी कीचकाला त्याचे सारे पितामह दाखवितो. तू गुप्तपणें त्याच्याशी संकेत कर व त्याला नर्तनागारांत आणून सोड. पुढचें मी पाहीन." द्रौपदीनें त्याच्या इच्छेनुरूप कीचकाशी संकेत केला. ठरलेल्या संकेताप्रमाणें कीचक नर्तनागारात आला. भीम त्याच्या आधींच नर्तनागारात येऊन बसला होता. तो आटोक्यांत येतांच भीमानें त्याचे केश धरून ओढले. साऱ्या रात्रभर त्या दोघांचें युद्ध झालें व शेवटीं भीमानें त्याला ठार मारले. प्रतिशोधाच्या आगीनें संतप्त झालेल्या भीमसेनाने ज्या पद्धतीनें कीचकाला ठार मारलें तिचें वर्णन करीत असतां महाभारतकार म्हणतात .—

क्रोधाविष्टो विनिःश्वस्य पुनश्चैनं वृकोदरः ।
जग्राह जयतां श्रेष्ठः केशेष्वेव तदा भृशम् ॥ ७२
गृहीत्वा कीचकं भीमो विरराज महाबलः ।
शार्दूलः पिशिताकाङ्क्षी गृहीत्वेव महामृगम् ॥ ७३
तत एनं परिश्रान्तमुपलभ्य वृकोदरः ।
योक्त्र्यामास बाहुभ्यां पशुं रशनया यथा ॥ ७४
नदन्तं च महानादं भिन्नभेरीसमस्वनम् ।
भ्रामयामास सुचिरं विस्फुरन्तमचेतसम् । ७५
प्रगृह्य तरसा दोर्भ्यां कण्ठं तस्य वृकोदरः ।
अपीडयत कृष्णायास्तदा कोपोपशान्तये ॥ ७६
अथ तं भग्नसर्वाङ्गं व्यावृद्धनयनाम्बरम् ।
आक्रम्य च कटीदेशे जानुना कीचकाधमम् ॥ ७७
अपीडयत बाहुभ्यां पशुमारममारयत् ।
तं विषीदन्तमाज्ञाय कीचकं पाण्डुनन्दनः ॥
भूतले भ्रामयामास वाक्यं चेदमुवाच ह ॥ ७८

अद्याहमनृणो भूत्वा भ्रातुर्भार्यापहारिणम् ।
शान्तिं लब्धोऽस्मि परमां हत्वा सैरन्ध्रिकण्टकम् ॥ ७९
इत्येवमुक्त्वा पुरुषप्रवीरस्तं कीचकं क्रोधसरागनेत्रः ।
आस्रस्तवस्त्राभरणं स्फुरन्तमुद्भ्रान्तनेत्रं व्यसुमुत्ससर्ज ॥ ८०
निष्पिष्य पाणिना पार्णिं संदष्टौष्ठपुटं बली ।
समाक्रम्य च संक्रुद्धो बलेन बलिनां वरः ॥ ८१
तस्य पादौ च पाणी च शिरो ग्रीवां च सर्वशः ।
काये प्रवेशयामास पशोरिव पिनाकधृक् ॥ ८२
तं संमथितसर्वाङ्गं मांसपिण्डोपमं कृतम् ।
कृष्णाया दर्शयामास भीमसेनो महाबलः ॥ ८३
उवाच च महातेजा द्रौपदीं योषितां वराम् ।
'पश्यैनमेहि पाञ्चालि कामुकोऽयं यथा कृतः ॥ ८४
एवमुक्त्वा महाराज भीमो भीमपराक्रमः ।
पादेन पीडयामास तस्य कायं दुरात्मनः ॥ ८५
ततोऽग्निं तत्र प्रज्वाल्य दर्शयित्वा तु कीचकम् ।
पाञ्चालीं स तदा वीर इदं वचनमब्रवीत् ॥ ८६
प्रार्थयन्ति सुकेशान्ते ये त्वां शीलगुणान्विताम् ।
एवं ते भीरु वध्यन्ते कीचकः शोभते यथा ॥ ८७
तत्कृत्वा दुष्करं कर्म कृष्णायाः प्रियमुत्तमम् ।
तथा स कीचकं हत्वा गत्वा रोषस्य वै शमम् ॥ ८८
आमन्त्र्य द्रौपदीं कृष्णां क्षिप्रमायान्महानसम् ।

–महाभारत, विराटपर्व अध्याय २२

" क्रोधाविष्ट झालेल्या भीमसेनानें सुस्कारा सोडून पुनश्च त्याचे केस धरले. रक्त पिऊं इच्छिणारा वाघ ज्याप्रमाणें दिसतो तसाच भीम त्या वेळीं दिसू लागला. कीचक थकला असें पाहून पशूला दोरीनें बांधतात त्याप्रमाणें भीमानें त्याला आपल्या भुजबंधनानें जखडून टाकलें. फुटलेल्या भेरीप्रमाणें अतकाळचा घोर नाद करीत असलेल्या कीचकाला भीमाने इतक्या फेऱ्या दिल्या कीं तो अगदीं अचेतन होऊन गेला. केवळ श्वासावरूनच तो ओळखतां येत होता. नंतर त्याचें अग सर्व ठिकाणीं सांधे खिळखिळे करून मोडून टाकल्यावर व डोळे उघडून मृत्यूची वाट पाहात तारवटलेल्या डोळ्यांनीं तो आकाशाकडे पाहात असलेल्या स्थितींत त्याच्या

कमरेला मांडीचा विळखा घालून व दोन्ही हातांनीं त्याचा गळा दाबून पशूप्रमाणें बुकलून त्याला भीमानें ठार मारलें. नंतर त्याला त्यानें जमिनीवर फरफरां ओढले व तो तोंडानें म्हणू लागला की, आमच्या कुलस्त्रीची विटबना करणाऱ्या या चांडाळाला ठार मारून मी आज कर्तव्यपूर्तीचें समाधान भोगीत आहें. याप्रमाणें बोलून त्यानें त्या कीचकाच्या प्रेताकडे पाहिलें. अस्ताव्यस्त स्थितीत वस्त्र व आभरणें इतस्ततः विखुरली असतांना, डोळे तारवटलेल्या स्थितींत त्याचें प्रेत पडलेलें पाहूनही भीमाचें समाधान होईना. क्रोधानें त्यानें पुनश्च आपले दांतओठ चावले व रागानें कीचकाच्या त्या प्रेतावर आक्रमण करून त्यानें त्याचा तो मृतदेह यथेच्छ तुडवून काढला व नंतर त्याचे हातपाय, मस्तक, मान इत्यादि सर्व अवयव त्याच्या देहांत घुसवून त्यानें त्याच्या शरीराचा एक मोठा मांसाचा गोळाच बनविला. लाथेच्या ठोकरीनें तो गोळा द्रौपदीच्या समोर करीत भीम म्हणाला. हे पांचाली, पहा या कामुकाची मी काय अवस्था केली आहे. तेथें अग्नि पेटवून तो मांसपिंड भीमानें तिला दाखविला. पुनश्च तो तिला म्हणाला : हे पांचाली, तुझ्यासारख्या शीलचारित्र्यसंपन्न साध्वीला जे लोक शीलभ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतात त्याचा वध अशा भयंकर प्रकाराने होत असतो. याप्रमाणें द्रौपदीचे काम केल्यावर त्याला खरे समाधान लाभलें. द्रौपदीचा निरोप घेऊन तो परत महानसांत आला. थोड्या वेळानंतर कीचकाच्या वधाचा आश्चर्यकारक प्रकार ऐकून त्याचे सारे बांधव तिथें जमले व बलवान् अनुकीचकांनी वळानें राजा विराटाची अनुमति घेऊन सैरंध्रीला कीचकाच्या प्रेतावरोबर जिवंत जाळून टाकण्यासाठी म्हणून तिला तिरडीवर बांधले. ती बिचारी शोकानें विलाप करूं लागली. तिच्या आक्रंदनाचा शब्द कानात येतांच सारा भयानक प्रकार भीमसेनाच्या ध्यानांत आला व बसल्या जागेवरूनच तिला संरक्षणाचें आश्वासन देत भीमसेन वेगळ्याच मार्गानें स्मशानाकडे चालला. महाभारतकार म्हणतात :—

इत्युक्त्वा स महाबाहु विजज्ञम्भे जिघांसया ।
ततः स व्यायतं कृत्वा वेषं विपरिवर्त्य च । १७

अद्वारेणाभ्यवस्कन्द्य निर्जगाम बहिस्तदा ।
स भीमसेनः प्राकारादारुह्य तरसा द्रुमम् ॥ १८
श्मशानाभिमुखः प्रायाद्यत्र ते कीचका गताः ।
स लङ्घयित्वा प्राकारं निःसृत्य च पुरोत्तमात् ॥
जवेन पतितो भीमः सूतानामग्रतस्तदा ॥ १९
चितासमीपे गत्वा स तत्रापश्यद् वनस्पतिम् ।
तालमात्रं महास्कन्धं मूर्धशुष्कं विशाम्पते ॥ २०
तं नागवदुपक्रम्य बाहुभ्यां परिरभ्य च ।
स्कन्धमारोपयामास दशव्यामं परन्तपः ॥ २१
स तं वृक्षं दशव्यामं सस्कन्धविटपं बली ।
प्रगृह्याभ्यद्रवत्सूतान्दण्डपाणिरिवान्तकः ॥ २२
ऊरुवेगेन तस्याथ न्यग्रोधाश्चवर्त्यविंशुकाः ।
भूमौ निपतिता वृक्षाः सङ्घशस्तत्र शेरते ॥ २३
तं सिंहमिव सङ्क्रुद्धं दृष्ट्वा गन्धर्वमागतम् ।
वित्रेसुः सर्वशः सूता विषादभयकम्पिताः ॥ २४
गन्धर्वो बलवानेति क्रुद्ध उद्यम्य पादपम् ।
सैरन्ध्री मुच्यतां शीघ्रं यतो नो भयमागतम् ॥ २५
ते तु दृष्ट्वा तदाऽऽविद्धं भीमसेनेन पादपम् ।
विमुच्य द्रौपदीं तत्र प्राद्रवन्नगरं प्रति ॥ २६
द्रवतस्तांस्तु संप्रेक्ष्य स वज्री दानवानिव ।
शतं पंचाधिकं भीमः प्राहिणोद्यमसादनम् ॥ २७
वृक्षेणैतेन राजेन्द्र प्रभञ्जनसुतो बली ।
तत आश्वासयत्कृष्णां स विमुच्य विशांपते ॥ २८
उवाच च महाबाहुः पाञ्चालीं तत्र द्रौपदीम् ।
अश्रुपूर्णमुखीं दीनां दुर्धर्षः स वृकोदरः ॥ २९
एवं ते भीरु वध्यन्ते ये त्वां क्लिशन्त्यनागसम् ।
प्रेहि त्वं नगरं कृष्णे न भयं विद्यते तव ॥ ३०
अन्येनाहं गमिष्यामि विराटस्य महानसम् ॥ ३१

——महाभारत, विराटपर्व अध्याय २३

अथ मुक्ता भयात्कृष्णा सूतपुत्राग्निरस्य च ।
मोक्षिता भीमसेनेन जगाम नगरं प्रति ॥ ११

त्रासितेव मृगी बाला शार्दूलेन मनस्विनी ।
गात्राणि वाससी चैव प्रक्षाल्य सलिलेन सा ॥ १२
तां दृष्ट्वा पुरुषा राजन् प्राद्रवन्तो दिशो दश ।
गन्धर्वाणां भयत्रस्ताः केचिद् दृष्ट्वा न्यमीलयन् ॥ १३
ततो महानसद्वारि भीमसेनमवस्थितम् ।
ददर्श राजन् पाञ्चाली यथा मत्तं महाद्विपम् ॥ १४
तं विस्मयन्ती शनकैः संज्ञाभिरिदमब्रवीत् ॥
गन्धर्वराजाय नमो येनास्मि परिमोचिता ॥ १५

—महाभारत, विराटपर्व अध्याय २४

" याप्रमाणें बोलून भीमानें अनुकीचकांना मारण्याच्या इच्छेनें एक मोठी जांभई दिली, व नंतर आपला वेष बदलून दुसऱ्याच एका मार्गाने प्राकाराचें उल्लघन करून तो स्मशानांत आला. चितेच्या जवळ जाऊन त्याने एक मोठा वृक्ष उपटला. व तो आपल्या खाद्यावर घेऊन दण्डपाणि अन्तकाप्रमाणे सूतपुत्रांच्या अगावर धावून गेला. त्याच्या धांवण्याच्या वेगानेच कित्येक वृक्ष उन्मळून पडले. क्रुद्ध झालेल्या सिहाप्रमाणे गन्धर्व अगावर येत असल्याचें पाहून विपादानें सारे अनुकीचक भयकपित झाले. व बलवान् गन्धर्व झाड घेऊन मारावयास येतो आहे, तरी सैरन्ध्रीला सोडा व पळा असा एकच आरडाओरडा करीत ते द्रौपदीला सोडून नगराकडे पळू लागले. पण आता भीमसेन त्याना सोडणार होता काय ? महेन्द्रानें वज्रानें दानवाचा नाश करावा त्याप्रमाणे भीमसेनानें त्या वृक्षाने १०५ अनुकीचकाना ठार मारून टाकले. नंतर अश्रुनयना द्रौपदीला आश्वासन देत भीमसेन तिला म्हणाला, " तुझ्यासारख्या निरपराध व्यक्तीला जे लोक त्रास देतात त्यांना अशाच प्रकारे मृत्यु येत असतो. तू नगरांत जा. आतां तुला कसलेही भय उरलेलं नाही. मी दुसऱ्या वाटेनें महानसांत जातों. याप्रमाणे संकटातून सुटल्यावर पाण्याने शरीर व वस्त्रें स्वच्छ करून द्रौपदी विराटनगरीकडे येऊ लागली. तिला येतांना पाहताच आपण हिच्याकडे नुसतें पाहिले तरी रागावलेले, गन्धर्व आपल्याला ठार मारून टाकतील या भयाने लोक दशदिशांना पळूं लागले व ज्यांना पळणें शक्य नव्हतें त्यांनीं डोळे मिटून घेतले.

येतांना द्रौपदीनें मत्त गजेन्द्राप्रमाणें महानसाच्या दाराशींच उभ्या असलेल्या भीमाला पाहिलें व त्याला ती ओळख देत म्हणाली कीं "ज्यानें या संकटापासून माझें सरक्षण केले त्या गन्धर्वराजाला माझा नमस्कार असो." महापराक्रमी भीमसेनाच्या युद्धाची ही अमानुष पद्धति व प्रतिशोधाची ही विलक्षण तऱ्हा त्या काळी इतकी प्रसिद्ध होती की तिच्यावरून तो सहज ओळखला जाई. त्यामुळेंच दक्षिणगोग्रहणाच्या युद्धांत राजा त्रिगर्तानें राजा विराटाला पकडून नेले असतां त्याला सोडविण्यासाठीं भीम ज्या वेळी रणांत उडी घेऊं लागला व आपल्या पद्धतीप्रमाणें एक महान् वृक्ष उपटून सैन्याला ठार मारण्याचा विचार करू लागला त्यावेळीं युधिष्ठिरानें त्याला पुढीलप्रमाणे इषारा दिला आहे :—

मा भीम साहसं कार्षीस्तिष्ठत्वेष वनस्पतिः ।
मा त्वं वृक्षेण कर्माणि कुर्वाणमतिमानुषम् ॥ १८
जनाः समवबुध्येरन् भीमोऽयमिति भारत ।
अन्यदेवायुधं किञ्चित् प्रतिपद्यस्व मानुषम् ॥ १९
चापं वा यदि वा शक्तिं निस्त्रिंशं वा परश्वधम् ।
यदेव मानुषं भीम भवेदन्यैरलक्षितम् ॥ २०
तदेवायुधमादाय मोक्षयाशु महीपतिम् ।
यमौ च चक्ररक्षौ ते भवितारौ महाबलौ ॥ २१

—महाभारत, विराटपर्व अध्याय ३३

" हे भीमा, हा वृक्ष जागच्या जागीच राहूं दे. व्यथ साहस करू नकोस. तू जर वृक्ष हातात घेऊन अमानुष कर्म करू लागशील तर लोक हा भीम आहे हे ओळखल्यावाचून राहणार नाहीत. सामान्य माणसें ज्याप्रमाणे आयुध हातात घेऊन युद्ध करतात त्याप्रमाणें रथात बसून व धनुष्य, शक्ति, खड्ग इत्यादि मनुष्यासारखीच आयुधे हातात घेऊन राजा विराटाची लवकर सुटका कर. नकुल व सहदेव तुझे चक्ररक्षक होतील."

कौरव व भीमसेन

जाणून बुजून नग्न खड्गाखाली जो आपले मस्तक देईल त्याचें तें मस्तक चिरलें गेले असता खड्गाला दूषण देण्यांत काय अर्थ

आहे ? त्याचप्रमाणें भीमसेनासारख्या प्रचंड सामर्थ्याच्या, अनिवार क्रोधाच्या, व प्रतिशोधाच्या आगीने नेहमींच प्रदीप्त असणाऱ्या व्यक्तीचा भयानक छळवाद केल्यावर त्याचे स्वाभाविक परिणाम भोगण्याची पाळी आल्यावर मग त्याला दूषण देण्यांत काय अर्थ आहे ? राजा धृतराष्ट्रानें कुलभेदाची जबाबदारी भीमावर ढकलली आहे हें आपण संजयाशी त्यानें केलेल्या भाषणांत पाहिलेंच आहे. परंतु एखाद्या पाताळयंत्री पुरुषाला शोभण्यासारखेच ते उद्‌गार आहेत. केवळ लहानपणीं मुलांच्या स्वाभाविक खेळण्यांत भीमानें धृतराष्ट्रपुत्रांचा पराभव केला असतां त्यामुळे चिडून त्याला विषप्रयोग करण्यापर्यंत ज्या नीचांची मजल गेली त्यांच्याविषयीं भीमाच्या अंतःकरणांत काय म्हणून द्वेष सचरूं नये ? भीमाच्या सामर्थ्यामुळेंच पाण्डव अजिक्य आहेत या समजुतीनें पहिल्यापासून भीमावरच धृतराष्ट्रासहित सर्व कौरवांनीं प्राणघेऊं भीषण आघात केलेले आहेत. लहानपणी वैराची कल्पना देखील नसतांना त्यांनी त्याच्यावर विषप्रयोग करून व मूर्च्छित स्थितीत त्याला लतापाशांनी बांधून नदीच्या पाण्यांत फेकून दिले. लाक्षागृहांत त्याला जिवंत जाळून टाकण्याचा प्रयत्न केला. स्वतःची माता कुंती व ज्येष्ठ बंधु युधिष्ठिर यांच्याविषयी भीमाला आत्यंतिक प्रेम असे. त्यांच्या दुर्गतीला लाक्षागृहानतर पारावार उरला नाही हें पाहून मूळचाच क्रोधी भीमसेन कौरवांचा कठोर विद्वेषी बनला असल्यास त्यांत नवल काय आहे ? आपल्यासारखा सामर्थ्यसपन्न पुत्र असतांना एके काळीं जगताची साम्राज्ञी म्हणून जी नांदली त्या आपल्या मातेला पाणी प्यावयास फुटके भाडेही असू नये व जाड कापड भिजवून तिला त्याचें पाणी पाजण्याचा आपल्यावर प्रसंग यावा याचें त्याच्या मानी अंतःकरणाला काय वाटले असेल! केवळ राज्यलोभामाठीं मनुष्य इतका नीच होऊ शकतो याची त्याच्या सरळ स्वभावाला कल्पनाही शिवली नव्हती. ज्या दिवशी त्यानें कुन्तीला वृक्षाखाली अनाथासारखें झोपतांना पाहिलें त्याच दिवशी त्याच्या अन्तःकरणांत कौरवाच्या विषयीचा भयानक विद्वेष बद्धमूल झाला. महाभारतकार म्हणतातः—

स सुप्तां मातरं दृष्ट्वा भ्रातॄंश्च वसुधातले ।
भृशं शोकपरीतात्मा विललाप वृकोदरः ॥ २१
अतः कष्टतरं किं नु द्रष्टव्यं हि भविष्यति ।
यत्पश्यामि महीसुप्तान्भ्रातॄनद्य सुमंदभाक् ॥ २२
शयनेषु परार्ध्येषु ये पुरा वारणावते ।
नाधिजग्मुस्तदा निद्रां तेऽद्य सुप्ता महीतले ॥ २३
स्वसारं वसुदेवस्य शत्रुसंघावमर्दिनः ।
कुन्तिराजसुतां कुंतीं सर्वलक्षणपूजिताम् ॥ २४
स्नुषां विचित्रवीर्यस्य भार्यां पाण्डोर्महात्मनः ।
तथैव चास्मज्जननीं पुण्डरीकोदरप्रभाम् ॥ २५
सुकुमारतरामेनां महार्हशयनोचिताम् ।
शयानां पश्यताऽद्येह पृथिव्यामतथोचिताम् ॥ २६
धर्मादिन्द्राच्च वाताच्च सुषुवे या सुतानिमान् ।
सेयं भूमौ परिश्रान्ता शेते प्रासादशायिनी ॥ २७
किं नु दुःखतरं शक्यं मया द्रष्टुमतःपरम् ।
योऽहमद्य नरव्याघ्रान्सुप्तान्पश्यामि भूतले ॥ २८
त्रिषु लोकेषु यो राज्यं धर्मनित्योऽर्हते नृपः ।
सोऽयं भूमौ परिश्रान्तः शेते प्राकृतवत्कथम् ॥ २९
अयं नीलाम्बुदश्यामो नरेष्वप्रतिमोऽर्जुनः ।
शेते प्राकृतवद्भूमौ ततो दुःखतरं नु किम् ॥ ३०
अश्विनाविव देवानां याविमौ रूपसंपदा ॥
तौ प्राकृतवदद्येमौ प्रसुप्तौ धरणीतले ॥ ३१
ज्ञातयो यस्य नैव स्युर्विषमाः कुलपांसनाः ।
स जीवेत सुखं लोके ग्रामद्रुम इवैकजः ॥ ३२
एको वृक्षो हि यो ग्रामे भवेत्पर्णफलान्वितः ।
चैत्यो भवति निर्ज्ञातिरर्चनीयः सुपूजितः ॥ ३३
येषां च बहवः शूरा ज्ञातयो धर्ममाश्रिताः ।
ते जीवन्ति सुखं लोके भवन्ति च निरामयाः ॥ ३४
बलवन्तः समृद्धार्था मित्रबान्धवनन्दनाः ॥
जीवन्त्यन्योन्यमाश्रित्य द्रुमाः काननजा इव ॥ ३५
वयं तु धृतराष्ट्रेण सपुत्रेण दुरात्मना ।
विवासिता न दग्धाश्च कथंचिद्दैवसंश्रयात् ॥ ३६

तस्मान्मुक्ता वय दाहादिमं वृक्षमुपाश्रिताः ।
कां दिशं प्रतिपत्स्यामः प्राप्ताः क्लेशमनुत्तमम् ॥ ३७
सकामो भव दुर्बुद्धे धार्तराष्ट्राल्पदर्शन ।
नूनं देवाः प्रसन्नास्ते नानुज्ञां मे युधिष्ठिरः ॥ ३८
प्रयच्छति वधे तुभ्यं तेन जीवसि दुर्मते ।
नन्वद्य ससुतामात्यं सकर्णानुजसौबलम् ॥ ३९
गत्वा क्रोधसमाविष्टः प्रेषयिष्ये यमक्षयम् ।
किं नु शक्यं मया कर्तुं यत्ते न क्रुध्यते नृपः ॥ ४०

—महाभारत, आदिपर्व अध्याय १५१

"आपली निजलेली आई व भाऊ पाहून अत्यंत शोकविव्हल झालेला भीम विलाप करूं लागला. तो म्हणाला, "आज जें मी माझ्या डोळ्यांनी पाहतों आहें त्याच्यापेक्षां अधिक शोककारक असें दुसरें कांही असू शकेल काय? माझ्या अत्यंत दुर्भाग्यानें या माझ्या बन्धूना मी जमिनीवर झोंपलेले पाहात आहें. जे पूर्वी वारणावतांत उत्कृष्ट शय्येवर देखील झोप येत नाही म्हणून म्हणत ते आज जमिनीवर झोपले आहेत. तशीच ही आमची माता अत्यंत सुकुमार असून व अत्यंत श्रेष्ठ शय्येवर झोपण्याची तिची पात्रता असूनही ती जमिनीवर झोपलेली मी पहात आहे. ही शत्रुसघाचें मर्दन करणाऱ्या वसुदेवाची बहीण, कुन्तीराजाची कन्या, सर्व श्रेष्ठ लक्षणांनी युक्त, महाराज विचित्रवीर्याची सून, महाभाग पाण्डुराजाची भार्या, व आमच्यासारख्यांची माता अमतांना तिनें अशा स्थितीत शयन करावें काय? धर्म, महेन्द्र, वायु यांच्यापासून जिला पुत्रलाभ झाला तिनें श्रान्त अवस्थेंत जमिनीवर आपलें अंग टाकावें काय? या माझ्या नरव्याघ्र बन्धूना मीं जमिनीवर झोपलेले पाहणें याहून अधिक दुःखकारक काय असू शकेल? जो धर्मनित्य राजा, त्रैलोक्याचें अधिराज्य करण्याच्या योग्यतेचा आहे तो आज परिश्रान्त स्थितीत एकाद्या सामान्य माणसाप्रमाणे जमिनीवर झोपला आहे, हा निळचा मेघाप्रमाणें श्यामवर्णाचा व लोकांमध्ये अप्रतिम असणारा अर्जुन एकाद्या प्राकृताप्रमाणे जमिनीवर झोपला आहे, याहून अधिक दुःखदायक काय असू शकेल? देवांमध्यें अश्विनीकुमार ज्याप्रमाणें सर्वांत

अधिक सुन्दर आहेत त्याप्रमाणेंच मनुष्यांत जे आपल्या रूपसंपत्तीनें सर्वश्रेष्ठ आहेत ते हे नुकुल सहदेव बिचारे कसे झोपले आहेत ? ज्याला कुलाधम व दुरात्मे नि भेदबुद्धीचे नातलग मुळीच नसतील तो एकटचा ग्रामवृक्षाप्रमाणें सुखाने आपलें जीवन जगू शकेल. गांवांत फुलें व पानें यांनी लदबदलेला व ज्याला कोणीच दुसरे आपल्या जातीचे समान वृक्ष भाग्यांत वांटेकरी व्हावयास नाहींत असा एकच वृक्ष असला तर लोक त्याच्यावर पार बांधतात, त्याला पूजनीय समजतात व त्याची पूजा करतात; तशीच एकटचा मानवाची अवस्था आहे. तसेंच ज्याला धार्मिक व शूर जातभाई असतात ते सर्व लोक विपत्ति नसलेल्या अवस्थेंत सुखाचें जीवन जगूं शकतात. असे लोक बलवान्, सर्व इच्छा पूर्ण झालेले आपले मित्र व बान्धव यांना आनन्द देणारे असे होऊन अरण्यांतील वृक्षांप्रमाणें एकमेकांच्या आश्रयावर जिवत राहतात. पण आमची ही काय अवस्था झाली आहे ! दुरात्म्या धृतराष्ट्रानें आपल्या पुत्रांसहित कारस्थान करून आम्हांला राजधानीतून हाकलून देऊन दग्ध करण्याचा प्रयत्न केला. आम्ही हांकलले गेलों. दग्ध झालो नाही हे केवळ आमचें दैव ! कसेतरी अग्नीपासून वांचून आम्ही या वृक्षाच्या तळवटी आलों आहों. आता आम्ही कोठे जावे ? केवढचा क्लेशांत आम्ही सांपडलों आहोंत ! हे क्षुद्रा दुर्बुद्धे दुर्योधना, तुझ्यावर देव खरोखरीच प्रसन्न आहेत म्हणूनच तुझा वध करावयास मला युधिष्ठिर अनुज्ञा देत नाहींत. त्यामुळेंच तू जिवत आहेस. वास्तविक पुत्र व अमात्यासहित व कर्ण नि शकुनिसहित या सर्व दुष्टांना ठार मारण्याची माझी इच्छा आहे. पण आमच्या राजाला राग येत नाही त्याला मी काय करूं."

भीमाच्या अन्तःकरणांत धृतराष्ट्रासहित सर्व कौरवांविषयी विद्वेष बद्धमूल व्हावयास कौरवच याप्रमाणे कारणीभूत झाले. युधिष्ठिराची ही महत्ता आहे की इतक्या भयानक अपराधानतर देखील त्याच्या अन्त.करणांत कौरवांविषयी विद्वेष उत्पन्न झाला नाही. तो झाला असता तर त्यालाही दोष देतां आला नसता. राज्यलोभासाठीं विष देण्यासारखी व आश्रयार्थ आलेल्या एका अनाथ विधवेला तिच्या पांच पुत्रांसहित जिवंत जाळून टाकण्यासारखीं पंचमहा-

पातकासारखी पातकें करावयास जे प्रवृत्त होतात ते धर्मशास्त्राप्रमाणेंच वध्य आहेत. मग भीमानें त्याच्या बाबतीत तोच निर्णय घेतला असला तर त्याला दोषी कसें ठरवितां येईल? कौरवांचे अपराध एवढ्यावरच थाबले असते तरीही गोष्ट वेगळी होती; पण तसें मुळींच झालें नाही. राज्य तोडून दिल्यावर तें पाण्डवांनी स्वतःच्या भरंवशावर वाढविलें तरी कौरवानी त्याचा विद्वेष करून द्यूताच्या वाममार्गानें तें घशात घातलें. कदाचित् भीम याही गोष्टीनें सतापला नसता. पण शूरांचा सर्वश्रेष्ठ मानबिंदु म्हणजे त्याची कुलस्त्री आहे. हें माहीत असतांना देखील युधिष्ठिरानें द्रौपदीला पणाला लावलें व तिचे केस धरून फरफटत दु.शासन तिला नागवी करण्याचा प्रयत्न करूं लागला. भीमाची काय अवस्था झाली असेल? एवढ्यासाठींच तुमचें भुजबल आहे काय, व नग्न केल्या जात असलेल्या बायकोचें ज्याला संरक्षण करतां येत नाही त्यानेच बकासुर व हिडिब यांना मारलें असेल काय असें विचारणारा आपला कटाक्ष जेव्हा भीमावर द्रौपदीनें टाकला तेव्हा त्याच्या हृदयाचे पाणी झाले. युधिष्ठिराच्या नियंत्रणामुळें त्याला कांही करता येईना. शेवटी तो युधिष्ठिरावरच संतापला व एकदम सभेंत उठून उभा राहून म्हणाला :—

भवन्ति गेहे बन्धक्यः कितवानां युधिष्ठिर ।
न ताभिरुत दीव्यन्ति दया चैवास्ति तास्वपि ॥ १
काश्यो यद्धनमाहार्षीद् द्रव्यं यच्चान्यदुत्तमम् ।
तथान्ये पृथिवीपाला यानि रत्नान्युपाहरन् ॥ २
वाहनानि धनं चैव कवचान्यायुधानि च ।
राज्यमात्मा वयं चैव कैतवेन हृतं परैः ॥ ३
न च मे तत्र कोपो भूत्सर्वस्येशो हि नो भवान् ।
इमं त्वतिक्रमं मन्ये द्रौपदी यत्र पश्यते ॥ ४
एषा हृष्यनर्हती बाला पाण्डवान्प्राप्य कौरवैः ।
त्वत्कृते क्लिश्यते क्षुद्रैर्नृशंसैरकृतात्मभिः ॥ ५
अस्याः कृते मन्युरयं त्वयि राजन्निपात्यते ।
बाहू ते संप्रधक्ष्यामि सहदेवाग्निमानय ॥ ६

—महाभारत, सभापर्व अध्याय ६८

"हे युधिष्ठिरा, प्रत्येक द्यूतकाराच्या घरीं दासी असतात. पण कोणी त्या दासींना देखील द्यूतांत कधी पणाला लावीत नाहींत. त्यांच्यावर देखील दया केली जाते. पण तू प्रत्यक्ष आपल्या कुल-स्त्रीची ही काय अवस्था करून टाकलीस ? राजसूय यज्ञांत मोठ-मोठ्या राजांनी तुला समर्पण केलेले नजराणे व सर्व संपत्ति, इतकेंच नव्हे तर राज्य आणि स्वतःचा देह तू द्यूतांत पणाला लावलास व या नीचांनी कपटानें तें सर्व जिकून घेतले. त्याचेंही मला तितकें दुःख झालें नाहीं. त्यामुळें मी रागावलों नाहीं. कारण कीं आम्हां सर्वांचा तूच धनी आहेस. पण द्रौपदीसारख्या धर्मपत्नीला तूं पणाला लावलेंस यांत मात्र तू स्वतःच्या अधिकाराचें अतिक्रमण केलें आहेस. आमच्याशी या निर्दोष स्त्रीचा संबंध आला हाच काय तो तिचा अपराध आहे. क्षुद्र, नृशंस व मन ताब्यांत नसलेल्या नराधमांकडून केवळ तुझ्यामुळेंच तिची ही असहनीय विटंबना चालली आहे. त्याच्यापेक्षांही राग धरावयाचा तो तुझाच धरला पाहिजे. ज्या हातांनी द्रौपदीची विटंबना होईल असें कुकृत्य तू केलेंस ते तुझे हातच मी जाळून टाकतों. जा. सहदेवा, ऊठ व अग्नि आण. मी हच्या युधिष्ठिराचे हात जाळून टाकतो." शेवटी अर्जुन मध्यें पडला व युधिष्ठिराचे हात वांचले. पण एवढ्यावरही हें प्रकरण मिटलें नाही. शेवटी दुःशासनानें द्रौपदीला नग्न करावयास्तव तिच्या वस्त्राला हात घालून नागराजाच्या शेपटीवर पाय द्यावा त्याप्रमाणें भीमाला डिवचले. तो तेथें प्रतिकार तर करूं शकत नव्हता, पण तो चालू प्रकार पाहतांच क्रोधानें ओठ थरथरत व हातावर हात चोळीत तो उभा राहिला व मानवेतिहासांत जिच्या रौद्रतेला उपमा नाही अशी भीषण प्रतिज्ञा त्यानें केली. तो म्हणाला:–

इदं मे वाक्यमावध्यं क्षत्रिया लोकवासिनः ।
नोक्तपूर्वं नरैरन्यैर्न चाप्यो यद्वदिष्यति ॥ ५१
यद्येतदेवमुक्त्वाहं न कुर्यां पृथिवीश्वराः ।
पितामहानां पूर्वेषां नाहं गतिमवाप्नुयाम् ॥ ५२

अस्य पापस्य दुर्बुद्धेर्भरतापसदस्य च ।
न पिबेयं बलाद्वक्षो भित्त्वा चेद्रुधिरं युधि ॥ ५३
—महाभारत, सभापर्व अध्याय ६८

" हे जगांतील क्षत्रियांनो, मीं जें बोलत आहे तें नीट कान उघडे ठेवून ऐका. आजपर्यंत असें कोणीही बोलला नाहीं व पुढेंही असें कोणी बोलू शकणार नाहीं. मी आतां जी प्रतिज्ञा करणार आहें ती जर मी पार पाडली नाही तर माझ्या पूर्वजांची पुण्यगति मला प्राप्त होणार नाही. या भरतकुलकलंक दुर्बुद्धीचें वक्षःस्थल फोडून मी जर त्याचें उष्ण रक्त प्राशन करणार नाही तर मला नरक प्राप्त होईल." भीमसेन ही भयकर प्रतिज्ञा करीत असतां धृतराष्ट्र, गांधारी, कुरुकुलांतील इतर सर्व सभ्य ती ऐकत होते. कोणीही त्याचें सांत्वन केलें नाहीं कीं निवारण केलें नाही. उलट त्याचा संताप अनावर होण्यासाठी दुःशासन पुन्हां पुन्हां द्रौपदीच्या केसांना हिसके देत व तिला फरफरां ओढत तिची अधिकाधिक अप्रतिष्ठा करू लागला. वृद्धांच्या घातक मौनाची व मदाध तरुण सत्ताधिपांच्या अधमपणाची नि पोरकटपणाचीही मर्यादा सुटली. गांधारीनें वा धृतराष्ट्रानें त्याच वेळी दुःशासनाचें निवारण करावयास हवे होतें. ते त्यांनी न केल्यावर त्याच्या परिणामांबद्दल त्यांना भीमाला काडीइतकाही दोष द्यावयाचा अधिकार उरत नाही. पुन्हां झालेल्या अनुद्यूतानतर पांडव वनांत जाऊ लागले असतां दुर्योधन न शोभेशा पोरकटपणानें भीमाच्या चालण्याची नक्कल करून त्याला वेडावू लागला, दुर्योधनाचें पाहून दुःशासन त्याला वारवार 'षंढ' व 'बैल' म्हणू लागला व धृतराष्ट्र तें सारें ऐकून मानसिक समाधान अनुभवू लागला. या सर्वच प्रकारांमुळें संतापलेला भीम म्हणाला :–

अहं दुर्योधनं हन्ता कर्णं हन्ता धनंजयः ।
शकुनिं चाक्षकितवं सहदेवो हनिष्यति ॥ २६
इदं च भूयो वक्ष्यामि सभामध्ये बृहद्वचः ।
सत्यं देवाः करिष्यन्ति यन्नो युद्धं भविष्यति ॥ २७
सुयोधनमिमं पापं हन्तास्मि गदया युधि ।
शिरः पादेन चास्याहमधिष्ठास्यामि भूतले ॥ २८

वाक्यशूरस्य चैवास्य परुषस्य दुरात्मनः ।
दुःशासनस्य रुधिरं पातास्मि मृगराडिव ॥ २९
—महाभारत, सभापर्व अध्याय ७७

" मी दुर्योधनाला ठार मारीन. कर्णाला अर्जुन ठार मारील व या कपटद्यूत खेळणाऱ्या शकुनीला सहदेव ठार मारील. पुनश्च या सभेमध्ये मी माझ्या घोर प्रतिज्ञेचा उच्चार करतों. जर आमचें युद्ध झालें तर देव माझी वाणी सत्य केल्याविना राहणार नाहीत. या पापी दुर्योधनाला मी गदेनें ठार मारीन व त्याचें मस्तक मी पायानें तुडवीन. तसेंच या केवळ वाक्शूर, कठोर व दुरात्म्या दुःशासनाचें मी एकाद्या सिंहाप्रमाणें रक्त प्राशन करीन." भीमानें जेव्हां हीं वाक्यें उंच्चारलीं तेव्हां त्याचा खरा भयंकरपणा कुरुकुलवृद्धांच्या ध्यानांत आला नाहीं. पण ज्या वेळीं ती खरीं झाली त्या वेळीं मात्र त्यांची छाती फाटल्यावाचून राहिली नाहीं. कुलस्त्रीचा अपमान होऊनही पांडव तो सहन करीत होते म्हणूनच दुःशासन भीमाला षंढ म्हणत होता ना? मग तो षढपणाचा आळ नष्ट करण्याचा, त्याचा भयकर सूड घेण्यावांचून दुसरा कोणता मार्ग भीमासाठी मोकळा होता ? केवळ युधिष्ठिराच्या नियत्रणामुळेंच तेरा वर्षेपर्यंत भीमसेनानें हा क्रोध मनांत वागविला. त्यामुळें त्याची अवस्था कशी वेडयासारखी होऊन गेली होती याचें वर्णन करतांना स्वतः श्रीकृष्णच म्हणतात :

नच स्वपिषि जागर्षि न्युब्जः शेषे परंतप ।
घोरामशान्तां रुषतीं सदा वाचं प्रभाषसे ॥ ५
निःश्वसन्नग्निवत्तेन संतप्तः स्वेन मन्युना ।
अप्रशान्तमना भीम सधूम इव पावकः ॥ ६
एकान्ते निःश्वसन् शेषे भारार्त इव दुर्बलः ।
अपि त्वां केचिदुन्मत्तं मन्यन्ते तद्विदो जनाः ॥ ७
आरुज्य वृक्षान् निर्मूलान् गजः परिरुजन्निव ।
निघ्नन् पद्भिः क्षितिं भीम निष्टनन् परिधावसि ॥ ८
नास्मिन् जने न रमसे रहः क्षिपसि पाण्डव ।
नान्यं निशि दिवा चापि कदाचिदभिनन्दसि ॥ ९
अकस्मात् स्मयमानश्च रहस्यास्से रुदन्निव ।
जान्वोर्मूर्धानमाधाय चिरमास्से प्रमीलितः ॥ १०

भृकुटिं च पुनः कुर्वन्नोष्ठौ च विदशन्निव ।
अभीक्ष्णं दृश्यसे भीम सर्वं तन्मन्युकारितम् ॥ ११

—महाभारत, उद्योगपर्व अध्याय ७५

"हे भीमा! तू झोंप घेत नाहीस. सदा जागाच असतोस. झोंपलास तरी नुसता पालथा पडून राहतोस. नेहमी घोर, अशांतिकारक व अत्यत रागाची अशीच वाणी तू उच्चारीत असतोस. अग्नि स्वतःच्याच ठिकाणी स्वतःच्याच तापानें जळत राहावा त्याप्रमाणें तूही स्वतःच्याच रागाने आपल्याच ठिकाणी जळफळत असतोस. अशांत मनानें तू सारखे निःश्वास सोडतांना धुरकटलेल्या अग्नीप्रमाणें दिसतोस. मंडळीत न मिसळतां एकाद्या भारार्त दुर्बलाप्रमाणें तू एकांतांत सुस्कारे टाकीत बसतोस. लोक तुला उन्मत्त समजतात. रस्त्यानें जात असतां उन्मत्त हत्ती जसा साऱ्या झाडांना मुळापासून उखडून तुडवीत जातो त्याप्रमाणें पायानें जमिनीवर जणू आघात करीत तू जातोस. लोकांत कधीही न मिसळतां एकांतांतच राहाणें तुला आवडतें. रात्री व दिवसा तुला कुणीही भेटले तरी ते तुला आवडत नाहीं. एकदमच तू हसतोस व एकांतात तू रडत बसतोस किंवा गुडघ्यांत डोकें घालून डोळे मिटून किती तरी वेळ तू राहातोस. भिवया पुनःपुन्हां वाकडया करीत सारखे दांतओठ तू चावीत असतोस." याप्रमाणें भयानक स्वरूपाचा संताप भीमसेनानें तेरा वर्षे सतत आपल्या हृदयांत वागविला. त्याला वेड लागण्याचीच पाळी आली होती असें म्हटले पाहिजे. अज्ञातवास संपतांच आपला सारा सताप केव्हां तरी काढण्याची सधि आली असेंच त्याला त्या वेळी वाटलें. अशा स्थितीत सधीच्या वाटाघाटी सुरू झाल्या व श्रीकृष्ण स्वतः संधीसाठी जाणार हें ऐकतांच तो अत्यंत विषण्ण झाला. राक्षसांपेक्षांही अधिक भीषण कर्म करणारे लोक सधीसाठी कसे काय योग्य आहेत हें त्याला कळेना. श्रीकृष्ण ज्या वेळी संधीवर त्याचें मत विचारू लागले त्या वेळी तो त्यांना उपरोधानें असें म्हणाला की,

अप्ययं नः कुरूणां स्याद्युगान्ते कालसम्भृतः ।
दुर्योधनः कुलाङ्गारो जघन्यः पापपूरुषः ॥ १८

तस्मान्मृदु शनैर्ब्रूया धर्मार्थसहितं हितम् ।
कामानुबद्धं बहुलं नोग्रमुग्रपराक्रम ॥ १९
अपि दुर्योधनं कृष्ण सर्वं वयमधश्चराः ।
नीचैर्भूत्वाऽनुयास्यामो मा स्म नो भरताऽनशन् ॥ २०

——महाभारत, उद्योगपर्व अध्याय ७४

"मला असें वाटतें कीं हा दुर्योधन म्हणजे युगान्तकाळीं काल-पुरुषानें भारलेला एक कुलांगार अति नीच असा पापपुरुष आहे. पण तू त्याच्याशी मृदु बोल. धर्म व अर्थानें युक्त, हितकारक, आपल्या इच्छा परिपूर्ण करणारे उग्र असें कांहीही बोलू नकोस. कारण की आपल्या भरतकुळांतील लोक वांचले पाहिजेत ना! हे कृष्णा, सारे कुळ वांचण्यासाठी हवें तर दुर्योधनाला सिंहासनावर बसवून आम्ही खाली उभे राहून त्याची सेवा करूं." श्रीकृष्णांनीं त्याच्या तोंडून हें अभूतपूर्व भाषण ऐकतांच त्याचा क्रोध चेत-विण्यासाठी 'तू भ्यालास काय' असें विचारलें. त्याबरोबर चिडून तो इतकेंच म्हणाला कीं,

विगाढे युधि सम्बाधे वेत्स्यसे मां जनार्दन ।
परुषैराक्षिपसि किं व्रणं पूतिमिवोन्नयन् ॥ १४

——महाभारत, उद्योगपर्व अध्याय ७६

"हे जनार्दना, भयानक महायुद्ध सुरू झाल्यावर मी भ्यालों कीं काय हें तुला आपोआप कळेल. उगाच माझ्या अंतःकरणाच्या जखमा कशाला उकरतोस?"

शेवटी भीषण महायुद्ध झालें व इतक्या दिवसाच्या भीमाच्या इच्छा संपूर्ण करण्याची सुवर्णसधि त्याला मिळाली. एकाहून एक भयकर पंचमहापातकांच्या राशी उभारणाऱ्या सर्व नराधमांना धर्मशास्त्रानुसार त्यानें कठोरांतले कठोर दंड दिले. राजसभेंत कुल-स्त्रीचे केश धरून ओढणाऱ्या व भीमाला षंढ म्हणणाऱ्या दुःशासन-दुर्योधनादिकांना त्याची प्रतिज्ञा ऐकतांना तुच्छ वाटली. पण ती खरी होतांना मात्र त्यांना स्वत चेंच षंढत्व पूर्णपणें पटून त्यांच्या अगावर शहारे उत्पन्न झाले. तेंच काय?.पण भीमाच्या प्रति-शोधाच्या रोमांचकारी कथा ऐकणाऱ्या लोकाना आज पांच हजार

वर्षानंतर देखील हृदय थरारल्याचा अनुभव आल्याविना राहाणार नाहीं. दुःशासनाला भीमसेन उग्र दंड देत असतां कौरवपक्षीयच काय पण पाण्डवपक्षीय मंडळी सुद्धां थरारल्यावांचून राहिली नाहींत. महारथि कर्ण व दुर्योधन पहात असतां त्यानें तो उग्र दंड दिला आहे.

रोमांचकारी प्रतिशोध

महाभारतकार दुःशासनाच्या वधाचें वर्णन करतांना म्हणतातः—

तं पातयित्वाऽथ वृकोदरोऽथ जगर्ज हर्षेण विनादयन् दिशः ।
नादेन तेनाऽखिलपार्श्ववर्तिनो मूर्च्छाकुलाः पतितास्त्वाजमीढ ॥ १२
भीमोऽपि वेगादवतीर्य यानाद् दुःशासनं वेगवानभ्यधावत् ।
ततः स्मृत्वा भीमसेनस्तरस्वी सापत्नकं यत्प्रयुक्तं सुतैस्तें ॥ १३
तस्मिन्सुघोरे तुमुले वर्तमाने प्रधानभूयिष्ठतरैः समन्तात् ।
दुःशासनं तत्र समीक्ष्य राजन्भीमो महाबाहुरचिन्त्यकर्मा ॥ १४
स्मृत्वाथ केशग्रहणं च देव्या वस्त्रापहारं च रजस्वलायाः ।
अनागसो भर्तृपराङ्मुखाया दुःखानि दत्तान्यपि विप्रचिन्त्य ॥ १५
जज्वाल क्रोधादथ भीमसेन आज्यप्रसिक्तो हि यथा हुताशः ।
तत्राह कर्णं च सुयोधनं च कृपं द्रौणिं कृतवर्माणमेव ॥ १६
निहन्मि दुःशासनमद्य पापं संरक्ष्यतामद्य समस्तयोधाः ।
इत्येवमुक्त्वा सहसाऽभ्यधावन्निहन्तुकामोऽतिबलस्तरस्वी ॥ १७
तथा तु विक्रम्य रणे वृकोदरो महागजं केसरिको यथैव ।
निगृह्य दुःशासनमेकवीरः सुयोधनस्याधिरथेः समक्षम् ॥ १८
रथादवप्लुत्य गतः स भूमौ यत्नेन तस्मिन्प्रणिधाय चक्षुः ।
असिं समुद्यम्य सितं सुधारं कण्ठे पदाऽऽक्रम्य च वेपमानम् ॥ १९
उवाच तद्गौरिति यद् ब्रुवाणो हृष्टो वदेः कर्णसुयोधनाभ्याम् ।
ये राजसूयावभृथे पवित्रा जाताः कचा याज्ञसेन्या दुरात्मन् ॥ २०
ते पाणिना कतरेणावकृष्टास्तद् ब्रूहि त्वां पृच्छति भीमसेनः ।
श्रुत्वा तु तद् भीमवचः सुघोरं दुःशासनो भीमसेनं निरीक्ष्य ॥ २१
जज्वाल भीमं स तदा स्मयेन संशृण्वतां कौरवसोमकानाम् ।
उक्तस्तदाऽऽजौ स तया सरोषं जगाद भीमं परिवर्तनेत्रः ॥ २२
अयं करिकराकारः पीनस्तनविमर्दनः ।
गोसहस्रप्रदाता च क्षत्रियान्तकरः करः ॥ २३

अनेन याज्ञसेन्या मे भीम केशा विकर्षिताः ।
पश्यतां कुरुमुख्यानां युष्माकं च सभासदाम् ॥ २४
एवं त्वसौ राजसुतं निशम्य ब्रुवन्तमाजौ विनिपीडय वक्षः ।
भीमो बलात्तं प्रतिगृह्य बोर्भ्यामुच्चैर्ननादाथ समस्तयोधान् ॥ २५
उवाच यस्यास्ति बलं स रक्षत्वसौ भवेदद्य निरस्तबाहुः ।
दुःशासनं जीवितं प्रोत्सृजन्तमाक्षिप्य योधांस्तरसा महाबलः ॥ २६
एवं क्रुद्धो भीमसेनः करेण उत्पाटयामास भुजं महात्मा ।
दुःशासनं तेन स वीरमध्ये जघान वज्राशनिसन्निभेन ॥ २७
उत्कृत्य वक्षः पतितस्य भूमावथापिबच्छोणितमस्य कोष्णम् ।
ततो निपात्यास्य शिरोपकृत्य तेनासिना तव पुत्रस्य राजन् ॥ २८
सत्यां चिकीर्षुर्मतिमान् प्रतिज्ञां भीमोऽपिबच्छोणितमस्य कोष्णम् ।
आस्वाद्य चास्वाद्य च वीक्षमाणः क्रुद्धो हि चैनं निजगाद वाक्यम् ॥२९
"स्तन्यस्य मातुर्मधुसर्पिषोर्वा माध्वीकपानस्य च सत्कृतस्य ।
विध्यस्य वा तोयरसस्य पानात्पयोदधिभ्यां मथिताच्च मुख्यात् ॥ ३०
अन्यानि पानानि च यानि लोके सुधामृतस्वादुरसानि तेभ्यः ।
सर्वेभ्य एवाभ्यधिको रसोऽयं ममाद्य चास्याहितलोहितस्य" ॥ ३१
अथाह भीमः पुनरुग्रकर्मा दुःशासनं क्रोधपरीतचेताः ।
गतासुमालोक्य विहस्य सुस्वरं किं वा कुर्यां मृत्युना रक्षितोऽसि ॥ ३२
एवं ब्रुवाणं पुनराब्रवन्तमास्वाद्यमानं तमतिप्रहृष्टम् ।
ये भीमसेनं ददृशुस्तदानीं भयेन तेऽपि व्यथिता निपेतुः ॥ ३३
ये चापि नासन् व्यथिता मनुष्यास्तेषां करेभ्यः पतितं हि शस्त्रम् ।
भयाच्च संचुक्रुशुरस्वरंस्ते निमीलिताक्षा ददृशुः समन्ततः ॥ ३४
तं तत्र भीमं ददृशुः समन्ताद्दुःशासनं तद्रुधिरं पिबन्तम् ।
सर्वेऽपलायन्त भयाभिपन्ना न वै मनुष्योऽयमिति ब्रुवाणाः ॥ ३५
तस्मिन्कृते भीमसेनेन रूपे दृष्ट्वा जनाः शोणितं पीयमानम् ।
संप्राब्रवंश्चित्रसेनेन सार्धं भीमं रक्षो भाषमाणा भयार्ताः ॥ ३६
भीमोऽपि हत्वा तत्रैव दुःशासनममर्षणम् ।
पूरयित्वाञ्जलिं भूयो रुधिरस्योग्रनिःस्वनः ॥ ४१
शृण्वतां लोकवीराणां इदं वचनमब्रवीत् ।
एष ते रुधिरं कण्ठात् पिबामि पुरुषाधम ॥ ४२
ब्रूहीदानीं तु संहृष्टः पुनर् गौरिति गौरिति ।
ये तदाऽस्मान् प्रनृत्यन्ति पुनर् गौरिति गौरिति ॥ ४३

तान्वयं प्रतिनृत्यामः पुनर्गौरिति गौरिति ।
प्रमाणकोट्यां शयनं कालकूटस्य भोजनम् ॥ ४४
दंशनं चाहिभिः कृष्णैर्दाहं च जतुवेश्मनि ।
द्यूतेन राज्यहरणमरण्ये वसतिश्च या ॥ ४५
द्रौपद्याः केशपक्षस्य ग्रहणं च सुदारुणम् ।
इष्वस्त्राणि च संग्रामेष्वसुखानि च वेश्मनि ॥ ४६
विराटभवने यश्च क्लेशोऽस्माकं पृथग्विधः ।
शकुनेर्धार्तराष्ट्रस्य राधेयस्य च मन्त्रिते ॥ ४७
अनुभूतानि दुःखानि तेषां हेतुस्त्वमेव हि ।
दुःखान्येतानि जानीमो न सुखानि कदाचन ॥ ४८
धृतराष्ट्रस्य दौरात्म्यात्सपुत्रस्य सदा वयम् ।
इत्युक्त्वा वचनं राजञ्जयं प्राप्य वृकोदरः ॥
पुनराह महाराज स्मयंस्तौ केशवार्जुनौ ॥ ४९
असृग्दिग्धो विल्ववल्लोहितास्यः क्रुद्धोत्थयं भीमसेनस्तरस्वी ।
दुःशासने यद्रणे संश्रुतं मे तद्वै सत्यं कृतमद्येह वीरौ ॥ ५०

——महाभारत, कर्णपर्व अध्याय ८३

"नंतर त्याला खालीं पाडून व नीच आपल्या तावडीत आला या कल्पनेनें भीमानें हर्षानें गर्जना करून दशदिशा दणाणून सोडल्या. त्याच्या त्या नादानें सभोवारचे सर्व लोक मूर्च्छित होऊन जमिनीवर पडले. नंतर कौरवांनी आजवर केलेले सर्व अपकार मनांत आणून भीमसेन आपल्या वाहनावरून खाली उतरला व सूड घेण्यासाठी म्हणून वेगानें दुःशासनाच्या अगावर चालून गेला. दुःशासनाला पाहतांच देवी द्रौपदीच्या रजस्वला स्थितींतील वस्त्रापहरणाची, तिच्या केशग्रहणाची व पति अगतिक अवस्थेंत आहेत हें पाहून त्या निरागस महासाध्वीला दिलेल्या भयानक क्लेशांची स्मृतिचित्रें भीमाच्या डोळ्यासमोर तरळू लागली व हविर्भाग दिलेला अग्नि ज्याप्रमाणें भडकून उठतो त्याचप्रमाणें क्रोधानें भीमसेनही अत्यत सतप्त झाला. त्यानें कर्ण, दुर्योधन, कृपाचार्य, कृतवर्मा, अश्वत्थामा याना हांका मारून अमें सांगितले की हे सर्व योद्धयांनो, मी या मूर्तिमंत पाप असलेल्या दुःशासनाला तुम्हां सर्वांसमक्ष ठार करणार आहें. ज्याचें सामर्थ्य असेल त्यानें याचें सरक्षण करावें. असें

बोलून अत्यंत बलवान् भीमसेनानें सिहानें मोठ्या हत्तीला पकडावें त्याप्रमाणें दुर्योधन व कर्णासमक्ष दुःशासनाला घेरलें. त्याच्या डोळ्यांत इतका क्रोध चढला होता की त्याला खालीं पाडून भीमानें त्याच्या गळ्यावर आपला पाय दिला व तो वेदनेनें किंचाळत असतांनाच त्यानें आपलें खड्ग निष्कोषित करून हातांत घेतलें. त्यानें त्याला जोरानें विचारलें, तू आम्हांला कर्ण व दुर्योधना-समक्ष बैल असें म्हणत होतास नाही काय ? बोल, राजसूय यज्ञाच्या अवभृथस्नानानें जे पवित्र झाले ते देवी याज्ञसेनीचे केश तू कोणच्या हातानें धरून ओढलेस ? हे दुरात्म्या, तुला भीमसेन विचारीत आहे बोल. भीमाचें हें वाक्य ऐकतांच त्या स्थितींतही दुःशासनाचा अभिमान जागृत होऊन ज्या हातानें त्यानें द्रौपदीच्या केसांना स्पर्श केला होता तो भीमाच्या डोळ्यासमोर उभारीत तो म्हणाला, पहा हा तो हात आहे. हत्तीच्या सोंडेप्रमाणें पुष्ट, शृंगारांत पीनस्तनांचें विमर्दन करणारा, सहस्रावधि गोप्रदानें करणारा व क्षत्रियांचा अन्त करणारा हा हात आहे. हे भीमा, कौरव कुळांतील प्रमुख लोक पहात असतां, सारे सभासद उपस्थित असतां तुमच्या डोळ्यांसमोर याच हातानें मी याज्ञसेनीचे केस ओढले. त्याची ती मरणकाळची धिटाई पाहून भीमानें त्याच्या छातीला पीडा देत आपल्या दोन्ही हातांनी त्याला बळानें गच्च आवळून पुन्हां जोरानें गर्जना केली व सर्व योद्धयांना असें सांगितलें कीं मी याचा हा हात उपटतो. ज्याच्यात सामर्थ्य असेल त्यानें याचें रक्षण करावें. याप्रमाणें बोलून भीमसेनानें दुःशासनाचा हात उपटून काढला व सर्व लोकांसमक्ष त्यानेंच त्यास ठार मारलें. नतर हातांतील खड्गानें त्याचें मस्तक तोडून व हृदय विदारण करून भीमसेन त्यांतून निघ-णारें उष्ण रक्त आपली प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं पिऊं लागला. पुनःपुन्हां आस्वाद घेऊन तें रक्त प्राशन करीत असतां तो म्हणाला, मातेचें स्तन्य, जगांतील सर्व मधुर रस, उत्कृष्ट मदिरा इतकेच नव्हे तर समुद्रमंथनातून निघालेलें अमृत, यापेक्षांही या रक्ताची गोडी अधिक श्रेष्ठ आहे हयांत शका नाही. त्या रक्तप्राशनानेंही उग्रकर्म्या भीमसेनाचा राग शांत झाला नाही. त्याच्यां मृत देहाकडे पाहून तो

म्हणाला, काय करावें ? आतां मला तुझें कांहींच करतां येणें शक्य नाहीं. मृत्यूनें तुझें संरक्षण केलें आहे. पुनःपुन्हां रक्त पिणाऱ्या व अत्यंत हर्षित झालेल्या भीमसेनाला त्या भयानक स्थितींत पाहतांच कित्येक त्रस्त व्यथित होऊन मूर्च्छित होऊन खालीं पडले. कित्येकांच्या हातांतली शस्त्रें भयानें गळून पडली. कांहीं आर्त निनाद करूं लागले. कांहींनीं आपले डोळे गच्च मिटून घेतले व हा मनुष्य नाहीं असें म्हणत कित्येक पळून गेले. पळतांना देखील ते थरकांपत होते. पुन्हां भीमानें दुःशासनाच्या रक्तानें आपली अंजलि भरून घेऊन सर्व वीरांसमक्ष म्हटलें हे पुरुषाधमा, नीट पहा. आज मी तुझा कण्ठनाल चिरून त्यांतील उष्ण रक्त प्राशन करीत आहें. पुन्हां आम्हांला गाय म्हण. त्या वेळीं तुम्ही आम्हांला गाय म्हणून नाचत होतात, आज आम्ही तुम्हांला गाय म्हणून नाचत आहोत. विषप्राशन करवून नदीत फेकून देणें, सर्पदंश करविणें, लाक्षागृहांत जाळून टाकण्याचा प्रयत्न करणें, कपटद्यूतानें राज्य हरण करणें, अकारण वनवासाचें दुःख देणें, सर्वांत भयंकर असें द्रौपदीच्या केशपाशाचें कर्षण, सदोदित छळ करीत राहाणें, हया सर्वांचें हें फळ आहे. विराट राजाचे येथे आम्ही जे अपार क्लेश भोगले व शकुनि, दुर्योधन आणि कर्ण यांनी कारस्थानें करून आम्हांला जो त्रास दिला त्याचें हें फळ आहे. आमच्या अनेकविध दुःखाचें तूच कारण आहेस. दुरात्म्या धृतराष्ट्रानें आम्हाला जन्मभर क्लेश दिले. आपल्या पुत्रांसहित त्यानें आम्हांला छळलें. थोडेदेखील सुख त्यानें आम्हांला लाभू दिलें नाहीं त्याचें हें दारुण फळ आहे. याप्रमाणें बोलून रक्तानें न्हालेला भीमसेन श्रीकृष्ण व अर्जुन हयांच्या जवळ आला व मी केलेली प्रतिज्ञा पूर्णपणें खरी केली असें त्यानें त्यांना सांगितलें."

ज्याप्रमाणें भीमसेनानें दुःशासनाचें रक्त प्राशन करून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली त्याचप्रमाणें गदायुद्धांत दुर्योधनाच्या मांडया मोडून त्याला खालीं पाडल्यावर लाथेनें त्याचें मस्तक तुडवून आपली दुसरीही प्रतिज्ञा त्यानें पूर्ण केली. महाभारतकार म्हणतात :—

ततो दुर्योधनं हत्वा भीमसेनः प्रतापवान् ।
पातितं कौरवेन्द्रं तमुपगम्येदमब्रवीत् ॥ ३

गौर्गौरिति पुरा मन्द द्रौपदीमेकवासम् ।
यत्सभायां हसन्नस्मांस्तदा वदसि दुर्मते ॥ ४
तस्यावहासस्य फलमद्य त्वं समवाप्नुहि ।
एवमुक्त्वा स वामेन पदा मौलिमुपास्पृशत् ॥ ५
शिरश्च राजसिंहस्य पादेन समलोडयत् ।
तथैव क्रोधसंरक्तो भीमः परबलार्दनः ॥ ६
पुनरेवाब्रवीद्वाक्यं यत्तच्छृणु नराधिप ।
येऽस्मान्पुरोपनृत्यन्त मूढा गौरिति गौरिति ॥
तान्वयं प्रतिनृत्यामः पुनर् गौरिति गौरिति ।
नास्माकं निकृतिर्वह्निर्नाक्षद्यूतं न वञ्चना ॥ ८
स्वबाहुबलमाश्रित्य प्रबाधामो वयं रिपून् ॥
सोऽवाप्य वैरस्य परस्य पारं वृकोदरः प्राह शनैः प्रहस्य ।
युधिष्ठिरः केशवसृञ्जयांश्च धनंजयं माद्रवतीसुतौ च ॥ ९
रजस्वलां द्रौपदीमानयन्ये येचाप्यकुर्वन्त सदस्यवस्त्राम् ।
तान्पश्यध्वं पाण्डवैर्धार्तराष्ट्रान् रणे हतांस्तपसा याज्ञसेन्याः ॥ १०
ये नः पुरा षण्ढतिलानवोचन् क्रूरा राज्ञो धृतराष्ट्रस्य पुत्राः ।
ते नो हताः सगणाः सानुबन्धाः कामं स्वर्गं नरकं वा पतामः ॥११
पुनश्च राज्ञः पतितस्य भूमौ स तां गदां स्कन्धगतां प्रगृह्य ।
वामेन पादेन शिरः प्रमृद्य दुर्योधनं नैकृतिकं न्यबोचत् ॥ १२
—महाभारत, शल्यपर्व अध्याय ५९

"नंतर दुर्योधनाला खाली पाडून प्रतापशाली भीमसेन त्याच्या जवळ येऊन म्हणाला, आम्हाला हंसत एकवस्त्रा द्रौपदीला गाय असें म्हणून पूर्वी तू जो तिचा उपहास केलास त्याचें फळ हे दुर्मते, तू आतां भोग, असें म्हणून त्यानें आपल्या डाव्या पायानें राजा दुर्योधनाच्या मस्तकावर लाथ मारली. पुन्हां क्रोधानें डोळे आरक्त करून तो म्हणाला, पूर्वी शत्रु आम्हांला गाय म्हणून नाचत होते. आज आम्ही त्यांना गाय म्हणून नाचत आहोंत. आम्ही कांहीं यांच्याप्रमाणें अग्नि व द्यूताचें कपट करून व वंचना करून आमच्या शत्रूंना पीडा देत नाही. स्वतःच्या बाहुबलाच्या भरंवशावर आम्ही आमच्या शत्रूना पीडा देतों. नंतर वैराच्या पार जाऊन हंसत हंसत भीमसेन युधिष्ठिर श्रीकृष्ण इत्यादिकांच्या जवळ आला व त्यांना म्हणाला, "रजस्वला द्रौपदीला ज्यांनी सभेंत आणलें व तिला नग्न

करण्याचा जे प्रयत्न करीत होते त्या धृतराष्ट्रपुत्रांना द्रौपदीच्या तपानें पांडवानी ठार मारलें. जे राजा धृतराष्ट्राचे पुत्र आमच्याशी क्रूरपणानें वागून आम्हांला षंढ म्हणत होते ते आज सपुत्रपौत्रबांधव आम्ही ठार मारले आहेत. मग या कृत्यानें आम्हांला स्वर्ग मिळो वा नरक मिळो." याप्रमाणें बोलून पुनश्च हातांत गदा घेऊन तो दुर्योधनाजवळ आला व त्यानें त्याच्या मस्तकावर डाव्या पायाने पुनश्च लत्ताप्रहार केला. सारे धृतराष्ट्रपुत्र भीमसेनानें ठार मारून टाकले. पण या बाबतींत त्याला दोष देतां येणार नाहो. कारण त्यांनी त्याचे तसेच भयानक अपराध केले होते. मेल्यानंतरही कौरवांना भीमानें क्षमा केली नाहीं. घोर अपराध झाल्यावर जगांतल्या महापुरुषांनीं तो अपराध करणाऱ्यांचा असाच भयंकर प्रतिशोध घेतलेला आहे. वंचनेनें पित्याला मारल्यावर साऱ्या सत्ताधीशाची खांडोळी उडविणाऱ्या वीरश्रेष्ठ भार्गवरामांना आर्यसंस्कृतीनें भगवंताचा अवतार मानले आहे. वंचना करून शहाजी राजांना पकडून देणाऱ्या घोरपडयांचा एका रात्री निर्वश करून टाकणाऱ्या छत्रपति शिवरायांना भारतीय संस्कृतीनें अवतारी पुरुषच मानले आहे. मग भीमाला तरी याविषयी दोष कसा देता येणार? नुसते एका वंशात जन्मल्यानें कुणी कुणाचे बधु होत नसतात. जे समान जीवनविषयक दृष्टिकोनाचे ते आपले व जे त्या जीवनदृष्टीला नष्ट करावयास उद्युक्त होतील ते परके हाच या बाबतीतील खरा दृष्टिकोन आहे. कौरवांनीं आर्यसंस्कृतीच्या जीवनमूल्यांनाच धक्का लावण्याचा प्रयत्न केला. त्याचे फळ भीमानें त्यांना भोगावयास लावलें.

भीमाला यासंबधी कधीही पश्चात्ताप वाटला नाहीं. पश्चात्ताप वाटण्यासारखें त्यांत कांहीही नव्हतेंच. गांधारीनें ज्या वेळी त्याला तू दुःशासनाचें रक्त का प्यालास असें विचारलें त्या वेळी मी दुःशासनाचें रक्त प्यालों नसून प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं केवळ आपले ओठ रक्तांत भिजविले असें तिला सांगून भीम म्हणाला की .—

न मामर्हसि गान्धारि दोषेण परिशंकितुम् ।
अनिगृह्य पुरा पुत्रानस्मास्वनपकारिषु ।
अधुना किं नु दोषेण परिशंकितुमर्हसि ॥ २०

—महाभारत, स्त्रीपर्व अध्याय १५ ·